00066051

...T TO BE K... D OUT
...OU... PERMISSI...N.

THE
ASIATIC SOCIETY OF BOMBAY
Town Hall, Bombay.

Digitized with financial assistance from
Ms.Vaidehi Thakar
on 06 November, 2019

THE MAHÂBHÂRAT

OF

MOROPANT.

(THE GREAT MARÂTHÎ POET OF THE MAHÂRÂSHTRA.)

1. ADIPARVA.

Ø 2780

EDITED WITH

CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY

JANARDAN BALAJI MODAK, B. A.,

AND

VAMAN DAJI OKA.

LIBRARY OF THE BOMBAY BRANCH OF THE ROYAL ASIATIC

PRINTED AND PUBLISHED

BY

THE PROPRIETOR

OF

THE "NIRNAYA-SÂGAR" PRESS.

BOMBAY.

/NXA-d-3

1891.

Price 1¼ Rupee.

Mot / Pali
66057

(Registered according to act XXV of 1867.)

(All rights reserved by the Publisher.)

महाराष्ट्रकविवर्यमोरोपंतकृत

महाभारत.

१. आदिपर्व.

हें

जनार्दन बाळाजी मोडक, बी. ए.,

व

वामन दाजी ओक

यांनीं अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन शुद्ध केलें.

66051

आणि

मुंबईंत निर्णयसागर छापखान्याचे मालक यांनीं आपल्या
छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

१८९१.

किंमत १। रुपया.

00066051

आस्तिकपर्वांची अनुक्रमणिका.

अध्याय	श्लोकसंख्या	विषय
१	९५	ध्यान—स्मरण—वंदन—सूतागमन—सूताप्रति शौनकाज्ञा—कथारंभ—भारतग्रंथ—विभाग—कथागुण.
२	१३८	जनमेजयास सरमेचा शाप—त्याचा उपाध्याय सोमश्रवा—आरुण्यादिशिष्याख्यान—उत्तंकचरित—पौष्यराजचरित—सर्पसत्र.
३	६०	भृगुवंशवर्णन—च्यवनोत्पत्ति—पुलोमाहरण—अग्नीस भृगुशाप—ब्रह्महत्यासमाधान—रुरुचरित.
४	१७२	आस्तीककथा—आस्तिकऋषीचें जन्म व कृत्य—कश्यपभार्या कद्रु व विनता—सर्पोत्पत्ति—अरुणोत्पत्ति—अरुणाचा विनतेस शाप व उःशाप—अमृतमंथन—चतुर्दशरत्नोत्पत्ति—मोहिन्यवतार—राहुशिरच्छेद—सर्पशाप—कद्रुविनतासंवाद—गरुडोत्पत्ति—अरुणास सूर्याचें सारथ्य—विनतादास्यांगीकार—दास्यविमोचनोपाय—अमृताहरणार्थ गरुडगमन—गरुडभक्ष्य—वालखिल्यऋषिकथा—देवगरुडयुद्ध—वरलाभ—इंद्रगरुडयुद्ध—इंद्रगरुडसंवाद—सर्पास अमृताचा लाभ व त्याचें हरण—सर्पविलाप.
५	१७६	शेषाचें तप—वरलाभ—सर्पशापनिवारणविचार—जरत्कारुतपोनिष्ठा—परीक्षिच्चरित—जनमेजयराज्याभिषेक—जरत्कारुविवाह—आस्तिकजन्म.
६	१९	परीक्षिन्मृत्युकथा—सर्पसत्रोद्योग.
७	६९	सर्पसत्रार्थ जनमेजयास यज्ञदीक्षा—ऋषिवर्णन—इंद्रकृत तक्षकाश्वासन—आस्तिकसर्पसत्रागमन—आस्तिककृत राजस्तुति—आस्तिकवरप्रदान—सर्पसत्रसमाप्ति.
८	६६	शौनकसूतप्रश्नोत्तरें—उपरिचरराजचरित—व्यासजन्म—रामकृष्णभीष्माद्युत्पत्ति.

अध्याय.	ग्रंथसंख्या.	विषय.
९	६७	सूर्यचंद्रवंशोत्पत्ति—कचदेवयान्युपाख्यान.
१०	८२	शर्मिष्ठा व देवयानी यांचा कलह—शुक्र व वृषपर्वा यांचा देवयानीस बोध—देवयानीपाणिग्रहण—यदुजन्म.
११	८६	शर्मिष्ठागांधर्वविवाह—पुत्रोत्पत्ति—देवयानीशर्मिष्ठासंवाद—ययातीस शुक्राचा शाप—पुरुराज्याभिषेक—ययातीचें स्वर्गाधिरोहण—आत्मस्तुतीमुळें पतन—सत्समागमद्वारा उद्धार.
१२	९८	दुष्यंतशकुंतलाख्यान—भरतराज्यपदलाभ—पूर्वजकथा.
१३	१००	महाभिषराजोपाख्यान—प्रतीपोपाख्यान—शांतनुगंगासंवाद—शांतनूचा गंगेशीं विवाह—वसिष्ठाख्यान—देवव्रत (भीष्म) यासह गंगा अंतर्धान पावते—शांतनु व भीष्म यांचें चरित्र.
१४	१९	शांतनूस सत्यवतीच्या पोटीं चित्रांगद व विचित्रवीर्य होतात—गंधर्वयुद्धांत चित्रांगदाचा वध—विचित्रवीर्याचा काशीराजकन्यांशीं विवाह व त्याचें क्षयरोगानें मरण.
१५	९३	वंशवृद्धीस्तव विवाह करण्याविषयीं सत्यवतीचा भीष्मास उपदेश—त्याचें उत्तर—पांडु, धृतराष्ट्र आणि विदुर यांची उत्पत्ति—यमाचा अवतार विदुर—मांडव्यशापकथा—पांडूची राज्यपदप्राप्ति—धृतराष्ट्रविवाह.
१६	२९	कुंती दुर्वासऋषीची सेवा करते—कर्णोत्पत्ति—पृथास्वयंवर—माद्रीशीं पांडूचा विवाह—दिग्विजय—विदुरविवाह.
१७	२६	गांधारीला व्यासाचा शतपुत्र होण्याविषयींचा वर—दुःशला जन्मवृत्त, युयुत्सुसंभव.
१८	१००	पांडुहस्तें किंदममुनिमरण—त्याचा पांडूला शाप—सन्नि… पांडूची तपश्चर्या—अपुत्रत्वनिमित्त त्याला चिंता—पांडवां… उत्पत्तिकथा.
१९	२६	कामातुर पांडूचा स्वभार्येसह विहार—शापविस्मृति—पांडु… रण—पांडूचा प्रेतसंस्कार—माद्रीसहगमन—कुंतीचें पांडव… सह हस्तिनापुरास परत येणें—व्यासाचा मातेस (सत्य…

[illegible]	अध्यायसंख्या.	विषय.
		तास) शोध—उभय सुनांसह सत्यवतीचें उत्तमलोकगमन.
	४३	पांडवपराक्रम—दुर्योधनखेद—जलक्रीडा—दुर्योधन भीमास विषास चारतो—संज्ञाहीन भीम गंगेंत बुडून नागलोकास जातो—तन्निमित्त शोध आणि कुंती व पांडव यांचा शोक—विदुरकृत समाधान—वासुकि भीमास आठ दिवस ठेवितो—त्याचें परत येणें.
	१२	कृप आणि कृपी यांची उत्पत्ति—त्यांचें शांतनुहस्तें पालन—कृपाचें पित्यापाशीं (शरद्वान् ऋषीपाशीं) धनुर्वेदपठन.
	१६	द्रोणाची उत्पत्ति—द्रोण आणि द्रुपद यांचें गुरुबंधुत्व—द्रोणाचा कृपीशीं विवाह—त्यांचा पुत्र अश्वत्थामा—द्रोणाला परशुरामापासून सरहस्य धनुर्वेदास्त्रप्राप्ति.
	४६	द्रुपदगृहीं द्रोणाचा अपमान—तो कृपाचार्यांच्या घरीं गुप्तरूपें अर्जुनास अस्त्रविद्या शिकवितो—कौरवपांडवांचा विटीदांडूचा खेळ—वीट विहिरींत पडते—द्रोण मंत्रबळानें ती बाहेर काढतो—ही वार्ता मुलें भीष्मास सांगतात—भीष्मद्रोणसमागम—द्रोणाचा सत्कार—द्रोण भीष्मानुमतें कौरवपांडवांस अस्त्रविद्या शिकवितो.
	५६	अर्जुनाचें अस्त्रविद्याप्राविण्य, गुरुप्रेम आणि अद्वितीय धनुर्धरत्व—एकलव्याची धनुर्वेद शिकण्याची इच्छा—द्रोणाची त्यास शिकविण्याविषयीं विमुखता—एकलव्याचें मृन्मयगुरुसमीप धनुर्वेदपठन—गुरुदक्षिणा—दक्षिणहस्तांगुष्ठसमर्पण—तन्निमित्त एकलव्याची न्यूनता—द्रोण अर्जुनास ब्रह्मशिरोस्त्र देतो.
	७७	भीष्मादिकांसमक्ष द्रोणानें केलेली शिष्यांची परीक्षा—भीमदुर्योधनांचें गदानैपुण्य आणि अर्जुनाचें व कर्णाचें धनुर्वेदकौशल्य—कर्णास अंगदेशाधिपत्यप्राप्ति.
	३६	द्रुपदाचा पराजय—द्रोण त्याचें अर्धें राज्य घेऊन उत्तरपांचाळपति होतो.

अध्याय.	ग्रंथसंख्या.	विषय.
२७	२८	धर्मयौवराज्य—भीमार्जुनपराक्रम—पांडवैश्वर्यवृद्धि—धृतराष्ट्रचिंता—प्रधान कणिक आणि धृतराष्ट्र यांची मसलत—जंबुककथा.
२८	७६	धर्मगुणवर्णन—तन्निमित्त कौरवविषाद—दुर्योधन आणि धृतराष्ट्र यांचा एकांतविचार—पांडवांचें यात्रेनिमित्त वारणावत येथें प्रयाण—लाक्षागृह—पुरोचनोपदेश—पांडवांचा जतुग्रहवास—कुंतीव्रतनिमित्त विप्रभोजन—लाक्षागृहदाह—विदुरानुमतें पांडवांची सुटका—त्यांचा वनप्रवेश.
२९	६४	पौरजनांचा विलाप—हिडिंबासुराची बहीण हिडिंबा भीमास पाहून मोहित होते—तिचा व भीमाचा संवाद—हिडिंब बहिणीचा शोध करतो—भीमाचें व त्याचें युद्ध—हिडिंबवध—हिडिंबास्वीकार—घटोत्कचजन्म.
३०	६९	पांडवांस व्यासदर्शन—त्यांचा एकचक्रानगरीं प्रवेश—विप्रगृहवास—बकराक्षसाचा उपद्रव—ब्राह्मणचिंता—ब्राह्मणीचा पतीशीं संवाद—ब्राह्मण, त्याचा पुत्र व कन्या यांचा संवाद—कुंतीचें ब्राह्मणाशीं संभाषण—भीमाची बकवधाविषयीं प्रतिज्ञा—त्यांचें भुजयुद्ध आणि बकवध.
३१	२७	पांडवांचें एकचक्रानगरींत ब्राह्मणाशीं संभाषण—द्रोणागमन—पुत्रप्राप्त्यर्थ द्रुपदाचें उपयाजऋषींकडे गमन—द्रुपदाचें उपयाजाच्या सूचनेवरून त्याचा वडील बंधु याज [illegible]जकडे जाणें—द्रुपदाचा पुत्रकामेष्टि नामक यज्ञ—यज्ञकुंडांतून धृष्टद्युम्न पुत्र आणि कृष्णा कन्या यांची उत्पत्ति.
३२	५९	व्यास व पांडव यांची भेट—द्रौपदीपूर्वजन्मकथा—पांडवांचें गंगातीरीं आगमन—अंगारपर्णनामक गंधर्वाशीं अर्जुनाचें युद्ध—गंधर्वपराभव—तो आपलें पहिलें नांव सोडून चित्ररथ असें नांव धारण करतो आणि अर्जुनास चाक्षुषी विद्या देतो—अर्जुनाचे गंधर्वास प्रश्न व त्याचीं उत्तरें.
३३	१०१	वसिष्ठाख्यान.
३४	९८	पांडव द्रुपदपुरीस येतात—त्यांचें कुंभाराच्या शाळेत राहणें

अध्याय तिसरा.

[illegible] म्हणे, 'सौते ! भृगुवंश आमुचें ह्मीं ।
[illegible] पुसोनि सुखे आधी तूं मातुसत्तमा व्हणी'. ॥ १
[illegible] म्हणे, 'ब्रह्म्याचा भृगु पुत्र; तदीय पुत्र तो च्यवन; ।
[illegible] प्रमति, त्याचा रुरु; तत्सुत शुनक, सुमतिचें भेवन. ॥ २
[illegible] प्रमतिनामक, शौनक तुज म्हणति [illegible], आता ।
[illegible] पतिव्रता, सुख होतें [illegible] ॥ ३
[illegible] पुलोमा, ती होती प्रथमगर्भिणी धर्मी. ।
[illegible] एकदा [illegible] स्वामी, ॥ ४
[illegible] भृगुच्या आश्रमांत, [illegible] ।
[illegible] वाहिला शिरीं धरूनि कामाच्या ॥ ५
[illegible] होता पिता असे, रडता, ।
[illegible] पुरें भृगुभयें तिचा [illegible]. ॥ ६
[illegible] राक्षस म्हणे, 'अगा आर्या ! ।
[illegible] भृगुचीच [illegible] हे भार्या. ॥ ७
[illegible] भृगुला हे समर्पिली, दहना ! ।
[illegible] तुज पुसतों; [illegible] ॥ ८
[illegible] शब्दें [illegible], [illegible] ।
[illegible] साक्षी [illegible] ॥ ९
[illegible] वाहिल्या, [illegible] ।
[illegible] भृगुच्या पत्नीस तो [illegible]. ॥ १०
[illegible] गर्भ सतीच्या पथीं गळला हो ! ।
[illegible] राक्षसा, जळाला हो ! ॥ ११
[illegible] म्हणोनि तो च्यवन. ।
[illegible] पावली सती भवन. ॥ १२
[illegible] गळाले, तिहीं महा सरिता ।
[illegible] [illegible]. ॥ १३

[illegible]

भृगु घरीं नसतां तीस म्हणे, 'अग्नि! न अन्य [illegible] ' ।
तों रक्ष जोडूनि [illegible] लाहला मार्गी. ॥
हें कळतां, मुनिवर भृगु, या देवाच्या शिरीं अघ स्थापी ।
'हो सर्वभक्ष' ऐसें कोपें सर्वांगानला शापी. ॥
[illegible] मत्य म्हणतां दैवस्वात्यहि बाधला [illegible] ।
त्रिभुवनिं असत्य म्हणे जो राक्षस, त्याचि मात्र [illegible] ॥
अग्नि म्हणे, 'ब्राह्मण मज मान्य, भृगो! तूं [illegible] शाप ।
तुझें [illegible] सहावा; [illegible] न ताप. ॥
रुसला भगवान् पावक, झाला गुप्त, [illegible] ।
[illegible] सत्यवादी [illegible] तो कां तें? ॥
झाला तेव्हां हुतभुक् गुप्त भृगुकुलाक्रमाचें कोपें ।
लोकत्रयही व्याकुळ होम स्वाहास्वधाक्रियालोपें. ॥
ऋषिवरांहीं कथिला विधिलें निज ताप, अग्निचा [illegible] ।
तेव्हां तो समजावी त्या दहना, जेविं बाळका बाप. ॥
'एकाच्या कोपें कां बहुतांना कष्टविसि [illegible] ।
हें तों भृगु; परि [illegible] तें बळ, तुझेंचि [illegible] ॥
[illegible] अति तुझी, [illegible] ।
त्या सर्व भक्षिलास, स्वाहाप्राणप्रिया! स्वधापाळा! ॥
[illegible] करितां, तुज लेशही नसे [illegible] ।
[illegible] पुन्हा; कांहीं [illegible] नसे. ' ॥
ऐसें सांत्वन करितां वह्नि पुन्हा प्रगट [illegible] ।
भृगुनें केल्या [illegible] सत्य मानिलो दंड. ॥
[illegible] हे. शुनकाऱ्याही तुम्हांसि मी सुरुची ।
[illegible] कथा पवित्रा, प्रमतिसुताची [illegible] ॥
[illegible] वीर्यें, प्रसवोनि सुतेसि, मेनका देवी ।

१ [illegible] २. [illegible] सुखास [illegible] ३. [illegible] ४. [illegible] ५. अग्नि. ६. स्वाहाक्रिया. १०. हव्य (देवांसाठीं [illegible]) आणि [illegible] (पितरांसाठीं [illegible]). ७. [illegible]. ८. [illegible]. ९. [illegible] स्वाहा ही [illegible] आहे. ११. [illegible] १२. [illegible] १३. [illegible] १४. [illegible] १५. [illegible] १६. [illegible] १७. [illegible] १८. [illegible]

[illegible]स्थूलकेशमुनिच्या आश्रमनिकटीं, नदीतटीं, ठेवी. ॥ २६
[illegible], [illegible] पाहुनि तें कन्यारत्न, आश्रमीं आणी. ।
[illegible] निजलोचनद्वयीं प्राणी. ॥ २७
तें [illegible] मुनीनें; प्रमद्वरा नाम ठेविलें विधिनें; ।
[illegible], [illegible] तपःसिद्धिशीं, दयानिधिनें. ॥ २८
[illegible] विलोकिली ती गंधर्वराप्सरोद्भवा सुरुची, ।
[illegible] मनोवृत्ति [illegible] रुरुची. ॥ २९
[illegible] कळतां, स्थूलकेशाप्रति प्रमती ।
[illegible], त्यांही 'देतों' म्हणे उदारमती. ॥ ३०
[illegible] तिथिचा [illegible]; आधीं तिला डसे व्याळ; ।
हें कळतां, [illegible] रुरु एकाकी रडे, पिटी भाळ. ॥ ३१
[illegible] कौशिकी स्त्री मरतां, रुरु पावला महाकष्ट; ।
[illegible] या कथेचें हें कीं, दुःखद परिग्रह स्पष्ट. ॥ ३२
तप, दान, गुरुपालन, जरि [illegible] घडलें असेल, तरि तेणें ।
[illegible] येऊ, जें हरिलें [illegible]तस्करें लेणें". ॥ ३३
[illegible] जन्मप्रभृति [illegible], उठो मनःप्रिया तरि, ती. ।
[illegible] विकळा [illegible] विकळ मज करिती.' ॥ ३४
[illegible] विलाप [illegible] प्रमतिपुत्र जो, त्यासी ।
[illegible] दर्शन; [illegible] जेविं तर्पी [illegible]. ॥ ३५
[illegible], 'जो प्राणी [illegible] आयुष्य, पावला अंतें', ।
तो न पुन्हा उठला; हें वदति रुरो! तत्त्वजाणते संत. ॥ ३६
[illegible] देवीं; परि तीं, क्षणभरिहि न उठवितील मेलीला. ।
[illegible]ची जशि, तशिच तुझी मला गमे लीला. ॥ ३७
तुज या [17]दयितविरहज्वलनापासोनि व्हावया मुक्ती, ।

---

१. ऋषिविशेष. २. आश्रमाच्या समीपभागीं. ३. स्थूलकेशऋषि. ४. गंधर्वश्रेष्ठ आणि अप्सरा यांपासून उत्पन्न झालेली स्त्री. ५. उत्तम कांतिमती. ६. स्थूलकेशनामक ऋषीजवळ. ७. सर्प. ८. कपाळ. ९. स्त्री. १०. काळरूप चोराने. ११. अलंकार. (प्रमद्वरा). १२. जन्मापासून. १३. मनोभयरूप सर्पानें दंशित अशी. १४. अत्यंत मूढ होणाऱ्यास. १५. मृत्यु. १६. गेलेल्या [illegible]- [illegible] इच्छा करणाऱ्या बाळाचा. १७. स्त्रीच्या वियोगरूप अग्नीपासून.

एकें भविष्यज्ज्ञांनीं[1] कथिली, ती सांगतों, तुला युक्ती. ॥ ३८
अर्ध स्वायुष्याचें जरि तूं देशील तीस, नवरी ती ।
वांचेल; रीति पहिली तीच पहाशील तूं, न नव रीती.' ॥ ३९
विप्र म्हणे, 'आयु दिलें; येणें हस्तें करोनि, निजलीला[2] ।
उठवावें, तैसें तूं उठवीं; प्रकटीं जनांत निजलीला[3].' ॥ ४०
मग तो विश्वावसुसह दूत सुरांचा यमाकडे गेला; ।
लोकांचा निर्वाह, प्रार्थुनियां त्यास, तन्मतें केला. ॥ ४१
धर्में दिव्यवरकरें जागविली ते प्रमद्वरा सुरुची; ।
जशि अघनाची श्रीनें, या स्त्रीनें दृष्टि निववली रुरुची. ॥ ४२
तत्पाणिग्रहणोत्तर भार्गव घे अहिवधव्रत क्रोधी; ।
तो चंड दंडपाणी सर्प वधी; वारुळें, बिळें, शोधी. ॥ ४३
तो एकदां, वनांत भ्रमतां, रुरु निर्विषाहिला पाहे; ।
दंड उगारुनि म्हणे, 'दुष्ट मला पुष्ट भेटला आहे.' ॥ ४४
डुंडुभ म्हणे, 'वधिसि अपराध न करितां किमर्थ? सांग मला. ।
हा अनपराधभूतद्रोह अहित, तदपि विहित, कां गमला?' ॥ ४५
रुरु त्यासि म्हणे, 'माझी वधिली होती प्रिया खलें नागें; ।
म्यां व्यालवधव्रत हें त्यापासुनि घेतलें असे रागें.' ॥ ४६
सर्प म्हणे, 'ते अन्य प्राणघ्न व्याळ, करिति जे दंश; ।
आकृति सम, परि त्यांच्या खगुणांचा डुंडुभीं नसे अंश. ॥ ४७
अपराधी दंडावा, किंवा भलताचि जो अनपराधी? ।
धर्मज्ञा! कैंचि तुझी झाली ही पापसाधनपरा धी?' ॥ ४८
हा ऋषि, ऐसें जाणुनि, हेतु पुसे सर्पयोनिचा अहिला. ।
त्यास्तव सांगे रुरुला डुंडुभ वृत्तांत आपला पहिला. ॥ ४९
'होतों ब्राह्मणसुत मी, मन्नाम सहस्रपात्, सखा माझा, ।
ज्याचें नाम खगम तो, मुनिवृंदीं उडुगणीं जसा राजा. ॥ ५०
बाळपणीं, तृणसर्पें भिववुनि, कोपोदयासि त्या खगमीं ।
करिता झालों, आलों तच्छापें या कुयोनिला मग मी. ॥ ५१

---

१. भविष्य जाणणाऱ्यांनीं. २. आपली लीला. ३. आपल्या भार्येला. ४. यमधर्मानें. ५. संमतीनें. ६. त्या प्रमद्वरेचा विवाह झाल्यानंतर. ७. रुरु. ८. दुतोंडें. ९. निरपराधी प्राण्याचें वैर. १०. अकल्याणकारक. ११. पापाच्या साधनाविषयीं आसक्त. १२. बुद्धि. १३. चंद्र.

एकदां कथिलें होतें, होइल भृगुच्या कुळांत, त्या रुरुचें ।
दर्शन होइल शापा, तोपाळ जाळितें जसें मुकुरें. ॥ १२
तो तूं प्रमतिसुत मज सद्भाग्यें भेटलासि नवसांनीं.' ।
ऐसें वदतां झाला शापाच्या, दिव्यरूप, अवसानीं ॥ १३
प्राप्तस्वरूप तो मुनि मग त्या रुरुला म्हणे, 'अगा बापा ! ।
हिंसा तुज योग्य नव्हे, जोडिसि दष्टूनि कां महापापा? ॥ १४
ब्राह्मणधर्म अहिंसा, सत्योक्ति, तशी क्षमा, मनीं आण. ।
क्षत्रियधर्म प्रकृतिप्रतिपालन, दंड, उग्रता, जाण. ॥ १५
जनमेजय नृपाच्या अहिसत्राग्नि मग्नसर्पांतें ।
आस्तीक विप्र वदे संरक्षी तक्षकादिसर्पांतें.' ॥ १६
आरंभ रुरु सबल म्हणे, 'कथिला त्वां मज वरा नय मुने ! तें ।
वृत्त कथीं, न उपेक्षीं; योगा मिळतो सुजी न वसुनेतें.' ॥ १७
'इतिहास हा मुनि तुला कथितील' असें म्हणोनि तो विप्र ।
झाला गुप्त; नकोरा दुखित साहुनि असा विलु क्षिप्र. ॥ १८
हारपला चिंतामणि जाणि, घ्यावा तोंचि काय तो हातें ।
चतुर शोधितां, न मिळतां, मग रुरु विप्र शोकमोहातें. ॥ १९
सावध होउनि गेला; प्रस्तीतें वृत्त सांगता झाला; ।
मग रुरु तातमुखें तें आख्यान श्रवण करुनियां धाला. ॥ २०

अध्याय चवथा.

शौनक पुसे; तयाला सौति म्हणे, 'ऐक सूचका धीरा; ।
होता यायावरकुलतिलक प्रथमाश्रमी जरत्कारु. ॥ १
यतचित्त, ऊर्ध्वरेता, जितनिद्राहार, तरुतळीं राहे; ।
गर्तीं पितृजातें करितां तीर्थाटनासि तो पाहे. ॥ २
त्यांसि जरत्कारु पुसे, 'कोण तृणस्तोमलग्नपाद असे? ।
गर्तीं अधोमुख तुम्हीं लोंबतसां? पावलां विपत्ति कसे? ॥ ३

१. शेवटीं. २. प्रजापालन. ३. नीति. ४. लौकर. ५. सोडला. ६. तृप्त झाला. ७. चांगले. ८. ब्रह्मचारी. ९. ऋषिविशेष. १०. संयमन केलें आहे चित्तानें ज्याणें. ११. जिंकिली आहेत निद्रा आणि भोजन ज्याणें. १२. खळग्यांत. १३. पितरांतें. १४. तृणसमुदायीं लावले आहेत पाय ज्यांचे असे.

ज्याचा अवलंब तुम्हां, त्याहि तृणस्तोमभूलकासि महा- ।
मूषक खांडितसे कीं, हा शीघ्रचि गर्तपातहेतु, अहा !' ॥ ४
भूलोक गर्त, मूषक काळ, तृणस्तोम वंश, हा भाव; ।
संतति नसतां, स्वर्गीं पितरांसि बसावया नसे ठाव. ॥ ५
ते पितर म्हणति, 'आम्ही यायावरनाम ऋषि जनख्यात; ।
आहों पतनोन्मुख; हा होत असे संततिक्षयें घात. ॥ ६
आहे वंशीं, एकचि पुरुष, जरत्कारुनामक, ज्ञानी. ।
परि तेणें, स्त्री न करुनि, केली हे संततिक्षयें हानी. ॥ ७
एक तपचि करितो तो मंद, करीनाचि यत्न संतानीं; ।
संतानोत्पादन जरि निंदित, केलें कशास संतांनीं? ॥ ८
आम्हींच मंदभाग्य; स्वर्गापासोनि होतसों भ्रष्ट; ।
तूं कोण साधु? दुःखितवृत्तें होतोसि विव्हळ स्पष्ट.' ॥ ९
त्यांसि म्हणे, 'तो मीच. त्यांच्या उद्धाराचा प्रयत्न मज सांगा.' ।
ते म्हणति, 'जरत्कारो ! वत्सा ! पुत्रशीं कळोनियां कां गा? ॥ १०
स्त्री संपादुनि, जोडीं तीच्या ठायीं विशुद्ध संततिला; ।
तारील तेचि आम्हां; म्हणती "भवजलांत नौक" संत तिला.' ॥ ११
येरू म्हणे, 'जरि मजला नामें, शीळें, वयें, समा कन्या ।
देतील बंधु भिक्षे जरि, तरि मान्या असे; नसे अन्या. ॥ १२
पोषण न करीन तिचें; स्वल्पहि मी तदर्थ वित्त जोडीन; ।
होतांचि गर्भधारण संग तिचा मी स्वतंत्र सोडीन. ॥ १३
विधि हाचि मान्य आहे; त्याहुनि विधि मान्य मज नसे इतर.' ।
ऐसें ऐकुनि म्हणती, 'आम्हांला हेंचि इष्ट' ते पितर. ॥ १४
मग पृथ्वीवरी फिरला, परि कोठेंही न कोंस तो घडला. ।
दारकरग्रहणार्थी साधु जरत्कारु संकटीं पडला. ॥ १५
'कन्याभिक्षार्थी मी विप्र जरत्कारु, वचन माना, व्हा ।
सिद्ध, सत्य या विधिनें, परि तीहि असे जरी समानाख्या.' ॥ १६
यापरि वनांत हाका मोठ्यानें तीन विप्र जों फोडी, । १

१. आश्रय. २. मूळास. ३. खाड्यांत पडण्यास कारण. ४. पुत्राविषयीं. ५. साधूंनीं. ६. जन्मकार. ७. आपल्या उद्धरण्याचा. ८. नौका. ९. विशुद्ध संततिला. १०. तो. (जरत्कारु.) ११. इच्छित. १२. विवाहाची इच्छा करणारा. १३. तुल्य आहे नाम जीचें अशी.

तो भगिनीतें आणुनि वासुकि तात्काळ कर तया जोडी. ॥ १७

नाम 'जरत्कारु' असें पुसतां कथिलें; दिली तया विधिनें ।
वरिली तिला, हर्षविले निजपूर्वजचित्त त्या तपोनिधिनें. ॥ १८

'जनमेजयसत्रीं निजजननीशापें हुताश भक्षील; ।
त्या व्यसनीं तेजस्वी भगिनीसुत आपणासि रक्षील.' ॥ १९

या अर्थे वासुकिनें दिधली अनुजा तयासि आपुली. ।
शापाचा परिहार श्रीविधिच्या आननेंचि आपूनी. ॥ २०

आस्तीकनामक तिला सुत झाला; अग्नि जेवि भक्षी ।
जनमेजयसत्रीं, तो जाउनि, हुतशेष मातृकुल रक्षी. ॥ २१

आतां अहिशापातें कारण सूतात्मजोक्त बोलावें; ।
संक्षेपविस्तरज्ञ श्रोत्यांचें मस्तकान्त डोलावें. ॥ २२

कद्रू विनता कन्या दक्षाच्या, कश्यपर्षिच्या जाया; ।
पतिनें दोघींस दिले वर, आल्या मागत्या प्रिया ज्या या. ॥ २३

कद्रू तैजसवंत दशशत सुत मागे, तिला म्हणे तो 'घे.' ।
विनतेसहि दे कद्रूतनुजाधिकशक्ति पुत्रमणि दोघे. ॥ २४

'यत्नें गर्भ धरावे' ऐसा उपदेश आदरें केला. ।
मग तो भगवान् कश्यप तप साधाया तपोवना गेला. ॥ २५

प्रसवे अनल्पकाळें कद्रू अंडीं सहस्र वरदानें. ।
विनता दोन प्रसवे, दिधलीं पतिनें अभीष्टवरदानें. ॥ २६

भंडुपिंतोष्णस्थानीं दासींनीं, पूर्ण पांचशत वर्षें ।
केलीं अंडीं जतन, प्राणासम, कृपणवित्तसम, हर्षें. ॥ २७

अंडें भेदुनि झाले प्रकट अहिसहस्र; माय सुख पावे; ।
विनता म्हणे, 'अहा! सुत कां न उपजले बरें? मजहि व्हावे.' ॥ २८

फोडी अंडाप्रति तों पाहे पूर्वार्धसिद्धदेहातें; ।
तप अधैर्यें विनता आपुलिया आपणासि दे हातें. ॥ २९

कोपें तो पुत्र म्हणे, 'तूं स्त्रीची धरुनि मानसीं स्पर्धा, ।

---

१. भग्नी. २. संकटांत. ३. धाकटी बहीण. ४. जळून बाकी राहिलेलें. ५. सूतपुत्रानें सांगितलेलें. ६. शिरकमळ. ७. समानतेजोयुक्त. ८. फार दिवसांनीं. ९. इच्छित वर देणा-यानें. १०. अंड्यास योग्य अशा उष्ण स्थळीं. ११. एक हजार सर्प. १२. कद्रूची.

करुनि त्वरा, अधीरें केला मद्देह हा असा अर्धा; ॥ ३०
या अन्यायेंचि तिची दासी होशील पंचशत अब्द[1]; ।
देत्रविला शाप तुझ्या कर्मे; लावूं नको मला शब्द. ॥ ३१
जरि दुसऱ्याहि सुताचा घात[2] न करिशील, तरिच तो मुक्त ।
दास्यत्वापासुनि तुज करिल, असो दे मनांत हें उक्त. ॥ ३२
पंचशताब्दानंतर[3] उपजेल दुजा स्वयें सुत, न तूर्ण[4]; ।
जरि रक्षिशील तोंवरि, करिल मनोरथ समस्त परिपूर्ण.' ॥ ३३
विनतेचा प्रथम तनुज अरुण; तरणिसूत[5] जाहला आहे. ।
दुसरा गरुड उपजतां भरला गगनीं; न मंदिरीं राहे. ॥ ३४
झाला क्षुधित, प्रलयानलसा तेजस्विवर्य, तो पक्षी ।
क्षुत्पीडाशमनार्थ ब्रह्मानें अन्न कल्पिलें भक्षी. ॥ ३५
ज्या कद्रूची विनता दासी, सुतशापकारणें, झाली. ।
तीच कथा सांगावी, म्हणुनि, अमृतमथनसत्कथा आली. ॥ ३६
चतुराननमुख्यामर[6] सर्व कनकनगशिरीं[7] बसोनि, 'कसें ।
अमृतोत्पादन करणें?' चिंतिति नारायणासमक्ष असें. ॥ ३७
हरिनें विधिला[8] केलें अमृतप्राप्त्यर्थ युक्तिचें कथन. ।
'मंदरनगें करावें लवणोदधिचें[9] सुरासुरीं मथन.' ॥ ३८
प्रभुमंत्रें संधि करुनि, झाले एकत्र देवदैत्य, मग. ।
यत्न करिति, परि त्यांच्या वीर्यें नुचलेचि मंदराख्य नग. ॥ ३९
अकरासहस्र योजन तो[10] वरि, तितुकाचि भूमिच्या पोटीं. ।
उचलेना गिरि, देवांदैत्यांचीं भागलीं बळें मोठीं. ॥ ४०
नारायणासि अचलोद्धाराची[11] युक्ति तेधवां सुचली; ।
आज्ञापितां अनंता[12], तो भगवान् तत्क्षणीं तया उचली. ॥ ४१
नेला नग सिंधूप्रति, झाला आधार कूर्मराज तळीं, ।
वासुकि मंथनरज्जु, भ्रमविति सुरअसुर त्यासि अब्धिजळीं. ॥ ४२
मुख जिकडे वासुकिचें धरिती तिकडेचि ते असुर मानी[13]; ।

---

१. वर्षे. २. 'घात असा न करिशील तरि मुक्त' असाही पाठ आहे. ३. पांचशें वर्षांनंतर. ४. लवकर. ५. सूर्यसारथी. ६. ब्रह्मदेव मुख्य आहे ज्यांत असे देव. ७. मेरुपर्वताच्या शिखरीं. ८. ब्रह्मदेवाला. ९. क्षारसमुद्राचें. १०. पर्वत. ११. पर्वत उचलण्याची. १२. शेषाला. १३. अभिमानी.

गेली द्वीपा ससुता कद्रू; तें स्थान, जेविं नाकवन[1], ।
दे सुख त्यांला, जैसें साधूचें सर्वसज्जना कवन. ॥ ९४
गरुडाला अहि म्हणती, 'याहुनिही स्थळ असेल जें रम्य, ।
तेथें आम्हां नेईं; सामर्थ्यें तुज खगा! असे गम्य.' ॥ ९५
गरुड म्हणे मातेला, 'ऐकावें पन्नगोक्त म्यां कां? गे!' ।
अश्रुमुखी ती विनता पुत्राला सर्ववृत्तही सांगे. ॥ ९६
नागांला गरुड पुसे, 'उक्त कराया असेंचि उद्युक्त; ।
सांगा तुमच्या दास्यापासुन होईन मी कसा मुक्त?' ॥ ९७
अहि म्हणति, 'अमृत जरि तूं आणुनि देशील, मुक्त होशील. ।
नाहीं तरि तुजसह तव माता हें दास्य नित्य सोशील.' ॥ ९८
तें मान्य करुनि, सांगे मातेला; मग म्हणे, 'न कुत्सा हें ।
भुजयुग[2] पावो, जातों अमृतानयनार्थ[3] आजि उत्साहें. ॥ ९९
परि भक्षावें काय? क्षुद्बाधा दारुणा, वदें युक्ती; ।
तनुमतिसामर्थ्यातें कारण सर्वांसि पाहिजे भुक्ती[4].' ॥ १००
विनता म्हणे, 'पयोनिधिकुक्षींत निषाद[5] फार आहेत, ।
ते खा; आणुनि अमृत, क्षिप्र करीं मुक्त, पुरविं हा हेत. ॥ १०१
ब्राह्मण मात्र न खावा; तद्घातें[6] होय आपुला घात; ।
दहन, रवि, शस्त्र, विष, तो; जोडावे त्यासि सुमतिनें हात. ॥ १०२
चिन्ह पुससि तरि कंठीं जाळील, तयावरूनि वळखावा. ।
विप्र करूनि निराळा, त्वां सर्व निषादलोक खळ खावा. ॥ १०३
तव पक्षांतें मारुत, पक्ष्मांतें[7] चंद्र सूर्य रक्षोत; ।
वन्हि शिरातें; तनुतें वसु[8]; वत्सा! विघ्न तुज न लक्षोत.' ॥ १०४
आशीर्वादें सुखवुनि, आज्ञा दे पादपंकजीं विनता[9]; ।
मग तो तैसेंचि करी, वदली होती सती जशी विनता. ॥ १०५
वृंदावनीं अजगरें मोहुनि गिळिले निषाद सर्व, तसे ।
जठरानळांत झाले भस्म, प्रळयानळांत पर्वतसे. ॥ १०६
तेव्हां गरुडें, पसरुनि मुख, गिळिले बहुसहस्र ते कोळी. ।

---

१. नंदनवन. २. बाहुयुग. ३. अमृत आणण्यासाठीं. ४. भोजन. ५. मासे मारणारे कोळी. ६. ब्राह्मणाच्या घातानें. ७. 'पृष्ठातें चंद्र सूर्य रक्षोत' असाही पाठ आहे. ८. अष्टवसु. ९. नम्र असा जो गरुड त्यास.

तेव्हां कंठीं एक ब्राह्मण अंगारराशिसा पोळी. ॥ १०७
त्याला खग 'नीघ' म्हणे, परि न निघे विप्र, तो विषादी तें ।
मरण तसें मान्य करी; मग सोडी तत्प्रियानिषादीतें. ॥ १०८
भक्षूनि निषादांतें, वंदी जाऊनि कश्यपास मग. ।
आशीकुशलप्रश्नें तातें केला प्रसन्नचित्त खग. ॥ १०९
वृत्त कथुनि, गरुड म्हणे, 'आलों ताता! त्वदंघ्रि देखाया; ।
अमृतहरणासि जातों, क्षुत्परिहारार्थ अन्न दे खाया.' ॥ ११०
कश्यप म्हणे, 'सुता! या कासारीं कूर्मराज जो राहे, ।
तो उन्नत त्रियोजन, दशयोजनमंडल स्वयें आहे. ॥ १११
गजहि वनीं एक असे सौ गांवें उच्च, आयतहि बारा; ।
ते भक्षावे; म्यां हा तुज वत्सा! अंडजा! दिला चारा. ॥ ११२
गज सुप्रतीकनामा मुनि, जो कच्छप विभावसू तो, ते ।
झाले असे स्वशापें धनलोभें, अनुजअग्रजनि होते. ॥ ११३
अद्यापि पूर्ववैरें कलह करिति, उठति त्या गजीं, कूर्मीं, ।
दक्पातवातयोगें क्रोधाविषाब्धींत तापकर ऊर्मी.' ॥ ११४
आशीर्वाद निरोपहि दे, मग खगपति तसेंचि करि तो, घे ।
एकेंचि नखें कच्छप, गजही एकेंचि, उचलिले दोघे. ॥ ११५
करिकच्छपधर खगवर तो जाय उडोनि मेरुच्या शिखरीं. ।
आश्रय द्याया म्यालीं त्यांचीं गुरुतरुवनेंहि त्यासि खरीं. ॥ ११६
आश्रय वृक्ष न देती, कांपति; मग खग म्हणे, 'करूं कैसें?' ।
तों एक वट वदे, 'ये, मच्छाखेवरि खगेश्वरा! बैसें.' ॥ ११७
शतचर्मतंतुमाजि न मायाची, आणि लांब शत गांवें ।
भंगे बसतांचि; तिचें त्या गुरुभारें स्वधैर्य न तगावें. ॥ ११८
पाहे जों शाखेला, तोंचि तिच्या आश्रयें अधस्तुंडें ।
श्रीवालखिल्यवृंदें[14] लोंबत होतीं, तपोग्निचीं कुंडें. ॥ ११९
नाश न पावावीं तीं दिव्यतपःश्रीविलासिनीसदनें[15], ।
म्हणउनि, पडतांचि धरी शाखेला वैनतेय तो वदनें. ॥ १२०

१. जाळी. २. तुझे पाय. ३. क्षुधाशमनार्थ. ४. सरोवरांत. ५. सहा. ६. लांब. ७. कनिष्ठ. ८. वडील. ९. लहरी. १०. मेरुपर्वताचीं. ११. माझ्या खांदीवर. १२. रहावयाची. १३. अधोमुख असीं. १४. समूह. १५. उत्तम तपशोभारूप विलासिनी म्ह० विलास करणारी स्त्री, तिचीं गृहें.

गजकच्छपशाखाधर **गरुड** उडाला, नभीं बहु भ्रमला; ।
मुन्यवनाधिभरेंचि[1], न शाखादिभरें करोनि, तो श्रमला. ॥ १२१
मग, **गं**धमादनाप्रति जातां, पाहे पिता, म्हणे, 'बा ! हें ।
साहस न करीं, तुजला भस्म न मुनिवर करोत, ये. राहें.' ॥ १२२
प्रार्थुनि म्हणे मुनींप्रति, 'मजवरति दया करूनि, हे शाखा ।
सोडा, सयश जोडा, व्यसनीं **वि**नताप्रजा[2] तुम्ही राखा.' ॥ १२३
ते मुनि त्या शाखेला सोडुनि गेले **हि**मालया, मग, ती[3] ।
तातकथित **वि**जयनगीं **गरु**डें त्यजितांचि, कांपली जगती. ॥ १२४
ज्यावरि शाखा त्यजिली, त्याचि नगशिरीं[4] बसोनियां, पक्षी ।
त्या स्वचरणनखरशिखरलग्नद्विपें[5]कच्छपांसि तो भक्षी. ॥ १२५
भोजन करुनि उडे तो अमृत हरायासि, तेधवां झाले ।
भूकंपाद्युत्पात[6], त्रिदश[7] **म**हेंद्रादि सर्वही भ्याले. ॥ १२६
उत्पातबीज[8] पुसतां, हरिसि[9] **गु**रु म्हणे, 'करीं स्मरण, मागें ।
वदले, त्वां स्वबळमदें अपमानित, **वा**लखिल्य ते रागें. ॥ १२७
पूर्वीं करीत होता पुत्रार्थी **क**श्यप स्वयें यजन; ।
साहित्य देत होते सुर, ऋषि, गंधर्व, सर्व भव्य जन. ॥ १२८
समिधांचा गिरिसम गुरु भुजलीलेकरुनि आणितां भार, ।
मार्गांत **वा**लखिल्यहि तुज येतां भेटले निराहार. ॥ १२९
अंगुष्ठोदरमितवपु ते, एक पलाशवर्तिका[10] वाटे ।
आणित असतां, श्रमले होते; गोष्पदहि[11] सिंधु ज्यां वाटे. ॥ १३०
त्या गोष्पदांत पडतां, बुडतां, श्रमतां, तयांसि पाहोनी, ।
तूं हांसलासि; नाहीं झालासि सहाय, जवळि राहोनी. ॥ १३१
त्या अपमानें चित्तीं कोपातें धरुनि, यज्ञ ते धन्य ।
करिते झाले, स्वतपें निर्माया इंद्र तुजहुनी अन्य. ॥ १३२
कामगम[12], कामरूप[13], स्वाधिक बळ, **इं**द्र निर्मितील **मु**नी, ।
करितील पदच्युत मज, हें त्या स्वपित्यासि[14] कळविलें नमुनी.' ॥ १३३

---

१. ऋषींच्या पालनरूप आधीच्या भरानें. २. विनतेचा पुत्र गरुड. ३. शाखा. ४. पर्वत. ५. हत्ती. ६. पृथ्वीकंपादिक उत्पात म्ह० अशुभचिन्हें. ७. देव. ८. कारण. ९. इंद्राला. १०. पलाशसमिधा. ११. गाईच्या पावलाच्या चिन्हांत तुंबलेलें पाणी. १२. मनास वाटेल तिकडे जाणारे. १३. हवीं तशीं रूपें धरणारे. १४. कश्यपास.

त्यांप्रति कश्यप वदला, 'मुनिहो! स्वतपें नवी जगद्रचना ।
शक्यचि तुम्हां असे, परि विधिच्या मिथ्या करूं नये वचना. ॥ १३४
मिथ्या संकल्प नसो तुमचाहि, करा खगेंद्र, [1]विप्रभ या ।
हरिचें वदन पहा हो, वारा याच्या तुम्ही सुविप्र! भया.' ॥ १३५
ते सुप्रसन्न होउनि, वदले ऐसें, 'प्रजापते! [2]साधो! ।
तरि हा त्वत्पुत्र असो, त्वत्संकल्पितहि या फळें [3]साधो.' ॥ १३६
'तो [4]विनताकुक्ष्युद्भव, [5]काश्यपि, [6]पक्षींद्र, गरुड, बळशाली, ।
जातो अमृत हराया, [7]उत्पातोत्पत्ति तद्भयें झाली.' ॥ १३७
हें ऐकुनि इंद्र म्हणे, 'सुरहो! [8]पक्षी हरो न [9]सोमातें; ।
रक्षा; [10]खगकृतपरिभवनूत्नमषीलेप हा नसो मातें.' ॥ १३८
झाले सिद्ध सुर सकळ, नेले अमृतासमीप [11]अशनिकरें.' ।
म्हणति, 'करावाचि सुधाहरणेच्छु विहंग[12] [13]काळवश [14]निकरें.' ॥ १३९
तों तेथें गेला तो [15]खगपति[16]चूडा[17]महामरीचिमणी. ।
भ्याली त्यासि [18]सुरचमू, [19]श्येनांचें जेविं भय धरी चिमणी. ॥ १४०
नखपक्षतुंडपातें बहु मूर्छित होय [20]विश्वकर्मा. तें ।
वर्णावें किति? त्याच्या वाखाणी फार विश्व कर्मातें. ॥ १४१
उडवूनि पक्षपवनें धूळि, करी अंध देवसेनांतें ।
जें धैर्य मनीं होतें, वीरांला पाठि दे, वसेना तें. ॥ १४२
शक्रें पवनाकरवीं रज [21]वारवितांचि, देवकटकांहीं ।
बहु शस्त्रवृष्टि केल्या, परि नाटोपेचि पक्षिभट कांहीं. ॥ १४३
मग [22]गगनग खग त्यांतें जर्जर करि पक्षतुंडनखरांनीं. ।
सुरकटकीं तो तैसा, जैसा [23]प्रज्वलित [24]वायुसख रानीं. ॥ १४४
पळवुनि सुर सकळ, वधुनि अश्वक्रंदादि यक्ष नव, धरणी ।
रंगविली; सर्वांचा केला तेणें द्रवोनि न वध रणीं. ॥ १४५
[25]कोटचि होय अनळ, जैं जाय हरायासि गरुड सोमातें. ।

---

१. निस्तेज. २. हे साधो. ३. पूर्ण होवो. ४. विनतेच्या कुक्षीपासून झालेला. ५. कश्यपपुत्र. ६. पक्ष्यांचा इंद्र. ७. उत्पाताची उत्पत्ति. ८. गरुड. ९. अमृतातें. १०. गरुडानें केलेला जो पराभवरूप नवीन काजळाचा लेप. ११. इंद्रानें. १२. पक्षी. १३. मृत्युग्रस्त. १४. आग्रहानें. १५. पक्षिश्रेष्ठ. १६. चूडामणी म्ह० शिरोभूषण. १७. महामरीचि म्ह० अतितेजस्वी. १८. देवसेना. १९. ससाणा. २०. देवांचा शिल्पी. २१. घालवितांचि. २२. स्वर्गगामी. २३. पेटलेला. २४. अग्नी. २५. किल्ला.

गर्वें म्हणे, 'विदारुखरनखराघातकर[1], डसो, मातें.' ॥ १४६
विझवी त्यासि गरुड, बहुमुख होउनि, करुनि बहुनदीपानें[2]. ।
दावावा झंझानिलसूर्यांतें[3] गर्व बहु न दीपानें. ॥ १४७
क्षुरपर्यंत[4], सुदारुण[5], चक्र वरी भ्रमतसे; तळीं दोघे ।
अमृतघटप[6], चक्षुर्विष, अहि; तें पाहूनि सूक्ष्म वपु तो घे. ॥ १४८
शिरला अरांतरें[7] तो वायु तसा, मग अनल्प[8] रज[9] उडवी; ।
अंध करुनि ते काळव्याळ, न भरतां निमेष, तो तुडवी. ॥ १४९
घेउनि अमृतघट, करुनि चक्राचा भंग, जाय कवि; त्याचें ।
तेज अतुळ; म्हणति, 'नभीं तें मंडल लोपलेंचि सवित्याचें.' ॥ १५०
प्याला अमृत न लेशहि, केवळ सदतिक्रमासि[10] तो भ्याला; ।
म्हणउनि, निस्पृहजनधन भगवान् दे भेटि त्या अलोभ्याला. ॥ १५१
विष्णु म्हणे, 'विहगवरा ! तूं माग मला अभीष्ट वर दात्या.' ।
मागे सुधेविणें अजरामरता, केतुवास[11], वरदा त्यां[12]. ॥ १५२
आपणाहि म्हणे प्रभुला, 'मजपाशीं तूंहि इष्ट वर मागें[13].' ।
देव म्हणे, 'मद्रथ हो.' सरले नाहींच शिष्ट वर मागें. ॥ १५३
स्वपराभव करुनि, बळें जातां घेऊनि सोमकलश[14], मन
क्रोधासि होय वश; मग ताडी वज्रें तयासि बलशमन[15]. ॥ १५४
विहगेंद्र म्हणे, 'जेणें[16] निजतेजें सकळ अचल कांपविला, ।
दाटुनि मजवर सोडुनि, अपयश दिधलें रणांत कां पविला[17]?' ॥ १५५
विप्रास्थिचा[18] अनादर न करावा, म्हणुनि सोडिलें पत्रें[19]; ।
हें तुमच्या दृष्टीला हो साक्षात् दिव्यरुचि सुधासत्र[20]. ॥ १५६
सुरपति म्हणे, 'सुपर्णा ! सांग मला स्वबळ, आयकों दे गा ! ।
वरिचे त्ररि तें तुझिया श्रितजयदभुजांत[21] काय कोंदे गा?' ॥ १५७
तार्क्ष्य[22] म्हणे, 'आत्ममुखें न करिति आत्मप्रशंसन[23] ज्ञानी; ।

---

१. तीक्ष्ण नखांनीं आघात करणारा. २. प्राशनें. ३. 'झंझावात: सवृष्टिक:.' पावसासहित जो वेगाचा वारा आणि सूर्य त्यांस. ४. वस्त्र्यासारिख्या धारा ज्याच्या. ५. अतितीक्ष्ण. ६. अमृतघटपान करणारे. ७. चक्रधारांच्या फटींतून. ८. बहुत. ९. धूलि. १०. सदुल्लंघनास. ११. ध्वजस्तंभीं वास. १२. विष्णूसी. १३. माग. १४. अमृतकलश. १५. बलनामक दैत्याचा वधकर्ता. (इंद्र.) १६. ज्या इंद्रानें. १७. वज्राला. १८. ब्राह्मणास्थिरूप वज्राचा. १९. पंख. २०. अमृतगृह. २१. आश्रितांला जय देणाऱ्या भुजांत. २२. गरुड. २३. आत्मस्तुति.

परि कथितों संकोचें, कीं हें ध्यावें मनीं न अज्ञांनीं. ॥ १५८
[1]सनगवनसमुद्रोदक्षिति पक्षाग्रीं सदैव वाहेन; ।
ब्रह्मांडकंदुकें मी क्रीडेन; अशीं सहस्र साहेन.' ॥ १५९
शक्र म्हणे, 'विहगेंद्रा! घे, देतों, तूं सुपात्र सख्यातें.' ।
गरुड म्हणे, 'तृप्त असें मी सुरसें याचि, सुरसिकख्यातें.' ॥ १६०
इंद्र म्हणे, 'जरि अमृतप्राशनवांछा नसेचि, मग, मातें ।
खिन्न करूनि, कशाला नेसि? न देसी फिरोनि खगमा! तें[2]? ॥ १६१
तूं देणार जयां हें, ते आम्हां पीडितील; या सुरसा ।
भलता उचित नव्हे बा! तूं पी; असशी महायशा [3]सुरसा.' ॥ १६२
गरुड म्हणे, 'हें, कांहीं कारण आहे, म्हणूनियां, मात्र ।
नेतों; त्वां आणावें ठेविन तेथोनि निजसुधापात्र.' ॥ १६३
[4]वृत्रारि म्हणे, 'झालों त्वत्साधुत्वेंचि तुष्ट; वर माग.' ।
वीरें[5] म्हणे, 'मज हें दे, भक्षावे म्यां समस्त खळ नाग.' ॥ १६४
इंद्रें 'दिधलें' म्हणतां, जाउनि [6]सर्पारि तो म्हणे, '[7]उक्त ।
केलें; हें घ्या; आह्मी दास्यापासूनि जाहलों मुक्त. ॥ १६५
म्यां ठेविला कुशांवरि हा तुमचा अमृतघट; पहा, सेवा, ।
स्नान करा, शुचि व्हा; हो! [8]उद्योगांतर मुहूर्तभरि ठेवा.' ॥ १६६
अहि गेले स्नाना, तों अमृत हरुनि, हरि म्हणे 'धुवा वपु, न्हा; ।
खळहो! पहाल पुष्कळ निजनेत्रांतील [9]अमृत, हें न पुन्हा.' ॥ १६७
न्हाले, भूषित झाले, आले त्या [10]लेखंजीवना प्याया. ।
अन्योन्यांतें म्हणती, 'व्हा अजरामर, करा त्वरा, प्या [11]यीं.' ॥ १६८
कलश न दिसतां, सोडिति निश्वासा, तळमळोनि, '[12]अहिमा; या ।
हानीच्या हेतूतें समजति ते आपुलीच अहि माया. ॥ १६९
तो घात त्यांसि दुःसह; सर्वस्वविनाश साहता शतदा. ।
'चुकलों, मुकलों स्नानें;' म्हणती ते सर्प 'हा!' [13]हताश तदा.॥ १७०
'लटिकं, बटिक, माय न हे, कपटें दुःसह्य वैर वरचील. ।

---

१. पर्वत, वनें व समुद्रोदक यांसह पृथ्वी. २. अमृत. ३. देवासारिखा. ४. वृत्रासुराचा शत्रु (इंद्र). ५. गरुड. ६. सर्पांचा शत्रु. (गरुड). ७. वचन. ८. दुसरा उद्योग. ९. उदक, अश्रु. १० देवाचें जीवन. (अमृत.) ११. अमृतातें. १२. उष्ण. १३. भग्न झाली आहे इच्छा ज्यांची.

खाय चरारां चावुनि, उग्रत्व तसें न भैरव रचील.’ ॥ १७१
चुकवी कुगति, यशें उत्सुकवी सन्मन, असन्मुखें सुकवी[1]; ।
सुखवी मातेला निजमुखवीक्षामृतरसेंचि, तो सुकवी[2]. ॥ १७२

अध्याय पांचवा.

कद्रूचा ज्येष्ठ तनय शेष; दुजा वासुकी महाभाग; ।
ऐरावत, कर्कोटक, तक्षक, कालीय, बहु असे नाग. ॥ १
सर्व[3]गुरूत्तम माता, परि तीची रीति ती नव्हे नीट. ।
म्हणउनि शेष तप करी, दुःसंगतिचा धरोनियां वीट. ॥ २
अत्युग्र गंधमादनगोकर्णादिस्थळीं सदा तपतां, ।
भेटे त्यासि पि[4]तामह, यमनियमातें[5] सुयुक्तिनें जपतां. ॥ ३
‘वत्सा ! कां उग्रतपें तापुनि, लोकांसि तापविसि ? बोल. ।
म[6]द्दृष्टिवरतरिगता शेषा ! न मनोरथाब्धि तुज खोल.’ ॥ ४
शेष म्हणे, ‘द्वेष करिति गरुडाचा, न धरिती भया, भ्राते, ।
दुर्मति परस्परहि, अ[7]रिसम भावुनि सर्वदा द[8]याभ्रा, ते. ॥ ५
जन्मांतरिं ही त्यांचा संग नसावा, म्हणूनि, देहातें ।
त्यागाया तप करितों, व[9]रदा ! वरदान हेंचि दे हातें.’ ॥ ६
द्रुहिण म्हणे, ‘मी जाणें क[10]द्रूचें, आणि त्याहि सापांचें, ।
विनतागरुडद्वेषप्रभृति विचेष्टि[11]तें अशेष, पापांचें. ॥ ७
वर माग, शोक न करीं, म्यां त[12]त्परिहार योजिला आहे; ।
सन्मतिला वर देतां, माझें मागें पुढें न मन पाहे. ॥ ८
मज न[13]यनिष्ठ, शुचि, तुझें नवनीताहूनि हृदय मउ ठावें. ।
या त्व[14]न्मतिमधुपीनें, ध[15]र्मसरोज त्यजूनि, न उठावें.’ ॥ ९
‘हाचि वर मला द्यावा’ शेष म्हणे. विधि करी दया फार. ।
मग त्याला प्रभु सांगे निजमाथां ध्यावया धराभार. ॥ १०

---

१. वाळवी. २. उत्तम कवी म्ह० सुज्ञ, शहाणा. ३. सकळ गुरूंमध्यें श्रेष्ठ अशी. ४. ब्रह्मदेव. ५. इंद्रियदमन आणि स्नानसंध्यादि नित्यकर्मे त्यांतें. ६. माझी दृष्टि हीच श्रेष्ठ नौका तींत बसणारा जो तूं, त्या तुला. ७. ‘सम भांडति सर्वदा दयाभ्रा ते’ असाही पाठ आहे. ८. कृपाघना. ९. वरदात्या. १०. सर्पमातेचें. ११. आचरण. १२. दूरीकरण. १३. नीतिसक्त. १४. तुझ्या मतिरूप भ्रमरीनें. १५. धर्मरूप कमल.

धरिली पृथ्वी माथां, त्या पाताळीं शिरोनियां विवरें[1]. ।
सख्यें आनंदविलें, विधिच्या आज्ञेकरूनि, त्या[2] विवरें[3]. ॥ ११
वासुकिहि करी चिंता; न सुचे कांहींच शापपरिहार[4]; ।
झाला म्लान; फिरविला पुष्पांचा जेविं वन्हिवरि हार. ॥ १२
वासुकिला कोणी अहि म्हणती, 'आम्ही विचार हा केला; ।
जनमेजयराजाच्या ध्यावें, होऊनि विप्र, भाकेला[5]. ॥ १३
गोंवुनि त्यासि म्हणावें, '[6]भरतकुळश्रीसुरत्नहारा ! हो ।
सत्यप्रतिज्ञ, राया ! अहिसत्रारंभ[7] उग्र हा राहो.' ॥ १४
अन्य अहि म्हणति, 'होऊं तन्मंत्री, दाखऊनि नयपटुता[8]. ।
पुसतां विचार, आणूं तच्चित्तीं सर्पसत्रफळकटुता.' ॥ १५
इतर म्हणति, 'सर्वज्ञ ब्राह्मण, नृपहित, असेल जो शिष्ट, ।
तो चावुनि मारावा भलत्या भुजगें, विचार हा इष्ट. ॥ १६
असतील तज्ज्ञ बहु, तरि मारूं सर्वांसिही, करूं दंश.' ।
साधु म्हणति, 'शिव ! शिव ! या मंत्रें[9] वांचेल हा कसा वंश ?' ॥ १७
एक म्हणति, 'घन होऊं, विझवूं अनळासि[10], सत्रविघ्न करूं.' ।
एक म्हणति, 'स्रुगादिक[11] पात्रें, असतां असावधान[12], हरूं.' ॥ १८
किति म्हणती, 'मळमूत्रें दूषावें[13] सर्व अन्न; तो यज्ञ ।
मग कैसा चालेल ?' स्वमत असें बोलती किती अज्ञ[14]. ॥ १९
'ऋत्विज होउनि सत्रीं रायाला दक्षिणार्थ अडवावें. ।
प्रारंभींच करावा प्रत्यूह[15], बहु च्छळूनि, रडवावें. ॥ २०
अथवा उदकीं क्रीडा करितां, राजा धरूनि आणावा. ।
बद्ध करावा; हा चि स्वश्रेयस्कर[16] उपाय जाणावा.' ॥ २१
कोणी पंडितमानी अहि म्हणति, 'तुम्हांसि लागलें खूळ[17]; ।
चावूं नृपासि; खाणूं स्वानर्थाचें[18] अशेष तें मूळ.' ॥ २२
वासुकि म्हणे, 'भुजग हो ! तुमचा मजला विचार हा न रुचे. ।

---

१. भोंकानें. २. शेषास. ३. पक्षिश्रेष्ठ गरुडानें. ४. शापमोचन. ५. शपथ, वचन. ६. भरतकुळरूप श्रीचा उत्तम रत्नांचा हार. ७. सर्पसत्राचा आरंभ. ८. राजनीतिकौशल्य. ९. मसलतीनें. १०. अग्नीस. ११. पळी इत्यादि यज्ञभाजनें. १२. सावध नाहीं असा. १३. बिघडवावें. १४. ज्ञानहीन. १५. विघ्न. १६. आपुलें कल्याण करणारा. १७. वेड. १८. आपल्या अनर्थाचें.

क्षुधितें कसे गिळावे कवळ[1] गेरळदूषितांतरा[2] तरुचे ? ॥ २३
गुरुलाचि शरण जावें; वाटे आम्हांसि तोचि रक्षील; ।
वारील शापताप प्रभु जरि करुणेकरोनि लक्षील.' ॥ २४
एळापत्र[3] म्हणे, 'मी वदतों, परिसा त्यजूनि संताप; ।
होतों तेव्हां अंकीं मातेच्या, जेधवां दिला शाप. ॥ २५
सुर हळहळले, वदले, 'तीक्ष्णा न स्त्रीपरीस तरवारी.' ।
मग ते विधिस विनविती. तो[4] त्यांचा खेद शीघ्रेतर[5] वारी. ॥ २६
जवळचि तेव्हां होतों, म्हणउनि, म्यां ऐकिलें तदुक्त[6] असें. ।
'मज शाप मानला हो! जरि नसता मान्य, वारितों न कसें? ॥ २७
तीक्ष्णजगदहित[7]पन्नगवृद्धि नसावी, असें मनीं होतें. ।
मद्वांछित[8] स्नुषेच्या तेजें सिद्धीस पावलें हो! तें. ॥ २८
जे पापाचार, खळ, व्याळ, जगत्काळ, तेचि मरतील. ।
दुस्तरशापव्यसनीं, जे धार्मिक, सदय, तेचि तरतील. ॥ २९
आस्तीकनामक द्विज, पुत्र जरत्कारुचा तयां कवच[9] ।
होईल, स्वस्थ असा, हें माझें देव हो ! मृषा[10] न वच.' ॥ ३०
देवांनीं, श्रवण करुनि विधिची अभयप्रदा अशी उक्ती, ।
आस्तीकमौक्तिकाची पुशिली त्या ज्ञानसागरा शुक्ती[11]. ॥ ३१
ऐसें आयकिलें म्यां. 'स्वजरत्कारु स्वसा[12] तया ऋषितें ।
द्यावी. जीवन[13]कामें यत्न करावाचि सर्वथा तृषितें. ॥ ३२
अभिधान समान जिचें, वरिल जरत्कारु जीस, ती कन्या ।
कद्रूची, वासुकिची अनुजा आहे, जगीं नसे अन्या.' ॥ ३३
एळापत्रोक्तें ते झाले सानंद[14] सर्वही भोगी[15]. ।
अमृतमथनींच ऐसा मंत्र[16] करी वासुकी महायोगी. ॥ ३४
शापान्ता वासुकिनें, मग डोळे करुनि अश्रुंनीं ओले, ।
विधि सुरमुखें विनवितां, जें एळापत्र, तेंचि तो बोले. ॥ ३५

---

१. घांस. २. विषानें दुष्ट झालें अंतर ज्याचें अशा. ३. सर्पविशेष. ४. ब्रह्मदेव. ५. अतित्वरित. ६. ब्रह्मदेवाचें वचन. ७. जगास अयोग्य अशी सर्पवृद्धि. ८. म्यां इच्छिलेलें. ९. आच्छादन, रक्षक. १०. असत्य. ११. शिंपला, माता. १२. भगिनी. १३. उदक इच्छिणाऱ्यानें. १४. आनंदयुक्त. १५. सर्प. १६. मसलत.

अमृतमथन झाल्यावरि, **वासुकिनें** सावधानधी भोगी ।
आज्ञापिले कथाया, होतांचि विवाहकाम[1] तो[2] योगी. ॥ ३६
दिव्यतपस्यासंगें भुलला होता महर्षि; तो कां जी! ।
स्त्रीला स्मरेल? रसिक, त्यजुनि सुधा, कोण सेवितो कांजी? ॥ ३७
ऐसें असतां, त्याचा त्या व्यसनीं[3] काळ लोटला प्राज्य[4]; ।
जों पर्यंत **परीक्षिन्नृपति** करायास लागला राज्य. ॥ ३८
त्या **अभिमन्युकुमारें** हर्षविली, रक्षुनी प्रजा, अवनी. ।
एका दिवशीं केला, मृगयाक्रीडेस्तव, प्रवेश वनीं. ॥ ३९
तेथें एक शरक्षत हरिण पळाला, म्हणोनि, त्या[5] मागें ।
लागे तो नृप; ऐसें झालें होतें कधीं न त्यामागें. ॥ ४०
पुनरपि विंधावा मृग, म्हणउनि, तो, धरुनि सज्य[6] धनु, सरला[7] ।
विशिखा[8] योजुनियां, मग, हरिणातें हरि[9] तसाचि अनुसरला. ॥ ४१
झाला अदृश्य मृग, तो स्वर्गतिचा हेतु होय त्या रूपें. ।
केला, भरीं भरूनि, श्रम भोगुनि, शोध काननीं भूपें. ॥ ४२
देउनि वियोग, निधिनें[10] लुब्ध, नृप भ्रमविला तसा एणें[11]. ।
मग विपिनीं[12] मौनव्रत, फेनप[13], मुनि एक देखिला तेणें[14]. ॥ ४३
नाम **शमीक** तयाचें, जो सत्वविशुद्ध मानसा गमला; ।
त्यासि म्हणे, 'क्षतमृग, जरि तुज आढळला असेल, सांग मला.' ॥ ४४
मुनि न वदे. नृप कोपे. मग कार्मुककोटिनें[15] मृता अहिला[16] ।
घाली त्याच्या कंठीं. घडला पूज्यापराध तो पहिला. ॥ ४५
भाविप्रबळभ्रम तो, सर्वहि बालिश[17] असो, असो सुकवी[18], ।
होणार, सत्पथींही, दिवसाही, डोळसासिही, चुकवी. ॥ ४६
नृपति निजपुरा गेला. न क्षोभे मुनि. न तो मनांत रुसे. ।
साधु, कृतोपद्रवही, प्रतिकूळ न होति ते जनां, तरुसे. ॥ ४७
त्या साधु**शमीकाचा** सुत, नाम तया महर्षिचें **शृंगी**; ।
सेवी दृष्टि जयाची **ब्रह्मपदाब्जा** सदा, जशी भृंगी. ॥ ४८

---

१. विवाह करण्याची इच्छा आहे ज्याची असा. २. ऋषि जरत्कारु. ३. व्यासंगांत. ४. बहुत. ५. हरिणाच्या. ६. दोरीसह, तयार. ७. वांकडा नव्हे असा. ८. बाणाला. ९. सिंह. १०. ठेव्यानें. ११. मृगानें. १२. वनांत. १३. फेंस पिणारा. १४. त्या नृपानें. १५. धनुष्याच्या टोंकानें. १६. सर्पाला, १७. मूर्ख. १८. शहाणा.

तो स्वाश्रमासि, विधिला[1] वंदुनि, येतां तयाप्रति सखा तें ।
गुरुलंघन[2] सांगे कृश[3]. असमंजस[4] कर्म सन्मतिस खातें. ॥ ४९
वृत्त अशेष कृशमुखें कळतां, शृंगी तदा असें शापी, ।
‘तक्षकदंशें सप्तम दिवशीं तत्काळ तो मरो पापी!’ ॥ ५०
मग आश्रमासि येउनि, शृंगी जों तातमूर्तिला पाहे, ।
मृतसर्प कंठदेशीं तोंवरि तैसाचि अर्पिला आहे. ॥ ५१
काढुनि सर्प, पित्याला सांगे, ‘ज्या दुर्जनें असें पाप ।
केलें, म्यां त्यासि दिला, तक्षकदंशें मरो असा शाप.’ ॥ ५२
पुत्रासि शमीक म्हणे, ‘सुतपस्या व्यर्थ गेलि; हें काय ।
केलें? न पावलें क्षय कंठगतप्रेतलेलिहें[5] काय[6]. ॥ ५३
पूज्य, दशश्रोत्रियसा, अध्ययनतपःक्रतु[7]क्रियाहेतू, ।
राजा, गुरु प्रजांचा, चोरादिव्यसन[8]सागरीं सेतू. ॥ ५४
या क्रोधदस्यु[9]तिलकें कोण तपोधन जगीं नसे लुटिला? ।
बापा! विचक्षणा[10]! तूं कैसा विश्वासलासि यां[11] कुटिला[12]?’ ॥ ५५
बहु हळहळोनि, मुनिनें गौरमुख[13] छात्र[14] शीघ्र पाठविला; ।
शाप नृपासि कळविला; तेणें स्वकृतापराध आठविला. ॥ ५६
गुरुलंघनपरितप्तें[15] भूपें तो गौरवदन बोळविला. ।
आधीं मस्तक त्याच्या असकृत्[16] क्षुद्रपद[17]रजांत लोळविला. ॥ ५७
मंत्रिमतें[18] तोषविले विषनाशोपायदक्ष[19] कनकांहीं. ।
ते म्हणति, ‘स्वस्थ असा; आम्हांहुनि शक्त तक्षक न कांहीं.’ ॥ ५८
शीघ्र करविला एकस्तंभप्रासाद; त्यांत नृप राहे; ।
जेथें प्रवेश त्याच्या आज्ञेवांचूनि वातहि न लाहे. ॥ ५९
तेथेंचि राजकार्यें करितां, सा दिवस लोटले नीट. ।
आप्तोक्त[20] करी, परि नृप भ्याला नाहींच तो महाधीट. ॥ ६०
सप्तम दिवशीं कश्यपमुनि, कोणी एक, मृत्यु वाराया, ।

---

१. ब्रह्मदेवाला. २. बापाचा अपमान. ३. कृश नामक ऋषिकुमार. ४. वाईट कर्म. ५. गळ्यांत पडलेला मृत सर्प त्याचे योगें. ६. देह. ७. यज्ञ. ८. संकट. ९. क्रोधरूप श्रेष्ठचोरें. १०. हे शहाण्या. ११. क्रोधास. १२. खळाला. १३. शिष्यनाम. १४. शिष्य. १५ श्रेष्ठाच्या अपमानानें पश्चात्ताप पावलेला. १६. वारंवार. १७. शुद्र पादधूलींत. १८. प्रधानाच्या मतानें. १९. विषनाशाच्या उपायाविषयीं कुशल असे. २०. आप्तांनीं सांगितलेलें.

धांवोनि येत होता, द्विजतनु तक्षकहि त्यासि माराया. ॥ ६१
दोघांसि गांठ पडतां, तक्षक त्यातें पुसे, 'अगा आर्या! ।
सांग, त्वरा करुनि, तूं कोठें जातोसि? कोणत्या कार्या?' ॥ ६२
कश्यप म्हणे, 'परिक्षिन्नृपतीतें आजि विप्रशापानें ।
तक्षक डसणार, तया जातों रक्षावया प्रतापानें. ॥ ६३
त्यासि म्हणे, 'जो तक्षक डसणार तयासि, तो महाविष मी; ।
साधो! जा मागें तूं, कां पडसी संकटीं अशा विषमीं[1]?' ॥ ६४
विप्र म्हणे, 'मद्विद्याबळ मज ठावें; तुझेंहि हरिन गर[2]; ।
पैतिकुशळमुदित[3] गजपुर[4] करिन, जसें नागमुक्त[5] हरिनगर[6].' ॥ ६५
नाग म्हणे, 'जरि मद्विषहत[7] नृप उठवावयासि तूं शक्त, ।
म्यां चाविला करुनि तरु जीवंत, स्वबळ दाखवीं व्यक्त[8].' ॥ ६६
विप्र म्हणे; 'हूं.' तों तो स्वविषाचा दाखवी विभव[9], डास ।
घेउनि, तक्षक भस्मचि करि एका घनघटानिभ[10] वडास. ॥ ६७
तो मुनि हांसोनि म्हणे, 'हा अद्भुत गा! अहे[11]! तुझा डास; ।
क्षणहि न भरतां, झाला ऐसा भस्मत्वहेतु झाडास. ॥ ६८
आतां माझें विद्याबळ, लोकीं अतुळ, निर्विवाद, पहा. ।
होता तसाचि करितों, जरि झाला भस्मराशि पादप[12] हा.' ॥ ६९
ऐसें वदोनि, मुनिनें, तें सर्व करूनि भस्म एकवट, ।
केला जीवंत, करुनि त्यावरि विद्यासुधाभिषेक[13], वट. ॥ ७०
आला क्षणांत अंकुर, नव पत्र, स्कंध, पल्लवहि दाट. ।
झाला वृक्ष यथास्थित मुनितेजेंकरुनि; तोही अहि भाट[14]. ॥ ७१
तक्षक म्हणे, 'मुने! तूं धन्य, ब्रह्माची भाससी, बापा! ।
हरशील गरळ माझें, इतरांचेंही, समस्त, निष्पापा! ॥ ७२
जरी असशील धनार्थी, तरि मजपासोनि अर्थ[15] बरवें घे; ।
नृप तों गतायु; कुशल न खंडितमूळाफळद्रुवर[16] वेघे[17]. ॥ ७३

१. दुर्घटीं. २. विष. ३. राजक्षेमानें संतुष्ट. ४. हस्तनापुर. ५ सर्परहित. ६. वैकुंठ. ७. माझ्या विषानें मेलेला. ८. स्पष्ट. ९. प्रताप. १०. मेघसमुदायतुल्य वडास. ११. हे सर्पा. १२. वृक्ष. १३. विद्यारूपअमृताचा अभिषेक. १४. स्तवकर्ता. १५. धन. १६. तोडिलें मूळ ज्याचें असा वांझ जो वृक्ष त्यावर. १७. चढे.

दुर्वारविप्रशापें निःशेष प्राशिलें नृदेवायू; ।
तेणें करशिल काय? न वृद्धि निरिंधनशिखीस दे वायू. ॥ ७४
अयश न जोडावें त्वां; क्षीणायु क्षितिप निश्चयें मरतो; ।
येथूनिच पुष्कळ धन घेउनि, अमलिनयशा भवान् परतो.' ॥ ७५
ध्यानें जाणूनि म्हणे मुनि, 'तोचि तपस्विशेखर खरा हो!' ।
धन घेऊनि परतला; परि चित्तीं लागला खरखरा हो. ॥ ७६
मग तक्षक, नृपतीचें जाणुनि बहु सावधानपण, सद्मीं ।
नागांतें मुनिवेषें प्रेषी; ते शिरति, अलि जसे पद्मीं. ॥ ७७
भेटति कपटमुनि, कुशळ पुसति सबहुमान, साधुता राया ।
दावुनि, फळ जळ अर्पिति, वदति प्रिय, मानसा धुताराया. ॥ ७८
पूजुनि, बोळवुनि तयां, मग, तो नृप, विप्रदत्ततीर्थजळें ।
घेउनि माथां, ससचिव, सेवूं बैसे ऋषिप्रसादफळें. ॥ ७९
शिरला होता तक्षक योगबळें ज्यांत, तेंचि भूप फळ ।
घेता झाला; वाटे मोठें सर्वां बळांत भाविबळ. ॥ ८०
त्यांत नृपासि कृमि दिसे, ज्याहुनि वर्णें लहान शेंदूर; ।
ज्याचें नेत्रयुग म्हणे, 'तिमिरा! उपमा लहा, नसें दूर.' ॥ ८१
त्या ह्रस्वकाणुकृमिला राजा सचिवांसि दाखवी; हांसे; ।
भ्रमला सुविचक्षण परि; पडले कंठांत मृत्युचे फांसे. ॥ ८२
सचिवांसि म्हणे, 'सप्तम दिन सरलें; मरण युक्तिनें टळलें; ।
कृमि कंठीं डसवावा; शृंगिवचनही न पाहिजे मळलें.' ॥ ८३
सचिव म्हणति, 'बहु उत्तम; न करावा शब्द साधुचा लटिका; ।
टळलाचि समय; जाया अस्ताप्रति भानुला नको घटिका.' ॥ ८४
काळप्रेरित, सचिवानुमतें, नृप आपुल्या करें कृमिला ।
डसवी कंठीं; हांसे; तों तेणें कंठदेश आक्रमिला. ॥ ८५
भीषणभोगें वेष्टुनि, फूत्कारें कांपवूनि सांग रसा, ।
नागें, कंठीं चावुनि, नृप केला घटजपीतसागरसा. ॥ ८६

---

१. राजाचें आयुष्य. २. काष्ठरहित अग्नीस. ३. परीक्षित् राजा. ४. तूं. ५. तपस्व्यांमध्यें श्रेष्ठ. ६. होऊ. ७. चटपट. ८. घरांत. ९. भ्रमर. १०. प्रतारायास, ठकवायास. ११. दैवाचें बल. १२. लघुदेहकीटकाला. १३. अष्टप्रधानांस. १४. व्यापला. १५. भयंकर शरीरानें. १६. पर्वत-वृक्षासहित. १७. अगस्तीनें प्यालेल्या समुद्राप्रमाणें (जीवनहीन केला.)

दव कवळित नगखगसे, तग सेवक काढिती न तैं पळ ते. ।
जळते प्रासादासह[1] नृपतिसवें, जरि न तत्क्षणीं पळते. ॥ ८७
मोठा वेग करुनिं, तो गगनपथीं, मग उडोनियां जाय. ।
राय, प्रासादासह, होय भंसित[2]; सर्व पुर म्हणे, 'हाय.' ॥ ८८
परलोकहित नृपाचें करुनि, गुरु पुरोहितप्रधानजन ।
करिति जनमेजयाचें, अभिषेकुनि सविधि, पितृपदीं भजन. ॥ ८९
बाळपणींच सुमति तो जनमेजय रंजवी प्रजा; माता- ।
तात तसा पाळी, ज्या गुरु धन, सत्कार्य विप्र जामाता. ॥ ९०
काशिप सुवर्णवर्मा राजा, जनमेजया नृपा धन्या, ।
संबंध योग्य जाणुनि, देता झाला वपुष्टमा[3] कन्या. ॥ ९१
त्या काळींच, ब्राह्मणवर्य जरत्कारु, सांडुनी पहिला ।
आश्रम, दुसरा सेवी, धन्य करी स्वांगनाप्रजा[4] अहिला[5]. ॥ ९२
वासुकिनें रम्य गृहीं, करवुनि साहित्य सर्व, वसवीला. ।
मुक्त्यर्थ[6] उमाशंकर जाणों देवालयांत बसवीला. ॥ ९३
स्त्रीस मुनि म्हणे, 'अप्रिय करितांचि त्यजिन तत्क्षणीं तुजला. ।
विप्रिय सोशी विषयी, हा, विषयाकारणें, नसे सुजला.' ॥ ९४
त्या शब्दें कंपित तनु झाली, झंझानिलें जशी कदली. ।
पदलीना ते साध्वी; मान्य करुनि, 'बहु बरें' असें वदली. ॥ ९५
भयचकितता मृगाची, शुनकाची[7] जागरूकता[8] शिकली, ।
ती इंगितज्ञताही काकाची; म्हणुनि सेवनीं टिकली. ॥ ९६
पत्नी अंतर्वत्नी[9] होतांचि, म्हणे मनांत तो 'जावें; ।
हा स्नेहपाश कैसा तोडावा? यासि काय योजावें?' ॥ ९७
एका समयीं, स्त्रीच्या अंकीं ठेवूनि शिर, निजे श्रमला. ।
साध्वीस तोच अवयव सर्वावयवांत धन्यसा गमला. ॥ ९८
संध्यासमयावधि पति निजला, न उठे, म्हणोनि, ते व्याली[10], ।
निद्राभंग कराया, न करायाही, सती मनीं भ्याली. ॥ ९९
'निद्राभंग बरा, परि न बरा आवश्यकक्रियालोप[11];' ।

---

१. राजवाड्यासह. २. भस्म. ३. नामविशेष. ४. आपल्या स्त्रीचा ज्येष्ठ बंधु. ५. वासुकी-सर्पाला. ६. मुक्तीकरितां. ७. श्वानाची. ८. जागृतपणा. ९. गरोदर. १०. नागकन्या. (जरत्कारी.) ११. संध्याहोमादि कर्मांचा लोप.

करुनि विचार असा, जों उठवी, तों विप्र तो[1] करी कोप. ॥ १००
'कां गे ! भुजंगमे ! त्वां मजला निद्राभरांत जागविलें ? ।
काय करशील ? अंकीं शिर ठेवुनि, तुज उदंड भागविलें ! ॥ १०१
जातों; न साहवे मज ऐसा अवमान, पळहि, हा कांहीं. ।
गृहसुख पुरे; कळविलें; शूळचि उठले शिरांत हाकांहीं. ॥ १०२
'अस्तासि चालिला रवि, संध्याविधि अंतरेल,' या भावें, ।
म्हणसी जागविलें, तरि माझें सामर्थ्य तुज नसे ठावें. ॥ १०३
मी निजलों असतां, बळ कैंचें अस्तासि जावया रविला ? ।
म्यां काय द्यूतांत ख्यात स्वतपःप्रताप हारविला ? ॥ १०४
दाटूनि दोष ठेवी, तो काय किती प्रकार बोलावा ? ।
स्नेहाचा, निजचित्तीं, लेशहि येऊं न देचि ओलावा. ॥ १०५
जातां स्त्रीस म्हणे, 'मी होतों सुखरूप, या तुझ्या भवनीं; ।
गेल्यावरि, वासुकिला सांगावें, योग्य हा जन स्ववनीं.' ॥ १०६
नमुनि जरत्कारि म्हणे, 'नसतां अपराध, टाकितां दासी; ।
द्विजराज तुम्ही; या अपवादें कैं घाल हर्ष चांदासी ? ॥ १०७
वासुकिनें, ज्या अर्थें, या देहें पूजिले भवच्चरण; ।
अजि वरद ! अहो वत्सल ! आहे कीं तें नसे तुम्हां स्मरण ?' ॥ १०८
विप्र म्हणे, 'त्वद्गर्भी आहे गुणमणिकरंड, कवि, शिष्ट; ।
शापव्याकुळमातुळकुळविपदर्णवतरंडक, विशिष्ट.' ॥ १०९
वासुकि पुसे, 'अहा ! तो कां हो ! गेला मुनि ? स्वसे ! नमनीं ।
चुकलोंचि काय आम्हीं ? क्षणभरिही स्वस्थ निःस्वसे न मनीं.' ॥ ११०
मुनिच्या अभयोक्तीनें झाला सानंदचित्त वासुकि; ती ।
स्वस्थ करी विश्वातें; तेथें कद्रूतनूद्भवासु किती ? ॥ १११
चिंतामणि पेटीला, कीं जेविं निधानकुंभ सुक्षितिला, ।
कीं अमृतरस कुपीला, बहु गौरव दे तिचाच कुक्षि तिला. ॥ ११२
स्वहितेच्छु भुजग जपती फार जरत्कारिला, तसे, चुकवी ।
जो बोध मरण, त्याच्या मातें विद्येसि सर्वदा सुकवी. ॥ ११३
उत्तमसमयीं झाला पुत्र तिला; प्रकटतां रवि, प्राची ।

१. जरत्कारु. २. उत्तमरक्षणीं. ३. शापानें व्याकुळ जें मातुलकुल त्याला विपत्तिरूपसमुद्र तरण्याविषयीं नौका. ४. बहिणी. ५. सर्पांचे प्राण. ६. ठेव्याचा घट. ७. कुस. ८. पूर्वदिशा.

जशि शोभे, तशि तेणें ती[1] भार्या फारफार विप्राची. ॥ ११४
आस्तीक नाम त्याचें ठेवुनि, मानूनि लाभ लाभाचा, ।
वासुकिनें स्वप्राणाहूनि सदा रक्षिला भला भाचा. ॥ ११५

अध्याय सहावा.

सचिवमुखें जनमेजय परिसे साद्यंत तातघातकथा. ।
कोपें म्हणे, 'न शापीं, पापीं भुजगींच, तातघात कथा. ॥ १
हा तात! मला झाली अत्यंत असह्य, तापदा,[2] वार्ता.[3] ।
हा साहवेल कवणा? क्षणभरि सोसेल ताप दावार्ता.[4]' ॥ २
भूप अमात्यांसि म्हणे, 'झालें वनवृत्त तें कसें श्रवण? ।
कश्यपतक्षकभाषण ऐकूनि तुम्हांसि भेटला कवण?' ॥ ३
म्हणति प्रधान, 'होता काष्ठार्थी पुरुष वटनगारूढ;[5] ।
होऊनि भस्म, झाला जीवंत, वटासवेंचि, तो गूढ. ॥ ४
तेणें कथिलें देवा! जरि मध्यें प्राप्त जाहलें मरण, ।
कश्यपमुनिच्या विद्यासामर्थ्यें त्यासि राहिलें स्मरण.' ॥ ५
सचिवांसि म्हणे राजा, 'जेणें बाधों दिली न हानि वडा; ।
वांचविता तातालां तो मुनि, चित्तांत भाव हा निवडा. ॥ ६
मार्गांतूनि फिरविला कश्यप, देऊनि धन, असा मोठा ।
आग्रह घातीं ज्याचा, तो तक्षक अहि कसा नव्हे खोटा? ॥ ७
तोचि भुजग कृतपातक, घातक; तात कपटें खळें वधिला. ।
शृंगीक्षोभ बरा; परि न बरा त्या कुमतिच्या मनामधिला. ॥ ८
प्रिय आपुलें कराया, उत्तंकाचेंहि, मी तया अरिला ।
भस्म करीन कुळासह; संकल्प असा स्वमानसीं धरिला.' ॥ ९
ऋत्विक्पुरोहितांतें[6] भूप म्हणे, 'तक्षकें जसा तात ।
केला भस्म, तसा मी त्या दुष्टाचाहि इच्छितों घात. ॥ १०
होतील भस्म दहनीं पन्नग जेणें, जरि प्रयोग असा ।
अवगत[7] असेल सांगा; हो पतिरिपुकुळविनाशहृष्ट[8] रसा.[9]' ॥ ११

---

१. जरत्कारी. २. ताप देणारी. ३. कथा. ४. वनाग्निपीडिता. ५. वटवृक्षावर चढलेला. ६. यज्ञकर्त्या उपाध्यायांतें. ७. माहीत. ८. राजा परीक्षितीच्या शत्रुकुळाच्या नाशानें आनंदित. ९. पृथ्वी

ते म्हणति, 'नृपा! आहे वेदपुराणोक्त[1] सर्पसत्र; पहा।
कौतुक; म्हणोत होउनि अहि पश्चात्तप्त, सभय, सत्रप[2], 'हा!' ॥ १२
'पारिक्षित जनमेजय नरनाथ करील सर्पसत्रास;'।
बुध वदति; तोंचि तूं हो दीक्षित; होऊत सर्प सत्रास[3]. ॥ १३
साहित्य नृपति करवी; यज्ञायतनार्थ[4] मोजितां भूतें[5],।
'विप्रनिमित्तें यज्ञासिद्धि' असें भावि वर्णिलें सूतें. ॥ १४
तें परिसोनि नृप म्हणे द्वास्थां[6], 'या यज्ञमंदिरामाजी।
मज न कळतां, न कोणी यावा; आज्ञा मनीं धरा माजी[7].' ॥ १५

अध्याय सातवा.

दीक्षा नृपासि देउनि, विधिलागिं जपोनि, धीर विप्र कृती।
करिती सत्रारंभ, व्यासादि तपोनिधी रविप्रकृती[8]. ॥ १
गुरुशाप[9]विधि[10]कृततदनुमोदनसन्मंत्रमुनिबळें कुंडीं,।
जैसे पतंग दीपीं, पडति तसे सर्प वन्हिच्या तुंडीं[11]. ॥ २
नानावर्ण, महाबळ, वृद्ध, शिशु, व्याळ म्हणति 'हा!' रडती;।
पडतां कृशानुवदनीं[12], दीन महाकाय फार आरडती. ॥ ३
उद्गाता कौत्समुनी, पिंगल अध्वर्यु, त्या मखीं, होता.।
शार्ङ्गरवऋषि ब्रह्मा, च्यवनात्मज चंडभार्गवहि होतौ[13]. ॥ ४
मौद्गल्य, देवशर्मा, कहोड, उद्दालक, प्रमति, वत्स्य,।
कुंडजठर, काळघट, श्रुत, श्रवक, वेदवारिनिधि मत्स्य; ॥ ५
इत्यादि मुनि सदस्य; व्यासहि; ती अद्भुतप्रताप रभा.।
लोपे वैश्वानर[14]भा; अधिक दिसे त्या मखांत तापस[15]भा. ॥ ६
शक्रासि शरण गेला तक्षक, जाणोनि त्या मखारंभा.।
दे अभय हरिहि[16]; शरणागतचि सखा शर्मद[17], न सखा रंभा. ॥ ७
बहु भुजग भस्म होतां, उरतां परिवार केवळ स्वल्प,।
वासुकिहि, विकळ होउनि, 'सर्वांचा पातला' म्हणे 'कल्प[18].' ॥ ८

---

१. वेदांनीं व पुराणांनीं सांगितलेलें असें. २. सलज्ज. ३. सभय. ४. यज्ञकुंडाकरितां. ५. पृथ्वीतें. ६. द्वारपाळांस. ७. माझी. ८. सूर्यासारखा. ९. आईचा शाप. १०. ब्रह्मदेव. ११. मुखांत. १२. अग्निमुखीं. १३. ऋत्विजविशेष. १४. अग्नितेज. १५. ऋषितेज. १६. इंद्रही. १७. सुखद. १८. अंत.

भगिनीस म्हणे, 'वत्से ! वाटे उसळोनि मीहि त्या कुंडीं ।
सत्वर पडेन; सर्पग्रास करी मंत्रदीप्तशिखि[1] तुंडीं. ॥ ९
दिग्भ्रम झाला; गेलें धैर्य बळ; भ्रमतसें महातापें;[2] ।
मन न वळे मज, जैसा गज अंकुश न वसतां मेहातापें. ॥ १०
आम्हां रक्षील तुझा आत्मज; कथिलें भविष्य हें विधिनें[3]; ।
म्हणुनि जरत्कारुकरीं पूर्वीं म्यां तुज समर्पिलें विधिनें[4]. ॥ ११
तें आज सत्य व्हावें; वत्से ! वत्सासि सांग, 'माहेर ।
व्यसनीं[5] न बुडो, काढीं पुत्रातें[6], बोध करुनि, बाहेर.' ॥ १२
आस्तीकासि तशी तूं बहुमान्या, जानकी जशी कपिला[7]. ।
कीं देवहूति माता जैशी त्या सर्वमुनिवरा कपिला[8].' ॥ १३
स्वस्थ हृदय वासुकिचें करुनि, जरत्कारि वृत्त सत्वर तें ।
पुत्रासि कथी; तेंव्हां अभय दिलें त्यासि[9] त्यांहि[10] सत्वरतें. ॥ १४
आस्तीक म्हणे, 'मामा ! तुमचे असु या भयें न कांपावे. ।
स्वकृत सुकृत रक्षोद्यत असतां, तें संकटीं न कां पावे ? ॥ १५
जे मेले ते मेले; उरले रक्षील; आळस त्रात्या ।
हरिस नसे; वरिलचि तो सर्वात्मा विश्वपाळ सत्रा त्या.' ॥ १६
देउनि अभय असें, तो, रक्षाया वासुकिप्रभृति भोगी, ।
वामन जसा बळिकडे, गेला जनमेजयाकडे योगी. ॥ १७
व्हावा प्रवेश म्हणवुनि, मखऋत्विङ्नृपसदस्ययश वर्णी ।
साधु, जरत्कारुमुनीश्वरबाळ, व्याळपाळ, मुनि, वर्णी[11]. ॥ १८
'सोम, वरुण, प्रजापति, सुरपति, यम, रंतिदेव, शशबिंदू, ।
नृग, गय, अजमीढ, धनद, दशरथ, कुळदुग्धसिंधुचा इंदू; ॥ १९
नृपति युधिष्ठिर, भगवान् व्यास, असे सुविधिदेशसमयज्ञ ।
जे जे, त्यांहीं केले मख, हाही योग्य त्यांचिसम यज्ञ. ॥ २०
या सत्रींचे विप्र श्रुतिशास्त्रयशस्तपोनिधि, ज्ञानी, ।
साक्षात् वेदपुरुष हे, गावे, ध्यावे, सदा विधिज्ञांनीं. ॥ २१

---

१. अग्नि. २. महातापाशीं. ३. ब्रह्मदेवानें. ४. यथाविधि. ५. संकटीं. ६. 'पुत्रातें प्लव (म्ह० नौका) करोनि बाहेर' असाही पाठ आहे. ७. मारुती वानरास. ८. ऋषिविशेष. ९. वासुकीस. १०. आस्तीकानें. ११. ब्रह्मचारी.

भगवान् पुत्रच्छात्रांसह **वे**दव्यास देव आपण, ज्या ।
सांनिध्य देतसे, निजभाग्यें बहुमान्य भूप हा पणज्या. ॥ २२
जे विधिनें तुज भजले, तरलेचि भवांत वीतिहोत्रा! ते. ।
त्वां अभय ज्यांसि न दिलें, रक्षाया त्यांसि भीति हो त्राते. ॥ २३
राया! अपूर्व दिधला त्वां हा या हव्यवाहना भाग. ।
तूं तैसाचि, जसे ते **ख**ट्वांग, **दि**लीप, **भीष्म**, **ना**भाग. ॥ २४
भीष्म व्रतें; **दि**वाकर तेजें; प्रभुतेकरूनि तूं **श**क्र; ।
द्युतिनें **ना**रायण तूं; यद्यपि नाहीं तुझे करीं चक्र. ॥ २५
गुणरत्नाकर **कृ**ष्णापरि; धर्मविनिश्चयज्ञ तूं **ध**र्म; ।
आश्रय वसुश्रियांचा तूं; यज्ञनिधान भूमिचें शर्म. ॥ २६
तूं अस्त्रशस्त्रशास्त्रज्ञाता **दा**शरथि **रा**म बाहुबळें; ।
और्व; **त्रि**त तेजें; तूं **भ**गीरथ पहावया अशक्य खळें. ॥ २७
वीर्य सदा गुप्त तुझें, जैसें **वा**ल्मीकिचें; जितक्रोध; ।
जोडा तूंचि **व**सिष्ठा; न दुजा; केला उदंड म्यां शोध. ॥ २८
अस्मन्मनःप्रिया! तुज या सर्वांसह सदा असो स्वस्ती; ।
त्वद्यश करो, तुझ्या अरिभटकटकासह, दिगंतरीं वस्ती. ॥ २९
या ऐशा सत्राचा कर्ता तूं मात्र **भा**रता! राया! ।
तूं व्यसनीं सेतु जनां, वाहूनि जनाधिभार, ताराया.' ॥ ३०
ऐसें करितां स्तवन प्रज्ञातेजोनिधि प्रतिद्वारीं, ।
रोध करावा कवणें? झाला बहुमान्य वेदविद्वारीं. ॥ ३१
वय अल्प; अनल्प तपोविद्यातेज; प्रगल्भता शब्दीं; ।
पाहोनि, सर्व सादर झाले मुनि ते, जसे शिखी अब्दीं. ॥ ३२
भूप म्हणे, 'बाळ दिसे, परि मतिनें वृद्धसा, न बाळकसा; ।
वय अल्प; परि अनल्पज्ञान; म्हणावा असाहि बाळ कसा? ॥ ३३
वर द्यावासा वाटे; भलत्यासि सुपात्र हें नव्हे लभ्य; ।
सांगोत **श्रीव्यास**प्रभृति, करुनि ऐकमत्य, मज सभ्य.' ॥ ३४

---

१. आस्तीकाचा बाप जो अर्जुन त्याला. २. हे अग्ने. ३. अग्नीस. ४. ऋषिविशेष. ५. तप आणि सहनशीलता यांविषयीं वसिष्ठाची साम्यता तुला आहे. कारण ज्याचे शंभर पुत्र विश्वामित्रानें मारिले तथापि त्यास क्रोध आला नाहीं. ६. जनाचा मनोव्यथारूप जो भार त्यास. ७. बुद्धि व तेज यांचें स्थान. ८. वेदवेत्त्यांच्या समूहांत. ९. प्रौढता. १०. मोर. ११. मेघीं.

सर्व सदस्य म्हणति, 'बहुउत्तम सत्कारयोग्य हें पात्र; ।
द्यावा वर; थांबावें परि ये तक्षकभुजंग तों मात्र.' ॥ ३५
आस्तीकचातकावरि तो नृप जीवनद[1] बोळला होता; ।
तों तेंचि वदे; जाणुनि मखविघ्न, मनांत पोळला होता[2]. ॥ ३६
'तक्षक येऊं द्यावा' ऐसें म्हणतांचि, राय होत्यातें ।
प्रार्थुनि म्हणे, 'शिखिमुखीं होमा; अवकाश काय हो त्यातें?' ॥ ३७
ऋत्विज म्हणति, 'नृपा ! सुरपति[3] आहे सिद्ध शत्रुच्या अवनीं[4]; ।
शस्त्राधिदेवता[5] हें सांगति हरिच्याचि[6] तो असे भवनीं[7].' ॥ ३८
तों लोहिताक्ष सूतहि बोले, 'मुनि बोलिले यथार्थ नृपा ! ।
कथितों पुराणमत मीं; कोण न शरणागतीं करील कृपा?' ॥ ३९
इंद्रें स्वतातघातक पाठीशीं घातला, म्हणूनि, करें ।
कर चोळी; अधरातें चावी जनमेजय प्रभू निकरें. ॥ ४०
नृपतिप्रियार्थ होता मंत्रबळें तक्षकासि आकर्षी; ।
गडबडले बहु तेव्हां वासव, सुर, साध्य, सिद्ध, नाकर्षी. ॥ ४१
शक्र, बसोनि विमानीं, लपवुनि अहि उत्तरीयवस्त्रांत, ।
सत्रासि जाय, होउनि विवश, बळ अनंत विप्रशस्त्रांत. ॥ ४२
सर्पमखायतनोपरि[9] गगनीं आला भयार्त मघवा[10] हो; ।
अतुळा ऋषिकीर्तिसुधातटिनी; तीमाजि सर्व अघ वाहो. ॥ ४३
तों नृप होत्यासि म्हणे, 'आजुनि जरि हरि[10] अरीस[11] सोडीना; ।
निजभक्तसंततीचें करुनि हित, प्रेम यशहि जोडीना; ॥ ४४
तरि काय पाहतां हो? दोघांसहि पावकांत होमा जी ! ।
तुमच्या पदप्रसादें वांछा सफळा जगांत हो मोजी[12]. ॥ ४५
ऐशी यजमानाची आज्ञा होतांचि, विप्रवर होता ।
झाला सिद्ध, तयीं त्या यज्ञाच्या उपरि वज्रधर होता. ॥ ४६
भ्याला नाहीं जो प्रभु, करितां वृत्रासवेंहि भीमरणा[13], ।
पविधर[14], कवि, धरभेत्ता, तोही सुरराज, फार भी मरणा. ॥ ४७
त्यजिला सुरपतिनें तो शरणागत तक्षक स्वपदरींचा; ।

---

१. मेघ. २. हवनकर्ता. ३. इंद्र. ४. रक्षणीं. ५. शस्त्रांच्या (मंत्रविशेषांच्या) देवता. ६. इंद्राच्या. ७. गृहीं. ८. क्रोधानें. ९. सर्पयज्ञस्थानावर. १०. इंद्र. ११. शत्रूस. १२. माझी. १३. भयंकरयुद्धा. १४. पर्वत भेदणारा.

पावेलचि भंगातें प्रभुहि, जरि धरील पक्ष सदरींचा[1]. ॥ ४८
हरि[2] भवनासचि[3] गेला, शरणागत सोडुनि स्वहस्तींचा; ।
दैवकवळित[4]निजकलभत्राणीं[5] दुर्बळचि पतिहि हस्तींचा. ॥ ४९
ओढोनि आणिला हो ! तो तक्षक मंत्रशक्तिनें जवळ; ।
आपण 'घे' म्हणतांचि, ज्वलनें घ्यावाचि आननें कवळ. ॥ ५०
ऐसें करुनि ऋत्विज म्हणति, 'नृपा ! जें त्वदिष्ट[6] सत्कार्य, ।
तें हें झालेंचि बरें; सत्कारीं शिशुमुनींद्र सत्कार्य. ॥ ५१
बहुधा अहि कंपितहरिहस्तापासोनि पावला पतन; ।
हे नाद तक्षकाचे; भवदहिता[7] करिल कोण गा जतन ?' ॥ ५२
मुदितमना नृपति म्हणे, 'बाळमुने ! वर तुला महाकविला ।
देतों; माग; न आम्हीं कोणीहि कधीं सकाम हाकविला.' ॥ ५३
आस्तीक म्हणे, 'देवा ! तुमचा महिमा बहूत्तम खरा, हो ! ।
जरि वर देतां, द्या हा, न बरा अत्यंत उग्र मख, राहो.' ॥ ५४
नृपति म्हणे, 'मणि, कांचन, धेनु, गज, ग्राम घे; न मख राहो; ।
देवी सरस्वतीच्या मजवरि तूं सुप्रसन्न मखरा ! हो.' ॥ ५५
विप्र म्हणे, 'मणि, कांचन, धेनु नको, हय नको, नको हस्ती; ।
ग्राम नको, धाम[8] नको, मख राहो. मातृकुळ असो स्वस्ती[9].' ॥ ५६
ऋत्विक्, सदस्य म्हणती, 'राया ! स्तुतिचा मनोज्ञ नवरा हो; ।
दे वर मुनिला; त्वद्यश साधुवदान्यांत नित्य नवें[10] राहो !' ॥ ५७
नृप लोभवीत होता जोंवरि मुनिला अनेकवरदानें, ।
सांवरिला होता अहि मुनितेजानें प्रपन्नकरदानें[11]. ॥ ५८
मग त्या आस्तीकाला भूप म्हणे, 'जरि नको दुजी वस्तू; ।
'त्वत्सत्रमेव[12] विरमतु[13]' म्हणसि, तरि तुझेंचि इष्ट तें अस्तु[14]'. ॥ ५९
विप्राचें प्रिय करितां, सर्वहि ऋत्विक्, सदस्य, वरदा त्या ।
म्हणति, 'भला ब्रह्मण्या ! सर्वां दात्यांत तूंचि वर दात्या !' ॥ ६०
केलें सत्र समाप्त, क्षितिपतिनें विप्र तर्पिले वित्तें; ।
गौरविला आस्तीक प्रेमें, मानूनि आत्मभू[15] चित्तें. ॥ ६१

१. बलाढ्य शत्रूंचा. २. इंद्र. ३. गृहास. ४. वणव्यांत सांपडलेल्या. ५. आपल्या छाव्याच्या रक्षणीं. ६. तुला प्रिय. ७. तुमच्या शत्रूस. ८. गृह. ९. कुशल. १०. नूतन. ११. शरणागतास आश्रय देणाऱ्यानें. १२. तुझा यज्ञच. १३. राहो. १४. असो. १५. ब्रह्मदेव.

जेणें 'विप्रनिमित्तें विघ्नित होईल मख' असें भावी[1] ।
कथिलें होतें, नृप त्या सूतींहि महागुणज्ञता दावी. ॥ ६२
व्हावें सदस्य माझ्या हयमेधीं त्वां महामनुज्ञात्या[2] ! ।
ऐसें आस्तीका नृप विनवुनि, दे जावया अनुज्ञा[3] त्या. ॥ ६३
दुष्कर कर्म करुनि तो मुनि, जाउनि शीघ्र मातुळावासा[4], ।
दे हर्ष, घनें दिधल्या दवार्तहर्षासवें तुळावासा. ॥ ६४
जीवनदानें झाला सर्वांसह सुप्रसन्न नागवर[5]; ।
वासुकि त्या भगिनीच्या पुत्रासि म्हणे, 'यथेष्ट माग वर.' । ६५
आस्तीक म्हणे, 'माझ्या आख्यानीं अर्पितील जे श्रवण, ।
त्यांसि न लेशहि द्यावें भय, व्हावें सर्वदा तुम्हीं प्रवण[6].' ॥ ६६
पन्नग म्हणति, 'दिला वर बापा! त्वच्चारितनामगात्याचा ।
घात करील अही जो, मूर्धा शतधा उलेल[7] गा! त्याचा.' ॥ ६७
ऐसा आस्तीक मुनि व्याळांचा शाप, मृत्यु, वारूनी, ।
तप करुनि, वंश ठेवुनि, गेला मोक्षासि, भक्त तारूनी. ॥ ६८
सौति म्हणे, 'हे शौनक! मुनिवर्या सुमतिकीर्तिसदनानें ।
रुरुला अशी प्रमतिनें पूर्वी कथिली कथा स्ववदनानें.' ॥ ६९

अध्याय आठवा.

शौनक सौतीस म्हणे, 'सत्रीं कर्मांतरीं कथा व्यासें ।
कथिल्या नृपा तशा, त्या वाटे आम्हां तुवां कथाव्यासें.' ॥ १
सौति म्हणे, 'परिसा जी! कथनीं आहे मलाहि हव्यास[8]; ।
सांगेन तेंचि, वदला नृपतिप्रति जें सुखावह व्यास.' ॥ २
व्यासासि म्हणे राजा, 'संतति संरक्षिली तुवां कुरुची; ।
क्षयहेतु विरोधाची उठली तीच्या मनांत कां कुरुची[9] ? ॥ ३
कौरव पांडव बंधू, वैर कसें त्यांत वाढलें अजि! तें ? ।
सांगा, न वारिलें त्वां प्रभुनें कां ? त्याहि ईश्वरें अजितें ?' ॥ ४
श्रीव्यासें स्वच्छात्रा[10] श्रीवैशंपायना दिली आज्ञा; ।
'पूर्वजकथा कथावी राया जनमेजया तुवां प्राज्ञा!' ॥ ५

१. पुढें होणारें. २. गायत्री हा महान् मंत्र जाणणाऱ्या. ३. आज्ञा. ४. मामाच्या गृहास ५. वासुकी. ६. नम्र. ७. फुटेल. ८. हर्ष. ९. दुष्ट रुची. १०. स्वशिष्या.

सांगे वैशंपायन संक्षेपें प्रथम सर्वही, परि तें ।
तृप्ति न दे, म्हणुनि पुन्हा सांगे रायासि विस्तरें [1]चरितें. ॥ ६
उपरिचरवसुकथा, जी मुनिगीता, आयका कवी हो! ती. ।
हेचि सुधा तुळितां, तरि बहु बोलों काय ? काकवी हो ती. ॥ ७
पुरुवंशज वसु पूर्वीं उग्र तप करी; [2]प्रजावन त्यागी; ।
त्यासि [3]हरि म्हणे, 'तुज भू[4]त्राणचि हित, हे नव्हे असत्या [5]गी.' ॥ ८
सुरमुनि तसेंचि म्हणती; मग वसु तें मान्य करि; तया माळा, ।
यष्टि, स्फटिक, विमानहि ये शक्र सख्या स्व चेदिभूपाळा. ॥ ९
तो हरिदत्तविमानीं हरिसा साजे; म्हणोनियां प्रणती ।
करुनि उपरिचरवसुतें प्रेमें गंधर्व अप्सरा म्हणती. ॥ १०
होती नदी श्रुतिमती त्याच्या नगरासमीप जी, तीतें, ।
रोधुनि बळेंचि [6]कोलाहलनग [7]भोगी, त्यजूनि नीतीतें. ॥ ११
[8]तटिनीस सोडवाया, बळसिंधु, नृपति, जसें [9]विटा मत्ता, ।
त्या कोलाहलगिरिला हाणी, [10]अशनी जशी, तशी लत्ता. ॥ १२
[11]पादाघातें पडलें विवर; तयांतूनि ती[12] निघोनि नृपा ।
अर्पुनि नगज सुत, सुता, 'मजवरि केली' म्हणे 'उदंड कृपा.' ॥ १३
सेनापति करुनि तिचा सुत, वसुनें तत्सुताहि [13]गिरिकेला ।
स्त्रीत्वें वरुनि विधिनें, श्वशुरत्वें तोहि धन्य गिरि केला. ॥ १४
गिरिकेच्या ऋतुकाळीं केली आज्ञा स्वयेंचि पितरांनीं; ।
मृगयार्थ म्हणुनि गेला, संपादाया तदीय हित रानीं. ॥ १५
तें वन [14]चित्ररथोपम खवळी कामासि, म्हणुनि गिरिकेला ।
वसुनृप चिंती; मदनें वश तो तत्काळ धैर्यगिरि केला. ॥ १६
चित्तांत चिंतितांचि स्त्रीसंगसुखासि, [15]शुक्रपात घडे; ।
पत्रपुटीं धरुनि, वसु क्षितिपति पळमात्र संकटांत पडे. ॥ १७
वीर्य [16]अमोघ व्यर्थ न जावें, ऐसा विचार आठविला; ।
तें स्त्रीस द्यावयाला, मग [17]खगें नगरासि शीघ्र पाठविला. ॥ १८

---

१. घडलेल्यागोष्टी. २. प्रजांचें रक्षण. ३. इंद्र. ४. रक्षण. ५. वाणी. ६. कोलाहलनामा पर्वत. ७. उपभोगी. ८. नदीस. ९. जारा. १०. वज्र. ११. लातेनें. १२. नदी. १३. गिरिकानामक कन्येला. १४. कुबेराच्या बागेसारखें. १५. वीर्यपात. १६. व्यर्थ न होणारें. १७. पक्षी.

पत्रपुट धरुनि तुंडीं श्येन उडे, त्यासि धांवतां अडवी ।
आमिषशंकित अन्य श्येन नभीं; दैव अन्यथा घडवी. ॥ १९
ते श्येन तुंडयुद्धीं जेव्हां खेपथीं प्रवर्तले दोघे, ।
तेव्हां पादनखांनीं पत्रपुटातें धरूनि खग तो घे. ॥ २०
तें वसुवीर्य गळालें, श्येनाचें चित्त गुंततां युद्धीं; ।
पडलें दैवेनियोगें श्रीमद्भास्करसुतोदकीं शुद्धीं. ॥ २१
त्यातें मत्स्यी प्राशी; ते तैशी अद्रिकाप्सरा शापें ।
विधिच्या झाली होती, आपण संपादिल्या तशा पापें. ॥ २२
शापान्तहि वसुवीर्यें प्रसवेल अपत्ययुग तिच्या विधिनें ।
केला होता निश्चय, पूर्वी शापोनिही दयानिधिनें. ॥ २३
वसुवीर्य सेविल्यावरि, मास दहावा भरे, अशा काळीं ।
सांपडली दाशाला ती, त्या यमुनेंत टाकिल्या जाळीं. ॥ २४
चिरितां अपत्ययुग दे, मुक्तायुग उकलितां जशी शुक्ती; ।
तत्काळ अद्रिका त्या शापापासोनि पावली मुक्ति. ॥ २५
ते त्या उपरिचराला आश्चर्यें दाश दाविती बाळें; ।
कन्या दाशासि दिली, सुत आपण घेतला धरापाळें. ॥ २६
तो मत्स्यनाम राजा; जी दाशपतीसि ओपिली कन्या, ।
ती सत्यवती, धीवरसदनीं जी वाढली सती धन्या. ॥ २७
त्या कन्येच्या देहीं मीनाचा गंध येत होता; तें ।
परि वपु निरुपम; रक्षी यमुनातीरीं स्वतोतपोतातें. ॥ २८
त्यावरि, ज्याच्या जन्में होय वसिष्ठ स्वयें परम हर्षी, ।
तीर्थाटणप्रसंगें तेथें आला पराशर महर्षी. ॥ २९
वंदुनि सत्यवतीनें बैसविला निजतरींत उतराया; ।
झाला प्रसन्न विनयें, निरुपमरूपेंहि, शक्तिसुत राया ! ॥ ३०
दिव्यज्ञान मुनि म्हणे, 'सुंदरि ! मज अंगसंग दे; हरितें ।
त्वद्रूप मन्मनातें; कामज्वर तुरवि तिळहि देह रितें.' ॥ ३१
ती त्यासि म्हणे 'दोहीं तीरीं सर्वत्र विप्र आहेत, ।
दिवसा, अशा प्रकाशीं, तुमचा कैसा घडेल हा हेत?' ॥ ३२

१. ससाणा पक्षी. २. मांस. ३. आकाशमार्गीं. ४. दैवयोगें. ५. यमुनोदकीं. ६. कोळ्याला. ७. शिंपली. ८. कोळ्याच्या घरीं. ९. पित्याच्या नौकेतें. १०. वसिष्ठपुत्र शक्ति त्याचा सुत पराशर

करि अंधकार तेथें, निर्मुनि तो योगिराज नीहार[1], ।
त्या वरुनि, मनिं म्हणे ती, 'दुर्लभतर होय हा जनीं हार[2].' ॥ ३३
विनवुनि ती त्यासि म्हणे, 'गुरुजन देती वरासि कन्या; या ।
मार्गासि लंघितां, मी प्रभुजी! होईन पात्र अन्याया.' ॥ ३४
तो मुनि हांसोनि म्हणे, 'स्वपराच्या दूषणासि कैवि[3] टाळी; ।
हूं म्हण; माग वर; सुमुखि! कोणासहि साधुसंग न विटाळी.' ॥ ३५
'हाही दुर्गंध नसो' ऐसा वर मागतांचि दे; हातें ।
स्पर्श करुनि, करि विप्र क्षिप्र[4] तिच्या दिव्यगंध[5] देहातें. ॥ ३६
योग्यत्व अंगसंगीं आलें; कुदशा त्यजूनि तनु सरली; ।
योजनगंधा[6] मुनिला, जशि गंगा शंकरासि, अनुसरली. ॥ ३७
सदयमुनिनें भवाध्वश्रांताचें[7] दुःख हेरिलें रे! तें ।
नच [8]उरलें; सुक्षेत्रीं कल्पद्रुमबीज पेरिलें रेतें. ॥ ३८
वाटे, सांडुनि जातां, गर्भवती निरविलीच यमुनेतें; ।
वदली असेल तेही, 'विसरावें स्ववरदान न मुने! तें.' ॥ ३९
यमुनाद्वीपीं झाली तत्काळ सुखप्रसूति; सुत पातें ।
हालों न दे पहातां; करि कौतुक शक्तिपुत्र[9] सुतपातें. ॥ ४०
प्रसवे; कन्याभाव न मळला; पळ लागलें न सुटकेला. ।
सत्यवतीकुक्षीनें लज्जित सद्रत्नशुक्तिपुट केला. ॥ ४१
तो उपजतांचि झाला प्रौढ मुनि; स्वजननीस करि नमन; ।
तीस म्हणे, 'येतों मी; स्मरतां, भेटोनि, हृष्ट करिन मन.' ॥ ४२
द्वीप अयन[10] आश्रय त्या मुनिसि उपजतां, म्हणूनि, कवि त्यातें ।
द्वैपायन म्हणति नृपा! अज्ञानमहातमिस्रसवित्यातें[11]. ॥ ४३
होतिल बहु कलिमलिन, प्राज्ञजन न पावतील श्रेयास[12]; ।
यास्तव करी चतुर्धा वेदविभागासि, म्हणुनि, तो व्यास. ॥ ४४
ऐसा भगवान् व्यास ब्राह्मणरूपें मुकुंद अवतरला. ।
जन, ज्याच्या उपदेशें, निजहित जाणुनि, सुखेंचि भव तरला. ॥ ४५

---

१. धुकें. २. माला. ३. ज्ञाता. ४. सत्वर. ५. उत्तम आहे सुवास ज्याचा असा. ६. चार कोसपर्यंत जीच्या आंगाचा सुवास जाई, अशी. ७. संसारमार्गी श्रमलेल्याचें. ८. पुत्र. ९. पराशर. १०. आश्रय. ११. अज्ञानरूप महांधकाराचा नाश करणारा सूर्य. १२. कल्याणास.

या श्रीव्यासप्रभुला वंदुनि, मी [1]भारतेतिहासरस ।
पाजीन तुम्हा श्रोत्यां, अमृतरसाहूनि फार हा सरस. ॥ ४६
दितिज, दनुज, राक्षस बहु, धरुनि मनुष्यादिरूप, या महिला ।
पीडिति अधर्मभारें, धरुनि सुरद्वेष मानसीं पहिला. ॥ ४७
निजभर परिहारार्थ प्रार्थी श्री[2]पद्मयोनिला [3]अवनी; ।
तो देवांसि म्हणे, 'जा अंशें, व्हा सिद्ध भूमिच्या [4]अवनीं.' ॥ ४८
इंद्रें विष्णु विनविला; झाला वसुदेवपुत्र तो अंशें; ।
ज्याच्या उदयें लोकीं वरिलें सयश सुधांशुच्या वंशें. ॥ ४९
बळदेव शेष झाला; यादव देवांश भीष्म [5]वस्वंश; ।
जेणें निजप्रतापें कुरुचा नाहीं बुडों दिला वंश. ॥ ५०
मांडव्याच्या शापें झाला यमधर्म [6]शूद्रयोनिजनी; ।
कुरुच्या वंशीं तेजें भीष्म विदुर हींच दिव्य दोनि जनीं. ॥ ५१
[7]सूर्यांशें [8]कुंत्युदरीं कर्ण उपजला; तसाचि जो द्रोण, ।
तो अंश बृहस्पतिचा; तैसा होता सुविद्यजन कोण? ॥ ५२
तो [9]रुद्रकाळकामक्रोधांशोत्पन्न भूमिपा! जाण ।
जो द्रोणाचार्याचा अश्वत्थामा [10]बहिश्चर प्राण. ॥ ५३
[11]रुद्रगणांशोद्भव कृप, शकुनि नृपा! द्वापरांश विख्यात; ।
[12]मरुदंशज कृतवर्मा, द्रुपदहि, शैनेय[13] तोहि, तज्जात. ॥ ५४
गंधर्वपति अरिष्टानंदन, नामेंकरूनि जो हंस, ।
तो धृतराष्ट्र, सुयोधन कलि, केला ज्या खळें [14]कुळध्वंस. ॥ ५५
दुर्योधना[15]नुजन्मे [16]पौलस्त्य; तयां न साधु मानावें. ।
विस्तरभयें तयांचीं मी सांगेनाचि सर्वथा नांवें. ॥ ५६
पहिला दुर्योधननृप; तदनुज दुःशासनाख्य तो दुसरा; ।
दुःसह, दुःशल, ऐसे शत झाले, मकर कुरुकुळा [17]सुसरा. ॥ ५७

---

१. भारतरूप इतिहास हाच रस. २. ब्रह्मदेवाला. ३. पृथ्वी. ४. रक्षणाविषयीं. ५. अष्टवसूंच्या अंशापासून झालेला. ६. शूद्रयोनींत उत्पत्ति ज्याची असा. ७. सूर्याचा अंश. ८. कुंतीच्या उदरांत. ९. सकळांस वळविणारा जो काळस्वरूपी महादेव त्याच्या कामक्रोधाच्या अंशापासून झालेला. १०. शरीराबाहेर असणारा. ११. महादेवगणाच्या अंशापासून झालेला. १२. मरुद्देवांच्या अंशांपासून झालेला. १३. सात्यकि. १४. कुलक्षय. १५. धाकटे बंधु. १६. राक्षस. १७. उत्तम सरोवराला.

वेश्यापुत्र युयुत्सु स्तुत्य; शतां वेगळाचि तो, त्यांत. ।
जैसें गुणें अधिक गजमौक्तिक एकचि अनेकमोल्यांत. ॥ ५८
[1]अभ्यंश पांडुराजा; त्याच्या दोघी सुलक्षणा भार्या, ।
त्या सिद्धिधृती कुंती माद्री झाल्या सुरांचिया कार्या. ॥ ५९
त्यांच्या ठायीं झाले जे, कुरुचा भूषवावया वंश, ।
सुत पांच, धर्ममारुतहरिदस्रांचे[2] प्रसिद्ध ते अंश. ॥ ६०
[3]शच्यंश द्रुपदसुता झाली, साध्वीजनीं जिची अर्चा. ।
[4]कृष्णानुजोदरज जो अभिमन्यु सुधांशु पुत्र तो [5]वर्चा. ॥ ६१
[6]कुरुगुरुशिरोंबुजातें जो धृष्टद्युम्न धरुनि [7]असि खंडी ।
तो [8]अग्न्यंश; नृपाळा! राक्षस तो सुर मनुष्य न, शिखंडी. ॥ ६२
प्रतिविंध्य युधिष्ठिरसुत, सुतसोम वृकोदरात्मज ख्यात; ।
श्रुतकीर्ति शतानीक श्रुतसेनाचे क्रमें तिघे[9] तात. ॥ ६३
हे पांच [10]द्रुपदसुताकुक्ष्युद्भव अंश वि[11]श्वेदेवांचे; ।
अवतरले अंश असे, बहु सुखवायासि वि[12]श्वें, देवांचे. ॥ ६४
जो विप्रचित्ति दानव, तोचि जरासंधनृप महासत्व; ।
शिशुपाळ हिरण्यकशिपु, कंसहि तो काळनेमि हें तत्व. ॥ ६५

अध्याय नववा.

जनमेजयनृपति पुसे; वैशंपायन कथी सविस्तर; तें ।
बहु; मी लेशचि गातों; जग लेशेंही महद्यशें तरतें. ॥ १
[13]श्रीकांतनाभिपद्मीं प्रगटे विधि, वि[14]प्रसर्जनीं दक्ष; ।
त[15]द्दक्षांगुष्ठोद्भव विख्यातयशा [16]प्रजापती [17]दक्ष, ॥ २
त्याची कन्या अदिती, कश्यपभार्या, महासती, ज्येष्ठा; ।
तीचा पुत्र विवस्वान्; वैवस्वत म्हणति तत्सुता श्रेष्ठा. ॥ ३

---

१. अत्रिऋषीचा अंश. २. यम वायु इंद्र अश्विनीकुमार यांचे. ३. इंद्राणीचा अंश. ४. सुभ-च्या उदरांत झालेला. ५. तेजस्वी. ६. द्रोणाच्या शिरकमळातें. ७. तरवार. ८. अग्नीचा अंश. ९. अर्जुन, नकुळ व सहदेव. १०. द्रौपदीच्या कुशीपासून उत्पन्न झालेले. ११. विश्वसंज्ञकदेवांचे. १२. जग. १३. विष्णूच्या नाभिकमलांत. १४. ब्राह्मणांच्या उत्पत्तीविषयीं. १५. त्याच्या उजव्या अंगठ्यापासून उत्पन्न. १६. प्रजा उत्पन्न करणारांत मुख्य. १७. दक्षप्रजापती.

त्या वैवस्वतमनुची [1]सोमात्मजबुधवधू [2]इला [3]तनुजा; ।
तीचा पुरूरवा सुत, पुर प्रतिष्ठान दे स्वयें मनुजा. ॥ ४
तत्सुत आयु, तयाचा नहुष तदात्मज ययाति, जो अरिला ।
यमसम समरीं झाला, [4]शुक्रसुतेनें स्वयेंचि जो वरिला. ॥ ५
झाला ययाति [5]कविचा जामाता; तीच सत्कथा परिसा. ।
या चरितामृतपानें या लोकीं सर्व रसिक हो [6]हरिसा. ॥ ६
देवाचार्य बृहस्पति, [7]कवि असुराचार्य, हे जगन्[8]महित, ।
शिष्याभिमान धरुनि, स्पर्धा करिती सदा जसे [9]अहित. ॥ ७
दे[10]वांच्याही जे जे [11]भट होती सं[12]गरांत [13]असुरहित ।
[14]संजीविनीबळें त्यां उठवि, करी काव्य नित्य असुरहित. ॥ ८
ती विद्या सुरगुरुला अवगत नव्हती, म्हणूनि समरांत ।
बहु मरती, तें पाहुनि, न टिके उत्साह धैर्य अमरांत. ॥ ९
ती विद्या साधाया देवांनीं सद्विचार आठविला. ।
शुक्राकडे स्वगुरुसुत कच विनवुनि, कथुनि युक्ति, पाठविला. ॥ १०
शिष्यत्वें जाउनि, कच सांगे गुरुदास्य[15]काम, पद नमुनी; ।
प्रणतीं शत्रुसुतींही द्रवला तो सुप्रसन्नवदन मुनी. ॥ ११
आराधिला कचें गुरु, गुरुची कन्याहि देवयानी ती; ।
झाली प्रसन्न सत्वर; शिकविति तैशीच देव [16]यां नीती. ॥ १२
असुर म्हणति, 'विद्येनें प्रबळ करायास देव या नीचें ।
मन मोहिलें गुरूचें, गुरुचित्ताहूनि देवयानीचें.' ॥ १३
गुरुगोरक्षण करितां, देवद्वेषेंकरूनि असुरांनीं. ।
कचमांस मृगांसि दिलें वांटुनि भक्षावयासि असु रानीं. ॥ १४
गाई गृहासि आल्या, मावळला रविहि, कच न आढळला; ।
तेव्हां सोडुनि [17]धृतिनग [18]शुक्रसुताबुद्धिभूमिला ढळला. ॥ १५
शुक्रसुता गहिंवरली; न्हाणी [19]तदुरःस्थलासि अश्रु तिचें; ।
कवणाला न प्रिय तें गुणमणिमय केलिमंदिरें[20] [21]श्रुतिचें? ॥ १६

१. चंद्रपुत्र जो बुध त्याची स्त्री. २. नामविशेष. ३. कन्या. ४. देवयानीनें. ५. शुक्राचार्यांचा. ६. इंद्रासारिखा. ७. शुक्र. ८. पूज्य. ९. शत्रु. १०. देवांच्या संगरांत. ११. योद्धे. १२. युद्धांत. १३. प्राणरहित. १४. जिवंत करण्याची विद्या. १५. इच्छा. १६. कचास. १७. धैर्यरूप पर्वत. १८. देवयानीच्या बुद्धिरूप पृथ्वीला. १९. तिच्या वक्षःस्थलास. २०. क्रीडागृह. २१. वेदाचें.

तातासि म्हणे, 'आला नाहीं अद्यापि कच; नसे अवधी; ।
लव धीर बुद्धि न धरी माझी; ताता! सुनिष्ठुरा तव धी. ॥ १७
येता मघांचि, असता जरि कुशली; करिति खळ अघा[1]; बरवी ।
गति न दिसेचि कचाची; कुशळिजनविरह असा न घाबरवी. ॥ १८
कच आजि न येतां, मीं प्राण त्यागीन न भरतां घटिका; ।
आण तुझी; जाण खरें; केला निश्चय नव्हेचि हा लटिका.' ॥ १९
काव्य म्हणे, 'धीर धरीं; आहे संजीविनी सुधाधारा[2]; ।
उठवूनि आणितों कच, चिंतुनि विश्वंभरा बुधाधारा[3].' ॥ २०
मंत्रजप करुनि तो कवि, 'ये रे! वत्सा! कचा!' असें बाहे. ।
भेदुनि वृकोदरें[4], पैल[5] सर्व निघे, त्यांत लेशहि न राहे. ॥ २१
होता तसाचि झाला; उठला; आचार्य देव तारी; ती ।
शक्ति तशीच निरुपमा[6]; भिन्ना गुर्वन्यदेवतारीती[7]. ॥ २२
कच येतां बहु हर्षे; 'धन्य' म्हणे 'मीच कन्यका; मातें ।
वांचविला, त्वांचि दिला; या देइल कोण अन्य कामातें?' ॥ २३
पुसतां वधवृत्त, कच स्वगुरुसुतेला समस्त आयकवी. ।
प्रार्थुनि म्हणे, 'उगी. हा स्वस्ति[8] असो सर्वविप्रराय कवी.' ॥ २४
त्यावरि गुरुकन्योक्तें[9], पुष्पें आणावयासि जाय वना; ।
सांपडला त्या असुरां कच, जैसा वत्स एकला यवना. ॥ २५
पुनरपि त्या पापांनीं सद्विप्रकुमार चरचरां चिरिला. ।
भय न धरिलें तिळहि, त्या पापाच्या जोडितां महागिरिला. ॥ २६
खंड तिळप्राय करुनि, नेउनि, केले निमग्न जळधींत. ।
नाहींच धर्म, करुणा, पापभय, विचारलेश खळधींत. ॥ २७
जो मुनि तयांसि[10] कन्याप्रियकाम, दयाळु, काव्य[11] तो तारी. ।
रज गोळा करुनि, घडी शिष्याची मूर्ति, जेंवि ओतारी. ॥ २८
पुनरपि तो कच वधिला; केला तद्देह दग्ध रुष्टांनीं[12]; ।
शुक्रासि पाजिलें हो तद्भस्म सुरारसांत[13] दुष्टांनीं. ॥ २९

---

१. पापाला. २. अमृताची धार. ३. देवांला आश्रय. ४. लांडग्यांचीं उदरें. ५. मांस. ६. उपमा नाहीं जिला अशी. ७. गुरूवांचून जे अन्य देव त्यांची रीति. ८. सुखरूप, कुशल. ९. देवयानीच्या भाषणेंकरून. १०. कचास. ११. शुक्र. १२. कोपिष्ठांनीं. १३. मद्यांत.

कच न दिसतां रडे सुरयानी; तीतें पिता म्हणे, 'कां गे! ।
वत्से रडसी?' ऐसें पुसतां, तैसेंचि ती पुन्हा सांगे. ॥ ३०
शुक्र म्हणे, 'वत्से! मी वांचवितों, परि पुन्हा पुन्हा मरतो; ।
आग्रह करूनि, म्हणसी, 'प्रेतंगतीं गतहि कच पुन्हा परतो.' ॥ ३१
त्यज शोक; मत्प्रसादें तुज काय उणें? मुली! नकोचि रडों; ।
दाटुनि माथां वाहुनि दुर्वह दुःखाद्रिला, नको चिरडों.' ॥ ३२
ती तातासि म्हणे, 'कच गुरुभक्त, कुलीन, साधु, कार्य कर; ।
जरि त्यासि सोडिलें जळ, तरि जळ सोडू मलाहि आर्यकर. ॥ ३३
ब्रह्मघ्नशिष्यांची भीड धरुनि, साधु शिष्य मोकळिला, ।
म्हणतिल; न ऐकवे तें; न स्वहित कचीं असें गमो कळिला.' ॥ ३४
स्वमनिं म्हणे कविसत्तम, 'मळवावें पंडितें न यश; हाणी ।
प्राणाचीहि बरी; परि न यशाची;' सांगती नय शहाणी. ॥ ३५
मग मेळवी महात्मा एकत्र समस्त असुर कोपानें; ।
खवळे प्रियपुत्रभसितमिश्रित मधुच्याहि तज्ज्ञ तो पानें. ॥ ३६
असुरांसि म्हणे, 'कां रे! नेणा अद्यापि मत्तपा? मरतो ।
कीं वांचतो? पतंग? न भी जो ज्वलनासि मत्त, पामर, तो. ॥ ३७
'विप्र अवध्य' म्हणे श्रुति; हाणोनि तिच्याहि लात हाकेला, ।
कचहननें सुरगुरुचा न, तुम्हीं माझाचि घात हा केला. ॥ ३८
ब्राह्मण कणसे खुपती तुमच्या नेत्रीं; न सोसवे; काढा; ।
युक्तचि मरणाराला हितपरिणामहि न सोसवे काढा. ॥ ३९
धिक्कारुनि असुरांतें, धर्मचि तो अमृतमयवचा शिकवी; ।
बाहे करुणाविद्यादिव्यतपस्याबळें कचासि कवी. ॥ ४०
जों गुरु 'वत्स! कच!' म्हणुनि 'एहि' असें तो म्हणावया योजी, ।
तों विद्यासामर्थ्यें उपजूनि गुरूदरीं, म्हणे 'ओ जी!' ॥ ४१
उदरप्रवेश पुसता झाला तो पुण्यराशि शुक्रमुनी; ।
सांगुनि खळकपट, म्हणे, 'येथ वसो काळ हा शिशु क्रमुनी. ॥ ४२

१. देवयानी. २. मृत. ३. वहाण्यास कठीण अशा दुःखरूप पर्वताला. ४. सुज्ञ. (देवयानी) ५. पुत्रासारखा कच अशा कचाच्या भस्मानें मिश्रित जें मद्य त्याच्या. ६. योग्यच. ७. अमृत[…] वचन ज्याचें असा. ८. ये.

निर्भय वसेन, काळ क्रमुनि पवित्रोदरीं[1], असाचि सुखें. ।
न हित गुरूदरदारण[2]; निघतां मज निंदितील साधुमुखें.' ॥ ४३
शुक्र म्हणे, 'वत्से! कच कुक्षि विदारुनि निघेल बाहेर. ।
हा तरलाचि; परि तुझें या कुव्यसनीं[3] बुडेल माहेर.' ॥ ४४
सुरयानी त्यासि म्हणे, 'वदतां हें अशुभ काय हो तात!? ।
व्हावे दोघेहि मला; चिंतामणि[4] हेचि पाय होतात. ॥ ४५
तारुनि शिष्यासि, तरो गुरु;' म्हणत्ये, 'पात्र कन्यकान्या[5] या ।
नोहे वरासि वरदा!? जाणसि तूं सुज्ञनायका! न्याया.' ॥ ४६
भीड सुतेची भारी; विद्या संजीविनी कचा शिकवी; ।
गुरुलाहि वांचवाया योग्य करी सज्जना कचासि कवी. ॥ ४७
गुरुकुक्षि विदारुनि कच बाहेर निघे; परंतु बहु तो भी; ।
उठवुनि गुरु, संकोचें नमुनि, रडे कुळज, कीर्तिचा लोभी. ॥ ४८
गुरुदक्षिणाविधीतें कच, गुरुचा आप्त, विद्यमानधनें ।
देहें साधी; धन्यचि केला निज आप्तविद्य[6] मानधनें. ॥ ४९
कचघातकासुरांतें सुरयानीचा स्वयें जनक दापी[7]. ।
कीं 'जो ब्रह्मद्वेष्टा कुशळ[8] न पावेल तो जन कदापी. ॥ ५०
समजा बरें, जसा मी विप्र, गुरु, तसाचि हा कच; पळाला ।
ब्रह्मांडांतुनि जरि रिपु, वधिन, न देतांचि हाक, चपळाला.' ॥ ५१
असुरांसि करुनि शिक्षा, बाहु उभारुनि, म्हणे 'अहो! कानीं ।
घ्यावें माझें हितकर मर्यादावचन साधुलोकांनीं. ॥ ५२
जो विप्र आजपासुनि मद्य प्राशन करील, तो पापी ।
ब्रह्मघ्नासम निश्चित.' अशि मर्यादा स्वयें कवि स्थापी. ॥ ५३
वर्षें सहस्र होता कच गुरुसेवेंत; मग तया प्राज्ञा ।
शुक्रें बहुसंतोषें दिधली जाया पित्याकडे आज्ञा. ॥ ५४
कच सिद्ध होय जों, तों शुक्रसुता त्या मनोहरा, उचिता, ।
स्वकरग्रहार्थ[9] विनवी; बहु आवडली सुविद्यता शुचिता. ॥ ५५

---

१. निर्मळ उदरामध्यें. २. गुरूचें उदर फाडणें. ३. वाईट हट्ट. ४. इच्छिलेलें देणारें रत्न. या कन्येहून अन्या. ६. प्राप्त झाली विद्या ज्याला. ७. रागें भरे. ८. कल्याण. ९. आपल्या ग्रहणार्थ.

जें गुरुचें, तेंचि तिशीं, पूज्यत्वाचें धरूनि कच नातें, ।
ठेवूनि दृष्टि धर्मीं, तो न तिच्या मान्य होय वचनातें. ॥ ५६

पडतां गळां, म्हणे कच, 'भगिनीला वरुनियां न भाउ तरे. ।
करितां अधर्म, सद्यः स्वपितृसुहृज्जनमुखप्रभा उतरे. ॥ ५७

सुख व्हावें, तरि धर्माप्रति म्हण माथां वसें, नसें दूर; ।
पूजा कैंची लोकीं! जरि दगड शिरीं धरी न शेंदूर. ॥ ५८

धर्म अनंत असो, परि तो करितां कीर्तन स्वसे! वेचे; ।
सांगें प्रकार याहुनि दुसरे कांहीं मज खसेवेचे. ॥ ५९

ज्या उदरीं वास तुझा, तेथें माझाहि, हें असे नातें. ।
केविं करग्रहण करूं? संमत धर्मासि जें असेना तें.' ॥ ६०

बहु दिवसांची आशा तत्काळ छेदितां कचें, रुष्टा ।
शुक्रसुता त्यासि म्हणे, 'रे कपटपटो! भला भला दुष्टा! ॥ ६१

ऐक कृतघ्ना! जरि मी, उठवाचि मदर्थ या हैता, शतदा ।
ऐसें गुरुस न म्हणत्यें, कैसा उठतास तूं हताश! तदा? ॥ ६२

मलिन, कुटिल, नीरस, जड, अजड, पुनर्भवपणेंहि कचसाच; ।
धरिला शिरींहि न खप्रकृतिगुण त्यजिसि; नाम कच साच. ॥ ६३

न करीं विफळ मदाशा; आशा भंगूं नयेचि साधूंनीं; ।
जरि भंगिशील, विद्यासिद्धि नसो, जीस नेसि साधूनी.' ॥ ६

कचहि म्हणे, 'गुरुवेदानुज्ञा नाहीं; म्हणोनियां कर्मा ।
मान्य नसें मी; शापीं; कीर्तिकरचि शाप न चुकतां धर्मा. ॥ ६

पढवीन ज्यासि विद्या, ही त्यासि फळेल; तूंहि घे शाप; ।
तुज कोणीही ऋषिसुत न वरील; फळो तुझें तुला पाप.' ॥ ६

जातां स्वर्गीं, मिरविति निजगुरुसुतरत्न देव यानीं तें. ।
वर्णिति दैत्यातें किति, किति कवितें, कितिक देवयानीतें. ॥ ६

अध्याय दहावा.

विद्यालाभमुदित सुर हरिसि म्हणति, 'विक्रमासि यासम, या ।
पूर्वी, न पावलोंचि; प्रभुजी! टाळूं नकाचि या समया. ॥

---

१. आपल्या बापाचें आणि मित्रांचें मुखसंबंधीं तेज. २. हे भगिनी. ३. कपटकुशला. ४. ५. केशासारखाच. ६. संपादून. ७. विमानीं. ८. शुक्राचार्यातें. ९. आनंदित. १०. इं ११. मोठ्या पराक्रमास.

आम्हां न दिसेचि दुजा सुखदायक शत्रुनाशसम यज्ञ. ।
समयीं पराक्रमातें करिति [1]शुभयशोधनाश, समयज्ञ.' ॥
'[2]वृषपर्वतडागाचा होऊं नेदी विनाश [3]कविरोध. ।
पाडावा यांत [4]यशःसंपज्जीवनविनाशक विरोध.' ॥
करुनि विचार असा [5]हरि जेथें वृषपर्वदैत्यपतिराज्य, ।
त्या देशीं जाय, म्हणे, 'जरि मिळतें [6]रंध्र [7]लघुहि, तें [8]प्राज्य.' ॥
तों रम्यवनीं शक्रें जळकेलि[9]रता, सखीयुता, धन्या ।
अवलोकिल्या कविसुता एक, दुजी सर्वदैत्यपतिकन्या. ॥
विप्रासुरवरकन्या पाहुनि, हर्षें मनीं म्हणे [10]बलहा, ।
'भगवंत पावला; या दोघींत प्रथम लावितों कलहा.' ॥
उदकीं क्रीडत होत्या; त्यांचीं वस्त्रें [11]सरस्तटीं होतीं. ।
[12]मारुतरूपें शक्रें मिश्रित केलीं परस्परें हो तीं. ॥
राजसुता शर्मिष्ठा [13]जळकेलि करूनि त्या तटीं आली. ।
होती [14]जलाशयींच श्रीमत्कविकन्यका तिची [15]आली. ॥
शर्मिष्ठा [16]कविजांबर नेसे झडकरि; कळों न [17]वासव दे. ।
तों तीस देवयानी, ओढुनि [18]तत्परिहितात्मवास, वदे. ॥ ९
'असुरसुते! मच्छिष्या होउनि, मद्वस्त्र नेससी कां गे!? ।
बहु मातलीस ऐसें मज [19]समुदाचारलोप हा सांगे. ॥ १०
'मर्यादा पाळावी, निजशि[20]वं गुरुचेचि पाय, रीतीतें ।
सांडूं नये,' म्हणति कवि 'साधुपदाचीच पायरी तीतें.' ॥ ११
शर्मिष्ठा तीस म्हणे, 'बैसावें जैं सभेंत [21]मत्तातें, ।
त्वत्तातें व्हावें तैं [22]बंदी; तूं विसरलीस मत्ता तें. ॥ १२
सिंहासनीं विराजे [23]मद्गुरु, न सहस्र[24]करहि, परि [25]सविता; ।
बैसे खालीं त्वद्गुरु कवि, कविता करुनि, त्यासि [26]परिसविता. ॥ १३

---

१ शुभ असें जें यशोरूप धन त्यातें इच्छिणारे. २. वृषपर्वारूप तळ्याचा. ३. शुक्ररूप तट. कीर्ति संपत्ति हेंच उदक यांचा नाश करणारा. ५. इंद्र. ६. छिद्र, उणेपणा, निमित्त. ७. नही. ८. मोठें. ९. क्रीडा. १०. इंद्र. ११. सरोवराच्या तीरीं. १२. वायु. १३. जलक्रीडा. . सरोवरांत. १५. सखी. १६. देवयानीचें वस्त्र. १७. इंद्र. १८. शर्मिष्ठेनें नेसलेलें आपलें १९. मर्यादाभंग. २०. कल्याण. २१. माझ्या बापानें. २२. भाट, स्तुतिपाठक. २३. माझा ा. २४. हस्त; (पक्षीं) किरण. २५. सूर्य. २६. ऐकविता.

...ी न पाविजे त्वां, मत्ताताची तुझ्या न सरि[1] तातें; ।
जन्हुकन्यकेचें[2] भाग्य, न पावेल अल्प सरिता तें. ॥ १४
...ू तों कन्या, जो स्तुतिकर, याचक, दान घे सदा, त्याची. ।
मी कन्या स्तव्याची[3], भव्याची, सर्वसेव्यदात्याची.' ॥ १५
होती महेंद्रनयनें, पाहुनि राजेश्वरा! जया, चकितें. ।
'मत्तातभाग्य कैंचें त्वत्ताता भिक्षुकासि, याचकि! तें? ॥ १६
मत्ताताची जी श्री[4] कीर्ति, कवीला नयेचि भिक्षुकि! ती. ।
अमृतरसासीं व्हाया सम माधुर्यें समर्थ इक्षु किती? ॥ १७
राजसुतेचें यश जें, तुज येइल काय गे! दरिद्रे! तें? ।
पाहसि विकावया तूं केसरमौल्यें[5] कसें हरिद्रेतें[6]?' ॥ १८
निर्भर्त्सना[7] करी बहु; संपादी द्वेष, पाप; गाढ कली[8] ।
करुनि, कविजेसि[9] कूपीं ती कोपाची महापगा[10] ढकली. ॥ १९
मेलीच असें मानुनि, शर्मिष्ठा आपुल्या घरा गेली; ।
कूपीं कविजा होती, जैशी नागी[11] मनांत रागेली. ॥ २०
तों मृगयाश्रांत[12], तृषित, तोयार्थ[13] ययाति तेथ एकाकी[14] ।
आला, शर्मिष्ठा ज्या कूपीं त्या देवयानिला टाकी. ॥ २१
कूपीं पाहे सहसा सत्कन्यारत्न तो ययाती तें. ।
'कोणाची कोण?' असें मंजु[15] पुसे, करुनियां दया, तीतें. ॥ २[illegible]
सांगे तज्जा[16] मी, कवि म्हणति द्विजनायका ययाते! ज्या.' ।
नरवर म्हणे, 'प्रसवला तो भगवान् काव्य काय या तेजा?' ॥ २३
कविजा म्हणे, 'नरेंद्रा! स्वतपें, तुझिया यशेंहि, तुज जाणें[17]; ।
मज दक्षकरीं[18] धरुनी, वर घेउनि, करुनि धन्य भुज, जाणें.' ॥ २[illegible]
क्षुधितापुढें सुधेची[19] पात्री दैवेंचि वाढिली; वरंती[20] ।
झाली मनें; गुरुभुजें दक्षिणकर धरुनि, काढिली वरती. ॥ २[illegible]
भूप म्हणे, 'धिक् चिंता; क्षत्रा विप्रात्मजा न सेव्या; ही.' ।
तीहि म्हणे, 'नहुषेतर[21] कविला' चित्तीं 'जनीं नसे व्याही.' ॥ २[illegible]

---

१. बरोबरी. २. गंगेचें. ३. स्तुतीस योग्य अशाची. ४. भाग्य, संपत्ति. ५. केशराच्या किमत... ६. हळदीतें. ७. फजीति, तिरस्कार. ८. कलह. ९. शुक्रकन्येस. (देवयानीस.) १०. मोठी न... ११. सर्पिणी. १२. पारधं करून थकलेला. १३. उदक पिण्याकरितां. १४. एकटा. १५. कं... वाणीनें. १६. त्याची कन्या. १७. जाणत असें. १८. उजव्या हातीं. १९. अमृताची. ... ययातीस मनें करून वरिती झाली. २१. नहुष राजाहून दुसरा मनुष्य.

नृप गेला; मग आली. शोधाया घूर्णिका[1] तिला; 'हां गे ! ।
जा, सांग पित्याला, म्यां त्यजिलें वृषपर्वपुर' असें सांगे. ॥ २७
वृत्त कथुनि कविसि, म्हणे, 'ती निष्ठुरता पहा· निरोपाचीः ।
छाया[2] कराचि; न करो अतिनिष्ठुर ताप हानि रोपाची.' ॥ २८
भेटोनि तितिक्षेचे[3] गुण सांगे साधु बाप तनयेतें, ।
कीं, 'कोपाच्या संगें स्वविभागा[4] सर्वथा पतन[5] येतें.' ॥ २९
शर्मिष्ठोक्त[6] पित्यातें कथुनि, म्हणे, 'तूं असाचि असशील; ।
सोसुनि अपमान सुखें, वाटे या दुर्जनांत वसशील.' ॥ ३०
शुक्र म्हणे, 'विधि वदला मजला तूं विश्वसृष्टिपति तनये ! ।
स्वमुखें काय वदों ? मज पाहों ती शरण केविं पतित न ये. ॥ ३१
अज्ञ मुलें कलह करिति; न वदावें तेंचि बोलति स्वैरं[7]; ।
तें चित्तांत धरुनियां, प्राज्ञें[9] पुरुषें करूं नये वैर.' ॥ ३२
सुरयानी गुरुसि म्हणे, 'बा ! नेणति थोर थोर केवि ज्यातें, ।
धर्माचें तत्व बरें जाणतसे हे सुबुद्धि कविजा[10] तें. ॥ ३३
धर्माधर्मबळाबळवार्ता तों दुर्लभाचि अन्या या; ।
कन्या या पायांची जाणें न्याया, तथैव अन्याया. ॥ ३४
त्यांत पळहि न वसावें, ज्यांत दुरितभीति[11], धर्म, नय, नाहीं. ।
तृणचरमुखें[12] सुखें अवलोकावीं, खळमुखें न नयनांहीं. ॥ ३५
दुर्जनसहवास सदा तापद[13]; हा काय नरक सामान्य ? ।
होईल यासि दाटुनि[14] मानधन[15] प्राज्ञ नर कसा मान्य ?' ॥ ३६
वृषपर्व्यास म्हणे कवि, 'मी विप्रचि कीं अविप्र ? मत्तनया ।
पीडावी ? हरिसि[16] हंसति वाटे सोडूनि अवि[17] प्रमत्त[18] नया[19]. ॥ ३७
त्यजितों तुला; अतिक्रम[20] साहे, ऐसा नव्हें पुरोधा[21] मी. ।
वृत्त्यर्थ[22] तापसा मज शाक[23] पुरो, वा नवा पुरो, धामीं[24].' ॥ ३८

१. दासी. २. कृपारूप छाया. ३. सहनशीलतेचे. ४. आपल्या ब्राह्मण्याला. ५. कमीपणा. ६. [शर्मिष्ठे]चें भाषण. ७. स्वेच्छेनें. ८. बापाला. ९. शहाणे पुरुष. १०. सुरयानी. ११. पापभीति. [१२.] पशुमुखें. १३. संतापदायक. १४. मुद्दाम. १५. मानी. १६. सिंहास. १७. बोकड. १८. उन्मत्त. १९. नीतीस. २०. अपमान. २१. उपाध्याय. २२. उपजीविकेकरितां. २३. भाजी. [२४.] गृहीं.

असुरपति म्हणे, 'स्वामी ! आहें मी सर्वथैव अपराधी. ।
पहिली एकाचि असो या दासजनीं, नसोचि अपरा[1], धी. ॥ ३९
जरि सिंधु जीवनाचीं[2], क्षणहि न दे, करुनियां दया, दानें, ।
तरि वांचावें कैसें रक्षावें बा स्वयाद यादानें[3] ? ॥ ४०
त्यजितां मरेल हा जन; न प्रभुवर लाविला मेळा[4] सुकवी[5]. ।
स्वयशा अकृपत्वाच्या सहसा लागों न दे मला सुकवी.' ॥ ४१
काव्य[6] म्हणे, 'मी जातों; व्यसनांत[7] तुम्हीं तरा, बुडा लोल[8]; ।
आतां सुर येतील; क्षिप्र पळा हो ! मला नसे बोल. ॥ ४२
तुमचे प्रियकन्येचें अप्रिय, मज हा न दोष करवेल. ।
लावाल शतसुरांचे अजिरीं[9], परि ते न तोषकर वेलं[10].' ॥ ४३
वृषपर्वा नमुनि म्हणे, 'श्रीचा, माझाहि नाथ तूं, देवा ! ।
हो सुप्रसन्न; आम्हां दासांपासूनि घे सदा सेवा.' ॥ ४४
शुक्र म्हणे, 'जरि म्हणसी स्वश्रीचा, आपुलाहि, नाथ मला, ।
तरि कन्याचि मंदात्मा[11]; प्रार्थूनि करा प्रसन्न जो श्रमला.' ॥
राजा म्हणे, 'बहु बरें'. मग सुरयानीकडे तयासहित ।
जाय कवि; तदुक्त[12] कथी, जें तीस, तयाकृताश्रयास[13], हितें[14]. ॥
परिसुनि तातोक्ति[15] म्हणे, 'म्हणतो तुज आत्मवित्तनाथ[16]; मुखें ।
राजा मज माग म्हणो; मग मी मागेन इष्टकाम सुखें.' ॥
राजा म्हणे, 'गुरुसुते ! देतों, जें मागशील, तें नमुनी. ।
आम्हा तूं तशि पूज्या, पूज्य, जसा हा तपोनिधान[17] मुनी.' ॥
कविदुहिता त्यासि म्हणे, 'दशशतकन्यायुता तुझी तनया[18] ।
शर्मिष्ठा मंदासी[19] व्हावी; कामासि इच्छितें मन या. ॥
यावें मजसह मत्पतिसदनासि[20], त्यजुनि भाउ, दासीनें. ।
दास्य करावें भावें[21], न असावें मानसें उदासीनें. ॥

---

१. अन्या (रागाची). २. उदकाचीं. ३. जलजंतूनें. ४. जितरप लावलेली जागा. ५. बा
६. शुक्र. ७. संकटांत, दुःखांत. ८. चंचल. ९. अंगण्यांत. १० कल्पवल्ली. ११. माझा अ
१२. वृषपर्व्याचें भाषण. १३. केला आहे आश्रय ज्यानें अशा. (वृषपर्व्याला.) १४. हितक
१५. पित्याचें वाक्य. १६. आपले द्रव्याचा स्वामी. १७. तपश्चर्येचा ठेवा. १८. कन्या. १९.
दासी. २०. घराला. २१. निष्कपटानें.

राजा [1]धात्रीस म्हणे, 'हेंचि [2]शिवें. तुझीच आण. [3]जागे हा ।
श्रीगुरु [4]अस्मत्त्राणीं; कन्येला शीघ्र आण; जा [5]गेहा. ॥ ५१
धात्रीनें समजावुनि कथितां कन्येसि पितृमुखाज्ञा, ती ।
शिबिकेंत बसोनि निघे, कीं पात्र असोत जयसुखा ज्ञाती. ॥ ५२
गुरुतनयेसि म्हणे, 'तुज देईल तुझा जयासि [6]बा, [7]धामीं ।
त्याच्याहि तुझी दासी येतें, न गणूनि दास्यबाधा, मी.' ॥ ५३
[8]स्मित करुनि, देवयानी, [9]राजवधूगल्ल व्हावया ओले, ।
टोले शर्मिष्ठेच्या माथां हाणावया, असें बोले, ॥ ५४
'[10]मज्जनक तव पित्याचा [11]बंदी; स्थिति रीति हे अशी; गाई ।
घेतो याचक; माझी दासी होशील तूं कशी [12]गोई?' ॥ ५५
शर्मिष्ठा उत्तर दे, 'जी बहु आग्रह करील, अज्ञा ती. ।
कुळजेनें [13]व्यसनकरीं प्राणहि द्यावे, परंतु न ज्ञाती.' ॥ ५६
सुरयानी गुरुसि म्हणे, 'विद्यातेजें, विवेकें[14]विज्ञानें, ।
बापा! सत्य निवालें; निववूनि जना, निवे कवि, ज्ञानें. ॥ ५७
चाला आला चित्ता आतां मुनिनायका! [15]पुरीं वास. ।
[16]वास तुझ्याचि यशाचा मधुर; असा काय कापुरा वास? ॥ ५८
जाय पुरीं, उत्सव दे मुनि शिष्या, जेंवि [17]अर्क [18]राजीवा. ।
वांटी मधुरा [19]आशी कवि, वृषपर्वाहि शर्करा जीवा. ॥ ५९
त्यावरि, एका समयीं, त्याच [20]वनीं शुक्रकन्यका गेली. ।
संगीं सहस्र दासी, शर्मिष्ठा; काननीं करी [21]केली. ॥ ६०
तेथें [22]मृगानुसारी आला राजा ययातिहि तसाच; ।
पूर्वी जेणें केले [23]कूपोद्धारेंकरोनि हित साच. ॥ ६१
[24]दासीसहस्रमध्यस्थित कन्याद्वय विलोकुनी [25]रुचिर, ।
नरपति विनवी नयनें [26]तल्लावण्यामृतऱ्हदीं [27]सुचिर. ॥ ६२

---

१. दासीला. २. कल्याण. ३. तत्पर असे. ४. आमच्या रक्षणीं. ५. गृहा. ६. बाप. ७. घरीं. ...स्य. ९ राजकन्येचे गाल. १०. माझा बाप. (शुक्र.) ११. स्तुतिकर्ता. १२. अगाई. १३. ...ांचे हातीं. १४. विचाररूप ज्ञानानें. १५. नगरीं रहाणें. १६. सुगंध. १७. सूर्य. १८. कम- ... १९. आशीर्वाद. २०. अरण्यांत. २१. क्रीडा. २२. हरिणाच्या पाठीस लागलेला. २३. वि- ...तून वर काढण्यानें. २४. सहस्रदासींमध्यें रहाणारें. २५. सुंदर. २६. त्या कन्यांच्या लावण्य- अमृताच्या डोहांत. २७. फार वेळपर्यंत.

पुसतां नृपें, हराया निजमधुरोक्तें[1] तदीय खेदासी, ।
सांगे, 'मी शुक्रसुता; माझी असुरेंद्रजा[2]हि हे दासी.' ॥ ६३

'राजसुता त्वद्दासी[3] हें कैसें?' नृप पुसे. म्हणे कविजा[4], ।
'पुससी काय? जग असे वश कर्मा[5], हस्त जोडिती कवि ज्या[6].' ॥ ६४

'त्वांहि कथावें मज निजकुलनाम,' असें सती अकुत्स[7] वदे. ।
नृप आपणहि तिला, तें[8] स्वमुखें सांगोनि, फार उत्सव दे. ॥ ६५

शशिकुलज[9], नहुषसुत, जन हा, नाम ययाति, येथ तोयां[10] मी ।
आलों मृगानुसारें; आपृच्छे[11] त्वां[12] तदेहमितो[13] यामि[14].' ॥ ६६

त्यासि म्हणे सुरयानी, 'परम मनोहर तुझें जगीं यश गा ! ।
सत्य सखा भर्ता हो; झालें तुज मी मनोरमा वशंगा[15]. ॥ ६७

हे शर्मिष्ठा दासी; दासी विंशतिशतें[16]हि कन्या या; ।
अंगीकारावें मज; जाणसि तूं धर्मपाळक ! न्याया.' ॥ ६८

नृपति म्हणे, 'सिंधूंसि[17] त्यजुनि, दया करुनिही, नदी नातें ।
लावील सरांशीं[18], तरि तें हित त्या शक्तिहीनदीनातें. ॥ ६९

तुज व्हावें पात्र, अशीं कैंचीं पुण्यें सहाय यां[19] तितुकीं? ।
विप्रवरसुते ! क्षत्रिय उतरेल तुझ्या न हा ययाति तुकीं[20].' ॥ ७०

'ब्रह्मक्षत्रविमिश्रिततत्वें[21] तूंही ऋषीच, सन्महित[22]; ।
वर्णाश्रमधर्मांच्या अवनें[23], लोकीं तुझेंचि जन्म हित. ॥ ७१

त्यांतहि मीच असें तुज म्हणत्यें; नाहींच तुजकडे दोष; ।
मजवरि गुरुचा प्रेमा बहुतचि; न करील लेश तो रोष[24]. । ७२

शिवलासि मत्करा तूं; शिवतां अन्याय या तिजा; माता ।
स्त्री; गुरु कीं तूं; साजे कविसि, न अन्या, ययाति जामाता. ॥ ७३

धरिला करीं कळीनें जो, तो त्या होय योग्य अत्यागा. ।
कर सोडिसी कसा हा? धर्मज्ञा ! न करितांहि अत्यागा[25].' ॥ ७४

---

१. आपल्या मधुर भाषणानें. २. वृषपर्व्याची कन्या. ३. तुझी दासी. ४. देवयानी
नशीबाला. ६. दैवास. ७. निंदारहित. ८. आपलें कुलनामादिक. ९. चंद्रवंशींचा. १०.
११. पुसतों. १२. तुला. १३. आतां मी येथून. १४. जातों. १५. स्वाधीन. १६.
(दोन हजार.) १७. समुद्राला. १८. सरोवरांशीं. १९. मला. (ययातिला.) २०. तुलनेविषयीं,
वरील. २१. ब्राह्मणक्षत्रियांच्या मिश्रित वीर्यानें. २२. साधूंला पूज्य. २३. रक्षणें. २४.
२५. मोठ्या अपराधा.

नृपति म्हणे, 'मज तुजही मान्य, तुझा गुरु करील आज्ञा, ते. ।
वृष्टिप्रति चातकसे, करिताति [1]गुरूक्तिलाचि आ ज्ञाते.' ॥ ७५
जेव्हां असा निजाशय नृपरत्नानें वधूसि जाणविला; ।
[3]धात्री धाडुनि, कळवुनि वृत्त, पिता त्या वनांत आणविला. ॥ ७६
कविनें, येतांचि, दिली [4]पादप्रणता नृपासि [5]रुचिराशी, ।
[6]धर्मालोपवरासह; मग विधिनें निजसुताहि [7]रुचिराशी. ॥ ७७
बहु सत्कारुनि, मुनिनें वृषपर्व्यानेंहि भूप बोळविला. ।
[8]असकृत् नृपें प्रयाणीं गुरुपादरजांत मुगुट लोळविला. ॥ ७८
गेला पुरासि घेउनि, बसवूनि [9]मनुष्यदेव [10]यानीं; तें, ।
[11]श्रीतें [12]पद्म तसें, [13]वरसद्म सुखद होय देवयानीतें. ॥ ७९
बहुपुण्यवंत रमतो जैसा सानंद देवलोकवनीं, ।
स्त्रीरत्नीं बहु रमला नृप. [14]सुरसीं रसिक काय तो कवनीं ? ॥ ८०
सदनीं करी ययाती जे कांहीं सुखविलास तीसहित, ।
रायें स्वात्मा तैसा, जेंवि हरें सुखविला [15]सतीसहित. ॥ ८१
[16]कविजासुत यदु पहिला; त्याचें [17]गुरुलोचना, मना, [18]तुंड ।
निववी; शशिबिंब जसें, करि [19]कविचें, [20]मुदित धाम, नातुंड. ॥ ८२

अध्याय अकरावा.

होय ऋतुमती जेव्हां शर्मिष्ठा, व्याकुळा [21]वैराधीनें; ।
चित्तीं म्हणे, 'सहावें किति दुःख [22]कलेवरें पराधीनें ? ॥ १
प्रियतम सहाय नसतां, यौवनहननें करोनि जो क्षीण, ।
तद्गणनीं कुंठितमति होईल सरस्वतीहि जोक्षीण. ॥ २
शिशु पाळण्यांत घालुनि, हालवितां, निजवितां, सुखें [23]जोजो ।
[24]धात्री म्हणति, सखीला अमृतरसचि तो, निघे मुखें जो जो. ॥ ३

---

१. गुरूच्या वचनाला. २. मुलीला. ३. दासी. ४. पायां पडलेल्यास. ५. उत्तम आशीर्वाद. ६. धर्माचा अलोपरूप जो वर त्यासह. ७. रुचि म्ह० कांति तिची राशी. ८. वारंवार. ९. राजा. १०. पालखींत. ११. लक्ष्मीला. १२. कमल. १३. नवऱ्याचें घर. १४. नवरसयुक्त. १५. पार्वती. १६. देवयानीचा पुत्र. १७. आईबापांच्या नेत्रांला. १८. तोंड. १९. शुक्राचें. २०. आनंदयुक्त. २१. मोठ्या दुःखानें. २२. शरीरानें. २३. 'जो जो बाळा' हा शब्द. २४. दाई.

काय करूं? एकांतीं जरि होती भेटि, वाटतें मतिला ।
विनवुनि वरितें, पुत्रप्राप्त्यर्थ[1], तरि, स्वयें सखीपतिला. ॥
न उपेक्षील कदापि क्षितिपति, धर्मज्ञ, शरण आलीला. ।
मजही व्हावे, झाले कामद ते जेंवि चरण आलीला[2].' ॥
नृपहि उपवनीं[3] गेला; एकांतीं तीहि दृष्टिला पडली; ।
न घडावीच कधीं, परि दोघांची गांठि विधिबळें[4] पडली. ॥
देतां दुर्लभ दर्शन एकांतीं, करुनियां दया, तीतें, ।
कळला प्रसाद; मग ती विनवी मंजु[5] स्वयें ययातीतें. ॥
'द्वारीं मृगपतिहस्तांतूनि[6] अहो! वीरराय! जी मुक्ता[7], ।
ती सेविजेल इतरें सिंहावांचूनि काय जी! मुक्ता[8]?' ॥
नृपति म्हणे, 'जें वदसी, जाणतसें मी, यथार्थ सुंदरि! तें. ।
सरस असोचि मधुप[9] बहु मनिं; जरिहि रसें करूनि कुंद[10] रितें. ॥
तुज शयनीं न बहावें[11], वदला कवि; मज अलंघ्य आज्ञा ती. ।
माझे तुझेहि न पुन्हा मुनिच्या क्षोभें म्हणोत हीं[12] ज्ञाती.' ॥ १
शर्मिष्ठा त्यासि म्हणे, 'गम्यस्त्रीविषयकानृतें[13] पाप ।
न शिवेचि; धर्म झाला; आर्तजनाचा[14] निवारिजे ताप. ॥ १
वरिलासि मत्सखीनें; म्यांही वरिलासि तूं मनें; मातें ।
पापापासुनि रक्षीं; या माझ्या चालवूनि नेमातें.' ॥ १
भूप म्हणे, 'व्रत माझें, कोणी जनं जें अभीष्ट मागेल, ।
तें द्यावें त्यासि असें; मज तत्त्यागेंहि[15] दोष लागेल.' ॥ १
ऐसें वदे नृपति; मग द्याया त्या सुंदरीस मुदतिशय[16], ।
हांसे; म्हणे, 'धरूं दे सुंदरि! रंभोरु[17]! सुभ्रु[18]! सुदति[19]! शय[20].' ॥ १
केली कृपा नृपानें, प्रथम स्वमनीं नमूनि त्या ऋषितें[21]. ।
प्याली तीहि चकोरी पतिमुखचंद्रामृता मनें तृषितें. ॥ १

---

१. पुत्र होण्याकरितां. २. सखीला. ३. बागेंत. ४. दैवबळें. ५. मंजुळ वाणीनें. ६ सिंहहस्तांतून. ७. सुटली. ८. मौक्तिक. ९. भ्रमर. १०. कुंदपुष्प. ११. बोलवावें. १२. हाय. १३. गमन करण्यास योग्य जी स्त्री तद्विषयक जें अनृत तेणें. १४. पीडिलेल्या. १५. त्या व्रताच्या त्यागानें. १६. हर्षाचा अतिशय. १७. केळीसारख्या मांड्या जीच्या अशी. १९. उत्तम आहेत भिंवया जीच्या अशी. १९. उत्तम आहेत दांत जीचे अशी. २०. हात. २१. शुक्राचार्यांतें.

स्वप्रसवें सुख शोभा दे क्षितिस पराहि जेंवि सुक्षितिच्या; ।
प्रसवोनि सुतासि, तसा सुख शोभा दे विशुद्ध कुक्षि तिचा. ॥ १६
शर्मिष्ठेला झाला सुत; नाम द्रुह्यु ठेविलें आहे; ।
ऐसें कळतां, चित्तीं चिंतेला काव्यकन्यका वाहे. ॥ १७
भेटुनि तिला म्हणे, 'हें कर्म उचित सुभ्रु ! काय गे ! हातें ।
विमळ कुळ मळविलें, कीं लावियला अग्नि काय गेहातें ? ॥ १८
[1]धवलांबरासि कज्जल, तैसें जें शुचिकुळासि पाप डसे; ।
तें धूतां श्रम बहु; गुरु भाजति दुःखाग्निमाजि पापडसे.' ॥ १९
येरु म्हणे, 'ऋषि आला, [2]श्रुतिपारग, धर्मशील; वरदा त्या ।
प्रार्थूनि, याचिला म्यां ऋतुकाळीं पुत्रकामवर दात्या.' ॥ २०
देवी म्हणे, 'खरें हें जरि, तरि शो[3]भनचि, मानलें मजला. ।
मज नाम सांग त्याचें; सुंदरि ! जो वरद ऋषि तुला भजला.' ॥ २१
[4]दैत्यपतिजा म्हणे, 'ऋषि गमला रविसाचि; नामगोत्रास ।
कैंची शक्ति पुसाया ? सांगों मी देवि ! काय तो त्रास.' ॥ २२
राज्ञी म्हणे, 'बरें. मज नाहीं कोप त्वदीयसुतलाभें. ।
जन न उतला जगीं जो, तो पावे नित्य [5]भद्र, [6]उतला [7]भें.' ॥ २३
वदल्या दोघी प्रेमें, झाल्या सानंद, हांसल्या [8]आली. ।
आलिंगिलें परस्पर. मग निजसदनास [9]भार्गवी आली. ॥ २४
त्यावरि दुसरा झाला, तो तुर्वसु [10]शुक्रकन्यकातनय. ।
अनु पूरु पुत्र दोघे शर्मिष्ठेला; करीं न घात नय. ॥ २५
कविकन्येचे दोघे, शर्मिष्ठेचे तिघे सुत, [11]उरविते ।
[12]पितृचिंतातिमिर [13]सुहृन्नयनाब्जें सुखविते, सुतनु, रवि ते. ॥ २६
एकासमयीं देवी पतिसह गेली [14]अशोकवनिकेला. ।
'क्रीडावें तेथ सुखें' संकल्प असा तिणें स्वमनिं केला. ॥ २७
शोभे सती [15]उपवनीं पतिसह, जशि शंभुची उमा रमणी. ।
तों देखिले तिणें सुरगर्भसमप्रभ तिघे कुमारमणी. ॥ २८

---

१. स्वच्छ वस्त्रासि. २. वेदपारग. ३. चांगलें. ४. शर्मिष्ठा. ५. कल्याण. ६. माजला. ७. भय. ८. सख्या. ९. देवयानी. १०. देवयानीचा पुत्र. ११. न उरविते. १२. बापाचा चिंतारूप अंधकार. १३. मित्रांचीं नेत्रकमलें. १४. अशोक वृक्षाच्या बागेंत. १५. बागेंत.

देवी[1] राजासि पुसे, 'सुरकलभांची[2] हिरोनि गति घेते, ।
कोणाचे शिशु, जैसे देवांचे चालते नग[3] तिघे ते ? ॥ २

दिसति तुम्हांसम रूपें, श्रीचे[4] संकेतकुंज[5] ते ज्यांचे ।
काय[6] रुचिर[7]; काय सुचिर झाले हे प्रकट पुंज[8] तेजांचे.' ॥ ३

पाचारुनि[9] त्यांसि म्हणे, 'कोणाचे बाळ हो ! तुम्हीं ? धाम[10] ।
कोठें तुमचें सांगा ? कुळ तुमचें कोण ? काय हो नाम ? ॥ ३

अंकीं[11] तुम्हांसि घेउन आलिंगुनि, हृष्ट[12] कोण होतात ? ।
कोणासि माय म्हणतां ? तुमचा कृतसुकृत[13] कोण हो ! तात ?' ॥ ३

माता सांगुनि, पुसतां तात, ययातीस दाविती बोटें. ।
खोटें कर्म नृपाचें जाणुनि, ती दुःख धरि मनीं मोठें. ॥ ३

गेले शिशु जवळि परि, न त्यांतें करुणासुधानदीपति[14] घे. ।
ते त्या क्षणींच रुचले स्वकुळाचे त्या बुधा न दीप तिघे. ॥ ३

उत्सुक झाले होते अंकारोहार्थ[15] पुत्र, पर तो न ।
प्रभु घे, मग मातेप्रति गेले रोदन करीत परतोन. ॥ ३

पतिकृतकपटें पावे, आणुनि नेत्रांसि वारि[16], खेदासी. ।
तीस म्हणे, 'कां गे ! हे ऋषिसुत तरि नृपतिसारिखे दासी ! ? ॥ ३

त्वां हा भूप भुलविला, केला माझा दहांत अपमान; ।
बटिक लटिक[17] तूं दुष्टे ! वद[18], लंघ्य तुला मदीय तप, मान ?' ॥ ३

राजसुताहि[19] म्हणे, 'तूं कमळाला मधुकरी[20] जशी तृषिता[21], ।
ज्या भाळलीस ऋषिजा; त्या सत्पुरुषीं कशी नसे ऋषिता[22] ? ॥ ३

जो त्वत्पति, तो मत्पति, देवि ! पहा धर्म, मी तुझी आली[23]. ।
त्वां म्यांहि मनें वरितां, ऋषिता, पतिता प्रभूकडे आली. ॥ ३

तूं ज्येष्ठा विप्रसुता, राजसुता मी सये ! कनिष्ठा हो ! ।
जैशी तुझी नृपपदीं, माझीहि तशीच एकनिष्ठा हो. ॥ ४

---

१. राणी देवयानी. २. देवांच्या हत्तींच्या छाव्यांची. ३. तरु. ४. लक्ष्मीचे. ५. संकेतार्च झांकरें. ६. देह. ७. सुंदर. ८. राशी. ९. बोलावून. १०. गृह. ११. मांडीवर. १२. आनंदयुक्त १३. कृतपुण्य. १४. दयारूप अमृताचा समुद्र. १५. मांडीवर बसण्याकरितां. १६. उदक १७. लबाड. १८. बोल. १९. वृषपर्व्याची कन्या शर्मिष्ठा. २०. भ्रमरी. २१ तृषेनें युक्त. २२. ऋषित्व. २३. सखी.

वदलें सत्यचि पूर्वी, देवि! पहातां ऋषीच पति तत्वें; ।
क्षोभों नको वृथा तूं, हा जन दूषूं नकोचि पतितत्वें[1]. ॥ ४१
जी स्मरहता[2], पदनतां, त्यजिल न शशिवंशसदनदीप[3] तितें; ।
भेटेल नदी जी जी, ती अनुकंप्याची[4] नंदनदीपतितें[5].' ॥ ४२
शुक्रसुता पतिस म्हणे, 'हें विप्रियं[6] काय उचित महिम्यातें[7]? ।
त्यजिलें आजि तुझें जें श्रीपद्महि सद्म शुचितमहि[8] म्यां तें.' ॥ ४३
आरोपूनि स्वशिरीं, दासीसंगें करूनि विटंलीला[9], ।
पंडितवर परि न शके समजावाया ययाति विटंलीला[10]. ॥ ४४
गुण[11] वावडीस सुदृढ प्रेमाचि स्त्रीस आवरायाचा; ।
तो तुटतां यत्न नसे कांहीं; गेलाचि आंव[12] रायाचा. ॥ ४५
जाय पित्याच्या सदना, करुनि परित्याग बायको पतिचा. ।
पुत्रांतेंहि न पाहे, सांगावा उग्र काय कोप तिचा? ॥ ४६
नाहींच कांतवदना[13], हृदयांत धरूनि ती असुख, वळली. ।
वाटे नृपासि धरितां, सोडीलचि आपुले असु[14] खवळली[15]. ॥ ४७
भूप म्हणे तीस, 'परिस माझें सुखसंपदे! विनवणें, हो[16]. ।
चित्त सुवृत्त, न पावो विश्लेषें[17] कंप देवि! न वणें हो!' ॥ ४८
दवार्ता[18] जेंवि मृगी कासारीं[19], जाय ती स्वमाहेरीं; ।
पावे नृपहि, म्हणे जो, नमुनि गुरुसि, 'तापसोत्तमा[20]! हेरीं[21]. ॥ ४९
ताप दिला जेणें, तो हा कामी तापसा! हतांस[22] दया ।
उठवि तुझी, किति मारूं हाका? मी ताप[23] साहतां सदया!' ॥ ५०
'माझी दासी मजहुनि बहुमान्या, यासि बा! दया तीची; ।
तीन तिला सुत दिधले, दोघे मज; ती प्रिया ययातीची.' ॥ ५१
स्वतपाच्या तीव्रत्वें लाजविता योगिराज जो पविला[24], ।
तो स्वातिक्रम[25] कळवुनि, सुरयानीनें क्षणांत कोपविला. ॥ ५२

---

१. पापीपणानें. २. कामार्ता. ३. चंद्रवंशरूप गृहसंबंधी दीप. ४. दयार्ह्य म्ह० दया करण्यास योग्य. ५. समुद्राला. ६. न आवडणारी गोष्ट. ७. मोठेपणाला. ८. अत्यंत शुद्ध. ९ जारलीला. १०. कंटाळली जी तिला. ११. दोरी. १२. धैर्य. १३. सुंदर मुख जीचें अशी. १४. प्राण. १५. क्रोधयुक्त अशी. १६. होवू. १७. वियोगें. १८. वणव्यानें पीडित. १९. सरोवरीं. २०. तपस्विश्रेष्ठा. २१. बारीक दृष्टीनें पहा. २२. मृतांस. २३. संताप. २४. वज्राला. २५. आपला अपराध.

‘वृंदावनासि[1] मानिति, अव्हेरिति मूर्ख मत्त पनसा[2] हो ! ।
तीच गति; अतिक्रम परतप[3] साहो, लवहि मत्तप न साहो. ॥ ५३
जेणें अधर्म घडला, नाशो[4] बळवीर्य आजि राया ! तें; ।
वपुला आतांचि जरा[5] ग्रासो; हा दंड साजिरा[6] यातें.’ ॥ ५४
भूप म्हणे, ‘शाप दिला उग्र विपत्पातहेतु[7]; म्हातारा ।
झालों पहा; अहा जी ! जोडितसें हात हे तुम्हां, तारा. ॥ ५५
ऋतुदान धर्म कीं जी ! हीं यास्तव हाय ! काय शापावा ? ।
कन्येकडे तरि पहा, रक्षा मुनिनायका ! यशा, पावा. ॥ ५६
म्हणतां सत्यचि देवा ! जें, हें न विचारिलें तुम्हां, चुकलों; ।
परि शापें तुमच्या प्रियदुहितेच्या[9] मी समागमा मुकलों. ॥ ५७
करुणा करा सुतेवरि, गुरुजी ! प्रभुजी ! स्वशाप हा फिरवा; ।
मिरवा प्रसाद लोकीं, जिरवा मनिं रोष, मज इला निरवा[10]. ॥ ५८
मी यौवनीं अतृप्तचि; हीच्या आतांचि भर विलासाचा; ।
शापमिषें[11] त्वां तापचि आम्हां दोघांसि भरविला[12] साचा.’ ॥ ५९
शुक्र म्हणे, ‘नरनाथा ! नाहीं होणार शाप हा लटिका; ।
तेज पहा वचनाचें, ज्यासि फळाया न लागली घटिका. ॥ ६०
परि मद्वरें तयाप्रति जाइल, देशील हे जरा ज्यातें; ।
येईल तुजप्रति, जें त्याचें तारुण्यतेज, राजा ! तें.’ ॥ ६१
भूप म्हणे, ‘दोघींला दिधले म्यां पांच तनय निर्जरेतें[13]; ।
तो राजा होऊ, जो देइल यौवनहि, घेउनि जरेतें.’ ॥ ६२
काव्य म्हणे, ‘हेंहि दिलें, जा; परि होवोनि वीर्यमत्त, नया[14] ।
न उलंघीं; धर्मातें रक्षीं; दुखवीं पुन्हा न मत्तनया[15].’ ॥ ६३
गुरुची आज्ञा कन्या घेउनि, जाउनि गृहासि, तो[16] जीर्ण[17] ।
आणी मनीं असें कीं, ‘यदुच्या देहीं जरेसि योजीन.’ ॥ ६४
त्यासि म्हणे, ‘स्वजरा घे, यौवन दे, अयश न नूतन[18] यदो ! घे;’ ।
तो तें न करी; तुर्वसु ही; तेहि द्रुह्यु, अनु, तनय दोघे[19]. ॥ ६५

१. कडुवृंदावनफळास. २. फणसास. ३. दुसऱ्याचें तप. ४. नाश पावो. ५. वार्धक्य. ६. योग्य. ७. विपत्तींत पडण्यास कारण. ८. ययाति. ९. कन्येच्या. १०. इच्छ्या हातीं मला द्या. ११. शापाच्या निमित्तानें. १२. चारला. १३. आपल्या वीर्यानें. १४. नीतीला. १५. माझी कन्या. १६. ययाति. १७. वृद्ध. १८. नवीन. १९. द्रुह्यु आणि अनु हे दोघे शर्मिष्ठेचे तनय न करिती.

पुरुनें आज्ञेचा त्या केला स्वीकार; ते जरा याला ।
स्पर्शे, काव्यवरबळें याचें तारुण्य तेज रायाला. ॥ ६६
करितां आज्ञाभंग, क्षोभाचें पात्र जाहले चवघे; ।
पूरु प्रसाद गुरुचा पावे; सत्कीर्तिची सदा चव घे. ॥ ६७
पूरुप्रति भूप म्हणे, 'वत्सा! मत्सार्वभौमपदवीतें[1] ।
तूंचि सुपात्र; मज तुझें साधुत्व तव स्तवासि[2] वदवीतें. ॥ ६८
तूं धन्य, अन्य न असा, कैंची सर्वत्र साधु सुतरीती? ।
बापा! प्रजा अशी, जी पितरांसि भवार्णवांत[3] सुतरी[4], ती.' ॥ ६९
धर्मार्थकाम[5] सेवी पुत्रवयें नृप सहस्र वत्सर[6] तो; ।
मग मनिं म्हणे, 'पुरे हें; या स्त्रीसंगीं मदीय[7] वत्स[8] रतो. ॥ ७०
स्वल्पहि एकाहि स्रक्चंदनवनितादि[9] सर्व विषय मही; ।
कळले मज हे भोगचि मारक, न व्याळ[10], शस्त्र, विष, यमही. ॥ ७१
श्रीसेव्या[11]! सदलिमता[12]! वस राज्यसरीं[13], न मज्ज[14], राजीवा[15]! ।
वत्सा! बहु कष्टविलें त्वां, स्वीकारूनि मज्जरा, जीवा.' ॥ ७२
जाय नृप, श्रीकरवीं धरवुनियां पूरुहस्त, वनवासा. ।
न गमे प्रजांसि पति तो, गुणजितसुरभूरुहस्तव[16], नवासा. ॥ ७३
जाउनि तपोवनातें, सेवी राजा महातपा पवना[17]; ।
जाळी ज्ञानदवें तो चित्तगजाचा महात[18] पापवना. ॥ ७४
गेला स्वर्गासि अमित सुकृतें जोडोनि राय; तें नाकीं[19] ।
होय सुदुःसह शक्रा, जैसें बाळासि रायतें नाकीं. ॥ ७५
एका समयीं सुरपति त्याचेंचि महत्त्व तन्मुखें वदवी[20]; ।
ऋजुभावें[21] नृप नेणे कीं, आत्मस्तोत्र[22] कुगतिची पदवी. ॥ ७६

---

१. माझ्या सार्वभौम ऐश्वर्यातें. २. स्तुतीस. ३. संसारसागरांत. ४. उत्तम नौका. ५. धर्म, अर्थ, काम. ६. वर्षें. ७. माझा. ८. पुत्र. ९. माळ, चंदन, स्त्री आदिकरून. १०. सर्प. ११. लक्ष्मीनें सेवन करण्यास योग्य. १२. साधुरूप भ्रमरांस मान्य अशा. १३. राज्यरूप सरोवरीं. १४. बुडों नको. १५. हे राजीवा! (कमळरूप वत्सा). १६. गुणांनीं जिंकिली आहे कल्पवृक्षाची स्तुति ज्याणें असा. १७. वायूला. १८. मनोरूपी हत्तीला वश करणारा महात. १९. स्वर्गी. २०. बोलवी. २१. सरळ भावानें, भोळेपणानें. २२. स्वतःची स्तुति.

'स्वतपें तूं कवणाशीं तुल्य ?' असें हरि[1] पुसे **य**यातीतें. ।
त्यातें **ना**हुष[2] राजा सत्यचि सांगे मनें भयातीतें[3]. ॥ ७५
'देवेंद्रा! कोणीही स्वतपें मत्तुल्य जन असेना कीं. ।
काय वदों ? नर ते किति ? न महर्षिजनीं असा, नसे नाकीं.' ॥ ७
शक्र म्हणे, 'बहु भास्वर[4] रविसम ज्यांचे तपोगुणें काय[5], ।
त्वत्तुल्य त्वदधिकही आहेत तपोनिधी; उणे काय ? ॥ ७
हें काय उचित तुजला ? साधु न कोणासही अव्हेरीती. ।
अभिमानें स्वतपःक्षय केला कीं; हे बरी नव्हे रीती. ॥ ८
झाला सर्व तपःक्षय, पावें प्रक्षीणपुण्य[6] तूं पतन. ।
बहु तप करिता तापस धन्य नव्हे; धन्य करिल जो जतन.' ॥ ८
नाहुष म्हणे स्वपतनावसरीं[7] प्रार्थूनि **ना**कपाळाला[8], ।
'हा जन संतांत पडो, जरि आलें पतन या कपाळाला.' ॥ ८
इंद्र म्हणे, 'तुज राया संतांत घडेल पात[9]; कमळाला ।
रविसे हर्ष तुला ते देतील, हरूनि पातकमळाला.' ॥ ८
पडतां, स्वर्गासि पुन्हा गेले घेवोनि संत राजाला. ।
नृप **अष्टक**, **प्र**तर्दन, **व**सुमन, **शि**बि नायक, स्वंआज्याला[10]. ॥ ८
तरला **य**यातिराजा, दर्शन होतांचि संतरायांचें; ।
सद्दर्शनचि सुदर्शन करि गट चट कटक अंतरायांचें[11]. ॥ ८
जें दुरिततृण[12] तया दैवे[13] **या**दव **य**दुचे; हरी[14] अरिगजांचे[15]. ।
त्या **पू**रुचेहि **पौ**रव; पौर[16] वदति नाकगोष्टिहि[17] न ज्यांचे. ॥ ८

अध्याय बारावा.

श्रीमद्ययातिनंदनपूरुकुळीं भूप जन्मले शतशा[18]; ।
श्रवणें सत्कीर्ति[19] हरिति ताप, सुधांच्या[20] नद्या न लेश तशा. ॥

---

१. इंद्र. २. नहुषाचा पुत्र ययातिराजा. ३. निर्भय अशा. ४. कांतिमान्. ५. देह. ६. न झालें आहे पुण्य ज्याचें. ७. पडण्याच्या वेळीं. ८. देवेंद्राला. ९. पडणें. १०. ययातीची कन्य माधवी इचे हे अष्टकादि चार पुत्र होते, म्हणून ययाति त्यांचा आजा. ११. विघ्नांचें १२. पातकरूपी गवत. १३. अग्नि. १४. सिंह. १५. शत्रुरूपी हत्तींचे. १६. पुरवासी जन १७. स्वर्गास जाण्याची गोष्ट. १८. शतावधि. १९. 'तत्कीर्ति' असाही पाठ आहे. २०. अमृतांच्या

त्या पौरवांत झाला राजा दुष्यंत[१] धर्मपर[२], महित[३]; ।
स्वगुणें करि प्रजांचें अनुदिन[४] तो मूर्त[५] धर्म परम हित. ॥ २
तो एकदा वनाला जाय, कराया यथेष्ट मृगयेतें[६]; ।
बलकोलाहल[७] परिसुनि, 'कुलनाशव्यसन[८]' म्हणति मृग 'येतें.' ॥ ३
वधिले व्याघ्र वृक[९], खग[१०], श्वापद; धरिले प्रमत्तगज रानीं; ।
चिरिले किरि[११]; लेशहि धृति[१२] मृगयूथीं[१३] नुरविलीच गर्जरांनीं[१४].' ॥ ४
एका हरिणामागें एकाकी[१५] भूप धांवतां श्रमला; ।
जातां दूर श्रीमत्कण्वाश्रम रम्य पाहतां रमला. ॥ ५
तें सत्यलोकतुल्यचि आश्रमपद, ज्यांत अघ[१६] न साच. ।
तेथील तापस शिखी[१७]चातकसे, त्यांत कण्व घनसाच. ॥ ६
श्रीमालिनी[१८]तटीं तो त्या शुद्धाश्रमपदांत शिरला हो; ।
चित्तांत म्हणे, 'काश्यपपदपद्मरजःप्रसाद[१९] शिर लाहो.' ॥ ७
मुनि आश्रमांत नव्हता, त्याची कन्या शकुंतला होती. ।
पूजी नरदेवातें[२०], करि तेव्हां स्ववपु दीपकज्योती. ॥ ८
अवलोकितांचि, आधीं भुलला लावण्यकल्पलतिकेला. ।
त्यांत तिणें उचितादर सस्मितमधुरोदितेंहि[२१] अति केला. ॥ ९
चित्तीं म्हणे नृपति, 'हे जातीची[२२] सस्मिताहि[२३] कलिका[२४]; मी ।
होईन काय, चुंबुनि ईतें, सफळेच्छ तृप्त अलि[२५] कामी?' ॥ १०
मग तीस पुसे, 'सुंदरि! चतुरे! तूं कोण? सत्य सांग मला. ।
तुज या वनांत हित हा उग्र तपोनियमताप कां गमला? ॥ ११
कण्वसुता मी म्हणसी, परि न गमे सत्य, सत्य वद नातें; ।
दे मत्कर्ण[२६]तृषाहरवृत्तसुधाचषकता स्ववदनातें. ॥ १२

---

१. पूरुपासून दुष्यंत अठरावा वंशज होता. २. धार्मिक. ३. पूज्य. ४. प्रतिदिवशीं. ५. मू-
[ ]ान् धर्मच. ६. पारध. ७. सैन्याचा कलकलाट. ८. संकट. ९. लांडगे. १०. पक्षी. ११. डु-
[ ]. १२. धैर्य. १३. हरिणसमुदायीं. १४. कलकलाटांनीं. १५. एकटा. १६. लवमात्रपातक.
[१]७. मयूर. १८. नदीविशेष तिच्या तीरीं. १९. कण्वऋषीच्या चरणधूलीचा प्रसाद.
[२]०. दुष्यंतराजातें. २१. हास्ययुक्त मधुर भाषणानें. २२. जाईची. २३. किंचित् विकसिता.
[२]४. कळी. २५. भ्रमर. २६. माझ्या कानांची तृषा नाहींशी करणारें वृत्त म्ह० हकिकत हेंच
अमृत तें पिण्याचें पात्र त्याचा भाव म्ह० पात्रता.

त्वत्तात ऊर्ध्वरेता[1] कण्व कसा? तूं सुता कशी? बोल. ।
हा पौरव दुष्यंत त्वद्वृत्ताकर्णनीं[2] असे लोलें[3].' ॥

ती त्यासि म्हणे, 'पूर्वीं एके मुनिनें विचारिलें होतें; ।
जें त्यातें मत्तातें[4] कथिलें मज्जन्म[5], सांगतें हो! तें. ॥

विश्वामित्र तप करि, केलें कोणींहि तेंवि तप नाहीं. ।
तापे मुनितेजें जग, जैसें कल्पांतकाळतपनांहीं[6]. ॥

उग्रतपःसामर्थ्यें विश्वामित्र प्रभु स्वपद हरितो, ।
ऐसें शंकूनि म्हणे, धरुनि करें मेनकाकरा, हरि[7] तो. ॥

'स्वःश्रीभोग[8] बहुत जरि केला, परि तो गमे न केला हो; ।
म्हणुनि ईचा[9] हां[10], कौशिक[11]मुनिहि तुझा भोग मेनके! लाहो. ॥

स्वपदहर गमे सकळां, मजलाचि प्रियतमे[12]! न केवळ तो; ।
न वळेल उपायशतें, तुजचि मुनी नियत[13] मेनके वळतो. ॥

तूं पात्र, गाधिजाला[14] सदुपायन[15] करुनि देह, नुतितें[16] हो[17].' ।
हरि[18] वारंवार असें, स्वकरेंचि धरुनि, वदे हनु[19] तितें हो. ॥

भ्रूधनु[20] ओढुनि कज्जलविषदिग्ध[21] कटाक्षशर वरारोहे[22]! ।
सोडुनि लुटीं तपोधन सौभाग्यश्री तुझी भरारो[23] हे.' ॥

ती अप्सरा म्हणे, 'तो भस्म करिल मज महातपा शापें. ।
जाइल कवण यमाच्या, जोडूनि बळेंचि हात, पाशापें[24]? ॥

मी अबला भीरु[25] कशी साहों त्या गाधितनयतेजातें? ।
भ्यालासि असा दुःसह मानुनियां तूंहि सुरपते! ज्यातें. ॥

गाताति कीर्ति ज्याची मुनिसुतहननत्रिशंकुरक्षणजा[26] ।
ब्रह्मसखत्व[27]चि दे नवसृष्टीचा दिव्य अंकुर क्षण[28] ज्या[29]. ॥

---

१. योगी, ब्रह्मचारी. २. तुझ्या वृत्तश्रवणीं. ३. उत्सुक. ४. माझ्या बापानें. ५. माझा जन[्म] ६. प्रलयकालच्या सूर्यांनीं. ७. इंद्र. ८. स्वर्गसंपत्तीचा भोग. ९. स्वःश्रीचा. १०. मी इं[द्र] ११. विश्वामित्र. १२. हे प्रिय मेनके. १३. खास, निःसंशय. १४. विश्वामित्राला. १५. उत्त[म] नजराणा. १६. स्तुतीतें. १७. होई. १८. इंद्र. १९. हनुवटी. २०. भृकुटीरूप धनुष्य[ ] २१. कज्जलरूप विषानें लिप्त. २२. हे सुंदरि मेनके. २३. वृद्धि पावो. २४. पाशाजवळ. २५. भित्री[ ] २६. वसिष्ठपुत्रांचें हनन, त्रिशंकुराजाचें रक्षण, ह्यांपासून झालेली कीर्ति. २७. ब्रह्मदेवाची योग्यता[ ] २८. क्षणभर. २९. विश्वामित्रास.

जें दुष्कर पुरुषवरा तुजहि, कसें करिल काज [1]रामा तें? ।
[2]सदमृततरु तो मुनि, परि कपटें होईल [3]काजरा मातें. ॥ २४
करिल कसें माजर? जें दुष्कर [4]हरिहननकाज वाघास. ।
न शकति अग्नि [5]विधु; कसा [6]दिनमणिचा करिल काजवा घास?॥ २५
त्या मुनितें मोहाया हा जन काय [7]प्रभु? प्रभो! परि तें ।
तेज पाहाया जातें; [8]परिजनगत नाथतेज जय करितें. ॥ २६
जातें; तव आज्ञेचा कोण सुधी जन करील अपमान? ।
परि मन्निकट असावे मज साह्य [9]वसंतकामपवमान.' ॥ २७
शक्र म्हणे, 'सर्वेहि सुर आहों तुजला सहाय; कार्य करीं.' ।
आज्ञा दे; मग गेली आणाया [10]तूर्ण तोहि [11]आर्य [12]करीं. ॥ २८
जेथें करीत होता दारुण तप तो [13]तपोनदीन मुनी, ।
तेथें जाउनि, खेळे [14]तन्निकट, प्रथम तत्पदीं नमुनी. ॥ २९
होती करीत [15]कंदुककेलि, मधुर गान, मोहिनी, तीतें ।
स्पर्शे प्रथम [16]वसनहर पवन, मग त्यजुनि तोहि नीतीतें. ॥ ३०
सुरतरसांत बुडाला, जाणों स्त्रीरत्न [17]शीतनवसर, तो ।
तप्त [18]मतंगज रतला; शक्र म्हणे, बहु करोनि नवस, 'रतो.' ॥ ३१
झाली गाधिजसंगें हे कन्या; मालिनीतटीं ठेवी; ।
स्वर्गासि जाय तेथुनि, बहु निष्ठुर चित्त करुनि, ते [19]देवी. ॥ ३२
संरक्षिली वनीं, मधु पाजुनि मातेविना, [20]शकुंतांनीं. ।
असतां [21]विधिकवच, नव्हे काळाच्याही विनाश [22]कुंतांनीं. ॥ ३३
स्नानार्थ मालिनीतें गेलों, तों कळविलें इच्या [23]रुदितें; ।
आणुनि [24]उटजीं, केलें म्यां पालन, लालन, स्वयें [25]मुदितें. ॥ ३४
झाले शकुंत पाळक, म्हणुनि असे मज शकुंतला नाम. ।
ठेवुनि वागविलें हें रत्न गळां जेविं [26]मालतीदाम.' ॥ ३५

१. स्त्री. २. उत्तम अमृतवृक्ष. ३. काजरा या नांवाचा विषतरु. ४. सिंह मारण्याचें काम. ५. चंद्र. ६. सूर्याचा. ७. समर्थ. ८. सेवकजनीं प्रविष्ट झालेलें. ९. वसंतऋतु, मदन व वायु. १०. सत्वर. ११. विश्वामित्र. १२. हातांत. १३. तपाचा सागर. १४. विश्वामित्राजवळ. १५. चेंडूचा खेळ. १६. वस्त्र हरण करणारा. १७. थंड नूतन सरोवर. १८. हत्ती. १९. मेनका. २०. पाखरांनीं. २१. दैवरूप कवच. २२. भाल्यांनीं. २३. रोदनानें. २४. पर्णशालेंत. २५. आनंदितानें. २६. जाईच्या फुलांचा हार.

ऐशी तातमुखें श्रुत[1] निजजन्मकथा शकुंतला कळवी; ।
पळवी, स्मित[2] करुनि, नृपतिमनिंची अलभ्यता[3], व्यथा पळवी. ॥
नृपति म्हणे, 'तरि सुंदरि! सुदति[4]! मुदतिशय[5] तुला, मलाहि घडो.
सत्कृतिशीं[6] रसिकांची, तुजशीं माझी तशीच गांठि पडो. ॥
कुलशीलगुणांहीं तूं, योग्या, नृपकन्यका, महोदारा[7], ।
घे राज्य सर्व, नाहीं त्वदधिक[8] मज अन्य काम[9], हो दारा[10].' ॥
हांसुनि तीहि म्हणे, 'हो! प्रार्थावें प्रणतपारिजातातें[11]; ।
देवा स्वयें वहावें या निजकारुण्यवारिजा[12] तातें. ॥
मजकरवीं न तुम्ही बुधे[13] गुरुमर्यादातिपात[14] करवा हो! ।
सत्पात्रीं स्वधनातें चिंतामणि[15] कण्वतातकर वाहो.' ॥
भूप म्हणे, 'गांधर्वें[16] तुजशीं होईन शीघ्र अन्वित[17] मी. ।
नाहीं तरि अदयस्मरशरहत[18] झालों, बुडेन तन्वि[19]! तमीं. ॥
अन्या, धन्या, कन्या, अन्यायन्याय जाणत्या, मागें ।
गांधर्वेंचि वरातें भजल्या; तद्गुरुंहि[20] न भरले रागें. ॥
गुरुदेवताप्रसादा हो भाजन[21], आपुल्याचि देहातें, ।
सत्कीर्ति जगीं व्हाया, सत्पात्रीं आपुल्याचि दे हातें.' ॥
सुत युवराज असो, हा वरुनि वर निका, शकुंतला आली[22] ।
झाली; करांत याच्या मधुपवरनिकाशकुंतला[23] आली. ॥
तेव्हां तद्दैव म्हणे, 'योग्य तुला न नर अन्य केलीला[24]; ।
श्री विष्णुशीं तशी तूं याशिं करीं कण्वकन्यके! लीला.' ॥
राजा दुष्यंत म्हणे लब्धमनोरथ, 'प्रियंवदे! विरहा ।
मीही भ्याडचि, सेना पाठवितों तों अशीच देवि! रहा. ॥

१. ऐकिलेली. २. किंचित् गालांत हसणें. ३. आपल्या प्राप्तीची अशक्यता. ४. उ… आहेत दांत जीचे. ५. आनंदाचा अतिशय. ६. उत्तम कवितेशीं. ७. महाउदारा. ८. तुझ्या… अधिक. ९. इच्छा. १०. स्त्री. ११. नम्रांस कल्पतरू. (कण्वास). १२ आपल्या दयारू… कमळास. १३. ज्ञाते. १४. गुरूच्या मर्यादेचें उल्लंघन. १५. मनांत आणिलेलें देणारा मणि… १६. गांधर्वविवाहानें. १७. युक्त. १८. निर्दय मदनाच्या बाणानें विद्ध. १९. सुकुमारि. २०. त्यां… वडील माणसें. २१. पात्र. २२. सखी. (स्त्री). २३. भ्रमरासारिखे काळे जीचे केश. २४. क्री… केला.

दे मज निरोप, हंसें वद विस्मरिजेल काय देवि! सर[1]? ।
भिन्न दिसो, एकचि वपु; हें कोणासहि न काय दे विसर.' ॥ ४७
गेला निरोप घेउनि, परि मनिं कण्वासि भूप तो भ्याला. ।
चित्तीं म्हणे, 'अहा मुनि शापिल मज परमविषयलोभ्याला.' ॥ ४८
आला कण्व मुहूर्तें, फलपुष्पसमित्कुशांसि आणूनी, ।
झाला प्रसन्न भगवान्, दिव्यज्ञानेंकरूनि जाणूनी. ॥ ४९
कण्व म्हणे, 'वत्से! त्वां केला निश्चित आजि तातकर[2]; ।
न धरीं संकोच; नव्हे गांधर्वविधि स्वधर्मघातकर. ॥ ५०
तुज सुत होईल भला, निववील यशोमृतें कुलीनमनें; ।
त्यासि मदाशीर्वादें करितील समस्त नृप मुली! नमनें. ॥ ५१
तातातें नमुनि म्हणे, 'म्यां दुष्यंतासि वाहिलें कै[3]य. ।
भवदाश्रमीं[4] अतिथिचें[5] नव्हतां[6] प्रिय उचित राहिलें काय? ॥ ५२
त्यावरि कृपा करावी, द्या हा वर, योग्य होय कन्या यां[7].' ।
कण्व म्हणे, 'हेंहि दिलें; कां भीसी? न करुनीहि अन्याया.' ॥ ५३
झाला शकुंतलेला सुत; सुतपा[8] त्यासि कण्व परिपाळी; ।
गृहधर्मांची कुतुकें दे तो[9] भगवान् विरक्त परि पाळी. ॥ ५४
भरवी मृगार्भका[10], मग तो भरवी कां न नातवा घास? ।
झाला असा शिशुपणीं[11] बद्ध करी काननांत[12] वाघास. ॥ ५५
[13]तो आश्रमवृक्षांसी शार्दूलवराहहस्तिहरिसेना[14] ।
बांधी सावर्षांचा; शिकवी कण्वोक्त युक्त परिसेना. ॥ ५६
'सर्वदमन' त्यासि म्हणति, करिति सदा सुवरवृष्टि जलदमुनी[15]; ।
निरुपम सुख प्रजांला हा सुख देईल, सर्व खल दमुनी. ॥ ५७
कण्व म्हणे, 'मुलि! झाला राज्योचित[16] सुत, मलाहि लाभ वनीं; ।
जा पतिगृहासि; शोभे स्त्रीजन पतिच्याचि राहिला भवनीं[17]. ॥ ५८

---

१. मानससरोवर. २. पितृहस्त. ३. देह. ४. तुमच्या आश्रमांत. ५. पाहुण्याचें. ६. न होतां. वरास. ८. तपस्वी. ९. तो भगवान् कण्व विरक्त परि गृहधर्मांची पाळी कुतुकें दे. (कण्वऋषी री निराश तथापि तो कौतुकानें गृहधर्मांची पाळी दे म्ह० गृहस्थाश्रमासारिखी वागणूक करी.) ०. हरिणांच्या बालकांस. ११. बाल्यदशेंत. १२. रानांत. १३ तो मुलगा. १४. व्याघ्र, डुकर, ज, सिंह, यांचे समूह. १५. मुनिमेघ. १६. राज्यास उचित. १७. घरीं.

राज्यसुख पहा; पतिची सेवा करिं; मज उदास मुलि! न[1] मनीं; ।
पतिसह वृद्धपर्णी ये, जरि हें वन, सिंधु[2], नीर[3], पुलिन[4] मनीं.' ॥
आज्ञापिले स्वशिष्य, स्वसुता नेत्रें पुसोनि पाठविली; ।
साश्रुमुनिजनीं, कण्वें शतवार तदीयभक्ति आठविली. ॥
दुष्यंतसद्मपद्मीं, ते स्त्री श्री कण्व भानुशिष्य करीं ।
नेली, पुत्र सुगंधासह, धर्मनयांबुपूर्णनगरसरीं[5][6]. ॥
पतिला म्हणे मुनिसुता, 'द्यावें पुत्रासि यौवराज्य नृपा! ।
स्मृति आहे कीं? केली पूर्वी जी काश्यपाश्रमांत कृपा.' ॥
राजा म्हणे, 'कवण तूं? कोणाचा पुत्र? काय गे! वदसी? ।
कां[7] च स्मृतिरपि; तापसि[8]! मैवं[9] प्रलंपात्र[10] भूभुजः सदसि.' ॥
साध्वी म्हणे, 'अहो! नयधर्मज्ञ तुम्ही नरेंद्र पौरव[11] कीं; ।
वदतां असें कसें? हो!; करितां विश्वासघात रौरव[12] कीं. ॥
मृगयेचिये[13] प्रसंगीं, हरिणामागें वनांत लागोनी, ।
आलासि मालिनीच्या[14] तीरीं कण्वाश्रमासि भागोनी. ॥
सिद्धाश्रमांत[15] नव्हता तात; तुला म्यांचि पूजिलें वन्यें[16]; ।
जागें काय करावें निपट[17] कपटनिद्रिता जना? अन्यें[18]. ॥
मज्जन्मवृत्त[19] पुशिलें त्वां; मग म्यां मेनकाप्सरा माय, ।
कौशिक[20] बाप, असें तुज कथिलें; तें विसरलासि तूं काय? ॥
सुतयौवराज्यवर[21] मज देउनि, गांधर्वविधि करोनि मला ।
वरुनि, न जाणें म्हणसी; पूरुकुळीं तूंचि सुज्ञ साधु भला[22]. ॥
स्त्रीस म्हणति जाया; सुतरूपें पति तदुदरांत[23] जन्मति; तें ।
श्रुतिवचन[24] तुज असावें ठावें; परि मान्य होय सन्मतितें. ॥

१. मानूं नको. २. नदी. ३. पाणी. ४. वाळवंट. ५. धर्मनीतिरूप उदकानें पूर्ण नगररूप सरोवरीं. ६. या आर्येत रूपकालंकाराचें उत्कृष्ट उदाहरण आहे. ७. कशाची. ८ ऋषिकन्ये! कशाची गे स्मृति? या राजसभेंत असें भलतेंच भाषण करूं नको' असा अर्थ. ९. नको. १०. बडबड एथें. ११. पुरूच्या वंशांतले. १२. नरकवास. १३. पारधीच्या. १४. नद नांव. १५. ज्यांनीं परमार्थ आपलासा केला आहे अशांच्या आश्रमांत. १६ वनांतील फळपुष्पां १७. अत्यंत. १८. दुसऱ्यानें. १९. माझी जन्मकथा. २०. विश्वामित्र. २१. तुझ्या पुत्र यौवराज्य देईन असा वर. २२. एथें व्याजस्तुति अलंकार आहे. २३. तिच्या (जायेच्या) उदरां २४. 'पतिर्जायां प्रविशति गर्भो भूत्वा स्वमातरम् । तस्यां पुनर्नवो भूत्वा दशमे मासि जायते तज्जाया जाया भवति यदस्यां जायते पुनः' या स्मृतिवचनास उद्देशून हें लिहिलें आहे.

मी जाया सत्कार्या; आत्माचि तुझा कुमार हा राया ! ।
झाला प्राप्त, परि गळां न धरिसि अद्यापि रत्नहारा या.' ॥ ७०
भूप म्हणे, 'भग्नव्रत तात तुझा; मायही तुझी असती; ।
नसतीस तत्सुता तूं, लज्जा कांहीं तरी तुला असती. ॥ ७१
सावर्षांचा म्हणसी; इतुक्यांतचि एवढा कसा गे ! हा ? ।
स्वीकारुनि तुज, लावूं डाग कसा मूढलोकसा गेहा ?' ॥ ७२
साध्वी म्हणे, 'मिळविलें ज्ञानतपःकीर्तिभाग्य मत्तातें, ।
कैंचें तुझ्या कपाळीं नीचा ! अतितुच्छभाग्यमत्ता ! तें ? ॥ ७३
जी ब्रह्मयोनि देवी मन्माता मेनका, सुरांस मता; ।
नीचा तुझीच माता; करिल सुधेची कशी सुरा समता ? ॥ ७४
जरि मुख्यसत्यधर्मच्युत आपण, विश्वनिंद्य जन; नीचा ! ।
निंदिसि कसें पदातें मत्ताताच्या, मदीय जननीच्या ? ॥ ७५
पौरववरौरवगौरवकर्ता, भर्ता भला मला गमसी; ।
समशीलबुद्धि होउनि, नीतीनें आजि बोलुं लाग मसी. ॥ ७६
बहुधा तुझें कपाळ न साहे सुतरत्नसंनिधानातें; ।
हतभाग्य न घे, देतां दाटुनि आणूनि, सन्निधानातें. ॥ ७७
क्षितिपति मत्सुतचि असो तेजाचा मूर्तिमंत हा निकर; ।
हा निकर मांडिला तूं; देशील कर स्वकीर्तिहानिकर.' ॥ ७८
ऐसें वदोनि, उठली जाया, तों जाहली नभोवाणी; ।
'दुष्यंता ! काय करिसि ? समजावीं आपुली सती राणी. ॥ ७९
त्वां हे विधिनें वरिली; या साध्वीचें विशुद्ध जनु; रोगें ।
पुर, राष्ट्र भस्म न करो; समजावीं सुतवतीस अनुरागें. ॥ ८०
पुत्राचें भरण करीं; भाग्यें तुज लाधला, भर तयातें; ।
म्हणतील आजपासुनि भुवनीं जन सर्वही भरत यातें.' ॥ ८१

---

१. सत्कारास योग्य. २. स्वद्रूप. ३. बाप. ४. जारिणी. ५. घराण्याला, (कुळास.) ६. माझ्या
नें. ७. मान्या. ८. अमृताची. ९. मद्य. १०. बरोबरी. ११. पौरवराजांस रौरवाचें .(नर-
) गौरव करणारा. १२. सुतरूप रत्नाच्या सांनिध्यातें (जवळपणातें). १३. उत्तम ठेव्यातें.
४. राजा. १५. समूह, पुंज. १६. अनर्थ. १७. करभार. १८. आकाशवाणी. १९. जन्म.
०. क्रोधानें. २१. प्रीतीनें. २२. पोषण. २३. पोस.

स्वकुळपुरोहित, ऋत्विक्, मंत्री, आचार्य, साधु जे होते, ।
राजा म्हणे, 'परिशिलें ?' म्हणती सारेचि एकदां 'हो' ते. ॥
'मत्सुत[1], मद्वनिता[2] हे मी जाणें; परि जनास कळवाया ।
ऐसें निष्ठुर वदलों, तुमची शंका अशेष पळवाया.' ॥
कळवुनि असें समस्तां, हृदयीं सप्रेम बाष्पभर तातें ।
आलिंगिलें, गुरुसुहृत्सचिवानुमतेंकरूनि, भरतातें. ॥
कण्वसुतेसि म्हणे नृप, 'दयिते ! साध्वि ! क्षमा करीं भीरु[3] ! ।
त्वत्क्षोभा भ्याला सति ! हा जन, बहु पावका जशी भी रूं[4]. ॥
असकृत्[5] विरहद[6], तापद, परि मित्रीं[7] काय सुमुखि ! भीरु[8] ! सती ?
दयिते ! नलिनी, न धरुनि चित्तीं सुप्रेमभंगभी, रुसती ? ॥
माझी कीर्ति श्री, तूं; बोलाया वदन कोरडें जाये; ।
त्वत्कंठ कां न दाटे ? येऊं देऊं नको रडें जाये ! ॥
वदलों शुध्यर्थ असें; भीतों बहु मानसांत डागातें; ।
निंदिल हंसवर कसा, रसें[10] सेवुनि, मानसा[11] तडागातें ?' ॥
स्त्री सुखवुनि, दुष्यंतें गुरुसेवापुण्यकीर्तिलाभरत ।
युवराज पुत्र केला; कविंनीं तो सुबहु कीर्तिलें[12] भरत. ॥
दुष्यंत जधीं राजा झाला, रिपुनृप तधींच नक्षत्रें; ।
भरत तरि रवीच, परी तें यश केलें कधींच न क्षत्रें[13]. ॥
कण्वें भरताकरवीं बहुदक्षिण यज्ञ करविले शतशा; ।
याचा प्रताप मिरवी छवि[14] पाताळींहि, नुरवि लेश तशा. ॥
गोवित्तें[15] वाजिमेधीं[16] ब्राह्मणपूजाद्यनंतलाभरतें[17] ।
दिधल्या सहस्रपद्में[18] कण्वाला धेनु दक्षणा भरतें. ॥
केली कीर्ति शशिकुळीं भरतें, नाशूनि भूमिभार, तता[19]; ।
म्हणवूनि पौरवांच्या ठायीं नांदे प्रसिद्ध भारतता. ॥

---

१. माझा पुत्र. २. माझी स्त्री. ३. हे भित्रे. ४. कापूस. ५. वारंवार. ६. वियोग देण
७. सूर्यावर. ८. हे भित्रे. ९. होय. १०. पाणी. ११. मानससरोवरातें. १२. वर्णिला. १३.
त्रियानें. १४. कांति. १५. गाईरूप द्रव्य. १६. अश्वमेधीं. १७. ब्राह्मणपूजादि अनंतलाभ
१८. वाल्मीकिरामायणाचे युद्धकांडाचे २८ वे अध्यायांत श्लोक ३३–३७ पर्यंत संख्या दि
आहे तिजवरून पद्म हें ३३ वें स्थान होतें. म्हणून सहस्र पद्में हें छत्तिसावें स्थान येतें. म्हण
एक या अंकावर ३५ शून्यें देऊन होणारी संख्या. १९. विस्तृता.

भरतसुत भुमन्यु नृपति; तत्सुत सुहोत्र; तत्तनय हस्ती; ।
तत्तनय तो विकुंठन; म्हणति सदा साधु, 'अस्तु ते स्वस्ति.'[1] ॥ ९४
नंदन विकुंठनाचा अजमीढ, जगत्पवित्र यत्स्मरण; ।
पुत्र चतुर्विंशति शत त्याचे; कुळकर तयांत संवरण. ॥ ९५
संवरणाचा सुत कुरु; त्याचा नंदन विदूर मतिशाली;[2] ।
त्याचा तनुज अनश्वा; स्त्री अमृता मागधी तया झाली. ॥ ९६
तत्पुत्र परीक्षिन्नृप, तन्नंदन भीमसेन भूमिपती; ।
त्याचा प्रतिश्रवा सुत, त्याचा तनुज प्रतीप शुद्धमती. ॥ ९७
अमृतप्रतिम चरित्र प्राशावें श्रवण करुनि आर्यांनीं.[3] ।
गाईल रामकरुणाघनभक्तमयूर तेंचि आर्यांनीं.[4] ॥ ९८

अध्याय तेरावा.

इक्ष्वाकुवंशज महाभिष राजा सांगराजसूयशतें, ।
हयमेधसहस्रेंही[5] जोडी, दुर्लभ सुरांहि जें, यश तें. ॥ १
तो नृप झाला स्वर्गीं बहुमान्य सुरांसि, सुकृत[6] साधूनी; ।
ब्रह्मसभेसि बसविला होता तत्रत्य[7] सर्व साधूंनीं. ॥ २
विधिदर्शनार्थ गेली ब्रह्मसभेप्रति सरिद्वरा[8] गंगा; ।
तों तदुरोंचल[9] उडवुनि, मारुत[10] उघडें करी तिच्या अंगा. ॥ ३
सर्व अधोमुख झाले; पाहे नृप तो तसाचि गंगेतें; ।
जाणे द्रुहिण,[11] महाभिषमन तद्रूपीं क्षणार्ध रंगे, तें. ॥ ४
ब्रह्मा म्हणे, 'नृपा! नरलोकीं जा; घे सुजन्म; थापटुनी ।
भुज, जिंकिलें न कोणी ज्ञानासिविनाचि[12] मन्मथा[13] पटुनीं. ॥ ५
जाणूनि अहित केवळ, ज्यांहीं त्यजिलेंचि विषयमद्य जनीं, ।
ते साधु सत्यलोकीं राया! होताति योग्य मदर्चनीं.[14] ॥ ६
भोगुनि विषय, विटोनि स्वर्गतिला पावशील, विषयमते! ।
राया! कळो तुज अमृत अनुग्र, कीं विषय उग्र विष, यम ते.' ॥ ७
स्वमनीं म्हणे महाभिष, 'आत्मा शुद्ध प्रतीपभूपाचा; ।

---

१. असो तुझें कल्याण. २. बुद्धिमान्. ३. श्रेष्ठांनीं. ४. आर्याछंदांनीं. ५. अश्वमेधसहस्रांनेंही. ६. पुण्य. ७. तेथील. ८. नदिश्रेष्ठा. ९. तिच्या उरावरील पदर. १०. वायु. ११. ब्रह्मदेव. १२. ज्ञानरूपखड्गावांचून. १३. मदनाला. १४. माझ्या पूजेविषयीं.

भरतसुत भुमन्यु नृपति; तत्सुत सुहोत्र; तत्तनय हस्ती; ।
तत्तनय तो विकुंठन; म्हणति सदा साधु, 'अस्तु तें स्वस्ति.'[1] ॥ ९४
नंदन विकुंठनाचा अजमीढ, जगत्पवित्र यत्स्मरण; ।
पुत्र चतुर्विंशति शत त्याचे; कुळकर तयांत संवरण. ॥ ९५
संवरणाचा सुत कुरु; त्याचा नंदन विदूर मतिशाली[2]; ।
त्याचा तनुज अनश्वा; स्त्री अमृता मागधी तया झाली. ॥ ९६
तत्पुत्र परीक्षिन्नृप, तन्नंदन भीमसेन भूमिपती; ।
त्याचा प्रतिश्रवा सुत, त्याचा तनुज प्रतीप शुद्धमती. ॥ ९७
अमृतप्रतिम चरित्र प्राशावें श्रवण करुनि आर्यांनीं[3]. ।
गाईल रामकरुणाघनभक्तमयूर तेंचि आर्यांनीं[4]. ॥ ९८

अध्याय तेरावा.

इक्ष्वाकुवंशज महाभिष राजा सांगराजसूयशतें, ।
हयमेधसहस्रेंही[5] जोडी, दुर्लभ सुरांहि जें, यश तें. ॥ १
तो नृप झाला स्वर्गीं बहुमान्य सुरांसि, सुकृत[6] साधूनी; ।
ब्रह्मसभेसि बसविला होता तत्रत्य[7] सर्व साधूंनीं. ॥ २
विधिदर्शनार्थ गेली ब्रह्मसभेप्रति सरिद्वरा[8] गंगा; ।
तों तदुरोंचल[9] उडवुनि, मारुत[10] उघडें करी तिच्या अंगा. ॥ ३
सर्व अधोमुख झाले; पाहे नृप तो तसाचि गंगेतें; ।
जाणे द्रुहिण[11], महाभिषमन तद्रूपीं क्षणार्ध रंगे, तें. ॥ ४
ब्रह्मा म्हणे, 'नृपा! नरलोकीं जा; घे सुजन्म; थापटुनी ।
भुज, जिंकिलें न कोणी ज्ञानासिविनाचि[12] मन्मथा[13] पटुंनीं. ॥ ५
जाणूनि अहित केवळ, ज्यांहीं त्यजिलेंचि विषयमद्य जनीं, ।
ते साधु सत्यलोकीं राया! होताति योग्य मद्यजनीं[14]. ॥ ६
भोगुनि विषय, विटोनि स्वर्गतिला पावशील, विषयमते! ।
राया! कळो तुज अमृत अनुग्र, कीं विषय उग्र विष, यम ते.' ॥ ७
स्वमनीं म्हणे महाभिष, 'आत्मा शुद्ध प्रतीपभूपाचा; ।

---

१. असो तुझें कल्याण. २. बुद्धिमान्. ३. श्रेष्ठांनीं. ४. आर्याछंदांनीं. ५. अश्वमेधसहस्रानेंही. ६. पुण्य. ७. तेथील. ८. नदिश्रेष्ठा. ९. तिच्या उरावरील पदर. १०. वायु. ११. ब्रह्मदेव. १२. ज्ञानरूपखड्गावांचून. १३. मदनाला. १४. माझ्या पूजेविषयीं.

गंगा म्हणे, 'अनिंद्या, दिव्या मी; मत्[1]प्रसंग न विटाळी. ।
भज मज; येतां असुलभवस्तु करा, त्यासि कोण कवि टाळी?' ॥ २१
नृपति म्हणे, 'तरि म्हणतों स्वकरा हा दिव्यलाभ यावा मी, ।
अंकीं जरि कल्याणि! प्रथमचि तूं बैसतीस या [2]वामीं. ॥ २२
अंक स्नुषासुतांला दक्षिण योग्य; स्त्रियांसि वाम हित; ।
सोसूनि विलंबातें, हो सूनचि; [3]पंथ नव्हे नवा [4]महित.' ॥ २३
गंगा म्हणे, 'बहु बरें; तुमचा आत्मा कुमार जो [5]भावी, ।
त्याच्या तरि वामांकीं हे सून यथा[6]भिलाष शोभावी. ॥ २४
पावेल पति सुगतिला, वर्तेन असेंचि साधु बहुधा मी; ।
परि साधु, असाधु, किमपि न म्हणावें; हित करीन बहु [7]धामीं.' ॥ २५
म्हणतां 'अवश्य' झाली गुप्त सती [8]क्षिप्र ती; [9]परायास ।
प्रात्यर्थ न करितांचि स्वमुखें प्रार्थी प्रतीपरायास. ॥ २६
पुत्रार्थ यज्ञ केले; आर्जविले अमर, विप्र; ती परते; ।
त्यापासून तपीं, स्त्रीसह, [10]कुळसारसरवि [11]प्रतीप रते. ॥ २७
पोटासि महाभिष नृप आला, झाला कुमार बहु [12]रुचिर; ।
बहु वृद्धपणीं फळला [13]विधि, करितां परम उग्र तप [14]सुचिर. ॥ २८
कुळ [15]शांत जाहलें, तें जन्मुनि विस्तारिलें, म्हणूनि सुता ।
शांतनु ऐसें ठेवी नृप नांव, यशें दुधाचियाहि उता. ॥ २९
धन्य प्रतीप राजा; भासे जोडाचि शांतनु रवीतें; ।
होतें [16]शोकतम मनीं कीं झाला वंश शांत, नुरवी तें. ॥ ३०
सुत यौवनस्थ होतां, पूर्वकथा भूप त्यासि तो कानीं ।
सांगोनि, म्हणे, 'तैशी स्वप्नींहि न पाहिलीच लोकांनीं. ॥ ३१
भेटेल तुला तनया! धन्य कराया स्वयेंचि ती [17]महिला; ।
मजपाशीं वर वरिला आहेचि; तिला भजें दुज्या [18]महिला. ॥ ३२
जें ती करील, तें त्वां सर्व सहावेंचि; [19]रुक्ष न वदावें; ।
तुटतांचि प्रेम जाइल, [20]तेंचि करीं तीस नित्य नव [21]दावें. ॥ ३३

१. समागम. २. डाव्या. ३. मार्ग. ४. पूज्य. ५. पुढें होणारा. ६. इच्छा. ७. गृहीं. ८. सत्वर. ९. अत्यंत श्रम. १०. कुळरूपकमळाला सूर्य. ११. राजविशेष. १२. सुंदर. १३. नशीब. १४. फार वेळ. १५. नष्ट. १६. शोकरूप तम म्ह० अंधकार. १७. स्त्री. १८. पृथ्वीला. १९. स्नेहरहित, कठोर. २०. प्रेम हेंच नवें दावें तिला कर. २१. दोरी.

हा बाल्हीक अनुज; हें राज्य तुझें तें मीं, करीं[1] अवन[2]; ।
[3]भवन हितें[4] नव्हे आम्हां, हित कुरुकुळजांसि या वयांत वन.' ॥ ३४
समजावुनि शांतनुला जाय, जसा ज्येष्ठपुत्र देवापी; ।
किति राज्य? दे तपस्या[5] सुख, अमृताचीहि तें न दे वापी[6]. ॥ ३५
बहु महिमा शांतनुचा; स्पर्शे ज्या ज्यास तो सकारुण्य[7], ।
त्या त्या जीर्णांसि[8] पुन्हा तत्काळ प्राप्त होय तारुण्य. ॥ ३६
तो मृगयाशीळ नृपति एकाकी[9] सुरसरित्तटीं[10] धन्वी ।
होता, तों एकांतीं तेणें दूरूनि देखिली तन्वी[11]. ॥ ३७
सेविति आमरण[12] सदा यतिपति, जे परम शांत, नुसतीतें[13]; ।
निरुपम तनु[14] प्रकटितां कां हो! न भुलेल शांतनु सतीतें?॥ ३८
नृपति म्हणे, 'तूं कोण त्रिभुवनसौंदर्यमूर्ति रुचिरतमी[15]? ।
रूपीं लुब्ध चकोरचि झालों त्वन्मुखसुधांशुरुचिरत[16] मी. ॥ ३९
वद[17] सुदति[18]! या वनीं कां? मी तों भूप प्रतीपसुत धन्वी ।
भ्रमतों असाचि मृगयाशीळ वनीं; सांग कोण तूं? तन्वि! ॥ ४०
वर मागतों तुला, तव शृंगारामृतरसांत मज्जाया[19]; ।
दे दान हें उदारे! हो, होउनि सुप्रसन्न, मज्जाया[20].' ॥ ४१
गंगा स्मित[21] करुनि म्हणे, 'राया! होईन मी तुझी भार्या; ।
परि अप्रिय न करावें, दूषुनि माझ्या शुभाशुभा कार्या. ॥ ४२
विप्रिय करितांचि नृपा! जाईन; असें रुचेल तरि, हे मी ।
स्त्रीरत्न योग्य अंकीं बसवावें, जेंवि रत्न वरि[22] हेमीं[23].' ॥ ४३
तें मान्य करी राजा; जेव्हां दे त्यास दान वपु[24] राणी; ।
त्या त्यांत रस, जसा मन रसिका दे त्या सदा नवें[25] पुराणीं. ॥ ४४
झाले सुत आठ तिला; त्यांत उपजतांचि बुडविले सात; ।
त्यागभयें नृप साहे, जरि संततिचा असा करी घात. ॥ ४५
सुत आठवाहि होतां, नृप पावे पुत्रशोककष्ट महा; ।
'न करीं कुळघात' म्हणे 'एक तरि असो कुमार अष्टम हा. ॥ ४६

१. हातीं. २. रक्षण. ३. गृह. ४. बरें करणारें, कल्याण करणारें. ५. तपश्चरण. ६. विहीर. ७. कृपायुक्त. ८. म्हाताऱ्याला. ९. एकटा. १०. देवनदी (गंगा) तीच्या तीरीं. ११. सडपातळ स्त्री. १२. मरणपर्यंत. १३. शरीररहित अशीतें. १४. शरीर. १५. अतिसुंदर. १६. तुझ्या मुखचंद्राच्या कांतीच्या ठायीं रत. १७. बोल. १८. उत्तम आहेत दंत जीचे अशे. १९. बुडाया. २०. माझी स्त्री, २१. हास्य. २२. उत्तम. २३. सुवर्णीं. २४. शरीर. २५. नूतन.

त्वां न सुत, पति बुडविला; झालों सुतशोकपावकीं[1] तप्त; ।
यासिहि बुडविसि काय? क्रूरे! ते बुडविले जसे सप्त[2].' ॥ ४७
देवी म्हणे, 'नृपा! तुज पुत्र प्रिय; मी नव्हें प्रिया; युक्त[3]; ।
हा सुत घे; जातें; त्वां विप्रिय[4] केलें; न रक्षिलें उक्त[5]. ॥ ४८
विप्रिय करूनि माझें, त्वां मत्सहवाससमय संपविला.' ।
ऐसें वदोनि, गंगादेवीनें तो नृपाळ कंपविला. ॥ ४९
मग कथिलें, 'मी गंगा; सुत हे वसु; आपवें[6] दिला शाप. ।
केलें विमुक्त; नाहीं केलें, त्वत्सुत वधूनि, म्यां पाप.' ॥ ५०
वसुशापाचें कारण पुसतां, गंगा म्हणे, 'असें झालें. ।
एका वसुच्या चित्तीं स्वस्त्रीचें दुष्ट बोलणें आलें. ॥ ५१
हरिली वसिष्ठमुनिची धेनु श्रीनंदिनी स्वबळदर्पें[7]; ।
मग शापिलें; डसावें पुच्छ तुडवितां पदें, जसें सर्पें. ॥ ५२
'जन्मा मनुष्यलोकीं' ऐसा सर्वांस शाप; त्यांत नृपा! ।
'सत्वर सुटाल जन्मुनि,' अशि केली, कवळितांचि पाय, कृपा. ॥ ५३
जेणें केलें मुनिचें धेनुहरण, तो द्युसंज्ञ हा; याला ।
ऋषिचा वरप्रसाद, प्रणति[8] करुनि विनवितां, असा झाला. ॥ ५४
'राहेल हा द्युनामा नरलोकीं बहुत काळ; परि हार ।
होईल सज्जनांचा; प्रणतार्तीचा[9] करील परिहार[10]. ॥ ५५
शास्त्रनिपुण, धर्मात्मा, पितृभक्त, ब्रह्मचर्यपर, महित[11] ।
होइल लोकीं, जोडुनि कीर्ति; कुळाचें करील परम हित. ॥ ५६
नेतें शिशुला; मग हा येईल; त्यजिल न वसु धामातें[12]; ।
बहु भुलविला पति, म्हणुन हे देऊ शाप न वसुधा[13] मातें.' ॥ ५७
दयिता गेल्यावरि, तो हास्तिनपुरनाथ शांतनु प्रौज्य[14] ।
क्रतु[15], दान धर्म साधी; श्रीरामासारिखें करी राज्य. ॥ ५८
वेदांनीं कथिलीं तीं करि कर्में; ब्राह्मणांसि दे दानें; ।
वर्षें छत्तीस नृपति कंठी गंगावियोगखेदानें. ॥ ५९

---

१. विस्तवांत. २. सात. ३. योग्य. ४. जें आवडत नाहीं तें. ५. वचन. ६. वसिष्ठानें हा जेव्हां वरुणाचा पुत्र झाला तेव्हां त्याचें आपव असें नांव ठेविलें. ७. गर्वानें. ८. नमस्कार. ९. नम्र झालेल्यांच्या पीडेचा. १०. निवारण. ११. पूज्य. १२. गृहातें. १३. पृथ्वी. १४. पुष्कळ. १५. यज्ञ.

गंगातटासि मृगयाव्यासंगें जाय एकटा भूप. ।
तों स्तब्ध, अल्पहि दिसे तोय[1], म्हणे, 'कां इचें असें रूप?' ॥ ६०
भूप म्हणे, 'जाणविला प्रियविरहक्लेशहेतु दुष्करसा. ।
गंगाहि मद्वियोगें झाली मत्तुल्य काय शुष्करसा[2]?' ॥ ६१
करुनि विचार पहातां सर्वत्र, कुमार पटु[3], धनुष्पाणी[4] ।
दिसला; यत्कृतमार्गणसेतुस्तव[5] तें तसें दिसे पाणी. ॥ ६२
झाला अदृश्य सत्वर दिव्याकृति जेधवां[6] कुमारमणी[7], ।
सुत आठवुनि नृपें ती विनविलि, जशि शंकरें उमा रमणी. ॥ ६३
दुर्लभ दर्शन, तनयहि द्याया, ती आपणासि तरुनि, करें ।
सुत धरुनि, ये; जिचें यश गावें संतानकादितरुनिकरें[8]. ॥ ६४
आली निववायाला सस्मित[9] देवी जशी नवसुधा हो. ।
दर्शन होतांचि, दिसों सहसा दे, वीजशी, न वसुधा[10] हो. ॥ ६५
गंगा म्हणे, 'अहो जी! तुमचा हा पुत्र आठवा; याला ।
न्या स्वगृहीं, मज समयीं, यातें पाहूनि, आठवायाला. ॥ ६६
हा शिष्य वसिष्ठाशीं, भृगुरामाशींहि[11] सम; न वेदांत, ।
शास्त्रांत उणा; आधीं या आले वेद, मग नवे दांत. ॥ ६७
गुरुशुक्रनीतिशास्त्रीं पटु[12], भटपति[13] शक्रसम[14], रवि खरा या ।
लाजे, कीं सुकुशळ हा बहु शरकर[15], करुनि समर[16]; विखराया. ॥ ६८
म्यां देवव्रत ऐसें याचें अन्वर्थ[17] ठेविलें नाम; ।
ने पुत्ररत्न; शोभे येणें कुळदीपकें तुझें धाम[18].' ॥ ६९
देउनि सुतरत्न करीं, घेउनि पतिचित्तवित्त[19], ती गेली. ।
नेत्रोदकें तिघांच्या गंगा गंगातटीं नवी[20] केली. ॥ ७०
पुत्रासि पुरीं नेउनि, शांतनु दे यौवराज्यपद त्यातें. ।
सामात्य[21] पौर[22] झाले वश त्या, प्रियपथ्य[23]सत्यवदत्यातें. ॥ ७१

---

१. उदक. २. शुष्क आहे रस म्ह० उदक जीचें अशी. ३. हुशार. ४. धनुष्य आहे हातीं ज्याच्या. ५. ज्याणें केलेल्या बाणरूप सेतूमुळें. ६. जेव्हां. ७. उत्तम मुलगा. ८. संतानकादिक कल्पवृक्षांच्या समुदायानें. ९. हास्ययुक्त. १०. पृथ्वी. ११. परशुरामाशीं. १२. चतुर. १३. योद्ध्यांचा स्वामी. १४. इंद्रासारखा. १५. बाणरूपी किरण. १६. युद्ध. १७. खऱ्या अर्थाचें. १८. गृह. १९. पतीचें चित्तरूप द्रव्य. २०. नवी नदी. २१. प्रधानांसह. २२. पुरवासी लोक. २३. हितकारक.

सत्पुत्रें सर्व [1]भर स्वशिरीं घेतां, [2]प्रतीपसुत हर्षें ।
नेता झाला घटिका चार तशीं चार, उपरि त्या, वर्षें. ॥ ७२
यमुनातीरवनीं तो गेला होता सुभूषित, [3]सुवासा; ।
तेथें नृपासि [4]मारुत भेटे [5]न्हाऊनि, आणुनि [6]सुवासा. ॥ ७३
सत्यवतीनि[7]कट नृपा नेलें गंधें [8]तदंगसंभूतें; ।
जैसें तपोयशें मन वेधूनि उमासमीप शंभूतें. ॥ ७४
[9]चेतोहरगंधाढ्या ती म्हणतों [10]दिव्यं [11]पद्मकलिका मी; ।
घेउनि सुवास धांवत गेला जो, रसिक तोहि [12]अलि [13]कामी. ॥ ७५
यमुनातीरीं कन्या सत्यवती [14]सुतनु देखिली भूपें. ।
गमली ती [15]भूमिगता साक्षाद्देवीच अद्भुतें रूपें. ॥ ७६
पुसतां सांगे कन्यारत्न, न वदवे [16]त्रपाभरें तरि, तें; ।
'धमार्थ वाहतें पि[17]तृवचनें मी [18]दाशपतिसुता [19]तरितें.' ॥ ७७
चित्तीं म्हणे नृप, 'अहा! चवरी ती झांडणीच कीं केली; ।
मोळविक्यानें काष्ठें फोडाया [21]असिलता वनीं नेली.' ॥ ७८
भरली मनांत नवरी, मागाया दाशपतिकडे गेला; ।
मग त्यास स्वमनींचा अर्थ श्रुत आपुल्या मुखें केला. ॥ ७९
दाशपति म्हणे, 'आहें जातीनें मी, नव्हें नवा, [22]हीनें. ।
द्यायाचीच सुता; [23]वररत्नपदीं तीस कां न वाहीन? ॥ ८०
परि आहे मच्चित्तीं, तो राया! एक [24]काम पुरवा हो! ।
सद्वरलाभसुखामृतपूरीं माझें [25]प्रकाम पुर वाहो.' ॥ ८१
'वद, काम काय? देऊं.' भूप म्हणे. दाशपति वदे वाचा; ।
'तुजमागें नृप हो, जो होईल इला कुमार; दे [26]वाचा.' ॥ ८२
[27]स्मरहत जरि नृप, निर्मळ परि मेळविलें मळों न दे यश तें. ।
गेला पुरासि कीं तो न सुता देइल वळोन [28]देयशतें. ॥ ८३

१. भार. २. शांतनु. ३. उत्तम वस्त्र नेसलेला. ४. वायु. ५. सजल होऊन. (पाण्याचे बिंदु घेऊन, असा भाव.) ६. सुगंधास घेऊन. ७. जवळ. ८. तीच्या अंगापासून झालेल्या. ९. चित्त हरण करणाऱ्या सुवासानें पूर्ण. १०. स्वर्गातील. ११. कमळाची कळी. १२. भ्रमर. १३. कामातुर राजा शांतनु. १४. सुंदर. १५. पृथ्वीवर आलेली. १६. लाजेनें. १७. बापाच्या सांगण्यावरून. १८. उत्तम कोळ्याची कन्या. १९. नौकेतें. २०. केरसुणी. २१. तरवार. २२. नीच. २३. उत्तम नवऱ्याचे पायांवर. २४. इच्छा. २५. यथेच्छ. २६. भाक, वचन. २७. मदनानें पीडिलेला. २८. शेंकडों देणग्यांनीं.

भूप म्हणे, 'हा करितों[1] युगं, न धरुनि मीड, काय [2]यामातें. ।
सुखवील तीच मात्रा, नाशुनि [3]हृत्पीडकामया, मातें.' ॥ ८४
[4]गांगेय पित्यासि पुसे, 'दिसतां कृश, [5]हरिण काय हो तात! ।
कारण? चिंतारोगें जन ऐसे [6]क्षीणकाय होतात. ॥ ८५
चिंता काय? जया तुज, धरुनि शिरीं सर्व भूप [7]पादरजा, ।
भावें उपासिती, सुर [8]शक्रासि तसे, सदैव सादर ज्या. ॥ ८६
[9]व्याधि कळों द्या; त्याची [10]क्षिप्रं करीन [11]प्रतिक्रिया देवा! ।
अस्वस्थ सर्व झाले, तुमची [12]सर्ववल्लि ज्या जनां सेवा.' ॥ ८७
राय म्हणे, 'काय वदों? वत्सा! देवव्रता! तुज पहातों ।
तेव्हांचि पावतों [13]तटें; [14]चिंतापूरीं सदैवहि वहातों. ॥ ८८
एक अपत्य जया, तो अनपत्यचि; त्यांत नित्य तूं [15]शस्त्री; ।
[16]लोकहि [17]अनित्य वाटे; करिजे रक्षावया स्वदेश स्त्री. ॥ ८९
जें पूर्वजीं मिळविलें, करिशिल तूं वाढवुनि जनन यश तें. ।
तूं स्वसमचि बा! ध्यावें कुशळें एकाहि तूज [18]तनयशतें. ॥ ९०
काळप्रवाह दारुण; नेणों होईल चलन [19]सेतूतें; ।
हें दुःखाचें कारण गांगेया! पाठिबल नसे तूतें.' ॥ ९१
पितृवचन श्रवण करुनि, देवव्रत पितृसखा अमात्यातें ।
[20]गुरुचिंताहेतु पुसे; तो सांगे सर्व सत्तमा त्या तें. ॥ ९२
वृद्धामात्यें कथितां, [21]तातप्रिय दाशपतिकडे [22]तूर्ण ।
[23]सार्य [24]नदीसुत गेला, कार्य पित्याचें करावया पूर्ण. ॥ ९३
लंघी,[25] जेंवि गयेच्या, [26]बुध तो [27]गुरुचित्तरंजनाश, पथा. ।
[28]दाशवरोक्त शिरीं घे, करि, [29]तत्संदेहभंजना, शपथा. ॥ ९४

---

१. एक युग म्ह० त्रेचाळीसलक्ष वीसहजार वर्षे. २. प्रहरातें. ३. हृदयास पीडा करणाऱ्या रोगास. ४. गंगापुत्र भीष्म. ५. पांडुरवर्ण. ६. कृशदेह. ७. पायांची धूळ. ८. इंद्राला. ९. शरीरपीडा. १०. सत्वर. ११. उपाय. १२. कल्पलता. १३. तीर. १४. काळजी हाच पूर त्यांत. १५. शस्त्र धरणारा. १६. परलोक. १७. अशाश्वत. १८. शेंकडों पुत्र मोबदला देऊन. १९. बांध. २०. बापाच्या काळजीचें कारण. २१. बाप आहे आवडता ज्याला. २२. सत्वर. २३. अमात्यादि आर्यांसहवर्तमान. २४. नदीचा पुत्र भीष्म. २५. क्रमी. २६. शहाणा भीष्म. २७. पित्याच्या चित्तरंजनाची आशा ज्यास. २८. मुख्य कोळ्याचें बोलणें शिरसा मान्य करी. २९. त्याचा संशय घालविण्याकरितां.

पुनरपि दाशपति म्हणे, 'त्वदपत्याचें[1] परंतु भय वाटे; ।
कीं राज्यलोभ दारुण; या ग्रीष्मीं[2] स्नेहनीतिनद[3] आटे.' ॥ ९५
गांगेय म्हणे, 'त्यजिला स्त्रीसंग; सशंक[4] दाशवर ज्यांत;, ।
अनृत वदेन, तरि गळो हें, न रणमखीं[5] कदा, शव[6] रजांत.[7]' ॥ ९६
करितां अशि प्रतिज्ञा, दाशपति म्हणे, 'दिली सुता[8] साधो[9]! ।
या धर्में त्वचिंतित सर्वहि पितृभक्त! संस्तुता! साधो[10].' ॥ ९७
त्या समयीं ऋषिसुरगण करुनि कुसुमवृष्टि म्हणति, 'हा भीष्म[11]; ।
हा विषयवासनासरिदंतकतेजाचि[12] केवळ ग्रीष्म.' ॥ ९८
तो सत्यवतीस म्हणे, 'चाल; असो तांतचित्त[13] महिं[14], माते; ।
वर्णिति नभीं पहा ऋषि देव तुझा अतुळभाग्यमहिमा[15] तो.' ॥ ९९
दिधली सुदुर्लभा त्या सत्पुत्रें त्या पित्यासि सत्यवती. ।
'स्वच्छंदमृत्यु[16] हो' अशि आशी[17] तातेंहि त्यासि सत्यवती[18]. ॥ १००

अध्याय चवदावा.

सत्यवतीसुत पहिला चित्रांगद, जेंवि रात्रिकांत[19] नव, ।
सुखकर; दुसरा झाला, त्या नांव विचित्रवीर्य शांतनव[20]. ॥ १
शांतनुनृप भीष्माच्या हातीं तें पुत्रयुग्म[21] दे हातें; ।
गेहातें[22] देवांच्या जातां; काळाचिया[23] स्वदेहातें. ॥ २
भीष्में राजा केला चित्रांगद; तो अतीव अभिमानी. ।
काय कथा मनुजांची? असुरांसि[24], दिवौकसांसिहि[25] न मानी. ॥ ३
त्यातें गंधर्वाधिप चित्रांगद कपटपाटवें[26] मारी ।
तीरीं सरस्वतीच्या, वर्षत्रय युद्ध करुनियां भारी. ॥ ४
शांतनवें[27] मातृमतें विधिनें देवोनि पितृपद भ्राल्या ।
बाळा विचित्रवीर्या, दिधली नयशक्तिही[28] अदभ्रा[29] त्या. ॥ ५

---

१. तुझ्या पुत्राचें. २. या लोभरूप ग्रीष्मांत. ३. प्रीति व न्याय हीच कोणी नदी. ४. शंका-युक्त. ५. रणयज्ञांत म्ह० रणभूमीवर. ६. शरीर. ७. धुळींत. ८. कन्या. ९. हे साधो. १०. सिद्ध होऊ. ११. भयंकर. १२. विषयवासनारूप नदीचा नाश करणारें तेज ज्याचें असा. १३. वागान चित्त. १४. उत्सवांत. १५. मोठेपणा. १६. मर्जीस येईल तेव्हां मरण्याची शक्ति आहे ज्यास असा. १७. आशीर्वाद. १८. खरी. १९. चंद्रमा. २०. शांतनुपुत्र. २१. पुत्रद्वय. २२. गृहातें. (स्वर्गी जातेवेळेस, असा भाव.) २३. काळाच्या हातीं देहातें दिलें. २४. राक्षसांस. २५. स्वर्गलोक स्थान ज्यांचें असे जे देव त्यांस. २६. कुशलतेनें. २७. भीष्में, २८. राजनीतिज्ञान. २९. उत्तगाग.

होतां विवाहदीक्षायोग्य भ्राता नदीज[1] तो कानीं ।
काशिपसुतास्वयंवर[2] परिसे, कथितां स्वदूत लोकांनीं. ॥ ६
वाराणसीस जाउनि, **का**शिपतिसुता तिघीहि **भी**ष्म हरी. ।
कन्यार्थि[3], युयुत्सु[4], समरनिपुण[5], नृपतिकुंजरांत[6] होय हरी[7]. ॥ ७
बहु भूप भग्न केले, परि मागें **शा**ल्व लागला एक; ।
जाणों महोरगावरि[8] गेला धांवोनि मातला[9] भेक[10]. ॥ ८
तो विरथ[11] मात्र केला, आंवरिला घातकाम[12] हात रणीं; ।
तेजचि खद्योताचें[13] हरिल, करिल घात कां महा तरणी[14]? ॥ ९
भगिनीसुतासुनाशा त्या नेल्या निजगृहासि **शां**तनवें[15]. ।
त्याचें जन्मापासुनि सदय विमळ चित्त; न प्रशांत नवें. ॥ १०
लग्नोपक्रमसमयीं[16] ज्येष्ठा **अं**बा म्हणे, 'मला न वरा; ।
नवराजीवाक्षहि[17] हा नलगे; मज **शा**ल्व मानला नवरा. ॥ ११
माझा, मज्जनकाचा, **शा**ल्वाचाही विचार हा निर्धार[18]. ।
क्षय मन्मनोरथाचा करितां, हें कर्म धर्महानिकर.' ॥ १२
पाठविली माघारी **अं**बा; कथिलें तसेंचि साधूंनीं[19]; ।
बंधूस **अं**बिकेसह दिधली **अं**बालिकाहि साधूनी. ॥ १३
नृपं[20] **का**मात्मा[21] झाला; लावण्य, प्रेम अतुल दोघींचें; ।
वाहे शृंगाररसीं तन्मानस, जेंवि पुष्प ओघींचें. ॥ १४
स्त्रीविषय सातवर्षें रात्रदिवस भोगितां, न तो धाला[22]. ।
झाला वश **का**माच्या अहिता; न हिता स्वकीय बोधाला. ॥ १५
देहज[23] यक्ष्मा[24] त्याला खाय, जसा आश्रयाश[25] आहुतिला. ।
जी राजकांति होती, लेशहि नुरवीच रोगराहु तिला. ॥ १६
न चुकेचि भावि[26]; चुकतें तरि, मृत्यु न व्हावयासि काम[27] रण ।
करिताचि **भी**ष्म; येतें मग त्या मध्यमवयांत कां मरण? ॥ १७

---

१. भीष्म. २. काशिराजाच्या कन्यांचा विवाह. ३. कन्या इच्छिणारा. ४. युद्ध करूं इच्छिणारा. ५. युद्धकुशळ. ६. राजरूप हत्तींत. ७. सिंह. ८. मोठ्या सर्पावर. ९. माजलेला. १०. बेडूक. ११. रथरहित. १२. ठार मारण्याची इच्छा ज्याला असा. १३. काजव्याचें. १४. सूर्य. १५. भीष्में. १६. आरंभीं. १७. नूतन कमलपत्रासारिखे नेत्र ज्याचे असाहि. १८. निश्चय. १९. संतांनीं. २०. राजा विचित्रवीर्य. २१. मदनाधीन. २२. तृप्त झाला. २३. देहांत उत्पन्न झालेला. २४. क्षयरोग. २५. अग्नि. २६. पुढें होणारें. २७. यथेष्ट.

सत्यवती साश्रु म्हणे, 'गेला टाकुनि सकाय[1] गेहा[2] हा; ।
लोकांत मंदभाग्या मीच; करूं यत्न काय? गे! हा! हा!' ॥ १८
चिंताशोकव्याकुळ भीष्महि मुकला क्षण स्वभावाला; ।
करवूनि पारलौकिक, करि सद्गति समुचित स्वभावाला[3]. ॥ १९

अध्याय पंधरावा.

दीना होउनि देवी[4] सत्यवती पुत्रशोकतापानें, ।
भीष्मासि म्हणे, 'साधो! रक्षावें कुळ तुवां अपापानें. ॥ १
धर्में त्वन्माता मी धर्मज्ञा! धर्मसेतुरक्षा[5] या ।
कथितें तें मान्य करीं, स्वीकारीं स्त्री स्वधर्म रक्षाया. ॥ २
मी गुरु[6], मदुक्तिनें या स्त्रीस्वीकारीं नसे तुला पाप. ।
आपद्धर्म[7] असे हा बा! पद गुरुचें वरीं, हरीं ताप. ॥ ३
स्वजना हो तृप्ति तुझ्या ठायीं, जैशी शिलीमुखां[9] बकुळीं. ।
कुरुकुळगृह न खचावें; याला आधार तूंचि खांब कुळीं.' ॥ ४
भीष्म म्हणे, 'माते! त्वां धर्मचि कथिला, परि प्रतिज्ञा ते ।
अत्याज्य[10]. भीति सत्यभ्रंशासि, न बहु अरिप्रति[11] ज्ञाते. ॥ ५
म्यां ब्रह्मचर्यसुव्रतनियम[12] स्वमुखें त्वदर्थ जो केला, ।
देह त्याज्य, परि न तो त्याज्य; न सेवील सुज्ञ ओकेलीं[13]. ॥ ६
त्यजितील पंचभूतें[14] स्वगुणांसि[15], रवी छवीस[16] सोडील, ।
शीतत्वातें चंद्रहि, शक्रहि करविक्रमासि तोडील. ॥ ७
उष्णत्व त्यजिल दहन[17], मर्यादेतेंहि सिंधु[18] सोडील, ।
धर्मपर धर्मराजहि सद्धर्मप्रीतिलाहि तोडील; ॥ ८
परि हा शांतनव[19], तुझा सुत, केवळ कृपण मान, सत्य जितां[20] ।
मेल्याहि न टाकील, प्राणासि न भीतमानस त्यजितां.' ॥ ९

---

१. शरीरासह. २. गृहा. ३. आपल्या बंधूस. ४. राणी. ५. धर्ममर्यादेचें रक्षण. ६. वडील. ७. संकटसमयीं आचरावयाचा धर्म. ८. स्त्रीस्वीकाररूप. ९. भ्रमरांस. १०. टाकावयाची नव्हे. ११. शत्रूप्रत. १२. ब्रह्मचर्यव्रतरूप उत्तम नियम. १३. वांतीला. १४. पृथिवी, आप, तेज, वायु, आकाश, हीं मूलतत्त्वें. १५. आपल्या गुणांस. (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या.) १६. कांतीस. १७. अग्नि. १८. समुद्र. १९. शांतनूचा पुत्र. २०. जीवंत असतां.

देवी म्हणे, 'खरें हें. सांगाया योग्य होय. मी नातें ।
गंगेचें माझें सम जाणें, तुज सत्य तोय मीनातें.' ॥ १०
भीष्म म्हणे, 'मज न शिवे सत्य भ्रष्टत्व, वंश, यश राहे, ।
ऐसा विचार, शिष्टश्रुतिमान्य, विचारिशील तरि आहे. ॥ ११
पूर्वी पितृवधकुपितें रामें[1] स्वीकारुनि स्वगुरुकेली[2], ।
वधुनि सहस्रभुजार्जुन, असकृत[3] निःक्षत्रिया धरा केली. ॥ १२
क्षत्रियवंश बुडाले; वधिले जे जे प्रसिद्ध योध रणीं; ।
पाठीं[4] शिशुहि नुरविले; राम म्हणे, 'क्षत्रहीन हो धरणी.' ॥ १३
संतानार्थ शरण मग विप्रांसि क्षत्रियस्त्रिया गेल्या. ।
ज्या केवळचि बुडाल्या संतति, त्या प्रकट मागुती केल्या. ॥ १४
गुरुशप्त[5] उतथ्याचा[6] सुत, ममताकुक्षिजात[7], दीर्घतमा[8] ।
होता प्रकाशमैथुनदोषी[9], परि आश्रय प्रतोषशमा[10]. ॥ १५
स्त्रीपुत्रांनीं तो ऋषि, त्या दोषें, जान्हवींत[11] वाहविला. ।
संतानार्थ बलिनृपें प्रार्थुनि तो निजगृहांत राहविला. ॥ १६
यापासूनि सुदेष्णाराज्ञीला पुत्र जाहला अंग, ।
दुसरा कलिंग, पुंड्रहि, सुह्महि, तैसाचि पांचवा वंग. ॥ १७
ऐसा आपद्धर्मव्यवहार असे; म्हणोनियां क्षिप्र ।
कोणी विचित्रवीर्यक्षेत्रीं[12] संतान वाढवू विप्र.' ॥ १८
देवी[13] म्हणे, 'हित वदसि तूं बा! सद्बुद्धिच्या अंगारा! या ।
माझ्याहि हितगुजाचें[14] श्रवण करीं सज्जना! अगा! राया!' ॥ १९
लज्जा वदों न दे, परि चिंतिति ज्याचे पवित्र पाय कवी, ।
श्रीमत्पराशराची पुण्यकथा स्वानुभूत[15] आयकवी. ॥ २०
व्यासजनन[16] कथुनि, म्हणे, 'प्रदक्षिणा पुत्र मज करी नमुनी. ।
जातां, वदे असें कीं, स्मरतां येउनि, सुखी करीन मुनी. ॥ २१
येइल तुझ्या मना, तरि त्याला या संकटांत बाहेन[17]. ।

---

१. परशुरामानें. २. स्वपित्याची क्रीडा. ३. वारंवार. ४. शेवटीं. ५. बृहस्पतीनें शापिलेला. ६. बृहस्पतीचा बंधु त्याचा. ७. उतथ्याच्या ममतानामक स्त्रीच्या कुशीपासून झालेला. ८. उतथ्यपुत्र. ९. उघड्यास्थळीं मैथुन करणारा. १०. संतोष आणि शांति यांला. ११. गंगेंत. १२. स्त्रीचे ठायीं. १३. सत्यवती. १४. गुह्य. १५. आपण अनुभवलेली. १६. व्यासोत्पत्ति. १७. बोलावीन.

संततिचिंताशमन.[1] प्रार्थुन त्या मुनिवरास पाहेन.' ॥ २२
भीष्म वदे, पडतां तें कानीं, 'नमुनि वरदास, विश्वास ।
धाया, स्मर; रक्षिल तो कानीन[2] मुनिवर दास विश्वास.'[3] ॥ २३
स्मरतांचि, दर्शन दिलें मातेला ईश्वरें पराशरजें.[4] ।
वाढति माथां ज्याच्या चरणांचीं शुद्धधी पराश[5] रजें.[6] ॥ २४
येतांचि, धांवला हो, पाहत होताचि वाट पान्हा, तो ।
जाणों म्हणति मिथः[7] स्तन 'दृष्टिक्षीरें न आटपा न्हातो.' ॥ २५
शिंपुनि कमंडलुजळें मग, आधीं दर्शनेंचि, निववीली. ।
शोकवियोगदवार्ता[8] त्या अमृतघनें पळांत जिववीली.[9] ॥ २६
माता पूजुनि सुखवी पुत्रातें, तोहि नमुनि मातेतें. ।
विश्व पदरजीं लोळे, परि तिलमात्रहि न तेज मांते[10] तें. ॥ २७
मातेसि पुसे इच्छावरद **श्रीव्यास**, जेंवि संतान.[11] ।
मागे विचित्रवीर्यक्षेत्रीं **कुरुकुळ**शिवोर्थ[12] संतान. ॥ २८
'ताताकडील **भीष्म**, **व्यासा**! मातेकडील तूं शिष्ट; ।
मृतबंधुचें करावें धर्मार्थ तुम्ही असेल जें इष्ट. ॥ २९
असतां समर्थ तूं सुरतरुगुरुवरचरणरेणु देवरें,[13] हो![14] ।
या त्वत्प्रजावतींनीं[15] न म्हणावें, स्वजननीस दे वर हा.' ॥ ३०
व्यास म्हणे, 'धर्मज्ञे! मातें आज्ञा तुझी शिरोधार्या.[16] ।
सांगेन तें करूं दे व्रत, वर्षभरी त्वदात्मभूभार्या.'[17] ॥ ३१
काली[18] म्हणे, 'अहा! बा! होईल अराजक[19] प्रजालोप. ।
आर्तमनांसि[20] महाश्रय आम्रतरूचें लहानसें रोप. ॥ ३२
कौशल्या[21] गर्भातें पावो आतांचि; बा! विलंब कसा ।
साहों? अधर्म टपतो लोका मीना गिळावया बकसा.' ॥ ३३

---

१. संतति कशी होईल याविषयीं उत्पन्न झालेल्या काळजीचें निवारण. २. कन्यापुत्र. (व्यास.) ३. जगास. ४. व्यासें. ५. परपदाची आशा धरणारे. ६. धूलि. ७. परस्पर. ८. वणव्यानें पीडिलेली. ९. वांचविली. १०. माजे. ११. कल्पतरु. १२. कल्याणाकरितां. १३. दीर. १४. हाय हाय. १५. भावजयींनीं. १६. मस्तकानें धरावयास योग्य. (शिरसा वंद्य.) १७. तुझ्या पुत्राची स्त्री. १८. सत्यवती. १९. राजरहित. २०. श्रमलेल्याच्या मनास. २१. स्त्रीनामविशेष. (अंबिका.)

व्यास म्हणे, 'माते! तरि कौशल्या मद्दिरूपता[1] साहो. ।
माझी करू प्रतीक्षा, ऋतुकाळीं सुव्रता, सुवासा[2] हो.' ॥ ३४
ऐसें सांगुनियां, श्रीसत्यवतीच्या पदांबुजीं नमुनी, ।
तो योगिवेष ईश्वर झाला अंतर्हित[3] क्षणांत मुनी. ॥ ३५
सांगे सुनेसि देवी, 'कुरुकुळ तारावयास भाव्याशीं[4] ।
बोल, रम सुतार्थ, जशी रमत्ये, बोधार्थ, सत्सभा व्यासीं. ॥ ३६
झालीच मनें प्रांजळ ती पुत्रास प्रसू[5]; न शयनातें ।
मोडिति, करूनि अंजळि, नेता सून प्रसूनशयनातें[6]. ॥ ३७
मासूनें शुचिशयनीं सून निजविली, धरूनि हनु[7]; कंपा ।
पावे चित्तीं भीष्मा[8]; ये मुनिहि करावयासि अनुकंपा[9]. ॥ ३८
मुनिवररविच्या उदयीं ते कैरविणीचें[10] अंबिका झाली. ।
अत्युग्र रूप पाहुनि, झांकी तत्काळ लोचनें, भ्याली. ॥ ३९
त्या साध्वीवरि करुणा केल्यावरि, सूनुला[11] पुसे माता. ।
'होईल पुत्र कैसा? सांग मला, सर्व जाणसी ताता!' ॥ ४०
व्यास म्हणे, 'होइल सुत नागायुतबळ[12], सभाग्य, विदितनय[13], ।
राजर्षि, साधुसत्कृत; त्यासहि होतील शत बळी तनय. ॥ ४१
परि मातेच्या दोषें होइल जात्यंध[14], येवढेंचि उणें. ।
चंद्रीं अंक[15] तसें हें; परिपूर्ण परंतु सर्वसाधुगुणें.' ॥ ४२
माय म्हणे. 'माझें मन, जाणुनि होणार नृप अचक्षु[16], भितें; ।
योग्य दुजा सुत द्यावा; लंघावें त्वां न हें वच क्षुभितें[17].' ॥ ४३
मान्य करुनि मुनि गेला. अंधचि सुत अंबिकेसि मग झाला. ।
धृतराष्ट्र असें भीष्में संस्कारुनि नाम ठेविलें त्याला. ॥ ४४
अंबालिकेसिही मग विनवी, गेला म्हणूनि सुतपा; 'हूं. ।
त्वांहि न भ्यावें; सिंहासनगत बाई! तुझाचि सुत पाहूं.' ॥ ४५
तीही भ्याली मुनिला; झाली [18]पांडु क्षणांत; कातरता[19] ।

---

१. माझें अतिशय तेज. २. उत्तम वस्त्र धारण करणारी. ३. गुप्त. ४. दिराशीं. ५. प्रसवणारी. (माता.) ६. पुष्पशय्येप्रत. ७. हनवटी. ८. भयंकरा. ९. दया. १०. चंद्रविकासिनी कमलिनीच. ११. पुत्राला. १२. दहाहजार हत्तींचें बळ ज्यास असा. १३. माहीत आहे नीति ज्याला. १४. जन्मांध. १५. लांच्छन. १६. नेत्ररहित. (अंध.) १७. क्रोधिष्ठानें. १८. पांढरी. १९. भयभीतपणा.

स्त्रीगुणचि; असो दोष; न पुरुषहि त्या भीतिदायका तरता. ॥ ४६
कृष्ण[1] म्हणे, 'म्यां दिधला संप्रति[2] सुंदरि! कुमार तुजला जो, ।
तद्वर्ण पांडु, नामहि; शुचिकर्पूरप्रसूहि[3] तुज लाजो.' ॥ ४७
तेंही, पुसतां, कथिलें पांडुत्व; म्हणूनि धरुनियां हनुतें, ।
माय म्हणे, 'बा! तिसरा द्यावा त्वां कल्पतरुसमूहनुतें[4].' ॥ ४८
लाजे, हांसे, पाहे पायांचिकडे प्रसन्नवदन मुनी. ।
'अंब[5]! श्रुतिराज्ञा[6] ते.' ऐसें बोलोनि, जाय पद नमुनी. ॥ ४९
झाला पांडु. तयावरि पहिलीला वासवी[7] तदेव[8] पुन्हा ।
सांगे. 'आजि मुनिकडे जा, येइल, मुदित होउंदे वपु, न्हा.' ॥ ५०
ते सांगे दासीला, आपण चित्तांत फार व्रीडेस[9] ती. ।
व्याळीशीच[10] गमे मुनितनु; रक्षी सासुचीहि भीड सती. ॥ ५१
त्या प्रभुला ठकवि असें; कोणीहि न कर्म ठकवि नटलीला[11]. ।
तारावया भजे हो! भुलला न सुकर्मठ कवि नटलेलीला[12]. ॥ ५२
न्हाया प्रसन्न जोडुनि सजलोत्थितरोम[13] हात, 'पार मला ।
दावा' म्हणे 'भवाचा[14].' तरिच तिशीं तो महातपा रमला. ॥ ५३
गुरुवरसेवालाभें झाली लोकत्रयीं उजळ दासी. ।
पंक झडोनि गळाला, अनुसरतां त्या सुपुण्यजळदासी[15]. ॥ ५४
सेवाधर्में पूजुनि, भवसागरसेतु सुखविला साचा. ।
संपादिला प्रसाद प्रभुचा, जो हेतु[16] सुखविलासाचा. ॥ ५५
मुनिराज म्हणे तीतें, 'भावें झालीस आनत[17] पदासी. ।
तरलीस; यावरि न तूं दासी; ऐसें न आन[18] तप दासी[19]! ॥ ५६
होइल सुत धर्मात्मा, सर्वसुमतिपति, महायशा; शीलें[20] ।
गातिल कवि; महिला, कुरुपति करुनि तया सहाय, शोशील[21]. ॥ ५७
केलें मद्वंचन हें; प्रसवेल सुमेरुतुल्य सुत रोई[22];' ।
ऐसें मातेसि कथुनि, गेला होउनि मुनींद्र उतराई. ॥ ५८

---

१. व्यास. २. आतां. ३. शुद्धकर्पूराला प्रसविणारीही. ४. कल्पवृक्षसमूहानें स्तविला जो. ५. हे आई. ६. तुझी आज्ञा मला वेदासारखी मान्य आहे. ७. सत्यवती. ८. तेंच. ९. लज्जायुक्त. १०. सर्पिणीसारखी. ११. नटासारखी लीला ज्याची. १२. सजलेलीला. १३. घर्मरोमांचयुक्त. १४. संसाराचा. १५. उत्तम पुण्यरूप मेघास. १६. कारण. १७. नम्र. १८. अन्य, दुसरें. १९. हे दासी. २०. स्वभाव. २१. रक्षील. २२. मोहरी.

मांडव्या[1]च्या शापें झाला दासीकुमार **यमधर्म**. ।
विदुर असें नाम तया ठेवुनि; **गांगेय**[2] दे सुबहु शर्म[3]. ॥ ५९
शापाचें मूळ असें; **मांडव्य** महर्षि तरुतळीं उग्र[4] ।
तप करि; निजाश्रमपदद्वारींच उभा; दिसे स्वयें उग्र[5]. ॥ ६०
कृश, तेजस्वी, मौनव्रत, ऊर्ध्वभुज, प्रशांत, पात्यातें ।
पातें लावुनि होता; म्हणति मुनी सुर महातपा त्यातें[6]. ॥ ६१
कोणा एका नरपतिनगरीं चोरी करूनि, चोरांनीं ।
पळतां आश्रय केला आश्रम, वांचावयासि, तो रानीं. ॥ ६२
मागोनि लाग लावित नृपबळ येउनि, पुसे तया तपत्या[7]. ।
सांगेल काय मौनी? ध्यानस्था एक ठावुकें तप त्या. ॥ ६३
त्या आश्रमींच तस्कर सांपडतां, मुनिहि मानिला चोर. ।
बांधुनि नेतांहि न तो डगमगला. शांति साधुची थोर. ॥ ६४
राजाज्ञेनें शूळीं मुनिहि चढविला, परंतु न क्षोभे. ।
तेथेंहि तपस्तेजें, एकलतालाग्रगार्कसा[8], शोभे. ॥ ६५
होता तसाचि शूळीं; तिळहि न धैर्य प्रताप डळमळला. ।
न ज्ञानदृक्शतांशहि[9], येउनि देहात्मतापडळ[10], मळला. ॥ ६६
तापसजनास त्याचा ध्यानीं वृत्तांत तो सकळ कळला; ।
मग खगरूपें[11] रात्रौ येउनि, पाहुनि तयास, कळकळला. ॥ ६७
मुनि म्हणति, 'बा! अहा! हें काय? प्रख्यात तूं ऋषी. वेळसा[12] ।
हा कां? क्षेत्रीं सुकृतचि पिकविशि, कीं शालितें कृषीवळसा[13].' ॥ ६८
मांडव्य म्हणे, 'मुनिहो! सुविचारें यासि दंडकर हा तो ।
मुख्य न; कृत[14] भोगावें; शांतीसी तरिच दंडक[15] रहातो.' ॥ ६९
तें वध्यस्थळरक्षकवदनें[16] परिसोनि, भूप कर जोडी; ।
अभयवरद मुनि, उतरुनि मग मूळीं, शूळ न निघतां तोडी. ॥ ७०
तत्प्राणांचा न करी, जरि अंतर्गतहि, ती अणी[17] कवळ[18]. ।
होता स्वस्थ. तपाचें सांगावें काय हो अणीक[19] बळ? ॥ ७१

१. ऋषिविशेष. २. गंगापुत्र भीष्म. ३. कल्याण. ४. घोर. ५. शिव. ६. मांडव्यातें. ७. तपकर्त्यास. ८. एका ताडवृक्षाच्या अग्रभागीं सूर्य पहावा तसा. ९. ज्ञानदृष्टीचा शतांशही. १०. मोहाचा पडदा. ११. पक्ष्याच्या रूपानें. १२. फेरा. १३. शेतकऱ्यासारिखा. १४. केलेलें कर्म. १५. रीति. १६. वध करावयाच्या स्थळसंबंधी जे रक्षणकर्ते त्यांच्या तोंडानें. १७. शूलाग्र. १८. ग्रास. १९. दुसरें.

त्याचें प्रख्यात अणीमांडव्य असेंचि जाहलें नाम. ।
होय परशुराम जसा, परशूच्या धारणामुळें, राम. ॥ ७२
[1]संयमनीप्रति जाउनि, [2]धर्मासि म्हणे मुनींद्र, 'म्यां पाप ।
काय कधीं केलें? रे! आलें फळ ज्यास, हा असा ताप. ॥ ७३
तत्वज्ञ आपणाला म्हणविसि; [3]वद तत्व शीघ्र [4]पितृपा! हूं. ।
मग मत्तपोबळ पहा; बोल; तुझें आजि सुज्ञपण पाहूं.' ॥ ७४
धर्म म्हणे, 'भगवंता! मन ठेवुनि कुतुकसाधनीं तुच्छीं, ।
बा! घातली सुई कां? बाळपणीं त्वां [5]पतंगिकापुच्छीं.' ॥ ७५
'अपराध अल्प असतां, त्वां केला दंड हा असा; धूसी ।
बहुधा असेंचि जीवा; शिक्षावें म्यांचि तुज असाधूसी. ॥ ७६
हो मानुषदासीसुत, हाचि उचित दंड; पूस नय मातें; ।
जें [6]अज्ञपणीं घडलें [7]अघ, आणावें मनांत न यमा! तें.' ॥ ७७
ऐसा मुनिनें दिधला दासीपुत्रत्वहेतु हा शाप; ।
तो धर्म विदुररूपें संरक्षी कुरुकुळीं, जसा बाप. ॥ ७८
धृतराष्ट्र, पांडु, विदुर भ्राते, [8]सूर्येंदुवन्हि जेंवि, हित ।
झाले प्रजांसि; करिती सर्व सुखें कर्म, ज्यास जें [9]विहित. ॥ ७९
द्वापर कृतयुग झालें; आलें यांतचि समृद्धिचें कथन; ।
ज्ञातज्ञेय तिघेही कर्त्यांचें यशचि शत्रुचें मथन. ॥ ८०
धृतराष्ट्र अंध, शूद्रीसुत विदुर, म्हणोनि राहिले दोघे. ।
भीष्में केला राजा पांडु; तदाज्ञाबळेंचि पद तो घे. ॥ ८१
एका समयीं हर्षें भीष्म म्हणे [10]स्वांशिवाद्रिच्या [11]भिदुरा, ।
'साधो! [12]धर्मरहस्यज्ञाननिधे! [13]वत्सरा! सख्या! विदुरा! ॥ ८२
हें कुळ सत्यवतीनें, व्यासानें, मींहि रक्षिलें कुरुचें; ।
कुळयश वाढवुनि, तुम्हीं सुखवा मन या कुळाचिया गुरुचें. ॥ ८३
म्यां ऐकिलें असें कीं, यदुकुळजा कुंतिभोजनृपकन्या, ।
सुबळसुता, मद्रेश्वरतनया, या सुकुळजा वधू धन्या, ॥ ८४

---

१. यमनगरीप्रत. २. यमासि. ३. बोल. ४. हे पितृपते यमा. ५. एका प्रकारची माशी तिच्या पुच्छांत. ६. अजाणतेपणानें. ७. पाप. ८. सूर्य, इंदु व वन्हि. ९. योग्य. १०. आपल्या अकल्याणपर्वताच्या. ११. वज्रा. १२. गुह्य. १३. वत्सा.

संतानार्थ कुळाच्या, भार्या तव अग्रजांसि त्या उचिता; ।
अस्मत्संबंधी ते नृप; त्यांची विदित मज असे शुचिता[1]. ॥ ८५
आल्या मनासि माझ्या; तूं सांग स्वमत; वृद्धिला गोत्र ।
म्यां त्वांहि पाववावें; योग्यचि तूं, हें नव्हे वृथा स्तोत्रें[2].' ॥ ८६
विदुर म्हणे, 'शिशु आम्हीं; तूं माता, तात, गुरु; करीं हित तें. ।
स्वकुळकथा काय? मुदित जग केलें बा तुझ्या यशें वितते[3].' ॥ ८७
विप्रमुखें **भीष्मा**ला कळलें, आराधुन **स्मर**[4]हरातें, ।
गांधारी सुबळसुता झालीसे पात्र शतसुतवरातें. ॥ ८८
धृतराष्ट्रार्थ वराया **गांधारी**तें, **नदी**सुतें[5] जवन[6] ।
त्या **गांधार**पतिकडे पाठविला दूतवर, जसा पवन. ॥ ८९
वर अंध म्हणुनि, कांहीं पहिली पडली विचारणा; परि तो ।
आला मना; कलंक न चंद्राच्या गुणगणा वृथा करितो. ॥ ९०
गांधारी स्ववराच्या जाणुनि नेत्रांत अंधकारा, ती ।
बांधी निजनयनांतें; भावी अंधाहि **अंध**कारा[7]ती. ॥ ९१
नागपुरीं[8] भगिनीचें **शकुनी** पूजूनि सूरि[9] दान करी. ।
नगरपथातें पंकिल[10] करिती तद्दत्त, भूरिदान[11], करी[12]. ॥ ९२
गांधारीनें स्वगुणें गुरुजन[13], पति, पोष्य[14]वर्ग तोषविले. ।
नाहींच घेतलें परपुरुषाचें नाम, परि न रोषविले. ॥ ९३

अध्याय सोळावा.

केला होता **शूरें**[15] प्रथमापत्यप्रदानपण सत्य ।
इष्ट कराया स्वजनकभगिनीसुत **कुंतिभोजें**[16] अनपत्य[17]. ॥ १
वसुदेवाच्या जनकें पहिली कन्या दिली सख्यास **पृथा**[18]. ।
कीं साधुनें प्रतिज्ञा जाऊं देऊं नये कदापि वृथा. ॥ २
ती **कुंती** पितृसदनीं कांसारीं[19] पद्मिणी तशी वाढे. ।
तों **दुर्वासा** तेथें ये, ज्याचे जाच कडु, जसे काढे. ॥ ३

---

१. शुद्धपणा. २. स्तुति. ३. विस्तृतें. ४. शिवातें. ५. गंगापुत्र भीष्मानें. ६. वेगवान्. ७. शिवसा. ८. हस्तिनापुरीं. ९. चतुर. १०. चिखलानें युक्त. ११. पुष्कळ आहे मद ज्यांस असे. १२. गज. १३. वडील माणसें. १४. आश्रित. (सेवक.) १५. वसुदेवाच्या बापानें. १६. राजविशेष. १७. संततिरहित. १८. कुंती. १९. सरोवरांत.

त्या मुनितें ती, सेवा करुनि, करी सुप्रसन्न देवि,[1] 'द्या ।
वर मज' असें न मागे, परि तो तीस स्वयेंचि दे विद्या.[2] ॥ ४
मुनि कुंतीस म्हणे, 'या मंत्रें ज्या ज्या सुरा बाहाशील,[3] ।
त्या त्या सुरप्रसादें वत्से! तत्पुत्रसुख पहाशील.' ॥ ५
सर्वभविष्यज्ञ मुनिप्रवर, अशी करुनियां दया, गेला. ।
मग कौतुकें पृथेनें सूर्यागमनार्थ मंत्रजप केला. ॥ ६
एकांतीं गंगेच्या तीरीं जपतांचि दिव्यमंत्रास, ।
दिसला दिनकर, येतां होय चमत्कार, हर्ष, संत्रास.[4] ॥ ७
येउनि निकट[5] रवि म्हणे, 'सुंदरि! पाचारिलेंसि कां? मातें. ।
काय करूं इष्ट तुझें? तूं कोणा इच्छितीस कामातें[6]?' ॥ ८
कुंती म्हणे, 'प्रभो! मज सेवापरितुष्ट विप्रवर[7] विद्या ।
देता झाला; कुतुकें मी वदलें, जरि असेल बरवि, द्या. ॥ ९
विद्याबळ जाणाया, पाचारुनि पाहिलें तुम्हां देवा! ।
चुकलें; क्षमा करा. हें विद्येचें कृत्य; किती इचा केवा[8]?' ॥ १०
भानु म्हणे, 'वरदाता दुर्वासा गुरु तुझा मला कळला. ।
फळला कल्पद्रुम तो; तद्वर न कधींहि अपयशें मळला. ॥ ११
भीरु[9]! भय त्यजुनि, मिठी घालीं माझ्या गळ्यांत बाहूंनीं. ।
दर्शन अमोघ[10] माझें; तुज उचित न हा नकार, बोहूनी.[11] ॥ १२
बंधुजनापासुनि तूं मुग्धे! चित्तीं भिऊं नको; मळता ।
जन करि बहु कर हो तो, कीं[12] जाणसि आमुची न कोमळता?' ॥ १३
सत्य, प्रिय, हित बोलुनि, योजुनि [13]अंकीं निवास रमणीतें ।
घेउनि, देउनि अधरामृत, भोगी रत्न वासरमणी तें. ॥ १४
झाला सहजकवचमणिकुंडलधर तत्क्षणीं रुचिर[14] बाळ. ।
तीहि कुमारी झाली; आली जाणों प्रसूतिची आळ. ॥ १५
रवि गेल्यावर, तो सुत गंगेच्या घातला तिनें पदरीं; ।
केलें कठिण मन; असो पुत्रफळ; त्यागमति नव्हे बदरीं[15]. ॥ १६

---

१. कुंती. २. मंत्रविद्या. ३. बोलावशील. ४. भीति. ५. जवळ. ६. मनोरथातें. ७. ब्राह्मणश्रेष्ठ. (दुर्वासा.) ८. गणना. ९. हे भित्रे. १०. सफल. ११. बोलूनि. १२. 'ठावी तुज आमुची' असाही पाठ आहे. १३. मांडीवर. १४. सुंदर. १५. बोर.

तें पुत्ररत्न दिधलें **गंगेनें** अधिरथासि; तद्भार्या[1] ।
राधा त्यातें पोषी; यास्तव **राधेय** म्हणति त्या आर्या[2]. ॥ १७
त्यांहीं **वसुषेण** असें पुत्राचें नाम ठेविलें विधिनें. ।
झाला शूर, उदार; स्तविलें ज्याच्या यशा सुधानिधिनें[3]. ॥ १८
कुंतीनें पांडु नृपति नृपवृंदांत[4] स्वयंवरीं वरिला. ।
जैशी वरिती झाली देवसमूहीं पुलोमजा[5] हरिला[6]. ॥ १९
दुसरा विवाह व्हावा पुत्राचा, हें मनांत आणूनी, ।
मद्रपतिकडे गेला आपण **गांगेय** योग्य जाणूनी. ॥ २०
यच्चरितें सुजनाच्या हृदयीं अमृतेंचि, शत्रुच्या शल्यें; ।
सद्विज[7], सामात्य[8], सबळ[9], तो भरतश्रेष्ठ[10] पूजिला शल्यें[11]. ॥ २१
भीष्म म्हणे, ‘राया ! वच[12] **सप्तर्षींचें** जसें करि हिमाद्री[13]; ।
करिं तूंहि या ऋषीचें; आहे जरि एक, दे तरिहि **माद्री**.’ ॥ २२
शल्य म्हणे, ‘कुरुनाथा[14] ! अढळ कुळाचार, जेंवि हेमाद्री[15]. ।
ठावा असेल तुजला, द्यावी म्यां शुल्कदासि[16] हे **माद्री**.’ ॥ २३
भीष्म म्हणे, ‘कुलधर्मत्याग नव्हे उचित, मान्य मज आहे; ।
सत्कुलजाचेंचि सदा स्वकुलाचाराकडेचि मन वाहे.’ ॥ २४
ऐसें मान्य करुनि, दे कन्याशुल्कार्थ[17] भूषणें, वस्त्रें, ।
रत्नें, कनकें, वाजी, हस्ती, रथ, आणि चांगलीं शस्त्रें. ॥ २५
शल्य मग नदीजाचा[18] अनुजेनें अंक[19] शोभवुनि उजवा, ।
प्रार्थुनि म्हणे, ‘पुरा न्या; प्रेमरसें लोभवूनि, इस उंजवा[20].’ ॥ २६
त्या लावण्यवतीला आला घेऊनि **भीष्म**, मग लग्न ।
झालें, **पांडुसुहृन्मन**[21] हर्षीं, दुःखीं अमित्रमन[22], मग्न. ॥ २७
कुंतीशीं माद्रीशीं करुनि सुखविहार एकमासभरी, ।
भीष्मादिगुरुमतें तो **पांडु** प्रस्थान[23] भूजयार्थ[24] करी. ॥ २८
पवनातें, तेजातें ग्रासुनि निःशेष न करि अहि[25], तरणी[26]; ।

---

१. त्या अधिरथाची स्त्री. २. श्रेष्ठा. ३. चंद्रानें. ४. राजसमूहांत. ५. इंद्राणी. ६. इंद्राला. ७. ब्राह्मणासह. ८. मंत्रीसह. ९. सहसैन्य. १०. भीष्म. ११. शल्यराजानें. १२. वचन. १३. हिमाचल. १४. हे भीष्मा. १५. मेरु. १६. मोल देणारास. १७. कन्येच्या मोलाकरितां. १८. भीष्माचा. १९. मांडी. २०. हिचें लग्न करा. २१. पांडुराजाच्या मित्रांचें मन. २२. शत्रूंचें अंतःकरण. २३. प्रयाण. २४. पृथ्वीजयार्थ. २५. सर्प. २६. सूर्य.

न तसा पांडु महाबळ; याच्या उरला न एक अहित रणीं. ॥ २९
अरिनाग पांडुहरिच्या केले शतचूर्ण सायकरदांनीं. ।
त्यजुनि दुरभिमान, स्वप्रियहित वरिलें न काय करदांनीं ? ॥ ३०
अहित अहि, तयां झाला विवर, विवर सांपडों दिलें न रणीं. ।
महित महितळीं झाले, नमुनि न मुनिसुत, हठी द्विषन्मरणीं. ॥ ३१
करद परें दमुनि केले, धनदमन दरिद्र आपणा मानी. ।
ऐशीं वित्तें घेउनि अक्षय, आला पुरासि तो मानी. ॥ ३२
बहु मानिला नदीजें पांडु, जसा शंकरें स्वसेनानी. ।
तें वेष्टुनि केलें गजपुर लंकाद्वीपतुल्य सेनांनीं. ॥ ३३
शोभे स्थळस्थळीं तें राशीकृतरत्नकनक नगर मला ।
वाटे, गमलें लोकां कीं, येथें रत्नकनकनग रमला. ॥ ३४
भीष्मादिकांसि तें धन दिधलें वांटूनि; जेंवि धनदानें, ।
केलीं आश्रितयाचकहृदयें संतुष्ट भूरिधनदानें. ॥ ३५
एकच्छत्रा, कंटकरहिता, स्ववशा, करोनियां अवनी, ।
भवनीं रमोनि, पांडु क्रीडे तुहिनाद्रिदक्षपार्श्ववनीं. ॥ ३६
घेउनि गेला संगें कुंतीतें आणि त्याहि माद्रीतें. ।
गंगागौरीगुरुसा आश्रय करि पांडु त्या हिमाद्रीतें. ॥ ३७
धाडी धृतराष्ट्र सदा साहित्य वनांत आदरें पुरतें. ।
अनुकूलदारसंगें कां ? हो ! न गमेल पांडुला पुर तें[23] ? ॥ ३८
पांडु वनीं असतां सुरसिंधुज, विदुरार्थ आणवुनि बरवी ।
देवकमहीपतीची पारसवी कन्यका, तिला वरवी. ॥ ३९

अध्याय सतरावा.

एके समयीं क्षुधित, श्रांत, श्रीव्यास मंदिरा आला. ।
गांधारीनें सादर तुष्टविला, सुप्रसन्न तो झाला. ॥ १

---

१. शत्रु. २. शत्रुरूपी गज. ३. पांडुरूपी सिंहाच्या. ४. बाणरूप दांतांनीं. ५. करभार देणाऱ्यांनीं. ६. गरुड. ७. छिद्र. ८. पूज्य. ९. शत्रूंच्या मरणीं. १०. करभार देणारे. ११. शत्रु. १२. कुबेराचें मन. १३. अभिमानी. १४. भीष्में. १५. आपला सेनापति म्ह० कार्तिकेय. १६. पर्वत. १७. पुष्कळ द्रव्यदानानें. १८. निष्कंटक. (शत्रुरहित.) १९. पृथ्वी. २०. गृहीं. २१. हिमाद्रीच्या दक्षिणभागच्या वनांत. २२. शिवसा. २३. वन. २४. गंगेचा पुत्र भीष्म. २५. नामविशेष.

66051

'वर माग' असें म्हणतां, मुनिच्या पायांसि ती सती लागे. ।
शतपुत्र वर हरा जो मागितला, तोच त्यासही मागे. ॥ २
मग गर्भवती झाली, होती तैशीच दोन अब्द सती; ।
कुंतीस पुत्र झाला, ऐसें परिसोनि, होय खिन्नमती. ॥ ३
दुःखें निजोदराला ती गांधारी स्वमुष्टिनें ताडी. ।
गर्भासि बळात्कारें, भवितव्यबळेंहि, संकटीं पाडी. ॥ ४
लोहाची कांडीशी पडिली पेशीच एक मांसाची; ।
चित्तीं म्हणे सुबळजा, 'हे त्यागावीच दुःखदा साची.' ॥ ५
तों तें जाणुनि, येउनि, मुनि साहसकारिणीस त्या वारी. ।
वरदा श्वशुरासि म्हणे, मग ती आणूनि लोचनीं वारी. ॥ ६
'दिधलें मज शतसुतवरदान तुम्हीं वरदराज ! मामाजी ! ।
झाली पेशी; वर्षद्वय हे तनु पावली श्रमा माझी. ॥ ७
झाला सुत कुंतीला परिसुनि, मज दुःख वाटलें मोठें. ।
मग म्यां उदर बडविलें; स्वामीपाशीं वदों नये खोटें.' ॥ ८
व्यास म्हणे गे वत्से ! लोकीं सर्वज्ञतेसि मी मात्र ।
जाणें सर्वहि; तिळहि न जाणें लटिकें वदावया मात्र. ॥ ९
शतघृतकुंभांत रवे पेशीचे घाल कन्यके ! शीतें ।
उदकें शिंपावी ते; सद्यः शतधा करील पेशी तें.' ॥ १०
केलें तसेंचि; तेव्हां कन्येचा काम मानसीं आला; ।
श्रीमन्मुनिप्रसादें, भाग अधिक एक त्या शतीं झाला. ॥ ११
घृतकुंभरक्षणाचा विधि, अविधिहि, कथुनि, कृष्णमुनि गेला. ।
झाला प्रथम सुयोधन, तेणें खरशब्द उपजतां केला. ॥ १२
गांधारीसुतकृत रव परिसुनि, गोमायु, गृध्र, खर, काक, ।
हाक स्वयेंहि देती; धृतराष्ट्राच्या मनीं शिरे धाक. ॥ १३
भूदेव, भीष्म, विदुर स्वगृहीं आणूनि, आंबिकेय वदे, ।
'व्यासेश्वरप्रसादें झाला सुत, परि मना न उत्सव दे. ॥ १४
राजसुत युधिष्ठिर तो राजाचि, स्पष्ट तो कुळज्येष्ठ; ।

---

१. वर्षें. २. आपलें उदर. ३. आंडें, पिशवी. ४. सुबलसंज्ञक राजापासून झालेली. (गांधारी.) ५. निवारी. ६. उदक. ७. तुकडे. ८. व्यासमुनि. ९. शब्द. १०. कोल्हा. ११. गाढव. १२. अंबिकापुत्र, धृतराष्ट्र.

हाहि नृपति त्यामार्गें[1]; भवितव्य वदा बरें तुम्ही श्रेष्ठ.' ॥ १५
म्हणति भविष्यज्ञ द्विज, 'बुडवाया जाण हा निदान[2] कुळा; ।
त्यागावाचि; न भुजगें पोसावें प्राणहानिदा नकुळा[3].' ॥ १६
विदुर म्हणे, 'त्यागावी अहिदष्टा[4] तत्क्षणींच आंगोळी[5]. ।
मारक कळतां, घ्यावी उग्रविषाची बळेंचि कां गोळी? ॥ १७
एकोनशतसुतांशीं[6], एक कुपुत्र त्यजूनि, नांदावें. ।
व्याकुळ व्हाया, फुंकुनि भाजों द्यावें स्वगेह कां दावें[7]? ॥ १८
झाला कुळकीर्तीच्या, आप्तजनाच्या, कुपुत्र हा निधना[8]. ।
त्यजिति यशोधन देहहि, यश रक्षिति, म्हणति, 'होउ हानि धना.'॥ १९
उग्रनिमित्तें[9] सर्वहि भ्याले, एकचि न अंध तो भ्याला; ।
होय मरणहेतूल्कामुखभूतीं[10] सुनिधिबुद्धि[11] लोभ्याला. ॥ २०
पितृसुरतृप्तिप्रद, जगदाल्हादक, तापहर[12], सुवृत्त[13], शुची[14], ।
शशिचें मंडळ, कुळही; तेथ हरिण अंक[15], येथ हा पशुची. ॥ २१
ज्या दिवशीं दुर्योधन झाला, कुंतीस भीम ते दिवशीं; ।
स्वगुणें एकें तप्तें, एकें केलीं सुहृन्मनें हिंवशीं[16]. ॥ २२
धृतराष्ट्राला झाले शत सुत, कन्याहि एक वरदानें. ।
जैसें कथिलें होतें श्रीमद्व्यासें अभीष्टवरदानें. ॥ २३
अंतर्वत्नी[17] असतां, गांधारीनें स्वयेंचि सनयेला[18] ।
दिधला सद्वैश्येच्या निजपतिसेवाधिकार तनयेला. ॥ २४
वैश्या सेवादक्षा, प्रज्ञाचक्षुहि[19] कृतज्ञ, भजलीला ।
दे पुत्रफळ; गमे सुरतरुची, प्रभुचीहि, तुल्य मज लीला. ॥ २५
नाम युयुत्सु तयाचें; एकाधिक शतकुमार यासकट. ।
सर्वांत साधु वैश्यानंदन, होईल तें पुढें प्रकट. ॥ २६

---

१. धर्ममार्गें. २. कारण. ३. मुंगुसाला. ४. सर्पानें दंशिलेली. ५. बोट. ६. एक उणा ज्यांत अशा शंभरपुत्रांशीं. ७. वणव्यानें. ८. नाशाला. ९. वाईट चिन्हांनीं. १०. मरणास हेतु (कारण) जें उल्कामुख भूत (पिशाच) त्याचे ठायीं. ११. धनाची ठेव येथें आहे अशी बुद्धि. १२. उष्णता; (पक्षीं) दुःख. १३. वाटोळें; (पक्षीं) सदाचारी. १४. शुभ्र; (पक्षीं) पवित्र. १५. लांछन; (पक्षीं) काळिमा. १६. थंडगार. १७. गर्भिणी. १८. नीतिमतीला. १९. धृतराष्ट्र.

अध्याय अठरावा.

होता महावनांत स्त्रीसह नृप पांडु, तत्कथा परिसा. ।
[1]अरिसामंतनमितपद तो मृगयार्थें फिरे वनीं [2]हरिसा. ॥ १
तेणें मैथुनसमयीं हरिणीसह हरिण देखिला पुष्ट; ।
वधिला पंचशरांनीं स्त्रीसकट अदुष्ट तो, जसा दुष्ट. ॥ २
तो ऋषिपुत्र, तपोधन, भार्येशीं काननांत मृगरूपें ।
रतिकेलिसक्त होतां, वधिला सहसा मृगभ्रमें भूपें. ॥ ३
किंदमनामा तो ऋषि भूमिवर पडोनि पांडुला गांजी. ।
कर जोडुन नृपहि म्हणे, 'भ्रमलों; मृगरूप घेतलें कां ? जी !' ॥ ४
किंदम म्हणे, 'अरे ! म्यां, व्हावा सुत ऋष्यशृंगसा मातें, ।
हें मात्र वांछिलें रे ! मन वश होऊं दिलें न कामातें. ॥ ५
जनलज्जेस्तव मृगतनु घेउनि, रमतां वनीं मृगीसहित, ।
केला कसा तुवां वध ? केलें नसतांहि लेश म्यां अहित. ॥ ६
मृगयाधर्म तुज, मजहि आहेतचि विदित, परि सुरत[3]शर्म ।
अनुभवुनि, कसें केलें हनन ? अरे ! काय हें उचित कर्म ? ॥ ७
ब्रह्मवधें [4]दुरित नसो; नकळत घडला; परंतु तूज नृपा ! ।
सुरतसुखज्ञा तुजला यावी, आली कशी न [5]लेश ? कृपा. ॥ ८
दुष्टोचित शासन, कीं सोसावें काय तापसानें हें ? ।
कां निरपराध वधिला ? राया ! वद काय पाप सानें हें ? ॥ ९
घे शाप तापसाचा, तुजही करितां मनःप्रिया संग ।
मृत्यु घडो; या माझ्या [6]शापाशनिचा कधीं न हो भंग.' ॥ १०
शापवचन मलिन तया करि, कज्जल जेविं [7]पांडुरमणीतें. ।
मुनि गेल्यावरि, येउनि तें कळवी साश्रु पांडु रमणीतें. ॥ ११
'[8]व्यसनें [9]तात बुडाला, मीही; भोगील काय मंद [10]रसा ? ।
झालों [11]स्वगुरुसुहृज्जनहृत्सागरमथनहेतु [12]मंदरसा. ॥ १२
कामेंचि बुडविलें जग, हें ऐकावेंहि न व्यसन कानें. ।

---

१. शत्रुरूप जे मांडलिक राजे त्यांणीं नमस्कृत. २. सिंहसा. ३. सुख. ४. पाप. ५. लहान. ६. शापरूपी वज्राचा. ७. पांढऱ्या मण्यातें. ८. संकटानें. ९. भीष्म. १०. पृथ्वी. ११. स्वकीय गुरु आणि सुहृज्जन यांच्या हृदयसागराचें मथन करण्यास कारण. १२. मंदराचलासारखा.

इतर किति? पाविजेलचि विषयें भय नित्य नव्य [1]सनकानें. ॥ १३
झालों विचित्रवीर्य[2]क्षेत्रीं मी पांडु [3]कृष्णसुत; पाला ।
भक्षीन, करीन सुखें, होउनि संगीं [4]वितृष्ण, सुतपाला. ॥ १४
मी नाठवीन राज्य, स्वजन, स्त्री, शयन, वसन, अन्न, मनें. ।
जा हस्तिपुरास तुम्ही, सांगा भीष्मादिकांसि मन्नमनें.' ॥ १५
म्हणति स्त्रिया, 'करूं तप आम्हीही, अधिक काय सन्यासी? ।
येथें तपोनि, भोगा स्वर्गीं सुख कुंतिमद्रकन्यांशीं. ॥ १६
भार्या न त्यागाव्या, विरहज्वलनांत या न भाजाव्या; ।
अंतीं स्वर्गासि तुम्हांसह, तेजें शोभवुनि नभा, जाव्या.' ॥ १७
[5]दारोदारोक्ति करी मान्यचि, कीं प्रेम शुद्ध, निष्कपट. ।
काढी [6]अंगद, कुंडल, [7]कटकयुगुल, [8]मौलिरत्न, [9]निष्कपट. ॥ १८
तीं भूषणें, सुवस्त्रें अर्पुनि विप्रांसि, तो म्हणे, 'स्वामी! ।
जाउनि नागपुरीं हें सांगावें, मागतों वरा या मी.' ॥ १९
[10]वल्कल नेसोनि, म्हणे दासांसि, 'पुरासि जा सखे! [11]खग हो! ।
जळला [12]शापदवें हो; आश्रय सर्वांसि भीष्म [13]सन्नग हो. ॥ २०
दुर्दैवग्रीष्मानें गेला आटोनि [14]पांडुकासार. ।
जा [15]भीष्ममानसाप्रति दासमधुप हो! विचार हा [16]सार. ॥ २१
भीष्म, धृतराष्ट्र, विदुर, [17]स्वर्द्रुम तुमचे, तदाश्रयें वर्ता. ।
हा पांडु, आजपासुनि, झाला यति, भूमिचा नव्हे भर्ता. ॥ २२
सस्त्रीक पांडु गेला पूर्वीं राघव तपोवना [18]जेंवी; ।
वाढुनि शोकविष समय तो सकळांच्या म्हणे मना, 'जेवीं.' ॥ २३
सेवकजन बहु रडला; समजावें केविं त्या अनाथानें? ।
पांडुपदें जशि [19]त्यांच्या, शिशुच्याहि न तृप्ति तशि मना थानें. ॥ २४
त्यांनीं नागपुरीं ती नेली बहु शीघ्र तापदा वार्ता. ।
[20]अंगारवृष्टिनें तशि केली सर्व प्रजा तिणें [21]आर्ता. ॥ २५

---

१. ऋषि विशेष. २. स्त्रीच्या ठायीं. ३. व्यासपुत्र. ४. इच्छारहित. ५. स्त्रियांचें उदार-भाषण. ६. बाहुभूषण. ७. कडें. ८. मस्तकांतील रत्न. ९. पदक. १०. झाडाची साल. ११. पक्षि हो. १२ पांडु. १३. उत्तम वृक्ष. १४. पांडुरूप तलाव. १५. सरोवरविशेष. १६. श्रेष्ठ. १७. कल्पवृक्ष. १८. ज्याप्रमाणें. १९. सेवकजनाच्या. २०. अग्नीच्या पावसानें. २१. पीडिता.

आजी[1], माय[2] बहु रडे; भीष्म विदुर फार जाहले कष्टी. ।
धृतराष्ट्र म्हणे, 'विधिनें[3] कोंवें पळविली अचक्षुची[4] यष्टी[5]?' ॥ २६
तो पांडु हिमगिरीतें लंघुनियां, गंधमादना[6] गेला. ।
इंद्रद्युम्नसराप्रति जाउनि, शतशृंगपर्वतीं ठेला. ॥ २७
तेथें पांडु, तप करुनि, पावे सुमहर्षितुल्यता सुकृती[7]. ।
काय न साधील, पथा साधूंच्या अनुसरोनि, सासु कुंती? ॥ २८
तेथील महर्षिनिकर[8] अन्योन्यातें म्हणे, 'उठा, चाला;' ।
श्रीब्रह्मदेवदर्शन ध्यायास्तव सिद्ध एकदा झाला. ॥ २९
पांडु म्हणे, 'मी येतों.' मुनि म्हणती, 'वायु, कीं महर्षिजन ।
जाया समर्थ, न इतर विविलोकपथीं[9] करावया व्रजन[10].' ॥ ३०
समजे पांडु तदाशय[11], कीं झालों जरिहि अनृण इतरांचा, ।
तरिहि अनपत्यतेस्तव आहेंच ऋणी समस्त पितरांचा. ॥ ३१
पितरांच्या फेडाया न समर्थ, करुनि महा तप, रिणा मी. ।
घडतां अधःपतन, मज पुण्यें देतिल न हात परिणामीं. ॥ ३२
व्यास म्हणे, 'स्वामी हो! तारावा संकटांत हा भक्त; ।
अनपत्यत्व[12] स्वर्गद्वारनिरोधासि[13] हेतु[14], हें व्यक्त[15]. ॥ ३३
जेंवि पितृक्षेत्रीं मी, मत्क्षेत्रींही तसेंचि संतान ।
होतें, तरि तरतों; हा काम पुरवितें तुम्हीचि संतान[16].' ॥ ३४
मुनि म्हणति, 'भारता! हा काम तुझा देवताप्रसादानें ।
होईल पूर्ण, ऐसें दिसतें आम्हांसि पाहतां ज्ञानें.' ॥ ३५
मुनि गेल्यावर, पांडु ज्येष्ठस्त्रीतें म्हणे, 'प्रिये! कांहीं ।
कथितों, तें मान्य करीं; तुज तों अमृतहि मदुक्तयधिक[17] नाहीं. ॥ ३६
मद्वचनें संपादीं सन्मुनिपासूनि शुद्धसंततिला. ।
संततिलाभचि लाभ; 'स्वर्निःश्रेणीच[18]' म्हणति संत तिला. ॥ ३७
शरदंडायनभार्या, पतिच्या आज्ञेकरूनि, सन्मुनितें ।
भजली पूर्वीं; तारी सदपत्यत्रय तयांसि, जन्मुनि, तें.' ॥ ३८

---

१. सत्यवती. २. अंबालिका. ३. दैवानें. ४. आंधळ्याची. ५. काठी. ६. पर्वतविशेष. ७. पुण्यवान्. ८. महर्षींचा समुदाय. ९. ब्रह्मलोकाच्या मार्गात. १०. गमन. ११. ऋषिसमूहाचा अभिप्राय. १२. अपुत्रत्व. १३. बंद होण्यास. १४. कारण. १५. स्पष्ट. १६. कल्पवृक्ष. १७. माझ्या भाषणाहून अधिक. १८. स्वर्गलोकास जाण्याची शिडी.

कुंती म्हणे, 'तुम्ही मज कथितां ज्या काय आजि कार्यांतें, ।
व्युषिताश्वकथा[1] जाणुनि, मग मान्य करील कोण आर्या तें ? ॥ ३९
व्युषिताश्व भूप मेला; त्याची भद्रा वधू सती, पतिचें ।
शव आलिंगूनि, करी विलाप बहु; न गणि मत सुहृन्मतिचें. ॥ ४०
स्वपदीं दृढ भाव तिचा जाणोनि, नभांत बोलिला वाणी, ।
सोडीनाचि शवाला, संततिचा काम धरुनि, जैं राणी, ॥ ४१
'न करीं विलाप सति ! घे वर; ऋतुकाळीं तुवां मदंगातें ।
रक्षुनि घ्यावें शयनीं; देईन अपत्यहेतुसंगातें.' ॥ ४२
भद्रा तैसेंचि करी; झाले तिस शाल्व, मद्र सुत सात. ।
हें ऐकिलें असेल व्युषिताश्वचरित तुम्हींहि विख्यात. ॥ ४३
शापप्रतिबंध खरा; परि अस्मद्भाव भाग्य पुण्यबळें, ।
स्वामी तुम्हीच कल्पद्रुम द्याल स्त्रियांसि पुत्रफळें. ॥ ४४
तेंवि, मनःसंकल्पें, दिव्यतपोयोगसिद्धिमंतानें, ।
माझ्या ठायीं देवा ! निर्मावीं त्वांचि शुद्ध संतानें.' ॥ ४५
पांडु म्हणे, 'गे ! साध्वी व्युषिताश्व जसा, तसा नसे अन्य. ।
तो साक्षाद्देवोपम; लोकीं सन्मान्य, योगनिधि धन्य. ॥ ४६
मज आहे श्रुत ऐसें, कीं कामविहारिणि स्त्रिया, स्ववशा ।
पूर्वी होत्या, भजती भलत्यासि, जशा वनीं गजास वशा[2]. ॥ ४७
उद्दालकमुनिपुत्रें रीति तयांची विलोकिली खोटी; ।
केली हे मर्यादा, जे आतां चालती जगीं मोठी. ॥ ४८
उद्दालकपत्नीतें एक ब्राह्मण धरी करीं कामी. ।
'क्रीडों चाल' म्हणे, जरि देखत होता तिचा पती धामीं[3]. ॥ ४९
तें पाहुनि उद्दालकमुनिसूनु[4] म्हणे तयासि, 'कर सोडा.' ।
भव्यार्थ[5], आजिपासुनि, या दुष्टा दंडकासि[6] कर जोडा.' ॥ ५०
तात म्हणे, 'वत्सा ! हे रीति पुरातन, तुवां न कोपावें. ।
स्त्री प्रियकामविहारी; विघ्न किमपि तूं करूं नको, पावें.' ॥ ५१
तें मात्र वचन न करी मान्य श्रीश्वेतकेतु[7] बापाचें; ।
स्पष्ट म्हणे, 'हें कारण होइल नरकप्रदोग्र पापाचें. ॥ ५२

---

१. राजविशेष त्याची कथा. २. हस्तिणी. ३. गृहीं. ४. पुत्र. ५. कल्याणार्थ. ६. रीतीला. ७. उद्दालकाचा पुत्र.

याचरिती [1]भ्रूणघ्नी परपुरुषाला भजेल जी असती; ।
भ्रूणघ्न सतीत्यागी पुरुषहि, नरकीं घडो तया वसती. ॥ ५३
पुत्रोत्पत्त्यर्थ [2]धवें आज्ञा देतांहि, जीहि आज्ञा ते ।
न करील, [3]तैशीच तिही; भंगितिल न धर्म[4]सेतु हा ज्ञाते.' ॥ ५४
अशि मुनिकृत मर्यादा लोकीं अद्यापि चालते कांते ! ।
जाणसि [5]मदुद्भवासहि; मान्य करीं वचन [6]कनकनिभकांते ! ॥ ५५
कल्माषपादपत्नी मदयंती, जाणताति संत तिला. ।
ती पावली वसिष्ठापासुन [7]गतिकीर्तिहेतुसंततिला. ॥ ५६
त्वांहि तसेंचि करावें; म्यां रचिला आजि सफळ अंजलि हो. ।
मन्नाम पुत्रवंतांमाजि [8]यमामात्यपाणिकंज लिहो.' ॥ ५७
जन्मेजयासि सांगे [9]मुनि, कीं [10]वाणीसही, करुनि पण, जी ।
जिंकूं शके [11]सुभाषणनिपुणत्वें, ती वदे तुझि [12]निर्पणजी. ॥ ५८
'मत्पितृसदनीं होता श्रीदुर्वासा महोग्र, परि चरण ।
म्यां अर्चिले सदाही; केलें, साहोनि कष्ट, [13]परिचरण. ॥ ५९
तेणें[14] प्रसन्न होउनि मंत्र मला एक शिकविला आहे. ।
पुत्रार्थ सुराकर्षण कथिलें, वेळाहि पातली [15]त्यों हे. ॥ ६०
श्री[16]गुरुदत्तमनुबळें सांगाल तया सुरासि बाहेन. ।
परपुरुषाला, तुमच्या वचनें, पुत्रोद्भवार्थ पाहेन.' ॥ ६१
पांडु म्हणे, 'धर्मातें बाहें, वाहें तयासि हें [17]कांय. ।
[18]तेंज न सज्जनमतपथ सोडिल, अगुणें विनिग्रहें काय ?' ॥ ६२
पतिस नमुनि, गुरुचरणस्मरण करुनि, मंत्रजप करी विधिनें; ।
तत्काळ दिलें दर्शन [19]धर्में, मंत्राहृतें, दयानिधिनें. ॥ ६३
परिसुनि धर्म वदे, '[20]अयि ! सति ! कुंति ! [21]मतं [22]ददामि किं[23] ते[24] ?' तें ।
परिसुनि म्हणे पृथा, 'जें सुतरत्न हरील सर्व चिंतेतें.' ॥ ६४

---

१. गर्भघातिनी. २. पतीनें. ३. भ्रूणघ्नी. ४. मर्यादा. ५. माझ्या उत्पत्तीस. ६. सुवर्णासारिखी कांति जीची अशे ! (हे कुंति.) ७. उत्तमा गति व कीर्ति यांविषयीं कारण जी संतति तिला. ८. यमाचा अमात्य चित्रगुप्त त्याचें हस्तकमल. ९. वैशंपायन. १०. सरस्वतीलाही. ११. उत्तम भाषणामध्यें प्रवीणत्वें. १२. कुंती. १३. सेवा. १४. दुर्वासानें. १५. देवाच्या आकर्षणाला. १६. श्रीगुरु जो दुर्वासा त्याणें दिलेल्या मंत्राच्या सामर्थ्यानें. १७. शरीर. १८. धर्मापासून झालेला. १९. यमधर्मानें. २०. अगे. २१. इष्ट. २२. देऊं. २३. काय. २४. तुज.

धर्मे तसाचि दिधला सुत, करुणा करुनि **पांडु**भूपाळीं. ।
ईषशुक्लपंचमीतिथि[1] होती, [2]तज्जनन होय ज्याकाळीं. ॥ ६५
तो उपजतांचि, झाली वाणी [3]अशरीरिणी अशी व्योमीं; ।
'हा कुरुकुळीं युधिष्ठिर हित सकळां, अमृतरस जसा [4]सोमीं.' ॥ ६६
हा **पांडु**पुत्र सत्यव्रत, सुज्ञ, अजातशत्रु, [6]भूतरणी; ।
हा [7]मूर्त **धर्म** भूपति; यति यश जोडील परम [8]पूत रणीं.' ॥ ६७
सुतमुख शशिरुचि सेवुनि, **पांडु** निवाला; परंतु एकानें ।
तृप्त नसेचि; जसा [9]मरुतरुप [10]सकृत्प्राप्तवारिसेकानें. ॥ ६८
पुनरपि म्हणे तिला, 'बळशाली सुत आणखी असावा गे ! ।
सबळचि वीरखळबळीं, विपिनीं [11]समरुद्दवा असा, वागे. ॥ ६९
कुंती, मंत्रजप करुनि, चिंती मनिं कीं, '**समीर देवा**! [12]यो'. ।
तोही तसाचि आला; त्यासि म्हणे ती, 'सुपुत्र दे **वायो** !' ॥ ७०
पवनापासुनि झाला सुत बळनिधि **भीम**सेन, [13]तज्जननीं ।
होय गगनगी, हर्षे भूमिहि, केवळ न एक [14]तज्जननी. ॥ ७१
'हा बळजळधि खळांचा समरीं उतरील सर्व हा [15]रेंचें. ।
चूर्ण करील शिळा दृढ, शत्रुशिरें, मुष्टिच्या प्रहारेंच.' ॥ ७२
[16]अंकीं निजला असतां, व्याघ्रभयें ती **पृ**था उठे [17]तूर्ण. ।
तों [18]घनसा **भीम** पडे, होय तनुभरें तळीं शिळा चूर्ण. ॥ ७३
'तिसराहि पुत्र लोकश्रेष्ठ असावा' असें मनीं आणी. ।
उग्र तप करी राजा **पांडु**; तदुक्तें तशीच ती राणी. ॥ ७४
आराधिला [19]सुरेश्वर; भेटोनि म्हणे तयासि, 'माग वर.' ।
पांडु म्हणे, 'दे मजला आत्मसम कुमार [20]भूरिभाग, वर.' ॥ ७५
इंद्र म्हणे, 'मत्सम तुज पुत्र दिला सर्ववीरवर हो ! तो. ।
हो तूंहि पुत्रिवर; बहुगुण सुजनीं अर्पिला सुवर होतो.' ॥ ७६

---

१. आश्विन शुक्ल पंचमी. २. मूळभारतांत 'ऐंद्रे चंद्रसमायुक्ते मुहूर्तेऽभिजितेऽष्टमे । दिवा मध्यगते सूर्ये तिथौ पूर्णेऽतिपूजिते ॥ समृद्धयशसं कुंती सुषाव प्रवरं सुतम् ॥' (अ० १२३ श्लो० ६–७) असें; आहे यावरून ज्येष्ठ शुक्ल १५ स जन्म झाला असें दिसतें. ३. त्याची उत्पत्ति. ४. आकाशवाणी. ५. चंद्रीं. ६. पृथ्वीवरचा सूर्य. ७. मूर्तिमान्. ८. पवित्र. ९. मरुदेशांतील वृक्षावर. १०. एकवेळ प्राप्त झालेल्या उदकाच्या सिंचनानें. ११. वाऱ्यासह दावानळसा. १२. ये. १३. त्याच्या जन्मकाळीं. १४. त्याची माता. १५. गर्व. १६. मांडीवर. १७. शीघ्र. १८. वज्रासारिखा. १९. इंद्र. २०. महाभाग्यवान्.

[1]हरि गेल्यावरि, **पांडु** स्त्रीस म्हणे, 'एक वर्ष तपलीस ।
ज्या [2]अर्थें तूं देवि ! स्वव्रतनियमास फार जपलीस, ॥ ७७
तें तप फळलें; तुज सुत देणार **हरी**, म्हणूनि, गुरुदत्ता ।
विद्या तुवां जपावी, जीची साची जगत्त्रयीं सत्ता. ॥ ७८
कुंतीनें शुभदिवशीं, एकांतीं, इष्टकाम जाणविला. ।
[3]**आ**त्रेयदत्तविद्यादूती योजून **शक्र** आणविला. ॥ ७९
इंद्रापासून **अर्जुन** होतां, सद्गुण मनोरम [4]नभोगी ।
वर्णी, तच्छ्रवणें सुख बहु **कुं**ती**पां**डुसाधुमन भोगी. ॥ ८०
'हा रंजवील गुरुजनचित्तातें; [5]श्रुतिरहस्य कवळील; ।
दुग्धाब्धिफेनधवळें स्वयशें **कुरु**च्या कुळासि [6]धवळील; ॥ ८१
लीलेनें सुरदुष्कर कर्म करिल; [7]संगरीं न आटेल; ।
फाटेल भयें याच्या [8]द्विषदुर; हा मूर्त काळ वाटेल; ॥ ८२
हा तोषवील युद्धीं त्यासहि, जो **काळ**कंपद [9]**पि**नाकी. ।
पावेल पाशुपतही, ज्या पात्र न, जरि कृती तदपि, [10]नाकी. ॥ ८३
किंबहुना **विष्णु** जसा सुखद **अ**दितिला, तसाचि हा तुजला. ।
[11]धन्यासि **कुं**ति **पां**डो ! त्वत्क्षेत्रीं कल्पवृक्ष हा रुजला.' ॥ ८४
ऐशी अंबरवाणी झाली, शुभकुसुमवृष्टि बहु मोठी; ।
वाद्यध्वनि बहु झाले; आले **आदित्यरुद्र**मुनि कोटी. ॥ ८५
पावे **द**शरथगृह जें यश, [12]**पां**डुटजहि [13]**जि**ष्णुजननीं तें; ।
बहु मानिलें सतींनीं **कुं**तीतें जेविं **वि**ष्णुजननीतें. ॥ ८६
पांडु पुन्हाहि प्रार्थी त्यातें **कुं**ती म्हणे, 'पुरे; लोभें ।
होईन [14]बंधकी मी; क्षोभें न मनीं; इहींच बहु शोभें.' ॥ ८७
माद्री पतिप्रति म्हणे, 'झाले माझ्या कुमार [15]जावेला; ।
सुख गमलें; म्हणतें मी, 'वृद्धीतें यापरीस जा वेला !' ॥ ८८
दोघी वंध्या होतों, परि फळला सत्प्रसाद एकीला. ।
झाला तुम्हासि संततिलाभ, जसा वृष्टिलाभ [16]केकीला. ॥ ८९

---

१. इंद्र. २. हेतूनें. ३. अत्रीचा पुत्र दुर्वास यानें दिलेली विद्यारूप दूती. ४. आकाशवाणी. ५. वेदरहस्य. ६. शुभ्र करील. ७. युद्धांत. ८. शत्रूंचें वक्षस्थळ. ९. महादेव. १०. स्वर्गवासी. ११. धन्य आहेस. १२. पांडूची पर्णशाला. १३. अर्जुनाच्या उत्पत्तिसमयीं. १४. जारिणी. १५. वस्तुतः एथें 'सवतीला' असें पाहिजे. १६. मयूराला.

मी मात्र मंदभाग्या; सांत्वुनि म्हणतां, 'रहा सुखें, न रडें.' ।
परि मुनिशापवृकें या हरिणीचें कवळिलें मुखें नरडें. ॥ ९०
मत्संतानार्थ तुम्ही दयितेला भीड घालितां, तरि ती ।
आज्ञा न मोडिती, या सवतीवरिही सती दया करिती.' ॥ ९१
पांडु म्हणे, 'माझ्याही चित्तीं आहे असेंचि; पदर तिला ।
पसरीन; करील वचन; भंगील न ती मदीयपदरतिला.' ॥ ९२
कुंतीस म्हणे, 'देवि ! त्वद्गुजनीं सादरा तुझी आली. ।
माद्री त्वां तारावी; हेचि न दुःखाब्धिच्या तटा आली. ॥ ९३
यश बहु वाढेल तुझें; हेंचि भल्यांनीं जपोनि सांचविलें; ।
सर्वस्व वेंचिलें, परि एक भलेपण जगांत वांचविलें.' ॥ ९४
आज्ञा स्वीकारुनि, ती, मंत्रजप करुनि म्हणे तिला, 'जावें; ।
पुत्रार्थ सकृत् दैवत चिंतावें त्वां; सये ! न लाजावें.' ॥ ९५
ती दस्त्रांतें चिंती, तों ते पावोनि म्हणति, 'हे माद्री ! ।
द्यावें काय ? वद तुवां स्वावयवें जिंकिलाचि हेमाद्री.' ॥ ९६
माद्री हांसोनि म्हणे, 'जाणुनि हृद्रोग, त्यासि अगदानें ।
दूर करा जी ! रोगी न निवे कनकाचियाहि अगदानें.' ॥ ९७
त्यांपासुनि ती पावे अत्यंतमनोरमांग यमलांतें; ।
नकुळ सहदेव ते बहु सुखविति त्या पांडुनेत्रकमलांतें. ॥ ९८
कुंती बोले, 'माझा उपमर्द करील ती, असें गमतें; ।
द्वंद्वांव्हानें पुत्रद्वंद्व जिणें सहज साधिलें समतें. ॥ ९९
अणखी माद्रीविषयीं पांडु प्रार्थी पृथेसि एकांतीं. ।
मान्य न करी; गमे ती वृष्टि उघडली मयूरकेकांतीं. ॥ १००

अध्याय एकोणिसावा.

झाले पांच सुरद्रुमसम[13] सुत, आनंद पांडुचा पिकला. ।
पिकें[14] लाभला बहुदिसां आम्राला, सुरभि[15] ज्यामधें टिकला. ॥ १

---

१. लांडग्यानें. २. स्त्री कुंती इला. ३. माझ्या चरणसंबंधी प्रीतीला. ४. सखी. ५ एकदां. ६. अश्विनीकुमारांतें. ७. औषधानें. ८. सोन्याच्या पर्वताच्या दानानें. ९. जुळ्या मुलांतें. १०. दोघांच्या बोलावण्यानें. ११. बंद झाली. १२. मोरांच्या टाहोच्या शेवटीं. १३. कल्पतरुतुल्य. १४. कोकिल. १५. वसंत किंवा सुवास.

त्यावरि वसंतकाळीं, एकांतीं, रम्य[1]नंदनाभवनीं, ।
माद्री अनुसरली, जशि सेवी त्या [2]पूरुनंदना [3]भवनीं. ॥ २
होता विरक्तिभस्माच्छादित कामाग्नि पांडुहृत्कुंडीं; ।
फुंकिला [4]सुरभिवनश्रीधमनी काळें धरूनियां [5]तुंडीं. ॥ ३
पावे स्मराग्नि, जागा होतां, [6]स्त्रीदृष्टिसर्पिराहुतिला. ।
लोपे [7]विवेकशशिरुचि, [8]मुनिशापचि होय [9]दर्पि राहु तिला. ॥ ४
[10]धृति नव्हति काय? मुनिचा नव्हता तो विदित काय कोप तिला? ।
परि होणार चुकेना वारूं न शकेचि बायको पतिला. ॥ ५
[11]स्मरकाळमूढ पांडु प्रेमें आलिंगुनि [12]स्वरामेला, ।
सुरतीं प्रवर्तला जों, झाला मुनिशाप तों खरा, मेला. ॥ ६
[13]दृङ्मीलन निश्चळता पांडूची प्रथम भासली सुरतें. ।
मग मरण समजलें, हो! झालें वपु शीत [14]कांतिभासुर तें. ॥ ७
माद्री, 'हा प्राणेश्वर! हा देव!' असे करी विलाप वनीं. ।
ते नेउनि भेटविले क्षिप्र तिचे शब्द कुंतिला पवनीं. ॥ ८
ससुता कुंती तेथें जाय म्हणे, 'हाय! माद्रि! हें काय? ।
शाप विदित असतां, त्वां स्पर्शों द्यावें पतीस हें [15]काय? ॥ ९
क्षणसुखलोभें मूढे! एकांतीं [16]कांत भुलविला साचा. ।
केला घात कसा? गे! या व्यसनीं काम तुज विलासाचा.' ॥ १०
माद्री म्हणे, 'न म्यां, नरदेव [17]नियतिनेंचि, भुलविला साचा. ।
बाइ! [18]हरि पुढें दिसतां [19]आठवहि [20]करेणु करि विलासाचा. ॥ ११
[21]दीपकळिकेसि धाउनि आलिंगी आग्रहें पतंग जसा, ।
पडला गळांचि माझ्या; [22]रंभेच्या [23]दीप्तमद [24]मतंगजसा.' ॥ १२
कुंती म्हणे [25]पतीसीं, 'मी जातें, ऊठ, तूं मुलें पाळीं.' ।
माद्री म्हणे, 'मला दे आज्ञा, माझ्याचि हें असो [26]भाळीं.' ॥ १३

---

१. नंदनतुल्य वनांत. २. पुरूच्या वंशजाला म्ह० पांडूला. ३. गृहीं. ४. वसंतसंबंधी वनशोभारूप फुंकणी. ५. तोंडांत. ६. स्त्रीदृष्टिरूप सर्पिच्या (घृतांच्या) आहुतिला. ७. विचाररूप चंद्राची कांति. ८. किंदममुनीचा शाप. (अ० १८ गी० १० पहा.) ९. क्रूर. १०. धैर्य. ११. मदनरूप काळानें मोहित केलेला. १२. आपल्या बायकोला. १३. डोळ्यांचें झांकणें. १४. कांतीनें शोभणारें. १५. शरीर. १६. राजा पांडु. १७. दैवानेंच. १८. सिंह. १९. स्मरण. २०. हत्तीण. २१. दिव्याच्या ज्योतीला. २२. केळीच्या. २३. मदोन्मत्त. २४. हत्तीसारखा. २५. सहगमन. २६. कपाळीं.

तूंचि मुलें रक्षाया दक्षा, [1]यादवि! न मी, तुझी ममता ।
सर्वत्र तुल्य आहे; राहेल न मन्मनीं असी समता. ॥ १४
दे मज अग्नि, स्वर्गी पतिसह [2]सुकृतें तुझ्याचि जाईन. ।
बाई! न दया टाकीं. तेथें मी त्वद्गुणांसि गाईन.' ॥ १५
कुंतीनें माद्रीची सफळा [3]सहगमनकामना केली. ।
[4]नियतिमना ये त्यांच्या, सवतीच्या ये न कां मना [5]केली? ॥ १६
[6]शतशृंगवासि मुनिजन झाला तेथें समस्त [7]एकवट. ।
आश्रय मुलांसि बुडतां, कुंतीसहि होय तोचि एक [8]वट. ॥ १७
त्या पांडुकुटुंबातें ते साधु महर्षि गुह्यकवनांत ।
उघडें पडों न देती, सुकवि जसे [9]वेदगुह्य कवनांत. ॥ १८
पांचसुतांसह कुंतीप्रति समजावूनि, आपुल्या संगें, ।
[10]संस्कार घडायास्तव त्या दोघांचींहि आणिती [11]अंगें. ॥ १९
येउनि पुरासि केलें मुनिनीं तें [12]स्वांघ्रिशुद्धिवृत राष्ट्र. ।
भेटाया आणविले सत्यवतीभीष्मविदुरधृतराष्ट्र. ॥ २०
वृत्त कथुनि, बाळ पृथा भेटवुनी, दाखवूनि अस्थि, 'रहा ।
धैर्यनयें, धर्मपथीं,' मुनि म्हणति, 'असाचि, अर्थ [13]अस्थिर हा.' ॥ २१
मुनि गेले. झालें तें पांडुमरणवृत्त [14]धृतिनगीं [15]भिदुरें. ।
करवी उत्तरकार्य [16]प्रज्ञाचक्षुर्मतें सुधी विदुर. ॥ २२
विध्युक्त पारलौकिक झाल्यावर पुत्र पांडुचे गेहीं ।
गेले. गमले, शिरले ते पंच प्राण टाकिल्या देहीं. ॥ २३
त्यावरि [17]मातेसि कथी व्यास कुरुकुळीं अनर्थ जो [18]भावी, ।
धाडी तपोवनीं; कीं ती स्वर्गी तप करूनि शोभावी. ॥ २४
[19]दोघी सुनाहि घेउनि, भीष्मासि पुसोनि, जाय ती न टिके. ।
त्यजिले आप्तजन तसे, स्वप्नींचे अर्थ ते जसे लटिके. ॥ २५

---

१. यदुकुलोत्पन्ने. २. पुण्यानें. ३. मृतभर्त्यासह जाण्याची इच्छा. ४. दैवाच्या मनास. ५. क्रीडा. ६. हिमालयाचें शिखर. ७. एकत्र. ८. वटवृक्ष. ९. वेदांचें रहस्य. १०. अंत्यविधि. ११. मृतशरीरें. १२. आपल्या चरणाच्या शुद्धीनें व्याप्त. १३. अशाश्वत. १४. धैर्यरूप पर्वतीं. १५. वज्र. १६. धृतराष्ट्राच्या अनुमतानें. १७. सत्यवतीला. १८. होणारा. १९. अंबिका आणि अंबालिका. (विचित्रवीर्याच्या भार्या.)

गेल्या तिघीहि उत्तमलोकीं त्या धरुनि कांस योगाची. ।
पडली गळांचि त्यांच्या निःसीम समृद्धि दिव्यभोगाची. ॥ २६

अध्याय विसावा.

पांडुसुतांचीं झालीं [1]उपनयनें ते श्रुतिस्मृती पढले. ।
अल्पवयांतचि पांचहि बंधु महत्वीं हळूहळू चढले. ॥ १
भीम बळी, त्यापासुनि होती **धृतराष्ट्रपुत्र** [2]परिभूत. ।
मंत्रज्ञ सहज पाहे, पावति अत्यंत ताप परि [3]भूत. ॥ २
ज्या त्या क्रीडेंत, मुलें **भीमा**पासूनि पावती [4]भंग. ।
सन्माणिक्यमणिपुढें [5]गोमेदाचा फिका पडे रंग. ॥ ३
भीमाच्या साहजिकें तेजें ते भंग पावती [6]क्षुद्र. ।
[7]ऋक्षांत रवि, तसा तो[8] त्यांत महात्मा, पशूंत कीं [9]रुद्र. ॥ ४
चढति फळार्थ [10]नगीं ज्या तन्मूळीं **भीम** निजपदें ताडी. ।
लीलेनें तत्फळदळकुसुमांसह त्यांसि भूतळीं पाडी. ॥ ५
[11]शशिरंकुपुढें कैसे होतील न भग्नगर्व [12]कोळविट? ।
भीमबळोत्कर्षें ते खळ धरिति मनांत सर्वकाळ विट. ॥ ६
स्पर्धा करूनि साधूं जातां, भलतेंहि काज, वेगमती ।
न पुरे; तो **भीम** शशी भासे; ते सर्व काजवे गमती. ॥ ७
[13]**मा**रुतिसिंह वधावा कपटें, तद्बंधु हेहि [14]अवि चारी ।
बांधावे, ऐसें हें योजी दुर्योधनाख्य अविचारी. ॥ ८
[15]जळकेलीचें करवी साहित्य मग [16]प्रमाणकोटींत. ।
वरि दावी प्रेम असें, कीं नाहीं [17]तत्प्रमाण कोटींत. ॥ ९
ने **पांडवांसि** तेथें. बहुत भला भासला, न वंचकसा. ।

---

१. मुंजिबंधनें. २. पराभव पावलेले. ३. पिशाच. ४. पराभव. ५. पाषाणविशेष. हा मणि हिमालयांत व सिंधुनदांत सांपडतो. याचा रंग पांढरा, पिंवळा, असमानी व तांबडा असा चार प्रकारचा असतो. गुणांवरून याचे शुभावह आणि अशुभावह असे दोन भेद आहेत. (रसरत्न-समुच्चय, अ० ४ श्लो० ५४—५६ पहा). ६. नीच. ७. नक्षत्रांत. ८. भीम. ९. पशुपति महादेव. १०. वृक्षावर. ११. चंद्रस्थ हरिणापुढें. १२. हरिणविशेष. १३. भीमरूप सिंह. १४. मेंढे. १५. उदकक्रीडेचें. १६. गंगातीरस्थ एक तीर्थ. १७. त्याचें माप.

कळलाचि न [1]संसर्गायोग्यचि, तो [2]मूर्तपापपंचकसा. ॥ १०
गेले प्रमाणकोटिस्थानीं गंगातटीं [3]वरोपवनीं. ।
तेथ [4]पटगृहीं शोभा केली होती, जसी [5]महाभवनीं. ॥ ११
धृतराष्ट्रपुत्र पांडव त्या [3]सदुपवनीं, जया जसें इष्ट, ।
गंगातटपटसदनीं ते भक्षिति अन्न विविध जें मिष्ट. ॥ १२
दुर्योधनें विषान्नें वाढविलीं. भीम जेविला भावें. ।
आदर तसा करी खळ, बहुदिवसां मित्र जेंवि लाभावें. ॥ १३
'इष्टार्थाची निश्चित सिद्धि,' म्हणे तो मनांत खळ, 'केली.' ।
मग ते सूर्यास्तावधि करिती श्रीजान्हवींत जळकेली. ॥ १४
आले कुमार तीरीं. त्यांत बहु श्रांत भीम [6]गरळानें, ।
तो व्यापिला; न्हद जसा तैलाच्या बिंदुनें [7]सुतरळानें. ॥ १५
जळकेलींत श्रमला, प्रथमहि सविषान्न जेविला तिपट, ।
निजला शीत पटगृहीं, तीरीं येतांचि मोहिला निपट. ॥ १६
दुर्योधनें विषाकुळ [8]मारुति केला निबद्ध वल्लींनीं. ।
[9]पंकजवद्दुर्जातें करिजे तो घात [10]भृंगवल्लींनीं. ॥ १७
दुर्योधनें बुडविला तो गंगेंत त्यजूनि [11]अनुकंपा. ।
ऐसें [12]अघ करितां, त्या [13]पापाची पावली न [14]तनु कंपा. ॥ १८
पाषाणसा बुडाला. खळसंगें घात हा असा घडला. ।
नागकुमारांवरि तो जाउनि, [15]नागालयांतरीं पडला. ॥ १९
वरि पडतां डसले ते; दैवें तो त्यासि होय [16]हितें दंश. ।
विष उतरलें [17]अहिविषें; उरला नाहींच लेशहि [18]तद्दंश. ॥ २०
स्वज्ञानातें पुनरपि पावे तो जेंवि अंध नेत्रातें ।
दैवें तद्बळ त्याला झालें, तोडोनि बंधनें, [19]त्रातें. ॥ २१
बंधन तोडुन भीमें डसले होते तनूसि जे सर्प, ।
गरुडें जसे, तसे ते दूर उडविले, हरूनियां [20]दर्प. ॥ २२

---

१. सहवासास अनुचित. २. मूर्तिमान् पंचमहापातकांसारिखा. ब्रह्महत्या, सुरापान, सुवर्णस्तेय, गुरुतल्पागमन आणि तत्संसर्ग हीं पांच महापातकें समजतात. ३. सुंदर बागेंत. ४. तंबूमध्यें. ५. मोठ्या वाड्यामध्यें. ६. विषानें. ७. अतिचंचलानें. ८. भीमसेन. ९. कमलसदृशदुष्टानें. १०. भ्रमरासारिखा लीन झाला जो त्याचे ठायीं. ११. दया. १२. पाप., १३. पापरूप दुर्योधनाची. १४. देह. १५. सर्पगृहामध्यें. १६. हितकारक. १७. सर्प. १८. त्या. विषाचा अंश. १९. रक्षण करणारें. २०. गर्व.

नागकुमारमुखें[१] श्रुत होतां आश्चर्यवृत्त, तो राजा ।
वासुकि पाहों आला; **कुंतीचा आर्यका**ख्यही आजा[२]. ॥ २३
आर्यकनाग प्रेमें भेटे **भीमा**सि, कीं कळे नातें. ।
आर्यांचें[३] दूरत्वें, नसतां सहवासही, मळेना तें[४]. ॥ २४
वासुकि म्हणे, 'करावें याचें प्रिय काय, **आर्यका**! सार[५]. ।
श्रांताला निववावें, इच्छितसे हेंचि कार्य कासार[६].' ॥ २५
आर्यक म्हणे, 'प्रभो! प्रिय करिसी जरि सुप्रसन्न चित्तानें, ।
बहुलाभ काय याला दिधल्या मणिकांचनादिवित्तानें[७]? ॥ २६
आहे सहस्रगजबळ[८] ज्या रसकुंडीं[९] प्रतिष्ठित प्राज्ञा! ।
जितुका रुचेल तो रस तितुका सेवू, असी दिजे आज्ञा.' ॥ २७
रससेवनार्थ आज्ञा **वासुकि**ची होय, दाविलें कुंड. ।
सुपरिश्रांतें **भीमें** त्या रसकुंडासि लाविलें तुंड[१०]. ॥ २८
केलीं एकोच्छ्वासें[११] एक असीं रिक्तें[१२] आठ रसकुंडें. ।
पात्रें स्वल्पजळाचीं जैसीं तृषितें गजें निहितशुंडें[१३]. ॥ २९
अंश जगत्प्राणाचा[१४] म्हणउनि रस तो महातपा प्याला. ।
सुकृत[१५] अमित नसतें, तरि लावूं देतें न हात पाप्याला. ॥ ३०
एकांतीं सुखशयनीं **पांडव** निजला पिवोनियां सुरसा[१६] ।
रूपें बळें गुणें तो सकळां नागांसि भासला सुरसा[१७]. ॥ ३१
इकडे **धर्म** पृथेला[१८] जातांचि गृहीं पुसे, 'पुढें आला ।
भीम? न येतां दिसला, केला बहु शोध, काय तो झाला?' ॥ ३२
कुंती म्हणे, 'अहा! हा! दैवा! हे रीति काय गा! बरवी?' ।
ती प्रियपुत्रगति जसें तिस, पतिगतिही तसें न, घाबरवी. ॥ ३३
कुंती विदुरासि म्हणे, 'भावोजी! **भीम** भेटवा, धुंडा. ।
तद्रहिता हे संतति न हिता, जैसी विपुष्करा[१९] शुंडा. ॥ ३४

---

१. सर्पबालकांच्या मुखें. २. कुंतीची माता भोजा ही आर्यक नामक कद्रूपुत्राची (नागाची) कन्या, म्हणून आर्यक हा कुंतीचा मातामह. ३. थोरांचें. ४. नातें. ५. उत्तम. ६. सरोवर. ७. रत्नें, सोनें, इत्यादिक धनानें. ८. सहस्रगजांचें बळ. ९ अमृतरसाच्या पात्रांत. १० तोंड. ११. एका श्वासानें. १२. रिकामी. १३. घातली आहे सोंड ज्यानें अशा हत्तीनें. १४. वायूचा. १५. पुण्य. १६. उत्तमरसातें. १७. देवासारिखा. १८. कुंतीला. पृथेला कुंतिभोजनामक राजानें तच्या पित्यापासून दत्तक घेऊन 'कुंती' असें नांव ठेविलें. १९. अग्रभागहीन. (जशी, सोंड.)

दुर्योधन साहेना त्याशि, जसा शिशु कणासि नयनींच्या, ।
वाटे वधिला तेणें; अन्यायचि आवडे, न [१]नय, नीचा'. ॥ ३५
विदुर म्हणे, 'यावरि हें येऊं देवूं नकोचि तोंडास. ।
रक्षीं [२]शेषें, न घे [३]द्विषदहि [४]मौनास्तीकभक्ति तो [५]डंास. ॥ ३६
'त्वत्सुत दीर्घायु' असें जें वाक्य [६]महर्षिचें, न तें विसरें. ।
होय [७]सदाशीर्वचनें अमृताच्याही भलें न तेंवि [८]सरें. ॥ ३७
येईल शीघ्र कीं तो [९]साध्वाशीर्वादपात्र [१०]शिवंशील. ।
निवशील सुतस्पर्शे, चिंतेला न [११]गणरात्र शिवशील.' ॥ ३८
करुनि समाधान असें गेला विदुर स्वमंदिरा; मग तो[१२] ।
आठ दिन निजोनि उठे; प्राणव्यसनींहि पुण्यवान् जगतो. ॥ ३९
आर्यकमतें [१३]अहींद्रें सुखवाया [१४]कुंतिकुळपताकेला ।
त्यास्थानींच वृकोदर बहु सत्कारुनि पावता केला. ॥ ४०
भीमें माता भ्राते क्षिप्र निववि्ले, तसे न [१५]धनसारें. ।
[१६]तच्चित्तचातकासुख नाशी [१७]रसपानवृत्तघन सारें. ॥ ४१
धर्म म्हणे, 'दुर्योधनचित्तास प्रेम नित्य नव दावा. ।
भीष्मा विदुरा वांचुनि हा अर्थ तुम्हीं परासि न वदावा. ॥ ४२
विश्वास खळीं न बरा, सावध व्हा, भय घडे [१८]अनवधानें ।
[१९]हा राज्यलुब्ध लेशहि लाजेल न गुरुसुहृज्जनवधानें.' ॥ ४३
पांडव सावध झाले, त्याले दुर्भेद्य [२०]विदुरमतकवचा; ।
साहति सुदुःसहाही [२१]दुर्योधनकर्णशकुनिहतकवचा. ॥ ४४

अध्याय एकविसावा.

गौतमपुत्र [२२]शरद्वान् [२३]चापश्रुतिनिष्ठ जो स्वभावानें, ।
पूर्वी [२४]वज्री भ्याला त्याच्या दारुणतपःप्रभावानें. ॥ १

---

१. नीति. २. अवशिष्ट चार पुत्र. ३. शत्रुरूप सर्प. ४. मौनरूप आस्तीक नामक ऋषीचे भक्ताच्या ठिकाणीं. ५. दंश, चावा. ६. महामुनीचें. (व्यासाचें.) ७. साधूंच्या आशीर्वादानें. ८. सरोबरानें. ९. साधूंच्या आशीर्वादासपात्र. १०. कल्याणकर स्वभाव ज्याचा. ११. फार दिवस. (रात्रींचा समूह.) १२. भीम. १३. वासुकिनें. १४. कुंतिभोजराजाची कुलपताका कुंती तिला. १५. कापुरानें. १६. त्या मातावंधूंच्या चित्तरूप चातकाचें असुख (दुःख). १७. अमृत-प्राशनादिक जी घडलेली गोष्ट तीच मेघ. १८. गैरसावधपणानें. १९. दुर्योधन. २०. विदुरमत हेंच कवच (चिलखत) त्याला. २१. दुर्योधनादिक कपाळकरंट्या खलांच्या वचनाला. २२. कृपाचार्यांचा पिता. २३. धनुर्वेदनिपुण. २४. वज्र धरणारा. (इंद्र.)

पाठविली सुरकन्या जानपदी [1]स्वस्तडागनक्रानें, ।
त्याच्या उग्रतपाला [2]विघ्ने करावा म्हणूनि शक्रानें. ॥ २
तो [3]बाणधनुष्पाणी मुनि [4]जानपदीकटाक्षशरपातें, ।
वातें तरुसा, कांपे, धैर्य मनें, चाप सोडिलें हातें. ॥ ३
प्रथम सशर चाप गळे, त्यावरि [5]तद्वीर्यही गळे [6]क्षिप्र. ।
होतां विघ्न, स्वाश्रम सोडुनियां जाय तो महाविप्र. ॥ ४
मुनिवीर्य [7]शरस्तंबीं पडतां होय द्विधा [8]सुता सुत तें. ।
गर्भाशयीं न वसतां दिव्याकृतिलाभ [9]सत्कृतें सुततें. ॥ ५
[10]मृगयागत शांतनुच्या तें मिथुन [11]चमूचरें अरण्यांत, ।
अवलोकिलें मुनीच्या स्थानांत, ख्यात जो [12]शरण्यांत. ॥ ६
दर्भासन[13]कृष्णाजिनवल्कलशरचाप[14]साहचर्यानें, ।
तें [15]मुन्यपत्ययुग हें निश्चित केलें सुबुद्धिवर्यानें. ॥ ७
भेटविलें शांतनुला, तेणें [16]मुनिवीर्यजात जाणोनी, ।
परिपाळिलें कृप कृपी नामें ठेउनि गृहासि आणोनी. ॥ ८
येउनि निजाश्रमातें तोहि शरद्वान् महामुनि ज्ञानी, ।
जाणे शांतनुसदनीं स्वापत्याच्या स्थितिप्रति ध्यानीं. ॥ ९
भेटोनि कृपसुताला तो [17]स्वधनुर्वेद [18]दाय दे तात. ।
पुत्रासि जोडिलें धन, जेंवि सुखें बाप माय देतात. ॥ १०
गुरुच्या अनुग्रहें कृप अभ्यासें फार न पडतां खेदीं, ।
[19]परमाचार्यत्वातें पावे तो स्वच्छधी धनुर्वेदीं. ॥ ११
भीष्में कौरव पांडव शिष्यत्वें त्यासि अर्पिले विधिनें. ।
ते बाळ धनुर्वेदीं सर्व पढविले कृपें कृपानिधिनें. ॥ १२

---

१. स्वर्गरूप तळ्यांतील नक्र (ग्राह) जो शक्र त्याणें. २. हा शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे. ३. बाण व धनु हातांत आहेत ज्याच्या तो. ४. जानपदीच्या कटाक्षरूप शरांच्या प्रहारानें. ५. रेत, शुक्र. ६. सत्वर. ७. शरनामक तृणसमूहीं. ८. मुलगी आणि मुलगा. ९. सुतत म्ह० अतिविस्तृत अशा पुण्यकर्मांनें (घडला.) १०. शिकारीकरितां आला जो शांतनुराजा त्याच्या. ११. सैन्यांतील मनुष्यानें, सेनाचरानें. १२. शरणागताचें संरक्षण करण्याविषयीं जे दयाळु त्यांत (प्रसिद्ध). १३. कृष्ण म्ह० कृष्णसार (काळवीट) त्याचें अजिन (कातडें). १४. जवळ असण्यानें. १५. ऋषीचें अपत्यद्वय. १६. ऋषीच्या वीर्यापासून झालेलें. १७. आदान, संधान, विमोक्ष आणि संहार असा चतुर्विध धनुर्वेद. १८. पितृधन. १९. श्रेष्ठ आचार्यपदवीतें.

अध्याय बेविसावा.

जाय भरद्वाज मुनी गंगाद्वारीं करावया स्नान. ।
होय घृताची[1]दर्शन, तेथें तों तेंचि लागलें ध्यान. ॥ १
सौंदर्य[2]गुणोत्कर्षें फारचि शोभे, जसी रति[3], घृताची[4]. ।
तद्रूपें हृदयाची होय जसी, पावकें[5] गति घृताची[6]. ॥ २
पावे कामविकारें तत्काळ अमोघ रेत जें पतन, ।
द्रोण[7]कलशमखपात्रीं मुनिनें तें तेज ठेविलें जतन. ॥ ३
स्वात्युदकें[8] शुक्तिपुटीं[9] होताहे जन्म जेंवि मोत्याचें, ।
मुनिवीर्यें मखपात्रीं मुनिजन्म, द्रोण नांव हो त्याचें. ॥ ४
पढला सांग[10] श्रुति[11] तो निज[12]पितृशिष्याग्निवेशमुनिजवळी. ।
अग्न्यस्त्रासि शिके, जें रिपुसि, कळिसि रामनामसें, कवळी. ॥ ५
मित्र भरद्वाजाचें पृषत[13] नृप, तसें तदात्मज द्रुपद ।
द्रोणाचें, अध्ययनीं गुरुचें आराधितां सुरद्रुपद[14]. ॥ ६
जाय भरद्वाज मुनी स्वर्गातें, पृषतही, मग प्राज्य[15]. ।
उत्तरपांचाळांचें द्रुपद करी धर्मनीतिनें राज्य. ॥ ७
तप करितां पितरांची आज्ञा झाली म्हणोनि तो द्रोण ।
विधिनें वरी कृपीतें. न करील गुरूक्त[16] जाणता कोण? ॥ ८
प्रसवे कृपी सुतातें. शब्द करी उपजतां तयापरि तो ।
उच्चैःश्रवा सुरांचा हय हेषेतें[17] जयापरी करितो. ॥ ९
अश्वत्थामा ऐसें नाम तया ठेविलें असें झालें. ।
त्यावरि त्या द्रोणाच्या कर्णाप्रति परशुरामयश[18] आलें. ॥ १०
कीं तो यथेष्ट देतो सद्विप्राकारणें[19] स्वधन कांहीं ।
दैन्यं[20] उरों देत नसे संप्रति बहुमूल्यरत्नकनकांहीं. ॥ ११

---

१. देवांगनाविशेष. २. सौंदर्यगुणाच्या अतिशयानें. ३. कामपत्नी. ४. अप्सराविशेष. ५. अग्नीनें. ६. तुपाची. ७. द्रोणकलशसंज्ञकयज्ञपात्रीं. ८. स्वातिनक्षत्राच्या उदकानें. ९. शिंपीच्या पोटीं. १०. शिक्षा, कल्प, व्याकरण, छंदस्, ज्योतिष आणि निरुक्त या सहा वेदांगांसह. ११. वेद. १२. आपल्या बापाचा शिष्य जो अग्निवेश नामा मुनि त्याजपाशीं. १३. द्रुपदाच्या पित्याचें नांव. १४. कल्पवृक्षरूप चरण. १५. मोठें. १६. गुरुकथित. १७. अश्वशब्द. (खिंकाळणें.) १८. जामदग्न्य. १९. उत्तम ब्राह्मणांला. २०. विपत्ति.

दिव्यास्त्रांचा दाता मूर्तधनुर्वेद नीतिशास्त्रज्ञ, ।
जेणें अगणित केले स्वभुजबळें सांग [1]रणमहायज्ञ.' ॥ १२
ऐसें परिसुनि जाय द्रोण [2]महेंद्राचळीं तया भेटे. ।
ज्याचे विशिख[3] [4]क्षत्रीं व्याघ्रीचे [5]अविकुळीं जसे [6]पेटे. ॥ १३
सांगोनि नाम गोत्र, [7]प्रांजळि वंदूनि तत्पदें, राहे. ।
[8]वाग्युद्धदानशूर प्रभु राम द्रोणमुनिकडे पाहे. ॥ १४
सर्वस्वें प्रिय पोष्य ब्राह्मण ज्या अद्भुतप्रभा [9]वपुसे ।
'वद इच्छा काय' असें द्रोणाला तो [10]महाप्रभाव पुसे. ॥ १५
तो भारद्वाज म्हणे, 'इच्छितसें मी अनंत धन, दात्या! ।
व्हावी तुझ्या प्रसादें तुज मज पाहोनि लाज [11]धनदा त्या.' ॥ १६
राम म्हणे, 'विप्रजना दिधलें [12]सर्वस्व, [13]कश्यपा [14]अवनी. ।
अस्त्रें शरीर आहे, अन्य किमपि राहिलें नसे [15]भवनीं. ॥ १७
यांत तुला सत्पात्रा! द्यावें म्यां काय बोल [16]आशु कसा? ।
'द्या दिव्यास्त्रेंचि' असें द्रोण द्विज [17]मंजु बोलिला शुकसा. ॥ १८
अस्त्रें समग्र दिधलीं; [18]सरहस्यव्रत दिल्हा धनुर्वेद. ।
केला [19]स्वरूपचि परि [20]छात्रें भक्त्यर्थ उरविला भेद. ॥ १९

अध्याय तेविसावा.

मग भेटोनि द्रुपदा, द्रोण म्हणे, 'मी तुझा सखा पहिला.' ।
दे क्षोभ [21]शब्द तो त्या, दंड जसा स्पर्शतां खळा अहिला. ॥ १
[22]पार्षत म्हणे, 'दरिद्रा! तूं राजाचा सखा कसा? मुग्धा! ।
[23]मित्रें सधन सधनाचें साजे, गोदुग्ध मित्र गोदुग्धा. ॥ २

१. युद्धरूप मोठे याग. २. महेंद्र नामक पर्वतीं. उत्तरसरकार आणि ओरिसा प्रांत यांपासून गोंडवणापर्यंत जी पर्वताची ओळ (सांखळी) आहे तीच हा पर्वत होय असें म्हणतात. ३. बाण. ४. क्षत्रियीं. ५. मेंढ्यांच्या कळपामध्यें. ६. बच्चे. ७. सन्मानपूर्वक हात जोडून. ८. वाणी, युद्ध, आणि दान यांच्या विषयीं शूर. (बोलण्यांत, युद्धांत, आणि धर्म करण्यांत शूर असा भाव.) ९. शरीरसे. १०. जामदग्न्य. ११. कुबेराला. १२. सकल धन. १३. कश्यपमुनीला. १४. पृथ्वी. १५. गृहीं. १६. शीघ्र. १७. मंजुळ. १८. रहस्य (इतरांस न समजूं देण्याचे मंत्र) आणि व्रत (पाळण्याचे नियम) यांसह. (धनुर्वेदाचें रहस्य सांगून तें राखण्याचे नियम सांगितले, असा भाव.) १९. स्वसमान, आत्मतुल्य. २०. शिष्यें. २१. 'सखा'शब्द. २२. पृषतापुत्र द्रुपद. २३. हा नपुंसकलिंगी शब्द आहे.

न करुनि विचार वदतां पडतें शोकांत मानस, [१]ख्यातें, ।
विद्वत्वें सधनत्वें तुल्यें लोकांत मान सख्यातें. ॥ ३
झालें [२]जीर्ण विसर [३]जें, कोण तया [४]मंदनायका! पुसतो? ।
[५]गतरंगसुगंध जुना पावे सन्मान काय कापुस तो? ॥ ४
[६]श्रोत्रियसख अश्रोत्रिय, शूरसख [७]क्लीब, [८]सुकविसख अकवि, ।
आम्हां असें नसे [९]श्रुत; हंससख न [१०]मानसस्थही बक वी[११]? ॥ ५
बहु बडबडे असें, दे मद्य तसें, त्यासि भाग्य [१२]मत्तत्व. ।
मुनि मनिं म्हणे, 'न करितां [१३]परिभव, न कळेल यासि [१४]मत्तत्व.' ॥ ६
मुनि त्या अपमानातें [१५]घोंटी, जेंवि [१६]त्रिलोचन [१७]गरातें. ।
[१८]किमपि विरुद्ध न वदतां, गेला तो [१९]हस्तिनाह्वनगरातें. ॥ ७
राहे गुप्त कृपगृहीं द्रोण; [२०]तदात्मज [२१]सुशीळराशि कवी, ।
पार्थास कृपानंतर अस्त्रें, कोणासि न कळतां, शिकवी. ॥ ८
ते कुरुकुमार करितां नगरीबाहेर जाउनि क्रीडा, ।
[२२]निरुदककूपपतितनिजवीटोद्धृत्यपटु पावले [२३]व्रीडा. ॥ ९
ते वृद्ध कृश श्याम द्रोण ब्राह्मण [२४]अदूर पाहोनी ।
निजवीटोद्धारार्थ प्रार्थिति, भंवते उभेचि राहोनी. ॥ १०
द्रोण म्हणे त्यांसि, 'तुम्ही भरतकुळज कीं, [२५]कृतास्त्र कीं, तरि ती ।
वीटा न निघे, धिग्! धिग्! गुण तेचि [२६]स्वेष्टसिद्धि जे करिती. ॥ ११
वीटा तसी [२७]स्वमुद्रा टाकुनि मी काढितों [२८]ईषीकांहीं. ।
साहित्य परि करावें प्रेमें मद्भोजनाविषीं कांहीं.' ॥ १२
धर्म म्हणे, 'अस्मद्गुरु कृप, तदनुमतें तुम्हांसही भिक्षा ।
शाश्वत मिळेल, दावा वीटा काढूनि अद्भुता शिक्षा.' ॥ १३

---

१. प्रसिद्धें. २. जुनें. ३. सख्य. ४. मूर्खशिरोमणे. ५. ज्याचा रंग आणि सुगंध गेला आहे तो (कापुस). ६. वेदवेत्त्या ब्राह्मणाचें मित्र. ७. नपुंसक. ८. शहाण्याचें मित्र. ९. ऐकिलेलें. १०. मानससरोवरीं रहाणारा. ११. पक्षी. १२. उन्मत्तपणा. १३. पराभव, पाडाव. १४. माझें तत्व (तेज). १५. गिळी. १६. त्रिनेत्र शंकर. १७. विषातें. १८. अल्प देखील. १९. हस्तिनापुरातें. (हस्तिना आहे आह्वा म्ह० नाम ज्याची तें.) २०. त्याचा पुत्र अश्वत्थामा. २१. सत्स्वभावनिधि. २२. उदकरहित विहिरीमध्यें पडलेल्या आपल्या वीटेला वर काढण्याविषयीं अकुशल. २३. लज्जा. २४. समीप. २५. अस्त्रज्ञ, अस्त्रविद्या शिकलेले. २६. स्वीय इष्टार्थाची सिद्धि. २७. आपली आंगठी. २८. इषिका म्हणून एक प्रकारचें तृण आहे. यास कसाड, कसई, कास, असें म्हणतात. त्याच्या अभिमंत्रित काड्यांनीं.

हास्य करूनि **द्रोणें** त्या शशि[1]कुळजांसि द्यावया तुष्टी ।
कूपांत ईषीकांची[2] अभिमंत्रण[3] करुनि सोडिली मुष्टी. ॥ १४
ऐकीचें[4] मुख शिरलें वीटेमध्यें, तिला दुजी जडली, ।
तिसरी तीस, चतुर्थी तिजला, ऐसी परंपरा घडली. ॥ १५
बाहेर काढिली ती वीटा तत्काळ, जेंवि पात्र गळें. ।
स्वरभंग[5] त्यांत[6] वरिला त्या **पार्थाच्या** मुहूर्तमात्र गळें[7]. ॥ १६
अभिमंत्रित शर सोडुनि मुद्राछिद्रांतरीं[8] तया शिरवी, ।
वरि अंगुलीयकातें[9] ओढी किरणें जसें पयांशि[10] **रवी**. ॥ १७
त्या मंत्रचमत्कारें प्रमुदित होउनि, कुमार ते प्रणती[11] ।
करुनि प्रेमें, 'सांगा निज नाम ग्राम कुळ' असें म्हणती. ॥ १८
द्रोण म्हणे, 'सांगा हें **भीष्माला** ज्ञान[12]भगनदीपाला. ।
जाणेल तोचि लोकीं; विदित[13] नसे काय गंग[14]नदीपाला.' ॥ १९
बाळमुखें तें कळतां, **भीष्म** म्हणे **परशुराम** कीं **द्रोण** ।
आला असेल भाग्यें, लोकीं तिसरा असा कृती[15] कोण?' ॥ २०
श्रीगुरु[16]सम गुरु[17]बंधु प्रेमें भेटोनि निवविला **भीष्में**. ।
जैसा मयूर मेघें जो तापविला सुदुःसहें ग्रीष्में. ॥ २१
आणूनि राजसदनीं, पूजुनि होऊनि सानुराग[18] मनीं, ।
भीष्में तयासि पुसिलें कीं, 'सांगा हेतु कोण आगमनीं?' ॥ २२
द्रोण म्हणे, 'परिसावें त्वां, सांगावें तुलाचि सभ्यास. ।
द्रुपदास मजहि करवी चापीं गुरु अग्निवेश[19] अभ्यास. ॥ २३
गुरुबंधु सखे आम्ही होतों गुर्वाश्रमांत, वीरमणे[20]! ।
तेव्हां मजला ऐसें **पांचाळ द्रुपद** गौरवूनि म्हणे. ॥ २४
'जेव्हां काय मज सख्या! **द्रोणा**! देईल राज्यपद तात, ।
तेव्हां तद्भोक्ता[21] तूं, आण तुझी, कुळज[22] सत्य वदतात.' ॥ २५

---

१. चंद्रवंशजातांस. २. कासतृणाची. ३. मंत्रसंस्कारित करून. ४. एका इषीकेचें. ५. गहिंवर. ६. त्या मुलांत. ७. गळ्यानें, कंठानें. ८. आंगठीच्या छिद्रामध्यें. ९. मुद्रिकेतें. १०. उदकातें सूर्य आपल्या किरणांनीं समुद्राचें उदक आकर्षून घेतो ही सुप्रसिद्ध गोष्ट आहे. ११. नमस्कार. १२. ज्ञानरूप ऐश्वर्याच्या सागराला. १३. ज्ञात. १४. सूर्याला. १५. कुशल. १६. गुरु परशुराम त्यासारखा. १७. द्रोण. १८. प्रीतियुक्त. १९. ऋषिविशेष. २०. हे वीरश्रेष्ठा. (भीष्मा.) २१. त्या राज्याचा भोक्ता (उपभोग घेणारा.) २२. कुलीन पुरुष.

गेला पढोनि, झाला नृप[1] तो, झालों गृहस्थ मी, राया! ।
फळली[2] सुतरत्नफळें त्यावरि माझी कृपी सती जाया. ॥ २६
धनिकापत्यकृतपयःप्राशन[3] पाहोनि, पुत्र पेय[4] मागे. ।
पिष्टोदकें[5] ठकवितां, तें माझ्या शल्य काळजा लागे. ॥ २७
पिष्टोदकपानमुदित[6] सुत धनिकसुतांत[7] चपळपद नाचे. ।
मोहिति[8] मज क्षणक्षण त्यांच्या[9] उपहासशब्द[10] वदनाचे. ॥ २८
बहु धन असो नसो, परि एक असावें गृहीगृहीं[11] दुभतें. ।
द्यावें सुतार्थ शुद्धापासुनि गोदान, सन्मतें[12] शुभ तें. ॥ २९
फिरलों बहु कीं, 'संतति पटु[13] तसि गोदानदी न ताराया.' ।
परि विधि[14] मज दे मिळवूं जातां गोदान दीनता[15], राया! ॥ ३०
स्मरलें स्वसखद्रुपदस्नेहवचन[16] मज म्हणोनि मग, राहो ।
यत्नांतर[17], करुनि असा निश्चय, गेलों तदीयनगरा हो! ॥ ३१
भेटोनि तया वदलों, 'पूर्वींचा मी सखा' असें नातें. ।
जें तद्दत्तोत्तर[18] तुज सांगाया योग्यसें असेना तें. ॥ ३२
परि न कथितां भल्याला हृत्ताप[19] उणा न होय, शांतनवा[20]! ।
तें ऐकुनि साहेसा कोण असा सज्जन प्रशांत नवा? ॥ ३३
धिक्कारिति अज्ञ जसे मागतया[21] भीक सर्वदा 'भणगा,[22]' ।
मज धिक्कारी, हृदयीं झाले ते शब्द सर्व दाभण, गा! ॥ ३४
वदला असे असें कीं, मी सख्यानर्ह[23] मंद, राहो तें. ।
स्मरतां बहु दुःख मनीं, भीष्मा! खळजलधिमंदरा[24]! होतें. ॥ ३५

---

१. राज्याधिकारी. २. फलवती झाली. (प्रसवली.) ३. श्रीमंताच्या मुलानें केलेलें पयःप्राशन म्ह० दुधाचें सेवन. ४. दुग्ध. ५. पिष्टयुक्त उदकानें. (हें दुधासारखें पांढरें असतें.) ६. पिष्टयुक्त पांढऱ्या पाण्याच्या प्राशनानें आनंदित. ७. श्रीमंताच्या बालकांमध्यें. ८. मूढ करतात, वेडा करतात. ९. धनिकांच्या. १०. निंदाशब्द. ११. गृहस्थाच्या घरीं. एथें 'गृहीगृहीं' हा अग्राह्य समास आहे. तेव्हां पंतांचा पाठ 'गृहीं गृहीं' म्ह० घरोघर, असा कदाचित् असेल. १२. साधूंच्या मताप्रमाणें. १३. समर्थ. १४. दैव. १५. 'परि गोदान मिळवूं जातां विधि मज दीनता दे' असा अन्वय. १६. आपला मित्र द्रुपद त्याचें स्नेहभावाचें भाषण. १७. इतर खटपट. १८. त्यानें दिलेलें उत्तर. १९. हृदयसंताप. २०. हे भीष्मा. २१. मागणाऱ्याला. २२. भिकारी. २३. स्नेहास अनुचित. २४. दुष्टजनरूप सागराचें मंथन करणाऱ्या मंदरपर्वता. (भीष्मा.)

'देईन अन्न एका दिवसाचें मात्र, पाहिजे तरि घे,' ।
हें शेवटीं वदे, तों कोपागारीं मदीय चेत रिघे[1] . ॥ ३६

द्रुपदकृतनम्रत्वाची येतांचि प्रत्ययासि पुष्कलता,[2] ।
त्यजिली सभा तयाची म्यां, मधुपें[3] जेंवि घर्मशुष्क लता.[4] ॥ ३७

आलों त्वन्नगरा मी जोडाया अर्थ शिष्य यश कांहीं. ।
कर्णं विटविले माझे द्रुपदाच्या विरसवचनमशकांहीं.[5]' ॥ ३८

नायक वीरांचा श्रीद्रोण द्रुपदोक्त सर्व आयकवी. ।
'हाय'! कवी[6] तोहि म्हणे, ज्याच्या मातेशि[7] शंभुसायक[8] वी.[9] ॥ ३९

भीष्म म्हणे, 'राज्य तुझें, ज्याच्या प्राप्त्यर्थ देव नवसावे, ।
ते कुरुभाग्यें आले; हे पाय क्षणहि दूर न वसावे. ॥ ४०

सिद्धचि झालें सर्वहि कर्तव्य, असें तुम्हीं मनीं आणा. ।
बाणासन[10] विज्य[11] करा, कौरव दासानुदाससे जाणा.' ॥ ४१

प्रार्थुनि भीष्में द्रोण प्रासादीं[12] स्थापिला महेश्वरसा,[13] ।
केला मान असा कीं, मानी तो सत्य होय हे स्वरसा.[14] ॥ ४२

स्वपदीं कुमार सर्वहि शिष्यत्वें वाहतांचि शांतनवें, ।
शिकवी धनुःश्रुतिहृदय,[15] व्हाया यश, करुनि शत्रु शांत, नवें. ॥ ४३

शिष्यांसि द्रोण म्हणे, 'येतां तुमच्या कृतास्त्रता[16] आंगा, ।
मच्चिंतित कार्य तुम्ही सिद्धिप्रति पाववाल कीं सांगा?' ॥ ४४

त्यांत म्हणे अर्जुन, 'मी युष्मच्चिंतितसमस्तकार्यकर.[17] ।
दुःसाध्य काय? असतां या माथां विजयदायकार्यकर.[18]' ॥ ४५

प्रेमें रडे पडे गुरु पार्थगळां त्या तशा उदार पणें.[19] ।
आर्य[20] प्रसन्न होती नुसत्याहि हितोक्तिच्या[21] उदारपणें.[22] ॥ ४६

---

१. शिरे. २. अतिशयता. ३. भ्रमरें. ४. उन्हानें सुकलेली लता. ५. रसशून्य भाषणरूप डांसांनीं. ६. बुध. ७. गंगेसि. ८. विष्णु. ९. प्रसवता झाला. १०. धनुष्य. ११. ज्या म्ह० दोरी तिनें रहित. १२. राजवाड्यांत. १३. शिवसा. १४. आपली पृथ्वी. १५. धनुर्वेदाचें रहस्य. १६. अस्त्रविद्यानिपुणता. १७. तुम्हीं चिंतिलेलीं समस्त कार्यें करणारा. १८. यशोदायक आपला हात. १९. उदार म्ह० मोठा अशा पणानें म्ह० प्रतिज्ञावचनानें. २०. थोर, श्रेष्ठ. २१. कल्याणप्रदवचनाच्या. २२. उदारत्वानें.

अध्याय चोविसावा.

दिव्यास्त्रमानुषास्त्रें पार्था शिष्यासि पढवितां यश तें ।
ऐकुनि, राजसुतांचीं[1] त्या गुरुचे[2] वैरिति[3] भव्य[4] पाय शतें. ॥ १
गुरुच्या प्रसादपदवीप्रति शिक्षोत्कर्ष[5] साधुनी चढतां, ।
दुर्योधनसख कर्ण स्पर्धा पार्थासवें करी पढतां[6]. ॥ २
श्रीगुरु एका समयीं सूक्ष्ममुख[7] कमंडलु[8] स्वशिष्यकरीं ।
उदक भरुनि आणाया दे, पुत्रासहि म्हणे तसेंचि करीं. ॥ ३
जळ आणाया गुरुनें पुत्राच्याही करीं दिल्हा, पर तो ।
विस्तीर्णमुख[9] कमंडलु होता, कीं शीघ्र एक हा परतो. ॥ ४
उपदेशावें कांहीं पुत्रासि रहस्य न कळतां, अन्या ।
केली युक्ति असी कीं द्यावें भक्ता विचक्षणा धन्या. ॥ ५
ऐसें गंभीरतर[10], जें स्वगुरुमनोगत अगम्य तर्कशतें, ।
जाणे अर्जुन; मन कीं लवहि न गुरुचरणविरहकर्कश[11] तें. ॥ ६
तत्काळ वारुणास्त्रें[12] भरुनि स्वकमंडलूंत तो पाणी, ।
गुरुला गुरुपुत्रासह जोडी तद्दास्यकृतिकृती[13] पाणी[14]. ॥ ७
याहि शहाणपणें तो अर्जुन गुरुच्या मनांत शिरला, हो ! ।
ऐशा गुरुप्रियांचें पदरज एकहि कुळांत शिर लाहो. ॥ ८
कथिली रहस्यविद्या दोघांसहि, अधिक काय संतानें[15]? ।
संतानें[16] पुरवावी संश्रितवांच्छा[17] तशीच संतानें[18]. ॥ ९
त्या अर्जुनीं कराया, उपदेश करूनि, सूपकारातें[19] ।
सांगे एका समयीं गुरु, पाचारूनि सूपकारातें[20]. ॥ १०
‘जाईल जरि कदाचित् दीपक भीमानुजाशनावसरीं[21], ।
तरि मागतां म्हणावें, ‘अन्न न वाढीन या तमःप्रसरीं[22]. ॥ ११

---

१. वृष्णि, अंधक इत्यादिकांचीं. २. द्रोणाचे. ३. सेविति. ४. कल्याणरूप. ५. शिक्षेचें आधिक्य. ६. विद्याग्रहण करितां. ७. बारीक आहे तोंड ज्याचें असा. (सूक्ष्म मुख असल्यामुळें उदकपूर्ण होण्यास विलंब लागावा.) ८. कुंभ. ९. मोठ्या तोंडाचा (म्हणून सद्यः पूरणीय असा). १०. अत्यंत खोल. ११. गुरुचरणाच्या वियोगाविषयीं कृपण. १२. वरुण आहे देवता ज्याची असें अस्त्र त्यानें. १३. त्या गुरुच्या दास्यरूपकर्मी कुशल. १४. हात. १५. पुत्रानें. १६. साधूनें. १७. आश्रितजनाची इच्छा. १८. कल्पद्रुमानें. १९. उत्तम उपकारातें. २०. पाककर्त्यातें, आचाऱ्याला. २१. भीमाचा कनिष्ठ बंधु जो अर्जुन त्याच्या भोजनसमयीं. २२. गाढ अंधकारांत.

ग्रास मुखीं न पडेल, श्रमसील, तमांत जेवशील कसा?' ।
कोणीं कथिलें म्हणतां, वद कीं 'आहेचि लौकिकार्थ[1] असा.' ॥ १२
झालें तसेंचि दैवें; दीप कदाचित् प्रभंजनें[2] गेला. ।
अशन[3] करीतचि होता अर्जुन, तों तर्क तन्मनें केला. ॥ १३
'अत्यभ्यासें[4] जातो, तिळहि न चळतो, मुखींच पाणि[5] तमीं. ।
होईन शब्दवेधी[6] तिमिरांतहि, हें मनांत आणित मीं.' ॥ १४
तेव्हां पासुनियां तो स्वापसुखाची[7] करुनि कुत्सा[8], हें ।
ऐसें मनीं धरुनि, शरसंधान करी मनांत उत्साहें. ॥ १५
बाणगुणझणत्कारश्रवण करुनि, शयन सोडुनि, द्रोण ।
चित्तीं म्हणे, 'अहो! शरसंधान तमांत करितसे कोण?' ॥ १६
पाहे तों, तो अर्जुन आहे एकाग्रबाणसंधानीं; ।
आलिंगिला भुजांनीं, प्रोष्यागत[9] पुत्र जेंवि अंधांनीं. ॥ १७
आचार्य म्हणे, 'वत्सा! स्वयश यमाचाहि नायको दंड, ।
लोकीं असें करीन, त्वद्वनुला अन्य काय कोदंड[10]? ॥ १८
तुजसम दुजा धनुर्धर लोकीं कोठेंहि आढळेनाची, ।
करिन असें मी, मद्वरशब्द[11] ध्रुव[12] होय, हा ढळेनाची.' ॥ १९
गुरुच्या, सद्वर देतां, आवरिति न हात पादुका, नातें ।
तैसेंचि तें, समर्पी शिष्यासि महातपा दुकानातें[13]. ॥ २०
झाला तो गुरुसमचि, प्रथम गुणें जरिहि होय विंदु[14], पण ।
दुग्धाब्धिपरिष्वंगीं[15] त्याचें राहेल तोयबिंदुपण[16]? ॥ २१
कोणीएक निषाद[17] क्षितिपति होता सुवर्णधनु नामें. ।
तत्पुत्र एकलव्य द्रोणाप्रति ये धनुर्निगमकामें[18]. ॥ २२

---

१. लोकाचार. २. वायूनें. ३. भोजन. ४. दृढ अभ्यासानें. ५. हस्त. ६. पदार्थ प्रत्यक्ष दिसत नसून, त्याचा शब्द मात्र ऐकूं येत असतां त्या शब्दाच्या अनुसंधानानेंच त्या अप्रत्यक्ष पदार्थाचा बाणादि साधनांनीं वेध करणारा. ७. निद्रासुखाची. ८. निंदा. ९. प्रवास करून आलेला पुत्र. १०. धनुष्य. ११. माझें वरदानसंबंधी वचन. १२. स्थिर. १३. सकलविद्याभांडारातें. १४. ज्ञाता. १५. दुग्धसमुद्राच्या आलिंगनानें. १६. दुग्धसागरानें तोयबिंदूला आलिंगिलें असतां त्या बिंदूचें भिन्नत्व राहील काय? अर्थात् त्या तोयकणाचें भिन्नत्व राहणार नाहीं, असा भाव. १७. कोळी. १८. धनुर्वेद शिकण्याच्या इच्छेनें.

सर्वत्र समें सदयें गुरुनें त्या मात्र एकलव्याला ।
केलें नाहीं, जैसें विधिनें श्रुतिपात्र[1] एकल[2] व्याला. ॥ २३
गुरुनें आश्रय न दिल्हा, परि तो नैषादि[3] न विटला चित्तीं. ।
जों जों दुर्लभ तों तों, सस्पृह[4] वित्तेच्छु होतसे वित्तीं. ॥ २४
जाउनि वनांत, मृन्मय गुरु करुनि, धरूनि भावसारा[5] धी, ।
ताराधीश[6]चकोरन्यायें[7] तो साधु त्यास आराधी. ॥ २५
पुरवी इष्ट सकळही, न गुरुध्यानप्रभाव[8] नाचारी[9]. ।
इच्छाफळें न तैसी कल्पलता, जेंवि भावना[10] चारी[11]. ॥ २६
जें तो मृन्मय[12] गुरु दे, सत्यहि गुरु दे न अर्जुना फळ तें. ।
तद्भाव[13]चि सद्गुरु पटु[14] धन्य कराया जना, असें कळतें. ॥ २७
होउनि सुविद्य कुरुकुळनंदन गेले करावया मृगया. ।
गुर्वाज्ञा कीं, 'सत्वर माघारें बहु न मारितां मृग, या.' ॥ २८
मृगया करितां शिरला शशमृगहननार्थ काननीं कुतरा. ।
नैषादीप्रति पाहुनि[15], भुंके जाणों म्हणे 'धनू उतरा'. ॥ २९
श्वा[16] बहु भुंके पसरुनि तुंडीं[17] मांसास्थिवल्लभा[18], त्यांत ।
तो सप्त एकलव्य स्वशर भरी, जेंवि भल्ल[19] भात्यांत. ॥ ३०
पाहुनि पांडव म्हणती, 'ज्याचे श्वमुखांत सप्त शर भारी ।
आहे कुंती असाही, तरि मग कां हो! नसेल शरभारी[21]? ॥ ३१
क्षत तिळहि न होतां शर भरिले श्वमुखांत जेंवि भात्यांत. ।
ऐसा लाघवशिक्षानिधि[22] जो भुज, अतुळ वीर्यभा[23] त्यांत.' ॥ ३२
विस्मित होउनि पांडव शोधुनि भेटोनि त्या निषादास, ।
पुसती वृत्त, श्रवणें पावाया दुःसहा विषादास. ॥ ३३

---

१. श्रुति=वेद, कान. वेद शिकण्यास योग्य; (पक्षीं) कानानें ऐकण्यास योग्य. सर्प कानानें ऐकत नाहीं, पण डोळ्यांनीं ऐकतो, यास्तव त्यास 'चक्षुःश्रवा' असें नांव आहे. २. एकल्या (सर्पाला.) ३. निषादपुत्र. (एकलव्य.) ४. इच्छेनें युक्त. ५. भाव म्ह० भक्ति हेंच सार म्ह० बल जिचें अशी. ६. चंद्र. ७. चंद्रचकोरन्यायानें. चकोर पक्षी चंद्रकिरणसेवनानें उपजीवन करतो, असा कविसंकेत आहे. ८. गुरुध्यानाचें माहात्म्य. ९. दीनता. १०. भक्ति, ध्यान. ११. चारिले, खाऊं घातिले, देले. १२. मृत्तिकेचा. १३. त्याचा भक्तिभाव. १४. कुशळ. १५. कृष्णमलदिग्धांग आणि कृष्णाजिनजटाधर असें भयंकर रूप पाहून. १६. कुतरा. १७. मुखा. १८. मांस व हाडें हीं ज्याला प्रिय अशा. (तुंडाचें विशेषण.) १९. बाणविशेष. २०. कुशल. २१. शरभाचा वैरी. २२. हस्तचापल्यविद्येचा समुद्र. २३. पराक्रमतेज.

तो निजवृत्त कथी, तों अर्जुनमुख उतरलें विषादानें[1]. ।
मोहचि पावों पाहे त्या अपकर्षें[2] जसें विषादानें[3]. ॥ ३४
येउनि पुरासि अर्जुन, एकांतीं स्वगुरुला म्हणे, 'गुरुजी ! ।
स्मरती स्ववरोक्ति[4] तुम्हां मत्पंचप्राणपन्नगा[5] ! गुरु जी. ॥ ३५
'होसील तूंचि माझ्या शिष्यांत विशिष्टतर[6] असामान्य; ।
दुसरा कोणीहि जगीं छात्र[7] न होईल तुज असा मान्य.' ॥ ३६
ऐसा वर देउनि, कां मदधिक लोकाधिक स्वशिष्य दुजा? ।
केला निषादपतिसुत, सत्य असावा जगांत बोल तुजा. ॥ ३७
कौतुक विलोकिलें तें तैसें आह्मीं वनांत हो तात ! ।
शुष्यद्ध्रद[8] मीन तसे, विकळ मनोरथ मनांत होतात.' ॥ ३८
राहे उगाचि, संकटहर युक्ति बरी मनांत पाहूनी, ।
जाय वनातें गुरु, जो श्रिततापापह[9] अनातपाहूनी[10] ॥ ३९
सार्जुन भारद्वाज[11] प्रेक्षाया त्या पदानता[12] पावे. ।
पाहुनि म्हणे, 'छळें हे ऐसे नैष्ठिकें[13] कदा न तापावे. ॥ ४०
गुरुचरणव्रतनिष्ठा शरमोक्षाभ्यास[14] सारखा यामीं[15]. ।
ऐसा फार बरा हा; आलों व्हायासि परिखा[16] या मी.' ॥ ४१
ऐसें मनांत बोलत जाय गुरु, तया निषादतनयानें ।
वंदुनि पूजुनि केलें सर्वस्वनिवेदनादि विनयानें. ॥ ४२
द्रोण म्हणे, 'तूं माझा जरि शिष्य, दिजे मदीय वेतन[17] हो ! ।
केवळ विफळची दाउनि नम्रत्व, ऋजुत्व[18] मात्र वेत न हो.' ॥ ४३
नैषादि म्हणे, 'स्वामी ! जें मज सांगाल तें निवेदीन[19]. ।
प्रकटीकृतगुर्वर्थें[20] शिष्य, जसा बहुधनें निवे दीन.' ॥ ४४
द्रोण म्हणे, 'साधुजनीं कांहीं वेंचोनि अंग[21] ठावा[22] हो. ।
हा दक्षिण पाणि तुझा मच्चरणीं आजि आंगठा वाहो.' ॥ ४५

---

१. खेदानें. २. अप्रतिष्ठेनें. ३. विषभक्षणानें. ४. तुमची वरदानसमयींची उक्ति. ५. माझ्या पंचप्राणरूप सर्पा. ६. मोठी. ७. शिष्य. ८. शुष्क होणारा डोह ज्यांचा असे. ९. आश्रितांचा (दु:ख) संताप घालिवणारा. १०. छायेपेक्षां. ११. द्रोण. १२. पदीं नम्र झालेल्या (एकलव्याला.) १३ भक्तिमान्. १४. बाण सोडण्याचा अभ्यास. १५. रात्रीं,. १६. परका. १७. देणगी. (गुरुदक्षिणा.) १८. सरलत्व. १९. देईन. २०. प्रकट केलेल्या गुरूच्या अर्थानें (प्रयोजनानें). २१. शरीराचा अवयव. २२. प्रख्यात.

दारुणतर वचन असें परिसे, परि [1]सेक [2]नवसुधेचाची ।
[3]भावी, तद्यश सन्मतिचाहि हरी ताप, न [4]वसुधेचाची. ॥ ४६
जों गुरु म्हणे, 'मदिष्ट प्रतिपाळूनि, स्ववाक्य साच करीं.' ।
तोंचि च्छेदुनि घे तो स्वांगुष्ठ [5]व्याळदष्टसाच [6]करीं. ॥ ४७
साहे छळ आनंदें, वाहे अंगुष्ठ, वरि न तो पाहे, ।
राहे उगाचि, जाणों देउनि अत्यल्प लाजला आहे. ॥ ४८
केली सत्कीर्ति [7]दुणी, झाली [8]संधानशीघ्रताचि उणी. ।
तो काय घात म्हणती? [9]कीर्तिविघातासि आत्मघात [10]गुणी. ॥ ४९
शिष्यांतरींहि होतें प्रेम, तदपि [11]फाल्गुनींच एकीं तें. ।
कवि म्हणति चातकांतें घनभक्त जसे, तसे न [12]केकींतें. ॥ ५०
सर्वरहस्यज्ञाता गुरुपुत्र [13]रणप्रवीणधर्म सदा. ।
[14]असिधर 'गुरुसम' म्हणती, 'भीम सुयोधन धरील कोण गदा?' ॥ ५१
सर्वत्र [15]जिष्णु गुरुसा, त्या गुरुशिष्यांत एकमात्र उणें. ।
वृद्धत्व क्षत्रत्व त्यजुनि पहातां, समान सर्वगुणें. ॥ ५२
हरुनि सकळ तम, जोडा होउनि, [16]सर्वार्थभासक रवीला, ।
गुरुनें एक तरुशिरीं [17]शिष्यपरीक्षार्थ [18]भास करवीला. ॥ ५३
तेव्हां एक उतरला अर्जुन भेदुनि शिरींच भास [19]कसा. ।
सर्वांत मुख्य पार्थ, ग्रहनक्षत्रांत [20]विश्वभासकसा. ॥ ५४
द्रोणाच्या [21]जंघेलीं ग्रासी गंगेंत एकदा [22]यादें. ।
तैं रक्षी [15]जिष्णु; म्हणे गुरु, 'माझा [23]हाहि एक दायाद.' ॥ ५५
होतें ब्रह्मशिरोस्त्र[24]द्रविण द्रोणें जपोनि सांचविलें, ।
तें जिष्णुला दिल्हें, कीं तेणें [25]प्राणात्ययांत वांचविलें. ॥ ५६

---

१. सिंचन. २. नूतन अमृताचा. ३. मानी, समजे. ४. पृथ्वीचाच. ५. सापानें चावलेला असा. ६. हस्ताचे ठायीं. ७. दुपट. ८. शरसंधान करण्याची चपलता. ९. कीर्तीच्या नाशाला. १०. गुणी पुरुष आत्मघाताला घात म्हणत नाहींत, परंतु कीर्तिविघाताला घात म्हणतात, असा भाव. ११. अर्जुनाच्या ठायीं. १२. मयूरांतें. १३. युद्धनिपुणासारखे ज्याचे धर्म (गुण) तो. १४. खड्गधर. १५. अर्जुन. १६. सकल पदार्थ प्रकाशित करणाऱ्या. १७. शिष्यांची परीक्षा प्रहरणज्ञानांत घेण्यासाठीं द्रोणानें शिल्पिजनांकडून एक कृत्रिम भास पक्षी करवून वृक्षाग्रीं ठेविला, अशी कथा आहे. १८. पक्षिविशेष. याचे पंख नीलवर्ण असतात. १९. कसोटीस. २०. सूर्यसा. २१. पोटरीला. २२. जलजंतु, ग्राह. २३. अर्जुन सुद्धां. २४. धन. २५. प्राणसंकटांत.

अध्याय पंचविसावा.

गुरुनें एका समयीं [1]रंगीं भीष्मादि सर्व मेळविले. ।
शिष्यांकरवीं तेथें शिक्षित शस्त्रास्त्रखेळ खेळविले. ॥ १
रचिते झाले रंगीं शिल्पिवर विचित्र [2]मंच रायाचे. ।
गमति [3]विमान उतरले क्षितिवरि गगनांत संचरायाचे. ॥ २
स्त्रीपुरुषरत्नशोभित बहु मोठा रंग काय वर्णवतो? ।
भासे व्यक्त खवळला [4]यादोमणिकोटिकोश अर्णव तो. ॥ ३
[5]द्रोणेंदुशिष्यरश्मि [6]स्वगुणसुधा प्रकट करुनि दाखविती. ।
[7]प्रेक्षकलोकचकोरव्राताकरवीं यथेष्ट चाखविती. ॥ ४
झाले कुतुकफळांचे श्रीधर्मादिक [8]सुयोधनग दाते. ।
आले घेउनि [9]बळजळराशि वृकोदर सुयोधन गदा ते. ॥ ५
[10]सव्यापसव्य मंडळगति दोघे भ्रमति हे, मन गदांनीं ।
हर्षविति देखल्यांचें, अधनाचें जेंवि [11]हेमनगदानीं. ॥ ६
जन म्हणति, 'होय जैसा [12]परिवेष भ्रमवितां [13]अलातातें, ।
भीमगदेचाहि तसा; केला अभ्यास बहु भला [14]तीतें.' ॥ ७
'दुर्योधनाहि भंवता होय गदेचा तसाचि परिवेष. ।
[15]रविमंडळमध्यगहरिसम' म्हणतो 'यासि, भिन्न परि वेष.' ॥ ८
गांधारीला सांगे [16]पुत्रविचेष्टित पृथा, [17]नृपा [18]क्षत्ता. ।
[19]भीमोत्कर्षोक्ति तयां लागे दोघांसही जसी लत्ता. ॥ ९
म्हणती '[20]साधु वृकोदर! साधु सुयोधन!' असें तई कोणी. ।
रंगस्थितिच न केवळ, गडबडली [21]तद्विचेष्टितें [22]क्षोणी. ॥ १०
गुरुवचनें गुरुसुत त्यां दोघांच्या [23]क्षिप्र राहवी खेळा. ।
ते पूर्वपश्चिमाब्धी, जाणों [24]द्रोणात्मजोक्ति ते [25]वेळा. ॥ ११

---

१. विद्या शिकण्याचे स्थानीं, सभास्थानीं. २. पलंग. ३. हा शब्द सस्कृतांत पुल्लिंगी आहे. ४. यादें (जलचरें), मणि (रत्नें) यांच्या कोटी, यांचा कोश, संग्रहस्थान, सागर. ५. द्रोणरूप चंद्राचे शिष्यरूप किरण. ६. स्वगुणरूप अमृत. ७. प्रेक्षकलोक हाच चकोरसमूह त्याकरवीं. ८. चांगले योद्धे हेच वृक्ष. ९. बलसागर. १०. डावें उजवें. ११. सुवर्णपर्वताच्या दानानें. १२. मंडलाकार (तेजोविशेष). १३. ज्वलितकाष्ठातें, कोलिताला. १४. भीमानें. १५. सूर्यमंडळाच्या मध्यवर्ती विष्णूसारखा. १६. पुत्राचें आचरण. १७. धृतराष्ट्राला. १८. विदुर. १९. भीमाच्या उत्कर्षाचें भाषण. २० शाबास. २१. त्यांच्या (भीमदुर्योधनांच्या) कृतीनें. २२. पृथ्वी. २३. सत्वर. २४. द्रोणपुत्र जो अश्वत्थामा त्याचें भाषण ती. २५. सागरमर्यादा.

मग राहवूनि वाद्यें, द्रोण म्हणे, '[1]सूनुहूनि तो मजला ।
प्रियतर चकोर होउनि, [2]गुरुशस्त्रास्त्रामृतांशुला भजला. ॥ १२
जो जिष्णु विष्णुसा या रंगीं यावा, तयासि बोलावा, ।
भीष्मादि गुणज्ञजन प्रेक्षुनि [3]तद्भुजविलास डोलावा.' ॥ १३
गुरुचित्तज्ञ धनंजय ये [4]तनुधर [5]चापवेदसा, रंगीं ।
नुरवी भान स्वगुणें, गीतें गीतज्ञ जेंवि [6]सारंगीं. ॥ १४
भेदी सूक्ष्म कठिन [7]चल [8]लक्ष्यें पळतां बसोन तो यानीं, ।
निववि जनांसि गुणांनीं, मेघ जसा चातकांसि तोयांनीं. ॥ १५
अग्न्यस्त्रप्रमुखास्त्रें प्रकट करुनि, वारुणादिकें शमवी, ।
अर्जुन गुरुप्रसादें प्रेक्षकजनचित्तवृत्तिला रमवी. ॥ १६
होय अदृश्य प्रकट क्षणभरि अणु धरि शरीर पर्वतसें. ।
जनदृष्टिला मिळालें नाहींच कधींहि हर्षपर्व तसें. ॥ १७
तों त्या रंगद्वारीं [9]तलताडितबाहुशब्द दुःसहसा ।
झाला, जसा [10]अशनिचा होतो, पडतां शिळातळीं सहसा. ॥ १८
ते अल्प मयूराचे शब्द करिति, चकित [11]विमद [12]भुजगा जे. ।
दचके मनांत रंगीं जन, जेव्हां तो प्रचंड भुज गाजे. ॥ १९
द्वाराकडेचि सारे पाहति तों [13]मूर्त राशि तेजाचा, ।
कर्ण शिरे रंगीं, भुजरव [14]पविरव म्हणति लोक ते [15]जांचा. ॥ २०
[16]शत्रुमदाचा कर्णापासुनि व्हायासि अंत रंगांत, ।
अवकाश दे सुयोधन [17]सानुज तोषोनि [18]अंतरंगांत. ॥ २१
वाटे [19]रंगाब्जवनीं आला प्रेमासि [20]अर्क राखाया. ।
जनदृष्टि उड्या घालिति, बहु माशा जेंवि [21]शर्करा खाया. ॥ २२
[22]भानु नसो तो तेजें, [23]स्वस्तोत्र [24]हिमांशु कीं [25]दिवा करवी, ।
भीमार्जुन तेजस्वी, वृष नसतां, कीं तया दिवाकर वी. ॥ २३

---

१. पुत्रापेक्षां. २. गुरुचीं शस्त्रें आणि अस्त्रें हाच अमृतांशु (चंद्र) त्याला. ३. त्याच्या (अर्जुनाच्या) बाहूंचा खेळ (पराक्रम). ४. मूर्तिमान्. ५. धनुर्वेदसा. ६ हरिणीं (भान नुरवी). ७. चंचल. ८. निशाणें. ९. तालवृक्षांच्या (ताडांच्या) परस्पर प्रहाराप्रमाणें भुजताडणाचा ध्वनि. १०. वज्राचा. ११. गर्वरहित. १२. सर्पी. १३. मूर्तिमान्. १४. वज्रशब्द. १५. ज्याचा. १६. अर्जुनाच्या गर्वाचा. १७. धाकट्या भावांसह. १८. चित्तांत. १९. रंग म्ह० प्रेक्षागार हेंच कमलवन. २०. सूर्य. २१. साखर. २२. सूर्य. २३. आपलें स्तवन. २४. चंद्र. २५. दिवसास

[1]कर्ण द्रोणासि नमुनि, बंधुत्व न जाणतां, निजा अनुजा ।
[2]जिष्णुसि म्हणे, '[3]चमत्कृति दाखविल्या त्वां धरूनियां धनु[4]ज्या, ॥ २४
त्या दावितों, [5]चमत्कृतितटिनीशततातमेरुपर्वत मी; ।
भ्रमसी वृथा [6]पृथाप्रियपुत्रा! कां तूं शिरोनि [7]गर्वतमीं?' ॥ २५
द्रोण म्हणे, 'दावावे त्वांहि चमत्कार, बोल राहोंदे. ।
तव शस्त्रास्त्रचमत्कृतिरसपूरीं सर्व रंगीं वाहोंदे.' ॥ २६
कर्णें तसेंचि केलें कर्म; सुविद्या नेता न कां पावे? ।
सुर शेष डोलिले, मग [9]नरमस्तक कां तदा न कांपावे? ॥ २७
द्रवलें दुर्योधनमन पाहुनि [11]शस्त्रास्त्रयानपटुतेला. ।
[12]अंतर्मलिन द्रवतें चक्षु जसें पाहतांचि [13]कटुतेला. ॥ २८
भेटुनि म्हणे सुयोधन, 'बहु यश वाढोनि तें [14]तंगो कर्णा! ।
बापा! भला भला गा! [15]कार्मुकवेदत्रिनेत्रगोकर्णा! ॥ २९
हें राज्य तुझें भोगीं, भोग जसा [16]चंदनद्रु [17]भुजगांनीं, ।
आम्हीं वरिलासि, तुझे गाऊंदे हे गुणाढ्य भुज [18]गांनीं.'॥ ३०
कर्ण म्हणे, 'परि आहे एक मनीं काम, तो करीं पूर्ण. ।
वाटे मजसीं तिसऱ्या [19]पार्थासीं द्वंद्वयुद्ध हो [20]तूर्ण.' ॥ ३१
[21]कलिपुरुष म्हणे, 'कर्णा! [22]अरिमूर्धमहत्त्वकक्षदव डावा ।
त्वच्चरण [23]हो, दिगंतीं त्वां रि[24]पुजनमद समूळ दवडावा.' ॥ ३२
जिष्णु म्हणे, 'न [25]बाहातां जाताति महाजनांत दाटूनी, ।
बोलतिहि न बोलवितां ते घडिले मूर्खकोटि [26]वांटूनी. ॥ ३३

---

१. गीति २४-२५ युग्म समजावें. २. अर्जुनास. ३. चमत्कार. ४. ज्या, दोरी. ५. चमत्काररूप नद्यांचे शतकांचा पिता मेरु, असा मी. ६. अर्जुना. ७. गर्वरूप अंधकारांत. ८. सभा. ९. नम्र पुरुषाला. १०. 'मस्तक' शब्द पुल्लिंग. ११. शस्त्रास्त्रांच्या ज्या गति त्यांविषयीं जी कुशलता तिला. १२. ज्यांत मळ शिरला आहे असें. १३. तिखटपणाला, तिखट पदार्थाला. (भस्कापुरीला.) १४. टिको. १५. धनुर्वेद हाच त्रिनेत्र (शंकर) त्याचें वसतिस्थान जें गोकर्णक्षेत्र तसा. (हें क्षेत्र दक्षिणहिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. एथें शिवाचें आत्मलिंग असून माघमासीं महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते.) १६. चंदनवृक्ष. १७. सर्पांनीं. १८. गाण्यांत. १९. अर्जुनाशीं. २०. सत्वर. २१. दुर्योधन. (कलीच्या अंशरूपानें अवतीर्ण झालेला पुरुष.) २२. शत्रूंच्या मस्तकाचें जें महत्त्व तेंच गवत त्यांत वणव्यासारिखा. २३. होवो. २४. शत्रुगणाचा गर्व. २५. आह्वान केल्यावांचून. २६. चूर्ण करून.

कर्णा! [1]दंडक रुचला तुज फार तुझा, परंतु हा नीच. ।
सावध हो, नाहीं तरि, होईल प्राणकीर्तिहानीच.' ॥ ३४
कर्ण म्हणे, 'काय तुझें एथें, हा रंग सर्वसामान्य. ।
न वदें बहु, तुज बहुधा प्राणपरिचयहि न गर्वसा [2]मान्य. ॥ ३५
यावरि कटु वदतां, शिर उडवीन शरें, जसाचि चेंडु करें. ।
[3]आदिवराहपरिभव न करिजेल [4]स्वकुळनुतिवचें डुकरें.' ॥ ३६
ऐसें कर्ण वदे, तों गुर्वाज्ञेसह धनुर्लता पार्थ ।
स्वीकारी तेजस्वी; लोकीं वर्ते यशःप्रतापार्थ. ॥ ३७
पांचहि पांडव उठले; भरला उत्साह अंतरंगांत. ।
उठले कौरव शतही म्हणति तदा संत '[5]हंते' रंगांत. ॥ ३८
दैवानें दाखविले [6]समराडंबर वृथा, न नाश तदा. ।
परि सुतकलहारंभीं 'हाय' असें ये पृथानना शतदां. ॥ ३९
बुडवि [7]पृथापृथिवीला जेव्हां [8]मोहांबुनिधि महा खोल, ।
तिस उद्धरी [9]गुरुसुमतिदंष्ट्रेनें विदुरकवि[10]महाकोल. ॥ ४०
झाले [11]पांडवपक्षी द्रोण कृपाचार्य भीष्म उत्साहें. ।
थोरांसि नावडे, '[12]श्रितसाधुत्यागें घडेल [13]कुत्सा हें.' ॥ ४१
जों नाहींच सुतांचे [14]अन्योन्यास्त्रऱ्हदीं शर [15]विरोले, ।
बंधुत्व त्यजुनि, [16]सुतस्नेहें रिपुसे [17]सुरेश [18]रवि झाले. ॥ ४२
कृप कर्णासि म्हणे, 'हा [19]नृपसुत करणार तुजसवें युद्ध. ।
जे द्वंद्वयुद्धकर्ते वीर असावे कुळादिकें शुद्ध. ॥ ४३

---

१. रीति. २. तुला गर्व जसा मान्य नाहीं, तसा बहुधा प्राणपरिचय ही (प्राणाची आवड ही) मान्य नाहीं; तूं गर्व जसा तुच्छ समजतोस तसाच स्वजीवही समजतोस असें दिसतें, हा भावार्थ. ३. विष्णूच्या दहा अवतारांपैकीं तिसऱ्यास 'आदिवराह', 'यज्ञवराह' असें म्हणतात. याचें मुख डुकराचें आणि इतर शरीरभाग मनुष्यासारखे होते. विष्णूनें हा वराह अवतार घेऊन, हिरण्याक्ष दैत्यास मारून, समुद्रांत बुडणाऱ्या पृथ्वीचा उद्धार आपल्या दंताग्रानें करून तिला उचलून धरिलें, अशी कथा आहे. या अवतारी वराहाचा पराभव. ४. स्वकीय कुळाच्या स्तुतिवाक्यानें. ५. खेदार्थी. ६. युद्धाचे आवेश. ७. पृथारूप पृथ्वीला. ८. मोह हाच सागर. ९. महाबुद्धिरूप दाढेनें. १०. आदिवराह. ११. पांडवांच्या पक्षाचे. १२. आश्रित सुजनांचा त्याग केल्यानें. १३. निंदा. १४. परस्परांचे अस्त्ररूप डोहांत. १५. बुडाले. १६. अर्जुन आणि कर्ण. १७. इंद्र. १८. सूर्य. १९. अर्जुन.

गौरव[1] ह्यातें वाणी देवीहि[2] लिहों शकेचिना ज्याचें ।
गौरें[3] वहातें लोकीं यश, गांगस्रोतसेंचि[4] राजाचें. ॥ ४४
ते पूर्वज याचे, हा कौरव गौरवपदेंदुकुळजात,[5] ।
जाणे विश्व. तुम्हांही सांगावे सान्वय[6] प्रसू[7] तात. ॥ ४५
कोणाचें कुळभूषण तूं कर्णा! प्रथम हेंचि कळवावें. ।
भलत्यासींच नृपसुतें द्वंद्व करुनि शस्त्र यश न मळवावें.' ॥ ४६
वृषवदन[8] उतरलें, जैं कृपवाक्शर काळजांत खडतरले;[9] ।
मर्म उघडितां, मानी पुरुष बुडाले त्रपेंत,[10] जड[11] तरले. ॥ ४७
अंधसुत म्हणे, 'गुरुजी ! ज्याचा बहु सोसितो हिरा जाच, ।
न्यायें[12] तो सत्कुळजहि, सैन्यपतिहि, शूर तोहि राजाच. ॥ ४८
जरि[13] जिष्णु युद्ध न करी, तरि देतों राज्य अंगदेशाचें.[14] ।
या कर्णाचें यश हो झालें तें जेंवि अंगदेशाचें.[15]' ॥ ४९
ऐसें वदोनि करवी रंगीं राज्याभिषेक तो कर्णा. ।
भरिला सुहृदीं क्षण शिशुतृप्तिद[16] पीयूषरसचि[17] गोकर्णा.[18] ॥ ५०
कर्ण म्हणे, 'राज्य दिल्हें ऐसें तुज राजनंदना ! काय ।
द्यावें, सांग, गुणज्ञप्रीत्यधिक[19] गमे न चंदना कांय.' ॥ ५१
भूप म्हणे, 'अत्रुटिता[21] धारा सरळा जसीच तैलाची ।
यावज्जीव[22] असावी त्वन्मैत्री, स्थिति धरूनि शैलांची.[23]' ॥ ५२
दिधला सुयोधनाला सख्यवर सुतें[24] तसाचि सवित्याच्या.[25] ।
अतुळोदारत्वातें[26] गाती व्यासादि सर्व कवि त्याच्या. ॥ ५३
आला तशांत तेथें अधिरथ,[27] त्यातें करी नमन कर्ण. ।
तेव्हांचें कुतुक कथुनि रसिकीं प्रमुदित करीन मन कर्ण.[28] ॥ ५४

---

१. महत्त्व. २. सरस्वतीहि. ३. शुभ्र. यशाचा रंग शुभ्र आहे अशी कविप्रसिद्धि आहे. ४. गंगाप्रवाहासारखें. ५. महत्वाचें पद जें चंद्रकुल त्यांत उत्पन्न झालेला. ६. वंशासह. ७. माता. ८. कर्ण. ९. आदळले, खोंचले. १०. लज्जेंत. ११. अभिमानशून्य, मूर्ख. १२. शास्त्राप्रमाणें सत्कुलीन, शूर आणि सेनापति, ह्या राजांच्या तीन योनि गणल्या आहेत; म्हणजे हे तीन पुरुष राजे समजावे.(आदिपर्व, अ० १३८ श्लो० ३५ पहा). १३. कर्ण राजा नाहीं यास्तव. १४. अंगदेश हा भागलपुराजवळचा देश असें म्हणतात. १५. अंगदनामक वानराचा प्रभु (राम) त्याचें. १६. मुलांस तृप्ति देणारा. १७. दुग्धरस. १८. पात्रविशेष, जेणेंकरून बाळांला औषध पाजितात तें. १९. गुणज्ञ पुरुषाच्या प्रेमापेक्षां अधिक. २०. देह. २१. अखंडित. २२. जीव आहे तोंपर्यंत. २३. पर्वताची. २४. पुत्रें. २५. सूर्याच्या. २६. अनुपम औदार्यातें. २७. यालाच कर्ण हा नदींत सांपडला. २८. कान.

अधिरथ सूत, तदात्मज वृष, कळतां भाव तो तसा रंगीं, ।
भीम वदे, जो कर्णी [1]विभय, जसा [2]सिंहपोत [3]सारंगीं. ॥ ५५
'कर्णा! [4]वर्णाधम तूं [5]सूत, तुला [6]युद्धमृति नव्हे उचिता. ।
[7]परगति पावों पाहसि, परि पदरीं फार पाहिजे शुचिता. ॥ ५६
उचित [8]प्रतोदधारण तुज, चापग्रह नव्हे उचित रंगीं. ।
[9]पावनता निजधर्मी, गंगेच्याहि न तसी शुचि [10]तरंगीं. ॥ ५७
[11]अंगविषयराज्यपदीं अनुचित तूं, रे! नराधमा! उतरें. ।
पात्र [12]पुरोडाशाला झालें आहे कधीं तरी कुतरें?' ॥ ५८
[13]उपहास असा परिसे, परि [14]सेनानीपिता तसा साहे. ।
[15]किंचित्प्रस्फुरिताधर कर्ण [16]व्योमस्थ रविकडे पाहे. ॥ ५९
[17]कल्यंश म्हणे, 'भीमा! या बोलें मानितील विषम दहा. ।
न वदावें कटु पटुनें, बोले [18]भुजवीर्यगर्वविषमद हा. ॥ ६०
'जे जे कोणी क्षत्रिय त्यांसि बळ ज्येष्ठ' हेंचि [19]सन्मत रे! ।
अबळ न [20]अहितोदधिला घेउनिहि क्षत्रियांत जन्म तरे. ॥ ६१
जेथें बळ गुण तो [21]गुरु; शूर बळा मानिती, न [22]कुलशीला. ।
गुणहीन [23]शाल्मलि वृथा, लघु न म्हणति, भजति साधु तुळशीला.॥ ६२
शूराच्या [24]तटिनीच्या ठेविति सुगुणीं न मन कवि [25]प्रभवीं ।
भजति स्वगुरुत्वेंचि न; पाहति कुलशील [26]कनकविप्रभवीं. ॥ ६३
उदंकापासुनि झाला [27]वैश्वानर, [28]कृत्तिकासुत [29]स्कंद. ।

---

१. विशेष भयप्रद. २. सिंहबालक. ३. हरिणांच्या ठायीं. ४. जातीनें नीच. ५. सारथी. (ब्राह्मणीच्या ठायीं क्षत्रियापासून झालेला.) ६. युद्धामध्यें मरण. ७. उत्तम गति. ८. चाबुक धरणें. ९. पवित्र करण्याची शक्ति. १०. शुभ्रवर्ण लाटांमध्यें. ११. अंगदेशाच्या राज्यपदीं. १२. हविर्भागाला. १३. निंदा. १४. सेनानी म्ह० देवांचा सेनापति कार्तिकस्वामी त्याचा पिता शिव (विषदाह सोशी तसा). १५. किंचित् स्फुरण पावणारे ओष्ठ ज्याचे असा. १६. आकाशवर्ती. १७. कलीचा अंश दुर्योधन. १८. बाहुबलाचा गर्व हेंच विष, त्या विषाचा मद म्ह० कैफ, अंमल. १९. साधुजनांचा अभिप्राय. २०. शत्रुसागरास. २१. उत्तम, श्रेष्ठ. २२. वंशाला अथवा स्वभावाला. २३. वृक्षविशेष. (शेंवरी.) २४. नदीच्या. २५. मूलस्थानीं. (आदिपर्व, अ० १३७ श्लो० ११ पहा.) २६. सुवर्ण आणि ब्राह्मणपुत्र यांच्या ठिकाणीं. २७. अग्नि. २८. कृत्तिकासंज्ञक नक्षत्रांचा पुत्र. त्या (कृत्तिका) सहा होत्या. त्यांनीं गंगेनें टाकलेल्या गर्भास घेऊन वाढविलें, म्हणून यास 'कार्तिकेय' म्हणतात. त्या गर्भास सहा मुखें होऊन त्यांनीं सहाही कृत्तिकांचें स्तनपान केलें; म्हणून त्याचें नांव 'षण्मुख' पडलें. २९. कार्तिकेय.

मंद प्रताप त्याचा म्हणेल तो मूर्खतालताकंद[1]. ॥ ६४
असुरांसि जो स्वतेजें घूकांला[2] अर्कसाचि[3] तापवितो, ।
झाला दधीचिमुनिच्या अस्थींपासूनि जन्मता[4] पवि[5] तो. ॥ ६५
ज्याच्या यशोमृतरसें[6] झाली आहे सदैव धौत[7] मही, ।
विश्वामित्र क्षत्रियपुत्र, शरस्तंबजात[8] गौतमही[9]. ॥ ६६
द्रोण गुरुहि कलशोद्भव[10], तुमचाहि प्रभव[11] मज असे कळला. ।
सांग स्वयोनिदोषें[12] तेजस्वी यांत कोण तो मळला ? ॥ ६७
सर्वसुलक्षणमंडित सुकवचकुंडल जगीं असामान्य ।
तेजोराशि[13] उपजला, वद दुसरा कोण रे ! असा मान्य ? ॥ ६८
प्राकृत[14] योषा[15] याची जननी, हें तों नयेच युक्तींत, ।
पिकतें मौक्तिक मुक्ताशुक्तींतचि[16] तें न अन्यशुक्तींत. ॥ ६९
प्रसवे व्याघ्रास[17] मृगी ? काय उकिरड्यांतही हिरा पिकतो ? ।
जरि वाढला कुळींही काकाच्या[18] काक काय रे ! पिक[19] तो ? ॥ ७०
स्वल्पा न अंगराज्या, समुचित हा सार्वभौमपदवीतें. ।
आज्ञाकरा[20] मज असें कर्णाचें भाग्य भावि वदवीतें. ॥ ७१
हें ज्याला मानेना तेणें म्हणतील जीप्रति ज्ञाते, ।
अत्युग्रा करुनि असी सिद्ध करावी रणीं प्रतिज्ञा ते. ॥ ७२
शत्रु उठावा आम्हांदेखत लावूनि अंघ्रि[21] चौपातें[22] ।
आम्हांसि वधूं[23], कीं हो[24] हतमस्तक[25] अस्मदंघ्रिच्या[26] पातें[27].' ॥ ७३
ऐसी रंगीं वदला धृतराष्ट्रकुमार तो यदा[28] वाणी, ।
हाहाकारें गर्जति तों रंगीं लोक तोयदांवाणी[29]. ॥ ७४

---

१. मूर्खस्वरूप वेलीचा कांदा. २. घुबडांला. ३. सूर्य. ४. तो पवि जन्मता झाला, असा अन्वय. ५. वज्र. ('पवि' शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे.) ६. कीर्तिरूप अमृताच्या रसानें. ७. स्वच्छ. ८. शरनामक गवताच्या राशींमध्यें झालेला. (अ० ९. गी० ५ पहा.) ९. कृपाचार्यही. १०. कलश नामक यज्ञपात्रांत जन्मलेला. (अ० २२ गी० ३-४ पहा.) ११. उत्पत्ति. १२. उत्पत्तिदोषानें. १३. कांतिनिधि. १४. क्षुद्र, नीच. १५. स्त्री. १६. मोत्यांच्या शिंपींत. १७. हेंच उदाहरण मूळग्रंथांत आहे. (आदिपर्व, अ० १३७ श्लो० १६ पहा.) १८. कावळ्याच्या. (कावळे कोकिलास वाढवितात हें सुप्रसिद्ध आहे. म्हणूनच कोकिलास 'परभृत' संज्ञा आहे.) १९. कोकिल. २०. आज्ञानुवर्ती, आज्ञेंत असणारा. २१. पाय. २२. मनुष्यातें. २३. वध करो. २४. होवो. २५. मारिलें आहे मस्तक ज्याचें असा. २६. आमच्या चरणाच्या. २७. पतनानें, प्रहारानें. २८. जेव्हां. २९. मेघासारिखे.

व्हावा रण, परि जाउनि अस्ता तो समय साधु रवि टाळी, ।
[1]क्रुद्धेक्षणांसि देउनि तेज [2]जगद्बांधवत्व न विटाळी. ॥ ७५
किति म्हणति, 'रंजवाया [3]वारुण्यबळेंसि [4]अर्यमा वळला.' ।
किति म्हणति, '[5]कलि न व्हावा म्हणउनि तेजस्विवर्य मावळला.' ॥ ७६
[6]अक्षत गृहासि गेले, सर्व करी कुशळ [4]अर्क, राहो तें; ।
[7]ज्ञातसुतपृथेसि तसें होय, जसें त्यजुनि [8]शर्करा होतें. ॥ ७७

अध्याय सव्विसावा.

द्रोण म्हणे शिष्यांसि, '[9]द्रविण किती वाहती [10]असु [11]ज्ञानी. ।
गुरु पूजूनि सुखविला सुज्ञानीं, दुखविला [12]असुज्ञानीं. ॥ १
द्या दक्षिणा असी कीं **द्रुपदाचा** सर्व गर्व खाणावा, ।
युद्धीं भग्न करावा, मग बांधुनि मत्समीप आणावा.' ॥ २
तें मान्य करुनि सर्वहि शिष्य, रथीं प्रथम बैसवुनि [13]गुरुला, ।
चढले स्वरथीं, स्वर्गीं तर्पाया [14]सद्यशोमृतें **कुरुला**. ॥ ३
[15]सानुज **सुयोधन** पुढें धांवे, त्या **पांडवांसि** सोडोनी, ।
व्हायास **कर्ण** आपण धन्य **द्रोणार्थ** कीर्ति जोडोनी. ॥ ४
शिरले **द्रुपदपुरींतहि** गमलें [16]जयमूळ काळ तो साचें ।
जि[17]**ष्णुमतें** गुरु राहे अंतर सोडूनि [18]अर्धकोसाचें. ॥ ५
जिष्णु म्हणे, 'पावति [19]गति इतर पशु न, त्या **पि**[20]**नाकिच्या** [21]पशुची. ।
गुरुजी ! पात्र शुचियशा या शिष्याचाचि एक [22]चाप शुची. ॥ ६
द्रुपद बळी, हे दुर्बळ, नाहीं येणार यांसि यश कांहीं. ।
[23]श्येनें कसा जिंकावा ? पक्षित्वमदें करूनि मशकांहीं. ॥ ७

---

१. क्रोधानें युक्त नेत्र ज्यांचे. २. जगाचें बंधुत्व. सूर्याला 'लोकबंधु,' 'लोकबांधव' अशी संज्ञा आहे. ३. पश्चिमदिशारूप स्त्रीला. ४. सूर्य. ५. कलह. ६. सुखरूप. ७. जाणिलें आहे सुताला (कर्णाला) जिनें त्या पृथेला. ८. साखरेला. ९. द्रव्य. १०. प्राण. ११. किती ज्ञानी द्रविण वाहती, (किती) असु (वाहती), असा अन्वय. कित्येक शहाणे लोक गुरुला धन वाहून संतुष्ट करतात, व कित्येक प्राणही वाहून संतुष्ट करतात, असा भाव. १२. मूर्खांनीं. १३. द्रोणाला. १४. उत्कृष्ट यशरूप उदकानें. १५. दुःशासन, विकर्ण, जलसंध, सुलोचन, युयुत्सु इत्यादि धाकट्या भावांसह. १६. तो काळासारखा द्रुपद राजा जयाचें मूळ असें वाटलें. १७. अर्जुनाच्या अभिप्रायानुरूप. १८. द्रुपदनगरापासून. १९. स्थिति, योग्यता. २०. महादेवाच्या. २१. नंदीची. २२. धनुष्य. २३. ससाणापक्षी.

होतील भग्न कौरव, मग आम्हीं दाखऊं निजबळाला. ।
आधिं [1]प्रबळपरकरें दुष्टांचा पाहिजे मद गळाला.' ॥ ८
हा [2]मंत्र मना आला; मग पांचा पांडवांसह द्रोण ।
मागें राहे. शिशुचें म्हणुनि न घे [3]सूक्त जाणता कोण? ॥ ९
[4]निजदेहपरिष्वंगीं मानावे अमृतगोळसे तातें, ।
म्हणुनि द्रुपदपुरातें पीडिति ते, जेंवि टोळ सेतातें. ॥ १०
परि अरि सकळ पळविले द्रुपदें समरांगणांत भेटोनी, ।
जेंवि [5]वृकव्याघ्रादिश्वापद [6]दहनें वनांत पेटोनी. ॥ ११
अरिबळभयार्त निर्भय केलें तें आपुलें पुर द्रुपदें. ।
अभय दिलें भीतांतें द्रोणें दासांचिया [7]सुरद्रुपदें. ॥ १२
धर्मासि गुरुसमीप स्थापुनि घेवूनियां तदाज्ञा [8]ते, ।
गेले द्रुपदनृपावरि त्याच्या उतरावया मदा ज्ञाते. ॥ १३
रथचक्ररक्षणीं [9]यम योजुनि तत्काळ [10]वैरितांपार्थ, ।
झाला द्रुपदमदातें [11]स्वशरशिखिमुखांत [12]वैरिता पार्थ. ॥ १४
भीम गदेतें घेउनि धांवे हो! [13]एकशृंग पर्वतसा, ।
गजमद जसा [14]हरिपुढें, त्याहिपुढें शत्रुसैन्यगर्व तसा. ॥ १५
भीमगदेतें अरिबळ, जैसें [15]मंडूककटक [16]उरगीतें, ।
भी, मग दे [17]तें [18]पाठ, व्योम भरिति तैं प्रसन्न सुर [19]गीतें ॥ १६
[17]पांचाळबळास न भी शिरतां तो, जेंवि सागरा मकर. ।
वाटे द्विजापराधें आलासे धरुनि राग [20]रामकर. ॥ १७
[21]वेदांतीसा अर्जुन, [22]रिपुभट [23]गौतमनयज्ञसे, नाशा ।

१. बलाढ्य शत्रूच्या हातानें. २. मसलत. ३. सुभाषित. 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम्' याचाच अर्थ पंतांच्या गीत्यर्धांत आहे. ४. आपल्या देहाच्या आलिंगनीं. ५. लांडगे. ६. अग्नीनें. ७. कल्पवृक्षरूप पद ज्याचें त्यानें. (द्रोणाचें विशेषण.) ८. पांडव. ९. जुळे मुलगे. (नकुळ सहदेव.) १०. शत्रुसंताप करण्यासाठीं. ११. आपल्या बाणरूपें अग्नीच्या मुखांत. १२. अर्पणकर्ता. १३. ज्याला एकच शिखर आहे अशा पर्वताप्रमाणें. १४. सिंह. १५. बेडकांचें सैन्य. १६. सर्पिणीला. १७. द्रुपदसैन्य. १८. पाठ दे म्ह० पळे. १९. गायनानें. २०. परशुरामहस्त. २१. वेदांत जाणणाऱ्या पुरुषासारखा. सकळ संसार मिथ्या असून चित्स्वरूप जो परमेश्वर तोच सत्य, हें वेदांतरहस्य जाणणाऱ्या पुरुषासारखा. २२. शत्रुपक्षीय वीर. २३. गौतममुनिविरचितन्यायशास्त्रपारंगत पुरुषांसारखे. वेदांताचे कोटिक्रम न्यायाच्या कोटिक्रमापेक्षां प्रबलतर आणि सुयुक्तिसाधित असल्यामुळें, वेदांतज्ञापुढें न्यायशास्त्रज्ञ जसा टिकाव धरूं शकत नाहीं, त्याप्रमाणें अर्जुनापुढें द्रुपदवीरसमूह टिकला नाहीं, हा भावार्थ.

तद्बळ[1] पावे, पूर्णा होय जयाची न यज्ञसेनाशा[2]. ॥ १८
[3]श्रीगुरुवराच्युतोद्धृतफाल्गुनगोवर्धनीं [4]द्रुपदशक्र ।
वृष्टी करि, परि झाले [5]कौरवगोपाळरोमहि न वक्र. ॥ १९
खंडुनि शस्त्रास्त्रातें लीलेनें अर्जुनें [6]अहीनकुळें ।
क्षीण[7]मद द्रुपद [8]धराधव धरिला, हो! जसा [9]अही [10]नकुळें. ॥ २०
[11]अर्जुनगरुडें [12]गुरुवरकार्मुकपक्षोत्थशस्त्रवातबळें, ।
उडउनि बळाब्धि धरिला भग्नमद[13]द्रुपददंदशूक पळें. ॥ २१
गिरिवर [14]हरिसा चढला क्षिप्र रथीं पांडुपुत्र [15]करवाळी, ।
द्रुपदासि धरी, जैसा [16]दशवदना [17]तन्मदांतकर वाळी. ॥ २२
मग तो भीमासि म्हणे अर्जुन देवूनि दुरुनि हाकेला, ।
'न वधावें कटक वृथा, परतावें, भूप भग्न हा केला.' ॥ २३
तें राजरत्न दुर्लभ, परि न करुनि फारसा उपाय [18]नतें ।
पार्थें आणुनि गुरुच्या चरणयुगीं अर्पिलें [19]उपायन तें. ॥ २४
द्रोण म्हणे द्रुपदातें, 'तूं माझा, मी तुझा, सखा पहिला. ।
आतां तरी म्हणों कीं [20]आक्रमिलें [21]एतदर्थ या [22]महिला. ॥ २५
द्रुपदा! तुज अभय दिल्हें, यावरि पावो तुझी न [23]तनु कंपा, ।
आम्हां ब्राह्मणतेजा न [24]विसंबे [25]क्षांति शांति [26]अनुकंपा. ॥ २६
[27]गुरुकुळवासी होतों, परि सख्य क्षीण जाहलें मग तें. ।
म्हणुन असुख अनुभविलें बहु म्यां [28]भवदीयदर्शनोपगतें. ॥ २७

---

१. त्या द्रुपदाचें सैन्य. २. द्रुपदाची आज्ञा. यज्ञसेन, पार्षत आणि पांचाल अशीं द्रुपदाचीं अन्य नामें. ३. श्रीगुरुवर्य अच्युतानें (कृष्णानें) उचललेल्या फाल्गुन(अर्जुन)रूप गोवर्धन नामक पर्वतावर. ४. द्रुपद हाच इंद्र. ५. कुरुवंशोत्पन्न पांडवरूप गोपालांचे (गवळ्यांचे) केशही. इंद्रानें गोकुळ बुडविण्याच्या हेतूनें अतिवृष्टि केली, तेव्हां कृष्णानें गोवर्धन पर्वताच्या आश्रयानें गोकुलस्थ जनाचें संरक्षण केलें, या कथेस अनुलक्षून ही गीति आहे. ६. सत्कुलोत्पन्नें. ७. हतगर्व. ८. पृथ्वी-पति. ९. सर्प. १०. मुंगसानें. ११. अर्जुनरूप गरुडानें. १२. गुरूचा वर आणि कार्मुक (धनु) या पंखांपासून निघालेल्या शस्त्ररूप वायूच्या प्रभावानें. १३. द्रुपदरूप सर्प. १४. सिंह. १५. खड्ग-धर. १६. रावणाला. १७. त्याचा (रावणाचा) गर्व हरणारा. १८. नम्रें. १९. नजराणा. २०. पा-दाक्रांत केलें. २१. या कारणास्तव. (मित्रत्वास्तव.) २२. पृथ्वीला. २३. शरीर. २४. सोडी. २५. क्षमा. २६. दया. २७. गुरूच्या (भारद्वाज मुनीच्या) घरीं राहणारे. २८. तुझ्या दर्शनार्थ आलेला जो मी त्याणें.

'भूप सखा भूपाचा, कवि कविचा, धनिक तोचि धनिकाचा,'[1] ।
ऐसें वदलासि तुझ्या गमला हा द्रोण विप्र मनिं कोंचा[2]; ॥ २८
उत्तरपांचाळपती मी निजतेजें, न तोंड वासूनी, ।
दक्षिणपांचाळपती तूंही होसील आजिपासूनी. ॥ २९
पांचाळराज तूंही, मीही, सख्यासि योग्य समशील[3]. ।
आहें कीं नाहीं, गा! वद, वदतां मज उदार गमशील. ॥ ३०
सख्याला लोभी मी परि राजपणाविणें घडेना तें[4], ।
म्हणवुनि राजा झालों, कीं न उपायांतरें[5] घडे नातें.' ॥ ३१
द्रुपद म्हणे, 'ब्रह्मर्षे! तुमच्या जोडा नसेचि अनुभावा[6]. ।
अतनु[7] मदपराध तदपि पूर्वस्नेह स्मरोनि तनु[8] भावा[9].' ॥ ३२
देवुनि राज्यार्ध नृप द्रोणें सत्कार करुनि बोळविला. ।
अहि सोडिला जसा पयें[10] पाजुनि मनिं मणि हरूनि पोळविला. ॥ ३३
राज्यार्ध समग्र यश द्रोणें हरिलें म्हणूनि तो मौनी[11] ।
पावे ताप. असा, जो लेशहि न निवेल लक्षसोमांनीं[12]. ॥ ३४
आपण घट, परि पुत्राकरवीं द्रोणाब्धि आटवायाला ।
शोधी वरदा ऋषिला स्वयश जगीं अतुळ[13] वाढवायाला. ॥ ३५

अध्याय सत्ताविसावा.

सद्गुणसिंधु युधिष्ठिर धृतराष्ट्रें यौवराज्यभाक्[14] केला. ।
वरिला श्रीनें देवुनि घेवुनिहि गळां पडोनि भाकेला[15]. ॥ १
जे पांडुला न वठले[16] ते केले करद[17] जिष्णुनें स्वारी[18]. ।
भीमानेंही केली तसि जसि विजयार्थ विष्णुनें स्वारी. ॥ २

---

१. (अ० २३ गी० २-३ पहा.) २. कच्चा. ३. समान स्वभावाचा. ४. सख्य. ५. दुसऱ्या उपायानें. ६. प्रभावा. ७. मोठा. ८. अल्प. ९. माना, गणा. १०. दुग्ध. ११. अभिमानी. १२. चंद्रांनीं. १३. निरुपम. १४. यौवराज्य भोगणारा. राजा राज्यपदीं असतांना राज्यकारभार पाहणारा, व त्या राजानंतर गादीवर बसणारा असा यथाविधि अधिकारी केलेला पुत्र इत्यादिक पुरुष. १५. वचनाला. १६. वश झाले. १७. करभार देणारे. १८. स्वशत्रु.

म्हणती गजपुरवासी याच्या लुटिला [१]धनेश [२]कटकांहीं ।
आले नव्हतेचि असे मागें भरिले धनें [३]शकट कांहीं. ॥ ३
वृद्धीस पांडुसंतति बहु पावे, जेंवि वन्हिची [४]कणिका. ।
[५]स्वसुतहितोपाय पुसे अंध नृपति [६]नयविशारदा [७]कणिका. ॥ ४
धृतराष्ट्रासि रुचेसी सांगे अत्युग्र नीति तो कणिक. ।
[८]वणिक [९]ग्राहकहस्तीं देतो [१०]विषसर्पिशर्करा कणिक. ॥ ५
'राज्यार्थ शत्रुवध हा पुरुषार्थ' असेंचि बोलिला कणिक. ।
तत्कथित [११]जंबुककथा मात्र कथिन कौतुकें न मी अणिक. ॥ ६
[१२]कोठें व्याघ्र [१३]वृक [१४]नकुळ [१५]जंबुक [१६]मूषक सखे वनीं होते. ।
बहु जपले, परि एका [१७]मृगकुळपतिला न [१८]पावले हो ! ते. ॥ ७
जपति जसे पाडाया [१९]व्यसनीं सुजनासि सर्वकाळ [२०]विट. ।
तेहि तसेचि, परि करी विफळचि तद्यत्न सर्व [२१]काळविट. ॥ ८
चिंता करितां जंबुक त्यांस म्हणे, 'आचराल जरि सारे, ।
सांगेन सुयुक्ति, तुम्हीं [२२]स्वेष्टफळप्रद मदुक्ति परिसा रे ! ॥ ९
या [२३]आखुनें करावा [२४]क्षतखुर जेव्हां असेल [२५]तो [२६]सुप्त, ।
व्याघ्रें मग मारावा मृगवर, [२७]परं [२८]मंत्र हा करा गुप्त.' ॥ १०
करितां तसेंचि, कोल्हा त्यांसि म्हणे, 'स्नान करुनि या खाया, ।
तोंवरि सावध बसतों एथें मी या मृगास राखाया.' ॥ ११
[२९]तो स्वार्थपंडित असें सांगे तें, जेंवि [३०]अंबु कमळाला, ।
त्यांच्या मना रुचे, दे न दिसो [३१]कपटींद्र जंबुक मळाला. ॥ १२
न्हाउनि येउनि पाहुनि दीन पुसे व्याघ्र, '[३२]वदे, नवा घाला ।

---

१. कुबेर. २. सैन्यांनीं. ३. गाडे. ४. किटाळ, फुणगी, अतिसूक्ष्म कण. ५. आपल्या पुत्रांच्या कल्याणाचा मार्ग. ६. राजशास्त्रार्थज्ञ. ७. प्रधानाचें नांव. ८. वाणी. ९. गिऱ्हाइकाच्या हातांत. १०. विषयुक्त सर्पि (तूप) व साखर, कणिक. ११. अशा पशुपक्ष्यांच्या गोष्टी महाभारताच्या आदिपर्वाशिवाय उद्योगपर्वांत, कर्णपर्वांत आणि शांतिपर्वांत आहेत. १२. कोणेएके स्थळीं (वनामध्यें.) १३. लांडगा. १४. मुंगस. १५. कोल्हा. १६. उंदीर. १७. मृगयूथप. (कालविट.) १८. धरण्यास असमर्थ होते. १९. संकटीं. २०. शठ, लुच्चे मनुष्य, धूर्त. २१. मृगविशेष. २२. आपल्यास इष्ट फल देणारी. २३. उंदिरानें. २४. भक्षितपाद, चावलेले खुर ज्याचे असा. २५. काळविट. २६. निजलेला. २७. परंतु. २८. मसलत. २९. कोल्हा. ३०. उदक. ३१. कपटपटु. ३२. बोल.

पडलासा कां दिससी? सांगे तो [1]म्लानवदन वाघाला. ॥ १३
[2]फेरु म्हणे, 'परिसावें वदला जें किमपि आखु खोटा तें, ।
'धिग् व्याघ्रातें! माझ्या सामर्थ्यें भरिल आजि पोटातें.' ॥ १४
व्याघ्र म्हणे, 'हें नलगे, घालिन [3]मृगयूथपीं नवा घाला, ।
देईल या भुजांचें बळ फळ याहूनि [4]पीनें वाघाला.' ॥ १५
गेला तो तेजस्वी अभिमानी व्याघ्र भक्ष्य सोडोनी. ।
तों आला आखु, तया फेरु म्हणे [5]सौध्य [6]भाव [7]जोडोनी. ॥ १६
'वदला [8]व्याघ्रामिष विष, तुज खाऊं दे, असेंचि मुंगस, खा ।
ऐसें कसें म्हणो? मी लघु परि तूं मेरुहूनि [9]तुंग सखा.' ॥ १७
हें ऐकतांचि [10]वंचकवचन शरण जाय तो बिळाला हो. ।
चित्तीं म्हणे, 'न मेलों, हाचि महालाभ मज मिळाला हो!' ॥ १८
[11]वृकही आला त्याला फेरु म्हणे, 'मज मृगासि रक्षाया ।
ठेउनि, गेला व्याघ्र स्त्रीसह येणार सर्व भक्षाया. ॥ १९
वांच, मरसि कां लोभें? मांसाशा शीघ्र सांड, गा! जा गा!' ।
हें ऐकतांचि निसटे, झाला तत्काळ लांडगा जागा. ॥ २०
मग मुंगसासहि म्हणे, 'आखु वृक व्याघ्ररायही नकुळा! ।
म्यां जिंकोनि पळविले, येथें तुज काय लाभ हीनकुळा. ॥ २१
युद्धीं न भंगितां मज कोण मृगाला शिवे [12]केवळ खाया? ।
मी श्वापदवर आहें, परि तुज नाहीं [13]विवेकें वळखाया? ॥ २२
नकुळ म्हणे, 'आखु वृक व्याघ्रहि जिंकोनि पळविले जेणें ।
तेणेंसीं न झगडणें, येणेंचि भलें, न या मृतें [14]एणें.' ॥ २३
ऐसे [15]मंत्रबळें वृकनकुळव्याघ्राखु मोहुनी चवघे ।
जंबुक निर्भय चित्तें मृगमांसाची वनीं सुखें चव घे. ॥ २४
ऐसेंचि [16]कृतप्रज्ञें साधावें आत्मकार्य [17]नैपुण्यें. ।

---

१ (चिंतेनें) उतरलें आहे तोंड ज्याचें असा. २. कोल्हा. ३. मृगांच्या कळपाच्या नायकावर. (श्रेष्ठ मृगावर.) ४. पुष्ट. ५. साधावयाचा. ६. वस्तु, अर्थ. ७. साधुनी. ८. वाघाचें मांस. (मूळांत 'मृगमांस' असें आहे, आणि 'मृगाचें मांस' असाच अर्थ इष्ट आहे; यावरून 'हरिणामिष' अशासारखा किंवा असाच पंतांचा पाठही असावा; तो तसा असल्यास छंदोभंग न होतां अर्थस्वारस्य कायम राहतें.) ९. उंच. १०. कोल्ह्याचें भाषण. ११. लांडगा. १२. ग्रास. १३. विचार. १४. हरिणानें. १५. मसलतीच्या जोरानें. १६. शहाण्यानें, ज्ञानी पुरुषानें. १७. निपुणपणें.

अघशमनार्थ करावीं, होईल स्वार्थसिद्धि तैं, पुण्यें.' ॥ २५
विस्तरभयास्तव कणिकनीत्यंतर्गत कथाचि असि कांहीं ।
लिहिली ईच्या श्रवणीं आदर करिजेल साधुरसिकांहीं. ॥ २६
पांडुसुतोच्छेदेच्छा येतां बुद्धींत, नीति कणिकाची ।
भेटे, व्यभिचारेच्छा धरितां जसि कामिनीस गणिकांची. ॥ २७
परि जाणे द्रोणविदुरभीष्मकृपव्यांळसंनिधानातें, ।
बहु भी अंध खणाया त्या पांडुकुमारसन्निधानातें. ॥ २८

अध्याय अठ्ठाविसावा.

सद्गुण युधिष्ठिराचे सर्वत्र सदैव सर्व पौर वदे, ।
कीं, 'हा आम्हांसि तसा पूर्वीं कोणीं न हर्ष पौरव दे. ॥ १
अरिगज विदारुनि रणीं बहु लाजविलें द्विपारिजातातें. ।
अर्थिमनोरथ पुरवुनि केलें गतगर्व पारिजातातें. ॥ २
भूरक्षणभर जेणें भीष्माच्या उतरिला शिरावरिला, ।
लंघुनि धृतराष्ट्रा जो राज्यश्रीनें स्वयें हिरा वरिला. ॥ ३
त्या पांडुच्या युधिष्ठिर सुत कुरुपति योग्य अर्क राज्यातें. ।
ज्या त्या न दुजा ग्रहें, जें यश अमृतीं ये न शर्कराज्यातें. ॥ ४
राज्याभिषेक आम्हीं यासि करूं, सुख न ज्या सुखा परतें; ।
सुप्रभु ताट सुधेचें, कुप्रभु 'वांतान्नपूर्ण खापर तें.' ॥ ५
पौरस्तुतधर्मगुणश्रवणें दुर्योधनादि खळ मळती. ।
हरिगुणसङ्गीत जसें श्रवणीं शिरतां पिशाच तळमळती. ॥ ६
करिति कुमंत्र सुयोधनदुःशासनकर्णशकुनि हे चवघे, ।
साधुद्वेषें उग्र व्यसनांत बळें बुडावया अवघे. ॥ ७

---

१ पापनिरसन व्हावें म्हणून. २ सुकर्में. ३. कणिकाच्या नीतिशास्त्रांत समाविष्ट झालेली. ४. पांडवांच्या नाशाची इच्छा. ५. वेश्यांची. व्यभिचारेच्छा धरितां कामिनीस जसि गणिकांची (नीति भेटे), असा अन्वय. ६. सर्पसांनिध्य. ७. पांडुपुत्ररूप उत्तम ठेव्यातें. ८. पुरुकुलोत्पन्न. ९. सिंहसमुदायातें. जात म्ह० समुदाय. १०. याचकमनोगत. ११. गर्वहीन. १२. पारिजात नामक कल्पवृक्षातें. १३. पृथ्वीरक्षण करण्याचें ओझें. १४. टाकूनि. १५. अभिप्राय, मत. १६. शर्करायुक्त घृतातें. १७. ओकलेल्या अन्नानें भरलेलें.

दुर्योधन एकांतीं मग गांठी निजपित्यासि [1]भोंदाया. ।
सुतरूपी [2]दुर्विधि तो इच्छी [3]व्यसनाननांत कोंदाया. ॥ ८
ऐसें म्हणे पित्याला, 'परिसा विज्ञापना अहो ! तात! ।
जे [4]लोकशब्द कर्णी [5]तप्तायःशंकुतुल्य होतात. ॥ ९
धृतराष्ट्र अंध, [6]राज्यानर्ह; [7]अनघ **पांडु** आमचा भर्ता. ।
तैसाचि **युधिष्ठिरही**, न पर, घनचि [8]चातकव्यथाहर्ता. ॥ १०
[9]लोकानुराग ऐसा, त्वांहि दिल्हें [10]यौवराज्य [11]अहितातें. ।
निजसुतशतहि बुडविले पोसून गृहांत पांच [12]अहि तातें. ॥ ११
'कुरुपति' असें जनें तूं असतां राष्ट्रांत **पां**डवा गावें, ।
आम्हीं सेवकभावें धरुनि करीं [13]चाप [14]कांड वागावें ॥ १२
परपिंडभक्षणास्तव निजराज्यपदच्युतिस्तव [15]ज्ञाती, ।
[16]लवतील न, प्रजाही, नरकगति बरी, न्हे [17]अवज्ञा ती. ॥ १३
[18]दुर्गतिमहापिशाची [19]निजसंतानासि झेंडपणी न करी, ।
ऐसा मंत्र जपावा, [21]यूथ उपेक्षील धडपणी न [22]करी. ॥ १४
'कैसें करूं?' असा तूं [23]आधि नरेंद्रा ! धरूं नको लेश. ।
[24]क्षेम असती ताराया संततिस, क्षितिस जेंवि [25]**को**लेश. ॥ १५
[26]हे [27]**वा**रणावताप्रति दवडावे युक्तिनेंचि देवा! तें ।
काम तुझें, नयनीं कण कुशळ मुखाच्या उरों न दे वांतें. ॥ १६
युक्तिलहरीशतें त्वां उडवावीं तीं दयानदा! [29]यादें, ।
कां राज्य वृथा देसी, कोणासहि यश दिल्हें न [30]दायादें. ॥ १७
आम्हीं स्वपदीं होऊं नीतिबळें [31]बद्धमूळ मग, राया ! ।
करितील काय **पांडव**? आलेहि जरी फिरोनि नगरा या.' ॥ १८

---

१. फुसलावून फसवाया. २. दुर्दैव. ३. व्यसनरूप मुखांत. ४. लोकांचे शब्द (धर्मस्तुतिरूप.) ५. तापलेल्या लोखंडाच्या खिळ्यासारखे. ६. राज्यास अयोग्य. ७. निर्दोष, निष्पाप. ८. चातकाची व्यथा हरणारा एका मेघाशिवाय अन्य कोणी नाहीं. ९. लोकप्रीति. १०. युवराजाचा अधिकार. ११. शत्रूतें. १२. सर्प. १३. धनुष्य. १४. बाण. १५. गोत्रज, बांधव. १६. नम्र होतील. १७. अपमान. १८. दरिद्रता ही मोठी पिशाची. १९. आपल्या अपत्यास. २०. झपाटा, बाधा-(पिशाचरूप.) २१. समूह. (निजकुल.) २२. गज. २३. मनोव्यथा. (चिंता.) २४. समर्थ. २५. महावराह. २६. पांडव. २७. इंद्रप्रस्थाप्रति. २८. मुखाच्या वातें कुशल (नर) नयनीं कण उरों न दे, असा अन्वय. २९. जलचरें. ३०. गोत्रज बांधवं, वारिसदार. ३१. ज्यांचें मूळ जमिनींत (राज्यभूमींत) पुष्कळ खोल गेलें असे.

[1]प्रज्ञाचक्षु म्हणे, 'मज हें रुचलें कर्म, परि महाखोटें. ।
भीष्मद्रोणविदुरकृपपौरांचें भय पुढें दिसे मोटें. ॥ १९
नत लोटितां पदें अपकीर्ति जगीं [2]सह्य न [3]प्रभावज्ञा, ।
लोकां हें न घडेही, [4]महवृंदा [5]महपतिप्रभावज्ञा. ॥ २०
हरितील [6]अस्मदसुधन, धर्मप्रिय पौर [7]एकसरतील, ।
[8]पार्थाहिपुढें तुमचे निःशेषहि [9]यत्नभेक सरतील.' ॥ २१
दुर्योधन बोले, 'हें भय न धरीं, [10]द्रौणि मजकडे आहे; ।
गुरुहि मिळेल मलाचि. प्रियपुत्रवियोग कोण हो! साहे? ॥ २२
त्यजिजेल कृपाचार्यें निजसर्वस्वहि सुखें, परि न [11]भाचा; ।
भीष्महि [12]मध्यस्थ सदा, [13]दंडक याचा जयापरि [14]नभाचा. ॥ २३
[15]पांडवविवासनातें जरि असति समर्थ पौर[16] [17]वारया. ।
मी वश करीन दानें मानें सर्वांसि पौरवा! राया! ॥ २४
आहेत [18]कोशं हातीं, लोकांचें रंजवीन मन दानें. ।
[19]विश्ववशीकरणाचा घ्यावा नलगेचि मंत्र [20]धनदानें. ॥ २५
हे आम्हीं काय दिवे, तेजस्वी काय [21]हो रवि, [22]दुरापें, ।
न दुजीं, परि या कार्या नेईल न कीर्तिहार [23]विदुरापें.' ॥ २६
ऐसें वदोनि, मोही त्यास प्रतिकूळ काळ सुतरूपें. ।
हतभाग्य अशुभचिंतन कां न करी [24]पारिजातसुतरूपें? ॥ २७
[25]आप्तजनमुखें कळवी [26]पशुपतिची वारणावतीं यात्रा, ।
कीं ती सेवावीच प्राज्ञें [27]भवरोगहर महामात्रा. ॥ २८
विदुरास उमजलें कीं बुडवाया कीर्ति सुतप [28]दादानें ।
केला मंत्र, व्यसनीं पाडाया पांडुसुत [29]पदादानें. ॥ २९

---

१. धृतराष्ट्र. (प्रज्ञा म्ह० बुद्धि हीच आहे चक्षु म्ह० नेत्र ज्याचे असा.) २. सहन करण्यास योग्य. ३. प्रभाव जाणत्यास. ४. महांचा समुदाय. ५. सूर्यप्रभेची अवज्ञा. ६. आमचे प्राण आणि धन. ७. एकवटतील. ८. अर्जुनसर्पापुढें. ९. प्रयत्नरूप बेडूक. १०. अश्वत्थामा. ११. भगिनीचा (कृपीचा) पुत्र अश्वत्थामा. १२. निष्पक्षपाती, उभयपक्षांस सारखा. १३. रीति. १४. आकाशाचा. आकाश सर्वांस सदा समान असतें. १५. पांडवांस देशांतून घालवून देणें या गोष्टीस. १६. पुरवासी लोक. १७. निवारण करण्यास. १८. भांडारें. १९. विश्वाला वश करण्याचा. २०. कुबेरानें, श्रीमंतानें. २१. विदुर. २२. दुष्प्राप. (मिळण्यास कठीण.) २३. विदुरापाशीं. २४. पारिजात नामक उत्तम कल्पवृक्षापाशीं. २५. यथार्थभाषी लोकांकडून. २६. शंकराची. (पशूंचा म्ह० जीवांचा पति.) २७. संसाररूप दुःख हरण करणारी. २८. धृतराष्ट्रानें. २९. राज्यपदग्रहणानें.

धर्म म्हणे, ‘राजा कां जा म्हणतो वारणावता? रचितो ।
कांहीं घात सुयोधन [1]मदांधदिग्वारणावतारचि तो.’ ॥ ३०
पांडवहि म्हणति, ‘पाहूं, वाहूं वंदूनि शंकरा [2]बेले. ।
[3]रावति सुर [4]भजनीं, मग कोण न होउनि विशंक राबेल?’ ॥ ३१
तें आप्तमुखें कळतां, धृतराष्ट्र म्हणे तयांसि, ‘बाळक हो! ।
जा वारणावता, जरि जाणार तुम्हीं गुरूक्तिपाळक हो! ॥ ३२
पशुपतिचा यात्रोत्सव [5]आतृप्ति पहा, रहा, वहा रत्नें. ।
देवब्राह्मणचरणीं, धनवस्त्रान्नें जनासि द्या यत्नें. ॥ ३३
तेथें कांहींकाळ स्वर्गी सुरसे सुखें वसा, मग या; ।
पितरां बहु सुख देते [6]केली आज्ञा जसी, तसी न [7]गया.’ ॥ ३४
धर्म म्हणे, ‘बहु बरवें, ताता! हा तारक [8]त्वदुपदेश. ।
झाला [9]गुरुवाक्यादृत पूरु महात्मा स्वयें [10]यदुपदेश. ॥ ३५
पशुपतिपाद पहाया पाहूं तें वारणावत [11]नरा! [12]जे ।
आपण होतात करुनि संकटविनिवारणा वतन राजे.’ ॥ ३६
जाणार पांडुसुत तों खळ दुर्योधन [13]पुरोचना यवना ।
आधींच पुढें धाडी, करावया प्राणनाशका [14]भवना. ॥ ३७
सानुज युधिष्ठिर निघे मग जाया वारणावता, [15]राजा ।
आलिंगूनि म्हणे त्या [16]भूभारनिवारणावतारा ‘जा.’ ॥ ३८
भीष्मादिगुरुजनातें नमुनि म्हणे, ‘[17]अढळ आप्तता राहो, ।
व्हा विरहाब्धींत मला सेतु, तुम्हीं सर्व आप्त तारा हो!’ ॥ ३९
कुंतीसहित निघाले पांडव, तेव्हां तयांसि पाहोनी, ।
विप्रादि पुरस्थ म्हणति, ‘आम्हां सुख काय येथ राहोनी? ॥ ४०
अंध, परि धूर्त [18]लोकीं, नाहीं दुसरा असा [19]धुतारा या. ।
आम्हां बुडवाया क्षम होय, नव्हे हा असाधु ताराया. ॥ ४१

---

१. मदोन्मत्तदिग्गजाचा अवतार. २. शंकराला बेलाचें पान फार प्रिय आहे. ३. स्वपती. ४. ज्या शंकराच्या सेवेंत. ५. तृप्ति होईपर्यंत. ६. केलेली. (मान्य केलेली.) ७. प्रसिद्ध पुण्यक्षेत्र (येथें केलेली पिंडदानादि क्रिया.) ८. तुझा उपदेश. ९. पितृवचनीं आदरयुक्त. येथें ‘आदृत’ म्ह० सादर, कृतादर असा अर्थ आहे. १०. यदूच्या पदाचा (राज्याचा) स्वामी. (अ० ११ गी० ६४–६६ पहा). ११. हे अर्जुना. १२. पाय. १३. नामविशेष. दुर्योधनाचा मित्र. १४. गृहा. १५. धृतराष्ट्र. १६. भूभाराच्या निवारणार्थ अवतार ज्याचा झाला. (धर्मराजाला.) १७. दृढ, स्थिर. १८. या लोकीं. १९. वंचक. (ठक.)

आंतहि अंधचि, गारा वेंचुनि, टाकील कां कवि हिऱ्यातें ? ।
गंगा टाकुनि जाइल अज्ञचि, जळ ज्यांत [1]टांक, [2]बिहिऱ्यातें. ॥ ४२
देवा! विश्वपते! या पांडुनृपसुतांसि पाव, कपटानें ।
खळचि बुडावे, व्हावे भस्मचि, बांधोनि [3]पावक [4]पैटानें. ॥ ४३
जरि [5]केंडिला तरि हिरा, स्तविलाचि शिरीं चढे न [6]शिरगोळा. ।
तो हारवील निजशिर, जो खळ करणार साधुशिर गोळा.' ॥ ४४
धर्म म्हणे, '[7]भवदाशीर्वाद खरे [8]स्वर्द्रुचे सखे, दानें ।
देतील इच्छिलीं, कां करिजेल मनीं [9]निवास खेदानें?' ॥ ४५
म्लेच्छाच्या [10]भाषेनें विदुर महात्मा [11]हितोपदेश तदा ।
धर्मासि करी, त्याच्या धृतिला मतिलाहि तोष दे शतदा. ॥ ४६
'कथिलें पुरोचनाला तुमचे अग्नींत [12]काय [13]होमाया; ।
सावध व्हा. साधूंची स्वार्थपरखळासि काय हो माया? ॥ ४७
गृह करविलें असे, तें [14]दहनौषधमय, तयांत [15]उतरा हो! ।
दावा विश्वास खळा, कोपविषाचा मनींच [16]उत राहो. ॥ ४८
करिल [17]सुरंगपथ तुम्हां जाया माझा सखा सुखनक वनीं, ।
[18]अवनीं तुमच्या मज जें रसिकांच्याहि रसिका सुख न कवनीं. ॥ ४९
तेथुनि रात्रौ ठकवुनि विश्वासें तों चला, भय वनातें ।
जातां त्यजा, गृहा द्या अग्नि, घडो तोच लाभ यवनातें.' ॥ ५०
[19]मृतिहर मंत्र असा [20]तो सन्मतिचा साधु सोयरा शिकवी, ।
परते, परि [21]पांडुतनयविरहौर्वा होय [22]तोयराशि [23]कवी. ॥ ५१
कुंती पुत्रास म्हणे, 'वदला तुजसीं [24]रहस्य काय कवी?' ।
धर्म तिला संक्षेपें विदुरोक्तांतिल रहस्य आयकवी. ॥ ५२

---

१. बिंदु. २. झऱ्यातें. ३. अग्नि. ४. वस्त्रानें. ५. तिरस्कारिला. ६. पाषाणविशेष. ७. तुमचे आशीर्वाद. ८. स्वर्गसंबंधी वृक्षाचे. (कल्पवृक्षाचे.) ९. वसति. १०. विदुरानें धर्मास म्लेच्छभाषेनें हितोपदेश केला, तरी व्यासानें तो संस्कृत भाषेनेंच उपनिबद्ध केला आहे. महाभारतावर टीका करणार नीलकंठ चतुर्धर यानें विदुरोक्तीचा म्लेच्छभाषानुरूप परिस्फोट केला आहे. ११. महाभारत, आदिपर्व, अ० १४५ श्लो० २०-२६ यांत हा हितोपदेश आहे. १२. देह. १३. जाळावया. १४. ज्वालाग्राही पदार्थयुक्त. १५. बिऱ्हाड करा, रहा. १६. कढ, उमाळा. १७. सुरुंग. ११. रक्षणीं. १९. मरणनिवारक. २०. विदुर. २१. पांडवांचा वियोग हाच एक और्व (वडवानल) होय. २२. सागर. २३. बुध. (विदुर). २४. गोप्य मंत्र, मसलत.

मग **वारणावतीं** नृप घनसा, पुरजनहि होय चातकसा. ।
म्हणति भले, 'वरिच नसे येथ, न लाजेल पारिजात कसा?' ॥ ५३
स्तविति नृपा पौर, जसे चातक सेवूनि होय वनदास[1]. ।
स्थापी लाक्षासदनीं[2] दाउनि बहु भाव[3] तो यवन दास. ॥ ५४
जातांचि **धर्म** त्या शतदुष्टांचें[4] कृत्य, मतहि अंधाचें, ।
भीमादिकांस कळवी करवुनियां ग्रहण भित्तिगंधांचें[5]. ॥ ५५
'सांडुनि हे कण[6], घेसी पदरीं तनुजा[7] तुषा[8] अगा! राया! ।
ते[9] उचित प्रासादा[10], **पांडुतनय** जातुषा[11] अंगारा[12] या.' ॥ ५६
ऐसें **पांडव** म्हणती, **धृतराष्ट्रा** आठवूनि हळहळती. ।
चिंतामणि[13] हारवि जो तत्सुहृदांची[14] तसीच हळहळ ती. ॥ ५७
म्हणती, 'जाणविली या कर्में निजनरकनिष्ठता[15] ताते[16]; ।
साक्षात् **धर्म** म्हणावें, न म्हणावें नर, 'कनिष्ठतातातें[17].' ॥ ५८
करुनि दृढ मंत्र मनही होते विश्वस्तसेचि[18] त्या भवनीं. ।
यवनीं दयाचि दाविति, पाहति मृगयामिषेंचि मार्ग वनीं. ॥ ५९
भेटे विश्वासनिधी स्नेहार्थी **विदुर**सचिव[19] तो खनक. ।
धर्म म्हणे, 'संरक्षीं आम्हां तूं रक्षितो जसा जनक.' ॥ ६०
विवर जतुगृहांत[20] करी कळवी, 'करितों पुरासि खंदकसें. ।
जाणेल **विदुर**मंत्रितें[21] तें तो सज्जनवधेच्छु[22] मंद कसें.' ॥ ६१
बिलमार्ग सिद्ध होतां **धर्म** म्हणे स्वानुजांसि, 'हा यवन, ।
सौ[23] जीव अन्य घालुनि करुनि स्वकरें प्रदीप्त हें भवन, ॥ ६२
रात्रौ पळोन जाऊं, विप्राराधनमखा[24] विलंबें[25] करा.' ।
बकराजसा[26] जंपे[27], परि ठकला खळ, काय हरिपुढें[28] बकरा? ॥ ६३

---

१. उदक देणाऱ्या मेघास. २. लाखेच्या घरीं. ३. भक्ति. ४. दुर्योधनादिक शंभर दुष्ट भावांचें. ५. भिंतीच्या वासाचें. ६. धान्याचे कण. ७. शरीरापासून झालेल्या पुत्राला. ८. कोंड्याला. ९. दुर्योधनादि कौरव. १०. राजवाड्याला. ११. लाक्षानिर्मिता. १२. गृहाला. १३. चिंतित पदार्थ देणारा मणि. १४. त्याच्या मित्रांची. १५. नरकप्राप्तीविषयीं प्रेमातिशय. १६. धृतराष्ट्रें. १७. विदुरातें. १८. विश्वासास पात्र झालेल्या मनुष्यासारखे. १९. मित्र. २०. लाक्षागृहांत. २१. मसलत. २२. सज्जनाचा वध इच्छिणारा यवन. २३. सहा. २४. द्विजपूजनरूप यज्ञा. २५. उशीर करा. २६. श्रेष्ठ बकासारखा. २७. टपे. २८. सिंहापुढें.

कुंतीचें व्रत कांहीं, व्हावी तत्सांगता असें [1]छद्म ।
करुनि, ब्राह्मणभोजन केलें, जैं जाळणार तें [2]सद्म. ॥ ६४
पौरवधू आणविल्या, न्हाणविल्या, गौरवूनि लेवविल्या, ।
देवविल्या [3]सदलंकृति, सूर्यास्तावधि समस्त जेवविल्या. ॥ ६५
अन्नार्थी जे आले त्यांसि म्हणे धर्मराज, 'जेवा या.' ।
तों आली [4]पंचसुता एक [5]निषादीहि तेथ जेवाया. ॥ ६६
जेवुनि यथेष्ट पुत्रांसह मद्यहि सेविलें निषादीनें. ।
काळें आदर दावुनि देतां, प्यावें न कां विषा दीनें ? ॥ ६७
मद्यें भुले निषादी, पडले तत्सुतहि पासले [6]शवसे. ।
कोणाच्याही हृदयीं देहस्मृतिचा न वास लेश बसे. ॥ ६८
ज्यासि [7]पृथा भी, जैसी व्याघ्राच्या सावधान गाय वना, ।
त्या भवना जो राखे, ये नीज [8]अघाचिया [9]नगा यवना. ॥ ६९
'विश्वासघात यवना न घडो. हो सुख, न आपदा [10]सांस.' ।
ऐसें विचारितां तें साधूंच्या काय पाप दासांस ? ॥ ७०
विवरीं शिरले, भवनद्वारीं लावोनि [11]वीतिहोत्री ते. ।
पळतां वनांत [12]तिमिरीं बहु [13]भीतांचेहि भीति हो ! त्राते. ॥ ७१
वाहे पृथेसि पृष्ठीं, हस्तीं धरि भीम [14]अग्रजा [15]अनुजा, ।
[16]यमळांसि कडेवरि घे, तोचि गमे म्हणति [17]अंजनाजनु जा. ॥ ७२
तेज न साहति त्याचें [18]गहनीं व्याघ्रादि [19]काननौके तें, ।
दे लाज विमानातें, मग दे तो भीम कां न नौकेतें ? ॥ ७३
सत्संगें लाजेला भीमबळें तेंवि तूर्ण [20]अटवीला ।
तरले [21]मुमुक्षुसे ते, [22]तो खळ [23]षड्वर्गसाचि [24]फटवीला. ॥ ७४
[25]विदुराप्तपुरुष भेटे दावी सांगोनि नाम [26]नौवेला. ।
ते म्हणति, 'कळे [27]बाला देवाच्या जेंवि कामना वेला.' ॥ ७५

---

१. कपट. २. घर. ३. उत्तम दागिने. ४. पांच आहेत पुत्र जिला अशी. ५. कोळीण. ६. प्रेतासारखे. ७. कुंती. ८. पापाच्या. ९. पर्वता. १०. सहाजणास. ११. अग्नीतें. (वीति म्ह० पुरोडाशादि भक्ष्य ज्यांत हवन करतात तो, असा शब्दार्थ.) १२. काळोखांत. १३. भीतांचे त्रातेहि बहु भीति, असा अन्वय. १४. धर्मा. १५. अर्जुना. १६. जुळ्यांला. (नकुळसहदेवांस.) १७. मारुति. (अंजनेपासून जनु म्ह० जन्म ज्याचें तो.) १८. अरण्यीं. १९. अरण्य ज्यांचें स्थान असे. (वनचर.) २०. अरण्याला. २१. मोक्षेच्छु असे. २२. यवन. २३. सहाजण. २४. फसविला. २५. विदुरानें पाठविलेला विश्वासु जन. २६. नौकेला. २७. बापाला.

विदुरप्रेषिततरिनें[1] तरले गंगेसि ते सुखें क्षिप्र[2]. ।
हरिदत्तविरक्तिबळें[3] तरति महासिद्धिला असे क्षिप्र[4]. ॥ ७६

अध्याय एकुणतिसावा.

गृह जळतां पौर म्हणति, 'हो[5]!' कळलें त्यांसि कर्म फटकळ[6] तें. ।
गुप्त करो, सदसत्कृत[7], तत्काळ दहाजणांत अटकळतें. ॥ १
अग्नि विझवितां, करितां शोध, पुरजनीं शिरोनि खनकानें, ।
बिळ भस्में भरिलें, बुध भरि सूचकवदन[8] जेंवि कनकानें[9]. ॥ २
ते सा प्राणी पाहुनि पौर म्हणति, 'हाय! काय हें कर्म! ।
हा! धृतराष्ट्रा! पांडवघातीं त्वां कोण देखिला धर्म? ॥ ३
यवना! युक्तचि तुज हें, न विलंब फळासि साधुहानीचा; ।
जा नरका, कां वधिले वदान्य[10] विश्वस्त[11] साधु हा! नीचा!' ॥ ४
तें ऐकोनि ससुत धृतराष्ट्र रडे, म्हणुनि विदुर तोहि रडे, ।
कीं अंधें अमृतफळें टाकुनि पदरांत घेतले हिरडे. ॥ ५
करवी क्रिया[12] नृप रडे, पुत्रहि दुर्योधनादि सोंगाळ[13]. ।
विदुर नये न, म्हणति जळ[14] द्या, खळ दुर्योधना दिसों गाळ[15]. ॥ ६
दुःख [16]तिहीं अनुभविलें जें कोणींही कधींहि न वनीं तें. ।
अतिसुकुमार शरीरें त्यांची जैसीं नवीन नवनीतें[17]. ॥ ७
दक्षिणदिशेसि जातां, रवि उगवे मावळे, वनीं पळतां ।
भय बहु कीं खळ येइल दैवें जगला असेल जरि जळतां. ॥ ८
सायान्हीं[18] माय म्हणे, 'तगे[19] न निघे, तोय पाज, सुतराया! ।
बा! तूंचि सेतु आम्हां या तृड्व्यसनाब्धिलागिं[20] उतराया'. ॥ ९
धांवे तरु मोडित तो, सुटला गिरिवरुनि थोर पाथरसा[21], ।
श्रमतां त्या गुरुभक्ता दे विद्याज्ञानसेंचि पाथ[22] रसा[23]. ॥ १०
पात्र नसे म्हणउनि घे भिजउनि तो उत्तरीयवास[24] वनें[25]. ।

---

१. विदुरानें पाठविलेल्या नौकेनें. २. सत्वर. ३. ईश्वरदत्त वैराग्याचे सामर्थ्यानें. ४. हलके. ५. हाय. ६. दुष्ट. ७. चांगली अथवा वाईट कृति. ८. चहाडाचें तोंड. ९. सुवर्णानें. १०. दाते. ११. ज्यांच्यावर भरंवसा ठेविला असे. १२. और्ध्वदेहिक क्रिया. १३. ढोंगी. १४. जलांजली. (तर्पण-समयीं.) १५. गयाळ. १६. पांडवांनीं. १७. लोणी. १८. संध्याकाळीं. १९. टिकाव. २०. तृषारूप संकटसमुद्राला. २१. धोंड्यासारिखा. २२. उदक. २३. पृथ्वी. २४. पांघरावयाचें वस्त्र. २५. जळ.

वास[1] वनव्याघ्रा दे भय त्याचा, तेंवि अरिस वासव[2] न. ॥ ११
धांवत ये पाहे तों श्रमनिद्रा[3] लागली स्वमातेतें. ।
वातें दवार्चिसें[4] त्या दैन्यें गेहनांत[5] दुःख माते[6] तें. ॥ १२
निजला सानुज धर्महि कल्पुनि[7] सुखशयन भूमितळ मळला. ।
तें पाहुनि शुष्कन्हदीं मीन[8] तसा भीम फार तळमळला. ॥ १३
चोळी खळान्तकर[9] कर करकर रदं[10] खाय, 'हाय! हाय!' करी. ।
गुंते गुर्वाङ्गिनें; [11]पंकीं पडला करील काय करी[12]? ॥ १४
अश्रु पुसोनि म्हणे, 'रे! दुष्टा दुर्योधना! कुळकलंका! ।
पोषू भू तव संगें दशवदनाच्या जसी पुलक[13] लंका. ॥ १५
तुमचा पिताचि पुरुकुळविपिनींचा[14] अग्नि, हो! त्रपा[15] प्याला. ।
लोभ्याला तेजस्वी बंधु नको, अग्निहोत्र पाप्याला. ॥ १६
शोकीं अयशीं नरकीं केला कीं मग्न दुष्ट हो! तात. ।
[16]अविचारितोक्ति करितां बालिश[17] हो! आर्य रुष्ट[18] होतात. ॥ १७
गजही साहूं न शकति ज्यांच्या स्वमदांततत्परा[19] गंधा, ।
ते केले [20]दुर्विधिहतमति शशकांनीं[21] हरी[22] परागंधा[23]. ॥ १८
काका! ते तुज रुचले करिति महात्वास भस्म रासभ[24] जे. ।
न गुणज्ञ तूं धरि शिरीं विधु[25] न उमावल्लभ[26] स्मरास[27] भजे.' ॥ १९
ऐसें जों भीम वदे, चिंती कृष्णा[28] भयापहा[29] जागे. ।
भगिनीस हिडिंब म्हणे, 'ते कोण मनुष्यसे पहा जा गे!' ॥ २०
ती राक्षसी हिडिंबा धांवे कीं चरचरा नरा खावें. ।
रक्षील व्याघ्री क्षण, परि पळहि जिणें [30]जिणें न राखावें. ॥ २१
भुलली वनीं हिडिंबा भीमाची पाहतांची सुंदरता. ।
तात्काळ सुंदरी ती होय जसी दिव्ययोनि[31] सुंदरता[32]. ॥ २२

---

१. गंध. २. इंद्र. ३. श्रमानें आलेली नीज. ४. वणव्याचे ज्वाळेसारखे. ५. अरण्यांत. ६. माजे. ७. मानून. ८. मासा. ९. दुष्टांचा नाश करणारे. १०. दंत. ११. चिखलांत. १२. हत्ती. १३. रोमांच. १४. वनाचा. १५. लज्जा. १६. अविचारानें केलेलें भाषण. १७. मूर्खहो. १८. क्रोधयुक्त. १९. आपल्या मदाचा नाश करण्याविषयीं तत्पर अशा गंधाला. २०. दुर्दैवानें ओढिली बुद्धि ज्यांची. २१. ससा. २२. सिंह. २३. विदेशवासी. २४. गर्दभ. २५. चंद्र. २६. शंकर. २७. मदन. २८. श्रीकृष्णाला. २९. भयहारका. ३०. जीवित. ३१. स्वर्गांत आहे जन्म जिचा अशी देवांगना. ३२. सुंदसंज्ञक दैत्याच्या ठायीं रममाण झालेली (तिलोत्तमा). (उपसुंद आणि सुंद या दोघां सहोदर राक्षसांच्यामध्यें कलह उत्पन्न करून त्यांचा नाश करावा म्हणून इंद्रानें तिलोत्तमा नामक अप्सरा पाठविली. तिला पाहून उभयबंधूंचा कलह होऊन ते मरण पावले.)

भीमासि म्हणे, 'कां जी! शिरलां या काननांत तापससे, ।
येथें जन बहु पावति [1]मृगराजबिळांत जेंवि ताप ससे. ॥ २३
माझा हिडिंब राक्षस [2]सोदर तुमचा करील वध, मातें ।
तेणेंचि धाडिलें, परि तुज वश मी, त्या त्यजूनि अधमातें. ॥ २४
स्वीकार करीं साधो! [3]स्मर बाधो न मज, मीहि टाळीन ।
मरणा, पळविन तुजला वरुनि, सतीव्रत न तें विटाळीन. ॥ २५
हो मत्पति, ये स्कंधीं बैस, विमानीं [4]अमर्त्यसा धांवें. ।
त्वांही म्यांही रक्षुनि अन्योन्यातें स्वकार्य साधावें.' ॥ २६
मग भीम म्हणे, 'निद्रित माता भ्राते त्यजूं वनीं, तुजला ।
जोडूं, तोडूं प्रीति, स्त्रीसंगसुखासि कोण गे! सुजला? ॥ २७
साधावा स्वार्थ, असें भय दावुनियां भयातुरा मातें, ।
समयीं देईलचि दे जेंवि यशोलाभ [5]यातु रामातें.' ॥ २८
तों ती म्हणे, 'पळवित्यें, सर्वांसि करा तुम्हींच परि जागे.' ।
भीम म्हणे, 'सुखसुप्तां उठवीना, करिल काय अरि, जा गे! ॥ २९
तो अंधकार, मी रवि; तो रावण, मीहि [6]पुष्कराक्ष; ससा ।
तो, [7]हरि मी; तन्मुख मी करिन पळामाजि शुष्क राक्षससा. ॥ ३०
हें उर हे बाहु पहा, त्याचा आम्हांसि काय गे! [8]लेखा? ।
जा, त्याला म्हण, त्याच्या धाकेंचि गळोनि [9]काय गेले, [10]खा.' ॥ ३१
होतां विलंब, राक्षस ये पाहे [11]स्वस्वसाचरित्रास, ।
कोपोनि म्हणे, 'दुष्टे! तुज नाहीं मृत्युचा परित्रास. ॥ ३२
काळें मति तुज दिधली [12]मर्त्यापसदास अनुसरायाची, ।
वांचेल कसी या [13]सांसकट तुझी आजि [14]तनु सरायाची.' ॥ ३३
ऐसें वदोनि धांवे सर्वांचाही करावया कवळ, ।
भीमें दटाविला तो करितां [15]रदशब्द निद्रितांजवळ. ॥ ३४
परि भगिनीस वधाया धांवे तो [16]यातुधान कोपानें, ।
भीम म्हणे, 'भू याच्या रक्ताच्या आज तृप्त हो [17]पानें.' ॥ ३५
पांडव रागें मागें त्या पापाच्या [18]महानगा ढकली. ।
[19]द्वात्रिंशद्धस्तांवरि करिति महागजसमान गाढ [20]कली. ॥ ३६

---

१. सिंहाच्या गुहेंत. २. बंधु. ३. काम. ४. देवसा. ५. राक्षस. ६. रामचंद्र. ७. सिंह. ८. गणना. ९. देह. १०. भक्षण कर. ११. आपल्या भगिनीची कृति. १२. नराधमाला. १३. सहांसकट. १४. शरीर. १५. दांतांचा शब्द. १६. राक्षस. (यातु म्ह० राक्षस यांना जो पोसतो तो. राक्षस हे स्वजातिपोषक आहेत.) १७. प्राशनानें. १८. मोठ्या पर्वताला. १९. बत्तीस हातांवर. २०. कलह, युद्ध.

त्यांच्या युद्धध्वनिनें जागी झाली पृथा सुतांसहित, ।
तों [1]निकट देखिली स्त्री, लावण्य जिचें जगीं तुळारहित. ॥ ३७
कुंती तिला पुसे, 'तूं कोणाची सांग बायको, पातें ।
न लवेचि तुज पहातां, पुसिल्याच्या न धरिं बाइ! कोपातें. ॥ ३८
तूं काय अप्सरा, कीं वनदेवी? वद किमर्थ आलीस? ।
कां एकली? पतिकडे पाठविलें सुमुखि! काय [2]आलीस?' ॥ ३९
कुंतीस म्हणे ती, 'मी [3]रात्रिचरी या वनींच [4]मद्वसती, ।
येथें प्राणी कोणी अस्मत्त्रासेंकरूनियां नसती. ॥ ४०
[5]स्वाग्रजहिडिंबवचनें आलें मारावया तुम्हांला, जों ।
भुललें [6]नवहेमाभा एका मी, काय हो! तुम्हां लाजों? ॥ ४१
वरिला मनें तुझा सुत, न्यावा येथूनि शीघ्र पळवावा, ।
मद्भाव असा कीं हा स्वविचार तुम्हासही न कळवावा. ॥ ४२
तुमची संगति सोडुनि तो वश झाला मला न वीरमणी, ।
आश्चर्य थोर हें कीं, प्रार्थी, परि नावडे नवी रमणी. ॥ ४३
मज लागला परोपरि बहुत विनवितां तुझ्या सुता वेळ. ।
तों सासुबाइ! कोपी मद्भ्राता धांवला उतावेळ. ॥ ४४
आधीं माझे घ्याया, मग तुमचे प्राण [7]मूर्त [8]अंतकसा. ।
धांवे, परि मत्पति तव सुत असतां, तो करील अंत कसा? ॥ ४५
तुमची सुखनिद्रा क्षणमात्रहि मोडूं नयेचि त्या [9]अहितें, ।
या भावें मत्पति ने दूर तया [10]पंक्षिपति जसा [11]अहितें. ॥ ४६
न धरील काय जी! [12]खगपतिनखकरवाळ लाज, सापाला ।
[13]सपदि न वधितां, चुरिला असता खळ, वाळला जसा पाला. ॥ ४७
ते दोघे झगटति परि मत्पति मारील [14]राक्षसापसदा. ।
गरुडापुढें तृणचि तो, इतरीं जरि [15]असुहराक्ष साप सदा.' ॥ ४८
ऐसें ऐकुन [16]सायुध चवघेही बंधु धांवले सहसा. ।
जिष्णु म्हणे, 'वद आर्या! जरि अरि भासत असेल दुःसहसा, ॥ ४९
तरि आज्ञा दे वधितों, तुझियेचि दयेकरूनि [17]यांतूतें. ।

---

१. जवळ. २. सखीस. ३. राक्षसी. ४. माझी वसति. ५. माझा वडील बंधू हिडिंब याच्या आज्ञेनें. ६. नूतन सुवर्णासारिख्या (भीमास). ७. मूर्तिमान्. ८. काळासारखा. ९. शत्रूनें. १०. गरुड. ११. सर्पातें. १२. गरुडाची नखरूप तरवार. १३. तत्क्षणीं. १४. राक्षसाधमा. १५. प्राण हरण करणारे ज्याचे नेत्र तो. १६. आयुधांसह. १७. राक्षसातें.

श्रमलासि पथीं, व्हावा न श्रम बहु [1]अस्मदाश्रया तूतें'. ॥ ५०
भीम म्हणे, 'होतो [2]सुरसुदतीचा [3]शस्त्रमथित नवरा कीं. ।
भुजयुद्धींच मरो खळ, सोडावा त्वां [4]स्वविशिख न [5]वैराकीं. ॥ ५१
मज [6]यातु तसेंचि, जसें अमृतीं [7]विजयाश तक्र, तुच्छा या ।
वधिन कुतुकें, करिल जरि यावरि आंगें [8]शतक्रतु छाया.' ॥ ५२
ऐसें वदोनि भीम [9]श्रितपीडांच्या निवारणारांनीं ।
बाहूंनीं करि अरिला [10]ध्वंसु, जैसा सिंह [11]वारणा रानीं. ॥ ५३
विजयी भीम म्हणे, 'या खळभगिनीचाहि वध करावा, हें ।
[12]वृंदावन भोग्य नव्हे, काय पहातोसि रे! [13]करा! वाहें.' ॥ ५४
धर्म म्हणे, 'रे! बापा! रक्षीं बळिनायका! यश; स्त्रीतें ।
न वधीं; जें कर्म नव्हे [14]सन्मत, करितील काय [15]शस्त्री तें?' ॥ ५५
[16]खेचरी म्हणे पृथेला, 'जाणसि दुःखासि तूंहि सासू! या. ।
न करीं मदुपेक्षा सति! मति कुळजाची नसेचि [17]सासूया. ॥ ५६
आर्ये! [18]लोकद्वयहित, सुतचि नव्हे काय वद नवा [19]सून? ।
काय मरावें क्षुधितें, कल्पलतेजवळि वदन वासून? ॥ ५७
जो निस्पृह संसारीं, बहु विटला तो [20]यमी न संग मनीं ।
जरि धरि, तरि तळमळतां, यत्न करिल तोय [21]मीनसंगमनीं. ॥ ५८
स्मरतां भेटेन पथीं, [22]विषमीं पृष्ठीं तुम्हांसि वाहेन, ।
सेवा करितां तुमची, मी आत्मसुखाकडे न पाहेन.' ॥ ५९
धर्म म्हणे, 'दिधलें जें, मागसि वंदुनि पदासि खेचरि! तें; ।
परि आमुचे करावे त्वां [23]प्रमुदितमति सदा [24]सखे चरितें. ॥ ६०

---

१. आमच्या आधाराला. २. देवांगनेचा. ३. शस्त्रानें मर्दिलेला. ४. आपला बाण. ५. अतितुच्छ राक्षसावर. ६. राक्षस. ('यातु' हा शब्द नपुंसकलिंगी आहे.) ७. 'जसें अमृतीं तक्र विजयाश' असा अन्वय. अमृतावर जय मिळविण्याची आशा बाळगणारें ताक. ८. इंद्र. (इंद्रानें शत म्ह० शंभर क्रतु म्ह० यज्ञ केले, म्हणून त्याला 'शतक्रतु' असें नांव पडलें.) ९. आश्रितांच्या दुःखांचें निवारण करणाऱ्या (बाहूंनीं). १०. गतप्राण. ११. हत्तीला. १२. एका जातीचें कडू फळ. १३. हे हाता! धांव (या राक्षसीवर.) १४. सज्जनांस मान्य. १५. शस्त्रधर. १६. राक्षसी. १७. गुण असतांही दोषदृष्टीनें जें पहाणें तद्युक्त. १८. उभयलोकीं कल्याण करणारा. १९. सून (हा) लोकद्वयहित नवा सुतचि नव्हे काय? वद, असा अन्वय. २०. जितेंद्रिय. २१. मत्स्याच्या संगतीविषयीं. २२. संकटीं. २३. सानंदमानस. त्वां आमुचे सखे सदां (स्व)चरितें प्रमुदितमति करावे—असा अन्वय. २४. बंधु.

क्रीडार्थ [1]दिसा ने, परि सांजे या [2]स्वप्रियावहा [3]आण, ।
रक्षीं सत्य निशाचरि, घात करीना असी वहा [4]आण.' ॥ ६१
खचरी म्हणे, 'चुकेना गुरुभजनीं देह हा निभावो जी ! ।
[5]वचनातिक्रम करितां, क्षिप्र घडो [6]देहहानि भावोजी !' ॥ ६२
गुरुवचनें [7]मारुति जें एकचि [8]सदपत्यरत्न दे तीतें. ।
तन्नाम [9]घटोत्कच, दे सुख पितरां, शतहि सुत न देती तें. ॥ ६३
[10]कार्पटिकाचा वेष स्वीकारुनि पांडुपुत्र ते [11]जातें, ।
मिरवावेंचि, परि अरित्रासें आच्छादिति स्वतेजातें. ॥ ६४

अध्याय तिसावा.

स्कंधीं पृथेसि वाहुनि, लंघुनि मत्स्यादि देश दूरवर, ।
गेले [12]तापसवेश स्वीकारुनि पांडुपुत्र शूरवर. ॥ १
त्या व्यसनांत निववला दर्शन देवूनि [13]तापह व्यासें, ।
जो चिंती साधुजनीं संपत्तिसदा, न ताप, हव्यासें. ॥ २
चिंतामणि अधना जें, धन्वंतरि जें [14]गदाकुला देतो, ।
भेटोनि अकस्मात् सुख तें त्या कुरुच्या तदा कुळा दे तो. ॥ ३
[15]पौत्रांसि म्हणे, 'मज हें कळलें होतें, परंतु जळधीतें ।
मिळतां बळें नदीतें फिरविल कोणी बळी, न [16]खळधीतें. ॥ ४
हा [17]बालद्रुम हो, कां खेद, तुम्हीं, मी [18]सुधाढ्य [19]आवाल, ।
पावाल वृद्धि पुष्कळ, [20]दुष्टग्रीष्मासि लाज लावाल. ॥ ५
प्रार्थावें नलगे मज, जें तुमचें हित करीन आधीं तें. ।
भेटेन, एकचक्रानगरींत रहा, हरीन [21]आधींतें.' ॥ ६

---

१. दिवसास. २. तुझें प्रिय करणाऱ्याला. (भीमाला.) ३. घेवून ये. ४. शपथ. ५. प्रतिज्ञाभंग. ६. देहनाश, मरण. ७. भीम. (मारुताच्या म्ह० वायूचा पुत्र.) ८. उत्तम अपत्य (पुत्र)-रूप रत्न. ९. याचें मस्तक घटसदृश आणि उत्कच म्ह० केंशरहित होतें म्हणून याला 'घटोत्कच' असें नांव पडलें. (आदिपर्व, अ० १५७ श्लो० ३८ पहा.) १०. तीर्थवाइयाचा, कषायवस्त्र धारण करून तीर्थाटन करणाराचा. ११. ज्यातें. १२. तप करणाराचा वेश. १३. दुःखहारक. १४. रोगग्रस्ताला. १५. नातवास. (सत्यवतीचा कानीनपुत्र व्यास, याचा अंबालिकेच्या ठायीं झालेला पुत्र पांडु, म्हणून पांडूचे धर्मादिक पुत्र हे व्यासाचे पौत्र.) १६. दुष्टाच्या बुद्धीला. १७. लहानवृक्ष. १८. अमृतसंपन्न. १९. अळें. २०. खलरूप उन्हाळ्यास. २१. मनोव्यथेतें.

जातां देवूनि अभय [1]निजजनकाचा पिता, महा ज्ञाते, ।
त्याचि नगरीं द्विजगृहीं होते पाळुनि [2]पितामहाज्ञा ते. ॥ ७
[3]सिद्धान्न मातृहस्तीं देती ते वरुनि वृत्ति [4]माधुकरी. ।
भीमासि अर्ध देती, अर्धाचे [5]पांच भाग साधु करी. ॥ ८
होते कांहीं काळ स्वीकारुनि [6]भैक्ष्यवृत्तिला [7]मुदित, ।
तों कुंती परिसे त्या [8]आश्रयदब्राह्मणालयीं [9]रुदित. ॥ ९
भीमासि म्हणे, 'रडतो दुःखें सकुटुंब विप्र बापा! हें ।
मज बहु दुःसह झालें; आलें नेत्रासि अश्रु बा! पाहें. ॥ १०
आम्ही पक्षी, हें [10]गृहं नीड, [11]धरादेव [12]आश्रयागम हा. ।
दुःख हरूनि करावी [13]प्रत्युपकृति, होय हाचि [14]याग महा.' ॥ ११
भीम म्हणे, 'शोध करीं जा, स्वमुखें विप्रनायका पूस. ।
वारीन दुःख सर्वहि, [15]दहना अतिभार काय कापूस?' ॥ १२
द्विजरुदित पुन्हा तप्त [16]श्रुति करि भेटोनि [17]यादवीची, तें ।
मोहे मन, जेंवि विषांबुधिच्या भेटोनि [18]याद [19]वीचीतें. ॥ १३
जाय द्विजाकडे ती गाय जसी वासराकडे मोहें. ।
करितां विलाप, बोलत होता निजदुःख, तेधवां तो[20] हें. ॥ १४
'जाये! वदलीस परस्थळगमनविचार सर्वथा राहो. ।
माहेर येथ आहे, वोळखिती लोक सर्व, थारा हो. ॥ १५
गेलों[21] असतों तरि कां पडतें हें [22]प्राणसंकट [23]प्रमदे! ।
स्वकुटुंबव्यसन जसें देतें न तसें [24]बुधा विष भ्रम दे. ॥ १६
नरि दान तुझें द्यावें कांते! मज भासतें तसें तरि तें, ।
[25]सिंधूदरीं विकावें स्वहितार्थ [26]तितीर्षुनें जसें [27]तरितें. ॥ १७

---

१. पांडूचा. २. पितामह म्ह० आजा (व्यास) त्याच्या आज्ञेला. ३. शिजलेलें अन्न. ४. प्रत्येक पुष्पांतून मधुकर म्ह० भ्रमर जसा मध गोळा करतो, तसा घरोघर भिक्षा मागून जो अन्नभाग मिळेल तो गोळा करणें, या कृतीला 'माधुकरी' म्हणतात. ५. चार बंधूंला आणि एक आईला असे पांच भाग. ६. भिक्षावृत्तीला. ७. संतुष्ट. ८. आश्रय देणाऱ्या द्विजाच्या घरीं. ९. रोदन. १०. घरटा. ११. ब्राह्मण. १२. आश्रयरूप अगम म्ह० वृक्ष. १३. उलट उपकार. १४. यज्ञ. १५. अग्नीला. १६. कर्ण. १७. कुंतीची. १८. जलजंतु. १९. लहरीतें. २०. द्विज. २१. हें स्थळ सोडून जर गेलों असतों. २२. जीवावरचें संकट. २३. हे उत्तम स्त्रिये. २४. शहाण्या पुरुषाला. २५. नदीच्या मध्यभागीं. २६. तरूं इच्छिणारानें. २७. नौकेनें.

पुत्रचि अधिक, न कन्या, अन्यास गमे, मला न लोभ्याला. ।
नयनयुगांतुनि एकहि द्याया स्वप्नीं न कोण तो भ्याला? ॥ १८
देतों निज[1]वपु परि तूं भीरु! कसी साहशील विरहातें? ।
स्वर्गींहि दुःसहचि जें म्हणसील मज स्मरोनि चिरें[2] 'हा[3]!' तें. ॥ १९
प्राणांचा त्याग बरा, तुमचा न बरा, कसा न तो पापी? ।
कूपांत बळें अबळा घालुनि ठकवूनि दोर जो कापी.' ॥ २०
तों ब्राह्मणी म्हणे, 'हो! कवि साधु तुम्हीं करूं नका शोक. ।
यॅ[4]न्मूल 'आपदर्थे' तो शंकरसाचि आठवा श्लोक. ॥ २१
अजि! 'आ[5]त्मानं सततं रक्षेद्दारैर्धनैरपि' श्लोकीं, ।
तेंचि करा हो! न बुडों द्या हो! मज निजमतीसही शोकीं. ॥ २२
पतिपूर्वी स्त्रीस मरण, तें लग्नाहूनि काय हो ऊ[6]न? ।
न रहावेंचि सतीनें पळभरिहि विरूपकाय होऊन. ॥ २३
रक्षाल तुम्हींच मुलें, अबळा वाहील भार जीवा हे ।
रक्षील कशी आल्या नॅ[7]वपूरीं भीरु फार जी वाहे. ॥ २४
जाईन मीच, राक्षस जरि करकर सर्वमानवां चावे. ।
दैवें स्त्री म्हणुनि, दया येतां, मत्प्राण कां न वांचावे? ॥ २५
मज भक्षीलचि तो तरि वि[8]धुरपणें सर्वथा नका राहूं, ।
ती स्त्री मीच, म्हणा जी! मागें सा[9]रूनियां नकारा हूं.' ॥ २६
ऐसें म्हणतां स्त्रीच्या कंठीं घालुनि मिठी म्हणे, '[10]अयि! ते ।
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमो दयिते!' ॥ २७

---

१. स्वशरीर. २. बहुकाळ. ३. हाय. ४. ज्याचें मूळ 'आपदर्थे' असें आहे तो श्लोकः—'आपदर्थे धनं रक्षेद्दारान्रक्षेद्धनैरपि । आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि ॥'. हाच श्लोक मूलग्रंथांत या स्थलीं आहे. (आदिपर्व अ० १६० श्लो० २७ पहा.) ५. (आपत्काळीं) बायकोचा अथवा धनाचा नाश झाला तरी तो पत्करून आत्मरक्षण सतत करावें. ६. उणें. ७. नूतनउदकाच्या पुरांत. ८. गृहस्थाश्रमावांचून. बायको मेल्यानंतर पुरुषाची जी अवस्था असते तश्या अवस्थेंत राहूं नका, विवाह करा, हा भावार्थ. ९. जी! नकारा मागें सारूनिया हूं (होय) म्हणा—असा अन्वय. १०. 'अयि! ते कथं एवं अदयं उक्तम्'=अगे! तूं कसें हें निष्ठुर भाषण बोललीस? 'दयिते! अयं तत् अनुष्ठितुं क्षमः किम्'=हे प्रिये! हा मी तें करण्यास समर्थ आहें काय?. या गीतींत 'अनुष्ठितुम्' हें रूप लेखकप्रमादानें पडलें असून पंतांचा मूळचा पाठ 'अनुष्ठिति' असा असावा असें दिसतें. ही लेखकप्रमादाची कल्पना जर सयुक्तिक असेल तर 'तदयं किमनुष्ठितिक्षमो दयिते!' असा गीतींत फेर करावा लागेल.

परिसे असें पृथा जों तोंचि म्हणे [१]त्यासि कन्यका,'मातें ।
द्या, [२]धर्माचीच सुता, हे किमपि नयेचि अन्यकामातें. ॥ २८
[३]आत्मा पुत्र, सखा स्त्री, कन्या चिंताचि सर्वकाळ, जिला ।
प्रसवोनि वाहति मनीं श्रीमंतहि पितर सर्व काळजिला. ॥ २९
कन्या रक्ष्य तिघांतुनि एका तुज हो म्हणेल कां टाकीं ? ।
बापा! कांट्यानेंचि प्राज्ञ सुखें काढिताति कांटा कीं.' ॥ ३०
ऐसी वदोनि कन्या रडवूनि रडे, तशांत जवळून ।
खवळूनि उठे बाळक बोले हस्तें तृणासि कवळून. ॥ ३१
समजावुनि [५]त्यांसि म्हणे, 'ऐसें लाटिलचलासि मालीन. ।
कां ललतां आलल्तां पलतां मी सागलांत तालीनें.' ॥ ३२
हांसविलीं हर्षविलीं व्यसनार्त तिघेंहि बाळशब्दानें. ।
[६]अब्दानें [७]ग्रीष्मदवाकुळबर्हिकुळें जसींच [८]अब्दानें. ॥ ३३
तेव्हांचि पृथा देवी भेटे, अभयोक्ति जी वदे त्यांतें. ।
[९]संजीवनीच जाणों ती रोगें करुनि जीव देत्यांतें. ॥ ३४
रोदनकारण पुसतां विप्र म्हणे, 'अंब! तापसि! [१०]श्रवणें ।
घ्यावें शिव, अशिवाच्या व्यर्थचि कां तूंहि तापसि [११]श्रवणें? ॥ ३५
या राष्ट्रा बकराक्षस [१२]अजयूथा लांडगा जसा [१३]पौळी. ।
[१४]तद्वेतनदानाची आलि असे आजि मजकडे पाळी. ॥ ३६
एक [१५]महिष, एक पुरुष, [१६]शाल्योदनराशि, त्यासि भक्षाया ।
द्यावा असें असे, या व्यसनीं मज कोण [१७]दक्ष रक्षाया? ॥ ३७
विरहभयें एकासहि राक्षसहस्तीं न देववेचि, तसें ।
धनहि न पुरुष मिळेसें, स्वकुळचि मी [१८]भूमिदेव वेचितसें. ॥ ३८

---

१. त्या ब्राह्मणाला. (बापाला.) २. धर्मानेंच सुता परित्याज्य आहे. ३. 'आत्मा पुत्रः सखा भार्या कृच्छ्रं तु दुहिता किल' असें मूळांत आहे. (अ० १६१ श्लो० ११ पहा.) ४. बाप, आई, बहीण यांस. ५. अशीच एक बोबड्या शब्दांची गीति कृष्णास शकटासुर मारावयास आला होता त्या प्रसंगींची आहे:—"गोपशिशु म्हणति,'पलिसा ललतां हलिनेंचि झालिला पाय,। गाला उलोनि पलला, सल्व खलें, नवल कलितसां काय? ॥" ६. मेघानें. ७. उन्हाळ्यांतील वणव्यानें पीडित जे मोर त्यांचीं कुळें. ८. उदकाच्या दानानें. ९. रोगें करुनि जीव देत्यांतें ती जाणों संजीवनीच—असा अन्वय. रोग झाला म्हणून जे जीव देणारे त्यांतें ती संजीवनीच. १०. कानानें. ११. श्रवणानें, ऐकण्यानें. १२. बकऱ्यांच्या कळपास. १३. रक्षी. १४. त्याचें वेतन (पगार) देण्याची. १५. रेडा, १६. साळीच्या भाताची रास. १७. समर्थ. १८. ब्राह्मण.

सहज गज[1]गंड भेदी हरिंचा[2] न्हता कळा शिकत करज.[3] ।
[4]अकृतघ्नत्वार्थचि दे शुचिता मळल्या जळासि कतकरज.[5] ॥ ३९
तैसा कुळीन जन परदुःखध्वंसीं पटु स्वभावानें ।
संकट हरि अरिचेंही, हरिनां कां प्रार्थितांचि भावानें?[6]' ॥ ४०
कुंती म्हणे, 'दिला तुज एक स्वसुत,[7] द्विजा! नकोचि रडों. ।
हा शोकभर स्वशिरीं घेउनि सकुटुंब तूं नको चिरडों.' ॥ ४१
विप्र म्हणे, 'शिव! शिव! परघातक जो स्वार्थलुब्ध नर कामीं, ।
तो जैसा तैसा या कर्मे पावेन घोर नरका मी. ॥ ४२
करुनि पराचें अहित स्वहित विहित काय तापसि! कवीसी. ।
माते! असें असें मज व्हाया याहूनि ताप सिकवीसी.' ॥ ४३
कुंती म्हणे, 'मं[8]दात्मज गुरुवरमंत्रें असे महातेजा. ।
साहों न शकति राक्षस वज्राघातासही सहाते ज्या. ॥ ४४
सुखवल्लिचा न्हे गा! क्षुद्रलतागुच्छकासम स्तबक.[9] ।
स्पष्ट मंदात्मजचरणीं[10] अर्पील प्राणधन समस्त बक.[11] ॥ ४५
परि हें विप्रवरा! त्वां न प्रकटावें, मनींच जिरवावें. ।
विद्यार्थिजनोपद्रव[12] लागेल म्हणूनियां न मिरवावें.' ॥ ४६
मग विप्रपृथाप्रार्थित[13] भीम धरुन राक्षसापराध मनीं, ।
कोपे, जाणों दहनचि तो, होय प्रार्थना तया धमनी.[14] ॥ ४७
तें मान्य करुनि मुनिला, 'व्हा स्वस्थ' असेंचि तो कवि प्रार्थी. ।
निःस्व[15] जसे वित्तार्थी, तैसेचि कुलीन लोक विप्रार्थी. ॥ ४८
स्वानुज[16] साहस कांहीं करणार, असें युधिष्ठिरा समजे. ।
'[17]आकारेंचि [18]परेंगित कळे म्हणति कवि युधिष्ठिरासम जे. ॥ ४९

---

१. हत्तीचीं गंडस्थळें. २. सिंहाचा. ३. नख. ४. जलानें आपलें रक्षण केलें हें कृत्य, त्याजविषयीं आपण कृतघ्न न व्हावें या हेतूनें. ५. निवळीचें झाड, तिच्या बियांचें चूर्ण. ६. भक्तीनें. ७. माझा मुलगा. ८. ज्याला. ९. गुच्छ, फुलांचा झुबका. १०. माझ्या मुलाच्या पायावर. ११. दैत्यविशेष. १२. विद्यार्थिजनाचा त्रास. बकवधाची गोष्ट लोकांस कळली तर ते कौतुकानें भीमापाशीं मंत्रविद्या शिकण्यासाठीं येऊन तन्निमित्त त्रास देतील. ही मंत्रविद्या शिकणारे हेच विद्यार्थी. १३. द्विज आणि कुंती यांनीं प्रार्थिलेला. १४. फुंकणी. १५. दरिद्री. (ज्यांपाशीं स्व म्ह० धन नाहीं असे.) १६. आपला धाकटा बंधु (भीम.) १७. याच अर्थाचा श्लोकः—'आकारैरिंगितैर्गत्या चेष्टया भाषणेन च । नेत्रवक्त्रविकाराभ्यां ज्ञायतेऽन्तर्गतं मनः ॥.' १८. दुसऱ्याचा अभिप्राय.

पुसतां[१] पृथा कथी तें. धर्म म्हणे, 'अंब[२]! परिस तोकवच[३]. ।
द्यावा काय उचित? जो[४] रणीं सहाणार अरिस तो कवच. ॥ ५०
द्यावा परा न, तरतां अंबुधिमध्यें जसा स्व नावाडी. ।
धार्मिक[५] न तो, जना जो न गणुनि शिशुरोदनस्वना[६] वाडी[७].' ॥ ५१
कुंती म्हणे, 'अरे! बा! पावों द्यावा मुनी कसा असुखा? ।
आम्हीं सुखें म्हणावें, 'काळा! द्विज सोड, आमुचे असु[८] खा. ॥ ५२
विप्रार्थ तुम्हीं असुही स्वर्गीं सुखवावया जनक वाडा[९]. ।
हेंचि हित, न काळासहि पाहुनि लाविति भलेजन कवाडा. ॥ ५३
भीसी कां? अनुभविलें अनुजबळ तुवां न काय गा! रानीं[१०]? ।
पावो ताप पराचा, परि हिमगिरिचा न काय[११] गारांनीं. ॥ ५४
पडला निपटे[१२] शिशुपणीं भीम मदंकावरूनि[१३] ज्यावरि तें ।
झालें चूर्ण शिळातळ न धरीं भय, यश तवानुजा वरितें. ॥ ५५
ब्राह्मणसाहाय्यकर[१४] क्षत्रिय जो तोचि संत, तोचि तरे. ।
ऐसें व्यासें कथिलें[१५], म्हणुनि तुम्हां हेंचि संततोचित[१६] रे!' ॥ ५६
जननीस धर्म वर्णी, नवल न वर्णील तीस सुरभी[१७] ती. ।
तरिच तसे खळ वधिले तत्पुत्रांनीं जयांसि सुर भीती. ॥ ५७
रात्री एकाकीही[१८] शिरतां सागरवनीं[१९] न भी मकर[२०], ।
भीमहि तसा बकवनीं आणि तदन्नीं[२१] तसाचि भीमकर[२२]. ॥ ५८
जेवी[२३] भीम, 'बका! ये' ऐसी मारूनि हाक उग्रास[२४], ।
शिरले काय सदुदरीं[२५] सदोदनाचे[२६] भिवोनि सुग्रास[२७]. ॥ ५९
हें पाहुनि बक धांवे, मानेवरि दे धडाधड बुक्यांतें. ।
होय तया अशनीं[२८] त्या कुरुकीर्तिकुचाच्चिया हित बुक्यातें[२९]. ॥ ६०

---

१. धर्मानें विचारिलें असतां. २. हे आई. ३. बालकवचन. ४. जो रणीं अरिस सहाणार तो कवच द्याया काय उचित—असा अन्वय. रणांत शत्रूचा मार सोसणारा जो कवच (भीम) तो देण्यास योग्य काय ?. ५. धर्मशील. ६. पुत्राच्या रोदनशब्दास. ७. वाढी. ८. प्राण. ९. बाढा. १०. अरण्यांत हिंडिबवधाच्या समयीं. ११. देह. १२. केवळ. १३. माझ्या मांडीवरून. १४. ब्राह्मणाला मदत करणारा. १५. (महाभारत, आदिपर्व, अ० १६४ श्लो० २२ पहा.) १६. निरंतर योग्य. १७. कामधेनु. १८. एकटाही. १९. समुद्रोदकांत. २०. सुसर. २१. त्या बकासुराच्या अन्नांत. २२. भीमाचा हस्त. २३. भक्षी. २४. भयंकरास. (बकास.) २५. साधूंच्या पोटांत. २६. उत्तम अन्नाचे. २७. उत्तम घांस. २८. भोजनसमयीं. २९. कुरुकीर्तिरूप स्त्रीच्या स्तनाला बुक्यासारखें. (बुका हा सुगंधी पदार्थ प्रसिद्धच आहे.)

हंसेंहि जेववावा जो प्रेमें धरुनियां चिंबुक[1] लावा,[2] ।
तो त्या गरुडा झडपी, ‘आमरण’[3] म्हणे ‘असाचि बुकलावा.’ ॥ ६१
भीम न सोडी भोजन, राक्षस ताडी बळें जरि बुक्यांनीं. ।
खळ गांजी, परि सादर हरिभजन करी जसा बुध[4] मुक्यांनीं.[5] ॥ ६२
पांडव जेवुनि आधीं मग राक्षसजीवितास आंचवला. ।
सन्मणि[6] न कोटिलक्षा ये, येतो काय राक्षसा चवला[7] ? ॥ ६३
मारी हरि लीलेनें जेंवि गजा,[8] तेंवि पार्थ कुणपाशा.[9] ।
तैं सुर म्हणति, ‘यमाच्या गुरु साजति भीमबाहुगुण[10] पाशा.’ ॥ ६४
ठेवी नगरद्वारीं परमभयानक अशुद्धिमत्[11] कुणप,[12] ।
जाणो मातेनें[13] तो वधिला शिशुरक्तपोग्र[14] मत्कुणप.[15] ॥ ६५
भीमें हळूचि जावुनि कथिली वार्ता द्विजासि कानीं ती. ।
श्लाघ्यहि[16] करुनि न मिरवी कुळज, सुजन हो! असी सिका नीति. ॥ ६६
‘चुकलों, क्षमा करा मज, अपराधसहस्र घातुका[17] घडलें.’ ।
या[18] भावें जाणों तें द्वारीं[19] रक्षं[20] क्षमापना[21] पडलें. ॥ ६७
प्रातःकाळींच तसें बकशव पाहोनि, एकचक्रा[22] तें ।
यश देती झाली करिवरपाळाच्याचि[23] एकचक्रातें. ॥ ६८
म्हणति विचक्षण पुरजन अन्योन्य मनीं धरूनि हरिख, ‘चला, ।
ज्याचा वार[24] तयासचि हेतु पुसों कीं कसा खअरि खचला?’ ॥ ६९
सांगे विप्र, ‘मजकडे येतां प्राणघ्न[25] उग्रतर वार,[26] ।
बहु भ्यालों, अज[27] जैसा भीतो पाहूनि उग्र तरवार. ॥ ७०
सकुटुंब रडत होतों तों आला मंत्रसिद्ध विप्र कृती,[28] ।
रोदनहेतु मज पुसे तो सदय महामना शुचिप्रकृती. ॥ ७१

---

१. हनुवटी. २. पक्षिविशेष. ३. मरेपर्यंत. ४. ज्ञाता. ५. मुकाट्यानें. ६. उत्तम रत्न कोटिलक्षास मिळत नाहीं. ७. दोन आण्यास. ८. कुवलयापीड नांवाचा कंसाचा हत्ती. याला कृष्णानें मथुरेंत मारिलें. ९. प्रेतभक्षक राक्षसास. १०. भीमाचे बाहु(भुज)रूप गुण (दोरे). ११. अपवित्र. १२. शव, प्रेत. १३. नगरीरूप मातेनें. १४. पुत्राचें रक्त प्राशन करणारा असा भयंकर. १५. ढेंकणांमध्यें श्रेष्ठ. १६. स्तुत्य कार्य. हें अर्ध सुभाषितांत गणण्यालायक आहे. १७. घातक्याला. १८. वर सांगितलेल्या गीत्यर्धांतील उद्देशानें. १९. नगराच्या द्वारीं. २०. राक्षस. २१. क्रोधाविष्ट जनास मृदु भाषणानें (‘चुकलों, क्षमा करा मज’ इत्यादि) क्षमार्द्र करण्यासाठीं २२. एका नगरीचें नांव. २३. गजेंद्राचें पाळण करणारा जो श्रीविष्णु त्याच्या चक्राला जें यश तें (बकवधरूप यश) एकचक्रा नगरी देती झाली. २४. पाळी. २५. प्राणनाश करणारा. २६. पाळीचा दिवस. २७. बकरा. २८. कुशल.

ऐकोनि व्यसन वदे, 'मी देतों अन्न [1]राक्षसापसदा. ।
हरिणवनीं [2]वृक न बरा, [3]मंडूकाच्या बिळांत साप सदा. ॥ ७२
मच्चिंता न करावी, स्वस्थ असावें' असें अभय मातें ।
देउनि, जाय [4]दमाया जेंवि [5]शिवाप्राणवल्लभ यमातें. ॥ ७३
त्याचेंचि कर्म हें, तो आम्हाला होय पौर हो! तात. ।
साधूंसि सहाय सुखें देव [6]सकर्पूरगौर होतातें." ॥ ७४
ऐसें ऐकुनि पौर [8]ब्रह्मोत्सव करिति गाति महिमा ते, ।
म्हणती, 'ब्राह्मणचि तुझा पति गुरु आम्हां प्रजांसि महि माते!' ॥ ७५

अध्याय एकतिसावा.

पांडव जेथें होते तेथें [9]वासार्थ एक विप्र हित ।
शुचि तेजस्वी आला, किरण जसा [10]नीरजीं [11]रविप्रहित. ॥ १
तो सांगे, '[12]द्रुपदमखप्रभवा [13]कृष्णा [14]अयोनिजा कन्या, ।
तीचा स्वयंवरोत्सव, न कळे कोणा वरील ती धन्या.' ॥ २
पांडुसुत तिची पुसती जैसे [15]अनभिज्ञजन कथा नमुनी. ।
होय [16]श्रोतृश्रोत्रक्षुधितार्भकतृप्तिजनक थान मुनी. ॥ ३
कथिली द्रोणद्रुपदद्वेषकथा [17]परिभवान्त [18]आधींची, ।
[19]जी त्या पांचाळाची झाली उत्पत्तिभूमि [20]आधींची. ॥ ४
मग विप्रें ऐकविली पुढिल कथा ती असी, "[21]स्वअहितातें ।
मारीसा सुत व्हाया, शोधी मुनितें [22]तपस्विमहितातें. ॥ ५
[23]उपयाजाख्यमुनीतें सेवी बहु, काम तो पुसे आर्य; ।
द्रुपद तयाला सांगे जें होतें योजिलें मनीं कार्य. ॥ ६

---

१. राक्षसनीचा. २. लांडगा. ३. बेडुकाच्या. ४. दमन करण्यासाठीं. ५. पार्वतीपति. (शिव.) ६. कापुरासारखा गौरवर्ण जो शंकर त्यासह. शंकर कर्पूरगौर आहे असें वर्णन ग्रंथांतरीं आढळतें. ७. हें अर्ध सुभाषितरूप आहे. ८. ब्राह्मणानें राक्षसाचा वध केला असें ऐकून ब्राह्मणांच्या सुखासाठीं केलेला पूजनादिक उत्सव. ९. रहाण्याकरितां. १०. कमलीं. ११. सूर्यानें पाठविलेला. १२. द्रुपदाच्या यज्ञापासून जिची उत्पत्ति ती. १३. द्रौपदी. १४. शुक्रशोणितसंयोगानें जन्म न पावलेली. १५. मूर्ख, अजाण. १६. श्रवण करणाऱ्यांचीं कर्णरूप जीं क्षुधित बाळें त्यांला तृप्ति देणारें थान (स्तन) मुनि (तो विप्र) होई. १७. पराभवापर्यंत १८. मागची. १९. कथा. २०. काळजींची, मनोव्यथांची. २१. स्वकीयशत्रूतें. (द्रोणातें.) २२. तपस्विजनांस महित म्ह० वंदनीय अशा मुनीतें. २३. ऋषिविशेष.

‘[1]अर्बुद गाई देइन तुज, दे [2]द्रोणान्तहेतु सुत मातें. ।
नाशी मद्व्यसनातें, जैसा नाशी [3]विभावसु तमातें.’ ॥ ७
मान्य करी न महात्मा, परि नृप जोडोन हात दास्यातें, ।
विधुतें चकोरसा तो म्हणे, ‘वरामृत वदा’ [4]तदास्यातें. ॥ ८
उपयाज म्हणे, ‘प्रार्थी मद्भ्राता ज्येष्ठ याजनामा जी! ।
इच्छा ती सांग तया, तो परम समर्थ या जनामाजी. ॥ ९
कार्य करील तुझें, जा; आहे ज्ञाता, परंतु लोभी तो; ।
हूं न म्हणेल, इतर जन पापापासूनि थोर जो भीतो. ॥ १०
म्हणसील कसा लोभी तरि आचरणावरूनि वळखावें, ।
भक्षी विजनींही जें [5]स्थळशुचिता न कळतां न फळ खावें.’ ॥ ११
उपयाजमतें प्रार्थी [6]पुत्रार्थी भूप हा तया, ज्याला ।
[7]धनलोभांक असे, परि जोडी [8]द्विजराज हात याजाला. ॥ १२
याज द्रुपदमनोरथ परिपूर्ण करावया, [9]नयज्ञात्या ।
अनुजा घेवोनि, करी [10]जो देता पुत्रदान यज्ञा त्या. ॥ १३
[11]हवनांतीं याज म्हणे, ‘ये [12]राज्ञि! [13]क्षिप्र घे [14]वरा [15]हवितें, ।
होइल [16]मिथुन तुज असें कीं, जें [17]शतपुत्रमद न राहवितें.’ ॥ १४
राज्ञी म्हणे, ‘मुने! मी पुण्यहवि[18]प्राशना नसें उचिता. ।
तांतड कां? बा! थांबा, [19]मलिना आहें, घडो मला [20]शुचिता.’ ॥ १५
याज म्हणे, ‘देवि! रहा, किंवा जा, न [21]प्रयोग राहेल, ।
[22]घनबिंदु चातकीच्या काय विलंबें विलंब साहेल?’ ॥ १६
देवीच्या [23]आत्मरजोदोषें जेव्हां स्वभाग राहविला, ।
याज [24]शिखिमुखीं [25]होमी सं[26]ततिपीयूषसागरा हविला. ॥ १७

---

१. दशकोटि. २. द्रोणाच्या अन्तास (मरणास) कारण असा. ३. सूर्य. ४. त्याच्या मुखातें. ५. भक्षण कोणत्या ठिकाणीं करावें आणि कोणत्या ठिकाणीं करूं नये, याजविषयीं नियम आहेत; त्यांप्रमाणें जागा योग्य आहे किंवा नाहीं हें न जाणतां, स्थळाचा शुद्धपणा न पाहतां. ६. सुतलाभेच्छु. (द्रुपद.) ७. द्रव्यलोभरूप चिन्ह किंवा लांछन. ८. चंद्र किंवा ब्राह्मणश्रेष्ठ. ९. नीतिजाणत्या. १०. जो (यज्ञ) पुत्रदान देता (देणारा) त्या यज्ञा करी–असा अन्वय. ११. यज्ञाच्या शेवटीं. १२. पृषतस्नुषा, द्रुपदभार्या. १३. सत्वर. १४. पवित्र, श्रेष्ठ. १५. हवनार्ह घृताला. १६. जुळें, जोडी. १७. शंभर पुत्रांचा गर्व. १८. पाना. १९. अस्पृश्या, अस्नाता. २०. शुद्धपणा. २१. यज्ञाचा प्रयोगविधि (अनुष्ठान) राहणार नाहीं. २२. हें अर्ध सुभाषितरूप आहे. २३. देवी रजस्वला होती म्हणून पवित्र हविर्भाग घेण्यास ती गेली नाहीं. तो तसाच राहिला. नंतर याजानें त्याचें विसर्जन अग्निमुखांत केलें. २४. अग्निमुखीं. २५. हवन करी. २६. संततिरूप अमृताचा सागर. (हविचें विशेषण.)

कवचकिरीटशरधनुश्चर्मासिधरा[1] वि[2]भावसु कुमारा ।
प्रसवे, वे[3]दी हि महाकन्यारत्न स्व[4]भावसुकुमारा. ॥ १८

कन्यारत्न जसें क्षिति[5] ज[6]नकाला व्हावया सुख निवे[7]दी, ।
तैसेंचि द्रुपदाला भाग्यें होवूनियां सु[8]खनि वे[9]दी. ॥ १९

होय न[10]भोवाणी कीं, 'हे सर्व[11]स्त्रीश्वरी सु[12]सत्कार्या ।
अवतरली देवांच्या सिद्धिप्रति न्यावयासि स[13]त्कार्या. ॥ २०

भय जानकीनिमित्तें झालें रा[14]त्रिचरा जसें हो! तें, ।
ए[15]तन्निमित्त सा[16]ध्वस सनृपजनां कौरवां तसें होतें.' ॥ २१

ऐसें श्रवण करुनि नरराजहि याजहि स[17]हासजन नाचे. ।
गाणार सुरहि झाले दि[18]व्यकुमारीकुमारजननाचे. ॥ २२

रा[19]ज्ञी म्हणे, 'मुने! हे कन्या हा सुतहि क[20]ल्पनग, मोहें ।
माता जाणोत मला, [21]हविराहुति माय, यांसि न गमो हें.' ॥ २३

धृष्टद्युम्न असें त्या पुत्राचें नाम अ[22]र्थ साधूनी ।
कृ[23]ष्णा हें कन्येचें केलें अ[24]भिधान सर्वसाधूंनीं. ॥ २४

याजाच्या मंत्रबळें [25]त्यांला वाटे खरीच जननी [26]ती, ।
मोह[27]प्रदा जरि तरी त्या मुनिची गाति साधुजन नीती. ॥ २५

द्रोण तयासहि पढवी, जरि झाला [28]स्वनिधना असें कळलें; ।
कीं, भा[29]वि यश न मळलें, यत्नशतेंही कधीं नसे टळलें. ॥ २६

---

१. चिलखत, मुगुट, बाण, चाप, ढाल आणि तरवार यांतें धारण करणारा असा. २. अग्नि. ३. अग्निकुंडही. ४. जात्या कोमल. ५. पृथ्वी. ६. जनकराजाला. (सीतेचा पिता.) ७. अर्पण करी. ८. उत्तम खाण. ९. वेदी देई (निवेदी.) १०. आकाशवाणी. ११. सर्व स्त्रियांमध्यें श्रेष्ठ, सर्वयोषिद्वरा. १२. सत्कारास योग्य. १३. क्षत्रियक्षय हें देवांचें उचित कार्य. १४. राक्षसां. १५. हिच्या (द्रौपदीच्या) योगें. १६. भय. १७. स्वकीय जनांसह. १८. द्रौपदी आणि धृष्टद्युम्न यांच्या जन्माचे. १९. पार्षती, पृषताची सून. २०. कल्पवृक्ष. २१. हवीची (यज्ञद्रव्याची) आहुति. २२. 'धृष्टद्युम्न' या शब्दाचा अर्थ धरून. धृष्ट म्ह० प्रगल्भ आणि द्युम्न म्ह० वित्त (राजांचें बलरूप धन) असा शब्दार्थ होतो. बल, शत्रूत्कर्षासहिष्णुत्व, कवचकुंडलादिकांसह जन्म, शस्त्रास्त्रशौर्य इत्यादि गुणांनीं संपन्न असल्यामुळें कुमारास धृष्टद्युम्न असें नांव ठेविलें. (आदिपर्व, अ० १६७ श्लो० ५३.) २३. वर्णानें काळी असल्यामुळें हिला कृष्णा असें नांव ठेविलें. २४. नांव. २५. त्या दोघां मुलांना. २६. द्रुपदाची भार्या. २७. भ्रम उत्पन्न करणारी. २८. आपल्या नाशाला. २९. यश न मळलें (आणि) यत्नशतें ही कधीं (निधन) टळलें नसे (असें) भावी (मानी, गणी,)—असा अन्वय. द्रोणानें द्वेषानें आणि राज्यार्थ जाईल या भयानें धृष्टद्युम्नाला विद्या शिकविली नाहीं अशी अकीर्ति होऊं नये यास्तव विद्यादान केलें, हा भावार्थ.

जें न मिळालें अन्या तिळमात्रहि वेचितांहि [1]कायशतें, ।
[2]भृत्यजिता **अ**जिता कीं लाभे त्या [3]सुज्ञनायका यश तें. ॥ २७

अध्याय बत्तिसावा.

भेटोनि **व्या**स म्हणे [4]पौत्रांसि, 'तुम्हां [5]सुखाब्धिमज्जन हो, ।
तुमच्या सत्कीर्तीनें [8]बहु लज्जित अन्य [6]कीर्तिमज्जन [7]हो. ॥ १
ऐका सुकथा, कोणी ऋषिकन्या तप करूनि अत्यर्थ, ।
[9]**शं**भूप्रति आराधी बहुकाळ तपोवनांत [10]पत्यर्थ. ॥ २
दर्शन देउनि **ह**र 'वर माग' असें वचन तो [11]अगाध वदे. ।
ती पांचदां म्हणे, 'मज देवा! [12]वरदेश्वरा! अगा! [13]धव दे'. ॥ ३
शंभु म्हणे, 'पांच दिले. त्यांची [14]जन्मांतरांत नवरी, हो!' ।
ती प्रार्थूनि म्हणे, 'हें काय? सती बहुवरांसि न वरी, हो.' ॥ ४
देव म्हणे, 'तूं पति दे ऐसें वदलीस पांचदां साचें, ।
करणें लागे [15]प्रार्थित मज टाकुनि [16]पंचपांच दासाचें.' ॥ ५
वर दे [17]वरदेश जिला, झाली ती **द्रु**पदकन्यका, नातें ।
येतें तुम्हांकडे हें, जाऊं द्यावें न अन्य कानातें. ॥ ६
द्रुपदपुरींच रहा जा, तेथ तुम्हांला वरील नवरी ती, ।
तोंवर [18]हेचि असों द्या, बुधहो! दाऊं नका चि नव [19]रीती. ॥ ७
[20]**पृ**षतकुळ**नं**दनींच्या व्हाल वरुनि त्या सभाग्य [21]वेलीला ।
बहु लाजतील तुमच्या लीलेला [22]सर्वभाग्यवल्लीला.' ॥ ८
मुनि गेल्यावरि चिंतिति [23]त्यां, सेवी [24]यत्पदांबुजा [25]**मा** ते, ।
मग तेथूनि निघाले, व्हाया **पां**चाळराजजामाते. ॥ ९

---

१. देहशतें. २. दासांनीं (भक्तांनीं) जिंकिलेल्या अजिताला (देवाला.) ३. विद्वद्वर्या. (द्रोणा.) ४. नातवांस. (व्यास हा सत्यवतीचा पुत्र आणि पांडव हे तिचे प्रपौत्र म्ह०. पणतु, (तेव्हां ते व्यासाचे पौत्र.) ५. सुखरूप सागराचें स्नान ६. कीर्तिमान् जन. ७. होवो. ८. बहुत. ९. शंकर. १०. पतीकरितां. ११. गंभीर. १२. वर देणाऱ्यांमध्ये श्रेष्ठा. १३. पति. १४. अन्यजन्मीं. १५. मागितलेलें (इष्टकार्य.) १६. वेडेवांकडे छक्केपंजे. १७. वर देणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ. (शंकर.) १८. हे (रीति) असों द्या,हल्लींचाच द्विजवेष ठेवा. १९. क्षत्रियत्वप्रकाशक नवी रीति. २०. पार्षतकुळरूप नंदनवनींच्या. २१. लतेला. २२. सर्व भाग्यवंतांच्या लीला. २३. कृष्णाला. २४. ज्याच्या पदकमलाला. २५. लक्ष्मी.

मार्गासि अहोरात्र[1] क्रमितां रात्रौ धरूनि कोलीत[2], ।
चाले धनंजय पुढें खपथींच्या[3] घनतमासि[4] सोलीत[5]. ॥ १०
त्या उल्मुकें[6] कुठारें[7] घनवनसें[8] निबिड तिमिर भंगे तें. ।
आले जों ते पांडव रात्रौ मार्ग क्रमूनि गंगेतें[9]. ॥ ११
कोपे गंधर्वांचा राजा अंगारपर्ण[10] पाहूनी, ।
दापूनि[11] म्हणे, 'यांचा मार्गें परतोनि, दूर राहूनी. ॥ १२
इच्छित असाल व्हाया जरि खगपति[12]गृहबिलेशयासम[13] यें[14]. ।
नाहीं लंघीत कधीं, जे मुनिवर, तेहि लेश या समया[15]. ॥ १३
गंधर्वयक्षराक्षसभाग निशी[16], नरविभाग दिन, याला ।
वेदप्रमाण, रक्षिति बुध मर्यादा धरूनि विनयाला. ॥ १४
गंधर्वराज मी, या करिती क्रीडा जळांत मज्जाया[17], ।
बालिश[18] हो! येतां कां प्राणव्यसनाब्धि[19]माजि मज्जाया[20]? ॥ १५
जिष्णु म्हणे, 'रे! मंदा! गंगास्नानासि नियम काळाचा? ।
कोण करील स्वांबाभिगमीं[21] उत्साहभंग बाळाचा? ॥ १६
'रात्रौ थान न प्यावें, प्यावें दिवसाचि,' जो असें वदता ।
त्यालागिं पशुत्वाची साची साजे सुधीमतें[22] पदता[23]. ॥ १७
हो दूर मार्ग सोडुनि, रविचा तम होतसे जसें दूर. ।
गृध्र नव्हेचि अरुणसख[24] आनखशिख[25] विखरितांहि सेंदूर[26].' ॥ १८
गंधर्वराज कोपें सोडी शर, जे शिखीच[27] तिखटपणें. ।
दाविति तें जें भेकीं दाखविति क्षुधित उग्रविख[28] टपणें[29]. ॥ १९

---

१. रात्रंदिवस. २. ज्वलत्काष्ठ. ३. 'गतिरोधकपथतमासि सोलीत' असाही पाठ आहे. ४. निबिड अंधकाराला. ५. सोलणें=साल काढून टाकणें. सोलीत=कमी करीत, जाळीत. ६. कोलितानें. ७. कुऱ्हाडीनें. ८. दाट. ९. सोमाश्रयायण नामक गंगातीर्थास आले. १०. गंधर्वविशेष. ११. दटावूनि. १२. गरुडगृहांतील. १३. सर्पाप्रमाणें. १४. पुढें या. १५. नियमाला. १६. गंधर्वादिकांचा संचारकाल निशा आणि मनुष्यांचा संचारकाल दिवस. १७. माझ्या स्त्रिया. १८ मूर्ख हो. १९. प्राणसंकटरूप सागरांत. २०. बुडाया. २१. आपल्या आईकडे जात असतां.) २२. सुज्ञांच्या मतानें. २३. स्थानत्व, पदवी. २४. अरुणाचा मित्र सूर्य. रविचा (मार्ग सोडुनि) जसें तम दूर होतसे (तसें तूं) मार्ग सोडुनि दूर हो—असा अन्वय. २५. नखापासून शेंडीपर्यंत. २६. गृध्र आनखशिख सेंदूर विखरितांहि अरुणसख नव्हेचि—असा अन्वय. २७. अग्नीच. २८. भयंकर सर्प. (ज्यांचें विष भयंकर आहे असे.) २९. टपून बसणें, लक्ष लावून बसणें. जें टपणें क्षुधित उग्र विख भेकीं दाखविति तें (टपणें शर) दाविती—असा अन्वय.

खंडी शरांसि अर्जुन लीलेनें फिरवुनी [1]अलातातें, ।
धरि मोडुनि [2]अग्न्यस्त्रें; नकुळ म्हणे, 'जिंकिला भला तातें.' ॥ २०
केशीं धरूनि त्यातें वोढुनि धर्मासमीप जों आणी, ।
[3]पत्यभयार्थ प्रार्थी जोडुनि कुं[4]भीनसी सती पाणी. ॥ २१
धर्म म्हणे, "हे याची मज म्हणत्ये नमुनि बायको, 'पावें, ।
सोडीं,' सिंहें शशकीं मशकीं, गरुडेंहि, काय कोपावें?" ॥ २२
जि[5]ष्णु म्हणे, 'गंधर्वा! देतो तुज अभय [6]आर्य जा वांचें, ।
न सरो त्वदायु, न सरे जेंवि विवाहांत कार्य [7]जावांचें.' ॥ २३
गंधर्व म्हणे, 'त्यजिलें म्यां निज अं[8]गारपर्ण हें नाम, ।
चित्ररथ म्हणा मज, तूं मान्य तसा जेंवि [9]भार्गवा [10]रांम. ॥ २४
मी [11]चाक्षुषी [12]स्वविद्या देतों घ्या दिव्य [13]पांचशत वाजी ।
[14]श्रीपद्म हो! तुम्ही निजसख्यरसीं हा द्विरेफ[15] [16]तरवा जी! ॥ २५
घेवुनि [17]फळाद्युपायन हर्षवितो तात [18]पदनतापत्या ।
तैसें करीं, म्हणो 'हूं' मात्र तुझें [19]दानिं वदन, [20]तापत्या!' ॥ २६
जिष्णु म्हणे, 'सख्य असो, माझें मज 'हूं' म्हणों न दे शील, ।
[21]अस्त्रविनिमयें घेऊं विद्या, जरि हूं म्हणोन देशील. ॥ २७

---

१. कोलितातें. २. ज्याची देवता अग्नि आहे असें अस्त्र. ३. पतीला अभय मिळावें असें. ४. गंधर्वस्त्रीचें नांव. ५. अर्जुन. ६. धर्मराज. ७. परस्परबंधुस्त्रियांचें. ८. अंगार म्ह० निखारा, त्यासारखें भास्वर आणि दुःस्पर्श आहे पर्ण (वाहन, रथ) ज्याचें तो. ९. परशुरामास. १०. दाशरथी रामाचा पराक्रम पाहून तो जसा जामदग्न्याला मान्य झाला तसा. ११. नामविशेष. (विद्येचें विशेषण). १२. चाक्षुषी विद्या. तीन जगांतील कोणताही विषय आपल्या चक्षूनें म्ह० नेत्रानें जसा पहावा असें इच्छितों तसा पाहतों म्हणून 'चाक्षुषी विद्या' असें या विद्येचें नांव. हिचें महाभारतांत वर्णन आहे तें:–'यच्चक्षुषा द्रष्टुमिच्छेत्त्रिषु लोकेषु किंचन । तत्पश्येद्यादृशं चेच्छेत्तादृशं द्रष्टुमर्हति ॥.' या विद्येच्या योगें वस्तु कोणत्याही प्रकारची असो, ती पाहणाराला त्याच्या संकल्पानुसार दिसते. १३. प्रत्येकाला शंभर असे पांचशें घोडे. १४. लक्ष्मीचें विलासमंदिर जें कमल त्यासारखे. १५. भ्रमर; (पक्षीं) चित्ररथ. १६. तरावयास लावा. १७. फळें इत्यादि उपायन (नजराणा). १८. पदीं नम्र झालेल्या अपत्याला (मुलाला). १९. दानाविषयीं 'हूं' म्हणो, हुकार देवो. २०. तपतीवंशोद्भवा. (अर्जुना.) तपती ही सूर्याची कन्या आणि सोमवंशीय संवरण नामक राजाची स्त्री. हिला वैवस्वती तपती असें म्हणतात. हिची कथा आदिपर्व, अ० १७१-१७३ यांत दिली आहे. २१. अस्त्रांच्या अदलाबदलीतें.

पुसतों तेंहि वद खरें आम्ही कवण्या गुणें उणें गमलों? ।
धर्षण[1] कां त्वां[2] केलें? धर्मपथीं तों न लेशही भ्रमलों. ॥ २८

भारत पौरव कौरव आम्ही तापत्य वद कसें वदतां? ।
उच्चारिलें सख्या! हें तापत्य असें नवेंचि कीं पद तां.' ॥ २९

चित्ररथ म्हणे, 'आश्रमरहित[3] अहां, एक हें तुम्हांत उणें, ।
आणि पुरोहितहि[4] नसे, धर्षण केलें कळोनि याचि गुणें. ॥ ३०

असतें पुरोहितकवच लागों देतें न हा उपद्रव तें, ।
ब्राह्महिमें[5] वन अल्पें अहितोष्णें क्षात्र हें तुप द्रवतें. ॥ ३१

वाढो भुजसागरबळजळ, तुमचें वांच्छिलें[6] पुरो, हित हो[7], ।
शक्रें बृहस्पति तसा, विजयार्थ बरा वरा पुरोहित, हो[8]! ॥ ३२

वदलों तापत्य असें तें सत्यचि, तत्कथा तुम्ही परिसा. ।
तुमचा पूर्वज[9] होता संवरण[10] महायशा बळी हरिसा[11]. ॥ ३३

साधुमतिमक्षिकांला झाली स्थिति शुद्ध शर्करा ज्याची, ।
भक्ति सदा वाखाणी निजभक्तजनांत अर्क[12] राजाची. ॥ ३४

अनुरूप[13] वर मिळावा, या कामें तीव्र जी करी तप ती, ।
अर्क म्हणे, 'संवरणा द्याया स्वसुता असे बरी तपती[14]! ॥ ३५

मृगयेसि एकदा तो जाय मृगानुसरणें, चुके कटका[15], ।
अश्वहि मरे गिरिवनीं, हिंडे मार्ग भ्रमोनि एकटका[16]. ॥ ३६

त्यासमयीं एकांतीं दर्शन दे त्या नृपासि ती तपती ।
येसख्यार्थ[17] सुरसुता[18] सांबशिवातें[19] उपासिती[20] तपती[21]. ॥ ३७

---

१. अपमान, निंदा, प्रतिबंधरूप उपद्रव. २. त्वां. ३. गृहस्थाश्रमरहित, दारहीन. (जो अब्राह्मण आश्रमविशेषहीन तो धर्षणीय समजावा). ४. उपाध्याय, कुलाचार्य, पुरोधा. ५. क्षात्र (क्षत्रिय तेज) हें तूप आणि ब्राह्म (ब्राह्मणाचें तेज) हेंच हिम. हिमाच्या योगें तूप घन (घट्ट, दाट) होतें, व हिमाचा संयोग नसतां अल्पें अहितोष्णें (थोड्याशा शत्रूरूप उष्णतेनें) तें तूप द्रवतें (पातळ होतें). तुमचा पुरोहित तुमच्याबरोबर असता, तर तुमचें तेज घन झालें असतें असा म्हणण्याचा भाव. ६. वांच्छित परिपूर्ण होवो. ७. होवो. ८. अहो. ९. पांडवांपासून अकरावा पूर्वज आणि ब्रह्मदेवापासून छत्तिसावा वंशज. १०. राजविशेष. ११. सिंहसा. १२. सूर्य. संवरण हा सूर्योपासक होता. १३. सदृश. १४. सूर्यकन्येचें नांव. १५. सैन्याला. १६. एकटा. १७. त्या संवरण राजाच्या सख्यासाठीं. १८. अमरात्मजा. १९. अंबा (भवानी) सहित शंकराला, गौरीशंकराला. २०. पूजिती. २१. तप करिती.

भूप[1] म्हणे, 'जन्मुनि जें कुळ केलें धन्य, सांग सुंदरि! तें. ।
मत्कर्णांनीं वृत्तश्रवणरस[2] भरावया स्व उदर रितें ॥ ३८
त्वन्माता जी, साजे रत्नाकर[3] बंधु, आयताक्षि[4]! तिला. ।
स्वर्गशताधिक[5] महिमा आला आतांचि आयता क्षितिला[6]. ॥ ३९
नयनद्वय भूरितृष[7] त्वद्वपु[8] पीयूषवर्षि[9] सुतनो[10]! हें. ।
हळहळतों बहु, कीं मी दशशतदृक्[11] कश्यपर्षिसुत[12] नोहें.' ॥ ४०
विनवी असें, परि न ती उत्तर दे भानुजा[13], अदर्शन[14] दे. ।
तो[15] समय जसा त्याला, ताप चकोरासि तेंवि दर्श[16] न दे. ॥ ४१
संवरणीं होय तिचा, सीतेचा विरह तो जसा रामीं. ।
सांगों काय बहु? असो; कथितों तुज ती कथाचि सारा[17] मी. ॥ ४२
नृप मूर्च्छित पडतां, ती भेटोनि म्हणे, 'अहो! पहा हे मी, ।
कोण कुशळ जन मणिला न म्हणेल जडोमियां रहा हेमीं[18]. ॥ ४३
मी तपनसुता[19] तपती, विनवा माझ्या मदर्थ जनकास, ।
तरती मनोरथातें निजधर्माची धरोनि जन कास. ॥ ४४
धर्मेंकरूनि भजतां होइल हे विषलताहि सोमलता[20]; ।
त्यजितां धर्मपथातें धरिते पीयूषवल्लि[21] सोमलता[22].' ॥ ४५
'गांधर्वें[23] मजला भज' ऐसें विनवी नृपाळ, परि तपती ।
पितृसंकोचें[24] गेली; पडला तीचा विलाप करित पती. ॥ ४६
शोधीत सचिव[25] आला, झाला कश्मळ[26] समस्त हरिता तें. ।
करुणा करी तयावरि जेंवि करावी स्वसूनुवरि[27] तातें. ॥ ४७

---

१. सवरण. २. वृत्तांतश्रवणरूप रस. ३. सागर. (रत्नांचा आकर म्ह० खाण. समुद्राच्या उदरांत मोत्यें इत्यादि रत्नें सांपडतात हें सुप्रसिद्ध आहे.) ४. हे विशाललोचने. ५. शंभर स्वर्गापेक्षा अधिक. ६. पृथ्वीला. ७. मोठी तृषा (तहान) लागली आहे ज्यास असें नयनद्वय. ८. तुझें शरीर. ९. अमृतवृष्टि करणारें. १०. हे सुंदरि. ११. सहस्र नेत्र ज्याला असा. १२. कश्यपऋषिसुत. (इंद्र.) १३. सूर्यजा. (तपती.) १४. अंतर्धान पावे. १५. तो समय त्याला (संवरणाला) जसा (ताप दे) तेंवि दर्श चकोरासिं ताप न दे—असा अन्वय. १६. अमावास्या. १७. श्रेष्ठा. १८. सुवर्णी. (सुवर्णाच्या कोंदणांत.) १९. सूर्यकन्या. २०. सोमसंज्ञकवल्लि. यज्ञांत हिचा रस काढून पितात अशी प्रसिद्धि आहे. २१. अमृतवल्ली. २२. सोमलपणा म्ह० विषत्व. २३. गांधर्वसंज्ञक विवाहानें. मनुप्रोक्त अष्टविध विवाहांपैकीं एक; वधूवरांचा अन्योन्यानुराग असला म्हणजे हा विवाह होतो. २४. बापाचा (सूर्याचा) संकोच होता म्हणून, सूर्याची अनुमति नव्हती म्हणून, तपती स्वतःची मालकीण नव्हती असा भाव. २५. राजाचा अमात्य. २६. मोह, मूर्च्छा. २७. आपल्या मुलावर. (आदिपर्व, अ० १७३ श्लो० ५.)

सचिव म्हणे, 'रविलाचि प्रार्थी, दुसरा उपाय न करावा.' ।
करितां तसेंचि भेटे आपव[1], सरतांचि दिवस[2] अकरावा. ॥ ४८
ज्याचें तेज न तापद, ज्या लोपविलें नसेचि चरमागें[3], ।
तो अपर अद्भुत तपन[4], नरपतिस म्हणे, 'अभीष्ट वर मागें.' ॥ ४९
भेटोनि जेधवां त्या अभयवरातें मुनींद्र आपव दे. ।
यापरि संवरण तया प्रभुला कळवूनि आत्मताप वदे. ॥ ५०
'आंगेंचि वारिला त्वां प्रणतार्तांचा[5] न ताप वारविला. ।
यास्तव मदर्थ कन्यारत्नातें माग आपवा! रविला? ॥ ५१
कार्यार्थ व्योमपथें[6] गेला हो तो रविप्रतिम[7] हर्षी. ।
श्रीमान् वसिष्ठ भेटे, दुसरा रविसा रविप्रति महर्षी. ॥ ५२
सूर्य म्हणे, 'वद तुज जें व्हावें, देतों असंशय मुने! तें. ।
म्यां सन्मतितें[8] पुरवुनि आळ[9] सुखविलें तसें न यमुनेतें[10].' ॥ ५३
मुनितिलक म्हणे, 'झाली पावुनि धात्री[11] अनामया[12] ज्यातें, ।
तपती मागों आलों मी त्या संवरणनाम याज्यातें[13].' ॥ ५४
रवि आणवूनि हर्षें मुनिहस्तीं दे तदैव[14] तनयेतें, ।
नित्याराधित जें कां कामा वर देत दैवत न ये तें. ॥ ५५
गुरुनें दिली जसी ती सद्विद्या कीं सदौषधी[15] रमणी ।
तीनें सुखमय केला, जो होता तो सदोष[16] धीरमणी. ॥ ५६
पावोनि निवे तीतें तो नृप रोगी जसा नवसुधेतें[17]. ।
भुलला तिलाचि राजा, द्वादश वर्षें भजे न वसुधेतें[18]. ॥ ५७
तपतीस पुत्र झाला कुरु, तद्वंशीं तुम्ही म्हणोनि असें, ।
तापत्यनाम पौरवकौरव इत्यादि वंशनाम जसें.' ॥ ५८
जिष्णु वसिष्ठमुनीचा महिमा गंधर्वपतिमुखें परिसे, ।
ज्याचे वर्णनवर्ण[19] त्रासद दुरितांसि[20] करिकुळां हरिसे[21]. ॥ ५९

---

१. वसिष्ठ ऋषि. (मागें पृष्ठ ८५ टीप ६ पहा.) २. बाराव्या दिवशीं. ३. अस्ताचलानें. ४. सूर्य (वसिष्ठ). ५. नम्र आणि पीडित जनांचा. तूं स्वत: अंगानें तापद नाहींस, पण त्वां शरणागतांचा ताप निवारिला नाहीं, असा भाव. ६. आकाशमार्गें. ७ सदृश. ८. चांगली मति आहे ज्याची अशा सज्जनाला. ९. ळळा, हट्ट. १०. यमुना नदी ही सूर्यकन्या. ११. पृथ्वी. १२. सुखरूप, आमय(रोग)-रहित. १३. यजमानासाठीं, याज्य=यजमान, ज्याच्यासाठीं यज्ञ करतात तो. १४. तेव्हांच. १५. उत्तम औषधी. १६. मन्मथदोषाविष्ट, कामदोषरूप व्याधिपीडित. १७. अमृताला. १८. पृथ्वीतें. १९. वर्णनसंबंधी अक्षरें. २०. पापांला. २१. सिंहासारखे.

अध्याय तेत्तिसावा.

पार्थ म्हणे, 'तो कोण ब्रह्मर्षि[1] असे? मनोरमहि म्यां तें ।
तद्यश नसे परिसिलें, सांग सख्या[2]! तूं तदीय[3] महिम्यातें. ॥ १
गंधर्व म्हणे, 'होता कुशिकतनुज[4] गाधि[5] कान्यकुब्जपती[6], ।
तत्सुत विश्वामित्र प्रभु, यत्सेवेसि[7] नृप सदां जपती[8]. ॥ २
सबळसचिव[9] तो भूपति मृगया करितां वनीं बहु श्रमला; ।
दैवें वसिष्ठमुनिचें पुण्याश्रमपद विलोकितां रमला. ॥ ३
स्वपदनतगाधिजातें[10] सत्कारुनि मुनि म्हणे, 'अगा राया! ।
जावें न क्षुधितें त्वां, येवुनियां आमुच्या अगारा[11] या.' ॥ ४
वाल्मीकिच्या जन जसा तृप्तिसि पावे कुळांसकट[12] कवनीं[13], ।
मुनिच्या उटजीं[14] तैसा तो गाधिज भूपही सकटक[15] वनीं. ॥ ५
नृपति म्हणे, 'कोठुनि हें आलें साहित्य जेवणा रानीं? ।
अस्मद्गृहींहि न कधीं वरिली हे तृप्ति जेवणारांनीं. ॥ ६
जें न नृपप्रासादें[16] तें मुनिच्या भुक्तिसुख[17] दिलें उटजें[18]. ।
हें मोठें नवल अहो! लाजविला पारिजात[19] कीं कुंटजें[20]. ॥ ७
वल्कलरुद्राक्षधर[21] ब्राह्मण अकृतान्ययत्न[22] हा रानीं. ।
बळ[23] पूजिलें कसें हो बहुमूल्य[24] दुकूलरत्नहारानीं?' ॥ ८
करितां शोध कळे कीं उटजीं सुरधेनुनंदिनी[25] आहे. ।
पाहे तीस नृप म्हणे मग मुनिला, 'गाय मागतों, द्या हे. ॥ ९
अर्बुद[26] गाई देतों, अथवा देतों स्वराज्य भोगाया, ।
दे गाय, काय विनिमय[27] हा भवदर्थोन[28], मान्य हो गा! या.' ॥ १०

---

१. (क्षत्रिय असून) ब्रह्मर्षी झालेला तो. २. चित्ररथा. ३. त्या ब्रह्मर्षीच्या. ४. कुशिकाचा पुत्र. ५. राजविशेष. ६. कान्यकुब्जसंज्ञक देशविशेषाचा (कनोज देशाचा) स्वामी. ७. ज्या विश्वामित्राच्या सेवेला. ८. तत्पर असती. ९. सैन्य आणि अमात्य यांसहित. १०. आपल्या चरणीं नम्र झालेल्या गाधितनयाला (विश्वामित्राला.) ११. गृहा. १२. सहवर्तमान. १३. कवितेंत. (रामायणांत.) १४. पर्णशाळेंत. १५. सैन्यासह. १६. राजवाड्यानें. १७. भोजनसुख. १८. पर्णशालेनें. १९. कल्पतरु. २०. कुड्याच्या झाडानें. २१. वल्कलें (झाडांच्या साली) आणि रुद्राक्ष धारण करणारा. २२. तपःस्वाध्याय साधनावांचून दुसरा उद्योग न करणारा. २३. सैन्य. २४. बहुमोलाच्या, रेशमी वस्त्रांनीं आणि रत्नांच्या हारांनीं. २५. कामधेनुची मुलगी. २६. दशकोटी. २७. मोबदला. २८. तुमच्या अर्थाहून (धेनूहून) उणा (कमी).

मुनिवर म्हणे, 'नृपा! हें वचन तुझें मन्मनासि कंपा दे, ।
या धेनुबळें माझा हा आश्रमधर्म[1] सांग[2] संपादे. ॥ ११
कोण ज्ञाता राज्यस्वीकार करील आधि[3] जामाजी? ।
मागों नको, न देयाँ[4] हेयाँ[5] हे धेनु गाधिजा! माजी[6].' ॥ १२
विश्वामित्र म्हणे, 'मी क्षत्रिय, आधार[7] जाण तेजाचा[8], ।
आज्ञामानसभंग[9] न करिती भद्रेच्छु[10] जाणते[11] जांचा[12]. ॥ १३
स्वाध्याय[13] तुझें बळ, तूं ब्राह्मण, कैंचें असह्य[14] तेज[15] तुला? ।
पिप्पलजत्व[16] सम असो देहनीं[17] तेजस्विता[18] न ते जंतुला[19]. ॥ १४
मानधन[20] प्रभु मी, जें वदलों कर्तव्य, तें करीन खरें. ।
ऐसा कोण प्राणी ज्यातें न करील वश हरी[21] नखरें[22]?' ॥ १५
भगवान् वदे, 'बळी तूं, तुझिया चतुरंग[23] सैन्य सांगोतें[24]. ।
तुज कर्तव्य असे जें सिद्ध न करिसी अभीष्ट[25] कां गा! तें?' ॥ १६
कौशिक[26] अनुगांसि[27] म्हणे, 'सोडा हो धेनु ही, चला हांका[28], ।
हा काय रत्नभोक्ता[29]? मारू अनुताप[30] पावुनी हांका[31].' ॥ १७
दंडें ताडुनि नेतां, फोडी ती धेनु फार हंबरडे. ।
तेव्हां आश्रमवासी द्विजमृगवनदेवताकदंब[32] रडे. ॥ १८
नेतां बळेंचि धांवत येवुनि ती मुनिपुढें उभी राहे, ।
आणूनि लोचनीं जळ, बहुदीनत्वें मुखाकडे पाहे. ॥ १९
धेनु म्हणे, 'स्वामी! त्वां पालन केलें, करी न बाप तसें, ।
कां मज उपेक्षिलें हो मी खळदंडें उदंड[33] तापतसें.' ॥ २०
साधु म्हणे, 'मज हृदयीं शत[34], तुज बाहेर हे कशा[35] लागे. ।
मी ब्राह्मण क्षमावान्[36]. माते! रडतीस तूं कशाला गे? ॥ २१

---

१. गृहस्थाश्रमांतील कर्तव्यधर्म. २. संपूर्ण, अशेष. ३. मनोव्यथा, चिंता. ४. द्यायास योग्य. ५. सोडण्यास योग्य नव्हे. ६. माझी. ७. वसतिस्थान. ८. क्षात्रतेजाचा, वीर्याचा. ९. आज्ञा व मन मोडणें, न पाळणें. १०. हितैषीजन. ११. शहाणे. १२. ज्याचा. १३. वेदाध्ययन. १४. न सोसण्याजोगें, सोसण्यास कठिण. १५. वीर्य. १६. पिप्पलोत्पन्नत्व. १७. अभ्रांत. १८. तेजस्वीपणा, कांति. १९. लाखेला. २०. मान हेंच धन (संपत्ति) ज्याचें तो. २१. सिंह. २२. नखानें. २३. चार अंगें (गज, अश्व, रथ आणि पदाति) आहेत ज्यांचीं तें (सैन्य). २४. बराबर. २५. अभिप्रेत कार्य. २६. विश्वामित्र. २७. भृत्यांस. २८. हांकून न्या. २९. रत्नाचा उपभोग घेणारा. ३०. पश्चात्ताप. ३१ बोंब. ३२. समूह. ३३. पुष्कळ. ३४. तुझ्या पाठीवर चाबूक एकदां लागला, तर माझ्या हृदयांत शंभरदां लागतो. ३५. चाबूक. ३६. क्षमाशील आहें. (कारण ब्राह्मणाचें बल क्षमा होय.

क्षत्रियतेज असें हें, जें तुजला पीडितें [1]कशापातें, ।
मत्तेज[2]क्षांति मला म्हणति, 'अहाहा! न [3]ओक शापातें.' ॥ २२
[4]मन्मतिदरींत न शिरे [5]कोपमतंगज, [6]विवेकहरि जागे; ।
[7]म्यां न त्यजितां, नेतो भूप बळें, तुज रुचेल तरि जा गे!' ॥ २३
गाय म्हणे, 'भगवंता! आज्ञा नसतां तुझी, न [8]मद्धरणीं ।
काळही बळी, किती हा! न तृणबळें वन्हि होय बद्ध रणीं.' ॥ २४
विप्र म्हणे, 'नेला कीं दृढ बद्ध करूनि वत्स [9]दाव्यानें. ।
स्वबळें नृपें [10]मदाश्रम, देह जसा व्यापिला सदा [11]व्यानें. ॥ २५
शक्य असेल तरि रहा.' ऐसें मुनि बोलतांचि ती [12]क्षोभे. ।
[13]ग्रीष्मगमध्यान्हार्कप्रतिम तिचा देह तेधवां शोभे. ॥ २६
[14]धेनुमिषें त्या मुनिची [15]सुतपस्यासिद्धि कोपली वाटे. ।
फाटे [16]गाधिजबळतम त्या [17]चपलेच्या धरूनियां [18]वाटे. ॥ २७
[19]अंगांपासुनि केले प्रकट तिनें **म्लेच्छ यवन शबर शक**, ।
[20]बळ उडविलें तिहीं, [21]खगपतिपक्षांहीं जसें सहज [22]मशक. ॥ २८
जेंवि दिगंताप्रति ने तिमिरा[23] [24]तूळा [25]रविप्रभा [26]वात्या. ।
सेना तसी नृपबळा, [27]निस्तुळ म्हणती [28]कवि [29]प्रभावा त्या. ॥ २९
दशशतसहस्र पीडिति एकैका **गाधिजानुगा यवन** ।
गाय वन स्वर्गहि, तें दावि पितां आपणांत गाय [30]वनं. ॥ ३०
'[31]पकडो लियो हकालो [32]बे! [33]बिसवामितर [34]भाग जावेगा.' ।
यवन म्हणति दाखविती शब्दीं [35]हरि [36]करिवरांसि जा वेगा. ॥ ३१

---

१. चाबुकाच्या प्रहारानें, कशाघातें. २. सहनशीलता, तितिक्षा. ३. बाहेर काढ. ४. माझी मति हीच गुहा, तिजमध्यें. ५. क्रोध हाच माजलेला गज. ६. विचाररूप सिंह. ७. मला नेण्याच्या कामीं. ८. याचा काय पाड ?. ९. गुरांस बांधण्याची दोरी. (दावें.) १०. माझा आश्रम आपल्या सैन्याकरवीं व्यापिला. ११. व्यानसंज्ञक वायूनें. (हा सर्व शरीरांत फिरणारा वायु होय.) १२. खवळे. १३. ग्रीष्मऋतूंतील दोनप्रहरच्या सूर्यासारखा. १४. धेनूच्या रूपानें. १५. चांगल्या तपश्चर्येचें सामर्थ्य. १६. विश्वामित्राचें सैन्य हाच अंधकार. १७. विद्युल्लतेच्या. १८. मार्गा. १९. शरीराच्या निरनिराळ्या अवयवांपासून. २०. सैन्याची दाणादाण केली. २१. पक्ष्यांचा नायक जो गरुड त्याच्या पंखांनीं. २२. चिलट, घुंगुरडें. २३. अंधकाराला. २४. कापुसाला. २५. सूर्याचें तेज. २६. वावटळ. २७. तुलनारहित, अनुपम. २८. शहाणे लोक. २९. सामर्थ्या, पराक्रमा. ३०. वन (उदक) पितां तें आपणांत गाय दावी म्ह० गाधिजमुनीच्या सैन्यास ती गाय पाण्यांतही दिसूं लागली—असा भाव. ३१ पकडा, धरा, हांका. ३२. अरे. ३३. विश्वामित्र. ३४. पळून जाईल. ३५. सिंह. ३६. श्रेष्ठ हत्तींला.

मागें पाहों न दिल्हें, तीं बारा कोश पळविलीं [1]कटकें. ।
यश हारविलें तेथें किति शस्त्रें [2]हार [3]कुंडलें [4]कटकें ? ॥ ३२
भूप म्हणे, 'जे नेणति गोब्राह्मण, तेज ते जन [5]क्षत्रीं ।
कल्पिति, जसें न पाहुनि शिशु [6]शशभृत्तेज तेज नक्षत्रीं. ॥ ३३
धिक् क्षत्रियतेजातें! सार नसे, नाश या [7]पलालसमीं, ।
येणेंचि जाहलों [8]हतकाम [9]पराभूत [10]पापलालस मी. ॥ ३४
क्षत्रबळ नाव फुटकी, जें ब्राह्मणतेज तेचि नव नौका. ।
बुडतों न अन्यथा मी, तरतां व्यसनांत [11]तोहि न [12]वनौका. ॥ ३५
[13]प्राज्यहि राज्य [14]हितें न्हे; तप साधावें, तयांत सर्वहि तें. ।
तप न करावें कोण्या प्रभुनें? [15]विनिमग्न ज्यांत सर्व [16]हितें.' ॥ ३६
निश्चय करूनि राज्यश्री सोडुनि सर्व ताप साहूनी, ।
[17]होमुनि [18]तपोनळीं वपु होय अधिक [19]सर्वतापसाहूनी. ॥ ३७
सिद्धि म्हणति, 'पति वरिले व्यर्थ तुम्हीं बहु तपोनि, धिक् [20]क्षणदे! ।
धिक् [21]स्वाहे! धिक् [22]पद्मिनि!, सुख न, जसें हा तपोनिधि क्षण दे.' ॥ ३८
[23]ब्रह्मर्षिता वरी त्या पतिस म्हणे, 'तूंहि [24]अच्छ विप्र खरा, ।
रवि [25]भावी, कीं भुलली [26]निजरुचि, अन्यत्र न [27]छवि प्रखरा.' ॥ ३९
झाला नृपति वसिष्ठस्पर्धेनें विप्र, तें असो आतां. ।
विस्तर भय दे, नाहीं तरि काळाचेंहि भय नसे गातां. ॥ ४०
[28]त्या मुनिनें [29]सिद्धिबळें [30]मोहुन [31]सौदासनृपतिच्या मतितें, ।
केला वसिष्ठ [32]सुतशतशोकार्त, किजे जसें [33]महापतितें. ॥ ४१

---

१. सैन्यें. २. कंठभूषणें. ३. कर्णभूषणें. ४. वलयें. ५. क्षत्रियाचे ठायीं. ६. चंद्राचें तेज. ७. कडब्यासारखें अथवा पेंढ्यासारखें. ८. ज्याचा काम विफळ झाला तो, हताश, भग्नमनोरथ. ९. मोड झालेला. १०. नीच कर्म करण्यास तत्पर. ११. तो वसिष्ठ. १२. वन हेंच ओक (गृह) ज्याचें तो, वनवासी ऋषि. १३. पुष्कळ. १४. कल्याण. १५. गढून गेलेलीं. १६. कल्याणें. १७. हवन करून, अर्पून. १८. तपोरूपी अग्नींत. १९. सकळ तपस्व्यांहून. २०. हे रात्रि. २१. अग्नीच्या स्त्रीचें नांव. २२. हे सूर्यस्त्रिये. २३. विश्वामित्र राजर्षि होता, पण तपःप्रभावानें ब्रह्मर्षि झाला. २४. स्वच्छ. २५. मानी. २६. आपली कांति. २७. कांति. २८. कौशिकानें. २९. तपःप्राप्तसिद्धीच्या प्रभावानें. ३०. विश्वामित्रानें किंकर नामक राक्षसाची प्रेरणा कल्माषपाद राजाच्या शरीरांत करवून त्याच्या बुद्धीस मोहित केलें, आणि त्या राजाकरवीं वसिष्ठाचे शक्ति आदि शतपुत्र मारविले. (महाभारत, आदिपर्व, अ० १७६ श्लो० २१–४२). ३१. कल्माषपादराजाच्या. ऋतुपर्णपुत्र सुदास, त्याचा पुत्र सौदास हाच कल्माषपाद. ३२. शंभर पुत्रांच्या (मरणजनित) शोकानें पीडित. ३३. मोठ्या पातक्यानें.

ज्येष्ठ सुत वसिष्ठाचा शक्ति मुनि पथीं[1] वनांत आढळला. ।
कल्माषपाद[2] मागे पथ, परि कवि तो न सर्वथा ढळला[3]. ॥ ४२
संकुचित[4] पथ न सोडी म्हणुनि नृपें ताडिला कशापातें[5]. ।
'धर्मज्ञा! राक्षस हो' दे मुनि या उग्रपाक[6]शापातें. ॥ ४३
भेटे राक्षस[7] मंत्री गाधिसुताज्ञेंकरूनि शापाला. ।
ग्रासी मोह नृपाला, राहु महाग्रह जसा निशापाला[8]. ॥ ४४
मृगमांसभोजनार्थी[9] त्यावरि भेटे द्विज[10] क्षमापतिला, ।
मान्य करुनि तें विसरे[11], कीं शापें मोह जाहला मतिला. ॥ ४५
रात्रौ[12] स्मरलें, सरलें[13], होतें यद्यपि उदंड, परि पळ[14] तें. ।
दैव प्रसन्न नसतां, वस्तु सकल भें[15] दिल्याचिपरि पळतें. ॥ ४६
'नरमांस द्यां[16]' म्हणे नृप, 'कोठुनि आणूं तदर्थ[17] हरिणा मी.' ।
नुमजे[18] मोहें कीं हें कर्म मला तापवील परिणामीं[19]. ॥ ४७
करितां तसेंचि सूदें[20], उमजे, नुमजेल काय हो मुनितें[21]? ।

---

१. अतिसंकुचित मार्गी. २. या राजाचें नांव कल्माषपाद पडण्याचें कारण:—हा एकदां एका राक्षसाच्या पाठीस लागला असतां थकून परत आला. तेव्हां त्या राक्षसानें याचा सूड उगविण्याचा बेत केला. नंतर तो वसिष्ठमुनींचें रूप धारण करून राजाकडे आला आणि त्यास म्हणाला कीं, 'भोजनार्थ सामिष अन्न सिद्ध कर.' नंतर गुप्तरूपें स्वयंपाकांतील मांस उचलून त्या जागीं नरमांस ठेवून तो राक्षस निघून गेला. भोजनसमयीं खऱ्या वसिष्ठानें तें कपट जाणून राजास 'तूं राक्षस होशील' असा शाप दिला. तेव्हां क्रोधसंतप्त होऊन राजा वसिष्ठास प्रतिशाप देण्यास तयार झाला. त्यानें शाप देण्यासाठीं हातांत उदक घेऊन अभिमंत्रित केलें आणि शापोच्चार करणार इतक्यांत त्याच्या बायकोनें (मदयंतीनें) त्यास खरा वृत्तांत कळवून बोध केला कीं, 'गुरूस शाप देणें उचित नाहीं.' तेव्हां राजानें तें उदक आपल्याच पायांवर टाकलें. त्यामुळें त्याचे पाय कल्माष(कृष्णवर्ण) झाले, म्हणून कल्माषपाद असें नांव पडलें. ३. शक्तीनें मार्ग दिला नाहीं. ४. संकोच पावलेला. (अरुंद). ५. चाबुकाच्या प्रहारानें. ६. भयंकर परिणाम ज्याचा त्या शापातें. ७. किंनर नामक राक्षस विश्वामित्राच्या आज्ञेनें त्या शापाला मंत्री (मसलत देणारा) भेटे. ८. चंद्राला. ९. मृगाचें मांस भोजनासाठीं मागणारा. १०. क्षुधाविष्ट विप्र राजाला भेटला. ११. मृगमांस भोजन देतों असें मान्य करून नंतर ती गोष्ट मोहामुळें राजा विसरे. १२. घरीं आल्यावर अर्धरात्रीं राजास वचन दिल्याचें स्मरण झालें. १३. मांस सरलें. १४. मांस. १५. भय. १६. असें आपल्या सूदाला (आचाऱ्याला) म्हणे. १७. त्या द्विजासाठीं. १८. न+उमजे. येथें 'न' शब्दांतील 'अ'ला परसवर्ण आदेश झाला आहे. नसणें, नुघडि, नुरणें अशीं उदाहरणें वारंवार आढळतात. १९. अंतीं. २०. स्वयंपाक करणारानें. २१. शक्तिमुनीला.

पटे जें अति शुष्क क्रोधें ज्वलनांत काय होवुनि तें. ॥ ४८
विप्र म्हणे, 'हा! दुष्टा! ब्राह्मण नरमांस काय रे! खातों? ।
श्रुतिकृतमर्यादेची[1] जी पुसली[2] आजि काय रेखा[3] ती? ॥ ४९
मी विप्र, नव्हें राक्षस; राज्यमदांधें न नीट वळखावें. ।
हें त्वांचि आजिपासुनि राक्षस होवुनि मनुष्यपळ[4] खावें.' ॥ ५०
हे दोन[5] शाप, राक्षस[6], गाधिज, एकामतेंचि गुरु[7] चवघे. ।
पढवुनि मित्रसहकरें[8] मारविती श्रीवसिष्ठसुत अवघे. ॥ ५१
सेवि द्विजरक्तरसा नृपति, वसिष्ठहि नव्याचि शोकरसा. ।
सेवन करवी भरवी विधि[9] त्याचा शापभूत तो करसा. ॥ ५२
होय विफळयत्न[10] मुनि स्वंतनुत्यागीं धरूनि कामातें. ।
मेर्वग्न्यब्धींस[11] म्हणे, 'म्हणतां कां हो! मरूं नका मातें?' ॥ ५३
बद्ध करुनि कर चरण[12] बुडतां तोडी महानदी पाशा. ।
कोणा नको सुतेजा? काय पतंगीं[13] लहान दीपाशा[14]? ॥ ५४
तोडी पाश, न बुडवी जी सकरुणमानसा[15] धुनी[16] तीस, ।
ठेवुनि नाम विपाशा[17] गाति सबहुमान साधु नीतीस. ॥ ५५
जैसा यत्न न सोडी, जरि धन न मिळे, तथापि धनकामी[18] ।
निधनार्थी[19] मुनिहि म्हणे, 'यत्नीं फळ[20], आवरूं स्वमन कां मी?' ॥ ५६

---

१. वेदांनीं घालून दिलेल्या मर्यादेची. २. पुसून नाहींशी केली. ३. रेघ, ओळ. ४. मनुष्यमांस. ५. 'राक्षस हो' हा एक शाप (गी० ४३) आणि 'राक्षस होवुनि मनुष्यपळ खावें' हा दुसरा शाप (गी० ५०). असे दोन शाप. ६. किंनर राक्षस. ७. एकाच मताचे चार गुरु (उपदेशक) राजास मिळाले. ८. कल्माषपाद राजाच्या हातानें. (मित्रसह आणि वीर्यसह हीं कल्माषपादाचींच दुसरीं नांवें.) ९. दैव. १०. स्वदेहनाशाची इच्छा धरून वसिष्ठानें मेरुकूटावरून आपल्याला ढकलून दिलें, परंतु तो मरण पावला नाहीं, म्हणून 'विफळयत्न' असें म्हटलें आहे. ११. मेरु, व अग्नि, अब्धि यांस. मेरुवरून उडी टाकून मेला नाहीं. नंतर पेटलेल्या अग्नींत उडी टाकली, तों तो अग्नि शीत झाला. नंतर गळ्यांत धोंडा बांधून समुद्रांत उडी टाकली, तों लाटांनीं बाहेर आणिलें. याप्रमाणें तिघांपासून सुटका झाली म्हणून 'म्हणतां कांहो मरूं नका मातें' असें त्यांस संबोधून म्हटलें आहे. १२. हातपाय बांधून वसिष्ठ नदींत बुडूं लागला तां तिनें त्याचे पाश तोडिले. १३. शलभीं. १४. दीपाची आशा पतंगाला लहान असते काय? अर्थात् प्रबळ असते. १५. दयायुक्त अंतःकरण जीचें. १६. नदी. १७. पाशच्छेद करणारी नदी. १८. धनेच्छु पुरुष. १९. मरण इच्छिणारा. २०. यत्नीं फळ (मिळतें).

शक्तिस्त्री न विसंबे श्वशुरासि, वनीं फिरे तयामागें, ।
गुरुसेवनें भुलविलें मन कुळजाचें, तसें न हेमागें, ॥ ५७

भरि एकदा श्रुतिरवें तद्गर्भाचेंहि कानना तुंड ।
तें कुललयशोकतमीं धरिल हिमकरत्व कां न नातुंड ? ॥ ५८

महर्षि पुसे, 'वत्से ! शक्ति तसा वेद कोण गे ! म्हणतो ? ।
वाटे आलिंगावा कडकडुनि, मला दिसेचिना पण तो.' ॥ ५९

ती साश्रु अदृश्यंती बोले जोडूनि हात, 'मामाजी ! ।
गर्भ मदुदरीं म्हणतो मज घालायासि हा तमामाजी.' ॥ ६०

मुनिपति म्हणे, 'अगा ! कुळतंतो ! संतोषदान नातूनीं ।
न दिलें, असें अमृत तव गळतें संतोषदाननांतूनी. ॥ ६१

ऐसें मद्व्यसनशमन कवण दयित सोयरा शिशो ! करिता ? ।
तव वेदध्वनिघटजें केला विपतोयराशिशोक रिता ?' ॥ ६२

सोडुनि मरणोद्यम शमधन् अनघ नलिनभवप्रभव परते; ।
चित्तीं म्हणे, 'अकृपसे गमले मेर्वादि सदयतम पर ते.' ॥ ६३

तों मार्गीं भक्षाया मुनिसह तेंकुलकराहि उर्वरिता ।
तो भूप ये सुहृत्त्व त्यजुनि विधिबळें धरूनि उर्वरिता. ॥ ६४

गुरुशापदुरिंधनहततेजा राजर्षि, वन्हि तो यज्य ।
न्हाया पुन्हा प्रकाशित सिंची मुनि मंत्रपूत तोयाज्य. ॥ ६५

---

१. शक्तीची भार्या, वसिष्ठाची सून; हिचें नांव अदृश्यन्ती, पराशराची माता. २. न टाकी. ३. मेरुपर्वतानें. ४. तद्गर्भाचें हि तुंड एकदा श्रुतिरवें कानना भरि—असा अन्वय. त्या अदृश्यंतीच्या गर्भस्थ मुलाचें तोंड वेदघोषानें अरण्या भरून टाकी. ५. तें नातुंड कुललयशोकतमीं हिमकरत्व कां न धरील ?—असा अन्वय. ६. वसिष्ठवंशसंहारनिमित्त जो शोक हाच अंधकार (तम) त्यांत. ७. चंद्रत्व. ८. नातू. ९. बाप्पाकुला. १०. वसिष्ठपुत्र जो शक्ति त्याच्या स्त्रीचें नांव. ११. मोहांत. १२. संतोषाचें देणें. १३. संतोष देणाऱ्या मुखांतून. १४. माझ्या संकटांचें निरसन. १५. तुझ्या वेदपठणाचा शब्द हाच अगस्त्यमुनि त्यानें. १६. मरणाचा उद्योग. १७. शांति हेंच धन ज्याचें तो. १८. निष्पाप. १९. ब्रह्मपुत्र (वसिष्ठ.) २०. अत्यंत दयाळु. २१. मेरु, अग्नि आणि समुद्र. २२. त्या वसिष्ठाचा कुलकर (कुलतंतु, पराशर.) २३. उरलेल्या. २४. कल्माषपाद. २५. मित्रत्व. २६ महाशत्रुत्व. २७. गुरुशापरूप दुष्टकाष्ठांनीं दग्ध तेज ज्याचें. २८. यजमान. २९. मंत्रानें पवित्र. ३०. उदकरूप तूप.

मलिन कुगंधि कुरूप क्रूर कठिन शुष्क राक्षसत्वानें,[1] ।
तो नृप केला स्मरसा[2] सहसा त्या पुष्कराक्षसत्वानें.[3] ॥ ६६
निज सत्कीर्ति तिलाही होऊं दे न वितथा,[4] पिशा[5] पावे. ।
यद्यपि शापार्ह तिघे, न म्हणे तो कवि तथापि शापावे. ॥ ६७
तारुनि नृपासि कुळकर[6] पुत्रहि[7] दे, न सुकृतासि[8] मुनि वेची. ।
तत्कीर्तिला[9] नमि श्री शरदृतुच्या लक्षवेळ पुनिवेची.[10] ॥ ६८
व्हावा अद्भुत जैसा प्रध्वस्ततमःपराश[11] रविस रवी ।
मुनिला सुतशोक तसा होवुनि शक्तिज पराशर विसरवी. ॥ ६९
तो आजालाचि म्हणे तात, किजे अधिक काय हो तातें ? ।
खेद अदृश्यंतीतें दे, श्वशुरा तात म्हणत होता तें. ॥ ७०
ती एकदां म्हणे, 'बा ! म्हणसि असेंचि पसरूनि आ ज्याला ।
म्हणुनि तुवां निववावें तें कैंचें म्हणसि तात आज्याला. ॥ ७१
मामाजीस म्हणसि, तें न म्हण, म्हण तयासि 'आर्य आजाबा.' ।
आजा बा[12] न म्हणावें, गहिंवर येतो तयासि[13] मांजा[14] बा ! ॥ ७२
राहु निशेच्या, माज्या राक्षस, करि रोष नंदना ! तिलकीं,[15] ।
काय वदावें ? दावें गिळिला अल्पद्रु नंदनातिल[16] कीं. ॥ ७३
ज्यांस म्हणत होती कर जोडुन विद्याकळा सभा 'वो जी' ।
हरिस हरिणसे झाले नव्याण्णव त्या खळासि भावोजी.' ॥ ७४

---

१. राक्षस होऊन राहिल्यामुळें. २. कामदेवासमान. ३. पुष्कराक्षाप्रमाणें (विष्णूप्रमाणें) सत्व (धैर्य) ज्याचें त्या वसिष्ठानें. ४. व्यर्थ. ५. वेड्या राक्षसाला. ६. वंशवृद्धि करणारा. मित्रसहराजानें (कल्माषपादानें) राक्षसावस्थेंत एका ब्राह्मणास खाऊन टाकलें. तेव्हां त्याच्या स्त्रीनें 'तूं मदयंतीशीं संग करतांच मरशील' असा शाप दिला. त्यामुळें त्याला स्वस्त्रीसंग करतां येईना, तेव्हां त्यानें वसिष्ठाची आराधना करून पुत्र मागितला. मुनीनें प्रसन्न होऊन राजस्त्रीशीं दिव्य विधीनें संग करून पुत्र उत्पन्न केला. ७. अश्मक हें पुत्राचें नांव. हा गर्भांत सात वर्षें राहूनही बाहेर निघेना, तेव्हां मदयंतीनें अश्मा (दगड) घेऊन त्यानें कुक्षिविदारण करून त्या गर्भास बाहेर काढलें, म्हणून. त्यास अश्मक असें नांव पडलें. ८. पुण्याला. वसिष्ठानें आपलें पुण्य खर्च केलें नाहीं, कारण नृपपत्नीशीं मैथुन न करतां पुत्र उत्पन्न केला, तेव्हां परस्त्रीसंगपातकानें होणारा पुण्यक्षय झाला नाहीं. ९. वसिष्ठाच्या कीर्तिला. १०. पौर्णिमेची. ११. नाशिली आहे तमोरूप म्ह० राहूरूप शत्रूची आशा ज्याणें असा; (पक्षीं) नाशिली आहे तमोगुण शत्रूची आशा ज्यानें असा. १२. बाप. १३. त्या मुनिला. १४. माझा. १५. तिलकीं (निशेच्या)=चंद्रीं; (पक्षीं) तिलकीं (माझ्या)=कपाळावरील कुंकवाच्या तिलकीं. १६. नंदनवनांतील.

पितृघातवृत्त कळतां सर्वां लोकांस दोष तो[1] लावी, ।
कीं शक्तोपेक्षकमति[2] ती अघकृन्मति[3] सर्वेंचि तोलावी. ॥ ७५
जैसें सुटों न द्यावें प्राणक्षयतत्परा[4] शराशि कवी ।
ब्रह्मर्षि[5] तसेंचि करी, निजशांतिकळा[6] पराशरा शिकवी. ॥ ७६
'धरिति शिवेच्छु[7] क्षत्रियजन जिंकाया पैरा[8] शरालीला,[9] ।
संत क्षमेसि[10] धरिती, तुज हेचि रुचो पराशरा! लीला. ॥ ७७
व्याघ्रवृकहरिव्याळप्रभृतींचा जो समूह हानिकर, ।
त्याहूनि कामकोपप्रमुखांचा निपट[11] दुष्ट हा निकर[12]. ॥ ७८
बा! सादर अभयाच्या तापस दानींच, हानि करवि खरी. ।
धृतिला धुळींत नेवुनि ताप सदा नीच, हानिकर विखरी. ॥ ७९
जी शीतां[13] गाधजळा[14] सरिता[15] शिरतां निवे करी[16] तींत, ।
निवतो प्रवेशतां जन सर्वहि तैसा विवेकरीतींत. ॥ ८०
नाशी स्वसेवनकरा[17], अन्यजनाही, म्हणोन कोपानें ।
बहु अहित[18] होय, तैसें अहित विषाच्या म्हणों नको पानें[19]. ॥ ८१
भृगुकुळज[20] और्वमुनिही[21] पूर्वी ऐसाचि कोपला होता, ।
पितृवचनें परि टाकी स्वक्रोधाग्नीस[22] सागरीं पोतां. ॥ ८२
दे मज हें, लोकांचें भस्म क्रोधें करूं नको, पावें. ।
कथिला[23] धरूनि हेतु[24] नय, अनुनय[25] किति बा! करूं? न कोपावें. ॥ ८३

---

१. पराशरऋषि. २. दुःख घालविण्याविषयीं समर्थ असून जे उपेक्षा करतात त्यांची बुद्धि. ३. पाप करणाऱ्याच्या बुद्धीशीं. ४. प्राणांचा नाश करण्यास उत्सुक अशा बाणाला. ५. वसिष्ठ. ६. आपली क्षांतिरूप कला. ७. कल्याण इच्छिणारें. ८. शत्रूला. ९. बाणपंक्तीला. १०. दयेस. ११. केवळ. १२. समूह. १३. थंड. १४. खोल पाणी जिचें. १५. नदी. १६. हत्ती. १७. आपलें सेवन करणाऱ्यास. १८. अकल्याण. १९. प्राशनानें. २०. भृगुऋषीच्या कुळांत जन्मलेला. २१. और्वनामक ऋषीहि. (ऊरु म्ह० मांडी तीपासून झालेला तो और्व.) भार्गवकुळांतील स्त्रीपुरुषांस कृतवीर्य राजाच्या वंशांतील राजांनीं द्रव्यानिमित्त बहुत पीडा दिली. परंतु त्यांचें कोणीही निवारण केलें नाहीं; यास्तव या और्वमुनीला फार कोप आला व सर्व लोकांचा विनाश करावा म्हणून यानें उग्र तप केलें. त्याच्या प्रभावानें सर्वांस पीडा करण्यास समर्थ असा भयंकर अग्नि उत्पन्न झाला. तो सर्वांस जाळूं लागला. ते सर्व लोक याच्या पितरांस शरण गेले. तेव्हां त्यांनीं येऊन और्वास उपदेश केला आणि त्याचा कोपानल त्याकरवीं समुद्रांत टाकविला. (महाभारत, आदिपर्व, अध्याय १७९-१८०) २२. आपल्या कोपानलास. हाच वडवाग्नि म्हणून प्रसिद्ध झाला. २३. बाळाला. २४. हनुवटी. २५. प्रार्थना.

कोपें कुळज जरि, तमें तरि फुगवुनि गल्ल [1]भानु गांठावा. ।
महिमा [2]क्षमारताचा बहु तो [3]श्रीवल्लभानुगां ठावा. ॥ ८४

[4]नंदनशीळ म्हणति त्या [5]तापाकुळ [6]नंदनाप्रति ज्ञाते. ।
सोडावी मद्वचनें बापा! कुळनंदना! [7]प्रतिज्ञा ते.' ॥ ८५

लोकक्षयसंकल्प त्यागुनि, सुखवुनि मनांत आजोबा, ।
राक्षससत्र करी कीं [8]भाव्यजसुतसा सुरांत साजो [9]बा. ॥ ८६

जैं [10]भस्मसात् पराशर करि मंत्रबळें [11]पुलस्त्यसंततितें, ।
आले संरक्षाया [12]क्रत्वत्रिपुलस्त्यपुलह संत तितें. ॥ ८७

त्यासि पुलस्त्य म्हणे, 'बा! तुज पाहुनि सर्व ताप हरपावे, ।
सद्यः साधुसमागम तेंवि न नाशूनि ताप हर पावे. ॥ ८८

तेजःप्रमाण आत्मा, तत्त्वज्ञांस [13]प्रमाण न वय जनीं. ।
तें अद्भुत तेज तुझें दिसलें कोणास या न नवयजनीं? ॥ ८९

हा [14]आर्यहि न क्षांती क्षण दूर करून, कोपला शांत. ।
काळचि निमित्त करितो भलत्यास, करूं नको [15]पलाशांत. ॥ ९०

पावे [16]क्षमी सुकृत सुख यश जें पावेचिना [17]अमर्षी तें ।
विधुतें [18]लक्ष्म तसें हें अकृपपण नसो [19]भवत्समर्षीतें. ॥ ९१

साहे न कोपवेगा जो, कीं जो कांपरा शरास रणीं, ।
त्याची रुचेल शांतिस, कीं कीर्तिस कां पराशरा! [20]सरणी? ॥ ९२

कामाची क्रोधाची ज्यांहीं केली जपोनि आज्ञा, ते ।
चुकले, स्वहिता मुकले, त्यांतें पाहोनि म्हणति 'हा' ज्ञाते. ॥ ९३

---

१. सूर्य. कोपानें जर कुलीनाला ग्रासिलें, तर तमानें (अंधकारानें) देखील मोठ्या डौलानें (गल्ल फुगवुनि) सूर्याला ग्रासावें. २. क्षमाशील पुरुषांचा, क्षमापरांचा. ३. लक्ष्मीपति विष्णूचे सेवक त्यांला. ४. आनंदप्रद शील (स्वभाव) ज्याचें तो. ५. दुःखानें पीडित. ६. पुत्राला. ७. सर्वलोकनाशाची प्रतिज्ञा. ८. भक्तयुक्त नारदमुनिसा. ९. बाप. (शक्तिमुनि.) १०. सकल भस्म. 'सात्' हा प्रत्यय साकल्यार्थी आणि अधीनतार्थी होतो:—जसें; राजसात्, अग्निसात्, विप्रसात्. ११. राक्षसातें. १२. क्रतु, अत्रि, पुलस्त्य आणि पुलह हे सृष्टिकर्ते ब्रह्ममानसपुत्र महर्षि होत. १३. 'तेजसां हि न वयः समीक्ष्यते' (रघुवंश, स० ११ श्लो० १) हें कालिदासाचें वचन ह्या आर्येशीं समानार्थक दिसतें. 'गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः' हें भवभूतीचें वचनही त्याच अर्थाचें द्योतक होय. १४. वसिष्ठ. १५. राक्षसनाश. (मांसभक्षकांचा राक्षसांचा अंत.). १६. क्षमाशील. १७. क्रोधाविष्ट. हें गीत्यर्ध सुभाषितवत् आहे. १८. चिन्ह. १९. तुजसारिख्या ऋषीतें. २०. रीत.

हित इतर न धन शमसम[1], यावरि तुज हें न कार्य[2] सत्र[3], पहा ।
कवि रविरुचि[4] शुचिभव[5] तव व्हावा येणें न आर्य[6] सत्रप[7] हा.' ॥ ९४
शक्तिज सत्र पुरें करि, सद्वचनाच्या निवेचि तो पानें. ।
हो पानें सुखद अमृत, परि सद्वचनींच शांतिसोपानें[8]. ॥ ९५
गंधर्वोक्तवसिष्ठप्रभुचरितें[9] जिष्णु[10] तो निवाला हो! ।
प्रेमें म्हणे, 'जसा मी सर्वहि जन पात्र या शिवाला[11] हो[12]. ॥ ९६
पुसतां पुरोहित[13], म्हणे, 'आचार्यत्वेंकरूनि सौम्यातें ।
उत्कोचनामतीर्थी क्षिप्र वरा जा नमूनि धौम्यातें[14]. ॥ ९७
जाणें, तो गुण जाणे जे तत्पूर्वज मुनींद्र देवल[15] ते. ।
तत्पदयुगुली[16] म्हणत्ये, 'न सुख स्पर्धेंत बाइ! देवलते!' ॥ ९८
देवुनि अग्न्यस्त्रातें, ठेवुनि चित्तीं तदुक्तमंत्रास[17], ।
धौम्याप्रति जातां दे कुदशेसि पदोपदींहि संत्रास[18]. ॥ ९९
तीर्थी स्वानुजरूपें[19] जी होती तप करीत देवलता[20] ।
तीणें बहु लाजविली पांडुसुतेच्छित[21] करूनि देवलता[22]. ॥ १००
'येंद्रुवमाश्रिततारकमनलसमुरुभवपयोनिधौ म्या तें[23], ।
हें यानपात्र[24] वरिलें,' धर्म म्हणे पद धरूनि धौम्यातें. ॥ १०१

अध्याय चवतिसावा.

गेले धन्य कराया पंडूचे नंदन द्रुपदराजा ।
तो गुरुहि जाय, समुचित पसराया नंदनद्रु[25] पदरा ज्या. ॥ १

---

१. शांतिसमान. २. करावयास योग्य. ३. यज्ञ. (राक्षसयज्ञ.) ४. सूर्यासारखी कांति ज्याची तो. ५. शुद्ध जन्म ज्याचें तो. ६. वसिष्ठ. ७. सलज्ज. ८. शांतीच्या पायऱ्या. ९. चित्ररथ गंधर्वानें सांगितलेल्या वसिष्ठ प्रभूच्या चरितानें. १०. अर्जुन. ११. कल्याणाला. १२. होवो. १३. पुरोहित (कोण करावा असें) पुसतां. १४. हा पांडवांचा पुरोहित, देवलऋषीचा कनिष्ठ भ्राता. १५. ऋषिविशेष. १६. त्याच्या पदांची जोडी म्हणते:—हे देववल्ली! माझ्याशीं स्पर्धा करून तुला कांहीं सुख नाहीं मिळणार. १७. त्या चित्ररथानें चाक्षुषीविद्येविषयीं सांगितलेल्या मंत्रास. १८. संताप. १९. आपला कनिष्ठ भ्राता धौम्य याच्या रूपानें. २०. देवलत्व, देवलमुनीचा भाव. २१. पांडवांचें चिंतित. २२. कल्पवृक्ष, देववल्ली. २३. जें मोठ्या भवसमुद्रांत आलस्यरहित व जें निश्चयें आश्रितांस तारणारें, तें (पद). २४. नौका. २५. ज्या (गुरुधौम्याला) नंदनद्रु (कल्पवृक्ष) पदरा पसराया समुचित (योग्य), तो गुरुहि (धौम्यहि) जाय—असा अन्वय.

राजसुतांसि रहाया त्या द्रुपदपुरीं कुलाल[1] दे शाला[2]. ।
काळगति पहा बुध हो! बा एखादे भुलाल देशाला. ॥ २
मिरवायासि न उरला स्वमहत्त्वाचा कुला[3] लव सतींत[4], ।
रत्नगृहोचित[5] पृथ्वीपतिसुत वसले कुलालवसतींत[6]. ॥ ३
सेवुनि भिक्षान्न सुखें रत[7] होते देवविप्रभजनांत, ।
कोण्हीहि न ओळखिले, झाले दाटूनि विप्रभ[8] जनांत. ॥ ४
बहु विप्र, बहु क्षितिपति, बहु मागध[9] सूत[10] बंदिजन[11] आले. ।
कृष्णास्वयंवरोत्सवदर्शनभाग्येच्छु[12] देवही झाले. ॥ ५
वरबुद्धि **अर्जुनींच** स्थिर होती सर्वदा, परि पुरा जे ।
आले, ते आदरिले **द्रुपदें**, पहिले जरि स्वरिपु राजे. ॥ ६
झालें जतुगृहदाहश्रवण, परि मना न साच वाटे तें. ।
वांच्छितसिद्धयर्थ धरी तो राजा[13] युक्तिच्याच वाटेतें. ॥ ७
करवी लक्ष्य[14] व्योमीं **पार्थासचि** शक्य भेद त्याचा कीं, ।
चलचक्र[15] तळीं भेदनसाधन, तें सूक्ष्म रंध्र त्या चाकीं. ॥ ८
शर पांच मात्र, धनुही त्र्यंबक[16]कोदंडमित्र कठिणपणें. ।
करवुनि ऐसें भिववी बहुतांच्याही मनास कठिणपणें[17]. ॥ ९
घोषविलें[18] कीं, 'चढवुनि धनुला पांचा शरांत लक्षातें ।
भेदील जो कृती त्या माझी कन्या वरील दक्षातें[19].' ॥ १०
सर्व मिळाले रंगीं[20] विप्रनृपांहीं सुमंच[21] शोभविले. ।
रंगीं ते लोक तसे कमळवनीं जेंवि भृंग लोभविले. ॥ ११
बसले होते **पांडव** विप्रांच्या शिवमया[22] समाजांत. ।
कोण न होतील तदाश्रित शांत दया सुधासमा ज्यांत? ॥ १२

---

१. कुंभार. २. मृत्तिकाघट करण्याचें गृह, ३. पृथ्वीला. ४. सतींत (साध्वींमध्यें) मिरवायासि स्वमहत्वाचा लव कुला न उरला–असा अन्वय. ५. रत्ननिर्मित गृहीं राहण्यास योग्य. ६. कुंभाराच्या घरांत. ७. निमग्न. ८. तेजरहित. ९. राजांची वंशपरंपरा वर्णन करणारे, वंशसूचक. १०. पौराणिक. ११. स्तुतिपाठक. १२. कृष्णेचा स्वयंवरोत्सव पाहण्याचें भाग्य इच्छिणारे. १३. द्रुपद. १४. शरव्य, निशाण, लक्ष. १५. चलयंत्र. (यालाच छिद्र होतें.) १६. शंकराच्या धनुष्याचें मित्र. १७. दुस्तर प्रतिज्ञेनें. १८. प्रसिद्ध केलें. १९. चतुरातें. २०. सभास्थानीं. २१. उत्तम पलंग. २२. कल्याणरूपा.

रंगीं धृष्टद्युम्नें धरुनि करीं आणिली [1]स्वसा रमणी ।
जाणों [2]भुजगें [3]प्रेक्षकजननयनमनोहर [4]स्वसार मणी. ॥ १३
तद्रूपें मोहे सुरजनहि, धरिल धैर्य तो कसा रंग? ।
मूर्तिमती [5]गीति गमे ती भुलले तेहि [6]लोकसारंग. ॥ १४
वरिलें उमापण तिणें पाववुनि [7]स्वच्छवि प्रकाशाला. ।
तसि नसती तरि मिळते बहु सुज्ञ स्वच्छ विप्र [8]काशाला? ॥ १५
कर वळविला [9]अंजें जें [10]विष्णुधृतस्त्रीस्वरूप कित्ता तें, ।
चित्र तसेंचि उतरिलें चतुरें, वाटे कवींद्रचित्तातें. ॥ १६
रंगीं धृष्टद्युम्न स्वभुज उभारुनि म्हणे, 'अहो! परिसा ।
भेदील लक्ष तो या मद्भगिनीला वरूनि हो [11]हरिसा? ॥ १७
कृष्णेसि म्हणे, 'वत्से! दे माळा लक्षभेद करित्यातें, ।
कुळ शीळरूप सद्गुण असतील [12]स्वानुरूप जरि त्यातें. ॥ १८
हा दुर्योधन, नृप हे, व्यासवरें बंधु जन्मले शत गे! ।
हा कर्ण ज्यापुढें [13]परचापश्रुतिकुशळता न लेश [14]तगे. ॥ १९
हा शल्य मद्रपति, हा [15]चैद्यप शिशुपाळ, हा जरासंध, ।
[16]गंधद्विपगंध तसा दुःसह याचाहि शत्रुला गंध. ॥ २०
हे राम कृष्ण यदुपति, हे दोघे साधु उद्धवाक्रूर, ।
गमले रिपु [17]गोपस्त्रीहृदया, जे परम शुद्ध [18]वाक्क्रूर.' ॥ २१
ऐसें [19]समागतांचें कळवी कुळशीळकर्मजन्म तिला. ।
कीं लक्ष्यभेदकरही अकुळज कोणी रुचो न सन्मतिला. ॥ २२
दुर्योधनादिकांची कन्यारत्नींच वेधली दृष्टी, ।
जसि वृष्टि चातकाला, त्याला तसि ती [20]विरंचिची [21]सृष्टी. ॥ २३

---

१. भगिनी. (द्रौपदी.) २. सर्पानें. ३. पाहणाऱ्या जनाचे नेत्र व मन हरण करणारा. ४. आपलें धनसर्वस्व. ५. गानकला. ६. लोकरूप हरिण. सारंग जातीची आणि नागादिक इतर प्राण्यांची गानलोलुपता सुप्रसिद्ध आहे. ७. आपली कांति. ८. कशाकरितां. ९. ब्रह्मदेवें. १०. विष्णूनें धरलेलें स्त्रीस्वरूप. समुद्रमंथन होऊन अमृत बाहेर आलें. त्याविषयीं देवदैत्यांचा कलह लागला. अमृतकलश दैत्य देईनात. तेव्हां देवांच्या हितासाठीं विष्णूनें मोहिनीरूप धारण केलें, या कथेचा येथें संदर्भ आहे. ११. सिंहसा, इंद्रसा. १२. स्वसदृश. १३. दुसऱ्याचें धनुर्वेदकौशल्य. १४. टिके. १५. चैद्यदेशाचा पति. १६. मदोन्मत्त हस्तीचा गंध. १७. गोपींच्या मनाला शत्रूसारखे वाटले. १८. वाणीनें भयंकर. कृष्णास मथुरेस नेलें तेव्हाचें अक्रूराचें भाषण आणि उद्धवाचें गोपीसांत्वनपर भाषण त्यांस क्रूर वाटलें, हा भागवतकथासंदर्भ. १९. मिळाल्यांचें. २०. ब्रह्मदेवाची. २१. द्रौपदी.

कृष्णेकडे जनाची तसि दृष्टी, श्री[1]कडे जसी सृष्टी. ।
भक्ताकडेचि हरिची दृष्टि, जसी वांसुराकडे गृष्टी[2]. ॥ २४
बळदेवासि[3] म्हणे प्रभु[4], 'आर्या! त्या ब्राह्मणांत तो धर्म. ।
तो भीम, तो धनंजय, ते यम[5], म्यां वळखिले, नव्हे नर्म[6]. ॥ २५
ब्राह्मणवेष असों द्या, तेजें[7] पहा, चातका सदा दाते[8] ।
घनसे[9] निववितिं, मज वश झालेचि, न घातकास दादा! ते. ॥ २६
'नवल ईटांत[10] मिळाल्या कनकाच्या[11] इष्टका[12], मला भाचे[13] ।
गुरुचे बहु, याहुनि शतहर्ष उणे इष्टकामलाभाचे.' ॥ २७
ऐसें बळभद्र म्हणे, वर्णी त्या विश्वसाक्षिदृष्टीतें[14], ।
सृष्टीतें जी [15]रचि ती, यश न जिचें ये सुधाब्दवृष्टीतें[16]. ॥ २८
देशोदेशींचे नृप झटले, परि परशुरामसें[17] चाप ।
न वळे, लवे भुजबळें[18], तत्ताडित[19] बहुत पावले ताप. ॥ २९
चोळुनि कर[20] करकर रद[21] खावुनि दष्टोष्ठ[22] मोघचापल[23] ते ।
हतदर्प[24] भूप म्हणती, 'हंत[25]! हता[26]: स्म त्वयाद्य[27] चापलते[28]!' ॥ ३०
तेव्हां स्वात्युत्साहें[29] हृष्टमना[30] तात[31] उष्णकर[32] करुनी ।
[33]रविसमवर्णें कर्णें चाप चढविलें क्षणांत करकरुनी. ॥ ३१
स्वमनीं पांडव म्हणती, 'हा[34]! हा! या दुष्कुळ[35]प्रसूतानें ।
नेलेंचि लक्ष्य भेदुनि सह[36]कन्यारत्न यशहि सूतानें[37].' ॥ ३२

---

१. लक्ष्मीकडे. २. नूतन प्रसूत झालेली गाय. ३. बळराम. ४. कृष्ण. ५. नकुळ सहदेव. ६. थट्टा, खोटें. ७. यांचें क्षात्रतेज. ८. देणारे. ९. मेघाप्रमाणें. १०. विटांत. ११. सुवर्णाच्या. १२. इष्टा. १३. पृथा ही वसुदेवाची बहीण; ही दोघेंही यदुकुलोत्पन्न शूरनामक राजाचीं अपत्यें, तेव्हां पांडव हे वसुदेवाचे (गुरुचे=बापाचे) भाचे होते. १४. कृष्णातें. (सकल जगताला पाहणारी आहे दृष्टि ज्याची त्याला.) १५. उत्पन्न करी. १६. अमृतरूप मेघाच्या वृष्टीतें. १७. परशुरामाच्या धनुष्यासारखें प्रचंड. १८. बाहुबळानें. १९. त्या चापानें ताडिलेले (राजे.) २०. हात. २१. दंत. २२. चावले ओष्ठ ज्यांहीं असे (भूप). 'ओत्वोष्ठयोः समासे वा' या नियमानें समासामध्यें अवर्णापुढें 'ओतु' (मांजर) किंवा 'ओष्ठ'शब्द असतां विकल्पेंकरून पररूप होतें यावरून 'दष्टोष्ठ' असें रूप झालें. २३. व्यर्थ ज्यांचें चपलत्व. २४. गतगर्व. २५. हायहाय. २६. मारले गेलों. २७. त्वां आज. २८. हे चापलते, तूं आज आम्हांस ठार बुडविलेंस. २९. आपल्या अत्यंत उत्साहानें. ३०. हृष्ट (आनंदित) आहे मन ज्याचें तो. ३१. बाप. तेव्हां स्वात्युत्साहें उष्णकर तात (रवि) हृष्टमना करुनी कर्णें चाप चढविलें—इत्यादि अन्वय. ३२. रवि. ३३. सूर्याप्रमाणें अंगकांति ज्याची अशा. ३४. हायहाय. ३५. अधमवंशोत्पन्नानें. ३६. द्रौपदीरूप रत्नासह. हा 'सहोक्ति' नामक अलंकार होय. ३७. सारथ्य करणाऱ्या कर्णानें.

जों कर्ण म्हणे, 'न शिवों देईन इला दुज्या [1]नवरया मी.' ।
तोंचि म्हणे ती [2]कृष्णा, '[3]सूतमहं जातुचिन्न वरयामि.' ॥ ३३

कर्ण [4]विगुण धनु टाकुनि पाहुनि रविला, चुरूनि हातातें ।
चित्तीं म्हणे, 'कशाला केला निर्माण पुत्र हा तातें? ॥ ३४

[5]वैतरणी [6]सुतरा, ही बुडवी, निंदोत पाप, सुतरेतें ।
केला कां बुडवाया [7]दुस्तरलज्जानदींत सुत रेतें?' ॥ ३५

[8]शिशुपाल [9]यत्न करि, परि बोले स्वमनांत [10]चापदैवत, 'मी ।
[11]न कठिन, तुला बुडवितें आठवुनि तुझेंचि पाप दैव तमीं.' ॥ ३६

[12]मागधराजसुत म्हणे, 'कृष्णा होईल आजि [13]मज्जाया.' ।
त्यासि म्हणे [14]चापलता, '[15]लज्जापंकीं तुम्हींहि [16]मज्जा [17]या.' ॥ ३७

[18]शल्यहि पडला, [19]झडला मद, न [20]प्रकटूनि शक्तिला जे तें ।
कौतुक पाहत होते सांपडले तेच [21]कवि न लाजेतें. ॥ ३८

पाहति उगेचि दूरुनि न शिवों दे चाप त्या [22]अहीनकुलां ।
[23]लेखी [24]तृणतुच्छ जसा, [25]अबळा बाळा, बळी [26]अही [27]नकुला. ॥ ३९

---

१. नवऱ्याला. २. द्रौपदी. ३. अहं जातुचित् सूतं न वरयामि म्ह० कर्णाला मी कधींही वरणार नाहीं. महाभारतांत 'नाहं वरयामि सूतम्' असें आहे. (आदिपर्व, अ० १८७ श्लो० २३ पहा.) ४. दोरीनें रहित. ५. यमलोकीं जातानां मार्गांत जी भयंकर नदी लागते ती. ६. तरण्यास सोपी. कर्ण म्हणतो:—वैतरणी सुतरा, (या) सुतरेतें (नदीतें) 'ही बुडवी' (असें) पाप (पापी नर) निंदोत=वैतरणी (ही नदी मोठी भयंकर आणि दुस्तर असें लोक म्हणोत, पण मला तर) सुतरा (तरून जाण्यास सोपी वाटते). या तरून जाण्यास सोप्या अशा नदीतें 'ही लोकांनां बुडविते' असें पापी जन खुशाल म्हणोत. कारण, लज्जानदीच खरोखर दुस्तर आहे, तशी वैतरणी नाहीं, असा भावार्थ. ७. तरुन जाण्यास कठिण अशा लज्जारूप नदीमध्यें. ८. हा सोमवंशीय दमघोष राजाचा पुत्र वसुदेवाचा भाचा आणि कृष्णाचा आतेभाऊ. हा हिरण्यकशिपूचा अंशावतार असून यास 'चैद्य' असेंही नांव आहे. ९. लक्ष्यभेद करण्याचा यत्न. १०. चापरूप दैवत. ११. मी कठिन न, दैव तुझेंचि पाप आठवुनि तुला तमीं (दुःखांत, अंधकारांत) बुडवितें (असें) चापदैवत स्वमनांत बोले—असा अन्वय. १२. जरासंध, मगधदेशाचा राजा बृहद्रथ याचा पुत्र. १३. माझी स्त्री. १४. धनुष्याला लवचीकपणावरून लतासादृश्य कल्पिण्याचा कविसंप्रदाय आहे. १५. लज्जारूप चिखलांत. १६. बुडा. १७. चला. १८. मद्रराज. १९. गर्व उतरला. २०. शक्तिला न प्रकटूनि जे तें कौतुक पाहत होते तेच कवि लाजेतें न सांपडले—असा अन्वय. २१. शहाणे, चतुर नर. २२. उत्तमकुलोत्पन्नांला. २३. मानी, गणी. २४. तृणासारखा क्षुद्र हलकट. २५. निर्बळाला. २६. सर्प. २७. मुंगसाला.

जाणों [1]तत्तेज म्हणे त्यांला, '[2]वश चित्तवृत्ति कामा जी ।
ती न भली, सावध व्हा; कां करितां निपट [3]मृत्तिका [4]माजी?' ॥ ४०
'न बुडो क्षत्रयश' म्हणुनि उठवी [5]उत्साहदायि मन पार्था; ।
धर्महि म्हणे, 'असो [6]गुरुलब्धा शिक्षा सदैव [7]अनपार्था.' ॥ ४१
जैं धनुकडे निघे [8]द्विजवृंदांतुनि विप्र एकला जाया, ।
साधूंसि तोंचि शिकवी [9]साधूत्साहातिरेक [10]लाजाया. ॥ ४२
कोणी म्हणति, '[11]निवारा, आम्हां [12]क्षत्रियकृतोपहासाचें ।
पात्रत्व नवें द्याया सुचपळ [13]बटु जोडितो पहा! साचें.' ॥ ४३
[14]किति म्हणती, 'जाऊंद्या, होवुं न देईल कर्म [15]कुत्सा हें; ।
पूर्वी [16]श्रीराम जसा, उठलासे [17]हा तसाचि उत्साहें. ॥ ४४
प्याला [18]अगस्त्यनामा ब्राह्मण निःशेष [19]नदनदीपातें, ।
विस्मरला [20]रामातें कां त्या [21]भृगुवंशसदनदीपातें? ॥ ४५
[22]ब्रह्मतपःकेलिगृह ब्राह्मण न करील काय हो! बोला? ।
'[23]विजयोऽस्तु' म्हणा, चढला [24]विप्राशीनें न कोण तो [25]मोला? ॥ ४६
पावे तत्काळ [26]महाऋद्धीप्रति पार्थ [27]तोकें, [28]विप्राशी ।
[29]त्या माता [30]कामदुघा, कारुण्य [31]स्तन्य, तो [32]कवि प्राशी. ॥ ४७

---

१. त्या राजाचें तेज. २. जी चित्तवृत्ति कामा वश (होत्ये) ती भली न–असा अन्वय. ३. माती. ४. माझी. (तेजाची.) ५. उत्साह देणारें. ६. गुरु(द्रोणा)पासून प्राप्त झालेली. ७. सफला. ८. ब्राह्मणसमुदायांतून. ९. साधूंच्या उत्साहाचा अतिशय. १०. साधूंसि लाजाया शिकवी–असा अन्वय. ११. या विप्राचें निवारण करा. १२. क्षत्रियांनीं केलेल्या थट्टेचें. १३, बालक, मुलगा. १४. कित्येक ब्राह्मण. १५. निंदा. १६. सीतास्वयंवरसमयीं जनकाच्या मंडपांत. १७. पार्थ. १८. कालकेय नामक असुर लोकांस त्रास देऊं लागले, तेव्हां मुनीच्या प्रार्थनेवरून अगस्त्यऋषीनें तपोबलानें समुद्रोदकाचें शोषण करून त्यांत लपून असणाऱ्या कालेयकांचा नाश केला. (महाभारत, वनपर्व, अ० १०२–१०५) या कथेकडे येथें लक्ष्य आहे. १९. सागरातें. (नद आणि नद्या यांचा स्वामी त्यास.) २०. परशुरामातें. २१. भृगुऋषीच्या वंशरूप गृहसंबंधी दीप. (परशुरामाचें विशेषण.) २२. ब्रह्मरूप तपश्चर्येच्या क्रीडेचें स्थान. २३. जय असो असें. २४. ब्राह्मणाच्या आशीर्वादानें. २५. महात्म्याला, मोठेपणाला. 'विप्राशीनें मोला न चढला तो कोण?' अशा काक्वर्थीचें ग्रहण येथें इष्ट आहे. २६. समृद्धि. २७. बालक. २८. ब्राह्मणाचे आशीर्वाद. २९. त्या विप्राशी कामदुघा माता–असा अन्वय. ३०. मनोरथ पूर्ण करणाऱ्या. ३१. दुग्ध. ३२. अर्जुन.

नमिला आधीं पार्थें [1]विश्वप्रियसुहृद[2]कृत्रिम [3]पिनाकी, ।
म्हणती, '[4]यद्यश सेवुनि अमृतीं गोडी नसे [5]किमपि' [6]नाकी. ॥ ४८
मग हृदयीं आठविला [7]कुशळकर [8]कुशेशयाक्ष [9]कंसारी, ।
[10]यत्स्मरणें [11]शुचिमतियतिपतिगतिला योग्य होय [12]संसारी. ॥ ४९
करुनि प्रदक्षिणा, धनु उचलोनि, ख्याति तो करी मोटी, ।
चापाच्याचि न केवळ नरवीरांच्याहि [13]वांकवी [14]कोटी. ॥ ५०
यंत्रच्छिद्रद्वारें पांचहि शर एकदांचि सोडोनी. ।
पाडी पळांत पृथ्वीवरि [15]पुरुषप्रवर लक्ष्य [16]तोडोनी. ॥ ५१
प्रीति [17]मुनिगणांच्याही, राजांच्या कीर्ति [18]सोमवंशाच्या, ।
घाली कंठीं माळा, [19]कृष्णा त्या [20]श्रीमरुत्वदंशाच्या. ॥ ५२
आशीर्वादांच्या द्विज, पुष्पांच्या करिति सुरहि वृष्टीतें, ।
द्रुपदपुरी [21]जनकपुरीसम सुखदा होय [22]साधुदृष्टीतें. ॥ ५३
ब्राह्मण नाचति रंगीं आनंदें [23]उडविती [24]स्वचैलातें; ।
तें तोयें[25] होय हो! यश [26]खळजननृपचित्ततप्ततैलातें. ॥ ५४
[27]सत्कांतलाभचिंता उत्साहें उचलितांचि धनु [28]सरली. ।
[29]सद्गुणरक्ता कृष्णा [30]कृष्णाजिनधारकाहि अनुसरली. ॥ ५५
कोपोनि कर्णशल्यप्रमुख नृपति म्हणति, 'हा द्रुपद खोटा, ।
आम्हां [31]मानधनांचा केला अपमान, घात हा मोटा. ॥ ५६

---

१. विश्वाचा प्रिय मित्र. २. स्वाभाविक, स्वतःसिद्ध, नैसर्गिक. ३. महादेव. (पिनाक हें आयुध ज्याचें तो.) ४. ज्या महादेवाचें यश. ५. अल्प देखील. ६. स्वर्गी रहाणारे. (देव.) ७. कल्याण करणारा. ८. कमलनेत्र. ९. कृष्ण. (कंसाचा शत्रु.) १०. ज्या कृष्णाच्या स्मरणानें. ११. शुद्धबुद्धि ज्यांची अशा संन्यासिश्रेष्ठांच्या गतीला. (शुचि म्ह० वासनादि दोषरहित; कारण यतीची ऐहिक सुखवासना लुप्तप्राय असते.) १२. संसार (प्रपंच) करणारा मनुष्य. १३. लववी, नम्र करी. १४. धनुष्याचीं टोकें; (पक्षीं) कोटिसंख्या. १५. नरश्रेष्ठ अर्जुन. १६. विद्ध करून. १७. मुनिगणांच्याही कंठीं माळा प्रीति घाली, सोमवंशाच्या राजांच्या कंठीं कीर्ति माळा घाली—असा अन्वय. १८. चंद्रकुलोत्पन्न. १९. द्रौपदी. २०. इंद्राचा अंश (पुत्र) जो अर्जुन त्याच्या. २१. सीतास्वयंवरप्रसंगीं जनकाची नगरी जशी होती तशी. २२. सज्जनांच्या नेत्रांला. २३. महाभारत, आदिपर्व, अ० १८ श्लो० २३ पहा. २४. स्ववस्त्रातें. २५. तें यश तोय होय—असा अन्वय. २६. दुष्टजन जे नृपति त्यांचें चित्त हेंच तापलेलें तेल त्याला. २७. चांगला नवरा मिळावा ही काळजी. २८. शेवटास गेली, दूर झाली. २९. उत्तम गुणांच्या ठायीं प्रीति करणारी. ३०. हरिणाचें कातडें (अजिन) धरणाराला. (अर्जुनाला.) कृष्ण=कृष्णमृग, काळवीट. ३१. मान हेंच धन ज्यांचें अशा राजांचा.

मुख्य स्वयंवरीं अधिकारी [1]क्षत्रिय, न विप्र, हें कळतें; ।
भलतेंचि बळें करितो, [2]श्रुतियश ऐशा खळामुळें मळतें. ॥ ५७
विप्र नव्हे वध्य, वधा द्रुपदा, न करो दुजा अशा [3]अनया, ।
चढवा [4]गुण, घ्या शर, हूं, धर्मार्थ [5]मुहूर्त दृढ करा मन, या. ॥ ५८
आम्हां नृपांत भलत्या एका स्वमतें वरील नवरी ती, ।
विप्र [6]स्वयंवरवधूवर, हे स्थिति [7]नाशहेतु, नव रीती. ॥ ५९
नवरी न वरील [8]परा जरि, तरि [9]दीप्तानळांत [10]होमा ती; ।
वारुनि तेजें, अनया कारण, [11]त्यांची पळांत हो माती.' ॥ ६०
[12]युद्धोद्यतनृपचक्रत्रस्तमति द्रुपद काळजी वाहे, ।
विप्रांसि म्हणे, 'माझ्या झालेचि नृपाळ काळ जीवा हे.' ॥ ६१
कमळवनावरि गजसे द्रुपदावरि धांवले बळी [13]परे ते; ।
त्यांवरि [14]सज्य करुनि धनु [15]धन्वीश्वर जिष्णु सिंहसा परते. ॥ ६२
सरळ सबळ जवळ द्रुम समयीं मिळतां कशास [16]कोदंड ? ।
वाटे, भीम परतला [17]काळ, कवळिला न वृक्ष, तो [18]दंड. ॥ ६३
[19]शरणागताभिमानी [20]समरोद्यत सर्व विप्र पाहोनी, ।
अर्जुन बोले, डोले [21]सुरगुरु [22]रोमांचभार वाहोनी. ॥ ६४
'[23]षडरिघ्न तुम्हीं गुरु हो! [24]षडरिजितमदासि काय [25]हरिना मी? ।
[26]अरि हरिनें नुचलावें [27]अघदलनीं, बळ [28]उद्दंड हरिनामीं. ॥ ६५

---

१. स्वयंवराचा अधिकार क्षत्रियालाच आहे. (महाभारत, आदिपर्व, अ० १८९ श्लो० ७). २. वेदाचें यश. (विप्राला स्वयंवराचा अधिकार नाहीं, क्षत्रियालाच आहे, अशी श्रुति आहे तिचें उल्लंघन दुष्ट द्रुपदानें केलें म्हणून श्रुतीच्या यशाला डाग लागतो.) ३. अन्यायातें. ४. धनुष्याची दोरी. ५. दोन घटिका. ६. स्वयंवरांतील वधूचा नवरा. ७. नाशास कारण. ८. दुसऱ्यास. ९. प्रदीप्त झालेल्या अग्नींत. १०. जाळून टाका. ११. द्रुपदाची. १२. युद्धास तयार झालेल्या नृपमंडळानें भयभीत केली आहे मति ज्याची. (हें द्रुपदाचें विशेषण.) १३. शत्रु. १४. ज्यासहित. (ज्या=धनुष्याची दोरी.) १५. धनुर्धरांत अग्रणी. १६. धनुष्य. १७. यमराज. १८. यमदंड. १९. जे शरण आले त्यांचा ज्याला अभिमान आहे असा. २०. युद्धास तयार झालेला. २१. देवांचा गुरु बृहस्पती. २२. अर्जुनाच्या भाषणानें रोमविकार पावून, आनंदानें रोमांचित तनु होवून. २३. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर आणि मोह या जिवाचें अनहित करणाऱ्या सहा विकारांचा घात करणारे. २४. कामादि सहा शत्रूंनीं जिंकिलेले जे जन त्यांच्या गर्वाला. २५. हरण करणार नाहीं काय? २६. चक्र. २७. पापनाश करण्यास्तव. २८. पुष्कळ.

[१]युष्मदभयवर आम्हांकरवीं करवील [२]दुष्टमदनाशा. ।
साधुपुढें [३]अहिताशा शंभुपुढें जेंवि [४]दुष्टमदनाशा.' ॥ ६६
भीमार्जुन शत्रूवरि फिरतां, दावी [५]मुकुंद [६]रामातें; ।
[७]ज्या पाहे त्यासि म्हणे [८]बळ, 'तूं बहु सुखद सुंदरा! मातें.' ॥ ६७
कर्णासीं भीमानुज, शल्यासीं भीमसेन युद्ध करी. ।
[९]तत्तेजस्तब्ध इतर नृप झाले, जेंवि [१०]पंकरुद्ध [११]करी ॥ ६८
[१२]रणविस्तर काशाला? [१३]हेमाक्षरणीं [१४]महाकिरी टिकला, ।
कीं अर्जुन कर्णरणीं, अरिसहि बहु तोषवी किरीटि[१५]कला. ॥ ६९
कर्ण म्हणे, 'विप्रवरा! आनंद दिल्हा तुवां भला आजी; ।
ऐसी नसेचि पूर्वीं आढळली [१६]कामुका मला [१७]आजी. ॥ ७०
तूं [१८]चापवेद, किंवा [१९]भार्गव, कीं [२०]शक्र, कीं स्वयें विष्णु? ।
कीं मजसीं झगडेसा होता सुत एक पांडुचा जिष्णु. ॥ ७१
या पांचां[२१]मध्यें तूं कोण? वद स्पष्ट, जाणत्या कळतें ।
वरि गारसा हिरा परि, त्या [२२]कवचें तेज काय हो! [२३]मळतें?' ॥ ७२
पार्थ म्हणे, 'मी कार्मुकवेद नव्हें, रामही नव्हें, आहें ।
[२४]विप्र [२५]गुरुप्रिय, अस्त्रीं शस्त्रीं [२६]पटु, [२७]चित्र म्हणसि कां गा! हें? ॥ ७३
गुरुचा प्रसाद ज्यावरि काळासहि तो कदापि [२८]आटेना; ।
वाटे [२९]नारायणसा, अजितपरा तत्सुकीर्ति बाटेना.' ॥ ७४
त्या [३०]विप्रवेषवासविमुखवर्णांहीं भरूनियां [३१]कर्ण ।
[३२]परते, पुरतें जाणें, '[३३]जय्य नव्हे ब्रह्मतेज' हें कर्ण. ॥ ७५

---

१. तुमचा अभय देणारा प्रसाद. २. दुष्टांच्या गर्वाचा अंत. ३. अकल्याणेच्छा. ४. दुष्ट मदनाची इच्छा. ५. कृष्ण. ६. बळरामातें. ७. ज्या (भीमाला अथवा अर्जुनाला). ८. बळराम. ९. त्याच्या पराक्रमानें निश्चल. १०. चिखलांत रुतलेले. ११. हत्ती. १२. पंतांना लांबलचक वर्णनें आवडत नसून ते संक्षेपानें वर्णन करण्याची शैली पसंत करतात, याचें हें एक उदाहरण आहे. १३. हिरण्याक्षाच्या युद्धीं. १४. महावराह. १५. अर्जुनाची युद्धकला. १६. युद्धाची इच्छा करणाऱ्या (मला.) १७. संग्राम. १८. धनुर्वेद. १९. परशुराम. २०. इंद्र. २१. चापवेद, भार्गव, शक्र, विष्णु आणि जिष्णु हे पांच. २२. त्या गारेच्या आवरणानें, आच्छादनानें. २३. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २४. ब्राह्मण. २५. गुरूचा आवडता. येथें 'विप्रगुरुप्रिय' असा सामासिक शब्द न घेतां 'विप्र गुरुप्रिय' असा पदच्छेद करावा हें बरें, कारण मूळ भारतांत 'ब्राह्मणोऽस्मि' असें आहे. (महाभारत, आदिपर्व, अ० १९० श्लो० २०.) २६. कुशल, निष्णात. २७. आश्चर्य. २८. जेरीस यावयाचा नाहीं. २९. सर्वव्यापी आदिदेवासारखा. ३०. ब्राह्मणवेषधारी वासवीच्या (अर्जुनाच्या) तोंडच्या अक्षरांनीं. ३१. कान. ३२. युद्ध न करतां परत जाई. ३३. जिंकण्यास शक्य.

त्या भीमानेंही सुररुचिर[1] समर अमरतोषकर[2] केला; ।
यत्कीर्तिनें विरेसा दिल्हा जडात्मत्वदोष[3] करकेला[4]. ॥ ७६
भीमें शल्य क्षितिवरि कंदुकसा[5] भुजरणांत[6] आपटुनी, ।
हांसविले मुनि, न तसे शिशुहि कधीं हास्यरसकथापटुनीं[7]. ॥ ७७
शल्यपराभव[8] पाहुनि कर्णादिक सर्व शंकले पर[9] तें ।
दाविति, परि धैर्य उडे आधीं, मग मद्रपतिकलेवर[10] तें. ॥ ७८
नृप म्हणती, 'हे ब्राह्मण, आम्हांला भीड फार वेदाची, ।
मानधनासि[11] न साहे वार्ता अपमानजन्यखेदाची. ॥ ७९
कोठील ब्राह्मण हे? तेजस्वी भीमजिष्णुसे धीट, ।
शोधूं, बरें करूं, करणें तें न विचारितां नव्हे नीट.' ॥ ८०
ऐसें वदोनि गेले नृप निजशिबिरासि[12] कीर्ति हारवुनी, ।
झाले म्लानश्री[13] ते द्विजतेजें जेंवि पुष्पहार[14] उनीं. ॥ ८१
साग्रज[15] जिष्णुहि मग त्या द्रुपदसुरद्रुप्रसूनमाळेला[16], ।
सांभाळुनि स्ववस्त्रच्छायेंत क्षिप्र जाय शाळेला[17]. ॥ ८२
वदले, 'भिक्षा घेवुनि आलों, ये जननि! घे' असें कवि ते ।
तच्चिंतातिमिरहृदयपद्माचे[18] प्रेक्षणीय[19] जे सविते[20]. ॥ ८३
शाळेंत पृथा बोले, 'भिक्षा माझ्यासमीप ती ठेवा, ।
हो तृप्तिदा सुधासी[21], सर्व भ्राते मिळा, सुखें सेवा.' ॥ ८४
नमितां द्रुपदसुतेतें पाहुनि कुंती म्हणे, 'अहा देवा! ।
वदलें असें कसें? कीं सर्व भ्राते मिळा, सुखें सेवा'. ॥ ८५
भलतेंच वदे सासू, सासूया[22] जाहली न परि सून; ।
कुंती अधर्मभीता[23] मुदिताही[24] होय वृत्त परिसून. ॥ ८६

---

१. देवांप्रमाणें मनोहर. २. अमरांना (देवांना) संतोषजनक. ३. चेतनाशून्य देहत्वाचा दोष, चेतनारहित देह आहे हा दोष. ४. गारेला. ५. चेंडुसा. ६. बाहुयुद्धांत. ७. हास्यरस उत्पन्न करणाऱ्या कथा सांगण्यांत कुशल अशा जनांनीं. ८. पाडाव, मोड. ९. शत्रु. १०. शल्याचें शरीर. ११. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १२. सेनेचा तळ, सेनानिवेशस्थान, राहण्याची जागा. १३. तेजोहीन. १४. फुलांची माळा. १५. भीमासह. १६. द्रुपदरूप कल्पवृक्षाच्या पुष्पांची माळा (द्रौपदी) तिला. १७. कुंभाराच्या घराला, कुलालगृहाला. १८. तिचें (कुंतीचें) चिंतारूप तिमिरानें (अंधकारानें) भरलेलें जें हृदय हें पद्म (कमळ) त्याचे. १९. पाहण्यास योग्य. २०. सूर्य. (सूर्यकिरणांनीं पद्में विकसित होतात या गोष्टीस अनुलक्षून हें वर्णन आहे.) २१ अमृतासारखी. २२. दोषदृष्टी, समत्सर. २३. बहुभर्तृतारूप अधर्मानें भ्यालेली. २४. आनंदित.

गौरवुनि[1] धरूनि करीं नेवुनि धर्माकडे सुने, त्यातें ।
सांगोनि पुसे अनृताधर्महर[2] सुयुक्ति त्या सुनेत्यातें[3]. ॥ ८७

मातेला समजावुनि धर्म म्हणे, 'अर्जुना! इचा विधिनें[4] ।
पाणि[5] स्वीकारावा आतां त्वां शक्तिकीर्तिच्या निधिनें.' ॥ ८८

जिष्णु म्हणे, 'गुरुलंघन[6] अज्ञ जन करो, करी न परि वेत्ता[7], ।
मी तों न आपणाला जाणत जाणत करीन परिवेत्ता[8]. ॥ ८९

त्वां भीमें म्यां नकुळें सहदेवें कार्य[9] पाणिपीडन[10] तें ।
व्हावें क्रमेंचि, धर्म्यव्यवहारीं धरुं नयेचि भीड नतें[11].' ॥ ९०

धर्म विचार करी, तों अनुजांच्या आपुल्याहि नयना तें ।
रुचलें स्त्रीरत्न, मनें एकचि धरिलें, त्यजूनि नयें[12] नातें[13]. ॥ ९१

जनकेंचि[14] चुंबिली जी चुंबावी नंदनेंहि[15] नलिनी[16] ती, ।
धरिली त्या कृष्णारतमतिनीं[17] अति नीचसीच अलिनीतीं[18] ॥ ९२

गज गंगेंत निवाया म्हणति, न चिंतूनि शुद्धि, 'मज्जन[19] हो[20].' ।
तैसेंचि पांडुसुत त्या लावण्यनदींत बुद्धिमज्जन[21] हो. ॥ ९३

धर्म म्हणे, 'ज्या ध्येयांना[22] अनुसरले हे स्वबंधु चवघे, तें ।
धरिलें माझ्याहि मनें, कोणाही न पुसतांचि चव घेतें. ॥ ९४

झालें वश निर्जतनया[23] मन, या अनया न यत्न, होगलितें[24] ।
जैं भेदे[25] कटक[26], किजे तैं रायें युद्ध काय हो गलितें[27]? ॥ ९५

---

१. आदर करून. २. असत्यरूप अधर्म हरणारी आपणास मिथ्यावादित्वाचा दोष लागूं नये अशी. ३. उत्तम मार्गदर्शक. ४. शास्त्रोक्त मार्गानें. ५. हस्त. ६. वडिलांचा अतिक्रम, त्यांचा अनादर. ७. ज्ञाता. ८. ज्येष्ठ बंधुपूर्वी विवाह करणारा, लग्न न झालेल्या वडील बंधूचा लग्न झालेला कनिष्ठ बंधु, परिवेदिक. ९. करावें. १०. हस्तग्रहणविवाह. वधूचा हात वराच्या हातीं देणें आणि वराचा हात वधूच्या हातीं देणें इत्यादि विधियुक्त विवाह. ११. नम्रानें. १२. नीति सोडून सर्वांच्या मनानें द्रौपदीच्या ठायीं एकच नातें (भार्यारूप) धरिलें. १३. स्त्रीत्वाचें नातें. १४. बापानें. १५. मुलानें. १६. कमलिनी, कमळाचें झाड. १७. कृष्णेच्या (द्रौपदीच्या) ठायीं रमली आहे मति (मन) ज्यांची त्यांनीं. (पांच पांडवांनीं.) १८. भ्रमराची रीति. १९. स्नान. २०. होओ, होवो. (येवो, येओ, होवो, होओ, यांबद्दल यो, हो, अशीं रूपें आढळतात.) २१. बुद्धिमान् लोक. २२. ध्यानास्पद वस्तु, ध्यानाचा विषय जो पदार्थ त्याला. २३. मदनास. मनापासून मदन उत्पन्न होतो म्हणून त्यास निजतनय (मनाचा पुत्र) असें येथें म्हटलें आहे. २४. हांकून लावणारें. २५. पराभव पावे. २६. सैन्य. २७. ज्याचें धैर्य खचलें आहे त्यानें.

व्यासोक्ति[1] पृथोक्ति[2] जसी असमद्वृत्तिहि पहा तसीच बरें, ।
प्रभुच्या कोण न सन्मत[3] देतो दासासि कीर्तिचीं चंवरें[4]?' ॥ ९६
ज्याची हे स्त्री होइल होतिल रिपु त्या स्वबंधुचे अन्य[5]; ।
जो वासितासहचर[6] द्विप[7], होती तदरि[8] मदकरी[9] वन्य. ॥ ९७
धर्म भ्रात्यांसि म्हणे, 'पांचांची हे सती असो भार्या; ।
श्रुतिची मातेची सम आज्ञा आम्हां नव्हेचि परिहार्या[10].' ॥ ९८

अध्याय पस्तिसावा.

प्रभु राम कृष्ण दोघे गेले शाळेसि[11] त्या कुलालाच्या[12]. ।
तद्गृहसमभाग्य[13], भाळीं[14] न बुक्याच्या तें न वा[15] गुलालाच्या. ॥ १
सांगुनि नाम, युधिष्ठिर नमिला यमिलालसाकरयशांनीं[16]; ।
ध्यावें श्रितांशिवांहीं[17] ज्यांप्रति, जैसें हरिप्रति[18] शशांनीं[19]. ॥ २
म्हणति पृथेला, 'आत्याबाई! नमिताति हे तुला भाचे.' ।
यत्पदरजाहुनि[20] उणे इष्टाच्या सर्व हेतु[21] लाभाचे. ॥ ३
हरि भीमासि नमी, दे आलिंगन जिष्णुला, तया यमल[22] ।
नमिति, वृकोदर[23] भेटे रामा[24], यच्चिंतनेंचि[25] जाय मल[26]. ॥ ४
कुंती म्हणे, 'असे तो ताप न, अमृताब्धिची[27] हरी[28] लहरी[29], ।
झालेंचि म्हणत होतें मी, जें कीं 'व्यसन हें हरील हरी.' ॥ ५

---

१. व्यासाची उक्ति. (अध्याय ३२.) २. पृथेची उक्ति. (मागची ८४ वी गीति पहा.) ३. सज्जनांस मान्य. (हें पद 'दासासि' याचें विशेषण आहे.) ४. चामरें. ५. इतरबंधु त्याचे वैरी होतील. ६. स्त्रीचा किंवा हत्तीणीचा (वासिता=स्त्री, हत्तीण.) सोबती. ७. हत्ती. ८. त्याचे शत्रु. ९. मदोन्मत्त हत्ती. १०. अमान्या. ११. गृहास. १२. कुंभाराच्या. १३. त्याच्या घरांतील राखेचें भाग्य. १४. कपाळीं. तद्गृहसमभाग्य बुकयाच्या भाळीं न, तें (भाग्य) गुलालाच्या (भाळीं) न वा—असा अन्वय. १५. किंवा. १६. योग्यांनीं इच्छा करण्याजोगीं यशें ज्यांचीं त्यांनीं. १७. आश्रितांचीं अशिवें त्यांनीं. १८. सिंहाप्रत. १९. मृगविशेष, ससा. २०. ज्यांच्या चरणाच्या धुळीहून. २१. कारण यत्पदरजाहुनि उणे इष्टाच्या लाभाचे सर्व हेतु. असा अन्वय. २२. नकुल सहदेव. २३. भीम. (याचा जठराग्नि अतिशय प्रदीप्त असल्यामुळें हा लांडग्याप्रमाणें पुष्कळ अन्न खाऊन पचवी, म्हणून त्यास वृकोदर हें नांव पडलें असावें. शब्दार्थ पाहिला तर लांडग्याप्रमाणें याचें पोट होतें इतकाच आहे.) २४. बळरामा. २५. ज्या बळरामाच्या स्मरणानें. २६. पाप. २७. सुधासागराची. २८. कृष्ण. २९. लाट.

या दिनतुळेसि[1] पावे न दिवाळी, पाडवाहि न, न दसरा, ।
आम्हांसि भेटलां, हें तेंवि जसा वाळतांचि वनद[2] सरा[3]. ॥ ६
हे द्वारका, न भार्गवशाळा[4], मज भेटलेंचि माहेर; ।
आहे रक्षाव्रतरुचि[5] करुणा तुमच्याचि आंत बाहेर.' ॥ ७
ज्याच्या स्वरोमकूपीं[6] सतत सुखस्वस्थ[7] सत्यपांड[8] वसे, ।
धर्म म्हणे त्या प्रभुला, 'कळले हे केंवि सत्य पांडवसे?' ॥ ८
कृष्ण म्हणे, 'असतांही गूढ[9] कसा अग्नि भारता! कळतो? ।
आंकळिला[10] मृगमद[11] जरि बहुयत्नें वास काय आंकळतो[12]? ॥ ९
लोपे कवि[13] न कुवासें[14], पावे ख्यातीस मंद न सुवासें[15], ।
कळतोचि जाणत्याला सर्वतरुश्रेष्ठ चंदन सुवासें[16]. ॥ १०
आहेत वीर बहु जरि, परि भेदाया पणा[17] असाध्या या ।
निपुण तुम्हींच, मज इतर नाहीं जी! आपणाअसा ध्याया[18]. ॥ ११
व्यसन चुकविलें, पहिला लोकीं हा लाभ साजिरा, ज्याची ।
प्रथम असावी ती ही कीर्ति मिळालीच आजि राजाची. ॥ १२
वाटे, म्हणेल त्यांची मति त्यांला कीं, 'तुम्हीं नभा उखळा' ।
मूर्ख भलतेंचि करिती, सज्जनही आवडे न भाउ खळा. ॥ १३
वृद्धि असावी तुमची, शत्रूचे सर्व गर्व हरवावे. ।
व्यसनीं बुडवूं पाहति खळ ज्या, त्या सज्जनासि हर पावे[19]. ॥ १४
द्यावा निरोप आम्हां, झालों भेटोनि आजि सानंद. ।
धर्म तुम्हांला व्यसनीं रक्षक, मज साग्रजा जसा नंद. ॥ १५

---

१. 'या दिवसाच्या साम्याला. २. मेघ. (वन-उदक-देणारा.) ३. सरोवराला. ४. कुंभाराची मडकीं घडण्याची जागा. ५. रक्षणरूप व्रताची आवड. ६. रोमरंध्राचे ठायीं. येथें 'स्वरोमकूपीं' यांतील 'स्व' निरर्थक दिसतो. ७. सुखी आणि निःशंक. ८. सत्यपअंड. (ब्रह्मांड.) ९. गुप्त. हाच दृष्टांत मूळग्रंथांत आहे. (आदिपर्व, अध्याय १९१, श्लो० २३). १०. आवरिला. ११. कस्तूरी. १२. आंवरतो. हें अर्ध उत्तम सुभाषित आहे. पंताच्या काव्यांत अशीं अनेक प्रकारचीं सुभाषितें आढळतात. १३. ज्ञानी, पंडित. १४. कुत्सितवस्त्रानें. १५. उत्तम वस्त्रानें. १६. उत्तम परिमलानें. ही गीति सुभाषितांत गणण्यालायक आहे. १७. द्रुपदानें केलेल्या पणा. १८. ध्यान कराया, चिंतन कराया. १९. हें सुभाषितांत गणण्यालायक आहे.

प्रिय आमुचे बहिश्चर[1] पंच[2] प्राणचि तुम्हीं, न असुहित[3] ।
कोणीही होवूंदे, भवदवन[4] स्वहित, अन्य अस्वहित.' ॥ १६
ऐसें वदोनि ते प्रभु[5] करिती कोणासि नकळतां गमन; ।
मग भिक्षान्नें केलें रात्रौ त्या साधुनीं क्षुधाशमन. ॥ १७
राहोनि गुप्त धृष्टद्युम्नें तच्छोध लाविला आंगें. ।
त्यातें द्रुपदनृप पुसे, 'वत्सेची गति कशी? सुता! सांगें.' ॥ १८
धृष्टद्युम्न म्हणे, 'ज्या पुरुषें नेली स्वसा[6] महाभागें[7] ।
गेलों कुलालशालेप्रति शोध करावया तयामागें. ॥ १९
ते पांच बंधु, आहे माता त्यांची जशी सुरी[8], तीतें ।
त्यातें पाहुनि झालों हृष्ट विलोकूनिही सुरीतीतें[9]. ॥ २०
त्याचें विलोकिलें म्यां तैसें कोठेंहि दिव्य तेज नसे; ।
आश्चर्यरूप पांचहि न पहावे ते धरापते[10]! जनसे[11]. ॥ २१
भिक्षान्न त्यांसि वाढुनि, मग कृष्णा तेंचि जेविली नमुनी, ।
गमलें नसेल तैसें सुख त्यां ब्रह्मींहि जे विलीन[12] मुनी. ॥ २२
त्यांच्याचि पायथां ती निजली, ते[13] राशि रत्नहेमाचे[14] ।
गणिले कुशशयनोनचि[15] कृष्णेनें हे पलंग हे मांचे[16]. ॥ २३
मज त्यांच्या शस्त्रादिव्यवहारीं[17] क्षत्रियत्व आढळलें, ।
जरि भिक्षुवेष[18] शिवें[19] तरि, तेज तयां त्यजुनि काय गा! ढळलें? ॥ २४
न जळाले पांडव ते, होईनचि सत्यतर्क[20] बहुधा मी; ।
न विशेष[21] विप्रवेषीं त्यांचा दिसतो, विशेष बहु धर्मी[22].' ॥ २५
राजा म्हणे, 'असो हा वत्सा! तव सत्य तर्क रे! तें हो ।
जें दमयंतीजनका[23] सुख, सुख हें पात्र शर्करेतें[24] हो!' ॥ २६

---

१. शरीराबाहेर फिरणारे पांच प्राण. २. प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान हे शरीरांतील पांच वायु होत, त्याप्रमाणें शरीराबाहेरचे पांच पांडव हे पांच प्राण. ३. प्राणाचें अहित. (असु + अहित.) ४. तुमचें रक्षण. ५. कृष्ण आणि बलराम. ६. भगिनी. ७. महाभाग्यशाली पुरुषानें. ८. देवस्त्री. ९. सदाचारातें. १०. हे पृथ्वीपते, द्रुपदा. ११. प्राकृत जनाप्रमाणें. १२. गढून गेलेले. १३. पति. १४. रत्नांचे आणि सुवर्णाचे. १५. दर्भशयनाहून उणे, म्ह० कमी योग्यतेचे. १६. बाजा. १७. त्यांच्या सेना, अस्त्रें, शस्त्रें, गदा, रथ इत्यादिकांच्या संबंधानें झालेल्या गोष्टींत. १८. भिक्षेवर उपजीविका करणाऱ्याचा वेष. १९. कल्याणप्रद. २०. खरा आहे तर्क ज्याचा असा. २१. विशिष्टगुण, विशिष्ट धर्म. २२. तेजीं. २३. दमयंतीचा पिता भीमराजा याला. २४. साखर.

प्रात:काळीं धाडी मग [1]पार्षद त्याकडे [2]पुरोध्यास. ।
‘देवद्विजप्रसादें’ तोहि म्हणे, ‘नृपतिचा [3]पुरो [4]ध्यास.’ ॥ २७
[5]त्यांसि [6]उपाध्याय म्हणे, ‘[7]स्वयशोर्थ करा कृपा, सकळ वाहो ।
आधीं, महासुख पुढें, कुळ नाम तुम्हीं नृपास कळवा हो ! ॥ २८
झाला द्रुपद बहु सुखी, आजि तुम्हां [8]न्हाणणार, [9]कनकानें ।
पूजील, पूजिले ते जैसे दशरथकुमार जनकानें. ॥ २९
वाटे होता अर्जुन वर व्हावा, तोचि काम पुरला हो ! ।
बुधहो ! निजकुळ कळवा, हें [10]मिथिलेच्या यशासि पुर लाहो.’ ॥ ३०
पूजुनि धर्म म्हणे, ‘कां नृप करितो खेद ? जें गत न ये तें. ।
हा पण, कीं लक्षाचा भेदक जो, तोचि योग्य तनयेतें. ॥ ३१
झालें तेंचि, मनोरथ पुरला असतां किमर्थ हा शोध ? ।
समजा मनीं, कसें यश मेळविता अकुळ भलतसा [11]योध ?’ ॥ ३२
यापरि धर्म वदे, तों द्रुपदें [12]प्रेषूनि [13]आप्त जेवा या.’ ।
ऐसें विनवुनि नेले, गेले सुरथीं बसोनि जेवाया. ॥ ३३
ऐकुनि धर्मोक्ति [14]पुरोहितवदनें हृष्ट होय तो लेश, ।
[15]चिंताब्धिमग्नमतिभूद्धारा योजी [16]उपायकोलेश. ॥ ३४
ज्या ज्या वर्णा जें जें व्यवहारा योग्य वस्तु सर्वहि तें, ।
तद्दृष्टीस पडेसें मांडविलें पार्षतें [17]सुधीमहितें. ॥ ३५
[18]वर्णपरीक्षार्थ असें केलें कीं वस्तु जें तयां इष्ट ।
त्यावरुनि जाति त्यांची जाणावी ते अशिष्ट कीं शिष्ट. ॥ ३६
पाहुनि त्यांसि जन म्हणति, ‘अहा ! पहाहो ! अहो ! [19]अजिनरहितें ।
उडविति सुरत्व रूपें, करितिल ते काय कीं अजि नरहितें.’ ॥ ३७
द्रुपदातें [20]द्रुपं दाते स्वर्गींहुनि वाटले गृहा आले ।
[21]ओधीतें आधीं तें तद्दर्शन नुरवि, सर्वही [22]धाले. ॥ ३८

---

१. द्रुपद, पृषतराजाचा पुत्र. २. उपाध्यायास, पुरोहिताला. ३. परिपूर्ण होवो. ४. इच्छा. ५. पांडवांस. ६. ज्याच्या घरीं जाऊन विद्यार्थी यथाशास्त्र अध्ययन करतात तो उपाध्याय. ७. आपली कीर्ति व्हावी यास्तव. ८. स्नान घालणार. ९. सुवर्णानें. १०. जनकाची राजधानी. ११. वीर. १२. पाठवून. १३. विश्वासू मनुष्य. १४. उपाध्यायाच्या मुखें. १५. चिंतारूप समुद्रीं बुडालेली जी बुद्धिरूप पृथ्वी तीच्या उद्धाराला. १६. उपायरूप महावराह. कोल=वराह. १७. सुज्ञजनांस मान्य अशा पार्षतें (द्रुपदें). १८. ब्राह्मण, शूद्र, वैश्य, क्षत्रिय या चार वर्णांपकीं कोणत्या वर्णाचे आहेत ही परीक्षा करावी म्हणून. १९. अजिनरहितें रूपें सुरत्व उडविती—असा अन्वय. २०. वृक्षश्रेष्ठ. २१. मेनाव्यथेतें. २२. तृप्त झाले.

बसतां [1]वरासनीं कीं भोजन करितां न शंकले चुकले. ।
[2]श्रीमद्गुणवत्वें ते पांडुतनय [3]जिष्णुविष्णुसीं [4]तुकले. ॥ ३९
त्या विविधवस्तुमध्यें जें जें धनुरादि वस्तु [5]समरहित ।
तिकडेच ते पहाती, जैसे विषयांकडेचि [6]शमरहित. ॥ ४०
[7]असकृत् [8]भागवत जसें [9]मुमुक्षुहीं [10]धीरजनकृतस्तुतिहीं, ।
अवलोकिलें, धरुनियां बहु आदर संगरार्ह वस्तु तिहीं. ॥ ४१
[11]नृपें [12]तच्चेष्टित पाहुनि विप्र न ते, पांडुसुत असें समजे. ।
सुज्ञांसि झांकिलेही कळति [13]गुणख्यात [14]मृगमदासम जे[15] ॥ ४२
धर्मासि मग [16]म्हणे, 'हो पूर्ण करा सर्व [17]कामना, मातें ।
सांगा स्वनाम, सांगति जैसे गुरुराज रामनामातें. ॥ ४३
माझें [18]मानस आहे तुमच्या बहु [19]साभिलाष कुलनामीं, ।
पावेन श्रवण करुनि [20]पीतामृततुष्टपुष्टतुलना मी. ॥ ४४
[21]विधिनें करीन कन्यादान महोत्सव म्हणून कामातें ।
पुरवा हो !, [22]पुरें वाहो सुखपूरीं, [23]परें म्हणूं नका मातें.' ॥ ४५
धर्म म्हणे, 'नृपनाथा! [24]युष्मत्कृत तर्क जे न ते लटिके, ।
[25]तज्ज्ञातज्ञपरीक्षेमाजि पळहि [26]घृतपणें न तेल टिके. ॥ ४६
[27]भूदेव नव्हों, क्षत्रिय आम्हीं श्रीपांडुराजसुत, राया !।
हा [28]विप्रवेषसेत्ववलंब [29]व्यसनार्णवासि उतराया. ॥ ४७
[30]वोळंख गा [31]वोळ [32]खगावरि घनसा, राजसत्तमा ! राया. ! ।
हे तेचि, जपत होता ज्यां तो[33] [34]मदमद्यमत्त माराया.' ॥ ४८

---

१. श्रेष्ठ आसनावर. २. श्रीमंतांच्या गुणांनीं संपन्न असल्यामुळें. ३. इंद्र आणि विष्णु यांशीं. ४. तुलना पावले. ५. युद्धोपयोगी. ६. शांतिरहित विषयीलोक. ७. वारंवार. ८. पुराण, श्रीमद्भागवतग्रंथ. ९. मुक्ति इच्छिणाऱ्या जनांनीं, मोक्षार्थी जनांनीं. १०. सुज्ञ लोकांनीं केली आहे स्तुति ज्यांची त्यांनीं. (हें 'मुमुक्षुहीं' याचें विशेषण.) ११. द्रुपद. १२. त्यांचें आचरण, कृति. १३. प्रसिद्ध. १४. कस्तूरीसारिखे. १५. हें अर्ध सुभाषित समजावयाचें. १६. याचा कर्ता 'द्रुपद' (अध्याहृत). १७. इच्छा. १८. अंतःकरण. १९. इच्छान्वित, सेच्छ. २०. अमृतपानानें जो तुष्ट आणि पुष्ट झाला त्याची समता. २१. यथाशास्त्र. २२. नगर. २३. परका. २४. तुम्हीं केलेले. २५. तें जाणणारे व न जाणणारे यांच्या परीक्षेंत. २६. तूप. २७. विप्र. २८. ब्राह्मणवेषरूप सेतूचा आश्रय. २९. संकटरूप सागरास. ३०. ओळख. ३१. प्रसन्न हो, वळून पहा, प्रीति कर. ३२. पक्ष्यावर (चातकावर.) ३३. दुर्योधन. ३४. गर्वरूप मद्यानें माजलेला.

भूप म्हणे, 'मीच सुखी, न असा पावोनि अन्य कामातें, ।
झाली ताराया [1]शतपुत्रवरा [2]धन्य कन्यका मातें. ॥ ४९
व्यसनीं सहाय झाला रामाला [3]काननांत वानरही, ।
होइल सहाय मग तुज **भी**ष्माच्या कां न नातवा नरही? ॥ ५०
विहि[4]तेंचि [5]सत्कार्यार्थ स्वप्राणांचा विनाश [6]पथकरितां ।
दैवाधीन सकळ, परि मज तें भय दाविना शपथ करितां.' ॥ ५१
करुनि समाधान असें [7]पंचायतनापरीच तो [8]भावें ।
पूजी **पांडु**कुटुंबा, [9]सुज्ञें पूज्यांसि कां न लोभावें? ॥ ५२
'पाणिग्रहण करावें **कृष्णे**चें **अर्जु**नें [10]विधानानें' ।
हें **धर्मा**प्रति म्हणतां **द्रु**पदानें प्रीतिच्या [11]निधानानें, ॥ ५३
धर्म म्हणे, 'मी आधीं मग **भीम**प्रभृति बंधु हे तीतें ।
विधिनें धरितील करीं, धरिति जसे वीर एक [12]हेतीतें.' ॥ ५४
द्रुपद म्हणे, 'धर्मज्ञा! सविधि वरावी तुवांचि, अथवा हे ।
एकेंचि [13]युष्मदनुजें, म्हणसी [14]ऐसी जगीं न पथ वाहे.' ॥ ५५
धर्म म्हणे, 'मातेची आज्ञा आम्हां नृपा! [15]श्रुतिसमान; ।
[16]धर्मज्ञ साधु देती मान गुरूक्तिस, जसा [17]श्रुतिस मान ॥ ५६
बहुतां ऋषींस भजली [18]जटिलाख्या **गौ**तमी, तथैव [19]सती ।
[20]वार्क्षी [21]दशप्रचेतःस्त्री, यत्कीर्तीस सत्सभा [22]वसती.' ॥ ५७
धर्मोक्तें वक्ता परि केवळ **पां**चाळ कोंडला, गावें ।
[23]तत्कालागतशुकगुरुसद्यश, तेथेंचि तोंड लागावें. ॥ ५८

---

१. शंभर पुत्रांहून श्रेष्ठ. २. पुण्यवान्, भाग्यशाली. ३. वनांत. ४. योग्यचि. ५. साधूंच्या कार्यासाठीं. ६. स्वीकारितां. ७. शिव, विष्णु, सूर्य, गणपति, आणि देवी यांच्या समूहास 'पंचायतन' म्हणतात. या पांच देवांप्रमाणें. ८. भक्तीनें. ९. हा चतुर्थ पाद सुभाषितरूप आहे. १०. यथाविधि. ११. स्थान, विश्रांतिस्थान. १२. तरवारीतें. १३. तुमच्या धाकट्या बंधूनें. १४. पांचांनीं एकीला वरावें असा. १५. वेदासारखी. १६. धर्म जाणणारे. हें अर्ध सुभाषित आहे. १७. वेदास. १८. जटिला ही गौतम ऋषीची कन्या. ती सर्व धर्मसंरक्षकांमध्यें श्रेष्ठ असून सात ऋषींची भार्या होती. (आदिपर्व, अध्याय १९६ श्लोक १४.) १९. पतिव्रता. २०. वृक्षापासून उत्पन्न झालेली मारीषासंज्ञक कन्या ती. २१. प्राचीनबर्हिराजाचे समुद्रकन्या सवर्णा हिच्या ठायीं झालेले जे प्रचेतःसंज्ञक दहा पुत्र त्यांची स्त्री. (अध्याय १९६ श्लोक १५) २२. रहाण्याचें स्थान. २३. तत्कालींच आला जो शुकगुरु (व्यास) त्याचें उत्तम यश.

द्रुपदातें एकांतीं नेवुनियां देवगुह्य[1] सांगाया, ।
व्यास म्हणे, 'धर्माचें शुचि मत, होसी न मान्य कां गा ! या ? ॥५९
पूर्वी सत्रीं दीक्षित[2] यम असतां राहिलें प्रजाशमन[3], ।
त्यास्तव सेंद्रसुरांचें[4] इच्छी अमरप्रजाविनाश[5] मन. ॥ ६०
विधि[6] विनविला[7] तिहीं[8], तो सांगे सत्रीं[9] यमाकडे[10] जाया, ।
येतां विलोकिली [11]श्रीगंगास्रोतांत ऐश्वरी[12] माया. ॥ ६१
हेमांब्ज[13] येत होतें वाहत त्याचा करावया शोध, ।
एकाकी[14] शक्र[15] निघे अवलंबुनि देवसिंधुचें[16] रोध[17]. ॥ ६२
गंगेत पावकद्युति[18] योषा[19] दूरूनि देखिली रडती. ।
त्यांचे[20] होती कांचनपद्म[21], जळीं अश्रुबिंदु जे पडती. ॥ ६३
शक्र म्हणे, 'कोणाची तूं, दुःखा पात्र दुःसहा याजी' ।
ती 'सांगूं काय ?' म्हणे 'पुसतांचि तरि स्वयें पहा ये[22] जी[23].' ॥ ६४
स्त्रीसह जातां हरि[24] गिरिवरशिखरीं[25] अशनिला[26] करीं वाहे. ।
सिंहासनस्थ अक्षक्रीडारत[27] दिव्य दंपती[28] पाहे. ॥ ६५
दावी प्रभुत्व[29] शब्दें[30], तों त्या पुरुषें[31] विलोकिला मात्र, ।
झाला स्तंभितगात्र[32] छात्र[33] गुरूचा[34] भयाब्धिला[35] पात्र. ॥ ६६

---

१. देवाच्या मनांतील गुप्त हेतु, रहस्य. २. सत्रामध्यें जे यजमान असतात त्यांनीं दीक्षा घेतली पाहिजे असें आहे. दीक्षा घेतल्यावर यज्ञकर्माव्यतिरिक्त कर्म करावयाचें नाहीं असा नियम आहे. ३. प्रजा मारणें. ४. इंद्रासह देवांचें. ५. अमर (न मरणाऱ्या–मृत्युरहित) अशा प्रजांचा नाश. यम दीक्षित असल्यामुळें प्रजानाशाचें काम बंद पडलें होतें. ६. प्रजापति, ब्रह्मदेव. ७. पृथ्वीवर मनुष्यांची वृद्धि झाली आहे, यामुळें आम्हांस मोठें भय आहे; अमर आणि मनुष्य यांमध्यें कांहीं अंतर नाहीं, तर देवांना मनुष्यांपेक्षां कांहीं विशेष असावा—याप्रमाणें प्रार्थना केली. ८. इंद्रासहित सोम, वरुण, कुबेर, वसु, इत्यादि देवांनीं. ९. यज्ञांत. १०. यमधर्माकडे. ११. गंगाप्रवाहांत. १२. ईश्वराची अद्भुत कृति. १३. सुवर्णकमल. १४. एकटा. १५. इंद्र. १६, गंगेचें. १७. तीर. १८. अग्नीसारखी तेजस्वी. १९. स्त्री. २०. त्या अश्रुबिंदूंचे. २१. सुवर्णकमळें. २२. चला, माझ्या बरोबर स्वतः चला आणि पहा. २३. अजि. २४. इंद्र. २५. श्रेष्ठ पर्वताच्या शिखरावर, हिमालयशिखरावर. २६. वज्राला. २७. फांशांच्या खेळांत निमग्न. २८. जोडपें, स्त्री-पुरुष. २९. सत्ता, अधिकार. ३०. मला जाणत नाहींस काय ? हें भुवन माझ्या ताब्यांत आहे, मी सकल देवांचा स्वामी आहें, तूं अक्षक्रीडेमध्यें निमग्न होऊन प्रमत्त झालास काय ?—इत्यादि शब्दें. ३१. शंकरानें. ३२. स्तब्ध शरीर. ३३. शिष्य, (इंद्र.) ३४. बृहस्पतीचा. ३५. भयाच्या सागराला.

त्या स्त्रीस म्हणे तो प्रभु[1], 'आण पुढें फार दावितो बल हा.' ।
स्त्री स्पर्शतांचि पडला छिन्नाद्रिद्रुम[2] जसा तसा बल्हा[3]. ॥ ६७
आज्ञा करूनि करवी त्या[4] हातीं दूर अद्रिच्या शिखरा. ।
तेव्हां शक्र समजला कीं, हाचि प्रभु बळांबुराशि[5] खरा. ॥ ६८

शिखरपिधानापनयन[6] करितांचि, गुहेंत तो[7] पुरुष चवघे[8] ।
पाहे बहुतेजस्वी, मंजूषेमाजि[9] [10]फणि तसे अवघे. ॥ ६९
'चौघांत पांचवा हो' म्हणतां, हरि त्या [11]महेश्वरा कुपिता ।
नमुनि म्हणे, 'विश्वगुरो! होताति कुपुत्र[12], परि न्हे कुपिता[13]. ॥ ७०
देव म्हणे, 'रे! यावरि[14] मदमत्त[15] तुम्हीं कदापि व्हाना कीं? ।
जा, होवुनि नरें[16] [17]भूभर हरुनि पुन्हा वासयोग्य[18] व्हा नाकीं[19]. ॥ ७१
बहुभोगासक्त[20] तुम्हीं न्हतांचि मदर्चनीं[21] बरे जागे[22] ।
पांचांसि दिली स्वःश्री[23] हे[24] स्त्री, मुलि! तूंहि जन्म घे जा गे!' ॥७२
ती कृष्णा हे, पांडव झाले ते पांच इंद्रहि नव रे! ।
त्वत्कन्येचे पांचहि होणारचि ते नरोत्तमा! नवरे. ॥ ७३
तैसेचि [25]भूमिभरपरिहारार्थ सहाय यांसि लोकेशें[26] ।
सितें[27] असित कच[28] [29]दिल्हे, बळ[30] शुक्लें, कृष्णेंहि कृष्ण तो केशें[31].॥७४

---

१. शंकर. (अक्षक्रीडा समाप्त झाल्यावर शंकर म्हणे.) २. तुटलेल्या पर्वतावरील वृक्ष. ३. इंद्र. (बल नामक असुराचा हंता.) ४. इंद्राच्या हातानें. गुहेचें द्वार झांकणारें जें अद्रिशिखर तें इंद्राकरवीं शंकर दूर करवी. ५. बलसागर. ६. शिखर हेंच पिधान (झांकण) त्याचें अपनयन (दूरीकरण). ७. इंद्र. ८. हे चार पुरुष पूर्वीचे इंद्र होत. ९. पेटान्यांत. १०. सर्पासारखे. ११. शंकरा. १२. वाईट पुत्र. १३. वाईट बाप. १४. याच्या नंतर. १५. गर्वानें उन्मत्त. १६. मनुष्य. १७. पृथ्वीचा भार. १८. वसतीस योग्य. (पूर्वार्जित कर्मांच्या योगें.) १९. स्वर्गीं. २०. सुखोपभोगांत अत्यंत निमग्न. २१. माझ्या पूजेविषयीं. २२. जागृत, सावध. २३. स्वर्गश्री, स्वर्गलक्ष्मी. २४. ही (इंद्रास घेऊन शंकराकडे गेलेली स्त्री). २५. पृथ्वीचा भार उतरण्याकरितां. २६. भगवान् बळराम आणि कृष्ण. २७. सित म्ह० पांढरा आणि असित म्ह० काळा, याविषयीं आधार—'स चापि केशौ हरिरुद्बबर्ह शुक्लमेकमपरं चापि कृष्णम् । तौ चापि केशौ निविशेतां यदूनां कुले स्त्रियौ रोहिणीं देवकीं च ॥ तयोरेको बलभद्रो बभूव योऽसौ श्वेतस्तस्य देवस्य केशः । कृष्णो द्वितीयः केशवः संबभूव केशो योऽसौ वर्णतः कृष्ण उक्तः ॥' (महाभारत, आदिपर्व, अध्याय १९७ श्लोक ३२-३३) भावार्थ—भगवान् नारायणानें आपला सित म्ह० पांढरा आणि असित म्ह० काळा असे दोन केश उपटून यदुकुळांत टाकिले; त्यांत श्वेत केंसाचा अवतार रोहिणीचे ठायीं बळराम झाला आणि कृष्ण केंसाचा अवतार देवकीच्या ठायीं श्रीकृष्ण झाला. २८. केश. २९. भगवान् नारायण यानें दिले. पांच इंद्रांस बरोबर घेऊन उमापति नारायणाकडे गेला, त्यांनेंही या पांच इंद्रांस मनुष्यलोकीं जन्म घेण्यास आज्ञा दिली. (आदिपर्व, अध्याय १९७ श्लोक ३१) ३०. बळराम. ३१. विष्णु.

सांगोनि [1]देवगुह्य **व्यास** स्वकमंडलुस्थ तीर्थजळ ।
लावुनि नयनीं देता झाला **द्रुपदासि** दिव्यदृष्टि पळ. ॥ ७५
शक्रांश ऐक, पहिले चार, असे **इंद्र** पांच त्यारूपें ।
अवलोकिले प्रसादें मुनिच्या तत्काळ **[2]पार्षतें** भूपें. ॥ ७६
मुनिसि नमूनि [3]विमोहें **द्रुपदें** स्वीकारिली तदाज्ञा ते. ।
कन्या पांचांसि दिल्ही; झाले [4]बहुहृष्टधी तदा ज्ञाते. ॥ ७७
द्रुपद पृथेसि म्हणे, 'म्यां वरिले [5]कुरुकीर्तिहेतु जामाते, ।
परि पाळावी दिधली कन्या सेवेसि हे तुजा, माते!' ॥ ७८
कृष्णें पांडव गजरथहयदासीदासरत्नधनदानें ।
गौरविले, ऐसे ज्यां पाहुनि व्हावें सलज्ज [6]**धनदानें**. ॥ ७९
पांडववृत्तश्रवणीं [7]स्वउर क्षाळुनि [8]उदश्रुबिंदूंनीं ।
गेले स्वयंवरागत नृप, [9]**भीष्मासहि** मनांत निंदूनी. ॥ ८०
दुर्योधन **कर्ण शकुनि** बहु निंदुनि त्या [10]**पुरोचना** यवना ।
[11]भवना गेले लावुनि वैर [12]हरीसीं [13]करी जसे [14]स्ववना. ॥ ८१

अध्याय छत्तिसावा.

विदुर म्हणे, '[15]राजाजी! **[16]कौरव** उदयासि पावले जाणा.'।
धृतराष्ट्र म्हणे, '**कृष्णेसह** [17]मन्नमना [18]**सुयोधना** आणा.' ॥ १

---

१. देवांची गुप्त गोष्ट; पांच इंद्र हेच पांडव आणि स्वर्गश्री ही लक्ष्मी इत्यादि रहस्य. २. अर्जुन, हा इंद्राचा अंश. इंद्र स्वपदाधिष्ठित असल्यामुळें त्यानें जन्म न घेतां आपल्या वीर्यानें उत्पन्न झालेला असा अंशभूत पांचवा पुरुष दिला तो अर्जुन. (आदिपर्व, अध्याय १९७ श्लोक २८.) ३. मोहरहित. ४. अत्यंत संतुष्ट आहे मन ज्यांचें ते. ५. कुरुकुलाच्या कीर्तीस कारणीभूत असे. ६. कुबेरानें. ७. आपलें वक्षस्थळ. ८. नेत्रांतून जे अश्रुबिंदु निघाले त्यांनीं. ९. भीष्माचा आणि धृतराष्ट्राचा धिक्कार करून, असें मूळांत आहे. १०. जो पूर्वी लाक्षागृह करून पांडवांस मारण्याविषयीं इंद्रप्रस्थास पाठविला तो. ११. गृहाला. १२. सिंहासीं. १३. हत्ती. १४. आपल्या अरण्याला. १५. हे राजा धृतराष्ट्रा. १६. (विदुरमतें) कुरुकुलोद्भव पांडव, (पक्षीं; धृतराष्ट्रमतें) दुर्योधनादि पुत्र, यास आधार—'मन्यते स वृतं पुत्रं ज्येष्ठं द्रुपदकन्यया । दुर्योधनमविज्ञानात्प्रज्ञाचक्षुर्नरेश्वरः ॥', (आदिपर्व, अध्याय २०० श्लो० १९.) १७. मला नमन करण्याकरितां. १८. दुर्योधना.

क्षत्ता[1] म्हणे, 'नृपाळा ! नमना आतांचि आणितों, पण ती ।
पांडवभार्या कृष्णा आहे निजपितृपुरीं[2], असें म्हणती'. ॥ २
अंध म्हणे, 'गा ! विदुरा ! झालें हें वृत्त अमृत कानांतें. ।
जें द्रुपदासीं घडलें तें न यशस्कर गमेल कां नातें ? ॥ ३
यांच्या त्यांच्या[3] ठायीं समता ममता न तातता[4] दुसरी, ।
तत्सुख मत्सुख, हे तनु होतचि होती तदाधिनें[5] उसरी[6].' ॥ ४
विदुर म्हणे, 'गा ! बापा ! बुद्धि असावी असीच आर्यांची ।
या लोकीं परलोकीं संपत्तीहूनि हेचि कार्याची[7]; ॥ ५
नसतां[8] विदुर, सुयोधन धृतराष्ट्राला म्हणे, 'अहो ! तात ! ।
मज बहु दुःखद तुमचे आतांचे मंत्रवर्ण[9] होतात. ॥ ६
करिसि सपत्नगुणस्तुति[10], मानिसि रिपुवृद्धिला स्ववृद्धि नृपा ! ।
व्यर्थ अपत्यें[11] कां हीं ? कांहीं यांवरि कसी नसेचि कृपा ?' ॥ ७
प्रज्ञाचक्षु[12] म्हणे, 'मज पडतो संकोच फार विदुराचा, ।
सर्वहि हेतु सुखाचा स्वापत्याचा तसा न विदुराचा[13]. ॥ ८
पांडवगुणवर्णन तें विदुरमनोधारणार्थ, हें साचें, ।
वरि सरस, आंत नीरस मद्भाषण मित्र होय फेंसाचें[14]. ॥ ९
ईनकांत[15] काय होतो मंदाक्षाच्या त्यजून काच मनीं[16] ।
मज हित तूंचि, न धर्म, प्राणाच्या तो वरील आचमना[17]. ॥ १०
दुष्करहि करीन, वदा धरिला स्व-मनांत निजहितोपाय[18] ।
छेदावा गतिहेतुहि[19] जो विषरुग्दुष्ट[20] निजहि[21] तो पाय[22].' ॥ ११

---

१. सूत, विदुर, २. आपल्या बापाच्या नगरीं. ३. पांडवांच्या आणि धार्तराष्ट्रांच्या ठायीं. ४. पितृत्व. ५. त्या पांडवांच्या दुःखानें. ६. अळू इत्यादि पदार्थ कापून सुकवून ठेवितात ती. (म्हणजे शुष्क होत होती, असा भाव). ७. कामाची, उपयोगाची. ८. विदुर स्वगृहीं निघून गेल्यावर. ९. पूर्वगतविदुरधृतराष्ट्रसंवादांतील अक्षरें. १०. शत्रूंच्या गुणांचें स्तवन. ११. मुलें. (अपत्यें म्हणजे ज्यांच्या योगें पितर पतन पावत नाहींत तीं). १२. धृतराष्ट्र. प्रज्ञा (बुद्धि) हाच आहे चक्षु नेत्र ज्याचा, ज्याला चर्मचक्षु नाहीं तो. अंध). १३. ज्ञात्याचा, पंडिताचा. १४. फेंसाचें मित्र म्हणजे फेंसासारखें बाहेरून सरस पण आंत रसहीन. १५. सूर्यकांत. १६. हें सुभाषित आहे. १७. संहार करील, गिळून टाकील. १८. आपल्या हिताचा उपाय. १९. गमनास कारण. २०. विषरूप रोगानें दूषित झालेला. २१. आपलाही. २२. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे.

स्वमत सुयोधन सांगे, 'भेदावा[1] द्रुपद भूरिधनदानें[2], ।
येणें[3] कोण चळेना ? काय महातरु चळेल न नदानें ? ॥ १२
कीं जें अन्योन्य[4] असे पावेल प्रेम अंत, राया ! तें. ।
जेणें योजावें त्या पांचांत स्त्र्यादिअंतरायातें[5]. ॥ १३
कीं भीम मारवावा देवुनि क्ष्वेड[6] हेंचि भद्र[7] हित, ।
मरतीलचि, वांचोनिहि काय ? शवचि[8] ते समस्त तद्रहित[9].' ॥ १४
ऐशा सांगे तो खळ मूर्ख पित्याजवळि नैककूपाया[10], ।
सुविचारहंस भेटति कैसे कुविचारभेक[11] कूपा[12] या ? ॥ १५
कर्ण म्हणे, 'राया ! हें व्यर्थ, जसें बुद्धिहीन मृगपोर[13] ।
योजावें पढवुनि वधयुक्ति विदारावयासि मृगपोर[14]. ॥ १६
तों वणवा विझवावा, जों भेटि तया दिली नसे वातें; ।
यदुबळ न भेटतां अरि मारा, जें अन्य मत न सेवा तें. ॥ १७
ऐसें स्वमत तुम्हांला कथितों मी आप्त म्हणुनि मायेनें[15]. ।
मज आजि आजिनें[16] फळसिद्धि दिसे जसि, तसी न मायेनें[17].' ॥ १८
धृतराष्ट्र म्हणे, 'कर्णा ! कथितो शक्रासि जीव[18] जेंवि हित[19], ।
कीं यदुवरासि[20] उद्धव[21], सांगसि मज तूं तसेंचि जें विहित[22].' ॥ १९
मग भीष्मद्रोणविदुरसंमत घ्याया समीप आणविले. ।
त्यांला वृद्धें[23] सुयोधनकर्णांनीं निजविचार जाणविले. ॥ २०
गांगेय म्हणे, 'वत्सा ! गांधारीनंदना[24] ! स्वभावांसीं[25] ।
न बरा विरोध दुष्टांसींहि, करिल कोण सुस्वभावांसीं[26] ? ॥ २१

---

१. भेद पाडावा, फुटाफूट करावी. २. पुष्कळ द्रव्याच्या देणगीनें. ३. द्रव्यदानानें, ('द्रव्येण सर्वे वशा:') धनलोभानें. ४. परस्पर. जें अन्योन्य प्रेम असें तें राया अंत पावेल–असा अन्वय. ५. स्त्रियादिक विघ्नातें. ६. विष. ७. सुख. ८. प्रेत. ९. त्या भीमारहित. १०. अनेक कुत्सित उपायांला. ११. बेडूक. १२. दुष्ट विचाररूप भेक (बेडूक) ज्यांत आहेत अशा कूपाला (दुर्योधनाला) सुविचाररूप हंस कोठून भेटणार ? १३. हरिणाचें बालक. १४. सिंहाचें (मृगपाचें) वक्षस्थळ (उर). १५. ममतेनें. १६. युद्धानें. १७. कपटानें. १८. बृहस्पति. १९. कल्याण. २०. श्रीकृष्णाला. २१. हा कृष्णाचा चुलत भाऊ. याच्या बापाचें नांव देवभाग (वसुदेवाचा कनिष्ठभ्राता) आणि आईचें नांव कंसा. हा परमबुद्धिमान् नीतिमान् मसलत सांगण्यांत कुशल होता. यास पुसल्यावांचून कृष्ण कोणतीही मसलत करीत नसे. हा मोठा धीसचिव होता आणि याजवर कृष्णाचें प्रेम होतें. २२. योग्य. २३. धृतराष्ट्र. २४. गांधारीच्या पुत्रा दुर्योधना. २५. दुष्टांसींहि स्वभावांसीं विरोध न बरा, (मग) सुस्वभावांसीं (भावांसीं) कोण (विरोध) करिल–असा अन्वय. २६. ज्यांचा स्वभाव चांगला आहे त्यांशीं. हें अर्ध सुभाषितरूप आहे.

मज ते तुम्हीं सम, जसा धृतराष्ट्र, तसाचि पांडुराजा गा ! ।
कुरुवंश हा जयास्तव सुयशा [1]डिंडीरपांडुरा [2]जागा. ॥ २२
तुमचें तसेंचि [3]त्यांचें राज्य, तयां भाग द्या [4]सम [5]न्यूनें ।
अंशें [6]अनिष्ट धरितां [7]धन्व करीं अर्जुनें [8]समन्यूनें. ॥ २३
वैरें भस्म करावें न कुरुकुळा, जेंवि [9]कानना [10]दावें, ।
यश सुख पुण्य मिळे, मग बंधूंनीं कां न नीट [11]नांदावें ? ॥ २४
[12]सामजळें प्रक्षाळा, व्याकुळ करितें [13]महापयश मातें ।
[14]तसहि सन्मन धरितें पुनरपि वरितें महापय [15]शमातें. ॥ २५
[16]साधील [17]हरिमुखींचा कोणी घालुनि हात [18]कवळा हो ! ।
दुर्मिळ [19]पांडुसुतामिष, न तुम्हीं व्हा आत्मघातक, वळा हो.' ॥ २६
द्रोण म्हणे, 'धृतराष्ट्रा ! पुसतां, जें युक्त तेंचि सांगावें ।
सुजनीं, सुजनें त्यागुनि हरिगीत [20]ग्राम्यगीत कां गावें ? ॥ २७
तिकडे [21]सामपटु पुरुष शीघ्र तुम्हांकडुन आत्मसम जावा, ।
द्या अर्धराज्य त्यांला, आणा, चित्तीं धरोनि [22]समजावा. ॥ २८
धाडा उत्तम वस्त्रें रत्नालंकार हार अथवा जी ।
हे संपत्ति [23]समर्पा, [24]प्रेषीं [25]पत्ति [26]द्विपेंद्र रथ [27]वाजी.' ॥ २९
कर्ण [28]म्हणे, 'मेळवुनि [29]प्रभुपासूनी [30]प्रभूत धन मान ।
बहु [31]अंतरंग होवुनि [32]करिती [33]स्वार्थार्जनीं न [34]अनमान. ॥ ३०

---

१. फेणासारख्या स्वच्छ. (यशाचें विशेषण. डिंडीर=फेण.) २. पात्र ३. त्या पांडवांचें. ४. सारखा. ५. उणें, कमी. (हें 'अंशें' याचें विशेषण.) न्यूनें अंशें समन्यूनें अर्जुनें धन्व करीं धरितां अनिष्ट (होईल)—असा अन्वय; कमी राज्यांशानें क्रुद्ध झालेल्या अर्जुनानें हातांत धनुष्य धरिलें असतां अनिष्ट होईल—असा भावार्थ. महाभारतांत ही 'अर्धभूमिं राज्यस्यार्धम्' असाच उल्लेख आहे. (आदिपर्व, अध्याय २०३ श्लोक ४-८). ६. अहित (होईल.) ७. धनुष्य. ८. सक्रोधें. ९. वनाला. १०. वणव्यानें. ११. हें गीत्यर्ध सुभाषित होय. १२. सख्यरूप उदकानें. १३. मोठी अपकीर्ति. १४. संतापलेलें; (पक्षीं) कढलेलें. हें अर्ध सुभाषित आहे. १५. शांतीतें. १६. मिळवील. १७. सिंहमुखांतील. १८. ग्रासा. हें सुभाषित आहे. १९. पांडव हें आमिष (मांस). २०. गांवढळ, हलकट गाणें. (अश्लील किंवा बीभत्स लावण्या इत्यादि.) २१. सख्य करण्यांत कुशल. २२. समजूत घाला. २३. अर्पण करा, द्या. २४. पाठवा. २५. पायदळ. २६. गजश्रेष्ठ. २७. घोडे. २८. आदिपर्व, अध्याय २०४ श्लोक १३ पहा. २९. राजा धृतराष्ट्रापासून. ३०. पुष्कळ. ३१. सुपरिचित, प्रियतम, बद्धसख्य. ३२. याचा कर्ता 'भीष्म, द्रोण.' ३३. आपला इष्ट अर्थ संपादण्यांत. ३४. उपेक्षा, हयगय.

प्रभुचें न [1]कथिति आपण यद्यपि [2]नयधर्मपटु तथापि हित, ।
अद्भुत [3]हितशत्रुत्व न उमजे [4]सद्रीतिसत्कथापिहित. ॥ ३१
[5]शठमित्रमंत्रपान [6]प्राज्ञमतें परम [7]विषम रायाला, ।
हें घडतां नलगेचि प्राशावें इतर विष मरायाला. ॥ ३२
शिष्ट म्हणति, '[8]दिष्ट खरें सुखदु:खद [9]विष्टपीं' जसें इष्ट, ।
किंवा अनिष्ट करितें, मित्र तसें, अन्य [10]कल्पन [11]क्लिष्ट. ॥ ३३
लोकांत सावधपणें शब्दें [12]हित [13]अहित वोळखा, वागा, ।
दुर्योधना ! सख्या ! बहु बोलुनि म्या काय बोळ खावा गा ?' ॥ ३४
द्रोण म्हणे, 'आम्हीं [14]हितशत्रु, न तूं, [15]सुप्तसर्प तुडवाया ।
सांगसि जो दाटूनि [16]व्यसनविषमहार्णवांत बुडवाया. ॥ ३५
रे कर्ण ! [17]दीर्घदर्शी जो तोचि मनुष्य, अन्यथा नरसा ।
दिसला, तरि पशु, ज्या दे, मातेचें त्या न अन्य थान रसा. ॥ ३६
सेवि[18] तया वृद्धाचें मंत्रित हित, हित तसें न तरुणाचें, ।
विष म्हणसि कसें त्याला ? अमृताधिक उक्त जें सकरुणाचें. ॥ ३७
झाला असतां प्राप्त [19]क्षयनामा [20]काळवल्लभ [21]व्याधी ।
[22]क्षीणायुलाचि वाटे वैद्याची [23]स्वाहिताचि भव्या धी.' ॥ ३८
विदुर म्हणे, 'दादाजी ! करिताहे [24]ज्यांसि आ [25]पतित [26]ऊनीं ।
पाजिलियाहि धरावें तिळभरिहि न जेंवि [27]आप [28]तितऊनीं. ॥ ३९
तैसेचि हे गुरूक्ता [29]तापत्रयतप्त सुज्ञ [30]आं पसरी, ।
[31]जडचि नघे, ज्याची करि अमृत न [32]सुरसिंधुचेंहि आप [33]सरी. ॥ ४०

---

१. यद्यपि आपण (भीष्म, द्रोण) नयधर्मपटु, तथापि प्रभूचें हित न कथिति—असा अन्वय. २. नीति व धर्म यांत निष्णात. ३. बाहेरून मित्रत्व दाखवून आंतून वैर करणें. ४. उत्तम रीति व उत्तम कथा यांनीं आच्छादित. ५. ठक अशा मित्रांच्या उपदेशाचें सेवन. ६. सुज्ञांच्या मतानें. ७. दु:खद, भयंकर. ८. दैव. ९. जगांत. १०. कल्पना, तर्क. ११. अयुक्तिक, असंगत, व्यर्थ. १२. मित्र. १३. शत्रु. १४. कपटी मित्र. १५. निजलेला साप. १६. संकट हेंच विष त्याच्या मोठ्या समुद्रांत. १७. दूर पहाणारा. १८. सेवन करणाराला. वृद्धाचें मंत्रित सेवि तया हित, तसें तरुणाचें (मंत्रित सेवि तया) हित न—असा अन्वय. १९. क्षय आहे नांव ज्याचें तो. २०. काळाचा मित्र. २१. शारीरव्यथा, रोग. २२. ज्याचें आयुष्य क्षीण झालें आहे त्याला. २३. आपल्या अकल्याणाची. २४. ज्या उदकास्तव. २५. पडलेला. २६. उन्हांत. २७. उदक. २८. चाळणीनीं. २९. आधिभौतिक म्ह० पंच महाभूतांपासून होणारा ताप धरणीकंप, अग्निपीडा, समुद्रानें मर्यादा सोडणें, पाण्यांत बुडणें; आध्यात्मिक ताप म्ह० शरीरास होणारा ताप—रोग, खरूज; आधिदैविक ताप म्ह० देवापासून होणारा ताप—विद्युत्पतन, अनावृष्टि, अतिवृष्टि; या तीन तापांनीं तप्त झालेला. ३०. गुरूक्त स्वीकारी. ३१. मूर्ख. ३२. गंगेचें, ज्याची (ज्या गुरूक्ताची) सरी अमृत न करि, सुरसिंधुचेंही आप (ज्याची सरी न करि)—असा अन्वय. ३३. बरोबरी.

भीष्मोक्तासि न देसी मन, देवुनि काय त्या[1]विना कर्णे[2]? ।
[3]गुरुसूक्तासहि तुमचा हि[4]तकरवर सू[5]क्त [6]मानिना **कर्णे.** ॥　　४१
काय न हि[7]तवाक् गुरु हे? हितवाक् गुरुहूनि काय गा! बाळ? ।
टाकूनि [8]सार सुज्ञा! गोळा करितोसि काय [9]गोबाळ? ॥　　४२
दुर्योधनकर्णशकुनिमंत्रें[10] महाघातकर अगा! राया! ।
[11]बालोक्ता वश होवुनि लाविसि शोकाग्नि कां [12]अगारा या? ॥　　४३
[13]पूर्वजसंपादित जें करितो ज्ञाता भला जतन यश तें, ।
तुझिया तों [14]लोभहतज्ञानें त्यजिलीच लाज [15]तनयशतें. ॥　　४४
पांच न ते, पांचशतें, **पांडुतनय** [16]वीरधीरहीरमणी, ।
हे [17]कांच साच, नाचति, परि [18]राज्यश्री न [19]मंदधीरमणी. ॥　　४५
धर्मी [20]युधिष्ठिर [21]निरत, **युधिष्ठिरीं** [22]सबळ [23]वृष्णिवर [24]शौरी, ।
त्या **शौरिच्याचि** ठायीं विजयश्री, जेंवि **शंकरीं** [25]**गौरी.** ॥　　४६
[26]**यदुसिंह** सहाय जयां, त्यांला वधितील [27]बाळ हे राया! ।
न समर्थ वक्रनेत्रें **पांडुकुमारांसि काळ** [28]हेराया. ॥　　४७
तैं या [29]कुळाहिताच्या त्वां केलें दृढ न मानस त्यागा, ।
अद्यापि तरी राया! ती माझी उक्ति मान सत्या गा!' ॥　　४८
धृतराष्ट्र म्हणे, '**विदुरा! सर्वज्ञा! भरतकुळहिता! भ्रात्या!** ।
[30]युष्मद्वचना भजतों मी, जेंवि भजे [31]शिखी [32]हिताभ्रा त्या ॥　　४९

---

१. मनावांचून. २. कान. ३. द्रोणाच्या हितवचनास सुद्धां. ४. हित करणारांमध्यें प्रमुख. ५. हितवचन. ६. मानिना. ७. हितवचन बोलणारे. ८. उत्तमांश. ९. निरुपयोगी, निरर्थक अंश, निःसार. १०. विचार, मसलत. ११. मूर्खांच्या भाषणाला. १२. घराला. १३. पूर्वजांनीं (वडिलांनीं) मिळविलेलें (यश.) १४. लोभानें नष्ट झालें ज्ञान ज्याचें त्या (तनयशतें.) १५. शंभर पुत्रांनीं. धृतराष्ट्राला गांधारीपासून शतपुत्र व एक कन्या (दुःशला) अशी संतति झाली. या शिवाय दासीपासून झालेला एक युयुत्सु नामक पुत्र होता. याची गणना पुत्रशतांत नाहीं. १६. शूर व सुशील अशा पुरुषांमध्यें हिरे. १७. हे तुझे पुत्र दुर्योधनादि खरोखर कांचेप्रमाणें होत. १८. राज्यलक्ष्मी. १९. मूर्खांची स्त्री. २०. पांडवाग्रज. (युधि स्थिर; युद्धांत जो अचल तो.) २१. निमग्न. २२. बळरामासहित. २३. यादवांत श्रेष्ठ. २४. श्रीकृष्ण. (शूरकुलोत्पन्नत्वामुळें हें नांव कृष्णाला पडलें.) २५. पार्वती. २६. यादववर. (श्रीकृष्ण.) २७. मूर्ख. (धार्तराष्ट्र.) २८. पहाण्यास. २९. कुळाचा अहित जो दुर्योधनरूप शत्रु त्याच्या त्यागाविषयीं. ३०. तुमच्या भाषणाला. ३१. मोर. ३२. हितकारी अभ्राला (मेघाला.)

ज्यास्तव मज लावितसे आचार्य **द्रोण** बोलें[1] तातहि[2] तें ।
कर्म कशास? अगा! जे हितें[3] वचनें तेचि बोलतात हितें[4]. ॥ ९०
माझेचि पुत्र **पांडव**, त्यांचें, यांचेंहि होय सम राज्य, ।
वैराग्नि पेटवाया दाटुनि सिंचील कोण समराज्य[5]? ॥ ९१
जा, **पांडव** घेवुनि ये, जें लागेल प्रभूत[6] वसु[7], ने तें. ।
पाहोत तूर्ण[8] **विदुरा! भीष्म द्रोण** प्रभू तव सुनेतें. ॥ ९२
मान्य **बृहस्पति**[9]ला तूं, वत्त्यांचा साधुराय, **का**व्याही[10], ।
आम्हांवरी प्रसन्नस्वांत[11] करीं बंधुनायका[12]! व्याही[13].' ॥ ९३
राजाज्ञेनें[14] भेटे **विदुर द्रुपदा** नृपा संदिष्टातें[15], ।
मग **पांडवबळ**भद्रप्रभुसहिता सांवळ्या संदिष्टातें[16]. ॥ ९४
वस्त्रालंकारांहीं **द्रुपद**प्रमुखांसि कवि[17] अलंकारी ।
विदुरप्रियार्थ सर्वांसह घे तो **भो**जकुळकलंकारी[18] ॥ ९५
विदुर म्हणे **द्रुपदा**तें, 'तुज म्हणतो यां[19] मुखें असें व्याही[20] ।
नातें तुझें मधुर हें, न रसा[21] मधुरत्व देवसेव्याही[22]. ॥ ९६
नंदन[23]नाम सुत सुकृत केलें त्वां हें करूनि नव नातें ।
श्रवणें जसी सुखदता[24], या आजि सुरांचियांहि न वनातें[25]. ॥ ९७
सीतेस्तव अर्कातें[26] **कृ**ष्णेस्तव[27] कीं स्ववंश **सो**मातें[28] ।
बहु मान्य आजि, राया! यावरि सुतविरह हा नसो मातें. ॥ ९८
या मागें न तसें मज आजि जसें दुःख एक गा! राया! ।
कृष्णाविलोकनसुखा पात्र न, गारा[29] नसोनि गारा या. ॥ ९९

---

१. शब्द, दोष. २. भीष्महि. ३. मित्र. ४. हितकारक. (हें 'वचनें' या शब्दाचें विशेषण.) ५. युद्धरूप तूप. ६. पुष्कळ. ७. धन. ८. शीघ्र, लौकर. ९. देवांचा गुरु. १०. शुक्राचार्याला ही. (हा दानवांचा गुरु.) ११. प्रसन्न अंतःकरण ज्याचें असा. १२. बंधुवर्या! १३. द्रुपदराजा. १४. धृतराष्ट्राच्या आज्ञेनें. १५. भाग्यशाली (द्रुपदा. दिष्ट=दैव, भाग्य.) १६. संतांस इष्ट असा जो कृष्ण त्यातें. १७. पंडित. (विदुर.) १८. भोजकुलास कलंक (डाग), लावणारा जो कंस त्याचा अरि श्रीकृष्ण. (कंस हा भोजकुलोत्पन्न होय.) १९. या माझ्या (विदुराच्या) मुखानें. २०. धृतराष्ट्र. २१. अमृतास. २२. देवांनीं सेवन करण्यास योग्य असें जें अमृत (रस) त्याला देखील. २३. नंदन म्ह० आनंदजनक. 'नंदन' हा शब्द पुत्रार्थी आणि इंद्राच्या उद्यानार्थी योजतात. त्वां (द्रुपदें) हें नव नातें (व्याहीपणाचें नातें) करूनि (जोडून) पुत्राला दिलेलें नंदन हें नाम सुकृत (कृतार्थ, सफल) केलें. २४. सुख देण्याचा गुण. २५. देवांच्या नंदन नामक बागेतें. २६. सूर्यातें. २७. द्रौपदीसाठीं. २८. चंद्रातें. २९. त्यांचा.

ज्यांहीं साकेतीं[1]चें श्रुत केलें कुतुक, नरवरा ! ते तें ।
या गजपुरीं[2] स्मरोत प्रेक्षुनि सस्त्रीक[3] नर वरातेतें'. ॥ ६०
द्रुपद म्हणे, 'विदुरा ! म्यां काय वदावें ? तुला सकळ कळतें. ।
प्रेक्षक[4]मन बहु चरणें[5] चुरितां वंद्या[6] फुलास कळकळतें[7]. ॥ ६१
वर्तेन तसेंचि, जसें विहित[8] तुम्हीं परम आप्त सांगाल, ।
अमृत भरवितां सकृपें[9] फुगवील स्वहितकाम[10] कां गाल[11] ?' ॥ ६२
धर्म म्हणे, 'ताता[12] ! तूं, द्रुपदनृपति, रामकृष्ण परमहित ।
सांगाल तसेंच करूं, आम्हां न तुम्हांपरीस पर[13] महित[14].' ॥ ६३
कृष्ण म्हणे, 'धर्मा ! जा, कीं आला न्यावया स्वयें चुलता, ।
धृतराष्ट्र वांचला त्वत्कुशळें, नाहीं तरी उरीं उलता[15] ॥ ६४
कोणेंहि पाविजेल स्वप्नींहि विनाश न विदुराधीनें[16] ।
व्याकुळ होवूं देइल न तुम्हां हा साधु कवि दुराधीनें[17].' ॥ ६५
प्रणतां[18] देतें ज्याच्या पदपद्माचें[19] सदा रज गतीतें[20], ।
त्या प्रभुमतें[21] परततां, बहु सुखविति ते सदार[22] जगतीतें. ॥ ६६
कृष्णाग्रजावरज[23] बळकृष्णाश्रित[24] करुनि कीर्तिला जतन ।
कृष्णात्मजकुळनंदन[25] कृष्णापति[26] वीर पावले वतन[27]. ॥ ६७

---

१. अयोध्येचें. साकेत म्ह० अयोध्या. 'साकेतः स्यादयोध्यायां कोशला नंदिनी तथा' इति यादवः. २. हस्तिनापुरीं. अत्रिपुत्र सोम यानें या ठिकाणीं एका हत्तीला एका पक्ष्यानें अचानक उचलून नेलें असें पाहिलें, तेव्हां या चमत्काराचें स्मारक म्हणून या ठिकाणीं एक शहर वसविलें आणि त्यास हस्तनापूर असें नांव दिलें. हस्ती म्ह० गज, नाग; यास्तव या नगराला 'गजपुर' 'नागपुर' इत्यादिही नांवें आढळतात. हें शहर गंगेच्या तीरीं प्रस्तुतच्या मिरत शहराच्या पूर्वेस असावें, असा विद्वानांचा अभिप्राय आहे. ३. स्त्रियांसह. ४. पहाणाराचें मन. ५. पायानें. ६. वंदन करण्यास योग्य. ७. हें सुभाषित आहे. ८. योग्य. ९. सदयानें. १०. निजकल्याणेच्छु. ११. गाल फुगविणें हें कोपाचें दर्शक आहे. हें अर्थ सुभाषितरूप समजावयाचें. १२. बापा विदुरा. १३. अन्य, इतर. १४. मान्य. १५. फुटला असता, फुटून जाता. १६. विदुराच्या स्वाधीनानें. (मनुष्यानें.) १७. दुष्ट मनोव्यथेनें. १८. नम्र झालेल्या जनास, शरणागतास. १९. चरणकमलाचें. २०. उत्तम पदातें. २१. कृष्णाच्या विचारानें. २२. स्त्रीसहवर्तमान. २३. अर्जुन धर्मराज भीमसेन नकुळ सहदेव. (कृष्ण=अर्जुन, अग्रज=ज्येष्ठ बंधु, अवरज=कनिष्ठ बंधु.) २४. बलराम व कृष्ण यांचे आश्रित. २५. कृष्ण (व्यास) त्याचा आत्मज (पांडु) त्यांच्या वंशातील नंदन (पुत्र) म्हणजे पांडव. कृष्णद्वैपायन व्यासापासून विचित्रवीर्याची भार्या अंबालिका हिच्या ठायीं पांडूचें जन्म झालें होतें. २६. द्रौपदीचे पति. २७. पूर्वार्जित हक्काची जागा. 'वतन' हा शब्द आरबी भाषेंतील आहे आणि पंतांच्या काव्यांत याचा प्रयोग अनेक स्थलीं आढळतो.

धृतराष्ट्रनृपप्रेहित[1]द्रोणकृपविकर्ण[2]चित्र[3]सेनांहीं[4], [5] ।
नगरांत आणिले ते पांडव वेष्टूनि चित्र सेनांहीं. ॥ ६८
पौर म्हणति[6], 'जसि धावी[7] येवुनि गहना[8] प्रभा वसंतानें ।
तसि पांडुच्या दिली या नगरा अतुळप्रभाव[9] संतानें[10].' ॥ ६९
म्हणति स्त्रिया[11], 'पुरश्री[12] जावुनि समजावुनि, स्वयें भार्या ।
होवुनि, घेवुनि आली, वाटे द्रुपदात्मजा नव्हे आर्या. ॥ ७०
पांडव नव्हेत, हे घन, यांची हे सहचरी[13] सुतनु[14] शंपा[15], ।
या स्वविरहदवहतपुरविपिनीं[16] केली उदंड[17] अनुकंपा[18]. ॥ ७१
सितकाक[19] मानसश्रीकर[20] नोहे करुनियां अध[21] मराळा[22], ।
शालि[23] कनकपात्रोचित[24] न धरुनिहि सुवृत्तता[25], अधम[26] राळा[27]. ॥ ७२
प्रभु रामकृष्ण हे तों चिंतामणिचे[28] श्रितां[29] जना वाडे, ।
आपत्सरिदुत्तारक[30] धर्माचे आप्तराज[31] नावाडे[32].' ॥ ७३
ऐसें श्रवण करीत, प्रियजनहृन्नीरजांसि[33] फुलवीत, ।
उलवीत[34] असदुरातें[35], कुरुराज्यश्रीमनासि[36] भुलवीत, ॥ ७४
जावुनि पांडव भीष्मप्रमुखगुरुजनाचिया पदीं नमनें ।
करुनि, निजप्रासादामाजि[37] सुखें राहिले अदीनमनें[38]. ॥ ७५

---

१. पाठविलेले. २. धृतराष्ट्राच्या शतपुत्रांतील एक. हा मोठा नीतिमान् आणि सत्पक्षानुयायी म्हणून दुर्योधनादिकांस अप्रिय आणि पांडवांस प्रिय होता. हा पापभीरु आणि सत्यवादी होता. ३. धृतराष्ट्रपुत्रांपैकीं एक. (आदिपर्व–अध्याय २०७, श्लोक १२–१३.) ४. चित्रविचित्रसेनांहीं, ५. 'हीं' हा तृतीयाविभक्तीचा बहुवचनीं प्रत्यय कवितेंत फार आढळतो. ६. हें रूप जरी वर्तमानकाळाचें आहे, तरी त्याचा प्रयोग कवितेंत पुष्कळदां भूतकाळीं करतात. ७. अरण्याला. ८. शोभा. ९. अतुळ (अनुपम) आहे प्रभाव (पराक्रम) ज्याचा तो. १०. अपत्यानें. (पुत्रानें.) ११. पुरवासिनी स्त्रिया. १२. हस्तिनापुरलक्ष्मी. १३. सखी. १४. चारुगात्री, लावण्यवती. १५. विद्युल्लता. १६. आपल्या वियोगरूप वणव्यानें दग्ध झालेलें नगररूप अरण्य त्याच्या ठायीं. १७. पुष्कळ. १८. दया, कृपा. १९. पांढरा कावळा. २०. मानससरोवराला शोभा देणारा. (हिमालयाच्या गंधमादन नामक शिखराच्या उत्तरेस प्रख्यात मानस सरोवर आहे.) २१. खालीं. (तिरस्कार करून असा भाव.) २२. हंसाला. २३. शालीनामक धान्यविशेष. २४. सुवर्णपात्रीं असण्यास योग्य. २५. उत्तम वाटोळेपणा, वर्तुलाकारता. २६. नीच, हलकट. हें अर्ध सुभाषित समजावें. २७. धान्यविशेष. २८. चिंतित मनःकामना परिपूर्ण करणारा मणि. २९. आश्रित लोकांना. ३०. विपत्तिरूपनदीचे पारकर्ते. ३१. आप्तजनामध्यें थोर. ३२. नौका चालविणारे. ३३. प्रियजनाच्या हृदयरूप कमलास. ३४. फोडीत. ३५. दुष्टाच्या वक्षस्थलातें. ३६. कौरवांच्या राज्यरूप लक्ष्मीच्या चित्ताला. ३७. आपल्या वाड्यांत. ३८. उदार मनानें.

कांहीं काळ [1]कुरुपुरीं होते, सामें तयांसि मग राजा ।
अंध म्हणे, 'राज्यार्ध स्वीकारा, या त्यजूनि नगरा, जा. ॥ ७६
राज्य करा, नगर रचा, वसवा [2]वासाई [3]खांडवप्रस्थ. ।
[4]चांदाची वृद्धि असो, नांदा [5]सानंद [6]सानुग स्वस्थ. ॥ ७७
भ्रात्यांत पुन्हा [7]विग्रह न प्रगटावा, न [8]पूर्व तापावे, ।
[9]कुलजविरोधें संतत [10]तापगुण मनीं [11]अपूर्वता पावे.' ॥ ७८
वंदुनि पित्यासि [12]साच्युत पांडवहि [13]चतुर्मुखांडवप्रस्था ।
स्वयशासि घालवाया बाहिर, गेले [14]स्वखांडवप्रस्था. ॥ ७९
तेथें [15]त्रिभुवनशिल्पी प्रभु आपण कथुनि युक्तिला, [16]पुर तें, ।
जें रचवी धर्माचें, निरुपम झालें नसेल कां पुरतें ? ॥ ८०
प्रभु पुर असें रची कीं [17]हरिसा [18]सानंद [19]धर्मसुत राहो, ।
सर्वजनासहि [20]दुस्तर [21]सुरभोगेच्छापगाहि [22]सुतरा हो. ॥ ८१
जें प्रभुदर्शन दुर्लभ [23]कामित [24]नाकींहि तेंहि तें पुर [25]वी, ।
मग कोणतीं न [26]संश्रितलोकांचीं [27]कामितेंहि तें पुरवी ? ॥ ८२
तें न पुर, प्रभुनें रसपूर्ण स्वजनासि वाढिलें पात्र. ।
चोळिति [28]निजगुणें कर बहु मलिनप्रकृति मक्षिका मात्र. ॥ ८३
स्थापुनि [29]सन्मणिकनकप्रासादीं पांडवांसि राम हरी ।
गेले [30]द्वारवतीतें गात्यांचा श्रम [31]यदीय नाम [32]हरी. ॥ ८४

---

१. हस्तिनापुरीं. २. राहण्यास योग्य. ३. इंद्रप्रस्थ (दिल्ली) नामक नगराच्या सभोंवार जें अरण्य होतें त्याला खांडवप्रस्थ असें नांव होतें. या अरण्यांत धृतराष्ट्राच्या आज्ञेवरून पांडवांनीं शहर वसविलें; तें अत्यंत सुशोभित होतें म्हणून त्यास 'इंद्रप्रस्थ' 'शक्रप्रस्थ' असें म्हणूं लागले. ४. चंद्राची वृद्धि तुम्हांला असो. ५. आनंदानें. ६. सेवकांसह. ७. विरोध. ८. पूर्वज, वाडवडील. ९. स्वकुलोत्पन्नांशीं कलह केल्यानें. १०. ताप [हा] गुण मनीं अपूर्वता पावे—असा अन्वय. ११. जो पूर्व नव्हे तो अपूर्व. यावरून अपूर्व म्हणजे पश्चात्, पाठिमागचा; तेव्हां 'ताप' या शब्दाला पश्चात् ह्या शब्दाचा योग होई; सारांश पश्चात्ताप उत्पन्न होतो. १२. श्रीकृष्णासह. १३. ब्रह्मांडरूप तटावर रहाणाऱ्या अशा. (वप्र=तट.) १४. स्वकीयखांडवप्रस्थास. १५. त्रिभुवन रचणारा कारागीर. १६. इंद्रप्रस्थ. १७. इंद्रसा. १८. आनंदानें. १९. यमपुत्र. २०. तरून जाण्यास कठीण. २१. देवभोगांची इच्छारूप नदी ही. २२. तरण्यास सुलभ. २३. इच्छित. २४. स्वर्गीतही. २५ प्रसवे. २६ आश्रित जनांचीं. २७. मनोगतें, ईप्सित, मनोरथ. २८. आपल्या दुर्गुणानें. २९ उत्तम रत्नें आणि सुवर्ण यांनीं रचलेल्या राजवाड्यांत. ३०. द्वारकेस. याच नगरीला 'द्वारावती,' 'कुशस्थली,' असें ही नांव आढळतें. ही आनर्त देशाची राजधानी असून येथें सकल यादव राहत असत. ही नगरी प्रथमतः भूमीवर होती, परंतु असुरांच्या त्रासास्तव कृष्णानें विश्वकर्म्याकडून हिची स्थापना समुद्रांत करविली. ३१. ज्याचें. ३२. हरण करी.

अध्याय सदतिसावा.

[1]इंद्रप्रस्थीं राया **धर्मा**ला म्हणति लोक, 'हा **राम**' ।
साधु, विवेकी, [2]कामद; अधिक न [3]जड [4]कल्पभूरुहाराम. ॥ १
न पराचें, आवडलें धर्माचें त्या प्रजेसि नव राज्य ।
[5]रसनेसि [6]वराज्य जसें [7]गव्यचि, [8]माहिष गमेल न वराज्यें[9]. ॥ २
तेथें **नारद** आला, पूजूनि तयासि **धर्म** [10]तन्मना ।
कृष्णेसि आणवी, ती वंदी, मुनि होय [11]सुप्रसन्नमना. ॥ ३
तीस म्हणे, 'सति ! [12]पतिमतिरतिदा हो, राज्ञि ! पुत्र हा राजा ।
[13]सानुज नांदो तुजसीं चिर, विरह नसो, करा विहारा, जा.' ॥ ४
कृष्णा जाय, मग म्हणे श्री**नारद पां**डवांसि, '**पौ**[14]रवें [15]हो ! ।
[16]नयशीलधर्मरक्षाप्राप्त तुम्हां सत्सभेंत गौरव हो[17]. ॥ ५
एक स्त्री, पांच तुम्हीं, भेद घडेना असी करा नीती, ।
[18]प्रीतिक्षतिकरविषयांपासुन बहु [19]साधुमानसीं भीती[20]. ॥ ६
धर्मा ! [21]एकस्त्रीच्छु भ्राते [22]भेदासि पावले मागें, ।
[23]एकात्मेही मेले, ऐकावें तें तुवां [24]महाभागें. ॥ ७
[25]**क**नककशिपुकुळसंभव होते **सुंदो**प[26]सुंद, ते देहें ।
कीं नामें भिन्न, मनें एकचि, [27]विख्यात अद्भुतस्नेहें ॥ ८
ब्रह्मांडाचा [28]स्वतपस्तेजें अतितप्त करुनि ते मध्य, ।
[29]परमेष्ठिवरें झाले [30]अतुळबळें [31]स्वेतराखिलावध्य. ॥ ९

---

१. हें भारती युद्धांतील प्रसिद्ध शहर हल्लींच्या दिल्लीशहराच्या ठिकाणीं होतें. हें कुरुदेशाच्या राजधानीचें शहर असून येथेंच मयासुरसभा होती. याच ठिकाणीं पांडवांनीं राजसूययज्ञ केला. २. इच्छा पूर्ण करणारा. ३. अचल. ४. कल्पवृक्षांचे बाग. ५. जिव्हेस. ६. उत्तम तूप. ७. गाईचें. ८. म्हशीचें. ९. हें सुभाषित होय. १०.त्या नारदास नमस्कार करण्यासाठीं. ११.सुप्रसन्न आहे मन ज्याचें तो, प्रीतमनस्क. १२.पतीच्या मनाला आनंद देणारी. १३. कनिष्ठ भावांसह. १४.पुरुकुलोत्पन्न पांडव. १५. अहो. १६. नीति (नय) आणि सदाचार (शील) यांनीं केलेलें जें धर्मरक्षण त्याजपासून मिळालेलें (गौरव). १७. होवो. १८. प्रीतिची हानि करणाऱ्या विषयांपासून. १९.सज्जनांच्या मनांत. २०. हें सुभाषित होय. २१. एका स्त्रीची इच्छा करणारे. २२. फुटाफूट, विघाड, तूट. २३. एक-चित्ताचे. २४. दैवशाली, भाग्यवंतानें. २५. हिरण्यकशिपूच्या वंशांत ज्यांचा जन्म (संभव) ते. २६. सुंद आणि उपसुंद हे निकुंभ नामक दैत्याचे पुत्र. २७. प्रसिद्ध. २८.आपल्या तपाच्या प्रभावानें. २९. ब्रह्मदेवाच्या वरानें; 'तुम्हां उभयतांखेरीज या तीन लोकांत जें कांहीं स्थावरजंगमात्मक आहे त्याच्यापासून तुमचा वध होणार नाहीं' असा वर ब्रह्मदेवानें यांस दिला. (आदिपर्व, अध्याय २०९, श्लोक २३-२४). ३०.अनुपम सामर्थ्यानें. ३१.आपणाहून इतर सर्वांच्या द्वारें वध पावण्यास अशक्य.

[1]त्रस्ततरसुरप्रार्थितविधिवचनें चतुर [2]विश्वकर्मा तें ।
व्यसन हराया, घाया निजकौशल्यें सुरांसि [3]शर्मातें, ॥ १०
[4]लोकत्रयस्थ तिळ तिळ उत्तम लावण्य मेळवुनि यत्नें ।
स्त्रीरत्न रची, जाणों अवयव ते न, खचिलींच तीं रत्नें. ॥ ११
नामें [5]तिलोत्तमा ती, लावण्य तिचें नृपा ! अपारचि तें, ।
जेणें [6]वेधावेंचि क्षण तरि, जें मन [7]महातपा रचितें. ॥ १२
तीस म्हणे [8]द्रुहिण, '[9]अये ! देवि ! त्रैलोक्यसुंदरि ! [10]पुनीते ! ।
[11]वारीं ताप, जगा जे [12]दिधले '[13]सुंदोपसुंदरिपुनीं ते'. ॥ १३
ती, [14]भुलले [15]सुरें हरिहर पाहुनि [16]लोकैकसुंदरा, ज्याला ।
[17]ब्रह्मनियोगें दावी तें मोहक वदन सुंद [18]राजाला. ॥ १४
[19]विंध्यवनीं [20]ललनाजनपरिवृत ते दैत्यराज [21]पीतसुर, ।
[22]स्वर्गाधिपत्य साधुनि होते स्वबळेंकरूनि [23]भीतसुर. ॥ १५
[24]पुष्पावचयव्याजें जैसी [25]चपळा घनीं, वनीं चपळ ।
फिरतां तिला पहाती, स्थिर पाहुनि बैसती न नीच पळ. ॥ १६
अवलोकितांचि चित्तें तद्रूपीं जेंवि सुंद रमला हो[26]! ।
उपसंदही म्हणे, 'हें प्राप्त स्त्रीरत्न सुंदर मला हो[27]'. ॥ १७

---

१. अतिपीडित देवांनीं प्रार्थिलेला जो विधि (ब्रह्मदेव) त्याच्या आज्ञेनें. २. देवांचा शिल्पी; यास 'त्वष्टा' असें ही नांव आहे. ३. सुखातें. ४. स्वर्ग मृत्यु पाताळ या तीन लोकांतील. ५. हें तिचें नांव. मूळांत असें आहे:—'तिलं तिलं समानीय रत्नानां यद्विनिर्मिता । तिलोत्तमेति तत्तस्या नाम चक्रे पितामहः ॥' (आदिपर्व, अध्याय २११, श्लोक १८.) ६. आकृष्ट करावें, भुलवावें. ७. मोठ्या तपश्चर्येला. ८. ब्रह्मदेव. ९. हे (अव्यय). १० पवित्रे 'पुनीते' या शब्दावरून मोरोपंत जर वैयाकरण असता तर' असें रूप तो न लिहिता असा किसेकांचा पंतांवर आक्षेप आहे. पुनीत म्ह० पवित्र, पूत या अर्थी हा शब्द प्रचारांत अतिशय आहे आणि पंतांची कविता 'प्राकृतसंस्कृतमिश्रित' आहे. तेव्हां 'पुनीते' हें संबोधनरूप व्याकरणरीत्या सदोष म्हणवत नाहीं. ११. निवारीं, दूर कर. १२. हें रूप कवितेंत मात्र आढळतें. १३. सुंदउपसुंद या शत्रूंनीं. १४. काममोहित झाले. १५. देव इंद्र आणि महेश्वर. १६. त्रिभुवनैकसुंदरी. १७. ब्रह्मदेवाच्या आज्ञेनें. १८. ज्याला (ज्या वदनाला) पाहुनि सुर हरिहर भुलले, तें मोहक वदन, ती लोकैकसुंदरा, ब्रह्मनियोगें सुंद राजाला दावी—असा अन्वय. १९. विंध्यपर्वतावरील वनांत. २०. स्त्रीजनांनीं वेष्टित. २१. प्राशिलें मद्य (सुरा) ज्यांणीं असे. २२. स्वर्गाचें स्वामित्व, नाकप्रभुत्व. २३. भय पावले देव ज्यांला असे. २४. फुलें वेंचण्याच्या मिषानें, निमित्तें. २५. वीज. २६. अहो. २७. होवो.

धांवुनि धरिति कर तिचे सोडुनि **सुंदो**पसुंद रीतीतें, ।
दोघांचेंहि कटाक्षें अनुमोदी कृत्य सुंदरी ती तें. ॥ १८
सुंद म्हणे, 'म्यां वरिली, सर परता, धरुनि हात तो डावा, ।
गुरुदारधर्षणोद्यत जो, तो लागेल हात तोडावा'. ॥ १९
उपसुंद म्हणे, 'माझी न करावी धर्महानि, करकरुनी ।
कां धरिला मृदुकर ? सर, हर ! हर ! मरसील हा निकृर करुनी.' ॥ २०
सुंद जसा, उपसुंदही दे, देयातें जसें गगन गाळी, ।
ज्यासि अमर्ष रुचे, तो अंध विवेकासि कां मग न गाळी ? ॥ २१
सुंदीं जैसा काम क्रोध उठे, तदनुजीं तसाचि तदा. ।
बिंबप्रतिबिंबचि ते; घे ज्येष्ठ, कनिष्ठही तसीच गदा. ॥ २२
सुंदाची उपसुंदीं, उपसुंदाची गदा पडे **सुंदीं**, ।
तन्मरणमुदुद्धासें **गण**पतिच्या कंठ नुठेल कां तुंदीं ? ॥ २३
परम सखे होते, परि एकस्त्रीरत्नभोगकामुक ते ।
मेलेचि, जरि न ऐसें करिते, तरि जीवनासि कां मुकते ? ॥ २४
म्हणुनि तुम्ही स्वस्नेहप्राणयशोव्यय न होय, सुख वाढे, ।
ऐसें वर्ता बुध हो ! कटुहि सदुपदेश हित, जसे काढे'. ॥ २५
पांडव म्हणति, 'गुरुवरें हित कथिलें, अमृत पाजिलें कानीं, ।
अवलोकिला बहुदिसां राजर्षी **पांडु** आजि लेंकांनीं. ॥ २६
आम्हांत जो **द्रु**पदजासहिता पाहेल केलिच्या भवनीं ।
तो ब्रह्मचारिधर्में वर्तेल द्वादशाब्दकाळ वनीं.' ॥ २७
समय असा करवुनि मुनि गेल्यावर एकदां असें घडलें, ।
गोधन कोणा एका विप्राचें दस्युच्या करीं पडलें. ॥ २८
तो द्विज **शक्र**प्रस्थीं हाका मारी म्हणे, 'अगा राया ! ।
संरक्षितोसि राष्ट्राप्रति, कीं तूं आपुल्या अगारा या. ॥ २९

१. गुरुजनाचे (पूज्यजनाचे) स्त्रियेचें धर्षण (अपमान) करण्यास सिद्ध झालेला. २. हें सुभाषित. ३. निकृति, हलकेपणा, नीचपणा. ४. गगनास गाळी देणाराला (गगन) जसें उलटून गाळी देतें म्हणजे प्रतिध्वनि करतें. ५. आकाश. ६. शिव्या. ७. क्रोध. ८. टाकी. हें सुभाषित होय. ९. त्यांच्या मरणाच्या आनंदानें आलेल्या हासानें. १२. तिडीक. ११. पोटीं. १२. आपला स्नेह, जीव आणि कीर्ति यांचा नाश. १३. हा चतुर्थ पाद सुभाषितरूप होय. १४. क्रीडेच्या. १५. घरीं, मंदिरांत. १६. बारा वर्षें. १७. नियम, प्रतिज्ञा. १८. गाई. १९. चोराच्या. २०. इंद्रप्रस्थीं. २१. घराला.

दुष्टविनाशें यश बहु वाढो म्हणती न, ते खचो राजे, ।
ते साधु भूप, देती सुख साधुजनासि, दुःख चोरा जे[3]. ॥ ३०
चोरोंपहृतब्राह्मणगोधन निजकीर्तिधन उठा राखा, ।
न म्हणो पुनरपि भगवान् राम, 'क्षत्रियकुळा कुंठारा! खा.' ॥ ३१
न द्विजगोधन केवळ नेलें, तुमचेंहि सुयश, धांवा हो! ।
धांवा रे पांडव हो! म्हणतां रक्षार्ह वस्तु कां वाहो?' ॥ ३२
तें ऐकतांचि, 'मा भैर्विप्र!' म्हणे संदवनैकरस कृष्ण. ।
परि तैं शस्त्रागारीं होता श्रीधर्मभूवर सकृष्ण. ॥ ३३
वासवि पडे विचारीं, 'कैसा हा स्वकृतनियम मोडावा? ।
रक्षण न करुनि कैसा विप्राचा अप्रसाद जोडावा? ॥ ३४
विप्रार्थेचि रक्षावा; लागो निजनियमलंघनें शब्द. ।
बारा सारावे वनवासीं, बुध शतहि सारिती अब्द'. ॥ ३५
निश्चय करुनि असा तो शस्त्रागारीं शिरे, नमूनि नृपा, ।
धनु घेवुनि चोर वधुनि संपादी कार्य करुनि विप्रकृपा. ॥ ३६
मग बहुकष्टें धर्में आज्ञा दिधली, सुखें न, वनवासा, ।
तीर्थाटनीं धनंजय उत्सव पावे सदा नवनवासा. ॥ ३७
त्या तीर्थपरा प्रभुला बहु मानवती सुरर्षि नाकर्षी; ।
कामाकुला उलूपी गंगाद्वारीं जळांत आकर्षी. ॥ ३८
ती ऐरावतनागपवंशजकौरव्यकन्यका आर्या ।
नेवूनि नागलोकीं पितृगेहीं होय जिष्णुची भार्या. ॥ ३९
चित्रांगदाहि वरिली मणिपूराधीशचित्रवाहनजा ।
ज्ञात्यास न व्रतच्युति, विषयांचा वाहवि प्रवाह न जो. ॥ ४०

---

१. नष्ट होवोत. 'खचोत' असें रूप पाहिजे होतें. २. चांगले. ३. हें अर्ध सुभाषितरूप आहे. ४. चोरानें नेलेल्या विप्राच्या गाई. ५. परशुराम. ६. हे परशो. ७. हे ब्राह्मणा! भिवूं नको. ८. साधूंच्या रक्षणाविषयीं मोठी गोडी ज्याला तो. ९. अर्जुन. १०. शस्त्रगृहांत. ११. तेजस्वी धर्मराजा. १२. द्रौपदीसह. १३. वासवाचा (इंद्राचा) पुत्र, अर्जुन. १४. द्विजाचा गोरूप अर्थ. १५. संवत्सर. १६. तीर्थाटन करण्यास तत्पर अशा धनंजयाला. १७. देवर्षी. १८. स्वर्गीं राहणारे ऋषि. १९. स्मरपीडित. २०. नागकन्याविशेष. २१. ऐरावत कुळांत झालेला जो नागश्रेष्ठ कौरव्य त्याची दुहिता. (आदिपर्व, अध्याय २१४) ही उलूपी अर्जुनाची भार्या होय. २२. मणिपुर नगराचा राजा चित्रवाहन त्याची कन्या. (आदिपर्व, अध्याय २१५.) २३. व्रतापासून पतन, व्रतभंग. २४. ज्याला. हें सुभाषित होय.

तैशाच पावल्या ज्या होत्या ग्राहत्व[1] अप्सरा[2] शापें, ।
त्या पांचहि उद्धरिल्या, तीर्थी **पार्थें** हरूनियां पापें. ॥ ४१
तीर्थें पाहत पाहत गेला तो **वासवि** प्रभासा[3] जों, ।
भेटुनि **कृष्ण** म्हणे, 'ये दोघे सुखवूनि **यदुसभा** साजो.' ॥ ४२
जो देवाश्रयगर्वित[4]मणिसानुप्रतिहि[5] रैवतक[6] दापी[7]; ।
तेथें ने, न विसंबे क्षणही तें इष्ट दैवत कदापी. ॥ ४३
मिरवीत स्वपुरींत प्रभुनें नेला **सिताश्व**[8] **वासवसा**[9]. ।
वृष्णि म्हणति, 'अर्जुनजी! येथेंचि पुरे करा प्रवास, वसा.' ॥ ४४
वसुदेवें आदरिला बहु करुनि तदात्मरंजना भाचा; ।
सर्वत्र मान पावे साधु सखा भक्त **कंजनाभाचा**[10]. ॥ ४५
कुंतीसुतें सुभद्रा नवरी **वसुदेवकन्यका** सुरुची[11]. ।
देखिलि अनुजा[12] मनुजाकारधरा[13] त्या **विरंचिच्या**[14] गुरुची[15]. ॥ ४६
अमृतांशुची[16] अहंकृति[17] सर्व जिच्या नाशिली मुखानें ती ।
तद्धृतिस[18] होय हृदयीं हाणुनि नयना शिलीमुखा[19] नेती. ॥ ४७
जाणोनि भाव भक्तप्रियकर हांसे, म्हणे, 'मन कुलीनें ।
त्वां न दिलें, परि नेलें करुनि बळ पहा कसें पटुमुलीनें[20].' ॥ ४८

---

१. नक्राचा जन्म. २. देववेश्या; वर्गा, सौरभेयी, समीची, बुद्बुदा आणि लता अशा पांच अप्सरा मैत्रिणी होत्या. कुबेराच्या वनांत विहार करीत असतां यांनीं एका तपस्वी विप्रास पाहिलें व काममोहित होऊन पांचा जणींनीं त्याचा तपोभंग करण्याचा उद्योग चालविला; तेव्हां त्यानें क्रोधानें यांस शाप दिला कीं, 'तुम्ही शंभर वर्षें जलामध्यें नक्र होऊन राहाल.' नंतर त्या शापानें भय पावून तपोधनाला शरण गेल्या, व त्याची परोपरीनें मनधरणी केली. तेव्हां त्यास दया आली. आणि 'कोणीएक उत्तम पुरुष शतवर्षांच्या अखेरीस येऊन तुमचा उद्धार करील,' असा त्यानें उःशाप दिला. त्याप्रमाणें अगस्त्य, सौभद्र, पौलोम, कारंधम आणि भारद्वाज या पांच तीर्थांत वास करणाऱ्या पांच देवांगनांस अर्जुनानें ग्राहदशेंतून मुक्त केलें. (आदिपर्व, अध्याय २१५-२१६.) ३. द्वारकेजवळच्या एका तीर्थाला. ४. देवांच्या आश्रया(वासा)मुळें गर्व पावलेला असा जो (मेरुपर्वत) त्यालाही. ५. मेरुप्रति. ६. हा एक द्वारकासमीपवर्ती पर्वत आहे. ७. दडपी. ८. ज्याच्या रथाचे अश्व (घोडे) सित (पांढरे) आहेत तो. (अर्जुन.) ९. इंद्रासारखा. १०. कमलनाभ कृष्ण त्याचा. ११. सुंदर चांगली आहे कांति (रुचि) जिची अशी. १२. धाकटी बहीण. १३. मनुष्यदेहधारिणी. १४. ब्रह्मदेवाच्या. १५. बापाची. (कृष्णाची.) १६. चंद्राची. १७. अहंकार. १८. त्याच्या धैर्याला. १९. नेत्ररूप बाणाला. २०. चतुर.

पार्थ म्हणे, 'तूं चेतश्चोर[1], तसीच स्वसा[2] तुझी देवा! ।
मोहावा स्मरहर[3]! हर! हर! तेथें आमुचा किती केवा[4]?' ॥ ४९
करुनि कृपा कृष्ण म्हणे, 'अर्जुनजी' तरि मुलीस पळवा हो! ।
पळ वाहो कोपें बळ[5], हे तनु[6] अतनुज्वरें[7] न पळवा हो[8].' ॥ ५०
शीघ्रचर[9] चरं[10] प्रेषुनि[11], धर्माज्ञा आणवूनि, मग तीतें ।
पळवी[12]; पळ वीशानें[13] हरिलीसें वाटवूनि[14] जगतीतें. ॥ ५१
रैवतनगोत्सवीं[15] ती हरिली, ऐकूनि राम[16] कर चोळी[17], ।
नुरवी[18] रिपुदारजनीं[19] जो तच्छोभाविरामकर[20] चोळी[21]. ॥ ५२
यादव सर्वहि झाले सिद्ध, परि हरि स्वयें न लेश वदे. ।
बळभद्र म्हणे, 'ऐका यादवहो! न मन यांत केशव दे. ॥ ५३
बसला उगाचि मौनव्रत धरुनि, स्वस्थ कुतुक[22] पाहतसे, ।
थांबा, यासि पुसों द्या, कां हा स्वातिक्रमासि[23] साहतसे.' ॥ ५४
ऐसें म्हणूनि, बळ[24] बळें[25] पळभर तें स्थिर करूनि भावाला ।
आपण पुसे, 'उगा कां? वद, जाणों दे त्वदीयभावाला[26]. ॥ ५५
माझ्या मतें वधावें त्या यदुकुरुकीर्तिनाशका[27] पापा[28], ।
जेणें[29] भलें म्हणविलें पाजुनि पय पाळिल्या खळा सापा. ॥ ५६
आम्हीं, तुझा सखा, या भावें तो पूजिला सदा सुरसा[30], ।
सर्पा अर्पावें जें, विषपण येतें तया पया सुरसा[31]. ॥ ५७

---

१. चित्त चोरणारा. २. भगिनी, सुभद्रा. ३. शंकर. ४. गणना, पाड. ५. बळराम. ६. शरीर. ७. अतनुच्या (अनंगाच्या, कामाच्या) ज्वरानें. ८. होवो. ९. लौकर चालणारा. १०. दूत. ११. पाठवून. (आदिपर्व, अध्याय २१९ श्लो० २४—२५.) १२. श्रीमद्भागवताच्या दशम स्कंधाच्या ८६ व्या अध्यायांत अर्जुनानें त्रिदंडी संन्यास घेऊन सुभद्राहरण केलें इत्यादि जी कथा आहे ती या आदिपर्वांत नाहीं. १३. पक्षिश्रेष्ठानें, गरुडानें. १४. भासवून. १५. रैवतपर्वतसंबंधी देव त्याच्या उत्सवांत. १६. बळराम. १७. घांसी. १८. उरविली नाहीं. १९. शत्रूंच्या स्त्रीजनाच्या ठायीं. २०. त्या रिपुस्त्रियांच्या शोभेचा नाश करणारा. २१. कंचुकी. २२. कौतुक. २३. आपल्या अपमानाला, व्यतिक्रमाला. २४. राम. २५. सैन्य. २६. तुझ्या अभिप्रायास. २७. यादवांची आणि कौरवांची कीर्ति नष्ट करणारा. (सुभद्राहर अर्जुन.) २८. दुष्टाला. २९. जेणें पय पाजुनि पाळिल्या खळा सापा भलें म्हणविलें—असा अन्वय. जो सापापेक्षांही अधम. ३०. देवसा. ३१. जें (पय) सर्पा अर्पावें (द्यावें) तया सुरसा (मधुर) पया (दुधाला) विषपण येतें. (तें दुध विषरूप होतें.) हें सुभाषित आहे.

[१]ज्यांत [२]सेदन्नें जेवी, [३]भंगी हाणोनि दुष्ट लत्ता तें, ।
न कृतघ्न उपेक्षावा, शीघ्र वधावें अशा [४]प्रमत्तातें. ॥ ५८
[५]स्वयशोघ्न जो, वधावा, तुज आजि [६]उपेक्षणीय कां गमला? ।
करिसी काय विचार? स्पष्टतर स्वमत शीघ्र सांग मला.' ॥ ५९
कृष्ण म्हणे, 'दादाजी! पडला आहे असा विचार मला, ।
कीं भगिनीहरणास्तव जिष्णु तुम्हां दुष्ट वध्यसा गमला. ॥ ६०
कन्येच्या लाभाचा निश्चय नाहीं स्वयंवरीं स्पष्ट, ।
घ्यावें दान, दिलें तरि, हें कर्महि [७]मानधनजना [८]कष्ट. ॥ ६१
धन देवुनि घ्यावी, तरि न अपत्याचा [९]भला करी विकरा, ।
चित्तीं या दोषाच्या आणुनि त्या [१०]पंडितोत्तमें [११]निकरा, ॥ ६२
युक्त [१२]प्रसह्यहरण [१३]क्षत्रप्रभवासि याचि [१४]भावानें, ।
यदुकुरुकुळकीर्तिकरें नवरी हरिली [१५]महाप्रभावानें. ॥ ६३
मज तों असेंचि दिसतें, कीं जो धर्मज्ञ, शुद्ध कुळ ज्याचें, ।
तो अन्याय करीना, धर्मींच मन [१६]प्रसन्न [१७]कुळजाचें. ॥ ६४
कीं न पराभव त्याचा [१८]श्रीकंठ करूं म्हणेल, तरि त्याला. ।
नाहीं अशक्य कांहीं [१९]दृक्पातें भुवन भस्म [२०]करित्याला. ॥ ६५
शक्ति [२१]पुरहरावांचुनि [२२]पार्थपरिभवीं नसेचि अन्यास, ।
[२३]पण न घडतां मरण, कीं मानधनजनास युक्त सन्यास. ॥ ६६
न चुके, कन्या अन्या धन्या कवणा वरासि अर्पावी? ।
क्षितिधरें[२४] एकचि, न दुजा, [२५]कद्रूहि तशा दुज्या न सर्पा [२६]वी. ॥ ६७

---

१. ज्या पात्रांत. (आदिपर्व, अध्याय २२० श्लोक २७). २. उत्तम अन्नें. ३. नाशी. ४. उन्मत्ताला. हें अर्ध सुभाषितरूप आहे. ५. आपल्या यशाचा नाश करणारा. ६. उपेक्षा (हयगय, दुर्लक्ष) करण्यास योग्य. ७. मान हेंच धन ज्यांचें अशा पुरुषांला. ८. कष्टदायक, अपमानकारक. हें सुभाषित. ९. भला मनुष्य, सत्कुलोत्पन्न पुरुष. (आदिपर्व, अ० २२१ श्लो० ४.) १०. त्या परम विचारशील (अर्जुनानें.) ११. समूहा. १२. बलात्कारानें हरण करणें. १३. क्षत्रियकुळीं जन्मलेल्या पुरुषाला. १४. हेतूनें. १५. मोठा आहे प्रभाव (पराक्रम) ज्याचा त्यानें. (अर्जुनानें.) गीति ६२–६३ यांचें युग्मक आहे. १६. संतुष्ट, आनंदित. हा चतुर्थपाद सुभाषितरूप होय. १७. उत्तम कुळीं झालेल्याचें. १८. सदाशिव. १९. दृष्टि फेंकण्यानें. २०. करणाऱ्याला. २१. शंकरावांचून. (त्रिपुराचा संहार करणाऱ्या विरूपाक्षावांचून.) २२. अर्जुनाचा पराभव करण्यास. २३. प्रतिज्ञा. हें अर्ध सुभाषित समजावें. २४. शेष. (पृथ्वी धरणारा.) २५. सकल सर्पांची माता. ही प्राचेतस दक्षाची कन्या आणि कश्यप ऋषीच्या तेरा स्त्रियांतील एक. २६. प्रसवे.

यास्तव मज वाटतसे सुज्ञ प्रेषूनि **पार्थ** फिरवावा, ।
जिरवावा कोप मनीं, भगिनीसह तो पुरांत मिरवावा.' ॥ ६८
केलें तसेंचि **रामें**, **वृष्णिपुरीं** लग्नकार्य [1]साधूनी, ।
पार्थ [2]स्वपुरा आला, गौरविला बंधुपौरसाधूंनीं. ॥ ६९
कुंतीतें नमुनि, तिची आज्ञा घेवोनि, फार [3]शंकितसा ।
कृष्णेकडे हळुहळू एकाकी **जिष्णु** जाय [4]अंकितसा. ॥ ७०
[5]प्रणयें [6]प्रिया [7]प्रियातें [8]स्मित करुनि म्हणे तया [9]नररमणीतें, ।
'दृष्टि निववि़ली आजी; [10]स्ववियोगें द्या भया न [11]रमणीतें. ॥ ७१
[12]हा प्रेमबंध पहिला, दुसरा [13]तो प्रेमबंध, दृढ अन्य, ।
भाराचाही बंध प्रथम [14]श्लथ होय जाणती [15]वन्य. ॥ ७२
[16]मधुप नव्या [17]नलिनीला सोडुन पहिलीस काय सेवील? ।
कां [18]सद्यः पक्वान्न त्यजुनि [19]रसिक [20]गतरसास जेवील?' ॥ ७३
जिष्णु म्हणे, '[21]त्वद्रचितें मज मिळतिल हे न [22]गोडवे दास्यें ।
लागति तुझ्या मुखें हे बोल, जसे शब्द गोड [23]वेदास्यें. ॥ ७४
दास्यें तुझी [24]सुमति हे सुखविल, [25]**सुरसिंधु** जेंवि **गौरीची**; ।
मूर्ति धरुनि तुजकडे आली [26]ही प्रीति जाण [27]**शौरीची**.' ॥ ७५
बहु रंजवी प्रियेच्या करुनि परोपरि [28]सुसांत्वन मनातें. ।
[29]गोपीवेषें प्रेषी, सेविल न **द्रुपद**[30]जांघ्रिनमनातें. ॥ ७६

---

१. संपादून. २. इंद्रप्रस्थाला बारा वर्षे भरल्यावर परत आला. ३. भयभीत असा. ४. सेवकसा, पराश्रितसा. ५. नम्रतेनें, प्रेमानें. ६. द्रौपदी ७. अर्जुनाला. ८. हास्य. ९. त्या नरवर्यातें. १०. आपल्या विरहानें. ११. सुभद्रेतें. १२. हा माझा प्रेमबंध. १३. तो सुभद्रेचा प्रेमबंध. (आदिपर्व, अध्याय २२१ श्लो० १७.) १४. सैल, ढिला. १५. रानटी लोक. गीति ७२ आणि ७३ ह्या सुभाषितरूप होत.' १६. भ्रमर. १७. कमलिनीस. १८. ताजें. १९. रसज्ञ पुरुष. २०. शिळ्या अन्नाला, नीरस अन्नाला. २१. त्वां केलेल्या. ('त्वद्रचितें' याचें विशेष्य 'दास्यें.') २२. एखाद्याचें प्रेम आपणावर असून तो तें विसरला असतां जे उद्गार त्याच्या संबंधानें आपल्या मुखांतून निघतात त्यांस 'गोडवे' म्हणतात. पंतांचें 'गोपीगोडवे' म्हणून एक लहानसें स्फुट काव्य आहे, त्यांत गोपींचे पूर्वोक्तप्रकारचेच उद्गार आहेत. २३. वेदांच्या मुखानें. २४. चांगली बुद्धि. २५. गंगा. २६. सुभद्रारूप. २७. कृष्णाची. (शूरकुलोत्पन्नाची.) २८. चांगलें समाधान. २९. बल्लवीवेष, गौळणीचा पोशाग. अर्जुनानें सुभद्रेला गौळणीचा वेष देऊन प्रथम कुंतीस भेटण्यास पाठवून नंतर द्रौपदीकडे पाठविली. ३०. चरण.

कृष्णेसि पट्टमहिषीवेषें[1] यावा न कोप या भावें, ।
वेष तसा करवी कीं आवृत[2] लावण्य तें तिचें व्हावें. ॥ ७७
परि ती फारचि शोभे, गुंजाशिखिपिच्छधातुधर[3] तीचे ।
भ्राते झाले चेतोहर[4] सांगा कोणत्या न गोरतीचे[5]? ॥ ७८
'देवि! तुझी प्रेष्या[6] मी' नमुनि असें ती म्हणे स्वसवतीतें. ।
कृष्णा[7] बहु मानवली[8] त्या नम्रपणें तिच्या प्रसवतीतें[9]. ॥ ७९
कृष्णा[10] भेटोनि म्हणे, 'नित्य असो निःसपत्न[11] तव नवरा, ।
नवनव राज्यसुख पहा, पाव सुताद्यखिलभव्यभवनवरा[12].' ॥ ८०
साक्रूरोद्धवसात्यकिवृष्णिकटकयुक्त[13] रामकृष्ण मग ।
आले आंदण घेवुनि, भक्तांचे मूर्तिमंत देवनग[14]. ॥ ८१
भरलें तिहीं धनें पुर, राष्ट्रहि बहु धर्मगृह न केवळ तें ।
चातकमुखचि भरी कीं अभ्र[15] भरायासि भूमिके वळतें. ॥ ८२
बळ[16] जाय, कृष्ण राहे, ठेवी न सुत, न वधू, न सेना, कीं ।
जें सुख भक्तगृहीं या हरिस, तया हरिस[17] तें नसे नाकीं[18]. ॥ ८३
शक्रप्रस्थीं असतां झाला नरवेष[19] विष्णुला भाचा[20]. ।
फारचि कामुक[21] होता स्वसख्यासह[22] त्याचि[23] जिष्णु लाभाचा. ॥८४
म्हणति, 'पितृकृतध्यानें[24] झाला तो बाळ[25] कृष्ण साच कवी.' ।
आजवळीं निजचित्रें जो भासे बाळकृष्णसा चकवी. ॥ ८५
धरिली प्रभुनें[26], बहु निजरूपनिरत जिष्णु म्हणवुनी, तनु[27] ती, ।
हा तर्क फार बरवा, एक असो दोष, फार यांत नुती[28]. ॥ ८६

---

१. अभिषिक्त राणीचा वेष. २. आच्छादित. ३. गुंजा, मयूरपिच्छें आणि गैरिकादि धातु धारण करणारे (राम कृष्ण). ४. चित्त हरण करणारे. ५. जिला पति आहे तिचे. (गौळणीचे.) ६. दासी. ७. सुभद्रा. ८. मान्य झाली. ९. मातेतें. (देवकीला.) १०. द्रौपदी. ११. शत्रुरहित. १२. पुत्रादि सर्व ऐश्वर्यांचें गृह अशा वराला. १३. अक्रूर, उद्धव, सात्यकि, वृष्णि आणि सैन्य यांसहित. १४. कल्पतरु. १५. मेघ. १६. बळराम. १७. इंद्रास. १८. स्वर्गांत. १९. मनुष्याचा वेष धारण करणारा विष्णु. (कृष्ण.) २०. बहिणीचा पुत्र. २१. सस्पृह, इच्छा करणारा. २२. श्रीकृष्णासह. २३. त्या पुत्रलाभाचा. २४. बापानें (अर्जुनानें) केलेल्या कृष्णाचे ध्यानानें. २५. सौभद्र, अभिमन्यु. २६. कृष्णानें. २७. शरीर. (सौभद्ररूपी.) २८. स्तुति.

तो अभिमन्यु[1] बहिश्चर[2] साक्षात् स्वप्राण पद्मनाभाचा[3], ।
आत्माहि[4] तसा त्याचा वल्लभ न गमे, जसा मना भाचा ॥ ८७
प्रसवे कृष्णा[5] पांचांपासुनि सुत पांच, त्यांत जो ज्येष्ठ ।
तो प्रतिविंध्य[6] महात्मा[7], दुसरा सुतसोम गुरुजनप्रेष्ठ[8]. ॥ ८८
श्रुतकर्मा आणि **शतानीक** श्रुतसेननाम एवं[9] च ।
धर्मज भीमज जिष्णुज नकुलज सहदेवज क्रमें पंच. ॥ ८९
दोघां[10] कृष्णांसि जसा आवडला, तद्गुणासही[11] फार, ।
विद्या कळा मग न कां **सौभद्र**गळ्यांत घालिती हार ? ॥ ९०
प्रतिविंध्यादि कुमार स्वपितृसमज्ञानशौर्यरूपगुणें, ।
अत्याग्रहें पहातां, दिसलें वय एक मात्र त्यांत उणें. ॥ ९१
एके समयीं[12] ससुहृज्जन[13] ते[14] सद्देवतरु[15] निके[16] लीला ।
दाविति विषयिजनाच्या[17], त्या श्रीयमुनेंत करुनि केलीला[18]. ॥ ९२
तेथें[19] द्विजरूप[20] अनल[21] एकांतीं त्या प्रभूंसि[22] भेटूनी, ।
मागे **खांडववन** तो व्हाया नीरोग[23] त्यांत पेटूनी. ॥ ९३

---

१. हा (अभि) निर्भय आणि मन्युमान् (क्रोधवान्) होता म्हणून त्याला 'अभिमन्यु' असें नांव पडलें. (आदिपर्व, अध्याय २२१ श्लो० ६७.) २. देहाबाहेर फिरणारा. ३. श्रीकृष्णाचा. (पद्मं नाभौ यस्य सः.) ४. जसा भाचा (कृष्णाचा) मना वल्लभ प्रिय गमे, तसा त्याचा (स्वतःचा) आत्माहि वल्लभ न गमे—असा अन्वय. ५. द्रौपदी. ६. प्रतिविंध्य (धर्मज), सुतसोम (भीमज), श्रुतकर्मा (अर्जुनज), शतानीक (नाकुलि), श्रुतसेन (सहदेवज) असे पांच पुत्र एकेक वर्षाच्या अंतरानें झाले. (आदिपर्व, अध्याय २२१, श्लो० ७९-८६). ७. उदारधी, महानुभाव. ८. गुरुजनास प्रिय. ९. याप्रमाणें. १०. अर्जुन आणि कृष्ण यांना. ११. दोघांच्या गुणांस. १२. उष्णकाळांत. (अध्याय २२२ वा पहा.) १३. मित्रजनांसह. १४. अर्जुन आणि कृष्ण. १५. साधुजनाचे कल्पवृक्ष. १६. खरें, चांगलें. १७. विषयासक्त जनांच्या, सांसारिक जनांच्या. १८. क्रीडेला. १९. यमुनेजवळच्या सुमनोहर स्थानांत. २०. ब्राह्मणाचा वेष घेतलेला. २१. अग्नि. २२. कृष्णार्जुनांस. २३. रोगरहित (निर्+रोग=नीरोग. र्‌च्यापुढें र् आला तर पहिल्या र्‌चा लोप होतो, आणि त्याचा पूर्व स्वर ऱ्हस्व असल्यास दीर्घ होतो—असा नियम आहे.)

श्वेतकिनृप[1] घृतधारा[2] द्वादशवर्षें[3] मुखीं[4] सतत ओती ।
बहु धा[5] म्हणोनि देती झाली निजसेवनीं हळुहि 'ओ'. ती. ॥ ९४
श्वेतकिची ब्रह्मांडीं अप्रतिमा[6] कीर्ति, हे 'तुपा प्याला ।
झाला रुग्ण[7] अनळ असि न दुजी पूतत्वहेतु[8] पाप्याला. ॥ ९५
चक्र[9] दिलें गुरुं[10] कृष्णा कुरुकृष्णा[11] अक्षयेषुधर[12] भाते, ।
गांडीवधनु, कपिध्वजरथ[13]; हय जे हरिति शीतकरभा[14] ते. ॥ ९६
दिव्यरथीं बैसुनि ते कृष्ण[15] म्हणति, 'भय तुला न वाटावें, ।
आरोग्यार्थ ज्वलना[16] ! खांडववन भेषजासि[17] चाटावें[18].' ॥ ९७
रक्षिति दहना[19] गहनासह[20] नानाजातिसत्वरस[21] खाया, ।
होतां सहाय ईश्वर, भेटे धांवोनि सत्वर सखा[22] त्या. ॥ ९८

---

१. श्वेतकी नामक एका प्रख्यातराजानें असंख्य यज्ञ केले; शेवटीं शतसंवत्सरात्मक यज्ञ दुर्वासा ऋषीच्या आश्रयानें केला. या अनेक यज्ञांत हविर्भक्षण केल्यामुळें अग्नीला इतकें जाड्य आलें कीं, 'त्याचा प्रतिकार कसा करावा ?' असें विचारण्यासाठीं त्याला ब्रह्मदेवाकडे जावें लागलें. अनेक वर्षे घृतधारा सेवन केल्यानें अग्नि निस्तेज आणि म्लान झाला. 'खांडववन भक्षण करून अग्नीनें आपलें जाड्य निरस्त करावें' असा उपाय पितामहानें सांगितला. पण हें वन इंद्ररक्षित होतें म्हणून तें अग्नीस सुप्राप्य नव्हतें. तेव्हां पितामहाच्या अनुमतानें अग्नि विप्रवेष घेऊन मनुष्यलोकीं कृष्णार्जुनांस शरण आला. त्या उभयतांनीं खांडववन भक्षणार्थ देण्याचें कबूल केलें, पण अर्जुनापाशीं रथादि-युद्धसाहित्याची कांहींशी उणीव असल्यामुळें अग्नीनें वरुणापासून मागून घेऊन अर्जुनाला गांडीव धनुष्य, अक्षय्य इषुधि, कपिध्वजयुक्त दिव्यरथ, इत्यादि सामुग्री दिली आणि कृष्णास वज्रनाभ नामक चक्र आणि कौमोदकी नामक गदा देऊन उभयतांस संतुष्ट केलें. नंतर अग्नि तें वन भक्षण करूं लागला, आणि कृष्णार्जुन रथारूढ होऊन वनाच्या दोन्हीं बाजूंस सर्व प्राणिनाश करूं लागले. हें वर्तमान कळतांच इंद्र अग्नीचें निवारण करण्यासाठीं सकलदेवांसह आकाशांत येऊन जलवृष्टि करूं लागला. तेव्हां कृष्णार्जुनांनीं त्याचा पाडाव करून त्यास परत लाविलें. नंतर अग्नि तें वन पंधरा दिवस यथेच्छ भक्षण करून व्याधिनिर्मुक्त झाला. (आदिपर्व, अध्याय २२३–२२५). २. तुपाची धार. (यज्ञांत.) ३. बारावर्षें. (द्वादशसंवत्सरात्मक यज्ञ केला म्हणून.) ४. अग्नीच्या तोंडांत. ५. तृप्त हो. ६. अनुपम, अद्वितीय. ७. रोगी. ८. पवित्रपणास कारण. ९. वज्रनाभ नांवाचें चक्र अग्नीनें कृष्णास दिलें. १०. प्रभु, सर्वोत्तम. ११. कुरुवंशजा अर्जुना. १२. अक्षय बाण धरणारे. १३. कपि (मारुति वानर) आहे ध्वजावर ज्याच्या असा (रथ). १४. चंद्रप्रभा, अत्यंत शुभ्र असे घोडे. १५. कृष्णार्जुन. १६. हे अग्ने. १७. औषधास. १८. हें औषध एक चाटण (लेह्य) होतें. १९. अग्नीला. २०. अरण्यासह. २१. अनेकविध प्राण्यांस आणि रसांस. २२. मित्र. (वायु.)

माधव[1] पांडव खांडवगहना[2] दहनासि[3] देति भक्षाया. ।
यत्न करी परि सामर[4] शक्र न झाला समर्थ रक्षाया[5]. ।। ९९
आला सर्वांचाही प्राणघ्न[6] महोग्र[7] एकदा समय[8], ।
खग[9] चार[10], पांचवा अहि[11], वांचे तैसाचि एक दास मय[12]. ।। १००
मातेनें[13] वांचविला तक्षकसुत अश्वसेन, जनकानें[14] ।
शार्ङ्गकपक्षी, पार्थें मयही, परिसो हितार्थ जनें कानें[15]. ।। १०१
शरणागतासि हेचि व्यसनीं देणार शर्म[16] परम[17] तिघे, ।
या तत्वातें येथें मूर्ख न घे, स्वहित धर्मपरमति[18] घे. ।। १०२
श्रीरामनामगुरुपद[19] सुनिपुणवादक[20], मयूरमुख[21] वाद्य, ।
श्रीरामदया गाती[22], गीत[23] जयग्रंथ[24], पर्व हें आद्य[25]. ।। १०३

---

१. कृष्णार्जुन. २. खांडववना. ३. अग्नीला. ४. अमरांसहित. ५. वन रक्षण्यास. ६. प्राणसंहारक. ७. मोठा भयंकर. ८. खांडववनभक्षणरूप. ९. शार्ङ्गपक्षाचीं चार बालकें. १०. त्यांचीं नावें येणेंप्रमाणें:—जरितारि, सारिसृक्क, स्तंबमित्र आणि द्रोण. ११. साप, तक्षकाचा पुत्र अश्वसेन. १२. मयासुर. या अग्निप्रलयापासून अर्जुनानें नमुचीचा बंधु मयासुर याचें संरक्षण केलें. हे उपकार फेडण्यासाठीं मयासुरानें मोठ्या कौशल्यानें पांडवांकरितां एक उत्तम सभागृह बांधिलें. १३. तक्षकाची भार्या स्वपुत्राचें (अश्वसेनाचें) मुख व पुच्छ आपल्या मुखांत धरून अग्निप्रलयांतून बाहेर जात असतां, अर्जुनानें बाणानें तिचा शिरश्छेद केला, तेव्हां इंद्रानें अश्वसेनास मुक्त केलें. (आदिपर्व, अध्याय २२५, श्लो० ६–८). १४. मंदपालानें. मंदपाल नामक एक मोठा जितेंद्रिय ऋषि होता, त्याला पुत्रसंतान नसल्यामुळें पितृलोकसंबंधी फळ मिळालें नाहीं. तेव्हां त्यानें पक्षियोनींत जरिता नामक पक्षिणीशीं संग करून प्रजोत्पत्ति केली. ती जरिता आपल्या चार बालकांसह खांडव वनांत राहत असे. अग्नि हें वन दहन करण्यास आला, तेव्हां मंदपालानें त्याची आराधना करून 'माझ्या मुलांस दग्ध करूं नको,' अशी प्रार्थना केली. ती अग्नीनें प्रसन्न होऊन मान्य केली आणि त्याप्रमाणें चार शार्ङ्गक पक्ष्यांस दग्ध केलें नाहीं. १५. या (९२–१०१) दहा पद्यांत मूळ ग्रंथाच्या बारा तेरा अध्यायांतील विषयांचा समावेश केला आहे. १६. सुख. १७. श्रीकृष्ण, अर्जुन आणि अग्नि. १८. स्वहितधर्माच्या ठायीं आसक्त आहे बुद्धि ज्याची तो. १९. श्रीरामाचें नाम हाच गुरु त्याचें पद. २०. गुरुपद हेंच कुशल वादक (वाद्य वाजविणारा). २१. मयूरकवीचें मुख हें वाद्य. २२. श्रीरामदया ही गाणारी. २३. जयग्रंथ हें गाणें. २४. महाभारतग्रंथास 'जय' हा एक पर्यायशब्द आहे. 'जयो नामेतिहासोऽयं श्रोतव्यो विजिगीषुणा' (आदिपर्व, अध्याय ६२, श्लोक २०), या पद्यभागावरून आणि 'नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् । देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥' या महाभारताच्या प्रत्येक पर्वाच्या प्रारंभीं असणाऱ्या श्लोकावरून 'जय' हा शब्द भारत नामक इतिहासाचाच वाचक आहे हें सुव्यक्त आहे. या गीतींत वादक, वाद्य, गाणारी आणि गीत या सर्व संगीतसाहित्याचा समावेश केला आहे. २५. पहिलें. (आदिपर्व.)

ऐका सज्जन हो ! [1]भवद्वच खरें, आश्चर्य म्यां पाहिलें,
[3]वाल्मीकिप्रभृति स्वबंदिनिकरीं दीना मला [4]बाहिलें. ।
केलें [5]प्राकृत काव्य, ईश्वरपदीं [6]धत्तूरसें [7]वाहिलें,
सांगूं काय वरप्रसाद ? अजि तें [8]व्यासेंहि कीं साहिलें. ॥ १०४

---

१. संस्कृत कविजनांचा असा संप्रदाय आहे कीं सर्गाच्या शेवटील एक दोन पद्यें सर्गवृत्ताहून भिन्न वृत्ताचीं असावयाचीं; या नियमास अनुसरून आदिपर्वाच्या या चरम पद्याचें वृत्त शार्दूलविक्रीडित आहे. पंतांनीं आपल्या काव्याविषयीं कोठें कोठें श्लाघा अथवा गर्वोक्ति ध्वनित करून, ज्या परमेश्वराच्या 'वरप्रसादा'नें अथवा 'सत्प्रसादामृता'नें तें प्रसन्न आणि सरस उतरलें, त्या ईश्वरपदीं लीन होऊन, तदुपकारस्मरणपूर्वक आनंदभरानें स्वकृतीचें वर्णन केलें आहे; तसा प्रकार या पद्यांतही जाणविला आहे. २. तुमचें वचन. ३. वाल्मीकप्रमुख जे आपले (ईश्वराचे) बंदिजन (स्तुतिपाठक) याच्या निकरीं (समूहांत). ४. बोलाविलें. त्यांच्यामध्यें आपली गणना झाली—असा भाव. ५. यद्यपि या ग्रंथास 'प्राकृत काव्य' असें म्हटलें आहे, तथापि यांत पंतांनीं संस्कृताचें अतिशयित मिश्रण केलें आहे असें पदोपदीं दिसून येईल. ६. धोतऱ्याच्या फुलासारखें. ७. समर्पण केलें. ८. 'महाभारत.' ग्रंथकार व्यास. यानें वेदांचे विभाग केले म्हणून त्याला व्यास किंवा वेदव्यास असें नांव पडलें. याचें सगळें नांव म्हटलें तर 'सत्यवतीसुत पराशर्य कृष्ण द्वैपायन वेदव्यास' असें आहे. यांनीं सुद्धां पंतांची कृति सहन केली. येथें 'रामायण'प्रणेता वाल्मीक आणि 'भारत'प्रणेता व्यास यांशीं आपली समता पंतांनीं व्यंग्योक्तीनें सुचविली आहे.

THE MAHÂBHÂRAT

OF

MOROPANT.

(THE GREAT MARÂTHÎ POET OF THE MAHÂRÂSHTRA.)

2. SABHAPARVA.

EDITED WITH

CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY

VAMAN DAJI OKA.

PRINTED AND PUBLISHED

BY

THE PROPRIETOR

OF

THE "NIRNAYA-SÂGAR" PRESS.

BOMBAY.

1891.

Price 6 *Annas.*

(Registered according to act XXV of 1867.)

(All rights reserved by the Publisher.)

महाराष्ट्रकविवर्यमोरोपंतकृत

महाभारत.

२. सभापर्व.

हें

वामन दाजी ओक

यांनीं अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन शुद्ध केलें.

आणि

मुंबईंत निर्णयसागर छापखान्याचे मालक यांनीं आपल्या

छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

१८९१.

किंमत ६ आणे.

सभापर्वाची अनुक्रमणिका.

अध्याय.	पृष्ठसंख्या.	ग्रंथसंख्या.	विषय.
१	१	११६	मयासुरप्रार्थना—मयसभा—त्या सभेंत धर्माचें आगमन—नारदानें प्रश्नरूपानें दर्शविलेली राजनीति—इंद्र यम वरुण कुबेर ब्रह्मदेव यांच्या सभांचें वर्णन—हरिश्चंद्रयशोवर्णन—श्रीकृष्णागमन—राजसूययज्ञोपक्रम—जरासंधवधविचार—त्याची उत्पत्ति—कृष्णार्जुनभीम यांचें मगधदेशीं प्रयाण—जरासंधवध.
२	१३	९८	जरासंधवधोत्तर अर्जुनादिकांचे दिग्विजय—धनसंचय—राजसूयदीक्षाग्रहण—आमंत्रित राजांचें आगमन—राजसूययज्ञसिद्ध्यर्थ व्यवस्था—कृष्णाची अग्रपूजा—शिशुपालक्रोध—तत्कृतभीष्मकृष्णनिंदा — कृष्णहस्तें शिशुपालवध—राजांचें स्वस्वनगरीं निवर्तन—व्यासाचा युधिष्ठिरास बोध—व्यासप्रयाण—धर्मभीमार्जुनसंवाद.
३	१९	६९	मयसभेंत दुर्योधनाची भ्रांतिमूलक बिटंबना—त्याचा भीमद्रौपदीकृत उपहास—त्याचा संताप—शकुनिहस्तें पांडवांचा सूड उगविण्याचा उपाय—कपटद्यूतद्वारा पांडवसंपत्तिहरणविचार—धृतराष्ट्राची संमति—त्याचें धर्मास आमंत्रण—विदुराचा द्यूतनिषेधपर बोध—त्याची उपेक्षा—सकुटुंब धर्माचें हस्तिनापुरीं आगमन.
४	२९	११२	धृतराष्ट्रसभेंत धर्मादिकांचें आगमन—द्यूतारंभ—शकुनिकपटजाल—द्रौपदीपण—शकुनिजय—द्रौपदी कौरवांची दासी—विदुराचा दुर्योधनास बोध—प्रातिकामिदूताचें द्रौपदीस सभेंत आणण्यासाठीं प्रेषण—तिला आणण्याविषयीं दुर्योधनाची दुःशासनास आज्ञा.

अध्याय.	पृष्ठसंख्या.	ग्रंथसंख्या.	विषय.
५	३७	१३३	दुःशासनहस्तें द्रौपदीचें आकर्षण—तिची त्यास विनवणी आणि बोध—द्रौपदीचा भीष्मादिकांस प्रश्न—त्यांचें मौन—विकर्णाची स्पष्टोक्ति—त्याचा कर्णमुखें उपहास—पांडव व द्रौपदी यांचें वस्त्राहरण—श्रीकृष्णाचा धांवा—तिच्या लज्जेचें रक्षण—पांडवांचें मौन—भीमाची क्रोधमूलक दुःशासनवधप्रतिज्ञा—विदुरोक्ति—केशिनी नामक राजकन्येची कथा—तदुत्तर भीष्मोक्ति.
६	५१	१०४	द्रौपदीपाशीं दुर्योधनाचें भाषण—तन्निमित्त भीमाची क्रोधोक्ति—कर्णाचें द्रौपदीपाशीं संभाषण आणि भीमाचा क्रोध—अपशकुन—धृतराष्ट्राच्या अग्निहोत्र गृहांत जंबुकप्रवेश—अशुभशब्दाराव—धृतराष्ट्राचा दुर्योधनास हितबोध—धृतराष्ट्रापासून द्रौपदीस वरप्राप्ति—पांडवाचें इंद्रप्रस्थीं गमन—पुनर्द्यूतारंभ—तत्संबधी प्रतिज्ञा—द्यूतासाठीं युधिष्ठिराचें सभेंत आगमन—द्यूतांत शकुनीचा जय आणि धर्माचा पराजय—पांडवांचा बारा वर्षें वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास.
७	६२	९२	पांडवांची वनांत जाण्याची सिद्धता—त्यांचा आणि द्रौपदीचा दुःशासनानें आणि दुर्योधनानें केलेला उपहास—तन्निमित्त भीमाचा कोप व प्रतिज्ञा—विदुराचें कुंतीविषयीं पांडवापाशीं भाषण—त्याजवर पांडवांचें उत्तर—कुंतीचा विलाप—विदुराचा आणि तिचा संवाद—धृतराष्ट्रविदुरांचा पांडव वनास कसे गेले या संबंधानें संवाद—नारदागमन—कौरववंशनाशकथन—तत्प्रयाण—धृतराष्ट्र व संजय यांचा संवाद.
एकंदर ग्रंथसंख्या		६८०	

मोरोपंतकृत महाभारत.

सभापर्व.

अध्याय पहिला.

(गीतिवृत्त.)

पांचाळीपतिस[1] म्हणे मय[2], 'कांहीं सांग आपुली सेवा[3].' ।
पार्थ म्हणे, 'सख्य असो, अथवा हें[4] माग यादवा[5] देवा.' ॥ १
श्रीपति[6] त्यास[7] म्हणे, 'तूं शिल्पचमत्कारकोटिजनक[8] मया! ।
निर्मुनि दे रुचिरसभास्थाना[9] निर्दोषरत्नकनकमया[10].' ॥ २
आज्ञा करुनि असी, प्रभु[11] भेटवुनी[12] सबहुमान धर्मातें ।
स्वपुरीं[13] जाय; मग करी भगवदुदित[14] कार्य विश्वकर्मा[15] तें. ॥ ३
देवांनींहि करावा ज्याच्या[16] स्वेष्टार्थ[17] नवस भाल्यातें, ।
अनृणत्वार्थ[18] मयासुर निर्मुनि दे दिव्य नव सभा त्यातें[19]. ॥ ४
स्थळ तें जळ, जळ तें स्थळ भासे, जीमाजि रत्नसारसभा[20] ।
भुलवी भ्रमरां अमरांसहि, ती चित्राचि[21] रत्नसार[22] सभा. ॥ ५
भीमाला आणुनि[23] दे वृषपर्व्याच्या[24] गदोत्तमगदेतें[25], ।
म्हणति रिपु जिचें दर्शन आधीं भय, मृत्यु तेंहि मग देतें. ॥ ६

---

१. अर्जुनास. २. मयासुर. दानवांचा कारागीर. (विश्वकर्मा.) ३. चाकरी, कामगिरी. ४. जें कोणतें काम करावयाचें तें. ५. कृष्णाला. ६. कृष्ण, माधव. ७. मयासुराला. ८. कोटि शिल्पचमत्कारांचा निर्माणकर्ता. ९. सुंदर सभागृहाला. १०. निर्मल रत्न आणि सुवर्ण ह्यांनीं युक्त अशा. प्रत्ययाचा अर्थ 'विशिष्ट,' 'युक्त,' 'परिपूर्ण' असा आहे. ११. कृष्ण. १२. कृष्णानें धर्मापाशीं मयासुराला नेवून भेटवून. १३. द्वारकेंत. १४. श्रीकृष्णानें सांगितलेलें काम. १५. विश्व हें कर्म ज्याचें तो, शिल्पपंडित मयासुर. १६. ज्या अर्जुनाच्या. १७. आपल्या कल्याणाकरितां. १८. खांडववनदाहप्रसंगीं अर्जुनानें संरक्षण केलें, या ऋणांतून मुक्त होण्याकरितां. १९. त्या अर्जुनातें. २०. रत्नरूप कमलांची प्रभा. २१. चित्रविचित्र. २२. रत्नमयी. २३. कैलासपर्वताच्या उत्तरेस मैनाकपर्वतावर बिंदुसरोवरीं वृषपर्वा नामक दानवानें ठेविलेली गदा मयासुरानें भीमाला आणून दिली. २४. असुरांचा अधिपति. २५. गदेमध्यें श्रेष्ठ जी गदा तीतें.

दे देवदत्तशंख[1] स्वत्रात्या[2] **अर्जुनास** दास **मय**, ।
घे मागोनि असें कीं, 'मज भेटीला असो सदा समय.' ॥ ७
त्या **मयसभेंत** शोभे **धर्म**, सुधर्मासभेंत[3] वासवसा[4]; ।
बुध अन्योन्य[5] म्हणति, 'कां जातां? या; हाचि नाकवास[6], वसा[7].' ॥ ८
अर्थिजनासह[8] धाडुनि गुण, दे साधूंसि **धर्म** सहवास, ।
कमलाकर[9] मधुपांतें[10] जेंवि प्रेषूनि[11] वायुसह वास. ॥ ९
नव नव नवल कराया न धरो लेशहि ईचीच[12] आळस भा[13], ।
राजर्षि महर्षि सकळ येथें[14], न्यूनाचि भूमिपाळसभा. ॥ १०
नित्य नवेचि महोत्सवकोटींचे त्या सभेंत भरे[15] भरती. ।
विस्तर[16] कशास? परि हरिदासगृहींची उदंड[17] भरभर[18] ती. ॥ ११
तेथें ज्ञानविशारद[19] शारदशशिगौर[20] गौरवार्ह[21] कवी[22] ।
दुस्तरभवाब्धिपारद[23] **नारद** येवुनि सुनीतिला[24] शिकवी. ॥ १२
तच्चरण[25] प्रक्षाळुनि, जें चिंतिति परे[26] महर्षि, तें पाणी ।
सेवूनि, जोडिले कुरुकुळतिलकें[27] परमहर्षितें[28] पाणी[29]. ॥ १३
तो मुनि **धर्मासि** म्हणे, 'वात्सल्य[30] करी पिता परम तोकीं[31], ।
तैसें भवान्[32] स्वराष्ट्रीं करुनि निवारुनि ताप रमतो कीं[33]? ॥ १४

---

१. हा महाशंख वरुणाचा होता. २. आपलें रक्षण कर्त्यास. ३. देवसभेंत. ४. इंद्रासारखा. ५. एकमेकांस. ६. स्वर्गवास. ७. रहा. ८. याचकांबरोबर. ९. सरोवर. १०. भ्रमरांतें. ११. धाडून. १२. या मयसभेची. १३. शोभा. १४. या सभेंत अनेक राजर्षि आणि महर्षि होते. देवल, असित, शुक, जैमिनि इत्यादि वेदवेदांगपारग महर्षि आणि मुंजकेतु, उग्रसेन, दुर्मुख इत्यादि राजर्षि होते. १५. उत्कर्ष पावती. १६. एकादी कथा विस्तारानें वर्णन करण्याजोगी असली तरी कांहीं निमित्त योजून तिचा विस्तार करावयाचा नाहीं, असा पंतांचा परिपाठ आहे, त्याचें हें एक उदाहरण होय. १७. विपुल, पुष्कळ. १८. भरभराट, समृद्धि, चढती कळा. १९. सर्वशास्त्रनिपुण. २०. शरदृतूंतील चंद्रासारिखा स्वच्छ आहे गौरवर्ण ज्याचा. २१. सत्कारास योग्य. २२. सुज्ञ, पंडित, अनागतदर्शी. २३. तरून जाण्यास कठीण अशा भवसमुद्राचे पैलतीरास नेणारा. २४. ही नारदनीति मूळसभापर्वाच्या पांचव्या अध्यायांत आहे. नारदानें प्रश्नरूपानें धर्मास ही राजनीति सांगितली असून प्रत्येक प्रश्न 'कच्चित्' (कीं काय) या शब्दानें केला आहे, म्हणून हिला 'कच्चित्प्रश्न' असें नांव पडलें आहे. २५. त्या नारदाचे चरण. २६. श्रेष्ठ. २७. कुरुवंशांतील श्रेष्ठ अशा धर्मराजानें. २८. अतिआनंदयुक्त (धर्मानें.) २९. हात. ३०. प्रीति. ३१. अपत्याचे ठायीं. (बालकीं.) ३२. आपण. 'भवान्' तृतीय पुरुष आहे म्हणून 'रमतो' असें क्रियापद आहे. ३३. मूळांत 'कीं'बद्दल 'कच्चित्' शब्दाचा प्रयोग केला आहे.

जे [1]राजधर्म [2]सुरतरुसख [3]मखसे [4]सुखद [5]उत्सवद नाकीं ।
त्यांसि जपोनि [6]गुरूच्या देसी यश परमशुद्ध वदना कीं? ॥ १५
वर्तत आले जैसे [7]पूरुकुलज साधु **भीष्म**पर्यंत ।
वर्तसि तसेंचि कीं ? तूं करिसी कीं [8]सद्यशोर्थ [9]अर्यंत ? ॥ १६
नाम खरें केलें कीं ? सुखद जसा मेघ [10]कोटिकेकींतें ।
[11]सुयशा तसा कवींतें, सद्यश कवणा नको ? टिके कीं ? [12]तें.' ॥ १७
धर्म म्हणे, 'गुरुराया! बहु काय वदों तुम्हापुढें देवा!? ।
तुमचा प्रसाद इच्छुनि करितों [13]सत्रास दास मी सेवा. ॥ १८
[14]युष्मत्पद राजपद प्रभुजी ! करितों जपोनि [15]परिचरण ।,
मी तों अशक्त मंदचि, तुमचे [16]श्रितकल्पवृक्ष परि चरण.' ॥ १९
यापरि वदोनि [17]हितमितवर्णा [18]कर्णामृता खऱ्या वचना ।
मुनिस म्हणे **धर्म**, 'तुम्हीं विश्वाची सर्व जाणतां रचना. ॥ २०
मयकृत सभा जसी हे, ऐसी कीं, ही परीस जरि बरवी ।
कोठें असेल सांगा, सत्य [19]जगच्चक्षु तूं, असा न रवी.' ॥ २१
हांसोनि म्हणे **नारद** भूवरि तों हेचि दिव्यरुचि, राजा ! ।
ऐक, सभा तुज कथितों देवांच्याही परीस [20]रुचिरा ज्या. ॥ २२
[21]शक्रसभा [22]सार्धशतकयोजनदीर्घा, तशीच विस्तीर्णा ।
शतयोजनें, [23]तदाश्रित [24]जनता ती [25]सर्वदुःखनिस्तीर्णा. ॥ २३

---

१. राजगुण—कार्योपदेशकौशल, प्रागल्भ्य, मेधावित्व, नीतिशास्त्रज्ञत्व, झालेल्या आणि होणाऱ्या गोष्टीचें ज्ञान, इत्यादि राजगुण. २. कल्पवृक्षाचे मित्र. ३. यज्ञसे. ४. सुख देणारे. ५. हर्ष देणारे. ६. पित्याच्या. ७. पुरुकुलांत झालेले, पुरुवंशज. ८. चांगल्या यशाकरितां. ९. शत्रूंचा नाश. (अरि + अंत.) १०. कोटिमयूरांना. ११. उत्तम यश देणारा. (धर्माचें विशेषण.) १२. सुयश. १३. सभय. १४. आपले चरण. १५. सेवा. १६. आश्रितांस कल्पतरूसारिखे. परि तुमचे चरण श्रितकल्पवृक्ष होत—असा अन्वय. १७. हितकर अशीं परिमित अक्षरें ज्याच्या ठायीं असें. ('वचना' या शब्दाचें विशेषण.) १८. कानास अमृतासारखें असें. १९. 'जगच्चक्षु' असें सूर्यास म्हणतात, परंतु तूंच जगच्चक्षु सत्य, सूर्य नव्हे. कारण तूं भ्रमण करून सर्व विश्व पाहणारा आहेस. २०. सुंदरा. २१. इंद्राची सभा. सभापर्व अध्याय ७ यांत इंद्रसभेचें वर्णन आहे. २२. अर्धसहवर्तमान शतक, दीडशें योजनें लांब असी. २३. त्या सभेचा आश्रय करून असलेली. २४. जनसमूह. २५. सर्वदुःखांतून पार पडलेली.

वाल्मीकिमुनि पराशर दुर्वासा याज्ञवल्क्य [1]मूर्तमख ।
तेथें शुक्र बृहस्पति जलद हरिश्चंद्र, सर्व [2]वायुसख. ॥ २४
तीमाजि अप्सरोजन नाचे, गंधर्ववृंद [3]आलापी, ।
या [4]सुरसा [5]सुरसा जन [6]सुकृती [7]आतृप्ति तेथ आला पी. ॥ २५
[8]कोट्यब्द तपश्चर्या करितां [9]तनु रात्रिदिवस भागावी, ।
क्षणमात्र ती पहावी अशि सुखदा, फार किति सभा गावी? ॥ २६
धर्मा! [10]यमधर्मसभा [11]शतयोजनविस्तृता अशी मोटी, ।
राजर्षिब्रह्मर्षिप्रवरांच्या जींत नांदती कोटी. ॥ २७
जींत ययाति नहुष नळ शिबि जनक भरत [12]मंदालसातनय ।
मुचकुंद दाशरथि नृग निमि शंतनु पांडु कुशिक वैन्य गय.॥ २८
[13]वरुणसभाहि असीच [14]प्रल्हादप्रमुख दिति[15]दनुज राजे ।
तेथें वासुक्यादिक वसति अहि ख्यात कुरुकुलवरा! जे. ॥ २९
गंगा यमुना विदिशा इत्यादि नद्या उपासिती वरुणा, ।
त्यांवरि वरुणसभेची वत्सावरि [16]सुरभिची तशी करुणा. ॥ ३०
धर्मा! जी [17]धनदसभा, तीही [18]शतयोजनायता रम्या, ।
[19]शम्यानंदकरी [20]शिवपदपूता [21]तज्जनेतरागम्या. ॥ ३१
[22]शिवसखसभेंत निरुपम सुख; सुर मुनि सिद्ध [23]मूर्तनग वसती, ।
तेथेंचि ते पहावे जे जे [24]अन्यत्र संत न [25]गवसती. ॥ ३२

---

१. मूर्तिमंत यज्ञ. २. वायु मित्र (सखा) ज्यांचा ते पावक (अग्नि). हे सत्तावीस आहेत. त्यांची नांवें:—अंगिरा, दक्षिण, गार्हपत्य, आहवनीय, निमर्थ्य, वैद्युत, शूर, संवर्त, लौकिक, जाठर, विषग, क्रव्याद्, क्षेमवान्, वैष्णव, दस्युमान्, बलद, शांत, पुष्ट, विभावसु, ज्योतिष्मान्, भद्र, भरत, स्विष्टकृत्, वसुमान्, क्रतु, सोम, आणि पितृमान्. ३. आलापाची जोड करी. ४. उत्तम रसाला. ५. देवाप्रमाणें. ६. भाग्यशाली, पुण्यवान्. ७. तृप्ति होईपर्यंत. ८. कोटि वर्षें. ९. देह. १०. यमाची सभा. हिचें वर्णन सभापर्वाच्या ८ व्या अध्यायांत आहे. ११. शंभर योजनें विस्तीर्णा. १२. अलर्क. १३. वरुणसभेचें वर्णन सभापर्वाच्या ९व्या अध्यायांत आहे. १४. प्रल्हाद आहे मुख्य ज्यामध्यें असे. १५. दैत्य. १६. कामधेनूची. १७. कुबेरसभा. सभापर्व अध्याय १० यांत हिचें वर्णन आहे. १८. शंभर योजनें लांब. १९. साधूंस आनंद करणारी. २०. शिवपदानें पवित्र अशी. २१. त्या शमिजनावांचून जे दुसरे त्यांस अगम्य (प्रवेश करण्यास कठीण असी). २२. शिवाचा मित्र जो कुबेर त्याच्या सभेंत. २३. मूर्तिमंत पर्वत (हिमवान्, पारियात्र, विंध्य, कैलास इत्यादि पर्वत. अध्याय १० श्लोक ३१–३३). २४. इतर ठिकाणीं. २५. सांपडती.

सुखगीतनृत्य तेथें, मजलाही तोचि एक थारा हो, ।
स्मरला [1]स्मरहर, भरला कंठ, न वदवेचि ते कथा राहो. ॥ ३३
जो हा भगवान् तेजोमंडलरूपी जगास [2]भासविता ।
कथिता झाला [3]पूर्वी [4]मद्गुरुची मज अगा! सभा [5]सेविता; ॥ ३४
[6]तद्दर्शनकामुक मी पुसता झालों उपाय [7]तपनातें; ।
वदला रवि कीं, 'तप कर, [8]जपनातें किति? समर्थ तपनातें.' ॥ ३५
केलें [9]तप [10]तपनोदित [11]दशशतवर्षें हिमाचळीं, मग मी ।
झालों [12]कृतकृत्य, तपीं बहु शक्ति, न पारिजातकीं [13]अगमीं. ॥ ३६
ब्रह्मसभाचि [14]गुरुसभा, [15]तन्न्यूना वर्णिल्या सुरसभा ज्या; ।
[16]देव्युत्थ शाकभाज्या किंवा [17]हे शाक या सुरस भाज्या. ॥ ३७
प्रभुमूर्ति सभा झाली पुरवाया काम [18]दासभावाचे, ।
याहुनि न वर्णवे बहु माझ्या ती [19]कामदा सभा बाचे. ॥ ३८
जें जें असे त्रिलोकीं [20]जंगम कीं [21]स्थाणु सर्व तें [22]व्यक्त ।
म्यां [23]पाहिलें नृपा! हरिमूर्तींत जसेंचि पाहतो भक्त. ॥ ३९
कथिल्या विलोकिल्या ज्या त्याच सभा तूज पांच वीरा! या; ।
येथें तुझीहि अधिका जसि त्या चौघींत पांचवी राया!' ॥ ४०
धर्म म्हणे, 'गुरुराया! पुरवीं [24]मोझीहि ही दुजी [25]ओळ, ।
त्वां **यम**धर्मसभेंतचि कथिले कीं [26]प्रायशः [27]क्षमापाळ. ॥ ४१
वरुणसभेंत **दिति दनुज**, [28]सरिदब्धिव्याल वर्णिले लक्ष; ।
[29]**धन**पतिसभेंत गुह्यक राक्षस गंधर्व [30]अप्सरा [31]त्र्यक्ष. ॥ ४२
ब्रह्मसभेंत महर्षि श्रुतिशास्त्रें मूर्तदैवतें सर्व ।
शक्रादि लोकपालक कथिले, मुनि [32]वालखिल्य [33]हरि [34]शर्व. ॥ ४३

---

१. शंकर. (मदनाला हरण करणारा.) २. प्रकाशित करणारा. ३. कृतयुगांत. ४. माझ्या पित्याची. (ब्रह्मदेवाची.) ५. सूर्य. ६. त्या ब्रह्मदेवाच्या सभेस पाहण्यास उत्सुक. ७. सूर्यातें. ८. ब्रह्मनामाचा जप हें नातें किती? तप हेंच नातें समर्थ, एवढ्याकरितां तप कर. ९. ब्रह्मव्रत. १०. सूर्यानें सांगितलेलें. ११. एकहजार वर्षें. १२. कृतार्थ. १३. वृक्षाचे ठायीं. १४. मोठी. १५.तीहून कमी. १६. शाकंभरी देवी(पार्वती)पासून झालेल्या. १७. मनुष्यांच्या. १८. दासबंधूचे. १९. इच्छित देणारी. २०.जाग्यावरून हालणारें. २१. स्थावर, न हालणारें. २२. स्पष्ट. २३. अध्याय ११ श्लोक ५३. २४. 'माझी दुजीहि ही आळ' असाही पाठ आहे. २५. आवड. २६. बहुधा. २७. राजे. २८. नद्या, समुद्र आणि सर्प. २९. कुबेराच्या सभेंत. ३०. सभापर्व–अध्याय १२ श्लोक ४. ३१. त्र्यंबक. (महादेव.) ३२. अंगुष्ठमात्रप्रमाण असा साठहजार ऋषींचा समुदाय. हे ऋषि पार्वतीलावण्यानें मोहित झालेल्या ब्रह्मदेवाच्या वीर्यापासून उत्पन्न झाले. ३३. विष्णु. ३४. शंकर.

इंद्रसभेंत सकळ सुर गंधर्व वराप्सरा [1]परमहर्षीं ।
त्यांत हरिश्चंद्र नृपति एकचि [2]सुरनाथसा [3]परमहर्षी. ॥ ४४
पुण्य हरिश्चंद्राचें काय? प्रिय ज्यास्तव [4]त्रिदशपतिला ।
हें सांगोनि स्वामी! या शिष्याच्या [5]प्रमोद द्या मतिला.' ॥ ४५
देवर्षि म्हणे, 'नृप तो [6]सम्राट् प्रभु [7]राजसूयमखकर्ता, ।
इतर [8]करद [9]पर [10]दमिता एक हरिश्चंद्र [11]सर्वभूभर्ता. ॥ ४६
सत्कार हरिश्चंद्रीं पाहुनि तव तात **पांडु** वदला हें ।
कीं, 'सांग सुतासि मुने! जेणे तैसेंचि मीहि पद लाहें.' ॥ ४७
सुरपतिसभेंत भोगुनि सौख्य तव पिता [12]महोत्सवें [13]साधो ।
[14]हें, नांदसील तूंही [15]सपितृप्रपितामहासवें साधो! ॥ ४८
हा राजसूयमहिमा, परि याची सिद्धि दुर्घट स्पष्ट, ।
[16]बहुविघ्न[17]क्षत्रक्षयकर्ता बहु मगहि पावतो कष्ट.' ॥ ४९
सांगोनि असें गेला[18] [19]मुनि, **कृष्ण** पहावयासि तेथूनी; ।
कीं सुज्ञहि न [20]असे जे घेती भरवुनि [21]निजास्य ते [22]थूंनीं. ॥ ५०
धर्म म्हणे, 'कष्ट घडो, हो जें होणें असेल, परि तात ।
व्हावा [23]पूर्णमनोरथ, सत्पुत्र [24]गुरूक्त सर्व [25]करितात.' ॥ ५१
पुसतां ऋत्विग्, बंधु, **व्यास**, सचिव, आप्त, म्हणति, '[26]देवा! हूं. ।
[27]ईशगुरूक्तकरांस [28]व्यसननदी सर्वथा न दे वाहूं.' ॥ ५२

---

१. श्रेष्ठमुनि. २. इंद्रासारखा. ३. मोठा आनंदी. ४. इंद्राला. ५. आनंद. ६. सार्वभौम. 'सम्राट्'शब्दाची व्याख्या:—'येनेष्टं राजसूयेन मंडलस्येश्वरश्च यः । शास्ति यश्चाज्ञया राज्ञः स सम्राडिति शब्द्यते ॥,' म्ह० ज्यानें राजसूय यज्ञ केला, जो द्वादश राजमंडलांचा प्रभु व जो सर्व राजांस आपल्या आज्ञेंत ठेवितो, त्याला 'सम्राट्' म्हणावें. ७. राजसूय यज्ञ करणारा. (राजानें अभिषेकद्वारा करावयाचा जो यज्ञ तो, अथवा राजा म्हणजे लतात्मक सोम, याचें सवन म्ह० कंडन करतात ज्यांत तो यज्ञ.) ८. करभारदेणारे. ९. शत्रु. १०. दमन करणारा. ११. सर्व पृथ्वीचा पति. १२. महायज्ञानें. १३. संपादन करो. १४. इंद्राला प्रिय असणें हें. १५. तात आजा पणजा यांसहवर्तमान. १६. ज्यांत पुष्कळ विघ्नें आहेत तो. १७. क्षत्रियांचा नाश. १८. दाशार्हनगरीप्रत. (दाशार्हाची-कृष्णाची नगरी द्वारका.) १९. नारद. २०. असे नारदसमान स्पष्टवक्ते; ते सुज्ञही तथापि थूनीं मुख भरवून घेती. २१. आपलें मुख. २२. थुंकीनें. २३. ज्याचे हेतु सफळ झाले असा. २४. गुरूनें (बापानें) सांगितलेलें. २५. हा चरण सुभाषितरूप आहे. २६. हे धर्मराजा. २७. समर्थ जो गुरु त्याचें भाषण करणाऱ्यांस. २८. व्यसनरूप नदी.

धर्म म्हणे, 'सिद्धि भजे [1]यन्मंत्रा, जेंवि [2]वासवा [3]रंभा, ।
त्या [4]स्वसल्या प्रथम पुसों मंत्र, मग करूं [5]शिवा [6]सवारंभा.' ॥ ५३
करुनि विचार असा [7]पटु दूत [8]द्रुत धाडिला [9]मुरारिकडे, ।
ज्याच्या चरणस्मरणें [10]अत्यघटित सर्वकार्यसिद्धि घडे. ॥ ५४
तो इंद्रसेन[11]नामा दूत नव्हे, [12]शुद्ध भाव [13]रायाचा, ।
कीं [14]तद्भक्तिवधूचा हार [15]श्रीवल्लभा वरायाचा. ॥ ५५
[16]मधुपास जसा [17]पद्माप्रति आणी, बळ करूं नदे वास, ।
घेवुनि आला धर्माप्रति अत्युत्सुक करून [18]देवास. ॥ ५६
त्या [19]संकल्पबिभीषणरामातें [20]सन्मनोभिरामातें ।
धर्म कथी [21]पितृवाचिकजनितोत्कटराजसूयकामातें. ॥ ५७
कृष्ण म्हणे, '[22]कुरुराया! धन्य म्हणतसे [23]सदैव शक्र तुला, ।
तूं न करिसील बापा! स्वगुणांहीं कोणत्या [24]वशे [25]क्रतुला? ॥ ५८
परि एक जरासंध प्रबळक्षितिपाळ काळ आजि तसा, ।
त्याचि पळालों [26]त्रासें, ज्या आम्हां बहु तुम्हीं [27]सभाजितसा. ॥ ५९
करिति जतन वतन, [28]पतन मत न भल्याला, तथापि तें वरिती; ।
त्यजिली स्वराजधानी मथुरा [29]अमरावतीच भूवरि ती. ॥ ६०
[30]हरं आर्जवोनि तेणें राजे [31]षडशीति कोंडिले असती, ।
हरणार [32]असु हरुनि [33]वसु [34]तदसिलता, न [35]गणिका तसी [36]असती. ॥ ६१
[37]मूर्धाभिषिक्त राजे पशुसे षडशीति बद्ध आहेत, ।
[38]पशुपतिपुढें वधावे शत, ऐसा त्या [39]कुबुद्धिचा हेत. ॥ ६२

---

१. ज्याच्या मसलतीस. २. इंद्राला. ३. अप्सरोविशेष. ४. कृष्णास. ५. मंगलप्रद. ६. यज्ञारंभा. (सव=यज्ञ.) ७. कुशल. ८. सत्वर. ९. कृष्णाकडे. १०. घडण्यास बहु कठीण असी. ११. धर्माचा सारथि. १२. निर्मल प्रेमभाव. 'साच भाव रायाचा' असाही पाठ आहे. १३. धर्माचा. १४. त्या धर्माची कृष्णाविषयीं जी भक्ति हीच वधू तिचा. १५. लक्ष्मीनाथास. १६. भ्रमराला. १७. कमळाकडे. १८. कृष्णाला. १९. संकल्परूप बिभीषणाच्या रामास. २०. सज्जनांच्या मनाला आनंद देणाऱ्यातें. २१. पित्याच्या निरोपानें उत्पन्न जहालेला प्रबळ असा राजसूययज्ञकाम जो त्यातें. २२. धर्मराया. २३. निरंतर. २४. स्वाधीन. २५. यज्ञाला. २६. भयें. २७. पूजित आहां. (सभाजन=पूजन.) २८. पतन भल्याला मत (मान्य) नाहीं, पण तें वरून वतन रक्षितात. २९. इंद्राची राजधानी मथुरा ही भूमीवरील अमरावतीच होय असा भाव. ३०. शंकर. ३१. शायशीं. ३२. प्राण. ३३. धन. ३४. त्या जरासंधाची असिलता (तरवार). ३५. वेश्या. ३६. जारिणी. ३७. पट्टाभिषिक्त, ज्यांच्या मस्तकावर राज्यपदारोहणसमयीं अभिषेक झाला ते. ३८. शंकरापुढें. ३९. दुष्टा जरासंधाचा.

त्वां राजांला मुक्त न करितां, त्या न वधितां जरासंधा ।
साम्राज्य राजसूयें कैचें, इतरां सुदुस्तरा [1]संधा.' ॥ ६३
धर्म म्हणे, 'अघटित तूं म्हणसि, तरि घडेल काय अन्यास? ।
तरि राजसूय राहो, दे आज्ञा ध्यावयास संन्यास.' ॥ ६४
भीम म्हणे, 'देवा! कां माझ्या अवमानितोसि बाहूंतें? ।
वर्णिसि मनमानेसें, चाल जरासंधतेज पाहूं तें. ॥ ६५
अथवा हें किति? त्याला जो तूं निजबाहुंचा अनादरिता, ।
[2]येच्छितधनुचा न हरुनि रिपुयश फिरला कधीं न नाद रिता.' ॥ ६६
कृष्ण म्हणे, 'गा! भीमा! मतिबळ बळ हेंचि मान्य सुकवीतें, ।
भुजबळ तें एखादेसमयीं तत्काळ ओंठ [3]सुकवीतें.' ॥ ६७
जिष्णु म्हणे, 'परि एकचि हें आम्हां [4]त्वदनुगांसि [5]गा! ठावें ।
सर्वत्र तूं यशस्वी, त्वद्दासें यश सुखेंचि [6]गांठावें. ॥ ६८
[7]दुर्घट अरिपरिभव, अजि [8]अजित [9]यशस्वींद्र तूं परि सहाय, ।
म्हणवील काय [10]लोहांकरवींहि कधींतरी परिस [11]हाय? ॥ ६९
देशिल यश [12]मद्धनुतें, अभिमानी तूं वृकोदरगदेतें; ।
अयशें [13]सिंहासनग न [14]वपु हर्ष यशें [15]वृकोदरग [16]देतें.' ॥ ७०
धर्म पुसे, प्रभु सांगे, [17]मगधवरोत्पत्ति ती अशी परिसा. ।
'होता बृहद्रथनृपति, सद्गुणसंपन्न विक्रमी [18]हरिसा. ॥ ७१
[19]अनपत्यत्वसुदुःखित तो वरदा चंडकौशिकाऋषितें ।
सुखवी, करोनि सेवा चित्तें [20]सुतदर्शनामृतीं [21]तृषितें. ॥ ७२
'माग वर' असें म्हणतां, सुतवर मागे नृपाळ तो नमुनी; ।
[22]अमृततरुतळीं होता ध्यानस्थ क्षण [23]तपोनिधान मुनी. ॥ ७३

---

१. प्रतिज्ञा. २. ज्या अर्जुनानें धरलेल्या धनुष्याचा. ३. शुष्क करितें. ४. तुझ्या सेवकांस. ५. हें 'आम्हां त्वत्पदानुगां ठावें' असाही पाठ आहे. ६. सेवावें. ७. 'दुर्घट अरिपरिभवसव' असाही पाठ आढळतो. ८. अजिंक्य. (न जिंकलेला असा.) ९. यशस्वी जनांत श्रेष्ठ. १०. लोखंडाकडून. ११.हाय हाय असें. हें अर्ध सुभाषितरूप आहे.१२.माझ्या धनुष्याला.१३.सिंहासनस्थ. १४. शरीर. सिंहासनग वपु अयशें हर्ष न देतें, पण वृकोदरग (वपु) यशें (हर्ष देतें)–असा अन्वय. १५.लांडग्याच्या उदरांत गेलेलें (वपु).१६. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे.१७.जरासंधाची जन्मकथा. १८. इंद्रासारखा. १९. अपुत्रत्वानें दुःख पावलेला. २०. पुत्रदर्शनरूप अमृताविषयीं. २१. तान्हेल्यानें. २२. आम्रवृक्षाखालीं. 'आम्रतरुतळीं होता' असाही पाठ आहे. २३. तपोराशि.

तों [1]अंकीं आम्राचें एक सरस फळ गळोनि उतरे, तें ।
देवुनि म्हणे मुनि, 'असो [2]येणें, जरि तुज न होय सुत रेतें; ॥ ७४
पावेल पुत्ररूपें हें फळ परिणाम, दे [3]स्वजायेतें. ।
जा, निश्चयें नराकृति होवुनि सुख यश गृहीं तुझ्या येतें.' ॥ ७५
बुडतां जों चिंतेच्या झालें अद्भुत [4]अलाबु ओघीं तें. ।
देता झाला राजा स्वकरें समभाग करुनि [5]दोघींतें. ॥ ७६
[6]अंतर्वत्नी पत्नी झाल्या, व्याल्या [7]सुपुत्रफळशकलें ।
त्यजिलींहि दूर, परि [8]मुनिवच भंगाया न दैवबळ शकलें. ॥ ७७
रात्रीं शकलें त्यजिलीं अश्रुसह [9]चतुष्पथांत दायांनीं; ।
तों राक्षसी जरा ये, काय करावें नृपा ! तदा यांनीं ? ॥ ७८
न्यावीं खावीं व्हावीं [10]सुवहें शकलें म्हणोनि तीं जोडी; ।
तों तीं जडलीं, धर्मा ! मुनिवचनीं काय शक्ति ही थोडी ? ॥ ७९
आला न सत्प्रसादीं कोणालाही कधींहि तोटा हो ! ।
झाला कुमार अद्भुतरूप, करी तत्क्षणींच तो टाहो. ॥ ८०
[11]बर्हिवनीं [12]घनरवसा गेला अंतःपुरांत तो टाहो; ।
होय सुकाळ सुखाचा पडला होता मुहूर्त तोटा हो ! ॥ ८१
मागोनि घे सुतातें नृप पसरुनि राक्षसीपुढें पदर, ।
विप्रप्रसाद निर्भय, नाहीं तरि गजहि [13]तन्मुखीं [14]बदर. ॥ ८२
नाम [15]जरासंध असें त्याकरितां, उपजला असा राया ! ।
कथिल्या [16]तद्वीर्यकथा म्यां साच, नव्हेत गा ! [17]असारा या. ॥ ८३
बहु काय वदों ? [18]कन्यापतिकंसविनाश ऐकतां मागें ।
फेरे [19]एकोनशत स्वभुजबळें निजगदेसि दे रागें. ॥ ८४

---

१. मांडीवर, उत्संगावर. २. या फळानें. ३. आपल्या पत्नीला. ४. भोंपळा. ५. या दोघीजणी बायका काशीराजाच्या जुळ्या कन्या होत्या. ६. गर्भवती. ७. तुकडे. ८. मुनिवचन भंग करण्यास. ९. चवाठ्यावर. १०. वाहण्यास सोपीं. ११. मोरांच्या वसतिस्थानांत. १२. मेघशब्दसा. १३. त्या जरेच्या मुखीं. १४. बोर. १५. जरा नामक राक्षसीनें दोन शकलें सांधिलीं म्हणून 'जरासंध' असें नांव पडलें. (सभापर्व—अ० १८ श्लो० ११.) १६. त्या जरासंधाच्या पराक्रमाच्या गोष्टी. १७. सारहीन, निःसत्व, खोट्या. १८. जरासंधजामात कंस याचा विनाश. (जरासंधाच्या दोन कन्या अस्ति व प्राप्ति ह्या कंसास दिल्या होत्या.) १९. नव्याण्णव.

[1]एकोन योजनें शत टाकी [2]मथुरापुरींत, [3]अशनीची ।
शक्ति किती? दृष्टि तशी बहुधा उग्रा असेल न शनीची. ॥ ८५
परि भीमार्जुन मज दे, जातों, येतों करोनि कार्यातें, ।
परमोदार वृकोदरभुज यश देतील शीघ्र [4]आर्यातें.' ॥ ८६
कुंत्याशी धर्माज्ञा घेवुनि वेषेंच [5]विप्रता राया! ।
सत्वर तिघे निघाले [6]मगधपतिस ते कवि [7]प्रताराया. ॥ ८७
[8]गोष्टीं [9]हरिसे नगरीं शिरले मारावया मगधराजा ।
प्रथम असो [10]पत्यंतर [11]हननाश नसो म्हणे मग [12]धरा ज्या. ॥ ८८
चढले [13]गिरिव्रजाच्या [14]प्राकाराधारगिरिशिरीं हरिसे, ।
[15]ज्यांशि [16]सकृत् ताडुनियां ध्वनिला जन [17]एकमासवरि परिसे. ॥ ८९
[18]वृषरूप दैत्य मारुनि तच्चमें [19]साधु मढविले होते ।
अद्भुत तीन असे जे [20]दुंदुभि ताडोनि फोडिले हो! ते. ॥ ९०
भंगिति भुजप्रहारें [21]शृंगातें म्हणति जन '[22]मनूरा' ज्या; ।
शिरले पुरीं अमार्गें माराया [23]आम्रफलजनू राजा. ॥ ९१
राजगृहीं ते शिरले पाहुनि मगधेंद्रही म्हणे, 'यावें.' ।
मानुनि वेषें [24]स्नातक [25]भूसुर पूजावया उठे भावें. ॥ ९२
कृष्ण म्हणे, 'राया! हे दोघे मौनव्रती अदीन मुनी ।
वदतिल, सारुनि नियम, [26]प्रहरद्वय रात्रिचें [27]अतिक्रमुनी.' ॥ ९३
स्थापुनि [28]अग्निगृहीं मग, त्याकाळीं तो हुताग्नि [29]वर्चाया ।
काळासि विप्र मानुनि [30]आला, झालाहि सिद्ध [31]अर्चाया. ॥ ९४

---

१. एक उणा. २. मथुरेंत जेथें गदा पडली त्या स्थलास 'गदावसान' असें नांव आहे. (अ० ३ श्लो० २५.) ३. वज्राची. ४. कुंतीचे आशीर्वाद. ५. ब्राह्मणपणा. ६. जरासंधास. ७. ठकवाया. ८. गोष्ठ्यांत. ९. सिंहासारखे. १०. दुसरा पति. ११. वध करण्याची इच्छा ज्याला तो. १२. पृथ्वी. १३. स्थलविशेष. १४. तटबंदीसारखे जे सभोंवतीचे डोंगर त्यांचे शिखरावर. १५. ज्या नौबतींस. १६. एकवार. १७. ज्यांचा ध्वनि एक मासपर्यंत राहत असे. १८. वृषभाकार. १९. चांगले. २०. भेरी, नौबती. २१. शृंगासारखा उंच असा इमारतीवरील स्तंभ. २२. मनोरा. (ज्या शृंगातें 'मनोरा' म्हणती त्यास.) २३. आम्रफळापासून जन्म (जनु) ज्याचें त्या जरासंधाला. २४. सोडमुंज झालेला ब्रह्मचारी. २५. ब्राह्मण. २६. निशीथसमय. २७. घालवून. २८. यज्ञागारीं. होमशाळेंत त्या विप्रांस ठेवून जरासंध स्वगृहीं आला. २९. वर्च्च म्ह० तेज. तेजवान् करावयास, प्रज्वलित करावयास. ३०. राजगृहास आला. ३१. (त्या विप्रांची) पूजा करण्यास.

'कुशलं [1]स्वस्त्यस्तु' असें वदले [2]ते, प्रथम बसविले भूपें, ।
पुसिलें कीं, 'वेषें तों विप्र तुम्हीं, अन्य भासतां [3]रूपें. ॥ ९५
आलां पुरीं [4]अमार्गें कां? केला [5]शृंगदुंदुभिध्वंस? ।
ब्राह्मण तो [6]मन्नगरीं न क्षोभे, जेंवि [7]मानसीं हंस. ॥ ९६
पूजनहि घेत नाहीं कां? हो! या [8]भूमिदेवदासाचें ।
कोण तुम्हीं? क्षत्रिय कीं ब्राह्मण, राजापुढें वदा साचें.' ॥ ९७
[9]शौरि म्हणे, 'रिपुसदनीं [10]अद्वारें शिरति [11]बुध अगा राया! ।
द्वारेंचि [12]सुहृत्सदनीं, आलों तैसेचि कीं [13]अगारा या. ॥ ९८
घेऊं नयेचि [14]अरिकृतपूजा व्रत [15]आमुचें असें आहे.' ।
ऐसें श्रवण करुनि नृप वैर कसें काय हें मनीं पाहे. ॥ ९९
हांसोनि नृप म्हणे, 'हो! विप्रांचा शत्रु मी नव्हे [16]व्यक्त, ।
[17]सक्त [18]ब्राह्मणभजनीं आहें, त्यांचाचि सत्य हा भक्त.' ॥ १००
कृष्ण म्हणे, '[19]अस्मद्रिपु ते मोडिति [20]सेतुला [21]नरवरा! जे; ।
कां [22]कोंडिले पशुतसे? बहु रडति करोनि दीन [23]रवें राजे. ॥ १०१
[24]यज्ञ करावा मारुनि पशुसे नृप काय हें बरें कर्म? ।
येणें प्रसन्न शंकर? रे राजा! हा अधर्म कीं धर्म? ॥ १०२
ऐसें कोणींहि कधीं केलें नाहींच कर्म हें मागें, ।
तूं काय? भस्म येणें देवांसह होइजेल [25]हेमागें. ॥ १०३
जरि हा स्वधर्म ऐसें [26]त्वन्मत, तरि हें बरेंचि; राया! हो. ।
आम्हां [27]भवदाज्ञा कीं, 'यज्ञ करा, मज करें चिरा, या हो!' ॥ १०४

---

१. कल्याण असो. दुसरा अर्थः—(हे राजा) अत्यंत (सु) अविनाशि (अस्ति) असें जें (मोक्षपद) तें तुला निर्विघ्नपणें (कुशलं) असो. कृष्णासमक्ष मरणाराला मोक्षपदप्राप्ति अवश्य होते ह्या समजुतीस अनुसरून हें वर्णन आहे. २. विप्रवेषी पांडव. ३. तेजें. ४. आडमार्गानें. ५. मनोरा व दुंदुभि यांचा नाश. ६. माझे नगरीं. ७. मानससरोवरीं. ८. विप्रांच्या (भूमिदेवांच्या) सेवकाचें (माझें.) ९. कृष्ण. (सभापर्व—अ० २१ श्लो० ४९.) १०. द्वाराशिवाय अयोग्य अशा इतर मार्गानें. (यावरून वैरभाव दर्शविला.) ११. धीर पुरुष, ज्ञाते. (सभापर्व—अ० २१ श्लो० ५३-५४.) १२. मित्राच्या घरीं. १३. घरास. १४. शत्रूनें केलेली पूजा (अर्हणा). १५. जे कार्यवंत (आमच्यासारखे) असतात त्यांचें व्रत (नियम) असें कीं शत्रूनें केलेल्या सत्काराचा स्वीकार करूं नये. १६. स्पष्ट. १७. तत्पर. १८. विप्रांच्या सेवेंत. १९. आमचे वैरी. २०. धर्मसेतुला. २१. हे राजा. २२. कारागृहांत ठेविले. २३. शब्द. २४. रुद्रयज्ञ. २५. सुवर्णाचलानें. २६. तुझें मत. २७. तुझी आज्ञा.

तूं क्षत्रिय, आम्हींही शंभुप्रीत्यर्थ या [1]नव[2]क्रतुला ।
कां न करूं तुज मारुनि? सरळ वचन हें गमो न [2]वक्र तुला. ॥१०५
तोडावे बंध सकळ, सोडावे भूप, हात जोडावे, ।
[3]रायानें रक्षावे कीं दाटुनि धर्मसेतु मोडावे? ॥ १०६
मी शौरि, हा धनंजय, हाहि [4]तिजा नीट ओळख [5]गदीन. ।
या बळि[6]खगप्रभुपुढें सर्व बळी अन्य टोळ खग दीन. ॥ १०७
सोडावे नृप, अथवा [7]रथवाहगजादिराज्यसुखभोग; ।
हो सिद्ध शीघ्र, [8]समरासम राया! तुज न अन्य [9]हितें याग.' ॥ १०८
मागध म्हणे, '[10]मखार्थ [11]प्रोक्षितें नृपपशु भयें न सोडीन, ।
कर ईश्वरासि किंवा [12]तद्रूपब्राह्मणासि जोडीन.' ॥ १०९
ऐसें वदोनि [13]सनयीं [14]तनयीं राज्याभिषेक तो करवी; ।
त्यासि म्हणे, 'हर्षद हो सुहृदां, कमळांसि जेंवि [15]तोकरवी.' ॥ ११०
विस्तर असो. तयासीं भीमासीं बाहुयुद्ध आरंभे; ।
[16]पूर्वागत म्हणति किती हा उर्वशि! हा घृताचि! हा रंभे! ॥ १११
[17]आरंभ [18]कार्तिकाचा युद्धाचा [19]तुल्य वर्णिती संत, ।
[20]भूतातिथिदिवसांचा त्याहि [21]मगधभूमिजानिचा अंत. ॥ ११२
होते [22]हर्षविषादाकुलमानस सार्ध [23]घस्र तेरा जे ।
प्रभुनें केवळ हर्षाकुळ केले पुसुनि अश्रु ते राजे. ॥ ११३

---

१. नूतन यज्ञाला. २.वांकडें.३. हें गीत्यर्ध सुभाषितरूप समजावयाचें. ४. तिसरा.५. भीमसेन. (गदायुद्धांत जे प्रवीण वीर त्यांचा स्वामी.) ६. गरुडापुढें. ७. अश्वगजआदि राज्यासंबंधी जे सुखादि भोग ते. ८. युद्धासारखा. ९. हित करणारा. १०. यज्ञासाठीं. ११. उदकासिंचनानें पवित्र केलेले. १२. त्या ईश्वरासारख्या विप्रांस. १३.न्याययुक्तीं, सदाचारसंपन्न. १४. याचें नांव सहदेव. (अध्याय २२ श्लोक ३१.)१५. बालसूर्य. १६.स्वर्गातील कित्येक प्रेक्षक अप्सरांस म्हणाले कीं (हे) उर्वशि, घृताचि, रंभे, हा (मनुष्यवीर) पूर्वागत (युद्धांत मरण पावून प्रथम वरतीं स्वर्गात आला.) कारण युद्धांत ज्यांस मरण येतें त्यांस त्या वरणाऱ्या आहेत. १७. कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून त्रयोदशीपर्यंत तेरा दिवस मल्लयुद्ध करून भीमानें जरासंधास मारिलें. (अध्याय २३ श्लोक २९–३०.) १८. कार्तिक महिन्याचा. १९. सारखा. युद्धाचा आणि कार्तिकमासाचा आरंभ सारखा एकाच दिवशीं झाला. २०. भूतें (पिशाचराक्षसादि) आहेत अतिथि (पाहुणे) ज्या दिवसांत, त्या दिवसांचा आणि मगधभूमि आहे जाया (पत्नी) ज्याची असा जो जरासंध त्याचा अंत (नाश, शेवट) संत (साधुजन) तुल्य (समानकालीं झाला) असें वर्णन करतात. युद्ध सरल्यामुळें रक्तमांस खाणाऱ्या भूतांचे दिवसही गेले आणि जरासंधही मरण पावला. २१. मगधराजाचा. २२. भुजयुद्धांचा परिणाम कसा होईल याचा नियम नसल्यामुळें हर्षखेदयुक्त मानस असे राजे. २३. दिवस.

जो प्रथम तारकामयसंग्रामीं[1] जिष्णुविष्णुनीं[2] साजे, ।
तो रथ बृहद्रथसुतें[3] संपादुनि सर्व जिंकिले राजे. ॥ ११४
त्यावरि चढोनि देवुनि अभय जरासंधनंदना[4] अजितें[5], ।
आणुनि धर्मासि दिलें यश, आम्हांलाहि गावया अजि[6]! तें. ॥ ११५
त्याचि[7] रथावरि बैसुनि मग जाय द्वारकेशि केशिघ्न[8]; ।
तैं[9] शंभु म्हणे, 'याच्या मात्र जना भय न देवि! दे विघ्न.' ॥ ११६

अध्याय दुसरा.

मग जिष्णु उत्तरेला, जिंकाया भीम वासवाशेला[10], ।
सहदेव दक्षिणेला, वरुणदिशेलाहि[11] नकुळ तो गेला. ॥ १
कवि[12] म्हणति, 'चतुर्भुजभुज[13] जे धर्मसहाय[14] दक्ष[15] अजित[16] रणीं ।
ते हे[17] कीं चतुराशासुखद[18]; चतुर्मूर्ति[19] होय अजि तरणी[20]. ॥ २
हरिति रिपूंचे मदगद[21], पदें[22] न, दयासिंधु ते सुजनमहित[23], ।
झाले केवळ न दरद[24], बदरदहि[25] न गांजिला प्रणत[26] अहित[27]. ॥ ३
करुनि चतुर्दिग्विजय[28] द्रविणाचे[29] अमित[30] राशि जोडूनी, ।
ते स्वपुराला आले, विजित नृपांचेंहि मन न मोडूनी. ॥ ४

---

१. बृहस्पतिभार्या तारका (तारा) हीच आहे आमय (रोग, विनाशहेतु) ज्या संग्रामांत (युद्धांत). (सभापर्व—अ० २४ श्लो० १७.) २. इंद्र व विष्णु यांनीं. ३. जरासंधें. ४. सहदेवातें. ५. कृष्णानें. ६. हे राजा. ७. त्या जरासंधाच्या रथांत. या रथाचें वर्णन अध्याय २४ श्लोक १८-१९ यांत आहे. ८. केशिनामकराक्षसाचें हननकर्ता. (कृष्ण.) ९. जरासंधवध करून धर्माची आज्ञा घेतल्यावर. १०. वासव+आशा=वासवाच्या (इंद्राच्या) आशेला (दिशेला)= पूर्व दिशेला. आठ दिशांचे आठ पालक, पति, अथवा स्वामी आहेत. त्यांस 'अष्टदिक्पाल,' 'अष्टदिक्पति' असें म्हणतात. 'इंद्रो वन्हिः पितृपतिर्नैर्ऋतो वरुणो मरुत् । कुबेर ईशः पतयः पूर्वादीनां दिशां क्रमात्॥' (अमरकोश). ११. पश्चिमदिशेला. (वरुण हा पश्चिमदिशेचा पति.) १२. ज्ञाते, बुध. १३. चार आहेत भुज (बाहु) ज्याला तो चतुर्भुज (कृष्ण) त्याचे भुज. १४. धर्माला साहाय्य करणारे. १५. समर्थ. १६. रणामध्यें न जिंकलेले, पराजय न पावलेले. १७. पूर्वोक्त आर्येतील चवघे—भीम, अर्जुन, नकुल, सहदेव. १८. चार दिशांला सुख देणारे. १९. चार मूर्ति ज्याच्या तो. २०. सूर्य. (सूर्यानेंच चार रूपें धारण केलीं कीं काय—असा भाव.) २१. गर्वरूप रोग. २२. राजपद. २३. सज्जनांस पूज्य. २४. भयदायक. २५. बोर देणारा. (बोर देणाराही दुःख पावला नाहीं—असा भाव.) २६. शरण आलेला. २७. शत्रु. २८. चार दिशांचा जय. २९. द्रव्याचे. ३०. असंख्य, अगणित.

तैसेंच आणिलें बहु वित्त युधिष्ठिरपुरास दासजितें[1] ।
अजितें[2], अजि तें[3] त्यां[4] तत्प्रेम असा कौतुकी[5] सदा सजितें[6]. ॥ ५

धर्मपरें धर्मपरा धन दिधल्या काय दोष ? कर दे, हें[7]. ।
किति ? दासदास्यहि[8] करी श्रीशें[9] श्रीचित्तंतोषकर[10] देहें. ॥ ६

धर्म[11] प्रभु, न परें[12] प्रभु, जेणें केला प्रसिद्ध तो[13] करद[14], ।
मोठ्यामोठ्यांलाही बुडतां व्यसनाब्धिमाजि[15] जो करद[16]. ॥ ७

धर्म म्हणे, 'देवा ! तुज दीक्षा साजेल, मज न, यज्ञाची ।
हो सम्राट्[17] सर्वेशा ! दृष्टि निवो सर्वसवनयज्ञाची[18].' ॥ ८

कृष्ण म्हणे, 'राया ! तूं उचित अनुद्धत[19] न उद्धत क्रतुला[20], ।
योग्य न दुग्ध स्थानीं योजाया प्रियहि शुद्ध तक्र[21] तुला. ॥ ९

देवा[22] ! सेवाचि भली दे मज, दुसरी न घेववे दीक्षा, ।
सुखकीर्तिहेतु[23] आम्हां तव नवसवभूमिदेववेदीक्षा[24]. ॥ १०

करिन ब्राह्मणपादप्रक्षालन, सांवडीन[25] मी उष्टीं; ।
सर्वहि करीन, देहीं फल हेंचि, न अन्य या वृथापुष्टीं[26]. ॥ ११

कृतकृत्य[27] यांत आम्ही, हो तूं सम्राट् प्रभो ! अगाधबला[28] ! ।
हो त्वद्यशें[29] त्रिलोकी[30] राया ! कुरुसत्तमा ! अगा ! धबला[31].' ॥ १२

जैसी यज्ञेशाज्ञा[32] झाली कुरुसत्तमां अतिप्राज्ञा, ।
तैसीच सत्कुलोत्तमधौम्यद्वैपायनादिविप्राज्ञा[33]. ॥ १३

---

१. दासानें जिंकलेल्या अशा कृष्णानें. २. कृष्णानें. ३. कृष्णाला. ४. त्यांचें (दासाचें भक्तांचें) प्रेम. ५. कौतुक उत्पन्न करणारें. तें कौतुकी तत्प्रेम त्या असा सदा सजितें—असा अन्वय. ६.सज्ज करतें, सजवितें, शोभवितें. ७. कर देणें. ८.दासांची सेवा. ९. लक्ष्मीपति. (कृष्ण.)१०. लक्ष्मीच्या मनाला संतोष करणारा. ११. युधिष्ठिर. १२. अन्य. १३. श्रीकृष्ण. १४. करभार देणारा. १५. संकटरूप सागरांत. १६. हात देणारा. १७. चक्रवर्ती. १८. सर्व यज्ञाचा (सवाचा) नय (पद्धति, विधि) जाणणाऱ्यांची. १९. नम्र. २०. यज्ञाला. २१. ताक. २२. हे राजा, धर्मा. २३.सुखाला व कीर्तिला कारण.२४.नव सव (नवीन यज्ञ), भूमिदेव (ब्राह्मण) आणि वेदी (यज्ञभूमि) यांची ईक्षा (अवलोकन.) २५. झाडून काढीन. २६. व्यर्थ पुष्ट झालेल्या. ('देहीं' याचें विशेषण.) २७. सफलमनोरथ. २८. ज्याचें बळ (सामर्थ्य) अगाध (मोठें) अशा हे धर्मा.२९. तुझ्या कीर्तिनें. ३०.तीन्ही लोकांचा समुदाय.३१. शुभ्र. धवळा. (प्रासाकरितां 'ब.') ३२.श्रीकृष्णाची (यज्ञेशाची) आज्ञा. ३३. उत्तम वंशांत झालेले धौम्यव्यासप्रमुख ब्राह्मणांची आज्ञा.

धर्में सर्वोत्सवोत्सुक[1] नृप आणविले स्वदूत धाडूनी, ।
विप्र क्षत्रिय वैश्यहि सच्छूद्रहि[2] भूवरील झाडूनी. ॥ १४
भीष्म, सकलत्रसुत[3]धृतराष्ट्र कृप द्रोण विदुर पुरवासी ।
धर्में आणविले, मृग[4] जाणो प्रेषूनि नकुळसुरवासी[5]. ॥ १५
सवसाहित्य[6] किति वदूं? रावति भुज जेथ साधुसुरतरुचे[7], ।
ज्या खटपटीपुढें न श्रीचें श्रीशास हीन[8] सुरत रुचे. ॥ १६
रामादि[9] सर्व यादव शिशुपालादिक नृपाळ बहु आले, ।
अर्पुनि उपायनें[10] बहु धर्मकृतें आदरें बहुत धाले[11]. ॥ १७
अध्वर्यु[12] याज्ञवल्क्य, ब्रह्मा[13] श्रीव्यास, पैल[14] मुनि होता[15], ।
सुमुनि सुसामानामा[16] सामग[17] यज्ञांत जाहला होता. ॥ १८
जेथ सभासद नारद, फार दया ज्ञान ज्यांत वास करी, ।
जेथें विप्रपदाब्जप्रक्षालन तीर्थपाद[18] देव करी. ॥ १९
तेथें साहित्यासि श्रीभीष्मद्रोण[19] विदुर बहु जपती, ।
न विसंबिति क्षण जसे गुणवदपत्याशि[20] वृद्ध मनुजपती[21]. ॥ २०
यजमानहि गुरुदेवद्विजभक्त अजातशत्रु[22] तज्जाया[23], ।
मूर्तिमती श्रद्धासी[24] आले गुण ज्या[25] सुधेंत मज्जाया[26]. ॥ २१
वाढी स्वमायसी, कीं मूर्तिमती सुरभि[27] गायसी [28]ते तें ।
जें जो इच्छी, [29]तीतें गाय[30] भुवन, जेंवि गाय सीतेतें. ॥ २२
यज्ञामें[31] सफळ सकळ सर्व, सगुणब्रह्म[32] ज्यांत [33]राबे तें ।
त्या क्रतुच्या वर्णावें कीर्तिसुधेतें, न अन्य [34]राबेतें. ॥ २३

---

१. यज्ञोत्सवाविषयीं उत्कंठित. २. उत्तम शूद्रजनही. ३. बायको व पुत्र यांसहित. ४. भीष्म धृतराष्ट्रादिक हेच मृग=हरिण. ५. नकुल हाच सुरव (मधुर गीतस्वर) त्यासि. ६. यज्ञ. ७. साधूंचा कल्पतरू जो कृष्ण त्याचे. ८. नीच, तुच्छ. ९. बलरामप्रमुख. १०. भेटी, नजराणे. ११. संतुष्ट झाले. १२. अध्यक्ष, यजुर्वेदी ऋत्विग्. १३. कर्मारंभीं व शेवटीं प्रणवोच्चार करणारा ऋत्विज्. १४. वसूचा पुत्र. १५. होतृ, ऋत्विज्. १६. धनंजयगोत्र श्रेष्ठ सुसामा नांवाचा मुनि. (सभापर्व—अ० ३३ श्लो० ३४-३५.) १७. सामवेद पठण करणारा. १८. तीर्थ आहे पादीं ज्याच्या तो श्रीकृष्ण. १९. केलें काय व न केलें काय हें पाहण्याचें काम भीष्मद्रोणांकडे होतें आणि यज्ञसंबंधी खर्चाचें काम विदुराकडे होतें. २०. गुणवान पुत्रास. २१. राजे, जनस्वामी. २२. ज्याला कोणी शत्रु नाहीं असा. (धर्मराज.) २३. त्याची बायको. (द्रौपदी.) २४. मूर्तिमंत आस्तिक्यबुद्धि. २५. ज्या द्रौपदीरूपिणी सुधेंत. २६. स्नानार्थ. २७. कामधेनु. २८. द्रौपदी. २९. द्रौपदीतें. ३०. स्तवी. ३१. यज्ञ. ३२. मूर्तिमान् ब्रह्म. ३३. काम करी. ३४. काकवीपेक्षां कांहीं दाट जो उंसाचा रांधा ती.

इतुक्याचि राजसूयक्रतुच्या या वर्णनें रसिक हर्षो; ।
काय डरडरां ढेंकर देवुनि चातक म्हणेल बहु वर्षो ? ॥ २४

तें यजनकर्म झालें पूर्ण सेविधि परमशुद्ध रायाचें, ।
उद्धरिलें भगवंतें भरताचें गोत्र उद्धरायाचें. ॥ २५

तेव्हां देवर्षि मनीं आणी कीं, 'क्षेत्र सर्व शुद्धरणें ।
उद्धरणार प्रभु, परि आधीं शिशुपाल आजि उद्धरणें.' ॥ २६

धर्मासि म्हणे, 'राया ! आले यज्ञोत्सवार्थ नगरा जे ।
त्यांमध्यें पूजावा त्वां प्रथम श्रेष्ठ, सर्व मग राजे.' ॥ २७

धर्म म्हणे भीष्मातें, 'सांगा जी ! मज तुम्हींच जें विहित, ।
सांगत आलां पूर्वीं जैसे मद्भावुकार्थ जेंवि हित.' ॥ २८

भीष्म म्हणे, 'वत्सा ! जरि पुससी सर्वांत कोण पूज्य असें ।
तरि वासुदेव आधीं पूजावा त्वां विशुद्धभक्तिरसें. ॥ २९

[12]ज्योतिर्गणांत रविसा, तेजस्वी कृष्ण या [13]सदांत पहा, ।
तेज अहा ! क्षिप्र वहा, अर्घ वहा, एक पूज्य [14]वृष्णिप हा.' ॥ ३०

---

१. इतक्या अल्पवर्णनानें. पंतांस कोणत्याही स्थलीं विस्तृत वर्णन करणें आवडत नसे असें या गीतीवरून होतें. २. विधिपूर्वक. ३. धर्माचें. ४. नारद. ५. क्षत्रिय. ६. धर्मयुद्धानें. ७. शिशुपाल हा सोमवंशीय दमघोष राजाचा पुत्र. ह्याची माता श्रुतश्रवा ही वसुदेवाची भगिनी, तेव्हां हा कृष्णाचा आतेभाऊ. शिशुपालाच्या आजाचें नांव चेदि म्हणून याला 'चैद्य' अथवा 'चेदिप' आणि ह्याच्या देशास 'चेदि' असें नांव पडलें. या देशाची राजधानी शुक्तिमती नामक नगरी. शिशुपाल हा हिरण्यकशिपूचा अंशावतार होय. यास जन्मतः तीन डोळे व चार हात होते. हा कृष्णाच्या मांडीवर बसला तेव्हां याचे दोन हात व एक डोळा असे गळून पडले. तत्क्षणींच श्रुतश्रवा भयभीत होऊन कृष्णास शरण गेली आणि 'यास मारणार नाहीं' असें वचन दे असें त्यास म्हणाली. 'मी या शिशुपालाचे शतापराध क्षमा करीन' असें कृष्णानें आपल्या आतेस वचन दिलें. नंतर तो द्वारकेस परत आला. पुढें राजसूययज्ञांत इंद्रप्रस्थ येथें कृष्णाची अग्रपूजा करावी असें ठरलें. ती गोष्ट शिशुपालास पसंत न पडून त्यानें भीष्माची आणि कृष्णाची अद्वातद्वा बोलून अतोनात निंदा केली. ती कृष्णास सहन झाली नाहीं, तेव्हां त्यानें शिशुपालाचे शंभर अपराध होतांच आपल्या चक्रानें त्याचें शिर तोडिलें व तो तत्काळ मरण पावला. (सभापर्व–अ० ४५.) ह्या शिशुपालवधाच्या कथानकावर माघकवीचें एक उत्तम संस्कृत काव्य आहे. ८. भीष्म धर्मराजास म्हणतो. येथें 'म्हणे' याचा कर्ता 'भीष्म' अध्याहृत आहे. (सभापर्व–अ० ३६ श्लो० २२.) ९. आचार्य, ऋत्विज्, श्वशुरादि संबंधिजन मित्र इत्यादि. १०. करण्यास योग्य. ११. माझ्या कल्याणार्थ. १२. नक्षत्रसमूहांत. हाच दृष्टांत मूळांत आहे:–'मध्ये तपन्निवाभाति ज्योतिषामिव भास्करः.' सभापर्व–अ० ३६ श्लो० २८.) १३. सभेंत. १४. वृष्णिपालक, यादवकुलपालक श्रीकृष्ण.

पूजी प्रभुला प्रेमें व्हाया [1]दृक्कामपूर्ति सहदेव, ।
पूजित आले [2]खस्थिरचर त्या श्रीविश्वमूर्तिसह देव. ॥ ३१
नारदभीष्मप्रमुखां साधूंच्या होय [3]दृष्टिलाभा जी ।
[4]भा [5]जीमूतश्यामा प्रभुची ती [6]चैद्यदृष्टिला [7]भाजी. ॥ ३२
[8]भगवत्सत्कृति पाहुनि कोपे शिशुपाल [9]सत्समाजांत, ।
दुष्टीं जशी पिशाची भरली दुर्बुद्धि तत्समा जांत. ॥ ३३
धर्मासि करी [10]सज्जनवृंदीं पाण्यापरीस पातळ, तें ।
वदवेना; [11]सन्निंदावागनुवादेंहि पाप [12]आतळतें. ॥ ३४
[13]गांजी पुष्कळ लावुनि मूर्खपण तशा सभेंत [14]शांतनवा, ।
परि हांसे, कीं जन्माप्रासुन बहु शांत, तो न शांत नवा. ॥ ३५
[15]त्रिजगत्पूज्यपद प्रभु गुरु [16]पुण्यश्लोक सार्वभौम खरा, ।
त्या निंदी श्रीकृष्णा कीर्तिश्रीशांति[17]भूतिच्या मखरा. ॥ ३६
बहु सांत्वन धर्म करी, न शमे, न वळे परंतु तो चैद्य. ।
[18]मरणाऱ्या रोग्याला काय करिल जाणता भला वैद्य ? ॥ ३७
भीष्म म्हणे, 'खळसांत्वन कां करितो? याचिया नसे कानें ।
हें ऐकिलें, [19]'निवे घृत कढलें [20]तोयांचिया न [21]सेकानें.' ॥ ३८
क्षोभे बहु या वचनें, त्याला [22]उपमान दुष्ट कुतरेंच; ।
विस्तर असो. तयाचा उतरी शिर हरुनि [23]शौरिसुत [24]रेंचें. ॥ ३९
सोसुनि शत [25]अपराध प्रभुनें शिशुपाल मारिला चक्रें, ।
केला पात्र [26]सुगतिला, जी प्रार्थावी गति स्वयें [27]शक्रें. ॥ ४०
शिरलें [28]तद्देहोत्थित तेज प्रभुच्या मुखीं पदा नमुनी, ।
मानिति मनांत त्या [29]वरचरितास महावरप्रदान मुनी. ॥ ४१

---

१. दृष्टीची इच्छा पूर्ण करण्यासाठीं. २. आपल्या स्थावरजंगमवस्तु. ३. दृष्टिलाभाला, नेत्रांला लाभदायक. ४. कांति. ५. मेघश्यामा. (जीमूत=मेघ.) ६. शिशुपाळाच्या दृष्टीला. ७. भाजून टाकी. ८. भगवंताचा सत्कार. ९. साधुमंडळांत. १०. साधुजनांच्या समुदायांत. ११. साधुनिंदारूप शब्दांच्या उच्चारणानें सुद्धां. १२. स्पर्श करितें. १३. याचा कर्ता 'शिशुपाल' (अध्याहृत.) १४. भीष्म. (शंतनुपुत्र.) १५. तीन्ही लोकांनीं पूजा करण्यास योग्य असें ज्याचें पद तो. (श्रीकृष्ण.) १६. निष्कलंक कीर्ति ज्याची तो. १७. ऐश्वर्य. १८. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १९. हा भागही सुभाषितरूप आहे. २०. पाण्याच्या. २१. शिंपडण्यानें. २२. सादृश्य, दाखला. २३. वसुदेवपुत्र. (कृष्ण.) २४. रग, खोड, गर्व.. २५. सभापर्व–अ० ४५ श्लो० २३–२७ पहा. २६. मोक्षाला. २७. इंद्रें. २८. त्याच्या (शिशुपालाच्या) देहापासून उत्पन्न झालेलें. २९. श्रेष्ठचरित्रास.

देवर्षिप्रमुख सुजन म्हणती, 'जीवांसि एक हरि हित[1] रे! ।
अद्भुत महिमा याचा, भक्त तरे, करुनि वैर अरिहि तरे.' ॥ ४२
ऐसें सद्यश[2] निर्मुनि नेवुनि सिद्धीस दासयागा[3] त्या, ।
केली हृष्टा[4] वाणी[5] कविच्याहि तिच्या सदास[6] या[7] गात्या. ॥ ४३
धर्में विप्रादि सकळ पूजुनि आनंदवूनि बोळविले, ।
भूदेवपदरजांत[8] स्वजनाकरवींहि देह घोळविले. ॥ ४४
प्रभुहि स्वपुरा[9] गेला, दुर्योधन[10] शकुनि राहिले होते. ।
त्या मयसभेस डोळे धृतराष्ट्रें काय वाहिले हो! [11]ते. ॥ ४५
घेतां निरोप सांगे व्यास मुनीश्वर युधिष्ठिरासि असें, ।
'वत्सा[12]! होणार पुढें क्षत्रक्षय[13], फार सावधान असें[14]. ॥ ४६
कारण[15] करूनि तुजला क्षत्रक्षय करिल काळ, हें चुकवी ।
ऐसा कोण त्रिजगीं? म्हणती दुर्वार[16] भाविला[17] सुकवी. ॥ ४७
दुर्योधनापराधें क्षत्रक्षय भीमजिष्णुबाहुबळें[18], ।
होणार, बा! त्रयोदशवर्षांतीं[19] आटतील वीरबळें[20]. ॥ ४८
क्षत्रक्षयीं कुरुपते! धर्मा! तुजला निमित्त जो कर्ता ।
स्वप्नांत निज सुदुर्लभ दर्शन देईल तो जगद्भर्ता[21].' ॥ ४९
ऐसें भावि[22] कथुनि मुनि[23] गेला कैलासपर्वता राया! ।
प्रभुला विनवुनि अयशोभीत[24] निज[25] सुपौत्र सर्व ताराया. ॥ ५०
धर्म म्हणे, 'भ्रातेहो! क्षत्रक्षय मन्निमित्त[26] होयाचा[27]; ।
अवश नसावें, त्यजितों जीवित, उपयोग काय हो! यांचा[28]?' ॥ ५१
जिष्णु[29] म्हणे, 'मतिनाशकमोहीं द्यावें न चित्त अजि राया! ।
कश्मलपंकें[30] भरितां पटुबुद्धिनटी[31] त्यजील अजिरा[32] या. ॥ ५२

---

१. कल्याणकारक. २. उत्तम यश. ३. दासांचा, भक्तांचा (धर्मादिकांचा) यज्ञ. ४. संतोषित. ५. सरस्वती. ६. सभेस. ७. या यागाला. ८. ब्राह्मणांच्या पायांच्या धुळींत. ९. द्वारकेस. १०. सभापर्व–अ० ४५ श्लो० ६७–६८ पहा. येथें शिशुपालवध हें कथानक समाप्त झालें. येथून द्यूताच्या कथेस आरंभ होतो. ११. दुर्योधन शकुनि हे उभयतां. १२. सभापर्व–अ० ४६ श्लो० १०–१७ पहा. १३. क्षत्रियांचा संहार. १४. रहा. १५. निमित्त. १६. निवारण करण्यास अशक्य, दुरतिक्रम. १७. भविष्याला, पुढें होणाऱ्या गोष्टीला. १८. पराक्रमानें. १९. तेरा वर्षांच्या अखेरीस. २०. सैन्यें. २१. जगताचें पालन करणारा (उमापति.) २२. होणारें. २३. व्यास. २४. अपयशाला भ्यालेला. २५. आपले (व्यासाचे) नातू. २६. माझ्या निमित्तें. २७. व्हावयाचा. २८. या जीविताचा. २९. सभापर्व–अ० ४६ श्लो० २३-२४ पहा. ३०. मोहरूप चिखलानें. ३१. कुशलांची (सुज्ञांची) बुद्धिरूप नटी. ३२. या देहरूप नृत्यांगणास.

बुध [1]मतिकवचें व्यसनीं [2]स्वपरपरित्राण कीं करी राया ! ।
[3]बुधविबुधसाधुमान्या ! रक्षीं [4]सत्स्वर्द्रुमा शरीरा या.' ॥ ५३
धर्म म्हणे, 'व्हाल तुम्हीं जरि मज अनुकूळ तरि करीन असें, ।
ज्ञातींसीं इतरांसीं वर्तेन तसें, तयांसि इष्ट जसें. ॥ ५४
कथिली दुर्व्यसनाची [5]भेदमयी बुद्धि हे [6]खनी [7]पटुनीं; ।
[8]शिवखनिसम मति धरितों मी [9]निजपरभेदलेख [10]नीपटुनी.' ॥ ५५
[11]विग्रहकारण भेद त्यागावा, युक्ति हे [12]नृपा सुचली. ।
[13]**भी**मार्जुनादिसाधुस्वांतासि सुधेपरीस ती रुचली. ॥ ५६
आधींच **धर्म** [14]नयरुचि सर्वत्र सम, क्षमी, कृती, करुण, ।
स्थिर ज्यापुढें विवेक व्यक्त सदा, जेंवि **रविपुढें अरुण.** ॥ ५७
[15]तत्साधुत्व किति वदों? स्वगुरूंच्या [16]हितवचा शिकविल्याला, ।
जपला जो रात्रिदिवस [17]दृढसद्गुणसुकवचाशि कवि त्याला. ॥ ५८

अध्याय तिसरा.

त्या **मयसभेंत** रचना पाहुनि राजा **सुयोधन** भ्रमला, ।
[18]प्रौढकविकृतीं जैसा बाळ म्हणे जो '[19]कळे [20]अदभ्र मला.' ॥ १
मानुनि जळ स्थळाला वस्त्रांतें आवरी करें, [21]वाटे ।
कोठें पडे जळीं तो जळ न, जळ स्थळचि तें खरें [22]वांटे. ॥ २
[23]पिहितें द्वार [24]विवृतसें मानुनि जातां कपाळ [25]ओपटलें, ।
झाला व्याकुळ दुर्मति आपुलियाचि भ्रमाचिया [26]पेटलें. ॥ ३
जाय बळें उघडाया कर देवुनि उघडिल्याहि [27]अरसा ज्या, ।
तोंडघशींच पडे हो ! होय चमत्कार तापकर राजा. ॥ ४

---

१. बुद्धिरूप चिलखतानें. २. आपलें व दुसऱ्याचें रक्षण. ३. सुज्ञ, देव, आणि साधु यांस मान्य अशा (हे धर्मा.) ४. सज्जनांच्या कल्पतरुरूप अशा. ५. स्वपरभेदरूप, फुटाफुट करणारी. 'भेदमूलो हि विग्रहः' असें मूळांत आहे. ६. खाण. ७. सुज्ञांनीं. ८. कल्याणाच्या खाणीसारिखी. ९ हा आपला (निज) हा परका अशा भेदाचा विचार. १०. नाहींसा करून, निपटून. ११. कज्याचें मूळ. १२. धर्मराजाला. १३. भीम अर्जुन इत्यादिकांच्या शुद्ध मनाला. १४. नीतीची गोडी ज्यास तो. १५. धर्माचा साधुपणा. १६. हितपरवचनास. १७. मजबूद सद्गुणरूप चिलखताला. १८. गंभीर कवीच्या कवितेंत. १९. समजतें. २०. पुष्कळ. २१. मार्गी. २२. सभापर्व–अ० ४७ श्लो० ३-६ पहा. २३. लावलेलें. २४. उघडें असें. २५. सभापर्व–अ० ४७ श्लो० ११ पहा. २६. पडद्यानें. २७. द्वारास.

भीमार्जुन पोषिति अतिहासा [1]अंधजसुदुःसहा [2]यमही, ।
[3]त्यां [4]निजभरहर [5]हरिचे [6]सुसहाय म्हणे, न दुःसहाय, मही. ॥ ५
त्या उपहासें झाला बहुतच्चि संतप्त तो सुयोधन हो! ।
चित्तीं म्हणे, 'मरो, परि अपमानी सर्वथा सुयोध [7]नहो.' ॥ ६
जातां पुराशि मार्गी शकुनि म्हणे [8]कुरुवराशि, 'सांग मला, ।
तूं अप्रसन्न कां? गा! [9]वाङ्नियम सदैव [10]विहित कां गमला?' ॥ ७
दुष्ट म्हणे, 'जें झालें [11]खर दुःख [12]कृतांतरूप मामा! तें ।
[13]दावार्चिसें कराया भस्म पहातें [14]तरूपमा मातें. ॥ ८
झालें युधिष्ठिराला भूमंडळ [15]विक्रमें वश, [16]कुनेते ।
भ्राते नव्हेत त्याचे, [17]नरतनुधर सर्व देव शकुने! [18]ते. ॥ ९
तो राजसूय [19]सन्मख, वैन्यापरि ते तसे [20]करद राजे, ।
समरीं न गणायाचे अभिमानी [21]वज्रभृत्करदरा जे. ॥ १०
एकहि शतांत न जसा [22]अज सिंहें हुंगिल्या [23]अजा [24]तारी, ।
तेंवि न नृप [25]चैद्याला, मारविता रक्षिता [26]अजातारी. ॥ ११
श्री कीर्ति भूति महिमा शक्रींचा या युधिष्ठिरीं भूपीं, ।
अन्यत्र लेश कैंचें? [27]सलिल जसें सागरीं तसें कूपीं. ॥ १२
या [28]स्वसपत्नोत्कर्षें जळतों मी अंतरींच, [29]असुखा या ।
सोसील कोण मानी? देतों मी [30]पावकासि [31]असु खाया. ॥ १३
घेवुनि दे गुर्वाज्ञा मज हा अग्नींत काय [32]होमाया; ।
[33]दुःखद जो [34]स्वपराला त्याची ज्ञात्यांसि काय हो! [35]माया? ॥ १४

---

१. सुयोधनास दुःसह अशा (हासाला). २. नकुल सहदेवही. ३. भीमार्जुनांस. ४. आपला (महीचा) भार हरणाऱ्या. ५. कृष्णाचे. ६. उत्तम साहाय्यकर्ते. ७. न होवो. ८. दुर्योधनास. ९. मौन धारण करणें. १०. उचित. ११. प्रखर, तीक्ष्ण. १२. यमासारखें. १३. दावानलाच्या ज्वालेप्रमाणें. १४. वृक्षासारख्या. १५. अर्जुनाच्या प्रतापानें. १६. पृथ्वीतें (कु) नियमन करणारे (नेते)=पृथ्वीशासनकर्ते. १७. मनुष्यदेह धरणारे ते (भ्राते) (हे शकुने) देव होत. १८. ते भ्राते. १९. उत्तम यज्ञ. २०. करभार देणारे. २१. वज्र धरणारा कर (हात, आहे ज्याचा असा इंद्र, त्याच्या भयाला. २२. बकरा. २३. शेळी. २४. रक्षण करी. २५. शिशुपालाला कोणीही नृप (राजा) न तारी, रक्षण करी. २६. अजातशत्रु, ज्यास शत्रु नाहीं तो. (धर्म.) २७. उदक. २८. आपल्या शत्रूच्या उत्कर्षानें. २९. दुःखा. ३०. अग्नीस. ३१. प्राण. ३२. जाळाया. ३३. दुःख देणारा. ३४. आपल्यास आणि दुसऱ्यास. ३५. ममता.

भ्रमलों सभेंत, केला उपहास तिहीं ससेवकांनीं कीं, ।
फसलों दैवें पंकीं, हंसखग[1] जसा फसे बकानीकीं[2].' ॥ १५
शकुनि म्हणे रायातें, 'प्रिय अप्रिय काय तूं? अगा! धात्या[3]; ।
'कर्मानुरूप देतो फळ' म्हणति असे भले अगाधा[4] त्यां[5]. ॥ १६
पुण्य तसेंचि तयांचें व्हावा उत्कर्ष नित्य नव साचा; ।
महिमा पूर्वींचा हा सुकृतभराचा[6], नव्या न नवसाचा. ॥ १७
यत्न तदुच्छेदीं[7] त्वां शत केले परि कवे[8]! न शकलास[9], ।
पूर्णेंदु[10] काय जिंकी उडु[11] ज्याच्या[12] जिंकवे न शकलास[13]? ॥ १८
तुजही सहाय गुरु[14], गुरुसुत[15], कृप, वृष[16], बंधु, भीष्म, आहेत; ।
होईल पूर्ण दिग्जय बहुदक्षिण[17] यज्ञ, कीर्ति हा हेत.' ॥ १९
नृप त्यासि म्हणे, 'मामा! योजिसि येथें कशास सामातें? ।
सांग उपाय, युधिष्ठिरपरिभव[18] जेणें घडे, असा मातें.' ॥ २०
शकुनि म्हणे, 'पांडुसुत, द्रुपदनृपति, तत्सहाय कंसारी[19], ।
यांशि भुजबळें जिंकी ऐसा कैंचा समर्थ संसारी? ॥ २१
परि एक उपाय असे धृतराष्ट्र तुला म्हणेल जरि कर गा, ।
होइल युधिष्ठिराची श्री पृथ्वी निश्चयेंचि तरि करगा[20]. ॥ २२
प्रेम[21] बहु, पटुत्व[22] नसे, द्यूतीं धर्म स्वयें असे भोळा; ।
अनिवर्तनप्रतिज्ञा[23] तच्छ्रीला[24] यापरी करीं गोळा.' ॥ २३
कुरुखल[25] म्हणे, 'तरि नृपा! घे आज्ञा, तूंचि हें वद पित्यातें. ।
मी हें बोलों न शकें, जरि करितो बहु दया, तदपि त्यांतें[26].' ॥ २४
करुनि कुविचार, नगरीं[27] जावुनि एकांत समय पाहूनी, ।
नृप गांठिला हळू हळु तच्छास्त्रविवेकचंद्रराहूंनीं[28]. ॥ २५
शकुनि वदे, 'राजा! हा झाला त्वज्ज्येष्ठपुत्र कृश हरिण ।
क्षणही स्वस्थ नसेचि व्याघ्रवनामाजि जेंवि शिशुहरिण[29].' ॥ २६

---

१. पक्षी. २. बगळ्यांच्या समुहांत (मंडळींत). ३. ब्रह्मदेवाला. ४. खोल अशा. ५. त्या ब्रह्मदेवाला. ६. पुण्यातिशयाचा, मोठ्या पुण्याईचा. ७. त्यांच्या नाशार्थ. ८. हे पंडिता. ९. समर्थ झालास. १०. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ११. नक्षत्र. १२. चंद्राच्या. १३. तुकड्यास. १४. द्रोण. १५. अश्वत्थामा. १६. कर्ण. १७. पुष्कळ दक्षिणा ज्यांत असा. १८. पराजय. १९. कृष्ण. २०. हस्तगत. २१. आवड. २२. चातुर्य. २३. न परतण्याची प्रतिज्ञा. २४. त्या धर्माच्या राज्यलक्ष्मीला. २५. कौरवांतील दुष्ट दुर्योधन. २६. धृतराष्ट्रातें. (सभापर्व-अ० ४७ श्लो० २३). २७. हस्तिनापुरीं. २८. त्याच्या (धृतराष्ट्राच्या) शास्त्रविचाररूप चंद्राचा ग्रास करणारे (शकुनिदुर्योधनादि) राहूंनीं. २९. मृगबालक.

वृद्ध[1] वदे, 'वत्सा! कां पांडुर[2] कृश जाहलासि सांग मला?।
भोगिसि भोग सुरांचे[3] निष्कंटकराज्यखेद[4] कां गमला?' ॥ २७
कलिपुरुष[5] म्हणे, 'देती तिळहि न सुख हे स्व भाग्यभोग मला,।
पाहुनि युधिष्ठिरश्री मज तुच्छ स्वविषय प्रभो! गमला. ॥ २८
मतिचक्षु[6] भेदिलें हो! माझें अतिदुःसहें किरीटिकणें[7];।
मज संसारीं कैंचें चिंतेनें लागतां किरी[8] टिकणें? ॥ २९
मी घटतों[9], परि तुमचे मनिं केवळ बाढ[10] तात! ते[11]; ज्यानें।
अवलोकिले, कळे त्या शिशुशशिसे[12] वाढतात तेजानें. ॥ ३०
इतरांची काय कथा? जे देणार त्रिखर्व[13] बळि[14] बा! गा!।
त्यांतें वारित होते द्वारप[15] दारापुढें न ज्यां जागा. ॥ ३१
संज्ञा[16] केली होती, कीं होतां लक्ष[17] त्या मखीं पात्र,।
उच्चगृहाग्रगपुरुषें[18] फुंकावा शंख एकदां मात्र. ॥ ३२
वाजत होता संतत दरें[19], जाणों विष वचोगृहीं[20] वमला;।
त्या अनिशरवश्रवणें[21] बापा! आलें खरेंच हींव मला. ॥ ३३
मयकृतसभेंत पडलों मी वापींत स्थलभ्रमें सहसा,।
हंसले सपत्नदारहि[22], न म्हणे कोणीहि कीं 'उगे न हंसा.' ॥ ३४
खद खद हांसे भीमहि जिष्णुहि, मजला तसेचि बा! यमही;।
तद्दुर्दशा[23] न करितां निस्तेजा[24] मज वठेल काय मही? ॥ ३५
पडलों उघडूं जातां द्वार गमे विवृतेंही[25] यथापिहितें[26].।
तत्कृतबोधाहुनि[27] मज गमलें तम[28], अहित जरि तथापि हित. ॥ ३६

---

१. धृतराष्ट्र. २. फिकट, पांडुरवर्ण. ३. देवांचे. ४. शत्रुरहित राज्याचें दुःख. ५. कलीचा अंशावतार. (दुर्योधन.) ६. बुद्धिरूप नयन. ७. अर्जुनरूप कणानें. ८. कीड. ९. कृश होतों. १०. दृढ. ११. पांडव. १२. बालचंद्राप्रमाणें. १३. तीनखर्व रुपये. १४. कर. १५. द्वारपाल (सभापर्व–अ० ४९ श्लो० २४.) १६. संकेत, ठराव. (सभापर्व–अ० ४९ श्लो० ३१). १७. एकलाख ब्राह्मणांना वाढप झालें म्हणजे सर्वांस कळण्यासाठीं शंखनाद करावा असा संकेत केला होता. १८. उच्चगृहाच्या अग्रभागीं गेलेल्या पुरुषानें. १९. शंख. २०. कर्णांत. २१. सतत चालू असणाऱ्या शंखनादाच्या श्रवणानें. २२. शत्रूची बायको द्रौपदी. ('दार' हा शब्द संस्कृतांत पुल्लिंगी बहुवचनी आहे.) २३. त्यांची (भीमादिकांची) वाईट दशा. २४. पराक्रमहीन अशा (मला). २५. उघडेही. २६. झांकलेलें. २७. त्या सभेविषयीं केलेल्या ज्ञानाहून. २८. अज्ञान. (माझें अज्ञानच मला बरें वाटलें—असा भाव.)

विवृतद्वाराकार प्रेक्षुनि[1] भित्तिप्रदेश[2] जों शिरतों, ।
फुटलें तें थोडें बहु, जें धरिलें शत्रुनें स्वयें शिर तों. ॥ ३७
धृतराष्ट्रसुता ! ये, मी दाखवितों, द्वार हें, न बापा ! हें ।
वदला असें वृकोदर जें तद्वाक्यार्थ[3] तूंचि बा ! पाहें.' ॥ ३८
अतिशयित भाग्य त्याचें स्वीयहि[4] अतिशयित दुःख कळवीलें; ।
जों त्या खलतिलकानें[5] कांहींसें अंधचित्त[6] वळवीलें. ॥ ३९
तों शकुनि म्हणे, 'राया ! अभिमानधना[7] ! सुयोधना ! जरि तें ।
भाग्य हरावेंचि असें इच्छिसि जिंकूनि दुर्जया अरितें, ॥ ४०
तरि मज कपटद्यूतीं आहे बळ फार, हा उपाय भला, ।
धर्महि न म्हणेल नको हेंही ठावें असे यथार्थ मला. ॥ ४१
धर्माची 'आहूतो न निवर्तेयम्'[8] असी प्रतिज्ञा ते, ।
न मृषा[9] द्यूता प्रति अतितरखर[10] म्हणति न असी[11] प्रति ज्ञाते.' ॥ ४२
खलमणि[12] म्हणे, 'नृपाळा[13] ! दे आज्ञा, श्री हरील शकुनी ती. ।
कां[14] न स्वीकारावी, करिल जरि महारिला वश कुनीती ?' ॥ ४३
धृतराष्ट्र म्हणे, 'पुसतों विदुराला, तो विवेकराशि कवी ।
मज हित सदां शिकवि तो, जेंवि बृहस्पति सुरेश्वरा[15] शिकवी'. ॥ ४४
भरतकुळकलंक[16] म्हणे, 'मोडील विदुर विचार हा केला, ।
मग मी मरेन, राया ! कथितों मारूनि उच्च हाकेला. ॥ ४५
तोचि ईहामुत्रसुखद[17] तुज, न प्रिय सुत, जसा प्रिय क्षत्ता[18]; ।
मजमागें राज्य करा दोघे, कोणास हो ! नको सत्ता[19] ? ॥ ४६
पुत्रप्रियकर[20] राजा[21] आज्ञापुनियां निजानुगां[22] बरवी ।
जींत सहस्र स्तंभ स्वर्णमणिखचित[23] असी सभा करवी. ॥ ४७
आतांनीं विदुराला हा कपटद्यूतमंत्र[24] जाणविला, ।
मग त्या धृतराष्ट्रेंही तो बुद्धिसुधासमुद्र[25] आणविला. ॥ ४८

---

१. पाहुनी. २. भिंतीची बाजू. ३. त्या भीमाच्या वाक्याचा अर्थ. (आंधळ्याच्या पोरा-असा भाव). ४. स्वकीयही. ५. दुर्जनश्रेष्ठानें. ६. धृतराष्ट्राचें मन. ७. अभिमान हेंच धन (द्रव्य, प्रियवस्तु) ज्याचें तो. ८. बोलावलें तर मागें फिरावयाचें नाहीं. ९. असत्य. १०. अतितीक्ष्ण. ११. लङ्कास. १२. दुर्जनश्रेष्ठ. १३. धृतराष्ट्रा. १४. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १५. इंद्राला. १६. भरताच्या वंशाला डाग लावणारा दुर्योधन. (सभापर्व–अ०४९ श्लो० ४५–४६). १७. भू व स्वर्ग या लोकीं सुख देणारा. १८. विदुर. १९. अधिकार. २०. सुताचें (दुर्योधनाचें) प्रिय करणारा. २१. धृतराष्ट्र. २२. स्वसेवकांस २३. सुवर्णरत्नमंडित. २४. कपटानें फांसे टाकून द्यूतांत पांडवांस जिंकावें हा विचार. २५. बुद्धिरूप अमृताचा सागर. (विदुर.)

नमुनि [1]कवि म्हणे, 'राया! न द्यूतविचार हा मला रुचला. ।
त्यजुनि [2]सहकार पिकला [3]पिकें लाजेना वरावया [4]कुचला.' ॥ ४९
अंध म्हणे, 'होऊंदे द्यूतक्रीडाविनोद भावांत, ।
[5]अस्मन्निकट तयांच्या न शिरेल [6]दुराग्रह स्वभावांत. ॥ ५०
मी, तूं, द्रोण, [7]नदीसुत, बैसों जेथें समर्थ घात कसें? ।
द्यूत करील, शमेल श्रीरामगुणासमक्ष पातकसें. ॥ ५१
[8]होणें होतें, साधो! चित्त तुझेंही न काळजी वाहो, ।
ज्याचें आचरण जसें त्या तैसा फलद काळ [9]जीवा हो; ॥ ५२
[10]क्षमहि [11]बुधोक्त न रुचलें, रुचलें [12]बालोक्त [13]अक्षमहि, [14]म्यां तें ।
काय वदावें? भुलला [15]दोषज्ञेंहि भूप [16]अक्षमहिम्यातें. ॥ ५३
'धर्मासि [17]सुहृद्द्यूतक्रीडार्थ क्षिप्र आण जा, विदुरा!' ।
ऐसें [18]वदे वचन, तें [19]कविहृदयाशिच न कांपवी, [20]भिदुरा. ॥ ५४
[21]असकृद्धितोपदेशें विदुर न शकला नृपासि वळवाया, ।
कीं तो पुत्रस्नेहें झाला सिद्ध स्वकीर्ति मळवाया. ॥ ५५
जो पोकळ वळवाया स्वमनासहि न शकला, [22]तयां खळ तो ।
[23]सिकतासेतूस [24]महाबळतोयमहौघसा कसा वळतो? ॥ ५६
धर्मासि निरोप [25]हरिप्रस्थीं [26]कटु केवळ [27]स्वभावाचा, ।
[28]चिंताम्लानच्छविनें कविनें कथिला [29]चळस्वभावाचा. ॥ ५७
जी [30]पतिदत्त [31]गरळरस आणुनि पाजी [32]सुता [33]कयाधू ती, ।
ही विदुररीतिहि [34]सख्या, [35]दोघांच्या अपयशां दया धूती. ॥ ५८

---

१. विदुर. २. आंबा. ३. कोकिल. ४. काजऱ्याचें फळ. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. हा दाखला मूळ ग्रंथांत नाहीं. ५. आमच्या (धृतराष्ट्रद्रोणभीष्मादिकांच्या) जवळ. ६. दुर्बुद्धि. ७. आपगेय भीष्म. ८. जें व्हावयाचें तें, जें दिष्ट आहे तें. ९. प्राण्याला. १०. समर्थ, हितकर. ११. ज्ञात्याचें भाषण, विदुराचें सांगणें. १२. मूर्खाचें भाषण. १३. असमर्थ, अहितकर. १४. मोरोपंतानें (कवीनें). १५. विद्वान् असा धृतराष्ट्र राजा. १६. फांसे. १७. मित्राशीं द्यूतक्रीडा करण्याकरितां. १८. 'वदे' याचा कर्ता 'धृतराष्ट्र' (अध्याहृत). १९. ज्ञात्याच्या हृदयालाच कांपवी असें नाहीं, तर वज्रालाही कांपवी—असा भावार्थ. २०. वज्राला. २१. पुष्कळ वेळ केलेल्या हितोपदेशानें. २२. विदुराला. २३. वाळवेच्या बांधास. २४. खळाळीच्या पाण्याच्या मोठ्या ओघासारखा. २५. इंद्रप्रस्थीं. २६. कडु. २७. आपल्या भावाचा (धृतराष्ट्राचा.) २८. चिंतेमुळें सुकलेली आहे मुखकांति ज्याची अशा कवीनें. २९. चंचल स्वभाव ज्याचा अशा भावाचा. ३०. पतीनें (हिरण्यकशिपूनें) दिलेला. ३१. विषरस. ३२. प्रऱ्हादाला. ३३. हिरण्यकशिपुभार्या. ३४. कयाधू व विदुररीति ह्या दोघी एकमेकींच्या सख्या (मैत्रिणी) होत. ३५. कयाधू आणि विदुररीति ह्यांच्या अपयशाला त्यांची दया धुऊन टाकिते.

धर्म म्हणे, '[1]बापाजी ! [2]ऐसें म्हणतात काय हो तात ? ।
बहु उत्तम [3]वचनकरा तारक गुरुचेचि पाय होतात. ॥ ५९
गमले तुम्हांपरिस ते [4]कितव हित [5]वसुंधरावरा कांहीं ।
जाणों तुम्हीं बुडविली श्री, उद्धरिजेल त्यां [6]वराकांहीं ? ॥ ६०
न [7]विचक्षण [8]हित [9]मानी [10]दर्शितनवपुष्टिगुणभरा [11]रोगी, ।
[12]नवकितवसचिवमंत्रें तरि [13]कुरुगुरुभाग्य बहु [14]भरारो गा ! ॥ ६१
चाला अवश्य येतों, भावि चुकेनाचि जें भलें खोटें, ।
अयश पुन्हा वृद्धपणीं गुरुचें होईल दुःख हें मोटें. ॥ ६२
स्वप्नींहि [15]अनय न घडो, अपकीर्ति नसो, असें असेल मनीं ।
तरि तारील [16]जगत्पति मज, [17]सालस जरि नसेन [18]तन्नमनीं. ॥ ६३
युद्धास द्यूतासहि जावें, नाहीं म्हणों नये, बा ! हे ।
माझी असी प्रतिज्ञा सत्या [19]अत्यादरोचिता आहे.' ॥ ६४
ऐसें वदोनि राजा सकुटुंब निघोनि [20]गजपुरा आला; ।
त्याला पाहुनि आतां थोडा बहु हर्ष दुर्जना झाला. ॥ ६५

अध्याय चवथा.

[21]दुसरे दिवशीं नेले **पांडुसुत** [22]नव्या सभेंत [23]बाहून ।
शकुनि म्हणे, 'खळों या;' **धर्म** म्हणे, 'अधिक काय [24]येहून ?' ॥ १
भीष्म द्रोण विदुर कृप धृतराष्ट्र सकर्ण जे शतभ्राते ।
[25]खळ होते, साधूंचा करणार बळें सभेंत [26]विभ्रमा [27]ते. ॥ २

---

१. हे विदुरा. २. द्यूत खेळावें असें तात (धृतराष्ट्र) म्हणतात काय ?. ३. आज्ञापालकाला. ४. ते ठक. अक्षक्रीडानिपुण शकुनि विविंशति पुरुमित्र इत्यादिक लबाड पुरुष धृतराष्ट्रराजाला तुमच्यासारखे हितकर गमले–असा भाव. ५. पृथ्वीपतिला. (धृतराष्ट्राला.) ६. नीचांनीं. ७. ज्ञाता, पंडित. ८. हितकर. ९. गणी. १०. दाखविला आहे पुष्टतेचा भर (पुष्टिगुणातिशय) ज्याणें अशा (रोगा). ११. सूज इत्यादि रोग. १२. नवीन अशा दुष्ट मंत्र्याच्या मसलतीनें. १३. धृतराष्ट्राचें दैव. १४. उत्कर्ष पावो. १५. अन्याय, अनीति. १६. कृष्ण, ईश्वर. १७. आळशी. १८. त्याच्या (ईश्वराच्या) नमनाविषयीं. १९. मोठ्या सत्कारास योग्य. २०. हस्तिनापुराला. २१. इंद्रप्रस्थाहून आल्यावर दुसरे दिवशीं. २२. धृतराष्ट्रानें नवीन करविलेल्या सभेंत. २३. बोलावून. २४. खेळाहून अधिक काय ? पण लावून द्यूत खेळावयाचें काय ?–असा भावार्थ. २५. सकर्ण शतभ्राते मात्र खळ होते. (भीष्म विदुर द्रोण इत्यादि सज्जन होते. सभापर्व–अ० ६० श्लो० २). २६. उपहास, विटंबना. २७. कर्णासह शंभर बंधु.

कपटद्यूतीं लावी प्रथमचि तो [1]साधुगीतकथ रथ रे ! ।
तों शकुनि म्हणे, 'जितिला.' तैं थोड्यांचेंचि चित्त न थरथरे. ॥ ३
मग धर्म लक्षदासीपण मांडी; 'जिंकिला' म्हणे शकुनी; ।
कपटें जिंकूं पाहे हंसाला जेंवि दुष्ट [2]बकशकुनी. ॥ ४
धर्म म्हणे, '[3]छळ करिसी, मर्यादा त्यजुनि ढाळिसी फांसे; ।
शकुने ! त्यजितां [4]धर्मव्यवहारपथासि, [5]सत्सभा हांसे.' ॥ ५
'कोणा व्यवहारीं छळ नाहीं ? दे धरुनि [6]गजवरा खळगा; ।
भ्यालासि तरि [7]निवर्तें' [8]प्रभुलाहि म्हणे असेंचि तो [9]खेळ गा ! ॥ ६
राजा म्हणे, '[10]प्रतिज्ञा माझी नाहीं म्हणों नये असि कीं, ।
त्यागीन तिला कां मी ? [11]यत्त्यागें निष्फळें यशें [12]अशेषिकीं. ॥ ७
[13]देवनकर्ता मजशीं मत्तुल्य सभाग्य कोण गा ! आहे ?' ।
धर्म असें सत्य वदे, तें दुर्मति तो सुयोधन न साहे. ॥ ८
गर्वे म्हणे, 'अहो ! मी [14]मामाला द्यावया धनें रत्नें, ।
आहें समर्थ, [15]देवनसाहित्य करीन सर्वथा यत्नें.' ॥ ९
धर्म म्हणे, 'अन्यासीं अन्याचें द्यूत हें विषम [16]वाटे, ।
ऐसेंहि असो, परि परिणामीं भय सोडितां [17]सुनयवाटे.' ॥ १०
मणिहार दास दासी रथ हय गज [18]कनकनिधिहि [19]तो लावी; ।
जिंकी [20]कपटी जी श्री [21]श्रीदश्रीशीं [22]विशंक तोलावी. ॥ ११
कपटद्यूत विलोकुनि विदुर म्हणे, 'काय हें अगा [23]राया ! ।
कां भ्रमलासि ? स्वकरें अग्नि कसा लाविसी [24]अगारा या ? ॥ १२
मद्वाक्य तुला न रुचे [25]मरणारा [26]अगदसें अगा बापा ! ।
पुत्र कसें म्हणसी या ? नरकीं नेत्या [27]संविग्रहा पापा. ॥ १३

---

१. साधूंनीं गाइल्या आहेत कथा ज्याच्या असा. (धर्म.) २. बगळा पक्षी. ३. कपट. ४. नीतिव्यवहार करण्याच्या मार्गाला. ५. साधुजनांची सभा. ६. मोठ्या हत्तीला खळगा धरून देतो. ७. मागें फीर, खेळ सोडून जा. ८. धर्मराजाला. ९. दुष्ट शकुनि. १०. 'आहूतो न निवर्तेयमिति मे व्रतमाहितम्' (अध्याय ५९ श्लोक १८). ११. ज्या प्रतिज्ञेचा त्याग केल्यानें. १२. सर्व, सगळीं. १३. द्यूतक्रीडा करणारा. १४. शकुनीला. हा दुर्योधनाचा मामा कपटद्यूतांत फार निपुण होता. १५. द्यूतक्रीडा करण्याची सामग्री. १६. भासतें. १७. सुनीतिमार्गातें. १८. सुवर्णराशि. १९. धर्मराज. २०. शकुनि. २१. कुबेराच्या संपत्तीसीं. २२. निःसंशय. २३. हे धृतराष्ट्रा. २४. गृहाला. २५. मारणाऱ्या मनुष्याला. हाच दृष्टांत मूळांतही आहे (अध्याय ६२ श्लोक २). २६. औषधासारखें. २७. मूर्तिमान् अशा.

कोल्हाचि पाळिला त्वां, आरडला उपजतांचि [1]जंबुकसा. ।
[2]श्रीदें त्यजिले, वरिला [3]अदक्षिणावर्त तुच्छ [4]कंबु कसा ? ॥ १४
[5]मधुतेंचि [6]मूढ पाहे, [7]पाहत नाहीं परि [8]प्रपातातें; ।
त्वां घातली कुरुकुळीं [9]द्यूतविषमयी बरी [10]प्रपा तातें. ॥ १५
त्यजिले खल सुत [11]कविनीं पाहुनि [12]तत्संग्रहांत [13]अत्याग, ।
[14]न्याय्य त्याग अशांचा केवळ अन्याय होय [15]अत्याग. ॥ १६
भोजकुळीं **कं**स, तसा याहि **कुरु**कुळीं कलंक [16]हा राया ! ।
नांदोत ज्ञाति सुखें, दे आज्ञा [17]पामरासि माराया. ॥ १७
तो **कृ**ष्ण त्या [18]खळाला तैसा हा [19]कृष्ण [20]यां खळासि वधू, ।
व्याली [21]असंग्रहार्हा म्हण गा भूपा ! अशा मळासि [22]वधू. ॥ १८
देवूनि [23]काक, घ्यावे पांच तुवां [24]चित्रबर्हशितिकंठ, ।
घे [25]पंचानन पांच, [26]क्रोष्टा दे, मानवेल [27]**शि**तिकंठ. ॥ १९
राया ! [28]कुलार्थ पुरुष, ग्रामार्थ कुळहि समस्त सोडावें, ।
ग्रामहि देशार्थ, मही आत्मार्थ, बुधें भलेंचि जोडावें.[29] ॥ २०

---

१. कोल्हा, गोमायु. दुर्योधन उत्पन्न झाला तेव्हां त्यानें कोल्ह्यासारखा शब्द केला, असें वर्णन आहे (अध्याय ६२ श्लोक ३). २. संपत्ति देणारे. ३. अदक्षिणभागीं (डाव्या अंगास) भोंवरा (आवर्त) आहे ज्याचा असा (कंबु). असा शंख अशुभप्रद समजतात. ४. शंख. ५. मधातें. ६. माध्विक, मधु विकणारा, मूर्ख मनुष्य—हें वचन शुक्रोक्त नीतींतील आहे. ७. हाच दृष्टांत मूळांत आहे. ८. पर्वताचा कडा. (मूढ पर्वताच्या कड्यावरील मध पहातो, पण कडेलोट होईल हें उमजत नाहीं—असा भाव.) ९. द्यूत हेंच विष, यानें भरलेली. १०. पाणपोई. ११. सुज्ञांनीं. १२. त्या दुष्ट पुत्रांचा संग्रह करण्यांत. १३. मोठा अपराध. १४. न्यायी, यथायोग्य. १५. त्याग न करणें. १६. दुर्योधन. १७. क्षुद्रास, नीचास. १८. कंसाला. १९. अर्जुन. २०. दुर्योधनाला. २१. संग्रह करण्यास अयोग्य अशास. २२. बायको. २३. काकरूपी शंभर पुत्र देऊन पांच मयूर म्हणजे पांच पांडव घे—असा भाव. २४. विचित्रपक्षांचे मोर. २५. सिंह. मूळांत 'शार्दूल' असें आहे. २६. कोल्हा. (दुर्योधन.) २७. शंकर. ही अदलाबदल देवाला आवडेल—असा भावार्थ. २८. याविषयीं वचनाधार:—'त्यजेत्कुलार्थे पुरुषं ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् । ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ॥' (सभापर्व—अध्याय ६२ श्लोक ११). (याचा अर्थ:—एका पुरुषाच्या संग्रहेंकरून जर कुळाचा नाश होत आहे तर त्याचा त्याग करून कुळाचें रक्षण करावें. एका कुळाच्या योगेंकरून जर ग्राम नाश पावतो तर तें कुळ ग्रामांतून काढून लावावें, आणि ग्राम रक्षावा. एका ग्रामामुळें जर देश उच्छिन्न होतो तर तो ग्राम मोडून टाकावा. जर आत्मा नाश पावतो आहे तर पृथ्वीचा त्याग करून आत्मरक्षण करावें.) जंभासुराच्या त्यागाकरितां शुक्राचार्यांनें जी नीति सर्व असुरांस सांगितली तींतील हें वचन आहे. २९. ही गीति 'सार' नामक अलंकाराचें उदाहरण होय. जेथें उत्तरोत्तर उत्कर्षाचें वर्णन केलेलें असतें तेथें सारनामक अलंकार होतो:—जसें मधाहून सुधा गोड, सुधेहून काव्य गोड, इ०.

भाग्यें येवुनि बसले स्वर्णष्ठीवी[1] निजालयीं[2] पक्षी, ।
[3]आमिषलोभांध परम पामर कोणी तशा खगा भक्षी. ॥ २१
मग तळमळे, रडे बहु तो[4] आपण आपला करुनि घात, ।
तैसेंच तुजहि घडतें, हो सावध, आवरीं नृपा ! हात. ॥ २२
धनलोभें नुमजे परि तूं म्हणसील क्षणक्षणीं मग '[5]हा !' ।
आमिषलोभांध जसा तो पश्चात्तप्त मंदधी [6]खगहा. ॥ २३
[7]माळाकार तरूंचें घेतो फळ पुष्प जेंवि तेंवि नृपा ! ।
घे **पांडुसुतांपासुनि** वित्त, असोंदे मनांत पूर्ण कृपा. ॥ २४
धनलोभ धरुनि चित्तीं द्यूतें चरणाश्रितां न गांजावें, ।
त्वां नरकासि न घेवुनि संगें [9]स्वसचिवसुतानुगां जावें. ॥ २५
ऐका हो ! सर्व तुम्हीं या रायाचें करूनि हित वांचा, ।
साधुच्छळें कुळक्षय कीर्तिश्रीभंग संग [10]कितवांचा. ॥ २६
शकुनि [11]कुनीतिज्ञ कुमति, [12]येथुनि आतांचि या खळा दवडा, ।
हा न भला बुडवाया शिरला या राजमंदिरीं [13]कवडा.' ॥ २७
इत्यादि **विदुर** बोले तें ऐकुनिही [14]अंधचक्षु तो न वळे, ।
दुर्योधन [15]पंचाक्षरिमंत्रें [16]परमोग्रभूतसा खवळे. ॥ २८
जनकाहूनि परम हित, [17]परं [18]महित ज्ञानसिंधु जो त्यातें ।
धिक्कारी ; उडवी त्या [19]स्वशिवगृहाधारभूत [20]जोत्यांतें. ॥ २९
'**विदुरा** ! उगा उगा, गा ! मेळविलें बुडवितोसि यश कां गा ? ।
कोण तुला पुसतो ? कीं, 'अजि आम्हां नेणत्यां स्वहित सांगा.' ॥ ३०
निपुण असेल निजहितीं करिल पराचेंहि तोचि [21]धीर हित, ।
[22]स्वामिद्रोहरता ! तुज काय कळे ? तूं प्रसिद्ध [23]धीरहित. ॥ ३१

---

१. सुवर्ण ओकणारे. २.आपल्या घरीं. ३.मांसलोभानें अंध जसा. ४.तो लोभांध पुरुष.५.हाय! ६. पक्षी मारणारा. ७. माळी. ८. सुवर्णष्ठीवी खगाचा आणि माळाकाराचा दृष्टांत मूळांतून घेतलेला आहे (अध्याय ६२ श्लोक १३-१६). ९. आपले प्रधान, पुत्र आणि सेवक यां सह. (अनुग= सेवक.)१०.जुगाऱ्यांचा, शठांचा.११. कुमार्गं जाणणारा.१२. या राजमंदिरांतून. १३. पक्षिविशेष. कवडा हा पक्षी अशुभसूचक होय. कित्येक पक्षी शुभसूचक आणि अशुभसूचक मानण्याचा प्रकार आमच्या देशाप्रमाणें इतर देशांतही आढळतो. १४. अंध. (धृतराष्ट्र.) १५. अंगांतून पिशाच काढण्याचे पंचाक्षरयुक्त मंत्रानें, मांत्रिकाच्या मंत्रानें. १६. भयंकर पिशाचासारखा. १७. 'सर्वात्मज्ञानसिंधु जो त्यातें' असाही पाठ आहे. १८. अत्यंत पूज्य. १९. स्वकल्याणरूप गृहास आश्रयभूत जें जोतें त्यातें. (विदुराला.) २०. चौथऱ्याला.२१.सुज्ञ, पंडित.२२.राजद्रोहासक्त.२४.बुद्धिहीन.

तूं पोषिलासि[1] सादर सतत जसा आत्मकाय[2] मत्तातें[3], ।
निंदिसि सभेंत दुष्टा! कर्म विसरलासि काय मत्ता तें. ॥ ३२
अस्मदहितहित[4] इच्छिसि, लाविसि आम्हां दहांत बालिशता[5], ।
वाचाल कृतघ्न कुटिल भरतकुळीं तूंचि पात्र गालिशता[6]. ॥ ३३
राजसभेंत वदावें कैसें तें न शिकलासि अभ्यासीं ।
चतुरपण परम दुर्मिळ तुज परिचय न घडलाचि सभ्यासीं[7]. ॥ ३४
तुज काय राजनीतिज्ञान? अरे! साप दुखविला साचा? ।
मृत्यु तसाचि सपत्नहि[8], कैंचा[9] मग लाभ सुखविलासाचा? ॥ ३५
शत्रुच्छेद करावा, करितों, कां लावितोसि अन्याया? ।
आम्हींच साहतों, न दुरुक्ति तुझ्या सोसतील अन्या या. ॥ ३६
जों मृदु लागे तों तों दडपी शिशु फार ऊन भातातें, ।
तैसें न करावें त्वां न वसावें हारवूनि भा[10] तातें. ॥ ३७
शास्ता[11] एकचि, न दुजा, गर्भी[12] जीवासि 'जो[13] शिकवितो रे! ।
करितों तच्छिक्षित[14] मी, बैस उगा तूं न होसि कवि तोरें[15]. ॥ ३८
हितशत्रु[16] निकट[17] न बरा, जा त्यांप्रति 'दयित[18] जे तुला असती; ।
टांकुनि[19] जातीच बहु प्रेमें जरि सतत सांत्विली असती[20].' ॥ ३९
विदुर म्हणे, 'न धरील श्रोत्रियवचनें[21] सदाचरण कुलटा[22], ।
टाकवितां दुर्व्यसन द्वेषें इच्छील घात ती उलटा. ॥ ४०
बोध प्रगल्भ[23] हा जरि न करायाचा स्वधर्महानि बरा, ।
परि कुरुवरमति न वरी[24] नेवरी[25] जैशी वरा[26] महानिवरा[27]. ॥ ४१

---

१. पोशिला गेलास. २. स्वदेह. ३. धृतराष्ट्रानें. ४. आमच्या शत्रूंचें कल्याण. ५. मूर्खपणा. ६. अपशब्दांच्या शतकाला. ७. सभ्य प्रतिष्ठित जनांचा सहवास तुला घडला नाहीं. ८. शत्रु. ९. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १०. तेज. ११ शासनकर्ता. १२. गर्भवासांत. १३. निर्माणकर्ता. (ब्रह्मदेव.) १४. त्या निर्माणकर्त्याच्या प्रेरणेप्रमाणें आचरण. १५. गर्वानें. १६ बाह्यत: मित्र (हित) असून अंतर्यामीं शत्रु, हित न करणारा, अनिष्टचिंतक. १७. समीप. १८. प्रिय. १९. हाच दृष्टांत मूळांत योजिला आहे (सभापर्व—अध्याय ६४ श्लोक ११). हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २०. जारिणी. २१. वेदाध्ययन करणाऱ्याच्या भाषणानें. श्रोत्रियाची स्त्री दुष्ट झाली असतां घरांत ठेवण्यास योग्य होत नाहीं, असें वर्णन मूळांत आहे. (अध्याय ६४ श्लोक १४.) २२. जारिणी स्त्री. २३. प्रौढ. २४. पसंत न करी. २५. वधू, कुमारी. २६. पतीला. २७. अतिप्रौढा. (म्हाताऱ्यास, साठवर्षांच्या वृद्धास.)

अप्रिय[1] परि पथ्य असें वक्ता श्रोताहि दुर्लभ स्पष्ट, ।
बहु सुलभ प्रियंवद[2] ते वाढविती चुकविती न ते[3] कष्ट. ॥ ४२
सुप्तव्याघ्रासि[4] नको लाऊं दाटूनि शृंगे[5], परिणामीं ।
संकट पडेल, म्हणतों काय अहित हे मदांधहरिणा[6]! मी; ॥ ४३
स्पष्ट हित अहित कथिता जो होय सहाय तोचि रायास, ।
प्रियवाक् नर कीं नरकीं भोगवितो भोगितो चिरायास[7]. ॥ ४४
सदय हितकाम[8] जो त्या असमंजस कर्म पाहवेना गा! ।
कैसें लावूं द्यावें पद, ज्या लंघन न साहवे नागा[9]?' ॥ ४५
भ्रातृहितेच्छु[10] बिभीषण पावे धिक्कार कीं परम हाही[11]. ।
खळ बहु खोटा, त्यासम[12] म्हणति[13] किती कवि भला परें[14] महाही[15]. ॥ ४६
शकुनि म्हणे, 'धर्मा! त्वां हारविलें धन समस्त कीं आहे?' ।
या वचनाशि न पुच्छीं[16] दत्तपदाला भुजंगसा[17] साहे. ॥ ४७
'काय पुससि रे! अयुत प्रयुत तथा शंकु पद्म अर्बुद कीं, ।
खर्व निखर्व, समुद्रहि पूर्णधनी[18] मी, जसा उदधि उदकीं. ॥ ४८
हा लेह[19] माझा शकुने! हूं खेळ; छळ नको करूं होगा[20] ।
कपटें यमदूतवृकव्याघ्रांमध्यें न कोकरूं[21] हो गा!' ॥ ४९

---

१. 'लभ्यते खलु पापीयान्नरो नु प्रियवागिह । अप्रियस्य हि पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ॥' (सभापर्व–अध्याय ६४ श्लोक १६). भावार्थः—मधुर बोलणारा व पापप्रवर्तक असा पुरुष अनायासें सांपडेल, परंतु न आवडणारें तथापि हितप्रद वचन बोलणारा व तें ऐकणारा विरळा. २. प्रियवाद करणारे. ३. प्रिय वदणारे. ४. निजलेल्या वाघाला. ५. शिंग (हरिणाचें). ६. मदानें अंध झालेल्या हरिणा. (दुर्योधनावर हा अलंकार.) ७. चिरकाल आयास. ८. हित करण्याची इच्छा ज्यास तो. ९. सर्पाला. १०. बंधूचें (दशमुखाचें) हित इच्छिणारा. ११. विदुरही. १२. त्या खळासारखा. १३. किती कवि त्यासम (खळासम) महाहि (सर्प) म्हणती, पर (परंतु) तो महाहि (सर्प) भला आहे–असा भाव. याविषयीं श्लोकः—'सर्पदुर्जनयोर्मध्ये वरं सर्पो न दुर्जनः । सर्पो दशति कालेन दुर्जनस्तु पदेपदे ॥'. याचा अर्थः—(दुर्जन आणि दीर्घद्वेषी सर्प या उभयतांमध्यें सर्प बरा; कां कीं सर्प कदाचित् कालेंकरून दंश करितो, पण दुर्जन पदोपदीं मर्मच्छेद करितो.) १४. परंतु. १५. मोठा सर्प. १६. शेंपटीवर दिलेल्या पाउलाला. १७. सर्पासारखा. १८. धनानें परिपूर्ण समुद्र असा मी आहें (अ० ६५–श्लो० ३-४). १९. पण, पणास लावण्याचें धन. २०. ढिला, ढैल, बलहीन. २१. मेंढीचें पोर.

ऐकुनि म्हणे 'जितं'[1] तो[2] मत्स्यातें बक जसा, खळ पणातें[3] ।
ग्रासी, उपमाचि नसे दुसरी त्याच्या विशृंखळपणातें[4]. ॥ ९०
'वृष[5] हय[6] धेनु अजाविक[7] हें धन म्यां लाविलें' म्हणे **धर्म**. ।
तों तो 'जितं' म्हणे हो! होय **भरत**कुळसभेंत हें कर्म. ॥ ९१
'वर्जुनि विप्रधन[8], सकळ पुरजनपदभू[9] अविप्रपुरुष[10] असें. ।
हें शिष्ट[11] मद्धन' म्हणे धर्मात्मा[12]; भावि[13] तें चुकेल कसें? ॥ ९२
दुर्जन 'जितं' म्हणे हो! मग सर्व अमूल्य निजकुमारमणी[14] ।
द्यूतीं लावी, जिंकी त्या नियति[15], जसी हरा[16] उमा रमणी. ॥ ९३
मग **धर्म** वदे, 'सिंहस्कंध[17] युवा[18] श्याम[19] दीर्घभुज **नकुळ**, ।
हें माझें धन, जेणें धन्य म्हणे **कुरुकुळासि** सुजनकुळ[20].' ॥ ९४
'इदमपि धनं जितं ते'[21] **शकुनि** म्हणे[22], दीप्तपावक पटानें[23] ।
बांधी मणिभ्रमें[24], बहु फुगला मलिनस्वभाव[25] कपटानें. ॥ ९५
धर्म म्हणे, 'गा **शकुने**! न कुनेत्रें[26] जाय रूप[27], कुज्ञानें[28]; ।
ज्ञानासि लोचनाहुनि फार जपावें म्हणोनि सुज्ञानें[29]. ॥ ९६
सद्गुणमंडित पंडित दंडितपस्वीड्य[30] सद्विवेकपिता[31] ।
सहदेव ग्लह[32] माझा स्वप्नींहि न यन्मना[33] शिवे कपिता[34].' ॥ ९७
'त्वद्बंधुरत्न हेंही द्यूतीं म्यां जिंकिलें' म्हणे **शकुनी**. ।
साहे[35] महापराधहि, दंड खळाला करावया शकुनी[36]. ॥ ९८
'ग्लह[37] केले **माद्री**सुत; परि आतां प्रम कठिण वाटेल, ।
सोदर[38]**भीम**धनंजयपण करितां कंठ फार दाटेल, ॥ ९९

---

१. जिंकिलें. २. शकुनि. ३. पणास लावलेल्या धनातें. ४. उद्दामपणातें, दांडगेपणातें. ५. बैल. ६. घोडा. ७. शेळ्या व मेंढ्या. ८. ब्राह्मणांचें धन शिवाय करून. ९. नगर व देशभूमि. १०. अब्राह्मण—पुरुष; विप्रांवांचून क्षत्रियादिक जन. ११. शिल्लक राहिलेलें (अध्याय ६५ श्लोक ८). १२. धर्मपरायण धार्मिक (धर्मराज). १३. जें व्हावयाचें तें. १४. राजकुमार आणि त्यांचीं महार्ह भूषणें. १५. दैव. १६. शंकराला. १७. सिंहासारखे खांदे ज्याचे असा. १८. तरुण. १९. श्यामवर्ण. २०. सुजनांचा समुदाय. २१. हेंही तुझें धन जिंकिलें. २२. प्रज्वलित अग्नि. २३. वस्त्रानें. २४. रत्नांच्या भ्रांतीनें. २५. दुष्ट स्वभाव ज्याचा तो. (शकुनि.) २६. वाईट लोचनानें. २७. शोभा, सौंदर्य. २८. कुत्सित ज्ञानानें मनुष्याचें रूप बिघडतें. २९. ज्यास उत्तम ज्ञान आहे त्या मनुष्यानें. ३०. संन्यासी तपस्वी यांहीं स्तुत. ३१. सद्विचारांचा जनक. ३२. पणास लावण्याचें द्रव्य. ३३. ज्याच्या (सहदेवाच्या) अंतःकरणास. ३४. मर्कटचेष्टा. ३५. (धर्मराज) खळाला दंड करावया शकुनी (समर्थ असून) महापराध साहे (सहन करी.) ३६. समर्थ असून. ३७. शकुनि म्हणतो. ३८. सहोदर भाऊ भीम आणि अर्जुन यांचा पण.

धर्म म्हणे, 'मी म्हणतों [१]मूर्तिधर [२]बहिश्चर [३]स्वअसु यांतें; ।
शकुने! [४]परुषोक्तीतें [५]भ्याल्या श्रुति, कांपतील न सुयांतें. ॥ ६०
सर्व अनिष्ट करावें शकुने! त्वां कीं परेंहि [६]अंतरतें ।
परि न वदावें बंधुप्रेमीं जेणें पडेल [७]अंतर तें.' ॥ ६१
शकुनि म्हणे, 'कौंतेया! द्यूतीं [८]कितवप्रलाप बहुतर, ते[९] ।
वदते हित मित, कितव व्यसनीं बुडते कशास? बहु तरते. ॥ ६२
ज्येष्ठ[१०] श्रेष्ठ[११] नृपा! तूं न धरावे बोल हे मनीं कांहीं; ।
द्यूतीं बहु कितवांहीं बडबडिजे, संगरीं [१२]अनीकांहीं.' ॥ ६३
धर्म म्हणे, 'ग्लह केला अर्जुन, जरि योग्य हा न या [१३]कामीं; ।
शकुने! याच्या तेजें झालोंसे विदित[१४] फार [१५]नाका मी.' ॥ ६४
'तो जिंकिला' म्हणे खळ, बसला मूळींच [१६]नागवायाला, ।
कीं भेटला कपटमिष साक्षात् कोल्हाचि नागवा याला. ॥ ६५
धर्म म्हणे, 'पण केला आतां, ज्याच्या [१७]कृतांत भी [१८]महिम्या; ।
[१९]अमितबल [२०]सन्नतभ्रू [२१]तिर्यक्प्रेक्षी [२२]गदींद्र भीमहि म्यां.' ॥ ६६
शकुनि म्हणे, 'याहि पणा जिंकुनि, [२३]पणविजयतत्पर [२४]मदक्ष ।
धर्मा! [२५]ग्लहांतराची वाट पहाताति हे परम [२६]दक्ष. ॥ ६७
सुत बंधुहि हारविले, उरलें धन काय गा! पणास हितें[२७]?' ।
धर्म म्हणे, 'मी द्यूतीं बुडविन [२८]सर्वस्व आपणासहित.' ॥ ६८
धर्मासहि जिंकी खळ कपटजयें, परम [२९]अक्षमहि, [३०]मांते, ।
जे व्यसन टाकणारे बुध हा ऐकोत [३१]अक्षमहिमा ते. ॥ ६९
शकुनि म्हणे, 'चुकलासि ग्लहयोग्यहि संग्रहीं असोनि धन, ।
जिंकोनि घेतलें कां? समयीं चुकणें नसो, असो [३२]निधन. ॥ ७०

---

१. देहधारी. २. शरीराबाहेर फिरणारे. ३. माझे प्राण. ४. कठोर शब्दास. ५. कान. ६. नाशाविषयीं रत, तत्पर, अज्ञानें. ७. वैमत्य, परस्परमतभेद होईल असें न वदावें. ८. जुगारी लोकांची बडबड. ९. कितव, द्यूत खेळणारे. १०. वयानें अधिक, थोर. ११. वरिष्ठ, गुणांनीं थोर. १२. सैन्यांनीं. १३. या द्यूतांत. १४. प्रसिद्ध, प्रख्यात. १५. स्वर्गाला. १६. लुटायाकरितां. १७. यम. १८. पराक्रमाला, मोठेपणाला. १९. अमर्याद सामर्थ्य ज्याचें असा. २०. चांगल्या कमानदार भिवया ज्याच्या असा. २१. वांकडें पहाणारा. २२. गदाधरांमध्यें श्रेष्ठ. २३. पण जिंकण्यास दक्ष. २४. माझे फांसे. २५. दुसऱ्या पणाची. २६. निपुण, कुशल. २७. उपयुक्त. २८. सर्वधन. २९. असमर्थ. ३०. माझे. ३१. फांशांचा पराक्रम. (फांसे खेळण्याचा परिणाम.) ३२. मृत्यु.

वे आपणासि राया! सोडवुनि द्रौपदीस लाव कसा? ।
श्रीचा कैवारी नृप धन्य, स्त्रीचा सदैव [1]लावकसा.' ॥ ७१
धर्म म्हणे, 'शकुने! जी [2]रूपें [3]श्रीला, क्षमागुणें [4]महिला, ।
साजे सखी अखिन्ना कृत्यभरें सुमति आमुची [5]महिला. ॥ ७२
[6]शरदुत्पलपत्राक्षी [7]शरदुत्पलपुण्यगंधसमगंधा, ।
[8]अस्खलित चालवी गृहधर्मीं मज, यष्टि तसि पथीं अंधा. ॥ ७३
आली [9]मखवेदीच्या जी [10]द्रुपदसुकृतभरास्तव [11]कुशीला, ।
वाटो बरा [12]सुशीला, वाटेल न हा बरा [13]स्तव [14]कुशीला. ॥ ७४
आधीं जिणें [15]उठावें, पाहुनि निजलों असें मग निजावें, ।
[16]रागेजणें सुदुर्मिळ तेंहि जिचें ज्वालसें गगनिं जावें. ॥ ७५
धौम्यापासुनि गोपांपर्यंत जिणें स्वयें समाचार ।
घ्यावा [17]श्रिततापहर श्रीगंगेचा जिचा [18]समाचार. ॥ ७६
ती देवी आतां म्यां या द्यूतीं लाविली, अहाहा! रे! ।
[19]छळिसी द्यूतींच कसा [20]हारे अन्यत्र कां न [21]हा हारे?' ॥ ७७
धर्म [22]नयज्ञोत्तम जो द्यूतीं [23]स्वकलत्ररत्न तो लावी. ।
हांसे '[24]जितं' म्हणे खल, कवि हो! ती गोष्टि काय बोलावी? ॥ ७८

---

१. लावकपक्ष्यासारखा. स्त्रीचा (कैवारी नृप) लावकसा–लावापक्ष्यासारिखा (होय); हा पक्षी आपल्या मादीविषयीं फार लंपट असतो, असा समज आहे. तात्पर्य, तूं आपला व संपत्तीचा नाश करून स्त्रीचें रक्षण केलेंस म्हणून तूं स्त्रीलंपट आहेस. (नवनीत.) २. लावण्यानें. ३. लक्ष्मीला. ४. पृथ्वीला. ५. स्त्री. ६. शरदृतूंतील कमलपत्रासारिखे नेत्र जीचे अशी. (अध्याय ६५ श्लोक ३४ पहा. उत्पल=कमल.) ७. शरदृतूंतील जें कमल त्याच्या सुगंधाशीं तुल्य गंध जीचा अशी. ८.पतन पावल्याशिवाय.९.यज्ञकुंडाच्या. १०. द्रुपदराजाच्या पुण्यातिशयामुळें. सुकृत=पुण्य. ११.उदरास. १२. सुस्वभावाच्या जनास. १३. स्तुति. १४. दुराचरणी लोकांस. १५. अध्याय ६५ श्लोक ३७ पहा. १६. रागावणें. ती आधीं कधीं रागावयाची नाहीं, रागावलीच तर तिचा राग अग्निज्वालेप्रमाणें आकाशांत (वरल्यावर) तत्काळ निघून जातो; म्हणजे त्यापासून कोणास पीडा होत नाहीं–हें तात्पर्य. (नवनीत.) १७. आश्रितांचा ताप हरणारा. (हें 'समाचार' याचें विशेषण.) १८. सारखें आचरण. १९. हा अन्यत्र न हारे, द्यूतींच हारे, अतएव छळसी. हा (मी धर्मराज) दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींत हार (पराभव) पावत नाहीं आणि द्यूतांतच कसा पराभव पावतों? यास्तव तूं मला कपट करून छळतोस–असा भावार्थ. २०. हारे. (पराभव पावे.) २१. हा धर्मराज. २२. नीतिनिपुणांमध्यें श्रेष्ठ. २३. स्त्रीरत्न. (कलत्र=स्त्री.) २४. जिंकिलें.

'धिक् धिक्' सभ्यजन म्हणे, विदुर अधोवदन बैसला उगला. ।
भीष्म द्रोण म्हणति, 'हा ! भाच्यांसह शकुनि जयसुखें फुगला.'॥ ७९
'किं जितमिह ? किं जितमिह ?' ऐसें असकृत् पुसे अचक्षु रसें, ।
रडले सभ्य, तयांच्या हृदयीं तें लागलें वच क्षुरसें. ॥ ८०
सखिहस्तीं हस्त न वृष, पांडवहृदयांत सायका मारी; ।
क्रोधातें भीम गिळी, गरळातें जेंवि काय कामारी. ॥ ८१
अंधसुत म्हणे, 'विदुरा ! कृष्णा दासी सभेसि आणावी, ।
गृहसंमार्जन करणें, हे सेवा तीस योग्य जाणावी.' ॥ ८२
विदुर म्हणे, 'शस्त्र वधी गिळितां तत्काळ बोकडाला हें ।
तैसेंचि कर्म करिसी, रे मंद ! न मृत्यु रोकडा लाहें. ॥ ८३
हरिच्या पुन्हा पुन्हा कां काड्या नाकांत घालिसी शशका ! ।
यश काय पक्षिपतिचें येइल हे चौर करुनि तुज मशका ! ॥ ८४
ब्रूयात्क्षमी गभीरोऽसीति बत युधिष्ठिरं प्रभुं को न ? ।
निज नीचपण प्रकटसि, तूं श्वान भल्यावरीहि भुंकोन. ॥ ८५
पांडव किमपि न वदती, तूं वदसि सभेंत शब्द घाणेरे, ।
हे सकळखळतिळांचे रगडुनि करणार पिष्ट घाणे रे !' ॥ ८६

---

१. उगाच, स्तब्ध. (अध्याय ६५ श्लोक ४२ पहा.) २. हाय ! हाय !. ३. या डावांत काय जिंकलें ? (अध्याय ६५ श्लोक ४३.) ४. वारंवार. ५. धृतराष्ट्र. ज्यास चक्षु (नयन) नाहीं तो. ६. गोडीनें, आवडीनें. ७. भाषण. ८. वस्त्र्यासारखें तीक्ष्ण. ९. मित्र जो दुर्योधन त्याच्या हातावर. १०. 'सखिहस्तीं हस्त न नृप' असाही पाठ आहे. या पाठाचा स्वीकार केल्यास सखिहस्तीं म्हणजे मित्र जो कर्ण त्याच्या हातावर आणि नृप म्हणजे दुर्योधन, असें समजावें. ११. कर्ण. १२. बाणाला. १३. विषातें. १४. शंकर. (यानें विष प्राशन केलें ही कथा सुप्रसिद्ध आहे.) हें अपन्हुतिनामक अलंकाराचें उदाहरण होय. 'ह्या उदाहरणांत हातावर हात मारणें ह्याच्या स्वरूपाचा अपलाप करून त्याच्याठायीं बाण मारणें ह्याचा आरोप केला आहे.' (साहित्यशास्त्र, पृष्ठ ६१.) १५. दुर्योधन. १६. घरांतील झाडसारवण. १७. सभापर्व–अध्याय ६६ पहा. १८. [बोकड शस्त्र] गिळितां [तें] शस्त्र बोकडाला तत्काळ वधी, हें तैसेंचि कर्म करिसी–असा अन्वय. (अध्याय ६६ श्लोक ८.) १९. मूर्ख. 'रे मंदा ! मृत्यु रोकडा लाहें.' असाही पाठ आहे. २०. (धर्मरूप) सिंहाच्या. २१. (दुर्योधनरूप) ससा. २२. (धर्मरूप) गरुडाचें. २३. चेष्टा. २४. (दुर्योधनरूप) चिलटा. ही गीति रूपकातिशयोक्तिनामक अलंकाराचें उदाहरण आहे. २५. तूं क्षमाशील व गंभीर आहेस असें कोण बरें धर्मराजास म्हणणार नाहीं ?. २६. कुतरा.

दुर्योधन हित कथितां 'धिक्कार तुला[1] असो' असेंच वदे. ।
ज्वरिता[2] जसें ससितपय[3] सद्वचन न दुर्जना तसें[4] चैव दे. ॥ ८७
कल्यंश[5] खळशिरोमणि[6] कपटपटु कटुस्वभाव सद्द्वेषी[7], ।
तो प्रातिकामि[8]नामक सूतातें द्रौपदीप्रति प्रेषी. ॥ ८८
'सूता! जा कृष्णेला घेवुनि ये, भय नसे तुला लेश, ।
सर्वज्ञ न, किंचिज्ज्ञ[9] क्षत्ता[10], ब्रह्मा नव्हे कुलालेश[11]. ॥ ८९
बहु कातर[12] विदुर सदा, वटवट[13] करितो अशीच हा नीच, ।
या खोत्याला गमते जी अस्मद्वृद्धि[14] ती स्वहानीच.' ॥ ९०
जावुनि तो सूत वदे, 'कृष्णे! द्यूतांत तूं स्वयें धर्में ।
हारविलीस, सुयोधनसदनाप्रति ये करावया कर्में[15].' ॥ ९१
हें वाक्य त्या सतीतें बहु दुःसह जेंवि वज्र कदलीतें[16], ।
परि परिसावें धैर्यें त्यासीं जें ती सुबुद्धि[17] वदली तें. ॥ ९२
सूता! काय वदसि हें? द्यूतीं हारविति संपदेतें[18] गा!।
[19]श्री म्हण, न स्त्री म्हण, हें त्वद्वचन[20] मनास कंप देतें गा!' ॥ ९३
सूत म्हणे, 'आधीं श्री, मग सात्मजबंधुमंडळी[21] धर्में ।
हारविली, निजमूर्ती द्यूतीं स्त्री शेवटीं असत्कर्में.' ॥ ९४
राज्ञी[22] म्हणे, 'तरि अगा! जा पूस सभेंत तूं असें आर्या, ।
राजेंद्रा! हारविली प्रथम द्यूतीं स्वमूर्ति कीं भार्या?' ॥ ९५
सूत सभेंत विचारी धर्मातें कीं, 'असें पुसे आर्या, ।
राजेंद्रा! हारविली प्रथम द्यूतीं स्वमूर्ति कीं भार्या?' ॥ ९६

---

१. विदुराला. २. ज्वर आलेल्या रोग्याला. ३. शर्करायुक्त दुग्ध. (सिता(शर्करा)सह जें तें ससित.) ४. गोडी. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ५. कलीचा अवतार. (दुर्योधन.) ६. खळांचा मुकुटमणि, दुष्टश्रेष्ठ. ७. साधूंचा द्वेष करणारा. ८. दूतविशेष. हा दुर्योधनाचा सूत (सारथि) द्यूतप्रसंगीं द्रौपदीस सभेंत ये म्हणून बोलावण्यासाठीं गेला होता. ९. अल्पज्ञाता. १०. सूत, विदुर. ११. कुंभारांचा स्वामी हवीं तशीं मडकीं घडतो, म्हणून तो सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाची सर पावेल काय? तसा अल्पस्वल्प जाणतो म्हणून विदुर सर्वज्ञ समजूं नये—असें तात्पर्य. (कुलालांचा—कुंभारांचा ईश—स्वामी). १२. भितरा. १३. विपरीत बोलतो, बडबड करतो. १४. आमची (वृद्धि) भरभराट, आमचा उत्कर्ष. १५. चाकराचा कामधंदा, दास्य. १६. केळीस. १७. बुद्धिमती. (द्रौपदी.) १८. संपत्तीला, श्रीला. १९. श्री (संपत्ति) हारविली असें म्हण, परंतु स्त्री (भार्या) हारविली असें म्हणूं नको. (अध्याय ६७ श्लोक ५.) २०. तुझें भाषण. २१. पुत्रासहवर्तमान बंधुमंडळी. २२. द्रौपदी. २३. अध्याय ६७ श्लोक ७-८ पहा.

धर्म न कांहींच वदे; तों दुर्योधन म्हणे, 'सभेस तिनें ।
यावें, स्वयें पुसावें, जें पुसणें योजिलें तिच्या मतिनें.' ॥ ९७
कृष्णेप्रति सूत म्हणे, 'देवि! न कांहींच धर्म वदला गे! ।
जाणो सभासदांसहि कठिन त्वत्प्रश्नवाक्यपद[1] लागे. ॥ ९८
दुर्योधन वदला कीं, त्वांचि पुसावें सभेंत, डोलेल[2] ।
त्वत्प्रश्नश्रवणसुखें, तुज पाहुनियां यथार्थ बोलेल. ॥ ९९
बहुधा सभेंत तुजला नेईल क्षुद्रबुद्धि[3] गांजाया; ।
नसतां उपाय कांहीं आग्रह करिशील तूंहि कां जाया?' ॥ १००
कृष्णा म्हणे, 'समर्थ न कोणीही सुज्ञ भावि टाळाया, ।
जेंवि विधु[4] राहु येतां पर्वी[5] आत्मप्रभा[6] विटाळाया. ॥ १०१
रक्षील धर्म समयीं, धरिती त्याचाचि भरंवसा सुकवी[7]; ।
आर्जविला असतां तो स्वजनव्यसनासि[8] निश्चयें चुकवी. ॥ १०२
भरतकुळधर्म न बुडो; सभ्यांला पूस एकदां जा, गा! ।
तन्मत[9] मान्य मला, कीं नय तच्चित्तीं[10] असे सदा जागा[11].' ॥ १०३
पुनरपि सभेंत जावुनि सूत म्हणे, 'सभ्य हो! तुम्हांस सती, ।
द्यूतांत मी जिता कीं, अजिता, ऐसें मदाननें[12] पुसती.' ॥ १०४
दुर्जनदुराग्रहाचे ज्ञाते[13] सभ्यहि न पोहतीच[14] वर, ।
तेथें उत्तर कैंचें? न चलेलसें[15] न वदती कविप्रवर[16]. ॥ १०५
जाणुनि संकट धर्में दूतमुखें कळविलें स्वजायेतें ।
कीं, 'श्वशुरासि[17] शरण ये', गुरु[18] कवच[19] व्यसन उग्र ज्या येतें. ॥ १०६
सभ्य[20] न वदती कांहीं, पांडवही मूकबधिरसम[21] गमती, ।
पाहुनि असें सुयोधन बोले जो सत्पथोपरमगमती[22]. ॥ १०७

१. तुझ्या प्रश्नाच्या वाक्यांतील प्रत्येक शब्द. २. या क्रियापदाचा कर्ता 'सभा' अध्याहृत समजावा. ३. हलक्या बुद्धीचा. (दुर्योधन.) ४. चंद्र. ५. पूर्णिमेस. ६. आपली कांति. ७. ज्ञाते. ८. आपल्या भक्तांच्या संकटांला. ९. त्या सभ्यांचा अभिप्राय. १०. त्या सभ्यांच्या मनांत नीति जागृत असते, कारण ते सभ्य धर्मात्मे आहेत. (अध्याय ६७ श्लोक १६.) ११. जागृत. १२. माझ्या मुखानें. (मत् + आननें=मुखें.) १३.दुर्जन जो दुर्योधन त्याच्या (द्रौपदीला सभेंत आणण्याविषयींच्या) दुराग्रहाला जाणणारे (ज्ञाते) असे जे भीष्मादिक सभासद. १४. अधोमुख बसले. १५. न चालेल असें, न मानवेल अथवा न पसंत पडेल असें. १६. कविश्रेष्ठ, सुज्ञवर्य. १७. धृतराष्ट्राला. १८. ज्या व्यसन उग्र येतें (त्याला) गुरु कवच (आहे)--असा अन्वय. हा चरण सुभाषितरूप आहे. १९. चिलखत, रक्षण करणारें साधन. २०. सभासद. २१. मुके आणि बहिरे यांसारखे. २२. साधुमार्गाच्या नाशाकडे (उपरमाकडे) जाणारी ज्याची मति असा.

'तीतेंचि आण जा, रे! ती कां स्वमुखें पुसे न येऊनी? ।
सभ्यजनीं हितपृच्छक, [1]सीतार्तहि कोण गा! नये [2]ऊनीं? ॥ १०८
सभ्यांनीं [3]प्रश्नोत्तर योजावें नीट कीं न योजावें, ।
[4]आर्तें वैद्यगृहाला, गुण यो, कीं [5]प्राक्तनें न यो, [6]जावें.' ॥ १०९
[7]मत्तें [8]श्वयूथपें [9]श्वा [10]सिंहीप्रति धाडितां धरायाला, ।
जाईल कसा? तैसा सूतहि भी कर्म तें करायाला. ॥ ११०
तांतड करी **सुयोधन**, परि सूत पुन्हा म्हणे, 'अहो सभ्य! ।
काय वदों? प्रश्नोत्तर **कृष्णेला** कां न होय हो! लभ्य?' ॥ १११
कोपें म्हणे **सुयोधन**, 'भीतो **भीमा**सि सूत हा भितरा, ।
[13]दुःशासना! स्वयें जा, आण तिला, कर्म हें नव्हे इतरा.' ॥ ११२

अध्याय पांचवा.

तो [11]हरिणीग्रहणार्थी [12]अत्युग्रप्रकृति लांडगासा च ।
गेला तेंचि कराया **दुःशासन** दुष्ट दांडगा साच. ॥ १
कृष्णेसि [13]म्हणे, 'चाल, द्यूतीं तुज जिंकिलें, [14]भज **कुरुत्तें**, ।
[15]**कुरुपतिस** पहा, लज्जा त्यज, सेवावें तुवां [16]शतगुरुत्तें.' ॥ २
त्या [17]दुष्टोक्तिश्रवणें **धर्मा**ची संकटीं पडे [18]जाया, ।
संरक्षणार्थ धांवे **धृतराष्ट्रा**च्या स्त्रियांकडे जाया. ॥ ३
पळतां धांवोनि तिला त्यां केशांतें धरूनि [19]आकर्षी, ।
ज्यां राजसूययज्ञीं अभिषेकिति बहु [20]महर्षि [21]नाकर्षी. ॥ ४
कृष्णा म्हणे, 'सभेंत न न्यावें मज, मी रजस्वला, आंगा ।
आच्छादन [22]एकांबर, नेतोसि अशीस आग्रहें कां? गा!' ॥ ५

---

१. थंडीनें पीडित. (सीत=थंडी, आर्त=व्यथित.) २. सूर्याच्या प्रकाशांत. हा चरण सुभाषितरूप आहे. ३. प्रश्नाचें उत्तर. ४. रोग्यानें. ५. दैवानें. ६. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ७. माजलेल्यानें. ८. कुत्र्यांच्या कळपाच्या नायकानें. ९. कुत्रा. १०. अध्याय ६७ श्लोक २५ पहा. ११. मृगीला पकडण्याचा हेतु ज्याचा आहे असा. १२. अतिक्रूर आहे स्वभाव (प्रकृति) ज्याचा असा. १३. दुःशासन म्हणे. १४. सेवा कर. १५. दुर्योधनातें. १६. शंभर भावांत जो गुरु (वडील) दुर्योधन त्यातें. (अध्याय ६७ श्लोक २७.) १७. दुष्ट भाषणाच्या श्रवणें. १८. स्त्री. १९. ओढी. (दुःशासन.) २०. महातपस्वी. २१. स्वर्गस्थ नारदादिऋषि.(नाक=स्वर्ग.)२२. एकवस्त्र. (अंबर=वस्त्र.)

दुष्ट म्हणे, 'खसमेला तुजला नेतोंचि, दूरसी अस कीं, ।
एकांबरा अस; तुझीं अंगें नग्नें असोत कीं [1]असकीं.' ॥ ६
देवी म्हणे, '[2]अनार्या! नाहीं तुझिया मनांत [3]पापदर, ।
ओढूं नको फरफरां, घेऊं दे सांवरूनि हा पदर.' ॥ ७
अधम म्हणे, 'द्यूतजिता दासी, तूं लाजसी कशाला गे! ।
चाल उगीच, प्रभुशीं हट करितां पाठिशीं कैशा लागे.' ॥ ८
कृष्णा म्हणे, 'पति कसें पाहुनि हें कर्म साहतील? न द्या ।
पद सर्पशिरीं, तुमच्या रक्ताच्या स्पष्ट वाहतील नद्या. ॥ ९
गुरुजनसभेंत कैसा नेसी ओढूनि काय हा नीचा! ।
करितोसि कर्म दुष्टा! प्रास्यर्थ बळेंचि काय हानीच्या? ॥ १०
धर्म परम सूक्ष्म असे, धर्मात्मा धर्म नृप नसे चुकला, ।
सावध व्हा, कंठीं यमपाश कसे घालितां अहा! उकला.' ॥ ११
ओढुनि सभेंत नेली तेव्हां ती द्रौपदी म्हणे, 'कुरुची ।
कीर्ति बुडाली, हा धिक्! कुरुवृद्धांलाहि मानली कुरुची. ॥ १२
हा! भीष्म द्रोण कसे न म्हणति हे सहजमित्र सत्व रहा ।
अन्यायें बुडणार व्यसनीं कुरुराजवंश सत्वर हा. ॥ १३
अन्यायाचलभिदुरें विदुरें अनवरतशुद्धसत्वरतें ।
जाऊं दिलें कसें? जें गेलें सोडूनि सख्य सत्वर तें ॥ १४
कारुण्यरसें भरले होते, जे दुर्बळाशि उद्धरिते, ।
झाले कसे अकस्मात् ते केवळ कुरुगुरु प्रबुद्ध रिते?' ॥ १५
[11]प्रेरियले भेदाया [12]पतिधैर्यद्विरदकट कटाक्ष तिनें ।'
प्रथम न म्हणती श्रीच्या म्हणती स्त्रीच्याचि [13]कटकटा क्षतिनें. ॥ १६
पेटे [15]पांडवकोपानल, [16]कृष्णादृष्टि होय [17]तद्धमनी; ।
करितील काय हो! ते? नि[18]जमर्यादागुणेंचि बद्ध मनीं. ॥ १७

---

१. अवघीं. २. नीचा, अधमा. ३. पापभय.(दर=भय.)४. चाबूक. ५.हा माझा देह. ६.नाशाच्या. ७. उलगडून काढा. ८. वाईट कृत्याची आवड. ९. अनीतिरूप पर्वतास (अचलास) वज्रासारख्या (भिदुरासारख्या) अशा (विदुरानें). १०. निरंतर शुद्ध सत्वगुणांत रमणारा असा, अखंड शांतवृत्तीचा असा त्यानें. ११. पाठविले. १२. पतिधैर्यरूप गजाचीं गंडस्थळें. १३. खेदोद्गारशब्द, (हाय हाय!) १४. नाशानें. १५. पांडवांचा क्रोधरूप अग्नि. १६. द्रौपदीचे कटाक्ष. १७. कोपाग्नीची फुंकणी (धमनी). १८. आपल्या मर्यादारूप दोरीनें. (गुण=दोरी.)

दुःशासनासि म्हणती भीमादिक निजमनांत, 'हे बाल[1]! ।
हूं; सुत सर्पिणीतें मेली मानूनि ओढ हे बाल[2].' ॥ १८
केश धरुनि दुःशासन तीस बळें फिरफिरोनि दे हिसके, ।
भावितमःप्रशमीं[3] न क्षम[4]ही होऊनि तेजें[5] देहिं शके[6]. ॥ १९
'दासी दासी' ऐसें असकृत्[7] तो खळ म्हणे सहास[8] तितें; ।
जाणो क्षमालि[9] शिकवी, 'जें जें अरि करिल तूं सहा सति! तें.' ॥ २०
'दासी दासी' म्हणतां दुर्योधन कर्ण शकुनि मोदवती[10] ।
हांसति खळ, सभ्य रडति, दुष्टें छळतां सभेंत मानवती[11]. ॥ २१
'गांगेय[12] म्हणे[13], 'सुभगे[14]! धर्म परम सूक्ष्म[15], यास्तव स्पष्ट, ।
'ऐसेंचि[16] असे' मजला वदवेना हा विचार बहु कष्ट. ॥ २२
वदला जितोऽस्मि[17] ऐसें धर्म; शकुनिनें तयावरि स्वमतें ।
पण करविला तुझा, या वरुनि तरि न तूं जिती[18] असें गमतें. ॥ २३
द्यूतांत परस्वपण[19] स्थापाया[20] निःस्वें[21] जन न्हे शक्त, ।
स्त्रीचें भर्तृवशत्व[22]हि पाहोनि[23] न मी वदों शकें व्यक्त.' ॥ २४

---

१. हे मूर्खा. २. केश. ३. (द्रौपदीच्या) देहीं क्षम तेज होऊनि ही भावितमःप्रशमीं न शके—असा अन्वय. द्रौपदीच्या आंगीं योग्य पातिव्रत्यतेज होतें तथापि पुढें अवश्य होणाऱ्या वस्त्रहरणादिरूप दुःखांचा उपशम करण्यास तें समर्थ झालें नाहीं. ४. समर्थ. ५. पराक्रम, सामर्थ्य. ६. समर्थ झालें नाहीं. ७. वारंवार. (सकृत्=एकवार) ८. हांसत हांसत, उपहास-पूर्वक. ९. क्षमारूप सखी (आलि). १०. हर्ष पावती. ११. मानप्रतिष्ठा ठेवण्यास योग्य अशी, पूज्य, द्रौपदी. १२. गंगात्मज. (भीष्म.) १३. सभापर्व—अध्याय ६७ श्लोक ४७-४९ पहा. १४. हे सौभाग्यसंपन्ने स्त्रिये. १५. जाणण्यास कठिण, न्यायान्याय विचार अत्यंत गहन. १६. तुझ्या प्रश्नाचें उत्तर अमुकच होय असें. धर्माची गति अतिसूक्ष्म आहे, त्याचा निर्णय करतां येत नाहीं, म्हणून तुझ्या प्रश्नाचें उत्तर देण्यास मी समर्थ नाहीं—असें तात्पर्य. १७. मीं जिंकलों गेलों आहें. १८. जिंकिलेली. १९. दुसऱ्याच्या स्वाचा (धनाचा) पण. २०. लावण्यास. २१. दरिद्री, निर्धन. २२. पतीच्या स्वाधीन असणें. २३. मनांत आणून. 'धर्म स्वतः जिंकला गेला यास्तव स्त्रीच्या संबंधानें निःस्वत्व (निर्धन) झाला; म्हणून द्रौपदी हें दुसऱ्याचें धन पणास लावण्यास त्याला अधिकार राहिला नाहीं, ह्यावरून पाहतां तूं जिंकली गेली नाहींस असें वाटतें; परंतु स्त्री ही सर्वदा भर्त्याच्या स्वाधीन, तस्मात् भर्त्याची जी गति तीच तिचीही असावयाची, म्हणून धर्म जिंकला गेला तेव्हां तूंही जिंकली गेलीस असें वाटतें, ह्यासाठीं अमुकच गोष्ट खरी असें मला स्पष्टपणें सांगतां येत नाहीं—हें तात्पर्य. (नवनीत.)

[1]कुरुवृद्ध असें बोले, उपहासें ताप ते [2]कितव देती. ।
सभ्यांसि निर्णयार्थ प्रार्थुनि पुनरपि [3]अशंकित वदे [4]ती. ॥ २५
'द्यूतीं [5]अनतिनिपुणनृप कितवांनीं आणिला बळेंचि कसा? ।
दावुनि कर्पूर जसा घालावा लोचनीं बळें चिकसा. ॥ २६
केलें [6]तसेंचि; हरिलें कपटें [7]सर्वस्व शेवटील पणें ।
नृप जिंकिला शकुनिनें, याला नरकींच शेवटीं लपणें. ॥ २७
केलें [8]स्वपरिभवांत द्यूत, पुन्हा भूप [9]लाउ [10]दारपण, ।
या बुद्धिनें शकुनिनें दाखविलें आपुलें उदारपण. ॥ २८
ऐसें असतां द्यूतीं अजिता मी कीं जिता? करा [11]संवदा ।
पुण्याचा, पुशिलें हें सत्य पहा, जोडित्यें करास, वदा. ॥ २९
[12]कुरुगुरुवचन तसें जरि संदिग्ध वदाल तरि न भागावें ।
अजि सभ्य हो! जरि गुरुहि न हरी संदेह, तरि [13]नभा गावें.' ॥ ३०
न वदे कोणीहि किमपि दुःशासन [14]घाबरी करी तीतें, ।
तद्रीति सम कवि म्हणो [15]ग्रामहरीच्या [16]बरीक रीतीतें. ॥ ३१
तें पाहुनि भीम [17]म्हणे, 'राया! आम्हांसमक्ष कृष्णेची ।
हे दुर्दशा बरी कीं? पूर्ति असे कीं न [18]अक्षतृष्णेची? ॥ ३२
आहेत कितव पुष्कळ, पुष्कळ त्यांच्या गृहांत [19]बटकीही, ।
[20]स्नेहें तेहि न त्यांतें [21]पण करिति, मदुक्ति काय लटकी ही? ॥ ३३
श्री बुडविली [22]महेंद्रश्रीतुल्या, मज इची नसे परवा, ।
[23]परें [24]वामलोचनेच्या ऐकों न शकेंचि या [25]विलापरवा. ॥ ३४

---

१. भीष्म. २. जुवेबाज, शठ. ३. शंका न धरतां. ४. द्रौपदी. ५. फार निपुण नव्हे असा धर्मराजा. ६. डोळ्यांत कापुर न घालतां चीक घालावा तसें केलें. ७. सकल धन. (द्रौपदीरूप धन.) ८. आपला परिभव (पराजय) अंतीं आहे असें (द्यूत). ९. बायकोचा पण लावो. १०. स्त्रीपण.(दार= बायको) ११. व्यापार. 'सवदा' हा फारसी शब्द आहे. १२. भीष्मवचन. १३. नभाला, आकाशाला, शून्याला गावें. गुरुच संदिग्ध बोलून संदेशनिरास करणार नाहीं तर, दुसरा कोणी निर्णय करील ही आशा उरली नाहीं—असें तात्पर्य. १४. पांडवपक्षपाती भीष्मानें जेव्हां संदिग्ध उत्तर दिलें, तेव्हां आपला जय झाला असें मानून दुःशासन अप्रिय, कटु आणि कठोर वचनें बोलून द्रौपदीला घाबरी करी. १५. (ग्रामसिंह) कुत्र्याच्या. १६. मात्र. १७. अध्याय ६८ श्लोक १-६ पहा. १८. द्यूत खेळण्याच्या इच्छेची. १९. दासी. २०. दया करून. २१. पणास लाविती. २२. इंद्राच्या संपत्तीसारखी. २३. परंतु. २४. वाम (सुंदर) आहेत लोचन (डोळे) जीचे अशी द्रौपदी, तिच्या. २५. शोकाच्या शब्दा.

या साध्वीस न दुःखद पर करचि, तुम्हां स्वकीर्तिहानिकर ।
हा निकर[1] पातकांचा, कैसा केला खळें महानिकर[2]? ॥ ३५
रे सहदेवा! सत्वर पुष्कळसा अग्नि आण जाचकसा, ।
जाळूं यांचे[3] हे कर, आम्हां हा सोसवेल जाच[4] कसा?' ॥ ३६
श्वेताश्व[5] म्हणे, 'बापा! भीमा! जीमाजि[6] वास अशिवाचा[7] ।
केवळ बाळपणींही वदलासि न तूं कधींहि अशि वाचा. ॥ ३७
द्यूतीं स्वधर्मगौरवधन[8] बहुधा त्वांहि सर्व हारविलें, ।
उक्तींत तें[9] दिसेना लेश, जसें भित्तिचित्र[10] सारविलें. ॥ ३८
क्षात्रव्रत[11] स्मरोनि द्यूतीं पाचारिलें म्हणुनि आला, ।
व्यसनी[12] स्वयें नव्हे हा, आर्य[13] अतिक्रमिसि[14] कां बुधा! याला? ॥ ३९
सद्गुण[15] सुसेव्य[16] हा गुरुदेवप्रिय[17] यासि जेंवि हार[18] उनीं ।
घालिसि तापांत कसा? गति कोण पुढें स्वसत्व हारउनी? ॥ ४०
आम्हां व्यसनार्तांची[19] धर्मस्थिति[20] हेचि बीज[21], पावें गा! ।
त्वां मोडावें न ईला[22] स्वस्वास्थ्यसुखार्थ[23] बा! जपावें गा! ॥ ४१
हें काय बरें? यों गुरुघातें[24] रिपु[25] परम मुदित[26] होतील; ।
स्वमुखीं विष, अमृतरस व्यालमुखीं[27], कोण सुज्ञ ओतील?' ॥ ४२
भीम म्हणे, 'न[28] विनवितें[29] जरि फार असेंचि मनहि, कर करुनी ।
भस्म ललाटीं धरितों कीं करितों प्रथम बद्ध करकरुनी.' ॥ ४३

---

१. समूह. २. मोठा अनर्थ. ३. या धर्माचे. 'बाहू ते संप्रधक्ष्यामि सहदेवाग्निमानय' असें मूळांत आहे. (अध्याय६८ श्लोक ६.) या ३६ व्या गीतीमध्यें पत्नीप्रेम आणि बंधुद्वेष या दोन विरुद्धभावांचा संधि आहे म्हणून ही गीति भावसंधिनामक अलंकाराचें उदाहरण आहे. ४. त्रास. ५. शुभ्र (श्वेत) आहेत रथाचे घोडे ज्याचे तो. (अर्जुन.) ६. ज्या वाचेमध्यें. ७. अकल्याणाचा. ८. स्वधर्माचें स्वभ्रातृधर्माचें गौरव (महत्त्व) हेंच धन. ९. स्वधर्मगौरवधन. १०. भिंतीवरील चित्र. ११. क्षत्रियांचा धर्म. १२. द्यूतासक्त. १३. धर्मराज. १४. अवमानितोस. १५. सद्गुण इत्यादि विशेषणें धर्माकडे आणि हाराकडे लागतात, म्हणून श्लिष्ट आहेत. सद्गुण—उत्तमगुणयुक्त; (पक्षीं) चांगल्या दोरीनें (सूत्रानें) तयार केलेला (हार). १६. सेवा करण्यास योग्य. १७. गुरु आणि देव प्रिय ज्याला तो. १८. पुष्पहार. १९. दुःखपीडितांची. २०. स्वधर्मानुरोधानें राहणें. २१. खाटलें. २२. या धर्मरूप बाजेला. २३. आपल्यास स्वस्थपण आणि सुख असावें यासाठीं. २४. गुरु म्हणजे पिता, त्यासारखा जो धर्मराज त्याच्या नाशानें. २५. शत्रु. २६. हर्षित. २७. सापाच्या तोंडांत. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २८. 'न विनवितें जरि मनहि असेंचि भस्म कर करुनी । आत्मललाटीं धरितों' असाही पाठ आढळतो. २९. माझें मन मला असें तुझ्या (अर्जुनाच्या) म्हणण्याप्रमाणें वागण्यास न विनवितें, तर (धर्माचे) कर भस्म करूनी (जाळून) इत्यादि.

निववी असुरांत जसा साधु [1]प्रऱ्हादराय [2]कविकर्णें ।
धृतराष्ट्रसुतांत तसा एकचि [3]नयनिपुणनायक [4]विकर्ण. ॥ ४४
भीष्मधृतराष्ट्रविदुरद्रोणकृपनृपांसि बोलें तो लावी, ।
'कीं समयीं न वदावी तरि मग केव्हां [5]सदुक्ति बोलावी? ॥ ४५
बोला हो! बोला हो! बोला हो! सर्व सभ्य! बोला हो! ।
[7]असमयमौनें तुमच्या सुज्ञपणाच्या न हानि मोला [8]हो. ॥ ४६
श्रवण तरि करा मज जें सुचलेंसे तेंचि भीड तोडूनी ।
वदतों, पद तों गुरुचें न शिवों द्यावें [9]शिखीस सोडूनी. ॥ ४७
चार व्यसनें मृगया [10]स्त्री [11]पान द्यूत यांत जो सक्त, ।
तो [12]धर्मच्युत [13]तत्कृत [14]सत्कृत न महाजनांत हें [15]व्यक्त. ॥ ४८
धर्म द्यूतव्यसनीं झाला [16]कितवांसि वश [17]पराभूत, ।
कां हो! भ्रांत करीना [18]स्वमतात्यशुचिक्रियापरा भूत? ॥ ४९
धर्म जयाच्या नादीं लावुनि, जिंकूनि शकुनिनें आर्या ।
पण आपणचि करविला पांचांची [19]आपुली सती भार्या. ॥ ५०
[20]अन्यर्त्विगननुमत जें द्रव्य न [21]होता असोन होमुनि तें ।
होइल सभेंत बहुमत तो एकातरिहि काय हो! मुनितें? ॥ ५१
द्यूतीं [22]साधारण धनपण करुनि नव्हेचि एक [23]हारविता ।
गिळिल [24]दुराग्रहराहु त्यजिना परि मद्विचार हा [25]रविता. ॥ ५२

---

१. हा हिरण्यकशिपूचा पुत्र. २. कवींचे कान. (हें 'निववी' याचें कर्म.) ३. नीतिज्ञजनांत श्रेष्ठ. ४. विकर्ण हा धृतराष्ट्राच्या शंभर पुत्रांपैकीं एक. हा महारथी असून मोठा न्यायी होता. हा दुर्योधनादिकांस प्रिय नसून पांडवांस प्रिय होता. ५. शब्द, दोष. ६. सत्यभाषण. ७. अवेळीं धरलेल्या मुकेपणानें. ८. होवो. ९. अग्नीला. १०. स्त्रीभोग. ११. सुरापान, दारु पिणें. (अध्याय ६८ श्लोक २०-२१). १२. धर्मभ्रष्ट. १३. त्या व्यसनासक्त पुरुषाची कृति. १४. सन्मान्य, मान्य केलेली. १५. स्पष्ट. ही गीति सुभाषितरूप आहे. १६. जुवेबाज शकुनि इत्यादिकांस. १७. पराभव पावलेला असा. १८. आपल्या मतानें अत्यंत अशुद्ध अशा कर्मांत तत्पर झालेल्याला. १९. स्वतःची. (एकंदर पांचांची.) २०. दुसऱ्या ऋत्विजांस अमान्य. (अन्य + ऋत्विग् + अननुमत.) २१. जो होता (यज्ञ करणारा) न असोन (नसून) जें द्रव्य (होमद्रव्य) अन्यर्त्विगननुमत (दुसऱ्या ऋत्विजांस अमान्य आहे) तें होमूनि (तें होमद्रव्य हवन करून) तो एका तरिहि मुनितें बहुमत होईल काय? मान्य होणार नाहीं—हा भावार्थ. २२. समाईक (द्रौपदी पांचां पांडवांची भार्या. म्हणून द्रौपदीपण हें साधारण धन—असा भाव). २३. हरविणारा. २४. दुराग्रह हाच राहु. दुराग्रह राहु गिळील, परि मद्विचार हा रविता त्यजिना—असा अन्वय. शकुनिदुर्योधनादिकांच्या दुराग्रहामुळें माझें भाषण निरर्थक होईल, तथापि माझे योग्य विचार मला बोलून दाखविले पाहिजेत—असा भावार्थ. २५. सूर्यपण.

सभ्यांमाजि वदाया [1]विहित असें बोलतोंचि अजि तत्व, ।
हरिकीर्ति [2]सती हेही तुल्या यांचें समान [3]अजितत्व. ॥ ५३
तें [4]साधु [5]साधु साधु ध्वनि करिती म्हणति, ‘[6]बोल कानांहीं ।
[7]ध्यावे असेचि, तूं कीं **विदुर**, [8]तिजा स्पष्ट [9]बोलका नाहीं. ॥ ५४
[10]न्यायमृकंडुसुताच्या [11]दुस्तरधृतराष्ट्रजाब्धिसाधुवटा ! ।
सभ्या ! भला भला ! [12]विधु लाजेल तुझ्याचि मानसा [13]धुवटा.’ ॥ ५५
कर्ण [14]म्हणे, ‘वाचाळा ! रे ! [15]सर्वस्वग्लहांत [16]हे आली; ।
अजिता कसी ? तुझी मति मतिमंदा ! **विदुरबुद्धिची** [17]आली. ॥ ५६
वरकड हे काय मुके ? वक्ता धर्मज्ञ तूंचि ? बैस उगा. ।*
न भला स्वभाव, हा तुज [18]बालिशजनपंक्तिला न बैसउ गा ! ॥ ५७
न वदति [19]सभ्य, न **पांडव**, जरि हे **कृष्णा** म्हणे, ‘अहो ! सांगा.’ ।
अजिता असती तरि हे तैसेंचि स्पष्ट न वदते कां गा ? ॥ ५८
म्हणसील ‘सभेंत सती [20]नाणावी,’ तरि [21]सती न हे असती, ।
असतो एक सतीचा उपभोक्ता पांच [22]हे इला [23]असती. ॥ ५९
[24]आनयन सभेंत इचें कीं हें [25]एकांबरत्व न विचित्र, ।
नग्नत्वहि नवल नव्हे, न चुना बहु [26]नासिकेसि ज्या [27]श्वित्रें. ॥ ६०
[28]सस्त्रीक [29]सधन **पांडव** **शकुनिजित** स्पष्ट, काय बोलशि रे ! ।
देतो सभेंत [30]लघुता जो [31]स्वाविषयीं बळेंचि बोल [32]शिरे. ॥ ६१

---

१. उचित. २. पतिव्रता.(द्रौपदी.) ३. अजितपणा, अजिंक्यपणा. द्रौपदी अजित होय, कारण धर्म व्यसनासक्त, जित, परप्रवर्तित आणि ती स्वत: सामाईक, एकट्याची नव्हे—असा भाव. ४. सज्जन, सभासद. ५. चांगलें चांगलें, शाबास शाबास. ६. भाषण. ७. सादर श्रवण करावे. ८. तिसरा. ९. निस्पृह वक्ता. १०. न्यायरूप मृकंडुसुताच्या म्हणजे मार्कंडेयमुनीच्या. ११. तरण्यास अशक्य अशा धृतराष्ट्रसुतरूप समुद्रांतील उत्तम वटवृक्षा (विकर्णा ?) मार्कंडेय जलप्रलयसमयीं समुद्रांत बुडत असतां त्याला एक वटवृक्ष आधार झाला, अशी कथा आहे; धृतराष्ट्रपुत्र न्याय बुडवूं लागले असतां त्याला तारण्यास (वटवृक्षाप्रमाणें हे विकर्णा !) तूंच एकटा आधार झाला आहेस, अन्य पुत्र त्या न्यायाला तारण्यास समर्थ नाहींत—असा भाव. १२. चंद्र. १३. स्वच्छ निर्मल अशा मनाला. १४. अध्याय ६८ श्लोक २७-३८ पहा. १५. सर्व धनाच्या पणांत. १६. द्रौपदी. १७. सखी. १८. मूर्खजनांच्या रांगेला. १९. सभासद. २०. न आणावी. २१. ही पतिव्रता नव्हे, असती=जारिणी. २२. हे (पांच पांडव) उपभोक्ते. २३. आहेत. २४. आणणें. (अध्याय ६८ श्लोक ३६.) २५. एकवस्त्रता. २६. नाकाला. २७. कुष्टरोग. २८. भार्यासहित. २९. धनासहित. ३०. कमीपणा. ३१. आपला विषय नव्हे त्यांत. ३२. हें गीतार्ध सुभाषितरूप आहे.

दुःशासना! न याचे ऐकावे फोल बोल; हा बाळ, ।
गीष्पतिपुढें[1] मिरवितो साक्षरता[2] दाखवूनि गाबाळ.[3] ॥ ६२
वदतो बुधांत भलतें, बोलाया न स्त्रियांतहि संकोनी[4] ।
हूं; घे पांडववस्त्रें या दासीचेंहि[5] वस्त्र हिसकोनी.' ॥ ६३
तें ऐकतांचि वस्त्रें टाकुनि उघडेचि पांचही बसले, ।
भीष्म म्हणे, 'हें दुःसह हृदयांत असें न शरकदंब[6] सले. ॥ ६४
माहात्म्य सतीचें हो, देवा! पावो न आस[7] विलयाला[8]; ।
हे आपणासि म्हणत्ये बाळमृगी[9], स्पष्ट आंसविल[10] यांला.[11]' ॥ ६५
दुःशासन सोडाया झोंबे स्वकुलाहितोदया[12] लुगड्या, ।
तेव्हां स्मरली कृष्णा[13] कृष्णा दीनाचिया दयालुगड्या. ॥ ६६
तो दुर्जन आधींही साधूंच्या करुनि हानि रीतीची, ।
नग्न सभेंत कराया पाहे खळ धरुनि हा निरी तीची. ॥ ६७
जैं दुर्दशा कराया दुर्दैवें सिद्ध नीचें[14] हा केला, ।
तैं दीनबंधुला[15] ती कृष्णा मारी मनींच हाकेला. ॥ ६८
'हे नाथ! रमानाथ! व्रजनाथ! हरे! मुकुंद! कंसारे[16]! ।
गोविंद! कृष्ण! केशव! दीनार्तिहर[17]स्त्वमेव[18] संसारे.[19] ॥ ६९
काळेंहि[20] सख्या! न तुझ्या दासीस पहावयासहि सकावें, ।
त्वद्भगिनीवस्त्र[21] खळें नग्न करायासि काय हिसकावें? ॥ ७०
जीहुनि नसे सुभद्रा तुज बहुमान्या, अकीर्ति हे तीची[22] ।
धांव दयाब्धे[23]! होते विश्वांत तुझ्या अकीर्ति हेतीची[24]. ॥ ७१
झालासि त्राताचि[25], न होउनि विधिच्या[26] अधीन होगलितो[27], ।

---

१. बृहस्पतिपुढें. २. विद्वत्ता. ३. गदळग्रंथ. ४. समर्थ होऊन. ५. द्रौपदीचें. ६. बाणसमूह. ७. आशा. ८. नाशाला. ९. लहान हरिणी. (द्रौपदी.) १०. रीस. ११. दुःशासनाला. १२. आपल्या कुलाच्या नाशाच्या उदयाकरितां. १३. द्रौपदी. १४. अधम. (दुःशासन.) १५. अनाथांच्या नाथाला. (श्रीकृष्णाला.) १६. हे कंसशत्रो, श्रीकृष्णा. १७. दीनाची पीडा हरण करणारा. १८. त्वमेव=तूंच आहेस. १९. संसारांत दीनजनांचें दुःख हरण करणारा तूंच आहेस. २०. यमानेंही. २१. तुझ्या बहिणीचें लुगडें. २२. त्या तुझ्या बहिणीची (द्रौपदीची—माझी) २३. हे दयासागरा. २४. खड्गाची. २५. रक्षणकर्ता. २६. ब्रह्मदेवाच्या. २७. मूर्खपणानें अथवा उधळेपणानें ऐश्वर्य घालविणारा, हारविणारा. ब्रह्मदेवानें गोकुळांतील गोप, गोधनें आणि वत्स यांस धरून नेलें तेव्हां श्रीकृष्णानें तीं सर्व स्वसामर्थ्यानें पुनः निर्माण केलीं, पण ब्रह्मदेवास शरण गेला नाहीं, या गोष्टीस अनुसरून हें वर्णन आहे.

[1]विरुदावळी तुझी हे [2]गजवरवरदा! कधीं न हो [3]गलिता. ॥ ७२
'भगिनी' ऐसें वदल्यें, परि फारचि लाजल्यें न हें लटिक; ।
प्रभुजी! रक्षा, तुमच्या दासांची मी ल्हानसी बटिक. ॥ ७३
जिंकिल काय खळा? [4]तो जिंकी द्यूतीं न धर्म [5]जोडावा. ।
[6]सुज्ञें [7]पंकपतित[8]परधेनूद्धरणेंहि [9]धर्म जोडावा. ॥ ७४
भागा, या, गाय तसी मी, न धरीं [10]अघभयास [11]हा यवन ।
गुरुजन सत्पालक, परि झाले या निर्दया सहाय [12]वनें. ॥ ७५
[13]कीर्त्यर्थ उद्धरीं मज उद्धरिली जेंवि सागरीं [14]महिला ।
त्वद्दासांची होती त्या [15]अमृतीं आजि या गरीं [16]महिला ॥ ७६
बा! ढळतां तिळहि पदर [17]भावी [18]व्यजनासि [19]साग [20]रामा जी! ।
[21]ती खळसभेंत उघडी पडल्ये न पडोनि सागरामाजी. ॥ ७७
भो भगवान्! भो वत्सल! भो [22]हतचाणूरमल्ल! [23]धांगावें. ।
विश्वीं तुझेंचि दुसरें न यश श्री[24]प्राणवल्लभा! गावें. ॥ ७८
आजि [25]असत्परपुरुषस्पर्श, न अपराध अन्य केला हो! ।
झांका प्रसादपदरें न [26]कुजनदृक्स्पर्श कन्यकेला [27]हो.' ॥ ७९

---

१. यशाची पंक्ति. २. गजेंद्रास वर देणाऱ्या (श्रीकृष्णा). इंद्रद्युम्न राजा अगस्तिमुनीच्या शापानें गजेंद्र झाला. त्याला विष्णूनें शापमुक्त केलें, या कथेस अनुलक्षून हें वर्णन आहे. ३. भ्रष्ट. ४. धर्मराज. ५. (सोंकट्यांच्या) डावास. ६. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ७. चिखलांत पडलेली. ८. दुसऱ्याच्या धेनूचा उद्धार केल्यानें दुसऱ्याची चिखलांत पडलेली जरी गाय असली तरी तिला चिखलाबाहेर काढल्याच्या योगानें. ९. पुण्यांश संपादावा. १०. पापभयाला. ११. हा दुःशासन. १२. अरण्य. १३. कीर्तिसाठीं. १४. पृथ्वी. १५. तशा विलक्षण सुखांत. १६. भार्या. १७. मानी, गणी. १८. पंख्यास. १९. अपराधी. (स+आग=अपराधासह.) २०. सुंदरी स्त्री. २१. पंख्याच्या वाऱ्यानें आंगावरचा पदर किंचितूही हालला तर जिला त्या पंख्याचा मोठा अपराध झाला असें वाटावें आणि राग यावा, ती मी (द्रौपदी) आज दुष्टजनांच्या सभेंत अगदीं उघडी पडत आहे, त्यापेक्षां समुद्रांत बुडतें तर कांहीं वाईट झालें नसतें—असें तात्पर्य. २२. मारला आहे चाणूरनामक मल्ल ज्यानें. चाणूर हा कंससभेंतील एक बलाढ्य मल्ल; धनुर्यागनिमित्तानें कृष्ण मथुरेस आला होता, तेव्हां त्यानें या मल्लास मारलें. (भागवत-स्कंध १० अध्याय ४४.) २३. धांवून यावें, पळत यावें. २४. हे लक्ष्मीच्या प्राणप्रियकरा. २५. दुष्ट परकी पुरुषाचा स्पर्श. २६. दुर्जनाच्या दृष्टीचा स्पर्श. २७. होवो.

अवतरला उतराया जो दुःसह [1]दुष्टभार [2]महिवरला, ।
[3]अहिवरलास्यपटु प्रभु [4]करुणोक्तें द्वारकेंत गंहिवरला. ॥ ८०
परमेश्वर रूप धरी [5]स्वपरजनहितोदया [6]लुगडियांचें, ।
निववाया सभ्यांसह मन नयनहि तो दयालु [7]गडियांचें. ॥ ८१
हा [8]अंबरावतार [9]श्रितलज्जारक्षणार्थ [10]अकरावा ।
प्रभुमत असे, '[11]सदवनीं आग्रह वेषीं कदापि न करावा.' ॥ ८२
शेले शाल्ह साड्या [12]क्षीरोदक लांब रुंद पाटावें, ।
झाला अनंत वस्त्रें कीं तीस अनाथसें न वाटावें. ॥ ८३
[13]पदसेवार्थचि भजती [14]अनवरत [15]महाविभूति [16]जा [17]निपट ।
तो [18]कृष्णावपु झांकी होवूनि [19]महाविभूतिजानि [20]पट. ॥ ८४
पहिलें [21]वसन [22]व्यसनप्रतिपादनपटु करें [23]कुमति सोडी ।
तों दुसरें आहेचि प्रथमाधिक वस्त्र, त्यासही वोडी. ॥ ८५
[24]कृष्णादेह [25]सदंबररत्नाकर त्यासि [26]खळभुजा टिटवी ।
उपसी परि [27]गांभीर्यें आपण न '[28]उंहूं' म्हणोनि [29]त्यां विटवी. ॥ ८६
मानिति [30]माया केवळ अल्प सभेंतील भूमितळ पट हो ! ।
म्हणति [31]अदित्यादि सत्या, 'या [32]मेल्याचें समूळ [33]तळपट [34]हो.' ॥ ८७
जें झांकिलें अनंतें दिव्यें भव्यें [35]सदंबरें [36]सुघडें ।
तें [37]साधुकाय काय [38]क्षुद्रमति करील नागवें उघडें? ॥ ८८

---

१. दुष्टांचा भार. २. पृथ्वीवरचा. ३. सर्पश्रेष्ठ जो कालिय त्याच्या फणांवर नृत्य करण्यांत कुशल असा. ४. द्रौपदीच्या करुण भाषणानें. ५. आपल्याविषयीं तत्पर अशा स्वभक्तांचें हित व्हावें म्हणून. ६. वस्त्रांचें. ७. मित्रांचें. पांडवांचें मन व नयन शांत करण्याकरितां परमेश्वर वस्त्रावतार धरी. ८. वस्त्ररूप अवतार. ९. आश्रितजनांच्या लज्जेचें रक्षण व्हावें म्हणून. १०. अवतार मत्स्य कूर्म वराहादिक दहा आहेत, म्हणून हा वस्त्रावतार अकरावा. ११. साधूंच्या रक्षणार्थ. (सद् + अवन=रक्षण.) १२. पांढरें पातळ. १३. पदसेवा घडावी म्हणून. १४. नित्य, अखंड. १५. मोठे ऐश्वर्यवंत, महाविभूति ज्यांची ते. १६. ज्या. (श्रीकृष्णाला.) १७. केवळ. १८. द्रौपदीचा देह. १९. महाविभूति (लक्ष्मी) आहे जाया ज्याची तो. (कृष्ण.) २०. वस्त्र. २१. वस्त्र. २२. दुःख देण्यांत कुशळ. २३. दुष्टबुद्धि. (दुःशासन.) २४. द्रौपदीचा देह हाच उत्तम वस्त्रांचा सागर. २५. अंबर=वस्त्र. २६. दुष्ट दुःशासनाचा हात हीच टिटवी पक्षीण. २७. गंभीरपणानें, (उपमेकरितां) खोलपणानें. २८. नको. २९. त्या टिटवीला. (दुःशासनाला.) ३०. पट माया (मावण्यास) सभेंतील भूमीतळ (भूमिचा पृष्ठभाग) केवळ अल्प (असें जन) मानिति—असा अन्वय. ३१. कश्यपाची भार्या अदिति इत्यादिक थोर थोर पतिव्रता स्त्रिया. ३२. या हतभाग्य दुःशासनाचें. ३३. सत्यानास. ३४. होवो. ३५. सुंदर वस्त्रानें. ३६. चतुरें. ३७. उत्तम देह, द्रौपदीचें पवित्र शरीर. ३८. दुष्ट बुद्धीचा. (दुःशासन.)

तो शतशः पट झटझट फेडुनि भागे, सभेंत वेडावे, ।
किति [1]खळबळ? जलनिधिचे कीं [2]दुस्तरतर [3]तरंग [4]फेडावे. ॥ ८९
होय सभेंत [5]हळहळास्वन, कृष्णेसि प्रशंसिती राजे; ।
'छी' ते खळासि म्हणती गेले [6]भवनदपरप्रतीरा जे. ॥ ९०
भीम म्हणे, 'राजे हो! तरि [7]पूर्वजगति न हो मला परिसा, ।
जरि [8]दुःशासनवक्षःक्षतज न सेवीन मी स्वयें [9]हरिसा'. ॥ ९१
सभ्य सकळ '[10]साधु' म्हणति भीमातें, 'धिक्' खळासही म्हणती; ।
हरि! हरि! [11]हरिहरिणांतचि [12]त्यांची केलीच त्या [13]जनें [14]गणती. ॥९२
तेंव्हां विदुर [15]म्हणे, 'हो! [16]प्रश्नोत्तर द्या, न सत्य बुडवावें, ।
कीं [17]देवभोग्य [18]दाम न [19]बोळें सुज्ञासमक्ष तुडवावें. ॥ ९३
[20]प्रल्हादसुत विरोचन, विप्र [21]सुधन्वा सुशील आंगिरस ।
[22]प्राणपणवृत्त यांचें परिसा हो! अमृत यापुढें [23]विरस. ॥ ९४
[24]स्वयंकरग्रहणोद्युक्ता त्या [25]दोघांलाहि [26]केशिनी कन्या ।
प्रार्थुनि म्हणे, 'भजेन [27]श्रेष्ठ उभयतांत जो तया धन्या.' ॥ ९५
'मी वर' म्हणे सुधन्वा कीं साक्षात्तात अंगिरा ज्याचा; ।
'मी वर' म्हणे विरोचन कीं तो सुत [28]साधुसंगि राजाचा. ॥ ९६
'श्रेष्ठ नव्हेंसा झालों तरि [29]यावज्जीव मी तुझा दास' ।
ऐसा [30]प्राणपण तिहीं केला हो! करुनि या विवादास. ॥ ९७
विप्र म्हणे, 'चाल पुसों दोघेही हें तुझ्याचि बापाला ।
मज मान्य [31]तदुक्त असे, कीं तो भीतो [32]अकीर्तिपापाला.' ॥ ९८

---

१. दुष्टाचें सामर्थ्य. २. तरण्यास अतिकठिण. ३. लाटा. ४. निवारावे; फोडावे. ५. हाहाकार. ६. संसाररूप नदीच्या परतीराला. ७. पूर्वजांस मिळालेली गति, पितामहादिकांची गति. (अध्याय ६८ श्लोक ५१-५३.) ८. दुःशासनाच्या उरांतील रक्त. (क्षतज=रक्त.) ९. सिंहासारखा. १०. शाबास, चांगलें, वाहवा. ११. सिंह आणि हरिण यांत. १२. भीमदुःशासनांची. (भीम=सिंह; दुःशासन=हरिण). १३. त्या सभ्य जनांनीं. १४. गणना. १५. अध्याय ६८ श्लोक ५९-८८ पहा. १६. द्रौपदीच्या प्रश्नाचें उत्तर. १७. देवांनीं उपभोग घेण्यास योग्य. १८. माला. १९. मूर्खानें. २०. प्रल्हाद हा हिरण्यकशिपूचा पुत्र आणि दैत्यांचा स्वामी. याच्या पुत्रांतील एकाचें नांव विरोचन. २१. अंगिरा ऋषीच्या पुत्रांतील एक. २२. प्राणाचा आहे पण ज्यांत असें वृत्त. २३. नीरस. २४. विवाह करण्याविषयीं उत्सुक. २५. विरोचन आणि सुधन्वा यांला. २६. या नांवाची एक राजकन्या. २७. कुलशीलादिकेंकरून जो श्रेष्ठ असेल त्याच्याशीं विवाह करीन. २८. साधूंचा सहवास ज्याला आहे अशा राजाचा. (प्रल्हादाचा.) २९. जीवंत आहें तोंपर्यंत. ३०. पराजितानें यावज्जीव जिंकणाराचें दास्य करावें, असा पण. ३१. त्याचें प्रल्हादाचें भाषण. ३२. दुर्लौकिकरूप पातकाला.

प्रऱ्हादास म्हणे मुनि, 'जें सत्य असेल सांग [1]कविपा ! तें !' ।
वदतां [2]अयथार्थ तुझा [3]मूर्धा शतधा फुटेल [4]पविपातें.' ॥ ९९
[5]जाय पुसाया त्यातें ज्या सुतपोराशि कश्यपा दास ।
जितसे [6]षडरि भजति, यम नियमहि, होऊनि [7]वश्य पादास. ॥ १००
प्रऱ्हाद म्हणे, 'स्वामी ! वक्ता अस्पष्ट कीं [8]मृषा वक्ता ।
[9]प्रेत्यगति कसी त्यांची ? हें सांगावें तुम्हीं मला भक्ता.' ॥ १०१
कश्यप म्हणे, 'कळोनि न बोले जो स्पष्ट त्यास वरुणाचे ।
[10]दशशत पाश करकरुनि बांधिति [11]पापकृददृष्टकरुणाचे. ॥ १०२
जो साक्षी अनृत वदे वत्सा ! त्याचीहि होय तीच [12]गती; ।
वर्षांतीं [13]एक सुटे [14]एवंच सहस्र [15]अब्द [16]ते तगती. ॥ १०३
जेथें धर्मिष्ठाला [17]खोटेपण लावितो स्वयें [18]खोटा, ।
तेथ [19]अवचनें, [20]अनृतें, [21]संदिग्धें [22]घात होतसे मोटा. ॥ १०४
हें [23]धर्मशल्य दूर न करितां, दुरितार्ध भाग [24]भर्त्याला ।
उरल्या [25]दुरितार्धाचा [26]सभ्यांला [27]पाद, पाद कर्त्याला. ॥ १०५
[28]भूतपुरुष सप्त तसे [29]भावीही सात जण असे चवदा ।
[30]वदता अनृत बुडवितो, याकरितां साधु हो ! खरेंच वदा. ॥ १०६
[31]हृतधन [32]हृतपुत्र ऋणी [33]व्याघ्रनृपग्रस्त [34]साक्षिहत [35]वा हे ।
समदुःखि, असीच स्त्री [36]सुतहीना कीं जिला सवत आहे. ॥ १०७

---

१. कविश्रेष्ठा. २. असत्य, मृषा. ३. मस्तक. ४. वज्रपातानें. ५. प्रऱ्हाद कश्यपाला पुसावयास जाई. ६. कामक्रोधमोहादि सहा शत्रु. ७. स्वाधीन. ८. असत्य. ९. मरणोत्तरगति. १०. हजार. ११. पाप करणाऱ्याविषयीं न पाहिली आहे करुणा ज्याणें अशा. (वरुणाचें विशेषण). १२. त्यालाही वरुण हजार पाशांनीं बांधितो. १३. एक वर्ष झालें म्हणजे एक पाश सुटतो. १४. याप्रमाणें. १५. वर्षें. (अध्याय ६८ श्लोक ७४–७६.) १६. पाश. १७. अधर्मत्व. १८. अधार्मिक, अधर्मशील. १९. मुकेपणानें. २०. मिथ्याभाषणानें. २१. संशयभूत अशा वचनानें. २२. मोठें पाप लागतें. जे सभासद अवचनानें, मिथ्यावचनानें किंवा संदिग्धवचनानें धर्मशल्य तोडून टाकणार नाहींत ते अधर्मविद्ध होतील—असा भाव. २३. धर्माच्या आड येणारें बाधक कृत्य. २४. सभापतीला, सभेच्या अध्यक्षाला, सभासदांतील श्रेष्ठ पुरुषाला. २५. पापाचा अर्धा वांटा. २६. सभासदांला. २७. पावहिसा, चवथाई. २८. मागील सातपुरुष, सातपूर्वज. २९. पुढील सात पुरुष. ३०. असत्य बोलणारा, वितथ धर्म सांगणारा. ३१. ज्याचें धन हरण केलें तो. ३२. ज्याचे पुत्र मेले तो. ३३. व्याघ्रानें किंवा राजानें ग्रासिलेला. ३४. साक्षीदारांनीं ज्याचा घात केला तो. ३५. किंवा. ३६. निःसंतान, निपुत्रिक.

हीं दुःखें पडति गळां त्याच्या, जो पुरुष बोलतो लटिकें; ।
वत्सा[1]! पळहि विनोदाकरितांहि तशासमीप तूं न टिकें.' ॥ १०८
प्रार्थुनि आज्याला[2] ज्या रायें[3] माजानिसेवकें[4] उक्ती ।
आयकिल्या त्या वरिल्या[5], भवतरि[6] देवर्षिच्या[7] जशा युक्ती. ॥ १०९
प्रऱ्हाद म्हणे, 'पुत्रा[8]! आवडतो धर्म, तेंवि तूं न मज; ।
तुजपरिस हा सुधन्वा श्रेयान्[9] स्वमनांत हें बरें समज. ॥ ११०
याचाचि पितां[10] श्रेयान्, न तुझा श्रेयान् पिता, तुझी माता ।
न श्रेयसी, तसी जसि याची माता, यथार्थ हें ताता[11]! ॥ १११
त्वत्प्राणेश[12] सुधन्वा, जा दास्य करीं जपोनि आमरण[13], ।
विप्रचरणपरिचरणचि[14] कामद[15], पुरवील काय काम[16] रण?' ॥ ११२
विप्र[17] म्हणे, 'साधो[18]! त्वां त्यजिला नंदनहि[19], धर्म न त्यजिला; ।
घे सुत दिला, तिला[20] कां न जपेल मुकुंद? मान्य सत्य जिलें.'॥ ११३
ऐसी कथा[21] असे हो! उपेक्षितां जीवनाशि[22] गाय मुके, ।
मौनें[23] शिशुचेंचि घेतां त्यागुनि सत्यामृतासि[24] काय मुके[25]. ॥ ११४
आर्येला[26] मानियलें बहु, पाहुनि सज्जनीं चमत्कृतिला[27] ।
खळचि न मानिति तैसे, बहु दूषणसज्ज[28] नीच मत्कृतिला[29]. ॥ ११५
कोणी दयाळु नसती त्या पंकांतूनि गाय काढी गा! ।
मी कृष्णा त्या मूर्ता पापाच्या[30] त्रासदायका ढीगां[31].' ॥ ११६
देवी म्हणे[32], 'रहा क्षण करिसी निरयार्थ[33] काय जोडि[34] खळा! ।
सभ्योक्ति[35] आयकों दे, रे! न शिळेला अपाय जो डिखळा[36]. ॥ ११७

१. हे प्रऱ्हादा. २. प्रऱ्हादाचा आजा कश्यप मुनि. कश्यपाची स्त्री दिति हिच्या ठायीं प्रऱ्हादपिता हिरण्यकशिपु झाला. ३. प्रऱ्हादानें. ४. मा (लक्ष्मी) जाया (भार्या) ज्याची तो विष्णु, त्याचा सेवक (प्रऱ्हाद) त्यानें. 'जायाया निङ्' (पाणिनि५।४।१३४)या सूत्रानें 'जाया'शब्दाला बहुव्रीहि समासांत 'जानि' असा आदेश होतो, जसें जानकीजानि. (ज्याची जाया जानकी आहे तो.) ५. स्वीकारिल्या. ६. संसारसमुद्रामध्यें नौकारूप. ७. नारदाच्या. ८. हे विरोचना. ९. श्रेष्ठ. १०. अंगिरा ऋषी. ११. हे मुला! १२. तुझ्या प्राणाचा स्वामी. १३. मरण येईपर्यंत. १४. ब्राह्मणांच्या पायांची सेवा. १५. इच्छा परिपूर्ण करणारी. १६. इच्छा. १७. सुधन्वा. १८. हे प्रऱ्हादा. १९. पुत्र. २०. कयाधूला. २१. विरोचन, सुधन्वा आणि केशिनी यांची कथा महाभारतांतील उद्योगपर्वाच्या ३५ व्या अध्यायांत सविस्तर दिली आहे. २२. जिवाला. २३. मौनरूप पुत्राचे. २४. सत्यरूप अमृताला. २५. चुंबन. २६. द्रौपदीला. २७. भगवंतांनीं वस्त्रें पुरवून केलेल्या चमत्काराला. २८. अनेक दूषणें देण्यास तत्पर. २९. माझ्या कृत्याला. ३०. मूर्तिमान् पापाच्या. ३१. राशीला. ३२. अध्याय ६९ पहा. ३३. नरकप्राप्तीकरितां. ३४. लाभ. ३५. सभासदांचें भाषण. ३६. मातीच्या ढेंकुळाला.

पुसिलें तें सांगा जी! अजि सभ्य! तुम्हांसि विनविलें नमुनी।
न वदावें हें सद्व्रत[१], परि त्यासि[२] सभेंत आणिती न मुनी.' ॥ ११८
ऐसें वदतां, ओढुनि पाडी[३], वोढी तशाहि पतितेतें[४], ।
विषसें गिळिती तीचें पडणें रडणें तदीय पति ते तें. ॥ ११९
कृष्णा[५] म्हणे[६], 'अहा! जी! द्रुपदसुता धर्मनृपतिची भार्या, ।
श्रीमद्यदुनाथसखी[७] मानवल्या सर्वदा जिला आर्या[८]. ॥ १२०
तीला खळ ओढितसे वातहि न विशंक जीस आतळला[९]; ।
नव्हता ताप कटाहीं[१०], जरि असता सुचिर काय हा[११] तळला. ॥ १२१
केला तप्त अनघजन[१२] तैलाच्या तापल्याहि न कटाहें, ।
कुरुगुरु धन्य सहातां न जनें धिक्कारिलाहि नकटा हें. ॥ १२२
कष्टें सांचविलें यश बुडवितसे मंद[१३] मत्त[१४] पाहोनी ।
साहति कसें नवल हें, ज्याचें तप उग्र मत्तपाहोनी[१५]. ॥ १२३
सांगा यांची[१६] दासी? कीं मी दासी नव्हे? मतां[१७] निवडा, ।
श्रवणीं[१८] धरूनि सूक्ता[१९] राजसभा शोभते, न तां[२०]निवडा.' ॥ १२४
भीष्म म्हणे, 'गे बाई! वदलों पहिलेंचि सूक्ष्म[२१] धर्मगती, ।
ज्ञात्यालाहि कळेना, इतरांशि कळेल काय गे मग ती? ॥ १२५
बळवान्[२२] वक्ता असतां होय अधर्महि सुधर्मसा धन्ये! ।
दुर्बळ[२३] वक्ता असतां धर्महि होतो अधर्मसा कन्ये! ॥ १२६
जें व्यसनीं सद्वृत्त[२४] त्यागावें तेंच कर्म अति नीच ।
अत्याज्य[२५] धर्मपथ हें तुज कथिलें न वदतांहि पतिनींच[२६]. ॥ १२७
वत्से! सत्सेव्यत्व[२७]त्सत्त्वा दृग्दोषलव[२८] नसो, सकता ।
न सहाया शांतहि या व्यसना, अन्यत्र हे न सोसकता[२९]. ॥ १२८

---

१. सज्जनाचें व्रत. २. सज्जनाचे व्रतास. ३. दुःशासन द्रौपदीला वोढुनि पाडी. ४. पडलेलीस. ५. द्रौपदी. ६. सभापर्व—अध्याय ६९ श्लोक ४-१३ पहा. ७. श्रीमान् यादवश्रेष्ठ कृष्णाची सखी. ८. साध्वी स्त्रिया. ९. स्पर्शला. १०. कढईत. ११. दुःशासनाचा देह. १२. निष्पाप जन. १३. मूर्ख. १४. माजलेला. (दुःशासन.) १५. माझ्या तपाहून. १६. कौरवांची. १७. निर्णय करा. १८. कानांत. १९. उत्तम भाषणातें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २०. कर्णभूषणातें. २१. परमगहन. २२. कर्णदुर्योधनांसारखा वक्ता. २३. दुर्बल पुरुषानें सांगितलेला जो धर्म तो अधर्मासारखा होतो. (अ० ६९. श्लो० १५.) २४. साधुवर्तन. २५. न टाकण्याजोगा. २६. पांडवांनींच. २७. साधूंनीं सेवा करण्यास योग्य असें जें तुझें सत्त्व त्यास. २८. दोषाचा लव. दृष्ट न लागो—असा अर्थ. २९. सोसकपणा, सहनशीलता.

सांगो धर्म जिता तूं कीं अजिता हें, प्रमाण तेंचि सती ।
[1]सत्त्वसुधानदि कृष्णे! [2]व्यसुसे द्रोणादि सभ्य हे दिसती'. ॥ १२९
[3]श्रीभीष्माशय हा कीं, '[4]अजिता म्हणतांचि हे अतिक्रुद्धा ।
जाळील कौरवांतें अन्यायें गांजिली सती शुद्धा.' ॥ १३०
[5]द्रौपद्यपमानज कीं [6]कुरुनाशज दोष [7]गुरु न हें समजे. ।
कौरवनाशचि होतो, उरतात उदंड दुष्ट यांसम जे. ॥ १३१
पांडव अशस्त्र केवळ परदासहि, धार्तराष्ट्र [8]तत्स्वामी; ।
कृष्णेसहि दोषावह [9]तन्नाश, नसे कलंक [10]तद्धामीं. ॥ १३२
[11]खळलय होणारचि, मग तप बुडवावें किमर्थ सांचविलें? ।
ऐसें चिंतुनि भीष्में स्पष्ट न बोलोनि त्यांस वांचविलें. ॥ १३३

अध्याय सहावा.

दुर्योधनहि [12]म्हणे, 'गे! धर्मास '[13]अनीश [14]अनृत' हे [15]चवघे ।
तव [16]धव भीमादि मुखें म्हणोत, ऐकोत सभ्य हे अवघे. ॥ १
[17]येणेंचि दासभावापासुनि तूं पावसील सुटकेला. ।
[18]अस्मत्प्रसाद कारण हेंचि, न [19]शतवार पाणिपुट केला. ॥ २
कीं 'मी [20]अनीश्वर' असें धर्म म्हणो, साधुरीतिस त्यजुनी, ।
आवडती तूंचि नवी, बहु नावडतीच होय सत्य जुनी. ॥ ३

---

१. सत्त्वरूप अमृताची नदी. २. प्राणरहित असे. (वि+असुसे.) ३. भीष्माचा अभिप्राय. ४. न जिंकिलेली असें म्हटलें असतां ही द्रौपदी आपला अन्याय नसतां आपल्यास पीडा झाली म्हणून रागावून कौरवांचा नाश करील. ५. द्रौपदीच्या अपमानानें झालेला. ६. कौरवांच्या नाशापासून झालेला. ७. मोठा, कोणता दोष महान् हें न कळे, कारण धर्मतत्त्व सूक्ष्म आणि दुर्ज्ञेय होय. ८. त्या पांडवांचे स्वामी धृतराष्ट्रपुत्र. ९. पांडवांचे स्वामी जे कौरव त्यांचा नाश द्रौपदीला देखील दोषावह होय; स्वामिस्वामिनाश होणें हें अत्यंत अकार्य आहे. १०. तिच्या गृहीं. ११. दुर्योधनादिक दुष्टांचा नाश अवश्य होणारच, मग तपोव्यय काय म्हणून करावा. १२. सभापर्व–अध्याय ७० श्लोक ३-६ पहा. १३. अनाथ. आमचा नाथ (ईश=स्वामी) नव्हे असें. १४. असत्यवादी असें. १५. भीम, अर्जुन, नकुळ, सहदेव. १६. पति. १७. या अशा भाषणानें. १८. भीमादि चौघांनीं धर्म आमचा स्वामी नव्हे व तो खोटा आहे असें म्हणावें हेंच (ही गोष्ट) आमची (तुजवर) कृपा होण्यास कारण आहे; परंतु शंभर वेळ हात जोडिल्यानें आमचा प्रसाद व्हावयाचा नाहीं. १९. शंभर वेळ जरी हस्तपुट केला तरी आमच्या प्रसादास हेतु नव्हे–असा भाव. २०. अनाथ.

काय वदतील [1]सभ्य व्याकुळ झाले तुझ्याच तापानें, ।
कीं एकदांचि फुटलें [2]त्वत्पतिपंचककपाळ पापानें'. ॥ ४
त्या दुर्योधनवचनें [3]खळबळलें [4]तदनुजादिखळबळ तें, ।
जैसें श्रवणीं पडतां साधूक्त [5]पिशाचकटक खळबळतें. ॥ ५
धर्माकडेचि पाहत होते ते सुजन कुजनही, परि तो ।
किमपि न वदला, बहुधा [6]समयीं समयज्ञ मौन्यही धरितो. ॥ ६
भीम म्हणे, '[7]अस्मदसु प्रभु धर्म, नृपेंद्र हा नव्हे लटिका, ।
नसतें [8]असें, तरि मला तुमच्या [9]मंथना न लागती घटिका. ॥ ७
कपटद्यूतीं अजितहि नृप जरि जित आपणासि मानील, ।
मानूं असेंचि आम्हीं, अस्मद्रीतीस विश्व वानील. ॥ ८
हे कृष्णा तों अजिता, ऐसेंहि असोनि साहतों [10]अनया ।
[11]गुरुवश नसतों तरि [12]अरिरुधिराच्या कां विनिर्मितों न [13]नया ? ॥ ९
[14]हे काय अशक्त ? पहा या माझ्या वज्रतुल्य बाहूंतें, ।
यांच्या आकृतिला जें उचित [15]भुजगराजतेज बाहूं तें. ॥ १०
माते ! [16]क्षमे ! म्हणों दे या [17]त्वद्वशगा [18]मनुष्यदेवा 'हूं ? ।
'हो भीम पळ [19]विसृंखळ, खळखळ खळरक्तपूर दे वाहूं.' ॥ ११
[20]गुरु आज्ञा देता तरि [21]अरिकरिहरि मी [22]सपत्नशशकांतें ।
वधितों, काय श्रम मज मथितां या [23]धार्तराष्ट्रमशकांतें ? ॥ १२
आज्ञा पुन्हा कशाला ? आहे पहिलीच [24]गुरु [25]वराज्ञा ते ।
न पुसति पुनः पुन्हा जे झाले सेवूनि [26]गुरुवरा [27]ज्ञाते.' ॥ १३
भीष्म द्रोण विदुर त्या क्रुद्धाला म्हणति, 'बा ! न कोपावें, ।
करिसील सर्व, [28]संप्रति म्हणतोसि तसें करूं नको, [29]पावें.' ॥ १४

---

१. सभासद. २. तुझ्या पांच पतींचें कपाळ (दैव). ३. क्षुब्ध झालें. ४. त्या दुर्योधनाचे अनुजादिकांचें (धाकट्या भावाचें) खळबळ (दुष्ट मंडळ.) ५. भूतसैन्य, भूतांचा समूह. ६. हा चरण सुभाषितरूप आहे. ७. आमचा प्राण. ८. आमचा धर्म हा प्रभु नसता तर. ९. मर्दन, नाश. १०. अन्याया. ११. धर्माधीन. १२. शत्रूच्या रक्ताच्या. १३. नद्या. १४. हे बाहु. १५. शेषाचें सामर्थ्य. १६. हे सहनशीलते. १७. तुला वश असणाऱ्या. १८. धर्माला. १९. निर्बंध, पाशरहित. २०. धर्मराज. २१. शत्रुरूप गजांचा सिंह. (भीमसेन.) २२. शत्रुरूप सशांना. (दुर्योधनादिकांस.) २३. धृतराष्ट्रपुत्ररूप चिलटांना. २४. मोठी. २५. वररूप आज्ञा. २६. गुरुश्रेष्ठाला. २७. ज्ञानसंपन्न. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २८. विद्यमानकालीं. २९. आम्हांला पाव, प्रसन्न हो, क्षमा कर.

[1]कर्ण म्हणे, 'हेच [2]तिघे [3]धर्मविलंघनसमर्थ, चवथा न, ।
यांसि तसें [4]पतिनिंदाव्यसन, जसें दे मुलासि चव थान. ॥ १५
इच्छिति मूलच्छेद स्वामीचा, न गणिती [5]महाघातें, ।
[6]व्याकुळ मनीं न होती, सुकृत यशाच्या अशा महा घातें. ॥ १६
द्रौपदि! एक [7]मदुक्त [8]छात्रतनुज दास हे अधन, यांत. ।
तूं [9]दासधन, सुयोधन [10]नाथ तुझा, स्पष्ट हें [11]स्मृतिनयांत. ॥ १७
[12]दुर्योधनदारचरणसंवाहननिरतबुद्धि हो भावें, ।
त्वन्नाथ धार्तराष्ट्रच, [13]पांडवदीनीं तुवां न लोभावें. ॥ १८
अथवा [14]स्वपतिजयें जरि [15]आत्मजयातें न मानिशी स्वमतें, ।
तरि तूं तरुणि [16]अपतिका, अन्य करीं, कां न? हें भलें गमतें. ॥ १९
वर्तति [17]मनमानेसें [18]सुरतपरा अपतिका स्त्रिया बटकी, ।
तें तुज विदित असो, गे! जो तो कामी गळां पडे [19]हटकी. ॥ २०
तुज [20]परिमितपतिक असा काशाला दारभाव? सांडावा, ।
[21]अपरिमितपतिक दास्य स्वीकारुनि [22]कामचार मांडावा. ॥ २१
सहदेव नकुळ अर्जुन भीम युधिष्ठिरहि दास हे अवघे, ।
न तुझे पति, तूं दासी, जो तुज मानेल तो सुखें [23]धवें घे.' ॥ २२
ऐसें ऐकुनि सोडी [24]अहिपतिसा भीमसेन सुसकारा, ।

---

१. अध्याय ७१ श्लोक १-५ पहा. २. भीष्म, द्रोण आणि विदुर. ३. धर्माचें उल्लंघन करण्यास समर्थ. ४. स्वामीच्या (दुर्योधनाच्या) निंदेचें व्यसन. ५. मोठ्या पापाला. (महा+अघातें, अघ=पाप.) ६. पापाचरणानें व्यथित. ७. माझें वचन. ८. छात्र (शिष्य) पुत्र व दास हे तिघे जण अधन होत, यांचें धन असल्यास तें यांचें नसून त्यांच्या गुरूचें, पित्याचें आणि धन्याचें यथाक्रम होय. ९. दासाचें धन. (हें धन दासाच्या धन्याचें होय. येथें पांडव हे सुयोधनाचे दास, तेव्हां तोच या धनाचा स्वामी, अर्थात् द्रौपदीचा स्वामी सुयोधन.) १०. धनी. ११, स्मृतिशास्त्र आणि न्यायशास्त्र ह्यांमध्यें. स्मृतिवचन याविषयीं आहे तें:—'त्रय एवाधना लोके भार्या दासस्तथा सुतः । यत्ते समधिगच्छंति यस्यैते तस्य तद्धनम् ॥.' भावार्थ:—भार्या, दास आणि पुत्र हीं तीन लोकांत अधन होत. हीं ज्यांपाशीं असतात त्यांचीं तीं धनें होत. १२. दुर्योधनाच्या बायकोचें चरणमर्दन करण्याविषयीं रमते बुद्धि जीची अशी. १३. पांडवरूप दीन पुरुषांमध्यें. १४. आपल्या पतीला जिंकिलें त्या योगें, द्यूतांत स्वभर्त्यांच्या झालेल्या पराजयानें. १५. आपल्या पराजयातें. १६. पतिहीना. द्यूतांत तुझ्या पतीचा पराजय झाला, तेणेंकरून तुझाही पराजय झाला, असें जर तूं मानीत नाहींस, तर तूं अभर्तृका आहेस, यास्तव [रत्यर्थ] अन्य पति कर. १७. मनास वाटेल तसें. १८. संभोगसुखेच्छु स्त्रिया. १९. मागतो. (संभोग मागतो.) २०. नियमित पति ज्यांत असा. ('दारभावा'चें विशेषण.) अर्थात् पांच पति ज्यांत असा पत्नीभाव. २१. अनेक पति आहेत ज्यांत असें दास्य. २२. यथेच्छ वर्तन. २३. पति. २४. शेषासारिखा.

बहुधा [1]गुरुसंकोच ग्रासी [2]तन्नामवर्ति सुसकारा. ॥ २३

भीम म्हणे **धर्मा**तें, 'राया! [3]यां नीच सूततनयास ।
काय म्हणों? [4]स्वकुलोचित वदतो, म्हणतील [5]साधुज न यास. ॥ २४

द्यूत न करितासि जरी, न्यायें जरि वर्ततासि, तरि बापा! ।
कां होतों दास? [6]नृपा! स्वप्नांतहि न करितां किमपि पापा. ॥ २५

कां या सभेंत करिते अरि [7]तेजोभंग? कां असें वदते? ।
जे [8]शशरवें [9]विरावे देती [10]मृगराजमस्तकीं पद ते?' ॥ २६

तों **दुर्योधन** बोले, '**धर्मा**! अजिता जरी **द्रुपदतनया** ।
तरि वद, वदन वरि करीं, कीं जाणसि सुज्ञ तूं नया अनया.' ॥ २७

ऐसें पुसे, कुचेष्टा तो [11]दुर्मद त्या सभेंत ही [12]मांडी ।
कृष्णेदेखत दावी डावी उघडी करूनियां मांडी. ॥ २८

भीम [13]म्हणे, 'जरि समरीं या मांडीवरि गदा न बसवीन, ।
तरि [14]पितृसालोक्यातें क्षणहि न पावेन, नरक वसवीन.' ॥ २९

विदुर म्हणे, 'हे अजिता, खळ हो! हें कर्म काय हो! करितां? ।
कैंचें कुशल शशांचें [15]शापुनि समरासि सिंह हो[16]करितां?' ॥ ३०

पुनरपि **सुयोधन** म्हणे, '**कृष्णे**! चौघे '[17]अनीश **धर्म**' [18]असें, ।
बोलोत, मुक्त करितों कीं मत्सदनीं करोनि कर्म [19]असें.' ॥ ३१

---

१. धर्माची भीड. २. भीमसेनाच्या नांवांत असणारा जो उत्तम सकार त्यास गुरुसंकोच (म्हणजे धर्माविषयीं जी त्याणें भीड धरली होती ती) ग्रासी, तेव्हां शेवटीं 'भीम एन' असें राहिलें. भीम म्हणजे भयंकर आहे सेना ज्याची असा भीमसेन; पण 'भीम एन' म्हणजे भयंकर पातक ज्याचें तो, मोठा पातकी; सारांश भीमसेनानें द्रौपदीचें संरक्षण केलें नाहीं, म्हणून तो मोठा पातकी झाला. गुरुसंकोच धरिल्यामुळें भीमसेन भीम एन (मोठा पापी) झाला, पण गुरुसंकोच न धरिता तर भीमसेन भीमपराक्रमी होऊन द्रौपदीस अपमानदुःखमुक्त करता. (एनस्=पातक.) ३. कर्णास. ४. आपल्या कुलास उचित. ५. साधूत्पन्न, कुलीन. ६. धर्मराजा. ७. पाणउतारा, अपमान. ८. सशाच्या शब्दें. ९. विरघळून जावे. १०. सिंहाच्या मस्तकावर. (मृगराज=सिंह.) ११. तो दांडगा दुर्योधन. १२. आरंभी. १३. अध्याय ७१ श्लोक १४ पहा. १४. पितरांच्या सलोकतेस. (वाडवडील ज्या लोकीं राहतात त्याच लोकीं राहणें.) १५. शाप देऊन, अपशब्द बोलून. हें गीलर्भ सुभाषितरूप आहे. १६. बलावितां. १७. अनाथ. (अन्+ईश=नाथरहित.) १८. याप्रमाणें. १९. राहें.

जिंष्णु म्हणे, 'या पूर्वीं होता [2]हा ईश आमुचा साचा, ।
आतां प्रभु कोणाचा ? न मला संकोच [3]दुष्टदासाचा.' ॥ ३२
इतुक्यांतचि **धृत**राष्ट्रक्षितिपतिच्या [4]अग्निहोत्रभवनांत, ।
[5]जंबुक शिरोनि बोले, पितरांच्या जेंवि [6]वल्लभवनांत. ॥ ३३
तो जंबुक आरडता बहु [7]रासभ दुष्ट [8]खगहि आरडले, ।
[9]उत्पातज्ञ सदय जन तेव्हांचि मनीं म्हणोनि '[10]हां !' रडले. ॥ ३४
तेव्हां **धृतराष्ट्रातें गांधारी विदुर** [11]अशुभ कळवीती, ।
त्यातें अतिप्रयासें नानापरि बोध करुनि वळवीती. ॥ ३५
वृद्ध म्हणे, 'रे मंदा! कां स्वकुळज्येष्ठबंधुभार्येशीं ? ।
आम्हांसमक्ष करिशी [12]अतिवाद, त्यजुनि लाज, [13]आर्येशी. ॥ ३६
[14]असकृत् निवारिलें जरि सुज्ञें **विदुरें** तसेंचि [15]मत्तातें, ।
करिशी भलतेंचि कसें ? अवमानिशि कां सदुक्त ? मत्ता ! तें. ॥ ३७
वत्से ! सति ! [16]मतिमति ! अतिमान्या मज तूं, क्षमा करीं दे हें, ।
वर माग, राग न धरीं, मत्पुत्रांचीं तुझ्या करीं [17]देहें.' ॥ ३८
सुमति म्हणे, 'जरि देतां वर, वचनें स्तवुनियांहि मामाजी ! ।
'धर्म अदास' असो हा [18]वरपट द्या आजि [19]या [20]हिमांमाजी. ॥ ३९
[21]प्रतिविंध्यास म्हणावें हा दासात्मज असें न [22]बाळांनीं, ।
अनुचित दाससुतत्व स्कंधीं ज्या वाहिलें नृपाळांनीं.' ॥ ४०
भूप म्हणे, 'हें दिधलें, दुसरा मज माग वर सुने !' त्याला ।
ऐसें परिसोनि पुन्हा वर मागे ती सती [23]सुनेत्रा त्या. ॥ ४१
'[24]सायुध सरथ **नकुळसहदेवार्जुनभीम** यांस दासत्व ।
न शिवावें, हें द्यावें मज, यांचें स्थिर असो सदा [25]सत्त्व.' ॥ ४२

---

१. अर्जुन. २. धर्म. ३. दुष्टाचा (दुर्योधनाचा) दास जो धर्म त्याचा. ४. (गृह्याग्नि) गृहांत. ५. कोल्हा. कोल्ह्याची कुई अभद्रसूचक होय अशी समजूत आहे. ६. प्रियकर वनांत. (मसणवटींत.) ७. गर्दभ. ८. पक्षी. ९. उत्पात जाणणारे. (शुभाशुभ जाणणारे विदुर द्रोण भीष्म इत्यादि.) १०. खेदोद्गार. ११. अरिष्टसूचक वर्तमान. १२. अमर्याद आणि कठोर असें भाषण. १३. श्रेष्ठेशीं. १४. वारंवार. १५. माझ्या बापानें. (भीष्मानें किंवा व्यासानें.) १६. हे बुद्धिमति. १७. शरीरें. 'देह'शब्द संस्कृतांत पुंनपुंसक आहे. १८. वररूप वस्त्र. १९. या विपत्तिरूप (थंडींत). २०. थंडीमध्यें. २१. धर्माच्या पुत्राचें नांव. २२. मुलांनीं. २३. सुलोचना अशी. २४. आयुधांसह. २५. तेज, सद्गुणवैभव. (अध्याय ७१ श्लोक ३२.)

माग म्हणे तिस राजा तिसरा[1] जाया[2] त्या तिचा राग; ।
नागवधूतें[3] जाणों पाजी वैरदुग्ध[4] करुनियां आग[5]. ॥ ४३

देवी म्हणे, 'उदारा ! स्त्री[6] योग्य नव्हे तिजा वर वराया, ।
लोभें आशीचीचि[7] न, मणिराशींची बरी वरव[8] राया[9] ! ॥ ४४

नीचत्वतीर्ण[10] मत्पति हे सुकृतें[11] पावतील कल्याण, ।
येतां सदश्व[12] हाता दुर्लभ त्याहूनि काय[13] पल्याण[14] ?' ॥ ४

कर्ण म्हणे, 'ज्या व्यसनोदधिमग्ना[15] गुरु, सुमित्र, सुत, नुतरी,[16] ।
त्याला झाली भाग्यें प्राप्त पहा हे समर्थ सुतनु[17] 'तरी'[18]. ॥ ४६

'स्त्री गति[19] पांडुसुतांची, हा ! दैव !' असें म्हणोनि भीम कर ।
चोळी, अनुजाशि[20] म्हणे, 'जिष्णो ! यादोगणीं[21] न भी मकर. ॥ ४

तैसा मी शत्रुगणीं, परि पाश तयाशि, तेंवि मज राजा[22], ।
दाखवितों कौतुक जरि वत्सा ! म्हणतासि 'करुनि गजरा जा.' ॥ ४

स्त्रीस सभेंतहि शिवला मग एकांतीं नसेल कां विटे[23] तो ?[24] ।
जो शुचि[26] तो स्वप्नींही परदाराच्या विलोकनें विटतो[25]'. ॥ ४

कर्णाकडे[27] विलोकुनि हांसोनि म्हणे, 'धनंजया[28] ! स्मरतें, ।

---

१. तिसरा वर. २. नाशाप्रत. ३. नागीण. ४. वररूप दूध. ५. अपराध. ६. क्षत्रियस्त्री तीन वर मागण्यास योग्य नाहीं; वैश्यानें एक वर मागावा, क्षत्रिय बायकोनें दोन, राजानें तीन, आणि ब्राह्मणानें शंभर वर मागावे असा नियम आहे. (अध्याय ७१ श्लोक ३५ पहा.) ७. आशीर्वादांची. ८. सेवन, एकसारखें तेंच खाणें. 'वरव' शब्द स्त्रीलिंगी आहे. ९. हे धृतराष्ट्र. १०. नीचत्वापासून मुक्त झालेले. ११. पुण्यकर्मांनें. १२. उत्तम घोडा. १३. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १४. खोगीर. १५. व्यसनरूप समुद्रामध्यें मग्न झालेल्यास. १६. न उतरी, पार उतरू देत नाहीं. १७. सुंदरी (द्रौपदी) या पांडवांची विपत्समुद्रपारग नौका (तरी) झाली. १८. नौका. १९. संरक्षणस्थान, आधारस्तंभ, तारणारी नौका. (अपत्य, कर्म आणि विद्या या तीन ज्योति (तेजें) जनास तारणाऱ्या होत, असें देवलऋषीचें मत आहे. या तिघांपासून उत्तम लोकप्राप्ति होते. येथें पांडवास तारणारी स्त्री झाली आहे म्हणून खेद दर्शविला आहे. अध्याय ७२ श्लोक ५–७.) २०. अर्जुनाला. २१. जलजंतुसमुदायामध्यें. (यादस् + गण.) २२. धर्म. २३. दुष्ट. तो अवश्य पारदारिक असला पाहिजे—असा भाव. २४. हें अर्ध सुभाषितरूप आहे. २५. कंटाळतो. २६ गीति ४९–५० ह्यांस अध्याय ७२ श्लोक ७ याजवरील नीलकंठकृत टीकेचा आधार आहे. यावरून मोरोपंत हे नीलकंठाच्या टीकेस अनुसरून पद्यरचना करीत असें निष्पन्न होतें. २७. भीम कर्णाच्या जातीची व उत्पत्तीची निंदा करण्याच्या हेतूनें अर्जुनास म्हणतो. २८. हे धनंजया ! माझें मन कर्णाला पाहून कंसातें स्मरतें. कर्णाला पाहून मला कंसाची आठवण होते, कंसाप्रमाणें कर्णही क्रूरकर्म करणारा असल्यामुळे असुरयोनीउद्भव सूतपुत्र नीच होय—असा भाव.

कंसातें[1] मन, त्या जें ग्रासी[2] तत्काळ तेज तूं स्मरतें'. ॥ ९०
जिष्णु म्हणे, 'नीचाशीं संत[3] न वदती, म्हणोनि सुज्ञानी ।
सोसावें, बा आर्या! कीं तूं आहेसि पूर्ण सुज्ञानी[4]'. ॥ ९१
भीम म्हणे, 'धर्मा! 'हूं' मात्र[5] म्हण, प्राज्य[6] राज्य तूं कर गा! ।
करगा[7] भूमि करीं मग, हरिला[8] व्हाया सदा मुदाकर[9] गां[10]'. ॥ ९२
क्रोधें भीम खवळला कल्पांतज्वलनसाच[11], परि त्यातें, ।
प्रतिबंधकमणि[12] झाला धर्म, रिपुपतंगदाह[13] करित्यातें. ॥ ९३
धृतराष्ट्राप्रति अंजलि करुनि युधिष्ठिर म्हणे, 'अहो तात! ।
तुमचे पाद तसे प्रिय अमृतकराचेहि[14] मज न होतात. ॥ ९४
ईश्वर तूं, त्वद्वचनीं[15] मन्मन[16] जाणोनि परम हित रमतें, ।
राज्यपदाधिक गुरुपद, वदतों हें गुरुमतें, न इतर मतें. ॥ ९५
पूर्वी गुरुवचनें[17] जो पी दुग्धरसा गरासहित[18] राया! ।
त्या प्रऱ्हादातें बुध गाती भवसागरासहि[19] तराया. ॥ ९६
देवा! सांगावें त्वां जें तुज वाटेल सांगपां[20] यांतें, ।
हे वाहतील पांचहि तुझिया प्रीत्यर्थ आंग पायांतें'. ॥ ९७
धृतराष्ट्र म्हणे, 'धर्मा आलासि तसाचि त्या नव पुरा[21] जा, ।
रक्षार्ह[22] शीलें[23] रक्षीं, रक्षो हेंचें[24] स्वयें, न वपु राजा. ॥ ९८
वत्सा! अजातशत्रो[25]! तूं बंधुकृतापराधविसरा[26] या, ।
अंधस्थविर[27] गुरुकडे[28] पाहुनि आहेस योग्य विसराया[29]. ॥ ९९

---

१. कंसास. २. त्या (कंसाला) जें तेज (कृष्णरूप) तत्काल ग्रासी तें तूं (धनंजया) स्मर—असा अन्वय. ज्या तेजानें कंसाला मारिलें त्याचें (कृष्णाचें) स्मरण कर आणि कर्णाला कंसाप्रमाणें तत्काल मार—असा भाव. ३. साधुजन. ४. उत्तम ज्ञानसंपन्न. ५. अतिवाद करण्याचें कारण नाहीं, एका शब्दानें आज्ञा दे—असा भाव. ६. पुष्कळ. ७. हस्तगत. ८. कृष्णाला. ९. हर्षाची खाण. (मुद्+आकर.) १०. गायन कर. ११. प्रलयकालच्या अग्नीसारखा. १२. अडथळा करणारा मणि असा धर्मराजा झाला. एक जातीचा मणि आहे, त्याच्या योगें अग्निभयाचें निवारण होतें अशी समजूत आहे. १३. शत्रुरूप पतंगाचें दहन करणाऱ्या (भीमाला). १४. चंद्राचे. १५. तुझे भाषणीं. १६. माझें मन. १७. पित्याच्या आज्ञेनें. १८. विषासहित. १९. संसारसमुद्र तरून जाण्यासाठीं. २०. (अंगप=कर्ण) कर्णासहवर्तमान दुर्योधनादिकांस. २१. नूतन नगरास. (खांडवप्रस्थास.) २२. रक्षण करण्यास योग्य. २३. सदाचरण, सुवृत्त. २४. शील. २५. ज्याला शत्रु उत्पन्न झाला नाहीं तो. (धर्म.) २६. दुर्योधनादिक बंधु यांनीं केलेल्या अपराधांच्या समूहाला. २७. वृद्ध. २८. बापाकडे (चुलत्याकडे—मज धृतराष्ट्राकडे.) २९. विसरण्याला.

अतिशुद्ध बुद्धिचें [1]फळ शांति, बळें सहन शील बापा! हें, ।
सर्व तुला विदित असे, आम्हां वृद्धांकडेचि बा! पाहें. ॥ ६०

[3]सुकृतातेंचि स्मरति, न कुकृतातें, याचि साधुरीतीची ।
[4]तेंचि रसिका, न सुधेचि, कीं केवळ अल्प माधुरी तीची. ॥ ६१

हें म्यां [5]उपेक्षिलें कीं [6]पुत्रबळाबळ मला विदित व्हावें, ।
[7]द्यूतविलोकनकौतुकमिलितातहि भेटतील याभावें. ॥ ६२

'कळलें पुत्रांत तुम्हीं श्रेष्ठ भले, जा स्वराष्ट्र सांभाळा; ।
बुडतां [8]असदनुसरणें [9]लावावा शब्द दोष कां [10]भाळा ?' ॥ ६३

नमुनि पित्यासि निघाला तो [11]व्यसनोन्मुक्त [12]सस्वजन [13]पार्थ, ।
सुजनासि गमे ज्याच्या कीर्तिश्रवणेंचि [14]जन्म [15]अनपार्थ. ॥ ६४

दुःशासन, कर्णशकुनिदुर्योधन हे जया स्थळीं होते, ।
तेथें जाउनि सांगे, 'शक्रप्रस्थासि चालिले हो! ते[16]. ॥ ६५

सुटले शत्रु, दुखविले [17]अहिसे, वधितील हे तुम्हां, तारा ।
व्यसनांत आपणातें, न बरा हा [18]नाशहेतु म्हातारा'. ॥ ६६

जाणोनि [19]अत्यनिष्ट क्षिप्र तया आंधळ्यासि [20]भोंदाया, ।
धांवुनि गेले शतसुत [21]शोकाजगराननांत [22]कोंदाया. ॥ ६७

त्यातें म्हणे सुयोधन, 'केला कीं व्यर्थ यत्न हा तातें. ।
मोहें गमाविलें जें आलें [23]अहिमूर्धरत्न हाता तें. ॥ ६८

जों झाले न [24]रणोद्यत सर्वोपायें [25]सपत्न [26]मारावे, ।
त्यांतचि [27]कुशल, स्वाश्रित जन सुज्ञें सर्वथैव तारावे. ॥ ६९

---

१. शांति हें बुद्धीचें फळ होय. २. अध्याय ७३ श्लोक ७ पहा. ३. गोडी. ४. त्या सुधेची. ही गीति सुभाषितरूप आहे. ५. ह्या द्यूताकडे मी दुर्लक्ष केलें, ह्या द्यूताची उपेक्षा केली. (अध्याय ७३ श्लो० १३.) ६. दुर्योधनादि पुत्रांचें सामर्थ्य आणि दौर्बल्य. ७. द्यूत पाहण्यासाठीं कौतुकानें मिळालेले आप्तजनहि. ८. दुष्टांचें अनुसरण केल्यानें. ९. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १०. कपाळास. ११. संकटांतून मुक्त झालेला. (धर्म.) १२. द्रौपदी व भीमादिक बंधु यांसह इंद्रप्रस्थास जाण्यास निघाला. १३. धर्म. १४. येथें सभापर्वांतील द्यूतपर्व संपलें. येथून अनुद्यूतपर्वास आरंभ होतो. १५. न व्यर्थ, सफळ. (अन्+अप+अर्थ.) १६. पांडव. १७. सर्पसे. १८. नाशास कारण वृद्ध (धृतराष्ट्र). १९. फार वाईट. २०. फुसलावया. २१. शोकरूप अजगराच्या (मोठ्या सर्पाच्या) मुखांत. २२. भराया. २३. सर्पाच्या मस्तकावरील मणि. २४. युद्धाविषयीं उद्युक्त. २५. शत्रु. २६. अध्याय ७४ श्लोक ८ पहा. २७. कल्याण.

[1]वृत्रारिप्रति वदला [2]गुरु ज्या या [3]भद्रधाम नीतीतें ।
प्रभुवर्या! अवमानुनि करिसी बहु खिन्न कां मनीं तीतें? ॥ ७०
[4]द्यूतजितप्रचुरधनें पूजुनि नृप सर्व, करुनि [5]वश अरि ते ।
मारावे, हें [6]मन्मत; कीं न भले [7]वृत्तिचे हरण करिते. ॥ ७१
पांडव न सोडिले ते, दुखवुनि अत्यंत उग्र [8]अहि [9]तातें. ।
नीतिज्ञ कोण दुसरा आत्मसुताच्या करील [10]अहितातें? ॥ ७२
येतील [11]कटक घेउनि, आम्हां वधितील, राज्य हरितील, ।
[12]दयितेच्या क्लेशांतें चिंतुनि ते काय गा! न करितील? ॥ ७३
आजुनि तरि सावध हो, द्यूतार्थ फिरोनि येतसे, कर गा! ।
करिल पुन्हा [13]मन्मातुल शत्रूंच्या राजसंपदा [14]करगा. ॥ ७४
द्यूतीं असा करूं पण करणें वनवास [15]अब्द बारा, हें ।
होतां, [16]अज्ञातवसति वत्सर, आइक, उगाचि बा! राहें. ॥ ७५
अज्ञातवास अंतीं करणें जो काय तो [17]समानजनीं, ।
जरि उमगले, वसावें द्वादशवर्षें पुन्हा तसेंचि वनीं. ॥ ७६
[18]सिद्धिर्द मामा, '[19]मा मा' न म्हण, [20]मदिष्टार्थ तप नको कांहीं. ।
[21]प्रार्थावा पुत्रांहीं स्वपिता स्वसुखार्थ, [22]तपन [23]कोकांहीं. ॥ ७७
होऊनि [24]बद्धमूल, [25]स्वसहाय करूं [26]समस्तनृपकटक, ।
मग मज भक्ष्य, व्यसनीं तरलेही अरि, जसे घृतीं [27]वटक. ॥ ७८
व्यसनीं [28]रंध्रहि उरे, जोंवरि राहे धरुनि तळ उगला, ।

---

१. वृत्रासुराचा शत्रु (इंद्र) त्याप्रत. २. देवपुरोहित, बृहस्पति. ३. कल्याणाचें गृह. ४. द्यूतांत जे जिंकले त्यांच्या (पांडवांच्या) बहुत धनानें. ५. स्वाधीन. ६. माझा विचार. ७. उपजीविकासाधनाचें. ८. सर्प, (अ० ७४ श्लो० ११). ९. धृतराष्ट्रानें. हें अपन्हुति नामक अलंकाराचें उदाहरण होय. १०. अकल्याणातें. ११. सैन्य. १२. प्रियभार्या द्रौपदी तिच्या. १३. माझा मामा. (शकुनि.) १४. हस्तगत. १५. वर्षें. १६. वास. कोणास माहीत नाहीं असें राहणें. १७. आत्मसदृश जनांत, समयोग्यतेच्या लोकांत. १८. सिद्धि देणारा मामा (शकुनि) आहे, कारण तो अक्षवशीकरणविद्येंत निपुण होता. १९. नको नाहीं. २०. माझें इष्ट (कल्याण) करण्यास. २१. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २२. सूर्य. २३. चक्रवाक पक्ष्यांनीं. या जातीच्या नरमांदींचा रात्रीं नित्य वियोग होतो आणि तेणेंकरून त्यास अत्यंत दुःख होतें, पण सूर्योदय होतांच भेट होते, म्हणून ते पक्षी सूर्योदयाची वाट पहात असतात आणि तो व्हावा म्हणून प्रार्थना करतात. २४. ज्याचें मूळ (पाया) बद्ध (दृढ) झाला तो. २५. आपलें साहाय्य करणारें, आपलें मित्र असें. २६. सकल राजांचें सैन्य. २७. वडे. २८. रंध्र म्हणजे छिद्र (भोंक); पक्षीं उणेपणा, न्यून.

भक्ष्यचि इतर सुवृत्तहि[1] वटक कटाहीं[2] तरोनि जो फुगला.' ॥ ७९
अंध म्हणे[3], 'हूं, फिरवा[4], जाऊं द्या जवन[5] दूत, नंदन हो! ।
देवा! युधिष्ठिराचा तो द्यूतोत्साह लेश मंद न हो[6]'. ॥ ८०
द्रोणादि[7] सुज्ञ वारित होते, परि न वळलाचि तो कांहीं, ।
भरला भरीं, भुलविला, दावुनि धनलोभ दुष्ट तो[8] कांहीं. ॥ ८१
लोभांध गुरु न, हो! तो आत्मारि[9] तथा[10] निजानुगांधारी, ।
आंतहि जो अंध तया[11] बोध किती हो! करील गांधारी? ॥ ८२
'नरकीं बुडवील, न हा[12] पुत्र, त्यागचि बरा, न अत्याग[13], ।
बांधा वधा खळाला, स्नेहें घडतें तुम्हांसि अत्याग[14]. ॥ ८३
क्षणभरि मात्र खळतनुजविरहातें[15] मन करूनि गाढ वहा, ।
राजगृहीं न वसावा, भ्रमलासि, नव्हे सदश्व[16], गाढव हा[17]. ॥ ८४
एकैक शतसुताधिक ते[18] सुत याहूनि काय हो! ऊन[19]? ।
सन्मणि टाकुनि घेतां कांच कसे सुज्ञराय[20] होऊन?' ॥ ८५
भूप म्हणे, 'बहुधा कुळ बुडतें, वारावयासि मी न शकें. ।
गरुडासहि लंघ्य न जें लंघावें दैव तें कसें मशकें[21]? ॥ ८६
गांधारि! उगीच रहा, होऊं दे द्यूत, औरसां[22] मान्य, ।
श्रुति म्हणति न इतराला त्या मानिसि केंवि पौर सामान्य'. ॥ ८७
ऐसें वदोनि भूपें पाठविला प्रातिकामि सूत बळें; ।
तेव्हां स्तविति खळ खळां, गळति खळखळां सुसाधुनेत्रजळें[23]. ॥ ८८
तो सूत दूर धांवत जाउनि गांठी पथांत पार्थातें[24], ।
ठकवुनि लुटावया पटु ठक जेंवि ससार्थवाहसार्थातें[25]. ॥ ८९

---

१. चांगला वर्तुलाकार; पक्षीं सद्वर्तनसंपन्न, चांगल्या चालीचा. २. कढईमध्यें. ही गीति सुभाषितरूप आहे. ३. अध्याय ७४ श्लोक २४ पहा. ४. दूर गेलेल्या पांडवांस परत आणा. ५. अतिवेगवान्. ६. कमी न होवो. ७. द्रोण, विदुर, भीष्म, युयुत्सु, द्रोणपुत्र इत्यादि ज्ञाते द्यूत करूं नका असें म्हणत होते. (अ० ७४ श्लो० २५–२७). ८. अपत्यांनीं. ९. आत्मघातक. १०. त्याप्रमाणेंच (आत्मवैरी) अशा आपल्या सेवकांस पोषण करणारा. ११. त्या धृतराष्ट्राला. १२. दुर्योधन. १३. न टाकणें बरें नव्हें, टाकणें हेंच उचित. १४. मोठा अपराध. (अति+आगस्=अपराध) १५. दुष्ट मुलाच्या वियोगातें. १६. उत्तम घोडा. १७. हा दुर्योधन. १८. पांडव. १९. कमी. २०. बुधश्रेष्ठ. २१. चिलटानें. २२. पुत्रांस जें मान्य आहे तें. २३. थोर सज्जनांच्या नेत्रांतून उदकें. २४. धर्मातें. २५. सार्थवाहासह (व्यापारी जनांचा नायकासह) सार्थाला (व्यापारी जनांला).

'द्यूतार्थ बाहतो तुज तात, युधिष्ठिर! नराधिपा! परत' ।
ऐसें तो सूत म्हणे; दे श्रवणें दुस्तराधि[1] पापरत[2]. ॥ ९०
धर्म म्हणे, 'क्षम[3] नाहीं लंघाया[4] सुज्ञही नर कपाळा[5], ।
स्तुत होय स्व:पाळा[6] केव्हां 'जी जी' म्हणे नरकपाळा[7]. ॥ ९१
द्यूतें क्षय हें कळतें, परि फिरतों लंघ्य काय हो तात ? ।
पितृवचनकर[8] निरुपम श्रीकीर्तीचे निकाय[9] होतात'. ॥ ९२
द्यूतासि पुन्हा सेवी गुर्वाज्ञेकरुनि शिशु जसा गरळा[10]. ।
किंवा परार्थ[11] जेंवि प्राशी श्रीकंठ[12] नीरसा गरळा[13]. ॥ ९३
बसले सभेंत पांडव, शकुनि म्हणे, 'गा युधिष्ठिरा! जरि तें ।
जितधन[14] दिधलें, देवूं, वृद्ध[15] करू सर्व गेह आज रितें. ॥ ९४
राया! आतां द्यूतीं एकचि आम्हीं तुम्हीं करूं पण हो! ।
'सर्वस्व[16] हारवावें कीं जिंकावें' न भीरु तूं पण[17] हो. ॥ ९५
द्यूतीं निर्जित झालों तरि आम्हीं रौरवाजिनें[18] धरुनी ।
द्वादशवत्सर व्हावें वनवासी सुमुनिवृत्तिला वरुनी ॥ ९६
अज्ञातवास सजनीं[19] परि वत्सर एक मग करावा हो, ।
होतांचि ज्ञांत[20] पुन्हा पहिला वनवासपथ धरावा हो. ॥ ९७
जित होतां वर्तावें याचि न्यायें तुम्हीं सदारानीं[21], ।
सजनीं वर्षभरि वसा द्वादश वर्षें वसा सदा रानीं. ॥ ९८
तेरा वर्षें ऐशीं क्रमिल्यावरि लागतांचि चवदावें ।
राज्य करावें आपण, हा पण; कोणी असत्य न वदावें.' ॥ ९९

---

१. तरण्यास कठिण अशी चिंता (आधि). २. दुष्कर्मासक्त. (दुर्योधन.) ३. समर्थ. ४. टाळाया, उल्लंघून जाण्यास. ५. दैवाला. ६. स्वर्गपालास. (इंद्राला.) ७. दुर्दैवाला. ८. पितरांची आज्ञा पाळणारे. ९. गृह. १०. विड्यामध्यें अनेक औषधें घालून चावून त्याचा जो रस लहान मुलांस पाजितात तो (व्यास). ११. परोपकारार्थ. १२. शंकर. १३. विषा. (समुद्रमंथनकाळीं उत्पन्न झालेल्या हालाहल विषास शंकरानें गृहण केलें, या कथेला उद्देशून हें वर्णन आहे.) १४. तुमचें आम्ही जिंकून घेतलेलें द्रव्य जर धृतराष्ट्र तुम्हास देत असेल तर देवो, अथवा घरांतील सर्व धन तुम्हांला देऊन जर घर रिकामें करीत असेल तर तो खुशाल तसें करो. १५. धृतराष्ट्र. १६. सगळें द्रव्य. (स्व=धन.) १७. परंतु. १८. मृगचर्में. (रुरु=कृष्णमृग, काळवीट त्यांचीं अजिनें=चर्में.) १९. समान योग्यतेच्या लोकांत. २०. प्रगट, ओळखलेले. २१. स्त्रीसहवर्तमानानीं.

सभ्य म्हणति, ‘[1]अक्षग्रह घातभ्रमकर, नसे असा [2]धुतरा. ।
कौरव हो! गौरव हो सुजनीं न करुनि असें [3]असाधु तरा. ॥ १००
अन्योन्यकरें तुमचा बुध हो! समरांत न सहसा वध हो, ।
धर्मा! तूं तरि आइक, देती भयलक्ष अक्ष, सावध हो’. ॥ १०१
धर्म [4]म्हणे, ‘न [5]व्यसनी, परि मी त्यजितां निज प्रतिज्ञा ते, ।
जे सुप्रसन्न मनवरि केवळ विटतील संप्रति ज्ञाते. ॥ १०२
शकुने! खेळ यथेष्ट द्यूतीं मी मांडिला [6]त्वदुक्तपण, ।
[7]छद्में कल्याण नसे, ऐकावें प्रथम हें [8]सदुक्त पण.’ ॥ १०३
पूर्वोक्त पणोच्चारण करुनि सभेमाजि शकुनि [9]अक्षांतें, ।
टाकुनि ‘जितं’ म्हणे खळ कपटें जिंकी [10]खळांतदक्षांतें. ॥ १०४

अध्याय सातवा.

[11]अजिनें नेसुनि झाले पांडव [12]वनवासदीक्षित तशांतें ।
दुःशासन बहु हांसे, गावें ज्यांच्या [13]सुधोत्तमयशांतें. ॥ १
‘[14]आजि[15]पराजित नव्हते झाले जे, तेच हे पराजित कीं, ।
आम्हां सुखेंचि तितकीं दुःखें जीं आमुच्या [16]परां जितकीं’. ॥ २
आजि [17]अकंटक केलें [18]नृपनयनिपुणें सुयोधनें राज्य, ।
[19]प्राज्यप्रीतिद झालें सुहृदांला, गाळिलें जसें [20]आज्य. ॥ ३
तात म्हणे, ‘नित्य असो या धर्मा [21]भव्य भाग्य मत्तनया; ।
ते हे आम्हां [22]हंसित होते, रक्षी न [23]भाग्यमत्त [24]नया. ॥ ४
हे पंडित [25]परि पांडव नरकीं श्रीमद धरुनि कां पडले? ।
[26]कैवर्तांस अदीक्षित [27]अजिनधर वनांत बंधु सांपडले. ॥ ५

---

१. द्यूत, फांसे घेणें. २. धोतऱ्याचें फळ. ३. वाईट. ४. सभापर्व–अध्याय ७६ श्लोक २० पहा. ५. व्यसनासक्त, जुवेबाज. ६. त्वां बोलिलेला जो पण तो. ७. कपटें. ८. साधूचें भाषण. ९. फांशांतें. १०. खळांचा अंत करण्यांत जे दक्ष त्या पांडवांतें. येथें ‘अनुद्यूतपर्व’ समाप्त झालें. ११. हरिणचर्में. १२. वनवास करण्याची दीक्षा (व्रत) ज्यांनीं घेतली ते. (दीक्षा = व्रतग्रहण.) १३. अमृताहून उत्तम अशा यशास. १४. ही दुःशासनाची उक्ति आहे. १५. युद्धांत पराभव पावलेले. (आजि=युद्ध.) १६. शत्रूला. १७. शत्रुरहित. १८. राजनीतिनिपुण अशा. १९. मोठी गोडी देणारें, पुष्कळ आवडतें. २०. तूप. २१. उत्तम दैव. २२. मयसभेंत दुर्योधन पाण्यांत पडला तेव्हां. २३. संपत्तीनें उन्मत्त झालेला पुरुष. २४. नीतीला. २५. ‘तरि’ असाही पाठ आहे. २६. कोल्यास. २७. कृष्णमृगचर्मधारी.

आपण षंढतिल[1] असें निःसंशय जाणतील हे आतां, ।
गर्वें फुगले होते फुगवूनि स्वगुण काय[2] कीं गातां. ॥ ६
क्लीबांसि सुता देउनि, सुमति परि द्रुपद फार चुकला हो, ।
यमभट हो! बळकट या[3] स्वापत्यविडंबकासि[4] बुकला हो! ॥ ७
द्रौपदि! हे कुरु दांत[5] क्षांत[6] सधन, यांत कांत[7] जोडावा; ।
लाभ नसे, ताप वसे, ज्यामध्यें तो कुसंग सोडावा. ॥ ८
षंढतिल[9], चर्ममय मृग[10], काकयव[11], जसे तसेचि फटकळ गे! ।
हे व्यर्थ कांकणाचे दावितिल न समरसिंधुतट[12] कळगे[13]. ॥ ९
कृष्णे! काडी मोडीं, काय तुला दीन मानले शवसे[14]? ।
जे राज्यभ्रष्ट कितव, ज्यांचे ठायीं न मानलेश वसे.' ॥ १०
भीम म्हणे, 'रे कोल्ह्या! याचा घेईन सूड जाण खरें, ।
हाणीन बाण वर्मी हाणिशि वचनें जशींच बाणखरें[15]. ॥ ११
काळातिथिमधुपर्कीं[16] जे पांडवपशु निवेदिले[17] होते, ।
जाणो न मारिले, वधकातर[18] सोडोनियां दिले हो! ते'. ॥ १२
'गौगौं'[19] असें म्हणे खळ दुःशासन अति असंत[20] तो नाचे, ।
किति वर्णावे सद्गुण सन्नीति करूनि संततोनाचे[21]? ॥ १३

---

१. नपुंसक. (अफल आणि निर्वीर्य तिलांप्रमाणें.) २. 'गायकीं' असाही पाठभेद आढळतो. ३. द्रुपदा. ४. आपल्या अपत्याची (द्रौपदीची) विटंबना करणारास. ५. इंद्रिय निग्रह ज्यांनीं केला ते. ६. सहनशीळ, क्षमाशील. ७. पति. ८. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. सभापर्व-अध्याय ७७ श्लोक १३ पहा. १०. चामड्याचे केलेले मृग. ११. ज्यामध्यें तंदुल धान्य नसून बाह्यतः धान्यासारखें दिसतें तें काकयव नामक धान्य, धान्याचें वांझें कणीस, निष्फळ तृणधान्य. १२. युद्धरूप समुद्राचें तीर. १३. कांकणाचा तुरा(कळगा). बहुवचनी. १४. प्रेतासारखें. १५. बाणासारखीं तीक्ष्णें. १६. काळरूप अतिथीची मधुपर्क पूजा करतेवेळीं. मधुपर्क हा एक प्रकारचा पूजाविधि आहे. कोणी प्रतिष्ठित पाहुणा (अतिथि) घरीं आला असतां हा विधि करतात. गाय अथवा बैल मारून त्याच्या कातड्यावर ज्या पाहुण्याला मधुपर्क द्यावयाचा असेल त्याला बसवावें आणि दहीं दूध मध इत्यादि अर्पण करून स्वागत करावें असा पूर्वी प्रचार होता. हल्लीं विवाहसमयीं वराला आणि पूजासमयीं देवाला मधुपर्क देतात. तथापि त्यांत मांसाबद्दल दहीं मध यांची योजना करण्याचा प्रघात आहे. या स्थलीं काल हा पाहुणा आणि पांडव हे मधुपर्कासाठीं दिलेले पशु असें समजावें. १७. उच्चारिलेले. मधुपर्कसमयीं 'गौर्गौर्गौः' असें त्रिवार उच्चारण करून गाईचा वध अथवा उत्सर्ग करीत असत. १८. वधाविषयीं भितरे. १९. 'गाय गाय' असें दुःष्ट दुःशासन म्हणे. मधुपर्कांतील पशुप्रमाणें मारण्यास योग्य असा भाव. या दुःशासनाच्या दुर्भाषणाचा सूड पुढें भीमानें घेतला आहे (मोरोपंतकृत कर्णपर्व पहा). २०. असाधु. २१. निरंतर जो हीन त्याचे.

दुर्योधन आपण मति[1]वेश्येचा जरि नवा ढेवा[2], यांला[3] ।
हांसे गत्यनुकारें[4], बाळ न भी ज्वलन[5] वाढवायाला. ॥ १४

हंसखगा काक[6] जसा, कीं धुतरा पुष्पकुळवरा कमळा, ।
वेडावी, लावाया वांछी अर्कींहि[7] तो वराक[8] मळा. ॥ १५

तें[9] अवलोकूनि म्हणे त्यासि निवृत्तार्धकाय[10] भीम असें, ।
'मंद! रहा, मंदर हा मी भीम खळाब्धिमथनयोग्य[11] असें[12]. ॥ १६

मी या सुयोधनाचा हंता, जरि मन्मनांत अनहंता[13], ।
सहदेव शकुनिचा या, कर्णाचा जिष्णु[14] दुष्टजनहंता.' ॥ १७

जिष्णु म्हणे, 'कर्तव्य प्रगट न करिती निजाननें[15] आर्य[16]. ।
पाहूं तें चवदाव्या अब्दीं[17] यावरि घडेल जें कार्य.' ॥ १८

भीम म्हणे, 'दुर्योधनदुःशासनकर्णशकुनिरक्तानें ।
भू[18] त्वां तृप्त करावी, ऐकावें गुरुवचोनुरक्तानें[19].' ॥ १९

पार्थ म्हणे, 'करिन तुझें जें प्रिय तेंचि, प्रसाद जोडोंया[20], ।
हें किति! मज उशिर नसे त्वत्प्रतिकूल स्वबाहु तोडाया. ॥ २०

अनुगांसह कर्णातें मारुनि मी हर्षवीन आर्यातें, ।
तोडीन स्वभुजहि जरि, हें न तुझ्या साधितील कार्यातें. ॥ २१

परि अरि राज्य न देइल जरि हायन[21] लागतांचि चवदावें, ।
गुरुसीं वाक्य प्रथमचि सुविचार बरा करूनिच वदावें.' ॥ २२

सहदेव[22] म्हणे, 'शकुने! अक्ष म्हणसि, परि नव्हेत हे अक्ष; ।
मूढा! सहदेवाचे त्वां वरिले शर रणीं स्ववधदक्ष. ॥ २३

कार्यें उरकुनि घे, रे! तेरा वर्षेंचि राहिलें आयू, ।
होतिल चतुर्दशाब्दीं माझे शर सर्प, असु तुझे वायू. ॥ २४

---

१. बुद्धिरूप वेश्येचा. २. वेश्येच्या मागें पखवाज वाजविणारा साजिंदा. (हा निंदाव्यंजक शब्द आहे.) ३. भीमाला. ४. सभेंतून जाणाऱ्या भीमाच्या गतीच्या अनुकरणानें. (अध्याय ७७ श्लोक २३ पहा. ५. अग्नि. ६ हंसपक्ष्याला कावळा जसा वेडावी. ७. सूर्याचे ठिकाणीं. ८. नीच. ९. तें अनुकरण. १०. मागें फिरविला आहे शरीराचा अर्धा भाग ज्यानें असा. ११. दुष्टजनसागराचें मथन करण्यास समर्थ असा मंदर पर्वत. १२. आहें. १३. गर्विष्ठपणा, अहंकाराचा अभाव. (अन्+अहंता.) १४. अर्जुन. (अध्याय ७७ श्लोक २६–२९.) १५. आपल्या मुखानें. १६. श्रेष्ठजन. १७. वर्षीं. (श्लोक ३०.) १८. भूमि. १९. गुरुवचनाविषयीं प्रीतियुक्त अशानें. २०. अध्याय ७७ श्लोक ३२-३६ पहा. २१. वर्ष. २२. अध्याय ७७ श्लोक ३९-४१ पहा.

पोषी[1] जशी पतिशुभाशुभभवमुदमुद्भरें[2] पुलक[3] लंका, ।
गांधारराजधानी[4] पोषू तैशीच रे कुलकलंका[5] !' ॥ २५
नकुळ म्हणे, 'व्याघ्रशिरीं दिधला हा वाम पाद ओतूनीं[6], ।
हा ! तापविली दयिता[7] कर्णी परुषोक्तिगरळ[8] ओतूनी. ॥ २६
कृष्णेसि रुक्ष वदले जे जे, मरतील ते समस्त रणीं ।
खळबळनकुळ तसे, तृणदव[9] कीं किंवा जसे तमस्तरणी[10].' ॥ २७
एवंविध[11] प्रतिज्ञा करुनि महासत्त्व[12] पांडुसुत राया ।
धृतराष्ट्रा पुसति नमुनि, त्या धर्मे आपदब्धि[13] उतराया. ॥ २८
धर्म पुसे ज्यां ज्यांतें, मागे जाया वनासि आज्ञा, ते ।
भीष्म द्रोण कृप विदुर होऊन उदश्रु[14] म्हणति 'हा !' ज्ञाते. ॥ २९
त्यांहि पुसे, स्वाहित[15] जे, वाजविती न धरुनि त्रपा[16] टीर[17], ।
धर्मासि एक साजे सदसत्समशील[18] मित्र पाटीर[19]. ॥ ३०
छळकाशि कवि न शापिति, देतें जड कनक काय हो! गोळी[20]? ।
पाळी जो त्याशि मधुर इक्षु तसा त्याहि अदय जो गाळी[21]. ॥ ३१
विदुर म्हणे, 'कुंतीचें वपु[22] कोमळ, वासयोग्य न वनीं तें. ।
कष्टांत वृद्धदेहें न उरावें, आतपांत[23] नवनीतें[24]. ॥ ३२
सेवाधिकार[25] मज द्या, ठेवा माझ्या गृहीं स्वमातेतें, ।
दुर्गत[26] बंधु पहातां दुःख जसें इतरथा[27] न माते[28] तें.'[29] ॥ ३३

१. धारण करी. २. रावणाच्या शुभाशुभ कर्मांपासून होणारा जो हर्ष किंवा दुःख त्याच्या भरानें. (पति+शुभ+अशुभ+भव+मुद्+अमुद्+भरें.) ३. रोमांच. ४. गांधार देशाची प्रधाननगरी तक्षशिला. गांधार देशाला कंदाहार हें अर्वाचीन नांव अपभ्रंश होऊन पडलें आहे. ५. कुलास दोष लावणाऱ्या (शकुने). ६. मार्जारांनीं. ७. प्रियभार्या द्रौपदी. ८. निष्ठुरभाषणरूप विष. (परुष+उक्ति+गरळ.) ९. गवत आणि वणवा. १०. अंधकार आणि सूर्य. अंधकाराला जसा तरणि (सूर्य) तसा दुष्टांचा बळाला नकुळ घातक आहे—असा भाव. ११. अशा प्रकारची. १२. मोठे धैर्यशाली. १३. आपत्तिरूप समुद्र, दुःखसागर. १४. नेत्रोदकयुक्त. १५. स्वशत्रु. १६. लज्जा. १७. कुल्ला, नितंब, टेरी. १८. सद् आणि असद् म्हणजे चांगलें आणि वाईट यांच्याठायीं सारखाच आहे स्वभाव ज्याचा तो. १९. चंदनवृक्ष. २०. शिव्या. हें प्रश्नालंकाराचें उदाहरण आहे. प्रश्न असून उत्तराची अपेक्षा नसते आणि अर्थगौरव होऊन तो परिपूर्ण असतो तेव्हां प्रश्नालंकार होतो. २१. रस काढी. ही गीति सुभाषितरूप आहे. २२. शरीर. २३. उन्हांत. २४. लोण्यानें. २५. चाकरी करण्याचा अधिकार. २६. दरिद्र. २७. अन्यथा, दुसऱ्या प्रकारानें. २८. माजे, वृद्धि पावे. २९. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे.

पांडव म्हणति, 'बहु बरें, पितृतुल्य पितृव्य तूं बुधा! सरसें ।
[1]भवदुपदेशें निवतो, त्वद्भाषण [2]तापल्या [3]सुधासरसें. ॥ ३४
तूं आमुचा [4]परमगुरु, न त्वत्सम ऐकिला सदय चुलता, ।
त्वच्छाया नसतां किति आम्हीं? या [5]संज्वरें गिरिहि [6]उलता.' ॥ ३५
विदुर म्हणे, 'बा **धर्मा**! व्यसनीं सद्रीतिनीति नवनौका, ।
करिशील राज्य, झाला काय श्रीरामराय न [7]वनौका? ॥ ३६
सर्व असा एक मतें, जें युष्मत्प्रिय वडेल सत्वर तें, ।
कोठेंहि कधींहि चिर स्थिर अनुभविलें न दुःख [8]सत्वरतें'. ॥ ३७
[9]कथिली **विदुरें** [10]सन्मति, जाणों दिधली तयां शिदोरी [10]ती; ।
कीं [11]व्यसनकूपपतितां [12]अनुपायज्ञां तयांशि दोरी [10]ती. ॥ ३८
पुत्रवियोगें **कुंती** बहु तळमळली, म्हणे, 'अहाहा! तें ।
सांगूं, कीं निंदूं त्या लिहिला जेणें कुलेख हा हातें?' ॥ ३९
[13]असु जातां [14]तनु [15]विकळा, कीं जातां वत्स जेंवि धेनु, [16]सती ।
तेंवि म्हणे, '[17]अलिकीं कां [18]लिपि लिहिली [19]अश्रुदा [20]विधे! नुसती?॥ ४०
त्यजिली जसी तुम्हीं [21]हे, सुत हो! त्यजिली तशी न कां [22]असुनीं? ।
[23]हे या [24]संज्वरगेहीं देहीं होतील तप्त कीं [25]असुनी. ॥ ४१
सुत हो! शुद्धांस कसें [26]आतळलें व्यसन? [27]अंक हा रविला; ।
विपरीतचि हें [28]कुरुकुळदीपांनीं स्वप्रकाश हारविला. ॥ ४२
आलां हतभाग्येच्या पोटाला म्हणुनि भोगितां ताप; ।
संसर्गें भोगावें पुण्य जसें साधु हो! तसें पाप. ॥ ४३
तुमचा धन्य पिता, ती माता [29]**मा**द्री सतीहि धन्या हो! ।

---

१. तुझ्या उपदेशें. २. तप्त झालेल्या. ३. अमृताच्या सरोवरासारखें. ४. अध्याय ७८ श्लोक ७–८ पहा. ५. संतापें. ६. फुटून जाता. ७. वनवासी. (वन=अरण्य, ओकस्=घर.) ८. सत्वसंपन्न पुरुषानें, सत्वगुण ज्यास आवडतो त्यानें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. अध्याय ७८ श्लोक ९–२३ पहा. यांत विदुरानें केलेला उपदेश आहे. १०. चांगली बुद्धि. ११. व्यसनरूप विहिरींत पडलेल्या जनांस. १२. जे उपाय जाणत नाहींत त्यांस. १३. प्राण. १४. देह. १५. व्याकुळ, व्यथित. १६. शीलाचारवती साध्वी. १७. कपाळीं. १८. लेख. १९. अश्रु उत्पन्न करणारी (लिपि). २०. ब्रह्मदेवा. २१. कुंती. २२. प्राणांनीं. संस्कृतांत 'असु,' 'प्राण,' या शब्दांचा प्रयोग बहुवचनांत होतो. २३. हे प्राण. २४. संतापगृहांत. (देहांत.) २५. असोन. २६. शिवलें. २७. कलंक. २८. कुरुवंशाला सुप्रकाशित करणाऱ्या पांडवांनीं. २९. सभापर्व–अध्याय ७९ श्लोक १९ पहा.

वंध्यत्व बरें, परि मजऐसी कोणासही न कन्या हो.[1] ॥ ४४
माझा पुत्र स्नेहें त्यजुनि मला तुजकडेचि आला गे[2] ! ।
स्वव्रतवत् प्रतिपाळीं, रक्षाया अधिक काय या लागे? ॥ ४५
वत्से ! कृष्णे ! माझा बाळक सहदेव देवसा यास ।
बहु सांभाळीं, व्हावा सुकुमार कुमार हा न [3]सायास. ॥ ४६
म्यां वत्स निरविला तुज हा [4]मदसुन्यास, यास जतन करीं, ।
विश्वासें दिधलें हें तुझिया [5]जीवनहित स्व वतन [6]करीं. ॥ ४७
रे वत्सा ! सहदेवा ! जाऊंदे धर्म भीम वनवासा, ।
जाऊ अर्जुन नकुळहि, कां बा ! झालासि बांधव नवासा? ॥ ४८
मजविण तुज, तुजविण मज तेरा [7]कल्पांत ते न [8]वत्सर हा ! ।
ने मज, नेम जरि अधिक, पाहूं तरि दे [9]मुखेंदु [10]वत्स ! रहा. ॥ ४९
हा कृष्णा ! जगदीशा ! काय बरें दैन्य हें अगा [11]धात्या ! ।
[12]व्यसनार्तासि तराया सेतु जसा सागरा अगाधा त्या. ॥ ५०
[13]कृष्णाश्रितजनसर्वव्यसनघनघनप्रकंपना बापा ! ।
[14]तापाकुल कुल कुरुचें संरक्षावें हरूनियां पापा. ॥ ५१
[15]गे बाई कौसल्ये ! संसाराला न हे वृथा आली, ।
झाली [16]तुहिनकरकुळीं उत्पन्न दुजी तुझी पृथा [17]आली. ॥ ५२
काय करूं चुकला [18]विधि भाळीं लिहितां लिहावया मरण, ।
बहुमुख [19]मद्विधितेजें पडलें [20]चतुराननासि विस्मरण.' ॥ ५३
विदुर तिला समजाउनि नेउनि सदनीं म्हणे, 'नकोचि रडों[21]', ।

---

१. होवो. २. अगे कृष्णे ! ३. आयासयुक्त. ४. माझ्या प्राणाचा ठेवा. (मत्+असु+न्यास.) ५. वांचण्याविषयीं कल्याणभूत, जीवनाला हितकारक. ६. हातीं. ७. ब्रह्मदेवाचे दिवस. ८. वर्षें. ९. मुखचंद्र. १०. सहदेवा. ११. विधे. १२. 'व्यसनारचीं' असाही पाठ आहे. १३. कृष्णाचे जे आश्रितजन त्यांच्या सर्व व्यसन(दु:ख)रूप निबिड मेघाविषयीं झंझावात (मोठा वारा) अशा कृष्णा. दु:खनाशका—असा भाव. १४. ताप+आकुल=संताप+पीडित. १५. ही परोक्षजनसंबोधनोक्ति आहे. १६. चंद्रवंशीं. १७. सखी. १८. ब्रह्मदेव. १९. बहुमुख अशा माझ्या दैवाच्या प्रतापानें. माझ्या दैवाचीं मुखें अनेक, पण ब्रह्मदेवाचीं मुखें कायतीं चारच, तेव्हां त्या चतुराननाच्यानें माझ्या बहुमुख दैवापुढें टिकाव न धरविल्यामुळें तो बिसरून गेला. २०. ब्रह्मदेवास. २१. 'नकोचि रडों, नको चिरडों' हा पंतांच्या शेंकडों ठरीव यमकांपैकीं एक होय.

जननि! उगी धीर धरीं, या [1]चिंतागिरिभरें नको चिरडों. ॥ ५४
सति! [2]भर आनंदाला जो देतो तोचि भर विलापाला. ।
[3]बलजलनिधिनें विधिनें श्रीराममुखींहि भरविला [4]पाला.' ॥ ५५
[5]कौरवपौरवधू बहु रडति म्हणति तें [6]कुकर्म परिसून, ।
'वृद्ध श्वशुर [7]च्यवला, न च्यवली गांजिलीहि परि [8]सून. ॥ ५६
बाई द्रौपदि! केली [9]आत्मश्रीचीच दुर्दशा कुरुंनी, ।
गुरुनीं न [10]दंडिलें कां? वारावें कां न दुर्जना दुरुनी? ॥ ५७
स्तवितील लोक तुज गुरु [11]सुकृतें व्यसनांत बाइ! तरलीला, ।
[12]गेया हे या वंशीं [13]त्वल्लीला असि नसे इतर लीला.' ॥ ५८
[14]स्वकृतानय आठवितां [15]धृति पावे नाश [16]अंधरायाची, ।
आंवळिली [17]आधिमहापाशें बांधूनि [18]कंधरा याची. ॥ ५९
[19]उद्विग्नचित्त होउनि आणवुनि क्षिप्र [20]सुस्वभावातें, ।
'पांडव वनासि कैसे गेले' ऐसें [21]पुसे [22]स्वभावातें. ॥ ६०
'[23]नृपें [24]मुख झांकुनि गेला, देता झाला जना न पाहूं [25]तें; ।
पाहत होता जातां [26]विपिनींशिं [27]वृकोदर स्वबाहूंतें. ॥ ६१
जो सर्वशिष्यवृंदीं द्रोणाला [28]परमतोषकर [29]सिकता, ।
त्याचा वनासि जातां पेरित होता पथांत कर [30]सिकता. ॥ ६२
नकुळ रजांहीं मळवुनि सर्वांगाला वनासि गेला हो! ।
सहदेवेंही जातां सारवुनि [31]मुखेंदु मलिन केला हो. ॥ ६३
केशांनीं मुख झांकुनि गेली रोदन करीत तव [32]सून, ।
द्रुपदें विलोकिली जी कन्या [33]देवव्रजासि [34]नवसून. ॥ ६४

---

१. चिंतारूप पर्वताच्या भारानें. २. उत्, अतिशय. ३. बलसागर जो विधि (दैव) त्यानें. ४.वृक्षांचीं पानें. ५. कौरवांच्या आणि पुरवासिजनांच्या स्त्रिया. ६. तें दुष्टकृत्य–द्रौपदीचें वस्त्राकर्षण व वनांत प्रेषण. ७. भ्रष्ट झाला. ८. पुत्राची स्त्री. ९. आपल्या राजलक्ष्मीची. १०. शासन केलें. ११. पुण्यानें. १२. गाण्यास योग्य अशी. १३. तुझी लीला, आचरण. १४. आपण केलेला अन्याय. १५. धैर्य. १६. धृतराष्ट्राची. १७. मानसिक चिंतेच्या जबरदस्त पाशानें. १८. मान. १९. शोकव्याकुल. २०. चांगला स्वभाव आहे ज्याचा अशा (विदुरातें). २१. अध्याय ८० श्लोक १–३ पहा. २२. स्वबंधूतें. २३. धर्मराजा. २४. हें विदुराचें धृतराष्ट्राला उत्तर आहे. २५. मुख. २६. वनास. २७. भीम. २८. आनंद देणारा. (अर्जुन.) २९. शिकणारा. ३०. वाळू. ३१. मुखचंद्र. ३२. द्रौपदी. ३३. देवसमुदायास. ३४. नवस करून.

[1]कुशदर्भपाणि भगवान् धौम्य [2]परे गात गात गेला हो !' ।
[3]क्षत्ता म्हणे, 'तुम्हां म्यां श्रुत तद्गमनप्रकार केला हो.' ॥ ६५
अंध म्हणे, 'गा! माझ्या चतुरा [4]चतुरास्यसुज्ञभावा! तें ।
रूप तसें [5]विविधें तिहीं कां केलें? स्पष्ट सांग [6]भावातें.' ॥ ६६
क्षत्ता म्हणे, '[7]युधिष्ठिर करिता झाला [8]स्वदृक्पथा [9]पिहितें, ।
यद्यपि भस्म करावे तव सुत चित्तीं सदा तथापि [10]हितें. ॥ ६७
घालीन गांठि सत्य स्वरिपूसीं संगरांत [11]बाहूनी, ।
समजावी भीम असें तळमळ करितां मनांत [12]बाहूंनीं. ॥ ६८
हा भाव अर्जुनाचा कीं शत्रूंसीं घडो समर, [13]सिकता ।
जेंवि अशा इषु सोडिन, माझी समरीं [14]हरासम [15]रसिकता. ॥ ६९
कोणीं न वोळखावें [16]हस्तिपुरीं आपणासि, हा नियम ।
करुनी, करिति रजांहीं लिंपोनि [17]स्वस्वरूपहानि [18]यम. ॥ ७०
[19]कृष्णेचा भाव असा; ज्यांहीं मज गांजिलें अतिद्वेषें, ।
त्यांच्या स्त्रिया समस्ता चवदाव्या वत्सरीं अशा वेषें, ॥ ७१
देउनि जलांजली स्वप्रियसुतबंधूंसि म्हणुनि 'हा!' रडत, ।
सोडोनि मोकळे [20]केंच येतील पथीं अशाचि आरडत. ॥ ७२
धौम्याभिप्रायहि हा जैं वरिजेतील कुरु [21]परेतत्वें ।
गातील पुढें [22]कुरुगुरु दर्भ धरुनियां करीं परे [23]तत्वें.' ॥ ७३
ऐसें विदुर वदे तों [24]देवर्षि त्यजुनियां नभा उतरे, ।
बोले सभेंत कीं, '[25]हा लोभी कविचाहि [26]हा न भाउ तरे; ॥ ७४
दुर्योधनापराधें भीमधनंजयबळें [27]महागर्व ।
हे कौरव चवदाव्या वर्षी मरतील निश्चयें सर्व.' ॥ ७५

---

१. कुश आणि दर्भ हातीं ज्याच्या तो. २. मृतकर्मांतील मंत्र. ३. विदुर. ४. ब्रह्मदेवाप्रमाणें जाणत्या बंधो. ५. नानाप्रकारचें. ६. अभिप्रायातें. ७. अ० ८० श्लो० १०-१२ पहा. ८. आपल्या नेत्रमार्गास. ९. आच्छादित. १०. धर्माच्या मनांत तुझें हित करावें असें असल्यामुळें त्यानें आपलें डोळे आच्छादित केले, न केले असते तर तुझे पुत्र दग्ध झाले असते. ११. बोलावून. १२. भुजांनीं. १३. वाळवेचे कण जसे परस्पर (अलग्न) भिन्न असतात तसे निरनिराळे बाण (इषु) समुदायानें शत्रूवर सोडीन. १४. शंकराप्रमाणें. १५. आवड, गोडी. १६. हस्तिनापुरांत. १७. आपल्या लावण्याचा लोप. १८. नकुलसहदेव. १९. गीति ७१-७२ यांचें युग्म आहे. २०. केश. २१. प्रेतपणानें. २२. कौरवांचे उपाध्याय. २३. खरोखर. २४. नारद. २५. अंधसुत. (दुर्योधन.) २६. अंध. (धृतराष्ट्र.) २७. ज्यांना मोठा गर्व झाला आहे असे (कौरव).

बोलोनि भविष्य असें भरला नारद मुनींद्र गगनींच. ।
द्रोणासि शरण गेले [1]राज्यनिवेदन करूनि मग नीच. ॥ ७६
शरणागतदुर्योधनभूपाला [2]गुरु म्हणे, 'अगा राजा ! ।
रक्षील कोण त्याला ? वद [3]दहनें व्यापिलें [4]अगारा ज्या. ॥ ७७
पांडव अवध्य [5]सुरसुत धार्मिक, माझे बहिश्चर [6]असु खरे, ।
तत्त्यागीं [7]महदसुख, प्राणत्यागीं नसे मज असुख रे ! ॥ ७८
आलां शरण मज तुम्हीं तुमचाही उचित होय [8]अत्याग, ।
[9]शरणागतारिच्याही [10]त्यागें घडतें जनासि [11]अत्याग. ॥ ७९
[12]मन्निधनार्थ द्रुपदें केला उत्पन्न तनय, तो मातें ।
धृष्टद्युम्न टपतसे ग्रासाया जेंवि राहु [13]सोमातें. ॥ ८०
[14]भगिनीप्रियार्थ समरीं होइल पांडवसहाय [15]मद्रिपु रे ! ।
काळापुढें किती मी ? [16]हरिशीं युद्धांत काय [17]अद्रि पुरे ? ॥ ८१
त्यासि जयश्री न त्यजि तसि, जशि ऐरावतासि [18]अभ्रमु रे ! ।
[19]यच्छरपवनें [20]समराजिरगगनीं [21]शत्रुकटकअभ्र मुरे. ॥ ८२
त्या अर्जुनासवें जें करणें समरांगणीं समागम तें, ।
मरणशताधिक संकट सत्य मज तदीय [22]पितृसमा गमतें. ॥ ८३
तुजकरितां मज आलें चवदाव्या वत्सरीं रणीं मरणें, ।
शाश्वत न तुम्हींहि, करा सत्वर सर्वहि असेल जें करणें.' ॥ ८४
अंध म्हणे, 'विदुरा ! [23]गुरुवचन खरें, पुत्र वदति तें न खरें, ।
[24]यां दुःसहें धनंजयशस्त्रें [25]हरिचीं गजां जशीं [26]नखरें. ॥ ८५
त्यांला वनवास न हो, सत्यव्रतरक्षणार्थ अथवा हो, ।
परि [27]पादचार न [28]विहितें, त्यांसि तयांचा सशस्त्र रथ वाहो.' ॥ ८६

---

१. राज्यार्पण. २. द्रोण. ३. अग्नीनें. ४. गृहास. ५. देवपुत्र. (देवांच्या अंशानें झालेले.) ६. प्राण. ७. मोठें (महत्) असुख (दुःख). ८. स्वीकार, त्याग न करणें. ९. शरण आलेल्या शत्रूच्या. १०. त्याग केल्यानें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ११. फार अपराध. १२. माझ्या वधासाठीं. १३. चंद्रातें. १४. द्रौपदीचें प्रिय करण्यासाठीं. १५. माझा वैरी. (धृष्टद्युम्न.) १६. इंद्राशीं. १७. पर्वत. हीं दोन्ही प्रश्नालंकाराचीं उदाहरणें आहेत. १८. ऐरावताची स्त्री. १९. ज्याच्या (अर्जुनाच्या) बाणांच्या वायूनें. २०. रणांगणरूप आकाशांत. २१. शत्रुसैन्यरूप मेघ. २२. त्याच्या (अर्जुनाच्या) पित्यासारखा मला. २३. द्रोणाचें भाषण. २४. या माझ्या मुलांना. (कौरवांना.) २५. सिंहाचीं. २६. नखें. २७. पायीं चालणें. २८. योग्य. (अध्याय ८० श्लोक ५२.)

गेले वनवासाला जेव्हां ते विष्णुचे सखे दास, ।
संजय असें पुसे त्या अंधास स्वाननें[1] सखेदास.[2] ॥ ८७
'राया! सुतविजयीं तुज व्हावा आनंद, खेद कां गमला? ।
धर्म बुडविला, हरिली श्री, चुकलें काय कार्य? सांग मला.' ॥ ८८
धृतराष्ट्र म्हणे, 'आतां कैंचा आनंद संजया! मातें ।
चिंतारजनीच्या[3] अनुभवितें मैंचित्तकंज[4] यामातें.[5] ॥ ८९
हृतमणिफणिवैर[6] बरें, बा गा! साहेल कोण वैरा या? ।
कळतचि कुकर्म केलें कुरुकुळ काळाननांत[7] वैराया.[8] ॥ ९०
विदुरोक्त हितहि, तनुजस्नेहैकपरें[9] न मानिलें कांहीं, ।
केली म्यांचि, न केली अक्षांहीं, बा! न हानि लेंकांहीं.' ॥ ९१
भक्तमयूरकरें[10] हें श्रीगुरुनें लिहिविलें सभापर्व, ।
कीं आर्यानंदाचें[11] रसिकांची नित्य हो[12] सभा पर्व. ॥[13] ९२

---

१. आपल्या मुखें. २. खेदयुक्त झालेल्या धृतराष्ट्राला. ३. चिंतारूप रात्रीच्या. ४. माझें चित्त हेंच कंज (कमल). ५. प्रहरातें. ६. हरण केला आहे मणी ज्याचा अशा सर्पाचा द्वेष. ७. काळमुखांत. ८. घालाया. ९. पुत्रप्रेमासक्तानें. १०.भगवद्भक्त मोरोपंत कवि याच्या हातानें. ११. आनंदाचें पर्व. १२. होवो. १३. शके १७२० त लिहिलेल्या सभापर्वाच्या एका प्रतींत पुढें दिलेलीं लेखकाचीं दोन पद्यें आढळतात. त्यांजवरून पंतांच्या कृतिविषयीं त्या वेळीं केवढी पूज्यबुद्धि जागृत होती हें दिसून येतें:—

'कृति मोरेश्वरकविकृत लिहुनि सभापर्व ठेविलें धामीं, ।
वाचावें रसिकांनीं कीं वाचावें तसेंच बहुधा मीं. ॥ १ ॥
लिहिलें हळू हळू म्यां गोड सभापर्व म्हणुनियां दुसरें, ।
याच्या श्रवणें रसिकां तुष्टि जशी तशि सुधेचिया न सरे.' ॥ २ ॥

THE MAHÂBHÂRATA

OF

MOROPANTA.

(THE GREAT MARÂTHÎ POET OF THE MAHÂRÂSHTRA.)

" A great poem is a fountain for ever overflowing with the waters of wisdom and delight."—SHELLEY.

3. VANAPARVA.

EDITED WITH

CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY

VÂMANA DÂJÎ OKA.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂM JÂVAJÎ

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRNAYA-SÂGARA" PRESS.

BOMBAY.

1894.

Price $1\frac{1}{2}$ *Rupees.*

(Registered under Act XXV of 1867.)

[All rights reserved by the publisher.]

महाराष्ट्रकविवर्यमोरोपंतकृत

महाभारत.

३. वनपर्व.

श्रीमन्मयूरकविची देते संतोष मानवां कविता, ।
असता जरि भूमीवरि सुरगुरु तरि तोहि मान वांकविता. ॥

हें

वामन दाजी ओक

यांनीं अनेक हस्तलिखित प्रतींवरून शुद्ध करून, अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन, परिशिष्टांसह तयार केलें,

आणि

मुंबईंत जावजी दादाजी यांच्यां "निर्णयसागर" छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१८९४.

किंमत १॥ रुपया.

महाराष्ट्र भाषेचें व कवितेचें

आस्थापूर्वक अध्ययन

करूं पाहणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

सप्रेम अर्पण करतों.

'काव्यसंग्रह'कार.

विषयानुक्रमणिका.

अध्याय.	विषय.	ग्रंथसंख्या.	पृष्ठसंख्या.
१	पांडववनवास, युधिष्ठिरकृत सूर्यप्रार्थना, स्थालीप्राप्ति, काम्यकवनप्रवेश, विदुरोपदेश, धृतराष्ट्रकृत विदुरनिर्भर्त्सन, विदुराचें पांडवांकडे गमन, धर्म व विदुर यांचें संभाषण, विदुराचें सांत्वन, धृतराष्ट्रानुताप, विदुरानयनार्थ संजयप्रेषण, विदुरानें परत न जावें असा पांडवांचा आग्रह, विदुराचें प्रत्यागमन, धृतराष्ट्राचें व विदुराचें संभाषण, दुर्योधनखेद, दुर्योधनशकुनिसंवाद, कर्णकृत दुर्योधनसांत्वन, व्यासागमन, व्यासोपदेश, धृतराष्ट्रव्याससंवाद, मैत्रेयदर्शन, मैत्रेयकृत बोध, दुर्योधनास मैत्रेयशाप, धृतराष्ट्राला विदुरमुखें भीमकृतकिर्मीरराक्षसवधनिवेदन.	९६	१–१४
२	पांडवसर्वस्वहरणवार्ताप्रस्फोट, यादवपांचालागमन, पांडवकृष्णसंवाद, द्रौपदीविलाप, कृष्णादिककृत द्रौपदीसांत्वन, धृष्टद्युम्नकृत कौरववधप्रतिज्ञा, कृष्णकथित शाल्ववधवृत्तांत, यदुपंचालांचें स्वस्थाननिवर्तन, प्रतिविंध्यादि भागिनेयांचें धृष्टद्युम्नासह गमन, नकुलसहदेवभार्यांचें स्वपितृगृहीं गमन, पांडवद्वैतवनप्रवेश, मार्कंडेयागमन, धर्मद्रौपदीसंवाद, धर्मभीमसंभाषण, युधिष्ठिरोपदेश, व्यासागमन, प्रतिश्रुतिप्राप्ति, अस्त्रप्राप्त्यर्थ अर्जुनाचें इंद्रकीलपर्वतीं गमन, अर्जुनतपश्चर्या, इंद्रदर्शन, तदुपदेश, इंद्रवरप्राप्ति, शंकरोपासना, इंद्रांतर्धान	११६	१४–२७
३	अस्त्रप्राप्तिनिमित्तक अर्जुनतपस्या, तपस्विजनभीति, किरातरूपी शंकराचें आगमन, वराहाकृति मूकदानवागमन, मूकवध, तन्निमित्तक किरातार्जुन-		

अध्याय.	विषय.	ग्रंथसंख्या.	पृष्ठसंख्या.
	कलह, किरातार्जुनयुद्ध, अर्जुनकृत शंकरस्तव, पाशुपतास्त्रलाभ, लोकपालांपासून अर्जुनाला दिव्यास्त्रप्राप्ति, इंद्रप्रेषितमातल्यागमन, अर्जुनस्वर्गगमन, अर्जुनाचा इंद्रार्धासनोपवेश, चित्रसेनापाशीं अर्जुनाचें नृत्यादिशिक्षण, चित्रसेनकृत उर्वशीप्रेरणा, अर्जुनोर्वशीसंवाद, अर्जुनाला उर्वशीचा क्लीबत्वप्रापक शाप, इंद्रकृत अर्जुनसांत्वन, लोमेशाला इंद्रमुखें अर्जुनवृत्तांतकथन, व्यासमुखें धृतराष्ट्राला अर्जुनोत्कर्षकथानिरूपण, धृतराष्ट्रसंजयसंवाद	८७	२७–३८
४	बृहदश्वयुधिष्ठिरसंवाद, नलाख्यानारंभ, भीमाला दमनाचा संतानप्रापक वर, दमयंतीरूपवर्णन, दमयंतीस्वयंवरोपक्रम, नलकृत हंसप्रेषण, भैमीप्रमदवनप्रवेश, तिची हंसग्रहणेच्छा, हंसकृत नलवर्णन, दमयंतीप्रार्थना (हंसाला), इंद्रप्रमुख लोकपालागमन, नलाचें देवदौत्य, नलाचा दमयंतीपाशीं संवाद, देवांपाशीं अकृतकार्य नलाचें प्रत्यागमन, भैमीकृत लोकपालांची प्रार्थना, नलदमयंतीविवाह, लोकपालांची निराशा, नलाला पुत्रकन्यालाभ, इंद्रादिलोकपालांचें प्रत्यागमन, इंद्रकलिसंभाषण, कलिद्वापरसंवाद, नलाच्या ठायीं कलिप्रवेश, नलमतिभ्रंश, 'द्यूत कर' असा कलीचा पुष्करास उपदेश, द्यूतांत नलाचा पराजय, कुंडिनपुराला अपत्यांचें प्रेषण, सदार नलाचें वनप्रस्थान, वनभ्रमण, स्वस्त्रीविषयक नलोक्ति, रात्रीं निद्रित दमयंतीपरित्याग, दमयंतीपरिदेवन, नलाचें वनभ्रमण, कर्कोटकनागदर्शन, नागाचें दावानलमोचन, कर्कोटककृत नलदंश, नलाचें सर्पदंशानें रूपांतर, कर्कोटककृत नलोपदेश, नलाचा ऋतुपर्णराजगृहीं वास, नलाचें		

अध्याय.	विषय.	ग्रंथसंख्या.	पृष्ठसंख्या.
	बाहुकनामधारण, दमयंतीची जागृति, दमयंतीचें अजगरकृत भक्षण, व्याधदर्शनलाभ, व्याधहस्तें अजगरापासून तिचें मोचन, तिचें अहोरात्रत्रयवनभ्रमण, दमयंतीसार्थवाहसंवाद, तिचा चेदिपुर राजगृहप्रवेश, सुदेवब्राह्मणासह दमयंतीचा संवाद, दमयंतीचा स्वपितृगृहप्रवेश, भीमप्रेषित नलान्वेषी पर्णादविप्राचें दर्शन, नलपर्णादसंवाद, दमयंतीपुनःस्वयंवर, नलयोजितरथांत ऋतुपर्णाचें विदर्भनगरप्रस्थान, मार्गी ऋतुपर्णनलसंवाद, बिभीतकद्रुमपत्रगणना, रथाचा तीव्र वेग, नलास अक्षहृदयलाभ, नलासह ऋतुपर्णाचा विदर्भनगरप्रवेश, केशिनीबाहुकसंवाद, कन्यापुत्रावलोकनानें नलाचा शोक, नलदमयंतीसंभाषण, आकाशवाणी, ऋतुपर्णाचें स्वदेशगमन, पुष्कराचा पराभव, नलाला राज्यलाभ, बृहदश्वप्रयाण	३१३	३८–७३
६	अर्जुनानागमननिमित्तक युधिष्ठिरशोक, धौम्यधर्मसंवाद, लोमशागमन, अर्जुनसंदेशकथन, पांडवांचें तीर्थयात्रार्थगमन, प्रभासतीर्थागमन, गंधमादनप्रवेश, भीमादिकांशीं युधिष्ठिराचें भाषण, मार्गाची दुर्गमता, द्रौपदीची मार्गक्रमणाक्षमता, मार्गांत वातवृष्ट्यादि प्रत्यूह व तज्जन्य क्लेश, घटोत्कचाचें आगमन, गंधमादनवास, नारायणाश्रमपद, सौगंधिककमलाहरणार्थ भीमाचें गमन, मारुतिदर्शन, हनुमद्भीमसंवाद, भीमगर्वपरिहार, सौगंधिककमलवनदर्शन, भीममार्गप्रतिबंध, भीमाचें कमलवनरक्षक कुबेरानुगामी राक्षसांशीं संभाषण आणि युद्ध, त्यांचें मरण, धर्मोत्पातदर्शन, भीमाविषयीं धर्माची चिंता, युधि-		

अध्याय.	विषय.	ग्रंथसंख्या.	पृष्ठसंख्या.
	ष्ठिरद्रौपदीसंवाद, भीमागमन, धर्मभीमसंवाद, आकाशवाणी, जटासुरवध, गंधमादनगमन, आर्ष्टिषेणमुनिदर्शन, पांडवकुबेरसमागम, मणिमत्कथावर्णन, कुबेराचें स्वस्थानीं गमन, धर्मास इंद्रदर्शनलाभ, इंद्रकृत धर्मसांत्वन, स्वर्गाहून अर्जुनाचें आगमन, अर्जुनकृत किरातयुद्ध, अस्त्रप्राप्ति, निवातकवचयुद्ध, कालकंजवध इत्यादिकाचें वर्णन, अर्जुनाप्रत युधिष्ठिरोक्ति	१२७	७४-९२
६	पांडवांचा यामुनपर्वतावर वास, अजगराकडून भीमाचें ग्रहण, अजगरस्ववृत्तकथन, युधिष्ठिरभीमदर्शन, अजगराचे प्रश्न आणि त्यांवर धर्माचीं उत्तरें (अजगरयुधिष्ठिरसंवाद), नहुषाची अगस्त्यशापापासून मुक्ति आणि स्वर्गयात्रा, अजगरापासून भीमाचें मोचन, पांडवांचा काम्यकवनप्रवेश, सत्यभामेसह कृष्णाचें आगमन, कृष्णयुधिष्ठिरसंवाद, श्रीकृष्ण व द्रौपदी यांची भेट व त्यांचें संभाषण, नारदमार्कंडेयांचें आगमन, ब्राह्मणमाहात्म्य, क्षत्रियमाहात्म्य, स्कंदव्याधादिक कथाचें निरूपण, सत्यभामाद्रौपदीसंवाद, सस्त्रीक श्रीकृष्णाचें द्वारकागमन	७०	९२-१०९
७	पांडवाभ्युदयजन्य धृतराष्ट्रचिंता, दुर्योधनास शकुनीचा उपदेश, घोषयात्रानिमित्तानें पांडवांस छळण्यास जावें अशी कर्णाची दुर्योधनास मसलत, धृतराष्ट्रानुमति, धृतराष्ट्राज्ञेनें दुर्योधनादिकाचें घोषयात्रानिमित्त प्रस्थान, घोषयात्रा झाल्यावर दुर्योधनाची जलक्रीडा, चित्रसेनगंधर्वाचा सस्त्रीक जलविहार, तत्कृतदुर्योधननिर्भर्त्सन, गंधर्वकौरवयुद्ध, कर्णपलायन, चित्रसेनकृत दुर्योधनग्रहण, दुर्योधनमोचनाविषयीं युधिष्ठिराची आज्ञा, पांडवगंधर्वयुद्ध,		

अध्याय.	विषय.	ग्रंथसंख्या.	पृष्ठसंख्या.
	चित्रसेनार्जुनयुद्ध, दुर्योधनमोक्ष, युधिष्ठिरार्जुनगंधर्वसंवाद, चित्रसेनाची धर्माला प्रणति आणि स्वर्गयात्रा, युधिष्ठिरकृत दुर्योधनसत्कार, कर्णदुर्योधनसमागम, कर्णाला दुर्योधनाचें स्वपराभवकथन, आणि पांडवकृतस्वमोचननिरूपण, दुर्योधनप्रायोपवेशनिश्चय, दुर्योधनाला कर्णाचा सांत्वनपर आणि प्रोत्साहनपर उपदेश, शकुनीचा दुर्योधनास बोध, पातालवासिदानवांचा कृत्याहस्तें दुर्योधनास पाताळीं नेऊन बोध, दानवकृत दुर्योधनाचें आश्वासन आणि पूर्वस्थानप्रेषण, कर्णदुर्योधनसमागम, अर्जुनवधविषयक कर्णप्रतिज्ञा, दुर्योधनचित्तसमाधान, भीष्मकृत दुर्योधनाचा अधिक्षेप, कर्णदिग्विजययान, दिग्विजय करून आणि धन घेऊन कर्णाचें परत येणें, दुर्योधनाचें वैष्णवसत्र (पौंडरीकयज्ञ), दुर्योधनाच्या राजसूययज्ञाविषयीं कर्णाची प्रतिज्ञा	१२०	१०९–१२०
८	पांडवांचा काम्यकवनप्रवेश, धर्मव्याससंवाद, व्यासोक्त मुद्गलचरित्र आणि सत्वगुणप्रशंसा, पांडवांकडे दुर्योधनाच्या प्रेरणेनें शिष्यायुतयुत दुर्वासनामक मुनीचें आगमन, मुनिजनभोजनेच्छा, द्रौपदीकृत कृष्णस्मरणस्तव, श्रीकृष्णागमन, कृष्णद्रौपदीसंवाद, सशिष्य दुर्वासास भोजननिमित्त सहदेवमुखें आव्हान, गुरुशिष्यीककर्तव्यताव्यामोह, दुर्वासाचें भय, साधूंचा छळ न करण्याचा त्याचा दृढ निश्चय, स्वकृतीचा पश्चात्ताप, कृष्णधर्मांचें संभाषण, कृष्णाचें द्वारकेस प्रयाण, दुर्वासाचें शिष्यांसह पलायन, धर्मकृत द्रौपदीची प्रशंसा....	९९	१२०–१२८
९	पांडवमृगयार्थगमन, पांडवरहिताश्रमीं जयद्रथप्रेषित कोटिकास्याचें आगमन, द्रौपदीला कोटिकास्याचा		

अध्याय.	विषय.	ग्रंथसंख्या.	पृष्ठसंख्या.
	प्रश्न, द्रौपदीजयद्रथसंवाद, जयद्रथकृत द्रौपदीप्रमाथ, जयद्रथास धौम्याचा बोध, द्रौपदीहरण ऐकून पांडवांचें जयद्रथाच्या पाठीस लागणें, जयद्रथाचें पलायन, अर्जुनजयद्रथसंवाद, त्याचें धर्मास शरण येणें, जयद्रथमोक्ष, जयद्रथकृत शिवाराधन, वरप्राप्ति, जयद्रथाचें स्वगृहागमन	७६	१२८–१३८
१०	रामोपाख्यान—रामरावणजन्मवर्णन, रावणादिकांस वरप्राप्ति, रावणकृत कुबेरैश्वर्यापहार, वानरांची उत्पत्ति, मंथरोत्पत्तिहेतु, विश्वामित्रागमन, गौतमसतीचा उद्धार, यज्ञविघ्नकृत् राक्षसांचा संहार, शिवचापभंग, सीतास्वयंवर, रामाचें अयोध्येस परत येणें, रामयौवराज्याभिषेक, मंथराकृत कैकयीबुद्धिभेद, कैकयीचें दोन वर मागणें, रामवनाभिगमन, भरतकृत कैकयीनिंदा, कौसल्याभरतसंवाद, रामपादुकासेवन, भरताचा नंदिग्रामवास	१०२	१३८–१५०
११	रामाचा चित्रकूटपर्वतावर वास, शूर्पणखागमन, तत्कर्णनासिकाच्छेद, ससैन्य खरराक्षसवध, शूर्पणखेचें रावणाला स्ववृत्तांतकथन, रावणक्रोधाविष्कार, रावणाचें गोकर्णास जाणें, रावणकृत स्ववृत्तकथन, मारीचाचा रावणास बोध, मारीचकनकमृगरूपधारण, मारीचवध, यतिवेषधारी रावणाचें आगमन, सीताहरण, जटायुदर्शन, गमनमार्गनिरोध, जटायुरावणयुद्ध, रावणकृत जटायुपक्षच्छेद, रामलक्ष्मणसमागम, सीताविरहाकुल रामाचा कारुण्योत्कट शोक, सीतान्वेषणार्थ रामाचें भ्रमण, जटायुकथित सीतापहारवृत्तांत, कबंधहनन, त्याचें शापमोचन आणि पूर्वरूप (विश्वावसुगंधर्वरूप) धारण, त्याचा सुग्रीव-		

अध्याय.	विषय.	ग्रंथसंख्या.	पृष्ठसंख्या.
	सख्यात्मक रामास बोध, शिखिसाक्षिकसुग्रीवसख्यलाभ, सप्ततालीभेद, वालिहनन, सुग्रीवाचें वानराधिपत्य, रुमाप्राप्ति, रावणकृत सीतेचा छळ, सीतान्वेषणार्थ वानरप्रेषण, मारुतीचें लंकेंत जाणें, सीतादर्शन, लंकेची होळी, अक्षाद्यसुतहनन, चूडामणि घेऊन मारुतीचें परत येणें, मारुतिरामसमागम, त्यांचें परस्पर संभाषण, मारुतिकृत उपकाराचा धन्यवाद, समस्तयूथपतिप्रत्यागमन	१३३	१५०–१६८
१२	रावणवधार्थ रामप्रयाण, सागरकृत सेतुबंधनिरूपण, बिभीषणागमन, नलकृतसेतुबंधन, सेतुबंधविषयक सालंकार वर्णन, लंकाप्रवेश, अंगददौत्य, रावणांगदसंभाषण, रामरावणयुद्ध, कुंभकर्णवध, लक्ष्मणकृत् इंद्रजिद्वध, रावणवध, रावणदारविलाप, बिभीषणलंकाराज्याभिषेक, सीतामोचन, रावणगृहवासनिमित्तक सीतेचा अनंगीकार, आणि रामाची अप्रियोक्ति, रामाचें आत्मगतभाषण, देववाणी, सीतेची स्वदोषपरिहारक शपथ, सीतादोषनिरास, देवांचा व दशरथाचा रामाला सीताग्रहणाग्रहपर उपदेश, गुरुदेववचनासारी रामाचें वर्तन, त्रिजटा आणि अविंध्य यांच्या उपकाराचें स्मरण, सीताकृत मारुतिस्तव, सीतेचा लक्ष्मणरचित अग्नींत प्रवेश, इंद्रप्रसादानें अमृतप्रोक्षणद्वारा मृतवानरांचें पुनरुज्जीवन, सीतेचें मारुतीला वरदान, पुष्पकारोहण, सुग्रीवादिक वानरांसह रामाचें अयोध्येस प्रत्यागमन, अंगदास यौवराज्याभिषेक, तारादिकपिदारांसह प्रयाण, नंदिग्रामीं भरताची भेट, त्याचें सांत्वन, पौरजनमहोत्सव, रामास राज्याभिषेक, मार्कंडेयकृत युधिष्ठिराश्वासन	८१६	१६८–१९३
१३	सावित्र्याख्यान—नारदाश्वपतिसंवाद, सावित्रीवर-		

अध्याय.	विषय.	ग्रंथसंख्या.	पृष्ठसंख्या.
	निश्चय, सत्यवत्सावित्रीपरिणय, सावित्रीसह सत्यवानाचा वनप्रवेश, सत्यवानाचा अंतसमय, त्याची शिरोवेदना, यमागमन, सावित्रीचें उपोषणव्रत, सावित्रीयमसंवाद, यमापासून वरपंचकप्राप्ति, सत्यवत्पुनरुज्जीवन, सावित्री व सत्यवान् यांचें संभाषण आणि आश्रमागमन, धौम्यादि मुनिजनाचें उपदेशपर भाषण, मुनीचें आणि सत्यवानाचें संभाषण, द्युमत्सेनराज्यप्राप्ति, सावित्रीकृत उभयकुलोद्धार	१०८	१९४–२१
१४	कुंडलाहरणोपाख्यान, सूर्यकर्णसंवाद, सूर्याचा कर्णास उपदेश, कर्णाचें उत्तर, इंद्रापासून वासवी शक्ति मागून घेण्याचा कर्णाचा निश्चय, कर्णाची सूर्योपासना, स्वस्वप्नवृत्तकथन, विप्ररूपी इंद्राचें कर्णाप्रत आगमन, इंद्राची याचना, कर्णाची विज्ञापना आणि उदारता, स्वहस्तें सहजकवचकुंडलकर्तन, इंद्राला कवचकुंडलदान, शक्राची प्रसन्नता, कर्णाला सुरम्यवर्णलाभ, कर्णयशःप्रसिद्धि, दातृत्वव्रतानें कर्णाचा उद्धार	३९	२१२–१
१५	आरणेयोपाख्यान, विप्राच्या अरणीचें हरण, अरणिहारकमृगान्वेषणार्थ पांडवांचें गमन, हरिणाची अप्राप्ति, वटवृक्षछायेखालीं विश्रांति, उदकहरणार्थ नकुलाचें सरोवरतीरीं गमन, सरोवरप्रवेश, यक्षप्रश्न, नकुलादि पांडवांचें प्रश्नोत्तर न दिल्यामुळें पतन, युधिष्ठिराचा बंधुवियोगनिमित्तक करुण विलाप, युधिष्ठिरयक्षसंवाद, यक्षाची प्रसन्नता, यक्षरूपी यमधर्माचा स्वरूपाविष्कार, नकुलादि पांडवांचें पुनरुज्जीवन, यमधर्मापासून धर्माला वरत्रयप्राप्ति, ब्राह्मणाला अरणिपुनर्लाभ, विप्रास पांडवांचा प्रणाम उपसंहार.	४६	२१८–२
	एकंदर ग्रंथसंख्या.	१७९२	

मोरोपंतकृत महाभारत.

वनपर्व.

अध्याय पहिला.

(गीतिवृत्त.)

[1]डमरुधरप्रियगुण[2]सख पांडव गेले [3]वनासि [4]सांगन, तें ।
यश परिसा, बुध हो! म्यां कथिजेल [5]भवद्वरेंचि [6]सांग [7]नतें. ॥ १
जाय वनाशि [8]युधिष्ठिरनृप, [9]सहवासार्थि[10]भूमिसुरसहित, ।
ज्याला न [11]विप्रसंगाहुनि वाटे [12]स्वर्गिसेव्य [13]सुरस [14]हितें. ॥ २
[15]ब्राह्मणकुळवृत्त्यर्थ प्रार्थी [16]कौंतेय [17]भानुला [18]भावें, ।
कीं [19]त्यां प्रभुप्रसादें [20]प्रणतें मोक्षादि इष्ट लाभावें. ॥ ३
जशि [21]नंदिनी [22]वसिष्ठा, दे धर्मा [23]लोकबांधव [24]स्थाली; ।

---

१. डमरु (वाद्यविशेष–हुडुक) यातें धरणारा (शिव) त्या शिवास प्रिय ज्याचे गुण असा श्रीकृष्ण त्याचे सखे पांडव. मोरोपंतकृत महाभारताच्या प्रत्येक पर्वाच्या पहिल्या गीतीचें आद्याक्षर घेतलें असतां 'श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति' असें एक संस्कृत वाक्य उत्पन्न होतें असें पूर्वीं लिहिलें आहे. यांत 'ड' हें तिसरें अक्षर आहे, तेव्हां तिसऱ्या पर्वाच्या (वनपर्वाच्या) आरंभीं तेंच अक्षर साधावें म्हणून 'डमरुधरप्रियगुणसख' असें लांब सामासिक पद योजिलें आहे. २. 'सखि'शब्दाला तत्पुरुष-समासाच्या अंतीं 'राजाहःसखिभ्यष्टच्' (पाणिनि–५-४-९१) या सूत्रानें 'सख' असा आदेश होतो. ३. द्यूतांत हरल्यामुळें धर्मराज बंधु व पत्नी यांच्यासह बारा वर्षेंपर्यंत वनवास करण्यास हस्तिनापुरांतून वर्धमानपुरास जाण्याचा एक दरवाजा होता त्या दरवाजानें गेला, आणि प्रथम द्वैतवनांत राहिला. (वनपर्व–अध्याय १ श्लोक १०.) ४. स्त्रीसहित. (अंगना=स्त्री.) ५. तुमच्या वरानें. ६. संपूर्ण. ७. नम्रें. ८. धर्मराज. (युधि–युद्धांत, स्थिर–अचल; 'गवियुधिभ्यां स्थिरः,' पाणिनि–८–३–९५.) या सूत्रानें गविष्ठिर आणि युधिष्ठिर अशीं रूपें होतात. हीं सप्तम्यंत अलुक्समासाचीं उदाहरणें होत). ९. समागम इच्छिणारे. १०. ब्राह्मणांसहित. (भूमिसुर=ब्राह्मण.) ११. ब्राह्मणसमागमापेक्षां. १२. स्वर्गी (देव) त्यांनीं सेवण्यास योग्य. १३. उत्तम रस, अमृत. १४. कल्याणप्रद. १५. विप्रसमुदायाच्या उपजीविकेसाठीं. (वृत्ति=उपजीविका.) १६. कुंतीपुत्र. (धर्मराज.) १७. सूर्याला. १८. भक्तीनें. १९. त्या सूर्याच्या (प्रभूच्या) कृपेनें. २०. नम्र झालेल्यानें. २१. कामधेनूची कन्या. २२. वसिष्ठाच्या आश्रमांत नंदिनी असल्यामुळें त्याला आश्रमधर्म चालविण्यास आणि अतिथिसत्कार करण्यास अडचण पडत नसे, इष्ट पदार्थ तिजपासून पाहिजे तेव्हां मिळत असे, या पुराणप्रसिद्ध कथेकडे येथें लक्ष्य आहे. २३. सूर्य. २४. पाकपात्र, अन्न शिजविण्याचें भांडें.

[1]ती चिंता हरि, जैशी शुद्ध [2]ब्रह्मज्ञता [3]अवस्थाली; ॥ ४
धर्माश्रितांसि [4]रक्षी श्रीहरिची जेंवि सर्वथा [5]लीला, ।
'हे' म्हणति '[6]अन्नपूर्णा' ते पांडव, विप्र, सर्व [7]थालीला. ॥ ५
अमृतरसातें हांसति ते ते सर्वहि पदार्थ, ती जे [8]वी; ।
जोंवरि [9]चतुर्विधान्नें प्रसवे तोंवरि न [10]पार्षती जेवी. ॥ ६
सब्राह्मणगण पांडव बसले जाऊनि [11]काम्यकवनांत; ।
[12]ग्राम्यालाप त्यागुनि जेंवि सुमतिरसिक [13]काम्यकवनांत. ॥ ७
धृतराष्ट्र स्वहित पुसे, त्याशि म्हणे विदुर, 'खेद कां ? टाकीं ।
या खळसुताशिं, [14]करिता हा केवळ हृदयभेद कांटा कीं. ॥ ८
अद्यापि तरी [15]राया ! हृदय तुझें पांडवांसि [16]आपंगू, ।
ते [17]सुगति सहाय बरे तुज [18]भवमार्गांत, काय [19]हा [20]पंगू ?' ॥ ९
अंध म्हणे, 'रे विदुरा ! खोटा [21]हितशत्रु तूं, न भाउ खरा; ।
न सुसंगतिगुण लागे दुष्टा, कीं [22]वृष्टिगुण [23]नभा [24]उखरा. ॥ १०

---

१. ती स्थाली प्राप्त झाल्यामुळें धर्मास विप्रसत्कार करणें फार सोपें झालें. सूर्य धर्मास प्रसन्न होऊन म्हणाला, 'या स्थालींतून चतुर्विध अन्नें यथेच्छ उत्पन्न होतील, या अन्नांनीं जितकें ब्राह्मणभोजन कर्तव्य असेल तितकें त्वां यथेच्छ करावें, पांचाली भोजन करण्यापूर्वी हीं अन्नें स्थालींतून उत्पन्न होतील पण तिचें भोजन झाल्यावर व्हावयाचीं नाहींत.' २. ब्रह्मज्ञान असणें ही स्थिति. ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्यानें अवस्थात्रयाचें निर्मूलन होतें, या समजुतीस अनुसरून हें वर्णन आहे. ३. जागृति स्वप्न आणि सुषुप्ति ह्या तीन अवस्थांची पंक्ति (आली). ४. 'रक्षी' याचा कर्ता 'स्थाली' अध्याहृत आहे. ही धर्माचे आश्रयास जे असत त्यांचें रक्षण करी. ५. क्रीडा. ६. पार्वती, देवी दुर्गा. (अन्नानें भरलेली, अन्न पुरविणारी देवी.) ७. थाली हा 'स्थाली'शब्दाचा अपभ्रंश आहे. संस्कृत शब्द मराठींत येतांना आद्य 'स्' व्यंजनाचा लोप होतो, जसें:—स्थूल=थोर, स्तन—थान, स्खलन—खळणें, इत्यादि. ८. उत्पन्न करी, प्रसवे. ९. चतुर्विध (चार प्रकारचीं) अन्नें:—भोज्य (ओदनादि—भात वगैरे), पेय (दुग्धादि), चोष्य (पक्वाम्रफलादि), आणि लेह्य (क्षिप्रादि खीर इत्यादि). १०. पार्षताची (द्रुपदाची) कन्या. (द्रौपदी.) ११. द्वैतवनांत कांहीं दिवस राहिल्या-वर पांडव सरस्वतीनदीच्या तीरीं असणाऱ्या अद्वैतवनांत (काम्यकवनांत) सर्व ब्राह्मणसमुदायासह गेले. येथेंच धर्मास सूर्यापासून स्थाली प्राप्त झाली. १२. रिकाम्या गोष्टी. १३. सुंदर कवितेंत. १४. हृदयभेद करणारा. १५. धृतराष्ट्रा. १६. आवरो, सांभाळो, प्रेमपूर्वक जवळ बाळगून रक्षण करो. १७. ज्यांपासून उत्तम गति प्राप्त होते असे. १८. संसाररूप वाटेंत. १९. हा खळ सुत दुर्योधन. २०. पांगळा. २१. बाह्यतः हित दाखवून आंतून अहित करणारा, (दुसऱ्याच्या) हिताचा वैरी. २२. वृष्टिगुण नभा लागे, उखरा न लागे—असा अन्वय. वृष्टि करण्याचा गुण नभांत असतो, पण उखर (कमपाण्याच्या) जमिनींत नसतो. २३. आकाशास. २४. उखर (ऊषर), खारे मातीचें स्थळ, जेथें शेत चांगलें पिकत नाहीं अशी माळवट डोंगरवट जमीन. यांत पाणी फार कमी असतें.

[१]औरस पुत्र प्रौढ ज्येष्ठ [२]त्यागार्ह काय हा [३]निखळ? ।
कळलें स्पष्ट मला कीं करितो चित्तीं शिरोनि हानि [४]खळ. ॥ ११
[५]आकारेंचि [६]परेंगित कळतें, बोलोनि काय हो! कळतें? ।
[७]असती [८]सुसांत्विताही त्यजिती, जें [९]तत्प्रियोक्त पोकळ तें. ॥ १२
जिकडे असे मन तुझें, आश्रय तुज युक्त तोचि, जा तिकडे.' ।
[१०]हंसी हंस, बकीं बक मिसळे, जन ओढतो स्वजातिकडे. ॥ १३
[११]दशकंधरें **बि**भीषणसा तो अपमानिला [१२]कवि [१३]क्षत्ता. ।
तत्ताप किति वदावा? बसल्या हृदयीं [१४]दुरुक्ति त्या [१५]लत्ता. ॥ १४
रामाकडे **बि**भीषण, गेला [१६]धर्माकडे तसाच [१२]कवी, ।
शास्त्राभ्यास खरा [१७]गुरु समयीं रक्षी, न मानसा [१८]चकवी. ॥ १५
दूरुनि **वि**दुर विलोकुनि **ध**र्म म्हणे, 'दृष्टि निववली [१९]वेढिलें, ।
[२०]कुरुकुळकल्याणचि हें वरि विधिनें लोकरीतिनें [२१]मढिलें. ॥ १६
जे [२२]न्यायामृत टाकुनि दाटुनि [२३]अन्यायमद्य [२४]कुनर [२५]पिते ।
जाणों करणार हरण [२६]शस्त्रांचें द्यूत करुनि पुनरपि [२७]ते.' ॥ १७
धर्म म्हणे [२८]त्यांसि, 'पित्या! टाकुनि आलां किमर्थ अंधातें? ।
जें [२९]स्वीकृत [३०]यष्टित्व त्यजिलें त्वां केंवि [३१]सत्यसंधा! तें?' ॥ १८

---

१. सजातीय स्त्रीशीं विवाह करून तिच्या ठायीं स्ववीर्यापासून झालेला. २. टाकण्यास योग्य. ३. निखालस, केवळ. ४. दुष्ट. ५. भय, हर्ष, क्रोध इत्यादिकांचे ज्ञापक जे शरीरावर कंप हास्य इत्यादि भाव होतात त्या प्रत्येकास आकार असें म्हणतात. 'आकारैरिंगितैर्गत्या चेष्टया भाषणेन च । नेत्रवक्त्रविकाराभ्यां ज्ञायतेंऽतर्गतं मनः ॥' या सुभाषितास अनुसरून येथें थोडेंसें वर्णन आहे. हाच अर्थ आदिपर्व-अ० ३० गीति ४९ या स्थलीं आढळतो. ही गीति सुभाषितरूप आहे. ६. दुसऱ्याचें मनोगत. ७. व्यभिचारिणी. ८. उत्तमप्रकारें जिचें सांत्वन केलें आहे अशी, प्रेमपूर्वक समाधान केलेली अशी सुद्धां जारिणी स्त्री; सुसांत्विताही असती त्यजिती जें तत्प्रियोक्त तें पोकळ—असा अन्वय. हाच दृष्टांत मूलांत दिलेला आहे. ९. त्याचें प्रियभाषण. १०. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ११. दश (दहा) आहे कंधरा (कंठ, मान) ज्याला तो. (रावण.) १२. ज्ञाता. १३. विदुर. १४. दुर्भाषणें. १५. लाथा. १६. धर्म काम्यकवनांत असतां विदुर त्याजकडे आला. १७. खरा गुरु शास्त्राभ्यास, (तो) समयीं रक्षी, मानसा न चकवी—असा अन्वय. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १८. भुलवी. १९. वडिलानें. (विदुरानें.) २०. कौरववंशाचें विदुर हें कल्याण. २१. मढविलें. २२. नीतिरूप अमृत. २३. अन्यायरूप मद्य. २४. दुष्ट कौरव शकुनि इत्यादि. २५. पिणारे. २६. गांडीवादिक युद्धाच्या आयुधांचें. (अध्याय ५.) २७. कौरव. २८. विदुरास. २९. अंध धृतराष्ट्राला काठी-प्रमाणें आधार देण्याचें पत्करलेलें काम. ३०. काठीपण. ३१. सत्य प्रतिज्ञा (संधा) ज्याची अशा.

विदुर म्हणे, 'बा ! न रुचे जेंवि कुमारीस पळहि पति [2]पिकला, ।
तेंवि नृपतिमतिला हा क्षत्ता न रुचे, सुनीति जरि शिकला. ॥ १९
घालविलें मज [3]रायें मानुनिया [4]मृदुदितें हितें [5]अहितें, ।
म्हणुनि तुजकडे आलों. [6]कोणि [7]उपासील कोपल्या [8]अहितें ? ॥ २०
प्रेमें [9]काककुळासचि [10]संतर्पायासि [11]आम्र पिकला जो ।
त्याच्या गळां पडाया साहुनि अपमान कां न [12]पिकें [13]लाजो ?' ॥ २१
धर्म विदुराशि विनवी [14]घर्मदवार्ता [15]शिखीस [16]घन जेंवी, ।
प्रार्थुनि म्हणे, 'पित्या ! हो स्वस्थ, स्थिर करुनियां स्वमन [17]जेवीं.'॥२२
राहुनि समीप शिकवी धर्माला त्या [18]महर्षिसुत रीती ।
[19]विपदर्णवांत होउनि नौका [20]ज्यां [21]स्वाश्रितांसि [22]उतरीती. ॥ २३
धृतराष्ट्र [23]म्हणे, 'चुकलों, विदुर न तो दवडिला [24]कुशळविसर, ।
करितों [25]तळमळ [26]गतधन जनसा, न पडेचि एक पळ विसर. ॥ २४
भलतें वदलों [27]भ्रात्या, वदतो जैसें अबंधु [28]अभ्रात्या, ।
पाहुनि होतील सुखी पांडवचातकमयूर [29]अभ्रा त्या.' ॥ २५
[30]परवृद्धि नसावी हा भाव प्रकटूनि [31]बोधें [32]मळवीला. ।
[33]रडला, पडला मूर्छित, तळमळला, विदुरविरह [34]कळवीला. ॥ २६
नृप संजयासि धाडी भ्रात्या विदुरासि शीघ्र आणाया ।

---

१. हाच दृष्टांत मूळांत आढळतो. (अध्याय ५.) २. म्हातारा, ज्याचे केंस पिकले आहेत असा. ३. धृतराष्ट्रानें. ४. माझीं भाषणें. ५. अकल्याण करणारीं अशीं. ६. हा चरण सुभाषितरूप आहे. ७. सेवील, आराधील. ८. सर्पांतें. ९. कावळ्यांच्या समूहाला. १०. तृप्त करायासि, पोसावयास. ११. आंब्याचा वृक्ष. १२. कोकिळ. १३. ही गीति सुभाषितरूप आहे. १४. घर्मांतील (ग्रीष्मांतील) वणव्यानें पीडित जो त्याला. १५. मोरास. १६. मेघ. १७. भोजन करीं. १८. कृष्ण-द्वैपायन व्यासापासून विचित्रवीर्याच्या स्त्रियांच्या दासीच्या ठायीं झालेला पुत्र, व्यासमुनिपुत्र. (विदुर.) १९. आपत्तिरूप समुद्रांत. २०. ज्या रीती. २१. आपल्या आश्रयास राहणाऱ्या जनांला. २२. उतरून परतीरास नेतात. २३. पश्चात्तापपूर्वक संजयापाशीं बोलतो. २४. कल्याणसमुदाय. मी विदुराला घालविलें नाहीं तर कुशळविसराला घालविलें—हें तात्पर्य. २५. संताप, तडफड, संतापामुळें केवळ चैन पडूं नये अशी जी अवस्था ती. २६. ज्याचें वित्त (चोरीस) गेलें आहे असा. २७. विदुराला. २८. जो भ्राता नव्हे अशाला. २९. मेघास. ३०. दुसऱ्यांचा उत्कर्ष, पांडवांची भरभराट. ३१. ज्ञान. ३२. डाग लाविला. ३३. धृतराष्ट्र रडला. ३४. धृतराष्ट्रानें संजयास विदुरविरह कळविला.

शिकवी पुनः पुन्हा कीं '[1]बा! म्हण घालुनि त्यासि [2]आणा [3]या.'॥ २७
[4]सर्वस्व परित्यागुनि ज्याचें स्मरतात [5]पादकंज [6]यमी ।
त्या हरिच्या आप्तां तो नमुनि म्हणे, 'दास सूत संजय मी. ॥ २८
आलों [7]राजाज्ञेनें, [8]गुरुदास्यमहर्धि [9]भवि दुरापा, हें ।
जाणशि, [10]कवे! पहा [11]निजगुरुलाचि, मुहूर्त न [12]विदुरा पाहें. ॥ २९
बहु म्हणतो नृप [13]अनुदिन गतधन कृपणा जनापरिस '[14]हाय!' ।
व्हावें सुज्ञें बुडतां भलत्याहि [15]निवारिलें परि [16]सहाय.' ॥ ३०
भीम म्हणे, 'बापाजी! जा [17]समयीं, येथवांचि कां घाई? ।
तूं [18]येथ नसावें, या [19]भावें करितो बरीच [20]कांगाई.' ॥ ३१
धर्म म्हणे, 'ताता! तो तुजविण वर्तेल वृद्ध अंध कसा? ।
[21]सत्संगशिवाविण त्या [22]दुःसह [23]भव, [24]वासवास [25]अंधकसा.' ॥ ३२
भेटे विदुर [26]गजपुरीं [27]असदाचरणोनितप्रभा [28]वडिला, ।
[29]ज्याचा झाला साधुद्वेषें स्वाभाविक प्रभाव ढिला. ॥ ३३
जरि अप्रसन्न चित्तीं [30]तरि दावी प्रेम, बैसवी [31]अंकीं, ।
अंध म्हणे, 'हर्ष जसा मज, न तसा राज्य पावल्या [32]रंकीं. ॥ ३४
जें कांहीं मी वदलों वत्सा! तुझिया मनीं न राहो तें, ।
पुण्य यश प्राप्त सहनशीलत्वें [33]सज्जनीं [34]नरा होतें.' ॥ ३५

---

१. बा संजया! २. शपथा. ३. शपथा त्या विदुराला घालून 'या' (चला) असें म्हण. ४. सकल धन. (स्व=धन.) ५. पादपद्म. ६. संन्यासी, योगी, मुनी, जितेंद्रिय साधु. ७. धृतराष्ट्राच्या आज्ञेनें. (अध्याय ६.) ८. गुरुसेवारूप मोठी समृद्धि. ९. संसारी जनास दुर्लभ. १०. पंडिता! (विदुरा). ११. धृतराष्ट्रालाचि, आपल्या वडील भावाला. १२. दूर असलेल्यास, लांब असलेल्यास. १३. दररोज. १४. 'हाय हाय' असें नृप धृतराष्ट्र म्हणतो. १५. निषेध केला तरि. १६. साहाय्य करणारें व्हावें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १७. योग्यकाळीं, मरणसमयीं. हें भीमाचें क्रोधमूलक वचन आहे. १८. येथें काम्यकवनांत आमच्यापाशीं. १९. हेतूनें, उद्देशानें. २०. थोडें दुःख असून आरडाओरडा करून जें अधिक दाखविणें ती, कांगाई. २१. सत्संगरूप शंकरावांचून. २२. सोसण्यास कठीण. २३. संसार. २४. इंद्रास. २५. अंधकासुरासारखा. अंधक हा महिषासुराच्या सेनेंतील एक प्रमुख असुर, यानें इंद्रादि देवांस युद्धांत जर्जर केलें. २६. हस्तिनापुरीं. २७ दुष्ट आचरणानें उणी कांति ज्याची असा. २८. वडिला, धृतराष्ट्राला. २९. ज्या धृतराष्ट्राचा. ३०. 'वरि दावी प्रेम' असाही पाठ आहे. ३१. समीपभागीं. ३२. भिकाऱ्याचे ठायीं. ३३. सज्जनपुरुषीं. ३४. सज्जनीं सहनशीलत्वें पुण्य (यश) नराला प्राप्त होतें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे.

विदुर म्हणे, 'दादाजी! परम गुरु प्रभुहि तूं क्षमाकर[1] गा ! ।
आम्हां पदाश्रितांची[2] वृत्तिस्थिति कीर्तिही भवत्करगा[3]. ॥ ३६

हे[4] ते[5] मैत्र[6] सम, परि मन पाहुनि दीनां मुलांस कळकळतें, ।
गुरुजनशील असेंचि प्रायः[7], प्रभुजी ! तुला सकळ कळतें.' ॥ ३७

समजावुनि पांडवहित[8] विदुर पुरा[9] आणितां पुन्हा तातें, ।
दुर्योधन करि चिंता, कल्पुनि चित्तीं निजार्थघातातें[10]. ॥ ३८

स्वहितकरशकुनिकर्णप्रमुखांशि म्हणे, 'गृहांत अहि[11] तातें ।
हो[12] आणिला, दुखविला, सर्वांच्याही करील अहितातें[13]. ॥ ३९

मोहुनि वृद्धमतीतें[14] दायादांतें[15] फिरोनि आणवितो ।
हा[16] त्यांहातीं आम्हां बाळतरूला समूळ खाणवितो[17]. ॥ ४०

न पहावे न सहावे[18] तें मरतों, आजि भक्षितों विष मी, ।
एवंविधमरणीं[19] सुख, न मला काळीं तशा महाविषमीं[20].' ॥ ४१

शकुनि म्हणे, 'प्राणांहुनि रक्षिति सत्यव्रताप्रति[21] ज्ञाते[22], ।
शंका धरिशि वृथा कां? त्यजितील कशी कृता[23] प्रतिज्ञा ते[24]? ॥ ४२

जरि आलेचि[25] तरि, पुन्हा, योजूनि अपाय[26] लक्षशा दडवूं[27] ।
रंध्रान्वेषी[28] आम्हीं, बहु त्यांतें व्यसनसागरीं[29] बुडवूं.' ॥ ४३

सांत्वन[30] करि दुःशासन, कर्णहि, परि आग्रही न तो समजे, ।
टाकूं पाहे पंचप्राण[31], प्रियबंधु तेहि, त्यांसम[32] जे. ॥ ४४

कर्ण म्हणे[33], 'हें न रुचे, तरि अरिकरिहरि[34] असों[35], अगा राया ! ।

---

१. क्षमा+आकर=क्षमेची खाण. २. चरणाचा आश्रय करणाऱ्यांची. ३. तुझ्या हातींची. ४. कौरव. ५. पांडव. ६. अध्याय ६ पहा. ७. बहुतकरुन वडील मनुष्यांचा असाच स्वभाव असतो. ८. पांडवांचा हितकर्ता. ९. नगरा. १०. स्वार्थनाशातें. (अध्याय ७ पहा.) ११. सर्प. १२. विदुर. १३. नाशातें. १४. वृद्धाच्या (धृतराष्ट्राच्या) बुद्धीला. १५. पांडवांतें. (दाय+आद=वडिलोपार्जित द्रव्य+घेणारा बंधु, वारिसदार, बांधव.) १६. हा विदुर. १७. खणून टाकवितो. १८. न सोसवे. १९. अशा प्रकारच्या विषभक्षणानें येणाऱ्या मरणांत. २०. महासंकट ज्यांत अशा काळीं. २१. न्यायानें आणि सत्यास अनुसरून वागण्याच्या व्रताला (नियमाला). २२. जाणते, सुज्ञ. २३. केलेली. २४. पांडव. २५. परत आले. २६. कपटद्यूतादिक अनेक अपाय. २७. त्यांस वनामध्यें माघारे पाठवूं, घालवूं. २८. रंध्र पहाणारे. छिद्र, व्यंग, खोड, शोधून काढणारे. (अध्याय ७.) २९. संकटरूप समुद्रांत. ३०. दुर्योधनाचें सांत्वन. ३१. प्राण, अपान, व्यान, उदान व समान असे शरीरांतील पांच वायु ते, जीव. ३२. त्या प्राणांसारखे आवडते जे बंधु त्यांलाही टाकूं पाहे. ३३. कर्ण दुःशासन शकुनि दुर्योधन यांस म्हणतो. ३४. शत्रुगजांचे सिंह. ३५. आपण आहों.

जें चित्तीं तेंचि[1] करूं, न उपेक्षूं[2] भूतिच्या[3] अगारा[4] या[5]. ॥ ४५
पडले व्यसनीं केवळ ते तेजोहीन[6] दीन दायाद[7], ।
ग्रीष्माल्पसरीं[8] सोडुनि गेलें जैसें नदीनदा याद[9]. ॥ ४६
बळपति[10] गुहसा[11] मी, त्यां[12] अधिक बहुभुजास्यगात्र[13] आया[14] सा[15], ।
चाल[16], करूं शत्रुक्षय, पळहि न होशील पात्र[17] आयासा[18].' ॥ ४७
ऐसें अनुमोदन[19] दे दुष्टाला, जेंवि मद्य वेडसरा, ।
धांवे साधुवरि श्वा[20] खवळविला[21] जेंवि पाळकें डसरा[22]. ॥ ४८
सबळ[23] सुयोधन पांडवहननार्थ[24] निघे, अशांत अयनांत[25] ।
व्यास[26] प्रकटे, ज्याच्या नांदे[27] करुणा मनांत नयनांत. ॥ ४९
वारुनि त्यांशि[28] मुनि म्हणे, 'धृतराष्ट्रा! तनुज[29] हा तुझा खळ गा! ।
विनिपात[30]हेतुमार्गामाजि रजः[31]पिहितमुख जसा खळगा. ॥ ५०

---

१. जें कौरवांस इष्ट तेंच करूं. २. हयगय न करूं. ३. ऐश्वर्याच्या. ४. गृहास. ५. दुर्योधन. 'अगा राया' आणि 'अगारा या' हा पंतांच्या शेकडों ठरीव यमकांपैकीं एक होय. पंतांच्या ग्रंथांत जें अपूर्व यमकचातुर्य दिसून येतें त्याचें कारण असें सांगतात कीं, पंतांनीं हजारों यमक आपल्या खोलीच्या भिंतीवर लिहून ठेविले होते आणि काव्यरचनेच्या वेळीं जे जे त्या त्या प्रसंगाला अनुरूप ते ते घेऊन ग्रंथ पुरा करावयाचा, अशी त्यांची चाल होती. ६. नष्टवैभव. ७. भाऊबंद, पांडव. ८. ग्रीष्मऋतूंत अल्प सरोवरीं. ९. जलजंतु. 'याद' हा शब्द संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे. १०. शक्तिमान्. ११. स्वामिकार्तिकासारखा. (गूहति=रक्षति सेनामिति गुहः=सेनेचें रक्षण करतो म्हणून 'गुह' असें नांव आहे.) १२. त्या कार्तिकस्वामीला माझ्यापेक्षां अधिक म्हटलें म्हणजे बहुभुजास्य असें गात्र आणि सहा माता इतकेंच आहे. १३. अनेक भुज (हात) आणि आस्यें (मुखें) आहेत ज्या गात्राला (शरीराला) तें=बहुभुजास्य गात्र. ज्या महादेवरेतापासून हा गुह उत्पन्न झाला तें सहा कृत्तिकांनीं धारण केलें म्हणून प्रत्येक कृत्तिकेपासून एक मुख व दोन हात असे त्याला मिळाले, तेव्हां याची आकृति सहा मुखांची आणि बारा हातांची झाली. यास्तवच यास 'षण्मुख' किंवा 'षडानन' असें नांव पडलें. १४. त्या सहा कृत्तिका मातृस्थानीं होत, याच कारणास्तव त्याला 'षाण्मातुर' असें नांव पडलें आहे. १५. त्यास भुज, मुखें आणि आया (माता) सहा एवढें अधिक. १६. शस्त्रें घेऊन वनांत पांडवांस मारण्यासाठीं निघ. १७. स्थान, विषय. १८. कष्ट, त्रास. १९. असें मत कर्णं दे. २०. कुत्रा. २१. रागास आणलेला, क्षुब्ध केलेला. २२. चावरा. २३. बळा(सैन्या)सहित. २४. काम्यकवनीं पांडवांचा नाश करण्यासाठीं रथांत बसून जावयास निघे. २५. मार्गांत. २६. व्यासमुनि धृतराष्ट्राच्या घरीं एकाएकीं येई. (अध्याय ७.) २७. राहे, असे. २८. त्या दुर्योधनाला निवारून. २९. मुलगा दुर्योधन. ३०. पाडण्यास कारणभूत. ३१. धुळीनें (रजानें) आच्छादित (पिहित) मुख ज्याचें असा.

हा हरुनि पांडवांचीं सर्वस्वें,[1] [2]जीवितेंहि [3]उर्वरितें ।
हरणार, कसें म्हणशी तूं हितकर या अशाहि [4]उर्वरितें ? ॥ ९१
देईल शोक, बुडवुनि कुळ, आपणही बुडोनि, तुज राया ! ।
सांग हित, सुज्ञ गुरु तूं आहेशि समर्थ याशि [5]उजराया. ॥ ९२
[6]श्रमदाहि अन्यरोगा मानिति बहु, [7]विटति साधु [8]सुतरोगा; ।
किंवा [9]हा धर्माचें दास्य करुनि [10]दुर्गुणाब्धि [11]उतरो गा ! ॥ ९३
अथवा कशास हें ही ? [12]सुगंध [13]कर्पूरहि न करी [14]लशुना, ।
[15]सिंहगुणस्वीकृतिला [16]तत्संगें काय गा ! करील [17]शुना ? ॥ ९४
स्वपरयशोवृद्धि रुचे सुजनांस, स्वपरकीर्तिहानि [18]खळा; ।
बैसविला [19]भूभूषणपदपदकीं काय [20]कांच ? हा [21]निखळा. ॥ ९५
मज वाटे हा [22]कुरुचा वंश सुखें या जनांत नांदावा, ।
काय करूं ? खळ करितो साधूंशीं स्वक्षयार्थ कां [23]दावा ?' ॥ ९६
धृतराष्ट्र [24]म्हणे, 'ताता ! जें हें द्यूतादि [25]दैवकृत सारें ।
[26]भावि कसें टाळावें लोकें [27]प्रारब्धकर्महृतसारें ? ॥ ९७
[28]दुष्टसुतोत्थापयशें [29]कर्पूरविशुद्ध आत्मकुळ [30]मळतें, ।
कळतें, तदपि [31]स्नेहें मन टाकायास [32]यांस [33]कळकळतें.' ॥ ९८

---

१. सपूर्ण धनें. २. प्राणांतें. ३. उरलेलीं. ४. मोठ्या शत्रूतें. (उरु+अरितें.) ५. सरळ कराया. ६. त्रासदायक, कष्टप्रद. ७. कंटाळून जाती. ८. पुत्र हाच रोग त्याला. हें अर्धे सुभाषितरूप आहे. ९. दुर्योधन. १०. दुर्गुणरूप समुद्र. ११. उल्लंघून पार जावो. १२. सुवासयुक्त. १३. कापूर. १४. लसणेस. १५. सिंहाच्या गुणांचा अंगीकार? १६. त्याच्या (सिंहाच्या) संगतीनें. ही गीति सुभाषितरूप आहे. १७. कुत्रा. हें प्रश्नालंकाराचें उदाहरण आहे. १८. दुष्टाला आपल्या व दुसऱ्याच्या यशाचा नाश रुचतो. १९. पृथ्वीला भूषणस्थान अशा पदकावर म्हणजे सिंहासनावर—असा भाव. २०. कांच. (हा शब्द संस्कृतांत निरनुस्वार आणि पुंलिंगी आहे.) २१. उखळा, काढून टाका. २२. वंशावळींतील ३७ व्या 'कुरु' नामक पुरुषाचा, पांडुधृतराष्ट्रांचा. २३. शत्रुत्व, 'दुश्मनी.' 'दावा' हा शब्द आरबी भाषेंतील आहे. ५०-५६ या गीतींतील व्यासाची उक्ति मूळांत आठव्या अध्यायांत आहे. २४. अध्याय ९ पहा. २५. दैवानें नेमिलेलें. दैवाच्या योगानें झालेलें, कर्ता करविता दैव, दुर्योधन त्या दैवाच्या स्वाधीन, म्हणून त्यानें स्वत: होऊन कांहींच केलें नाहीं, तेव्हां तो निर्दोष—असा इंगितार्थ. २६. होणारें. २७. पूर्वकृत कर्मानें हरण केलें आहे (सार) सामर्थ्य ज्याचें अशा (लोकानें). २८. दुष्ट+सुत+उत्थ(उत्पन्न झालेलें)+अपयशें=दुष्ट पुत्रापासून उत्पन्न झालेल्या अपकीर्तीनें. २९. कापरासारखें स्वच्छ. ३०. मलिन होतें, कलंकित होतें. ३१. पुत्रस्नेहानें. ३२. पुत्रास. (दुर्योधनास.) ३३. मन व्यथित होऊन द्रवतें, मनाला द्रव येतो.

व्यास म्हणे, 'सत्य वदसि वत्सा! आत्माचि पुत्र वेदमतें,[1] ।
ऐसेंचि चित्त माझें पुत्रस्नेहेंकरूनियां श्रमतें.[2] ॥ ५९
एक कृषीवलपीडित[3] दुर्बळ वृष[4] पाहतांचि महिवर ती ।
ख्याता[5] सुरभी[6] देवी स्नेहें झाली उदंड[7] गहिंवरती.[8] ॥ ६०
तूं पांडु विदुर मज सम, परि माझा पांडवांकडे [10]ओढा; ।
निम्नाकडेचि[11] धांवे, नाटोपे[12] जेंवि अद्रिचा[13] [14]ओढा. ॥ ६१
कीं नाहीं जनक[15] कनक,[16] वन कदनकरांशि[17] [18]सेवणें पडलें, ।
वाटे बहु अवघड,[19] जें न घडावें ज्यांस, त्यांस[20] तें घडलें. ॥ ६२
पुष्कळ सुख भोगावें ऐसें चित्तीं असेल, तरि त्यांतें[21] ।

---

१. वेदाच्या मताप्रमाणें पुत्र हा आत्माच आहे, पति पुत्राच्या रूपानें आपल्या जायेच्या ठायीं उत्पन्न होतो म्हणून पुत्र आणि पिता हे अभेदरूप आहेत. 'आत्मा वै पुत्रनामासि' इत्यादि वेदवचन आहे. तसेंच 'पतिर्जायां प्रविशति गर्भो भूत्वा स्वमातरम् । तस्यां पुनर्नवो भूत्वा दशमे मासि जायते । तज्जाया जाया भवति यदस्यां जायते पुन: ॥' असें स्मृतिवचनही आहे. (मोरोपंतकृत महाभारत–आदिपर्व–अध्याय १२ गीति ६९ पृष्ट ७८ पहा.) २. कष्ट पावतें. ३. शेतकऱ्यानें ताडिलेला. ४. बैल. ५. प्रसिद्ध. ६. कामधेनु, सर्व गाईंची माता. सुरभीची गोष्ट आहे ती अशी:–एका शेतकऱ्यानें नांगरास दोन बैल लाविले होते. त्यांत एक पुष्ट आणि एक कृश होता. जो रोडका होता त्याच्यानें नांगर ओढवेना म्हणून शेतकरी त्यास वारंवार मारी. हें पाहून सुरभीच्या मनास फार दु:ख झालें आणि ती इंद्रास सर्व हकीकत सांगून त्यास शरण गेली. आपल्या दुर्बल पुत्राच्या (बैलाच्या) दैन्यानें सुरभीला अत्यंत दु:ख झालें असें पाहून इंद्रास दया आली आणि त्यानें त्या शेतकऱ्याच्या शेतावर विपुल वृष्टि करून धान्य उत्पन्न केलें, आणि त्या कृश बैलाला मुक्त केलें. दुर्बल दीन पुत्रावर जशी सुरभीची प्रीति पुष्कळ होती, तशी दीन झालेल्या पांडवांवर माझी कृपा बहुत आहे असें व्यासोक्तीचें तात्पर्य. वाचकांस कंटाळा येईल असा ग्रंथविस्तार करणें पंतांस आवडत नसे म्हणून ते आख्यानाचें आख्यान प्रसंगविशेषीं एकाच गीतींत आटपीत असत. ६० व्या गीतींत सुरभीचें आख्यान दिलें आहे तें मूळ महाभारतांत बरेंच मोठें आहे. (वनपर्व–अध्याय ९ पहा.) ७. पुष्कळ. (उद्दंड म्हणजे उंच आहे दांडा ज्याचा तें, यावरून उद्दंड म्हणजे पुष्कळ असा अर्थ झाला.) ८. कोणत्याही दु:खाच्या योगानें रडें येण्याच्या पूर्वी गळा भरून येतो तें, त्याणें युक्त. गहिंवरती झाली=कंठ भरून येऊन रडूं लागली. ९. पांडव दीन आणि दुरवस्थित म्हणून त्यांच्याकडे व्यासाच्या मनाचा ज्यास्त ओढा, एरवीं धृतराष्ट्र, पांडु आणि विदुर हे त्यास समान होत. सुरभीचा आपल्या कृश पुत्राकडे जसा ज्यास्त ओढा होता, तसाच व्यासाचाही दीन पांडवांकडे होय. १०. कल. ११. उतरणीकडे, उतरत्या प्रदेशाकडे. १२. न आटोपे, न आंवरे. १३. पर्वताचा. पर्वतापासून निघणारा झरा स्वभावत:च उतरणीकडे धांवतो, ही गोष्ट व्यवहारसिद्ध आहे. १४. नाला, झरा, ओहोळ. १५. पिता पांडु. १६. सुवर्ण. १७. युद्ध करणारांस. (शूरांस.) १८. वनवास करणें भाग पडलें. १९. कठिण. २०. त्या पांडवांला. २१. त्या दुर्योधनातें.

हित [illegible] करील तसें, [१]साधुद्वेषिस्वघातकरित्यातें.' ॥ ६३
[२]राजा म्हणे, 'करावें आजि तुम्हीं [३]सुमतिधाम [४]नातुंड; ।
[५]शिकवा स्वहित, पुरवितें तुमचें कीं [७]विश्वकामना [८]तुंड.' ॥ ६४
व्यास म्हणे, 'पाजी घन [९]वन, [१०]खग असतो करोनि [११]आ जो बा ! ।
बापाशि बाप न म्हणे ऐशाला काय होय [१२]आजोबा ? ॥ ६५
पांडव [१३]पाहुनि आतां **मै**त्रेय महर्षि येथ येईल ।
[१४]बोधील ऐकिल्यावर, नाहींतरि उग्र शाप देईल.'-॥ ६६
ऐसें वदोनि, सोडुनि [१५]दुर्मतिसंसर्ग, मुनि पळाला हो ! ।
कीं ताप आपणाला दुःसह शापहि न त्या खळाला [१६]हो. ॥ ६७
आला **मै**त्रेयमुनी प्रार्थुनि शिकवावया हित ज्ञानी, ।
[१७]खळबोधश्रम निष्फळ ऐसें कथिलें जरीहि [१८]तज्ज्ञानीं. ॥ ६८
पूजुनि **धृ**तराष्ट्र म्हणे, '[१९]माझा तापें न [२०]काय [२१]पळवा हो, ।
पळवा हो ! [२२]अघ, मजवरि तुमचा [२३]करुणाब्धि एक पळ वाहो.॥ ६९
हे [२४]ते [२५]बंधु प्रेमें नांदोनि जगीं सुकीर्ति करितिल कीं, ।
[२६]व्यसनार्ता या दासीं करिल कृपा देव, जेंवि [२७]करितिलकीं'. ॥ ७०

---

१. साधूंचा द्वेष करून आपला घात करणारा जो (दुर्योधन) त्यातें. २. धृतराष्ट्र. ३. सुबुद्धीचें घर. ४. नातु. (दुर्योधन.) ५. हितोपदेश करून दुर्योधनाला स्वहित शिकवा. ६. कीं तुमचें तुंड विश्वकामना पुरवितें-असा अन्वय; तुमचें मुख जगाची इच्छा परिपूर्ण करतें. ७. जगाचें इच्छित. ८. मुख. ९. जल. १०. चातकपक्षी. ११. मुखविकास. १२. जो प्रत्यक्ष बापाचें वचन ऐकत नाहीं तो आजोबाचें वचन कायसें ऐकणार ? अर्थात् नाहीं-हा भावार्थ. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. हें अर्थापत्ति नामक अलंकाराचें उदाहरण आहे. या अलंकारांत कैमुतिकन्यायानें अथवा दंडापूपन्यायानें वर्णन असतें असें आहे, मग असें होईल हें सांगावयासच नको-अशा स्थलीं हा अलंकार होतो. १३. पांडवांस भेटून तुम्हांस भेटण्यासाठीं. १४. दुर्योधनास सदुपदेश करील. (अध्याय १०.) १५. दुष्टबुद्धि दुर्योधनाचा समागम. १६. होवो. १७. मैत्रेयमुनि हा पराशराचा शिष्य. 'पांडवांशीं वैर वाढवूं नको' असा यानें दुर्योधनास बोध केला, पण तो उन्मत्तपणानें न स्वीकारतां दुर्योधनानें त्यास तुच्छ मानून आपली मांडी त्याच्यापुढें थोपटली, तेव्हां 'भीमाची गदा तुझ्या मांडीवर बसून तूं मरण पावशील' असा त्यानें दुर्योधनास शाप दिला. (अध्याय १०-१८). दुष्टास केलेल्या उपदेशाचे श्रम व्यर्थ. १८. जाणत्यांनीं. १९. माझा काय तापें पळवा न हो-असा अन्वय. संतापानें माझें शरीर पळव्यासारखें शुष्क न व्हावें. २०. देह. २१. वाळलेला पाला. २२. दुःख. अहो माझें दुःख पळवा (घालवून लावा). २३. दयारूप समुद्र. २४. कौरव. २५. पांडव. २६. व्यसनानें पीडित. २७. गजेंद्रीं. ही कथा श्रीमद्भागवत-स्कंध ८ अध्याय २-४ यांत वर्णिलेली आहे. इंद्रद्युम्न हा द्रविडदेशाचा राजा अगस्त्यशापानें गजेंद्र झाला, त्या शापांतून विष्णूनें त्यास मुक्त केलें.

मैत्रेय म्हणे, 'राया! आहे हातीं तुझ्याचि बापा! हें, ।
त्यांच्या यांच्या ठायीं समतेस[1] पुढेंतरीहि[2] बा! पाहें. ॥ ७१
तूं ज्या सभेंत, तेथें ती कुलजा[3] तेंवि काय गांजावी? ।
कुरुकुळकीर्ति श्रीमद्भीष्महि असतां लयासि[4] कां जावी? ॥ ७२
कां दंडिले न ते त्वां? स्वसभेंतचि घालिते दरवडा[5] जे, ।
हा! हा! तो साधुमनीं अद्यापि असाधुवादरव[6] डाजे[7]. ॥ ७३
झाली तस्करवसती[8] जी होती कुरुसभा जनकशाला[9], ।
अद्यापि इचें करिती भीष्म विदुर कवि संभाजन[10] कशाला? ॥ ७४
आतां सर्व असो[11] तें, वत्सा! दुर्योधना! पहा हित रे! ।
सदतिक्रमकर[12] न तसा[13], जेंवि गरुडलंघनें[14] महाहि[15] तरे. ॥ ७५
संसार दो[16] दिसांचा, यश जोडी जो कुलीन तोचि तरे; ।
घ्यावें बरें म्हणोनि स्वपरमुखें तें[17] कुलीनतोचित[18] रे! ॥ ७६
भ्राते साधु[19] यशस्वी शस्त्रास्त्रज्ञ[20] प्रसिद्ध वासवसे[21], ।
पद्मचि ते[22] ज्यांत सदा श्री[23] गुणगणरसयश:सुवास[24] वसे. ॥ ७७
भासति तसेचि सत्वें[25] जैसे होते सविप्र[26] भवनांत[27], ।
अद्यापि वल्कलाजिनवसनहि[28] दिसती न विप्रभ[29] वनांत. ॥ ७८

---

१. समभावाला, सारखेपणास. २. यापुढें येणाऱ्या प्रसंगीं. ३. कुलीन स्त्री. (द्रौपदी.) ४. शेवटास. ५. दरोडा, घाला, डाका. ६. दुरुक्तीचा ध्वनि. ७. सलतो. ८. चोरांचें वासगृह. ९. जनक नामक राजर्षिसारख्या ब्रह्मवेत्त्या जनाचें ब्रह्मचर्चा करण्याचें घर; अथवा जनकाची (पित्याची–धृतराष्ट्र भीष्म द्रोण कृप इत्यादि गुरुजनांची) शाला (वसतिगृह). १०. सत्कार, पूजन. ११. जें झालें तें झालें, तें सर्व एकीकडे असो–असें सुचवून दुर्योधनाकडे मुख फिरवून म्हणतो. १२. साधूचें लंघनकर्ता, सज्जनाची अमर्यादा करणारा. १३. न तसा तरे जसा महाहि न तरे. १४. गरुडाचा अनादर केल्यानें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १५. मोठा सर्प. (महा+अहि.) १६. क्षणभंगुर, अल्पकाल चालणारा. १७. बरें म्हणवून घेणें हें. ही गीति पंतांच्या उत्तम सुभाषितांत गणण्यालायक आहे. १८. कुलीनपणास योग्य. १९. ईश्वरभक्तिपरायण, पुण्यात्मे. २०. शस्त्रांत आणि अस्त्रांत प्रवीण. २१. इंद्रासारखे. २२. ते भ्राते पद्म (कमळासारखे) होत. २३. लक्ष्मी; (पक्षीं) शोभा ज्या पद्मांत वसे–असा संबंध. २४. गुणसमुदायरूप रस आणि यशोरूप सुवास. २५. प्रतापानें, शौर्यानें. २६. द्विजांसहित. २७. घरांत. २८. वल्कल-अजिन (हरिणचर्म)+वसन (वस्त्र)=वल्कलें आणि हरिणचर्में हींच ज्यांचीं वस्त्रें ते. २९. निस्तेज, प्रभारहित.

भीमें हिडिंबबकखळ[1] वधिले मागें, जसे करी[2] हरिनें[3], ।
किर्मीरनाम[4] राक्षस सांप्रत, भ्यावें मनीं जेया[5] हरिनें[6]. ॥ ७९
ऐशा प्रबळांशीं तूं सख्यें[7] जरि वर्तशील, तरशील; ।
सुख भोगिशील पुष्कळ, नाहीं तरी हा! वृथाचि मरशील.' ॥ ८०
ऐसें सत्य हित वदे[8], परि न तयाला धरूनि तोख[9] वळे, ।
शापाशि यत्न मांडी[10], मांडी तोंडी[11], कुदेव[12] तो खवळे[13]. ॥ ८१
ज्याच्या[14] सुहित करावें अहितकरानयविषा[15] दमुनि[16] पानें ।
उपदेशामृत थुकितां, कां न धरावा विषाद[17] मुनिपानें[18]? ॥ ८२
मैत्रेय म्हणे, 'पापा[19] तापापह[20] सदुपदेश परिसविता[21], ।
घूका[22] दृष्टीस नको सर्वजगत्तोषहेतु[23] परि सविता[24]. ॥ ८३
दुर्योधना! तुज जरि न शिक्षावें[25], तरि म्हणेल मत्तप[26] 'हा ।
खळ मल्लंघन[27] करितो, तूंहि न हो क्षांतिभाग्यमत्त[28], पहा.' ॥ ८४
यास्तव घे शाप, तुझ्या भीमगदा करिल चूर्ण मांड्यांतें, ।
वाढिल काळा, बाळा जशि वाढी माय तूर्ण[29] मांड्यांतें[30].' ॥ ८५
पाय धरुनि अंध म्हणे, 'फिरवा जी! शाप.' मुनि म्हणे, 'न रडें, ।
'वाक्[31] करिन,' म्हणो स्वौषधिवदनाचें[32] व्याघ्र न चघळी नरडें[33]. ॥ ८६
धर्मन्यायें[34] वर्ता, तिळहि न करिजेल हानि शापानें, ।

१. मोरोपंतकृत आदिपर्व–अध्याय २९-३० पहा. (काव्यसंग्रह–पृष्ठें १५४-१६२.) २. हत्ती. ३. सिंहानें. ४. किर्मीर हा बकासुराचा भ्राता, हा वेत्रकीय नामक वनांत (वेताच्या वनांत) राहत असे. बकासुराला भीमानें मारिलें यास्तव त्याचा सूड उगवावा म्हणून भीमास मारण्यासाठीं काम्यकवनांत आला. तेथें भीमापाशीं याचें घोर युद्ध झालें. त्यांत हा मरण पावला. (वनपर्व–अध्याय ११). ५. भीमास. ६. इंद्रानें, विष्णूनें. ७. सामानें. ८. मैत्रेय मुनि वदे. ९. संतोष. १०. करी. ११. हंसून थोपटी. १२. भूदेव (मैत्रेय. कु=पृथ्वी.) १३. क्षुब्ध होई. १४. अहितकरानयविषा दमुनि ज्या उपदेशामृताच्या पानें सुहित करावें तें उपदेशामृत थुकितां मुनिपानें विषाद कां न धरावा–असा अन्वय. १५. अहितकर+अनय+विषा=अहित करणारा जो अनय (अनीति) हेंच विष, त्याला. १६. नासून, शमवून. १७. खेद. १८. ऋषिश्रेष्ठानें. १९. अधमा. २०. ताप+अपह=तापनाश करणारा. २१. ऐकविणारा. २२. घुबडा. याला 'दिवाभीत' असें सार्थ नांव आहे. २३. सकल जगताला आनंद देण्यास कारण. २४. सूर्य. २५. शासन करावें. २६. माझें तप. २७. मत्+लंघन=माझा अनादर, माझा अतिक्रम. हें तपाचें भाषण आहे. २८. क्षांतिरूप भाग्यानें उन्मत्त, सहनशीलतारूप ऐश्वर्यानें उन्मत्त. २९. त्वरित, लौकर. ३०. पक्वान्नविशेषांतें. ३१. तुमची वाक् मी करीन असें हा म्हणो. ३२. सु(उत्तम मारक) औषधी आहे ज्याचे वदनीं अशाचें. ३३. नरडी, गळा. ३४. पांडवांस शरण जाऊन सख्य करून वागा.

[1]तापद नव्हेचि, केला, [2]स्वसुहृत् मैत्रेय हा [3]निशापानें.' ॥ ८७
मुनि गेल्यावरि [4]राजा विदुरासि म्हणे, 'भैया [6]अदभ्रा त्या ।
वत्स वृकोदर कैसा परिहरिता जाहला? वद [7]भ्रात्या!' ॥ ८८
विदुर म्हणे, 'कथिलें जें धर्मे किर्मीरहननवृत्त मला ।
तें फार काय सांगों? त्या कर्मे भीम भी[8]मसा गमला. ॥ ८९
[9]निर्मी किर्मीर [10]महामाया, तो काळसा करी [11]लगट, ।
वनदेवतांसि वाटे सर्व प्राण्यांसि हा करील [12]गट. ॥ ९०
[13]तन्नाद कांपवी बहु [14]कृष्णेतें, जेंवि वायु [15]कदलीतें, ।
[16]पांचांही वीरां, ती तेंव्हां जें हाय हाय वदली तें. ॥ ९१
'कोण तुम्ही? सांगा रे!' वदत असें [17]दुष्ट ये जवळ खाया, ।
[18]धर्मोक्त वृत्त कारण होय [19]बकारातितेज वळखाया. ॥ ९२
दुष्ट म्हणे, 'होउनि परलोकीं [20]त्वद्रक्ततृप्त [21]बक राहो, ।
भीमा! स्वभ्रात्यांसह [22]किर्मीरव्याघ्रभक्ष्य बकरा [23]हो.' ॥ ९३
वारुनि धनंजयातें, घालुनि दृढ [24]कास, धरुनि [25]नग हातें, ।
भीम भिडे [26]रक्षांशीं, प्रथम म्हणे, 'हूं' रणांत,*मग *'हा' [27]तें. ॥ ९४
वधिलें भीमें जेंव्हां [28]हरिसहि तें [29]रक्ष नावरायाचें, ।

---

१. ताप देणारा. २. आपला मित्र. ३. चंद्रानें. (निशा+प.) ४. धृतराष्ट्र (अध्याय ११). ५. किर्मीर राक्षसाच्या. ६. बहु. (दभ्र=अल्प.) ७. हे बंधो. (विदुरा.) ८. महादेवसा. ९. उत्पन्न करी. १०. इंद्रजालासारखें कपट. ११. निकट संबंध, जवळ येणें. १२. एकदाच भक्षण करील. १३. त्याचा शब्द. १४. द्रौपदीतें. १५. केळीतें. १६. पांच पांडवांलाही तिचें 'हाय हाय' असें रोदन कांपवी—असा भावार्थ. १७. किर्मीर राक्षस. 'तुम्ही कोण आहांत, सांगा तुमचीं नांवें' असें बोलत बोलत पांडवांस खाण्यासाठीं तो राक्षस सरसावला. १८. धर्मकथित, आपण पांडव आहों, राज्यपदभ्रष्ट होऊन वनांत भ्रमण करीत आहों, इत्यादि धर्मानें सांगितलेलें वृत्त. १९. बकासुराच्या अरातीचें (शत्रूचें) भीमाचें तेज. २०. तुझ्या रक्तानें तृप्ति पावलेला असा. २१. भीमाच्या रक्तानें तर्पण केलें म्हणजे भ्राता (बक) आणि सखा (हिडिंब) यांच्या ऋणांतून मी मुक्त होईन असें वर्णन मूळ महाभारतांत आहे. २२. किर्मीररूप वाघाचें भक्ष्य. २३. होवो. २४. तयार होऊन. कास घालणें=कांहीं उद्योग करण्याविषयीं सिद्ध होणें. २५. वृक्ष. २६. राक्षसांशीं. ('रक्षस्'शब्द संस्कृतांत नपुंसक आहे.) २७. तें रक्ष=तो राक्षस 'हा' असें म्हणे. २८. इंद्रासहि. २९. राक्षस. ('रक्ष' हा शब्द नपुंसकलिंगी आहे आणि एथें जो 'लिंगव्यंग' नामक अलंकार केला आहे त्यास तो 'रक्षस्'शब्द साधक आहे. पराभव पावणारा शत्रु, लिंगानें हीन आहे, असें या अलंकारानें सूचित केलें आहे.)

सुर[1] वदले याचिपरि, 'स्वरिपु वधुनि रक्ष नांव[2] रायाचें.'[3] ॥ ९५
भीमाच्या विजयातें विदुर सविस्तर नृपासि आयकवी, ।
तें ग्रंथविस्तराला भ्याला जो, तो वदेल काय कवी[4] ? ॥ ९६

अध्याय दुसरा.

'दुष्टांनीं[5] नागविला कपटद्यूतांत धर्म,' हे वार्ता ।
जातां[6] झाल्या यादवपांचाळमती[7] महाधिनें[8] आर्ता[9]. ॥ १
यादवपांचाळ[10] वनीं आले भेटावयासि धर्मातें, ।
निंदिति धृतराष्ट्राच्या तत्तनयांच्याहि दुष्ट कर्मातें. ॥ २
पाहोनि पांडवांचीं रूपें तो विश्वभावन[11] वनीं तीं ।
पावे त्या भावातें[12] जो तापें होय भाव नवनीतीं[13]. ॥ ३
कृष्ण म्हणे, 'बा साधो ! स्वकृतकुकृत[14] आठवूनि रडतील, ।
छळ करिते छळक[15] [16]रिते धनें यशें जीवनेंहि पडतील[17]. ॥ ४
दुर्योधनदुःशासनकर्णशकुनिरक्त भूमि सेवील, ।
गृध्रशिवासंघ[18] सुखें तन्मांसातें[19] यथेष्ट जेवील. ॥ ५
धर्मन्यायीं त्वत्सम पूर्वाभ्यासी[20] रते[21]; नवा[22] न रते; ।
खळ आकारें दिसती[23], परि नर न, [24]विवेकहीन वानर ते. ॥ ६

---

१. देव. २. कीर्ति, नांवलौकिक. ३. धर्माचें. ४. मोरोपंत. पंतांना कोणत्याही विषयाचें विस्तारपूर्वक वर्णन आवडत नसे, मग तो विषय वर्णनास कितीही योग्य, मनोरंजक आणि अनुकूल असो–ह्या विधानाचें समर्थन ह्या गीतिवरून होतें. महाभारतांतील मोठमोठीं आख्यानें पंतांनीं एक दोन पद्यांतच आटपून घेतलीं आहेत, यावरून त्यांस ग्रंथविस्तार करणें आवडत नसे असें दिसून येतें. ५. कौरवांनीं. ६. पसरतां, प्रसिद्ध होतां. ७. मातृपक्षाकडील यादव आणि श्वशुरपक्षाकडील पांचाल यांचें मन. ८. मोठ्या मनोव्यथेनें. ९. पीडित. १०. भोज, वृष्णी, अंधक, पांचाळ, धृष्टकेतु, कैकय, धृष्टद्युम्न, इत्यादि जन. ११. कृष्ण. (विश्वाच्या भावनेचें=उत्पत्तीचें आदिकारण असा भगवान्). १२. दयार्द्रभावातें. जेथें एका शब्दानें काम व्हावयाचें तेथें अनेक शब्द योजून द्राविडीप्राणायाम करून इष्टार्थ दाखविणें–अशा प्रकारचें हें एक उदाहरण आहे. १३. लोण्यांत १४. आपण केलेलें दुष्कर्म. १५. साधुपीडक. १६. रिक्त, रहित. धनहीन, यशोहीन, आणि जीवनहीन (मृत) असे होतील. १७. धनादिकांनीं रिते पडतील. १८. गिधाडें आणि कोल्ह्या यांचे कळप. १९. त्यांच्या मांसास. २०. पूर्वीं केला आहे (धर्मन्यायांचा) अभ्यास (संचय) ज्यानें तो. २१. धर्मन्यायांत रममाण होतो, आनंद पावतो. २२. नूतन पुरुष, ज्यानें पूर्वीं अभ्यास केला नाहीं तो. २३. नरासारिखे दिसतात, परंतु ते नर नव्हत. २४. विचारशून्य.

कां गेला **विदुर** पुन्हा? म्हणतो त्या आंधळ्यासि कां 'जी' 'जी'? ।
ती प्यावी [1]अमृतांधें काय त्यजिली [2]वमूनि [3]कांजी जी? ॥ ७
खळ हो! बळें तुम्हीच व्यसनीं बुडवावया [4]असु [5]सका रे! ।
सोडाल आठवूनि [6]स्वकृतदुरित दीर्घ उष्ण सुसकारे. ॥ ८
[7]सत्तापद हो! [8]खदिरांगारांनीं न्हाल, व्हाल पापडसे, ।
साप डसे एकासचि, [9]सद्द्वेष्ट्याच्या कुळाशिं पाप [10]डंसे.' ॥ ९
जिष्णु म्हणे, '**कृष्णा**! तूं भगवान् विश्वेश **विष्णु** मज कळलें; ।
तत्त्व [11]**व्यासें** कथिलें, कीं हें [12]सद्भाग्य सत्फळीं फळलें. ॥ १०
सत्य तुझा संकल्प प्रभुजी! जें कार्य तेंचि करिशील, ।
[13]स्वपदाश्रितजनतापत्रयतम तूं [14]तरणि तूर्ण हरिशील'. ॥ ११
कृष्ण म्हणे, 'त्वत्प्रिय ते मत्प्रिय, [15]भवदहित तेचि [16]मदहित रे! ।
[17]तुज मज जो न अनुसरे तो न [18]भवाब्धींत एक पदहि [19]तरे.' ॥ १२
श्री[20]कृष्णा श्री**कृष्णा** दावुनि [21]खळपाणिकृष्टकेश वदे, ।
[22]उक्तिकडे मन दे, परि नयन [23]तदास्याकडे न [24]**केशव** दे. ॥ १३

---

१. अमृतच आहे अंध म्हणजे अन्न ज्यांचें अशा देवांनीं. २. ओकून टाकून. हे गीत्यर्थ सुभाषितरूप आहे. ३. पेज. हें प्रश्नालंकाराचें उदाहरण आहे. ४. प्राण. ५. शत्रु व्हा. ६. आपण केलेलें पाप. ७. सज्जनांस ताप देणारे हो. ८. खैराच्या निखाऱ्यांनीं. 'अंगारांनीं न्हाणें' हीं पदें एकमेकांशीं अर्थान्वित होण्यास अनुकूल नाहींत म्हणून 'योग्य' नाहींत. [illegible] साधूंचा द्वेष करणाराच्या सर्व वंशाला. १०. हें गीत्यर्थ सुभाषितरूप आहे. ११. व्यासानें आणि नारदानें कृष्णाचा सर्व वृत्तांत अर्जुनास सांगितला असें वर्णन मूळ भारतांत आहे. (अध्याय १२.) १२. उत्तम भाग्य. १३. स्व+पद+आश्रित+जन+ताप+त्रय+तम=आपल्या चरणांचा आश्रय करणाऱ्या भक्तजनांचें तापत्रयरूप तम (अंधकार). आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक असे तीन प्रकारचे ताप (दुःखें) आहेत; देवतेच्या क्षोभापासून उत्पन्न होणारा ताप 'आधिदैविक,' जसें-वीज पडणें, सांत येणें; पृथ्वी, जल, वायु अग्नि इत्यादि पंच महाभूतांच्या क्षोभानें होणारा ताप 'आधिभौतिक'-धरणिकंप, अतिवृष्टि; मनाच्या क्षोभापासून अथवा देहाच्या विकृतीपासून होणारा ताप 'आध्यात्मिक'-वेड लागणें, ज्वर येणें; असें हें तापत्रय हें अंधकारासारखें आहे. १४. सूर्य. १५. तुमचे शत्रु. १६. माझे शत्रु. १७. तूं नर त्या तुला आणि मी नारायण त्या मला, तूं आणि मी जगदुद्धारार्थ नरनारायण या संज्ञेनें पृथ्वीवर आलों आहों-असा भाव. १८. संसारसागरांत. १९. जे आम्हां दोघांस अनुसरणार नाहींत ते नरकांत जातील. २०. द्रौपदी. २१. दुष्ट दुःशासनानें हातानें ओढलेले केश. २२. भाषणाकडे. २३. द्रौपदीच्या मुखाकडे. २४. कृष्ण. द्रौपदी अतिशयित क्रोधानें बोलत होती म्हणून तिच्या मुखाकडे कृष्णानें पाहिलें नाहीं.

'हे केश धरुनि वोढुनि नेलें दुःशासनें सभेंत, सख्या ! ।
तेव्हां मज आठवली त्वत्पदयुगुली[1] सखी, न अन्य सख्या[2]. ॥ १४
ईणेंचि[3] राखिली बा ! लज्जा, उघडी[4] पडों दिली न सती; ।
यदुकुरुकीर्ति न उरती, जरि मज हे ठाउकी किली[5] नसती. ॥ १५
होते समीप पांचहि पति, अतिमति[6] हे, मनें उदासीनें; ।
ऱ्यां व्यसन साहिलें तें न असेल विलोकिलें कुदासीनें[7]. ॥ १६
सोडी पुनःपुन्हा खळ, न धरुनि लज्जा भया दया, लुगड्या, ।
उघडें पडतें वपु[8] तरि तूं अंतरतासि बा ! दयालुगड्या ! ॥ १७
जे पाप[9] गरद[10] अग्निद[11] सर्वस्वहर[12] स्वदारवस्त्रहर[13], ।
तदुपेक्षा[14] करिति कशी ? हे साक्षात् एकमुख सशस्त्र हरें[15]. ॥ १८
गुरु तात बंधु सुत हित कोणीच मला नसे; जिला असती ।
तीस घडेल असें कां ? हसतील सतीजनव्रता[16] असती[17]. ॥ १९
स्त्रीलंघन[18] करित्यातें प्राकृतहि[19] न साहती, पहा, लावा[20]. ।
हा ! लावावा कर मज ? वार्तेंहि न, पदर ही न हालावा. ॥ २०
ज्यांचीं शस्त्रें अस्त्रें दोर्दंडबळें[21] खळें वृथा केलीं, ।
धिक्[22] कष्टम् ! सर्वयशें सुज्ञानें एकदा लया गेलीं.' ॥ २१
ऐसें वदोनि रडतां कृष्ण म्हणे, 'अंबे[23] ! तूं नकोचि रडों, ।
कळवळतें मन्मन सखि ! या शोकाचळभरें[24] नको चिरडों[25]. ॥ २२

---

१. तुझें पद्युगुल. २. गडणी, मैत्रिणी. ३. या पदयुगुलीनें. ४. निराश्रित पडूं दिली नाहीं. उघडी पडणें=आश्रयहीन होणें. ५. युक्ति. ६. बुद्धिमान्. ७. नीच बटकीनें. ८. शरीर. ९. दुष्ट, नीचाधम. १०. कौरवांनीं पांडवास पूर्वी विष चारिलें होतें म्हणून येथें 'गरद' हें विशेषण योजिलें आहे. (मोरोपंत—आदिपर्व—अध्याय २० पहा.) ११. लाक्षागृहीं कोंडिलें म्हणून 'अग्निद' हें विशेषण. (मोरोपंत—आदिपर्व—अध्याय २८ पहा.) १२. सकळ धन हरणारे. (मोरोपंत—सभापर्व—अध्याय ४.) १३. बांधवांच्या बायकोचें लुगडें ओढून हरण करणारे. (स्व=सगोत्र, बांधव.) १४. त्यांच्याविषयीं हयगय. १५. शिव. १६. पतिव्रतेच्या आचरणाला. १७. जारिणी. १८. स्त्रियेचा अपमान. १९. क्षुल्लक मनुष्यही. २०. लावून पहा, तुलना करून पहा. २१. बाहुबळें. (दोस्+दंड+बळें=भुज+दंड+सामर्थ्यें.) २२. हाय ! हाय !. २३. माय, आई. 'राजपत्नी गुरोः पत्नी मित्रपत्नी तथा सती । पत्नीमाता स्वमाता च सर्वास्ता मातरः स्मृताः ॥.' २४. शोक+अचल+भरें=शोकरूप पर्वताच्या भारानें. २५. चूरडून नको जाऊं, चूर्ण नको होऊं. 'नकोचि रडों' आणि 'नको चिरडों' हा पंतांच्या ठरींव यमकांपैकीं एक आहे.

सखि ! [1]अखिलसतीपूज्ये ! म[2]द्वैर्य तवाश्रुबिंदुसह गळतें, ।
केवळ तुझेंचि न वदन, [3]अमृतद्युतिगौर [4]मद्यशहि मळतें. ॥ २३
तुज गांजिलें जिहीं [5]त्यां [6]ज्यांत यशोनाश अंगनाश तशा ।
वरितील दशा, त्यांच्या शोकें रडतील [7]अंगना शतशा. ॥ २४
असती असीच धर्मीं चित्तीं माझा धरूनि बोल टिकें, ।
झालें कधींच न मृषा, होईल [8]मदुक्त काय हो ! लटिकें ? ॥ २५
होइल मद्वच न [9]मृषा, केव्हांतरि [10]वारिराशि आटेल, ।
[11]ग्रहगण गळेल, हिमगिरिराज खचेल, [12]क्षितीहि फाटेल.' ॥ २६
ऐसें ऐकुनि साध्वी [13]मध्यमपतिच्या मुखाकडे पाहे; ।
जिष्णु म्हणे, 'या प्रभुच्या वचनीं विश्वास आमुचा आहे.' ॥ २७
धृष्टद्युम्न म्हणे, 'कुरुगुरु**भी**ष्मप्रभु जसा तसा **द्रो**ण ।
[14]खळकाळ कां न झाले ? पाहेल कुकर्म सभ्य तें कोण ? ॥ २८
वारावे मारावे खळ, तें केलें न कर्म दोघांनीं, ।
नय सोडुनि, [15]अघ जोडुनि, वद [16]वांचावें कशास [17]मोघांनीं ? ॥ २९
द्रोणाशि [18]मी, **शिखंडी भी**ष्माशि वधील, काय हें खोटें ? ।
मोठें यश यांत [19]भगिनि ! कां तूं कर्णीं [illegible] ३[illegible]
मारावा दुर्योधन **भीमें**, [illegible]ात घालिशी बोटें ? ॥
[illegible]ाहि **कर्ण**, हा नियम ।
न चकेल [illegible], जसा न चुके [21]निमिषहि करितां [22]प्रजासुहानि यम.' ॥

---

१. सकल पतिव्रतांनीं पूजन करण्यास योग्य अशी. २. हें 'सहोक्ति'नामक अलंकाराचें [illegible]रण होय. जेथें सहभाव चमत्कार वाटण्याजोग्या प्रकारें वर्णिलेला असतो तेथें हा सहोक्तिनामक अलंकार होतो. हा अलंकार 'सह' अथवा त्या अर्थाचा दुसरा शब्द योजिल्यानें होतो. ३. चंद्रतेजासारखें स्वच्छ. (अमृतद्युति=चंद्र.) ४. मत्+यश=माझें चंद्राप्रमाणें स्वच्छ यश. ५. त्या गांजणाऱ्या जनांला. ६. ज्या दशांमध्यें. ७. स्त्रिया. ८. मत्+उक्त=माझें भाषण. ९. असत्य. १०. समुद्र. ११. तारासमूह. १२. पृथ्वी. मृगजलस्नानसदृश असंभाव्यतासूचक असेच उद्गार मोरोपंतकृत आदिपर्व-अध्याय १५ गीति ७-८ यांत आहेत. (काव्यसंग्रह पृष्ठ ९१ पहा.) १३. अर्जुनाच्या[illegible] १४. खळांचें शासनकर्ते असे काळ. १५. पातक. १६. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १७. निष्फळ जीवित ज्यांचें त्यांनीं. १८. धृष्टद्युम्न. १९. द्रौपदी. २०. तूं कानांवर हात कां ठेवतेस ? कानांत बोटें घालणें=जी ऐकतों ती गोष्ट मला संमत नाहीं, या गोष्टीला माझी अनुमति नाहीं असें सूचविणें. २१. पळभरही. २२. प्रजा+असु+हानि=लोकांच्या प्राणांचा नाश.

कृष्ण म्हणे, 'शिशुपाळप्रियसख[1] यदुशत्रु शाल्व[2] माराया ।
जरि गुंतलों न असतों, न श्रम हा पावतासि गा[3]! राया! ॥ ३२
समयीं धांवत येतों, द्यूतातें कथुनि दोष राहवितों,[4] ।
जरि न वळते विशृंखळ[5] खळ, खळखळ रक्तपूर[6] वाहवितों. ॥ ३३
पाहोनि राजसूयक्रतु[7] जातां, शाल्वसंकटीं शिरलों; ।
तें शमलें, तों द्यूतव्यसन परिसतां तसाचि मी फिरलों. ॥ ३४
आतां काय उपाय? व्यसन न तुमच्याचि हें गळां पडलें, ।
आम्हां सुहृदांच्याही; बा! मत्पुर[8] सर्व खळखळां रडलें. ॥ ३५
'सरतील क्षणलवसे लघु,[9] केले अवधि अब्द[10] तेरा जे ।
त्वत्सम साधु न लागों देती स्वयशासि शब्द ते राजे'. ॥ ३६
सांत्वन करुनि जातां[11] प्रभु भिजवी स्वाश्रुंनीं स्वसेला[12] हो[13]! ।
ने स्वरथीं वाहुनि कीं ताप न अभिमन्युला स्वसेला हो[14]. ॥ ३७
धृष्टद्युम्नें नेले प्रतिविंध्यप्रमुख[15] जे सकल भाचे; ।
अतितुच्छ त्यांपुढें दिग्द्विरदांच्या[16] गतिविलास कलभाचे[17]. ॥ ३८
नकुळसहदेवभार्या[18] माहेराला स्वबंधुंनीं नेल्या. ।

---

१. शिशुपाळाचा आवडता मित्र (शाल्व राजा). २. शाल्व हा शिशुपाळाचा भाऊ; यानें सकल अयादव करण्यासाठीं घोर तप करून ... रुद्रास प्रसन्न केलें आणि त्याजपासून मयासुरनिर्मित ...ान घेऊन, त्यांत बसून द्वारकेवर वृक्षशिलादिकांची वृष्टि केली, त्याच्यापुढें कोणाचा उपाय चा... हें वर्तमान इंद्रप्रस्थीं कृष्णास कळलें, तेव्हां तो त्याचें पारिपत्य ... करण्यासाठीं परत द्वारकेस ...ानें शाल्वास जर्जर केलें, तेव्हां तो गुप्त झाला. पुढें कृष्णाचें व त्याचें घोर युद्ध झालें, त्यांत ...च्या हातून मरण पावला. (वनपर्व–अध्याय १४-२२; भागवत–स्कंध १० अध्याय ७६-७७). ३. अगा धर्मा. ४. द्यूत हें दोषरूप आहे असें सांगून तें रहित केलें असतें. ५. ज्यांस कांहीं बंधन नाहीं असे, ज्यांस कोणाचीच आडकाठी नाहीं असे, स्वेच्छाचारी, मर्यादातिवर्ती. ६. रक्ताचे पूर. ७. यज्ञ. ८. माझें नगर. (द्वारका.) येथें 'पुर'शब्दाचा पुरवासी लोक असा अर्थ लक्षणावृत्तीनें घेतला पाहिजे. ९. लौकर. १०. वर्षें. (अब्द हा शब्द वर्ष, संवत्सर या अर्थी असा आहे.) ११. द्वारकेस परत जातां. १२. आपलें उपवस्त्र. १३. भगिनी सुभद्रा तिला. १४. होवो. १५. प्रतिविंध्य, सुतसोम, श्रुतकीर्ति, शतानीक, व श्रुतसेन–हीं धर्मादिकांपासून अनुक्रमें झालेल्या द्रौपदीच्या पांच पुत्रांची नांवें. १६. दिग्गजांच्या. (द्विरद=दोन दांत (रद) ज्याला तो, हत्ती.) १७. छाव्याचें. १८. नकुलाची स्त्री करेणुमती ही शिशुपालाची कन्या आणि धृष्टकेतूची भगिनी. हिच्या पुत्राचें नांव निरमित्र. हिला धृष्टकेतु शुक्तिमती नगरीं आपल्या घरीं घेऊन गेला. सहदेवाची स्त्री विजया, ही केकयदेशीय राजाची कन्या आणि कैकयाची भगिनी. हिच्या पुत्राचे नांव सुहोत्र.

तो [1]इंद्रसेन सेवक [2]धात्री दासीही [3]हरिकडे गेल्या. ॥ ३९
[4]द्वैतवनाप्रति [5]धौम्यद्रुपदसुतायुक्त पांडवहि गेले, ।
तेथें मार्कंडेयें दर्शन देऊनि धन्य ते केले. ॥ ४०
तो मुनि म्हणे, 'विलोकुनि तुज झालें [6]स्मरण रामराजाचें, ।
आनंदभरित चरित त्वरित करितसे [7]सुपामरा [8]ज्याचें.' ॥ ४१
द्वैतवनीं द्रुपदसुता पतिला होऊनि [9]तप्ततनु गांजी, ।
वदली लेशहि न कधीं [10]श्रुतिकटु अपराधियांहि [11]अनुगां जी. ॥ ४२
'[12]द्यूतें महाव्यसन असें नायकिलें काय [13]नरवरा! कानीं? ।
सर्वस्व हरुनि सहसा केलाशि अरण्यचर [14]वैरीकानीं. ॥ ४३
[15]श्रोतृश्रुतिहर कीं तूं वदता सुविचार[16]रवेंनि कथा [17]पिकसा, ।
व्यसनांत बुडालास भ्रात्यांसह सुज्ञ जरि, तथापि कसा? ॥ ४४
[18]प्रासादीं नगरीं जे वसले ते तरुतळीं [19]दवस्थानीं ।
झाले [20]विच्छवि [21]रविकविपविधरसे बंधु [22]असदवस्थानीं. ॥ ४५
[23]यांसि पहातां कैसें व्याकुळ मानस नव्हे तुझें राया!? ।
तुज काय दया यांची? प्राणांसहि सिद्ध तूं [24]अव्हेराया. ॥ ४६
व्यसनप्रसंग तुजही तेजस्विवरासि [25]अंकें हा रविला, ।
झालासि दीन, वाटे द्यूतीं तोहि प्रताप [26]हारविला. ॥ ४७
या [27]दुष्टाप्रति आलें सोडुनि मेल्या दशानना [28]शील; ।
[29]ती कोणा धीराच्या [30]धृतिला माझी दशा न [31]नाशील? ॥ ४८

---

१. युधिष्ठिराचा सारथि. २. दाया. ३. कृष्णाकडे. ४. वनपर्व–अध्याय २३-२४ पहा. ५. धौम्य, द्रौपदी, यांहींकरून युक्त. ६. अध्याय २५ पहा. ७. अत्यंत मूर्खास, अतिनीचाला. ८. ज्या रामाचें चरित. हें अर्ध अनुप्रास नामक अलंकाराचें उदाहरण आहे. ९. संतप्त आहे तनु (शरीर) जिची अशी. १०. कानास वाईट लागणारें असें. ११. सेवकांस. १२. अध्याय २७ पहा. १३. हे नरवर्यी धर्मा. १४. नीचांनीं. (दुर्योधनशकुनिकर्णादिकांनीं.) १५. श्रोत्यांच्या कर्णास मोहणाऱ्या अशा. १६. खाण. १७. कोकिळेसारिखा. १८. राजवाड्यांत. १९. अरण्यांत किंवा वणवा लागण्याजोग्या स्थानीं, वनप्रदेशांत. २०. वि+छवि=तेजोहीन, कांतिरहित. २१. सूर्य (रवि), ब्रह्मदेव (कवि), आणि इंद्र (पविधर) यांजसारखे. २२. दुष्ट अवस्थानीं वाईट ठिकाणीं. २३. या तेजोहीन भावांला. २४. त्यागण्यास. २५. कलंक, डाग. २६. 'हा रविला' आणि 'हारविला' हा पंतांच्या ठरीव यमकांपैकीं आहे. २७. दुर्योधनाकडे रावणाचें शील (दुष्ट वर्तन) आलें. २८. दुर्वर्तन. २९. माझी दशा, मला प्राप्त झाली ती दशा. ३०. धैर्याला. ३१. भंगील.

ती स्पर्शली नसेलचि कोणाहि सभेंत दुर्दशा स्त्रीतें, ।
योग्य पहाया काय द्रोण, नदीसुत[1], तुम्हींहि शास्त्री[2] तें? ॥ ४९
सर्वत्र क्रोध जसा तैशी सर्वत्र[3] न क्षमा साजे, ।
ते कैसे न वधावे, तोडिति परघातदक्ष[4] मासा जे? ॥ ५०
येऊं द्या कोप मनीं, एकिकडे संप्रति क्षमा राहो, ।
कां गोष्पदांत[5] बुडतां? यश रक्षा, खळ विपक्ष[6] मारा हो[7]! ॥ ५१
क्रोध[8] असावा समयीं, केवळ वश चित्त न क्षमेला हो[9], ।
कोप त्यजितां जरि जमदग्नि[10] धनुर्वेददक्ष, मेला हो!' ॥ ५२
धर्म म्हणे, '[11]मतिमति! सति! [12]यतिपतिगति अतिसमर्थ जो हरि तो ।
म्हणतो, 'क्षमाचि बरवी,' परवीरयशें स्वसद्गुणें हरितो. ॥ ५३
व्यास द्रोण विदुर कृप भीष्म श्रीकृष्णनाथ हे सुकवी[13] ।
म्हणती, 'क्षमा शिवतरु[14]प्रति पोषी, क्रोध सर्वथा सुकवी[15].' ॥ ५४
व्याघ्र व्याळ[16] क्रूर, क्रूरतर क्रोध, बोधरोधक[17] हा[18], ।

---

१. भीष्म. २. ह्या गीतिमध्यें 'शास्त्री' असा शब्द आहे परंतु तो सार्थसाधित नाहीं. 'शस्त्री' असा असावा, कारण हें वाक्य वीरश्रीसूचक आहे. 'तुम्ही वीर असून माझी ही दुर्दशा कशी पाहिलीत? जी दुर्दशा कोणाहि धीराच्या धृतिला (धैर्याला) नाशिल्याशिवाय राहणार नाहीं (गीति ४८), आणि जे परघातदक्ष मांसास तोडितात ते कसे न वधावे? (गीति ५०),' हें द्रौपदीचें म्हणणें वीरश्रीविषयींच आहे. क्षत्रियांचें शास्त्र म्हणजे शस्त्रविद्या होय. त्या शास्त्रांत म्हणजे शस्त्रविद्येंत जे निपुण ते शास्त्री असा अर्थ करून निर्वाह केला तरी चालेल. ३. ही गीति सुभाषितरूप आहे. ४. दुसऱ्याचा घात करण्याविषयीं कुशल. ५. गो+पद=गाईचें पाऊल, तत्परिमित जागा. ६. शत्रु. ७. अहो. ८. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. होवो. १०. जरि जमदग्नि धनुर्वेददक्ष (तरि तो) कोप त्यजितां हो [आहे] मेला–असा अन्वय. जमदग्नि हा परशुरामाचा पिता. हा धनुर्वेदांत अत्यंत निपुण आणि अतिकोपी होता. याची स्त्री रेणुका, हिच्या हातून नदीवरून स्नान करून घरीं येण्यास विलंब झाला, म्हणून याला फार राग आला. तेव्हां तिचा वध करावा असें याच्या मनांत आलें, पण तें कर्म करण्यास कोणी धजेना. शेवटीं हिचा वध याच्याच आज्ञेनें परशुरामानें केला, तेव्हां हा प्रसन्न झाला आणि यापुढें कोणावर कोप न करितां कोपरहित असावयाचें, असें यानें परशुरामास कबूल केलें. हा इतका क्रोधरहित झाला कीं, याला क्षमाशील पाहून सहस्रार्जुनाच्या पुत्रांनीं याचा वध केला. (वनपर्व–अध्याय ११६.) ११. हे बुद्धिमति. १२. यतिपतींला (थोर संन्यासी जनांला) गति (मुक्ति, आश्रयस्थान) असा जो हरि तो. १३. उत्तमकवी, श्रेष्ठ ज्ञानी. १४. कल्याणवृक्षाप्रत. १५. शुष्क करी. १६. सर्प. १७. ज्ञानाचा नाशक. १८. हा क्रोध.

[1]क्रोधवशासि विलोकुनि बहु म्हणति [2]स्वहिततत्त्वशोधक '[3]हा!' ॥ ५५
वरिली सुयोधनें [4]ती, म्याही [5]भावुकपद [6]क्षमा, तींत ।
नर जे [7]हिला न सेविति, दवडिति हित ते [8]अदक्ष मातींत. ॥ ५६
त्यजुनि [9]तिला बहु तरले, एकहि न [10]हिलें त्यजूनि तरला गे! ।
कृष्णे! क्षमा सुधारस रसिकां, रस गोड कां इतर लागे? ॥ ५७
[11]श्रितहित करिती, हरिती सर्वव्यसन [12]क्षमाभवानी हो! ।
[13]आराधावी आम्हीं [14]खलमहिषापहृतवैभवानीं हो.' ॥ ५८
भीम [15]म्हणे, 'देवा! त्वां जन्मापासूनि सेविला धर्म ।
त्याचें हें फळ, नाहीं धन मान स्थान यश, नसे [16]शर्म. ॥ ५९
ज्यांशीं जैसें त्यांशीं तैसें जरि वर्ततासि, तरि अरि ते ।
हरिते कां सर्वस्व? व्यसनीं आम्हांसि मग्न कां करिते? ॥ ६०
न क्षत्रिय तूं, साधु ब्राह्मण [17]आम्नाय पढविता पढता, ।
[18]मानधन क्षत्रिय या व्यसनें [19]ज्वलनें [20]कटाहसा कढता. ॥ ६१
[21]राज्योपद्रव गेला, झाला [22]अभिलषित लाभ [23]अजिनाचा, ।
परमोत्सवीं उगे कां? अजि गा! उडवा [24]स्ववल्क, अजि! नाचा. ॥ ६२
काय म्हणों तुज आर्या! ब्राह्मणवृत्तीस काय अनुसरसी? ।
[25]त्यजुनि जलधिवसति कशी [26]तिमिंगिलें सेविजेल [27]तनुसरसी? ॥ ६३
श्रेयस्कर [28]स्वधर्म त्यागुनि घ्यावी न [29]विप्रता पदरीं, ।
[30]प्रकटी यशोर्थ, बुडवी न कधीं [31]त्वत्समकवि प्रताप [32]दरीं. ॥ ६४

---

१. क्रोधाधीन पुरुषाला. २. आत्महिताचें तत्त्व (मुख्य बीज) शोधणारे लोक हायहाय म्हणतात. ३. खेदार्थी अव्यय. ४. क्षमा, म्हणजे पृथ्वी. ५. कुशलस्थान अशी. ६. क्षांति. ७. ह्या क्षांतीला, क्षमेला. ८. मूर्ख. ९. पृथ्वीवाचक क्षमेला. १०. क्षांतिवाचक क्षमेला. ११. आश्रित जनांचें कल्याण. १२. क्षमारूप पार्वती. १३. सेवावी. १४. दुर्योधनादिक खलरूप-महिषांनीं (असुरांनीं) हरण केलें वैभव ज्यांचें अशांनीं. (पांडवांनीं.) १५. अध्याय ३३ पहा. १६. सुख. १७. वेद, श्रुति. १८. मान हेंच आहे धन ज्याचें असा. १९. अग्नीनें. २०. तैलकढईसारखा. २१. राज्य असल्यामुळें होणारा त्रास चुकला. २२. वांछित. २३. मृगचर्माचा. २४. आपलें वल्कल. २५. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २६. मत्स्यविशेषानें. हा मासा तिमि नामक मत्स्याहून मोठा असतो. याची लांबी शतयोजनांपेक्षां जास्त असते. २७. अल्पसरोवर. २८. क्षत्रियधर्म. २९. द्विजवृत्ति, द्विजांचा भिक्षाधर्म. ३०. दाखवी. ३१. तुझ्यासारखा पंडितपुरुष. ३२. भयीं, संकटांत.

हे आर्या[1] ! हे भार्या, हे आम्हीं, योग्य काय वनवासा ? ।
वल्काजिनधर वससी, स्वस्थ कसा या वनांत अनवासा[2] ? ॥ ६५
देतील राज्य न सुखें, धरिजे कितवोक्तिचा[3] न विश्वास, ।
काळाचाहि भरंवसा नाहीं जो नित्य खाय विश्वास[4]. ॥ ६६
द्वादश वर्षे गहनीं[5], दुसरें अज्ञात वर्ष तेरावें ।
लोटावें केंवि बरें ? दूरविचारेंकरून हेरावें[6]. ॥ ६७
वसवेल कथंकथमिति[7] आम्हां तप[8] एक सा[9] जणां रानीं ? ।
न कळत कसें बसावें तेजें विश्वांत सांजणारांनीं[10] ? ॥ ६८
रविवरि अभ्रें तैशीं वस्त्रें तव विग्रहा[11]उपरि मळकीं, ।
गुप्ताहि मृगमदातें[12] प्रकट करितसे स्वयें सुपरिमळ[13] कीं. ॥ ६९
अज्ञातवास करितां जरि आम्ही अरिचरांसि[14] आढळलों, ।
स्वपदचरमसोपानापासुनि[15] देवा ! न काय गा ! ढळलों ? ॥ ७०
चरमदिनींहि[16] उमगतां व्हावें वनवासनिष्ठ पुनरपि कीं ? ।
तो न द्रवेल सुजनीं, कल्पुनि काकत्व जेंवि कुनर पिकीं[17]. ॥ ७१
मरती वनांत पडतां बा ! जेंवि न पावतां नदा[18] यादें[19], ।
आम्हीं तसें मरावें, करिजेल न राज्यदान दायादें ! ॥ ७२
सोडील कसा तीतें ? जी देती नित्य लाभ नव धरणी, ।
वध्यचि खळ, धर्मचि हो, चोरांचा[20] दोषहेतु न वध रणीं. ॥ ७३
भणगापरि[21] न वस वनीं, म्हण गा ! बापा ! मनुष्यदेवा ! हूं[22], ।
दे बाहूंस यश रणीं खळखळ खळरक्तपूर[23] दे वाहूं. ॥ ७४
पुरुषाच्या शोभेला जें बळ खळविजय दे न नग[24] दे तें, ।

---

१. धर्मराजा. २. अनवासा=नवा नव्हे असा, बहुत-दिवस वल्कलें आणि मृगचर्में धारण करून वनांत असलेल्या मनुष्यासारखा. ३. लबाडाच्या भाषणाचा. ४. जगाला. ५. वनांत. ६. पहावें, मनांत आणावें. ७. कसें कसें, कसें तरी, मोठ्या कष्टानें. ८. बारा वर्षें. ९. सहा. १०. शोभणारांनीं. हें अर्ध सुभाषितरूप आहे. ११. विग्रह=शरीर. 'विग्रहो युधि विस्तारे प्रविभागशरीरयोः' इति हैमः. १२. कस्तूरीला. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १३. सुवास. १४. शत्रूच्या बातमीदारांस. १५. स्वकीयपदरूप (चरम सोपानापासूनि) शेवटल्या पायरीवरून. १६. शेवटच्या दिवशींही. १७. कोकिलेचे ठायीं. १८. महानदीला. १९. जलजंतूनें. २०. चोराचा (दुर्योधनाचा) वध रणांत केला असतां तो दोषहेतु नाहीं. तर तो धर्मच होय. २१. भिकाऱ्यासारखा. २२. अंगीकार, अनुमति, इशारा, कबूली इत्यादि अर्थ दाखविणारें अव्यय. २३. दुष्टांच्या रक्ताचा पूर. २४. अलंकार. हें अर्ध सुभाषितरूप आहे.

हित सत्य, असें म्हणतां देवा! किति मी म्हणों ‘न[1] न’ गदेतें.’ ॥ ७५
धर्म म्हणे, ‘भीमा! बा! दुर्व्यसनीं मीच हेतु तापातें, ।
दुःखीं सांश्रित[2]हि बुडे, करितो जो मीलिताक्ष[3] पापांतें. ॥ ७६
तेव्हांचि क्षण निष्ठुर होउनि हे मूर्तिमंत पाप कर ।
त्वां जरि केले असते भस्म, न होते तुम्हांसि तापकर. ॥[4] ७७
द्यूताला युद्धाला जावेंचि बलाविल्या, प्रतिज्ञा ती ।
रक्षूं जातां, कपटें हरिता झाला पदा[5]प्रति ज्ञाती[6]. ॥ ७८
हे कृष्णा[7] तरि[8] झाली, तरलों त्या दुस्तरा[9]हि आंवर्ता[10], ।
बुडतोंचि, या सतीचा[11] महिमा जरि काय हात आंवर्ता[12]? ॥ ७९
पूज्या[13] मर्यादा, परि भ्याला कांहींहि न शकुनी तीतें; ।
तो नावरेचि घातक दुर्जन जो होय वशें[14] कुनीतीतें. ॥ ८०
दाटूनि अनुद्यूतीं[15] आणुनि पण करविला पुनरपि, तया[16]।
लंघूं कैसें? पांडी[17] नरकीं जो अनृत[18] तो कुनर पितया[19]. ॥ ८१
प्राणांस तुम्हांसहि मी त्यजिन, न धर्मासि[20] पळहि सोडीन, ।
हें व्रत धर्मचि रक्षू, बापा[21]! न कदापि अयश जोडीन. ॥ ८२
बा! गा! धर्माच्या तों कोणी सोडूं नयेचि कासेतें[22], ।
निष्फळ होतीं मेघें त्यजिलीं आलींहि जीविका[23] सेतें[24]. ॥ ८३
निजहितकरधर्माचें कुशलें विटवूं नयेचि मन कांहीं, ।
यापरि[25] पोषणपालनलालन करिजे न अन्यजन[26]कांहीं. ॥ ८४

---

१. नाहीं नाहीं असा निषेध. २. आश्रितजनांसह. ३. मीलित+अक्ष=मिटले आहेत+डोळे ज्यानें असा. ४. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ५. राज्यपदाला. ६. स्वजन, गोत्रज, बांधव. ‘ज्ञाति’ हा शब्द संस्कृतांत पुंलिंगी आहे. ७. द्रौपदी. ‘नौका तरि हे झाली’ असाही पाठ आहे. ८. नौका. ९. तरून जाण्यास कठिण. १०. भोंवऱ्यास. ११. द्रौपदीचा. १२. आटोपता. १३. पूजावयास योग्य, देवाप्रमाणें मान देऊन पाळण्यास योग्य. १४. स्वाधीन. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १५. मागून केलेल्या द्यूतांत. १६. त्या पणाला. १७. हा अंश सुभाषितरूप आहे. १८. खोटा, असत्यसंध. १९. बापास. २०. प्रतिज्ञापालनादिधर्मास. २१. भीमा. २२. धर्माची कांस सोडूं नये. धर्माची कांस धरावी=संकटांतून पार पाडण्यासाठीं समर्थ जो धर्म त्याचा आश्रय करावा. २३. जीविका आलेलीं–पिकास आलेलीं शेतें, (जर) मेघें त्यजिलीं (तर) निष्फळ होतात. ही गीति सुभाषितरूप आहे. २४. शेतें. २५. या धर्माप्रमाणें. २६. इतर पितरांनीं धर्म हा एक पिताच मानिला आहे. ही गीति व पुढील ८५ वी आणि ८६ वी गीति ह्या सुभाषितरूप असून त्यांत सदुपदेश आहे.

[1]अंभोदास पहाती जैशीं पसरूनि नित्य [2]आ शेतें, ।
धर्मासि तसीं [3]भूतें, करि पूर्ण समर्थ [4]हैंचि आशेतें. ॥ ८५
साधु म्हणति, 'जो न करी धर्माशीं नीतिशीं विरोधा, त्या ।
रक्षीं व्यसनीं, [5]तदितर जन उदकीं [6]लोष्ठसा [7]विरो, [8]धाता !' ॥ ८६
म्हणऊनि अनुसरावें सुज्ञें न [9]क्रोधलोभकाममता, ।
पतनार्थ कां अहंता पोषावी, गा! तशीच [10]कां ममता? ॥ ८७
तुमचे प्रताप जे जे [11]दिग्विजयीं प्रगटले न ते लटिके, ।
कुरुगुरुपुढें परि न [12]गुरु, यज्ञांत [13]घृतापुढें न तेल टिके. ॥ ८८
भक्षुनि अन्न न समयीं [14]अंतर देती भले [15]नयज्ञाते, ।
द्रोणकृप युद्धयज्ञा वरितील, तसे [16]परां न यज्ञा ते. ॥ ८९
आम्हीं नियम त्यजितां, न चुकेल [17]नदीजही [18]उगारा या, ।
त्या सर्वज्ञ प्रभुला बा! कोण म्हणेल, 'गा! उगा, राया !' ॥ ९०
हे सर्व असोत, जया वीरप्रवरा [19]सुयोध नत सारे, ।
एकचि कर्ण पुरे तो, [20]कार्यपति जसा, [21]सुयोधन तसा रे ! ॥ ९१
यांसीं कलि करणें हें न म्हणेल कधीं [22]सुधी नर [23]विहितें रे! ।
धर्मन्याय त्यजितां तेजस्वीही [24]तमीं न रविहि [25]तरे.' ॥ ९२
भीम उगाचि बसे, तों ये [26]भगवान् व्यास सुप्रसन्नमनें, ।
जाणों साक्षात् धर्मचि तो, ते झाले [27]कृतार्थ [28]तन्नमनें, ॥ ९३

---

१. मेघास. २. मोठ्या उत्कंठेनें. ३. प्राणी धर्मास तसें पाहोत. ४. धर्मचि. ५. त्याहून अन्य, विरोध न करणाऱ्याहून भिन्न म्हणजे विरोध करणारा जन. ६. ढेंकुळासारखा. ७. झरून जावो. ८. हे ब्रह्मदेवा. ९. राग, लोभ आणि काम यांच्या मताला, यांच्या अभिप्रायाला. १०. ममत्वबुद्धि. ही गीति सुभाषितरूप आहे. ११. राजसूययज्ञाच्या पूर्वी केलेल्या दिग्विजयांत; अर्जुन उत्तरेस, भीम पूर्वेस, नकुल पश्चिमेस, आणि सहदेव दक्षिणेस गेला इत्यादि वर्णन सभापर्वांत आहे. (सभापर्व–अध्याय २ गीति १-४ पहा.) १२. मोठे. १३. तुपापुढें. १४. अंतर देणें=आपले सुखदु:खाचे विभागी जे इष्टजन अथवा पोषणकर्ते त्यांस समयीं दु:खांत सोडून जाणें. १५. नीतिप्रवीण. हें अर्ध सुभाषितरूप आहे. १६. अन्य प्रकारच्या यज्ञास ते वरणार नाहींत. १७. भीष्म. १८. आम्हावर शस्त्र उचलून रोखून धरण्यास. १९. उत्तम योद्धे. २०. येथें 'कार्यपति'च्या ऐवजीं 'कार्यपुट'(आळशी पुरुष) असा शब्द असावा काय? २१. दुर्योधन. २२. सुज्ञ. २३. योग्य. २४. अंधकारांत. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २५. हें धर्माचें भाषण मूळ वनपर्वाच्या ३६व्या अध्यायांत आहे. २६. ज्याला भग आहे तो. भग म्हणजे 'समग्र ऐश्वर्य, धर्म, यश, वैराग्य, श्री आणि मोक्ष यांचा समूह.' या सहांनीं जो संपन्न तो भगवान्. अथवा 'उत्पत्तिं प्रलयं चैव भूतानामगतिं गतिम् । वेत्ति विद्यामविद्यां च स वाच्यो भगवानिति ॥' (विष्णुपुराण). २७. सफलमनोरथ. २८. त्याला केलेल्या नमनानें, त्याला नमन केल्यानें.

दिव्यास्त्रलाभकारण[1] सद्विद्या[2] तो दयांबुराशि[3] कवी ।
एकांतीं राज्ययशःकामा[4] त्या श्रीयुधिष्ठिरा शिकवी. ॥ ९४
धर्महि, मुनि गेल्यावरि[5], त्याच्या आज्ञेवरूनि **जिष्णूतें**[6] ।
सद्विद्या उपदेशी, जैसा **कश्यपमहर्षि** **विष्णूतें**[7]. ॥ ९५
ती **काम्यकीं**[8] प्रतिश्रुति[9] विद्या उपदेशिली तया विधिनें, ।
जी आपणासि जैसी दिधली **द्वैपायनें**[10] दयानिधिनें. ॥ ९६
धर्म असें वदला[11] कीं, '**जिष्णो**! सुतपें समस्त ताप सरे, ।
हो यास्तव आम्हां या व्यसनीं तारावयासि तापस[12] रे! ॥ ९७
या विद्यासामर्थ्यें तप करितां सर्व विघ्नें[13] पळतील, ।
तुज दिव्यास्त्रें द्याया शक्रादिकलोकपाळ[14] वळतील. ॥ ९८
ज्याचें भाषण सोडुनि बाळपणीं सुस्वरीं[15] किमपि न रतूं[16], ।
त्या **व्यासें** कथिलें कीं, 'नारायणसख[17]पुराणऋषि नर[18] तूं; ॥ ९९
करिशील महत्कर्में[19] तूं **नारायणसहाय** शुभशील[20], ।
त्वद्यश[21] म्हणेल, 'किति सुरधेनूधा[22]! सद्रसासि[23] दुभशील[24]?' ॥ १००
हो सिद्ध, शीघ्र ये, बा! हे बाहु तुझे असोत जयशाली[25], ।
हो[26] वृष्टि तपोभ्राची[27], बहु हृत्क्षेत्रीं[28] पिकोत नयशाली[29].' ॥ १०१
भ्रात्यांतें भार्येतें **जिष्णु** म्हणे, 'जें अभीष्ट[30] सत्वर तें ।
होईल सिद्ध, न चिरव्यसनीं बुडिजे कधींहि सत्वरतें[31]. ॥ १०२

---

१. दिव्यास्त्रांच्या प्राप्तीला कारणभूत अशी. २. प्रतिश्रुतिनामक उत्तम विद्या. ३. दयासागर सुज्ञ व्यास. ४. राज्य आणि यश मिळावें असा काम (इच्छा) आहे ज्यास त्याला. (वनपर्व–अध्याय ३६ पहा.) ५. व्यास अंतर्धान पावल्यावर. ६. अर्जुनातें. ७. येथें वामनावतारकथेचें अनुसंधान केलें आहे. विष्णु वामनावतारीं कश्यपादितींच्या उदरीं जन्मास आला. मुंज झाल्यावर भिक्षुकीस (व तपश्चर्येस) निघतेवेळीं कश्यपानें यास उपदेश केला, अशी कथा आहे. ८. काम्यकवनांत. ९. विद्याविशेष. १०. व्यासानें. (यमुनेच्या बेटांत म्हणजे द्वीपांत यांचें अयन [जन्म] झालें म्हणून याला 'द्वैपायन' असें म्हणतात.) ११. महाभारत–वनपर्व–अध्याय ३७ पहा. १२. तप करणारा हो. १३. अरिष्टें. (हा शब्द संस्कृतांत पुंलिंगी आहे). १४. इंद्र, अग्नि, वरुण, वायु, कुबेर, यम ईशान आणि निर्ऋति असे आठ दिक्पाल. १५. चांगल्या गाण्यांत. १६. आपण रतत नव्हतों. १७. कृष्ण, विष्णु. १८. विष्णूचा अवतार, नारायणाचा सखा, ऋषिविशेष; १९. मोठीं कार्यें. २०. शुभ (मंगलकारक) आहे शील (स्वभाव) ज्याचा तो. २१. तुझें यश. २२. हे कामधेनूच्या कासे. (ऊधस्=कांस, ओंटी.) २३. उत्तम दुग्धास. २४. देशील. २५. विजयी. २६. होवो. २७. तपरूप मेघाची. २८. हृदयरूप शेतांत. २९. नीतिरूप तांदुळ. (शालि=भात, साळ.) ३०. ईप्सित कार्य. ३१. सत्वसंपन्न, धर्मशील.

धौम्याच्या धर्माच्या क्षणहि चुकावें तुम्ही न सेवेला,[1] ।
गुरुचरणा यश जैसें स्वर्गींच्याही तसें नसे वेला.' ॥ १०३
मग जाय तप कराया गुरुपद वंदोनि इंद्रकीलनगा,[2] ।
तद्विरहितां[3] दिसे तम[4] दिवसा, नसतांहि नेत्रमीलन[5] गा ! ॥ १०४
'एथेंचि रहा' ऐसें गगन[6] म्हणे त्या पुरातना ऋषितें, ।
प्राशी[7] तपस्विवेष[8] स्वर्नायक त्यासि दृग्द्वयें[9] तृषितें. ॥ १०५
शक्र म्हणे, 'कां धरिलें जें शास्त्रविरुद्ध[10] तापसत्वा तें ? ।
शांतें येथ तपावें, लेशहि द्यावा न ताप सत्वातें.[11] ॥ १०६
क्षत्रिय कीं ब्राह्मण तूं शस्त्रपरिग्रह[12] किमर्थ ? सांग मला, ।
त्वच्चित्ताला तापसविरुद्ध हा वेष योग्य कां गमला ?' ॥ १०७
पार्थाचा निज निश्चय कळतां, दर्शन तयासि वासव[13] दे, ।
खेदानंदाश्रुभरें भिजवुनियां उत्तरीयवास[14] वदे. ॥ १०८
'पुत्रा[15] ! वर माग, तुला द्यावें म्यां काय गा ! यशोधीतें[16] ? ।
जाणसि, जें प्रेम, मुखें वत्साचा काय[17] गाय शोधी,[18] तें.' ॥ १०९
पार्थ म्हणे, 'दिव्यास्त्रें जी[19] ! वर मजलागिं हाचि शोभन[20] द्या ।
तृषितासि[21] यथाभिलषित[22] जल देती, न धरितीच लोभ नद्यां.[23]' ॥ ११०
इंद्र म्हणे, 'पुत्रा ! हें काशाला ? दिव्य भोग माग मला, ।
तुज जो अनर्थ केवळ अर्थ तसा पंडितोत्तमा ! गमला.' ॥ १११

---

१. स्वर्गलतेला. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २. इंद्रकील नामक पर्वता. इंद्रकील हें हिमालयपर्वताचें एक प्रख्यात शिखर आहे. येथेंच इंद्रानें अर्जुनास दर्शन दिलें. येथेंच अर्जुनानें तपश्चर्या केली आणि किरातवेषधारी शंकराबरोबर युद्ध करून त्यास प्रसन्न करून त्याजपासून वरदान घेतलें. येथेंच वरुणादिलोकपालांनीं अर्जुनास नानाविध अस्त्रें दिलीं. ३. अर्जुनविरहित जे धर्मभीमादिक त्यांस. ४. अंधकार. ५. डोळे झांकणें. ६. आकाशवाणी. ७. डोळ्यांनीं प्राशन करणें= आदरानें आणि प्रेमानें पाहणें. ८. तपस्व्याचा वेष घेतलेला स्वर्गाचा नायक इंद्र. ९. दोन डोळ्यांनीं. १०. धनुष्य बाण कवच इत्यादि आयुधें धारण करणें हें तापसधर्मास विरुद्ध आहे आणि हें स्थल तर शांत दांत तपस्विजनांचें स्थान, तेव्हां त्या स्थलीं अर्जुनाचा क्षत्रियवेष त्या स्थलास उचित नव्हता—असें तात्पर्य. ११. प्राण्यातें. १२. शस्त्र धारण करणें. १३. इंद्र. १४. शेला, पांघरावयाचें वस्त्र. १५. अर्जुन हा इंद्रापासून कुंतीला प्राप्त झाला म्हणून तो इंद्राचा पुत्र. (मोरोपंत—आदिपर्व—अध्याय १८ गीति ७५-८४ पहा. काव्यसंग्रह—पृष्ठ १०९-११०.) १६. कीर्तिसागरातें. १७. देह. १८. चाटून स्वच्छ करिते. १९. अजी (इंद्र.) २०. हितावह. २१. तान्हेल्यामि. २२. यथेच्छ. २३. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे.

पार्थ म्हणे, 'दिव्यहि जे सुखभोग नकोत, बा! [1]दयाभ्रा! ते. ।
केंवि वनीं टाकावे? वांछिति माझ्या हितो[2]दया भ्राते. ॥ ११२
मज दिव्यभोग रोगचि; तें सुख, जें काय दुःख [3]शुद्धरणीं ।
तो [4]शवचि [5]बंधुहृद्गतशल्याच्या जो न योग्य उद्धरणीं.' ॥ ११३
शक्र म्हणे, 'बा! तुजसम तूंचि [6]भला [7]विश्वमहिततरशील, ।
व्यसनातें बंधूंसह [8]निर्दाळुनि सर्व [9]अहित तरशील. ॥ ११४
'[10]शंभुप्रति आराधीं आधीं, साधीं प्रसाद या [11]अगमीं, ।
येईन लोक[12]पाळांसह सत्कारावया तुला मग मीं.' ॥ ११५
ऐसें [13]धनंजयाला उपदेशुनि गुप्त होय [14]मघवा हो! ।
शिवभक्तियशःश्रवणें प्रेमाश्रुभरासमेत [15]अघ वाहो. ॥ ११६

अध्याय तिसरा.

तरली [16]चांडाळीहि न [17]भावें वाहोनि शंकरा बेल, ।
हें जाणतां बुध न कां त्याच्या भजनीं विशंक रावेल? ॥ १
[18]जिष्णूग्रतपें भ्याले सर्व [19]तपःश्रीविलाससदन मुनी, ।
कैलासाप्रति जाउनि कथिती श्रीशंकरासि पद नमुनी. ॥ २

---

१. हे करुणामेघा. २. कल्याणप्रद उत्कर्षास. ३. शास्त्रोक्त रणांत. ४. प्रेतासारखा. ५. भावाच्या हृदयांत गेलेल्या शल्यास बाहेर काढण्याच्या कामीं जो योग्य (समर्थ) नाहीं तो शवचि होय. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ६. हें 'अनन्वय' नामक अलंकाराचें उदाहरण आहे. जेथें ज्याची त्यालाच उपमा दिली असते म्हणजे जेथें उपमानत्व आणि उपमेयत्व हीं दोन्हीं एकाच वस्तूवर असतात, तेथें हा अलंकार होतो; जसें—गगन हें गगनासारखें आहे, रामरावण हे रामरावणोपम होत. याचें लक्षण व उदाहरण—'उपमानोपमेयत्वं यदेकस्यैव वस्तुनः । इंदुरिंदुरिव श्रीमानित्यादौ तदनन्वयः ॥ गगनं गगनाकारं सागरः सागरोपमः । रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव ॥'. ७. जगास अत्यंत वंद्य स्वभाव ज्याचा तो. ८. नाश करून. ९. शत्रु. १०. शंकराला. ११. या पर्वतीं. १२. कुबेर, वरुण, यम, वन्हि, वायु इत्यादि आठ लोकपाल. या अष्ट लोकपालांत इंद्राचाही समावेश होतो. १३. अर्जुनानें राजसूय यज्ञांत दिग्विजय करून सकल राजांस पराजित करून त्यांचें 'धन जिंकून' आणिलें यावरून 'धनंजय' असें त्यास नांव पडलें. १४. इंद्र. १५. पाप. १६. या चांडाळीची कथा 'शिवलीलामृत' अध्याय ३ ओंव्या १४६-१८० यांत आहे. हिचें पूर्वजन्मीचें द्विजकुळांतील नांव सुमित्रा असें होतें. चांडाळयोनींतील नांव उपलब्ध नाहीं. १७. भक्तीनें. १८. अर्जुनाच्या भयंकर तपश्चर्येनें. १९. तपोलक्ष्मीचीं विलासमंदिरें असे मुनि.

भगवान् म्हणे, 'न भ्यावें, त्याचा[1] संकल्प शुद्ध, मी जाणें, ।
स्वस्थमनें स्वस्थानाप्रति, टाकुनि भीतिला, तुम्हीं जाणें[2].' ॥ ३
मुनि जातांचि, किरातत्वाच्छादन[3] मूर्तिसंपदेवरि[4] घे, ।
जेथें पार्थ तप करी, त्याचि वनीं सानुकंप[5] देवें[6] रिघे. ॥ ४
आला किरातरूपी शिव जिष्णुसमीप, तोंचि हननाश[7] ।
दानव[8] वराहरूपी मूकहि[9] करि जो तपस्विजननाश. ॥ ५
दुष्टासि एकदांचि प्रेक्षिति[10] ते वीर पार्थ भव[11] दोघे, ।
म्हणती, 'शरप्रहारा[12], तापसजन 'हाय हाय !' न वदो, घे[13].' ॥ ६
खरतर[14] नरहरशर[15] परजीवन[16] एकक्षणींच संहरिती, ।
सम देवें[17] भक्त[18], ऐसें जाणों कळवावया असें करिती. ॥ ७
अर्जुन म्हणे, 'किराता[19] ! त्वां मृगयाधर्म[20] लंघिला दर्पें[21], ।
स्वांतार्थ[22] मजपुढें अघ[23] केलें, खगपतिपुढें[24] जसें सर्पें. ॥ ८
हा प्रथम मत्परिग्रह[25] असतां, त्वां ताडिलें कसें किरितें[26] ? ।
पाथरवटें[27] स्वटंकें[28] भेदावें वज्रपाणिसह[29] गिरितें[30] !' ॥ ९

---

१. त्या अर्जुनतापसाचा. २. जावें. ३. किरातत्व (किराताचा वेष) हेंच आच्छादन. ४. शरीररूप संपत्तीवर. ५. स+अनुकंपा=दयान्वित, सदय. ६. महादेव. ७. मारण्याची इच्छा धरणारा. (हनन+आशा.) ८. दैत्य. ९. मूकनामा दैत्य. वराहरूप (डुकराचें रूप) धारण करून, किरात आणि अर्जुन यांच्या युद्धास निमित्त झालेला असुर. हा कपटी असुर अर्जुनापाशीं आला असें पाहून, किरातरूपधारी शंकरानें अर्जुनाचें संरक्षण करावें या हेतूनें त्या दैत्यावर बाण सोडला, इतक्या संधींत अर्जुनाचाही बाण त्याजवर आला. पण त्यापूर्वीच तो दैत्य शंकराच्या बाणानें गतप्राण झाला. तेव्हां या दैत्याला कोणी मारलें व त्याला कोणी घेऊन जावें या संबंधें वाद उत्पन्न होऊन तन्निमित्त किराताचें आणि अर्जुनाचें युद्ध झालें. १०. पाहती. ११. शिव. १२. 'तपस्विजनानें हाय हाय न म्हणावें यास्तव हे दुष्टा दैत्या! शरप्रहाराला घे' असें ते दोघे म्हणाले. १३. शरप्रहारा घे. १४. अतितीक्ष्ण. १५. अर्जुनाचे आणि शंकराचे बाण. १६. शत्रूचे प्राण. १७. शंकर. १८. अर्जुन. १९. हे पारध्या. २०. या वराहावर अर्जुनानें प्रथम बाणप्रहार केला असून त्याजवर किरातानें नंतर प्रहार केला-हा प्रकार मृगयाधर्मास विरुद्ध-असा भाव. २१. गर्वानें. २२. स्वनाशार्थ. २३. पाप. २४. गरुडापुढें. २५. माझा स्वीकार, म्हणजे ही माझी प्रथमची शिकार (पारध). २६. डुकरातें. २७. जोतें इत्यादि बांधावयाचे चिरे काढून उपजीविका करणारा मनुष्य, अश्मदारक, टंकारी, सुंभेकरी. २८. आपल्या टांकीनें. २९. इंद्रासहवर्तमान. ३०. पर्वतातें.

त्यासि किरात म्हणे, 'रे! मद्वन[1] हें, प्रथम म्यांचि हा पिटिला, ।
म्यां वधिला असतां, तूं कोण शरें हाणणार या किटिला? ॥ १०
खद्योतत्व[2] सम असो, रवि कीं, तिमिरासि[3] काजवा खाणी[4]? ।
नवल रविपुढें कीट[5] स्वकृततमोनाशकाज[6] वाखाणी. ॥ ११
मिरविसि सुज्ञत्व वृथा, अन्याला स्वकृत ताप लाऊनी, ।
काय न दगड तपस्वी? भिजला वृष्टींत तापला ऊनीं[7]. ॥ १२
जोडुनि पुण्यवनीं तप, बुडसी त्याच्या भरेंचि गर्वतमीं[8], ।
तूं मजपुढें किती रे! कोण हरिपुढें[9] म्हणेल पर्वत मी? ॥ १३
हो सिद्ध, जरि असेल स्वतपोबलगर्व, सज्ज चाप करीं, ।
होशील विमंद[10], पडला गरुडाच्या जेंवि मत्त साप करीं[11].' ॥ १४
तें वाक्य अर्जुनाला, गरळ[12] जसें यमुनान्हदा[13] कढवी, ।
पढवी जो चापश्रुति[14] रामासि[15] तयावरि[16] स्वधनु चढवी. ॥ १५
शर ते जाणों वाहे एकनिमेषांत[17] एक लाखोली, ।
प्रभुची जाणेल कसा बाहुबळें तोचि एकला खोली[18]? ॥ १६
स्वरबें गिळों न देते कवलहि[19] सिंहा[20] विदारितेभा[21] ते, ।
सरले शर, दोन्हीही झाले सहसा तदा रिते भाते[22]. ॥ १७
भ्याला, परि धैर्य धरुनि, ताडी त्या ईश्वरासि[23] कोदंडें[24], ।
देतों[25] विश्व कवळित्या उग्रा काळासि कंप जो दंडें[25]. ॥ १८
जें युद्धांत म्हणे, 'हो! भास्करजी! न करजाल[26] विकिरीं[27]' तें ।

---

१. माझें वन. २. आकाशांत प्रकाशित होणें. ३. काळोखास. ४. खणून टाकी. (खाणणें=खणणें.) ५. किडा (काजवा.) ६. आपण केलेलें अंधकारनाशरूप कार्य. ही गीति सुभाषितरूप आहे. ७. उष्णांत. ही गीति सुभाषितरूप आहे. ८. गर्वरूप अंधकारांत. ९. इंद्रापुढें. १०. गर्वहीन. ११. हस्ताचे ठायीं. १२. कालिय नामक सर्पाचें विष जसें. १३. यमुनेच्या डोहाला. १४. धनुर्वेद. १५. परशुरामास. १६. त्या शिवावर. १७. एक पळांत. १८. अंत. १९. घांस. २०. विदारितेभा सिंहा कवळहि स्वरबें गिळों न देते (असे जे शर) ते शर सरले—असा अन्वय. २१. ज्यानें गज मारिला त्याला. (विदारित+इभ=फाडला+गज). २२. खांडववन भक्षून संतुष्ट झालेल्या अग्नीनें दिलेले अक्षय्य भाते. (मोरोपंत—आदिपर्व—अध्याय ३७ गीति ९६. काव्यसंग्रह पृष्ठ २२ पहा.) २३. शंकरास. २४. धनुष्यानें. २५. जो (ईश्वर=शंकर) विश्व कवळित्या उग्रा काळासि दंडें कंप देता—असा अन्वय. २६. किरणसमूह. २७. पसरा. 'वि' उपसर्गयुक्त 'कॄ' धातूचा अर्थ 'पसरणें, फेंकणें' असा आहे.

गांडीव[1] धनुहि हरिलें कामाद्यरिमदतमोरविकिरातें.[2] ॥ १९
ज्याचा[3] पाद म्हणे, ‘रे ! भक्तभवा[4] ! स्वकुदशा[5] न कर, वाळ.[6]’ ।
त्यावरि धनंजयाचा भंगे, पावे यशा न, करवाळ.[7] ॥ २०
प्रभुला जिंकूं पाहे भुजयुद्धीं, जेंवि काजवा सवित्या,[8] ।
परि तोषवी स्वधर्में आराधुनि भक्तराज वासवि[9] त्या. ॥ २१
‘मृत्युभयासि तराया न जडसुधेचें धरा चिबुक[10]’ लीला ।
ज्याच्या[11] असें सुरांसहि म्हणती, तो प्रभु[12] बराचि बुकलीला.[13] ॥ २२
शोणितें[14] वमला, श्रमला, भ्रमला, गमला ज्ञुठेलसा पडतां, ।
परि उठला, मोह[15] कसा राहेल ? दयाकटाक्ष सांपडतां. ॥ २३
पाहति[16] न जाहलें जें पूर्वी कौतुक कदापि नाकी[17] तें, ।
विजयार्थ[18] शरण गेला **नर** नतकामदपदा[19] **पिनाकीतें**.[20] ॥ २४

---

१. गांडीव हें धनुष्याचें नांव. हें अग्नीनें वरुणापासून मागून घेऊन, (महाभारत–आदिपर्व–अध्याय२२५ श्लोक१-९) अर्जुनास दिलें. वीरांच्या धनुष्यांस भिन्न भिन्न नांवें होतीं असें दिसतें:– कर्णाचें ‘कालपृष्ठ,’ अभिमन्यूचें ‘रौद्र.’ या ‘गांडीव’ धनुष्याचें वर्णन (विराटपर्व–अध्याय ४३ श्लोक १-७ यांत) केलें आहे तें असें:—विराटपुत्र उत्तर आणि बृहन्नला यांचें संभाषण चाललें असतां बृहन्नला उत्तरास म्हणते:–‘हे उत्तरा! तूं मला विचारलेंस, तें हें अर्जुनाचें गांडीव नामक धनुष्य आहे. हें शत्रूचा संहार करण्यास समर्थ आहे; हें लोकांमध्यें प्रख्यात आहे. हें सर्व आयुधांच्याहून उत्कृष्ट आहे. हें सुवर्णालंकृत आहे. हें अर्जुनाचें गांडीव धनुष्य मोठें प्रबल आयुध आहे. याला हजार धनुष्यांचें बल आहे. हें राष्ट्राचा उत्कर्ष करणारें आहे. या धनुष्यानें पार्थ देवांना आणि मनुष्यांना रणामध्यें जिंकतो; हें अनेक प्रकारच्या रंगांनीं चित्रविचित्र केलेलें आहे; हें सडसडीत बारिक आहे; हें लांब व अविद्ध आहे; पूर्वी हें धनुष्य ब्रह्मदेवानें एकहजार वर्षें धारण केलें; प्रजापतिनें ५०३ वर्षें, इंद्रानें ८५ वर्षें, सोमदेवानें ५०० वर्षें व वरुणानें १०० वर्षें धारण केलें; ३२॥ वर्षें श्वेतवाहन (ज्याच्या रथाला शुभ्रवर्ण घोडे असतात अशा) अर्जुनापाशीं आहे. ह्या धनुष्याचा पराक्रम मोठा आहे; हें सुंदर आहे; हें उत्कृष्ट व मनोहराकृति धनुष्य अर्जुनाला (अग्निद्वारा) वरुणापासून प्राप्त झालें. २. मदनादिक षड्रिपूंचा गर्वरूप जो अंधकार त्याचा रवि (सूर्य) अशा किरातें. ३. ज्या शंकराचा चरण. ४. भक्तांच्या संसाराला, जन्ममरणरूप दशेला. ५. आपली (संसारांतील) दुर्दशा. ६. वाळून जा, शुष्क हो. ७. तलवार. ८. सूर्याला. ९. अर्जुन. वासवाचा (इंद्राचा) पुत्र.१०. हनवटी.११. ज्या (शंकराच्या) लीला (क्रीडा) ‘मृत्युभयासि तराया जडसुधेचें चिबुक न धरा’ असें सुरांसही म्हणती तो प्रभु बराचि बुकलीला–असा अन्वय.१२.शिव. १३.बुकलणें=बुक्क्यांनीं मारणें, मुष्टिप्रहार करणें. १४. रक्त. १५. मूर्छा. १६. ‘पाहोत न झालें हो’ आणि ‘न पहाते झाले हो’ असे पाठभेद आढळतात.१७.नाकांत (स्वर्गांत) राहणारे देव. १८. युद्धांत जय मिळावा म्हणून. १९. शरणागतांचें काम पूर्ण करणारें ज्याचें पद अशा. २०. शिवातें. (पिनाक आहे आयुध ज्याचें तो पिनाकी = शिव).

वाहे [1]पार्थिवलिंगीं भावें जें [2]माल्य तो [3]प्रतापार्थ ।
पाहे तेंचि [4]पुरःस्थस्वमदघ्नकिरातमस्तकीं **पार्थ**. ॥ २५

प्रभुला [5]प्रभुप्रसादें त्या माल्यें करुनि वोळखे दास, ।
तो [6]पात्र होय [7]गरुडातिक्रमकर जेंवि टोळ खेदास. ॥ २६

पाय धरुनि **पार्थ** म्हणे, 'ब्रह्मांडीं [8]अघ न [9]माय बा ! पाहें ।
तूंचि हरीं [10]पंकें, हरिल अमृताचा न [11]घन मायबापा ! हें. ॥ २७

प्रभुजी ! क्षमा करा, जी [12]मागतसें पसरुनि स्व पदरा मी, ।
या दासींहि करो हें पदयुग, जैसें करी स्वपद [13]रामीं.' ॥ २८

त्यजुनि विचार, कराया इच्छित होता ब्रळें [14]परिभवातें, ।
[15]लंघन असह्य गुरुला, [16]स्वसभाजन वाटलें परि [17]भवातें. ॥ २९

नमुनि '[18]क्षमस्व' म्हणतां, प्रकट करुनि रूप, बाहुनीं कवळी, ।
[19]अधराप्रति [20]स्मितानें स्वयशानें त्रिभुवनासही [21]धवळी. ॥ ३०

तो [22]दीनबंधु [23]उजरी देउनियां अभय [24]पाशुपत [25]नातें; ।
बोले [26]असें, हरी जो स्वपद स्मरतांचि [27]आशु [28]पतनातें. ॥ ३१

'सर्वत्र रणीं विजयी तूं **नारायणसखा नरा** ! हो रे ! ।
स्वप्नींहि अयश तुझिया अवलंबुनि पदनखा न राहो रे !' ॥ ३२

न कळतहि नाम घेतां पाप्यासहि जो म्हणोनि '[29]ओ' तारी, ।

---

१. पूजा करावयासाठीं केलेल्या मातीच्या शिवलिंगावर. २. पुष्प. ३. प्रताप (धैर्य, कीर्ति, तेज वैभव) आहे अर्थ ज्याचा तो; यशोभिलाषी. ४. पुढें उभा असून आपला गर्व हरणारा जो किरात त्याच्या मस्तकावर. ५. देव गुरु इत्यादिकांनीं प्रसन्न होऊन दिला जो फलपुष्पवस्त्र इत्यादि पदार्थ तो. ६. भाजन. ७. गरुडाची अमर्यादा करणारा. ८. पाप. ९. राहे, मावे. १०. पाप. (चिखल.) ११. मेघ. अमृताचा घन (हे) मायबापा ! हें पंक न हरिल (यास्तव) तूंचि हरीं—असा अन्वय. १२. पदर पसरून मागणें=कांहीं एक गोष्टीविषयीं परम काकळूत करून ती दीनवाणीनें मागणें. १३. परशुरामीं. १४. पराजयातें. १५. मर्यादातिक्रम, अमर्यादा. १६. आत्मपूजन. १७. शंकराला. १८. क्षमा कर. 'क्षमस्व' यासारखीं छोटीं संस्कृत वाक्यें पंतांच्या काव्यांत अनेक स्थळीं आढळतात. १९. ओष्ठास. २०. मंद हास्यानें. (हास्याचा रंग पांढरा असा) कविसंकेत आहे. २१. शुभ्र करी. २२. दीनांचा—निराश्रितांचा बंधु. (शंकर.) २३. नीट करी, समर्थ करी. २४. पशुपति(महादेव) संबंधी—पाशुपतास्त्र. २५. दीनबंधुरूप नातें. २६. पुढची गीति पहा. २७. तात्काळ. २८. अधोगतीतें. २९. उत्तर देऊन.

गेला, संकल्पेंचि ब्रह्मांडें निर्मिणार ओतारी[1]. ॥ ३३
मग वरुण धनद[2] पितृपति[3] सुरपति[4] हे लोकपाळवर[5] आले, ।
इंद्रेतर[6] सर्वहि ते स्वास्त्रें[7] पार्थासि अर्पिते झाले. ॥ ३४
शक्र म्हणे, 'स्वर्गीं ये, रथ तुज आणावयासि धाडीन, ।
अस्त्रें देउनि पुत्रा ! तुजकरवीं स्वाहितांसि[8] नाडीन[9].' ॥ ३५
ते लोकपाल गेले मग रथ घेऊनि मातली[10] आला, ।
नमुनि म्हणे, 'अर्जुनजी ! तात बहातो[11], बसा रथीं[12], चाला.' ॥ ३६
शुचि[13] होउनि मातलिला दिव्यरथीं बैसवूनि मग चढला. ।
सदतिक्रम[14] करिल कैसा[15] जो धर्मन्याय गुरुमुखें पढला[16] ? ॥ ३७
निघतां गिरिसि[17] म्हणे, 'बा ! मी व्हावें आजि काय उतराई[18] ? ।
भवदुपकाराद्रिपुढें[19] हा केवळ होय पांडुसुत राई[20].' ॥ ३८
अमरावतीस[21] जाउनि गहिंवरवी तो गुणाढ्य[22] मघव्याला[23], ।
व्याला[24] न साधुला जो, लाजो तो बाप मूर्त अघ[25] व्याला. ॥ ३९

---

१. मूर्ति, भांडीं, इत्यादि ओतण्याचें कसब करणारा, ओतींव काम करणारा, ओतणारा. येथें किरातार्जुनीय कथानक संपलें. शंकरास प्रसन्न करून अर्जुनानें पाशुपतास्त्र मिळविलें, या कथाभकावर शके ५५६ पूर्वी झालेल्या भारवि नांवाच्या महाकवीनें 'किरातार्जुनीय' नामक एक उत्तम महाकाव्य संस्कृतांत रचिलें आहे. २. कुबेर. ३. यम. ४. इंद्र. ५. आठ लोकपालांतील श्रेष्ठ. ६. इंद्राशिवाय. ७. आपापलीं अस्त्रें. यमानें कालदंड दिला, वरुणानें पाश, आणि कुबेरानें कौबेरास्त्र दिलें. या आयुधांचा प्रभाव मूळ महाभारतांत वर्णिला आहे. (महाभारत—वनपर्व—अध्याय ४१. पहा.) या एकाच गीतींत पंतांनीं मूळांतील समग्र अध्याय आटोपून घेतला आहे. ८. तुझ्या शत्रूतें. ९. ठकवीन. १०. इंद्राचा सारथि. ११. बोलावितो. १२. या रथाचें वर्णन मूलग्रंथांत आहे त्याचा सारांश—शक्ति प्रास गदा इत्यादि शस्त्रांनीं युक्त; दहा हजार घोड्यांनीं ओढून न्यावा इतका त्याचा वेग; एक निमिषांत हजारो कोश जाणारा; मनाच्या गतीपेक्षां ही ज्याची गति ज्यास्त; वैजयंत नामक नीलवर्णध्वजरत्नदंडयुक्त आणि हेमदंडधृतश्वेतछत्रयुक्त असा तो रथ होता. (अध्याय ४२.) १३. गंगास्नान, जप, पितृतर्पण आणि हिमालयस्तवन करून अर्जुन रथांत बसला. १४. सज्जनांची अमर्यादा. १५. हें प्रश्नालंकाराचें उदाहरण आहे. १६. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १७. इंद्रकीलनगास. १८. दुसऱ्यानें उपकार केल्यामुळें त्याचा जो आपल्यावर भार असतो तो प्रत्युपकारादि द्वारा उतरला आहे ज्यानें तो, ऋणमुक्त. १९. तुझ्या उपकाररूप पर्वतापुढें. २०. मोहरी. २१. इंद्राच्या राजधानीला. २२. गुणशाली. २३. इंद्राला. २४. प्रसवला. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २५. पाप.

जातांचि पार्थ मोही[1] स्वगुणें तत्काळ त्या सुरसभेला[2], ।
न पिपीलिकसेनेसहि[3] सुसितेचाही[4] तसा सुरस[5] भेला[6]. ॥ ४०
बसवुनि निजासनीं हरि[7] करि पुत्रस्नेह जें जसें करवी, ।
शिरं[8] हुंगी, आलिंगी, फिरवी तनुवरि[9] सुधसि जो कर वी[10]. ॥ ४१
देवांकरवीं[11] बरवी करवी नरवीरसूनुची अर्चा[12], ।
शोभे जसा स्वतेजें देवेंद्र तसाचि तो महावर्चा[13]. ॥ ४२
प्रेमें वज्राद्यस्त्रें[14] हरि देता जाहला स्वतनयातें, ।
पात्रचि पितृसर्वस्वा[15]प्रति जो जाणे भला सुत नयातें[16]. ॥ ४३
मग पार्थ चित्रसेना[17]पासुनि अत्यंत आदरें सकळा, ।
इंद्राज्ञेनें शिकला निरुपमवादित्र[18]नृत्यगीतकळा. ॥ ४४
जरि पार्थ पांच वर्षें वसला स्वर्गीं पित्याचिया भवनीं, ।
भ्रात्यांला न विसरला, खिन्नचि होता तसा तदा, न वनीं. ॥ ४५
एकांतीं इंद्र म्हणे, त्या गंधर्वेंद्रचित्रसेनातें, ।
'स्वर्गींहि खिन्न सुत जरि हें वैभव काय? काय हें नातें? ॥ ४६
गुणवत्[19]कलत्रविरहज्वरिता सुखहेतु[20] शुचिरतापचिती[21], ।
स्पष्ट तदन्या[22] जी जी पूजा देणार सुचिर तापचि ती. ॥ ४७
स्पर्शो शृंगारसुधानिधिची धृतमूर्ति[23] उर्वशी[24] लहरी[25], ।

---

१. प्रलोभित करी, मोहित करी. २. सुधर्मा नामक देवसभेला. ३. मुंग्यांच्या समूहाला. ४. उत्तमशर्करेचाहि. ५. मधुर. ६. खडा, गोळा. ७. इंद्र. ८. मस्तकाचें अवघ्राण करण्याचा प्रघात फार होता असें दिसतें. ९. शरीरावर. १०. विणारा, प्रसवे. ११. येथें अनुप्रास अलंकार आहे. १२. नरवीराचा पांडुराजाचा सुत (पुत्र) अर्जुन त्याची पूजा. १३. अतितेजस्वी. (अर्जुन.) १४.वज्र हें परम तेजस्वी आणि दुष्टजनसंहारक असें अस्त्र होतें. वज्रआदिकरून अस्त्रें.१५. पित्याच्या सकल धनाला. १६. नीतीतें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १७. चित्रसेन हा गीतवाद्यनृत्यनिपुण इंद्रमित्र गंधर्व. हा विश्वावसूचा पुत्र. याची गणना देवर्षींत आहे. १८. वाद्य. १९. गुणवती स्त्रीच्या वियोगानें जो दुःखित त्याला. २०. सुखास कारण. २१. शृंगाररतरूप पूजा. (शुचि+रत+अपचिति= शृंगाररस+रति+पूजा.) २२. शृंगाररतिपूजेहून इतर (पूजा). ही गीति सुभाषितरूप आहे. २३. धरली आहे मूर्ति जिनें ती, मूर्तिमती. २४. उर्वशी—नरनारायण मुनींच्या ऊरुसमीपस्थ भागापासून (मांड्यांपासून) उत्पन्न झाली म्हणून 'उर्वशी' असें नांव इंद्रानें ठेविलें. बदरिकाश्रमीं राहून तप करणाऱ्या नरनारायणांचें इंद्रास भय पडलें. तेव्हां त्यांस विघ्न करण्यासाठीं इंद्रानें वसंत, काम आणि देवांगना यांस नित्याप्रमाणें पाठविलें. इंद्राच्या आज्ञेप्रमाणें अप्सरांनीं त्या ऋषींला भुलवून टाकण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु ते काष्ठलोष्ठाप्रमाणें अगदीं निर्विकार होते. याप्रमाणें त्या सर्वांचे प्रयत्न निष्फळ झाले. तेथील स्त्रियांचें लावण्य पाहून काम आणि अप्सरा यांस लाज वाटली. तेव्हां त्यांनीं परत स्वर्गास जाण्याचा बेत केला. हें जाणून नरनारायणांनीं इंद्रासाठीं आश्रमांतील स्त्रियांपैकीं एकीस घेऊन जा, असें सूचविलें. तेव्हां त्यांनीं ऊरुसमीपस्थ स्त्री पाहिजे अशी इच्छा दर्शविली, ती नरनारायणांनीं आपल्या तपःप्रभावानें पूर्ण करून उर्वशीला त्यांजबरोबर पाठविलें. (भागवत–स्कंध ११ अध्याय ४ पहा.) २५. शृंगारसुधानिधीची लहरी (लाट)=उर्वशी.

[1]सुतविकळत्व हरो, जसि सत्संगति सर्व [2]उर्वशील [3]हरी. ॥ ४८
देखत होता सादर सुत, जैं स्मितपूर्व [4]साभिनय नाचे, ।
[5]प्रकटी [6]विलास नटतां बहु ती [7]गंभीरनाभि नयनाचे. ॥ ४९
[8]तो तीस म्हणे, '[9]सुंदरि! जो तुज मागोनि [10]दत्त सुख [11]नेतो ।
माझ्या वदनें कांहीं प्रार्थितसे [12]सुगुणरत्नसुखने! [13]तो. ॥ ५०
या स्वर्गीं मूर्तिमती तूंचि सुधा, जी प्रसिद्ध [14]असुधा ती, ।
न [15]तिच्या पानें जैसे [16]त्वदधरपानें क्षणांत [17]असु [18]धाती. ॥ ५१
यास्तव या स्वर्गीं हा [19]पुरुषोत्तम पार्थ पात्र [20]सुरसा, हो! ।
परि तृप्त येथ येउनि सेवुनियां याचि मात्र [21]सुरसा [22]हो.' ॥ ५२
[23]देवी स्मित करुनि म्हणे, 'गंधर्वपते! उदंड [24]आजवर ।
प्रभुनें काम पुरविले, परि मज दिधला [25]अनर्घ्य आज वर. ॥ ५३
येऊं देईल मुखीं कां [26]प्रवरप्रेमकाम [27]मन्मथ न? ।
कोपें करील सोडुनि [28]पांचांहि [29]शिलीमुखांसि [30]मन्मथन. ॥ ५४
गंधर्वपते! जा तूं, हा जन बहु आजि सुखविला साचा, ।
भेटेन त्या [31]प्रियां मी पाहुनियां समय सुखविलासाचा.' ॥ ५५

---

१. पुत्राचें (अर्जुनाचें) खिन्नत्व, चिंताग्रस्तत्व. २. मोठें अशील म्हणजे दुष्ट स्वभाव. हा पाद सुभाषितरूप आहे. ३. दूर करी. ४. स+अभिनय=हावभावसहित. ५. दाखवी. ६. नयनाचे विलास—असा संबंध. ७. गंभीर (खोल) आहे नाभि जिची ती. ८. चित्रसेन. ९. उर्वशी ही वेश्या, सकळ देवांची स्त्री (वारवधू) म्हणून तिला सुंदरी असें म्हटलें आहे. १०. त्वां दिलेलें. ११. घेतो, ग्रहण करतो. १२. हे सुगुणरूप रत्नाचे उत्तम खाणी (उर्वशी.) १३. इंद्र. १४. येथें सुधेच्या ठायीं सुधेचे गुण नाहींत म्हणून तिला सुधा म्हणणें बरोबर नाहीं असें सुचवून ते सुधेचे गुण उर्वशीच्या ठायीं आढळतात, यास्तव तिलाच सुधा म्हणणें यथार्थ आहे असें दर्शविलें आहे म्हणून अपन्हुति अलंकार झाला. जेथें उपमेयावर उपमानाचा आरोप करण्यासाठीं उपमेयाच्या स्वरूपाचा अपलाप केला असतो तेथें अपन्हुति नामक अलंकार होतो. १५. त्या सुधेच्या. १६. तुझ्या अधरामृताच्या पानानें. १७. प्राण. १८. तृप्त होती. १९. पुरुषश्रेष्ठ. २०. देवासारखा. २१. अमृतरसातें. २२. होवो. २३. उर्वशी. २४. आजपर्यंत. २५. अमोल्य. २६. उत्तम नराविषयीं कामेच्छा (प्रेमकाम). २७. मदन. (विचारांचें मथन करणारा.) २८. मदनाचे बाण पांच असतात अशी कविप्रसिद्धि आहे म्हणून त्यास 'पंचशर' असें नांव आहे. 'उन्मादनस्तापनश्च शोषण: स्तंभनस्तथा। संमोहनश्च कामस्य पंच बाणा: प्रकीर्तिता: ॥,' अथवा 'अरविंदमशोकं च चूतं च नवमल्लिका। नीलोत्पलं च पंचैते पंचबाणस्य सायका: ॥' या श्लोकांत मदनाच्या पांच बाणांचीं नांवें सांगितलीं आहेत. २९. बाणांस. ३०. माझें मथन (नाश). ३१. आवडला अर्जुनाला.

जीच्या सुरसवपुपुढें खालें वदनासि अमृतसर[1] घाली, ।
ती जाय त्याकडे, जसि सुमधुकडे[2] वेग करुनि सरघाली[3]. ॥ ५६
शृंगारमानसींच्या[4] पाहुनि तो **पार्थ** त्या मरालीला[5] ।
उठला, तशीच पूज्या[6] ती स्त्री शतमखमुखामरालीला[7]. ॥ ५७
स्वकरें आसन देउनि नमुनि करी **पार्थ** तत्सभाजन[8] हो ! ।
'मज आज्ञा काय ?' म्हणे परिसा साधुत्व सत्सभाजन[9], हो. ॥ ५८
ती उर्वशी म्हणे, 'गा ! कीर्तिश्रीच्या नृमूर्तिकरवीरा[10] ! ।
शक्रोक्तें[11] स्वैरसेंही[12] आल्यें, मत्कामपूर्ति[13] कर वीरा ! ॥ ५९
करितां नृत्य मजकडे पाहत होतासि, त्या पहाण्यानें ।
सूचविलें त्वदभिलषित[14] हरिला मजलाहि त्यां[15] शहाण्यानें. ॥ ६०
जाणोनि त्वद्गुरुचें[16] प्रिय हें त्वन्मित्र**चित्र**सेनमुखें ।
अनुसरल्यें तुज, सुजना ! नीरजनयना[17] ! करीं विलास सुखें.' ॥ ६१
कर्णावरि[18] कर ठेवुनि '**शिव** ! **शिव** !' '**हर** ! **हर** !' असें म्हणे **नर**[19] तो. ।
'माते ! हा पुत्र रतो भजनीं, परि म्हणसि तूं तसें न रतो. ॥ ६२
माद्री पृथा शची[20] तूं मज तुल्या, योग्य हें नसे तूतें, ।
परि रक्षिति प्रयत्नें गुरुजन[21] तों भंगिती न सेतूतें[22]. ॥ ६३
ऐसें पाहत होतों कीं हे **ना**रायणोरुजा[23] आर्या ।
पूर्वज[24] **पु**रूरव्याची[25] **श्री**पतिची **श्री** जसी तसी भार्या.' ॥ ६४

---

१. अमृताचें सरोवर. २. उत्तम मधाकडे. ३. मधुमक्षिकांची पंक्ति. (सरघा+आलि=मधुमक्षिका+पंक्ति.) ४. शृंगाररूप मानससरोवरीं राहणाऱ्या. ५. त्या उर्वशीरूप हंसीला. ६. मान्या. ७. इंद्रप्रमुख देवपंक्तीला. ८. त्या उर्वशीची पूजा. ९. अहो, उत्तम सभेंतील लोक हो, ऐका साधुत्व. १०. मनुष्यरूप करवीर पुष्पास. (करवीर=पांढऱ्या कण्हेरीचें झाड.) ११. इंद्राज्ञेनें. १२ स्वकीयप्रीतीनेंहि. १३. माझ्या इच्छेची परिपूर्णता. १४. तुझी इच्छा. १५. चित्रसेनानें. १६. इंद्राचें. १७. कमलनेत्रा. १८. कर्णावर कर ठेवणें=कानावर हात ठेवणें=कानांत बोटें घालणें=या गोष्टींत मी नाहीं, ही गोष्ट मला संमत नाहीं असें सुचविणें. १९. अर्जुन. २०. इंद्राणी. २१. वडील मनुष्यें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २२. धर्मसेतूस, धर्ममर्यादेस. २३. नारायणमुनीच्या मांड्यांपासून झालेली. (उर्वशी.) २४. पुरूरवा हा मूळ ब्रह्मापासून सातवा पुरुष. २५. पुरूरवा हा बुधापासून इलेला झालेला पुत्र, हा अर्जुनाचा पूर्वज. आदित्याच्या शापानें उर्वशी पृथ्वीवर पडली तेव्हां तिला केशी नामक दैत्य धरून पळूं लागला. त्याजपासून पुरूरव्यानें तिला मुक्त केलें म्हणून तिनें त्याला वरिलें, अशी कथा आहे.

हांसोनि म्हणे देवी, 'आम्हां देवींस [1]अघ असेना तें ।
जाणत नव्हते रमले पौरव, तें काय तुज असे नातें? ॥ ६५
लावूं नयेचि सुज्ञें [2]भुक्तोच्छिष्टत्व अघ नव [3]सुधेतें, ।
स्वजनकभुक्ता माता म्हणुनि त्यजिती सुधी न [4]वसुधेतें. ॥ ६६
सांगों काय करिति जें आर्जव [5]लोकेशें सुर तसे जे तें? ।
घालिति [6]आलितिरस्कृतही, इच्छुनि [7]लेशसुरत, [8]सेजेतें. ॥ ६७
आल्यें स्वयें तुजकडे [9]कामार्ता स्त्री, म्हणोन कोमळ हो, ।
मद्भोगासि सुकृतफळ म्हणति सकळ, तूं म्हणो नको [10]मळ हो!' ॥ ६८
पावे न शुकापासुनि कर जोडुनि शरण जाय परि रंभा, ।
तद्वत् नारायणसखमुनिपासुनि उर्वशीहि [11]परिरंभा. ॥ ६९
पार्थ म्हणे, 'तूं माता, मी सुत, धर्मज्ञ नर, न वानर कीं ।
पडतां गळांहि गुरुनीं द्यावा जाया न वर नत्रा नरकीं. ॥ ७०
हो सुप्रसन्नमति, हा जननि! जन निज न निमग्न नरकीं हो. ।
अमर नव्हें, पशुहि नव्हें, मी [12]त्वदुदरजान्वयोत्थ नर कीं हो.' ॥ ७१
[13]क्षोभे, प्रसन्न व्हावें, परि मन कामासि जें [14]वश स्त्रीचें, ।
'हो क्लीब' असें शापी, उग्रत्व तिचें तसें न [15]शस्त्रीचें. ॥ ७२
शक्र म्हणे, 'बा साधो! करिता तूं एक शुद्ध तप शुकसा ।
तूंचि नर, इतर वानर, [16]इंद्रियविषयैकनिष्ठ न पशु [17]कसा? ॥ ७३
दिव्य [18]विषयार्णवीं तूं [19]बोधनलस्पृष्ट साधु [20]पर्वत रे! ।

१. पाप. (उर्वशी ही पौरवकुलमाता, कारण ती पुरुरव्याची पत्नी. तेव्हां तिच्याशीं गमन केल्यानें गुरुदारागमनाचें पातक अर्जुनास लागावें, पण पुरुवंशीय राजे स्वतपोबळानें स्वर्गी राहतात आणि अप्सरांसह रममाण होतात, यांत त्यांचा अपराध नाहीं, तो जुना संबंध आतां तुटला म्हणून पाप नाहीं—हा भावार्थ.) २. भोगून शिल्लक राहिलेलेंपण हेंच पाप. ३. अमृतातें. ४. पृथ्वीतें. ही गीति सुभाषितरूप आहे. ५. लोकपाल. ६. माझ्या सखींनीं तुच्छ मानलेले (झिडकारिलेले). ७. अल्प रतिसुख. ८. शय्येतें. ९. कामपीडिता. १०. पाप. ११. आलिंगनास (न पावे). १२. तुझ्या उदरापासून झालेला वंश, त्यापासून निर्माण असा. १३. मन क्षुब्ध होई. १४. स्वाधीन. १५. शस्त्रधराचें. १६. इंद्रियांस तृप्त करणाऱ्या विषयांच्या ठायीं एकनिष्ठा (अत्यासक्ति) आहे ज्याची असा (नर). १७. पशुच होय असें या प्रश्नाचें उत्तर. हा चरण सुभाषितरूप आहे. १८. विषयरूप समुद्रीं. १९. बोधरूप नलवानरानें स्पर्शिला असा. २०. नलवानरानें समुद्रांत टाकलेले पर्वत ऋषीच्या शापामुळें बुडत नसत या कथेकडे येथें लक्ष्य आहे.

[1]छायाग्रहासि [2]कपिसा, या विषया विरल जन, न सर्व, तरे. ॥ ७४
अज्ञातवासकाळीं हा बहु येईल शाप कामाला, ।
[3]मातेचा अस्नेहहि होय [4]यशोहेतु साधुरामाला.' ॥ ७५
[5]लोमश मुनि **पार्थातें** **हरिच्या** अर्धासनीं स्वयें पाहे, ।
शक्रासि पुसे, 'याचें [6]सुकृत असें सांग कोणतें आहे?' ॥ ७६
देवेंद्र म्हणे, 'साक्षात् **नारायण**सख पुराणऋषि **नर** हा, ।
अवतरला **भरत**कुळीं भूभारातें म्हणावया 'न रहा.' ॥ ७७
आला दिव्यास्त्रार्थ, प्रेमें झाला [7]प्रपन्न [8]**भव**चरणीं, ।
मरणार याचिपासुनि [9]वरदर्पित खळ [10]**निवातकवच** रणीं. ॥ ७८
शिकला दिव्यास्त्रें हा शीघ्रचि साधूनि देवकार्यातें, ।
येईल सांग ऐसें **धर्मातें** [11]साधुसेवकार्यातें. ॥ ७९
जा, [12]त्यांसि तीर्थयात्रा [13]सांग घडेसें स्वयेंचि तूं कर गा! ।
पुण्याविणें जयश्री होईल कसी मुनीश्वरा! [14]करगा?' ॥ ८०
हें स्वर्गींचें वृत्त **व्यास** [15]स्वसुतासि सर्व आयकवी ।
[16]तो ममतेला, आपण करुणेला वश, करील काय कवी? ॥ ८१
[17]**जि**ष्णूत्कर्षश्रवणें व्याकुळ मति होय अंधराजाची, ।
[18]दुर्मोच्यमोहपाशें [19]आंळपिली घट्ट [20]कंधरा ज्याची. ॥ ८२

---

१. सिंहिका म्हणून हिरण्यकशिपूची भगिनी होती. ही विप्रचित्ति नामक दानवाची स्त्री मारुति सीताशोधार्थ जात असतां त्याची छाया समुद्रजलावर पडली होती. त्या छायेचें आकर्षण करून हिनें मारुतीची गति कुंठित केली. नंतर मारुतीनें हिच्या मुखांत शिरून तिला मारून पुढें गमन केलें, या कथेकडे येथें लक्ष्य आहे. २. मारुतीसारखा. ३. हा भाग 'मातेचा अस्नेहहि होय यशोहेतु' सुभाषितरूप समजावा. ४. कीर्तीला कारण. ५. लोमश हा एक ब्रह्मर्षि; हा इंद्राचा निरोप घेऊन धर्माकडे काम्यकवनांत गेला आणि त्यानें अर्जुन सत्वर भेटेल असें त्यास सांगितलें. पुढें तो पांडवांसह तीर्थयात्रेस निघाला. मार्गांत यानें पांडवांस नीलुपदेश करून अनेक तीर्थांचा महिमा सांगितला. अनेक तीर्थें पाहत पाहत कैलासपर्वतावर पांडवांसह आला. नंतर अनेक आश्रम पाहत पाहत त्यानें पांडवांस काम्यकवनांत आणून सोडिलें. (महाभारत–वनपर्व–अध्याय ४७-१८२.) ६. पुण्य. ७. नम्र, शरणागत. ८. महादेवाच्या पदीं. ९. वराच्या योगें माजलेले. १०. निवातकवच हे प्रऱ्हादभ्राता संऱ्हाद याचे तीनकोटि पुत्र. हे समुद्रतीरीं राहत असून ब्रह्मदेवाच्या वरानें उन्मत्त झाले होते. हे इंद्रासही अजिंक्य होते. यांचा वध करून अर्जुनानें इंद्रापासून प्राप्त झालेल्या अस्त्रविद्येबद्दल त्याला शत्रुपराभवरूप गुरुदक्षिणा दिली. (वनपर्व–अध्याय १६८-१७३). ११. साधूंच्या सेवकांत आर्य (श्रेष्ठ, सन्मान्य असा) जो धर्म त्यातें. १२. धर्माला. १३. परिपूर्ण. १४. हस्तगत. १५. धृतराष्ट्रासि. १६. तो धृतराष्ट्र ममतेला वश, आपण (व्यास) कवि करुणेला वश (असल्यामुळें) काय करील?. १७. अर्जुनाच्या वृद्धीचे श्रवणानें. १८. सोडविण्यास कठीण अशा ममतापाशानें. १९. आळंगिली. २०. मन.

नृप संजयाप्रति म्हणे, 'जिष्णूचा शंभुशीं समागम तो ।
[1]प्रेमें स्वविजयसाचि स्पष्ट मला तत्पित्यासमा गमतो. ॥ ८३
पाशुपताद्यस्त्रांचा लाभ, स्वर्गीं [2]वैरासनाचा, हो; ।
हें बहु, म्हणे हरि, 'अहो उर्वशि! सुखवा [3]वैरास, नाचा, हो; ॥ ८४
झाला प्रसन्न ज्यावरि भगवान् [4]कल्पांतकाळनट [5]कलहें, ।
त्याशीं विरुद्ध [6]मत्सुत, दिसतें, मज कर्म फार [7]फटकळ हें !.' ॥ ८५
संजय म्हणे, 'धरावें हितकर मत हेंच, 'हा !' नच वदावें, ।
भ्यावें न बा ! न व्हावें तें [8]वर्ष अराज्यदान चवदावें.' ॥ ८६
वदला धर्म हरिप्रति 'मज द्या हें, येउ [9]अब्द चवदावा; ।
पद न दिलें, तरि [10]उरु कुरुगुरुरक्तांची शरांसि चव दावा.' ॥ ८७

अध्याय चवथा.

[11]कुशलप्रवृत्ति न कळे जिष्णूची, बहुत लोटले अब्द, ।
धर्मासि भीम लावी 'राज्य तुवां बुडविलें' असा शब्द. ॥ १
[12]बृहदश्व द्विजराज श्रीधर्माच्या समीप आला, जो ।
ताप उरोंचि न देता, त्यासि [13]विधु न कां म्हणोनि 'हा !' लाजो ?॥२
पूजुनि [14]त्यांसि नृप म्हणे, 'परिसावें स्वकृत मी निवेदीन, ।
पूज्यासि दुःख सांगुनि [15]अमृतनदनिमग्नसा निवे दीन. ॥ ३
जरि [16]धर्मन्यायद्विजदेवसपर्यापथीं सदा रत मी, ।
द्यूत करूनि बुडालों [17]सानुग [18]सानुजसुहृत् [19]सदार [20]तमीं. ॥ ४
[21]द्यूतपणीं हारविली ओढुनि नेली सभेंत [22]मज्जाया; ।
काय वदों ? तें केलें म्यांचि व्यसनीं स्वराज्य [23]मज्जाया. ॥ ५

---

१. तत्पित्यासम मला तो समागम प्रेमें स्वविजयसाचि स्पष्ट गमतो—असा अन्वय. २. इंद्राबरोबर अर्धासनाचा लाभ. ३. पुरुषश्रेष्ठाला. ४. प्रलयसमयीं सर्व सृष्टीचा संहार करून नर्तन करणारा (नट) भगवान् शंकर. ५. युद्धानें. ६. माझे (धृतराष्ट्राचे) पुत्र. ७. विषम, ओंगळ, घाणेरडें, कुत्सित. ८. चवदाव्या वर्षी पांडवांस राज्यदान नाहीं असें चवदावें वर्ष न व्हावें. ९. वर्ष. १०. मोठी. ११. कुशलवृत्तांत. १२. पांडवांकडे द्वैतवनांत आलेला एक ऋषि. यानें धर्मास अनेक इतिहास ऐकविले आणि अक्षविद्या आणि अश्वहृदयविद्या ह्या सांगितल्या. १३. चंद्र. १४. त्या मुनीस. १५. अमृताच्या डोहांत मग्न झाल्यासारखा. १६. धर्म, नीति, विप्र, देव यांची (सपर्या) पूजा करण्याच्या मार्गी. १७. सेवकांसह. १८. धाकटे बंधु, सुहृत्, यांसहित. १९. स्त्रीसहवर्तमान. २०. अज्ञानरूप अंधारांत, शोकांत. २१. द्यूतांतील पणांत. २२. माझी स्त्री. २३. बुडायास, बुडण्यासाठीं.

[1]संप्रति हा दास असा स्वीकारुनियां अरण्यवास वसे, ।
झाली पहा कसी हे[2], हेही[3] जे तैं [4]सभाग्य [5]वासवसे. ॥ ६
दिव्यास्त्रें साधाया पाठविला तोहि [6]वत्स न परतला, ।
वाटे मज [7]कितवासि त्यजुनि, मुनिजनीं करूनि तप [8]रतला. ॥ ७
वाटे दुःखी मत्सम मीच, वदा, जरि असेल आढळला. ।
न असा [9]अयशःपद कीं [10]भूपदपदकीं जडोनियां [11]ढेंळला.' ॥ ८
हांसोनि [12]मुनि म्हणे, 'बा! नलभूप जसा दुजा न [13]साधि तसा, ।
न तुम्ही दीन, न दुःखी, साधावें तें वनींहि साधितसा. ॥ ९
आज्ञेंत बंधु चौघे, [14]धृतमूर्ति [15]उपायसे, [16]सुनय [17]शस्त्री ।
साक्षात् [18]श्रीसीच सती होऊं दे म्लान न मुख न यश, स्त्री. ॥ १०
परिसा नलगति, तुमची [19]श्रुतिरति, हेही[20] सती, [21]अनलसा हो[22]. ।
होता नल तेजस्वी भास्करसा इंदुसा [23]अनलसा, हो! ॥ ११
श्रीवीरसेनसुत नल [24]निषधेश्वर [25]सुगुणमणिकरंडक हो! ।
[26]ब्रह्मण्यप्रभु [27]दुर्गतदारिद्र्यसमुद्रवरतरंडक हो. ॥ १२
तो [28]पुण्यश्लोक रणीं करिता रिपुवीरहानि[29] [30]वासवसा ।
तत्कीर्ति म्हणे, 'गा! [31]श्रीधी हो! या, योग्य हा [32]निवास, [33]वसा.' ॥ १३
[34]वैदर्भ भीमराजा होता बहु खिन्न हीन [35]संतानें, ।

---

१. विद्यमानकालीं. २. द्रौपदी. ३. भीमादि बंधुहि. ४. भाग्यशाली. ५. इंद्रासारखे. ६. अर्जुन. ७. द्यूतकर्त्यास. ८. रममाण झाला. ९. अपयशाचें स्थान. १०. भूपद हेंच पदक त्यावर. ११. पडला, भ्रष्ट झाला. १२. बृहदश्व. १३. दुःखी. १४. धरिली आहे मूर्ति ज्यांनीं, देहधारी. १५. साम, दान, दंड व भेद या राज्योपयोगी चार उपायांसारखे. १६. नीतिमान्. १७. शस्त्रधारी. १८. लक्ष्मी. १९. श्रवणप्रीति. २०. द्रौपदीही. २१. आलस्यरहिता. २२. होऊ. २३. अग्नीसारखा. २४. निषधदेशाचा राजा. २५. उत्तम गुणरूप मण्याचा करंडा, ज्याच्यामध्यें अनेक उत्तम गुण वास करतात असा. २६. भक्तिमान्, भजनशील. २७. दरिद्र्यांस दारिद्र्यसमुद्रांतून तारण्याविषयीं उत्तम नौकारूप. मोठा दानशूर होता—असा भाव. २८. पवित्र आहे श्लोक (कीर्ति) ज्याचा तो—विमलयशा. पुण्यश्लोक हें नळाचें प्रसिद्ध नांव आहे:—'पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः । पुण्यश्लोका च वैदेही पुण्यश्लोको जनार्दनः ॥.' २९. शत्रुवीरांचा नाश. ३०. इंद्रासारखा. ३१. श्री (संपत्ति) आणि धी (विद्या) यांना नल हा एकत्र राहण्यास उचित स्थान होय—असें तात्पर्य. सरस्वती आणि लक्ष्मी ह्या कधीं एकत्र राहत नाहींत अशी समजूत प्राचीनकाळीं रूढ असल्याचें या पद्यावरून दिसून येतें. ३२. स्थान. ३३. रहा. ३४. विदर्भदेशाचा. ३५. संततीनें.

तो भेटोनि सुखविला [१]दमनानें [२]स्वपदलीनसंतानें. ॥ १४
[३]नृपदास्यतुष्ट मुनिचें मन त्या मुनिला म्हणे, 'सखे दमना! ।
झाला शुद्ध, करावा [४]संततिसुखपात्र हा [५]सखेदमना.' ॥ १५
[६]ब्रह्मर्षिवरें दमनें वर दिधला त्या नृपासि संततिचा, ।
झाले तीन सुत, सुता चवथी, गाती [७]गुणौघ [८]संत तिचा. ॥ १६
ठेवी दम, दांत, दमन, दमयंती, हीं अशीं तयां नावें, ।
ज्यां [९]मुनिवरप्रसादप्रभवांतें त्रिभुवनेंहि मानावें. ॥ १७
भीम नृपति [१०]दुग्धोदधि, दमयंती [११]श्रीचें, वपु [१२]सुरुचिर तिचें ।
[१३]पाहूनि देह दिवसोंदिवस दिसे दीन, जरि [१४]सुरुचि [१५]रतिचें. ॥ १८
जाणों कळे [१६]भविष्यद्दमयंतीची [१७]स्मरा [१८]रुचिरतरता, ।
[१९]हरदृगनलीं जळाला रतिच्या विटलाचि तो [२०]शुचिरत रता. ॥ १९
ती पाहिल्यावरि गमे कोणासहि न स्वरूप सुंदरसें? ।
श्री[२१]वनमाळेहि पुढें मिरवील [२२]स्वमद काय [२३]कुंदे [२४]रसें? ॥ २०
श्रीकृष्ण रुक्मिणीला श्रीकृष्णा रुक्मिणी जसी आतां, ।
दमयंतीस नल नला दमयंती आयकों जनें [२५]गातां. ॥ २१
नल नृप म्हणे, '[२६]शिवा! [२७]ती [२८]नवरी हो, मन दुजीस न वरी हो.' ।
[२९]भैमी म्हणे, '[३०]शिवे! [३१]तो नवरा [३२]हो, प्रेम नित्य [३३]नवें राहो.' ॥ २२

---

१. दमनऋषीनें. २. आपणाला शरण आलेल्यास जो संतान (कल्पवृक्षासारखा) त्यानें. (दमनाचें विशेषण.) ३. नृपाच्या सेवेनें तुष्ट झालेल्या. ४. संततिरूप (पुत्ररूप) सुखास उचित स्थान. ५. खेदयुक्त आहे मन ज्याचें असा. ६. ब्रह्मर्षीमध्यें श्रेष्ठ. (दमनें.) ७. गुणसमूह. ८. साधुजन. ९. मुनिश्रेष्ठाच्या प्रसादाच्या (वराच्या) प्रभवास (पराक्रमास, शक्तीस) अथवा ज्या (मुलांना); मुनिश्रेष्ठाच्या प्रसादापासून प्रभव (उत्पत्ति) आहे ज्यांची अशा मुलांस. १०. दुग्ध-समुद्र. ११. लक्ष्मीच. १२. अतिसुंदर. १३. 'त्याहूनि' असाही पाठ आढळतो. १४. उत्तम आहे रुचि (कांति) ज्याचें असें. १५. मदनस्त्रीचें. १६. पुढें होणाऱ्या दमयंतीची. १७. मदनाला. १८. अतिसुंदरता. १९. हराच्या (शंकराच्या) तृतीयनेत्रांतील अग्नींत. २०. शृंगाररसिक. २१. आपादलंबी माळेपुढें. २२. आपला गर्व. २३. कुंद पुष्प. २४. अमृतें, मकरंदें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २५. आतां म्हणजे सांप्रत. कृष्ण व रुक्मिणी हीं दोघें जशीं एकमेकांस शोभतात असें लोक म्हणतात, तशीं पूर्वी नल व दमयंती परस्परांस अनुरूप होतीं असें लोक गात होते; हें आम्ही ऐकतों असें कवि म्हणतो.' (नवनीत. पृष्ठ २३५.) २६. हे महादेवा!. २७. दमयंती. २८. 'नवरी हो मज, दुज्यास न वरी हो' असाही पाठ आहे. २९. भीमराजाची कन्या दमयंती. ३०. हे जगदंबे, पार्वति! ३१. नळराजा. ३२. होवो. ३३. नूतन.

एका समयीं धरिला हंस नळें तो म्हणे, 'कृपा कर, गा! ।
सोड मला, जरि व्हावी ती दमयंती वधू, नृपा! [१]करगा. ॥ २३
करिन तुझें गुणवर्णन जेणें होइल तुझीच नवरी ती.' ।
सत्य प्रिय हित वदती [२]शुद्धात्मे न धरितीच नव रीती. ॥ २४
[३]राधाप्राप्त्यर्थ जसा [४]तो [५]स्वकरगतामळा यशा [६]शिनळ, ।
सोडी दमयंत्यर्थ क्षिप्रचि अतिदुर्लभा तशाशि नळ. ॥ २५
[७]नळमुक्तराजहंसासह हंसांची [९]नभःपथें [१०]आली ।
आली [११]प्रमदवनीं, तों भैमीही घेउनि [१२]प्रियां आली. ॥ २६
भैमी म्हणे, '[१३]मरालग्रहणेच्छा [१४]मन्मनांत आली हो! ।
एकासि तरि धरूं या, [१५]विखरा [१६]मुक्ता वनांत [१७]आली हो!' ॥ २७
इतरा हंसांनीं [१८]त्या नेल्या बहु लोभवूनि दूरवर, ।
भैमी त्यासि धरूं ये ज्या दे [१९]असुदान [२०]दानशूरवर. ॥ २८
एकांतीं तीपासीं स्तविला निषधेंद्र तो खगानें हो! ।
जाणों राधेला दे [२१]खगभगवद्वेणु [२२]तोखें गानें हो. ॥ २९
'काय द्विजें[२३], तुला द्विजराजेंही काय? [२४]मानवसुतनये! ।
जो[२५] त्वत्करासि तो [२६]सुरपसुतशतप्रवर मानवसुत न ये. ॥ ३०
पुण्यश्लोक निषधपति नल [२७]खलबलजलधिवाडवानल गे! ।
लोकां [२८]महोत्सवप्रद तोचि [२९]सदा, त्यांसि [३०]पाडवा न लगे. ॥ ३१
[३१]स्मरबुध[३२]दस्त्ररुचिरतर ऐसें म्हणणार जे न ते लटिके, ।

---

१. हस्तगत. २. निर्मल आहे अंतःकरण ज्यांचें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ३. हें उपमालंकाराचें उदाहरण आहे. ४. कृष्ण. ५. आपल्या हातांतील अमल (शुभ्र) यशाला. ६. जार. (कृष्ण.) ७. नलानें सोडलेल्या राजहंसाबरोबर. ८. मानससरोवरीं राहणाऱ्या हंसास राजहंस म्हणतात. याचे पाय व चोंच तांबडी असून बाकी शरीर पांढरें असतें. 'राजहंसास्तु ते चंचूचरणैर्लोहितैः सिताः'. ९. आकाशमार्गानें. १०. पंक्ति, कळप. ११. अंतःपुरोचित क्रीडावन. १२. प्रियसख्या. १३. हंस धरण्याची इच्छा. १४. माझ्या मनांत. १५. पसरा. १६. मोकळें. १७. सखीहो. १८. त्या सख्या. १९. प्राणदान. २०. नळराजा. (दात्यांत अतिश्रेष्ठ.) २१. खगरूप भगवद्वेणु, हंसरूपी श्रीकृष्णाचा वेणु. २२. आनंद. २३. पक्ष्यानें. २४. मानवोत्तम कन्ये. २५. जो त्वत्करासि नये. २६. सुरप म्हणजे इंद्र, त्याच्या शंभर पुत्रांहून प्रवर (श्रेष्ठ) असा मनुजपुत्र (नल). २७. दुष्टांचें बल हाच समुद्र, त्याचा नाश करण्याविषयीं वडवाग्नि. २८. मोठा आनंद देणारा. २९. पाडव्याच्या योगें लोकांस एकदां मात्र आनंद होतो, पण नलराजामुळें सदा आनंद होत होता—असें तात्पर्य. ३०. वर्षप्रतिपदा. ३१. मदन, बुध आणि अश्विनीकुमार यांपेक्षांही हा (नल) सुंदर. (स्मर, बुध आणि दस्र ह्यांची सौंदर्याविषयीं ख्याति आहे.) ३२. अश्विनीकुमार.

हैयंगवीन[1] जैसें सुरसिकरसनेपुढें[2] न तेलें टिके[3]. ॥ ३२
अनुपम[4] अनुरूप[5] अनघ[6] जरि वरिला त्वां नृपात्मजे ! न नल,[7] ।
होईल केवळ तापद, कीं जो नर नळ न होय तो अनल[8]. ॥ ३३
नलकस्तुरीस टाकुनि कां तूं घेशील अन्यनर माती ? ।
जरि वरिती न हरिप्रति घेती म्हणवूनि धन्य न रमा[9] ती. ॥ ३४
नररत्न तोचि, तूंचि स्त्रीरत्नं[10], उदंड ओडनावांचीं[11]; ।
न बुडविति न वा तारिति चित्रें बरवींहि ओडनावांचीं[12].' ॥ ३५
ती सुमति म्हणे, 'आर्या ! त्वां तिकडेही[13] असेंचि कळवावें, ।
साधो ! हळु हळु मृदु मधुहित[14] मित बोलोनि चित्त वळवावें.' ॥ ३६
'आज्ञा' म्हणोनि येथुनि[15] कळवुनि हें प्रेम तेथुनि[16] उडाला. ।
हंसप्रत्युपकारीं[17] हर्षीं कामज्वरीं नळ बुडाला. ॥ ३७
झाली स्मरज्वरार्ता[18] धाया ही योग्य हें पिता समजे, ।
आणति[19], न सांगतां सुख असुख परांचें[20], जगीं सदा सम[21] जे. ॥ ३८
योजी स्वयंवरोत्सव, रायांसि सुख प्रकाम[22] दे वार्ता[23], ।
आले नाहूतहि[24], मति कोणाची तैं न कामदेवार्ता[25] ? ॥ ३९
देवर्षिमुखें[26] परिसुनि शक्र करी धरुनि हरिख[27] गमनातें, ।
त्यांच्या[28] विमान येइल काय न येतांचि हरिखग[29] मनातें ? ॥ ४०

---

१. नवनीत, साजुक लोणी. कालच्या गोदोहापासून उत्पन्न झालेलें घृत. 'तत्तु हैयंगवीनं यद्ध्यो गोदोहोद्भवं घृतम्.' २. रुचि जाणण्यांत मार्मिक अशा जनांच्या जिभेपुढें. ३. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. 'न ते लटिके' 'न तेल टिके' हा पंतांच्या ठरींव यमकांपैकीं एक आहे. ४. ज्याला उपमा नाहीं असा. ५. योग्य, सदृश. ६. निष्पाप. ७. तूं नळाला न वरतां इतराला वरशील तर तो संताप देणारा होईल, कारण तो नळ (नळराजा) नसून अनळ (अग्नि) आहे. ८. अग्नि. ९. लक्ष्मी. १०. नररत्न, स्त्रीरत्न, अशीं नुसत्या नांवांचीं मनुष्यें पुष्कळ आहेत, पण ज्यांस हें नांव त्यांच्या गुणानें शोभतें अशीं तुम्हां दोघांवांचून कोणी नाहीं. ११. उपनामाचीं. १२. कूपांचीं आणि जहाजांचीं चित्रें बुडवीत नाहींत आणि तारीत नाहींत—असा भाव. १३. नळराजाकडेही. १४. मधासारखें गोड. १५. दमयंतीपासून. १६. नळराजापासून. १७. हंसाचे उलट उपकार आहेत ज्यांत अशा हर्षीं (आनंदीं). १८. कामज्वरानें पीडित. १९. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २०. दुसऱ्यांचें. २१. समदर्शी, साधु. २२. अत्यंत, पुष्कळ. २३. स्वयंवराची बातमी. २४. न बोलाविले तेही. २५. कामपीडिता. २६. नारदमुखें. २७. हर्ष. २८. इंद्राला दमयंती नेण्याची इतकी प्रबळ उत्कंठा होती कीं अत्यंत वेगवान् जो विष्णुवाहन गरुड तोही त्याच्या मनास येईना, मग विमान कोठून मनास येणार ? मनातें येणें=आवडणें, रुचणें. २९. विष्णूचा पक्षी. (गरुड.)

जों [1]निकट [2]कुंडिनाच्या आले यमवरुण[3]भूभृदर्यनल. ।
तों तोहि [4]सकलसद्गुणनिधि पुण्यश्लोक [5]वीरवर्य [6]नल. ॥ ४१
ते सुर म्हणति, 'अहाहा! [7]नलचि [8]सकलपुरुषमुकुटहीरमणी, ।
नवरी न वरील कसी? याला पाहोनि सुमतिही [9]रमणी. ॥ ४२
आम्हांलाचि न केवल लावितसे [10]व्यक्त लाज हा रविला; ।
आम्हीं [11]निजतेजोमद याचिपुढें सर्व आजि [12]हारविला.' ॥ ४३
[13]न सुचति जरि भलतैसी युक्ति प्रियकार्यसाधिका, [14]मुकते ।
त्या साधुसंगतिमहालाभासहि सर्व [15]साधि [16]कामुक ते. ॥ ४४
भेटोनि [17]त्यांसि म्हणती, '[18]कार्यपरें सर्वथा न लाजावें, ।
हो [19]अस्मद्दूत, [20]विमुख [21]न जनें, [22]सत्यव्रता नला! जावें.' ॥ ४५
'होतों दूत' नल म्हणे, 'कार्य वदा, कोण हो! तुम्हीं चवघे?' ।
ओळख देउनि म्हणती, 'आम्हीं [23]भैम्यर्थ पातलों अवघे. ॥ ४६
भैमी स्वयें वरू या आम्हां चौघां जणांत [24]अन्यतमा, ।
हें कार्य, दूत हो गा! जा गा! बा! तिजकडेचि धन्यतमा!' ॥ ४७
[25]सस्मितवदन नल म्हणे, 'प्रभुजी! जो हेतु [26]सुरवरागमनीं ।
माझ्याहि, तोचि सर्वांहि मृगांच्या तुल्य [27]सुस्वराग मनीं. ॥ ४८
दूत करुनि मज तिकडे कार्यास्तव पाठवूं नको, [28]पावा, ।
[29]कोणावरिहि सुनय न [30]स्वातिक्रम आठवून कोपावा.' ॥ ४९

---

१. समीप. २. कुंडिननगराच्या. कुंडिन हें भीमकराजाच्या राजधानीचें नांव. ३. इंद्र आणि अग्नि. (पर्वतांचा शत्रु इंद्र.) ४. साऱ्या उत्तम गुणांचा ठेवा. ५. वीरांमध्यें श्रेष्ठ. ६. 'आला' या अध्याहृत क्रियापदाचा कर्ता नळ. ७. 'नलचि सकलपुरुषवर्यवीरमणी' असाही पाठ आढळतो. (नवनीत.) ८. सर्व पुरुषांच्या शिरोभूषणांचा हिरा. ९. सुंदर स्त्री. १०. स्पष्ट. ११. आपल्या तेजाचा गर्व. १२. गमाविला. १३. ही गीति सुभाषितरूप आहे. १४. अंतरते. १५. मनोव्यथा-(आधि)युक्त. १६. कामी, कामाविष्ट, विषयासक्त. १७. त्या नळाला. १८. कार्यतत्परानें. १९. आमचा दूत. २०. प्रतिकूळ, पराङ्मुख. २१. 'न असें' असाही पाठ आढळतो. (नवनीत.) २२. सत्य हेंच व्रत (नियम) आहे ज्याचें तो. २३. दमयंतीकरितां. २४. कोणास तरी एकाला. २५. हास्ययुक्त मुख ज्याचें असा. २६. सुरवरांच्या, आपण जे देवश्रेष्ठ त्यांच्या आगमनीं. २७. मधुरशब्दाची प्रीति, मधुरध्वनीविषयीं आवड. २८. कृपा करा. पावणें=इष्ट कामनापूरक होणें, प्रसन्न होणें. २९. सुनय स्वातिक्रम आठवून कोणावरिहि न कोपावा—असा अन्वय. तुमचें व माझें एकच कार्य, त्याच कार्यासाठीं सर्व आलों आहों, यास्तव तुम्ही मला तिकडे अशा कामीं दूत करून पाठवितां हें उचित नाहीं. तुम्ही असें न कराल तर कोणाच्याही हातून सुनयाचें (नीतीचें) उल्लंघन (अतिक्रमण) होणार नाहीं—असा भाव. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ३०. आपली अमर्यादा.

शक्र म्हणे, 'वदलासि प्रथम तसें वचन, मग असें वदसी, ।
[1]अचल करींच असावा. व्यवहारीं शब्द संगरीं [2]सदसी.' ॥ ५०
भूप म्हणे, '[3]या कर्मी पवनहि होईल मज न [4]सांगाती,' ।
अंतःपुरप्रवेशीं, जी प्रभुजी! साधु युक्ति सांगा ती.' ॥ ५१
शक्र म्हणे, 'जा गा! तूं, चिंता आधींच करिसि कां गा! ती? ।
आम्हांसि हें कठिन जरि तरि सुज्ञ प्रभु म्हणोनि कां गाती?' ॥ ५२
शक्रवरें नल गेला, शिरला [5]अंतःपुरीं सुखें [6]सुरसा, ।
[7]भैमीच्या [8]हाँ, याच्या ती, सेवी रूपसंपदा सुरसा. ॥ ५३
भैमी हर्षे [9]त्याच्या, [10]विधुंच्या तसि [11]कुमुदिनी न आगमनीं, ।
सत्कारूनि म्हणे, 'जी! यावें मद्भाषणें न [12]आग मनीं. ॥ ५४
सुंदरवर कोण तुम्ही? [13]गुरुच्या वाटो न [14]हें [15]परांग मना, ।
कीं जें जें अंतःपुर तें तेंहि [16]विषय नव्हे [17]परागमना. ॥ ५५
आलां कसे [18]अवारित? [19]कार्यार्थ प्रकट आयकों, [20]दावा, ।
वाटे कर्णी तुमचा [21]वाङ्मय [22]सौवर्णकाय [23]कोंदावा.' ॥ ५६
वाहों लागे [24]गुरुघनरसपूरित वीरसेन[25]भूपनळ. ।
'सुंदरि! मी [26]पाशिपितृपपावकपुरुहूतदूत भूप नळ; ॥ ५७
सुमुखि! प्रार्थिति बहु तुज ऐसें प्रभु लोकपाल ते चवघे, ।
अवघे उणेचि रस, तूं [27]दिव्यरसाचीच सर्वदा [28]चर्व घे. ॥ ५८

---

१. दृढ. व्यवहारीं शब्द अचळ असावा (व) संगरीं करीं सदसी अचळ असावा—असा अन्वय. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २. उत्तम खड्ग. ३. या अंतःप्रवेशरूप कार्यामध्यें पवन (वायु)हि मजबरोबर यावयास निघणार नाहीं. वायूचाही जेथें प्रवेश होऊं शकत नाहीं. ४. सोबती. ५. राजादिकांच्या स्त्रियांचें राहण्याचें स्थळ. ६. देवसा. ७. हा नळ. ८. उत्तम रसाला, अमृताला. ९. त्या नळाच्या आगमनानें. १०. चंद्राच्या. ११. कमळिणी. १२. अपराध. मी जें पुढें भाषण करणार आहें त्याचा राग न यावा—हें तात्पर्य. १३. पित्याच्या (भीमाच्या). १४. तुमचें अंतःपुरांत आगमन. १५. मोठा अपराध. (पर+आग) १६. उचित स्थान, योग्य पात्र. १७. परक्याच्या येण्याला. १८. कोणी अटकाव न केलेले असे. १९. कार्यार्थ प्रकट दावा, आयकों=कोणत्या कामासाठीं आपण आलां हें स्पष्ट सांगा, तें मला ऐकूं द्या. २०. सौवर्णकाय कोंदावा. २१. वाणीरूप. २२. सोन्याचा देह, पक्षीं—उत्तम (अकारादि) वर्णांनीं युक्त असा आकार. २३. भरावा. २४. मोठा आणि उदकानें दाट गच्च भरलेला. (हें पनळाचें विशेषण.) नळानें प्रौढ, गंभीर आणि सुरस असें भाषण करण्यास आरंभ केला—असा भाव. २५. वीरसेनपुत्ररूप पन्हळ. २६. वरुण, यम, अग्नि, इंद्र यांचा दूत. २७. अमृतरसाचीच. २८. रुचि.

सुज्ञे! तुवां वरावा आम्हा चौघां जणांत [1]अन्यतम, ।
[2]धन्यतमत्व तुला [3]यो, न [4]शिवो पळ [5]दयितविरहजन्यतम.' ॥ ५९
हांसोनि म्हणे भैमी, '[6]प्रणतिप्रिय देव गुरु, असें म्हणती, ।
यांहीं क्षमा करावी, स्वीकारावी यशोर्थ [7]मत्प्रणती. ॥ ६०
वरिले हेचि चरण म्यां, त्यजितां [8]ज्वलनांत [9]काय [10]होमीनें, ।
[11]यज्जीवन [12]जीवनें तो दुग्धीं वांचेल [13]काय हो! [14]मीनें?' ॥ ६१
नल नृप म्हणे, 'सुबुद्धे! या दासावरि [15]तिहीं न कोपावें, ।
[16]मदधिक कोटिगुणें ते, आग्रह कांहीं करूं नको, [17]पावें. ॥ ६२
मृत्यु असो, [18]परवंचन करुनि सुधेच्या जिणें नको पानें, ।
[19]त्वत्पाणिग्रहणें मी देवांच्या बहु शिणेन कोपानें.' ॥ ६३
[20]विदुषी म्हणे, 'म्हणा जा कीं [21]म्यां कथिलें परोपरी, पण ती ।
प्रणति प्रभूंसि करिती, [22]अनुकंप्या मी [23]स्वयंवरा म्हणती. ॥ ६४
[24]सत्संमतस्वयंवरविधिनें वरितां तुम्हीं न अपराधी, ।
काय करूं? त्यजुनि तुम्हां माझी पळ अनुसरे न [25]अपरा धी. ॥ ६५
होईल देह [26]रंगीं सुरपतिनरपतिसमक्ष [27]नलगामी, ।
हा जन तुमच्याचि असे इतरा कोणाचियाहि न [28]लगामी.' ॥ ६६
होय [29]अकृतकार्यहि नल सुरवरसंमत खरें निवेदून, ।
सत्यें जसा तसा न [30]प्राज्येंहि सुधारसें निवे [31]दून. ॥ ६७

---

१. कोणी तरी. २. अत्यंत कृतार्थत्व. ३. येवो. ४. मनुष्यांस वरिलें असतां पतिविरह-जन्य दु:ख सोसावें लागेल; पण देवांपैकीं एकास वरिलें असतां तसें दु:ख सोसावें लागणार नाहीं–असा भाव. ५. पतिवियोगानें उत्पन्न जाहलेला शोक. (दु:ख.) ६. प्रणति (नमन) ज्यांस प्रिय ते, नुसत्या नमनानेंच संतुष्ट होणारे. ७. माझा नमस्कार. ८. अग्नींत. ९. देह. १०. जाळीन. ११. ज्याला वांचविणारें, ज्याचें वांचण्याचें साधन. १२. उदक. १३. येथें प्रश्नालंकार आहे. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १४. मासा. १५. त्या इंद्रादिकांनीं. १६. माझेपेक्षां श्रेष्ठ. १७. प्रसन्न हो, माझा हा मनोरथ पूर्ण कर. १८. दुसऱ्याला फसविणें. परवंचन करुनि सुधेच्या पानें जिणें नको, मृत्यु असो–असा अन्वय. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १९. तुझ्याशीं विवाह केल्यानें. पाणिग्रहण=विवाह. २०. शहाणी. (दमयंती.) २१. नळानें. २२. कृपा करावयास योग्या. २३. स्वत: पति पसंत करून त्यास वरणारी. २४. सज्जनास अत्यंत मान्य असा जो स्वयंवरविधि त्यानें. २५. दुसऱ्याला. २६. समाजांत. २७. नलानुसारी. २८. स्वाधीन. २९. केलें नाहीं. कार्य (देवकार्य) ज्यानें असा. ३०. पुष्कळ. (हें 'सुधारसें' यांचें विशेषण संस्कृताप्रमाणें आहे.) हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ३१. संतप्त, दु:खित.

रंगीं सर्व मिळाले, तेव्हां आली तयांत **द**मयंती. ।
जाणो चकोर ते ती मूर्तज्योत्स्नाचि[१] ताप[२] दमयंती. ॥ ६८
साहे न परोत्कर्षा[३] ज्याची मति सच्छळीं[४] सदानलसा,[५] ।
बैसे तिघांजणांसह[६] हरिहि[७] अधिष्ठूनि[८] त्या सदा[९] **न**लसा. ॥ ६९
रंगीं पाहों जातां दिसले चौघेहि ते धवासम[१०] जे, ।
भैमी देवकृतच्छल ऐसें चित्तांत तेधवां समजे. ॥ ७०
पांचा **न**ळांत जेव्हां काय दिसेनाच भेद लव[११] तीस, ।
बुद्धि म्हणे, 'कां भीशी? गुरुचरणीं[१२] त्यजुनि खेद लवतीस[१३]'. ॥ ७१
कर जोडूनि म्हणे ती, '**न**ल भर्ता **भी**मकन्यकेला हो,[१४] ।
प्रभुजी! स्वप्नांतहि जरि संकल्प नसेल अन्य केला हो[१५]! ॥ ७२
नल पति, इतर पुरुष पितृबंधु जरि मनांत मानले असती, ।
तरि ताराल इला हो! प्रभुजी! कैसी तरेल जी असती[१६]?' ॥ ७३
तीचा बलवान्[१७] निश्चय सुरहृत[१८] **न**लरूप घे हिरावूनी, ।
बहु तेज प्रकट करी शुचि[१९] सत्त्वगुण च्छळीं हिरा वूनीं[२०]. ॥ ७४
शुद्ध सवांग[२१] कुश[२२] नलद[२३] परि उपभोगोचितत्व[२४] नलदासी,[२५] ।
ऐसें[२६] मनांत आणुनि **द**मयंती सुमति होय **न**लदासी. ॥ ७५
पतिरूप सोडवुनि ती लोकेशांचा[२७] प्रसाद साधूनी,[२८] ।
घाली **न**ळासि माळा स्तविली प्रेमप्रसन्नसाधूनीं. ॥ ७६
नल तीस म्हणे, 'कुलजे[२९]! त्वां जरि[३०] देवांसमक्ष मज वरिलें, ।

---

१. मूर्तिमंत चंद्राची कांति. २. ताप शमवणारी. ३. दुसऱ्याच्या उत्कर्षाला. ४. साधूंचा छळ करण्याविषयीं. ५. निरंतर आलस्यरहित अशी, उद्युक्त अशी. ६. वरुण, अग्नि आणि यम यांसह. ७. इंद्र. ८. आश्रय करून. ९. सभेला. १०. पतिसम. धव (पति) जो नळ त्यासारखे. ११. अल्पमात्र, लेशमात्र. १२. इंद्रादिक देव जे गुरु (श्रेष्ठ) त्यांच्या चरणीं जर खेद त्यजुनि लवतीस (लवतेस—शरण जाण्यास तयार आहेस) तर तूं का भीशी (भितेस)—असा अन्वय. १३. नम्र होणारीस. १४. होवो. १५. अहो. १६. जारिणी. १७. दृढ, बळकट. १८. देवांनीं घेतलेलें. १९. हिरा वूनीं (उन्हांत) जसा जास्त तेज प्रकट करतो (तसा) शुद्ध (जो) सत्वगुण (तो) छळांत (त्याचा छळ झाला असतां) जास्त तेज (सामर्थ्य) प्रकट करितो. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २०. उन्हांत. २१. यज्ञांग. (सव=यज्ञ.) २२. दर्भ. २३. वाळा. २४. उपभोगाची योग्यता. २५. वाळ्यास. २६. 'जसे देव पवित्र तसा नळही पवित्र, ते जसे प्रेमार्ह तसा हाही प्रेमार्ह; पण ते गुरु म्हणून प्रेमार्ह, व हा संगमार्ह म्हणून प्रेमार्ह असें समजून तिनें नलालाच वरिलें.' २७. इंद्रवरुणादि लोकपालांचा. २८. संपादन करून. २९. हे सत्कुलोत्पन्ने. ३०. ज्यापक्षीं.

जों सासु[1] तों तुझा मी होतांहि प्रेम ऊन[2] मजवरिलें[3].' ॥ ७७
'प्रत्यक्ष दर्शन मखीं[4], सुगति,' असे वर नलासि वासव[5] दे, ।
'प्रकटेन इच्छितां, मम लोकीं येसील' हें हुताश[6] वदे. ॥ ७८
'पाकीं पटुत्व, धर्मीं स्थिति,' हे वर दोन धर्म[7] दे त्यातें, ।
वरुण जललाभ माल्याम्लानत्वहि[8] त्या प्रमोददे[9]त्यातें. ॥ ७९
गेले सुरपति नरपति पाहुनि तो साधुतोषकर[10] जोडी[11], ।
बहु वदले, 'या पुण्यश्लोका जाया स्वदोष[12] कर जोडा'. ॥ ८०
झाला विवाह गेला स्वपुरा, मग नल तिसीं सदा रमला, ।
भूमि म्हणे, 'ताराया अवतरला विष्णु हा सदार[13] मला.' ॥ ८१
कन्येसि इंद्रसेना, पुत्राला इंद्रसेन हें नाम ।
ठेवी, प्रजांसि दे बहु सुख पुण्यश्लोक तो जसा राम. ॥ ८२
सद्वापर[14] कलि[15] मार्गीं भेटे हरिला[16] सलोकपाळाला[17], ।
कळतां वृत्त[18] क्रोधें घे बहु बडवूनि तो[19] कपाळाला[20]. ॥ ८३
त्यांसि म्हणे, 'कैंवि तुम्हीं प्रभुनींहि स्वाभिमान[21] मोकलिला[22]? ।
नल गुरु[23] काय तुम्हांहुनि? सोसे न स्वापमान[24] तो कलिला. ॥ ८४
देवांसमक्ष कैसा दमयंतीनें मनुष्य हा वरिला? ।
दंड्या[25] ती, दंडाहीं[26] उठला प्रभुनीं न हात आवरिला.' ॥ ८५
शक्र म्हणे, 'गा! पुण्यश्लोक नळ गुणाढ्य[27] रामसाच कवी, ।
दे[28] सत्त्व सात्त्विका सुख सज्ज्ञानें, तमचि तामसा चकवी[29]. ॥ ८६

---

१. प्राणासहित. २. उणें. ३. माझ्यावरचें. ४. यज्ञांत. ५. इंद्र. ६. अग्नि. ७. यम. ८. पुष्पमाला म्लान न होणें. ९. आनंद देणाऱ्यास. १०. साधूंला संतोष करणारा. ११. जोडपें. १२. स्वदोष जाया (नष्ट व्हावे म्हणून) या पुण्यश्लोका (पवित्रकीर्ति नलाला) कर जोडा (प्रणाम करा)—असा अन्वय. १३. स्त्रीसहित. १४. द्वापरासहित कलि. १५. चार युगांतील जें चौथें त्याची मूर्तिमान् देवता; द्वापर=तिसरें जें युग त्याची मूर्तिमान् देवता. नलास राज्यभ्रष्ट करावयाच्या हेतूनें कलि द्वापरास घेऊन निषधदेशीं आला होता. १६. इंद्राला. १७. वरुणादिकांला. १८. नळाला दमयंतीनें वरिलें हें वृत्त. १९. कलि. २०. इष्ट गोष्ट सिद्ध न झाली म्हणजे कपाळ फोडून घेण्याचा तापट आणि कलहप्रिय मनुष्यांचा स्वभावच असतो हें सुप्रसिद्ध आहे. २१. स्वत:विषयीं योग्य पूज्यबुद्धि आत्ममान. २२. टाकिला. २३. मोठा. २४. आपला अपमान. (मी जो) कलि त्याला हा माझा अपमान सहन होत नाहीं, हें कलिवचन आहे. २५. दंड करण्यास योग्य. २६. दंडार्हीं (दंड करण्यास योग्य जो त्याला—अपराधी मनुष्याला) दंड करण्यासाठीं जो हात उठला तो देवांनीं आवरिला नाहीं, मग आजच कां असें केलें?—असा भावार्थ. २७. सुगुणसंपन्न. २८. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २९. फसवी.

योग्या तीच तयाला, तोचि तिला योग्य, जेंवि **काम रती,** ।
अनुरूप योग[1] सन्मत, साधूत्कर्षे असाधु का[2] मरती[3]? ॥ ८७
कामा[4], क्रोधा, लोभा, अनुसरतां लोक फार बा! ठकले, ।
न करावा सद्द्वेष[5], स्वहिता देऊं नयेचि पाठ[6] **कले**!' ॥ ८८
ऐसें शिकवुनि गेला स्वर्गाला शिष्यराय[7] **जी**वाचा[8], ।
मलिन[9] **कलि** न मान्य करी, ती[10] त्यासि शिवेल काय जी वाचा[11]?॥८९
रंध्रान्वेषण[12] केलें '**कलि**नें वर्षे समग्र[13] बारा [14]हो!' ।
खेल[15] न विटेचि, जरि म्हणे **द्वा**पर, 'हा दुष्प्रयत्न[16] बा! राहो'. ॥ ९०
नल भूप मूत्रशौचीं[17] करि, पदधावन[18] चुकोनि[19], संध्या [20]हो! ।
जाणों[21] तो साधु म्हणे, **कलि**चीहि प्रार्थना न वंध्या[22] हो[23]. ॥ ९१
त्या रंध्रीं[24] शिरला तो, **श्री**च्या गेहीं हळूच **कलि** कवडा[25], ।
छेदाया श्रित[26]सुखदा जेंवि भजे शस्त्रपाणि[27] हलिक[28] वडा[29]. ॥ ९२
आपण शिरे **नळीं कलि**, शिरवी त्या **द्वा**परास फाशांत[30], ।
व्यसनीं भल्यासि पाडी खळ, हरिणा व्याध[31] जेंवि पाशांत[32]. ॥ ९३

---

१. परस्परांस योग्य अशा वधुवरांचा योग सज्जनांला मत (मान्य) आहे. २. कां. ३. खिन्न होतात. मरणें=अतिशयित संकट, खेद, हानि पावणें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ४. हे मनुष्यजातीच्या स्वाभाविक सहा शत्रूंपैकीं तीन होत. ५. संतांचा (साधुजनांचा) द्वेष. ६. स्वहिता पाठ देऊं नये=स्वहित साधण्याचें सामर्थ्य असतां उपेक्षा करूं नये. पाठ देणें=सामर्थ्य असतां उपेक्षा करणें. ही गीति पंतांच्या उत्तम सुभाषितांत गणण्यालायक आहे. ७. शिष्यांमध्यें श्रेष्ठ. (इंद्र.) ८. बृहस्पतीचा. ९. पापी. १०. इंद्रानें उच्चारिलेली बोधामृतपूरित जी वाणी ती पापी कलीला स्पर्श करणार नाहीं—असा भाव. ११. वाणी. १२. न्यूनत्वाचा शोध; नलाच्या दोषांचा शोध, मर्मगवेषण. (रंध्र=छिद्र, दोष, व्यंग, खोड, गोम, अयत्न; अन्वेषण=शोध.) १३. संपूर्ण. १४. अहो. १५. कलि. १६. दुष्ट उद्योग. १७. मूत्रोत्सर्गानंतर शरीरशुद्धि करावयाच्या कर्मांत. १८. पादप्रक्षालन. १९. करण्याचें विसरून. २०. अहो. २१. येथें 'संध्या करि' याठायीं 'कलिचीहि प्रार्थना न वंध्या हो' ह्या उक्तीची संभावना केली आहे म्हणून हा उत्प्रेक्षालंकार होय. २२. निष्फळ. २३. होवो २४. छिद्रीं. २५. कपोत. 'कवडा' हा शब्द 'कपोत'शब्दाचा अपभ्रंश असावा असें दिसतें. कित्येक पक्षी शुभाशुभसूचक मानले आहेत. त्यांत कवडा हा पक्षी अशुभसूचक होय. हें मोरोपंतांच्या दुसऱ्या एका गीतिवरून ही दिसते. शकुनीस उद्देशून विदुर म्हणतो:—'हा न भला बुडवाया शिरला या राजमंदिरीं कवडा' (मोरोपंत—सभापर्व—अध्याय ४ गीति २७, काव्यसंग्रह—पृष्ठ २८ टीप १३ पहा.) २६. आश्रितांस सुख देणारा. २७. शस्त्र (कुऱ्हाड) आहे पाणीच्या ठायीं (हाताच्या ठायीं) ज्याच्या असा. २८. शेतकरी. २९. वटवृक्षाला. ३०. फाशांत. ३१. पारधी. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ३२. जाळ्यांत.

'द्यूत कर' असें शिकवी मग नलदायाद[1] पुष्कराशि[2] कली, ।
न शिकावें परि तन्मति[3] त्या दुर्मंत्रा[4] सुदुष्करा[5] शिकली. ॥ ९४
पुष्कर म्हणे, 'करावें द्यूत.' नल म्हणे, 'अहा ! भलें सुचलें, ।
अमृतापरीस माझ्या कर्णयुगाला[6] त्वदुक्त[7] हें रुचलें.' ॥ ९५
द्यूतीं आनंद जयें थोडा त्या पुष्करासि, अति कलिला, ।
हानि नळाला उमजे,[8] केली मलिनें[9] शिरोनि मति कलिला.[10] ॥ ९६
दुष्कर साधन जीचें त्या श्रीतें[11] मेळवूनि पुष्करसा[12] ।
पुष्कर साजे, नलतनु[13] जसि सरसी[14] ग्रीष्मकाळशुष्करसा.[15] ॥ ९७
बहु मास भरीं[16] भरला, प्रियसख[17] सचिवांसि विसरला निपट,[18] ।
स्त्रीहि श्रीहि बहु रडे, कलिनें दाटून पाडिलें विपट.[19] ॥ ९८
सर्वस्वनाश[20] होतां सचिवमतें ती[21] करूनि यत्नातें, ।
धाडी माहेराला[22] रथरत्नासह अपत्यरत्नातें.[23] ॥ ९९
सर्वस्व हरुनि पुष्कर नलराजाला म्हणे, 'उदारपणें[24] ।
शेवट[25] गोड करावा द्यूतरसाचा तुवां सदारपणें.[26]' ॥ १००
गरळरसाच्या[27] अब्दें[28] या तच्छब्दें[29] अतीव[30] तळमळला.[31] ।
परि न दुरुक्तें[32] आपण तो पुण्यश्लोक धीर नळ मळला. ॥ १०१

---

१. नळाचा बांधव. २. हा नलाचा भ्राता. ३. त्या पुष्कराची बुद्धि. ४. त्या दुष्ट उपदेशाला. ५. करण्यास फार कठीण अशा. ६. दोन्ही कानांस. ७. तुझें भाषण. (त्वद्+उक्त.) ८. न+उमजे=न कळे. येथें परसवर्णरूप झालें आहे. 'न'चा अकार नष्ट होऊन त्याचा 'उ'शीं संधि 'नु' असा झाला आहे:–जसें, नुरे. ९. पापी.कलीनें. १०. कलुषित. (मलिना.) ११. राज्यलक्ष्मीतें. १२. कमळासारखा. १३. नलाचें शरीर. १४. सरोवर. १५. ग्रीष्मऋतूच्या योगानें शुष्कोदका. १६. भरीं भरणें=मी कोण, करतों काय, इत्यादि विचार न करतां कोणत्या तरी छंदीं लागणें. १७. आवडते मित्र. १८. केवळ, अत्यंत. १९. विरोध, वांकडें. २०. सकल संपत्तीचा नाश. २१. दमयंती. २२. कुंडिनपुरास. (वनपर्व–अध्याय ६० श्लोक १९-२३ पहा.) २३. सर्वोत्तम मुलांत. (इंद्रसेन व इंद्रसेना यांतें.) 'रत्न' शब्दाचा अर्थ 'स्वजातीमध्यें श्रेष्ठ, उत्तम' असा आहे. 'जातौ जातौ यदुत्कृष्टं तद्रत्नमभिधीयते' (मल्लिनाथ.) जसें–रथरत्न=उत्तम रथ, अपत्यरत्न=उत्तम अपत्य, नररत्न=उत्तम नर. २४. उदारतेनें. २५. शेवट गोड करणें=एखाद्या व्यवहाराची अथवा कार्याची पूर्व अवस्था वाईट असतां त्याची अखेरची अवस्था (परिणामावस्था) उत्तम रीतीनें आनंदकारक करणें. २६. स्त्रीच्या पणानें. २७. विषरसाच्या. २८. जलदें, घनें. २९. त्याच्या (पुष्कराच्या) भाषणानें. ३०. फारच. ३१. संतापानें अस्वस्थ झाला, चैन पडलें नाहीं, तडफड केली. ३२. अपशब्दानें, अपशब्द बोलून.

जाय [1]विभूषण [2]दारानुगत नल त्यागुनि स्वनगरातें; ।
‘बहु लाजवी’ म्हणति तैं ‘जो हा हा पौर तो [3]स्वन [4]गरातें.’ ॥ १०२
त्या पुण्यश्लोकाला आश्रय देती न [5]दिनें [6]पुरोपवन, ।
नल [7]जठराग्नीस म्हणे, ‘[8]जळ कीं तुज तृप्तिला पुरो [9]पवन.’ ॥ १०३
पुष्करभयें न [10]पुसंती कोणीही आप्त त्या नळाला [11]हो ! ।
हिंडे [12]वनोवनीं तो अन्नावांचूनि बहु [13]गळाला हो. ॥ १०४
[14]यत्पादतलमृदुत्वें [15]लाजावें [16]कामधेनुनवनीतें, ।
वर [17]मिथुन पादचारें हिंडे, पावे फळेंहि न वनीं [18]तें. ॥ १०५
[19]हेमच्छद [20]खग पाहुनि [21]कल्पी आहारहेमलाभ वनीं, ।
वस्त्रें धरी, म्हणे, हो ! ‘प्राप्त न झालेंचि [22]हें मला [23]भवनीं.’ ॥ १०६
वस्त्रीं धरितां गेले वस्त्र हरुनि ते उडोनि खग नीच, ।
‘[24]वस्त्रहर [25]अक्ष’ ऐसें कळवुनि झाले अदृश्य गगनींच. ॥ १०७
[26]वनदेवता न पाहों सकती [27]लज्जानता [28]नलास्याला; ।
करिति न [29]रोमंथाला हरिण, मयूरहि तदा न [30]लास्याला. ॥ १०८
साध्वीनें [31]स्वपटार्धें [32]स्वतनू तसि झांकिली स्वपतितनु ती; ।

---

१. भूषणरहित. २. स्त्री आहे पाठीमागून असा. ३. ‘हाय हाय’ हा पौरांचा (पुरवासिजनांचा) शब्द. ४. विषातें. ५. एक दिवस. ६. नगर आणि बाग. (वनपर्व—अध्याय ६१ श्लोक १०-११पहा.) ७. भक्षित अन्नादिकांचा परिपाक करणारा जठरस्थ (उदरांत असणारा) अग्नि. ८. उदक. ९. वायु. १०. पुसणें=विचारणें; द्रव्यदानानें, मधुरभाषणानें अथवा अन्यमार्गें साहाय्य करून दुसऱ्याचा परामर्श घेणें. ११. अहो. या गीतीच्या पहिल्या व दुसऱ्या अर्धांतील ‘हो’ पदाचा अर्थ भिन्न दिसत नाहीं. १२. रानोरानीं. १३. थकला. १४. ज्या (मिथुनाच्या—स्त्रीपुरुषांच्या) पादतलाच्या मृदुपणानें. १५. मान खालीं घालावी, खालीं पहावें. १६. कामधेनूच्या लोण्यानें. (कामधेनुनवनीतापेक्षांही या दोघांचीं पादतलें मृदुतर होतीं—हा भाव.) १७. श्रेष्ठ जोडपें. १८. मिथुन. (नळ आणि दमयंती.) १९. सुवर्णपक्षाचा असा. (छद=पंख.) २०. पक्षी. २१. सुवर्णप्राप्ति आणि आहार (अन्न) मिळालें असें मानी. (अध्याय ६१ श्लोक १२-१३.) २२. हेमच्छद खग. २३. गृहीं. २४. वस्त्र हरण करणारे. २५. फांसे. कलीनें यांना (अक्षांना) हेमच्छद खगांचें रूप देऊन पाठविलें होतें. ते नलाचें वस्त्र हातीं पडतांच तें घेऊन उडून गेले, तेव्हां त्याच्यापाशीं जें एक वस्त्र होतें तेंही कलीनें अशा उपायानें हिरावून घेतलें. ‘वस्त्रहर विहग ऐसें’ असाही पाठ आढळतो. २६. वन रक्षण करणाऱ्या अशा कल्पित देवता. २७. लज्जेनें नम्र अशा. २८. नळाच्या तोंडाला. २९. रोवंथ. (पशु इत्यादिकांनीं तृणादि भक्षून त्याचें चर्वण करतात तो.) ३०. नृत्याला. ३१. आपल्या वस्त्राच्या अर्ध्या भागानें. ३२. स्वशरीर.

वेदहि अशा सतीची करिति सदा, परि न पळहि [1]पतित, [2]स्तुती.॥ १०९
वर्णी नदीनगांतें दावूनि तिला [3]विदर्भदेशपथ, ।
[4]त्याग समजोनि रडतां, समजावुनि नल सतीस दे [5]शपथ. ॥ ११०
एका [6]सभेंत [7]रात्रौ निजला मग आठवूनि [8]निजलीला ।
कलिमलिनबुद्धि नल तो सोडूं पाहे श्रमोनि [9]निजलीला. ॥ १११
'जावें कसें? न कळतां? मज पाशचि [10]दारसंग हा निपट, ।
आपण असोनि [11]अक्षत होऊं देइल न [12]संगहानि पट. ॥ ११२
फाडावा स्वकरें तरि आतां पट जागवील निजलीला, ।
होता [13]मदर्थ जरि हरि [14]असि असि म्हणता दुजी न निज लीला.'॥ ११३
शोधुनि सभा पहावी ऐसी आधीं दिली नळास मती, ।
मग [15]खड्गलता कलिनें, वाटे [16]त्यां [17]सुकृतसत्फळासम [18]ती. ॥ ११४
कलियोगें जें धरिलें रायें [19]तीक्ष्णत्व कापितां वस्त्रा ।
न धरील कधींहि तसें [20]शाणशितें [21]गरळलेपनें [22]वस्त्रा. ॥ ११५
खड्गें पट कापविला न तिचा अर्धा [23]गळाचि तो कलिनें, ।
न मळावेंचि कधीं तें प्रेम कसें मळविलें [24]खळें मलिनें? ॥ ११६

---

१. पापी पुरुष. २. स्तुति. ३. विदर्भदेशाचा मार्ग. अशा प्रसंगीं दमयंतीनें विदर्भदेशीं आपल्या पित्याकडे जावें असें नलानें सुचविलें व तिनेंही त्याचा हा अभिप्राय जाणला. ४. नल माझा त्याग करूं पाहतो असें जाणून. ५. आण. 'देवाची शपथ दे,' 'यज्ञोपवीताची शपथ दिली' असे प्रयोग देशावर प्रचारांत फार आहेत. ६. धर्मशाळेंत. ७. रात्रीं. 'रात्रौ' हें 'रात्रि'-शब्दाचें संस्कृताप्रमाणें सप्तमी विभक्तीचें एकवचन आहे. अशीं रूपें पंतांच्या काव्यांत पुष्कळ आढळतात. ८. आपल्या क्रीडा, आपली पूर्वकृति. ९. निजलेल्या स्त्रियेस. १०. स्त्रीसमागम. ११. न फाटलेला. १२. वियोग, तुटातुट. १३. माझ्यासाठीं. हरि मदर्थ जरि (जर) असि (तरवार) होता (झाला असता) (तर) असि दुजी निज लीला (हरिलीला) न (असें) म्हणता-असा अन्वय. १४. शस्त्र. (मजकरितां हरि शस्त्र होता तर अशी आपली दुसरी लीला नाहीं असें म्हणता-असा भाव.) १५. खड्गलता=तरवार. लता हें पद समासाच्या शेवटीं भ्रू, विद्युत् आणि भुज या शब्दांशीं अन्वित असून त्याचा अर्थ सौंदर्य, सौकुमार्य, सूक्ष्मता, तनुता असा असतो:-भुजलता, बाहुलता, भ्रूलता, विद्युल्लता, खड्गलता. १६. नळाला. १७. पुण्याच्या उत्तम फळासारखी. १८. खड्ग-लता. १९. कठोरपण, प्रखरपण. २०. सहाणेवर पाजविण्यानें, धार लावण्यानें; (शित=पाजविणें, धार लावणें.) २१. विषाच्या लेपानें. २२. शस्त्रविशेष, वस्तरा. २३. हें अपन्हुति नामक अलंकाराचें उदाहरण आहे. या स्थळीं पटावर गळ्याचा आरोप करण्यासाठीं पटाचा अपलाप केला आहे. येथें उपमेय जो पट त्यावर उपमान जो गळा त्याचा आरोप करण्यासाठीं उपमेयाच्या स्वरूपाचा अपलाप केला आहे म्हणून अपन्हुति अलंकार होतो. २४. दुष्टें.

जाय पुन्हा **न**ल परते, पाहे येउनि तिच्या मुखाला हो ! ।
[1]साश्रु **न**ल म्हणे, 'देवा ! हे [2]वामाक्षी सती सुखा [3]लाहो'. ॥ ११७
जाय पुढें, ये मागें, परतोनि सवेंचि [4]जेंवि [5]दोला [6]हो ! ।
तो [7]लाहो भेटीचा घे कीं न पुढें स्वदृष्टि [8]लोला [9]हो ! ॥ ११८
'[10]विश्वंभरे ! [11]क्षमे ! ह्या साध्वीला रक्ष, म्यां [12]निरविली हो ! ।
[13]सर्वसहे ! तुजपुढें न स्वाधिकता इणें मिरविली हो ! ॥ ११९
बापा ! [14]सतिव्रता ! हे तुज बहु जपली, न जीविता[15]सि सती, ।
तूंहि इला बहु जप गा ! त्वां त्यजिल्या न स्त्रिया बऱ्या दिसती.' १२०
कलि **द**मयंतीप्रेमा हे दोघे वोढिती **न**ळाला हो, ।
प्रेम्याला त्याचें मन सांपडलें, देह त्या [16]खळाला हो. ॥ १२१
[17]सत्याश्रित [18]गुणमय [19]शुचि कापुनि घे, परि न देचि [20]हांक, पट, ।
पुण्यश्लोकीं राहुनि उघडिल त्याचेंचि केंवि [21]हो कपट? ॥ १२२
नल गेल्यावरि **क**लिनें जागविली कीं तिचे [22]असु [23]खपावे, ।
पति न दिसतां म्हणे, 'हा !', राज्यभ्रंशें न ती [24]असुख पावे. ॥ १२३
'अजि नाथ ! अहो नरवर ! अजि इकडे एक वेळ [25]हेरा हो ! ।
[26]एकाकी जाल कसे? दासी सेवा करील [27]हे, [28]राहो. ॥ १२४
चुकल्यें, क्षमा करा, जी ! न चुकेन पुढें कदापि [29]सत्कार्या, ।

---

१. रडत. २. सुंदर नेत्र जिचे अशी. (वाम=अतिसुंदर; 'वामं सव्ये प्रतीपे च द्रविणे चातिसुंदरे । पयोधरे हरे कामे विद्याद्वामामपि स्त्रियाम् । वामी शृगालीवडवारासभीकरभीषु' इति विश्वः.) ३. पावो. ४. येथें उत्प्रेक्षालंकार आहे. जेथें हें उपमानच कीं काय अशी संभावना उपमेयावर केलेली असते तेथें हा उत्प्रेक्षा अलंकार होतो. याच्या वर्णनांत जणुं काय, जाणो, जेंवि, खरोखर, हे अथवा अशा अर्थाचे अन्य शब्द येतात. ५. झोंपाळा. ६. अहो. ७. लाभ. ८. चंचला. ९. होऊं. १०. विश्वाला धारण करणारी. (पृथ्वी.) ११. हे पृथ्वि. १२. स्वाधीन केली. निरवणें=आपल्या ठिकाणीं अन्याची योजना करून आपण कर्तव्य जें काम तें त्या अन्यावर सोंपणें. १३. सर्व अपराध सहन करणारी. (पृथ्वी.) १४. पातिव्रत्या. १५. प्राणास. १६. कलिला. १७. सतीचा आश्रित; (पक्षीं) सत्याचा आश्रित. १८. सूत्रमय; (पक्षीं) सद्गुणप्रचुर. १९. निर्मल; (पक्षीं) निष्पाप. २०. हांक दे=जागें करणें, इशारा करणें. यद्यपि पटानें स्वतःस कापूं दिलें तरी त्यानें शब्द केला नाहीं, त्यानें जवळच्या दमयंतीस जागें केलें नाहीं, दमयंती वस्त्र कापलें तरी जागी झाली नाहीं. २१. पट. २२. प्राण. २३. नाश पावावे. २४. दुःख. २५. पहा, सूक्ष्मदृष्टीनें पहा. २६. एकटे. २७. हे दासी=ही दमयंती दासी. २८. राहा हो. 'हें राहो' असा अन्य पाठ आहे. हें (पूर्वोक्त दासी सेवा करील वगैरे) राहूं द्या असें म्हणून पुढील गोष्ट ती बोलली. २९. उत्तम कार्याला.

त्यजिली दया अकस्मात्, [1]त्यागार्हा काय तीहि [2]सत्कार्या? ॥ १२५
माझें मन बहु तुमचा चिंतूनि [3]असाधुवाद तळमळतें, ।
अजि! पुण्यश्लोक! पहा [4]मत्त्यागें [5]कीर्तिपादतळ मळतें.' ॥ १२६
व्याघ्रालाही रडवी भ्रमतां [6]गहनीं तदा विलाप तिचा, ।
[7]पदमुद्रित पथहि तिला [8]कलिवशदैवें न दाविला पतिचा. ॥ १२७
[9]ज्याच्या चरणाचें [10]गुरु म्हणुनि धरावें शिरीं [11]रज [12]गरानें ।
त्या शोकें [13]गिळिलीला गिळिलें [14]विजनीं वनीं [15]अजगरानें. ॥ १२८
त्यासमयींचा तीचा गणिला [16]दवसाचि पळ विलाप वनें, ।
[17]व्याधासि [18]आर्तरव तो कर्णीं लागोनि कळविला पवनें. ॥ १२९
तो व्याध अजगरातें [19]खरशस्त्रेंकरुनि होय हो! चिरिता, ।
कुतुकें म्हणे, 'शिखि[20]शिखा, न जिरेल, इला वमूनि होचि रिता.'॥ १३०
त्यासहि [21]ती कीर्तिसुधा न पचे, कीं योग्य तो न [22]राहु [23]तिला, ।
देवी[24]कोपानल घे [25]निजधर्षणकामपामराहुतिला. ॥ १३१
मग तीन अहोरात्रें पतिविरहार्ता [26]घनीं वनीं भ्रमली, ।
[27]वृकसंत्रस्ता [28]यूथभ्रष्टा बाळा [29]मृगी तसी श्रमली. ॥ १३२
पाहे [30]रम्याश्रमपद [31]सीतासी, त्यांत ती निवे कांहीं, ।
पूजूनि सांत्विली बहु मुनिवर्यांहीं महाविवेकांहीं. ॥ १३३

---

१. त्यागास योग्य, त्याज्य. २. सत्कारायास योग्य. ३. शपथभंग, खोटें बोलणें. (गीति ११० पहा.) ४. माझ्या त्यागानें. ५. कीर्तिरूप पायांचें तळ. ६. अरण्यांत. ७. पायांनीं चिन्हित असा. ८. कलीच्या ताब्यांत असणाऱ्या दैवानें. ९. ज्या शोकाच्या. १०. थोर, मोठें. ११. धूलि. १२. विषानें. १३. ग्रस्त झालेलीस. १४. जेथें मनुष्यांची वसति नाहीं अशा वनांत. १५. सर्पविशेषानें. (अध्याय ६३ श्लोक २१.) १६. वणवासाचि. १७. पारध्याला. १८. दुःखिताचा शब्द. १९. तीक्ष्ण. २०. अग्निज्वाला. (शिखी=अग्नि.) २१. अजगरापासून दमयंतीची सुटका केली ही कीर्तिसुधा (यशोमृत). २२. राहु जसा अमृतसेवनाला योग्य नव्हता तसा तो व्याध त्या कीर्तिसुधेला (यशोमृताला) योग्य नव्हता. राहु अमृतसेवनास योग्य नव्हता म्हणून त्यानें देवरूप धरून अमृतप्राशन केलें. तें त्याच्या कंठगत होत आहे इतक्यांत मोहिनीरूपधारी विष्णूनें आपल्या चक्रानें त्याचें शिर छेदिलें अशी कथा आहे. (महाभारत–आदिपर्व–अध्याय १९ श्लोक ४-६.) २३. कीर्तिसुधेला. २४. दमयंतीचा कोपाग्नि. २५. आपल्यावर बलात्कार करण्यास इच्छिणारा असा जो पामर (नीच) व्याध त्याच्या आहुतीला. २६. निबिड अशा. २७. लांडग्यांना भ्यालेली. २८. कळपांतून चुकलेली. २९. या पद्यांत उपमा अलंकार आहे. येथें मृगी उपमान आहे आणि दमयंती उपमेय आहे. ३०. रमणीय आश्रमस्थान. ३१. सीतेनें वाल्मीकिचें आश्रमस्थान पाहिलें तशी.

'होईल भेटि पतिची, **क**लिचें हें कृत्य **न**ल न दे विपदा, ।
लागेल तिळप्रायहि तुमच्या [1]अपवादमळ न देवि! पदा. ॥ १३४
शीघ्रचि राज्यपदीं पतिसह बहु सुख भोगिशील [2]शीलवती! ।
[3]लवती **श्री** सत्त्वरता, अन्याला दे न एकही [4]लव [5]ती.' ॥ १३५
सांत्वन करितां झालें **भै**मीचें स्वस्थ चित्त कांहींसें. ।
[6]तद्दु:ख तसें अद्भुत, तें आश्रमपदहि, होय नाहींसें. ॥ १३६
विस्मित होउनि तेथुनि पुनरपि शोधी [7]त्या [8]शरण्यातें, ।
पाहे न [9]कंटकक्षत वपुतें ती पाहतां अरण्यातें. ॥ १३७
[10]अग [11]नग खग मृग पाहुनि त्यांसि म्हणे, '**न**ळ विलोकिला, बोला,' ।
त्या [12]शोकगररसाच्या पानीं मुनि **शं**भुचीच मति [13]लोलो. ॥ १३८
[14]सार्थ वनीं आढळतां जवळ करी ती मृगीच कळपा त्या, ।
[15]**न**लकृष्णसारविरहें जीच्या न पडेचि पळहि [16]कळ [17]पात्या. ॥ १३९
[18]निजवृत्त [19]सार्थवाहा कथुनि पुसे जो मनांत [20]देवें **न**ळ, ।
सार्थप म्हणे, 'मनुष्य न आढळले, बहु वनांत [21]देवनळ. ॥ १४०
पुसतां सांगे सार्थप, 'जाणें **चे**दिप [22]**सु**बाहुदेशाला,' ।
[23]तत्सहवासें चाले [24]धरुनि मनीं [25]**नि**षधजनपदेशाला. ॥ १४१
रात्रौ [26]निद्रावश तो सार्थ वनीं [27]विजनदावनगजांनीं, ।
[28]सार्थगजदानगंधक्षुब्धांनीं मर्दिला वनगजांनीं. ॥ १४२

---

१. दुरुक्तिकलंक. २. हे सुस्वभावसंपन्ने. ३.सात्त्विक पुरुषांना लक्ष्मी लवते (लवून प्रसन्न होते), अन्याला (सत्वरहिताला) ती एक लवही न दे—असा अन्वय. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ४. लेश. ५.संपत्ति, श्री. ६. तिचें (भैमीचें) दु:ख. ७. त्या नलाला. ८. रक्षणकर्त्यातें, शरण जाण्यास योग्य. ९. कांट्यांनीं बोंचलेलें.१०. पर्वत.११.वृक्ष. १२.शोकरूपविषाच्या पानीं. १३.आसक्त. १४.व्यापारी लोकांची टोळी, काफला, वैश्यजन. १५. काळविट मृग. (कृष्णसार=कृष्णेन सार: शबल: इति समास:; 'कृष्णसार: शिंशिपायां मृगभेदे स्नुहीतरौ' इति हैम:.), १६. विश्रांति. १७. पातें=डोळ्याची पापणी. जिचा डोळा कधींही लागला नाहीं—असा भावार्थ. १८. आपलें वर्तमान. १९. काफल्याच्या नायकाला, व्यापारी मंडळीचा जो पुढारी त्याला. २०. राजा नळ. २१. तृणविशेष. (अध्याय ६४ श्लोक १२७-१३० पहा.) २२. चेदिदेशाचा पति जो सुबाहु नामक राजा त्याच्या देशाला. २३. त्या सार्थाच्या समागमें. २४. चिंतूनि. २५. निषधनामक देशाच्या स्वामी नळास. (निषध+जनपद+ईशाला.) २६. निजलेला असतां. तो निद्रावश सार्थ रात्रौ विजनदावनगजांनीं सार्थगजदानगंधक्षुब्धांनीं वनगजांनीं मर्दिला—असा अन्वय. २७. निर्मनुष्य (विजन) अरण्यांतील (दाव) पर्वतावर जन्मलेल्या (नगजांनीं) वनगजांनीं. २८. व्यापाराच्या गजाच्या मदगंधानें क्षुब्ध झालेल्यांनीं, खवळलेल्यांनीं.

[1]पामर म्हणती, 'आली जी शोध करीत बायको पतिचा, ।
ती कृत्या, न पिशाची, ऐसा अत्युग्र काय कोप तिचा?' ॥ १४३
'दिसतांचि तीस मारूं' ऐसें म्हणती [3]स्वकार्यपटु वाणी; ।
ती कांपवी बहु गजत्रस्ता भैमीस [4]कर्णकटु [5]वाणी. ॥ १४४
तेथुनि पळोनि शिरली गहनीं भैमी, मनांत कांप तिच्या, ।
[6]स्वकृतासि बोल लावी, लावील सती पदासि कां [7]पतिच्या? ॥ १४५
ब्राह्मणसमागमें ती चेदिपतिपुरासि पावली [10]सांजे, ।
टाकित होत्या [11]उतरुनि जीवरुनि [12]गृहागमीं सख्या [13]सांजे. ॥ १४६
[14]इंच्याद्यमरी म्हणती, 'आम्हीं योग्या इच्या नसों [15]गतिला, ।
परि वेष्टिति पौरांचीं [16]पोरें मानुनि मनांत सोंग तिला. ॥ १४७
[17]प्रासादावरुनि तिला पाहे प्राज्ञा सुबाहुजननी ती, ।
[18]धात्री धाडुनि [19]धामीं ने कीं ठावी तिला सुजननीती. ॥ १४८
तीच्या लावण्यगुणें [20]द्रवली, दावी स्वमातृसम रीती, ।
गमली तिला [21]सुकृतलयनाकभ्रष्टा सुमूर्ति [22]अमरी [23]ती. ॥ १४९
पुसतां स्ववृत्त सर्वहि सांगे, पतिरीतिची कथी थोरी, ।
[24]सैरंध्री म्हणउनि घे पतिनाम [25]स्वात्मनामही चोरी. ॥ १५०

---

१. क्षुद्रजन, मंदबुद्धि. २. असुरी देवता. (अध्याय ६५ श्लोक २९.) ३. स्वोद्योगदक्ष. ४. कानास कडू लागणारी, कर्णकठोर, दुःश्राव्य. ५. भाषण. ६. आपल्या कर्मास. ७. येथें प्रश्नालंकार आहे. ८. दमयंती. ९. शुक्तिमती नामक नगरीस अथवा त्रिपुरी नामक नगरीस. १०. सायंकाळीं. ११. उतरून टाकणें, उतरणें=दृष्टिविकारादि बाधा न व्हावी म्हणून ओंवाळून काढणें; निंबलोण उतरणें इत्यादि. १२. घरीं आल्यावर. १३. सांजा (दळलेल्या गव्हांचा, कणकेचा—याचें अनेकवचन.) १४. इंद्राणी आदिकरून देवी. १५. पदवीला. १६. ग्रामिपुत्र (अध्याय ६५ श्लोक ४८.) १७. राजगृहावरून. १८. दाई, मुलें सांभाळणारी स्त्री. १९. गृहीं. २०. दया आली, दयार्द्र झाली, द्रव सुटला. २१. पुण्यलयामुळें स्वर्गापासून भ्रष्ट झाली अशी अमरी. २२. देवस्त्री. २३. भैमी. २४. सैरंध्री=दुसऱ्याच्या घरीं राहून स्त्रियांचे केंश विंचरणें, वेणी घालणें, आणि वस्त्राद्यलंकारादिरचना करणें इत्यादि शिल्पकाम करणारी व स्वातंत्र्यानें वागणारी स्त्री; स्त्रियांचें अंतःपुरांतील दासी, नेपथ्यधारिणी, भुजिष्या, कामवासिनी. (वनपर्व—अध्याय ६५ श्लोक ५५ टीका पहा.) २५. आपलें नांव. येथें स्व आणि आत्म या दोन समानार्थक शब्दांची योजना केली आहे. त्यांत एकाचें स्वारस्य दिसत नाहीं. अशीं उदाहरणें पंतांच्या काव्यांत कोठें कोठें दृग्गोचर होतात. आपलें नांव घेऊं नये असें स्मृतिवचन आहे:—
'आत्मनाम गुरोर्नाम नामातिकृपणस्य च । श्रेयस्कामो न गृह्णीयाज्ज्येष्ठापत्यकलत्रयोः ॥'

'[1]उच्छिष्टाशन पादक्षालन परपुरुषभाषण स्पष्ट, ।
न घडों घाल तरी, [2]निजपतिशोधावधि करीन मी कष्ट. ॥ १५१
बोलेन प्राणप्रियशोधार्थ ब्राह्मणासवें मात्र, ।
मदधीन असावें हें व्रत माझें, देवि! आणि हें [3]गात्र.' ॥ १५२
[4]राजप्रसू म्हणे, 'मज मान्य असे सर्व हें, असेंचि रहा, ।
[5]हो मत्सुता प्रियसखी, विरहानल [6]उपरमो, नसो चिर [7]हा.' ॥ १५३
सुख [8]नृपसुतासुनंदाज्योत्स्नासख्यें सतीव्रता पाहे, ।
पावे [9]भवार्तमतिसा सत्संगतिनें न तीव्रतापा हे. ॥ १५४
'[10]स्त्रीपट चोरूनि पळे तेव्हां कैंचीं नळासि [11]पायतणें ? ।
सिंहासनीं मिरवले ते चिरले हो! वनांत पाय [12]तृणें. ॥ १५५
जातां वनांत ऐके ऐशी दूरूनि [13]हांक, 'वणव्याला, ।
भ्यालों, पुण्यश्लोका! रक्ष; दुजा अभयदीं कवण [14]व्याला ?' ॥ १५६
धांवोनि जाय नळ कीं न [15]विपत्पूरीं [16]पदप्रवण वाहो, ।
पाहे तों [17]अहि आहे, आलासे त्या समीप वणवा हो! ॥ १५७
पुसतां नळासि सांगे, 'घडलें मज [18]गुर्वतिक्रमें पाप; ।
'[19]स्थावरसा हो, जों नळ [20]नुचली तों' हा [21]सुरर्षि दे शाप. ॥ १५८
[22]त्वद्धित करुनि यशातें हा नागसखा नवा नळा! [23]लाहो. ।
यातें रक्षुनि तुजला, तोष न भक्षुनि [24]दवानळाला [25]हो.' ॥ १५९
[26]अंगुष्ठमात्र झाला तो कर्कोटक असें वदोनि हित, ।
[27]दाववर्जितदेशीं त्यातें नळ भूप ने, करी विहित. ॥ १६०

---

१. उष्टें खाणें. (अध्याय ६५ श्लोक ६८-७० पहा.) २. माझ्या भर्त्याचा पत्ता लागेपर्यंत. ३ शरीर. ४. राजमाता. ५. होवो. ६. शांति पावो. ७. विरहानल. ८. राजसुता (वीरबाहुकन्या) सुनंदा हीच ज्योत्स्ना (चंद्रिका) तिच्या सख्यानें. ९. संसारदु:खानें पीडित बुद्धि ज्याची असा. १०. स्त्रियेचें वस्त्र. ११. वाहणा. १२. गवतानें. १३. ही कर्कोटक नागाची हांक. १४. सर्पाला. 'दुजा अभयदा कवण व्याला' असाही पाठ आहे. या पाठाचा स्वीकार केल्यास सापाला (व्याला) दुसरा कोण अभय देणारा आहे—असा अर्थ करावा. १५. विपत्तीच्या पुरांत. १६. पदनत, पदीं नम्र झालेला. १७. साप. (कर्कोटक नाग.) १८. गुरूच्या (नारदाच्या) अमर्यादेनें. १९. जोंपर्यंत नळ उचलणार नाहीं तोंपर्यंत न हालणारा असा हो. २०. न उचली. २१. देवर्षि. (नारद.) (अध्याय ६६ श्लोक ६.) २२. तुझें हित. २३. पावो. २४. दावाग्नीला तोष न होवो. २५. होवो. २६. आंगठ्याएवढा. (अध्याय ६६ श्लोक ९.) २७. दावाग्निरहित स्थानीं.

सोडावा भूवरि तों राहे अवलंब[1] धरुनि तो खातें[2], ।
मग बोले क्षण धाया[3] रोखातें[4], मग अनंत तोखातें[5]. ॥ १६१

'करितों हित कांहीं बा! स्वपदें मोजीत[6] सज्जना! चाल, ।
साधु तुम्ही, कां न नतोद्धारीं[7] होऊनि सज्ज नाचाल?' ॥ १६२

'एकद्वित्रीणि'[8] असें मोजी **नळ** लंघितां धराभाग[9], ।
दशमीं पदीं म्हणे दंश[10], तों चावे कल्पिताज्ञ[11] तो नाग. ॥ १६३

तत्काळ विकृत[12] झाला **नळ**, त्यातें नाग तो म्हणे, 'देवा! ।
सेवा हे बा! माझी.' किति पचवाया कृतघ्नपण केवा[13]? ॥ १६४

'डसलों यास्तव कीं या कुदशेंत तुला जनें न वळखावें, ।
त्वद्गत[14]कलिचें **रा**घवनामेंसें मद्विषेंहि बळ खावें. ॥ १६५

माझें बहुहितकर तव देहीं, न गमोचि, विष, मरणद[15], मनीं, ।
लेवविलें कवच[16] तुला हें सुखजयहेतु[17] विषमरणदमनीं[18]. ॥ १६६

शीघ्र **अयोध्ये**प्रति तूं ऋतुपर्ण[19]नृपासमीप जा, गा! तो ।
जागा तोषाचा बहु, जन त्याचा गुण जसा तुझा गातो. ॥ १६७

'मी **बाहुक** सूत' असें सांग, रहा तत्समीप सेवकसा, ।
या व्यसनीं सेव्य नव्हे रविवंशज तो मनुष्यदेव कसा? ॥ १६८

सत्संगीं[21] न शिरे बा! लवमात्रहि ताप, जेंवि न दवें[22] सरीं[23], ।
दावावा हयहृदयज्ञान[24]चमत्कार त्यासि सदवसरीं[25]. ॥ १६९

---

१. आश्रय, आधार, थारा, आस्रा. २. आकाशातें. ३. क्षणभर राग उत्पन्न करून पुढें पुष्कळ सुख देण्यासाठीं बोले. ४. रोषातें. ५. संतोषातें. ६. अध्याय ६६ श्लोक ११ पहा. ७. नतांचा—शरण आलेल्यांचा—उद्धार करण्यांत. ८. एक दोन तीन. ('त्रीणि' हें संस्कृत नपुंसकलिंगी अनेकवचन आहे.) ९. पृथ्वीचा प्रदेश. १०. दहा; (पक्षीं) दंश कर (डस). 'दश' हें 'दंश'धातूचें आज्ञार्थी द्वितीय पुरुषाचें एकवचन आहे. ११. 'दश' ह्या शब्दावरून मानिली आहे आज्ञा ज्या (कर्कोटकानें) तो. आज्ञा असल्याशिवाय नाग दंश करीत नाहीं ह्या समजास अनुसरून हें वर्णन आहे. (अध्याय ६६ श्लोक १२ टीका पहा.) १२. विरूप. १३. धन, सामर्थ्य, संचय, ठेवा, सांठा. 'किति पचवाया कृतघ्नपण केवा' हा चरण कव्युक्ति आहे. या उद्गारानें कवीनें आपला अचंबा दाखविला आहे. कृतघ्नपण बुडविण्यासाठीं विकृतरूप करणें ही किति नामी युक्ति! १४. तुझ्या शरीरांत शिरलेल्या कलीचें. १५. मृत्युदायक. १६. रक्षणाचें साधन, चिलखत. १७. सुख व जय यांच्या प्राप्तीस कारण. १८. संकटसमयरूप रणाच्या नाशाविषयीं. १९. इक्ष्वाकुकुलोत्पन्न राजा. हा अक्षविद्येंत परम निपुण होता. २०. राजा ऋतुपर्ण. २१. सज्जनांच्या समागमीं. २२. वणवा. २३. सरोवरांत. २४. अश्वविद्याचातुर्य. २५. योग्य प्रसंगीं.

देइल अक्षहृदय[1] तुज, घावें त्वां अश्वहृदय[2] ऋतुपर्णा; ।
घाया नवधि[3] राहों देनाचि नगीं[4] वसंत[5] ऋतु पर्णा. ॥ १७०
तैसें जें गेलें तें सर्वस्व पुन्हा अनंत देणार, ।
स्वस्थ स्वसत्वजीवन[6]मात्र असो, फार भाग्य येणार. ॥ १७१
निज रूप प्रकटावें, हृदयीं जेव्हां उठेल हा काम[7], ।
हें दिव्यांबर[8] देहीं घे[9], 'कर्कोटक' असें मुखीं नाम[10].' ॥ १७२
गेला[11] नळासि सुखवुनि, दुखवुनि तच्छळक[12] रासभा सदेही[13], ।
सद्धितकर कर्कोटक मात्र न तो, जिष्णु[14]चा सभासदही. ॥ १७३
नैषध ऋतुपर्णाला भेटोनि म्हणे, 'निजाश्रयीं ठेवा, ।
देवा ! बाहुकनामा सारथि आहें, करीन मी सेवा. ॥ १७४
आज्ञा कराल तरि हय घटिकेंतहि चालवीन शतगावें[15], ।
पाक करीन, असा कीं अमृतें वासापुढेंहि न तगावें. ॥ १७५
जाणें कविता, गायन, मुख्य कळा याचि दोन, येरां[16] ज्या ।
त्याही ठाव्या, म्हणती[17], 'स्वगुण स्वमुखें वदों नये' राजा[18] !' ॥ १७६
पंक्तिसहस्र[19] सुवर्ण[20] प्रतिमासीं करुनि वेतन स्थापी, ।
वरिली वृत्ति नळें ती जसि हंसें मानसच्युतें[21] वापी[22]. ॥ १७७
तेथें असतां नित्यहि निद्रासमयींच उत्तमश्लोक[23] ।
आठवुनि स्वमनांत स्त्रीस म्हणे एक उत्तम श्लोक. ॥ १७८
'कोठें असेल, मंदें[24] त्यजिली, क्षुत्तृट्समाकुळा[25] बाळा[26], ।

---

१. द्यूतक्रीडाज्ञान. २. अश्वपरीक्षाविद्या. ३. नवीन समृद्धि. ४. वृक्षाचे ठायीं. ५. वृक्षांला नूतन पल्लवांकुरादि समृद्धि देण्यासाठीं पूर्वीचीं पानें वसंतऋतु वृक्षांवर राहूं देत नाहीं. हें गीसर्व सुभाषितरूप आहे. ६. आपले धैर्यादि गुण आणि जीवन हें मात्र स्वस्थ असावें. इतक्याच पुरतें ऋतुपर्णापासून धन घे—असा भावार्थ. ७. स्वरूपप्रकाशनरूप काम. ८. उत्तम वस्त्र. ९. परिधान कर. १०. अध्याय ६६ श्लोक १४-२५ पहा. ११. अंतर्धान पावला. १२. नळाचा छळ करणाऱ्या रासभाला (गाढवाला—कलीला). १३. उत्तम सर्प. (कर्कोटक.) १४. इंद्राचा सभासद बृहस्पति. १५. चारशें कोस. १६. इतर. १७. सुजन म्हणती. १८. हे ऋतुपर्णा. १९. दहा हजार. २०. एक तोळा सोन्याचें नाणें. २१. मानस सरोवरापासून भ्रष्ट झालेल्या. वर्षाकाळीं हंस मानससरोवराप्रत मोठ्या प्रेमानें जाऊन तेथें वास करतात, अशी कविप्रसिद्धि आहे. हंसानें वर्षाकाळीं वापीसेवन करणें जितकें अनुचित तितकेंच नलानें सूतत्वाचें सेवन करणें होय—असा भाव. हा हंसाचा दाखला मूळांत नाहीं. २२. मोठी विहीर. २३. पुण्यकीर्ति. (नलराजा.) २४. म्यां मूर्खें, म्यां हतभाग्य पुरुषानें. मंद=अभाग्य, हतभाग्य. यास आधार:—'मंदोऽतीक्ष्णे च मूर्खे च स्वैरे चाभाग्यरोगिणो: । अल्पे च त्रिषु पुंसि स्याद्धस्तिजात्यंतरे शनौ ॥' इति मेदिनी. २५. क्षुधा आणि तृषा याहीं फार व्याकुळ अशी क्षुत्पिपासार्ता. २६. तरुण स्त्री. (अध्याय ६७ श्लोक १०)

मागेल अन्न कोणा? वांचेल कसी वनांत? हा! भाळा[1]!' ॥ १७९
जीवल[2] सखा पुसे, 'ही कोण तुझी? जीस नित्य शोचिशि रे! ।
बाहुक म्हणे, 'भल्याच्या हृदयीं पर[3]शोकवन्हिशोचि शिरे. ॥ १८०
आठवत्ये कोणीही मंदें त्यजिली वनांत हे बाळा, ।
सीतेसि राक्षसीशा बहु चिंता जीस म्हणति 'हेबाळा[4].' ॥ १८१
कितवें[5] मंदें पापें देउनि विश्वास कापिलाच गळा[6], ।
देउनि गेला चिंतावृद्धव्याघ्रीस[7] कीं 'इला चगळा[8].' ॥ १८२
अज्ञातवासकाळीं[9] **भी**में शोधासि धाडिले विप्र, ।
ते साधु बहु यशोधनलोभें सर्वत्र धांवले क्षिप्रं[10]. ॥ १८३
त्यांत **सु**देव ब्राह्मण होय यशस्वी[11], कपींद्रसा[12] सुकृती, ।
जो व्यसनीं थोरांच्या कामा[13] ये तोचि धन्य सासु[14] कृती[15]. ॥ १८४
पुण्याहवाचनीं[16] तो **चे**दिपतिगृहांत जाय सन्महित[17] ।
दूरुनि **द**मयंतीतें वळखे, मानी मनीं स्वजन्महित[18]. ॥ १८५
भेटे हळूचि आधीं प्रार्थुनि तो आप्तराज[19] साश्रु[20] तिला, ।
वर्णें[21] वळखे, **क**लिनें मळविलियाही सुधी जसा श्रुतिला. ॥ १८६
'**द**म**दां**त**द**मनसख मी **कुं**डिनवासी **सु**देव आइकसी? ।
बाइ! कशी गे! व्यसनीं पडलीस? न ती रडेल आइ कसी?'॥१८७
गहिंवरली वोळखितां बंधुसखा वाडवा[22] **सु**देवातें, ।
जेंवि मुमुक्षुमति जगीं वसत्या त्या आड **वा**सुदेवातें. ॥ १८८
तें मातेसि **सु**नंदा सांगे, ती त्या द्विजासि बाहूनी, ।
भाव पुसे, 'रडली कां सैरंध्री आज तूज पाहूनी?' ॥ १८९

---

१. कपाळा. २. जीवल नामक मित्र. हा ऋतुपर्णाचा अश्वपाळ. ३. दुसऱ्याच्या शोकाग्नीचें तेज. (शोचिस्=उजेड, प्रकाश, कांति.) ४. छळा, हेबाळणी करा, ओढाताण करा. ५. शठानें. ६. घात केला; गळा कापणें=एकाद्यास कांहींएक गोष्टीविषयीं भरंवसा देऊन समयीं फसविणें. ७. चिंतारूप वृद्ध वाघिणीला. ८. चघळा, खा; चघळणें=खावयाचा पदार्थ तोंडांतल्या तोंडांत बहुत वेळ फिरविणें. ९. नळ ऋतुपर्णाच्या घरीं गुप्तपणें असतां. १०. लौकर. (अध्याय ६८ श्लोक १-२ पहा.) ११. चेदिपुरांत राजगृहीं दमयंतीला पाहिली म्हणून यशस्वी. १२. मारुतीसारखा. १३. उपयोगी पडे. १४. जीवंत. १५. दैवशाली, कृतकृत्य. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १६. शुभकर्मप्रसंगीं. १७. सन्मान्य. १८. स्वजन्मसार्थक्य. १९. विश्वासुजनांचा राजा, उत्तम विश्वासू. २०. नेत्रोदकयुक्त. २१. रंगानें; (पक्षीं) अकारादि अक्षरानें. २२. ब्राह्मणाला.

विप्र म्हणे, ‘**न**ळमहिषी **भी**मसुता हें त्रिलोकितां कळली, ।
भ्रूमध्यग [1]पिप्लु पहा, व्यक्त न [2]तेद्रुचि दिसे, मळें मळली.’ ॥ १९०
मळ [3]धूतांचि [4]अविप्लुत पिप्लु [5]तमोमुक्त भानुसा साजे. ।
लाजे **सु**बाहुमाता, विषसें [6]स्वाज्ञान तन्मनीं डाजे. ॥ १९१
प्रेमें भेटोनि म्हणे, ‘वत्से! केलें असें तुवां कां? गे! ।
[7]त्वन्माता मद्भगिनी.’ ऐसें नातें रडोनि ती सांगे. ॥ १९२

भैमी म्हणे, ‘**सु**नंदा तसि [8]हेंहि, [9]असेंचि [10]पांहिलें कीं तें ।
कोटि गमे प्रीतिपुढें [11]तुच्छा [12]अमृतप्रपाहि लेंकींतें. ॥ १९३
[13]जाणोनि दया केली [14]ते तों तुच्छाचि [15]मावशी, [16]हेमीं ।
रत्नींहि न [17]रुचि, [18]शीलीं, [19]धाल्यें तेणेंचि मावशी! हे मी. ॥ १९४
होतां पतिप्रवृत्ति द्यूतीं, जाणोनि [20]भाविबाधा मी ।
पाठविलीं [21]स्वापत्यें, रडतो पाहोनि त्यांसि [22][23][24]बोधामीं.’ ॥ १९५
भैमीस मायसी जें सत्कारी फार मावसी ते, तें ।
वाटे श्री**अ**नुसूया पूजी सप्रेमभाव **सी**तेतें. ॥ १९६
भैमी म्हणे, ‘पितृगृहा [24]पाठवितां देउनि स्वसेनेला, ।
मावशि! उगी; लया त्वां ताप **सु**नंदे! सये! स्वसे! नेला.’॥ १९७
येतां **भै**मी, आधीं धाडुनि आनंद हेर माहेरा ।
दृष्टींसि म्हणति [25]कन्या, ‘धन्या व्हा, सत्य हे **र**मा [26]हेरां.’ ॥ १९८
माता तात भ्राते स्वापत्यें पुर **वि**दर्भ मात्र न ती ।
सुखवी, विश्वासहि, परि एक मलिन **क**लि न होय तुष्टमती. ॥ १९९

---

१. दोन भुवयांच्या मधला काळा वर्ण, तीळ, तिलक. पिप्लु=रक्ततिलकाकृति लांछन–असा अर्थ महाभारताच्या टीकाकारानें दिला आहे. या तिलकास महाराष्ट्रांत ‘मस’ असें म्हणतात असें टीकाकार नीलकंठ म्हणतो. २. त्याची शोभा. ३. सुनंदेनें धुवून काढतांच. ४. स्पष्ट. ५. अंधकारमुक्त. ‘तमविमुक्त’ असाही पाठ आहे. (तम=राहु). ‘तमो ध्वांते गुणे शोके क्लीबं, वा ना विधुंतुदे’ इति मेदिनी.) ६. आपलें अज्ञान. ७. तुझी आई. सुबाहुमाता आणि दमयंतीमाता ह्या दशार्णाधिपति सुदाम नामक राजाच्या कन्या, पहिली वीरबाहूस आणि दुसरी भीमास दिलेली. ८. मला (दमयंतीला)ही. ९. अशाच दृष्टीनें, समानपणें. १०. वागविलें. ११. लेंकींतें (मातृ) प्रीतिपुढें कोटि अमृतप्रपाहि तुच्छा गमे–असा अन्वय. १२. अमृताची पाणपोई. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १३. कोटि अमृतप्रपाहि प्रीतिपुढें लेंकीतें तुच्छा गमे–असें जाणून. १४. ती दया क्षुल्लक कपटरूपच होय. १५. कपटसें, कपटरूप अशी. १६. सुवर्णाच्या ठिकाणीं. १७. आवड. १८. उत्तम स्वभावाचे ठायीं गोडी आहे. १९. हे मावशी, त्या शीलानेंच ही मी संतुष्ट झालें. २०. पुढें होणारी पीडा. २१. आपलीं अपत्यें. (इंद्रसेन व इंद्रसेना.) २२. बाप. २३. गृहीं. २४. मला बापाच्या घरीं सेना देऊन पाठविल्यानें. २५. पौरकन्या. २६. पहा.

भैमी मातेसि म्हणे, 'गांजी साधूसि, दे वियोगा धी ।
स्नेहचि विश्वामित्र, न पर, एतन्नामका वियो गावी[1]. ॥ २००
दयितचि सुजनाकरवीं, स्वमुखाकरवींच आणवा हूं ने[2] ।
हें न करितां मरेनचि, सांगावें काय आण वाहून.' ॥ २०१
राज्ञी[3] म्हणे पतिस, 'जरि भुजगी[4] ग्रायासि मृत्युभी डसती ।
नच गडबडती वत्सा, न असें वदती त्यजूनि भीड सती.' ॥ २०२
भीमें नळ शोधाया केले जे विप्र सिद्ध त्यांसि कवी[5] ।
नळ उमगाया भैमी, सर्वत्र असें वदा, असें सिकवी[6]. ॥ २०३
'पुण्यश्लोका ! त्यजिली निजली आतां वनीं कशी भार्या[7] ? ।
नसतां दोष, सतीचा योग्य परित्याग काय गा ! आर्या !' ॥ २०४
येउनि असेंचि सांगती[8] नळविरहें जीस पितृभवन[9] कारा[10], ।
'आलों पाहुनि देवा, सांकारा[11] मात्र, त्या न अनकारा[12].' ॥ २०५
पर्णाद[13] द्विज सांगे, 'एकचि ऋतुपर्णपुरुष[14] साकेतीं[15], ।
त्वां शिकविलीं वचें[16] जीं श्रवणीं पडतां सखेद ठाके[17] तीं. ॥ २०६
तो र्‍हस्वबाहु[18] बाहुक पुरुष म्हणे, 'त्यागिजे स्वतनु, न सती, ।
करिता बळ, जरि विधिनें[19] विधिची धरिली यशोर्थ हनु नसती.॥२०७

---

१. गाधि=हा कान्यकुब्ज देशाचा राजा. याचा पुत्र प्रख्यात विश्वामित्र मुनि. गाधिराजा विश्वामित्र ज्याचें नांव अशा पुत्राला प्रसवो (वियो.) पण तो विश्वामित्र नव्हे (कारण तो विश्वाचा अमित्र शत्रु—छळ करणारा होय). तर, स्नेह हाच खरा विश्वामित्र (जगन्मित्र). २. सुजनाकरवीं दयित (प्राणवल्लभ—नल) आणवा; स्वमुखाकरवीं हूं (होय, हा, हूं=अंगीकारबोधक शब्द) न आणवा. नुसतें होय म्हणून राहूं नका—असा भावार्थ. ३. भीमपत्नी. (अध्याय ६९ श्लोक ३२-३३ पहा.) राज्ञी पतिस म्हणे [कीं] जरि [हिला] मृत्युभी ग्रायासि भुजगी डसती [तरी ही] वत्सा (भैमी) न गडबडती [व ही] सती भीड सोडून असें (गीति २०१) न वदती. एकादी नागीण हिला चावून जरी मरणाची भीतिही उत्पन्न झाली असती तरी देखील ही दमयंती गडबडली नसती. पण विरहदुःख असह्य आहे म्हणून भीड सोडून नवऱ्यास आणवा असें म्हणते आहे. ४. सर्पीण. ५. पंडित, ज्ञाता. (येथें 'भीम' हें विशेष्य.) ६. त्यांसि भैमी असें शिकवी—असा अर्थ. ७. अध्याय ६९ श्लोक ३७-३९ पहा. ८. प्रेषित विप्र. ९. बापाचें घर. १०. बंदिशाळा. ११. अकारसहिता अनळा. १२. अकाररहिता नळा. १३. दमयंतीनें नलराजाच्या शोधार्थ पाठविलेला विप्र. १४. ऋतुपर्णाचा सेवक. १५. अयोध्येंत. १६. गीति २०४ पहा. १७. उभा राहे, उत्सुकमन होई. १८. ऱ्हानभुज असा. १९. विधीनें (विधात्यानें) विधीची (दैवाची) यशोर्थ हनु धरिली नसती (यश प्राप्त व्हावें म्हणून आर्जव केलें नसतें), तर विधि (दैव) बळ (बळात्कार) करिता. दैव प्रसन्न झालें होतें म्हणून तनुत्याग केला नाहीं.

व्यसनविलुप्तविवेक[1] न पावेचि, उपेक्षितां स्वतनु, कंपा, ।
ऐशा दैवहतावरि[2] साध्वी न विटो, त्यजूनि अनुकंपा.[3]' ॥ २०८
वदला असें पुरुष तो, आहे केवळ विरूप[4] परि, पाक[5] ।
कीं शीघ्रयान येथें नळसा; अवितर्क्य कर्मपरिपाक.[6]' ॥ २०९
पूजुनि पर्णादातें, भैमी घेउनि मतीं स्वमातेतें, ।
योजी जें काम कुतुककीर्तिकर सरस्वतीसमा ते तें. ॥ २१०
त्याचि[7] सुदेवासि म्हणे, 'द्यावें त्वां एक दान दादानें,[8] ।
हें शुष्यज्जीवन[9] सरं[10] पूर्ण असो एकदा नदादानें.[11] ॥ २११
ऋतुपर्णाला म्हण कीं 'नळ नुगमे, तो नसेल या भावें ।
होतो पुन्हा स्वयंवर दमयंतीचा; प्रभो! तुम्हीं जावें. ॥ २१२
गेले पुष्कळ राजे राजकुमार स्वयंवरासि, अहा! ।
परि तो उद्यांचि कीं हो! जा, जरि जाणें घडेल, शक्ति पहा.'॥ २१३
तद्भावज्ञ[12] द्विज तो साकेतीं शिकविलें तसेंच वदे, ।
ऋतुपर्णा श्रवणीं तें वृत्त जसें अमृतहि न तसें चव दे. ॥ २१४
तें वृत्त बाहुकाला सांगोनि करूनि फुल्ल गाल, वदे, ।
'साधो! मित्रत्वें[13] द्विजराजीं[14] पद काय गा! न गालव[15] दे? ॥ २१५
मी कुंडिनगमनोत्सुक, जाणशि तूं शीघ्रयान, ने मातें, ।
'हूं' म्हण उद्यां स्वयंवर व्हावा प्रत्यूह[16] या न नेमातें.' ॥ २१६
नळ वरि म्हणे, 'बहु बरें.' स्वमनीं हा लागला खरखरा[17] हो! ।
प्रथम गमे सुज्ञमतें खर[18] योषिद्भाव[19] तो खरं[20] खरा हो. ॥ २१७

१. संकटांनीं विलुप्त (नष्ट) झाला विवेक (विचार) ज्याचा तो. २. हतभाग्यावर. ३. दया. ४. रूप बदललेला असा, रूपहीन. ५. अन्नपाक आणि रथ त्वरित नेणें या दोन कामांत. ६. परिणाम. कोणाच्या कर्मांचा परिणाम (अंत) कसा होईल ही गोष्ट तर्काच्या बाहेरची आहे. ७. पूर्वी भीमकराजानें नलदमयंतीच्या शोधाला पाठविलेला ब्राह्मण. ८. ज्येष्ठ भावानें (सुदेव हा मानलेला ज्येष्ठ बंधु.) ९. शुष्क आहे पाणी ज्यांतील असें. १०. सरोवर. ११. नदाच्या ग्रहणानें. १२. त्या दमयंतीचा भाव जाणणारा. १३. मित्रभावास्तव. १४. द्विज+राज=पक्षी+स्वामी=गरुडावर. १५. गालव—हा विश्वामित्र मुनीचा शिष्य. यानें विद्या समाप्त झाल्यावर आपण होऊन गुरुदक्षिणा देण्याचा आग्रह केला. तेव्हां ८०० अश्व यानें द्यावे असें ठरलें. ते अश्व मिळविण्याचा यानें उद्योग आरंभिला. गरुडाच्या पाठीवर बसून यानें शोध करून अश्व मिळविले आणि विश्वामित्रास दिले, अशी कथा आहे. (उद्योगपर्व—अध्याय १०५-११८.) गरुडानें मित्रभावानें गालवाचें कार्य केलें तसेंच तूंही माझें हें कार्य कर—असा ऋतुपर्णाच्या बोलण्याचा भाव. १६. विघ्न. १७. चटपट. १८. कठिण. १९. स्त्रीभाव. २०. गाढव. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे.

मग पुण्यश्लोक म्हणे, 'न सतीचा दोष, हा नियतिचा[1] कीं, ।
भ्रमवी[2] बळें भ्रमाच्या करुनि स्थिर नियमहानि यति चाकीं. ॥ २१८
पुत्र असोनि असें[3] कां? हा! म्यां वरिली वनांत विटलीला[4], ।
नाम न रुचेल, मग सुत मानेल कसा[5]? मनांत विटलीला. ॥ २१९
न बुडालों या मार्गें, आजिहि आहें, उद्यां बुडेन तमीं[6], ।
बत[7]! मीनकेतन[8]! कथं[9] घटितं[10] ते[11]? काय? तुज नसें नत मी? ॥ २२०
विटली न **वामनातें श्री**, अन्याही सती न दीनातें; ।
सुकतां सिंधु सरांशीं लावील कसें महानदी नातें[12]? ॥ २२१
न्यावाचि हा बहूत्सुक, वदलों या **सूर्यवंशभूपा** 'हूं', ।
ज्याला वरील **भैमी** तो सुकृती[13] भगवदंशभू[14] पाहूं.' ॥ २२२
योजी **ऋतुपर्णरथीं** स्वाद्भुतविद्याबळें हयां सज्जनी, ।
स्वजना दारिद्र्येंसीं स्मरवूंहि न दे गतें[15] तयांस[16] ज्जनीं. ॥ २२३
विद्यांप्यायित[17] **बाहुक**बाहुकलितरश्मि[18] ते चपळ वाजी, ।
फ़ुरफ़ुरति, म्हणति जाणों, 'आम्हां रविहयमदाहि[19] पळवा जी!' ॥ २२४
ऋतुपर्ण आपणासहि 'धन्य' म्हणे, होय सव्यथरथ[20] **रवी**, ।
क्षितिहृदयातें **बाहुक** दाउनि रथवेग भव्य थरथरवी[21]. ॥ २२५
ऋतुपर्णाचा सारथि **वार्ष्णेय** म्हणे मनीं, 'असा मान्य, ।
होता नळ[22], कीं संप्रति[23] या लोकीं एक हा असामान्य[24]. ॥ २२६
हा! पुण्यश्लोका[25]! बा! होतों मी सारथी तुझा पहिला, ।
काय तुझी गति झाली? कां त्वां दिधला वियोग या महिला[26]? ॥ २२७

---

१. दैवाचा. २. नियति (दैव) यति (योग्याला) स्थिरनियम हानि करुनि भ्रमाच्या चाकीं बळें भ्रमवी–असा अन्वय. हा भाग सुभाषितरूप आहे. ३. पुन: स्वयंवर कां? ४. जाराचा आचार. ५. हा काव्यार्थापत्ति नामक अलंकार होय. असें जर आहे तर मग असें होईल हें सांगावयालाच नको–असें कैमुतिकन्यायानें (किंवा दंडापूपन्यायानें) जेथें वर्णन असतें तेथें हा अलंकार होतो. ६. अंधकारांत. ७. खेदार्थी अव्यय. ८. हे मदना. ९. कसें. १०. घडणें. ११. तुझे. अशीं संस्कृत वाक्यें पंतांच्या काव्यांत वारंवार आढळतात, म्हणूनच तें 'संस्कृतप्राकृतमिश्रित' आहे असें पंतांनींच वर्णिलें आहे. १२. हें गीतार्ध सुभाषितरूप आहे. १३. पुण्यवान्. १४. भगवंताच्या अंशानें जन्मलेला. १५. गमनें. १६. अश्वांस. १७. बाहुकाच्या अश्वहृदयविद्येनें संतुष्ट झालेले. १८. बाहुकाच्या भुजांनीं धरिल्या रश्मि (दोऱ्या) ज्याचे ते (वाजी=अश्व). १९. सूर्याच्या अश्वांचा गर्व आहे ज्यांस असे. हा उत्प्रेक्षालंकार आहे. २०. पीडित आहे रथ (रथाश्व) ज्याचा तो. येथें 'रथ'शब्दाचा लक्षणेनें 'रथाश्व' असा अर्थ घेतला आहे. २१. थरथर कांपवी. २२. अध्याय ७१ श्लोक २६-३२ पहा. २३. विद्यमानकालीं. २४. अनुपम, लोकोत्तर. २५. नळा. २६. पृथ्वीला.

रूपें न, गुणें शुचि कवि दाता सकरुण[1] अनुग्र[2] हा नलसा, ।
तीच गति दृष्टि रीति स्थिति आर्ती[3] जी अनुग्रहानलसा.[4]' ॥ २२८
त्या नृपवार्ष्णेयांचे दाटति पाहोनियां जवास[5] गळे[6], ।
तों स्यंदनावरुनि[7] भूपृष्ठीं साकेतराजवास[8] गळे. ॥ २२९
भूप म्हणे, 'पडला गा! भूपृष्ठीं उत्तरीयपट[9], थांब.' ।
बाहुक म्हणे, 'पडों द्या, तो योजन[10] एक राहिला लांब.' ॥ २३०
पाहुनि बिभीतकद्रुम[11] भूप[12] म्हणे, 'बाहुका! प्रसंख्यानीं[13] ।
मत्समहि पटु न कोणी, मजला कर जोडिले असंख्यांनीं.[14]' ॥ २३१
ऐसें म्हणोनि सांगे [15]तो त्या तरुचीं फळें [16]दळें गणुनी, ।
बाहुक म्हणे, 'पहातों मोजुनि, संदेह वाटतो म्हणुनी.' ॥ २३२
'संख्यान अक्षहृदयहि जाणें मी सत्य, तुज नमो, जावें ।
सूर्यास्तापूर्वी, कीं लागेल विलंब बहु, न मोजावें.' ॥ २३३
बाहुक म्हणे, 'असें तरि जा, भो वार्ष्णेय! सूत! रथ हाकीं, ।
काय कठिन हो! जातो कुंडिननगरासि नीट पथ हा कीं?' ॥ २३४
राजा म्हणे, 'शरण तुज आलों, ने क्षिप्रं[17], कार्य तें सांधो.' ।
बाहुक म्हणे, 'मुहूर्त स्थिर हो, मोजीन तूर्ण मी, सांधो[18]! ॥ २३५
नेऊं, परि पाहों द्या, बहु कौतुक वाटतें मना म्हणुनी.' ।
भूप म्हणे, 'तरि इतुकीं या शाखेचींच तूं पहा, गणुनी.' ॥ २३६
शाखा छेदुनि मोजी प्रथम फळें, मग तशींच नळ पानें, ।
भरतां होय गतश्रम[20], विहिरीं[21] उकरूनि जेंवि जळपानें. ॥ २३७
'अश्वहृदय मी देतों, द्या मज संख्यान[22] अक्षहृदयहि[23] तें.' ।

१ सदय. २. सौम्य. ३. दुःखितजनावर. ४. अनुग्रह करण्याविषयीं अनलस असी. ५. वेगास. ६. गळे प्रेमाश्रुयुक्त झाले; कंठ दाटणें, गळा दाटणें=प्रेमशोकादिविकारजनित बाष्पांनीं भरून येणें. ७. रथावरून. ८. अयोध्याधिपति ऋतुपर्ण त्याचें वस्त्र. ९. उत्तरीय वस्त्र, आंगवस्त्र. १०. अध्याय ७२ श्लोक ३-५ पहा. ११. बेहड्याचें झाड. १२. ऋतुपर्ण राजा. १३. संख्या करण्याविषयीं, पदार्थगणना करण्यांत. १४. अगणित जनांनीं माझें वर्चस्व कबूल केलें. १५. ऋतुपर्ण. १६. पानें. १७. लौकर. (अध्याय ७२ श्लोक १८-२०) १८. साधूं दे, सिद्ध होवो. १९. लवकर. २०. श्रमरहित. २१. नदी इत्यादिकांचे तीरीं खणितात जो डोहरा (डुरा) तो. २२. संख्यान=रास केलेल्या पत्रफलपुष्पधान्यांची लांबी, उंची, विस्तार, संख्या इत्यादि केवळ पाहून सांगणें (नीलकंठ). २३. अक्षहृदय=अक्षांच्या अभिमानिनी देवतेचें हृदय वश करणारा मंत्र. हा मंत्र ज्ञात झाला असतां अक्ष (फांसे) अनुकूल पडतात. (नीलकंठ).

ऐसें मागितलें त्या दातृवरें सर्वदक्षहृदयहितें[1]. ॥ २३८
द्रुतकुंडिनगमनार्थी शिकवी त्या बाहुकासि तो कवि तें[2], ।
जाणों दि[3]व्यौषध दे [4]अंतर्गतकलिविषास ओकवितें. ॥ २३९
विद्या [5]दुष्टीं भय दे, जशि रघुची [6]परमनीं चमू, ढकली ।
कीं [7]स्वःस्था नहुषा [8]मुनिहुंकृति, [9]भी परम नीच मूढ कली. ॥ २४०
वर्णिति कवि ते प्याले गुरुकरुणामृतमहारसाला जे ।
स्पर्शोनि कलि नळाला श्रोत्रिय[10]मुनिला [11]महारसा लाजे. ॥ २४१
नळशक्तिपुढें कलिची शक्तिहि सिंहीपुढें जसी कुतरी, ।
चाले न लंघनीं गुरुच्या [12]माया, जेंवि सिंधुच्या [13]कुतरी. ॥ २४२
शापूं पाहे नळ, परि सुचलें [14]जें [15]वज्रकवच कलिला तें; ।
[16]सद्भीतें नमनातें, [17]दवभीतें, सेविजे [18]सुसलिलातें. ॥ *२४३

---

१. सर्व चांगल्या लोकांच्या हृदयांस प्रिय (हित) असा जो दातृवर नळ त्यानें. अश्वहृदय मी तुला देतों आणि तूं संख्यान (गणितविद्या) व फांसे खेळण्याची विद्या (अक्षहृदय) अशा दोन विद्या मला दे, असें सर्व-दक्ष-हृदय-हितें (सर्व जे दक्ष—चतुर त्यांच्या हृदयांस हितें—प्रियें म्हणजे सर्व चांगल्या लोकांच्या हृदयांस आवडणाऱ्या) दातृवर्य नळानें मागितलें. वाटेनें जातानां ऋतुपर्ण राजानें नळास एका झाडाचीं पानें एकदम मोजून दाखविलीं तें पाहून नळानें गणितविद्या मागितली. २. तें=संख्यान आणि अक्षहृदय. ३. उत्तम ओखद. यांत संख्यान आणि अक्षहृदय यांजवर विषवमनोत्तेजक दिव्यौषधाची संभावना केली आहे म्हणून हा उत्प्रेक्षालंकार होय. ४. शरीरांत प्रविष्ट झालेल्या कलिरूप विषास बाहेर काढणारें. ५. कलीच्या ठायीं. ६. शत्रुमनांत. ७. स्वर्गस्था. ८. अगस्त्यमुनीची क्रोधवाणी (शाप). नहुष राजा हा ययातिराजाचा पिता. हा इंद्रपद पावला असतां यास इंद्राणीविषयीं कामवासना उत्पन्न झाली. तिजकडे जाण्यासाठीं यानें आपल्या वाहनास सप्तर्षींस लाविलें व त्यांत बसून तो जाऊं लागला. वाटेंत यानें 'सर्प सर्प (चला चला)' असें म्हणून वाहनवाहकांस लत्ताप्रहार केला. तेव्हां क्रोधाविष्ट होऊन 'तूं स्वर्गापासून पतन पावून साप होशील' असा शाप अगस्त्यमुनीनें दिला, या उद्योगपर्वांतील कथेकडे येथें लक्ष्य आहे. ९. भय पावे. नळाला अक्षहृदयविद्या प्राप्त होतांच कलि भयग्रस्त झाला. १०. वेदवेत्त्या मुनीला. (श्रोत्रिय=छांदस, संपूर्णशाखाध्यायी.) ११. महारासारखा. जे गुरुकरुणामृत महारसाला प्याले ते कवि वर्णिति (कीं) श्रोत्रिय मुनिला (स्पर्शुनि) महार जसा (लाजतो) तसा नळाला स्पर्शोनि कलि लाजे—असा अन्वय. येथें 'कवि'शब्दाचे विशेषणांत विशेष समर्पकता दिसत नाहीं. १२. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १३. फुटकी नौका. १४. जें [नमनरूप] वज्रकवच तें कलिला सुचलें—असा अन्वय. १५. वज्रासारखें दृढ असें कवच. १६. साधुभीतानें. १७. वणव्याला भ्यालेल्यानें उत्तम उदकाचा आश्रय करावा. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १८. हेंच पूर्वार्धांतील वज्रकवच होय.

नमुनि म्हणे कलि, 'देवा! पुण्यश्लोका! महायशा! [1]पावें; ।
दे अभय मुखीं [2]याया स्तोत्र, न यायास 'हाय!' शापावें. ॥ २४४
[3]दुष्कर न [4]शिखिनिषेवण [5]हालाहलनामगरनिषेवण [6]वा, ।
शिरला या [7]तनुकक्षीं [8]भैमीशापाहिवरमिषें वणवा. ॥ २४५
[9]पूजिति अतापदा बहु, देवाहि न तापदा [10]अरण्यनळा; ।
[11]सत्पदचि हरि, न [12]हरि हरि, [13]हरिचेंहि [14]नतापदा [15]अरण्य नळा! ॥ २४६
[16]स्मरणें त्वद्भावातें पाहेन जनीं लवेंहि [17]अनलसमीं, ।
[18]अनलसमीरचि तूं तों मज [19]कक्षा पदिं असेन [20]अनलस मी.' ॥ २४७
कोपासि आवरी नळ, [21]सन्मति केवळ न रुक्षता सिकली, ।
आधीं दूषी [22]याचकसुरतरुला, मग बिभीतकासि कली. ॥ २४८
तें स्वमुखें प्रगट करुनि [23]दत्ताभयदानधर्म न विटाळी, ।
[24]खळकृतसच्छळकथनप्रस्तावातें कुलीन कवि टाळी. ॥ २४९

---

१. प्रसन्न हो. २. यावया. मुखीं [तुझें] स्तोत्र याया अभय दे [व] मुखीं 'हाय' यायास [त्वां] न शापवें–असा अन्वय. शाप देऊं नकोस, तसें झाल्यास मुखीं 'हाय हाय' येईल–असा भावार्थ. ३. करण्यास कठिण. ४. अग्नीनें जाळून घेणें, अग्निसेवन. ५. हालाहल नामक विषभक्षण. ६. किंवा. ७. तनुरूप (शरीररूप) कक्षांत (गवतांत). ८. दमयंतीचा शाप हाच अहिवर (महासर्प) त्याच्या रूपानें. ९. अतापदा बहु पूजिति; तापदा देवाहि अरण्यनला (अरणीच्या अग्नीला) न (पूजिति). १०. अरणीच्या अग्नीस. ११. (हे)नळा, सत्पदचि नतापदा (शरणागतांचें संकट) हरि (दूर करी), न हरि (इंद्र) हरि; हरिचेंहि अरण्य (न)=इंद्राचें नंदनवन देखील शरणागतांचें संकट हरण करीत नाहीं. अतापदा म्हणजे जो ताप देत नाहीं त्यास लोक फार पूजतात. अरण्यनळा-अग्निहोत्राच्या अरणीपासून जो अनळ (अग्नि) निघतो तो देव आहे पण तापद आहे म्हणून त्यास तितके पूजित नाहींत. सत्पद (साधूचे चरण) नत-आपदा जो नम्र जाहला त्याच्या आपदा हरि (हरण करितो) जसें सत्पद न तापदास हरि (दूर करी) तसें हरि (इंद्र) [किंवा] हरिचें (इंद्राचें) अरण्य (नंदनवनहि) दूर करीत नाहीं–असा भाव. येथें 'हरि हरि' हीं पदें खेदोद्गारवाचक आहेत असें समजलें तरी चालेल. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १२. इंद्र. १३. इंद्राचेंही. १४. नम्राच्या आपत्ति. १५. नंदनवन. १६. लवेंहि स्मरणें अनलसमीं जनीं त्वद्भावातें पाहेन–असा अन्वय. तुझें अल्पमात्र स्मरण करणाऱ्यास मी अनलसम (अग्निसदृश) नलरूपधारी समजून पीडा करणार नाहीं–असा भावार्थ. १७. अग्निसदृशीं. १८. अग्नि किंवा वायु तूं या गवताला मला आहेस. १९. गवताला. २०. निरालस्य, आलस्यरहित. २१. सज्जनाची बुद्धि रुक्ष (कठोर–रखरखित) असते असें नाहीं, ती मृदुही असते–असा भाव. २२. नळराजाला, याचकांच्या कल्पवृक्षाला. २३. दिलेलें अभयरूप दान हाच धर्म. २४. दुष्टानें केलेला जो सज्जनांचा छळ त्याच्या कथनप्रसंगाला. (प्रस्ताव=समय, प्रसंग). हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे.

बैसोनि रथीं पुनरपि अश्वांतें तो [1]प्रियंवद पिटाळी, ।
कुंडिनपुर दाउनि, भय ऋतुपर्णमनांत जें [2]तेंदपि [3]टाळी. ॥ २९०
कळतां, ऋतुपर्णाला **भीम**ें भेटावयासि आणविलें, ।
भैमीस [4]रथरवें '**नळ** आला' हें [5]**न**ळहयांहि जाणविलें. ॥ २९१
वळखे [6]**वा**र्ष्णेयाला, त्याही [7]रविवंशभवनदीपा हे, ।
नळसिंधुप्रतिच न ती [8]भीमसुकुंदांघ्रिभवनदी [9]पाहे. ॥ २९२
जो ऱ्हस्वबाहु सारथि तिसरा, चवथा नसे रथीं, **न**ळ कीं ।
हा, कीं भ्रमलीं नेत्रें अश्रुभरें सर्वकाळही मळकीं. ॥ २९३
ऋतुपर्णाची [10]सत्कृति करुनि म्हणे **भीम** भूप **वा**सवसा, ।
'गोड करा, [11]हंसें तुम्हीं, हा स्वीकारूनि कूपवास, वसा. ॥ २९४
वार्ता स्वयंवराची स्वप्नींहि नसे, कथील तों आर्य.' ।
आगमनहेतु पुसतां, नमनावांचूनि कोणतें कार्य?' ॥ २९५
भैमी दूतीस म्हणे, '[12]मद्धृदयीं तर्क हा असा वागे, ।
ऋतुपर्णाचा सारथि **बा**हुक जो तोचि **न**ळ असावा, गे! ॥ २९६
[13]**के**शिनि! जा शोध करीं, [14]मळलें [15]विमळ स्वरूप बहुधा त्या ।
'[16]मलिन**क**लिनयनपातें, जाणों [17]संदेहितचि मान्य बहु [18]धात्या.' ॥ २९७
जाउनि रथशाळेंत प्रार्थुनि बहु **बा**हुकासि [19]ती वदवी, ।
शोधुनि पाहे **भै**मीहृदयाच्या कार्यसिद्धिची [20]पदवी. ॥ २९८
[21]**प**र्णादाजवळि जसें वदला तैसेंचि **के**शिनीजवळ, ।
धवल मधुर ते [22]वर्ण [23]श्रुतिला गमले तिच्या [24]सुधाकवळ. ॥ २९९

---

१. गोड बोलणारा, मृदुभाषी. (नळ.) २. त्यास सुद्धां. ३. नाश करी. ४. रथाच्या वेगानें. ५. नळाच्या घोड्यांनीं. नळाच्या अश्वहृदयसामर्थ्यानें अश्व त्वरित आले तेव्हां तो नळच असें समजलें. ६. नळराजाचा सारथि. ७. सूर्यकुलगृहभूषणाला. (ऋतुपर्णाला.) ८. भीमकराजा हाच विष्णु याच्या पायांपासून उत्पन्न झालेली नदी भागीरथी ती. (दमयंती.) ९. नदीचा पति सिंधु म्हणून ती पतील न पाहे. नद्या ह्या पर्वताच्या कन्या आणि सागराच्या स्त्रिया—अशी कविप्रसिद्धि आहे. (मंत्ररामायण—युद्धकांड—गीति ८, काव्यसंग्रह पृष्ठ ८८ पहा.) १०. आदरसत्कार. ११. हंस मानससरोवरांत राहणारे, त्यांस कूपवास अप्रिय आणि असह्य म्हणून ही प्रार्थना भीमानें केली. १२. माझ्या हृदयांत. १३. दासीविशेष. (अध्याय ७४ श्लोक १-४) १४. बहुधा त्या मलिनकलिनयनपातें विमळ स्वरूप मळलें—असा अन्वय. १५. निर्मळ. १६. दुष्टकलीच्या दृष्टिपातानें १७. साधूंचें अकल्याणच किंवा साधूंचें अकल्याणकर्ता तोच. १८. ब्रह्मदेवास. १९. केशिनी. २०. स्थान. (नळराजा.) २१. मागें गीति २०६-२०८ पहा. २२. शब्द. २३. नाकाला. २४. अमृतग्रास.

ती भैमीस म्हणे, 'जी ! येइल भलत्या जनासि न गहिंवर, ।
दिसतें सत्त्व[1] असें कीं पडतां न चळेल हेमनग[2]हि वर. ॥ २६०
गहिंवरला[3] जी ! बाई ! परि आवरिला बळेंचि गहिंवर तो, ।
योगें[4] रूप फिरविलें[5], सूत[6] नव्हे हा, समर्थ महिवर[7] तो[8].' ॥ २६१
पुनरपि पाठविली ती, येउनि सांगे[9] हळूच ती, 'अनळ[10] ।
जळहि घटांत निघालें, बाइ ! म्हणावें कसें तया न नळ ? ॥ २६२
चुरलींहि फुलें झालीं पूर्वाधिक[11], अग्निहि न करा पोळी[12], ।
खिडकीहि होय मोटी, येइल तसि एकहि न करा[13] पोळी.' ॥ २६३
'तत्कृत[14] पदार्थ कांहीं आण, कर तदर्थ जा मिषाला[15] गे !' ।
ऐसें म्हणतां[16] आणी[17], चाखाया[18] त्याचि आमिषा[19] लागे. ॥ २६४
लागे खमंग[20] पळ[21], परि तनुचें स्तोकावशिष्टहि[22] मग रसें[23] ।
तें सर्व भान[24] पळवी, पळ वीर्यें[25] पीतें[26] मिष्ट हिमें[27] गरसें[28]. ॥ २६५
सावध होऊनि म्हणे, 'वोळखिला तोचि सुरस[29] मासाचा; ।
झांकूनि रूप होसी कां लटिका ? होचि सुरसमा[30] ! साचा[31].' ॥ २६६
मग बाहुकाकडे ती स्वापत्यें[32] न्यावया तिला[33] शिकवी, ।
तीं[34] पाहतांचि धांवे, धरुनि उराशीं रडे विलासि कवी. ॥ २६७
'स्वापत्यस्मृतिनें मी झालों ऐसा' असें म्हणे सुकवी[35]; ।
त्या सुदृढप्रेममहापाशांतहि[36] सांपडोनि तो चुकवी. ॥ २६८

---

१. बळ. ('सत्त्वं गुणे पिशाचादौ बले द्रव्यस्वभावयोः । आत्मत्वव्यवसायासुचित्तेष्वस्त्री तु जंतुषु ॥' इति मेदिनी.) २. मेरुपर्वतही. ३. शोकानें कंठ भरून आला. ४. प्रारब्धयोगानें. ५. विकृत केलें. ६. सारथि. ७. भूपति. ८. नळ. ९. अध्याय ७५ श्लोक ५—१७ पहा. १०. अग्नि. या पद्यांत जळधातुजय आणि वन्हिजय नलास प्राप्त होते असें सूचविलें आहे. ११. पूर्वींपेक्षा मोठीं झालीं, यावरून वायुजय सूचित केला. १२. भाजी, जाळी. १३. करावयास. १४. त्या नलानें शिजविलेला, पचन केलेला. (अध्याय ७५ श्लोक २० पहा.) १५. कपटाला, सोंगाला, निमित्ताला. १६. दमयंतीनें म्हटलें असतां. १७. केशिनी आणी. १८. दमयंती चाखाया लागे. १९. मांसाला. २०. अन्योपचारकृत रुचिविशेषानें युक्त. २१. मांस. २२. किंचित् शेष राहिलेलेंही. २३. गोडीनें, माधुर्यानें. २४. शुद्धि, संज्ञा. २५. प्रभावानें, सामर्थ्यानें. २६. प्यालेलें. २७. थंड. २८. विषासारखें. २९. उत्तम गोडपणा, सुरुचि. ३०. हे देवतुल्या. (नला.) ३१. खरा हो. हे सुरसमा ! साचा होचि—असा अन्वय. ही दमयंतीची उक्ति मूळ ग्रंथांत नाहीं. ३२. इंद्रसेन आणि इंद्रसेना. ३३. दासीला. ३४. अपत्यें. ३५. उत्तम पंडित. (नळ.) ३६. प्रेमरूप घट्ट अशा मोठ्या बंधनांत.

हें ऐकुनि साध्वीनें मातेकरवीं पि[1]त्यासि जाणविलें, ।
[2]तदनुमतेंचि तया बहु विनवुनि अंतःपुरांत आणविलें. ॥ २६९
ती पाहतां [3]धृतिमृगीकर्णीं [4]कटुशोकसिंहहाक शिरे, ।
स्वमनीं नळ कलिस म्हणे, 'केली [5]वरकांतिहानि हा! कशि? रे!'॥२७०
अन्योन्य दृष्टि मिळतां, शोकभरें तीहि [6]साधि, तोहि, रडे. ।
[7]विधिहतमति जन हरवुनि [8]करग अमृतफळहि [9]साधितो हिरडे. ॥ २७१
[10]दुःसहनिजविरहव्रतकृशतनुला देखतांचि कळवळला; ।
तीवरि [11]शुष्यत्सस्यक्षितिवर [12]घनसा दयाळु नळ वळला. ॥ २७२
जीनें [13]पतिपदपंकजरेणुपुढें तुच्छ लेखिला [14]काय, ।
ती त्यासि [15]पुसे, '[16]सुप्तस्त्रीत्यागी पुरुष देखिला काय? ॥ २७३
पायीं [17]भ्रमली श्रमली निजली भिजली [18]निजाश्रुनीं रानीं, ।
धार्मिक न पाहिला तो, जो जाय असीस टाकुनी रानीं? ॥ २७४
पति निजला मग निजली, तेव्हांचि प्रथम न उठली, चुकली, ।
[19]आग [20]त्यागविहित [21]हें? सुज्ञ मरे तों हि [22]फळहरा बुकली? ॥ २७५
[23]विटला जाणों प्रभु कीं वरिला नर, [24]सुरवरास न [25]बधूंनी, ।
हें अघ, तरि न वरावें काय [26]सुगुणगणवरास न [27]वधूंनीं. ॥ २७६

---

१. अध्याय ७६ श्लोक ५ पहा. २. बापाच्या अनुमतानें. ३. धैर्यरूप मृगीच्या कानांत. ४. कटु अशी शोकरूप सिंहाची हाक. ५. सुंदर कांतीची नासाडी. ६. मनोव्यथायुक्त. ७. विधीनें (दुर्दैवानें) हत (नष्ट केली) बुद्धि ज्याची तो. ८. हस्तगत, स्वाधीन असलेलें. ९. मिळवितो हे गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १०. असह्य अशा आपल्या विरहव्रतानें (वियोगकालांतील आचरणानें) कृश झालें शरीर(तनु) जिचें तिला. (दमयंतीला.) ११. शुष्क होताहेत धान्यें जीचीं अशा पृथ्वीवर. १२. मेघासारखा. १३. पतिपादकमळाच्या रजःकणापुढें. १४. देह. १५. गीति २७३-२७८ पर्यंत भैमीचें भाषण आहे. (अध्याय ७६ श्लोक १०–१४.) १६. निजलेल्या स्त्रियेचा त्याग करणारा. १७. फिरली. येथें अनुप्रास नामक अलंकार आहे. १८. आपल्या बाष्पोदकांनीं. १९. अपराध. २०. त्याग करण्यास योग्य, त्याग करण्याजोगें. २१. हें आग टाकण्यास योग्य काय?–असा प्रश्न. (अल्प अपराध झाला म्हणून टाकण्यास योग्य नव्हे–असें तात्पर्य). २२. फळ चोरणाराला. जो फळहर चोर आहे त्यास मरेतोंपर्यंत सुज्ञ बुकलतो काय? बुकलीत नाहीं असा बोलण्याचा भाव. २३. सौरस्यरहित झाला, रुष्ट झाला, प्रभूचें सौरस्य नाहींसें झालें. २४. देवश्रेष्ठास. (इंद्रास). २५. अनुकूल होऊन. २६. अनेक सद्गुणालंकृत अशा वराला. २७. स्वयंवरवधूंनीं. देवास सोडून मनुष्यास वरणें हें जर अघ (पातक) असेल, तर काय वधूंनीं (मुलींनीं) सुगुणगणवरास न वरावें ना? [या पद्यांत एका 'न'चा अर्थ मराठींतल्या 'ना'सारखा करावा म्हणजे दोन नकारांचा निर्वाह नीट होतो–जसें; 'तूं जात नाहींस ना?' 'त्यानें अजून जाऊं नये ना?']

जळविरहें मत्सीसी मरती, कीं प्रेम दाविती बोलीं[1], ।
पाहों बरी परीक्षा, नेत्रें करिती क्षणक्षणीं[2] वोलीं[3]. ॥ २७७
पुण्यश्लोकें रामें सीतासी हेहि अग्निच्या कुंडीं, ।
टाकूनि पाहिली, तों रंग[4] शुकीच्या, तसा इच्या तुंडीं[5]. ॥ २७८
बहुधा या[6] भावें ही त्यजिली स्त्री पंडितें जसी असती[7], ।
काळेंहि[8] कीं न पुण्यश्लोक त्यजिता, जरी बरी[9] असती'. ॥ २७९
पुण्यश्लोक म्हणे, 'गे ! राज्यश्रीस्त्रीवियोगहेतु[10] कली, ।
शतमरणविपत्तींसीं मतिमति[11] ! सति ! अतिविपत्ति हे तुकेली[12]. ॥ २८०
देवि ! कलि तुझ्या शापें, बहु कर्कोटकविषेंहि तळमळला, ।
गेला पळोनि, जेणें विधुंतुदें[13] विधु तसाचि नळ मळला. ॥ २८१
आलों तुजकरितांचि, श्रीमति ! साध्वि ! प्रसन्न हो महिते[14] ! ।
नें[15] सतीप्रसादसमसुखदायक सत्तीर्थवास होमहि[16] ते. ॥ २८२
दुःखांत पाडिले ऋजुमति[17] ! दुःसंगें तुझे असु[18] खगानें[19], ।
व्याधाच्या मधुरेंही हरिणाला शेवटीं असुख गानें[20]. ॥ २८३
कैंचें सुख दहनासीं[21], स्वच्छ करो सख्य वा रण करो रू[22], ।
तेंवि कलत्रास[23] कितवसंग[24] न सुखहेतु, वारणकरोरू[25] ? ॥ २८४
जरि तूं स्वयंवरीं वरणार परीक्षूनि गुणसुखनिधीतें[26], ।
युक्तचि कवि गातीलचि तुझिया निर्दोषगुणसुखनिधीतें[27]. ॥ २८५
प्रेमें जरि खळ वरिला, तरि लावी मानसीं खरखरा[28], गे ! ।

---

१. भाषणांनीं. २. प्रतिक्षणीं. ३. ओलीं. (ब आणि व यांचें सावर्ण्य आहे.) ४. रक्तिमा. ५. वदनीं. ६. सदोष आहे या हेतूनें. ७. व्यभिचारिणी. ८. कालांतरींही. ९. सती, शुद्धाचारसंपन्ना. हें भैमीभाषण मोरोपंतकृत वर्णनविस्ताराचें एक चांगलें उदाहरण आहे. १०. राज्यलक्ष्मी आणि भार्या यांच्या वियोगास कारण. ११. हे बुद्धिमति. १२. साम्य पावली. १३. राहूनें. १४. हे पूजनीये ! १५. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १६. यज्ञादि कृत्य. १७. अवक्र बुद्धि जिची अशी (हे दमयंति.) १८. प्राण. १९. पक्ष्यानें (हंसानें). २०. गायनानें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २१. अग्नीशीं. २२. कापूस. २३. बायकोला. २४. दुष्टाची संगति. २५. हत्तीच्या शुंडेसारख्या मांड्या जीच्या अशी. २६. गुण आणि सुख यांच्या राशीतें. २७. निर्दोष गुणाची खाण अशा तुझ्या बुद्धीतें कवि गातीलचि. २८. चटपट, वेदना, दुःखाची टोंचणी.

लोपविला न अकारचि[1], आकारहि, नळ न हा, खेर[2] खरा गे[3] !॥ २८६
ऋतुपर्णे पावता म्यां केला समयीं, न देवि ! मी चुकलों, ।
कळत चुकेन कसा हो ! ? नकळत चुकतां मैहा[4] सुखा[5] मुकलों.'॥ २८७
भैमी थरथर कांपे, नमुनि म्हणे, 'हा[6] उपाय आगमनीं, ।
वाहीन शपथशत मी, न धरावें यावरून आग[7] मनीं. ॥ २८८
त्यजुनि[8] सुर, चरण वरिले हे, कीं सौंदर्य पदनखापरतें ।
चंद्रींही न, पराचें सादर पाहे न वदन, खापर तें. ॥ २८९
उत्तर तुम्हीं दिलें तें पर्णादें कळवितांचि मातेतें, ।
कथुनि असें केलें जी ! सत्पदरतचित्त[9] जें न मांते[10] तें. ॥ २९०
ऋतुपर्णाजवळि तुम्हीं सूतपणें जरि असाल, तरि त्यातें ।
एकदिनीं शतयोजन आणालचि आत्मपोषककरित्यातें[11]. ॥ २९१
सम शुद्ध भाव सोडुनि मति अनुसरली असेल विषमातें[12], ।
तरि हेंचि दर्शनामृत मारू होऊनि उग्र विष मातें. ॥ २९२
प्राण्याच्या प्राणाचे पोषक वातार्कचंद्र[13] हे असती[14], ।
आतांचि प्राणातें सोडूत, जरी असेल हे असती[15].' ॥ २९३
आकाशीं वायु वदे, 'पुण्यश्लोका नळा ! न गांजावें[16] ।
ऐसेंहि होय समयीं[17] कीं स्थैर्यें त्यजुनियां नगां[18] जावें. ॥ २९४

---

१. अवर्णच लोपविला असें नाहीं तर आकाराचाही लोप केला (म्हणजे जो पूर्वीं अकारयुक्त नळ म्हणजे अनळ (अग्नि) होता, तोच नळ झाला म्ह० तेजोरहित झाला आणि आकाराचा (स्वरूपाचाही) लोप केला. २. खल. (र आणि ल यांचा सावर्ण्यास्तव भेद नाहीं, कारणपरत्वें एक समजावें.) अथवा खर=गाढव, अविचारी. ३. यमकांतील एकाक्षरी पदें भिन्नार्थक असतात असा नियम आहे, तथापि गा, गे, जो, तो, हा, हो, रे इत्यादि यमकांतील अंतिम पदें बहुधा एकार्थकच असतात. कोठें.कोठें गा=अगा, गायन कर; हो=अहो, होवो; असा अर्थ होतो. प्रकृतस्थळीं 'गे' हें पद एकार्थकच आहे. यमकांतील अंतिम एकाक्षरी पदें समानार्थक असतात, अशीं स्थळें पंतांच्या काव्यांत आढळतात; जसें मागील गीति १०४, ११९, १२१ इत्यादि. ४. तेज. ५. सौख्य. ६. स्वयंवर हा आगमनाचा उपाय होय. हाच स्वयंवराचा हेतु, अन्य हेतु नाहीं. ७. अपराध. ८. सुर त्यजुनि हे चरण वरिले कीं (कारण) [या]. पदनखापरतें (या पायांच्या नखासारखें सौंदर्य चंद्रींही न (नाहा). पराचें (इतरांचें) वदन सादर न पाहे [कारण] तें खापर (खापरासारखें) होय.) ९. साधुजनांच्या पदीं जें आसक्त तें. १०. उन्मत्त होत नाहीं. हा चरण सुभाषितरूप आहे. ११. आपल्या पोषणकर्त्यातें (अन्नदात्यातें). १२. अशुद्ध मार्गाला. १३. वायु, सूर्य, चंद्र. १४. आहेत. १५. जारिणी. १६. छळूं नको. १७. प्रसंगविशेषीं. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १८. पर्वतांला.

परि शीलें[1] कोण्याही व्यसनीं क्षणभरिहि सोडिली न सती[2], ।
तरतासि कसा? स्त्रीनें जरि शील[3]समृद्धि जोडिली नसती? ॥ . २९५
असतीस[4] सतीत्व जसें त्या श्रीमद्रामपादतामरसें[5] ।
देवा[6]! ईच्याहि[7] द्यावें दमयंतीच्या विशुद्धनामरसें[8]. ॥ २९६
गर्जति नभीं न केवळ माती[9] त्या सुरपुरांत[10] न नगारे[11] ।
पुष्पघन पडे, म्हणती गंधर्वां सुर पुरातन[12] न गा रे! ॥ २९७
दिव्यांबरें स्वतनुला झांकुनि, कर्कोटकासि नळ भूप ।
स्मरला, जों, स्मर[13] लाजों लागेसें प्रगटलें रुचिर[14] रूप. ॥ २९८
स्वपतिगळां पहिली श्री[15] जों, साध्वी स्त्रीहि तों, बळेंचि पडे, ।
ते दंपती न डोळे व्यर्थ विना प्रेमबोबळें[16] चिपडे. ॥ २९९
आलिंगुनि अंकावरि घेउनि, नेत्रें पुसोनि, तो हातें ।
बाष्पभररुद्धगल[17] नळ समजावी हरुनि शोकमोहातें. ॥ ३००
हर्ष इला नळलाभें बहु, न तसा कुमुदिनीस[18] शशिलाभें[19], ।
पुण्यश्लोकपदें[20] हे[21] किंवा ते[22] धरि मनांत न शिला भें[23]. ॥ ३०१
हळु हळुचि रडत होत्या दमयंतीच्या दयाळु ज्या माता ।
त्या मोठ्यानें रडल्या होतांचि प्रकट साधु जामाता[24]. ॥ ३०२
भीम रडे, न प्रगटी, पूर्वीं जो वेपमान[25] साधि[26] रडे, ।
केलें होतें चिंतावाळविनें जरिहि मानसा घिरडें[27]. ॥ ३०३
ऋतुपर्णहि सुख पावे, स्वार्थाग्रह लेशमात्र न कुलीनीं[28]. ।

---

१. उत्तम स्वभावानें. २. पतिव्रता. ३. शीलरूप संपत्ति. ४. अहल्येस. ५. शोभायमान रामाच्या चरणकमलें. ६. हे नला. ७. याचें विशेष्य 'दमयंतीच्या.' ८. निर्मलनाममाधुर्यानें. ९. मावतात. १०. अमरावतींत. ११. नगारा—हा आरबी शब्द आहे. १२. पूर्वींचे. पूर्वोक्त प्रसंगीं देव गंधर्वांस म्हणाले कीं, गायन करा पण जुनें शिळें गीत नका म्हणूं, कांहीं नूतन म्हणा—असा भावार्थ. १३. कामदेव. १४. सुंदर. १५. स्वरूपशोभा. १६. प्रेमरूप बुबुळें. १७. ज्याचा कंठ भरून आला आहे तो. १८. कमळिणीस. १९. चंद्रप्राप्तीनें. २०. पुण्यश्लोक नळाच्या किंवा श्रीरामाच्या पदाच्या योगानें. २१. दमयंती. २२. शिलारूप अहल्या. २३. भय. २४. जांवई. २५. कंपायमान. २६. मनोव्यथायुक्त, दुःखी. २७. सच्छिद्र पक्वान्न. २८. सत्कुलोत्पन्न पुरुषाच्या ठायीं. हा चरण सुभाषितरूप. आहे.

साधुमतीनीं धरिजे परभोगीं द्वेष काम न [1]कुलीनीं. ॥ ३०४
[2]नळदत्ताश्वहृदयवरविद्येनें [3]तोहि सुखविला सांचा, ।
झाला लाभ नळासम ज्यास, सुगतिभोगसुखविलासाचा. ॥ ३०५
[4]चार घटिकाहि दुःसह ज्यां, त्यांसि वियोग चार [5]हायन हो; ।
हाय न होरपळविला मीन, म्हणे अरिहि, न [6]विरहायन हो. ॥ ३०६
आधीं लीलेनें [7]श्रीहर भैमीताप जिंकिला [8]भूपें, ।
मग तो [9]पुष्करहि, [10]कसें हरवावें [11]वारिराशिला कूपें ? ॥ ३०७
पुण्यश्लोकानें कीं [12]श्रोतृदुरिततूळसंपदनळानें ।
गौरविला अहितकरहि पुष्कर, [13]कलिहृदयकंपदनळानें. ॥ ३०८
केलें राज्य बहु दिवस पुण्यश्लोकें नळें जसें रामें, ।
कळि कांपतो थरथरा ज्याच्या [14]कविकोटिकीर्तितें नामें. ॥ ३०९
नळ पुण्यश्लोक, तसा तूंहि, कळि तसा सुयोधनहि, खोटा. ।
द्यूतें पदच्युति [15]समा, परि [16]या तापापरीस तो मोटा. ॥ ३१०
अनुकूळा स्त्री भ्राते ब्राह्मण शतशः समागमें वसती. ।
धर्मा ! तुझी वनींची [17]प्रमदवनवसतिसमा गमे [18]वसती. ॥ ३११
करुनि खळपराभव तूं निष्कंटक राज्य सुचिर करिसील, ।
घे [19]अक्षहृदय, पडल्या योग तसा दुष्टगर्व हरिसील.’ ॥ ३१२
बृहदश्व अक्षहृदया देउनि संध्या करावया गेला, ।
केला प्रमुदित पुण्यश्लोक यशें धर्म चित्रसा ठेला. ॥ ३१३

---

१. पृथ्वीच्या ठिकाणीं लीन झालेल्याचे ठायीं. भावार्थ—ऋतुपर्ण हि (देखील) सुख पावे जरी त्याचा इष्ट हेतु साधला नाहीं तरी देखील त्याला बरें वाटलें), [कारण] कुलीनीं (सत्कुलोत्पन्न लोकांत) स्वार्थाग्रह लेशमात्र न [वसे]. कुलीनीं (पार्थिव-भौतिक-जड अशा) परभोगीं द्वेष (तिटकारा) [किंवा] काम (राग, इच्छा) साधुमतीनीं (सुज्ञ पुरुषांनीं) न धरिजे (धरूं नये). या पद्यांचा उत्तरार्ध उपदेशपर आहे. २. नळानें दिलेली अश्वहृदयरूप वरविद्येच्या (श्रेष्ठ विद्येच्या) योगानें. ३. ऋतुपर्णेही. ४. अध्याय ७७ श्लोक १८-१९ पहा. ५. वर्षें. ६. विरहाचें स्थान. ७. शोभा हरणारा दमयंतीचा ताप. ८. नळानें. ९. दायाद. १०. पुष्करानें नळ कां जिंकिला नाहीं तर समुद्राला कूपानें कसें जिंकावें ? हा पद्यभाग सुभाषितरूप आहे. ११. सागराला. १२. श्रोत्यांचीं पातकें हींच तूळसंपत् (कापसाचे ढीग) त्यास अनळ अग्नितुल्यानें. १३. कलीच्या हृदयास कंप देणाऱ्या नळानें. १४. अनेक कवींनीं कीर्तित (स्तुत) आहे जें नाम (नांव) त्यानें. येथें ‘कोटि’ शब्द बहुसंख्यावाचक समजावा. १५. सारखी, तुल्य. १६. तुला (धर्माला) प्राप्त झालेल्या तापापेक्षां. १७. राजाच्या क्रीडोपवनांतील वसतीसारखी. १८. रहाण्याचें स्थान. १९. अध्याय ७९ श्लोक १९-२१ पहा.

अध्याय पांचवा.

[1]ऋषिकथित [2]परमदुष्कर [3]जिष्णुतपःश्रवण करुनियां धर्म, ।
[4]सानुज [5]सदार चिंता पावे, पावेचि ना मनीं [6]शर्म. ॥ १
[7]देवर्षि, [8]तीर्थयात्राफळ जें [9]गंगात्मजा [10]पुलस्त्य वदे, ।
तें आपणही सांगुनि धर्माला [11]धर्मसंग्रहोत्सव दे. ॥ २
[12]धौम्येंहि विचार पुसतां सांगे धर्मासि तीर्थयात्रा त्या, ।
कविविस्तरभय न हरिति जरिहि हरिति भक्तभवभया [13]त्रात्या. ॥ ३
तो येउनि सांगे [14]सितवाहचरित [15]हरिनियुक्त [16]लोमश तें, ।
[17]प्रत्युत्थान जयाला द्यावें [18]सच्छ्रोतृकर्णलोमशतें. ॥ ४
"धर्मा! दिव्यास्त्रज्ञ [19]त्रिदशवरार्धासनस्थ [20]वासवसा, ।
अर्जुन विलोकिला म्यां, स्वस्थ तुम्हीं करुनि वननिवास वसा. ॥ ५

---

१. मुनिजनांनीं वर्णिलेलें (तप). अर्जुन वायुभक्षण आणि जीर्णपत्राशन करून उग्र तप करीत आहे, असें काम्यकवनांतील कांहीं ऋषींनीं धर्मास सांगितलें. (वनपर्व—अध्याय ७९). २. करण्यास कठीण असें. ३. अर्जुनतपश्चर्या. ४. बंधुसहित. ५. स्त्रीसहित. ६. सुख. ७. नारद. हा स्वेच्छाचारी, कलहप्रिय आणि परमभागवत होता. ८. अनेक तीर्थयात्रा केल्याचें फळ, पृथ्वीप्रदक्षिणा केल्याचें फळ. निरनिराळ्या तीर्थयात्रांचें फळ निरनिराळें आहे असें वर्णन आढळतें. पुष्करतीर्थ, अगस्त्यसरोवर, कोटितीर्थ, नर्मदा, सरस्वती, पंचनदतीर्थ, कुरुक्षेत्र, रामह्रदतीर्थ, इत्यादि अनेक स्थळीं यात्रा केल्याचें फळ. ९. भीष्मास. १०. पुलस्त्य नामक ऋषीनें पूर्वी भीष्मास भागीरथीतीरीं पृथ्वीप्रदक्षिणेचें फळ सांगितलें होतें, त्याचाच अनुवाद नारदानें धर्मापाशीं केला (अध्याय८२-८६). ११. धर्मसंग्रह करण्याविषयीं उत्साह. १२. नारद गेल्यावर धर्मानें विचारिल्यावरून धौम्यानें तीर्थयात्रानिरूपण केलें. (अध्याय ८७—९०.) येथें तीनतीन चारचार अध्याय एकाच पद्यांत आटोपून टाकिले आहेत, यावरून पंतांचें विस्तारभीरुत्व दृश्यमान होतें. १३. त्राता, [त्या तीर्थयात्रा] जरिहि भक्तभवभया हरिति [तथापि त्या] कविविस्तरभया न हरिति—असा अन्वय. त्या रक्षण करणाऱ्या तीर्थयात्रा यद्यपि भक्तांचें संसारभय हरतात, तथापि त्या तीर्थांचें वर्णन केलें असतां ग्रंथविस्तार होईल हें जें कवीस भय असतें त्या भयाचें हरण करीत नाहींत; धौम्यानें सांगितलेल्या तीर्थयात्रांचें वर्णन केलें असतां भवभय जाईल पण ग्रंथविस्तार फार होईल म्हणून सांगत नाहीं—असें तात्पर्य. १४. सित (शुभ्र): वाह (घोडे) ज्याचे (रथाला तो अर्जुन) त्याचें वृत्त. १५. इंद्रप्रेषित. १६. धर्मांचें आणि धौम्याचें तीर्थयात्रांविषयीं भाषण चाललें असतां लोमेश मुनि आला. (अध्याय ९१.) पंतांच्या या (अध्याय ५ गीति १-४) पद्यांतील कथाभाग मुक्तेश्वरानें कसा विस्तृत वर्णन केला आहे पहा. (मुक्तेश्वर—वनपर्व—अध्याय १४ ओवी १—७२). १७. उत्थापन. १८. उत्तम श्रवण करणाऱ्यांच्या (रसिक श्रोत्यांच्या) कर्णशतें आणि केशशतानें; कुतूहलमय कथा ऐकण्यास कर्ण उत्थित (सिद्ध—उभे) असतात आणि तशा श्रवणानें केश उभे राहतात, देह रोमांचित होतो, हें प्रसिद्ध आणि अनुभवसिद्ध आहे. १९. देवश्रेष्ठाच्या (इंद्राच्या) अर्धासनावर बसलेला. २०. इंद्रसा

शक्रें तुज कथिलें कीं, 'अर्जुन झाला [1]कृतार्थ, पाठवितों ।
[2]त्वद्धृतराधासुतभयशल्योद्धारयत्न आठवितों. ॥ ६
[3]विजयार्थ तीर्थयात्रा [4]लोमेशकथिता [5]अतामसी कर, गा! ।
[6]करगा होईल श्री, [7]कृष्णामृतसिंधुनामसीकर गा. ॥ ७
मज पार्थेंहि प्रार्थुनि कथिलें, 'गा! [8]पार्थिवोत्तमा! धर्मा! ।
करवीन तीर्थयात्रा, चाल, असें मी सहाय या कर्मा." ॥ ८
[9]चित्तांत तीर्थयात्राकाम, तया पुरविता प्रभुहि आला, ।
जैसा [10]अंभोद तृषित चातकखग पसरितांचि वरि [11]आला. ॥ ९
सेवी [12]पांडव सिद्धाश्रमतीर्थातें तदीयमहिम्यातें, ।
[13]विस्तरभयें न लिहिलें रसिकानुमतें मनोरमहि [14]म्यां तें. ॥ १०
तीर्थें करीत [15]गेलो, कीर्ति बहू ऐकुनि [16]प्रभासाची, ।
तेणें भेटविली, हो! [17]पुण्यर्द्धि [18]नवांबुदप्रभा साची. ॥ ११
[19]मुनि सर्व तीर्थयात्रा करउनि ने [20]गंधमादननगातें, ।

---

१. सफळार्थ, पूर्णकाम. २. तुझ्या हृदयांतील राधासुत(कर्ण)भयरूप शल्य उपटून काढण्याचा उपाय. ३. अर्जुनासाठीं, अर्जुनाची भेट व्हावी म्हणून. अर्जुनाच्या किंवा जयाच्या प्राप्त्यर्थ लोमशमुनींनीं सांगितलेली तीर्थयात्रा अवश्य कर, कारण ती अतामसी (सात्विकी) आहे. ती तीर्थयात्रा केल्यानें श्री (राज्य) हातांत येईल आणि मग कृष्ण हाच अमृतसिंधु त्याचें नाम हेंच सीकर (थंड तुषार) गा (स्तवन कर). या पद्यांत विजय म्हणजे अर्जुन-अथवा यशोलाभ असें दोन्हीं अर्थ उद्दिष्ट दिसतात. 'गा' हा शब्द 'सीकर' या शब्दाशीं अनुकूलार्थक नाहीं, हा यमकार्थदोष म्हटला तरी चालेल. ४. लोमेशानें सांगितलेल्या. ५. सत्वगुणयुक्त. ६. स्वाधीन. ७. कृष्णरूप अमृतसिंधुनाम हे तुषार. ८. श्रेष्ठराजा. ९. धर्माच्या चित्तांत. १०. मेघ. ११. मुखद्वाराला. १२. धर्म. १३. हें पंतांच्या विस्तरभीरुत्वाचें उदाहरण आहे. १४. मोरोपंतानें. १५. तीन भाऊ आणि द्रौपदी यांसह धर्मराज मार्गशीर्ष शुद्ध १५ नंतर पुष्यनक्षत्रावर म्हणजे सुमारें मार्गशीर्ष वद्य ३ रोजीं तीर्थयात्रा करण्यासाठीं निघाला. १६. प्रभासतीर्थाची. प्रभास हें तीर्थ द्वारकेजवळ आहे. येथें धर्म १२ दिवस होता. त्यास भेटण्यास श्रीकृष्ण बळराम आदि सर्व यादव आले होते. (अध्याय ११८.) १७. पुण्याची समृद्धि. (कृष्णास भेटविलें ही पुण्यसंपत्ति.) १८. नवीन मेघाची कांति. पुण्यर्द्धि ही आनंदजनक आहे म्हणून तिला नूतनमेघकांति (नवांबुदप्रभा) असें म्हटलें आहे. १९. लोमश. २०. गंधमादन. हें हिमालयाच्या उंच उंच शिखरांपैकीं एक आहे. याच्या उत्तरेस प्रख्यात मानससरोवर आहे. अनेक तीर्थें पाहत पाहत सानुज सदार धर्मराज येथें आला. अर्जुन येथें इंद्रलोकाहून परत येऊन त्यांना भेटला. येथें त्या सर्वांनीं चार वर्षें वास केला.

मातें मन्मति म्हणत्ये[1], 'मानवतिल साधुपाद न, न गा तें.' ॥ १२
कठिण पुढिल पथ म्हणउनि, **धर्म** म्हणे, 'सद्गुणभ्रमरबकुळा[2] ।
भीमा! गंगाद्वारीं वस, एका मात्र येउंदे **न**कुळा. ॥ १३
रक्षुनि **पां**चाळीला, **स**हदेवाला सहर्षि[3]**धौ**म्याला, ।
स्वस्थ रहा, नेतों मी त्वदनुमतेंकरुनि याचि सौम्याला[4].' ॥ १४
भीम म्हणे, 'हें गुरुला[5] विनवा, आम्हां तिघांस न वदावें, ।
अर्जुनविरहग्रीष्मीं[6] न जळावें त्वद्वियोगनवदावें[7], ॥ १५
चौघांसहि वाहेन, त्यजिता दाटूनि कां नरविमाना[8]? ।
शिरतां पाताळबिळीं[9] दीपहि पावेल कां न रविमाना?' ॥ १६
कृष्णा हांसोनि म्हणे, 'छांयेला[10] काय जी! महायास[11]? ।
चाला, चालेल पहा, योग्या नोहेचि हे[12] रहायास.' ॥ १७
भेटे साधु कुलिंदक्षितिनाथ[13] **सु**बाहु त्या अनन्यास[14], ।
परमाप्तास[15] प्रभुवर **धर्म** म्हणे, 'रक्ष हा जनन्यास[16].' ॥ १८
घेउनि जाय तयाला **लो**मश पाजूनि पुण्यपुंजरसा[17], ।
सुरसत्कृत[18]**बी**भत्सुप्रेक्षोत्साहहि पतत्रिकुंजरसा[19]. ॥ १९

---

१. 'साधुपद न मानवतील' [म्हणून] 'तें न गा' असें 'मन्मति मातें' (मला) 'म्हणत्ये'=चांगल्या लोकांस विस्तृत वर्णन आवडावयाचें नाहीं म्हणून तसें वर्णन करूं नको असें कवीला मन सांगतें. या पद्यांत कवीनें आपली वर्णनसंकोचाभिरुचि सूचविली आहे. २. उत्तम गुणरूप भ्रमरांस बकुलपुष्पासारखा अशा. ३. ऋषिसहित. ४. कोमलमनाच्या नकुळास. (अध्याय १४०.) ५. धौम्याला. ६. अर्जुनाचा विरह हाच ग्रीष्मसमय त्यांत. ७. तुझा वियोग हाच नवा वणवा त्यानें. ८. नररूप विमानाला. ९. पाताळबिळीं शिरतां दीपही रविमाना कां न पावेल! पाताळांत निबिड अंधकार असल्यामुळें तत्रस्थ लोकांस दीप हा सूर्यासारखा कां वाटणार नाहीं? तेथील लोकांत दीपाला सूर्याचा मान कां मिळणार नाहीं? काक्वर्थे 'मिळेल' हें उत्तर. १०. येथें द्रौपदीनें आपल्याला धर्माची छाया (सावली) असें म्हटलें आहे. छायेला जाण्यास मुळींच प्रयास पडत नाहींत हें सुप्रसिद्ध आहे. धर्म गेला असतां त्याची छाया त्याजबरोबर सहजच जाईल—असा भाव. (अध्याय १४०.) ११. मोठे प्रयास. १२. द्रौपदी. १३. कुलिंदनामक किरातांचा व देशाचा राजा सुबाहु. १४. धर्मराजास. (अन्+अन्यास=नाहीं+पर; ज्याला कोणी पर (परकीय) नाहीं—असा धर्म.) १५. परम विश्वासु सुबाहूला. धर्म या राजाच्या देशांत एक दिवस होता. १६. जनरूप ठेवा (पुरलेलें द्रव्य). १७. पुण्यराशिरूप रसाला. १८. देवांनीं सत्कारिलेल्या बीभत्सूला (अर्जुनाला) पाहण्याचा उत्साह. १९. गरुडसा. (पतत्रि+कुंजरसा=पक्षी+गजसा=पक्षिश्रेष्ठसा.)

जातां [१]दुर्गममार्गें अश्रुतचि पदार्थ नित्य नव दावी, ।
सांगे कथा अशा मुनि, गोष्टि सुधेचीहि ज्यांत न वदावी. ॥ २०
वातें वर्षें पावे कृष्णेची गिरिपथांत [२]तनु कंपा, ।
[३]रंभासी पडतां ती, व्याकुळ करि पांडवांसि [४]अनुकंपा. ॥ २१
[५]वीजी वल्कें [६]वायुज, अंकीं शिर धर्म तो [७]दयाघन घे, ।
[८]धौम्य मुखीं जल घाली; [९]देवर्षि म्हणे, '[१०]शंमोऽस्तु [११]ते [१२]अनघे !' ॥ २२
[१३]तच्चरण [१४]अजिनशयनीं [१५]चुरिती, म्हणती, 'बरी' न [१६]यम [१७]तीतें, ।
साधूंच्या [१८]दुःखितजनहितकृत्यान्य न [१९]वरी [२०]नयं मतीतें. ॥ २३
धर्म म्हणे, 'बा भीमा ! घे स्कंधीं, योग्य ही न गमनातें, ।
[२१]निष्ठुरसा गमला हा, '[२२]सत्संश्रययोग्यही [२३]नग मनातें.' ॥ २४
भीम म्हणे, 'मी ईसहि, तुजहि, [२४]यमांसहि, सुखेंचि [२५]वाहीन, ।
अथवा होइल आज्ञा तरि आजि [२६]घटोत्कचासि वाहीन.' ॥ २५
धर्मानुमतें स्मरतां, धाया [२७]गुरुदास्यपुण्य [२८]जनकानें, ।
ऐके घरीं [२९]घ, टोत्कच नमनीं, तो सत्य [३०]पुण्यजन कानें. ॥ २६

---

१. कठिण वाटेनें. २. शरीर (अध्याय १४४ पहा). ३. केळीसारखी. (अध्याय १४४ श्लोक ४ पहा.) ४. कृपा. ५. वारा घाली. वीजन=विंझण्यानें वारा घालणें. ६. भीम. ७. दयारूप मेघ. ८. धौम्यमुनीनें रक्षोघ्न मंत्राचा जप करून तें मंत्रित उदक तिच्या मुखांत घातलें आणि आशीर्वाद दिला. (अध्याय १४४ श्लोक १५-१९ पहा.) ९.लोमेश. १०.शांति असो. ११.तुला. तुला शांति असो=हा आशीर्वादच आहे. १२. हे पापरहिते. १३. त्या द्रौपदीचे पाय. १४. मृगचर्माच्या शय्येवर. १५. चेपतात, पादसंवाहन करतात. १६. नकुळ सहदेव. १७. द्रौपदीतें. १८. दुःखित जनास हितकर अशा कृत्याहून इतर. १९. स्वीकारी, अंगीकारी, धरी. २०. मार्ग, नियम, वर्तनक्रम. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २१. अदयसा. २२. साधूंच्या आश्रयास उचित असतांही. २३. पर्वत. २४. जुळे झालेले—जोडी-(नकुळसहदेव). २५. अध्याय १४४ श्लोक २३-२४ पहा.) २६. घटोत्कच—हा भीमसेनापासून हिंडिबा नामक राक्षसीच्या ठायीं झालेला पुत्र. (मोरोपंत—आदिपर्व—अध्याय २९ गीति ६३, काव्यसंग्रह—पृष्ठ १५५ पहा.) याचें मस्तक घटसदृश आणि उत्कच (केशरहित) होतें म्हणून यास 'घटोत्कच' असें नांव पडलें. यानें सर्व पांडवांस खांद्यावर घेऊन एका खेपेंत गंधमादनपर्वतशिखरावर नरनारायणाश्रमीं नेऊन उतरिलें. (अध्याय १४५ पहा.) २७. पितृसेवेचें पुण्य. २८. बापानें. (भीमानें.) २९. घरीं 'घ' असें त्यानें ऐकिलें व 'टोत्कच' हीं अक्षरें भीम उच्चारीत होता तीं त्यानें नमनाच्या समयीं ऐकिलीं. घटोत्कच किती त्वरित आला हें या गीत्यर्धांत दाखविलें आहे. ३०. राक्षस. (घटोत्कच.) ['अथ पुण्यजनो यक्षे राक्षसे सज्जनेऽपि च.']

धर्म नकुळ सहदेव द्रुपदसुता धौम्य भीमसेन मुनी, ।
[1]प्रेमास्रांशीं वर्षी घनसे केले घटोत्कचें नमुनी. ॥ २७
भीम म्हणे, 'पुत्र सुखें पावुनि [2]गुरुदास्यपुण्यपर्व तरे, ।
आम्हांसि गंधमादननामा [3]हो [4]सुगम पुण्यपर्वत, रे! ॥ २८
हे कृष्णा त्वन्माता चालों न शके पथीं, इला वाहें, ।
तारक तुल्य [5]स्कंधग [6]गुरुमूर्ती [7]गंडकीशिला बा! [8]हें.' ॥ २९
पुत्र म्हणे, 'भिन्न असति [9]पंचायतनांशि काय [10]संपुष्ट? ।
वाहो सर्वां माझा, आहे नीरोग[11] [12]काय [13]संपुष्ट. ॥ ३०
पांच तुम्हीं धौम्यहि गुरु, दुर्लभ मज दास्य [14]अन्यदा साचें, ।
वाहेन तुम्हां, हे मुनि [15]जनु सफळ करूत [16]अन्यदासाचें. ॥ ३१
अथवा त्या [17]देवीतें [18]विंध्य, तसा मी इलाचि वाहेन, ।

---

१. प्रेम+अस्रांशीं=आनंद+बाष्पातें=प्रेमाश्रूंचा वर्षाव करणारे. २ पितृसेवारूप पुण्याचा पर्वकाळ. ३. होवो. अरे! गंधमादननामक पुण्यपर्वत आम्हांला सुगम होवो—असा भाव. ४. गमन करण्यास सुलभ. (अध्याय १४५ श्लोक ४–५) ५. खांद्यावर असलेली. ६. गुरूची (पित्याची–जननीची) मूर्ति. ७. शालिग्राम शिला. ८. हें द्वय (गुरुमूर्ति आणि गंडकीशिला) तुल्य (समान) तारक (संरक्षक) होय. ९. पांच देवतांचें (शिव विष्णु, सूर्य, गणपति, आणि देवी यांचें) आयतन (गृह, समुदाय) त्यास. १०. संपुष्ट (संपुट), आकारविशेषयुक्त पात्र. ११. रोगरहित. १२. देह. १३. उत्तम पुष्ट. पुत्र (घटोत्कच) म्हणे (गीति ३२ अखेर)—'पंचायतनांशि भिन्न संपुष्ट असती काय?'–काक्वर्थे 'नसतात' हें उत्तर. संपुष्ट (संपुट) हा शब्द प्राय: नपुंसकलिंगी आहे. पण येथें पुंलिंगी आहे. मोठें संपुष्ट अशा अर्थी पुंलिंगी प्रयोग असावा, जसें–घोडें-घोडा. पंचायतन=देवतापंचक. सूर्य, विष्णु, शंकर, देवी व गणपति हीं प्राय: पंचायतनांतील मुख्य दैवतें होत. हीं एकाच संपुष्टांत (करंड्याचे एके शकलांत) ठेवीत असतात, म्हणून घटोत्कचाचें विचारणें कीं धर्मादिक चवघे बंधु व द्रौपदी या पंचायतनाला निरनिराळीं संपुष्टें कशास पाहिजेत? मी-एकटाच सर्वांस वाहून नेईन, कारण माझा देह चांगला पुष्ट व रोगरहित आहे.' १४. दुसऱ्या वेळीं. १५. जन्म. १६. हे मुनि अन्यदासाचें जनु सफळ करूत, मी तुम्हा वाहेन—असा अन्वय, मी तुम्हां पांचांस वाहीन आणि माझे सेवक राक्षस (अन्य दास) यांचें जन्म हे मुनि सफळ करोत—असा भावार्थ. १७. विंध्यवासिनी महिषासुरमथिनी दुर्गादेवीतें. हें देवीचें स्थान मिरजापुराजवळ आहे. १८. विंध्य—"गुजराथ व बुंदेलखंड ह्यांच्यामध्यें जी पूर्वपश्चिम पर्वताची ओळ आहे, तिला विंध्य किंवा विंध्याद्रि असें म्हणतात. विंध्याद्रि पर्वताच्या नांवामध्यें कांहीं फरक पडलेला दिसत नाहीं. तथापि त्या पर्वताला विंध्याद्रि हें नांव पडल्याविषयीं पौराणिक माहिती मिळालेली आहे. ती अशी—एकेसमयीं ह्या पर्वतानें (विंध्याद्रीनें) अति उंच होऊन सूर्यचंद्रांची गति रोधिली. तेणें-करून चोंहींकडे हाहाकार झाला व ह्या अपराधामुळें (त्याच्या गुरूला) अगस्तिऋषीला क्रोध आला. अगस्तिऋषीचा तो कोप पाहून पर्वतराज भयभीत झाले आणि त्यांनीं ऋषीपुढें साष्टांग नमस्कार घातला. तेव्हांपासून हा पर्वत तसाच पूर्व पश्चिम पडलेला असून, सूर्यचंद्रांची गति विंधल्यामुळें (रोधल्यामुळें, कारण विध्=विद्ध करणें, अडथळा करणें) त्याला 'विंध्याद्रि' हें नांव पडलें. हेंच अद्या-पिही चालू आहे." (भारत—वनपर्व—अध्याय ९६,९८, व १०३, १०५ पहा. भरतस्थलादर्श.)

[1]स्वाश्रितरक्षःकृतभवदुद्वहनजसुकृतभाग [2]लाहेन.' ॥ ३२
[3]रक्षःस्कंधीं **धौम्यप्रमुख** ऋषी प्रथम बसविले, पावे ।
शिवसा सत्संग, न कां [4]गरुडसखें [5]गरळरस विले[6]पावे ? ॥ ३३
[7]चक्षुर्विष अहि रक्षी अमृतघटातें मुखीं न ओतुनि घे, ।
[8]हरितेजें, हेंहि तसें, **शिवशुकसेवेशि** कां न [9]ओतु निघे ? ॥ ३४
कपिच्या **सीता**, [10]हरिच्या कीं **विंध्यमहाद्रिच्याहि** [11]आदिसती, ।
देवी **घटोत्कचाच्या** स्कंधीं तसि होय त्या जना दिसती. ॥ ३५
शोभति [12]घटोत्कचाश्रितरक्षःस्कंधीं चढोनि **कुरुवर** ते, ।
जाणों नभीं [13]घनाच्या साक्षात् **रवि चंद्र शुक्र गुरु** वरते. ॥ ३६
योगा[14]रूढ **श्रीमुनि लोमश** चाले पुढें जसा [15]अर्क, ।
[16]अर्कद्वय अद्भुत हें हा [17]क्षण खे[18]चरमनीं उठे तर्क. ॥ ३७

---

१. आपला आश्रित जो राक्षस त्यानें केलें जें आपलें उद्वहन (स्कंधीं घेऊन नेणें) तज्जनित पुण्यांश. २. पावेन. ३. राक्षसांच्या (घटोत्कचाच्या दासांच्या) खांद्यावर. ४. गरुडाचा सखा (इंद्र) त्यानें. इंद्रानें गरुडाला आपला मित्र केलें अशी कथा आहे. (मोरोपंत—आदिपर्व—अध्याय ४ गीति १६०, काव्यसंग्रह—पृष्ठ ३२.) इंद्राच्या हातांत अमृत, तेव्हां त्यानें विषरसाचा लेप अंगास लाविल्यानें प्राणहानि व्हावयाची भीति नाहीं. राक्षसांच्या खांद्यावर ऋषींस बसविलें, तेव्हां त्या दुष्ट राक्षसांस शिवासारखा उत्तम जो सत्संग (साधुसमागम) तो पावे (फलद्रूप होई.) खरें म्हटलें तर त्या दुष्ट राक्षसांस ऋषींनीं मारावें, परंतु तो सत्संग असल्यामुळें राक्षसांस कांहीं भय झालें नाहीं. यास दृष्टांत—गरुडाच्या मित्रानें आपल्या अंगास गरळाचा लेप खुशाल करावा, त्याला त्या विषलेपाची बाधा गरुड मित्र असल्यामुळें व्हावयाची नाहीं—असा भावार्थ. ५. विषरस. ६. अंगाला लावावे. ७. चक्षुर्विष या नांवाचा सर्प. याच नांवाचे दोन साप अमृतघटाचें रक्षण करीत असतां गरुडानें त्यांला मारून अमृतकुंभ घेऊन विष्णूपाशीं प्रयाण केलें अशी कथा आहे. (मोरोपंत—आदिपर्व—अध्याय ४ गीति १४८-१५१. काव्यसंग्रह पृष्ठ ३१.) ८. विष्णुप्रभावानें. ९. मांजर. १०. सिंहाच्या. ११. पार्वती, दुर्गादेवी. १२. घटोत्कचाचे आश्रित (सेवक जे) राक्षस त्यांच्या खांद्यावर. १३. घनाच्या स्कंधीं—असा अन्वय. हा उत्प्रेक्षा नामक अलंकार होय. या गीतींत कुरुवरांवर (उपमेयावर) रवि चंद्र शुक्र गुरु यांची (उपमानांची) संभावना केली आहे म्हणून हा उत्प्रेक्षालंकार होय. एका पदार्थावर त्यासारख्या दुसऱ्या पदार्थाची भावना करणें हा उत्प्रेक्षालंकार होय. हे पांडव नव्हेत, तर रविचंद्रादिक चार ग्रहच आहेत अशी भावना या पद्यांत पंतांनीं केली आहे. १४. योगसिद्धि करून आरूढ झालेले, योगबळानें आरोहण करून. १५. सूर्य. १६. दोन सूर्य. १७. क्षणभर. १८. आकाशगामी देवांच्या मनांत.

दाउनि दुरूनि [1]हरगिरि [2]मंदर नारायणाश्रमीं उतरी, ।
तेथ सदा [3]संनिहिता गंगा [4]भवसिंधुपारदा [5]सुतरी. ॥ ३८

[6]अर्काभ [7]सहस्रच्छद [8]सौगंधिक [9]पद्म [10]मारुतानीत ।
कृष्णेपुढेंचि पडलें, होय जणों [11]तन्मुखाब्जभाभीत. ॥ ३९

'ऐशींच मदर्थ तुम्हीं आणा सौगंधिकें' म्हणे [12]पतितें, ।
भीम निघे, [13]श्रुतिचेंसें मान्य तिचें सांगणें [14]तया अति तें. ॥ ४०

[15]एकाकीही शिरतां जो जेंवि [16]महावनीं न भी मकर, ।
सिंहादिकांसि भासे यमदंडाहुनि उणा न भीमकर. ॥ ४१

ज्याच्या रामयशासह सुयशासि सदा सहर्ष [17]नाक पितो, ।
[18]कदलीवनांत मार्गीं भीमाला दे स्वदर्शना [19]कपि तो. ॥ ४२

रुचिरहि रूप कपित्वें प्रथमचि नयनां न गोड वाटे तें, ।
पांडव [20]सावज्ञ म्हणे, 'जाऊं दे, ऊठ, सोड वाटेतें.' ॥ ४३

वानर म्हणे, 'न पथ मी देइन, जावें तुवां न या वाटे. ।
होईल घात जातां, यास्तव मजला तुझी दया [21]वाटे.' ॥ ४४

भीम म्हणे, '[22]हो कांहीं, पुसतो तुज कोण हात जोडून? ।
होशील [23]व्यथित वृथा, हो [24]प्लवंगा! दूर मार्ग सोडून.' ॥ ४५

वानर म्हणे, 'उठाया [25]शक्ति नसे मज, [26]जराव्यथावश मी, ।
जाणें तरि [27]लंघुनि जा, [28]पथ सोडाया शके न हा [29]दशमी.' ॥ ४६

१. कैलास. २. मंदर. हा पर्वत आसामाच्या दक्षिणेस आहे. समुद्रमंथनसमयीं देवांनीं याल. मंथनदंड केला होता. ३. समीपवर्तिनी. ४. भवसमुद्राचा परपार देणारी. ५. उत्तम नौका. ६. सूर्यसदृशकांतियुक्त. ७. हजार आहेत पत्रें ज्यास असें. ८. उत्तम सुवासिक अथवा नामविशेष. (अध्याय १४६ श्लोक २-३ पहा.) ९. कमळ. १०. वाऱ्यानें आणिलेलें. ११. त्या द्रौपदीच्या मुखकमलशोभेला भ्यालेलें. १२. नवऱ्यातें. (अध्याय १४६ श्लोक ५-६ पहा.) १३. वेदाचें. १४. भीमाला. १५. एकटाही. १६. मोठ्या अरण्यांत किंवा पाण्यांत. १७. स्वर्ग. लक्षणावृत्तीनें स्वर्गस्थ लोक—असा अर्थ. १८. केळींच्या अरण्यांत. या वनांत मारुति निद्रित होता, तो भीमाच्या भयंकर गर्जनेनें जागृत झाला आणि पृथ्वीवर पुच्छ आपटीत वाट अडवून शिळेवर बसला. (अध्याय १४६ श्लोक ६८-६९ पहा.) १९. मारुति. २०. अवमानयुक्त धिक्कारपुरःसर. २१. वाटले (येते). २२. कांहींही होवो. २३. दुःखित. २४. वानरा. २५. अध्याय १४७ श्लोक ७ पहा. २६. जरेच्या आणि व्यथेच्या स्वाधीन. २७. ओलांडून जा. २८. मार्ग. २९. दशमी. (दशमिन्=दशम म्हणजे मनुष्याच्या आयुष्यांतील शेवटचा दहावा भाग—तो ज्यास आहे तो.) नव्वद वर्षांहून ज्यास्ती वयाचा, अतिवृद्ध.

भीम म्हणे, ‘[1]परमात्मा [2]व्यापक सर्वां घटीं, असें [3]जाणें, ।
मग [4]लंघन करुनि तुझें प्लवगा! माझें घडे कसें जाणें?’ ॥ ४७
[5]नसतें असें, तरि जसा हनुमान् लंघूनि जाय [6]जलधीतें, ।
जातों या गिरिसहि मी लंघुनि बहु लाजवूनि [7]खलधीतें.’ ॥ ४८
प्लवग म्हणे, ‘[8]गा! साधो! हनुमान् तो कोण सांग? जलधीतें ।
लंघुनि गेला कां? गा! होय कशी काय लाज खलधीतें.’ ॥ ४९
भीम म्हणे, ‘तो हनुमान् [9]मद्बंधु, [10]तुला न ज्या, न [11]कीशा! तें ।
[12]तेज, श्रुत तुजही, ज्या जग गातें जेंवि [13]जानकीशातें. ॥ ५०
रामवधू शोधाया तो [14]अब्धि उडोनि जाय [15]शतगावें, ।
जाळी लंका, न तिच्या यशापुढें [16]सुरपुरीयश [17]तगावें. ॥ ५१
तो एक वीर मारुति मनुजांत [18]सुरासुरांत बळकट कीं, ।
मी भीम मज पहातां क्षणहि खळांच्या उरे न बळ [19]कंटकीं. ॥ ५२
कथिलें हें कळलें कीं? [20]रोधूं ये काय [21]सिंधुवाट [22]सरें? ।
हो दूर, मर्दिजेतो [23]पथकंटक सुज्ञसदय[24]वाटसरें.’ ॥ ५३
चित्तीं हांसोनि म्हणे, ‘भीमा! भय दाखवूं नको, [25]पावें, ।
मत्पुच्छ दूर सारुनि जा, साधो! दुर्बळीं न कोपावें.’ ॥ ५४
दूर झुगारूं पाहे [26]वामकरें पुच्छ धरुनि [27]सावज्ञ, ।
[28]गरिमगुणें [29]सुरगिरिगुरु होय [30]भवांशभव [31]भीमभावज्ञ. ॥ ५५

---

१. सर्वव्यापी भगवान्. २. व्यापिणारा, आश्रय करून असणारा. ३. जाणतो. ४. तुझें लंघन करणें म्हणजे सर्वव्यापी जो भगवान् परमात्मा त्याचें लंघन करणें होय, तेव्हां तें माझ्यानें करवणार नाहीं; परमात्म्याचें लंघन करण्यास मी कोठून समर्थ असणार—असा भाव. ५. मला हें ईश्वराचें ज्ञान नसतें तर, मी मूर्ख अज्ञ असतों तर. ६. समुद्रातें. (अध्याय १४७ श्लोक ८-९.) ७. दुष्टबुद्धीतें. ८. अगा. ९. माझा बंधु. (भीमही वायुपुत्रच.) १०. तुलना. ११. हे वानरा. १२. त्या हनुमानाचा पराक्रम. १३. श्रीरामातें. १४. समुद्र. १५. शंभर योजनें. १६. अमरावतीचें यश. १७. रहावें. (न रहावें असें तात्पर्य.) १८. देवदैत्यांत. १९. सैन्यांत. २०. बंद करतां येते काय? बंद करवेल काय? २१. समुद्रमार्ग. हा चरण सुभाषितरूप आहे. २२. सरोवरें. २३. मार्गांतील कांटा. २४. पथिकानें. २५. प्रसन्न हो, कृपा कर. (अध्याय १४७ श्लोक १६.) २६. डाव्या हातानें. २७. अवमानसहित, धिक्कारपूर्वक. (अध्याय १४७ श्लोक १९-२२ पहा.) २८. गरिमान्=गुरुत्व; आपल्या आंगांत पाहिजे तितका जडपणा आणण्याच्या गुणानें. २९. मेरुपर्वतासारखा जड. ३०. रुद्रांशापासून भव (जन्म) ज्याचा तो. (मारुति.) ३१. भीमाचा अभिप्राय जाणणारा.

भीमबळें, विघ्नें, रघुपतिपादाब्जस्थ[1] चित्तसें पुच्छ. ।
तिळहि न ढळे, गुरुपुढें[2] भावबळ[3] श्रेष्ठ, बाहुबळ तुच्छ. ॥ ५६
दोन्हीहि भागले[4] भुज, वर्षे घनसाच भीम घामातें. ।
चित्तांत म्हणे, 'आली कोठुन? नव्हतीच भी मेघा[5] मातें.' ॥ ५७
जाय शरण होउनियां तो[6] गतमदगद[7] अदभ्रदय[8] कपिला, ।
ज्याची लीला[9] प्रणताखिलवांछितसिद्धिदा[10] महाकपिला[11]. ॥ ५८
जाणावया स्वरूप प्रार्थी मोक्षेच्छुजन[12] वृषाकपितें[13], ।
भीम तसा त्या [13]हरिल्या स्वयश:श्रवणेच्छुजनतृषा[14] कपितें. ॥ ५९
भीमासि असें सांगे कीं, 'मारुति आंजनेय[15], वीरा! मी ।
आहें रामगुणरसीं[16], पूर्वी होतों निबद्धधी[17] रामीं. ॥ ६०
'यावत् स्वकथा[18] तावत् जीव' असा पावला सुवर[19] दास[20] ।

---

१. रामाच्या चरणकमळीं स्थिर झालेलें. २. हा अर्धांश सुभाषितरूप आहे. ३. भक्तिबळ. ४. थकून गेले. ५. मघांशीं. ६. भीम. ७. गेला आहे मदरूप रोग ज्याचा असा. ८. बहुत दयावंत मारुतीला. ९. ज्या मारुतीची क्रीडा. १०. प्रणतांला (शरणागतांला) अखिल (सकल) वांछित (इष्ट) सिद्धि देणारी. ११. कामधेनु. या गीतींत लीला आणि महाकपिला ह्यांचा अभेद वर्णिला आहे, म्हणून हा रूपक अलंकार होय. जेथें उपमान आणि उपमेय यांचा वास्तविक भेद असून हीं प्रत्यक्ष एकच आहेत, त्यांत भेद नाहीं, असें वर्णन असतें तेथें रूपकालंकार होतो. प्रस्तुत गीतींत महाकपिला हें उपमान आणि लीला हें उपमेय यांचा वास्तविक भेद असतांही पंतांनीं अभेद वर्णून येथें रूपकालंकार साधिला आहे. हा राजा साक्षात् शिव आहे, कारण यानें हीं पुरें जाळलीं आहेत—हा रूपकालंकार होय. याचे सावयव, निरवयव आणि परंपरित असे तीन भेद असून या भेदांचे अनेक पोटभेद आहेत. (रसगंगाधर—द्वितीयानन—पृष्ठें २३०-२३१ पहा. काव्यमाला—१२). १२. मुक्तीची इच्छा करणारा पुरुष. १३. शिवातें. 'वृषाकपि: पुमान् कृष्णे शंकरे जातवेदसि' इति मेदिनी. १४. आपलें यश श्रवण करण्यास इच्छिणाऱ्या जनांची तृषा हरणाऱ्या कपीतें (मारुतीतें). या गीतींत उपमालंकार आहे. यांत भीम (उपमेय) आणि मोक्षेच्छुजन (उपमान) यांचें सादृश्य वर्णिलें आहे म्हणून हा उपमालंकार होय. १५. अंजनीसुत. (मारुति.) १६. आतां श्रीरामाच्या गुणरसांत निमग्न आहे. पूर्वी खुद्द त्यांच्यांतच निमग्न होतों, प्रस्तुत रामगुणयशोवर्णनांत निमग्न आहें; कारण आतां तो राम प्रत्यक्ष नाहीं—असा भाव. १७. अत्यंत दृढ बांधली आहे बुद्धि ज्याची असा. १८. जोंपर्यंत पृथ्वीवर रामकथा राहील तोंपर्यंत तूं जीवंत रहा. १९. उत्तम वर. (मंत्ररामायण उत्तरकांड—गीति ४१८. काव्यसंग्रह—पृष्ठ २०४.) २०. सेवक. (मारुति.) येथें आपल्याविषयींच तृतीयपुरुषीं बोलतो आहे हें चिंतनीय होय.

हा 'रामायण' सेवुनि आहे तृप्त स्मरोनि वरदास.[1]' ॥ ६१
भीम म्हणे, 'ज्या रूपें[2] शतयोजन सिंधु लंघिला, गा! तें, ।
दावावें आजि मला, ज्याला[4] अद्यापि विश्व हें गातें.' ॥ ६२
मारुति म्हणे, 'असों दे, अत्युग्र[3] न पाहवेल, भीमा[5]! तें.' ।
भीम म्हणे, 'पाहों द्या, स्पर्शेल, दया करा, न भी मातें.' ॥ ६३
वाढों लागे सहसा[6] कदलीखंडीं[7] नभीं[8] महाकाय[9], ।
त्यातें पाहुनि पावे काळहि[10] भय, मग न भीम हा काय? ॥ ६४
लोकांत राममहिमा कीं प्रेमा आपला जसा रामीं, ।
वाढे तसाचि, योजूं दृष्टांता[11] कां परी[12] असारा[13] मी[14]! ॥ ६५
पावे, जेंवि पहातां क्षयरुद्रा[15] रत्नसानु[16], कंपातें, ।
आटोपाया[17] न पुन्हा तें[18] लागे यत्न सानुकंपातें[19]. ॥ ६६
भीम म्हणे, दादाजी! केली दुर्योधनें दया[20] वाटे, ।
हे पाय पाहतों मी कैसे? जरि लागतों न या वाटे[21].' ॥ ६७

---

१. वरदासास. (रामास.) २. ज्या रूपाला. (अध्याय १४९ श्लोक ३-४ पहा.) ३. अति भयंकर. ४. अध्याय १५० पहा. ५. भय. ६. एकाएकीं. ७. केळींच्या समूहांत. ८. आकाशांत. ९. विशाल शरीराचा. १०. यम. हें काव्यार्थापत्ति नामक अलंकाराचें उदाहरण आहे. जेथें कैमुतिकन्यायानें अर्थसिद्धि होते तेथें हा अलंकार होतो. किमुत (किं उत) याचा जो भाव तो कैमुतिक. याचा अर्थ—काय कथा, कशाला सांगावें—असा होतो. गोळी वाघाला मारिते, मग चिमण्यांची काय बरें कथा; हे स्त्रिये! तुझ्या मुखानें चंद्र जिंकिला, मग कमळाची काय कथा; या कोयतीनें कठिण लांकूड तुटतें, मग कोवळ्या गवताची काय गोष्ट सांगावी—हीं सारीं काव्यार्थापत्ति नामक अलंकाराचीं उदाहरणें होत. याचें लक्षण 'रसगंगाधर' नामक ग्रंथांत दिलें आहे तें:—'केनचिदर्थेन तुल्यन्यायत्वादर्थांतरस्यापत्तिरर्थापत्तिः' [काव्यमाला—१२, रसगंगाधर पृष्ठ ४८५.] याचे अनेक भेद आहेत. ११. दाखला. १२. दुसऱ्या. १३. खोट्या, निष्फळ, निरर्थक. १४. मोरोपंत कवि. १५. प्रलयकाळच्या शंकराला. १६. मेरु. (रत्नें आहेत सानुस्थानीं=शिखरस्थानीं ज्याच्या तो.) १७. आवरून धरण्यास. १८. तें शरीर. १९. (स+अनुकंपा=सहित+दया=)सदय मारुतीला. २०. आम्हांला वनवासास दुर्योधनानें पाठविलें ही आमच्यावर दयाच केली. असें केलें नसतें तर हे दादाजी! तुमचें दर्शन झालें नसतें—हा भावार्थ. हें अनुज्ञा नामक अलंकाराचें उदाहरण आहे. जेव्हां दोषयुक्त वस्तूंत गुणाचा भास होतो आणि ती दोषयुक्त वस्तु त्या गुणामुळें असावी अशी इच्छा होते, तेव्हां हा अलंकार होतो. येथें वनप्रवास हा यद्यपि दुःखप्रद तथापि सुखप्रद असा भीमास वाटला, तेव्हां हा अनुज्ञा अलंकार झाला. याचें लक्षण 'रसगंगाधरां'त दिलें आहे तें:—'उत्कटगुणविशेषलालसया दोषत्वेन प्रसिद्धस्यापि वस्तुनः प्रार्थनमनुज्ञा' [काव्यमाला—१२; रसगंगाधर—पृष्ठ ५१०.] २१. मार्गास.

देवें म्हणे, 'रे! वत्सा! 'हूं' म्हण जैसें वधूनि अहि, तातें ।
गरुडें पृथुकाशि, अभय द्यावें तुज म्यां, मथूनि अहितातें.' ॥ ६८
भीम म्हणे, 'गजगंडश्रीचा हरिनखरतेज नवरा कीं ।
आर्या! बहु तेजस्वी जे होती न खर ते जन वैराकीं. ॥ ६९
तूळीं तेजस्विकरानुगृहीत द्युमणिकांतसा, आर्या! ।
हा त्या तुच्छीं मिरवू तेज, प्रभु! तूं न योग्य या कार्या.' ॥ ७०
आलिंगूनि म्हणे, 'बा! हो दुःसह तूं नरामरां जा, गा! ।
शब्दें साह्य करिन मी, परि चित्तांतून रामराजा गा.' ॥ ७१
सांगुनि सौगंधिकवनपुष्करिणीच्या सुनीतिच्याहि पंथा, ।
आटोपी मूर्तिप्रति मारुति, हा कविहि तद्विशालकथा. ॥ ७२
सौगंधिकपुष्करिणी कैलासाच्या समीप पाहूनी, ।
हर्षे पांडव, तीहीं, नेला गुण दाखवूनि बोहूनी. ॥ ७३

---

१. मारुति. २. सर्प. ३. बापानें. 'तातें' या पदाचा 'गरुडें' या पदाशीं अन्वय. ४. मुलासि, ५. शत्रूतें. ६. हत्तीच्या गंडस्थळलक्ष्मीचा. ७. सिंहाच्या नखऱ्याचें (नखाचें) तेज (प्रभाव). ८. पति. स्वामी. ९. प्रखर, कठोर. १०. क्षुद्र नीच प्राण्यावर. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ११. कापसीं. १२. सूर्यकिरणांनीं अनुग्रह केलेला असा. १३. सूर्यकांतसा. १४. भीम. तेजस्वी जो सूर्य त्याच्या करांनीं (किरणांनीं) अनुगृहीत (प्रसाद केलेला) द्युमणिकांत (सूर्यकांत) [जसा] तूळीं (कापसावर) [तेज मिरवितो—कापसास जाळतो [तसा] [हे] आर्या (मारुते!) त्या तुच्छीं (दुर्योधनादिक शत्रुमथनीं—(गीति ६८ पहा) हा (भीम) तेज मिरवू, मिरवो). तूं (मारुति) प्रभु (नायक) [आहेस यास्तव] या कार्या (असल्या शत्रुमथनरूप क्षुद्रकामीं) योग्य न (नाहींस). थोरांनीं लहान कामें करूं नयेत, तीं लहानांकडूनच करवावींत; याला उदाहरण—कापूस जाळण्यास सूर्यानें श्रम करणें नलगे, तें काम त्याच्या तेजोन्वित कांतानें (दगडानें—कांचेनें) होतें. ज्याप्रमाणें सूर्यकांत कापसावर तेज मिरवितो त्याप्रमाणें तेजस्विकरांनीं (मारुतिहस्तांनीं) अनुगृहीत (जो) हा (मी भीम) तूळासारखा तुच्छ (जो शत्रुवर्ग) त्याजवर तेज मिरवू—अशा क्षुल्लक कार्यास तूं (मारुति) कशास पाहिजे, हा मी भीमच पुरे. १५. मनुष्यांस आणि देवांस. १६. अगा. १७. स्तवन कर. १८. सौगंधिकांच्या (श्वेतरक्तमिश्रित सुगंधि कमलांच्या) वनाला (समुदायाला उत्पन्न करणारी—प्रसवणारी) पुष्करिणी (स्थलकामिनी) तिच्या. १९. मारुतीनें भीमाला चतुर्वर्णांचे धर्म व आचार व विशेषतः क्षत्रियांचे धर्म सांगून, कोणत्या मार्गानें गेलें असतां कार्यसिद्धि होते आणि सौगंधिक कमळ घेण्यापूर्वी उग्र देवतांस कसें प्रसन्न करावें इत्यादि नीतिबोध केला असें वर्णन मूळांत आहे. (अध्याय १५०.) २०. मार्गा. २१. हा मोरोपंत कवि त्या मारुतिची मोठी गोष्ट थोडक्यांत आटपून घेतो. पंताच्या विस्तरभयाचें हें एक उदाहरण आहे. २२. बोलावूनि.

तद्रक्षक [1]धनदानुग राक्षस धर्मानुजासि पाहूनी, ।
'तूं कोण?' असें पुसती [2]तत्कृतधर्षण मनीं न साहूनी. ॥ ७४
[3]'सौगंधिकार्थ आलों धर्मनृपतिबंधु भीम मी आहें, ।
व्हा दूर, पळा, तोंडें झांका, करितां कशास रे! आ हें?' ॥ ७५
राक्षस म्हणति, 'पहातां काय? अरे! या खळा न राखावें, ।
क्षणभरहि [4]महदतिक्रम करित्या [5]सुविशृंखळा नरा खावें.' ॥ ७६
'आधीं [6]क्रोधवशांला युद्धीं उत्साह, परम [7]भी मग दे.' ।
ऐसें करीं म्हणे [8]श्रीकाळीहि मनांत, 'साधु [9]भीमगदे!' ॥ ७७
आधीं [10]हरिसा क्रीडा [11]अरिहरिणचमूंत भीमसेन करी, ।
मग त्या [12]नलिनींत गमे एकहि जैसा [13]सभीमसेन [14]करी. ॥ ७८
जरि पावले बहु करुनि भीमासीं [15]आहवा [16]निधन [17]दास, ।
[18]हतशेषमुखें कळतां, न गमे [19]प्रभुभावहानि [20]धनदास. ॥ ७९
इकडे धर्म [21]म्हणे, 'हे कथिती [22]उत्पात [23]भाविभी मातें ।
नकुळा! सहदेवा! व्हा सिद्ध, करा [24]सावधान भीमातें. ॥ ८०
मज [25]त्वद्दर्शन तैसें वृद्धां पितरांसि जेंवि [26]तोकवच, ।
वद [27]देवि! दयित कोठें? केला काय [28]स्वकरग तो कवच?' ॥ ८१
कृष्णा सांगे, 'उडवुनि सौगंधिकपद्म आणिलें वातें, ।
व्हावीं असीं, असें मी वदल्यें दावूनि [29]त्यांशि देवा! तें. ॥ ८२

---

१. कुबेरसेवक. २. त्या भीमानें केलेला उपमर्द (अपमान). ३. हें भीमाचें उत्तर आहे. ४. थोरांची अमर्यादा. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ५. उन्मत्ता, आडकाठी ज्याला नाहीं अशाला. ६. कोपाच्या स्वाधीन झालेल्या राक्षसांस (सौगंधिकवनरक्षकांस). ७. भय. ८. श्री-दुर्गादेवी. ९. हे भीमाच्या गदे. १०. सिंहासारखा. ११. शत्रुरूप मृगांच्या सेनेंत. १२. कमलिनींत. १३. भयंकर सेनेसहवर्तमान. १४. हत्ती. १५. युद्धातें. १६. मरण. १७. कुबेरसेवक. १८. मरून राहिलेल्या दासांच्या मुखें. १९. प्रभुत्वाचा नाश झाला असें कुबेरास वाटलें नाहीं. द्रौपदीसाठीं भीमानें कमळें घेऊन जावें अशी त्याची इच्छा होती. (अध्याय १५४ पहा.) २०. कुबेरास. २१. अध्याय १५५ पहा. २२. मोठा वारा सुटला, धुळीचे पर्वत उडूं लागले, विजेचा कडकडाट झाला, दाट अंधकार पडला, सूर्यकांति लुप्त झाली, पृथ्वी कंपित झाली, उल्कापात झाला, पशुपक्षिवर्गाची भयंकर गर्जना होऊन आश्रमस्थान दणाणून गेलें—असे अनेक उत्पात झाले. उत्पात= अशुभसूचक अद्भुत चिन्ह. २३. होणारें भय. २४. जागृत. २५. भीमदर्शन. २६. बालभाषण. २७. द्रौपदी. २८. आपल्या हातांत असलेला. २९. भीमास.

त्यावरि न देखिले ते[1], दाखविलें म्यां कशास? अगई! तें, ।
अतिकठिना[2] हे वाटे हीरांचाही[3] नमील[4] अंग[5] इतें[6]. ॥ ८३
धर्म म्हणे, 'रक्षील त्वद्रत, झालीस घाबरी कां? गे!' ।
हें वृत्त लोमशाला, तैसेंचि घटोत्कचासि, तो[7] सांगे. ॥ ८४
'हे मुक्तिची विशाला[8] न रुचे आम्हांशि त्याविना[9] शाला[10], ।
याच्या नाशा भीतों, भ्यालों न तशाहि त्या[11] विनाशाला. ॥ ८५
भीमह्रदाप्रति[12] आम्हां यादां[13] द्यायासि तृप्ति परमा न्या. ।
मान्या उपकृति[14], न परा सिद्धि बुधा, जेंवि हरिस[15] न रमान्या[16].'॥ ८६
नेला बंधुजवळि नृप, जाणों होता नसेचि तो नेला. ।
मुनिसिद्धिला न दुष्कर[17] किमपि न त्या यातुधानसेनेला[18]. ॥ ८७
धर्म म्हणे, 'भीमा! हें ईश्वरसखसैन्यहनन[19] अनुचित[20], रे! ।
न[21] तरेल महल्लंघनकर्ता[22], तो एक वायुजनुचि[23] तरे.' ॥ ८८
श्रीरामायणकृतिसी[24] ती दिव्या अमृतरसवती[25] नलिनी[26] ।
बहु दिवस सेविली, हो! त्या धर्मप्रमुखसर्वसाध्वलिनीं[27]. ॥ ८९

---

१. पति. (भीमसेन.) २. हे मी द्रौपदी मोठ्या कठोर हृदयाची होय. ३. 'हीर'मणीचें वज्र करतात, कारण हीरे (हीर) हे फार कठिण आहेत; तेव्हां हीरांचा=वज्रसदृश हिऱ्यांचा. ४. नमस्कार करील. ५. पर्वत. वज्रपर्वतापेक्षांही मी द्रौपदी कठिनतर होय—असा भावार्थ. ६. द्रौपदीतें. ७. तो धर्म. ८. मोठी. ९. भीमावांचून. १०. गृह. ११. सर्वस्वापहार जरि द्यूतांत झाला तथापि त्या नाशाला न भ्यालों. १२. भीमरूप डोहाप्रत. हें रूपकाचें उदाहरण आहे. येथें भीम आणि आम्ही या उपमेयांशीं ऱ्हद आणि याद या उपमानांचा यथानुक्रम अभेद वर्णिला आहे म्हणून हा रूपकनामक अलंकार होय. १३. जलजंतूंस. १४. उपकार. १५. विष्णूस. १६. लक्ष्मीहून दुसरी. शहाण्या मनुष्यास (बुधा) उपकृति जशी मान्य असते तसी दुसरी सिद्धि मान्य होत नाहीं, जशी विष्णूस रमेहून दुसरी स्त्री मान्य नाहीं, रमाच मान्य होय. १७. करण्यास अशक्य असें मुनिसिद्धीला कांहींच नाहीं; तसेंच राक्षसांना (घटोत्कचसेवकांस) ही कोणतेंही कृत्य अशक्य नाहीं, तेव्हां मुनिप्रसादानें आणि राक्षसांच्या बळानें ते पांडव भीमापाशीं कुबेराच्या वनांत त्वरित आले—असा भावार्थ. १८. राक्षसांच्या सेनेला. १९. महादेवाच्या मित्राच्या (कुबेराच्या) सैन्याचें मारण. सौगंधिकवनपुष्करिणीरक्षक राक्षसांचा नाश. २०. अयोग्य. २१. हा अंश सुभाषितरूप आहे. २२. थोरांचें उल्लंघन (अमर्यादा) करणारा. २३. मारुतिच. (वायूपासून जनु (जन्म) ज्याचें तो—मारुति.) यद्यपि मारुतीनें सागरासारख्या थोराचें उल्लंघन केलें, तथापि तोच म्हणून तरला, अन्य तरावयाचा नाहीं. २४. श्रीरामायणकाव्यासारखी. २५. अमृतरसयुक्त. २६. सौगंधिकवनपुष्करिणी. २७. धर्मआदिकरून सर्व साधुरूप भ्रमरांनीं. धर्म+प्रमुख+सर्व+साधु+अलिनीं.

धर्म म्हणे, 'भीमा! म्यां राज्यश्री[1] स्पष्ट लेखिली[2] असती[3], ।
निवती[4] बहु दृष्टि सख्या! अलका[5] जरि काय देखिली असती? ॥ ९०
तों गगनीं[6] वात वदे, 'धर्मा! येथूनि वर्त्म[7] जें पर[8] तें ।
न नरोचित[9], मर्यादा न विलंघीं, चित्त आवरीं, परंतें[10]. ॥ ९१
जा आर्ष्टिषेणमुनिच्या[11] स्थानीं[12] तूं गंधमादनीं आधीं, ।
तेथूनि[13] धनदफाल्गुनदर्शनसुखकार्यसिद्धिला[14] साधीं.' ॥ ९२
परतोनि धर्म आला त्या श्रीनारायणाश्रमीं[15] राहे, ।
तेथेंहि विघ्न बाधे, सादर गावें असेंचि तें आहे. ॥ ९३
आश्रय करूनि होता दुष्ट जटासुर[16] धरूनि ऋषितेतें[17], ।

---

१. राज्यलक्ष्मी. २. मानिली. ३. व्यभिचारिणी. ४. शांत होती, थंड होती. (अध्याय १५६.) ५. कुबेरपुरी. धर्म म्हणे–'[हे] भीमा! (या नलिनीसेवनानें) राज्यश्री (राज्यलक्ष्मी) असती (चंचला, व्यभिचारिणी) [अशी] मी स्पष्ट लेखिली (गणिली आहे, मानतों) [कारण या नलिनीसेवनानें जें दृष्टीला सुख झालें आहे तें] जरि अलका (राज्यश्रीचें आद्यस्थान) देखिली असती [तरि हे] सख्या! (भीमा!) दृष्टि बहु निवती काय? (दृष्टि निवाली नसती, तें सुख झालें नसतें.) राज्यश्री चंचल, क्षणभंगुर,–तिच्यापासून होणारें सुख क्षणविध्वंसी पण येथील सुख शाश्वत आहे, यास्तव हस्तिनापुरास न जातां येथेंच राहूं या, असा शांत्युपदेश धर्मानें भीमाला व्यंग्योक्तीनें केला आहे. दुर्योधनादिकांचा पराभव करून सूड उगवावा असा भीमाचा यत्न असून तद्विरुद्ध धर्माचा उपदेश असे, याचें हें पद्य उदाहरण होय. ६. आकाशवाणी झाली. ७. मार्ग. ८. अन्य, पुढचें. ९. मनुष्याला उचित. १०. मागें फिर. ११. या ऋषीचा आश्रम नरनारायणाश्रमासमीप होता. १२. आश्रमीं. १३. आर्ष्टिषेण मुनीच्या आश्रमांतून. १४. धनदाचें (कुबेराचें) आणि फाल्गुनाचें (अर्जुनाचें) दर्शनसुख (भेटीचा आनंद) हीच कार्यसिद्धि, तिला संपादन कर. १५. बदरिकाश्रमीं. १६. जटासुर–'अलंबुष राक्षसाचा पिता. पांडव तीर्थयात्रा करीत फिरत फिरत, बदरिकाश्रमीं येऊन राहिले असतां, हा त्यांसमीप मुनिवेषानें येऊन, व आपणच आपल्या तपश्चर्यादिगुणांची प्रशंसा करून, विश्वास दाखवून राहिला. परंतु मनांत हेतु कीं, भीमसेन आश्रमांत नसेल, त्या वेळेस पांडवांस मारून द्रौपदीस हरण करावें. हें याचें कपट पांडवांस न कळल्यामुळें, तो मुनि असें समजून, ते त्याच्या सेवेस तत्पर असत. एकदां असें झालें कीं भीमसेन फळें आणावयाकरितां अरण्यांत गेला, ती संधी याच्या मनाप्रमाणें येतांच यानें तत्काळ द्रौपदीसहित पांडवांस उचलिलें, (यांत अर्जुन इंद्रलोकाहून आला नसल्यामुळें नव्हता.) तो धूम पळत सुटला. त्यावरून युधिष्ठिरानें यास बहुत नीति सांगितली, परंतु हा तिकडे लक्ष्य न देतां चालला. असें पाहून युधिष्ठिरानें कांहीं अलौकिक प्रकारानें जड होऊन याचा वेग मंद केला, तेणेंकरून याच्यानें पुढें चालवेना. इतक्यांत भीम आश्रमांत येऊन, पांडव नाहींत असें पाहून, त्यांच्या शोधास निघालेला तेथें येऊन पोहोंचला. नंतर भीमाचें व याचें घोरयुद्ध होऊन, शेवटीं यास भीमानें मारिलें. (भारत–वनपर्व–अध्याय १५७.) १७. ऋषिपणातें, मुनिवेषातें.

जाणे न धर्मराजा, न घटोत्कचही, न अन्य ऋषि ते तें. ॥ ९४
भी[1]मघटोत्कच नसतां कृ[2]ष्णासहदेवनकुळधर्मांतें ।
पळवी, करी द[3]शमुखाद्यखिलकपटिमत्यशक्यकर्मांतें. ॥ ९५
त्यासि म्हणे धर्म, 'पळ, प्रे[4]क्षक मार्गीं न भीम हो[5] तूतें. ।
[6]तो वांचेल कसा? रे! जो ख[7]ळमूषक न भी म[8]होतूतें.' ॥ ९६
भीमाच्या, मन ठेवी धर्म, जसें विष्णुच्या इ[9]भ स्मरणीं. ।
प्रा[10]णव्यसनीं पावे, दे अभय, खळा करूनि भस्म रणीं. ॥ ९७
वा[11]यूक्तपथें गेला त्याचि [12]मुनिवराश्रमासि मग धर्म; ।
दे आर्ष्टिषेण आश्रय, तेथें नि[13]:सीम पावला श[14]र्म. ॥ ९८
तेथेंहि भीम कृ[15]ष्णावचनें त्या गिरिशिरीं बळें चढला, ।
मथिलें धनदब[16]ळ रणीं कळतां कोपें कुबेर बहु कढला. ॥ ९९
जाय पुन्हा [17]त्र्यंबकसखभटमथनेंकरुनि [18]ऑव रा[19]याचा, ।
योजी सा[20]मोपाय द्रु[21]त जाउनि त्या[22]सि आवरायाचा. ॥ १००
इतक्यांत [23]श्रीदहि ये, फार निवे, देखतांचि चवघांस. ।
[24]दृष्टिसि संतचि देती अमृताचे न र[25]सनेसि चव घांस. ॥ १०१
नमिला पांडुसुतांनीं, झाला श्रीद प्रसन्न सु[26]जनकसा. ।

---

१. राक्षस. २. द्रौपदी, सहदेव, नकुळ, व धर्म यांतें. ३. रावणादिक संपूर्ण कपट करणाऱ्यांच्या बुद्धीस अशक्य अशा कर्मांतें. दशमुख+आदि+अखिल+कपटि+मति+अशक्य+कर्मांतें. ४. पाहणारा. ५. होवो. ६. हें गीतार्ध सुभाषितरूप आहे. ७. दुष्ट उंदीर. ८. महाओतु, मोठ्या मांजरातें. ९. गजेंद्र. १०. प्राणांवरच्या संकटीं. ११. वायूनें कथिल्या मार्गानें. १२. आर्ष्टिषेणमुनीच्या आश्रमाला. (अध्याय १५८ पहा.) १३. अमर्याद. १४. सुख. १५. द्रौपदीच्या म्हणण्यावरून. अश्वरथनामक नदींत पांच रंगांचीं चमत्कारिक पुष्पें पडलेलीं पाहून या गंधमादन पर्वतशिखराची शोभा अपूर्व असावी असें द्रौपदीस वाटलें व ती शोभा पाहण्याची तिची इच्छा होती. ती तृप्त करण्यासाठीं तिच्या वचनानेंच भीम शिखरावर चढला. (अध्याय १६० पहा.) १६. सैन्य. (यक्ष व राक्षस). १७. कुबेरसैन्याच्या मथनेंकरून. १८. धैर्य. १९. कुबेराचा. २०. साम, दान, दंड, आणि भेद या चार उपायांपैकीं पहिला उपाय. साम=शत्रूला सांत्वनानें वश करण्याचा मार्ग. २१. लवकर. २२. कुबेरास. २३. कुबेरहि. २४. नेत्रांला. हें गीतार्ध सुभाषितरूप आहे. २५. जिव्हेस. याचा अर्थ:—इतक्यांत (पूर्वोक्त प्रकार चालला असतां) श्रीद हि (कुबेर देखील स्वत:) ये [व] चवघांस देखतां फार निवे [कारण] संतचि दृष्टीस [जशी] चव (गोडी, रुचि) देती [तशी चव] अमृताचे घांस रसनेसि न देती. २६. उत्तम पित्यासमान. हें उपमेचें उदाहरण आहे.

सदयप्रभुप्रसादा पात्र न होईल मर्त्य[1] सुजन कसा? ॥ १०२
धर्मासि म्हणे[2], 'साधो! संकोच धरूं नको मनीं कांहीं, ।
फळ भोगिलें महामुनिशापाचें[3] आमुच्या अनीकांहीं[4]. ॥ १०३
भीमा! अगस्त्यमुनिवरि मत्सख मणिमान्[5] महामदें[6] थुंकला, ।
मुकला स्वजीवना[7] तो, संसर्गीं परहि जन, जरि न चुकला. ॥ १०४
आलां स्वपितृगृहाला, स्वस्थ रहा, जन्म धन्य लेखाल[8], ।
येथेंचि अर्जुनाला तज्जनका जिष्णुलाहि[9] देखाल. ॥ १०५
धर्मा! भजेल पुनरपि तुजचि हृदयवल्लभा[10] विशंक[11] रसा[12].' ।
ऐसें वदोनि गेला जो जाणे भूतभावि[13] शंकरसा. ॥ १०६
स्वसदारबंधुलोचनचिरतृषितचकोरपारणा[14] व्हाया ।
प्रकटे नरें[15] चंद्र, म्हणति मुनि अरिधैर्याब्जवारणाऽऽह्वा[16] या. ॥ १०७
त्यां[17] तद्दर्शनलाभें[18] सुख, तें अधना न रत्ननिधिलाभें. ।
सद्दर्शनलाभाला[19] न खळाचें, फार रत्ननिधिला भें[20]. ॥ १०८

---

१. मरणवश मनुष्य. हें गीतार्ध सुभाषितरूप आहे. २. कुबेर म्हणे. (अध्याय १६१.) ३. अगस्त्य मुनीच्या शापाचें. पूर्वी कुशवती नामक स्थलीं कांहीं एका गोष्टीचा विचार करण्याकरितां देव जमले होते. तेथें अनेक यक्षांसह आपल्या मणिमान् नामक मित्रास बरोबर घेऊन कुबेर आकाशमार्गें जात असतां मणिमान् हा वरून अगस्त्य मुनीच्या शिरावर थुंकला. तेव्हां त्यानें कुबेराला शाप दिला:—'हे दुष्टा धनदा! माझी अवज्ञा करून तुझ्या सख्यानें माझ्या शिरावर उच्छिष्टपात केला, या कारणानें संपूर्ण यक्ष पहात असतां, कोणी एक मनुष्यापासून या यक्षसैन्यासहवर्तमान तुझा सखा मरण पावेल. त्यायोगें तुलाही बहुत दुःख होईल. ज्या काळीं त्या मनुष्याचें तुला दर्शन होईल, त्या काळीं तूं या शापापासून मुक्त होऊन संपूर्ण दुःखाचें तुला विस्मरण होईल.' या शापामुळें भीमाच्या हस्तें अनेक यक्ष आणि त्यांचा स्वामी मणिमान् हे मरण पावले आणि भीमाचें दर्शन होतांच कुबेरही शापमुक्त झाला. (अध्याय १६१ पहा.) ४. सैन्यांनीं. ५. नामविशेष. ६. अत्यंत उन्मत्तपणानें. ७. आपल्या प्राणाला. याचा अन्वयार्थ—तो (मणिमान्) स्वजीवना मुकला. परहि (इतर गंधर्वजन) जरि (यद्यपि) न चुकला (अपराधी नव्हता; त्याचे हातून कांहीं आगळीक झाली नव्हती) [तथापि] संसर्गीं [म्हणून] स्वजीवना मुकला. (मणिमानाचें पाप त्याच्या संसर्गी जनास देखील बाधलें, यामुळें इतर गंधर्व तुझ्या हातून मरण पावले, यांत तुजकडे कांहीं दोष नाहीं.) ८. मानाल. ९. इंद्रासहि. १०. हृदयाला आवडती. ११. बिनधोक, शंकारहित. १२. पृथ्वी. १३. भूत=झालेलें, आणि भावि=होणारें. १४. आपली स्त्री आणि बंधु यांच्या नेत्ररूप तृषित चकोरांस पारणा (तृप्ति-भोजन). पारणा=उपोषणांतीं भोजन. १५. अर्जुनरूप चंद्र. १६. शत्रूचे धैर्यरूप कमलाविषयीं गज अशा नांवाच्या अर्जुनास. १७. त्या अर्जुनाला. १८. त्यांच्या (द्रौपदीधर्मादिकांच्या) दर्शनप्राप्तीनें. १९. साधूंच्या दर्शनलाभाला खळाचें भें नाहीं. हें गीतार्ध सुभाषितरूप आहे. २०. भय.

शक्रहि दर्शन देउनि धर्मनृपाला म्हणे, 'अगा! साधो! ।
स्थैर्ये श्री कीर्ति तुज, न तसि [1]सुरमणिसंश्रया [2]अगा [3]साधो. ॥ १०९
[4]स्वरतासि [5]तामसी धृति दे, तसिच [6]निष्काम [7]राजसी, [8]ताप; ।
जो [9]सात्विकीय विजयी तो साक्षात् रामराज [10]सीतांप. ॥ ११०
आलापा शिकवितसे तोष, [11]इतर साधुचा विलापा, हें ।
जाणुनि [12]दिव्यास्त्रकर त्वद्दासा अर्जुना दिला पाहें.' ॥ १११
करुनि समाधान असें [13]हरि जाय, तयावरि स्व [14]भावातें ।
धर्म पुसे, वृत्त [15]कथी [16]तो सकळहि त्या शुचि[17]स्वभावातें. ॥ ११२
सांगे स्वतप, [18]किरातप्रभुदर्शन, [19]खळवराहवधयुद्ध ।
[20]भगवत्प्रसाद, सद्वर, पाशुपतास्त्रादिलाभ जो शुद्ध. ॥ ११३
[21]लोकपदत्तास्त्रकथा सांगुनि [22]त्यांचीं [23]विशुद्धतुरग मनें ।
गीतें [24]हरिणकुळेंशीं मोही [25]कथितें [26]महेंद्रपुरगमनें. ॥ ११४
स्वमुखें अर्जुन कथितां [27]हरिदत्तार्धासनादि [28]बहुमान ।
खालीं घाली केवळ न परांची, आपुलीहि बहु मान. ॥ ११५

---

१. देव आणि हिरे इत्यादिक मण्यांस आश्रयभूत अशा. २. मेरुपर्वताला. ३. प्राप्त होवो. ४. आत्मकार्यनिष्ठ मनुष्याला. ५. तमोगुणजनित धृति (धैर्य), अज्ञानमूलक धैर्य. ६. असंत. ७. रजोगुणजनित धृति; विषयलोभमूलक धैर्य. ८. दुःख; राजसी व तामसी धृति ताप देते=दुःखप्रद होते. ९. सत्वगुणसंपन्न. सात्विक, राजस, आणि तापस यांविषयीं भगवद्गीतेच्या सप्तदश अध्यायांत बरीच फोड केली आहे. १०. सीतापति. सात्विक गुणांनीं युक्त जो तो केवळ सीतापति रामच समजावा. ११. तोषाहून अन्य=क्रोध, असंतोष. याचा अर्थः—साधूचा तोष आलापा शिकवितसे आणि साधूचा इतर (क्रोध असंतोष इत्यादि) विलापा शिकवितसे, साधूच्या संतोषानें लाभ आणि असंतोषानें शोक होतो, हें जाणून, हे धर्मा! तुझा दास अर्जुन याला मी दिव्यास्त्रयुक्त असा कर दिला असें म्हण इंद्र म्हणे. १२. दिव्यास्त्ररूप हस्त. १३. इंद्र. १४. अर्जुनातें. १५. अध्याय १६७ पहा. १६. अर्जुन. १७. शुद्धस्वभावातें. १८. किरातरूपधारीशंकरदर्शन. १९. वराहरूपधारी मूक दैत्याच्या वधानिमित्त युद्ध. २०. शंकराचा प्रसाद. २१. अष्टौलोकपालांनीं दिलेल्या अस्त्रांची कथा. २२. धर्मादिकांचीं. २३. अर्जुन. (ज्याचे तुरग (घोडे) विशुद्ध (शुभ्र) तो.) २४. हरिणांची गानलुब्धता सुप्रसिद्ध आहे. २५. सांगितलेलें. (याचें विशेष्य 'गमनें'.) २६. अमरावतीप्रत गमनानें. या दोन पद्यांत (११३–११४) मूळांतील दोन अध्यायांचा (१६७–१६८) संक्षेप केला आहे. २७. इंद्रानें दिलेला अर्धासन इत्यादि थोर मान. २८. सन्मान.

'[1]वरदर्पित कोटित्रय [2]सुररिपु वधिले [3]निवातकवच रणीं, ।
पार्थ म्हणे, 'या विजयीं न मन [4]परमसुदित, आजि [5]तव चरणीं. ॥ ११६
[6]पौलोम कालकेय [7]स्वरहित [8]कामगहिरण्यपुरवासी ।
वधिले पाशुपतास्त्रें, भ्यालों [9]तद्दारशोककुरवासी. ॥ ११७
म्यां या विजयें न मनीं, [10]त्वदहितविजयेंचि फार [11]हरिखावें. ।
[12]स्वागस्करगजमौक्तिक कीं भलत्याचें म्हणेल [13]हरि [14]खावें. ॥ ११८
[15]त्वद्विरहें [16]शक्रार्धासनगहि नव्हताचि हा बरा [17]नाकीं, ।
वाटे क्षणक्षण असें कीं चिंतुनि ताप [18]घाबराना कीं. ॥ ११९
म्हणवित होते स्वर्गींही पांचहि '[19]हाय!' [20]वत्सर मला हो! ।
सुरभीचा [21]तत्स्तन्येतरसुरसीं काय वत्स [22]रमेला हो?' ॥ १२०
धर्म म्हणे, 'बा वत्सा! झालों कृतकृत्य; साधिली [23]महि म्यां; ।
मी [24]श्रीचतुर्भुजाच्या [25]विजयिचतुर्बंधु पावलों [26]महिम्या. ॥ १२१

---

१. ब्रह्मदेवाच्या वरानें उन्मत्त झालेले. २. देवांचे शत्रु. ३. निवातकवच हे प्ऱ्हादाचा भ्राता संऱ्हाद याचे पुत्र. इंद्रानें अर्जुनास अस्त्रविद्या शिकविली म्हणून गुरुदक्षिणा देण्यासाठीं अर्जुनानें या असुरांचा संहार केला. 'या दानवांचा पराभव कर म्हणजे मला गुरुदक्षिणा पावली' असें इंद्रानेंच अर्जुनास सांगितलें होतें. या दानवांपासून देवांस त्रास होऊं लागला तेव्हां ते इंद्रासह ब्रह्मदेवास शरण गेले. त्यानें इंद्र अन्य देहानें (पुत्ररूपें अर्जुनहस्तें) याचा वध करील असा त्यांस आशीर्वाद दिला. त्याप्रमाणेंच घडून आलें (अध्याय १६८–१७२). ४. अत्यंत हर्षयुक्त. ५. तुझ्या (धर्माच्या). ६. पुलोमा आणि कालका अशा दोन दैत्यकन्यका होत्या. त्यांस ब्रह्मदेवाच्या प्रसादानें पौलोम आणि कालकेय असे अनुक्रमें पुत्र झाले. ते देवांस अवध्य होते. परंतु त्यांचा मृत्यु मनुष्यापासून होता. त्यांचें नगर यथेच्छगामी हिरण्यपुर म्हणून होतें. त्यांस अर्जुनानें मारिलें (अध्याय १७३). ७. स्वर्गशत्रु. (स्वर+अहित=स्वर्ग+शत्रु). ८. पाहिजे तेथें इच्छेप्रमाणें जाणारें. (याचें विशेष्य 'हिरण्यपुर'.) ९. त्या मारलेल्या दानवांच्या स्त्रियांच्या शोकरूप कुत्सितशब्दांस. १०. तुझ्या शत्रूंच्या पराभव करून मिळविलेल्या जयानें. ११. आनंदावें. १२. आपला अपराध करणारा जो हस्ती त्याचें मोतीं. १३. सिंह. गजाच्या गंडस्थलीं मोत्यें असतात, तीं सिंह गंडविदारण करून घेतो अशी जुनी समजूत आहे. 'शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे' इत्यादि सुभाषितें सुप्रसिद्ध आहेत. १४. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १५. तुझ्या वियोगानें. १६. इंद्राच्या अर्धासनावर बसणाराही. १७. स्वर्गीं. १८. घाबरत नाहीं ना. १९. हायहाय. २०. वर्ष. २१. त्या कामधेनूच्या दुग्धाहून इतर सुरसीं. २२. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २३. पृथ्वी. २४. श्रीविष्णूच्या. २५. पराक्रमी चार बंधु ज्याचे तो. २६. श्रेष्ठपणातें.

[1]गुरुदत्ताही सिद्धिद्वारीं त्या प्रभुविना किली लाजे, ।
ऐसें ते साधु म्हणति जाणति वरदा [2]पिनाकिलीला जे. ॥ १२२
या नेत्रांनीं कीं ती [3]श्रीमूर्ति विलोकिली, अहो [4]भाग्यम् ! ।
[5]स्पष्टः स बत नियुद्धे ब्रुवते श्रुतयो महन्महोभाग्यम्[6]. ॥ १२३
[7]काळाधीन शतक्रतु, शिवसेवक [8]सत्य पांडवा ! [9]संवते; ।
किति[10] शक्रार्धासन तें, सतत [11]अमितसत्यपांडवासव ते. ॥ १२४
जे लांब रुंद मायामय [12]वेदसुरारि लाख वावें गा, ।
[13]तन्नाशकास्त्रकौतुक मजला त्वां आजि दाखवावें गा.' ॥ १२५
अर्जुन करी [14]उपक्रम, तों पावे [15]रत्नसानु कंपातें. ।
वारिति सुरवर [16]त्यांतें [17]त्रस्ताखिलसत्त्वसानुकंपातें. ॥ १२६
तेथुनि धर्म फिरे कीं बंधुकथित हित अमान्य न करावें, ।
वनवासीं देश गेलीं, तें त्या बारांत वर्ष अकरावें. ॥ १२७

अध्याय सहावा.

गेल्या पथं[18]चि होउनि [19]रक्षःस्कंधाधिरूढ ते आले, ।
हिमगिरिवरप्रदेशीं वसतां [20]यामुननगीं सुखी झाले. ॥ १

---

१. गुरुदत्ताही किली त्या प्रभुविना सिद्धिद्वारीं लाजे=गुरूनें सांगितलेली ही लाभाची किल्ली प्रभुप्रसादाशिवाय सिद्धिदायक होत नाहीं. पिनाकिलीला (शंकराच्या लीला) जाणणारे जे साधु ते असें म्हणतात कीं गुरूनें दिलेली जरी किली (किल्ली—युक्ति) असली तरी ती सिद्धिद्वार उघडण्यास त्या शंकरप्रभुविना लागते. ईश्वरप्रसादावांचून गुरूनें सांगितलेली युक्ति (शास्त्र) कोणास येत नाहीं. द्रोणाचार्यांनीं सकल धनुर्वेद अर्जुनास पढविला पण तो उपयोगीं पडला नसता, आतां शिवाचा प्रसाद होऊन पाशुपतास्त्र मिळालें, तेव्हां ती गुरुदत्ता विद्या सिद्धिप्रद झाली. २. महादेवलीला. ३. श्रीशंकरमूर्ति. ४. दैव. ५. श्रुति, ज्याला महोभाग्यवान् किंवा महातेजस्वी असें म्हणतात तो बाहुयुद्धीं प्रकट झाला. ६. अशीं संस्कृत वाक्यें पंतांच्या काव्यांत पुष्कळ आढळतात. ७. काळाच्या हातांत असणारा, नश्वर. ८. शाश्वत, सनातन. ९. अन्य, स्वतंत्र, अपराधीन. १०. त्या शक्रार्धासनाची महती कशास पाहिजे. ११. अमितब्रह्मांडांचे इंद्र. १२. वेद व देव यांचे शत्रु. १३. त्यांचा नाश करणाऱ्या अस्त्रांचा चमत्कार. १४. आरंभ. १५. मेरु. १६. अर्जुनातें. १७. त्रास पावलेल्या संपूर्ण प्राण्यांविषयीं दयायुक्त अशातें. १८. अध्याय १७६ श्लोक ५ पहा. १९. राक्षसांच्या खांद्यावर बसलेले. २०. पर्वतविशेष त्याचे ठायीं. यमुनानदीचा उगम याच पर्वतांतून असून या पर्वतावर पांडव एक वर्षपर्यंत राहिले. (अध्याय १७७ श्लोक १७ पहा.)

तेथें **भी**मासि धरी बळवान् नगकुहरगत[1] महाजगर,[2] ।
भयविकळ[3] तद्वपु[4] गमे, दवदहनें[5] जेंवि वेष्टिलें नगर. ॥ २
भीम तयासि पुसे, 'तूं कोण बळी? करिशि काय हा कवळ[6] ।
मद्गति हे, अन्याचें येथें मारील काय हाक बळ[7]?' ॥ ३
सर्प म्हणे, '**भी**मा! ज्यां[8] बहुधा स्वयशें सलज्ज **शि**बि[9] केला; ।
परि वाहविता[10] झालों विप्राकरवीं बळें स्वशिबिकेला.[11] ॥ ४
गमलें मज उद्धतपण सुखद, जरि विषापरीस अहिमहि[12] तें, ।
आलों अगस्त्यमुनिच्या[13] शापें[14] होऊनि उग्र अहि[15] महितें.[16] ॥ ५
भीमा! त्वत्पूर्वज मी झालों होतों महेंद्र,[17] परि मोटे ।
मारक,[18] न परे,[19] अनुभवें जाणे हा **न**हुष, बहु षंडरि[20] खोटे. ॥ ६

---

१. पर्वतबिलांत असणारा असा. २. मोठा अजगर. [अजगर=अजं गृणाति गिरति वा सः=सबंध बकरा अथवा शेळी गिळणारा साप. अजः गरः यस्य स अजगरः.] ३. भयानें व्याकुळ. ४. त्या भीमाचें शरीर. ५. वणव्यानें, अरण्यांतील अग्नीनें. ६. ग्रास. ७. याचा अन्वयार्थः—भीम तयासि (त्या अजगराला) पुसेः—तूं कोण बळी? हा काय (देह) कवळ (घांस) करिशी. [भीम स्वतःस म्हणतो] हे मद्गति या अजगरापुढें ही माझी दशा) [मग] येथें (या अजगरापुढें) अन्याचें बळ (जेथें माझें सामर्थ्य कुंठित झालें तेथें इतराचें सामर्थ्य) काय हांक मारील? (काय रडेल, काय कामास पडेल?) [बहुधा 'हाका मारणें' असा बहुवचनीं प्रयोग आढळतो.] ८. नहुषराजानें. ९. शिबि—हा सोमवंशीय राजा. यानें आपल्या पुत्राचें (बृहद्गर्भाचें) मांस विप्रवेषधारी ब्रह्मदेवास देण्याची सिद्धता करून आपलें अनुपम औदार्य प्रकट केलें. (वनपर्व—अध्याय १९४-१९८.) याच शिबिराजानें आपलें मांस देऊन पक्षिवेषधारी इंद्राग्नींला संतुष्ट केलें अशी कथा आहे. १०. नेवविणारा. ११. आपल्या पालखीला. १२. उष्णहि. १३. अध्याय १७९ श्लोक १४ पहा. १४. ही शापाची कथा अशी आहे—नहुष हा सोमवंशीय प्रसिद्ध राजा होता. इंद्रानें ब्रह्महत्या केल्यामुळें तो पदच्युत झाला. तेव्हां सर्व देवांनीं नहुषाला इंद्रपदाभिषिक्त केलें. याला कांहीं काळानें इंद्राणीचा उपभोग आपणास घडावा अशी प्रबल इच्छा झाली. परंतु ती त्यास वश झाली नाहीं. 'तूं अपूर्व वाहनांत बसून मजकडे ये म्हणजे तुझी इच्छा पुरवीन' असें एकदां तिनें नहुषाला सांगितलें, तेव्हां तो सप्तर्षींस व अगस्त्यमुनीस वाहनास लावून तिजकडे यावयास निघाला. त्याला जाण्याची घाई होती म्हणून त्यानें मुनिवाहकांच्या मस्तकास पाय लावून 'चला चला' (सर्प सर्प) असें म्हटलें. तेव्हां संतप्त होऊन अगस्त्यमुनीनें त्याला शाप दिला कीं, 'तूं सर्प होऊन पतन पावशील.' त्याप्रमाणें नहुष राजा अजगर होऊन यामुनगिरीवरील सरोवरांत पडला. (वनपर्व—अध्याय १७८-१८१. उद्योगपर्व—अध्याय ११-१७.) नंतर नहुषानें त्या मुनीची प्रार्थना केली, तेव्हां 'जो तुझ्या प्रश्नांचें उत्तर देईल तो तुला शापमुक्त करील' असा त्यानें उःशाप दिला. १५. सर्प. १६. पृथ्वीतें. या पदाचा अन्वय 'आलों' याकडे आहे. १७. महा इंद्र. १८. घातक. १९. शत्रु. २०. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर आणि मोह हे सहा शत्रु.

म्यां पोसावा[1] खाउनि सुगुण[2] सुरसमान[3] लेंकरूं काय[4] ।
बापा! कर्म असें हें दैवाला मानलें, करूं काय? ॥ ७
'त्वत्प्रश्नाचें उत्तर देता जो, तो[5] करील तुज मुक्त[6],' ।
हें त्या 'श्रीमन्मुनिचें म्या जतन[7] मनांत ठेविलें उक्त[8]'. ॥ ८
भीम म्हणे, 'बा सर्पा! लेशहि नाहींच मृत्युभी[9] मातें. ।
बंधु मरतील बहुधा झाला ऐकोनि मृत्यु भीमातें. ॥ ९
शोकें मरेल माता, मरतां न करूनि भीम भीमरण[10], ।
दे वीरसूसि[11] अपयश पुत्राचें तसि न भीमभी[12] मरण.' ॥ १०
पाहुनि उत्पात[13] पुसे[14] आधीं भीमासि, धर्म तो म्याला, ।
याचीच त्यांसि[15] चिंता, जेंवि धनाचीच फार लोभ्याला. ॥ ११
कृष्णा म्हणे, 'किती मी? बहु रमवितसें तया[16] अरण्यानी[17]; ।
म्यां सांभाळावें किति? ज्या भाळावें[18] तुम्हीं शरण्यानीं[19].' ॥ १२
'वत्सा[20] धनंजया! त्वां पांचाळी आत्मकीर्ति लक्षावी, ।
दक्षा[21] वीरवरा! हे माझ्या आज्ञेपरीस रक्षावी.' ॥ १३
धर्म ऋषींस म्हणे, 'श्रितरक्षण[22] आंगें कराल, करवाल, ।
तुमचा आशीर्वाद[23] प्रत्यूहांतक[24] कराल[25] करवाल[26]. ॥ १४
यम[27] हे माझे डोळे, जपतों यां तेंवि या न डोळ्यांतें[28], ।
त्यजुनि विमानें ज्ञाता[29] वरुनि करिल केंवि यान[30] डोळ्यांतें[31]? ॥ १५

---

१. काय पोसावा—असा अन्वय. २. गुणी. ३. देवांसारखा. ४. देह. ५. आत्मानात्मविवेकज्ञ. ६. अध्याय १७९ श्लोक २१ पहा. ७. जतन ठेवणें=सुरक्षितपणें राखणें, आस्थापूर्वक ठेवणें. ८. भाषण. ९. मरणाचें भय. १०. भयंकर युद्ध. ११. वीरास प्रसवणारीला, वीरमातेला. १२. भयंकर भीति. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १३. एकपक्षाक्षिचरण असे वर्तिकापक्षी सूर्याकडे पाहून वमन करूं लागले; शिवा दारुण व अमंगल नाद करूं लागल्या, धर्मराजाचा सव्य डोळा स्फुरण पावला आणि दक्षिण भुज कांपला, असे अनेक घोर उत्पात पाहून. १४. भीम कोठें आहे असें द्रौपदीस पुसे. (अध्याय १७९ श्लोक ४६ पहा.) १५. त्या धर्माला. १६. भीमास. १७. महारण्यं अरण्यानी; हा शब्द संस्कृतांत स्त्रीलिंगी आहे. १८. वश व्हावें. १९. शरणागतास आश्रय देण्यास तत्पर जे त्यांनीं. २०. हें धर्माचें भाषण आहे. (अध्याय १७९ श्लोक ४८ पहा.) २१. हे समर्था. २२. आश्रितांचें संरक्षण. २३. येथें रूपक नामक अलंकार आहे, कारण 'आशीर्वाद' आणि 'करवाल' याचा अभेद वर्णिला आहे. २४. विघ्नांचा नाश करणारा. २५. भयंकर. २६. तलवार. २७. नकुलसहदेव. २८. नेत्रांतें. २९. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ३०. वाहन. ३१. पालखीसारिखें वाहनविशेष त्यातें.

या डोळ्यांचें रक्षण तुमच्या व्रत होय [1]पादपाल्यांचें.' ।
जे श्रित असेचि करणें इष्ट सकळ [2]देवपादपा त्यांचें. ॥ १६
जाउनि सधौम्य धर्में [3]द्रुत [4]अहिकुहरासमीप [5]मागानें, ।
भीम निरखिला, जैसा [6]नंदें धरिला [7]स्वसूनु [8]नागानें. ॥ १७
धर्म म्हणे, 'रे वत्सा! केला कुरुवंशघात सापानें, ।
त्वद्व्यसनदर्शनें बहु ताप, न विषवन्हिच्या तसा पानें. ॥ १८
विपरीतचि हें, गिळिला नागानें गरुड कीं, अगा [9]धात्या! ।
[10]यां शोषाया केला हा, जैसा [11]घटजकर [12]अगाधा [13]त्यां.' ॥ १९
भीम म्हणे, '[14]आर्या! हा म्हणतो 'मी नहुष,' बल नवल याचें, ।
दुर्मोच्य काळपाशासम याच्या होय बलन [15]वलयाचें.' ॥ २०
धर्म म्हणे, 'मत्पूर्वज नहुष तुम्ही काय? जी! वदा नातें, ।
घ्या मजपासुनि दुसरें भोजन, द्या यासि जीवदानातें.' ॥ २१
सर्प म्हणे, '[16]उगळावा [17]स्वनियतिनें भरविला न सुग्रास, ।
खाइन उद्यां तुजहि, जा, बहु विनवावें तुवां न उग्रास. ॥ २२
मत्प्रश्नाचें उत्तर देशिल तरि मात्र यासि [18]सोडीन ।
मी शापमुक्त होउनि, तुज निजकुलजासि हात जोडीन.' ॥ २३
राजा म्हणे, 'पुसा, मी जोडितसें हात हे तुम्हां, [19]तारा, ।
कोणाहि कुळांत नसो [20]निजबाळकघातहेतु [21]म्हातारा.' ॥ २४
सर्प म्हणे, '[22]ब्राह्मण तो कोण? कसा? [23]वेद्य काय? वद, राया! ।
मिळतां [24]साधूक्तामृतफळ मी सेवूं कशास [25]बदरा या?' ॥ २५

---

१. पादरूपपाल्याचें, नेत्रपटलाचें. २. याचा अन्वयार्थ:—या डोळ्याचें रक्षण [हें] तुमच्या (ऋषींच्या) पादपाल्यांचें (चरण हेच कोणी पातीं त्यांचें) व्रत होय (तुमच्या चरणकृपेनें या डोळ्यांचें—नकुलसहदेवांचें—संरक्षण झालें पाहिजे. या पद्याचा उत्तरार्ध कव्युक्ति असून यांत अर्थांतरन्यास अलंकार आहे. [देवपादपाचें] जे श्रित त्यांचें सकळ इष्ट देवपादपा करणें असेचि (अवश्य आहे). ३. लौकर. ४. सर्पाच्या बिळाजवळ. ५. 'मागानें' याचा अन्वय 'जाउनि' या पदाकडे. ६. कृष्णाच्या पित्यानें. ७. आपला पुत्र. ८. कालिय सर्पानें. ९. हे ब्रह्मदेवा. १०. या भीमाला. ११. अगस्त्यऋषीचा हात. १२. गंभीरा. १३. समुद्रास. १४. श्रेष्ठा. (धर्मा.) १५. कव्याचें. याचा अर्थ:—हे धर्मा! हा अजगर मी नहुष असें म्हणतो. याचें बळ नवल करण्यासारखें आहे. याच्या वलयाचें वलन (वळण-वेढा, फेरा) काळपाशासारखा दुर्मोच्य होय. १६. ओकून टाकावा. १७. आपल्या दैवानें. १८. अध्याय १८० श्लोक १७ पहा. १९. रक्षा, संरक्षण करा. २०. आपल्या बाळकाच्या नाशास कारण असा. २१. वृद्ध. २२. अध्याय १८० श्लोक २० यांत हे नहुषाचे दोन प्रश्न आहेत. २३. जाणण्यास योग्य. २४. साधूंचें उक्त (भाषण) हेंच अमृताचें फळ. २५. बोरास.

धर्म म्हणे, 'कथितों मी, [1]स्ववचाला जरिहि तूंहि जपशील, ।
तोचि ब्राह्मण, जेथें [2]क्षांति दया दान [3]सत्य [4]तप शील. ॥ २६
वेद्य तरि [5]परब्रह्मचि, न स्पर्शे जेथ [6]मृतिजननशोची, ।
[7]ज्यातें पावोनि पुन्हा [8]संवर्तशतींहि [9]कृतिजन न [10]शोची.' ॥ २७
[11]एवंविध [12]अन्योन्यप्रश्नोत्तर होय [13]अमृतवर्ष तसें, ।
[14]सुश्रोतृवक्तृसंगमसम घन न म्हणेल अमृत वर्षतसें. ॥ २८
सद्भाषणेंचि पावे शापापासून नहुष सुटकेला. ।
[15]साधुचि [16]अमृतकर सदा यासचि कविंनीं [17]स्वपाणि[18]पुट केला. ॥ २९
ठेवी यशोर्थ कंठीं, उरवी लोकीं न, जेंवि [19]अज [20]गरता, ।
[21]सत्संग जयग्रंथीं दावी, नहुषीं न तेंवि अजगरता. ॥ ३०
नहुष जसा स्वर्गाला गेला पावोनियां [22]स्वभावाला; ।
धर्महि निजाश्रमाला पावोनि तसाचि त्या [23]स्वभावाला. ॥ ३१
ऋषि म्हणती, 'बा भीमा! ऐसें साहस नको करूं, दे हें, ।
तुजवीण आमुचीं हीं निर्जीवेंशींच भासती [24]देहें.' ॥ ३२

---

१. आपल्या वचनाला पाळशील. २. क्षमा. ३. यथार्थ आणि अहिंस्रवचन. ४. स्वधर्माचरण. मूळांत 'आनृशंस्य' (अनैष्ठुर्य) हा आणखी एक गुण सांगितला आहे. (अध्याय १८० श्लोक २१.) ५. निर्विशेष अविधपरिच्छेदशून्य निर्दु:ख आणि असुख असें ब्रह्म. ६. मरण, आणि जन्म, यांची ज्वाला. ७. ब्रह्मातें. ८. प्रलयशतींहि. ९. पुण्यवान् पुरुष, ज्ञाता. १०. शोक करीत नाहीं. ११. या प्रकारें. १२. धर्म आणि नहुष यांचीं प्रश्नोत्तरें. १३. अमृतवृष्टिप्रमाणें प्रश्नोत्तर झालें. १४. उत्तम श्रोता व वक्ता यांच्या संगतीसारखें. उत्तम अमृत मीही वर्णन करूं शकणार नाहीं, असें घन (मेघ) ही म्हणेल. १५. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. धर्मराज साधु, त्याच्या भाषणानें नहुष शापापासून सुटका पावला; कां तर साधु हाच अमृतकर (चंद्र) होय, याच कारणास्तव कवींनीं (सुज्ञ जनांनीं) साधूस स्वपाणिपुट केला, १६. चंद्र. (जीवन देणारा.) १७. हस्तांजली. हात जोडले—असा भाव. १८. 'पुट' हा शब्द कित्येक शब्दांच्या अखेरीस जोडतात:—अंजलिपुट, चंचूपुट, नासापुट, कर्णपुट, पल्लवपुट इत्यादि. या ठिकाणीं पुट म्हणजे पात्र. १९. शंकर. २०. विषपणा. २१. या पद्याचा अन्वयार्थ:—आज (शिव) जशी गरता (विषता—जनाचा प्राण घेणें हा धर्म) लोकीं न ठेवी, तर कंठीं ठेवी, तसा सत्संग (धर्मराजाचा समागम) अजगरता (सापपणा—सर्प असणें ही स्थिति) नहुषीं न ठेवी, तर—जयग्रंथीं (महाभारतग्रंथीं) ठेवी. [जय—असें महाभारताचें नांव आहे.] धर्माची भेट होतांच, नहुषाचा अजगरपणा गेला, फक्त नहुष अजगर झाला होता-अशी कथा मात्र भारतग्रंथांत राहिली—असें तात्पर्य. २२. स्वरूपाला. २३. स्वभ्रात्याला (भीमाला). येथें वनपर्वांतील अजगरपर्व संपलें. २४. शरीरें.

तेथूनि काम्यकीं[1] जों आला तो समुनिजन अजातारी,[2] ।
तों प्रभु[3] भेटाया ये, पडतां मोहांत जो अजा[4] तारी. ॥ ३३
पांडव म्हणेन चातक, परि घन हरि, वीज सत्यभामा[5] ती ।
न म्हणेन, त्यापुढें घनशंपांची[6] होय सत्य भा[7] माती. ॥ ३४
अंकें[8] जैशीं शून्यें सद्यःकार्यक्षमें,[9] न तीं अन्यें, ।
केलीं पांडवदेहें[10] त्या आद्यें[11] सगुणविग्रहें[12] धन्यें. ॥ ३५
ब्रह्मादि साधु योगी ज्याच्या पदभक्तिच्या पथीं शिरतो, ।
धर्माच्या, भीमाच्या, ठेवी पायांवरी स्वयें शिर [13]तो. ॥ ३६
आलिंगिला प्रभूच्या भुजभुजगांनीं[14] किरीटिपाटीर,[15] ।
बहु कांपविता झाला जाणों त्याचा वियोग हा [16]टीर. ॥ ३७
ऐसे धन्य पृथेचे मात्र न, सुत वंदितेहि[17] माद्रीचे ।
गंगाधरप्रियसखहि[18] झाले, केवळ न ते हिमाद्रीचे. ॥ ३८
गंगोन्हदें[19] करावे मरणोत्तर सुरसमानवपु[20] न्हाते[21] ।

---

१. कार्तिक वद्यपक्षांत पांडव काम्यकवनांत गेले (अध्याय १८२ श्लोक १८). २. धर्मराजा. ३. श्रीकृष्ण. ४. ब्रह्मदेवाला. ब्रह्मदेवानें कृष्णाचें सामर्थ्य पाहण्यासाठीं गोवत्सांस आणि गोपाळ-बालकांस चोरून नेलें, तेव्हां एक वर्षपर्यंत कृष्णानें वत्सांचें आणि गोपशिशूंचें रूप घेऊन गोकुळां-तील सर्व व्यवहार यथापूर्व चालविले. नंतर ब्रह्मदेवास कृष्णाचा प्रभाव कळला आणि त्याजविषयींचा त्याचा मोह गेला अशी कथा आहे. (श्रीमद्भागवत—दशमस्कंध—अध्याय १४ पहा.) ५. कृष्णाची स्त्री. ६. मेघांची आणि विद्युल्लतेची. ७. कांति. कृष्ण सत्यभामेसह धर्मास भेटण्यास आले त्या प्रसंगाचें वर्णन या पद्यांत आहे. पंत म्हणतात:—मी धर्मादिकांस चातक म्हणेन, परंतु कृष्णास मेघ आणि सत्यभामेस वीज असें मात्र म्हणणार नाहीं, कारण त्या कृष्णसत्यभामेपुढें मेघ आणि शंपा (वीज) यांची भा (कांति) माती होय. कृष्णाचे श्यामवर्णापुढें मेघाचा श्यामवर्ण, तसेंच सत्यभामेच्या ते-जस्वी वर्णापुढें वीजेचा वर्ण कांहींच नव्हत, तेव्हां घनाची आणि शंपेची उपमा कृष्णास आणि सत्यभामेस देणें योग्य नव्हे, कारण ज्यांची उपमा द्यावयाची ते पदार्थ अधिक गुणवान् पाहिजेत. ८. एक दोन इत्यादि अंकांच्या योगें. अंकावांचून नुसत्या शून्यास कांहीं किंमत नाहीं. ९. तत्क्षणींच कार्याविषयीं समर्थ अशीं. १०. पांडवांचीं शरीरें. ११. आदिपुरुषानें. १२. गुणसंपन्न विग्रह (देह) धारण करणाऱ्या (कृष्णानें). १३. साधु ज्याच्या चरणभजनाच्या मार्गांत रत होतात असा जो कृष्ण तो. १४. बाहुरूप सर्पांनीं. सर्प हे चंदनवृक्षाला चिकटून असतात अशी लोकप्रसिद्धि आहे. येथें रूपक अलंकार आहे व दुसऱ्या अर्धांत उत्प्रेक्षा आहे. १५. अर्जुनरूप चंदन. (पाटीर=चंदन) १६. कुला. १७. नमन करणारे. १८. महादेवाचे प्रियसखेहि. १९. गंगेच्या डोहानें. (ऱ्हद=डोह.) २०. देवसदृश वपु (शरीर) ज्यांचें असे. २१. स्नान करणारे.

जे [1]हरिनतिरससमुदित न म्हणति सुधा सुरस मानव पुन्हा ते. ॥ ३९
[2]भामा कृष्णा, गंगायमुनाशा भेटल्या [3]अनादिसल्या, ।
साक्षात् लक्ष्मी गौरी ऐशा झाल्याचि त्या जना दिसल्या. ॥ ४०
कुशलप्रश्नें [3]निर्वुनि देव म्हणे, ‘हाचि धन्य [4]वासर, हो. ।
[5]सद्दर्शन [6]सुसर, न पर, [7]मानस वा, थोर अन्य वा सर, हो ! ॥ ४१
अंतर्बाह्य निवालों तुमचीं अवलोकितांचि पंच मुखें, ।
वाटे मनासि दर्शन दिधलें मज [8]काम्यकांत [9]पंचमुखें. ॥ ४२
प्रथमचि तुम्ही [10]तुळा, [11]शतजन्मेंहि सुदुर्लभा परा सुकृतें, ।
संप्रति तव कर्में परकर्में जीवत्कृतें परासुकृतें. ॥ ४३
फिरलाशि उद्धराया तीर्थांतें, तूं न [12]मज्जन कराया, ।
सच्चरण म्हणति ‘आधीं [13]पुण्यर्द्धी, हो ! [14]नमज्जन ! करा या.’ ॥ ४४
आतां [15]पुण्यश्लोका ! काय तुजपुढें टिकेल [16]खळबळ तें ? ।
[17]त्वद्भुजघटजस्मरणें [18]अरिसिंध्वंतर [19]उदंड [20]खळबळतें. ॥ ४५
[21]खद्योत [22]व्योमपथीं [23]भानुपुढें काय देखिले [24]टिकले ? ।
[25]त्रिनयनभालेंदुपुढें [26]सरतिल [27]सितें [28]रक्तें रेखिले [29]टिकले ? ॥ ४६

---

१. हरिनमनरूप रसानें आनंदित असे मनुज सुधेला (अमृताला) सुरस असें पुनः म्हणत नाहींत. २. द्रौपदी व सत्यभामा ह्या आदिमाया. गीति ३८–४० यांस मूळांत आधार नाहीं. हा भाग प्रंतांनींच आपल्या कल्पनाचातुर्यानें येथें संनिविष्ट केला आहे. ३. भूतकालवाचक धातुसाधित अव्ययाच्या ‘ऊन’ प्रत्ययाच्या जागीं मराठी काव्यांत ऊनि, उनियां, ओन, ओनि, ओनियां हे प्रत्यय आढळतातः—हरून, हरूनि, हरूनियां, हरोन, हरोनियां. ४. दिवस. ५. साधूंचें दर्शन. ६. उत्तमसरोवर. ७. मानससरोवर. ८. काम्यकवनांत. ९. सदाशिवानें. १०. तुम्ही प्रथमच तुलना करून पहा. ११. परा शतजन्मेंही सुदुर्लभा (अशा तुझ्या) सुकृतें, परकर्में परासुकृतें तव कर्में संप्रति जीवत्कृतें. शतजन्मानेंही दुसऱ्यास अत्यंत दुर्लभ अशा तुझ्या पुण्यकर्मानें, परांच्या (शत्रूंच्या) कर्मानें (परासुकृतें) मृतप्राय केलेलीं तुझीं (तव) कर्में सांप्रत जीवंत केलीं आहेत. १२. स्नान. १३. पुण्यसमृद्धि. १४. अहो, नमन करणारे जन हो ! आधीं पुण्यर्द्धि करा या—असें सच्चरण म्हणती. १५. हे धर्मा. (ज्याची कीर्ति पवित्र तो पुण्यश्लोक.) १६. दुष्टांचें सैन्य. १७. तुझ्या भुजरूप अगस्तिऋषिच्या स्मरणें. १८. शत्रुसमुद्राचें हृदय. १९. पुष्कळ (उद्दंड=उ-दंड, उंच आहे दंड (दांडा, दांडी) ज्याचा तें—छत्री इत्यादि, यावरून उदंड म्हणजे पुष्कळ असा अर्थ झाला.) २०. हालून जातें, क्षुब्ध होतें. २१. काजवे. २२. आकाशमार्गी. २३. सूर्यापुढें. २४. स्थिरावले. २५. महादेवाच्या मस्तकावरील चंद्रापुढें. २६. सरसावतील काय ? २७. शुभ्र. २८. तांबडे. आकाशांत सूर्यापुढें काजवे टिकलेले किंवा शंकराच्या मस्तकावरील चंद्रापुढें बरोबरी करण्यास पांढरे अगर तांबडे आणि उत्तम रेखलेले चंदनाचे टिळे सरसावलेले कोणी पाहिले आहेत काय ? नाहीं. तसेच तुम्हापुढें तुमचे शत्रु टिकणार नाहींत—असा भाव. २९. कपाळास लाविलेले टिळे. यांत अन्योक्ति आणि प्रश्न या अलंकारांचा संकर आहे.

[न]गरी मज, शंभूची [1]इषुधि गमे, जींत सिद्ध यादव ती, ।
सिंधूच्या पुरतील न [2]वृष्ण्युत्साहा लिहावया [3]दौवती. ॥ ४७
संपत्ति शक्ति विद्या सत्साहित्येंचि होय [4]अनपार्था ।
[य]ास्तव [5]वृष्णि [6]बहूत्सुक जोडूं दे भव्य कीर्तिधन पार्था.' ॥ ४८
धर्म म्हणे, 'श्रीकृष्णा ! भुललों सेवूनि बोल कानांहीं, ।
बा ! तुज वेदहि लाजे, ज्यासम कोठेंचि बोलका नाहीं. ॥ ४९
स्तुति न दिल्या त्वां [7]आशीराशी, [8]श्रितलोकदेवकल्पतरो ! ।
प्रभुजी ! तुझ्या प्रसादें व्यसनीं हा दास [9]तोकंकल्प तरो'. ॥ ५०
[10]कृष्णेला कृष्ण म्हणे, 'सखि ! बरि आहेसि कीं, असे नातें ।
पुस न पुसहि मज म्हणतें, काय करूं, क्षण उगें असेना [11]तें ? ॥ ५१
मूर्त [12]बहिश्चर [13]असुसे [14]प्रतिविंध्यादि त्वदीय सुत [15]सौ जे ।
त्यांहीं, देवि ! सुभद्रागृह [16]षण्मुखमातृसदनसम साजे. ॥ ५२
[17]प्रद्युम्नें शस्त्रास्त्रीं [18]पटु केले, शिकति नित्य त्याजवळ, ।
आवडलें हेंचि [19]तयां बहु, तैसें देवि ! तें न [20]आजवळ.' ॥ ५३
सांत्वन कृष्ण करी, तों ये मार्कंडेय मुनि [21]पहायास, ।
तितुक्यांत नारदहि ये, ज्याच्या स्मरणें सरे [22]महायास. ॥ ५४

---

१. भाता. २. यादवांच्या उत्साहाला. ३. दौती. हा शब्द आरबी आहे. ४. सफळ. (अन्+अप+अर्थ=न+रहित+फळ=सफळ; 'द्वौ नञौ प्रकृत्यर्थं गमयतः' असा वचनाधार आहे.) ५. यादव. ६. बहु उत्सुक. ७. आशीर्वादाच्या राशी. येथें अपन्हुति नामक अलंकार आहे. ८. हे आश्रितजनांच्या कल्पवृक्षा कृष्णा. ९. बालसदृश. १०. द्रौपदीला. ११. नातें. कृष्ण कृष्णेला म्हणे:—'सखि ! बरी आहेस कीं' [असें] 'पुस' 'न पुस' [असें] मज नातें म्हणतें, काय करूं ? तें क्षण उगें असेना. तुझें माझें जें नातें आहे तें एकदां म्हणते, पुस=विचार, समाचार घे, एकदां म्हणते—न पुस=विचारूं नको. तर मी आतां काय करूं ? हा अपन्हवद्वारा प्रश्न आहे. तुझें माझें जें नातें आहे तें 'तूं बरी आहेस ना ?' असें तुला पूस असें मला म्हणतें आणि एकदां न पूस (नको विचारूं) असेंही म्हणतें, काय करूं ? तें नातें क्षणभरही उगें राहत नाहीं. मी तुला प्रसंगीं साहाय्य केलें नाहीं म्हणून 'तूं बरी आहेस ना ? असेंही माझ्यानें तुला विचारवत नाहीं— असा भाव दिसतो. १२. बाहेर असणारे. १३. प्राणासारखे. १४. प्रतिविंध्य, श्रुतसेन, अभिमन्यु, इत्यादि. (पृष्ठ १८ टीप १५ पहा.) १५. साहा. १६. कार्तिकस्वामीच्या मातेच्या (पार्वतीच्या) गृहासारखें. १७. कृष्णपुत्र, रौक्मिणेय. (अध्याय १८३ श्लोक ३० पहा.) १८. कुशल. १९. प्रतिविंध्यादिकांस. २०. आईचें माहेर. आजूळ, आजोळ, आजवळ=आजोबाचें घर. २१. पांडवांस प[illegible]ला. 'दृश्'धातूला कित्येक काळीं 'पश्य' आदेश होतो त्याजपासून मराठींत 'पाहणें' हा शब्द [illegible]ला आहे. २२. मोठे श्रम.

[1]तो [2]ब्राह्मणमाहात्म्य [3]क्षत्रियमाहात्म्य त्यांसि आयकवी, ।
वर्णी [4]पतिव्रतेचें [5]माहात्म्यहि सर्वयोगिराय कवी. ॥ ९५
[6]धर्मव्याधस्कंदप्रभवादिकथा उदंड तो बोले. ।
श्रवणें धर्म [7]ब्राह्मणगण नारद फार [8]देवही डोले. ॥ ९६
[9]सत्या कृष्णेसि म्हणे, 'वदत्यें तें तूं खरेंच मान सये ! ।

---

१. मार्कंडेय. २. वनपर्व—अध्याय १८४-१८५-१९२ यांत ब्राह्मणमाहात्म्यवर्णन आहे. हैहयकुलांतील राजानें तार्क्ष्यमुनीच्या मुलाला मृग अशा भ्रांतीनें मारलें, नंतर तो तपोबळानें सजीव झाला, द्विजांना मृत्युभय नाहीं (अध्याय १८४). वैन्य नामक राजर्षीनें अत्रि मुनीचें तपोबल जाणून आणि त्याचें भाषण शास्त्रप्रामाण्यसंपन्न असें प्रत्यक्ष पाहून त्याला अपार धन दिलें (अध्याय १८५) इक्ष्वाकुवंशज परीक्षित् राजाच्या शल नामक पुत्रानें वामदेव ऋषीचे अश्व कराराप्रमाणें परत दिले नाहींत तेव्हां मुनीनें स्वप्रभावानें चार राक्षस उत्पन्न केले आणि त्यांच्याकरवीं शल राजाला ठार मारविलें. पुढें याचा धाकटा भाऊ दल हा अश्व देईना, तेव्हां वामदेवानें शापानें त्याची शक्ति नष्ट केली (अध्याय १९२). असा कथाभाग या तीन अध्यायांत आहे. ३. वनपर्व—अध्याय १९४-१९८ यांत क्षत्रियमाहात्म्यवर्णनपर कथा आहेत. शिबिराजाला सुहोत्र राजानें सन्मानपूर्वक प्रदक्षिणा घालून त्याची बहुत प्रशंसा केली (अध्याय १९४). ययाति राजानें विप्रास रोहिणी जातीच्या सहस्र गाई देऊन संतुष्ट केलें (अध्याय १९५). वृषदर्भ राजानें एका धनार्थी विप्रास ताडण करून आणि धन देऊन राजा ब्राह्मणाला दंड करण्यास आणि प्रसाद करण्यासही समर्थ आहे असें दाखविलें (अध्याय १९६). शिबि राजानें कपोतासाठीं आपलें मांस देऊन कपोतरूपी अग्नीला संतुष्ट केलें (अध्याय १९७). याच शिबि राजानें आपल्या बृहद्गर्भ नामक पुत्राचें मांस विप्रवेषधारी ब्रह्मदेवास देऊन तृप्त केलें (अध्याय १९८). असा कथाभाग या पांच अध्यायांत आहे. ४. धर्मास. ५. वनपर्व—अध्याय २०५-२०६ यांत पतिव्रताख्यान आहे. कौशिक नामक ब्राह्मणास एका पतिव्रतास्त्रीनें बोध करून पतिव्रतेचा प्रभाव केवढा असतो हें दर्शविलें आणि विप्राच्या तेजापेक्षांही पतिव्रतातेज श्रेष्ठ होय असें त्याच्या अनुभवास आणून दिलें—अशी कथा आहे. ६. धर्म, व्याध, स्कंद (कार्तिकस्वामी) यांच्या उत्पत्तीच्या इत्यादि कथा अध्याय २०७-२३२ यांत आहेत. ७. ब्राह्मणांचा समुदाय. ८. कृष्ण. ९. "यांत सत्या म्हणजे सत्यभामा (येथें केवळ पंतानेंच छंदार्थ पुढलें 'भामा' पद काढून टाकिलें असें कोणी समजूं नये. मूळभारतांतहि तिला 'सत्या' म्हटलें आहे.) कृष्णेला म्हणजे द्रौपदीला म्हणत्से, मी जें सये तुला सांगत्यें तें तूं खरेंच मान, (म्हणजे यद्यपि खरें मानायाजोगें नाहीं, कांकीं मीं कृष्णपत्नी असून पुढें सांगत्यें तशी गोष्ट होणार नाहीं, तरी तूं क्षणभर उदाहरणाकरितां तरी खरें मानून घे, असा येथें 'च' या अन्वयानें आणि 'लोक म्हणोत' या पुढल्या तिच्याच म्हणण्यावरून ध्वनितार्थ निघतो. आणखी 'सये' या संबोधनानें आपला स्नेहभाव दाखवून जें पुसणार त्या प्रश्नाचें गुह्यत्वहि इंगित केलें.) तें काय पुसशील तर ऐक. लोक म्हणत असल्यास म्हणोत, परंतु माझ्या हातांत एक पळभरहि, कांतमानस म्हणजे नवऱ्याचें मन, नये म्हणजे येत नाहीं. अर्थात् माझ्यानें कृष्णास अगदीं वश करवत नाहीं." (यशोदापांडुरंगी टीका.)

लोक म्हणोत, परि पळहि माझ्या हातीं न कांतमानस ये. ॥ ९७
त्वां हे पांच पति कैसे वश केले? भजति सर्व एकीतें, ।
थोडें याहुनि पाहुनि नटती कादंबिनीस केकी तें. ॥ ९८
सांग वशीकरण कसें केलें? त्वां देवि! कोणत्या मंत्रें? ।
कीं दिव्यौषधिमूळें? किंवा वात्स्यायनोदितें यंत्रें?' ॥ ९९

१. वनपर्व—अध्याय २३३ पहा. २. पतीचें अंतःकरण. (वनपर्व—अध्याय २३३ पहा.) ३. "अशी मी सौंदर्यादिगुणयुक्त असतां, आणि कृष्णासारिखा माझा पति असतां, ही माझी स्थिति, आणि तुझी पाहलें तों त्वां हे धर्मभीमादि, पांच पति, तुला एकीला एकलीला, भजतात म्हणजे तुला अत्यंत वश आहेत, असे कसे वश केले; (अर्थात् तुझे पांच पति असून स्वभावतः ते परस्परांविषयीं साशंक असावे, आणि त्यांतून एकानेंहि तुजविषयीं प्रेम धरूं नये, अशी स्वाभाविक गोष्ट असतां ते पांचहि तुला एकलीला अगदीं वश होऊन गेले आहेत; असे कसे वश केले म्हणजे कोणत्या उपायानें त्वां त्यांस वश केलें आहे?) आतां ते कसे वश होऊन गेले आहेत हें कवि पुढल्या सरस दृष्टांतानें सांगतात—केकी म्हणजे मोर, कादंबिनीस म्हणजे मेघांच्या पंक्तीस, पाहून नटती नाचतात, तें याहून थोडें; म्हणजे मेघांच्या पंक्तीस पाहून मोर नाचतात, इतका मोरांचा तिजवर प्रेम आहे, तेंहि या धर्मादिकांचा तुझ्या ठायीं जो प्रेम आहे त्याहून थोडें; इतकें त्वां जें त्यांस वश केलें तें कसें असा संबंध. (एथें कवीनें या दृष्टांतानें मयूरांस कांत करून कादंबिनी त्यांची कांता असें दाखविलें आहे. आणखी त्या कादंबिनीच्या दर्शनेंकरून जी मयूरांच्या ठायीं नृत्य करण्याची उत्सुकता, तिणेंकरून मयूरांच्या ठायीं कादंबिनीविषयक नुसती पराधीनता दर्शविली इतकेंच नाहीं, परंतु तिच्या आल्हादजनक गुणांनीं मयूरांच्या ठायीं त्या नृत्यानें आल्हादजननहि सुचविलें; यावरून द्रौपदीच्या गुणाचें आनंदजनकत्व आणि त्या तिच्या गुणांनीं धर्मादिकांचें लुब्धत्वहि आधिक्येंकरून इंगित केलें आहे. म्हणोन एथें या सरस मयूरनृत्याच्या दृष्टांतानें उत्प्रेक्षा आणि पुढें व्यतिरेक असे दोन अलंकार कवीनें फार सरस साधिले आहेत.)" (य. पां. टीका.) ४. कोणत्या चतुर उपायानें. ५. नर्तन करिती. ६. मेघसमूहास. ७. मयूर. ८. "आतां अशा तुझ्या आनंदजनक गुणांनीं कोणत्या उपायांनीं तुझ्या पांच पतींस वश केलें हा प्रश्न पुसत असतां, प्रथमतः सामान्य स्त्रिया आपल्या पतींस वश करण्याकरितां लोकप्रसिद्ध जे उपाय आचरितात ते सत्यभामा तीस सांगत्ये—देवि—हे देवि हे द्रौपदीबाई, त्वां कोणत्या मंत्रें कसें वशीकरण केलें तें सांग, कीं किंवा दिव्यौषधिमूळें किंवा वात्स्यायनोदित यंत्रें वश केलें तें सांग असा एथें संबंध जाणावा. यांत जारण, मारण, उच्चाटण, इत्यादि जे विशेषेंकरून तांत्रिक ग्रंथांत प्रयोग सांगितले आहेत, त्यांत वशीकरण म्हणजे दुसऱ्याचें मन वश करण्याचा एक प्रयोग प्रसिद्ध आहे तो, मंत्र, दिव्यौषधीचें मूळ, आणि यंत्र, (म्हणजे वर्तुल त्रिकोन अष्टकोन आदिकरून आकृतिविशेष काढून, त्यांत स्थानें पाहून त्या स्थानांत अकारादि इष्ट वर्ण लिहून पूजनार्थ जें साधन त्या त्या ग्रंथांत त्या त्या मताच्या आचार्यांनीं सांगितलें आहे तें) यांच्या साधनानें सांगितला आहे." (य. पां. टीका.) १२. वात्स्यायन ऋषीनें सांगितलेल्या.

कृष्णा[1] हांसोनि म्हणे, 'भामे! मोहावयासि पतिला जे ।
मंत्राद्युपाय करणें या श्रवणें बहु मदीयमति[2] लाजे. ॥ ६०
प्रेमें[3] पतिच्चरणांसि न देउनि दे हात तायिताला[4] जे ।
ते स्त्री न रुचे पतिला कीं तीतें आततायिता[5] लाजे. ॥ ६१
जाणें[6] वशीकरण हें करित्यें जेणें कधीं न कोपति तें. ।

---

१. "या प्रश्नाचें उत्तर द्रौपदी देत्ये—कृष्णा हांसून म्हणत्ये, भामे—हे सत्यभामे, जे पतिला मोहायास, मंत्राद्युपाय—त्वां सांगितले मंत्रादि उपाय, करणें, या श्रवणें हें ऐकिल्यानें, मदीय मति—माझें मन, बहु लाजे—फारच लाजतें. (यांत द्रौपदीच्या हांसण्यानें सत्यभामेच्या प्रश्नाचें किंचित् विगर्हितत्व इंगित होतें; आणि अशा प्रश्नाच्या श्रवणमात्रेंकरून तिणें आपल्या मनाच्या लज्जेचें कथन केल्यानें तिच्या मनाचा थोरपणा एथें कवीनें इंगित केला आहे.)" (य. पां. टीका.) २. माझी बुद्धि. ३. "आणखी द्रौपदी म्हणत्ये—जे स्त्री प्रेमें पतिचरणाशीं हात न देउनि तायिताला दे, ते स्त्री पतिला न रुचे; कीं तीतें आततायिता लाजे;—म्हणजे जी स्त्री आपला हात प्रीतीनें नवऱ्याच्या पायांस लावावा तो न लावितां ताइताला लावित्ये, अशी स्त्री नवऱ्याला आवडत नाहीं; किंबहुना अशा स्त्रीस आततायिता म्हणजे धृष्टताहि लाजे—लाजत्ये. (सारांश आपल्या नवऱ्याच्या ठायीं निर्मल प्रीति ठेवावी ती सोडून जी बायको देवऋषीकडे जाऊन त्यां जवळून भारलेला ताईत घेत्ये, म्हणजे आपला प्राणवल्लभ जो पति त्यास प्रेमानें आपल्या गळ्यांतला ताइत करावा, तसें न करितां, जी स्त्री त्या नवऱ्याची प्रीति आपल्या वरच रहावी म्हणून धुतारे लोकांकडून कायणुबायणु घेऊन, त्याणें भारलेला नुसता ताईत आपल्या गळ्यांत बांधित्ये, अशा स्त्रीवर नवऱ्याची प्रीति कदापि बसणार नाहीं; उलटें अशी धीट साहस करणारी बायको निंदेस मात्र पात्र होईल. (यांत कवीनें अभिमेतार्थाचें सरस कथन करून शेवटीं यमकहि फार सुंदर साधिलें आहे.)" (य. पां. टीका.) ४. ताइताला. (कंठभूषणाला.) ५. घातकीपणा. ६. "हें मूढ बायकांचें वशीकरण तुला सांगितलें; आतां माझ्या वशीकरणाचा प्रकार ऐक, आणि तसें तूं कर, म्हणून द्रौपदी सत्यभामेस सांगत्ये—जेणें न कोपति—जेणेंकरून पति कोपणार नाहींत, तें करित्ये—अर्थात् तें आचरण मी करित्यें; हें वशीकरण जाणें—मीं वशीकरण जाणत्यें तें हें, अर्थात् तें हेंच किं ज्या आचरणानें पतीस कदापि कोप येणार नाहीं; माझ्या वशीकरणाचा उपाय काय तो असें आचरण, म्हणून सखि तूंहि असेंच करी—हे सखे, तूं असेंच माझ्यासारिखें कर; (सखि या संबोधनानें द्रौपदीनें आपला स्नेहभाव प्रदर्शित केला); आतां पति रागें भरणार नाहींत असें कोणतें आचरण पुसशील तर—पतितें मदमत्सर दाखवूं नको—आपल्या नवऱ्याला कदापि मद दाखवूं नको आणि मत्सरहि दाणवूं नको. (सर्व स्त्रियांना सर्व प्रकारच्या आपआपल्या नवऱ्यांच्या मनांतून क्रोध घालवून त्यांची प्रीति संपादन करण्याचा हा मोठा अमोघ उपाय एथें द्रौपदीनें सांगितला आहे असें समजलें पाहिजे. जी स्त्री आपला गर्व

सखि! तूंहि असेंचि करीं मद मत्सर दाखवूं नको पतितें. ॥ ६२
पैतिपरमेश्वरचरणा जी तत्सेवार्थ न नवशी करणें।
ती मुग्धा कैशी गे वळवील स्वामिमन वशीकरणें. ॥ ६३
पैतिचे प्रसाद देती ज्या सद्गतितें न योग सैव तीतें।
वाहे पहा शिरीं शिँवदेहार्धमता शिँवा स्वसवतीतें. ॥ ६४

दाखवित नाहीं, आणि जरी तिणें आपल्या नवऱ्याचें एकादें दुर्वृत्त आचरण ऐकिलें, तरी त्याविषयींचा आपल्या मनांतला मत्सरभाव त्यास न दाखवितां प्रीतीच्या बोधानें तें त्याचें दुराचरण घालविण्याचा प्रयत्न करित्ये, अशी कुशल साध्वी स्त्री आपल्या नवऱ्यास जिंकील यांत संशय नाहीं. मात्र तो नवरा पशूसारिखा पाषाणहृदयाचा नसावा; अशा पशूपुढें मात्र स्त्रियांचा उपाय चालत नाहीं.) एथेंहि कवीनें सरस अर्थ दाखवून यमकहि सुंदर रीतीनें साधिलें आहे." (य. पां. टीका.)

१. "आणखी जी नवशीकरणें तत्सेवार्थ पतिपरमेश्वरचरणा न (वळवील), ती मुग्धा वशीकरणें स्वामिमन कैशी गे वळवील?—जी स्त्री नवस करण्यानें (एथें कवीनें नवशीकरण असा शब्द साधून त्याची तृतीया केली आहे) तत्सेवार्थ—अर्थात् आपल्या पतीच्या सेवेकरितां, पतिपरमेश्वरचरणा–पति हाच आपला परम ईश्वर अथवा मुख्य धनी त्याच्या पायातें, न वळवील–वळविणार नाहीं–म्हणजे वश करणार नाहीं, (येथें पायांस वश करण्यानें पतिव्रतेचा अत्यंत नम्रीभाव प्रदर्शित होतो,) ती मुग्धा–ती वेडी, वशीकरणानें, आपल्या स्वामीचें मन, कशी गे वश करील? अर्थात् प्रीतीनें नवऱ्याची सेवा सोडून जी बायको त्याचें प्रेम आपल्यावर असावें म्हणून देवांस नवस करित फिरती, ती वेडी पूर्वोक्त वशीकरणाकरितां टाणेटोणे करून आपल्या नवऱ्याची प्रीति कशी संपादन करील? अर्थात् कदापि करणार नाहीं." (य. पां. टीका.)

२. "आतां पतिप्रसन्नतेचें महत्फल द्रौपदी सांगत्ये–पतिचे प्रसाद तीतें ज्या सद्गतितें देती–पतीची प्रसन्नता तीतें–त्या पतिव्रते स्त्रियेला, जी सद्गति देते; न योग सव–योग नाहीं, आणि सव म्हणजे यज्ञ नाहीं; अर्थात् ती सद्गति तिला योग देणार नाहीं, आणि यज्ञही देणार नाहीं. यास दृष्टांत पहा, शिवदेहार्धमता—शिवाची अर्धदेहा म्हणून मानलेली जी, शिवा—म्हणजे पार्वती, स्वसवतीतें–आपल्या सवतीला–अर्थात् गंगेला, आपल्या शिरीं वाहे–माथ्यावर वाहत्ये,–(या दृष्टांतानें आपला पति महादेव याची प्रसन्नता संपादण्याकरितां त्याच्या अर्धांगीं असतां ती पार्वती गंगेविषयीं आपला सवतीमत्सर टाकून उलटें आपल्या माथ्यावर तिचें वहन करित्ये; येथें कवीनें पूर्वी ६२ वे गीतींत मत्सर टाक म्हणून जो द्रौपदीनें सत्यभामेस उपदेश केला आहे, त्याच्या समर्थनाकरितां हा दृष्टांत फारच सरस योजिला आहे; आणि प्रकृत पतिप्रसादाच्या फलाच्या इष्टत्वासहि हा दृष्टांत फारच अनुकूल आहे, असें येथें समजलें पाहिजे." (य. पां. टीका.)

३. यज्ञ. ४. महादेवाच्या देहार्धाला मान्या म्हणजे अर्धांगीं रहाणारी असी. ५. पार्वती.

श्रुतिलो[2] कविधीसी[3] ती मानवली फार शुद्ध[4] वदलीला, ।
न पतीसचि कर्णांसहि सत्य सती होति उद्धवदलीला[5]. ॥ ६५
जें सासुरां मुली पितृगमनिं करिति तेहि काननौके[6] [7]तें ।
कवळिति जवळि तिमिंगिल[8] दिसतां भटवरहि[9] कां न नौकेतें? ॥ ६६
देव म्हणे, 'जरि होतें वनवासें कृश मदीय असु[10], खमतें[11], ।
असुख मतें माझ्या हें, जें [12]दृक्प्रिय सुख, नसोचि[13] असुखम[14] तें. ॥ ६७
कृष्णे! करिलचि म्हणशिल जरि 'या भूमंडळा नभा उखळ[15],' ।
तुजकरितां सखि! अखिलहि असु वसु[16] वेंचील हा, न भाउ खळ.॥६८
सखि! सोशिजेल लंघुनि काय खगोत्तमगरुद्रवा[17] टोळें? ।
कां दृगुपद्रवदमशकततिचें[18] न करील रुद्र वांटोळें[19]?' ॥ ६९

---

१. "तो द्रौपदीचा उपदेश सत्यभामेस फार रुचला असें सांगत असतां कवि म्हणतात—श्रुतिला कविधी असी शुद्धवदलीला ती फार मानवली—श्रुतिला–कानाला, कविधी–ज्ञात्यांची बुद्धि, अशी, शुद्धवदलीला–शुद्ध रीतीनें अर्थात् सम्यक् रीतीनें जी वदली–वदली गेली तिला, म्हणजे सम्यक् रीतीनें जिला उपदेश केला अशी जी सत्यभामा तिला, ती–अर्थात् ती द्रौपदी, फार मानवली–मान्य झाली–आवडली; म्हणजे कर्णांस जशी सुज्ञ पुरुषाची मति आवडत्ये, तशी त्या सत्यभामेला ती द्रौपदी आवडली; अर्थात् तिचा हा पूर्वोक्त उपदेश आवडला. आणखी अर्थांतरन्यासेंकरून कवि सांगतात—उद्धवलीला पतिसचि न कर्णांसहि सत्य सती होति–कारण उद्धवलीला–उद्धव म्हणजे उत्साह–आनंद, त्यातें देणाऱ्या ज्या लीला, अथवा उद्धवद–आनंद देणारी जो पतिव्रता कामिनी, तिच्या ज्या लीला–चरित्रें, केवळ नवऱ्यासच नाहींत तर कर्णांसहि–म्हणजे इतर ऐकणारांच्या कानासहि, सत्य–म्हणजे खऱ्या अशा, सती–अर्थात् साध्वी स्त्रियांप्रमाणें मनोरमा अशा होतात; अथवा, उद्धवदलीला–आनंद देणाऱ्या आहेत लीला ज्यांच्या अशा कामिनी (बहुव्रीहि) केवळ आपल्या पतींसच सती दिसतात असें नाहीं, तर कानांसहि सती– म्हणजे साध्वी, अशा वाटतात; अर्थात् त्यांचें चरित्र त्यांच्या पतींसच आनंद देतें, इतकेंच नाहीं, परंतु त्यांचें चरित्र ऐकणारे जे इतर जन त्यांच्या कानासहि तें त्यांचें चरित्र अत्यंत मधुर लागतें असा अर्थ." (य. पां. टीका.) २. वेदाला. ३. कवींच्या बुद्धीसारखी. ४. जिला (शुद्ध पापरहित) असें म्हटलें तिला. ५. उत्साह देणाऱ्या लीला ज्यांच्या अशा. ६. वनवासी पांडव. (कानन+ओकस्=अरण्य+गृह.) ७. रोदन. ८. मत्स्य. (तिमि नामक माशाला गिळणारा मोठा मासा.) ९. थोर योद्धे. १०. प्राण. ११. सोसतें. १२. दृष्टीला आवडणारें, संतोषदायक. १३. जें दृक्प्रिय सुख तें असुखम नसोचि, हें माझ्या मतें असुख–असा अन्वय. १४. सुखमा=सुषमा. शोभा नाहीं ज्यास तें; शोभाहीन. १५. उखळून टाक. १६. धन. १७. पक्षिश्रेष्ठ जो गरुड याच्या पक्षांच्या शब्दाला. (खग+उत्तम+गरुत्+रवा=पक्षी+श्रेष्ठ+पक्ष+शब्दा.) १८. दृष्टीला उपद्रव देणारी जी मक्षिकांची परंपरा तिचें (दृश्+उपद्रवद+मशक+ततीचें=नयन+इजा देणाऱ्या+चिलटें+पंक्तीचें.) १९. वाटोळें करणें=नाश करणें, खर्च करून कांहीं नाहीं असें करणें.

करुनि समाधान असें, गेला तीचा [1]निरोप घेऊन, ।
[2]श्रितताप हरि [3]हरि, न पर, तापहरहि [4]आतपत्र घेऊन. ॥ ७०

अध्याय सातवा.

[5]पांडववृत्तश्रवणें धृतराष्ट्र उदंड काळजी वाहे, ।
कीं दुखविले [6]भुजगसे निश्चित होतील काळ जीवा हे. ॥ १
शकुनि सकर्ण म्हणे, 'कुरुराया! संप्रति [7]धनेश तुज लाजे, ।
झाले [8]भणग, मदानें हांसत होते सभेंत तुजला जे. ॥ २
[9]स्वश्री दाउनि द्याया [10]दायादां दुःख, [11]काननां चाला, ।
[12]लाजतिल [13]वाक्शिखीच्या [14]हृतपक्षमयूर [15]कां न [16]नाचाला?' ॥ ३
[17]राजा म्हणे, 'म्हणेलचि '[18]पांडववत्सल [19]सबंधु [20]जनक 'नका.' ।
आम्हां, प्राणांशि, न बहु जपतो तो अंध, बंधु[21]जनकनका.' ॥ ४
कर्ण म्हणे, 'हूं, हें किति? घोष[22]परामर्शमिष पुढें कर, गा! ।
मज मंत्र[23]दासि, देउनि [24]पीतजयसुधेकरूनि [25]ढेंकरें, [26]गा.' ॥ ५
त्याचि मिषें आज्ञेला [27]पुसती जों, नृप करी नकारा तों, ।
स्पष्ट म्हणे, 'बालिश हो! [28]मरणप्रदकुमतिशीं नका [29]रतों. ॥ ६

---

१. जाण्याची आज्ञा. २. आश्रितजनांचें दुःख. ३. हरण करी. ४. छत्र. ५. या अध्यायांत मूळांतील २३६-२५७ इतक्या अध्यायांचा समावेश पंतांनीं केला आहे, यावरुन त्यांची वर्णनसंकोचाविषयींची आवड व्यक्त होते. या अध्यायांत घोषयात्रापर्वास आरंभ होतो. ६. सर्पासारखे. ७. कुबेर. ८. भिकारी. ९. आपली राज्यलक्ष्मी. १०. पांडवांना. (दायाद=वांटा घेणारा.) ११. वनाप्रत. १२. हें अर्ध सुभाषितरूप आहे. १३. सरस्वतीच्या मोराच्या. १४. पक्षरहित मयूर. १५. कां. १६. आपली संपत्ति दायादांस (पांडवांस) दाखवून दुःख देण्याकरितां वनास जाऊं या, सरस्वतीच्या बसण्याच्या मयूराच्या (शिखीच्या) नाचाला पाहून ज्यांचे पंख उपटले आहेत असे इतर मोर कां न लाजतील? पांडवांची संपत्ति आम्ही घेतली, आतां आमची संपत्ति पाहून ते खचीत लाजतील—असें तात्पर्य. १७. दुर्योधन. १८. पांडवांविषयीं कनवाळु. १९. बंधु विदुर यासह. २०. धृतराष्ट्र. २१. पंडुराजाचें द्रव्य (कनक) जे पांडव त्यास. २२. गाईचा समाचार हें निमित्त, गवळवाड्याच्या समाचाराचें निमित्त. (घोष=गाईच्या राहण्याची जागा, गोव्रज.) घोषयात्रापदेश करून. २३. मंत्र (मसलत) देणाराला. २४. प्यालेली जयरूप सुधा (अमृत) तेणेंकरून. (अध्याय २३८ श्लोक १८-२० पहा.) २५. ढेंकर देणें=दुसऱ्याचा पैसा खाऊन जिरविणें. २६. गायन कर. स्तवन कर. २७. कर्ण शकुनि इत्यादि. २८. मृत्युदायक अशा दुष्ट बुद्धीशीं. २९. रतूं, आसक्त होऊं, रमूं.

द्वैतवनाश्रय करुनि छळिले ते **पांडुपुत्र** आहेत, ।
त्यांला पुन्हा छळावें आहे तुमच्या मनांत हा हेतें[1]. ॥ ७

दिसतो **भीमधनंजयकृष्णा**क्षोभें [2]सुयोधनाश मला, ।
म्हणतों वनप्रवेशें दहनापरि या **सुयोधना** [3]शमला.' ॥ ८

शकुनि [4]म्हणे, 'गाईतें पाहूं, मृगया वनीं करूं, परतूं, ।
धर्मांकडे न जाऊं, व्यर्थ भिसी, धैर्यनिधि [5]सुधी ! [6]पर तूं. ॥ ९

धर्मज्ञ **धर्म** जपतो [7]कृतसमया, असति वश तया भ्राते ? ।
कां विटवितील आज्ञा लंघुनि चातक तसे [9]दयाभ्रा ते ? ॥ १०

दायादांचें दर्शन घ्यावें काशास ? ताप साधाया ? ।
'[10]वल्किजटिदर्शनेच्छा तरि पाहूं साधुतापसा [11]धाया.' ॥ ११

'[12]अंधमतिकुमारीच्या ते मोहिति [13]बोलनग मनाला [14]हो ! ।
अनुमोदन देइल कां प्रेमाचा [15]डोल न गमनाला हो ? ॥ १२

शिरला [16]सदार [17]सानुज [18]सशकुनि [19]**सांगेश** [20]तो [21]सकटक वनीं, ।
दुखवावया शिरे, खळ जैसा निजदुर्गुणांसकट [22]कवनीं. ॥ १३

[23]घोषीं **सुयोधन** वसे [24]हरिसा, परि [25]साच मुग्ध, न वनीं [26]तें ।
यश संपादी, केवळ नाशी सेवूनि [27]दुग्धनवनीतें. ॥ १४

---

१. हेतु. २. उत्तम वीरांचा नाश. ३. पाप्याला. भीम, अर्जुन व द्रौपदी यांच्या क्रोधानें मोठमोठ्या वीरांचा नाश ओढवला आहे असें मला दिसतें, यास्तव मी (धृतराष्ट्र) पापी जो दुर्योधन त्याला वीरांच्या नाशाविषयीं दहनापरी मानतों. वनांत प्रवेश केल्यानें जे वीर मरणार त्यास कारण दुर्योधन, तेव्हां तो अग्नीप्रमाणें संहारक अथवा जाळणारा आहे असें मी म्हणतों--अर्थे तात्पर्य. ४. अध्याय २३९ श्लोक १८-२१ पहा. ५. ज्ञानी. ६. शत्रूला. ७. केलेल्या प्रतिज्ञेला. ८. दुःखित करतील, असंतुष्ट करतील, राग येईसें करतील. ९. दयारूप मेघाला. (अभ्र=मेघ.) १०. वल्कलें धारण करणारे व जटिल (जटाधर) अशांच्या दर्शनाची इच्छा. ११. तृप्त होण्यास. १२. धृतराष्ट्राची मति (बुद्धि) हीच कुमारी तिच्या मनाला. १३. बोलरूप अलंकार. १४. अहो. १५. कल. १६. स्त्रीसहित. १७. बंधुसहित. १८. शकुनीसह. १९. कर्णासहित. (अंग+ईश=अंग देशाचा राजा=कर्ण.) २०. दुर्योधन. २१. सैन्यासहित. २२. या अर्धावरून मोरोपंताच्या वेळीं त्याच्या कवितेला फारसा मान नसून दुष्ट जनांकडून तिचा उपहास होत असे, असा ध्वन्यर्थ दिसतो. पंतांनीं ही निंदकांची गोष्ट स्वानुभवावरूनच कदाचित् येथें नमूद केली असावी. २३. गवळ्यांचें घर किंवा त्यांचा गांव त्यांत. २४. कृष्णासारखा. २५. पण खरोखरच मूर्ख. २६ गोकुळांत जें कृष्णानें मिळविलें तें (यश). २७. दूध आणि लोणी.

[1]कुरुपति [2]अनुगांसि म्हणे, 'मृगयाक्रीडा वनीं भली केली, ।
त्या [3]द्वैतवनाख्यसरीं [4]स्वप्रमदांसह चला करूं [5]केली.' ॥ १५
पूर्वींच तेथ येउनि [6]गंधर्वाधीश चित्रसेन [7]रते; ।
[8]दुर्योधनप्रहित जे झाले पाहोनि [9]चित्रसे नर ते. ॥ १६
गंधर्वांसि म्हणति नर, 'येताहे [10]मनुजदेव शूर [11]सरा, ।
हें द्वैतवनस्थान त्यागुनि आतांचि सर्व दूर सरा.' ॥ १७
[12]खेचरें म्हणति, 'कुमति हो! सिंहीचें [13]काय रे करील [14]शुनी? ।
[15]मृगमदपरिभवकर गुण नायकिला लेशमात्रही [16]लशुनीं. ॥ १८
गंधर्वराज करितो [17]जलकेलि, निघा, पळाचि, [18]पामर हो! ।
नातरि मराल, तुमचा पति तो हो [19]सनरकोटि सामर हो.' ॥ १९
तें ऐकुनि [20]भूप म्हणे [21]स्वभटांतें, 'शीघ्र सोडवा [22]सरें, हो! ।
पळवा गंधर्वांतें, हा स्वजयेंकरुनि गोड [23]वासर [24]हो.' ॥ २०
[25]कुरुपतिभट म्हणति, 'अरे! सोडा, गंधर्व हो! सरोवर तें, ।
आम्हांपासुनि [26]खेचरबळ [27]कुंठितगति नहो, सरो वरतें.' ॥ २१
करितां मदें [28]अतिक्रम, कळवुनि त्यांची [29]स्वकुळवरा करणी, ।
गंधर्वांनीं वधिले द्वैतवनानिकट बहु [30]वराक रणीं. ॥ २२
निज [31]कटक [32]भग्न पाहुनि कर्णें प्रकटूनियां [33]प्रभावातें, ।
गंधर्वांची हरिली दीपाची ज्यापरि [34]प्रभा [35]वातें. ॥ २३

---

१. दुर्योधन. २. सेवकांस. ३. द्वैतवननामक सरोवरांत. ४. स्वकीय तरुण स्त्रियांसहित. ५. क्रीडा. (अध्याय २४० श्लोक १८ पहा.) ६. गंधर्वांचा राजा. ७. आपल्या प्रमदांसह क्रीडासक्त होता. ८. दुर्योधनानें पाठविलेले सेवक. ९. चित्रासारखे स्तब्ध. १०. मनुष्यांचा राजा. (दुर्योधन.) ११. सरोवराप्रत. १२. गंधर्व. १३. हा पाद सुभाषितरूप आहे. १४. कुत्री. १५. कस्तूरीचा पराभव करणारा. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १६. लसुणीमध्यें. १७. जलक्रीडा. १८. क्षुद्र नीच जन हो. १९. तुमचा सनरकोटि पति सामर हो. तुमच्या कोटि मनुष्यांसहित राजा सामर (देवसहित) होवो. तुमचा राजा आपल्या सैन्यासह मरण पावेल—असा भावार्थ. २०. दुर्योधन. २१. आपल्या वीरांना. २२. सरोवर. २३. दिवस. २४. होवो. २५. दुर्योधनाचे योद्धे. २६. गंधर्वांचें सैन्य. २७. ज्याची गति बंद झाली असें. २८. मर्यादेचें उल्लंघन. २९. स्वज्ञातिश्रेष्ठा चित्रसेनास. ३०. कवडीसारखे तुच्छ कौरव भट. ३१. सैन्य. ३२. पराभूत, मोड झालेलें. ३३. पराक्रमातें. ३४. तेज, कांति. ३५. वाऱ्यानें.

त्याशि भट[1] म्हणति, 'विजयश्रीचा अतुलप्रभाव[2] नवरा हा, ।
याचि प्रभा[3] परा[4], जशि यज्ञवराहप्रभा[5] वनवराहा.' ॥ २४
त्या[6] चित्रसेन भेटे जैसा भगवान् अगस्त्य सिंधुरसा[7], ।
होउनि विरथ[8] पळाला, सिंहपरित्रस्तचित्त सिंधुरसा[9]. ॥ २५
कर्णपरिभवांत[10] असा झाला असतां सुयोधनाश[11] रण, ।
होउनि विकळ[12] म्हणति भट[13], 'आम्हांला हो सुयोधना! शरण.' ॥ २६
कलिपुरुष[14] चित्रसेनावरि धाउनि जाय आशु[15], न कदापी ।
खळ भी, हरिशि[16] पिसाळे जो, तो पसरूनि आ शुनक[17] दापी[18]. ॥ २७
जयहेतु[19] काय होइल अहिला[20] बळयत्नकोटि[21] केकिरणीं[22]? ।
मिरवे प्रकाश तिमिरीं[23] खद्योताचा[24], न तो टिके किरणीं[25]. ॥ २८
करुनि विरथ दुर्योधन[26] धरिला जैसा भुजंग खगपानें[27], ।

---

१. योद्धे. २. अनुपम प्रभाव (पराक्रम) ज्याचा असा. ३. कांति. ४. शत्रूला. ५. विष्णूच्या दहा अवतारांपैकीं तिसऱ्या अवतारास 'यज्ञवराह' अथवा 'आदिवराह' असें नांव आहे. याचें मुख डुकराचें (वराहाचें) आणि देह मनुष्यासारखा असें वर्णन आहे. हिरण्याक्ष दैत्याच्या पीडेनें प्राणिमात्रांस त्रास होऊन पृथ्वी बुडूं लागली, तेव्हां विष्णूनें वराहावतार घेऊन दैत्यांस मारून आपल्या दंताग्रानें पृथ्वीस उचलून धरलें अशी कथा आहे. यज्ञवराहाच्या तेजापुढें रानडुकराचें तेज काय पडणार आहे—नाहीं पडणार हें उघड आहे. ६. कर्णाला. ७. समुद्रोदकास. ८. दुर्योधनाचे वीर पळून गेल्यावर कर्ण एकटाच रणांत उभा होता. गंधर्वांनीं त्याचा सारथी मारून त्याच्या रथाचे तुकडे तुकडे करून टाकिले. (अध्याय २४१ श्लोक ३०-३२ पहा.) ९. गजासारिखा. (सिंधुर= हत्ती.) १०. कर्णाचा परिभव (पराभव) हाच आहे अंत (शेवट) ज्याचा असा (रण.) ११. उत्तम वीरांचा नाश ज्यांत असा (रण). १२. व्याकुळ, व्यथित. १३. त्राता. १४. कलीचा अंशावतार असा दुर्योधन. १५. लौकर. १६. सिंहाला, जो शुनक पिसाळे तो आ पसरूनि हरिशि दापी—असा अन्वय. १७. कुत्रा. १८. दटावी, भेडसावी. हा पद्यांश सुभाषितरूप आहे. १९. जय करण्यास कारण. २०. सर्पाला. २१. सैन्याचे कोटिशः प्रयत्न. २२. मयूराशीं युद्ध करण्यांत. (मयूर हे सापांचे वैरी होत या गोष्टीकडे येथें लक्ष्य आहे. मोर सापांना भक्षण करतात म्हणून त्यांस 'भुजंगभुक्' म्हणजे 'साप खाणारे' असें नांव अमरकोशांत आहे.) २३. अंधारांत. २४. काजव्याचा. २५. सूर्यकिरणांत. ही गीति सुभाषितरूप आहे. २६. अध्याय २४२ श्लोक ६-८ पहा. २७. गरुडानें. खगपानें (गरुडानें) भुजंग जसा धरावा तसा चित्रसेनानें विरथ करून दुर्योधन धरला, कारण (कवि अर्थान्तरन्यासोक्तिद्वारा म्हणतात.) गुर्वतिक्रम म्हणजे थोरांची अमर्यादा करणें हें लघुहित (अल्पहितप्रद ही) नाहीं, (अथवा हलक्या लोकांस हितकर होत नाहीं.) येथें थोर जो चित्रसेन त्याचा अतिक्रम केल्यामुळें लघु जो दुर्योधन त्याला हित झालें नाहीं, पण धरला गेला. यास दृष्टांत (पर्वतभक्षणानें) नगपानें वदन न फाटेल काय? काक्वर्थ—फाटेल. तात्पर्य, लहान तोंडीं मोठा घांस बरा काय?

लघुहित[1] न गुर्वतिक्रम[2], वदन न फाटेल काय नगपानें[3] ? ॥ २९
सानुज[4] सदार[5] दुर्जन दुर्योधन खेचरेश्वरें[6] धरिला, ।
जाणों[7] क्षितिहृदयींचा साक्षात् कांटाचि तो समुद्धरिला[9]. ॥ ३०
दुर्योधनासि जिंकुनि नेतां[8] बांधोनि आपुल्या अयनें[10], ।
धर्मासि शरण गेले सचिव[11] भरुनि अश्रुच्या भरें नयनें. ॥ ३१
ते वृत्त कथुनि म्हणती, 'तव संदर्शनसुखोदया[12] भ्राते ।
पावोत, सोडवावे बंधापासुनि तुवां दयाभ्रा[13] ! ते.' ॥ ३२
भीम म्हणे[14], 'खलमत[15] हें आम्हां श्री दाखवूनि गांजावें, ।
त्या हितकरसुहृदांसीं[16] आम्हीं भांडावयासि कां जावें ?' ॥ ३३
धर्म म्हणे, 'रे भीमा ! शरणागत[17] रिपुहि रक्ष्य[18] सन्महित[19], ।
बा ! जरि घडेल भीतांभयदान[20] जगीं तरींच जन्महित. ॥ ३४
न सहावा अन्यकृतज्ञातिपराभव[21] बुधें, उठा, रचितो ।
जन्मुनि सुयशासि न जो, जननीयौवनवनीं[22] कुठारचि[23] तो. ॥ ३५
आरंभिता न मख[24] तरि जाता, हों[25] पळहि राय न रहाता, ।
सुयशोमृतासि[26] पसरिति अमर[27], न पसरील काय नर हाता ?' ॥ ३६

---

१. अल्पहितप्रद. २. थेरांचा अपमान करणें. ३. पर्वतभक्षणानें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ४. धाकट्या भावांसह (दुःशासन-दुर्मुख-दुर्जय इत्यादि). ५. बायकांसह. ६. चित्रसेन गंधर्वानें. ७. हें उत्प्रेक्षा नामक अलंकाराचें उदाहरण आहे. यांत दुर्योधनाच्या ठायीं पृथ्वीच्या हृदयांतील कांट्याची संभावना केली आहे ह्मणजे उपमेयावर जाणो हें उपमानच आहे अशी संभावना केली आहे. ८. चित्रसेनानें नेतां-असा संबंध. ९. मूलासह उपटून काढिला. १०. मार्गें. (आकाशमार्गें-असा भाव). ११. प्रधान (दुर्योधनाचे). १२. तुझ्या दर्शनानें होणाऱ्या सुखाच्या उदयास. १३. कृपाघना. (धर्मा.) १४. अध्याय २४२. श्लोक १५-२१ पहा. १५. दुष्टांचा विचार. १६. कल्याण करणाऱ्या मित्रांशीं. (गंधर्वांशीं.) १७. शरण आलेला. (अध्याय २४३. श्लोक १२ पहा.) १८. रक्षण्यास योग्य. १९. साधूंस पूज्य, स्तुत्य. २०. भ्यालेल्या जनास अभय देणें. २१. परकीयांनीं केलेला स्वजातीचा मोड. २१. मातेच्या तारुण्यरूप वनांत. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २३. कुऱ्हाडचि. २४. यज्ञ. (अध्याय २४३ श्लोक १५ पहा.) २५. मी. (धर्म.) २६. उत्तम कीर्तिरूप अमृतासाठीं. २७. देव. मी (धर्मराय) जर यज्ञ आरंभिला नसता तर दुर्योधनबंधनवार्ता ऐकून पळभर देखील स्वस्थ राहिलों नसतों, त्यास जाऊन सोडविलें असतें, कारण देव देखील सत्कीर्तिरूप अमृतासाठीं हात पसरतात, मग मनुष्य त्या यशोमृतासाठीं हात कां पसरणार नाहीं ? अवश्य पसरीलच. यज्ञ करणाऱ्यास नियत प्रदेशाबाहेर जातां येत नाहीं म्हणून धर्म स्वतः जाण्यास असमर्थ होता. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे.

चौघेहि म्हणति, 'तुमचे घेउनि येतोंचि ते असुज्ञाती,'।
सुज्ञासि गुर्वनुज्ञा कामदुघा बहु मता असुज्ञा ती. ॥ ३७

होउनि सज्ज कुरुरथारूढ तयां गांठिती महाबळ ते, ।
खेचर फिरले, नसते, मरणार, भिऊनि तरि न कां पळते? ॥ ३८

गंधर्वांसि म्हणति, 'रे! दुर्योधन बंधु आमुचा सोडा, ।
ऐशी श्रीधर्माज्ञा, स्वमुखें 'चुकलों' म्हणोनि कर जोडा.' ॥ ३९

गंधर्व म्हणति, 'जो खळबळजळधीतें महातपा प्याला, ।
आम्हां मता तदाज्ञा, नातरि शिवता न हात पाप्याला. ॥ ४०

प्रास सुधाहि अव्हेरुनि जीस सदा पसरितात आ ज्ञाते, ।
आम्हीं नरदेवाज्ञा कांजी प्यावी? त्यजूनि आज्ञा ते.' ॥ ४१

ऐसें निष्ठुर वदले कीं खळमथनांत लेश अनय नसे, ।
झाले होतेहि विजयजमदें सनयन असोनि अनयनसे. ॥ ४२

'कां मरतां? सोडा रे! सोडा, गंधर्व हो!' म्हणति चवघे; ।
त्यांवरि खवळोनि खचर खरतरशरनिकर सोडिती अवघे. ॥ ४३

---

१. भीम अर्जुन नकुल सहदेव. २. प्राणरूप ज्ञाती, दुर्योधनादिक बांधव. ३. गुरुची आज्ञा. ४. इच्छित देणारी. (कामधेनु.) ५. [यद्यपि आम्हास तुझें म्हणणें—दुर्योधनास सोडवा—हें रुचत नाहीं तथापि] सुज्ञ लोकांस गुरुची आज्ञा—मग ती असुज्ञा (वेडगळ—अविचाराची) असो तरी मान्य होय व ती कामधेनूसारखी त्यांस वाटते. ६. कौरवांच्या (दुर्योधनादिकांच्या) रथांवर आरोहण केलेले. ७. त्या गंधर्वांला. ८. खेचर (गंधर्व) भिऊनि (भय पावून) मरणार [होते] तरि (तर) कां न पळते? (कां पळाले नसते?) [आणि मरणार होते तर ते] फिरले नसते—असा अन्वय. गंधर्व शूर होते म्हणून मरणास भिऊन पळाले नाहींत इतकेंच नव्हे, तर ते मागें परतले आणि लढाईत सिद्ध झाले—असें तात्पर्य दिसतें. ९. अध्याय २४४ श्लोक १२ पहा. १०. खळांचें बळ (दुष्टांचें सैन्य) हाच जलधि (समुद्र) त्यातें. ११. महातपस्वी (चित्रसेनरूप अगस्त्य). (अध्याय २४४ श्लोक १३-१४ यांत गंधर्वांचा स्वामी 'सुरेश्वर' असें वर्णन आहे, त्याजवरून महातपा म्हणजे इंद्र असाही अर्थ येथें ग्राह्य दिसतो.) १२. गंधर्व म्हणतात:—जो महातपा [आमचा यजमान चित्रसेन गंधर्व अगस्त्यमुनीप्रमाणें] खळबळजळधीतें (दुष्टदुर्योधनाच्या सैन्यसागरास) प्याला (नाश करिता झाला, सैन्याचा पराभव करिता झाला) त्याची आज्ञा आम्हास मान्य आहे म्हणून त्याच्या आज्ञेनें आम्ही या दुर्योधनास धरिलें. नातरि (त्याची आज्ञा नसती तर) या पाप्याला (दुर्योधनाला) आमचा हात शिवलाही नसता. १३. मान्य. १४. ज्या (चित्रसेनाच्या) आज्ञेस १५. धर्माची आज्ञा हीच कांजी (पेज). १६. दुष्टांचें शासन करण्यांत. १७. जयापासून प्राप्त जो मद त्यानें. १८. नेत्रसहित, डोळस. १९. अंध असे. २०. गंधर्व, खेचर=खचर. २१. अतितीव्र शरांचा समूह.

त्या [1]हरिचे आश्रित [2]ते, या [3]हरिचे [4]प्रबळ दास हे तिपंट, ।
झांकिति न त्यांशिं, त्याही [5]खेचरा [6]त्यांचे विशाळ [7]हेतिपंट. ॥ ४४
गर्वें [8]हरिशीं [9]भिडतां कां होतिल शुद्ध चित्रसे न [10]करी ? ।
[11]जिष्णुपुढें तशि खेचरगति होतां, युद्ध चित्रसेन करी. ॥ ४५
[12]तच्छस्त्रास्त्रैकार्णवमध्यंगत तो [13]महाकिरी टिकला, ।
[14]अपराजिता शिवासीं समरीं [15]विजयावहा [16]किरीटिकला. ॥ ४६
अन्यत्र नवल परि त्या पांडुकुमारीं नव्हे नवल यश तें; ।
[17]हरिहरदासपरिभवक्षम न सकळ देव दानव [18]लयशतें. ॥ ४७
[19]तो भेटोनि म्हणे, 'कां झालासि खळा सुयोधना [20]शरण ? ।
केला [21]शक्राज्ञस्वहितकरामितसुयोधनाश रण. ॥ ४८
हें काय बरें सुज्ञा ? जो दारुण [22]दंशकाम साप सदा, ।
[23]तन्मथन अनिष्ट ? अभय द्यावें त्या [24]सर्वतामसापसदा ? ॥ ४९
अर्जुन म्हणे, '[25]सख्या ! मज अकृतज्ञ असें म्हणो नको, पावें, ।
ऐसें [26]अजातरिपुवरि [27]अहितहितनिरत म्हणोन कोपावें. ॥ ५०

---

१. इंद्राचे. २. गंधर्व. ३. कृष्णाचे. ४. भीमार्जुनादि. ५. सूर्यास. ६. त्या कृष्णदास पांडवांचे. ७. शस्त्ररूप वस्त्रें. ८. सिंहाशीं. ९. युद्ध करतां. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १० हत्ती. ११. अर्जुनापुढें. १२. तत्+शस्त्र+अस्त्र+एक+अर्णव+मध्यंगत=त्या चित्रसेनाच्या शस्त्रास्त्ररूप महासागराच्या मध्याप्रत गेलेला. १३. आदिवराह. ज्या प्रमाणें प्रलयकालीन समुद्रांत महाकिरी (आदिवराह–विष्णु) टिकला (तगला–स्वस्थ होता), त्या प्रमाणें चित्रसेनानें सोडलेल्या शस्त्रास्त्ररूप सागरांत अर्जुन मात्र टिकला; कां तर, शिवांच्या युद्धांत ही किरीटिकला (अर्जुनाची युद्धकला) पराभव न पावतां जयावह झाली. ज्यानें शिवासीं युद्ध करून जय मिळविला, तो गंधर्वाला भिणार काय ? १४. पराभव न पावलेली. १५. यशस्वी, जयदात्री. १६. अर्जुनाची कुशलता. १७. कृष्ण व शंकर यांच्या दासाचा पराभव करण्यास समर्थ. १८. कल्पशतें. १९. चित्रसेन. २०. रक्षिता, त्राता. ['शरणं गृहरक्षित्रोर्वधरक्षणयोरपि' इति मेदिनी.] २१. इंद्रानें सांगितलेला असा (रणं) आणि आपलें हित करणाऱ्या बहुत उत्तम योद्धयांचा आहे नाश ज्यामध्यें असा (रण). २२. दंशाची इच्छा ज्यास तो. २३. त्या सापाचा नाश. २४. सकल तमोगुणी जनांत अधम (अपसद) अशा दुर्योधनातें. २५. चित्रसेना. २६. अजात (न झालेला) आहे रिपु (शत्रु) ज्याला तो (धर्मराज). त्याजवर. २७. अहित करणारे जे दुर्जन त्यांच्या हिताविषयीं तत्पर.

जेंवि शरणागताच्या त्यागा, प्राणाचिया न, शिबि[1] भ्याला, ।
सन्मति[2] अपवादा भी, करणीच्या[3]हि न वधू तशि बिभ्याला[4]. ॥ ९१
सोशील मृत्यु, परि गुरु शरणागतताप पळ न सोशील, ।
तारिल सकलांसहि त्या, बा! तें क्षणमात्र चळ नसो शील.' ॥ ९२
खेचरसिंह वदे कुरुसिंहाला[5], 'उचित भाग हरिला[6] जो, ।
या कर्में तुज मुक्ताकवळ[7] उगळितां[8] हठींद्र[9] हरि[10] लाजो.' ॥ ९३
तो खेचरनाथ म्हणे, 'कुरुवंशीं धन्य तो अजातारी[11], ।
खळरक्षकां तुम्हां प्रभु बहु बहु मानील, जो[12] गजा तारी. ॥ ९४
धन्य तुम्ही गुर्वर्पितवाक्चेतःकाय[13] कीर्तिलोभरत[14], ।
आठविला मज आद्यें कविनें[15] जो काय कीर्तिला[16] भरत[17].' ॥ ९५
भेटुनि वर्णुनि धर्मा, गंधर्वश्रेष्ठ जाय नाकाला[18], ।
खळ[19] बहु लाजे, जाणों तो न यशा ने हरूनि, नाकाला[20]. ॥ ९६
मृत गंधर्व उठविले शक्रें तत्काळ अमृतसेकानें[21] ।
स्वमरणकथेसि ऐकति सुप्तोत्थित[22] सत्य अमृतसे[23] कानें. ॥ ९७

---

१. शिबि—याचें नांव उशीनर असें होतें. याच्या सत्वाची परीक्षा करण्यासाठीं इंद्रानें श्येनाचें रूप घेतलें आणि अग्नीनें कपोताचें रूप घेतलें, आणि ते दोघे शिबीच्या यज्ञसभेंत आले. कपोत भयाभीत होऊन राजाच्या आश्रयानें लपून राहिला. इतक्यांत त्यास मारण्याच्या मिषानें श्येनही त्याच्याजवळ आला. 'मी क्षुधेनें पीडित झालों आहे, तेव्हां माझा भक्ष्य कपोत मला दे, त्याला आश्रय देऊन तूं अधर्म करूं नको' असें श्येन म्हणूं लागला, तेव्हां राजानें त्यास मृगवराहवृषभमहिषांचें मांस देण्याचें कबूल केलें. पण तें श्येनास आवडलें नाहीं. नंतर कपोताचे भारंभार आपल्या शरीराचें मांस कापून देतों असें उशीनरानें उत्तर केलें. तें श्येनास पसंत पडलें. तुलेमध्यें कपोतास एका बाजूस घालून राजानें आपलें मांस दुसऱ्या बाजूस घातलें, परंतु तें कमी भरलें म्हणून पुनः आपलें मांस घातलें, तरी तराजूंत कपोत जडच येऊं लागला, कपोताचे भारंभार मांस होईना, म्हणून राजा आपण स्वतः पारड्यांत बसला. तें पाहून संतुष्ट होऊन उभयतां इंद्र आणि अग्नि आपलीं रूपें प्रकट करून राजास वर देऊन निघून गेले. (वनपर्व—अध्याय १३०-१३१-१९७-१९८). २. साधूंची बुद्धि. ही गीति सुभाषितरूप आहे. ३. चेटकाच्या, जादूच्या. ४. बिब्याच्या रेघेला. ५. अर्जुनाला. ६. हरण केलास. ७. मोत्यांचा घांस. हत्तीच्या गंडस्थळांस फोडून त्यांतून सिंह मोत्यें काढून घेतो—अशी प्राचीन लौकिक समजूत आहे. ८. न ओकतां. ९. महाआग्रही. १०. सिंह. ११. अजातशत्रु (धर्म). १२. गजेंद्रास तारणारा. (विष्णु.) १३. गुरूला अर्पिलीं वाचा चेतः (मन) काय (देह) ज्यांनीं ते. १४. कीर्तिलाभाविषयीं आसक्त. १५. वाल्मिकानें. १६. कथिला. १७. रामभ्राता. १८. स्वर्गाला. १९. दुर्योधन. २०. नासिकेला. येथें उत्प्रेक्षानामक अलंकार आहे. २१. अमृत शिंपून. २२. आधीं निजून मग उठलेले. २३. न मेले असे.

धर्में सदार सानुज बंधु हित कथुनि पुराशि[1] पाठविला; ।
आठविला तत्परिभवखेदचि, न तदीय दोष आठविला. ॥ ५८
मार्गी भेटोनि म्हणे[3] कर्ण, 'सख्या! धन्य तूं महातेजा, ।
मज पळविलें जिहीं ते शत्रु न झाले रणीं सहाते ज्यां. ॥ ५९
खेचरनाथपरिभवें[4] तुजला सुरपाळ[5] कां न कांपावे? ।
चापश्रुति[6] जगदंबा समयीं प्रियबाळकां न कां पावे.'[7] ॥ ६०
दुर्योधन त्यासि म्हणे, 'काय सख्या! वर्णितोशि, कर्णा! तें ।
निज वृत्त काय सांगों? होइल अति तापदायि[8] कर्णातें[9]. ॥ ६१
अरिनें केलें मजला विरथ करुनि सानुजासि बद्ध रणीं, ।
सोडविलें धर्मानें, तें झालें दुःख बहु, न मद्धरणीं[10]. ॥ ६२
अस्मन्मंत्रित[11] कथिलें गंधर्वेंद्रें युधिष्ठिरासि खरें, ।
तेव्हां खचोनि पडलीं मजवरि दुःखाद्रिचीं महाशिखरें. ॥ ६३
प्राणाकडे न पाहुनि म्यां केला धरुनि मृत्युकाम रण, ।
कर्णा! आलें नाहीं मज तच्छस्त्रेंकरूनि कां मरण? ॥ ६४
वदलों शतदा मी कीं घे पोटीं भूमिदेवि! वर दे हा. ।
विश्वंभरा[12] क्ष्मा[13] परि न शिराया भूमि दे विवरें[14] देहा. ॥ ६५
बुडविति तापविती श्रुतमात्रा[15] सहसाचि दुर्दशा न तयां, ।
मद्दुःख बहु, न झाला पात्र समरनिहत[17] तो दशानन[18] या. ॥ ६६
प्रायोपवेश[19] करितों, दावूं काय त्रपावहास्याला[20]? ।
पाव मला, मरणाज्ञा दे, लोकांच्या न पाव हास्याला. ॥ ६७
दुःशासना! धृति धरुनि अंधपितृहितप्रियार्थ[21] हो राजा, ।
अभिषिंचितों पुढें ये, निर्जगुर्वाज्ञाचि[22] होय होरा[23] ज्या.' ॥ ६८

---

१. हस्तिनापुराला. २. अध्याय २४७ श्लोक १०-१५ पहा. दुर्योधनाचें सांत्वन करण्यासाठीं कर्णानें हें भाषण केलें आहे. ३. तुला सुयोधनाला. ४. चित्रसेनाचा पराजय केल्यामुळें. ५. अष्ट दिक्पाल. ६. धनुर्वेद. ७. प्रसन्न होई. ८. तापदायक, दुःखप्रद. ९. कानातें. १०. माझ्या हरणीं. ११. आमची मसलत.(अध्याय २४९ श्लोक ३-६.) १२. विश्व पोसणारी म्हणजे जगाला पोसते, परंतु माझ्या देहाला तिच्यानें पोसवलें नाहीं—असा भाव. १३. पृथ्वी. १४. छिद्र. १५. अध्याय २४९ श्लोक ५ पहा. १६. नद्या. १७. युद्धांत मारलेला. १८. रावण. १९. मरणाच्या संकल्पानें उपोषण. २०. लाजिरवाण्या मुखाला. (त्रपावह+आस्याला=लज्जाप्रद+मुखाला.) २१. अंध पित्यानें हित करणाऱ्या अशा प्रियार्थासाठीं. २२. दुर्योधनाची आज्ञाचि. २३. मुहूर्त.

'म्यां राज्यभर सहावा कैसा प्रियपुत्रशोकभर तातें[1] ? ।
गुरुदत्तराज्यभोगें संस्तविते काय लोक भरतातें[2].' ॥ ६९

ऐसें वदोनि झोंबे कंठीं **दुः**शासन स्वभावाच्या[3], ।
सर्वांसि दुःख होतें भाविवियोगें समस्वभावाच्या[4]. ॥ ७०

कर्ण म्हणे[5], 'बाळांसहि हें ऐसें झोंबणें गळां ठावें, ।
कां रडतां **भा**रत[6] हो ! न शिरोनि तुम्हीं तमीं गळांठावें[7]. ॥ ७१

प्रभुनें प्रजा, प्रजानीं प्रभु, रक्षावाचि संकटीं असुनी[8], ।
कां न जपावें तुज त्या **पां**डुसुतांनीं त्वदाश्रयीं असुनी ? ॥ ७२

पावे हरिहि[9] पराभव, मग अन्य न कां सुयोध नांडावा[10] ? ।
या अपयशें मळो पदनखरहि न तुझा **सु**योधना ! डावा.' ॥ ७३

शकुनिहि म्हणे[11] तयातें, 'यांत दिसे लेश न मज लाभाचा.' ।
प्रिय हित सत्यहि सांगे परि तद्वचनें[12] न समजला भाचा[13]. ॥ ७४

सुरजित[14] पातालग[15] दितिदनुसुत[16] निजहित[17]सुयोधनाश तदा ।
जाणुनि कृत्याहस्तें[18] नेउनि बोधिति **सु**योधना शतदा. ॥ ७५

असुर असें वदले कीं, 'होतां हें त्वच्छरीर[19] असुरहित[20], ।
राजा **सु**योधना ! मग कोण परें[21] प्रभु करील असुरहित[22] ? ॥ ७६

---

१. 'कैसा सहावा' याकडे 'तातें' याचा अन्वय आहे. २. कैकयीपुत्रातें. दशाननाचा आणि भरताचा दाखला मूळांत नाहीं. ३. दुर्योधनाच्या. ४. सारख्या स्वभावाच्या पुरुषांच्या होणाऱ्या वियोगानें. ५. अध्याय २४९ श्लोक ३६-४१ पहा. ६. अहो कौरव. ७. गळाठणें=गल्हाटणें=क्षीणत्व पावणें, चुकणें, सुचेनासें होणें, व्यवहारांत तोटा, बूड इत्यादि आल्यानें हीनधैर्य होणें. ८. प्राणांनीं. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. इंद्र देखील. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १०. पराभूत व्हावा, नागविला जावा. ११. अध्याय २५१ श्लोक १-१० पहा. १२. त्या शकुनीच्या भाषणानें. १३. दुर्योधन. यानें बांधवांच्या आणि मित्रांच्या बोधाचा अनादर करून अग्नीला देह समर्पण करण्याचा निश्चय केला. दुर्योधन प्रायोपवेशन करणार असें जाणून पातालनिवासी दैत्य दानव यांनीं जप करून होम यथाविधि केला. तेव्हां अग्नीपासून एक मोठी कृत्या (राक्षसी) उत्पन्न झाली. तिच्या करवीं त्यांनीं प्राणत्याग करणाऱ्या दुर्योधनास पाताळीं नेलें आणि तेथें त्यास उपदेश केला. (अध्याय २५१.) १४. देवांनीं जिंकिलेले. १५. पातालांत असणारे. १६. दैत्य आणि दानव. १७. आपलें हित करणाऱ्या वीरांचा नाश जाणून. १८. आसुरी उग्र देवता. आज्ञाकरी देवता=कृत्या. (नीलकंठ टीकाकार.) १९. तुझें शरीर. २०. प्राणरहित. २१. अन्य २२. असुरांचें (दैत्यदानवांचें) कल्याण.

सांवें[1] दिलाशि निर्मुनि पूर्वी आम्हांशि तूं तपस्तुष्टें[2], ।
कीं व्हावीं असुरकुळें बहु सेवुनि तव यशोमृतें पुष्टें. ॥ ७७
नाभ्यूर्ध्व[3] वज्रमय तव **जगदीशें** निर्मिला महाकाय[4], ।
पुष्पमय अधस्तन[5] **जगदंबेनें**, त्यजिशि हा असा काय? ॥ ७८
भगदत्तादि[6] तुज तुझ्या कार्याशि सहाय होतिल कराया, ।
अस्मत्पक्षश्रीच्या[7] भाळीं तूं भव्य हो तिलक[8] राया! ॥ ७९
भीष्मादिकांत अंशें राक्षसवीर प्रवेश करितील, ।
तेणें निर्दय होउनि ते स्वसुहृज्जीवनाशि[9] हरितील. ॥ ८०
नरकासुरहि[10] ससखयदुवरहननार्थी[11] शिरेल **कर्णांत**; ।
तोहि अरिबळीं[12] जैसा सिंधूच्या वाडवाग्नि[13] अर्णांत[14]. ॥ ८१
क्षत्रकुळीं **दितिजदनुज** बहु राक्षस जन्मले, अगा राया! ।
तुज ते सहाय होतिल, न उपेक्षीं भूतिच्या[15] अंगारा[16] यां[17]. ॥ ८२
सुरगति[18] **धर्म**, असुरगति तूं, यास्तव पसरिताति आ शेतें, ।
मेघा तुज, असुरकुळें जीवनलाभार्थ[19] धरुनि आशेतें. ॥ ८३

---

१. शिवानें. २. असुरांसह दुर्योधनानें शिवापाशीं तपस्या केली, तेव्हां त्यानें संतुष्ट होऊन त्याच्या शरीराचा पूर्वभाग वज्रासारखा दृढ व अधोभाग शस्त्रास्त्रांनीं अभेद्य होईल असा तुला वर दिला; तसेंच पार्वतीच्या वरानें दुर्योधनाचा देह रूपवान् आणि मनोहर झाला, इत्यादि कथा आहे. ३. नाभीवरचा. ४. मोठा देह. ५. कमरेखालचा. ६. भगदत्त हा भौमासुराचा (नरकासुराचा) पुत्र. हा गजयुद्धांत प्रवीण होता, यानें पांडवांच्या सैन्याची अनेकदां दाणादाण केली. हा मूळचा असुर असून क्षत्रियकुलोत्पन्न होय. भीष्म द्रोण कृप यांच्या शरीरांतही असुरांनीं प्रवेश केला होता. ७. आमच्या पक्षाच्या लक्ष्मीच्या. ८. टिका, टिकला. (येथें रूपापभ्रंश होतांना वर्णविपर्यय झाला आहे.) ९. आपल्या मित्रांच्या प्राणांला. १०. नरकासुर, याला कृष्णानें मारिलें म्हणून त्याचा द्वेष उगविण्यासाठीं तो कर्णांत शिरला. ११. मित्रासहित (अर्जुनासह) कृष्णाच्या घाताची इच्छा धरणारा. १२. शत्रुसैन्यांत. १३. वाडवाग्नि–समुद्रांत राहून जल शोषण करणारा अग्नि. याची कथा अशी—और्व नामक एक मोठा भार्गववंशोत्पन्न मुनि होता, त्यास असें कळलें कीं कार्तवीर्यकुलोत्पन्न राजांनीं भार्गवसंततीचा उच्छेद करून आपल्या कुलांतील स्त्रियांस द्रव्यनिमित्त बहुत पीडा दिली, तेव्हां यानें त्यांच्या नाशासाठीं तपःप्रभावानें भयंकर अग्नि उत्पन्न केला, त्यामुळें क्षत्रियांस फार त्रास झाला, तेव्हां ते और्वपितरांस शरण गेले. नंतर पितरांच्या आज्ञेवरून और्वानें आपला कोपानल समुद्रांत टाकिला. यासच 'वडवाग्नि, वडवानल' असें म्हणतात; कारण, याचें मुख वडवे(घोडी)सारखें आहे. १४. उदकांत. १५. संपत्तीच्या. १६. गृहास. १७. देहा. १८. देवाचें आश्रयस्थान. १९. जीवन=प्राण, उदक.

स्वसुतार्जुनहितकामें[1] याचकवेषासि वृत्रहा[2] धरिल, ।
करिल कपट वामनसा, कर्णाचीं कवचकुंडलें[3] हरिल. ॥ ८४
परि संशप्तक[4] समरीं करितिल हरिपुत्रघात[5] राक्षससे, ।
भीतील त्यांसि पांडव, सिंहाला जेंवि कातराक्ष[6] ससे.' ॥ ८५
ऐसें पाताळीं दितिदनुज[7] स्वमुखें रहस्य कळवूनी, ।
स्वस्थानीं पाठविती कृत्याहस्तें तयाशि वळवूनी. ॥ ८६
प्रकट न तें वृत्त[8] करी जाणों होईल त्या स्वनिधिला भें[9], ।
होय मनींच प्रमुदित[10] जैसा लुब्धांत लुब्ध[11] निधिलाभें[12]. ॥ ८७
प्रातःकाळीं रोदननमनार्जुनमारणप्रतिज्ञांनीं[13] ।
वळवी राधेय, जसा प्राणत्यागोद्यताप्रति[14] ज्ञानी. ॥ ८८
कर्णाशि[15] म्हणे, 'सखया! मित्रें[16]वांचुनि पडेन साधि[17] तमीं[18], ।
करितों त्वदुक्त[19], आलों त्वन्मंत्रेंचि स्वकार्य साधित मी.' ॥ ८९
जाय पुरा, दुर्योधन यश देउनि बंधुशकुनिकर्णातें, ।
वनवृत्त श्रुत झालें भीष्मद्रोणादिपूज्यकर्णा तें. ॥ ९०

१.आपला पुत्र अर्जुन याच्या हिताच्या इच्छेनें. २.इंद्र.३. हीं कवचकुंडलें कर्णास उपजत प्राप्त झालीं होतीं, तीं इंद्रानें विप्रवेषानें कर्णाकडे जाऊन मागून घेतलीं—अशी कथा आहे. ४.संशप्तक—पूर्वी शपथ घेतल्यामुळें युद्धास जो पराङ्मुख होत नाहीं तो, सत्यप्रतिज्ञ. 'ज्यानें मी युद्धांत अमुक योद्ध्यास मारीन, न मारीन तर ज्या गतीस पंचमहापातकी जातात ती गति मला होईल, अशी शपथ घेतली, त्याला हें नांव साधारण आहे. जो अशी शपथ घेणारा तो संशप्तक होय. भारती युद्धांत दुर्योधनाकडून अर्जुनासमागमें युद्ध करणारे दोन संशप्तक होते—एक त्रिगर्त राजाचे सुशर्मा, सुरथ, सुधनु, सुबाहु आणि सुधन्वा, असे पांच पुत्र, आणि सत्यवर्मा, सत्यरथ, सत्यव्रत, सत्येषु व सत्यकर्मा, हे पांच भिन्न भिन्न राजे. यांणीं अर्जुनास एका पाठीमागें एकानें युद्धास बोलाविलें, परंतु त्यानें या सर्वांसहि मारिलें.'(भारत—द्रोणपर्व—अध्याय १७ भा० प्रा० ऐ० कोष.)'सम्यक् शप्तमंगीकारो यस्य सः= संशप्तकः' असा याचा विग्रह आढळतो. ५. अर्जुनाचा (हरीच्या—इंद्राच्या—पुत्राचा) घात. ६. भयभीत नेत्र ज्यांचे ते. ७. दितीचे आणि दनूचे पुत्र=दैत्य आणि दानव. ८. असुरांचा रणोत्साहवर्धक बोध, पाताळीं कृत्येसह गमन आणि पुनरागमन इत्यादि वृत्त. ९. भीति. १०. आनंदयुक्त. ११. लुब्ध=लोभी, कृपण. १२.धन प्राप्त झाल्यानें. १३. रोदन, नमस्कार आणि अर्जुनास मारण्याची प्रतिज्ञा यांनीं. १४. प्राणत्यागाविषयीं उद्युक्त झालेल्यास. १५. दुर्योधन कर्णास म्हणतो. द्वितीया आणि चतुर्थी या विभक्तींच्या 'स'प्रत्ययाच्या ठायीं कवितेंत कधीं कधीं 'सि' 'शि' हे प्रत्यय आढळतात. १६.मित्र=सूर्य, स्नेही.१७.स+आधि=सचिंत, मनोव्यथायुक्त. १८. तम=अंधकार, दुःख. १९. तुझें वचन.

भीष्म [1]म्हणे, 'कथितों हित रिपुसहि, सांगेन कां न नातूतें ? ।
कां गेलासि ? [2]मदाज्ञा नसतां जायासि कानना तूतें. ॥ ९१
[3]स्वपरस्वरूप तुजला कळलें कीं, कां ? कसा [4]अजातारी ? ।
कर्ण कसा, पार्थ कसा, वत्सा ! [5]पंकांत गज गजा तारी. ॥ ९२
न [6]स्तुत्या धेनुपरिस जरि बहु दुध दे [7]अजा तरि पुराणा, ।
[8]सद्वदना कर्ण तसा स्तुत्य न, सोडुनि अजातरिपु राणा. ॥ ९३
हर्षे [9]कुलज [10]भेट तदा होय रणीं [11]बाणराजिलाभ [12]यदा ।
ती [13]सूतसुता झाली, जशि [14]पत्रिपदृष्टि [15]राजिला [16]भयदा. ॥ ९४
[17]याचें जो तेज हरी [18]त्याचें [19]फाल्गुन, म्हणोनि जे कवि ते ।
[20]कर्णखचरार्जुनां कां म्हणति न [21]खद्योत[22]रात्रिकर[23]रवि ते ? ॥ ९५
या कर्णे [24]उडुपें त्वां लंघाया [25]पांडवाब्धिला जावें, ।
हा बालिश हो ! न तुम्हीं या अविवेकेंकरूनि लाजावें. ॥ ९६
दे राज्य, संधि कर, [26]कर जोड, गुरु[27]युधिष्ठिराशि हो [28]नत रे ! ।
[29]नयसेतुपथाश्रय जो न करी [30]व्यसनार्णवांत तो न तरे.' ॥ ९७
जें [31]संमत भीष्मवचन पावे [32]दुर्मतिपुढें अनादर तें, ।
[33]गीचेंहि अनादरिजे [34]काय न गायन जडें [35]अनादरतें ? ॥ ९८
होती प्राप्त [36]ज्याच्या स्वीकारें [37]मंगळें [38]अवधिरहितें, ।

---

१. अध्याय २५३ श्लोक ४-१० पहा. २. माझी आज्ञा. ३. आपलें आणि शत्रूचें बलसामर्थ्यादिक रूप. ४. धर्मराज. ५. चिखलांत (संकटांत). ६. स्तवनास उचित. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ७. शेळी. ८. साधूच्या मुखाला. ९. उत्तम कुळांत झालेला. १०. वीर. ११. शरांच्या समूहाची प्राप्ति. १२. जेव्हां. १३. कर्णाला, सूताच्या (सारथ्याच्या) पुत्राला. १४. गरुडाची दृष्टि. १५. द्विमुख सर्पाला. (मालुंडाला, दुतोंड्याला.) १६. भय देणारी. १७. कर्णाचें. १८. गंधर्वपतीचें, चित्रसेनाचें. १९. अर्जुन. २०. कर्ण चित्रसेन आणि अर्जुन यांस अनुक्रमें. २१. काजवा. २२. चंद्र=रात्रिकर. २३. सूर्य. २४. कर्णरूप लहान नौकेनें. २५. पांडवरूप सागराला. हें रूपकालंकाराचें उदाहरण आहे. २६. हात. २७. युधिष्ठिर=युधि+स्थिर=युद्धामध्यें स्थिर रहाणारा असा धर्मराज. हें अलुक्समासाचें उदाहरण आहे. २८. नम्र. २९. जो नयरूप सेतूचा आश्रय न करील तो व्यसनरूप समुद्रांत न तरेल—असा भाव. ३०. व्यसनसागरांत. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ३१. साधूंस मान्य. ३२. दुष्टबुद्धि दुर्योधनापुढें. ३३. सरस्वतीचेंहि. ३४. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ३५. नादरत नव्हे अशा जडें. जो नादलुब्ध नाहीं अशा मूर्खानें. ३६. ज्या वचनाच्या. ३७. शुभप्रदसुखें. ३८. निरंतर. कवितेंत कधीं कधीं विशेषणांस त्यांच्या विशेष्यांची विभक्ति असते—या विधानाचें 'अवधिरहितें' हें उदाहरण आहे.

[1]कविशतसत्कृतकुळगुरुवचन न घे तो जरी [2]अबधिरहि तें. ॥ ९९
जाय उठोनि कुमति कीं [3]हा [4]राज्यानिष्टहेतु [5]म्हातारा, ।
न [6]वंदोनि वदे नातू, ‘बुडतां म्हणतिल न हे तुम्हा तारा.’ ॥ १००
कर्ण म्हणे, ‘**कुरुराया**! मजशीं [7]सुश्राव्य [8]शांतनव न वदे, ।
[9]कर्णासि ताप बहु कटुभाषी हा अप्रशांत नव नव दे. ॥ १०१
धिक्कारूं त्याशि कसें? गुरुधिक्कारेंकरूनि पाप डसे, ।
नाहींतरि म्यां ऐसे चुरिले असते धरूनि [10]पांपडसे. ॥ १०२
आहे **पांडुतनयकृतदिग्विजयाचें** [11]नृपा! [12]पडेप [13]यास, ।
माझा अभिमान असो तुज, जैसा [14]वारिचा जड [15]पयास. ॥ १०३
दिग्विजय ससेनाहीं केला [16]त्यांहीं न तो [17]असेनाहीं, ।
परि म्हणतों, ‘विजयी भुज कोणाचेही जगीं असे नाहीं.’ ॥ १०४
दिग्विजय करुनि येतों, एकाकी एकरथ [18]असेनहि मी, ।
किति हें? त्वदर्थ [19]वर्षी उघडा, [20]ग्रीष्मातपीं, असेन [21]हिमीं.’ ॥ १०५
गांधार म्हणे, ‘सखया! आहे मज बहु तुझाचि [22]विश्वास, ।
वीरा! एकाकीही तूं यद्यपि जिंकिशील [23]विश्वास. ॥ १०६

---

१. शेंकडों पंडितांनीं सत्कारलेलें असें कुलगुरुचें वचन. २. बहिरा नव्हे तो. (बधिर=बहिरा; संस्कृतशब्दांतील असंयुक्त थ, ध, आणि भ यांस ह असा आदेश होतो. पृथक=पोहा, दधि=दहिं, प्रभात=पहांट, मिथुन=मेहुण.) ३. भीष्म. ४. राज्यास अनर्थ करण्यास कारण. ५. बुड्ढा. ६. न बोलतां सुचवी. ७. उत्तम श्रवण करण्यास योग्य. ८. भीष्म. ९. कानाला. १०. येथें पापडाचा दाखला दिला आहे तो ग्राम्यत्वास्तव अप्रशस्त होय असें कित्येक म्हणतात. ‘काव्यांत न खपण्यासारख्या ग्राम्य शब्दांचा प्रयोग व केवळ व्यावहारिक दाखले’ [निबंधमाला—अंक ६३, पृष्ठ १४] पंतांच्या कवितेंत आढळतात असा त्यांच्या कवितेवर आक्षेप आहे, त्याचें प्रस्तुत पद्य हें उदाहरण होय. या आक्षेपावर उत्तर आहे तें असें:—‘ग्राम्य म्हणजे नांगरहांके वगैरे हलके लोक यांच्याच मात्र भाषणांत येणारे जे शब्द त्यांचा प्रयोग केला असतां हा दोष होतो. पण तसें मोरोपंताच्या कवितेंत आढळत नाहीं. त्या कवितेंत ज्या शब्दांचा प्रयोग केला आहे ते शब्द सभ्यांच्याही भाषणांत येणारे असे आढळतात. म्हणून तो ग्राम्यत्वरूप दोष आहे असें म्हणतां येत नाहीं. तसेंच सभ्य लोकांच्या व्यवहारांत येण्याऱ्या गोष्टी दृष्टांतत्वें करून सांगितल्या असतां तोही ग्राम्यत्वरूप दोष नव्हे, तर उलटा अर्थसौलभ्यरूपानें गुणच होय असें म्हणण्यास बाध दिसत नाहीं.’ (निबंधमाला—अंक ७० पृष्ठ २५-२६.) ११. दुर्योधना. १२. कोणेकास कोणेकाची सर्वदा प्रतिष्ठा वर्णावी असा जो तद्विषयी पक्षपात असतो तें. १३. भीष्मास. १४. पाण्याचा. १५. दुग्धास. १६. पांडवांनीं. १७. सेनारहितांनीं. १८. सेनारहित. १९. पावसांत. २०. ग्रीष्माच्या तापांत. २१. थंडींत. २२. भरंवसा. २३. जगास.

परि शोभार्थ असों दे, त्याग करावा न आत्मसैन्याचा, ।
माझा सखा तसा हो क्षितिला वश करुनि त्याहि वैन्याचा.[1]' ॥ १०७
दिग्विजयार्थ सुदिवशीं तो तेजोराशि सूरज[2] निघाला, ।
घालावया अनम्राकरदाहितसर्वशूरजनिं[3] घाला.[4] ॥ १०८
दुर्योधन बहु मानी शकट[5]शतानीत मणिकनक दातें[6] ।
भरिलें, घृतें भरावें, जें तैलानेंहि मणिक[7] न कदा तें. ॥ १०९
त्यावरि तो दुर्योधन निजकुलगुरुला म्हणे, 'पुरोहितहो[8] ! ।
मत्काम[9] राजसूयक्रतु[10] करणें, हा सुखें पुरो,[11] हितं[12] हो.' ॥ ११०
[13]तो साधु म्हणे, 'वैष्णवसत्र[14] करावें तुवां नयज्ञा ! तें, ।
[15]ऐसेंचि फळद, असतां[16] धर्म उचित तूंहि या न यज्ञातें.[17]' ॥ १११
तें मान्य करुनि रायें 'वैष्णवसत्रोत्सवा पहायास ।
यावें' म्हणुनि नृपांप्रति पाठविले दूत बहु बहायास.[18] ॥ ११२
मरताचि,[19] न मरता जरि म्हणताचि सदाहि अन्य सत्रप[20] 'हा !' ।
दूतमुखें दुर्योधन धर्मासि म्हणे, 'मदीय सत्र पहा.' ॥ ११३
धर्म म्हणे, 'गांधारे ! साधु करिसि कर्म भारतोचित[21] रे ! ।

---

१. वेन राजाचा पुत्र जो पृथुराज त्याचा सखा (मित्र) हो. या पृथुराजानें पृथ्वी विषम होती ती सम केली. शंकरानें दशचंद्र आणि देवीनें शतचंद्र अशीं यास खड्गें दिलीं. अग्नीनें अजगव नामक धनुष्य दिलें. वरुणानें अमृतमय छत्र दिलें. यांच्या योगें यानें पृथ्वी वश करून घेतली. हा मोठा पराक्रमी आणि बलाढ्य होता. २. सूर्यपुत्र कर्ण. ३. नम्र नव्हेत आणि ...ार देणारे नव्हेत असे दुष्ट जे सर्व शूरजन त्यांच्या ठायीं. (अनम्र+अकरद+अहित+ ...शूर+जनीं.) ४. हल्ला. ५. शेंकडो गाडे (शकट) भरून आणिलेलें. ६. दात्यानें, कर्णानें. ... मडकें. ८. उपाध्याय. ९. माझा मनोरथ. १०. राजसूय यज्ञ (क्रतु). राजा म्हणजे ...नक सोम याचें सवन म्हणजे कंडन ज्यांत करतात तो राजसूय यज्ञ. ११. परिपूर्ण होवो. .... कल्याण होवो. १३. पुरोहित. १४. वैष्णव नामक यज्ञ. या यज्ञाची अधिदेवता विष्णु. सुव- ...चा नांगर करून यज्ञभूमि सिद्ध करून तिजवर हा यज्ञ करतात. १५. राजसूयासारखेंचि. १६. ...का कुलांत एकानें राजसूय यज्ञ केला असतां, तो जीवंत आहे तोंपर्यंत त्या कुलांत दुसऱ्यानें राज- सूय यज्ञ करूं नये, असा नियम आहे म्हणून दुर्योधन राजसूय यज्ञ करण्यास अयोग्य होता. (अध्याय २५५ श्लोक १३-१५ पहा.) १७. राजसूययज्ञातें. १८. बोलवावयास. १९. ज्याला लाज म्हणून आहे असा दुसरासा मनुष्य गंधर्वांकडून इतकी फजीती झाल्यावर मरताच (खास मरून गेला असता). कदाचित् न मरता तरी सर्वकाळ 'हा !' (हाय ! हाय !) म्हणता. पण हा दुर्योधन इतका निर्लज्ज कीं 'माझें वैष्णवसत्र पहायास यावें' असें दूताच्या हातीं धर्मास सांगून पाठविलें. २०. सलज्ज. भरतकुलास योग्य असें.

जो धर्मसेतुसंश्रित[1] वाहुनि गुरुराज्यभार[2] तोचि तरे. ॥ ११४
बा ! येती पुण्ययशःसंपत्ती जोडितां न येरा या, ।
यावें, परि संप्रति वनवासव्रत[3] सोडितां नये, राया[4] !' ॥ ११५
भीम म्हणे[5], 'धर्मासह निश्चित येईन समरसत्रास[6], ।
रुचतो हाचि रस मना, देतो पर अमृतसम रस त्रास.' ॥ ११६
तें सत्र[7] पूर्ण होतां, कर्ण म्हणे, 'पांडवायु हरिशील, ।
ऐसाचि, कुरुपते ! तूं विश्वस्तुत राजसूय करिशील. ॥ ११७
जोंवरि न अर्जुनातें मारीन रणांगणांत मी स्वशरें, ।
तोंवरि न पादधावन[8] करवीन करीन आपुल्याचि करें. ॥ ११८
सेवीन[9] न मांसातें, जैसा मोक्षेच्छु सुजन न सुरेतें[10], ।
न तदुक्त[11] मृषा ज्याचें सुक्षेत्रामाजि सुजनन सुरेतें[12].' ॥ ११९
गांधार म्हणे, 'कर्णा ! पूर्ण भरंवसा मला तुझाचि असे, ।
त्वद्भुज संश्रितकामद[13], ते मंदारादि[14] पांचही न असे.' ॥ १२०

अध्याय आठवा.

चिंतित होता विपिनीं[15] तो धर्म सबंधु विप्रभव्यास[16], ।
तों त्यांसि भेटि देउनि धन्य करी शशिरविप्रभ[17] व्यास. ॥ १
व्यास म्हणे, 'वत्सा ! मी झालों द्विजतर्पणें[18] प्रहर्षित[19] रे ! ।
स्वल्पहि अन्न सुपात्रीं देउनि सकुटुंब मुद्गलर्षि[20] तरे. ॥

---

१. धर्मरूप सेतूस अवलंबून असलेला. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २. मोठें दुर्वह असे ज्याचें ओझें. ३. तेरा वर्षें वनवास करूं हें प्रतिज्ञारूप व्रत. (अध्याय २५६ श्लोक १३-१४ पहा. ४. दुर्योधना. ५. अध्याय २५६ श्लोक १६-१७ पहा. ६. रणयज्ञास. ७. वैष्णवसत्र. ८. पादप्रक्षालन. ९. अध्याय २५७ श्लोक १६-१७ पहा. १०. मद्यातें. ११. ज्याचें सुजनन (जन्म) सुक्षेत्रामाजि (उत्तम स्त्रियेच्या ठायीं) सुरेतें (उत्तम वीर्यानें) [झालें आहे] तदुक्त (त्याचें वचन) मृषा (खोटें) न. १२. पवित्र वीर्यानें. हे गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १३. आश्रित जनाचे काम (मनोरथ) परिपूर्ण करणारे. १४. पांच मंदारादि कल्पवृक्षही मंदार, पारिजातक, संतान, कल्पवृक्ष आणि हरिचंदन हीं या पांच कल्पवृक्षाचीं नांवें. १५. वनांत. या अध्यायांत मूळांतील सात अध्यायांचा (२५७-२६३) समावेश पंतांनीं केला आहे. १६. ब्राह्मणांच्या कुशलास. १७. चंद्रसूर्यासारखी प्रभा ज्याची असा. १८. ब्राह्मणांच्या तृप्तीनें. १९. अत्यंत हर्षित. २०. ऋषिविशेष.

जोडी सात्मजदार[1] द्रोणमित[2] व्रीहि[3] पंधरादिवसीं, ।
विधिवत् सेवी करवुनि पेज कण्या भात पानगे[4] दिवसीं. ॥ ३
समयीं सर्वहि भक्षी दुर्वासा नाम विप्र सादां[5] [6]तें, ।
सत्वाशिं न ढळतां तो[7] भगवान् बहु दाखवि प्रसादातें[8]. ॥ ४
सत्वाशिं न चुकले ते तरले, तरशील तूंहि, बारा या ।
सरल्याचि समा[9], यापरि तेरावीही सरेल, बा ! राया ! ॥ ५
व्यसनांत शीलवश[10] जन तरला नळवश[11] जळांत पाथरसा[12]. ।
सोडी सत्वाशिं न शुचिगुण तप्तहि जेंवि शुद्ध पाथ[13] रसा. ॥ ६
शिष्यायुतयुत[14] भगवान् दुर्वासा गजपुरासि[15] ये राहे, ।
सत्संगति सत्फलदा, सुज्ञासि पचे, पचे न येरा हे. ॥ ७
चित्र[16], च्छळ सोसुनि खळ[17] मुनिभजनीं सर्वकाल रावे[18] तें, ।
न विटे सत्सेवेतें जेंवि पिपीलिकासमूह[19] राबेतें[20]. ॥ ८

---

१. पुत्र व स्त्री यांसह. २. अर्धमण. ३. भात, तांदूळ. पुत्रस्त्रियांसह कपोतवृत्ति धरून, पक्षापक्षाच्या ठायीं द्रोणपरिमित तांदूळ जमा करून, दर्शपौर्णमासयाग संपादून, अतिथींस भोजन घालून, नंतर तो उरलेलें अन्न भक्षण करी. ४. पक्वान्नविशेष; ज्यांस फळें असें म्हणतात तीं. ५. सहा वेळां. ६. मिळविलेलें अन्न दुर्वासानें सहा वेळ मुद्गलाच्या घरीं भक्षण केलें. ७. मुद्गलमुनि. ८. कृपेतें. ९. संवत्सर. 'समा' शब्द अनेकवचनी आणि स्त्रीलिंगी संस्कृतांत आहे. याचा प्रयोग येथेंही तसाच केला आहे. १०. उत्तम स्वभावास वश झालेला. ११. नळ वानराला वश असा. नळानें समुद्रावर सेतुबंधन केलें या कथेकडे येथें लक्ष्य आहे. १२. पाथर=दगड, फत्तर, पाषाण. 'प्रस्तर' शब्दाचा 'पाथर' हा अपभ्रंश होय. १३. जल. ज्याप्रमाणें नळ (रामसैन्यांतील वानरश्रेष्ठ) याला वश झालेला पाथर (दगड) पाण्यांत तरला, त्याप्रमाणें शीलवश (सद्वृत्तवश) पुरुष संकटांतही तरतो. ज्याप्रमाणें शुद्ध उदक तप्त झालें तरी आपलें रसत्व सोडीत नाहीं, त्याप्रमाणें शुचिगुण (विमलगुणसंपन्न) पुरुष कितीही तापांत असला तरी आपलें सत्व सोडीत नाहीं. यांत उपमा व अर्थांतरन्यास या अलंकारांचा संकर आहे. १४. दहा हजार (अयुत) शिष्यांनीं युक्त असा. १५. गजपुर=यालाच 'हस्तिनापुर' अथवा 'नागपुर' अशीं अन्य नांवें आहेत. हें शहर पुरुकुलोत्पन्न हस्तिराजा यानें वसविलें, म्हणून यास 'हस्तिनापुर' असें नांव पडलें. दुसरें असेंही आढळतें कीं अत्रिपुत्र सोम हा अरण्यांत फिरत असतां, एका हस्तीला एका विहंगमानें उचलून नेलें असें त्यानें पाहिलें. तेव्हां त्या जागेवर त्यानें एक शहर वसवून त्याला या चमत्कारार्थ 'हस्तिनापुर' असें नांव दिलें. हें शहर विद्यमान मिरत शहराच्या पूर्वेस गंगाकांठीं असावें असें विद्वानांचें अनुमान आहे. १६. आश्चर्य. १७. दुर्योधन. १८. चाकरी करी, राहे. १९. मुंग्यांचा समूह. २०. काकवीपेक्षां कांहीं दाट जो उंसाच्या रसाचा रांधा करितात ती राब, तीतें.

दास्यें प्रसन्न होउनि 'माग' म्हणे तो[1] तपोनिधी राजा, ।
जो देणार तशाही सिद्धि, असुलभा तपोनि धीरा[2] ज्या. ॥ ९
खळ त्यासि म्हणे, 'येथें जैसा झालासि अतिथि, सुतपा! हें ।
शिष्यकटक घेउनि बा! तोहि कुरूत्तंस[3] पांडुसुत पाहें. ॥ १०
परि सुकुमारी कृष्णा जेवूं द्यावी, जपूनि घेनु सती ।
दोहावी जाणा हे, सत्वमयी ती तपोनिधे! तुसती.' ॥ ११
श्रोत्यांच्या व्हावें बहु तप्त प्राशूनि ज्या वरा कॅाने[4], ।
मागीतला तसा वर सद्गुरुपाशींहि[5] त्या नीचाने[6]. ॥ १२
तो मुनि 'अवश्य' ऐसें बोलोनि निघे, असाधुजन नाचे, ।
त्यातें पूजिति ते प्रियसख त्या यदुवंशविहितजननाचे[7]. ॥ १३
प्रार्थुनि धर्में मुनि तो स्नानासि सशिष्यकटक पाठविला, ।
त्या संकटीं सतीनें श्रितकल्पद्रुम मुकुंद आठविला. ॥ १४
स्वमनिं म्हणे ती कृष्णा, 'श्रीकृष्णा! धांव, पाव, नाश तदा[8]।
ऱ्हीचा[9] होऊं न दिल्हा, स्मरतें मज तेंचि पावना[10]! शतदा. ॥ १५
सत्य असो जें म्हणती कवि भवसिंधूंत नाव नामा तें, ।
संप्रति चुडे भरावे[11] त्वां करुनि श्रितजनावना[12] मातें. ॥ १६
नेसविता झालाशि प्रेमें तूं करुनियां दया लुगड्या, ।
आतां चुडे भरीं बा! आश्रय मज एक तूं दयालु गड्या! ॥ १७
तुजहुनि इतरें कोणें वारावा क्षिप्र अंतराय[13] महा? ।
दंडीलचि, साहेल न, देवा! स्वल्पाहि अंतरा[14] यमें[15] हा. ॥ १८
मग मत्स्वरूप[16] काय? ब्राह्मण आले दुरूनि जेवाया ।
त्यांसि तुझी भगिनी हे बा? न नमुनि जरि म्हणेल 'जेवा या.' ॥ १९

---

१. दुर्वास. २. जितेंद्रियाला. ३. कुरुश्रेष्ठ. (कुरु+उत्तंस=कुरुकुल+भूषण; धर्म.) ४. कर्णानें. ५. दुर्वासापाशीं. ६. नीचानें. (दुर्योधनानें.) ७. यदुवंशांत ज्यानें जन्म धारण केलें त्या श्रीकृष्णाचे आवडते मित्र. ८. वस्त्रहरणसमयीं. ९. लज्जेचा. १०. पवित्र करणाऱ्या. ११. चुडे भरणें हें कृत्य सौभाग्यसंपत्तिसूचक आहे. १२. आश्रय करणाऱ्या जनाचें रक्षण. (अवन.) १३. विघ्न. १४. अवकाशाला. १५. हा यमासम निर्दय दुर्वास. १६. जे ब्राह्मण दुरूनि जेवाया (भोजनार्थ) आले त्यांसि तुझी हे भगिनी 'या, जेवा' असें नमुनि (नमस्कार करून) जर न म्हणेल तर बा! मग माझें स्वरूप काय [राहिलें]? स्वरूप=तेज, अब्रू, इभ्रत, किंमत, इत्यादि.

या मुनिकोपासि जसा लागे न पैयाचिया उँता वेळ, ।
श्रीकृष्णजी! तुम्हीं मजवरि करुनि दयाचि या उतावेळ.' ॥ २०
स्मरतांचि ये प्रभु, दया सत्य सुरभि, भक्तवत्स लागावें, ।
कांसेसि यांचियाचि, त्यजुनि सकळ, याचि वत्सला गावें. ॥ २१
ते काय जे न केवळ भक्तिवश पुरंदरादि सुर भितरे, ।
तीही काय न आपणही जी व्यसनार्णवांत सुरभि तरे? ॥ २२
येतांचि दीनबंधुप्रति कळवी ती नमूनि आधींतें, ।
भगवान् म्हणे, 'भुकेलों, सखि! वाढ मला, असोचि, आधीं तें.'॥ २३
कृष्णा म्हणे, 'अहा बा! वाढावें काय? गा! पहा हातें, ।
क्षाळूनि घातलेंसे आतां कीं पालथें अहाहा! तें. ॥ २४
अन्न मदशनावधि रविदत्तस्थालींत, मग नसे लवही, ।
त्वद्दृष्टि सर्व जाणे, यमधर्माची असी नसेल वही.' ॥ २५
कृष्ण म्हणे, 'नर्म पुरे, तर्पाया योग्य सर्व थालीला, ।
मीच नव्हे काय इची सखि! सुरभिसखीच सर्वथा लीला.' ॥ २६
'आण बरें, पाहों दे.' ऐसा आग्रह करूनि आणविली, ।
कृष्णेसि सँत्सभेसि स्थालीसहि बहु दयाचि जाणविली. ॥ २७
त्या पात्राच्या कंठीं स्वल्पचि शाकान्न लँगलें होतें, ।
सत्परिचयेंचि जडही समयीं सत्वासि जागलें हो! तें. ॥ २८
तो यज्ञभुक् तशाही त्या शाकान्नासि वोढवी पाणी, ।
कृष्णेकरवीं आपण सांगुनि संकल्प सोडवी पाणी. ॥ २९

---

१. दुग्धाच्या. २. ओतास. ३. याच्याच. ४. इंद्रादिक. ५. कामधेनु. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ६. मानसव्यथांतें. ७. स्थालीपात्र. ८. माझें भोजन होईपर्यंत. ९. सूर्यानें दिलेल्या पात्रांत. १०. अध्याय २६३ श्लोक २२-२३ पहा. ११. क्रीडा. (विनोद.) १२. थालीची. १३. हे द्रौपदि. नर्म पुरे, (थट्टा पुरे कर.) थालीला तर्पाया सर्व (सकल प्राणी) योग्य आणि मीच मात्र तर्पाया योग्य नव्हे काय? इची लीला, हे सखि! सर्वथा सुरभिसखीच होय—असा भाव. १४. सज्जनसमुदायाला. १५. थालीच्या. १६. अडकलेलें, संलग्न झालें होतें. १७. साधुसमागमाच्या योगें. १८. अचेतनही. १९. तें शाकान्न. २०. यज्ञभोक्ता अग्नि (श्लोक २५.) २१. पुढें करी. २२. हस्त. २३. कांहीं व्रतदान इत्यादि कर्म कर्तव्य असतां प्रारंभीं देशकालास अनुसरून अमुक कारणास्तव अमुक कर्म करतों असा जो उच्चार तो, हा संकल्प यजमानास उपाध्याय सांगतो आणि यजमानाकरवीं त्याप्रमाणें पाणी सोडवितो.

प्राशुनि म्हणे प्रकट[1] हरि, 'विश्वात्मा देव तुष्ट हो येणें[2].' ।
हळुचि म्हणे, 'मुनि किति हे? घेउनि शतकोटि दुष्ट हो! येणें[3].'॥ ३०
कृष्णेसि म्हणे, 'बाई! बाहुनि आणीव विप्रकटकातें.' ।
ती सहदेवासि म्हणे, 'जा जी! क्षुधित मुनिवृंद[4] हटका[5] तें.' ॥ ३१
अघमर्षणींच[6] तों[7] मुनि झाला आकंठ तृप्त सहसा, जे ।
शिष्य अयुतमित[8] होते गार्भिण्यापरि[9] तयांहिसह सांजे[10]. ॥ ३२
जो तोहि पूर्ण चोंळी[11] विप्र यथापूर्व[12] न वपु, ढेंकर वी[13] ।
तृप्ति[14], प्रतिपदिं 'सोडूं छळ' हा संकल्प नव पुढें करवी. ॥ ३३
हरिला स्वजन[15] प्राणाधिक, तैसें वित्तही न लोभ्याला. ।
चिंतूनि अंबरीषच्छळपरिणामहि[16] मुनींद्र[17] तो भ्याला. ॥ ३४

---

१. स्पष्ट, उघड. २. येणेंकरून. ३. यावें. ४. ऋषिसमुदाय. ५. बोलावा. ६. संध्यासमयीं हातांत पाणी घेऊन मंत्रानें अभिमंत्रून टाकितात तें. अघमर्षण हें एक मानसादिक सर्व पापें नाश करणारें सूक्त आहे. ['सर्वैनसामपध्वंसि जप्यं त्रिष्वघमर्षणम्'–अमरकोश.] हें ऋग्वेदाचें १९०वें सूक्त महापापाचें क्षालन व्हावें ह्मणून पाण्यांत उभें राहून त्रिवार म्हणतात. ७. दुर्वास. ८. दशसहस्रसंख्याक. ९. गर्भिणीसमुदायापरि. [गार्भिण्य, गार्भिण=गर्भिणीनां समूहः–अमरकोश.] १०. हें वर्णन मूळांत नाहीं, कवीनेंच स्वकल्पनेनें येथें योजिलें आहे. ११. हाल्वी. १२. पूर्वीप्रमाणें. १३. प्रसवे, उत्पन्न करी. १४. तृप्ति ढेंकर वी आणि 'सोडूं छळ' असा नव संकल्प करवी. १५. स्वभक्तगण. १६. अंबरीष नामक राजाचा छळ केल्याचा शेवट. हा सूर्यवंशोत्पन्न नाभाग राजाचा पुत्र. हा मोठा दानशूर, पराक्रमी आणि भगवद्भक्त होता. एकदां द्वादशीच्या दिवशीं दुर्वास ऋषि याच्या घरीं अतिथि म्हणून आला. तेव्हां राजानें त्यास भोजनार्थ राहवून घेतलें. नंतर मुनि आपलें आन्हिक कर्म करण्यासाठीं नदीतीरीं गेला. या दिवशीं द्वादशी थोडी म्हणजे साधनद्वादशी होती. तेव्हां व्रतभंग होऊं नये म्हणून राजानें, तिथि संपली नाहीं तो देवास नैवेद्य समर्पण करून, भोजन न करतां देवाचें तीर्थ प्राशन करून पारणें सोडलें. हें जाणून मुनि संतप्त झाला. त्यानें आपल्या जटेंतील केंसापासून एक अक्राळ विक्राळ कृत्या (राक्षसी) उत्पन्न करून राजावर सोडिली. तेव्हां विष्णूच्या सुदर्शन चक्रानें तिचा नाश केला आणि त्या मुनीचा पाठलाग केला. हें पाहून दुर्वास भीतिग्रस्त असा विष्णूस शरण गेला. विष्णूनें 'परत अंबरीषाकडे जा, तो निराहार आहे, त्याचें समाधान कर म्हणजे चक्र तुला सोडील' असें सांगितलें. त्यावरून निरुपाय होऊन तो अंबरीषाकडे परत आला. दुर्वासास पाहतांच राजास हर्ष झाला. त्यानें सुदर्शनाची स्तुति करून दुर्वासाला त्यापासून मुक्त केलें आणि यथेच्छ भोजन दिलें–अशी कथा आहे. (भागवत–नवम स्कंद–अध्याय ४-६.) १७. दुर्वास.

ते शिष्य म्हणति, 'गुरुजी! न सुचे, कर्तव्य काय तें कळवा'. ।
गुरु त्यांसि म्हणे, 'मळवा यश, परि सत्वर पळा, मला पळवा. ॥ ३५
म्यां आजिपासुनि शपथ करुनि नमस्कार[3] सच्छला[2] केला, ।
दृग्हित[4] न विषशलाका[5] टाकुनि कर्पूरसच्छलाका[6] इला. ॥ ३६
झालों गुरूदर[7] जशा अत्यासन्नप्रसूति[8] गरवारी[9], ।
सच्छळकर्म स्वल्पहि[10] सद्यःक्षयहेतु[11] जेंवि गरवारी[12]. ॥ ३७
अस्मदुदरें[13] सदन्नें[14] नकळत अघमर्षणींच[15] कीं भरलीं, ।
विश्वंभरें[16] सुरद्रुमचिंतामणिकामधुग्यशें[17] हरिलीं. ॥ ३८
काय गिळावें आतां? मज एकहि तुहिनपर्वताभ[18] सित[19], ।
मी किति? करील कृष्णाकोपानल[20] तुहिनपर्वता[21] भसित[22]. ॥ ३९
त्या श्रीमदंबरीषाहुनि धर्म तपोबळें नसे ऊन[23], ।
हा मी मंदचि[24] केवळ, सच्छळगरळा[25] जळेन सेऊन. ॥ ४०
त्यां पांडुसुतांमध्यें भीम महात्मा[26] उदार बलसत्वें[27], ।
चारील मुष्टिमोदक[28], आतिथ्यासि[29] न चुकेल अलसत्वें[30].' ॥ ४१
ऐसें म्हणतचि पळतां प्रबळ भयचि होय बलद[31] दुर्वाशा[32], ।
भासे लंबोदरसा[33] तो, गळत्या तज्जटाहि दुर्वाशा[34]. ॥ ४२

---

१. अध्याय २६३ श्लोक ३२-३५ पहा. दुर्वासाचें भाषण मूळांत विस्तृत नाहीं. गीति ३५-४१ यांतील भाषणास मूळांत आधार फारच थोडा आहे, किंबहुना हें भाषण पंतांनीं पदरचेंच घातलें आहे. २. साधूंच्या छळाला. ३. नमस्कार करणें=सोडणें, नांव देखील न घेणें, सोडून देणें. ४. दृष्टीला हितप्रद. ५. विषाची काडी. ६. कापराची उत्तम काडी तिला. ७. मोठें पोट ज्यांचें अशा. ८. अतिजवळ आला आहे प्रसूतिकाळ ज्यांचा अशा. ९. गर्भिणी स्त्रिया. १०. सोपें. ११. तत्काल नाशास कारण. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १२. विषोदक. १३. आमचीं उदरें. १४. उत्तम अन्नानें. १५. अघमर्षण करीत असतांच आमचीं पोटें उत्कृष्ट अन्नानें भरून गेलीं. १६. देवानें. (कृष्णानें.) १७. सुरद्रुम+चिंतामणि+कामदुह्+यशें=कल्पवृक्ष आणि चिंतित इष्ट पदार्थ देणारा मणि आणि कामधेनु यांचीं यशें विश्वंभरानें हरून घेतलीं असें वाटतें. हा उत्प्रेक्षालंकार आहे. १८. हिमाचलतुल्य. १९. भाताचें शीत. २०. द्रौपदीक्रोधाग्नि. २१. हिमाचलाला. २२. भस्म. २३. उणा. २४. मूर्खचि. २५. सज्जनांचा छळ हेंच गरळ (विष) त्याला. २६. महाशय. २७. शक्तिरूप द्रव्यानें. २८. मुष्टिमोदक=कोणास प्रहार करण्यासाठीं केलेला मोदकाच्या आकारासारखा मुष्टि तो; चारील मुष्टिमोदक=मुष्टिरूप मोदक खाऊं घालील. २९. आदरसत्कारास. ३०. आळशीपणानें. ३१. बळप्रद. ३२. दुर्वासमुनीला. ३३. गणपतीसा. ३४. दुर्वांकुरासारख्या.

बंधुकथित[1] तीर्थतटग[2] विप्रश्रित[3] तत्पलायितोदंत[4] ।
मोही धर्मा, अहिचा[5] शिरला हृदयांत काय तो दंत[6] ? ॥ ४३
धर्म[7] म्हणे, ‘येईल स्पष्ट निशीथीं[8] छळार्थ दुर्वासा, ।
त्या दावाग्निपुढें या स्त्रीतनुसह मूर्ति शुष्क दुर्वा सा[9]. ॥ ४४
त्वंदास[10] होय हा जन, बा! शुद्धदयासुधानदा[11]! साचा, ।
सेवासादर असतां, छळ योग्य तुला बुधा! न दासाचा.’ ॥ ४५
झाला होता सानुज तो राजा धर्म चित्रसा सांधी[12], ।
सुयश निशीथीं भेटुनि भक्तां पद्मांशि मित्रसा[13] सांधी[14]. ॥ ४६
देव म्हणे, ‘मी आलों कृष्णेपाशीं मद्यांचि, मज्जन[15] हो[16]! ।
चिंतितसें कीं स्वप्नीं व्यसनींहि क्षण तुम्हां न मज्जन[17] हो[18]. ॥ ४७
कृष्णाचिंतेनें[19] हें संकट मज कळविलें, अगा[20] राया! ।
आलों संरक्षाया धांवत मी आपुल्या अगारा[21] या. ॥ ४८
जरि तेजस्वितपस्विप्रवर[22] छळशील[23] दुःसह त्रिजगा ।
भ्याला त्वत्तेजाला, धर्मा! गेला पळोनि अत्रिज[24], गा! ॥ ४९

---

१. भावानें (सहदेवानें) कथित. [मागें गीति ३१ पहा.] २. तीर्थाच्या कांठावरील. ३. ब्राह्मणांनीं अंगीकारलेला. ४. त्यांच्या पळण्याचा वृत्तांत. ५. सापाचा. ६. हें उत्प्रेक्षा नामक अलंकाराचें उदाहरण आहे. या वर्णनास मूळांत आधार नाहीं. ७. कृष्णास धर्म म्हणतो. ८. मध्यरात्रीस. ९. सहा. (पांच पांडव आणि द्रौपदी मिळोन सहा.) हें रूपकालंकाराचें उदाहरण आहे. १०, तुझा भक्त. ११. शुद्ध दयारूप अमृताच्या नदा (कृष्णा). १२. मानसव्यथेनें युक्त, चिंतातुर. १३. सूर्यसा. (श्रीकृष्ण) हें श्लिष्टोपमेचें उदाहरण आहे. मित्र=सूर्य, स्नेही, सुहृद. १४. संपादी (सुयश). १५. माझे भक्त. (श्लोक ४२-४४ पहा.) १६. अहो. १७. बुडणें. १८. होऊ. १९. हें दुर्वासाच्या आगमनाचें. २०. या यमकांविषयीं पुढील आख्यायिका सर्वप्रसिद्ध आहे:—‘असें सांगतात कीं, बारामतींत मोरोपंताची बसावयाची खोली असे तींत चोहोंकडे भिंतींवरून यमकबद्ध अक्षरें लिहून ठेविलेलीं होतीं. म्हणजे कवीस रिकाम्या वेळीं एकादा यमक सुचला कीं तो त्यानें भिंतीवर लिहून ठेवावा. पुढें काव्यरचनेच्या वेळीं जे जे यमक त्या त्या प्रसंगाला उपयोगीं पडतील ते ते त्यानें घ्यावे. हा प्रकार प्रस्तुत कवीच्या काव्यांत जें अपूर्व यमकचातुर्य आढळतें (कीं जें पाहून घटखर्पर कवीस खापराचा घडा घेऊन पाणीच वहावें लागतें!) ह्यावरून पहातां केवळ संभाव्य दिसतो. ‘अगा राया’ आणि ‘अगारा या,’ ‘हानिकर’ आणि ‘हा निकर’ इत्यादि शेकडों ठरीव यमकांवरून ह्या वरील गोष्टीस बळकटी येते.’ (निबंधमाला—अंक ५७ पृष्ठ २ पहा.) २१. घरास. २२. तेजस्व्यांमध्यें आणि तपस्व्यांमध्यें थोर. २३. छळ करण्याचा स्वभाव ज्याचा तो. २४. अत्रिमुनीचा पुत्र दुर्वास.

अनलसमीहित साधी राया! वारा महीवरा! कामा।
अनलस मीहि तसा धीरा! यावा रामही वरा का मा.'[1]॥ ९०
ऐसें बोलोनि करी स्वजनघनश्रीद[3] यान[4] दीपकसा, ।[2]
भक्तांशि उपेक्षील व्यसनीं तो श्रीदयानदीप[5] कसा? ॥ ९१
कीर्ति न देता, देता जरि म्हणता श्रीमद्द्विज[6] 'गदा द्यां.'[7] ।
सोसे स्वच्छळ, न सुहृच्छळकतपःश्रीमद[8] त्रिजगदाद्या[9]. ॥ ९२
धर्म म्हणे, 'मतिमति! सति! संसारामाजि अन्य कुणगा[10] तो।
केवळ अनिष्ट, परि हा बहु धन्य तुझा म्हणोनि गुण गातों.[11] ॥ ९३

---

१. हें पद्य 'समुद्गक' नामक यमकाचें उदाहरण आहे. याचें लक्षण:—'अर्धं पुनरावृत्तं जनयति यमकं समुद्गकं नाम.' (काव्यालंकार-अध्याय ३ श्लोक १६-काव्यमाला २ पृष्ठ २५.) पद्याच्या सकल अर्धाची पुनरावृत्ति झाली असतां समुद्गक नामक यमक उत्पन्न होतें. यमकाचे अनेक भेद आहेत—पुच्छ, पंक्ति, संदष्टक, संदंश, मुख, गर्भ, परिवृत्ति, युग्मक, महायमक. (काव्या- अध्याय ३ पहा. काव्यप्रकाश-नवम उल्लास-पृष्ठ २६२-५६३-वामनाचार्यसंशोधित आवृत्ति ...ल्या अर्धाचीं पदें आणि अर्थ:—अनलसमीहित=अग्नीनें इच्छिलेलें [अनल=अग्नि, ..., साधी=साधितो, राया=हे राजा, वारा=वायु, महीवरा=हे पृथ्वीपते, कामा=कार्यास. ...ं पदें व अर्थ:—अनलस=आळसरहित, मीहि=मी देखील (मी कृष्णही), तसा=त्या- ..., धीरा=धैर्यवंता, यावा=यावा, आला पाहिजे, रामही=बळरामसुद्धां, वरा=श्रेष्ठ, का=काय, ...=लक्ष्मी. याचा अर्थ:—कृष्ण म्हणतो, 'हे धैर्यवंता पृथ्वीपते राजा [धर्मा], अग्निनें इच्छिलेलें कार्य (जसा) वारा साधितो, तसा मी देखील आळसरहित (होत्साता) तुझें कार्य साधायास तयार आहें. ...ी (म्हणजे माझा वडील भाऊ बळरामही) यावा; (मग) लक्ष्मी(च) कां (मोठी, श्रेष्ठ? ...नये).' या गीतीच्या दोन्हीं अर्धांतील अक्षरें एकसारखीं आहेत आणि तीं साधण्यासाठीं ...ावी लागली आहे. ३. स्वजनास विपुल श्री (संपत्ति-कांति) देणारा. ४. प्रयाण. ...ाणि दया यांचा समुद्र. ६. शोभायमान दुर्वासा. ७. गदा द्या असें श्रीमान् ...णता, तर श्रीकृष्ण आपल्या हातांतील गदा देता, परंतु कीर्ति कधीं न देता. ... मित्रांचा छळ करणाऱ्या मुनीचा तपोलक्ष्मीचा गर्व. ९. त्रैलोक्याच्या आदीं झाला ...कृष्ण त्याला. १०. अल्प व्यापार संसारांत एकत्र कुटुंबामध्यें इतर भावांस न कळतां ...ल्या द्रव्याचा जो संग्रह तो कुणगा, जमवून ठेविलेलें धन. ११. धर्म म्हणे 'हे मति- ...द्रवति) सति (पतिव्रते)! संसारामाजि अन्य कुणगा तो अनिष्ट, परि तुझा हा [कुणगा] बहु धन्य; ...ून [त्याचे] गुण [मी] गातों? कुणगा=बायका जो डाळतांदुळांच्या अफरातफरीनें पैसा करितात तो, संचय. धर्माचे म्हणण्याचा आशय कीं, संसार (प्रपंच) करण्यांत बायका जो कुणगा करतात तो इष्ट नाहीं. परंतु तूं केलेला कुणगा (म्हणजे पुण्यसंचय कीं ज्याच्यामुळें परमात्मा हांकेसरशी धांवत येतो) अत्यंत श्लाघ्य आहे; याजकरितां त्याचे गुण गातों.

तुजविण न दीपिके! सति! कृष्णे! तरतों नयज्ञहि तमातें ।
करितों जरि तरि गमता [1]कृष्णेतर तो न यज्ञ हित मातें. ॥ ९४
देव तुझा कैवारी, शुद्धें प्रेमें तुझ्याचि वळला गे! ।
दे धेनु दुग्ध धांउनि वत्सा, इतरा [3]तदर्थ बळ लागे.' ॥ ९५

अध्याय नववा.

[4]राया! धृतराष्ट्राचा प्रिय [5]जामाता [6]विवाहकाम वनीं, ।
आला [7]जयद्रथाख्य [8]स्वबळभरें कांपवीत ती [9]अवनी. ॥ १
मृगयार्थ पांडुनंदन गेले असतां, निजाश्रमद्वारीं ।
होती उभी [10]द्रुपदजा जैशी [11]शंपा [12]नवांबुभृद्वारीं. ॥ २
तीतें पाहुनि झाला तो रावणसाचि पात्र अन्याया, ।
मित्रासि म्हणे, 'चित्ता हेचि [13]बहुमता, नकोचि अन्या [14]यां. ॥ ३
जा [15]कोटिका सख्या! तूं, पूस तिचें वृत्त, होय [16]मत्करगा ।
ऐसें आधीं चतुरा! [17]सामें निजकार्य [18]सिद्धिमत् कर [19]गा!' ॥
सांगुनि निजवृत्त, तिचें वृत्त पुसे तीस कोटिक [20]विहितसें ।
[21]स्वल्पांत तीहि सांगे, बोलों शकती न कोटिकविहि तसें. ॥
कळलें कोटिकवदनें ती कृष्णा [22]स्वभगिनी असें नातें, ।
[23]तरि भय न धरी लज्जेसह, फळ कामातुरीं असेना तें. ॥

१. कृष्णभक्तिरूप यज्ञाहून इतर. २. या पद्यांत 'संदष्टक' नामक यमकालंकार आहे. ज्या पद्याचे द्वितीय आणि चतुर्थ पाद समवर्णात्मक असतात तेथें संदष्टक यमक असतें. याचें लक्षण:— 'प्रत्येकं पश्चिमयोरावृत्त्या पादयोर्द्वितीयेन । यमके संजायेते गर्भः संदष्टकं चेति ॥.' [का अध्याय ३ श्लोक ७; काव्यमाला २ पृष्ठ २२.] अशीं संदष्टकाचीं उदाहरणें पंतांच्या आहेत. ३. त्या दुधासाठीं. ४. हे जनमेजया. ५. धृतराष्ट्राची दुःशला नांवाची कन्या जयद्रथ यास दिली होती म्हणून तो धृतराष्ट्राचा जामाता होय. ६. लग्नाची इच्छा अ ७. जयद्रथ अशी आख्या (नांव) ज्याची तो. ८. आपल्या सैन्याच्या भारानें. ९. पृथ्वी ११. वीज. १२. नवमेघसमूहीं. [नव+अंबुभृत् (मेघ)+वारीं (समुदायांत)] १३. फार आवड मला. १५. कोटिक, कोटिकास्य=हा शिबिदेशाधिपति सुरथ राजाचा पुत्र आणि जय हा भीमाच्या हातून मरण पावला. (अध्याय २६४ श्लोक १२-१६.) १६. मा १७. सामोपचारानें. १८. सिद्धियुक्त म्हणजे सिद्ध—असा भाव. सफळ होईल असें. १९. अगा. २० पुसण्याला उचित असें. २१. अल्प भाषणांत. या गीतींत अध्याय २६४–२६५–२६६ यांचा सारांश आला आहे. २२. आपली बहीण, जयद्रथाची बहीण. २३. जयद्रथ लज्जेसह भय न धरी, (कारण) तें फळ (लज्जा आणि भीति धरणें) कामातुरीं असेना. 'कामातुराणां न भयं न लज्जा' हें सुभाषित सुप्रसिद्धच आहे.

कृष्णेसि [1]म्हणे, ‘माझी राणी हो, लाजतीस कां? बस ये, ।
अंकावरि घेऊं दे, आइक सुखकर [2]मदुक्त, थांब, सये ! ॥ ७
[3]राज्यच्युतसंगें [4]श्रमपात्र करिसि [5]दिव्यदेह कां गे ! हें ? ।
श्रीमद्देह मिळाल्या सेवावीं [6]निर्धनेंचि कां गेहें ? ॥ ८
त्वां फेडिलेंचि त्यांचें तत्संगें कृश करूनि देह [7]रिणें, ।
हो [8]मद्दयिता, [9]देईन मन तुज, गानासि जेंवि दे [10]हरिण.’ ॥ ९
कृष्णा म्हणे, ‘कुबुद्धे ! [11]खद्योतीं [12]कीटकाधमीं मलिनीं ।
[13]द्युमणिप्रति सोडूनि प्रियभाव धरील काय रे ! [14]नलिनी ? ॥ १०
क्षणमात्र स्वप्नींही वरिली कुशलेच्छुनें न [15]विटलीला, ।
[16]हे आवडली बहुधा त्वन्मतिला [17]जीवनासि [18]विटलीला. ॥ ११
स्पर्शीच [19]मृतिप्रद हा [20]वीरपरिग्रह, [21]महाहिचा मणि कीं ।
[22]अंडघटीं [23]द्युमणिद्युति योग्या नांदावयासि कीं [24]मणिकीं ? ॥ १२
त्यजितिल [25]भेटे तुज समयीं, त्यजिति [26]हरि जसे [27]नगासि [28]नगदाहें ।
भीमप्रिया [29]प्रियसखी लवहि न साहेल [30]लंघन गदा हें.’ ॥ १३
[31]कामांध खळ करीना, अन्य करी लेश तरि विवेक पिसा, ।

---

१. अध्याय २६७ श्लोक १६-२० पहा. २. माझें वचन. ३. राज्यभ्रष्ट (पांडव) यांच्या संगतीनें. ४. श्रमास स्थान असें. ५. ‘देह’शब्द नपुंसकलिंगी आहे. ६. धनरहित अशीं गेहें (घरें). हें ‘अर्थांतरन्यास’ नामक अलंकाराचें उदाहरण आहे. ७. ऋण=कर्ज. ८. माझी स्त्री. ९. तुझ्या आज्ञेंत राहीन. १०. हरिणाची गानलोलुपता सुप्रसिद्ध आहे. (मोरोपंत—आदिपर्व—अध्याय २४ गीति १५) ११. काजव्याच्या ठायीं. काजवा आपला आवडता पति—असा भाव. १२ क्षुद्र किड्याच्या ठिकाणीं. १३. सूर्याला. १४. कमलिनी. या पद्यांत रूपक, उपमा व प्रश्न यांचा संकर आहे. १५. जारलीला. १६. ही विटलीला. १७. वांचण्यासि. १८. कंटाळलीला (मतिला). १९. मरणदायक. २०.हो मी वीरपत्नी. [परिग्रह=‘पत्नीपरिजनादानमूलशापाः परिग्रहाः’ इत्यमरः. ‘परिग्रहः कलत्रे च मूलस्वीकारयोरपि । शपथे परिवारे च राहुवक्त्रस्थभास्करे’ इत्यजयः.] २१. मोठ्या विषारी सापाचा मणिच केवळ. कित्येक प्राण्यामध्यें मणि अथवा मुक्ताफल (मोत्यें) सांपडतात अशी प्राचीन लौकिक समजूत आहेः—‘करींद्रजीमूतवराहशंखमत्स्यादिशुक्त्युद्भववेणुजानि । मुक्ताफलानि प्रथितानि लोके तेषां तु शुक्त्युद्भवमेव भूरिः ॥.’ २२. ब्रह्मांडाच्या उदरांत. २३. सूर्यप्रभा. २४. मडक्यांत. [हा प्रश्नालंकार आहे.] २५. वीर. २६. सिंह. २७. पर्वतास. २८. पर्वताच्या दहनानें. वणव्यानें पर्वत पेटून गेला असतां. २९. माझी आवडती सखी (गदा). ३० अपमान, अविनीतवर्तन, माझ्याशीं अनीतीनें वागणें. ३१. कामातुरें.

धांवोनि बळात्कारें '[1]हां हां' म्हणतांहि तो शिवे [2]कपिसा. ॥ १४
पावे व्यसन अनाथा, [3]जाणों विजनांत तापसी ते तें. ।
खळ दे तिला [4]जैसा तो पापमति [5]दशास्य ताप सीतेतें. ॥ १५
कृष्णेनें [6]भाविनरकपाताच्या प्रत्ययासि [7]जड लाहो ।
म्हणउनि [8]कृष्ट निजोत्तरपट आंसुडितांचि, दुष्ट पडला हो. ॥ १६
धौम्यासि म्हणे, 'धांवा, मजला हें [9]मूर्त पातक विटाळी, ।
रक्षा मज कीर्तीसहि, कीं [10]स्वपरव्यसनपात कवि टाळी.' ॥ १७
पुनरपि कपिसाचि पिसा [11]क्षिप्र धरायास तीवर [12]उगारे ।
तों धांउनि धौम्य म्हणे, 'न उठ धराया सतीवर, [13]उगा, रे!' ॥ १८
ती नमुनि म्हणे मुनिला, 'न वदावें व्यर्थ, दुष्ट हा पिटे, ।
वोढिल तरि [14]जीवनही, पावेल न एक मात्र हानि पट. ॥ १९
[15]भवदाज्ञेनें बैसो [16]हे दुष्टरथीं [17]वृकोदरगदासी, ।
न [18]हरिप्रसादकविची [19]आपन्ना [20]खळवृकोदरग दासी.' ॥ २०
बसतां स्वरथीं हर्षे तो, जेंवि दशास्य जानकीलाभें, ।
धरि पररथासि ती कीं स्पर्शाया [21]अंत्यजा न [22]कीला भें. ॥ २१
ती बहु त्यासि दटावी, [23]कापासा काय [24]दीपिना कील? ।
काय बधेल पराला [25]सती त्यजुनि [26]कायदा [27]पिनाकीला? ॥ २२

---

१. हां हां=कांहीं एक कार्य करण्यास प्रवृत्त झालेल्या मनुष्यास 'मागें सर' असें जें म्हणावयाचें त्या अर्थाचें द्योतक हें अव्यय आहे. हां हां म्हणतांहि=मागें सर असें म्हणत असतांही. २. मर्कटासारखा, माकडासारखा. ३. यांत उत्प्रेक्षा आहे. ४. यांत उपमा आहे. ५. रावण. ६. पुढें येणाऱ्या नरकपाताचा अनुभव (प्रत्यय) जडाला (मूर्ख जयद्रथाला) आतांच यावा म्हणून. ७. मूर्ख. ८. आकृष्ट; जयद्रथानें ओढलेलें आपल्या आंगावरील वस्त्र द्रौपदीनें जोरानें ओढतांच तो दुष्ट जयद्रथ पडला. (अध्याय २६८ श्लोक २४.) ९. जयद्रथ हेंच मूर्तिमंत पातक. १०. शहाणा मनुष्य (कवि) आपलें व दुसऱ्याचें संकटांत पडणें टाळतो. हा चरण सुभाषितरूप आहे. ११. लौकर. १२. उठून धरावयास धांवे. १३. केवळ. १४. प्राण देखील. १५. तुमच्या आज्ञेनें. १६. ही मी द्रौपदी. १७. भीमाच्या गदेप्रमाणें. १८. कृष्णाचा प्रसाद हाच कवि (शुक्राचार्य) त्याची. १९. दुःखिता. २०. दुष्ट लांडग्याच्या (जयद्रथरूप वृकाच्या) उदरांत गेलेली असी. २१. अतिशूद्राला. २२. अग्निज्वाला. २३. कापुस. २४. दडपी. २५. पार्वती. २६. अर्धांग देणाऱ्या. शंकराला 'अर्धनारीश्वर' असें नांव आहे [स्तुतिकुसुमांजलि—एकविंश स्तोत्र—पृष्ठ २९५-३०१ पहा. काव्यमाला २३.] २७. शिवाला. (पिनाक आहे धनुष्य ज्याचें तो—शंकर. याच्या धनुष्यास 'अजगव' असेंही नांव आहे.) या पद्याच्या पूर्वार्धांत उपमा व उत्तरार्धांत प्रश्न आहे.

द्रथासह धांवत धौम्य मुनीश्वर म्हणे, 'अगा राहो! ।
हो मद, तूं न तया जोल्मत्वख्यातिच्या अगारा हो. ॥　२३
जरि तूळराशिमध्यस्वबिळीं नेईल आखु वातीतें ।
तरि वाति आखुतें वा! सहसा भक्षील आखु वा तीतें? ॥　२४
रे! तत्काळचि साध्वीधर्षणकर, जरि महातपा, मरतो.' ।
धौम्य मुनि असें सांगे हित, परि जोडी न हात पामर तो. ॥　२५
कृष्णाहि म्हणे, 'काय न कापिल गिळितां वृकानना शंस्त्री? ।
वधि दशमुखा, मग करिल एकमुखाचाहि कां न नाश स्त्री?' ॥२६
अपशकुनज्ञ युधिष्ठिर समजोनि अनिष्ट सानुज परतला, ।
जो मृगयेंत न चित्तें त्यजुनि दया, रामनामजप रतला. ॥　२७
तों मार्गीं भृत्याची भार्या धात्रेयिकाचि आढळली. ।
धांवे, पडेहि असकृत् नगशिखराहुनि जशी शिळा ढळली. ॥　२८
वृत्त कथुनि कोपानिल दीप्त करायासि पांडुयोधमनीं ।
सरला सुवंशजा ती झाली धात्रेयिकाचि, हो! धमनी. ॥　२९
रिपुला गांठाया ते पांडव देती भरों न घटिकेतें, ।
खळबळ बहु भी, जाणों न पळहि साधूपुढें अघ टिके तें. ॥　३०

हे राहुदैत्या. २. नीचत्वप्रसिद्धीच्या. ३. गृहा. ४. कापसाच्या राशीमधील आपल्या बिळांत. . ६. अथवा. ७. पतिव्रतेचा अपमना करणारा जरी मोठा तपस्वी असला तरी [हे जय- ो मरण पावतो. हें धौम्याचें भाषण मूळांत इतकें विस्तृत नाहीं, यावरून पंतांनीं वर्णन- ल्याचें हें स्थल एक उत्तम उदाहरण होय. पंताच्या काव्यांतील कथा जरी पुराणग्रंथांतील थापि कवितेस जीवनभूत अशा ज्या कल्पना त्या सर्व खुद्द पंतांच्याच आहेत असें मार्मिक दिसून येईल. ८. नीच. ९. लांडग्याच्या तोंडाला. १०. शस्त्रधारी. ११. सीता रावणाला वधी. 'द्रौपदीहरण' नामक पोटपर्व संपून 'जयद्रथविमोक्षण' पर्वास आरंभ होतो. १३. अशुभ ाणणारा [पांडवांचा कौरवांनीं उपमर्द केला इत्यादि अशुभ गोमायुशब्द ऐकून पुढें अनिष्ट युधिष्ठिरानें जाणलें. अध्याय २६९ श्लोक ७-८] १४. सेवकाची स्त्री=प्रेष्यवधु=दासभार्या. यिका या नांवाची. १६. वारंवार. १७. पर्वताच्या मस्तकावरून. १८. क्रोधाग्नि. १९. पांडु- मनांत. २०. सरळ; (पक्षीं) निष्कपट. २१. उत्तम कुळांत झालेली किंवा उत्तम वेळूची वंश=वेळु, कुल.) २२. हें रूपकालंकाराचें उदाहरण आहे. यांत धात्रेयिका आणि धमनी भेद वर्णिला आहे. २३. फुंकणी. २४. दुष्ट जयद्रथाचें सैन्य. २५. या पद्यांत खळब- ार्यीं अघाची आणि पांडवाच्या ठायीं साधूची संभावना केली आहे म्हणून हा उत्प्रेक्षालं- . याचें लक्षण:—'संभावनमथोत्प्रेक्षा प्रकृतस्य समेन यत्' (काव्यप्रकाश—दशम उल्लास, का- २), 'अन्यथैव स्थिता वृत्तिश्चेतनस्येतरस्य वा । अन्यथोत्प्रेक्ष्यते यत्र तामुत्प्रेक्षां विदुर्यथा ॥' र्शी—द्वितीय परिच्छेद—श्लोक २२१,) 'असत्त्वेन संभावनमुत्प्रेक्षा' (अलंकारकौमुदी) 'क- चिदौचित्यादत्रार्थस्य सतोऽन्यथा । द्योतिते वादिभिः शब्दैरुत्प्रेक्षा सा स्मृता यथा ॥' ंकार—चतुर्थ परिच्छेद—श्लोक ९० पहा.]

गांठिति रिपुकटकातें, हरिणाच्या सिंह जेंवि कळपातें, ।
रक्षील काय पतिला तें व्यसनीं होय जें विकळ पौतें? ॥
स्वरथावरूनि भूवरि उतरुनि देवीस, जरिहि नाकद न ।
वरिलें पलायन खळें कीं न पहावेचि लोचना कदन. ॥
धर्म स्वरथीं स्त्रीतें मुनितें घेउनि म्हणे पुरोध्यातें, ।
'व्हा शांत असेंचि प्रियराज्यश्रीमोचनें पुरो ध्या तें.' ॥
अर्जुन भीमासि म्हणे, 'न करावें व्यर्थ भीतभटकदन, ।
गेला पळोनि बहुधा दुष्ट जयद्रथ न दाखवी वदन.' ॥
भीम म्हणे, 'सपुरोहित राया! तूं आश्रमांत जायेतें ।
निर्ववी, तेंचि करावें तेणें, जें स्वच्छ कर्म जों येतें. ॥
जा सहदेवा! नकुळा! तूंही जा, या तिघांसि सांभाळा, ।
लावावा गेलें धन येतां हातासि, बोल कां भोळा? ॥
येतों, आतांचि नको साधाया शत्रुवध मला उशिर, ।
कृष्ण असो, जा आर्या!, त्वच्चरणा तों न अधम लाउ शिर'. ।
धर्म म्हणे, 'रे! बा! त्या निजभगिनीच्या न उग्र हो तिलकीं
नित्य सुतासौभाग्यक्षयशोकें पितर सास्रु होतिल कीं.' ॥

---

१. धन्याला, नायकाला. २. जें करक. ३. अधु, व्याकुळ, दुर्बल. ४. पतन पावल[illegible]
गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ५. स्वर्ग देणारें. (पलायनाचें विशेषण.) ६. मर्दन, युद्ध.
हितास. ८. शांत व्हा. राज्यश्रीमोचनें (आपली राज्यलक्ष्मी सोडविल्याच्या योगानें)
प्रिय (इष्ट) पुरो (मिळो) तें ध्या (असें चिंतन करा.) ९. ध्यान करा. १०.
वीरांचें मर्दन. ११. अध्याय २७१ श्लोक ३९-४२ पहा. १२. धौम्यासह. १३.
याचा कर्ता 'तूं.' १४. ज्याला जें कर्म उत्तम येतें तें त्यानें करावें. हें वचन सुभाषित[illegible]
१५. धर्म, द्रौपदी आणि धौम्य या तिघांला. १६. दोष. हें अर्ध सुभाषितरूप आहे. १७.
१८. 'येतों' या शब्दाचा उपयोग येथें 'जातों' या अर्थी केला आहे. हें विपर[illegible]
उदाहरण आहे. कुंकू वाढलें, तांदुळ वाढले, हातांतील बांगड्या वाढल्या—इत्यादि वाक्यांत
लक्षणा आहे. १९. अर्जुन. २०. अर्जुन मात्र माझ्याबरोबर असूं द्या. २१. हे धर्मा. २२
(नीच जयद्रथ) तुझ्या पायाला आपलें मस्तक न लावो—शरण न येवो, तसें झालें तर [illegible]
दया येईल—हें तात्पर्य. २३. आपल्या भगिनीच्या (दु:शलेच्या) तिलकाविषयीं म्हणजे
लकाविषयीं उग्र (कठोर) होऊं नको, तिच्या पतीला (जयद्रथाला) मारून तिला वैधव्य [illegible]
२४. सौभाग्य तिलकावर. येथें 'तिलक' शब्दाचा अर्थ वाच्यार्थ अथवा लक्ष्यार्थ न घेतां व्यं[illegible]
सौभाग्य त्याचें ग्रहण करावें लागतें. येथें तिलक हा शब्द सौभाग्यार्थाचा व्यंजक होय आणि
हा व्यंग्यार्थ होय. २५. कन्येच्या सौभाग्याच्या क्षयानें (वैधव्यानें) झालेल्या दु:खानें. २६
व गांधारी. २७. रोदन करणारे. [अध्याय २७१ श्लोक ४३ हा या पद्याशीं ताडून पाह[illegible]
आहे. या प्रकारचीं स्थळें—मोरोपंत हे भाषांतरकार होत—या आरोपाचें समर्पक खंडन

कृष्णा [1]म्हणे, 'अहो! जरि मत्प्रिय करणें, वधाचि तरि [2]त्यातें, ।
मारावेंचि नयज्ञें [3]श्रीतें स्त्रीतें बळेंचि [4]हरित्यातें.' ॥ ३९
[5]कोशमितांतर असतां, बी[6]भत्सु म्हणे शरांस, 'कळवा जी!' ।
आलों, असें [7]अरिस, तो दूर न जावा, वधा सकळ [8]वाजी.' ॥ ४०
[9]अर्जुननामांकितशरहत [10]हयं पाहूनि फार तो भ्याला, ।
बहु [11]पापजीवितहि त्या प्रिय, जैसें [12]पापवित्त लोभ्याला. ॥ ४१
धांवोनि त्यासि सार्जुन भीम महाबळ पळांत आटोपी, ।
ज्याचें चित्त म्हणे सक्रोधा, '[13]और्वा! खलाब्धि [14]आटो, पी.' ॥ ४२
अर्जुन म्हणे, 'उभा रे! सिंहत्व त्यजुनियां [15]नै कुतरा हो; ।
[16]उतरा हो, क्षण पाहो, जा यमभट हो! तळीं न उतरा हो. ॥ ४३
रे! रे! जयद्रथा! हें योग्य नव्हे तुज पलायन, परत रे! ।
[17]अभिमुख मरोनि जरि पळ पळतां न [18]महाबलायन पर तरे.' ॥ ४४

---

१. अध्याय २७१ श्लोक ४५-४६ पहा. २. त्या जयद्रथातें. ३. लक्ष्मीतें. ४. हरणकर्त्यातें. ५. कोशपरिमित अंतर म्हणजे कोसभर अंतर असतां. ६. अर्जुन. ७. जयद्रथाला. ८. घोडे. (जयद्रथाचे घोडे आणि अर्जुन यांच्यामध्यें एक कोस अंतर असतां.) ९. अर्जुनाच्या नांवानें चिन्हित अशा बाणांनीं मारलेले. १०. अश्व. ११. दुष्टकर्मांमध्यें घालविलेलें आयुष्य. १२. दुष्टाचारानें संपादिलेलें धन. येथें उपमा आहे. १३. और्व म्हणजे समुद्रांत राहून त्याचें जल शोषण करणारा अग्नि. याची कथा अशी:—और्व नामक एक मोठा भार्गववंशोत्पन्न मुनि होता. त्यास असें कळलें कीं कार्तवीर्यकुलोत्पन्न राजांनीं भार्गवसंततीचा उच्छेद करून आपल्या कुलांतील स्त्रियांस द्रव्यानिमित्त बहुत पीडा दिली. तेव्हां यानें त्याच्या नाशासाठीं तपःप्रभावानें भयंकर अग्नि उत्पन्न केला. त्यामुळें क्षत्रियांस फार त्रास झाला, तेव्हां ते और्वाच्या पितरांस शरण गेले. नंतर पितरांच्या आज्ञेवरून और्वानें आपला कोपानल समुद्रांत टाकिला. यासच 'वडवाग्नि,' 'वडवानल,' 'वाडव,' 'और्व' असें म्हणतात. और्व म्हणजे ऊर्वपुत्र अथवा ऊरूचा (मांडीचा) भेद करून निघालेला, कारण हा मातेच्या ऊरूपासून झालेला होय. याचा नाश न व्हावा म्हणून याच्या मातेनें यास आपल्या मांड्यांत गुप्त ठेविलें होतें. १४. हे क्रोधरूप वडवानला! हा खल (जयद्रथ) हाच अब्धि (समुद्र) आटो, पी, हा आटूं दे, याला गिळून टाक. १५. कुतरा होऊं नको. १६. अर्जुन म्हणतो:—उतरा हो (अहो यमभट! खालीं या, मी जयद्रथास मारतों.) [असें यमभटास म्हणून जयद्रथास मारण्यासाठीं अर्जुन सिद्ध झाला. परंतु रणांगणीं मरून उत्तम गतीस जाण्याची त्याची इच्छा आहे किंवा कसें हें पाहण्यासाठीं तो पुनः त्यांस म्हणतो] क्षण पाहों=क्षणभर वाट पाहूं द्या म्हणजे त्याची इच्छा कळेल. १७. पर (शत्रु) जरि महाबलायन (महाबलाढ्य) तरी पळ पळतां न तरे, (पळ काढीत असतां तरत नाहीं (परंतु) अभिमुख (समोरासमोर युद्ध करीत असतां) मरोनि तरे. महा+बल+अयन=थोर+शक्ति+स्थान. १८. मोठ्या बळाचें स्थान.

भीम रथावरुनि उडी टाकुनि धांवुनि धरी तया अरितें,[1] ।
वाटे[2] प्रभुचें भीमाकृति[3] खलबलदलनलब्धयश[4] अरि[5] तें.[6] ॥ ४५
व्यसनीं न पडेल कसा व्याघ्रबिळीं जो मदांध ओतुं[7] निघे ? ।
कीं पद्मराग[8] मानुनि जो पदरीं विंगळांशि[9] ओतुनि घे. ॥ ४६
बुकली भीम, बुकलिती जैसें यज्ञांत बोकडाला [10]हो ! ।
कीं तो[11] साध्वीघर्षणदोषफलानुभव[12] रोकडा लाहो.[13] ॥ ४७
विकळ जयद्रथ होतां, वारी[14] धर्मानुजा[15] गुडाकेश,[16] ।

---

१. शत्रूतें (जयद्रथातें). २. यांत उत्प्रेक्षालंकार आहे. ३. भीमाचें स्वरूप घेणारें (भयंकर). ४. दुष्टांच्या सैन्यांच्या नाशापासून मिळविलें आहे यश ज्यानें असें प्रभूचें (विष्णूचें) तें अरि- (चक्र–सुदर्शन)च वाटे. ५. सुदर्शन. ६. तें भीमाचें कर्म. ७. बोका. ८. शोणरत्नविशेष, लोहितकरत्न. ९. विस्तव, निखारा. (विंगळा, इंगळा=अंगार.) ही गीति सुभाषितरूप आहे. या पद्याच्या पूर्वार्धांत प्रश्न आणि उत्तरार्धांत रूपक आहे. १०. अहो. ११. तो जयद्रथ. १२. पतिव्रतेच्या (द्रौपदीच्या) अतिक्रमाच्या दोषांच्या फळाचा अनुभव, द्रौपदीची अमर्यादा केली या अपराधाच्या फळाचा अनुभव. १३. पावो, लाहो=लाधो–हीं रूपें लभ् (मिळणें) या धातूचीं आहेत. १४. निवारी. [अध्याय २७२ श्लोक ६.] १५. भीमाला. १६. अर्जुन. [गुडाकेश=हा शब्द प्रस्तुत पद्यांत अर्जुन याअर्थी योजिला आहे. या पदाचा शब्दार्थ 'गुडाका' म्हणजे निद्रा आणि 'ईश' म्हणजे स्वामी. ह्याचा उपयोग 'हृषिकेश' शब्दाप्रमाणें केवळ विशेषनामाप्रमाणें समजावयाचा. 'निद्रेचा स्वामी' म्हणजे निद्रारूप भ्रांतीचा अथवा अज्ञानाचा नियंता, दमनकर्ता. निद्रा ही एक भ्रांती आहे, तेव्हां अशा भ्रांतीस जिंकून जो सदासर्वदा सावध, दक्ष असतो त्यास 'गुडाकेश' असें म्हणावें; परंतु अशा प्रकारची 'गुडाकेश' शब्दाची व्याख्या घेतली असतां तिची संगति सदासर्वदा अर्जुनाच्या व्यवहाराशीं मिळेल असा नेम नाहीं. कारण, अर्जुनाचीं कांहीं कृत्यें अदक्षताद्योतक आढळणार आहेत, तेव्हां 'गुडाकेश' हें नांव अर्जुनास अर्थानुरोधानें यथार्थपणें लागू पडत नाहीं; परंतु अर्जुनव्यतिरिक्त इतरांस 'गुडाकेश' असें म्हणण्याचा व्यवहार नाहीं, म्हणून तें विशेषनाम समजावें. पाश्चिमात्य गीर्वाणभाषाभिज्ञ पंडितांनीं प्रस्तुत शब्दाचा अर्थ कल्पनेनें बसविला आहे तो असा:—गुडा म्हणजे गुळवेल, तिच्या गांठीसारखे ज्याचे केश गुंतलेले आहेत तो 'गुडाकेश'. हा अर्थ काल्पनिक असल्या कारणास्तव त्याजविषयीं ज्यास्त लिहिण्याची आवश्यकता नाहीं. प्रस्तुत शब्दावर **शंकरानन्दसरस्वती**कृत गीतेवरील टीकेंत पुष्कळ मोठें व्याख्यान केलें आहे, त्यांत 'गुडाक' म्हणजे 'शिव' आणि 'ईश' म्हणजे 'स्वामी' यांचा बहुव्रीहि समास करून 'गुडाक आहे ईश ज्याचा तो' गुडाकेश म्हणजे अर्जुन असा एक अर्थ काढिला आहे. आमच्या वाचकांस वामनपंडितांचें पुढील विवरण पहिला अर्थ ध्यानांत धरण्यास चांगलें साधन होईल असा भरंवसा आहे. वामनपंडित आपल्या यथार्थदीपिकेंत असें म्हणतात:—'कीं तो अर्जुन गुडाकेश । गुडाका निद्रा तिचा ईश । निद्रा भ्रांती तिचा प्रवेश । न घडे बुद्धींत अर्जुनाच्या ॥ ७१ ॥ तोच भ्रांतीचा ईश । ज्याच्या मनीं ते न करी प्रवेश । या भावें म्हणे गुडाकेश । अर्जुनातें.॥ ७२ ॥'

कीं [1]तत्सत्सेव्यगुणा कोपें[2] न दूषू, जसा [3]गुडा केश. ॥ ४८
भीम म्हणे, '[4]गुरुदुःखद तो [5]स्त्रीजितसा[6]चि हा [7]दयाजित कीं, ।
चालो न देचि कर्मे मी करितों जीं हितोदया जितकीं. ॥ ४९
हा धर्म दयाजित तुज योग्य सखा स्त्रीजिता [8]दशरथा ! रे ! ।
शर [9]सह्य पार जातां, हृदयींच [10][11]जनापवादशर [12]थारे. ॥ ५०
वत्सा ! जैसा तो [13]गुरु होतोसि तसाचि तूंहि कां ? पावें, ।
या पापातें पाहुनि सन्नयनें न, नरकेंहि [14]कांपावें. ॥ ५१
देवूं दे [15]प्राणांतप्रायश्चित्त स्वकीय हा नर कीं ।
मूर्खहि [16]सुहृत् वसावा स्वर्गीं चिरकाळ, कीं महानरकीं ?' ॥ ५२
वधसम विडंबन असें समयींच स्मरण [17]शास्त्रपाटव दे, ।
[18]अर्धेंदुशरें त्याच्या माथां [19]काढूनि पांच [20]पाट वदे. ॥ ५३
'मीं पांडवदास असें स्वमुखें सर्वत्र बोलशील तरी ।
देईन जीवित तुला, तारी [21]विपदब्धिमाजि [22]शीलतरी.' ॥ ५४
वंदुनि म्हणे जयद्रथ, 'ऐसेंच म्हणेन मी सदा साचें; ।
मारूं नका बुक्यांनीं, रक्षावें जीवित [23]स्वदासाचें.' ॥ ५५

---

१. त्याचा (धर्माचा) साधूंनीं सेवण्यास योग्य असा दयारूप गुण जो त्याला. २. तुझा राग. ३. गुळाला केंस तसा. ['गुडौ गोलेक्षु विकृती स्नुही गुडिकयोर्गुडा' इति रुद्रः.] ४. मोठें दुःख देणारा. ५. दशरथ. ६. बायकोनें (कैकेयीनें) जिंकिलेला, बायको म्हणेल तसें वागणारा. ७. धर्म. ८. दयावान्, दयारूप बायकोनें जिंकिलेला. [अध्याय २७२ श्लोक ८]. ९. हें परोक्षजनसंबोधनोक्ति नामक अलंकाराचें उदाहरण आहे. १०. सहन करण्यास योग्य. ११. शर (बाण) शरीरांतून फार निघून जातो म्हणून तो सह्य होय, परंतु लोकनिंदारूप बाण हृदयांत रुतून राहतो (थारे) यास्तव तो असह्य होय. १२. थारे=स्थिर होतो. थारा, थिराई, थीर इत्यादि शब्द स्था (रहाणें) धातूपासून उत्पन्न झाले आहेत. १३. धर्म. १४. वत्सा! (अर्जुना!) जसा तो गुरु (धर्म) झाला तसाचि तूंही कां होतोस ? पावें (प्रसन्न हो आणि तसा होऊं नकोस). या पापातें (अधम जयद्रथातें) पाहून चांगल्या लोकांचे नेत्र (सन्नयन) भयचकित होतील इतकेंच नव्हे, तर याला पाहून खास नरक देखील थरथर कांपूं लागेल. १५. मरणरूप दंड. १६. मित्र. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १७. शास्त्रकुशलत्व. १८. अर्धचंद्र बाणानें. (अध्याय २७२ श्लोक ९.) जयद्रथाच्या डोक्यावर पांच ठिकाणीं पांच पाट काढले. जयद्रथाचा पांच ठिकाणीं डोक्यावर क्षौर केला. १९. पांच पाट काढणें=कोणाची अप्रतिष्ठा करावयाची असतां डोकीच्या केंसाचे वस्तऱ्यानें पांच पट्टे काढणें. हा एक शिक्षेचा प्रकार समजतात. २०. डोकीच्या केशांचा वस्तऱ्यानें जो पट्टा काढतात तो=पाट. २१. संकटरूप सागरांत. [अध्याय २७२ श्लोक १०-११]. हा पाद सुभाषितरूप आहे. २२. स्वभावरूप नौका. २३. आपल्या सेवकाचें (माझें).

ज्या[1]पासूनि धरावी प्रबळतराराति[2]च्याहि भी मानें[3] ।
बांधुनि केतुस्तंभीं[4] खळ[5] नेला स्वाश्रमासि भीमानें. ॥ ५६

प्रेषूनि[6] कोटरेतें[7] प्रेम्यानें[8] जेंवि बाण राखविला, ।
तैसाचि निजाज्ञेनें जेणें[9] तो[10] त्या प्रभूसि[11] दाखविला[12]. ॥ ५७

धर्म तशासि विलोकुनि भीमासि म्हणे, 'अगा! महाबाहो! ।
सोडें[13], न विलोकवे मज, द्याया असु[14] मृत्युला न हा बाहो[15].' ॥ ५८

भीम म्हणे, 'देवीला सांगा, ती जरि म्हणेल, सोडीन, ।
नाहीं तरि मी याचा सत्यंचलकर्ष[16] पाणि[17] तोडीन. ॥ ५९

कां सोडितां असों द्या, हा निजदासांत दास राबावा, ।
या कामहता रक्षा, पायांचा द्याचि आसरा, बावा!' ॥ ६०

कृष्णा धर्मासि म्हणे[18], 'देवा! सोडावयासि सांगा, जी! ।
मज देखवे न शिवती निर्दयतेसह[19] अकीर्ति आंगा जी.' ॥ ६१

धर्म म्हणे, 'रे साधो! जाऊं दे, सोड, दे मला बा! हें, ।
जातें त्यजुनि भलेपण, न विटावें सुयश तें, तया बाहें[20].' ॥ ६२

भीम म्हणे, 'मी पांडवदास, असें तीनवेळ मोठ्यानें ।
हा खळ[21] म्हणो, भल्याला विनवावें धरुनि पाय खोट्यानें.' ॥ ६३

---

१. ज्या जयद्रथापासून. २. अतिबलाढ्य शत्रूच्याहि. ३. अभिमानानें, गर्वानें, ताठ्यानें. ज्या भीमापुढें अत्यंत बलाढ्य शत्रूही नष्टगर्व होतो—असा भाव. ४. ध्वजस्तंभीं. ५. दुष्ट जयद्रथ. ६. पाठवून. ७. बाणासुराची माता तीतें. ८. पुत्रप्रेम्यानें कोटरेला पाठवून जसें बाणासुराचें संरक्षण केलें. बाणासुर व कृष्ण ह्यांचें युद्ध चाललें असतां शेवटीं आपल्या पुत्राचा नाश होतो असें पाहून बाणासुराची आई कोटरा नग्न होऊन रणांगणांत कृष्णापुढें येऊन उभी राहिली, तेव्हां कृष्णानें खालीं मान घातली, नंतर बाणासुर युद्धांतून परतला, अशी कथा आहे. (नवनीत.) [मोरोपंत–बृहद्दशम–अध्याय ६३ श्लोक १९-२०.] ९. धर्मानें. १०. जयद्रथ. ११. धर्मासि. १२. भीमानें पुढें उभा केला. [अध्याय २७२ श्लोक १५.]. १३. या जयद्रथाला मुक्त कर. १४. प्राण. १५. बोलावो. १६. सतीचा पदर ओढणारा असा. १७. हात. १८. अध्याय २७२ श्लोक १८ पहा. ही द्रौपदीची उक्ति मूळांतील पद्यार्शी ताडून पाहण्यालायक आहे. या गीतीच्या उत्तरार्धांतील अर्थास मूळांत आधार नाहीं, यावरून मोरोपंत हे भाषांतरकार किंवा काय याचा निर्णय करण्यास साधन मिळतें. १९. हें सहोक्तिनामक अलंकाराचें उदाहरण आहे. याचें लक्षण:—'सा सहोक्तिः सहार्थस्य बलादेकं द्विवाचकम्' [काव्यप्रकाश–दशम उल्लास ११२.] जेथें एक पद सह, समं, साकं इत्यादि शब्दांच्या अर्थान्वयाच्या बळावर अनेकार्थवाचक होतें तेथें हा अलंकार होतो. २०. निर्दय कर्मानें आपल्यापासून जाणाऱ्या सुयशास बाहें (बोलाव, जाऊं देऊं नको, सुयशाला राख.) २१. हा जयद्रथ.

धर्म म्हणे, 'गा भीमा! तुज जरि आम्हीं [1]प्रमाण, तरि सोडीं, ।
न वदें निष्ठुर कांहीं, [2]अभयवितरणें [3]संदीड्य [4]यश जोडीं.' ॥ ६४
भीमें गुरुमंत्रवशव्याघ्रें मृगसाचि सोडितां, नमनें ।
धर्मासि [5]करि, [6]वरि लवे मात्र शिरें, [7]दुष्ट अंतरीं, न मनें. ॥ ६५
[8]नृप त्यासि म्हणे, 'ध्याया [9]भुजगीच्या शोभतां नर मणीतें ।
वांचेल, परि पराच्या चित्तेंहि स्पर्शतां न [10]रमणीतें. ॥ ६६
जा, यावरि न करावें पाप असें, मागतों मला दे हें, ।
जें कर्म [11]धर्मशर्मद त्यासचि संपादितो [12]भला देहें.' ॥ ६७
खल न खलत्व त्यागी, जरि सामें [13]गौरवूनि बोळविला, ।
[14]लकुच कटुचि [15]अमृतकराकरवींही शर्करेंत घोळविला. ॥ ६८
हरदर्शनार्थ गंगाद्वारीं तपतां [16]तया [17]कृपापर [18]तो ।
भेटोनि म्हणे, 'घे वर, कष्टापासोनि मति [19]नृपा! परतो. ॥ ६९
'युद्धांत पंचपांडवपरिभव [20]हो मत्करें' असेंच वदे, ।
[21]प्रभुकर्णीं तें बहु कटु वच, जाणों [22]गरें मुखीं [23]रसें चव दे. ॥ ७०
शंभु म्हणे, 'नारायणसख नर अर्जुन पुराणऋषि, तातें ।
धनसें, [24]पाशुपतहि म्यां त्यासि दिलें, जेंवि [25]अमृत तृषितातें. ॥ ७१
मजपासीं तुज द्याया [26]तद्भंगावह असा नसेच वर, ।
हो [27]मशकमक्षिकाहर गरुडा नाशी असें नसे [28]चंवर. ॥ ७२

---

१. अनुल्लंघनीयत्वेंकरून मान्य असा पुरुष, शास्त्राधार इत्यादि तो. २. अभयदानानें. ३. साधूंनीं स्तुत्य असें. ४. या उत्तरार्धास मूळांत आधार नाहीं. ५. तो जयद्रथ नमनें करी. ६. वरवर, बाहेरून. ७. दुष्टात्मा. ८. धर्म. ९. सर्पिणीच्या. सापाच्या मस्तकावर मणि असतो अशा समजुतीस अनुसरून हें वर्णन आहे. [मागें अध्याय ९ गीति १२ पहा.] १०. स्त्रियेतें. ११. पुण्यकारक आणि सुखकारक. १२. सुजन. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १३. आदरानें रवानगी केली. १४. ओंठीचें फळ. १५. अमृत आहे ज्याच्या करीं (किरणांत) अशा चंद्राकरवींही. १६. जयद्रथाला. [जयद्रथ मुक्त झाल्यावर शंकरप्रसाद प्राप्त व्हावा म्हणून गंगाद्वारीं तप करण्यासाठीं आला.] १७. दयाशील. १८. शिव. १९. हे जयद्रथा. २०. होवो. २१. शंकराच्या कानांत. २२. विष. हें उत्प्रेक्षालंकाराचें उदाहरण आहे. २३. गोडीनें. २४. पाशुपत नामक अस्त्र. (अध्याय २७२ श्लोक ३० पहा.) २५. उदक. २६. त्या अर्जुनाचा पराभव करण्यासारखा. २७. याचें विशेष्य 'चवर.' २८. चवरी (चामर). चमर नांवाचा महिषाकृति मृग असतो त्याच्या शेंपटाचें चामर नामक व्यजन (चंवरी) करतात.

यश [1]एकदाचि अर्जुनरहितहि चवघां रणांत भंगुनि घे, ।
मेरु असो, बहु हेंही जरि लंघुनि [2]कुळगिरीसि पंगु निघे.' ॥ ७३
झाला [3]गुप्त महेश्वर, तो [4]बालिश [5]मनुजदेव [6]वेदा त्या ।
प्रभुसहि विटवी मागुनि, जें [7]तैशाही न देववे दात्या. ॥ ७४
मागावा [8]कामाद्यरिपरिभववर [9]वरदनायका, परि तो ।
[10]सत्परिभववर मागे, खळ न [11]पराहित [12]निजाहितहि करितो. ॥ ७५
[13]स्वगृहा जाय जयद्रथ विसरुनियां दुःख तें परिभवाचें, ।
[14]दासासमंजसत्वें क्षोभे मन शांतही परि [15]भवाचें. ॥ ७६

अध्याय दहावा.

[16]मार्कंडेयाशि म्हणे धर्म, 'बुडालों अगाध शोकांत.' ।
सांगा मत्सम [17]मदधिक जरि [18]दृष्टश्रुत असेल लोकांत.' ॥ १
त्या धर्माला श्रीमद्रामकथा [19]सांग होय परिसविता ।
[20]भगवद्यश कथिताचि [21]त्रिजगद्बंधु, न [22]तमोघ्न परि [23]सविता. ॥ २

१.एकवार, सर्वदा नव्हे. २.कुलपर्वतांस. हे कुलगिरि सात आहेत त्यांचीं नांवें:—महेंद्र, मलय, सह्य, शुक्तिमान्, ऋक्ष (गंधमादन), विंध्य, आणि पारिपुत्र (पारियात्र). येथें मेरुपर्वताशीं तुलना करून पाहिलें असतां कुलगिरि म्हणजे 'लहानसा डोंगर' असा अर्थ इष्ट दिसतो. येथें पूर्वार्धात शंभुदत्तवरवर्णन आहे आणि उत्तरार्धात त्यावर कवीचा अभिप्राय आहे. हे जयद्रथा! अर्जुनरहित चवघां पांडवांचा मोड करून तूं एकवारच यश घे, या वरास अनुलक्षून पंत म्हणतात:—मेरुपर्वत तर फारच मोठा, तो एकीकडे राहूं दे, त्याची गोष्ट कशाला? पण जर एखादा पांगळा स्वतां कुलपर्वतांपैकीं एकास जरी लंघुनि येईल, तर काय थोडें झालें? अर्थात् नाहीं, इतकें देखील पुष्कळ झालें म्हणावयाचें. ३. अध्याय २७२ श्लोक ८० पहा. ४. मूर्ख. ५. जयद्रथराजा. ६. ज्ञानस्वरूप शिवाला. ७. शंकरासारख्या. ८. कामादिक सहा रिपूंचा पराभव व्हावा हा वर. ९. वर देणाऱ्यांच्या नायकाला. (शंकराला.) १०. सज्जनांच्या परिभवाचा वर. ११. दुसऱ्याचें अकल्याण. १२.आपलें अकल्याण. हा चरण सुभाषितरूप आहे. १३.अध्याय २७२ श्लोक ८१पहा. १४. दासाच्या (जयद्रथाच्या.) असमंजसपणानें. १५. शंकराचें. येथें 'जयद्रथविमोक्षण' नामक पोटपर्व संपतें. १६. येथें रामोपाख्यानास आरंभ होतो. १७. माझ्यापेक्षां अधिक दुःखी. १८. पाहिलेला, ऐकिलेला. १९. सर्व. २०. भगवंताची कीर्ति. २१. भगवद्यश सांगणारा हाच खरोखर त्रिलोकबांधव होय, सूर्य काळोख नष्ट करतो तरी तो त्रिजगन्मित्र नव्हे. भगवद्यश कथिता हा सूर्याहून श्रेष्ठ—असें तात्पर्य. २२. अंधकारनाशक. २३. सूर्य.

इक्ष्वाकु[1]कुलज दशरथ राजा, तत्कीर्ति विष्टपीं[2] सुतता,[3] ।
स्वीकारिली तयाची साक्षात् श्री[4]प्राणवल्लभें सुतता[5]. ॥ ३
कौसल्यासुत राम प्रभु, कै[6]केयीज कीर्तिला[7] भरत, ।
पुत्र सुमित्रेचे ते लक्ष्मण शत्रुघ्न कीर्तिलाभरत[8]. ॥ ४
एकचि देवें[9] चतुर्धा[10] यापरि त्या रविकुळांत[11] अवतरला, ।
यन्नामें[12] विषपानव्यसनीं[13] म्हणती कवींद्र[14] भव[15] तरला. ॥ ५
मुनिवर पुलस्त्य[16], तत्सुत वैश्रवण[17], त्यजुनि त्यां[18] दयानिधिला ।
पद्माला भृंग तसा[19] तो[20] नित्य भजे पितामहा विधिला[21]. ॥ ६
सुत[22] पीडाया देहांतर[23] घे तो ख्यात विश्रवा नावें, ।
रसिक कवींनीं त्याचें तेंहि चरित अमृतमिश्र वानावें. ॥ ७
वरदें विधिनें दिधली वैश्रवणा[24] अमरता कनकलंका, ।
सख्यहि तेणें देवें[25] नाशी ज्याचें विलोकन कलंका[26]. ॥ ८
तो विश्रवा पिता[27] न क्षोभावा म्हणुनि राक्षसी कन्या ।
सेवार्थ दे[28] तिघी[29] त्या ज्या बहु आराधिती तयां[30] धन्या. ॥ ९
तो विश्रवा म्हणे 'वर मागा' ऐसें तिघींसहि, तदा त्या ।
सुत मागती प्रसन्ना मुनिला जोडोनि हात हितदात्या. ॥ १०
पुष्पोत्कटेसि दिधले सुत दशमुख कुंभकर्ण या नावें, ।
साधु बिभीषण मा[31]लिन्यात्मज ज्या त्रिभुवनेंहि मानावें. ॥ ११

---

१. इक्ष्वाकु=वैवस्वत मनूच्या दशपुत्रांतील ज्येष्ठ. हा सूर्यवंशांत अत्यंत प्रख्यात असून यानें वसिष्ठापासून अध्यात्मविद्या संपादिली. २. जगांत. ३. अत्यंत विस्तृतता. ४. श्रीविष्णूनें. ५. पुत्रपणा. ६. कैकेयीपासून झालेला. ७. कथिजेला, वर्णिला. ८. यशोलाभानुरक्त. ९. विष्णु. १०. चार प्रकारांनीं. 'धा'प्रत्यय संख्यावाचक शब्दांपुढें प्रकारार्थी होतो; जसें—चतुर्धा (चार प्रकारांनीं), पंचधा (पांच प्रकारांनीं), एकधा, द्विधा, त्रिधा, इत्यादि. ११. सूर्यवंशीं. १२. ज्याच्या नामानें, नामस्मरणानें. १३. हालाहल नामक विषाचें सेवन केलें त्या संकटांत. १४. पंडितश्रेष्ठ. १५. शंकर. १६. हा ब्रह्मदेवाचा मानस पुत्र. १७. कुबेर. वैश्रवण हा पुलस्त्य+गो यांचा पुत्र. (अध्याय २७४ श्लोक १२.) १८. पुलस्त्याला. (अध्याय २७ श्लोक १३.) १९. येथें उपमा आहे. २०. आज्याला. २१. ब्रह्मदेवाला. २२. वैश्रवण. हें भारतांतील वर्णन रामायणांतील वर्णनाशीं सर्वांशीं जुळत नाहीं हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें. २३. अन्यदेह, विश्रवा नामक रूप पुलस्त्यानें घेतलें. २४. कुबेरास. २५. शंकराशीं सख्य (मित्रता). २६. दोषा. २७. कुबेराचा पिता विश्रवा. २८. कुबेर दे. २९. पुष्पोत्कटा, राका आणि मालिनी. (अध्याय २७५ श्लोक ४.) ३०. विश्रव्याला. ३१. मालिनी नामक राक्षसीचा पुत्र.

खर शूर्पणखा झालीं दोन अपत्यें तिज्याहि राकेला, ।
ज्यांहीं लज्जित दावुनि [1]हृत्काठिन्या निजा हिरा केला. ॥ १२
[2]ऐका कालीं [3]धनपति पाहुनि ते दशमुखादि [4]तळमळले, ।
[5]साधूत्कर्षासहनत्वें केव्हां कोणते न खळ [6]मळले ? ॥ १३
शुभकाम बिभीषण, दशमुख [7]कुंभश्रुति कुकाम हे भारी, ।
[8]तप करितां भय देती [9]विघ्नांशि, जसे [10]वृकां [11]महेभारी. ॥ १४
खर शूर्पणखा त्यांची सेवा करिती जपोनि, [12]धीरानीं ।
आराधिला तपें विधि, न तसे तपले [13]तपोनिधी रानीं. ॥ १५
[14]एकसहस्राब्दांतीं शिर दशवदनें स्वयेंचि कापावें, ।
तें होमूनि, म्हणावें, '[15]पद्मभवा ! [16]वरदनायका ! [17]पावें'. ॥ १६
भेटे प्रसन्न विधि त्या दशकंठा कापितांचि [18]दशमातें, ।
वारुनि म्हणे, 'म्हणोत न या कर्मे निर्दय [19]त्रिदश मातें. ॥ १७
वर एका अमरत्वावांचुनि देतों समस्त, माग मला, ।
वत्सा ! वद, हें तप गुरु [20]भार मज तुझ्या [21]गुरूत्तमा गमला. ॥ १८
येतिल शिरें, [22]विरूप न दिससिल, होसील [23]कामरूपधर, ।
[24]जेतों रणीं अरींचा, स्थैर्यें जैसा [25]महीध्र[26]भूपधर'. ॥ १९

---

१. हृदयाच्या कठोरपणाला. या उत्तरार्धाला मूळांत आधार नाहीं. हें पंतांच्या कल्पनाचातुर्याचें फळ आहे. २. गंधमादनपर्वतावर बापापाशीं अर्धासनावर कुबेर बसला असतां. ३. कुबेर. ४. दुःखित झाले. ५. सज्जनांचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळें ६. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ७. कुंभकर्ण. ८. रावणानें एका पायावर उभें राहून, वायु भक्षण करून पंचाग्निसाधन करून ब्रह्मदेवास संतुष्ट करण्यासाठीं तप केलें; कुंभकर्णानें भूमिशयन करून नियताहार असें तप केलें; बिभीषणानें शीर्ण पर्ण सेवून जपपरायण आणि उपवासरत असतां तप केलें. ९. यांच्या तपानें विघ्नेंही भय पावत. यांच्या तपापुढें विघ्न हा पदार्थ कांहींच किंमतीचा नव्हता. १०. लांडग्यास. ११. मोठ्या हत्तीचे शत्रु सिंह. [मह+इभ+अरी=मोठे+गज+शत्रु. १२. जितेंद्रियांनीं. १३. तपस्वी मुनि. १४. एक हजार वर्षांच्या शेवटीं. एक हजार वर्षें संपलीं म्हणजे रावणानें आपलें एक एक डोकें कापावें आणि त्याचा होम करून ब्रह्मदेवास म्हणावें कीं, 'हे पद्मभवा ! वरदनायका ! पावें.' १५. हे कमलसंभवा ब्रह्मदेवा. १६. वर देणाऱ्यांमध्यें श्रेष्ठा. १७. प्रसन्न हो. १८. दहाव्या शिरातें. १९. देव. [तिसरी दशा—यौवन—सदा ज्यांस असते ते; देव सदा पंचवीस वर्षांचे असतात असें वर्णन रामायणांत आहे.] २०. ओझें. २१. तुझा श्रेष्ठ गुरु मी त्या मला. तुझ्या बापाच्या बापाला: २२. तुला वैरूप्य प्राप्त होणार नाहीं. २३. इच्छेस येईल तें रूप धरणारा. २४. जिंकणारा. ['जि'धातूला 'ता'प्रत्यय लागून 'जेता' असें रूप झालें. 'ता' हा कर्तृत्ववाचक प्रत्यय लागण्यापूर्वीं अंत्य लघु स्वरास गुण होतो असा नियम आहे—कृ-कर्ता, हृ—हर्ता.] २५. पर्वत. २६. राजांना धारण करणारा, राजाधिराज.

रावण म्हणे, 'प्रभो! मी सादर ऐसा तपीं असें देहें, ।
अमरत्व न देसी जरि तरि मजला मागतों असें दे हें. ॥ २०
असुरसुरयक्षराक्षसकिंनरगंधर्वसर्पभूतगणें, ।
[1]मत्परिभव न करावा, हे माझ्या [2]शासनांत [3]भू तगणें'. ॥ २१
ब्रह्मा म्हणे, 'मनुष्यावांचुनि जे [4]कीर्तिले तुवां सारे, ।
यांपासूनि नसो भय, परि न नरां वानरांसि [5]हांसा रे!' ॥ २२
[6]घटकर्णे [7]महानिद्रा मागे जोडूनि हात दात्यातें, ।
मंदा[8] सुरद्रु[9] झोळी[10] तैसी दे तीचि[11] हा तदा त्यातें. ॥ २३
'[12]परमापदेंतही मति धर्मींच रतो, [13]अशिक्षितचि देवा! ।
ब्रह्मास्त्रहि [14]स्फुरो, हें द्या गुरुजी! साधुंची घडो सेवा'. ॥ २४
मागे असें बिभीषण, त्याशि म्हणे ब्रह्मदेव, 'वत्सा! हें ।
घे अमरहि हो, व्हाया सुयश [15]ब्रह्मण्यदेववत् साहें'. ॥ २५
विधि वर देउनि जातां, करुनि रणीं कीर्तिहानि [16]धनपतितें, ।
प्रथम [17]पराभविलें त्या दशकंठें व्हावया [18]निर्धन [19]पतितें. ॥ २६
[20]पुष्पक विमान, लंका, हरितां धनपति म्हणे, 'कुलकलंका! ।
[21]त्रासें संप्रति, हर्षें मग, पोषू त्वत्क्षयें [22]पुलक लंका. ॥ २७
[23]मल्लोचनीं निरखिले बहु, परि कुतराचि [24]यागग न [25]यांनीं, ।
योग्य नव्हेसि बसाया, पापा! तूं तेंवि या [26]गगनयानीं. ॥ २८
वाहेल तुज न पुष्पक, जो तुज मारील त्याशि वाहेल, ।

---

१. माझा पराभव, मोड. २. आज्ञेंत पृथ्वी असणें. ३. पृथ्वी. ४. सांगितले. [अध्याय २७५ श्लोक २६.] ५. नर व वानर यांस हसूं नका, कारण त्यांजपासून तुम्हांस भय आहे. ६. कुंभकर्ण. ७. गाढ झोंप. ८. मूर्खाला. ९. कल्पवृक्ष. १०. झोळी=भिक्षा मागण्यासाठीं जी झोळण्यासारखी करतात ती. ११. महानिद्राच. १२. मोठ्या आपत्तींतही. [अध्याय २७५-श्लोक ३०.] १३. पढविलेली नाहीं तरी (ब्रह्मास्त्र). १४. उपदेशावांचून प्राप्त होवो. १५. विष्णूसारखा सहनशील हो, त्या योगानें यश प्राप्त होईल. विष्णूनें भृगुलत्ताप्रहार सहन केला या कथेकडे येथें कटाक्ष आहे. १६. कुबेरातें. १७. पराजित केलें. १८. मरण. १९. पापी (दशकंठानें.) २०. पुष्पक=हें कामगामी विमान वैश्रवणाला तपोबलानें प्राप्त झालें होतें, तें रावणानें बलात्कारानें त्याजपासून हरण केलें. पुढें रावणवधानंतर रामासमीप होतें. त्यानंतर रामानें वैश्रवणास परत दिलें. २१. लंका त्रासें संप्रति पुलक पोषू मग त्वत्क्षयें (तुझ्या नाशानें) हर्षें [पुलक पोषू]—असा अन्वय. २२. रोमांच. २३. माझ्या नेत्रीं. २४. यज्ञांत जाणारा. २५. या लोचनांनीं. २६. पुष्पकविमानीं.

करितोसि गुर्वतिक्रम[1], परि हरि[2] या दुर्मदा न साहेल.' ॥ २९
शापुनि[3] धनप[4] मनिं म्हणे, 'अनयीं[5] हा शक्तिसंपदंध[6] रतो.' ।
परिभवुनि अग्रजातें[7] लंकापति होय पंक्तिकंधर[8] तो. ॥ ३०
केवळ विशृंखळ[9] खळ खळबळजळनिधि दशास्य तो यत्नें ।
आक्रमुनि[10] सुरासुरनरनागवरांतें हरी धनें रत्नें[11]. ॥ ३१
लोकविनाशकरत्वें 'रावण[12]' हें नांव पावला खलधी[13], ।
पल धीरवीरहृदया स्वास्थ्य[14] न दे तो कुबुद्धिचा जलधी[15]. ॥ ३२
जाऊनि सत्यलोकीं ब्रह्मर्षि सुरर्षि सिद्ध[16] बहुधा त्या ।
पीडा पावकवदनें[17] कळविति 'हा! हा!' म्हणोनि बहु धाल्या[18]. ॥ ३३
ब्रह्मा म्हणे, 'सुरासुर[19] साहेल रणांत त्या न मत्तातें, ।
तन्नाशार्थ[20] तरणिकुल[21] केलें जन्मोनि धन्य मत्तातें[22]. ॥ ३४
म्यां विनविला स्वगुरु[23] कीं हो[24] नररूप, न म्हणोत तापस 'हा!' ।
प्रभु झाला दशरथसुत करिल सुखी, स्वल्पकाळ ताप सहा.' ॥ ३५
ब्रह्मा शक्रासि म्हणे, 'प्रभुला[25] व्हाया सहाय ऋक्षींतें[26] ।
द्या कामरूपबळ[27] सुत, करिजे[28] जें चंद्रकार्य ऋक्षीं[29] तें. ॥ ३६

---

१. वडिलांचा अपमान, गुरुजनांची अमर्यादा. २. विष्णु. ३. गीति २९ प्रमाणें शाप देऊन. ४. कुबेर. ५. अन्यायकर्मी. ६. बल आणि संपत्ति यांनीं अंध झालेला असा. ७. वडील भाऊ वैश्रवण त्यातें. ८. दशग्रीव. ९. बंधनरहित. १०. पराभव करून. ११. उत्तम उत्तम वस्तु. रत्न='जातौ जातौ यदुत्कृष्टं तद्रत्नमभिधीयते' (नीलकंठ—भारतभावदीप). १२. अध्याय २७५ श्लोक ४० 'रावयामास लोकान्यत्तस्माद्रावण उच्यते.' १३. दुष्टबुद्धि (दशास्य). १४. स्वस्थता, शांति; स्वास्थ्य न दे=पीडा करी, उपद्रव दे. १५. सागर. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १६. अणिमादि आठ सिद्धी ज्यास प्राप्त तो सिद्ध; देवविशेष. यांचे एकांगसिद्ध आणि सर्वांगसिद्ध असे दोन प्रकार आहेत. १७. पावक=अग्नि. सर्व देव सिद्ध इत्यादि अग्नीला पुढें करून ब्रह्मदेवास शरण गेले. १८. ब्रह्मदेवाला. १९. सुर+असुर=देव+दैत्य. २०. त्या रावणाचा नाश व्हावा म्हणून. २१. सूर्यवंश. २२. माझ्या पित्यानें (विष्णूनें). २३. आपला पिता (अध्याय २७६ श्लोक ५). २४. मनुष्याचा देह धारण कर म्हणजे तपस्वीजन दुःख पावणार नाहींत. २५. विष्णूला मदतगार होण्यासाठीं. २६. अस्वलींतें. २७. यथेच्छरूप आणि सामर्थ्य (बळ) आहे ज्यांस असे (पुत्र), कामरूपबलान्वित असे (पुत्र). २८. जें कार्य चंद्रानें करावयाचें आहे तें नक्षत्रांकरवीं करवावें, जें कार्य थोरांच्या हस्तें व्हावयाचें तें लहानाचे हस्तें करवून घेणें हा उत्तमपक्ष होय. २९. नक्षत्रीं.

अमितबळ सुरसुतांतें क्षिप्र [1]प्रसवोत [2]वानरी, हित मी ।
कथितों प्रभुदास्यरता प्रजा न ज्या बुडति त्या [3]नरींहि तमीं.' ॥ ३७
सुरकार्यसिद्धि व्हाया गंधर्वी [4]दुंदुभीहि आठविली, ।
[5]युक्ति पढवुनि प्रभुनें कैकेयीच्या समीप पाठविली. ॥ ३८
[6]कामबळ कामरूप त्रिदशांचे [7]वानरर्क्षतनु सुत ते ।
दुःसह अलंध्य सकलां, [8]कल्पांतींचे जसे जलधि [9]उततें. ॥ ३९
निर्मुनि अपत्य, हर्षे सर्वहि शक्रादिदेव [10]तो, कपिसें, ।
हरिदास्य [11]यल्ललाटीं धन्यचि तें जरि असेल तोकें[12] पिसें. ॥ ४०
काळीं दुस्स [13]चरांजननगशिखरेंशीं विबूनि आसविलें, ।
देवांनीं हिमगिरिला [14]क्षीरधिला स्वयश तुच्छ भासविलें. ॥ ४१

---

१. उत्पन्न करोत. २. इंद्रप्रभृति देवांनीं वानरादि योनींत जन्म घेऊन विष्णूचें साहाय्य केलें, या कथेकडे येथें कटाक्ष आहे. [अध्याय २७६ श्लोक ११.] ३. मनुष्यामध्येंही. ब्रह्मदेवोक्ति 'वानरस्त्रिया देखील अत्यंत बलिष्ठ अशा देवांच्या मुलांना प्रसवोत म्हणजे देव व त्यांचीं मुलें यांनीं आस्वली व वानरी यांच्या पोटीं जन्म घ्यावा.' आतां कदाचित् ते देव व त्यांचीं मुलें शंका घेतील कीं मृत्युलोकीं अवतीर्ण होणें म्हणजे पापसूचक आहे, कारण 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति' असा सिद्धांत आहे व अशा अवतीर्णास योगभ्रष्ट म्हणत असतात. त्या शंकेच्या समाधानार्थ ब्रह्मदेव म्हणे—'मी हित(पथ्य)कारक गोष्ट सांगतों कीं ज्या प्रजा (लोक) प्रभुदास्यरत असतात त्या नरीं ही तमीं न बुडति' ब्रह्मदेवाचे म्हणण्याचा आशय—जे लोक देवाच्या सेवेंत मग्न असतात ते मर्त्यलोकींचे लोभमोहादिजन्य जें तम (अज्ञान) त्यांत बुडत नाहींत—ते अलिप्त राहतात. तेव्हां देवादिकांस मृत्युलोकीं जाण्यांत धास्ती बाळगणें न लगे. 'नरीं हि तमीं' यांत 'नरीं' हें विशेषण 'तमीं'-शब्दाचें समजावें. 'हि'शब्दाचें स्वारस्य असें दिसतें कीं मनुष्ययोनींत इतर योनींतील प्राण्यांपेक्षां मायापाशाचा जोर अधिक चालतो म्हणून त्यांत देखिल न बुडति, मग आस्वल व वानरयोनींत कोठून बुडणार? ४. गंधर्वस्त्री. हीच ब्रह्मदेवाच्या आज्ञेनें कैकेयीची दासी मंथरा झाली. अध्याय २७६ श्लोक १०.] ५. दशरथानें दिलेल्या दोन वरांचें स्मरण कैकेयीस करावें इत्यादि युक्ति. ६. यथेच्छ बळ धारण करणारे. ७. वानरांच्या आणि आस्वलांच्या देहांतें धरणारे, जे देहानें वानर आणि ऋक्ष (आस्वल). ८. विश्वाचे प्रलयकाळींचे. ['कल्पः शास्त्रे विधौ न्याये संवर्ते ब्रह्मणो दिने' इति मेदिनी.] ९. उततें=उकळीस आलेलें, उतास आलेले (जलधि.) ज्याप्रमाणें कल्पकाळांतले उतास आलेले समुद्र अलंध्य आणि दुःसह असतात त्याप्रमाणें आस्वल आणि वानर अलंध्य आणि दुःसह होते. १०. तो सर्व शक्रादि देव कपिसें (वानररूप अथवा वानरसम) अपत्य निर्मुनि हर्षे (हर्ष पावे). ११. ज्याच्या कपाळीं. यल्ललाटीं हरिदास्य तें तोक पिसें (वेडें) जरी असेल तरी तें धन्यचि. १२. बालक. १३. चालणाऱ्या कज्जलपर्वताच्या शिखरांसारखीं. १४. क्षीरसमुद्रास.

देहें [1]कुब्जा, नामें झाली ती [2]मंथराभिधा, नातें ।
कैकेयीशीं लावी साधाया [3]कार्यसंविधानातें. ॥ ४२
श्री[4]गाधिजमुनि द्याया सत्कविवृंदांस सुमहिमा गाया ।
दशरथमधुपाप्रति ये [5]प्राप्तसुतसुरद्रुसुमहि मागाया. ॥ ४३
'दे राम लक्ष्मण [6]मखत्राणार्थ' असें तयासि तो [7]यांची, ।
ओपी नृप, जेंवि [8]पिता निज पात्री [9]मरुपथांत [10]तोयांची. ॥ ४४
तो अतिथि तृप्त सुज्ञें अर्पुनियां तें स्वताट केला, [11]हो ! ।
जातां पथीं मुनि म्हणे, 'रामा ! [12]सद्गतिद [13]ताटकेला हो.' ॥ ४५
तीतें त्या मुनिवचनें मारी तो, न रघुराज नय शोधी, ।
कीं जो [14]गुर्वाज्ञापर सर्वहि होतो खरा [15]जनें यशोधी. ॥ ४६
[16]मुनिदत्तास्त्राशीर्धन जोडुनि सिद्धाश्रमासि तो पावे, ।
मारी मखघ्न [17]राक्षस कीं संत खलांपुढें न लोपावे. ॥ ४७
जनकमखाप्रति जातां श्रीराम करूनि वंदन [18]वदान्या ।
त्या [19]गुरुसि म्हणे, 'आम्हां भागाल असें कदापि न वदा, [20]न्यां'. ॥ ४८
गाधिज रामाकरवीं मार्गीं [21]गौतमसतीसि उद्धरवी, ।
मानी [22]तत्पादास [23]स्वकरसहस्रापरीस शुद्ध रवी. ॥ ४९
मुनि जनकासि म्हणे, 'हो ! जें हरितें [24]धन्विगर्व यो[25] धनु तें'. ।
आणवितांचि उचलिलें रामें [26]शर्वादिसर्वयोधनुतें. ॥ ५०

---

१. कुब्जेप्रमाणें शरीरानें तीन ठिकाणीं वांकडी. कुब्जा ही सुप्रसिद्ध कंसदासी. २. मंथरा होती अभिधा (संज्ञा–नांव) जिची ती. ३. कार्याच्या उत्तम घडण्यातें. कैकेयीप्रलोभन, रामप्रव्राजन इत्यादि वैरदीपन कार्यांच्या घटनेतें. ४. विश्वामित्रऋषी. ५. प्राप्त झालेलें सुतरूप कल्पवृक्षाचें पुष्पहि. ६. यज्ञाच्या रक्षणासाठीं. ७. मागे. ८. प्राशनकर्ता. ९. मारवाड देशांतील मार्गांत. १०. उदकाची. ११. अहो. १२. उत्तम गति देणारा. १३. ताटका–ही सुकेतु यक्षाची कन्या, सुंदराक्षसाची स्त्री, आणि मारीच व सुबाहु यांची माता. १४. गुर्वाज्ञेंत तत्पर. १५. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १६. विश्वामित्रानें दिलें जें अस्त्र व आशीर्वादरूप धन तें. १७. सुबाहु इत्यादिक. १८. दात्यास. १९. विश्वामित्रास. २०. घेऊन चला. २१. अहल्येला. ही इंद्राशीं व्यभिचार केल्यामुळें पतिशापानें शिला झाली होती. २२. त्या रामाच्या चरणास. २३. सूर्याला एक हजार कर (किरण–हस्त) आहेत अशी प्रसिद्धि आहे. याच कारणास्तव 'सहस्रांशु' असें नांव सूर्याला आहे. २४. धनुर्धरांचा गर्व. २५. येवो. २६. महादेवादिक सर्वयोद्ध्यांनीं स्तुत अशा.

गुण जोडुनि [1]सलील प्रभुनें आकर्षितांचि भंगे तें, ।
[2]तेंद्रव न मुनिसभेसचि कांपवि [3]विभुमूर्धगाहि गंगेतें. ॥ ९१
होता कठिण [4]पण, [5]पण प्रभु परवुनि होय [6]जानकीजानी, ।
झाले [7]सदश्रु, धरिली होती हृदयांत जानकी जांनीं. ॥ ९२
जनकें चवघी [8]कन्या दिधल्या रामासमेत चवघांस, ।
ते दृष्टिस देति, तसे अमृताचेहि न जिभेसि चव घांस. ॥ ९३
[9]भग्नगुरुधनुर्ध्वानश्रवणें [10]भार्गव धरुनि ये कोपा, ।
स्वप्नींहि पराभविला जो न [11]क्षेत्रें करूनि [12]येकोपा. ॥ ९४
आला म्हणत असें कीं, 'विजयश्रीचा असेंच नवरा मी.'।
परि त्या चालेल [13]अनवरामाचें तेज काय [14]नवरामीं? ॥ ९५
श्रीरामाला दशरथ द्यावें युवराज्यपद असें योजी, ।
गुरु सचिव म्हणति, 'इच्छित होतों कीं हेंचि तव मना [15]यो जी!' ॥ ९६
[16]अभिषेकनिश्चय करुनि करवी साहित्य सर्वहि तदा, तें. ।
वाटे न मंथरेच्याचि मना आनंदपर्व [17]हितदातें. ॥ ९७
ती कैकेयीस [18]म्हणे, 'दासत्व तुझ्या सुतीं न [19]यो [20]ध्यां, [21]हो! ।
कल्याण कुमाराचें, [22]भवदाज्ञावर्तिनी अयोध्या [23]हो. ॥ ९८
विश्वास काय यांचा? [24]सुविषम होतात नर सदा [25]सम ही, ।
[26]गुर्वनुमतानुसरणेंकरुनि मग विटेल न [27]रसदास [28]मही. ॥ ९९

---

१. सहज, अनायासें. २. त्याचा (त्या धनुष्याचा) शब्द. ३. शिवाच्या मस्तकावर असणाऱ्या अशाही. ४. प्रतिज्ञा. ५. परंतु. ६. सीतापति. [जानकी जाया यस्य सः जानकीजानिः; 'जाया-' शब्दाला बहुव्रीहि समासांत 'जानि' असा आदेश, 'जायाया निङ्' (पाणिनि—५।४।१३४) या सूत्रानें होतो.] ७. रोदनयुक्त. ८. सीता (रामाला), मांडवी (भरताला), श्रुतकीर्ति (शत्रुघ्नाला), आणि ऊर्मिला (लक्ष्मणाला). [मोरोपंत—मंत्ररामायण—बालकांड—गीति ६३-६४ पहा.] ९. भग्न झालेल्या गुरुधनुष्याच्या (शिवधनुष्याच्या—शिव हा भार्गवरामाचा गुरु) ध्वनीच्या श्रवणानें. १०. परशुराम. ११. क्षत्रियजनानें. १२. ऐक्य, जमाव. १३. म्हाताऱ्या रामाचें. (भार्गवरामाचें.) १४. तरण्या रामाचे ठायीं. १५. येवो. १६. अध्याय २७७ श्लोक ८ पहा. १७. हितकारक. १८. अध्याय २७७ श्लोक १७-१९ पहा. १९. न येवो. २०. ध्यान करा. कुमाराचें कल्याण ध्या—असा अन्वय. २१. अहो. २२. तुझ्या आज्ञेंत वागणारी अशी. २३. होवो. २४. प्रतिकूल, असमबुद्धि. हा चरण सुभाषितरूप आहे. २५. समवृत्ति, समबुद्धि. २६. गुरु दशरथाच्या आज्ञेच्या पालनानें. २७. रस देणारास, प्रीति करणाऱ्या पतीला. २८. पृथ्वी.

[१]दायाददास्यदहनीं वेडे! करिशील [२]आज्य भरतातें, ।
होशिल [३]विपक्षदासी, देतां रामासि राज्यभर [४]तातें.' ॥ ६०
ज्या [५]प्रभुला धन्य म्हणत होत्या [६]कविसाधुसुरसभा, केला ।
वश तो कैकेयीनें, घेउनि, बोलोनि सुरस, भाकेला. ॥ ६१
'वर माग' असें म्हणतां, मागे प्रिय [७]काम हा [८]शुभरतातें, ।
'[९]द्या चवदा वर्षें वन रामातें, राज्य [१०]आंशु भरतातें'. ॥ ६२
कैकेयीच्या आलें जों ऐसें [११]दारुणोक्त तोंडास, ।
त्या दशरथहृदयाचा घे [१२]मोहमहाभुजंग तों डास. ॥ ६३
[१३]वरदानवृत्त परिसुनि वदला तो यापरि [१४]स्वजनकवच ।
'हो राज्यभ्रष्ट तनुज, परि सत्वभ्रष्ट न [१५]स्वजनकवच'. ॥ ६४
संत म्हणति, 'संततिहुनि संसारीं [१६]प्राज्य सार [१७]सत्या [१८]गी.' ।
ती [१९]गुरुंची न मळाया [२०]राममधुप [२१]राज्यसारस त्यागी. ॥ ६५
जनकादिगुरुजनातें वंदुनि [२२]रघुवंशपद्मभानु निघे, ।
वनवासातें [२३]परमानुग्रह ऐसें मनांत मानुनि घे. ॥ ६६
लक्ष्मण निघे [२४]पदाधिक जाणुनि [२५]तत्पादसुपरमाणूस, ।
त्यजिल गुरुभजन कैसें हें आयकिल्याहि उपर माणूस? ॥ ६७
श्रीराम म्हणे, 'मदधिक [२६]गुरुचरण त्यजुनि काय निघसी ते'. ।
लक्ष्मण म्हणे, 'भजावें गुरुचरण, त्यजुनि [२७]काय? निघ सीते!'॥ ६८

---

१. भाऊबंदांचें दास्य (सेवकत्व) हाच अग्नि त्यांत. २. तूप. ३. शत्रुदासी. ४. दशरथानें. ५. दशरथाला. ६. पंडित, सज्जन आणि देव यांच्या सभा. ७. मनोरथ. ८. मंगलकार्यांत तत्पर अशा दशरथातें. ९. अध्याय २७७ श्लोक २६ पहा. १०. त्वकर. ११. भयंकर वचन. १२. मोह (मूर्च्छा) हाच मोठा साप. १३. अध्याय २७७ श्लोक २८ पहा. १४. आपल्या लोकांस कवचरूपी असा. १५. आपल्या बापाचें भाषण. १६. पुष्कळ. १७. खरें भाषण. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १८. वाणी. १९. बापाची. २०. रामरूप भ्रमर. २१. राज्यरूप कमळ. २२. रघुवंशरूप पद्माचा (कमळाचा) भानु. (सूर्य.) २३. मोठा प्रसाद, थोर कृपा. २४. राज्यपदाधिक. २५. रामाच्या पादसंबंधी उत्तम परमाणूस (धूळीच्या कणास). २६. जेव्हां द्वितीय पाद चतुर्थ पादीं आवृत्त होतो तेव्हां त्या यमकाला 'संदष्टक' असें म्हणतात. ['प्रत्येकं पश्चिमयोरावृत्त्या पादयोर्द्वितीयेन । यमके संजायेते गर्भः संदष्टकं चेति ॥' काव्यालंकार—अध्याय ३ श्लोक ७.] या प्रकारचीं यमकें पंताच्या काव्यांत अनेक आहेत. २७. गुरुचरण भजावें=रामचरणाची सेवा केली पाहिजे, ते चरण टाकून काय हित आहे? अर्थात् हित नाहीं, तेव्हां हे सीते गुरुचरणाची सेवा करण्यासाठीं चल.

सीता म्हणे, 'त्यजावी हे न, न [1]चपलेसही [2]घनद सोडी, ।
यद्यपि [3]झडती [4]जड ती, आपण [5]उबगे पटासि न, [6]दसोडी.' ॥ ६९
जाय प्रसन्नवदन श्रीराघव [7]अकृतकुत्स वनवासा, ।
कीं मानिला प्रभुमनें तो [8]देसवटाहि उत्सव नवासा. ॥ ७०
भेदूनि काळिजाला गेला लोकापवादशर; थानें ।
शिशुसा, रामें त्यजितां, त्यजिले स्वप्राण त्या दशरथानें. ॥ ७१
दूत प्रेषुनि [9]मातुलनगराहुनि भरत शीघ्र आणविला, ।
कैकेयीनें स्वमुखें सर्वहि वृत्तांत त्यास जाणविला. ॥ ७२
भरत म्हणे, 'शिव ! शिव ! [10]इह [11]केयमपूर्वेदृशी [12]कुशीला हो ! ।
वत्सा ! शत्रुघ्ना ! वद [13]हीतें, आलों जिच्या [14]कुशीला हो. ॥ ७३
जा वेड्या ! तशिच दिसो दुर्वृत्ता राक्षसीच हे [15]तीची, ।
आकृति धरली बरवी वर, वीरा ! आंत [16]आलि [17]हेतीची. ॥ ७४
गेला विचार न करुनि केंवि ? अहो ! [18]पुष्कराक्ष ! सीमा या ।
तुमच्या साधुत्वाची, माय न हे [19]शुष्क राक्षसी माया. ॥ ७५
वरिली कां हे [20]निजकुलसर व्हाया शुष्क राक्षसी [21]तीतें ? ।
जेणें गुरुहानि करिति कां लक्ष्मण पुष्कराक्ष सीता तें ? ॥ ७६
गे ! कौसल्ये ! माते ! [22]दायादत्वें न साच [23]हीं रामीं, ।
घेइन टाकुनि चिंतामणिहार कळोनि काचहारा मी ? ॥ ७७
आण तव पदाची मज, अवगत नव्हताचि हा विनाशपथ, ।
त्यागीन प्राणातें, जरि तुज मद्बुद्धि दाविना शपथ.' ॥ ७८
कौसल्या त्याशि म्हणे, 'वत्सा ! तुज तों असें न वाटावें, ।
बा ! ठावें त्वन्मन मज, [24]सरें [25]मीनांच्या मतें न आटावें. ॥ ७९

---

१. विजेसही. २. मेघ. ३. झडल्ये. ४. अचेतन. ५. उपेक्षी. (कंटाळे.) ६. वस्त्राची दशी. ७. नाहीं केली निंदा ज्यानें असा. ८. देशसंबंधी प्रदेश, वनप्रदेश. ९. मातुल=मावळा. १०. इथें, भूलोकीं. ११. का+इयम्+अपूर्वा+ईदृशी=कोण ही अपूर्व अशी. मोरोपंताच्या काव्यांत अशीं संस्कृत वाक्यें अनेक आढळतात. [निबंधमाला–अंक ६६ पृष्ठें ३०-३१ पहा.] १२. दुष्ट स्वभावाची. १३. कैकेयीतें. १४. पोटीं, उदरीं. १५. तीच. १६. सखी. १७. शस्त्राची. १८. रामचंद्र (कमलाक्ष). १९. निर्द्रव, निष्करुण. २०. आपला वंश हाच एक सरोवर. २१. पिलानें (दशरथानें). २२. दायाद. (वांटा घेणारा. दाईज, दाईजपणानें.) २३. भरत. २४. सरोवर. २५. मीन=मासा.

एकात्मे साधु तुम्हीं, ऐसे तों ऐकिलेहि न [1]भ्राते, ।
जे इतर [2]सहज विषयास्तव बहु घेती करूनि [3]बभ्रा ते. ॥ ८०
कैकेयीच्या मतिचें कृत्य न, [4]मन्नियतिचेंचि [5]ताता! तें ।
बहु दुःख हें त्यजुनि मज आपण वरिली तुझ्या [6]चिता तातें. ॥ ८१
वत्सा! भरता! ज्यांचा [7]मार्दवलेशहि नसेचि [8]नवनीतीं ।
वत्साचीं पदपद्में कैशीं भ्रमतील [9]निर्जनवनीं तीं.' ॥ ८२
करुनि क्रिया पित्याची गेला तो [10]श्रितभवाब्धिसेतुकडे, ।
[11]पौर [12]सचिवहि [13]अयाचे [14]तच्चुंबकमणिकडे जसे तुकडे. ॥ ८३
धांवुनि गळांचि पडली होती जी [15]राज्यभू, तिला भरत ।
झिडकारूनि निघे, कीं [16]रामपदप्राज्यभूतिलाभरत. ॥ ८४
रामासि चित्रकूटीं, जैसा गाईस [17]तर्णक वनांत ।
भेटे, निवे [18]तदुटजीं तो, ज्यापरि रसिककर्ण [19]कवनांत. ॥ ८५
रामपदीं भरत मिठी घाली, [20]क्षतकंटकी तदपि [21]त्याचें, ।
तें [22]भाने [23]तन्मतिला, [24]निष्कंटकहि न रुचे पद पित्याचें. ॥ ८६
[25]अंकीं घेउनि रडत्या निजशिशुतें, पुसुनियां वदन, तातें ।
जें सुख द्यावें, दिधलें श्रीरामें तेंचि त्या [26]पदनतातें. ॥ ८७
हे बंधु स्नेहामृतरत सुरसिक, [27]अमृतरत न [28]सुरसिक ते ।
न कदापि अर्थशास्त्रें कविगुरुपासूनि असुर सुर सिकते. ॥ ८८
भरत कथी [29]स्वागमनावधि तैलीं [30]तातकाय होता तें. ।

---

१. बंधु. २. सुप्राप्य, साधारण. ३. बोभाट, फजिती. ४. माझ्या प्रारब्धाचेंचि. ५. बाळा, 'तातोऽनुकंप्ये पितरि' इति हेमचंद्रः. ६. प्रेतास अग्निसंस्कार करण्याकरितां काष्ठादिकांची रचून करितात ती, प्रेतशय्या, सरण. ७. मृदुत्वाचा लवही. ८. लोण्यांत. ही अतिशयोक्ति आहे. ९. मनुष्यरहित अरण्यामध्यें. १०. आश्रितास संसारसमुद्रांतून पार पडण्यास मार्ग (सेतु) जो राम त्याकडे. ११. पुरवासी जन. १२. प्रधानही. १३. लोखंडाचे. १४. लोहचुंबकमण्याकडे. १५. राज्यभूमि. १६. राम+पद+प्राज्य(विपुल)+भूति(ऐश्वर्य)+लाभ(प्राप्ति)+रत (तत्पर)=रामपदरूप मोठ्या ऐश्वर्यलाभाविषयीं रत. १७. वत्स. १८. त्या रामाच्या पर्णशाळेंत. १९. या चरणावरून पंतांची काव्याभिरुचि आणि सहृदयत्व हीं प्रतीयमान होतात. काव्य कसें असावें आणि त्याच्या योगें रसिकाचे मनावर काय परिणाम होतो याचा उल्लेख पंतांनीं अनेकदां केला आहे. २०. क्षतें, कांटे यांहीं युक्त. २१. त्या रामाचें (पद). २२. रुचे, आवडे. २३. त्या भरताच्या मनाला. २४. कंटकहीन असेंही दशरथाचें राज्यपद न रुचे. २५. मांडीवर. २६. शरणागताला. (भरताला.) २७. सुधालोलुप. २८. रसज्ञ. २९. आपण येई तोंपर्यंत. ३०. बापाचा देह.

राम म्हणे, 'हा! त्यजिले मच्छोकें प्राण काय हो! तातें? ॥ ८९
हा तात! हा नृपोत्तम! हा वत्सल! हा प्रभो!' असेंचि रडे, ।
प्रभुचें गुरुशोकभरें[1] हृत्कंज[2] महोपलें[3] तसें चिरडे. ॥ ९०
यच्चरणसरित्तटमृतसुकृतें[4] गीचेंहि[5] न करकंज[6] लिही ।
तो स्मृतिनें[7] अमृत[8] दिलें ज्या[9], त्या दे पिंड[10], तिळ हि अंजळिही. ॥ ९१
प्रार्थुनि तो भरत म्हणे, 'अमृतरसहि मज तुम्हांविना कुंचला[11], ।
काढा क्षिप्रं[12] अयोध्याहृद्गतनिजविरहवज्रशंकु[13], चला. ॥ ९२
राज्यश्रीस वळविता तूं, जेंवि इभीस[14] अंकुश तसाच, ।
मृगराज[15] तूं, त्वदाज्ञाकर आम्हीं सर्व रंकुंशत[16] साच.' ॥ ९३
श्रीराम म्हणे, 'वत्सा! वेदोक्त तसें गुरूक्त[17] सन्महित[18], ।
त्वां म्यांहि चालवावें या रविवंशीं तरीच जन्महित. ॥ ९४
न मिळे गुरूक्तधनुषीं[19] जो गुण[20] तो, व्यर्थ लाखवावें हो, ।
वचन करुनि परलोकीं तरि सुख जनित्यासि[21] दाखवावें, हो! ॥ ९५

---

१. बापाविषयीं अत्यंत शोकानें. २. हृदयकमल. ३. मोठ्या दगडानें. (उपल=दगड.) ४. ज्याच्या (ज्या रामाच्या–विष्णूच्या) चरणसंबंधी नदी (भागिरथी) तिच्या तीरीं मरण पावलेल्या जनांचीं पुण्यें. ५. सरस्वतीचेंहि. ६. हस्तकमल. ७. रामनामस्मरणानें, (रामनामाचें स्मरण केलें असतां). ८. मोक्ष. 'अमृत' शब्दाचे अनेक अर्थ आहेत ते.—'अमृतं यज्ञशेषे स्यात् पीयूषे सलिले घृते । अयाचिते च मोक्षे च ना धन्वंतरिदेवयोः ॥' इति मेदिनी. ९. ज्या (दशरथाला) स्मृतिनें (रामनामस्मरणानें) अमृत दिलें (मोक्ष दिला) त्या (दशरथाला) पिंड दे. १०. पिंड दे. पितरांस पिंडदान करणें आणि तिलांजलि देणें हे प्रकार उत्तरक्रिया व श्राद्धादिविधि करण्याच्या समयीं करतात. ११. काजरा. १२. लौकर. १३. अयोध्येच्या हृदयीं रहाणारा तुमच्या विरहरूप वज्राचा शंकु (खिळा) तो. [शंकु=खिळा, खुंटी, कील.] १४. हस्तिणीस. (इभ=हत्ती.) १५. सिंह. १६. शेंकडों मृग. १७. पितृवचन. १८. साधुजनांला पूज्य. १९. गुरुवचनरूप चापीं. २०. गुण=धनुष्याची दोरी. या पद्याचा अर्थः—गुरु (बाप) त्याचें उक्त (आज्ञा) हेंच धनु (धनुष्य) त्याशीं मेळे खाणारा जर गुण (ज्या) मिळाला नाहीं तर तो गुण शंभर वांवें लांब असला तरी काय कामाचा, तो व्यर्थ होय. या लोकीं नाहीं तर नाहीं, पण परलोकीं तरी पित्यानें जी काय आज्ञा केली असेल ती मान्य करून त्यास सुखवावें. या गीतींत 'धनुषीं' हा शब्द चांगला नाहीं, कारण 'धनुषीं' ही जर सप्तमी आहे, तर 'धनुष' अशी प्रथमा होईल. 'धनु' इतकाच शब्द आहे, 'धनुष' असा शब्द आढळत नाहीं, याकरितां 'धनुसीं' असें रूप करून ही तृतीया मानावी म्हणजे धनुबरोबर गुण योग्य नाहीं तर तो लांब असून काय कामाचा असा अर्थ करितां येईल. २१. बापास.

व्यसनीं बुडों दिल्हें नि[1]जजीवितहि, बुडों दिल्हें न यश तो[2]तें, ।
वत्सा ! पहा विचारुनि हेंचि सुसंमत असे [3]नयशततातें. ॥ ९६
सा[4]केतीं वस, मज हें दे, मीच वनीं असेन, [5]चवदावें ।
सरतां येईन, उगा, कोणीहि 'नको' असें नच वदावें.' ॥ ९७
भरत म्हणे, 'तरि हें [6]श्रीपदयुग संपादु काम हा, [7]यांस ।
न शिवो देऊत पदीं बैसुनियां पादुका [8]महायास. ॥ ९८
तें सिंहासन भूषित या श्रीम[9]त्पुण्यपादुकांनीं [10]हो ।
कीं यां[11]च्या बहु यश नय तेज [12]सुकृत शिवें[13] कृपा दुकानीं, [14]हो!'॥ ९९
सौव[15]र्णी [16]मणिखचिता भरतकरें तो पळार्ध ज्या त्याला, ।
त्या पादुका दिल्या [17]त्यां भक्ताला भक्तिनेंचि झाल्याला. ॥ १००
सांत्वुनि निजजननीजन सर्व सचिव पौर गुरु सखे दास ।
प्रे[18]षुनि [19]पुरीप्रति प्रभु मानी सुख वे[20]नंनिवासखेदास. ॥ १०१
नंदि[21]ग्रामीं, होउनि वल्किजटाधर, वसे, परतला जो, ।
प्रभुसि न आणुनि तो श्रीमदयोध्येला न कां भरत लाजो? ॥ १०२

अध्याय अकरावा.

प्रभु चित्रकूट टाकुनि, राहे गोदावरीतटीं [22]उटजीं, ।
[23]मानससर:सरसिरुहवनवासी हंस[24]वर [25]जैसा कु[26]टजीं. ॥ १

---

१. आपले प्राण. २. दशरथानें. ३. नीतिशततातें. ४. अयोध्येंत. ५. चवदावें वर्ष—असा भाव. ६. आपलें पादद्वय. ७. या भरताला. ८. महा+आयास=मोठें+दु:ख. ९. आपल्या पवित्र पादुकांनीं. १०. होवो. ११. या पादुकांच्या. १२. पुण्य. १३. कल्याण. १४. अहो. १५. सुवर्णनिर्मित. १६. रत्नजडित. १७. त्या भरताला. १८. पाठवून. १९. अयोध्येप्रत. २०. वनांत राहण्याच्या दु:खास. २१. अध्याय २७७ श्लोक ३९-४० पहा. २२. पर्णशालेंत. २३. मानससरोवरांतील कमलवनांत राहणारा. (मानस+सर:+सरसिरुह+वन+वासी=मानसनामक+सरोवर+कमल+समूह+वास करणारा.) २४. श्रेष्ठ हंस. हंसपक्ष्याला मानससरोवरीं राहणें फार आवडतें असा कविसमय आहे, हें वाचकांस माहीत असेलच. हे कविसमय अनेक आहेत, त्यांचा समावेश पुढच्या चार पद्यांत केला आहे:—'मालिन्यं व्योम्नि पापे यशसि धवलता वर्ण्यते हासकीर्त्यो रक्तौ च क्रोधरागौ सरिदुदधिगतं पंकजेंदीवरादि । तोयाधारेऽखिलेऽपि प्रसरति च मरालादिक: पक्षिसंघो ज्योत्स्ना पेया चकोरैर्जलधरसमये मानसं यांति हंसा: ॥', 'पादाघातादशोकं विकसति बकुलं योषितामास्यमद्यैर्यूनामंगेषु हारा: स्फुटति च हृदयं विप्रयोगस्य तापै: । मौर्वी रोलंबमाला धनुरथ विशिखा: कौसुमा: पुष्पकेतोर्भिन्नं स्यादस्य बाणैर्युवजनहृदयं स्त्रीकटाक्षेण तद्वत् ॥,' 'अह्न्यंभोजं निशायां विकसति कुमुदं

वरि शोभवूनि कपटें वपु जें मळमूत्रमणिक [3]रंडा तें ।
धाया ये शूर्पणखा खेचरी त्या सुगुणमणिकरंडातें. ॥ २
तन्नासाकर्णांतें, दूषाया काय, कापवि, त्रासी, ।
कीं दुर्दानें दूषूं पाहे श्रीनायका पवित्रासी. ॥ ३
आला नर मानुनि खळ खर घेउनि मनुसहस्र बळें खाया, ।
किति [12]तो? मुनिहि न पुरति प्रभुला तत्वेंकरूनि वळखाया. ॥ ४
झाले भस्मचि, पडतां सर्वहि राक्षस कुवर्ण ते रामीं. ।
म्हणतों खरादि पाप्मे प्रभुशर तन्मनुसुवर्ण तेरा मीं. ॥ ५

चंद्रिका शुक्लपक्षे मेघध्वानेषु नृत्यं भवति च शिखिनां नाप्यशोके फलं स्यात् । न स्याज्जाती वसंते न च कुसुमफले गंधसारद्रुमाणामित्याद्युन्नेयमन्यत्कविसमयगतं सत्कवीनां प्रबंधे ॥.' दुसऱ्या एका पद्यांत या कविसमयांचा समावेश केला आहे तो असा:—'पादाघातादशोकस्तिलककुरबकौ वीक्षणालिङ्गनाभ्यां स्त्रीणां स्पर्शात्प्रियंगुर्विकसति बकुलः सीधुगंडूषसेकात् । मंदारो नर्मवाक्यात्पटुमृदुहसनाच्चंपको वक्त्रवाताच्चूतो गीतान्नमेरुर्विकसति च पुरोनर्तनात्कर्णिकारः ॥.' २५. हें उपमालंकाराचें उदाहरण आहे. २६. कुब्याच्या झाडावर.

१. शरीर. २. मळमूत्राचें मडकें. ३. रंडा—रंडकी=हा निंदाव्यंजक शब्द विधवा स्त्रियेला लावतात. ४. राक्षसी. ५. उत्तम गुण हेच मणि (रत्नें) त्यांचा करंडा (पेटी) असा जो राम त्यातें. ६. तिच्या नासिकाकर्णांतें. ७. देह. तिचें शरीर विरूप करण्यासाठीं. ८. अपवित्र दानानें. ९. लक्ष्मीपतीस. (रामास.) १०. चवदा सहस्र. 'मनु' हा शब्द 'चवदा' याचा पर्याय आहे. कारण, मनु एका कल्पांत चौदा होतात. सहा मनु होऊन गेले. प्रस्तुतचा मनु सातवा आहे व पुढें सात मनु व्हावयाचे आहेत. प्रत्येक मनूच्या कालसत्तेस 'मन्वंतर' असें म्हणतात. ४३,२०,००० मानुष वर्षांनीं एक मन्वंतर होतें आणि अशा चौदा मन्वंतरांनीं ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो. या चौदा मनूंचीं नांवें:—(१) स्वायंभुव, चैत्र शुद्ध ३ चंद्रवार, कृत्तिका नक्षत्र. (२) स्वारोचिष, चैत्र शु० १५ बुधवार, चित्रा नक्षत्र. (३) औत्तमि, ज्येष्ठ शु० १५ बुधवार, ज्येष्ठा नक्षत्र. (४) तामस, आषाढ शु० १० शुक्रवार, स्वाती नक्षत्र. (५) रैवत, आषाढ शु० १५ शुक्रवार, उत्तराषाढा. (६) चाक्षुष, श्रावण वद्य ८ रविवार, रोहिणी. [इतके मनु झाले.] (७) वैवस्वत, भाद्रपद शु० ३ शुक्रवार, हस्त. [हा चालू मनु आहे]. (८) सावर्णि, आश्विन शु० ९ रविवार, श्रवण. (९) दक्षसावर्णि, कार्तिक शु० १२ गुरुवार, उत्तराभाद्रपदा. (१०) ब्रह्मसावर्णि, कार्तिक शु० १५ सोमवार, कृत्तिका. (११) धर्मसावर्णि, पौष शु० ११ शनिवार, रोहिणी. (१२) रुद्रसावर्णि, माघ शु० ७ मंगळवार, अश्विनी. (१३) दैवसावर्णि (रौच्यसावर्णि) फाल्गुन शु० १५ गुरुवार, उत्तराफाल्गुनी. (१४) इंद्रसावर्णि, फाल्गुन व० ३० मंगळवार, रेवती. [हे शेवटचे सात मनु यापुढें यावयाचे आहेत.] ११. सैन्य. १२. तो खर राक्षस. १३. पातकी. १४. राममंत्रांतील उत्तम वर्ण. ते खरादि राक्षस रामावर पडतांच भस्म झाले; कसे, तर कुवर्णासारखे; राम वाईट आहे असें म्हटलें तर हे कुवर्ण झाले, ते रामाविषयीं उच्चारिलेले कुवर्णच भस्म

बंधु खर स[1]बळ बुडवुनि धांवत लंकेसि जाय ती [2]नेकटी, ।
[3]कुदशाराज्ञीसिंहासन निजमुख दशमुखापुढें प्रकटी. ॥ ६
ती त्यासि म्हणे, 'दादा! [4]पंचवटीवासिकामिनीरत्न ।
तुज [5]सर्वरत्नभोक्त्या द्याया गेलें करावया यत्न. ॥ ७
[6]तत्पतिनें कर्णयुग च्छेदुनि केलें पहा वि[6]नासा, हें ।
[7]त्वत्कीर्तिविरूपकरण, मानधना! अन्य याविना साहें. ॥ ८
ती स्त्री सीता, तीचा जो पति, तन्नाम राम, नर [8]जात्या, ।
तदनुज लक्ष्मणनामा, जावुनि हो तूं [9]प्रभंजन [10]रजां [11]त्यां.' ॥ ९
अग्निज्वालांसि वमे मुखरंध्रें [12]दुष्टरक्ष, कोपे [13]तें, ।
ओकावा वन्हि [14]जैसा [15]वल्मीकें [16]क्रुद्धतक्षकोपेतें. ॥ १०
श्री[17]सीतार्थ निघे [18]अवलंबुनि वेगा [19]भुजंगमारीचा, ।
गांठी [20]श्रीगोकर्णी तो दशकंधर[21]भुजंग [22]मारीचा. ॥ ११
तो कळतां भाव म्हणे, 'राया! हें स्पष्ट कर्म [23]अविहित, रे! ।
व्यसनीं [24]हरिहि बुडे बळ न पहातां, पाहिल्यासि [25]अविहि [26]तरे. ॥ १२

होतात, रामास वाईट म्हटलें तर राम कांहीं वाईट होत नाहीं, ते कुवर्णच नाहींसे होतात; तसें रामास मारण्यास आलेले राक्षसच मेले, रामास कांहीं झालें नाहीं. पंत म्हणतात मला वाटतें (मीं म्हणतों कीं), ते खरादि पाप्मे म्हणजे पापें आणि रामाचे शर हे राममंत्रांतील तेरा सुवर्णच. राममंत्रानें पापें जळतात तसे रामशरानें ते राक्षस मेले—असें तात्पर्य. 'श्रीराम जय राम जय जय राम' हे तेरा राममंत्रांतील सुवर्ण होत.

१. सैन्यासहित. २. निकृत्तनासा. ३. दुर्दशारूप राजस्त्रीचें सिंहासन असें. ४. सीतारूप रत्न. ५. त्या स्त्रीरत्नाचा स्वामी राम जो त्यानें. ६. नकटी. ७. तुझ्या यशाचा नाश. ८. जातीनें. ९. महावायु. १०. त्या रजा=त्या रामलक्ष्मणरूप धूलिकणाला. ११. या चवथ्या पादांत रूपकालंकार आहे. १२. तो दुष्ट राक्षस. ('रक्ष'शब्द संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे.) १३. येथें नपुंसकलिंगी 'रक्ष'शब्दाची योजना करून पंतांनीं रावणाचें क्षुद्रत्व ध्वनित केलें आहे. १४. यांत उपमालंकार आहे. १५. वारुळानें. १६. कोपलेल्या तक्षकानें (सापानें) युक्त अशा. १७. सीतेला उपटावी म्हणून. १८. धरून. १९. भुजंगम+अरीच्या=साप+शत्रूच्या=गरुडाच्या. २०. गोकर्ण—हें क्षेत्र दक्षिणहिंदुस्थानाच्या दक्षिणभागांत महाप्रसिद्ध शिवक्षेत्र आहे. येथें माघमासीं महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरत असते. तेथें शिवाचें आत्मलिंग स्थापिलेलें आहे. (लेलेकृत रघुवंश.) २१. जार. २२. राक्षसविशेष. रावणाचा मामा त्याला. हाच रावणाचा पूर्वीचा अमात्य होता. २३. अनुचित. २४. सिंहहि. २५. मेंढाहि. २६. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे.

कोणी हें तुज कथिलें [1]चक्षुर्विषनागपुच्छ तुडवाया? ।
दाटुनि कां करिसी गा! रामासीं वैर, वंश बुडवाया? ॥ १३
शतयोजनें उडालों हा मी [3]रामेषुपक्षभूपवनें, ।
लीलेनेंचि जलधिचीं शोषिल तो अस्त्रदक्ष भूप वेंनें.' ॥ १४
रक्ष म्हणे, 'रे मूढा! भिवविशि, वर्णूनियां नरा, मातें; ।
चाल उगाचि, मरसि कां स्तवुनि [5]महेशासमान रामातें?' ॥ १५
[6]असुहर दोघेहि, परि श्रेष्ठ गमे रामराय मारीचा; ।
[7]गंगेच्या करिं द्यावा धीरें वीरें न [8]काय [9]मारीचा. ॥ १६
होउनि रत्नकनकमृग गेला रामाश्रमासि वेगानें, ।
पाहुनि [10]त्यांस कराया वश ती [11]रामा [12]श्रमा सिवे [13]गानें. ॥ १७
ती रामासि म्हणे, 'जी! अवलोका मृग असोनि, [14]सोन्यां, या, ।
भेद नसेचि, गृहा हा न्यावा, दुसरें असो नसो न्याया. ॥ १८
आणा धरोनि मृग हा, कैसा दिसतो मनोरम? उठावें, ।
जातो कीं धांवा जी! आहे कीं हरिणहृदय मउ ठावें'. ॥ १९
ठेवी उटजीं [15]अनुजा कंघाया शक्त ज्या न [16]कीनाश, ।
कीं व्हावा न कपटपटु [17]यांतूपासूनि जानकीनाश. ॥ २०

---

१. चक्षुर्विष अशा सापाचें शेंपूट. (नेत्रांमध्यें विष ज्याच्या तो चक्षुर्विष; ही एक सापाची जात आहे.) २. हें ललित नामक अलंकाराचें उदाहरण आहे. खरोखर जो वृत्तांत सांगावयाचा तो न सांगतां दुसरा एखादा त्याजसारखा अप्रस्तुत वृत्तांत सांगणें, याला 'ललित' असें म्हणतात. 'वर्णनीय जो प्रकृत अर्थ त्याचें वर्णन न करितां त्याचा प्रतिबिंबरूप जो अप्रकृत अर्थ त्याचें वर्णन करणें, ह्यास 'ललितालंकार' म्हणतात. जसें; पाणी निघून गेल्यावर हा पूल बांधण्यास इच्छितो.' ह्या उदाहरणांत योग्य समयीं उद्योग न करितां तो मग करणें ह्या प्रकृत वर्णनीय अर्थाचें वर्णन न करितां त्याच्या प्रतिबिंबभूत जो 'पाणी निघून गेल्यावर पूल बांधणें' हा अर्थ ह्याचेंच वर्णन केलें, म्हणून हा ललितालंकार झाला.' (साहित्यशास्त्र—पृष्ठ ७४.) ३. रामाच्या बाणाच्या पक्षापासून निघालेला जो वारा त्यानें. ४. उदकें. ५. शंकरासारखा ६. प्राणहरण करणारे. ७. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ८. देह. ९. महामारीच्या. १०. त्या सुवर्णमृगाला. ११. सीता. १२. वश करण्यासाठीं गाण्याचे श्रम घेई. १३. गायनानें. १४. सोन्या (सुवर्णाला) अवलोका—सोन्याला आणि मृगाला पहा, यांत भेद नाहीं. १५. लक्ष्मणाला. १६. यम. १७. कपटकुशल राक्षसापासून.

त्या कपटमृगामागें धांवे [1]प्रभु [2]रुद्रसा [3]शरी रानीं, ।
वरिति सुर [4]यदंघ्रिरजस्पर्शें बहु [5]मुद्रसा शरीरानीं. ॥ २१
[6]व्यर्थ पळे पशु, ऐसा कोण [7]कृती? एक पळ विलय मातें ।
न घडो, म्हणोनि यत्नें जो दावुनि धाक पळविल यमातें. ॥ २२
[8]प्रभुवर [9]खरतरविशिखें जेव्हां मर्मींच [10]अत्रपा वेधी, ।
समयीं गुरूक्तिस, तसी त्याची कपटस्मृतीस पावे धी. ॥ २३
'हा सीते! [11]हा लक्ष्मण!' ऐसें मरतां म्हणोनि मोठ्यानें ।
[12]अमृतप्रदीं करावें [13]अहिनें, केलें तसेंचि [14]खोट्यानें. ॥ २४
सीता म्हणे, 'अहाहा! धांवा, हो! [15]मारतात हाकेला. ।
लक्ष्मणजी! धांवा, हो! ज्यांचि बळें आत्मघात हा केला.' ॥ २५
सौमित्रि म्हणे, 'तुमचें व्हावें न [16]त्रस्त मन अहो! [17]वहिनी! ।
हें मृगकपट, [18]करावा गरुडाचा नाश काय हो! [19]अहिनीं?' ॥ २६

---

१. राम. २. रुद्र–ही कथा अशी आहे—सरस्वती उत्पन्न केल्यावर ब्रह्मदेव तिचें रूप पाहून तिचा अभिलाष करूं लागला. तेव्हां तिनें भीतीनें रोहिणीचें म्हणजे हरिणीचें रूप घेतलें. तें पाहून ब्रह्मदेव मृगाचें म्हणजे हरिणाचें रूप घेऊन तिचे पाठीस लागला. ब्रह्मदेव हें दुष्कर्म करीत आहे असें पाहून सर्व देवांनीं आपापल्यांतील क्रूर अंश देऊन त्यांपासून रुद्र देव उत्पन्न केला. नंतर त्या रुद्रानें व्याधरूप धारण करून त्या मृगाचें मस्तक कापिलें; तें आकाशांत 'मृगशीर्ष' या नांवानें नक्षत्रांत प्रसिद्ध आहे. हरिणी झालेली सरस्वती 'रोहिणी' नांवानें व रुद्र 'लुब्धक' या नांवानें आकाशांत तारारूपानें प्रसिद्ध आहे. रोहिणी, मृगशीर्ष, व लुब्धक या ताऱ्यांचा संबंध दाखविणारी ही कथा ऋग्वेदाच्या ऐतरेय ब्राह्मणांत आहे. वनपर्वांतील पुढील वचनांत या कथेचा उल्लेख आढळतो—'अन्वधावन्मृगं रामो रुद्रस्तारामृगं यथा.' (अध्याय २७८ श्लोक २०.) रुद्र (रडविणारा–धात्वर्थ) हा संहार करणारा शिव होय. ३. शरधारी. ४. ज्याच्या चरणरजस्पर्शेंकरून. ५. हर्षरसास. ६. ही कन्युक्ति आहे. पंत म्हणतात—तो पशु (कनकहरिणरूप मारीच) व्यर्थ पळे. कारण असा कोण कृती (समर्थ, भाग्यवान्) आहे कीं जो मला क्षणभर मरण न येवो असें म्हणून यत्नें यमाला धाक दाखवून त्यास पळविल? कोणी नाहीं. मग मारीच पळाला हें व्यर्थ. ७. कुशल. ८. प्रभुवर (राम) जेव्हां तीक्ष्ण बाण त्या अत्रपा (निर्लज्जा) मारीचास मर्मीं वेधी (मारी) तेव्हां वेळेवर गुरूक्ति जशी आठवते तशी त्या दुष्टाची धी (बुद्धि) कपटस्मृतिस पावे. कपट करावें असें त्यास स्मरण जाहलें. रामासारखा, कपटानें शब्द करण्यास तो प्रवृत्त झाला—असें तात्पर्य. ९. तीव्रतर बाणानें. १०. निर्लज्जास. ११. अध्याय २७८ श्लोक २३-२५ पहा. १२. दूध देणाऱ्याचे ठायीं. १३. सापानें. १४. कपटी मारीचानें. १५. राम हाकेला मारतात. १६. भयग्रस्त. १७. भावाची बायको ही भगिनीसारखी (बहीणीसारखी) मानावयाची म्हणून तिला भगिनी (वहिनी) असें नांव पडलें. १८. हा भाग सुभाषितरूप आहे. १९. सापांनीं.

सीता म्हणे, 'न धांवसि जेव्हां तूं परिसतांचि हाकेला, ।
स्त्रीकामा[1]! गुरुघात[2] श्रीकामापरिस[3] तांचि हा केला.' ॥ २७
ऐसेंहि म्हणे बहुधा 'उटजीं परमाधमा! नसावास!' ।
तो बोल करी व्याकुळ त्यासि विषव्रततिचा[4] जसा वास. ॥ २८
युक्तचि सीतेसि नमुनि तो बंधुकडेचि होय जाता, तें ।
माय जया रडवी शिशु जाय कथाया स्वदुःख तातातें. ॥ २९
त्यजितां उटज[5] म्हणे[6], 'वनदेवी हो! जानकीस रक्षा[7] हो, ।
लाविल इला बळें कर जरि खल परपुरुष सकुळ रक्षा 'हो.[8]' ॥ ३०
गेला लक्ष्मण, तों यतिवेषें उटजीं दशास्य[9] शिरला, हो! ।
कीं दैवमतें त्याचें प्रभुशस्त्रें करुनि पतन शिर लाहो. ॥ ३१
उटजीं न यातु[10] शिरलें, तें अग्निगृहीं अभद्र[11] कुतरेंच. ।
हा उतरिताचि त्याचा[12] असता तरि मानवेंद्रसुत[13] रेंचें[14]. ॥ ३२
जसि हे[15] जयद्रथें तसि ती[16] देवी त्या[17] खळें बळें हरिली, ।
न करीच भस्म, जाणों बाळें भुजगी[18] धृतव्रता[19] धरिली. ॥ ३३
सीता म्हणे, 'मजहि पर हरितो, हें काय हो! अहा! तात! ।
अद्यापि कां न येती? अबलेचा[20] अंत किति पहातात[21]? ॥ ३४
लक्ष्मणजी! बहु चुकल्यें, आधीं रक्षूनि [22]जीवित, रुसा [23]हो! ।
तुमचा भुज श्रितसुखद[24] मरुमार्गगदीर्घजीवितरुसा[25] [26]हो. ॥ ३५

---

१. स्त्रीची इच्छा ज्यास आहे तो स्त्रीकाम; हे स्त्रीकामा लक्ष्मणा. २. भरतापेक्षां; श्रीकाम जो भरत त्यापेक्षां गुरुघात (मोठा घात) त्वां (लक्ष्मणानें) केला. ३. त्यांच. ४. विषवल्लीचा. ५. पर्णशाला. ६. या लक्ष्मणोक्तीस मूळांत आधार नाहीं. पंतांनीं तो प्रसंग मनांत आणून लक्ष्मणाच्या मुखीं घातली आहे, यावरून पंतांचें समयोचित वर्णनचातुर्य व्यक्त होतें. ७. राख. ८. होवो. ९. राक्षस. (रावण.) १०. हें अपन्हुति नामक अलंकाराचें उदाहरण आहे; येथें उटज आणि यातु याच्या स्वरूपाचा अपलाप धरून त्यांच्या ठायीं अग्निगृह आणि कुतरें यांचा आरोप केला आहे. ११. अमंगल. १२. त्या राक्षसाचा. १३. दशरथाचा पुत्र. (लक्ष्मण.) १४. रेंच उतरिता=खोड मोडता, रेंच मोडणें, रेंच उतरणें=गर्व परिहार होई अशी खोड मोडणें; पाठ हलकी व्हावी म्हणून पाठीच्या शिरा मोडून अथवा चिमटीनें कातडी ओढून पाठ हलकी करणें. १५. द्रौपदी. १६. सीता. १७. रावणानें. १८. सर्पीण. हें उत्प्रेक्षालंकाराचें उदाहरण आहे. १९. धरिले आहेत नियम जीणें अशी. (अपकार अथवा दंश करावयाचा नाहीं असें व्रत जीचें ती.) २०. या बलहीन स्त्रियेचा. (माझा=सीतेचा.) २१. अंत पाहणें=कोणत्या एकाद्या व्यवहाराची अखेर काय होते हें पाहणें. २२. प्राण. २३. अहो. २४. आश्रितांस सुखदायक. २५. मारवाड देशामध्यें बहुतकाळ वांचणारा वृक्ष जसा तसा. २६. होवो.

हा राम! हा रघूत्तम! धांवा, हो! न त्यजा [1]स्वभावास ।
रक्षूनि जोडवा मग मजकरवीं [2]अंजली [3]स्वभावास.' ॥ ३६
वाहुनि रथीं, गगनपथ अवलंबुनि, जानकीस खळ पळवी, ।
तें व्यसन तिचें रोदन [4]तच्छ्वशुरसख्या [5]जटायुला कळवी. ॥ ३७
गृध्र म्हणे, 'रे! कोठें नेसी माझ्या [6]सुनेसि [7]फटकाळा! ।
मी [8]पक्षिप, तूं केवळ मदमत्त [9]व्याळ [10]पंक्तिफट काळा. ॥ ३८
बहु वृद्ध गृध्र जरि मी, जरि तूं [11]वज्रींदुराहु तरणा रे! ।
तरसिल न मज, जरि तुझे [12]सुरबलजलधीस बाहु तरणारे.' ॥ ३९
रोधावें जेंवि वनीं अतिचपला वानरा [13]वणवयानें, ।
केलें तसेंचि गृध्रें, वृद्धाहि तरे न रावण वयानें. ॥ ४०
सीता [14]गृध्रासि म्हणे, 'नमितें, व्हा [15]मुक्तिहेतु, मामाजी ।
उचिता [16]स्वतनूपेक्षा, कुदशा उचिता न हे तुमा [17]माजी.' ॥ ४१
गृध्रें क्षण सोडविली, विरथ करुनि शत्रुला, जसी [18]तातें. ।
मृगदर्शनादि जें जें स्वप्न म्हणे धरुनि लाज सीता तें. ॥ ४२
गृध्रें प्रभुकीर्तिरतें खळ, लंघुनि कीर्ति, घाबरा केला, ।
विसरेल [19]चकोर कसा सेवुनि परळांत राब [20]राकेला? ॥ ४३
चुकवूनि दृष्टि, खंडी खड्गें तो [21]दुष्ट [22]गृध्रपक्षितिला, ।

---

१. मूलप्रकृतीला, स्वभावाला. २. अंजलि जोडवा=नमस्कार करवा. ३. आपल्या बंधूस. (लक्ष्मणाला.) ४. तिचा श्वशुर (सासरा) त्याच्या (दशरथाच्या) सख्याला (मित्राला). ५. जटायु हा गृध्रजातीचा पक्षी होता. त्याचें दशरथ राजाबरोबर बंधूप्रमाणें सख्य होतें. त्यानें रावण सीतेला लंकेंत नेत असतां त्यास मार्गांत आडविलें, तेव्हां रावणानें याशीं युद्ध करून त्याचे पंख उपटून त्याला लोला करून आपण सीतेला घेऊन लंकेस गेला. जटायूच्या भावाचें नांव संपाती. (लेलेकृत रघुवंश.) ६. स्नुषा=सून. ७. हे दुष्टा! ८. गरुड. ९. साप. १०. दहा फणांचा सर्प. (पंक्ति=दहा; फट=फणा.) ११. वज्री+इंदु+राहु=इंद्र(ज्याच्यापाशीं वज्र असतें तो)+चंद्र+राहु नामक ग्रह, इंद्रचंद्रांचा राहु. इंद्र व चंद्र यांचा पराजय कर्ता. १२. सुर+बल+जलधीस=देव+सैन्य+सागराला, देवसैन्य हाच सागर त्याला. १३. वणव्यानें. १४. गृध्र=गिधाड, (जटायूला). १५. (माझ्या) मोचनास कारण. १६. आपल्या शरीराची उपेक्षा. १७. माझी. १८. तातें—बापानें मुलीस, त्याप्रमाणें त्या गृध्रें (जटायूनें) शत्रूला (रावणास) विरथ करून, क्षणभर सीतेस सोडविलें त्या वेळीं सीता कनकमृगदर्शनादिक जें जें पूर्वी झालें होतें तें सर्व स्वप्नच कीं काय असें लाजून (मनांत) म्हणे. उत्तरार्धांत सीतेचा आत्मगत विचार कवीनें सांगितला आहे. सगळी गीति कव्युक्ति आहे. १९. चकोर पक्षी हा चंद्रिका किरणांवर उपजीविका करतो अशी प्रसिद्धी आहे. हें अर्ध सुभाषितरूप आहे. २०. पूर्णिमेला. २१. रावण. २२. जटायूच्या पंखाच्या मूळास.

पडतां मूर्छित वाटे समजावी साधु गृध्रप [1]क्षितिला. ॥ ४४
सीतेसि [2]निजस्कंधीं [3]बैसवुनि तो [4]राक्षसेंद्र चोर पळे, ।
ती [5]तत्स्पर्शें तापे बहु, जेंवि मृगी [6]दवांत होरपळे. ॥ ४५
खळ [7]मूषक [8]लंकातृणराशिस्थ स्वकुळ सर्व चाटून, ।
तो खाववावया ने त्या [9]साध्वीवर्तिलागिं [10]दांटून. ॥ ४६
[11]मृग मारूनि परततां भेटे लक्ष्मणमयूर अभ्रा [12]त्यां, ।
जाणुनि वृत्त म्हणे प्रभु, '[13]हें भ्रात्या! तुज न उचित, [14]अभ्रात्या. ॥ ४७
व्हावीच विकळहृदया वध जाणुनि भीरु बायको पतिचा, ।
त्वां वत्सा! त्यजिलि कशी? करिता इतुक्यांत काय कोप तिचा? ॥ ४८
धरिलें मृगरूप बळें कीं सोडुनि उटज [15]हा निघो रानीं, ।
वाटे बहुधा केली [16]मुग्धेची प्राणहानि [17]घोरांनीं. ॥ ४९
वत्सा! मज [18]पंथ न सुचे, तूंच पुढें काढ चाल, बापा! हूं, ।
किति आलों? किति उरलें? झाली गति काय? चाल बा! पाहूं'. ॥ ५०
येतां, राक्षस गणिला, पडला होता जटायु तो रानीं, ।
केलीं [19]सज्ज धनुष्यें त्यांहीं [20]विगलज्जटायुतोरांनीं. ॥ ५१
[21]तो त्यांसि म्हणे, 'तुमच्या हृदया जें भासलें, असेना तें, ।
सुत हो! जाणा [22]दशरथसख गृध्र जटायु मी, असे नातें. ॥ ५२
रावण घेउनि गेला [23]स्वैवधूरत्नासि करुनि अन्याया, ।
बहु कीर्तिक्षत बाधे, [24]क्षततति बाधति तशा न अन्या या. ॥ ५३

१. पृथ्वीला. २. आपल्या खांद्यावर. (स्कंध=खांदा.) ३. अध्याय २७९ श्लोक ७ पहा. ४. रावण. ५. त्या रावणाच्या स्पर्शानें. ६. वणव्यांत. ही उपमा मूळांत नाहीं. पंतांच्या गीतींचें उत्तरार्ध बहुधा अलंकारमय अथवा कल्पनासौंदर्यमय असतें असें म्हणतात त्याचें हें समर्पक उदाहरण आहे. ७. उंदीर. ८. लंका हाच तृणाचा (गवताचा) राशि, त्याजवर असणारा. ९. साध्वीरूप वातीस. १०. हें रूपक नामक अलंकाराचें उदाहरण आहे. ११. अध्याय २७९ श्लोक १३ पहा. १२. त्या रामातें. (मेघासारखा जो राम त्यातें.) १३. आश्रमांत एकट्या सीतेला सोडून बाहेर जाणें. १४. बंधू नव्हे जो त्याला. (शत्रूला.) १५. हा राम. १६. सुंदर तरुणीची. (सीतेची.) 'मुग्धा' हा एक स्वीया नायिकेच्या तीन प्रकारांपैकीं एक प्रकार आहे. [साहित्यदर्पण ९६-९८-९९-१५४ पहा.] १७. भयंकरांनीं, हिंसकांनीं. १८. वाट. १९. ज्यायुक्त, गुणान्वित. २०. विगलत्+जटा+युत+उरांनीं= लोंबणाऱ्या जटा त्यांहीं युक्त उर ज्यांचें अशा रामलक्ष्मणांनीं. २१. तो जटायु. २२. दशरथाचा मित्र. 'सखि'शब्दाला ['राजाहःसखिभ्यष्टच्'—पाणिनि—५-४-९१] तत्पुरुषसमासाचे अंतीं 'सख' असा आदेश होतो. २३. आपुल्या स्नुषारत्नातें. २४. व्रणाचे समूह. हें अर्ध सुभाषितरूप आहे.

कपट न करिता, पडता क्षणमात्रें अंतकाननीं[1] चोर, ।
तें पावतें अशा या चंचूनें अंत[2] कां न नीचोर[3]' ॥ ५४
श्रीराम म्हणे[4], 'ताता! गेला कोण्यादिशेसि तो हतक[5]? ।
गतकलुष[6] हो यशोजल[7], त्यांत पडो तदसुनाश[8] तें कतक[9]'. ॥ ५५
स्वशिरःकंपें[10] दाउनि दक्षिणदिक्, गृध्र 'याउपर मातें ।
शक्ति नसे तिलहि, असें, पावे, कळकूनियां, उपरमातें[11]. ॥ ५६
'हा तात! मन्निमित्त भ्राते दोघेहि[12] पावलां मरण, ।
बहुधा स्वर्गींहि तुम्हां क्लेशकरचि[13] मद्विपत्तिचें स्मरण.' ॥ ५७
ऐसें रडोनि सुतवत् दहन करुनि, राम भूमिबाळेला[14] ।
शोधी वनीं, प्रभु गमे स्त्रीविरही, जेंवि वृद्ध बाळेला[15] ॥ ५८
'हा सीते! हा सीते! टाकुनि जावें तुवां न रामातें, ।
राहूतें[16] जेंवि सुधा, देवि! न जिरलीस तूं नरा मातें.' ॥ ५९
वाहति न नद्या, न चरति हरिणी, चोखी न थान तोकें[17] वनीं, ।
जेणें विलाप विभुचा[18] मज[19] वदवे सर्वथा न तो कवनीं. ॥ ६०
योजन[20]बाहु[21] कबंध[22] क्षणदाचर[23] लक्ष्मणासि धरि खाया, ।
मृगलाभें वृकसा तो लागे चित्तांत फार हरिखाया[24]. ॥ ६१

---

१. कालाचे तोंडीं, मृत्युमुखांत. २. शेवट. ३. हलक्या रावणाचें वक्षःस्थळ. ४. अध्याय २७९ श्लोक २३पहा. ५. नीच पुरुष, अधम, शठ. ६. निर्मळ, गेलें कलुष (गढुळपण) ज्याचें तें. ७. यशोरूप उदक. ८. त्या रावणाचा प्राणनाश. ९. निवळीबीज, कतकाला 'अंबुप्रसादन' म्हणजे पाणी स्वच्छ करणारें असें अन्वर्थक दुसरें नांव आहे. कतक वृक्षाचें फळ पाण्यांत टाकिलें असतां पाणी स्वच्छ होतें हें सुप्रसिद्ध आहे [मनु ६–६७.] १०. आपलें मस्तक हालवून. ११. मरणातें. १२. जटायु आणि दशरथ. १३. तापप्रद. १४. सीतेला. १५. वेडसर झालेला. १६. सुधा राहूला जिरली नाहीं अशी कथा आहे. देव अमृतपान करीत असतां राहु देवरूप धरून त्यांच्या पंक्तींत जाऊन बसला तो अमृत घेऊन पिणार इतक्यांत चंद्रसूर्यांच्या सूचनेवरून विष्णूनें त्याचें शिर छेदिलें—अशी कथा आहे. [महाभारत—आदिपर्व—अध्याय १९ श्लोक ४–६.] १७. बालक. १८. विश्वव्यापक रामाचा. १९. मज—मोरोपंताला. २०. योजन (चार कोस) लांब बाहु ज्याचे तो. २१. अध्याय २७९—श्लोक २८—३० पहा. २२. हा कबंध राक्षस मूळचा गंधर्व होता. त्यास ऋषिशापानें राक्षसयोनि प्राप्त झाली होती. याचे बाहु चार चार कोस लांब होते त्यांत जें सांपडें तें भक्षून तो दंडकारण्यांत राहिला होता. त्याचें मस्तक इंद्राचें वज्र लागून हृदयप्रदेशांत शिरल्यामुळें याचा देह कबंध म्हणजे मस्तकरहित दिसत असे, म्हणून त्यास हें नांव पडलें. (लेलेकृत रघुवंश.) (कबंध=शीर्षहीन पुरुष.) २३. राक्षस. २४. संतोषाया.

सौमिति म्हणे[1], 'आर्या! काळाचा होय हा सखा, यास ।
सांपडलों, अंतरलों, तुज, मज नेतो सहास[2] खायास. ॥ ६२
मारुनि रावण त्याचे दार[3] तदस्रें[4]करूनि न्हाणून[5], ।
गेल्या[6] निजकीर्तिसह श्रीमत्सीतासतीस आणून, ॥ ६३
जातां पुरास[7] यावें सामोरें भरतसह अनीकांहीं[8], ।
त्वां बैसोनि स्वपदीं नुरवावा[9] काम जनमनीं कांहीं[10], ॥ ६४
ऐसें[11] अवलोकावें, हें बहु माझ्या मनांत बा! होतें, ।
दैवीं नसे, बरें, सुरपुरजन[12] पाहोत दीर्घबाहो[13]! तें.' ॥ ६५
श्रीराम म्हणे, 'वीरा[14]! त्वां खड्गेंकरुनि बाहु तो डावा, ।
हा[15] म्यांहि एकदांचि, श्रीकांतें[16] जेंवि राहु तोडावा.' ॥ ६६
खंडिति तद्बाहूंतें त्यांचे ते सुकरवाल[17]कालाही, ।
कालाहि[18] उशिर लागे कापाया सुकरवाळ[19]काला ही. ॥ ६७
झाला दिव्य[20]शरीर प्रभुच्या जैं निर्मलासिनें[21] तुटला, ।
विश्वावसु गंधर्व द्विज[22]शापापासुनि क्षणें सुटला. ॥ ६८
त्या श्रीरामातें कां साधु न बहु मानितिल? कबंधातें ।
मारी, तारी, वारी[23] त्याच्या तो मानितिलक[24] बंधातें[25]. ॥ ६९

१. अध्याय २७९ श्लोक ३१-३४ पहा. २. हास्ययुक्त. ३. स्त्रिया. ४. त्यांच्या अश्रूनें. ५. न्हाणून=स्नान घालून. स्नान=न्हाण. ६. गेलेल्या अशा (कीर्तीचें विशेषण.) ७.अयोध्येस. ८.सैन्यांनीं. ९. उरवूं नये, सफळ करावा. १०. गीति ६३-६४ युग्म आहे. दोन पद्यांचा अन्वय असतां युग्म, तीन पद्यांचा असतां संदानितक विशेषक किंवा गुणवती, चार पद्यांचा असतां कलापक किंवा प्रभद्रक, पांच पद्यांचा असतां कुलक अथवा बाणावली अशा श्लोकसमूहास विशिष्ट संज्ञा आहेत. 'द्वाभ्यां युग्ममिति प्रोक्तं त्रिभिः श्लोकैर्विशेषकम् । कलापकं चतुर्भिः स्यात्तदूर्ध्वं कुलकं स्मृतम् ॥,' 'द्वाभ्यां तु युग्मकं संदानितकं त्रिभिरिष्यते । कलापकं चतुर्भिश्च पंचभिः कुलकं मतम् ॥' अपरे तु पंचात्मकस्य बाणावलीति संज्ञामाहुः । यथा—'एकः श्लोको मुक्तकं स्यात् द्वाभ्यां युगलकं स्मृतम् । त्रिभिर्गुणवती प्रोक्ता चतुर्भिस्तु प्रभद्रकम् । बाणावली पंचभिः स्यात् षड्भिस्तु करहाटकः॥.' ११. गीति ६३-६४ यांत वर्णिलेली स्थिति. १२. देव आणि पौरजन. १३. हे रामा! [दीर्घ (मोठे) बाहु (भुज) ज्याचे तो दीर्घबाहु.] १४.नरव्याघ्रा! १५. हा दक्षिण बाहु म्यां तोडावा. मूळांत दक्षिण बाहु लक्ष्मणानें आणि सव्य बाहु रामानें तोडावा असें वर्णन आहे. (अध्याय २७९ श्लोक ३६-३८ पहा.)१६. विष्णूनें. १७.उत्तम खड्ग (सुकरवाल) हेंच कालसर्प. १८.केळीचें कालासही. १९. चांगल्या कांकडीलाही. २०. दिव्यदेह. २१. निर्मळ खड्गानें. २२. ब्राह्मणशापानें हा विश्वावसु राक्षसयोनींत जन्मला होता. २३. निवारण करी. २४. सत्वसंपन्न जनांत श्रेष्ठ. (राम.) २५. राक्षसदेहबंधनातें.

तो सांगे, 'श्रीरामा! **सीता** नेली दशाननें, त्याची।
होइल बहु, तसि शिशुची भुजगीच्या दुर्दशा न नेत्याची[1]. ॥ ७०
स्वकरबळें[2], तेजस्वी लोकीं जैसा रवि, प्रसरसी[3] तें।
कथितों, पंपेप्रति जा, वर्णिति त्या विप्र फार सरसीतें[4]. ॥ ७१
मग ऋष्यमूकनगग[5] प्लवगपसुग्रीवसख्य साधूनी।
यश जोडिशील, अमृतहि सोडुनि तें सेविजेल साधूंनीं[6].' ॥ ७२
गंधर्व[7] जाय, तोहि[8] श्रीरघुकुलसारसरवि[9] सरसीतें[10]।
ती त्यासि म्हणे, 'कैसें अनुभविलें[11] सारसर[12] विसरसी तें?' ॥ ७३
प्रभुला दे ताप तिचा[13] वात, जरि सुगंध[14] मंद शीतळ तो.।
वाटे[15] नलिनींत[16] न, हा देह कढायींत[17] सर्वथा तळतो. ॥ ७४
'हा **सीते**! तुजवांचुनि सर्वहि मज तापहेतु[18], हा **सीते**!।
हा **सीते**! तूंचि, मज व्यसनसमुद्रांत सेतु[19], हा **सीते**! ॥ ७५
हा **सीते**! हा न जगत्प्राण[20], खरा वाघ, वायु हा, **सीते**!।
हा **सीते**! व्याळचि[21] हा, व्यक्त पितो राघवायु[22] हा, **सीते**! ॥ ७६
हा **सीते**! मज देतो त्वन्मुखजित[23] चंद्र ताप हा **सीते**!।
हा **सीते**! करितो द्विजराजहि[24] म्हणवूनि पाप[25] हा **सीते**!. ॥ ७७
हा **सीते**! कशि कळली त्वद्व्यसनकथा[26] पिकास[27], हा **सीते**!।
हा **सीते**! जरि नत मी, कशितोंचि[28] तथापि कास, हा **सीते**! ॥ ७८

---

१. नेणाऱ्याची. भुजगीच्या नेत्याची शिशुची तशी दुर्दशा न—असा अन्वय. २. आपल्या भुजबलानें. ३. प्रख्यात होशील. ४. सरोवरातें, तटाकिनीतें. ५. ऋष्यमूक नामक पर्वताच्या ठायीं गेलेला वानरश्रेष्ठ जो सुग्रीव त्याचें सख्य. (अध्याय २७९ श्लोक ४३-४६.) ६. संतांनीं. ७. विश्वावसु. ८. तो रामही. ९. श्रीरघुकुलरूप सारसाचा (कमळाचा आनंददायी) सूर्य. १०. पंपेतें. ११. अनुभविलेलें. १२. श्रेष्ठसरोवर. १३. त्या पंपेचा. १४. सुरभि; वायु शीत, मंद, आणि' सुरभि असा त्रिविध असतो असा कविसमय आहे. 'वने शैत्यमांद्यसौरभ्याणि कविसमयविशेषणैः (रघुवंश—सर्ग १ श्लोक ३८.] १५. हा उत्प्रेक्षालंकार होय. १६. पुष्करिणींत. १७. कढयींत. १८. दुःखकारण. १९. हें रूपकालंकाराचें उदाहरण आहे. २०. जगत्प्राण असें वायूला नांव आहे. 'समीरमारुतमरुज्जगत्प्राणसमीरणाः' इत्यमरः. २१. साप. २२. राघवाचें जीवित. २३. तुझ्या मुखानें जिंकलेला असा. २४. चंद्रमाहि. २५. दुष्टकर्म. हा द्विजराज (चंद्र; पक्षांतरीं—ब्राह्मणांचा राजा) म्हणवूनही पाप करतो. येथें 'द्विजराज' हें पद श्लिष्ट आहे. २६. तुझ्या नाशाची वार्ता. तुझा मधुर स्वर ऐकून कोकिलानें लज्जेनें मूकव्रत धारण केलें होतें, परंतु आतां तुझ्या नाशाची बातमी लागतांच तो मधुर स्वर गर्वानें पुनः करीत आहे असा विरहपीडित आणि कामबाणाभिसंतप्त अशा रामाचा अभिप्राय. २७. कोकिलास. २८. बांधतोंच.

हा **सीते**! जे त्वत्कचभारजितकलाप[1] मोर, हा **सीते**! ।
हा **सीते**! ते नाचति, मज पाहुनि, मज समोर, हा **सीते**! ॥ ७९
बहु लाजवीत[2] होतों[3] करिकेसरिकीरकेकिहरिणा[4] मीं; ।
हांसत[5] कर्म करावें, भोगावें रडत तेंचि परिणामीं. ॥ ८०
हा **सीते**! हा **सीते**! असशिल अद्यापि तूं कसी सासू[6]? ।
ऐकुनि या वार्तेतें[7] प्रियसखि! वांचेल ती कसी सासू[8]? ॥ ८१
मेला श्वशुर[9], न समयीं आम्हीं आलों[10], भिऊनि उग्रास[11], ।
तूं भीरु! व्यसु[12] होउनि झालीसचि तन्मुखांत सुग्रास[13]. ॥ ८२
हा **सीते**! हा **सीते**! हा **सीते**! सुदति[14] मुदतिशयसुखने[15]! ।
मुख नेत्रा दावुनि, परलोकीं मज साध्वि! द्यावया सुख ने. ॥ ८३
हा दयिते[16]! हा **जानकि**! हा भामिनि[17]! हा सुगात्रि[18]! हा **सीते**! ।
हा सुदति! हा कृशोदरि[19]! हा सुंदरि! हा वरोरु[20]! हा **सीते**!' ॥ ८४
ऐसा विलाप करितां **लक्ष्मण** वंदुनि म्हणे[21], 'अहो आर्या! ।
धैर्य त्यजितां, कैसी मारुनि खळ[22], सोडवाल ती भार्या? ॥ ८५
करिती इष्टवियोगें जे प्राकृत[23] तेंचि नर विलापातें, ।
व्याकुळ[24] होऊनि तमीं त्वां द्यावी लाज न **रविला** पातें[25]. ॥ ८६

---

१. तुझ्या केशभारानें जिंकला आहे कलाप (पिसारा) ज्यांचा असे (मोर). २. मंदगति, कृशकटि, सरल नासिका, श्याम केशकलाप आणि चंचलनेत्र यांनीं यथानुक्रम हत्ती, सिंह, पोपट, मोर आणि हरिण यांस लाजवीत होतों. ३. हें 'तुल्ययोगिता' नामक अलंकाराचें उदाहरण आहे. ४. हत्ती, सिंह, पोपट, मोर आणि हरिण यांना. ५. हें 'अर्थांतरन्यास' नामक अलंकाराचें उदाहरण आहे व हें गीत्यर्ध सुभाषितपर आहे. ६. प्राणयुक्त. (स+असु.) ७. रावणानें कपटानें आणि जुलुमानें सीता नेली ही वार्ता. ८. कौसल्या. ९. जटायु. १०. आम्ही योग्य वेळीं परत आलों नाहीं. ११. भयंकर रावणास. १२. गतप्राण. १३. त्या रावणाच्या मुखांत उत्तम घांस. १४. चांगले दंत जीचे अशी. १५. आनंदातिशयाची (मुदतिशयाची) उत्तम खाण (सुखनि) असी. १६. प्रिये. १७. कोपशीले. १८. सुंदर गात्र (शरीर) जीचें अशी, हे सुंदरांगि! १९. कृश आहे उदर जीचें अशी. २०. चांगल्या (वर) मांड्या (ऊरु) आहेत जीच्या असी. २१. अध्याय २८० श्लोक ३-६ पहा. २२. दुष्ट रावण. २३. क्षुद्र, विद्यासंस्कारहीन, अनात्मवान्. २४. **तमीं** पातें व्याकुळ होऊनि त्वां **रविला** लाज न द्यावी–असा अन्वय. येथें 'तमीं' आणि 'रविला' हे शब्द चिंतनीय आहेत. या अर्धाचा भावार्थ:—राम हा सूर्यान्वयोत्पन्न, तेव्हां त्यानें तमीं (अंधकारांत, अज्ञानांत, मोहांत) पडावें हें सूर्याला लाज आणणारें आहे. प्रतापी पित्याचा असा निस्तेज मुलगा व्हावा हें त्या बापाला लाजिरवाणें आहे. २५. पतनानें.

ल्याली[1] आहे पातिव्रत्याशनिकवच[2] सर्वकाळ, जिला ।
घडतें त्वद्ध्यानामृतपानहि[3], कां ती धरील काळजिला[4] ? ॥ ८७
सुग्रीव[5] ऋष्यमूकीं[6] आहे, भेटूं तयाशि आधीं, तें ।
साधूं, अन्योन्याच्या[7] नाशूं, साधूनि सख्य, आधींतें[8]. ॥ ८८
चिंतारत्नश्रीगुरुवरदान[9] तुझ्या असेचि पदरीं तें, ।
मग साधिशील न कवण [10]सिद्धि, सुखें संहरूनि संदरींतें[11] ? ॥ ८९
मी बंधु सचिव[12] भृत्यहि, हें लटिकें काय जी ! वदा नीतें[13], ।
देईन कार्य सिद्धिप्रति जाया कायजीवदानातें[14].' ॥ ९०
पंपेंत[15] स्नान करुनि विभु गेला ऋष्यमूकगोत्रास[16], ।
त्यातें दुरूनि पाहुनि पावे सुगलप्लवंग[17] तो त्रास[18]. ॥ ९१
पवनसुतासि[19] म्हणे, 'ते तापस परि कार्मुकी[20] शरी[21] रानीं ।
येताति कोण ? पुस जा, स्पष्ट गमति देवसे शरीरांनीं.' ॥ ९२
'आज्ञा' म्हणोनि, भेटे गिरिखालीं प्लवगपाळ[22] कपि त्यातें, ।
तत्काळ निवे पाहुनि बहुदिवसां जेंवि बाळक पित्यातें. ॥ ९३
दवतप्त[23] द्विपें[24] निवतो जैसा पावोनि गांगतोयातें[25], ।
तेंवि निवे कपि, रामहि सांगे निजवृत्त सांग[26] तो यातें[27]. ॥ ९४
रुग्णा[28] धनिकासि जसा वित्तार्थी[29] वैद्य, पवनजें कपिला[30], ।
भेटविला प्रभुतें, जसि चुकल्या वत्सासि कामधुक्[31] कपिला. ॥ ९५

---

१. नेसली. २. पातिव्रत्यरूप वज्रकवच. ३. तुझें चिंतन करणें हेंच अमृतपान. ४. धरणार नाहीं—असा काक्वर्थ. ५. सुग्रीव हा वाली नांवाचा एक वानर (किष्किंधा नगरीचा राजा) होता त्याचा भाऊ. सुग्रीव याची बायको तारा वालीनें पळवून त्यास घालवून दिलें होतें. तेव्हां तो ऋष्यमूक पर्वतावर राहत असे, कारण त्या पर्वतावर वालीला मतंगऋषीच्या शापामुळें जाववत नसे. या सुग्रीवाचा मंत्री हनूमान् या नांवाचा वानर होता. तो वायूपासून झाला म्हणून त्याला 'वायुतनय' 'पवनसुत' असें म्हणतात. ६. ऋष्यमूकपर्वतीं. ७. परस्परांच्या. (राम व सुग्रीव यांच्या.) ८. मानसिक दुःखातें. (सुग्रीवपक्षीं राज्यनाश व स्वभार्यापहार, आणि रामपक्षीं सीताविरह; पुढें गीति ९९ पहा.) ९. चिंतित वस्तु देणारें रत्न (चिंतामणि) हेंच श्रीगुरूचें वरदान. १०. कार्यसफलता. ११. साधूंच्या अरींतें. १२. अध्याय २८० श्लोक ६ पहा. १३. संबंध. १४. देह आणि प्राण यांच्या दानातें. १५. पंपानामक सरोवरांत. १६. ऋष्यमूकपर्वतास. १७ सुग्रीव वानर. १८. भय. १९. मारुतीस. हा सुग्रीवाचा मंत्री. २०. धनुर्धर. २१. बाणधारी. २२. वानरपति. (मारुति.) २३. दावाग्नीनें तापलेला असा. २४. गज. [द्विप=दोन मार्गांनीं उदक पिणारा तो.] २५. गंगेच्या उदकातें. २६. संपूर्ण. २७. या मारुतीतें. २८. रोगपीडित अशा. २९. धनार्थी. ३०. सुग्रीवाला. ३१. कामधेनु, मनोरथ पुरविणारी गाय.

सुग्रीवें सीतेचें सहभूषण[1] उत्तरीय[2] दाखविलें[3], ।
पितृवृत्तिपत्रसें[4] जें होतें त्या नगगुहेंत[5] राखविलें. ॥ ९६
तेजें करी प्रकाशित तें अद्भुतधाम[6] कानना[7] चेलं[8], ।
त्यातें पाहुनियां तो साधि[9] श्रीराम कां न नाचेल[10]? ॥ ९७
'मोहूत भुजंग[11] मोहा[12], केंवि तुम्हीं मजसम स्तनग[13]? होतें ।
तुमचेंहि सुकृत[14] सरलें, कीं सांगा मज, समस्त नगहो[15]! तें?' ॥ ९८
सुगल म्हणे, 'रामा! म्यां शोधावी जानकी, शपथ करितों.' ।
राम म्हणे, 'कार्य[16] तुझें जें, तें मी जानकीश[17] पथकरितों[18].' ॥ ९९
शिखिसाक्षिक[19] सख्य करुनि राम करी कार्य मान्य, वालिशतें[20] ।
क्षण ज्यापुढें नुरावें[21], प्रभुबळ[22] तुमजे सुकंठ[23] बालिश[24] तें. ॥ १००
तें[25] प्रत्ययार्थ एकें बाणें भेदूनि सप्ततालीला[26], ।
वालीस वधी, ज्यांची[27] स्वजनीं नुरवीच तप्तता लीला. ॥ १०१
निववी कपिराजपदीं[28] अभिषेचुनि तप्त अंग दासाचें[29]. ।
कुरवाळुनि वालिसुता दे प्रियपुत्रत्व अंगदा साचें. ॥ १०२

---

१. अलंकारांसहित. २. परिधानवस्त्र. ३. अध्याय २८० श्लोक १२ पहा. ४. बापाच्या बातमीच्या पत्रासारखें. ५. ऋष्यमूकपर्वताच्या गुहेमध्यें. ६. विलक्षण धाम (तेज) ज्याचें तें (चेल). ७. वनाला. ८. उत्तरीय वस्त्र. ९. मनोव्यथायुक्त. १०. अर्थात् नाचेल असें तात्पर्य. ११. भुजग हा शब्द येथें श्लिष्ट आहे. भुजग=सर्प; बाहुटे, बाहुभूषणें. हें रामाचें भाषण अलंकारांस संबोधून आहे. १२. हे समस्त नग हो! भुजग (सर्प; बाहुटे, बाहुभूषणें) मोहा मोहूत (मोहवश होवोत) त्यांत नवल नाहीं. पण मजसम तुम्ही स्तनग असतां कसे मोह पावलां? हें मला सांगा; कीं (कदाचित् असें तर नसेलना) तुमचेंहि जें सुकृत (पुण्य) होतें तें सरलें (म्हणून तुम्ही ही मोहवश झालां.) १३. स्तनावर राहाणारे (अलंकार). १४. पुण्य. १५. हे अलंकारांनो! १६. वालिवध, स्वस्त्रीप्रापण आणि राज्याभिषेक. १७. राम. १८. अंगीकारितों, पत्करतों. १९. अग्नीच्या साक्षीनें. अग्नी (शिखी) आहे साक्षी ज्यांत तें. २०. वालिवानरासारख्या शत वानरांनीं. २१. न उरावें. येथें 'उरणें' या स्वरारंभक धातूच्या योगानें 'न' याच्या 'अ'ला परसवर्ण आदेश झाला आहे; नुमजे, नुघडि, नुगवे हीं अशा प्रकारचीं आणखी उदाहरणें. नुरावें=न तगावें. २२. रामाचें सामर्थ्य. २३. सुग्रीव. २४. मूर्ख. २५. त्या सुग्रीवाची खात्री व्हावी म्हणून. [सप्ततालीभेदाची कथा महाभारतांत नाहीं. रामायण—किष्किंधाकांड—अध्याय १२ यांत आहे. रामानें एका सालवृक्षाचा भेद करावा म्हणून जो बाण टाकिला त्यानें सात सालवृक्षांचा भेद करून, ते वृक्ष ज्या भूमीवर होते तिचा भेद करून सप्तभूमिरसातलांत प्रवेश केला—असें वर्णन आहे.] २६. सात ताडवृक्षांच्या समुदाया. २७. ज्या रामाची लीला (क्रीडा) स्वजनीं (स्वभक्तांत) तप्तता (दुःखादिरूप कथा) दुःखदस्थिति नुरवीच (नाहींशी करी). २८. वानरैश्वर्याभिषेक करून. २९. स्वभक्ताचें (सुग्रीवाचें).

[1]प्रार्थी सुगल बहु, परि प्रभु [2]किष्किंधापुरीं न मन घाली; ।
[3]माल्यवदगींच [4]राहे सानुज तो [5]सन्मनोब्रुडनघाली. ॥ १०३

लंकेंत अशोकवनीं जसि बाळमृगी वृकींत, तशि [6]देवी ।
[7]बहुराक्षसींत होती, न स्नान करी, न ती निजे, जेवी. ॥ १०४

छळवी छळी [8]परोपरि तीस वश करावयासि [9]मायावी. ।
न वळेचि, [10]परंकरा कशि [11]कुळभित्तिगता [12]वधूत्तमा [13]यावी? ॥ १०५

हेंहि [14]म्हणे, 'राक्षसि हो! शेवटिं घेउनि [15]महानसा जा, गे!' ।
न [16]बळात्कारतम उठे, मनिं [17]शापदिवा लहानसा जागे. ॥ १०६

त्या [18]नगगुहेंत वार्षिकमासचतुष्टय [19]दिवानिश क्रमुनी, ।
ऐसें अनुजासि म्हणे तो [20]धन्वियशस्विमानिशक्र [21]मुनी. ॥ १०७

'[22]जा [23]वत्सा! चापीं [24]गुण चढवुनि, एकाचि [25]सायका [26]पुसं, ।
कापूस [27]अनलनिं किती? ऐसें त्या [28]प्लवगनायका [29]पुसे. ॥ १०८

---

१. किष्किंधेंत रहावयास या असें रामाला सुग्रीव प्रार्थी. २. येथें सांप्रत अनागोंदी नामक शहर आहे. ३. माल्यवान् पर्वतींच. ४. माल्यवान् पर्वतावर चार महिनेपर्यंत राम राहिला. (अध्याय २८० श्लोक ४०.) ५. सन्मनस्+अब्रुट्+अनघ(निष्कलंक)+अलि(भ्रमर.)=साधूंच्या मनोरूप कमलांतील निष्कलंक भ्रमर. [अब्रुट् (अप्+रुह्=पाण्यांत रुजणारें) कमल.]' ६. सीता. ७. द्व्यक्षी, त्र्यक्षी, ललाटाक्षी, दीर्घजिव्हा, अजिव्हिका, त्रिस्तनी, एकपादा, त्रिजटा, इत्यादि अनेक राक्षसी रावणानें सीतेच्या रक्षणार्थ ठेविल्या होत्या. [अध्याय २८० श्लोक ४१-४६.] ८. अनेक प्रकारांनीं. कोणी राक्षसी सीतेला भय दाखवी, कोणी भयंकर शब्द करी, कोणी मी तुला भक्षण करितें असें म्हणे, कोणी भर्त्याचा त्याग करून रावणास वश हो असा उपदेश करी (श्लोक ४७-४८ पहा). ९. कपटी. (रावण.) १०. दुसऱ्याच्या हातास. ११. सत्कुलरूप भिंतीनें आड केलेली. सत्कुलरूप भिंतीचा आश्रय धरून असलेली. १२. उत्तम युवती. १३. येऊं नये—असें तात्पर्य. १४. रावण म्हणे. १५. स्वयंपाकगृहास. १६. बलात्काररूप अंधकार. १७. नलकूबरशापरूप दीप. [पूर्वी रावणानें रंभेवर बलात्कार केला तेव्हां तिचा पति नलकूबर यानें रावणास शाप दिला कीं, 'परस्त्रीवर बलात्कार करशील तर मरण पावशील' इत्यादि कथेकडे येथें कटाक्ष आहे. अध्याय २८० श्लोक ६०-६१; मंत्ररामायण—उत्तरकांड, गीति १५६-१६२ पहा.] १८. माल्यवान् पर्वताच्या गुहेंत. १९. रात्रंदिवस. २०. धनुर्धर, यशस्वी आणि तेजस्वी यांमध्यें शक्र. (श्रेष्ठ इंद्रासारखा.) २१. मननशील, विचारशील. (राम.) २२. किष्किंधा नगरींत जा. (अध्याय २८२ श्लोक ५-१०.) २३. रामाच्या आज्ञेनें लक्ष्मण किष्किंधेस गेला. (रामायण—किष्किंधाकांड, सर्ग ३३.) २४. दोरी. ['मौर्वी ज्या शिञ्जिनी गुणः' इत्यमरः.] २५. बाणाला. २६. पुसून साफ कर, नेम धरण्यासाठीं साफ करून ठेव, लक्ष्यभेद करण्यासाठीं पुसून तयार ठेव. २७. अग्नीमध्यें. २८. सुग्रीवाला. २९. विचार.

बहुधा कृतघ्न मिथ्यावादी[1] दुष्परिहराघ[2] वानर तो[3], ।
अंगद असो कपीश्वर, तारेसीं सुगळ, राघवा! न रतो.' ॥ १०९
जातांचि[5] लक्ष्मणातें[4] धांवुनि भेटे सुकंठ, तो भ्याला, ।
नमुनि म्हणे, 'स्वप्नीं मज कार्य[6] दिसे, जेंवि वित्त लोभ्याला[7]. ॥ ११०
लंघील[8] कवण? जेणें वधिला एके शरें कपीश[9] तशा[10], ।
सर्व दिशा शोधाया पाठविले असति म्यां कपी[11] शतशा'. ॥ १११
ऐसें सांगोनि [12]निघे भेटाया त्याहि राघवा राया, ।
दिसलें कृतघ्नपण जें तेंहि महादुर्धराघ[13] वाराया. ॥ ११२
प्रभुतें पाहूनि निवे, जैसा निधिदर्शनें[14] निवे दीन, ।
[15]अंजलि बांधोनि, म्हणे, 'जरि अभय असेल तरि निवेदीन. ॥ ११३
मज बोलवाल तैसें बोलेनचि मी अज्ञान कीरचि[16], तें ।
कार्य घडेल कसें, जी! सुकृतें इतरें अजानकीरचितें[17]? ॥ ११४
देवीतें शोधाया पाठविले प्लवंगवीर[18] बोधून, ।
भरलाचि अवधिमास[19] द्रुत[20] येतिल ते दिशासि शोधून.' ॥ ११५
श्रीराम म्हणे, 'साधो! कृतकृत्य[21] तुझा सखा नवा नरें[22] हो ।
जा तिकडे, काय[23] गुणें तूं? बहुमत शतमखा[24], न वानर, हो.' ॥ ११६
तों पूर्वोत्तरपश्चिमदिक्शोध करूनि [25]कीश कवि चोर[26] ।
आले म्हणति, 'न देवी ती आढळली, न तोहि[27] [28]अविचार.' ॥ ११७

---

१. खोटें बोलणारा. २. परिहर (निरसन) करण्यास अशक्य ज्याचें पाप (अघ) असा. ३. सुग्रीव. ४. लक्ष्मणा. ५. किष्किंधेस जातांचि. ६. सीतेचा शोध लावणें हें कार्य. ७. येथें उपमालंकार आहे. ८. अपमान करील, उल्लंघन करील. ९. वाली. १०. तशा वीराला. (रामाला.) ११. अध्याय २८२ श्लोक १७-२० पहा. १२. सुग्रीव निघे—असा संदर्भ. (रामायण—किष्किंधाकांड सर्ग ३८.) १३. मोठें दुर्धर असें पाप. १४. निधि (ठेवा) म्हणजे पृथ्वींत पुरलेलें जें असंख्यात द्रव्य असतें तें; त्याच्या दर्शनानें दरिद्री जसा निवतो (संतुष्ट होतो) तसा रामदर्शनेंकरून सुग्रीव संतुष्ट झाला—असा भाव. १५. हात जोडून. १६. अज्ञान पाखरूं. (पोपटच.) १७. जानकीवांचून इतर स्त्रीनें केलेल्या सुकृतें (पुण्यानें). १८. वानरवीर. १९. नेमलेली मासाची मुदत. सीताशुद्धीस गेलेल्या वानरांस एक महिन्यांत परत येण्याविषयीं सुग्रीवाची आज्ञा होती. (किष्किंधाकांड—सर्ग ४० श्लोक ६९-७०.) २०. लवकर. २१. सफलमनोरथ. २२. राम. २३. तुझे गुण काय वर्णावे? २४. तूं इंद्राला अतिशयित मान्य आहेस, तूं वानर नव्हेस. २५. वानर. २६. हेर. २७. रावणहि. २८. मूढ. (रावण.)

राम म्हणे, '[1]कर्णीं कर ठेवू ती तरि न [2]दक्षिणा आशा, ।
मज फार [3]दक्षिणेची विप्रा जसि तशिच लागली [4]आशा.' ॥ ११८
[5]मासानंतर [6]दधिमुख सांगे [7]मधुवनविनाशवोभाट, ।
सुगळासि गमे तो निजभट सुयशातेंचि वर्णितो भाट. ॥ ११९
दुसरे दिवशीं प्रभुला वंदिति कपि [9]अंगदादि येऊन, ।
[10]तद्दर्शन तें जाणों त्या [11]शीतार्तीं यथेष्ट येऊन. ॥ १२०
राम म्हणे, 'शोधक हो! सकरुण हो! जरि असेल [12]सांगातें, ।
द्या जीवनौषध मला, कीं [13]त्याचें स्थान कोण सांगा तें? ॥ १२१
वांचेन काय? होइन साधूंसि, रसांत [14]आज्यसा, मान्य? ।
मरण बरें, यश ज्यांत श्रेष्ठ न, त्याहूनि राज्य सामान्य'. ॥ १२२
हनुमान् [15]वदे, 'प्रभो! म्यां लंकेंत विलोकिली [16]अनादिसती, ।
रवि[17]भा जसी [18]उलूकीनयना तसि राक्षसी जना दिसती. ॥ १२३
ज्या [19]शिखिशिखेसि भुलला तो दुष्ट [20]पतंग मत्त पाहून, ।
ती म्यां विलोकिली, तप [21]गुरु अन्याचें न [22]मत्तपाहून. ॥ १२४

---

१. ती दक्षिणा आशा तरी कर्णीं कर न ठेवू (ठेवो)=मला कांहीं सीतेविषयीं माहीत नाहीं असें न म्हणो. कर श्रवणीं ठेवणें=कानावर हात ठेवणें=कानांत बोटें घालणें=कान झांकणें=कोणत्या तरी कार्याविषयी अथवा गोष्टीविषयीं आपणास कांहीं माहिती नाहीं असें दर्शविणें. ['कर श्रवणीं ठेवित्ये नुघडि नेत्र घे भीतिला'—केकावली १० पहा.] २. दक्षिण दिशा. ३. (रामपक्षीं) दक्षिण दिशेची; (विप्रपक्षीं) दानद्रव्याची. ४. अध्याय २८२ श्लोक २५ पहा. ५. महिन्याच्या अखेरीस (दुसऱ्या महिन्याच्या शेवटीं; एक मास ११५ पद्यांतील व दुसरा त्या नंतरचा. मूळ श्लोकांत 'द्विमासोपरमे काले व्यतीते' असें आहे.) ६. दधिमुख हा सुग्रीवाचा मातुल; हा मधुवनाचें संरक्षण करीत असे. ७. मधुवन=ही वालीची पूर्वींची बाग असून तिचा स्वामी सांप्रत सुग्रीव होता. हिचा वानरांनीं नाश केल्याची वार्ता. (सुंदरकांड—सर्ग ६३ पहा.) ८. आपला योद्धा (दधिमुख). या पद्यांत उत्प्रेक्षालंकार आहे. ९. 'हनूमत्प्रमुखाः' असें मूळांत आहे. (अध्याय २८२ श्लोक ३३.) १०. त्या अंगदादि वानरांचें दर्शन. ११. थंडीनें कुडकुडलेल्या (रामीं). हा उत्प्रेक्षालंकार आहे. अध्याय २८२ श्लोक ३४-३६ पहा. १२. सांगातें=संगतीं, जवळ, बरोबर. १३. त्या जीवनौषधाचें स्थान. १४. तूपासारखा वंद्य, सहा रसांत घृताप्रमाणें मान्य. राम म्हणतो:—"वांचेन काय? साधूंसि मी मान्य—जसें रसांत आज्य मान्य होतें—तसा होईन काय? ज्यांत (ज्या कार्यीं—स्थळीं) यश श्रेष्ठ (उत्तम) त्यांत मरण बरें. त्याहून (त्या यशाहून, त्या यशाचे तुलनेनें पाहतां) राज्य हा पदार्थ सामान्य (अगदीं साधारण) आहे, स्पृहणीय नव्हे.' येथें 'काय' हा शब्द काकाक्षिगोलकन्यायानें योजावा. १५. अध्याय २८२ श्लोक ३७-७१ पहा. १६. सीता. १७. भा=कांति. १८. घुबडीच्या डोळ्यांला. १९. अग्निज्वालेस. २०. शलभ. ['पतंगः शलभे शालिप्रभेदे पक्षिसूर्ययोः' इति विश्वः.) २१. मोठें. २२. माझ्या तपापेक्षां.

वांचेल पतंग कसा लावुनियां वदन दीपकलिकेला[1]? ।
म्यां तों त्यासीं, लंघुनि शतयोजन[2] नंदनदीप[3], कलि[4] केला. ॥ १२५
पुर जाळिलेंचि, चुरिला अक्षाख्य[5] सहोपवन[6] कुमारमणी, ।
वाटे प्रसन्न झाली सती प्रिया शंभुची उमा रमणी. ॥ १२६
चूडामणि[7] पाठविला या[8] चरणावरि वहावयाला जो, ।
तो हा, पादाब्जस्था[9] यां[10] पद्मासन[11] महावया[12] लाजो. ॥ १२७
तुज ऐषीकास्त्राची[14] कथिती झाली रडोनि खुण[15], गा! ती ।
प्राणव्यसनीं[16] पडली, करिवरमतिसी[17] तुझेचि गुण गाती. ॥ १२८

---

१. दिव्याच्या ज्योतीला. अर्थात् वांचणार नाहीं—असा भाव. २. शंभर गांवें. ३. नद आणि नद्या यांचा पति. (समुद्र.) ४. त्या पतंगाशीं (रावणाशीं) कलि (कलह) केला. ५. अक्ष नांवाचा रावणाचा कुमारमणि (उत्तम पुत्र). ६. उपवनासहवर्तमान. ७. शिरोलंकार. ८. या तुमच्या. (रामाच्या.) ९. पादकमळावरील. १०. चूडामणीला. ११. ब्रह्मदेव. १२. मोठें वय असा. (वृद्ध.) १३. या (तुमच्या—रामाच्या चरणाकडे बोट दाखवून) चरणावरि वहावयाला (अर्पण करण्यासाठीं) जो चूडामणि (शिरोलंकार) [सीतेनें] पाठविला [आहे] तो हा (हातांतील चूडामणि दाखवितो.) पादाब्जस्था (पादकमलस्थित) या (चूडामणीला) [पाहून] महावया (वृद्ध) पद्मासन (ब्रह्मदेव) लाजो. राम हा विष्णु, त्याचा पुत्र ब्रह्मदेव, पुत्राचा अधिकार पित्याच्या पादकमळीं स्थित असण्याचा; या न्यायानें पद्मासनाचा रामपादाब्जस्थ असण्याचा अधिकार या चूडामणीनें बळकाविला असें पाहून त्याला लाज वाटो. (त्या पद्मासनानें या चूडामणीनें आपणास स्वाधिकारपदच्युत केलें म्हणून अथवा आपल्यास अधिकारपदसंबंधानें प्रतिस्पर्धी दायाद (चूडामणि) उत्पन्न झाला म्हणून खालीं मान घालावी). 'महावया' हें हेतुगर्भविशेषण आहे. पद्मासनाचा पादकमलस्थ असण्याचा अधिकार जुना, बहुतदिवसांचा असून, तो एकाकीं या नव्या सद्य:प्राप्त चूडामणीनें हिसकावून घेतला, हें 'महावया' या पदानें इंगित केलें आहे. १४. इषिकेचें गवताचें केलेलें अस्त्र=ऐषीकास्त्र. या अस्त्राची कथा रामायणांत आहे ती अशी:—राम अरण्यांत सीतेसह वास करीत असतां एकदां इंद्रकाक नामक कावळ्यानें सीतेच्या लावण्यास भुलून स्तनप्रदेशावर पक्षतुंडनखांनीं क्षत केलें. तेव्हां रामानें त्यास या अविनयाबद्दल शासन करण्यासाठीं त्यावर इषीकास्त्राचा प्रयोग केला, म्हणजे इषिका नांवाचें एक तृण (काश) आहे त्याची काडी अभिमंत्रित करून ती त्यावर सोडिली. त्या अस्त्रापासून आपला बचाव करण्यासाठीं तो कावळा पुष्कळ फिरला, पण त्याचें रक्षण करण्यास कोणी धजला नाहीं. तें इषीकास्त्र त्याची पाठ धरून होतेंच. तेव्हां तो निरुपाय होऊन, अस्त्राघात सोसण्यास असमर्थ होत्साता रामास शरण आला. सर्वनाशापेक्षां एकनेत्रनाश बरा अशी त्यानें आपल्या मनाची समजूत केली. तेव्हां रामानें त्याचा एक डोळा काढून घेऊन त्याला मुक्त केलें—अशी कथा आहे. [अयोध्याकांड—सर्ग ९५.] या वेळेपासूनच काकाला 'एकाक्ष' 'एकनेत्र' असें नांव पडलें. ही गोष्ट एकांतीं झाली म्हणून कोणास माहीत नव्हती. १५. स्मरण होण्यासाठीं खुण=प्रत्यभिज्ञान. १६. प्राणसंकटीं. १७. गजेंद्राच्या मतीसारखी. [शापग्रस्त गजेंद्रानें विष्णूचा धांवा केला इत्यादि पुराणप्रसिद्ध कथेकडे येथें कटाक्ष आहे.]

भस्म कराया घेउनि गेला तो दैव[1]हतक लंकेला, ।
रक्षा स्वकीर्तिला रविकुळदीपा! त्याहि गेतकलंकेला.[2]' ॥ १२९
राम म्हणे, 'साधो! त्वां वांचविलें, घेतलें विकत मातें, ।
मरणीं अमृत दिल्हें, जें उपकारीं न बुडवील कतमातें[3]?' ॥ १३०
प्रभुच्या प्रहर्षसमयीं सुगलाङ्गें करुनि यूथराज[4] बळी, ।
बहुसंख्य सिद्ध होउनि आले साह्यार्थ ईश्वराजवळी. ॥ १३१
नल[5] नील[6] सुषेण[7] पनस गज गवय गवाक्ष गंधमादन[8]ही ।
आले[9] जांबवदादि स्वबळभरें[10] कांपविति समस्त मही. ॥ १३२
कोटिसहस्रबलाधिक एकैक असंख्य ते मज[11] न कथवे, ।
दिसती प्लवगर्क्षांचे[12] जिकडे तिकडे जिताभ्रकनक[13] थवे. ॥ १३३

अध्याय बारावा.

सुदिनीं[14] रघुसिंह[15] निघे माराया त्या दशाननगजातें; ।
प्रभुचा क्षम होय चुरुनि कर द्याया दुर्दशा न नग ज्यातें[16]. ॥ १
तो उत्तराब्धि[17] जाणों जातो त्या दक्षिणाब्धिवरि, त्यातें ।
जिंकाया दुष्टातें[18] आश्रय देउनि कुकीर्तिवरित्यातें. ॥ २
स्वप्नांत[19] सिंधु सांगे[20], 'नळवानर विश्वकर्मसुत[21], राया! ।
रामा! तो सेतु रचू, हा कीर्तिप्रद उपाय उतराया'. ॥ ३

---

१. दुर्दैवी रावण. २. गेला आहे कलंक (डाग) जीपासून तिला. (सीतेला.) ३. कोणातें. सर्वांतें उपकारीं बुडवील–असें तात्पर्य. ४. यूथ+राज=समुदाय, वानरसमूह+पति=वानरांच्या कळपाचे स्वामी. (नल, नील, सुषेण इत्यादि.) ५. विश्वकर्म्याचा पुत्र. ६. अग्नीचा पुत्र. ७. वरुणाचा पुत्र. ८. कुबेराचा पुत्र. (बालकांड–सर्ग १७ श्लोक १०-१७ पहा.) ९. अध्याय २८३ श्लोक २-९ पहा. १०. आपल्या सैन्याचा भारानें. ११. मज मोरोपंतास. हें पंतांच्या विस्तृतवर्णनभीरुत्वाचें ज्ञापक होय. १२. वानरांचें आणि आस्वलांचें. १३. जिंकिलें आहे अभ्र (मेघ) व कनक ज्यांहीं असे. १४. अध्याय २८३ श्लोक १४ पहा. सुदिनीं=प्रशस्त तिथि पाहून. १५. हें रूपकालंकाराचें उदाहरण आहे. १६. ज्यातें (ज्या रावणातें) चुरुनि दुर्दशा द्याया (चुराडा करण्यास) नग (कैलास पर्वत) क्षम (समर्थ) न होय, (त्या रावणाला.) चुरुनि द्याया प्रभुचा(रामाचा) कर(हात) क्षम होय. कैलासपर्वत रावणानें उचलिला या गोष्टीवर कविकटाक्ष आहे. १७. हें उत्प्रेक्षालंकाराचें उदाहरण आहे. १८. दुष्टातें (रावणातें) आश्रय देउनि (देण्यामुळें) कुकीर्तिवरित्यातें (दुष्कीर्ति करून घेणाऱ्या अशा) त्यातें (त्या दक्षिणाब्धितें) जिंकाया, जाणों, तो उत्तराब्धि त्या दक्षिणाब्धीवर [चढाव करून] जातो. १९. अध्याय २८३ श्लोक ३३ पहा. २०. अध्याय २८३ श्लोक ३८-४२ पहा. २१. देवत्वष्टा (विश्वकर्मा) त्याचा पुत्र.

प्रभुचे आज्ञेनें नल सेतूतें, धरुनि अनलसत्व[1], रची, ।
तो[2] सिद्ध होय जगदघराशीचा[3] मूर्त अनल[4] सत्वरची. ॥ ४
तेथ बिभीषण[5] राक्षस नमुनि म्हणे, 'बा! पैराघ[6] वाराया, ।
तूंचि सुतीर्थ नता[7] मज, तूं माता बाप राघवा! राया!' ॥ ५
शरणागत अरिबंधुहि रामें प्रेमेंचि घेतला पदरीं[8], ।
खळदत्तीं[9] अमृतफळीं न प्रभुरुचि[10], बहु संदर्पितीं[11] बदरीं[12]. ॥ ६
'सुग्रीव पांचवा[13], बा! गुणरंजितसर्वसत्सभा[14]! सावा, ।
तूं बंधु, न कोणीही दीन सुधी सुरभिवत्स भासावा[15]'. ॥ ७
ऐसें पूजुनि त्यातें[16] प्रभु लंकाराज्य दे, न वेदां[17] ते[18] ।
गुण वर्णवती, ज्यांहीं[19] लाजविले बहु जुने नवे दाते. ॥ ८
शत[20]योजन आयत[21] दशयोजन विस्तीर्ण सेतु[22] शंकेतें ।

---

१. न आळसपणा, आलस्यरहितत्व. २. सेतु. ३. जगाच्या पातकाच्या राशीचा. ४. अग्नि. या अर्धात रूपकालंकार आहे. ५. येथें बिभीषण चार सचिवांसह रामदर्शनास आला होता. (श्लोक ४६.) ६. दुसऱ्याचें पातक अथवा मोठें पाप. ७. नम्रास. ८. पदरीं घेणें=कृपा करून स्वीकारणें, अंगीकार करणें. ९. दुष्टानें दिलेल्या. १०. प्रभूला गोडी नाहीं. प्रभूची आवड नाहीं. ११. साधूनें अर्पिलेल्या. १२. बोरांवर. (शबरीनें रामास बोरें दिलीं या कथेवर कविकटाक्ष आहे.) १३. आम्ही चौघे बंधु मिळून चार, सुग्रीव पांचवा आणि हे बिभीषणा! तूं सहावा. १४. गुणांनीं रंजविली सकल सज्जनांची सभा ज्यानें अशा हे बिभीषणा! १५. ही रामाची बिभीषणास उक्ति आहे:—सुग्रीव पांचवा (बंधु); बा (बिभीषणा!) हे गुणरंजितसर्वसत्सभा! तूं सावा (षष्ठ) बंधु कोणीही सुधी (शहाणा) सुरभिवत्स (कामधेनूचा मुलगा) दीन न भासावा—असा अन्वय. याचा भावार्थ:—कोणीही शहाण्यासुरत्या मुलास (पुरुषास) कामधेनूनें (अत्यंत भद्र पुरुषानें) आपला मुलगा म्हणून मानल्यावर (दत्तक घेतल्यावर) त्या मुलाला मग दैन्य असूं नये. ज्या अर्थी बिभीषणाचा रामानें अंगीकार केला त्या अर्थी त्याला दीन, खिन्न, पोरक्याप्रमाणें दिसण्याची जरूरी नाहीं. १६. त्या बिभीषणातें. १७. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद अशा वेदाला ते (रामाचे—परमेश्वराचे) गुण वर्णन करतां येत नाहीं. 'यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसा सह' असें श्रुतिवचन आहे. १८. ते रामाचे गुण. १९. ज्या गुणांनीं. २०. तो सेतु शतयोजन आयत (लांब) आणि दशयोजन विस्तृत होता असेंच वर्णन मूळांत आहे. (अध्याय २८३ श्लोक ४४; रामायण—युद्धकांड सर्ग २२ श्लोक ७२.) २१. लांब. २२. सेतूवर पंतांनीं सात उत्प्रेक्षा घेतल्या आहेत. त्यांचा या नवम गीतीच्या पूर्वार्धात उपोद्घात केला आहे व पंधराव्या गीतीच्या उत्तरार्धात उपसंहार केला आहे. ज्याचें क्षेत्रफळ एक हजार योजनें असा मोठा समुद्र शंकेतें दे (उत्प्रेक्षा सूचवी); [ती] कोणती? तर हा सेतु नसून हा भूमिबाहू (पृथ्वीचा हात) असावा. तो अतिशय रागावून लंकेतें बुडवाया गेला असें वाटे. रागावण्याचें कारण सीता ही पृथ्वीची मुलगी, तेव्हां तिचा लंकेनें (वस्तुतः लंकावर्ती रावणानें) केलेला छल पृथ्वीस असह्य व्हावा व त्याबद्दल तिला अत्यंत कोपावेश चढावा हें युक्तच.

दे, गेला बुडवाया कोपाकुल भूमिबाहु लंकेतें. ॥ ९
किंवा [1]तो [2]कपिकटकोत्तरसिंधूद्गत [3]बुभुक्षु [4]कालाही, ।
दूर पसरला खाया [5]रात्रिचरक्षुद्र बेडकालाही. ॥ १०
[6]सेतु न तो [7]यत्पतिनें स्वसुता नेली, जशी वृकें [8]एणी, ।
त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असे वेणी. ॥ ११

---

१. तो सेतु कालाहि (कालसर्प) होय. २. वानरसैन्यरूप उत्तरसमुद्रापासून उत्पन्न झाला असा. ३. क्षुधित. ४. काल+अहि=काल+सर्प. ५. राक्षसरूप क्षुल्लक बेडकाला खाण्यासाठीं हा (सेतु) कालसर्पच पसरला कीं काय असें वाटतें. ६. या गीतीसंबंधें पुढील उतारा वाचण्यालायक आहे. यांत या पद्यावरील 'विविधज्ञानविस्तार'कार यांचा दोषारोप व त्याचें 'निबंधमाला'कारकृत खंडन यांचा समावेश केला आहे. "मोरोपंतानें रामायणांत कोठें एक उत्प्रेक्षा केली आहे ती अशी:— सेतु न तो यत्पतिनें स्वसुता नेली जशी वृकें एणी । त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असे वेणी ॥ रामचंद्रानें शिलासेतु बांधला; तो कवि म्हणतो सेतु नव्हे, तर काय? आपली कन्या जानकी रावणानें नेली या कारणानें पृथ्वीनें त्या रावणाची लंकारूप जी स्त्री तिची वेणी धरून ओढिली. काय हा अलंकार! रावणानें जर दुसऱ्याची बायको आणली, तर त्याच्या स्त्रियेला तें बरें वाटेल काय? सहसा वाटणार नाहीं. तर मग तिची उगीच कां वेणी धरून ओढावी? रा० ब० भास्कर दामोदर यांणीं 'नवनीता'चे प्रस्तावनेंत ह्या उत्प्रेक्षेची फारच प्रशंसा केली आहे. त्यांना तिजमध्यें काय जो चमत्कार वाटला असेल तो वाटो. आमचें मत तर अगदीं भिन्न." (निबंधमाला–अंक ५९ पृष्ठ ९-१०) 'विविधज्ञानविस्तार'कारांच्या या आरोपाचें प्रत्याख्यान स्वतः 'निबंधमाला'कार यांनीं निबंधमालेच्या याच अंकांत केलें आहे तें असें:—"आमच्या आक्षेपकास लंकादेवीची वेणी धरून ओढल्याबद्दल तिची फार कींव आली आहे. या किंवेवरून त्याची सदयता प्रकट होते, पण सहृदयता होत नाहीं. * * * * * लंका ही रावणाची स्त्री यास्तव तिजविषयीं सीतेची माता जी भूदेवी तिची अत्यंत द्वेषबुद्धि होणें हें स्त्रीस्वभावास अनुसरूनच आहे, व आपल्या कन्येचा ज्या दुष्टानें विनाकारण छळ आरंभला आहे त्याच्यावर कसा तरी प्रतीकार घडो अशी इच्छा तीस होणें हेंही सहजच आहे. द्वेषाचें व प्रेमाचें मनुष्यापासून मनुष्याकडे किंबहुना पदार्थाकडेही कसें संक्रमण होत असतें हें मनुष्यस्वभावाकडे ज्यानें अंमळ लक्ष पुरविलें असेल त्याच्या सहज लक्षांत येणारें आहे. आमचे कविकुलगुरु यक्षाच्या मुखें मेघास सांगतात:—[*]भर्तुः कंठच्छविरिति गणैः सादरं वीक्ष्यमाणः । "बा मेघा! तुजकडे शिवगण मोठ्या प्रेमानें बघत राहतील कां? तर तुझा वर्ण त्याच्या स्वामीच्या कंठासारखा आहे म्हणून!" तर हृदयवृत्तीच्या संक्रमणाचा इतका प्रभाव आहे. आतां हें खरें आहे

---

* 'भर्तुः कंठच्छविरिति गणैः सादरं वीक्ष्यमाणः पुण्यं यायास्त्रिभुवनगुरोर्धाम चंडीश्वरस्य ।
धूतोद्यानं कुवलयरजोगंधिभिर्गंधवत्यास्तोयक्रीडाविरतयुवतिस्नानतिक्तैर्मरुद्भिः ॥' **मेघदूत.**
[महाकाल जो त्रिभुवनपति त्या वंदाया मग जावें । प्रभुकंठाची प्रभा मानुनी गण तुज बघतिल भावें ॥
तया स्थलींचीं बालोद्यानें हलवी मारुत मंद । विलसित पद्मां डोलवूनि जो हरी तयाचा गंध ॥]
'पद्यरत्नावली.'

रामजयश्रीलग्नीं लंका घाली सुनील पाटावे, ।
सेनावऱ्हाडिणीला पायघडी कां असें न वाटावें ? ॥ १२
बहुधा तुच्छ जलधितृण चाटायाचा धरूनियां वीट, ।
गेला प्रभुप्रतापासितपथ रक्षोटवीकडे नीट. ॥ १३
कीं पतित पति त्यागुनि विश्वशरण्याकडे रडत वांटे, ।

कीं, रावणानें आपली मुलगी चोरून नेली तर त्याच्या बायकोकडे काय अपराध आहे, तिला तर घरांत सवत आल्यानें वाईटच वाटणार आहे, वगैरे गोष्टींचा विचार आमच्या आर्यभूमीनें करणें जरूर होतें, पण हा तीस कसा झाला नाहीं कोण जाणें ? असो. स्वतः क्षमा खरी, पण या प्रसंगीं तीच आमच्या रसिकाच्या क्षमेस पात्र आहे. आमच्या कवीच्या हातून वरील चूक कशी घडली हेंही चांगलेंसें कळत नाहीं. पण पुढील शतकांत सगळेंच पारडें फिरून जाऊन नवे प्रभु, नवी विद्या, नवे महाकवि, नवे रसिक, अशी गर्दीच गर्दी होऊन जाणार आहे, व उपमा उत्प्रेक्षा वगैरे जोखण्याचे विलायती कांटे या देशांत येऊन थडकणार आहेत हें तरी त्या बिचाऱ्याच्या कोठून लक्ष्यांत यावें ! वरील उत्प्रेक्षेची प्रशंसा केल्याबद्दल कै० भास्कर दामोदर पाळंदे यांजवरही प्रस्तुत टीकाकर्त्याचा शेवटचा फटकारा गेला आहे. पण माजी रावबहादूरासारख्या खऱ्या रसिकास चमत्कार वाटण्याजोगें वरील उत्प्रेक्षेंत कांहींच नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं. एक तर केशाकर्षणाचा प्रकार स्त्रियांच्या कृतीस अनुसरून असल्यामुळें स्वभावोक्तिरूप होय; आणि शिवाय सेतूचें आणि वेणीचें सादृश्य कृष्णत्वास्तव, दैर्घ्यास्तव, आणि संवीतत्वास्तव अत्यंत समर्पक व हृदयंगम होय ! याप्रमाणें 'विविधज्ञानविस्तारा'तील आक्षेपांचें निरसन झालें. यावरून आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच, कीं जे आक्षेप कित्येक पंडितंमन्य प्रस्तुत कवीवर आपल्या विद्वत्तेच्या घमेंडींत झोकून देतात त्यांविषयीं यथार्थ बुद्धीनें विचार केला असतां ते प्रायः असेच नाहींसे होणार आहेत. त्यांतून कवींचे विचार तर्कशास्त्राच्या तराजूंत जोखूं पहाणें हें तर अरसिकतेचें केवळ शिखर होय !" (निबंधमाला अंक ५९ पृष्ठ १४-१५ पहा.) ७. जिच्या (लंकेच्या) पतीनें लंकापति जो रावण त्याणें. ८. कुरंगी.

१. रामाचें जयश्रीशीं लग्न व्हावयाचें होतें, त्या प्रसंगीं लंका (या लग्नांतील वधूमाता) सुनील (निळे भोर) पाटावे घाली (अर्पण करी, आंदण देई.) ['घालणें' या शब्दाचा प्रयोग आंदण देणें वगैरे अर्थी विवाहप्रसंगीं होत असतो हें लक्षांत ठेवा.] समुद्राचें पाणी निळें दिसतें म्हणून उदकाचा विस्तार हा सुनील पाटावे, असा दिसला हें युक्तच. किंवा रामविवाहप्रसंगीं वानरसेन हीच वऱ्हाडीण, तिला हा सेतु केवळ पायघडी असें वाटलें असल्यास युक्तच. २. समुद्ररूप गवत. ३. रामप्रतापरूप अग्नि. [असितपथ=कृष्णवर्त्मा=अग्नि; ज्याचा पथ (मार्ग) दहनानें असित (कृष्ण—काळा) होतो तो.] ४. राक्षसरूप अरण्याकडे. ५. विश्वाचें आश्रयस्थान जो राम त्याजकडे. ६. हें परिकरालंकाराचें उदाहरण आहे. जेथें विशेषण सहेतुक किंवा साभिप्राय असतें तेथें परिकरालंकार होतो. येथें विश्वशरण्या (विश्वालाही शरण जाण्यास योग्य) हें रामाचें विशेषण सहेतुक आहे म्हणून हा परिकरालंकार होय. उत्तरार्धांत उत्प्रेक्षालंकार आहे. सेतुबंधवर्णनपर सर्व गीति उत्प्रेक्षालंकारयुक्त आहेत. ७. मार्गानें.

आली जी लंकाश्री तीचा [1]तो [2]सांजनाश्रु पथ वाटे. ॥ १४

कीं रचिलें [3]स्वापयशें [4]शोकानळदग्ध [5]सागरोरचि तें, ।
सूचविले तर्क असे त्या सेतुवरें [6]महासुधीरचितें. ॥ १५

प्रभु सेतुपथें उतरुनि शत्रुकडे [7]वाळिसूनुला धाडी, ।
कीं कोणी न म्हणावें न कळत जाऊनि घातली [8]धाडी. ॥ १६

जाउनि सभेंत अंगद दशकंठातें [9]म्हणे, 'अगा राया! ।
आलों [10]अखिलप्रभुवररामाज्ञेस्तव तुझ्या अगारा या. ॥ १७

श्रीमद्रामप्रभुची आज्ञा आहे असी, परिस तीतें, ।
हरिति यशोर्थ पराच्या [11]श्रीतें, न स्पर्शती परि [12]सतीतें. ॥ १८

[13]येणें [14]क्षयपात्र [15]अमृतकरहि, [16]कुदशदेह देव [17]मघवाही, ।
आपणचि [18]भारवाही बुडतो, बुडवी कुळाहि [19]अघवाही. ॥ १९

---

१. तो सेतु सांजनाश्रुपथ वाटे. २. काजळासहित अश्रुयुक्त. ३. आपल्या अपकीर्तीनें. ४. शोकरूप अग्नीनें जळलें असें. ५. समुद्राचें वक्षस्थळचि. ६. महाबुद्धिसंपन्न रामानें रचिलेल्या (सेतुवरें). ७. अंगदाला. ८. धाड घाली. ९. अध्याय २८४ श्लोक ९-१६ रहा. १०. सकल धन्यांमध्यें श्रेष्ठ जो राम त्याच्या आज्ञेस्तव. ११. राज्यलक्ष्मीतें. १२. पतिव्रतेतें. १३. परस्त्रीहरणानें. १४. क्षयी. १५. चंद्र. चंद्रानें आपल्या गुरूची (बृहस्पतीची) पत्नी तारा हिचें हरण केलें म्हणून गुरूनें त्याला शाप दिला. त्या शापाप्रमाणें चंद्राच्या सोळा कलांचा क्षय कृष्णपक्षीं होतो. वेगळे वेगळे देव या कलांचें रसपान करतात, त्यामुळें चंद्रकलाक्षय होतो. या कलांचीं नांवें आणि जे देव त्यांचें पान करतात त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—सोळा कला—'अमृता मानदा पूषा तुष्टिः पुष्टी रतिर्धृतिः । शशिनी चंद्रिका कांतिर्ज्योत्स्ना श्रीः प्रीतिरेव च । अंगदा च तथा पूर्णामृता षोडश वै कलाः ॥.' कलापान करणाऱ्या देवांचीं नांवें—'प्रथमां पिबते वह्निर्द्वितीयां पिबते रविः । विश्वेदेवास्तृतीयां तु चतुर्थीं सलिलाधिपः ॥ पंचमीं तु वषट्कारः षष्ठीं पिबति वासवः । सप्तमीमृषयो दिव्या अष्टमीमज एकपात् ॥ नवमीं कृष्णपक्षस्य यमः प्राश्नाति वै कलाम् । दशमीं पिबते वायुः पिबत्येकादशीमुमा ॥ द्वादशीं पितरः सर्वे समं प्राश्नंति भागशः । त्रयोदशीं धनाध्यक्षः कुबेरः पिबते कलाम् । चतुर्दशीं पशुपतिः पंचदशीं प्रजापतिः ॥.' १६. वाईट आहे दशा (स्थिति) ज्याची असा देह (शरीर) ज्याचा तो (इंद्र) [इंद्रानें अहल्येशीं व्यभिचारकर्म केलें म्हणून तिच्या नवऱ्यानें (गौतममुनीनें) 'तुझ्या अंगास सहस्र भगें पडतील' असा इंद्रास शाप दिला—या कथेकडे येथें कविकटाक्ष आहे.] १७. इंद्रही. १८. भारवाहक. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. येथें व्यतिरेकनामक अलंकार आहे. याचें लक्षण:—'उपमानाद्यदन्यस्य व्यतिरेक स एव सः' [काव्यप्रकाश १० उल्लास १०५]; याचा भावार्थ:—जेथें उपमान आणि उपमेय यांतून एकाचें आधिक्य आणि न्यूनत्व वर्णिलें असतें तेथें हा अलंकार होतो. पाण्यांतून भार वाहणारा मनुष्य स्वतः बुडवितो, पण अघवाही पुरुष स्वतःस आणि स्वकुलास बुडवितो असें येथें एकाचें आधिक्य वर्णिलें आहे. म्हणून हा व्यतिरेकालंकार होय. १९. पापाचें ओझें घेणारा.

[1]दीपकलिकेसि [2]द्याया आलिंगन जो करी पतंग जेवा, ।
तो कीं तूं ? [3]सिंहीला लातेनें हाणिता [4]मतंगज [5]वा. ॥ २०
होउनि तूं [6]व्याघ्रव्रतधर चरचर न बहु मानवां चावें, ।
कुलजें धरूनि चित्तीं [7]नयलयभय सबहुमान वांचावें. ॥ २१
न कुरीतीतें हृदयीं ठेवीं, टाकूनियां सुरीतीतें, ।
ईतेंचि [8]सुधाधारा बुध म्हणती रावणा! [9]सुरी [10]तीतें. ॥ २२
भक्षिसि नरमांसातें, हा पापा! प्राशिसी [11]सुरेतें कीं ? ।
हा! रे! भ्रष्टा! घडलें तुज जन्म [12]महर्षिच्या सुरेतें कीं ? ॥ २३
धरिली असेल [13]असती जी रीति, तशीच जी सुरी तीतें ।
त्यज, तुज बहु सुख व्हाया देतों मी आपल्या सुरीतीतें. ॥ २४
सीतेपरीसहि मला प्रीति असे फार [14]साधुरीतीची, ।
ती देतोंचि तुज, पहा आधीं सेवूनि [15]माधुरी तीची. ॥ २५
नाहींच तरि हठें तूं देणार प्राण, मद्यपा! हूं, दे, ।
त्वद्दुर्दशा पहाया बहु इच्छिति, त्यांसि [16]सद्य पाहूं दे'. ॥ २६
खळ '[17]मारावेंचि' म्हणे, कथितांहि सुखावहा निरोपातें, ।
[18]हतभाग्य कां म्हणेना हो! सुरतरुच्याहि हानि [19]रोपातें ? ॥ २७
[20]मधुपासि बहु प्रिय जो [21]आत्मप्राणव्रजासम [22]स्तबक ।
[23]सकळरसिकप्रिया त्या न ढुकोनहि पाहती समस्त [24]बकें. ॥ २८
झोंबति राक्षस चवघे [25]त्यांतें, [26]काळाहि जेंवि [27]खगपातें, ।
[28]त्यांतें उडोनि झाडी, झाले ते चूर्ण जेविं [29]नगपातें. ॥ २९

१. दिव्याच्या ज्योतीला. २. वेगा. ३. या गीतींत दोन रूपकालंकार आहेत. ४. मतंगज=हत्ती. [मतंग ऋषीपासून झालेला—असा विग्रह या शब्दाचा आढळतो.] ५. अथवा. ६. व्याघ्राचें व्रत आचरणारा. ७. नीतिभंगाचें भय. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ८. अमृताची धार. ९. सुरी=समुद्रमंथनसमयीं निघालेली सुरा ती. (मद्य.) १०. कुरीतीस. ११. मद्यातें. १२. विश्रवा मुनीच्या सुरेतें (पवित्र वीर्यानें). १३. असाधु. १४. उत्तम चालीची. १५. गोडी. १६. आतां. १७. रावण अंगदाला मारावें असें म्हणे. १८. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १९. रोपा=लहान कोवळें झाड. २०. भ्रमराला. २१. आपल्या प्राणसमूहासारखा. २२. पुष्पगुच्छ. २३. सर्व रसिकांना प्रिय (आवडता) अशा त्या स्तबकाला. २४. हें पद्य अन्योक्तीचें उदाहरण असून सुभाषितपर आहे. २५. अंगदातें. [अध्याय २८४ श्लोक १८-१९ पहा.] २६. कालसर्प. २७. गरुडातें. येथें उपमालंकार आहे. २८. त्या चार राक्षसांतें. २९. पर्वतावरून होणाऱ्या पतनानें.

तें ऐकतांचि **राम** स्वसहायांतें म्हणे, ‘उठा, राहो ।
नामचि शेष [1]खळाचें, विस्मय [2]भार्गवसखा कुठारा [3]हो’. ॥ ३०
कपि एकदांचि ‘जयति श्री**राम**ो जयति लक्ष्मणो’ म्हणती, ।
[4]रणतीव्रयत्न [5]ते त्या [6]लंकावरणासि लाविती [7]खणती. ॥ ३१
[8]टंकघनाधिक त्यांचे खर [9]कूर्पर दंत नखर गुडघे ते ।
ते न्यूनचि [10]दुष्काळीं जे राशीचे लुटोनि [11]गुड घेते. ॥ ३२
[12]लंकेवरि कपिसेना, शेतावरि टोळधाडसी, पडली. ।
मधु प्यावया [13]पिपीलिकपृतना कीं [14]स्वर्णभाजनीं जडली. ॥ ३३
[15]वांटे [16]पिपीलिकावृतभोगा ती होय आकुळा व्याली, ।
न[17] पुरी न[17] कटककोपें उग्रा गरळाग्निच्या कुळा [18]व्याली, ॥ ३४
क्षोभे [19]साखिलखलबल **रावण** [20]सभुजगसमूह [21]तक्षकसा, ।
[22]हृतदार **गरुड**सा प्रभु होय न [23]तद्दर्पभंगदक्ष कसा ? ॥ ३५
दशकंठ म्हणे, ‘झाले गज [24]मर्कटनखरभग्नकट [25]कटकीं. ।
नर वानर तुच्छ म्हणत होतों, परि माजलीच कटकट कीं. ॥ ३६
[26]मद्भटलक्षहि वारूं न शके एकाहि माकडा, गमला ।
[27]मद्विक्रम तुच्छ [28]नरा, शिवला हा जेंवि [29]काक डाग मला.’ ॥ ३७

---

१. दुष्ट रावणाचें. २. भार्गवरामाचा मित्र जो कुठार (परशु, कुऱ्हाड) त्याला विस्मय होवो. ३. होवो. ४. रावणाविषयीं तीव्र आहे यत्न ज्यांचा असे. ५. ते कपि. ६. लंकेच्या आवरणाला (तटाला, प्राकाराला). ७. कुदळी. ८. टांक्या, घण, यांहून अधिक. ९. कोंपर. १०. वानर-सेनेचे कोंपर, दांत, नखें, व गुडघे हे सगळे अवयव टंक (टांकी) व घण यांहींपेक्षां विशेष प्रखर होते. दुष्काळाचे वेळीं राशीचे (शेतांत, घरीं नेण्यापूर्वीं धान्य ठेवीत असतात, त्या ठिकाणचे) गुड (धान्याचे मोधळे) लाटणारे (लुटणारे) लोक या वानरसेनेपेक्षां कमी (हापापलेले) असतात. यांत स्वभावोक्ति व उपमा यांचा संकर झाला आहे. ११. धान्य. १२. या गीतींत सर्वत्र उपमा-लंकार आहे. १३. मुंग्यांची सेना. १४. सुवर्णपात्रीं. १५. यांत सर्वत्र उत्प्रेक्षालंकार आहे. १६. मुंग्यांनीं आवृत (वेष्टित आहे) भोग (देह किंवा फणा) जिचा अशी व्याली (सर्पिणी). १७. दोन नकारांचा लोप होऊन येथें प्रकृतार्थ उत्पन्न होतो. १८. प्रसवली. १९. संपूर्ण खलबलासह रावण. २०. सर्पसमुदायासह. तक्षकासारखा. २१. या गीतींत सर्वत्र उपमालंकार आहे. २२. हरण केली दार (स्त्री) ज्याची तो (राम-प्रभु). २३. त्याचा (रावणाचा-तक्षकाचा) गर्वनाश करण्यास समर्थ. २४. माकडांच्या नखांनीं भग्न झालीं आहेत गंडस्थळें (कट) ज्यांचीं असे. २५. सैन्यांत. २६. माझ्या वीरांचें एक लक्ष, माझे एक लक्ष वीर. २७. माझा पराक्रम. २८. मानवरूपधारी रामाला. २९. कावळा.

[1]घटकर्णालागिं तो [2]उपायशतें, ।
सांगुनि वृत्त [3]म्हणे, 'बा ! रक्षावें त्वांचि [4]यातुपा ! यश तें.' ॥ ३८
घटकर्ण म्हणे, 'चिंता न करावी गा ! [5]समस्तयातुपते ! ।
नर वानर जे आले, [6]उद्दीपक या [7]धनंजया तुप तें[8]. ॥ ३९
म्हणसी एकचि गेला जाळुनि लंकापुरास माकड बा ! ।
निजलासि तूंहि, [9]'हो कपिकोटिहि मज [10]सिंधुरासमा कडबा. ॥ ४०
वाटे नवल, व्याघ्रहि भ्याला [11]निजकाननांत [12]ओतूंतें, ।
जाऊं, प्रदीप्त होऊं, [13]कपिबळघृत आननांत ओतूं तें.' ॥ ४१
[14]आज्ञा घेउनि निघतां, भासे [15]तो [16]प्रळयकाळपावकसा, ।
कपि म्हणति, 'दयामेघा ! श्रीरामा ! शीघ्र [17]वर्ष, [18]पाव कसा ?' ॥ ४२
त्यातें वेष्टुनि ताडिति कपिकोटी जेधवां [19]अगनगांनीं, ।
तैं [20]कोटिहोम होतो ऐसें क्षण [21]भाविलें [22]गगनगांनीं. ॥ ४३
शतशः [23]प्लवंग गटगट गिळितां न म्हणे 'नको' [24]पलाशमन; ।
त्या पापिकुंभकर्णापरि केव्हांही न कोपला [25]शमन. ॥ ४४
ते [26]मृतिभीत पळाले कपि ज्या [27]घटकर्णनासिकेवाटे ।
ती [28]प्राणावनधर्मा [29]प्राणिविहितवर्णना सिके वाटे. ॥ ४५
[30]भयकंचुकासि, धरितां घटकर्णें, [31]प्लवगराय कपि त्याला, ।

---

१. कुंभकर्णाला. २. शतशः उपाय करून. [अनेक प्रकारचीं वाद्यें वाजवून. अध्याय २८६ श्लोक २० पहा.] ३. अध्याय २८६ श्लोक २१-२८ यांत जें रावणाचें भाषण आहे त्याचा संक्षेप पंतांनीं एका चरणांत केला आहे. ४. हे राक्षसेंद्रा. ५. सर्व राक्षसांच्या पते (रावणा). ६. पेटविणारे. ७. अग्नीला. (कुंभकर्णाला.) ८. ते नर वानर तूप. यांत रूपकालंकार आहे. ९. हो=होओ, होऊं. 'हो' हें विध्यर्थी एकवचनाचें रूप आहे. १०. गजसदृशा. (सिंधुर=गज.) यांत उपमालंकार आहे. ११. आपल्या वनांत. १२. मार्जारांतें. १३. वानरसैन्य हें घृत (तूप). १४. रावणाची आज्ञा. १५. कुंभकर्ण. १६. प्रळयकाळच्या अग्नीसारखा. १७. वृष्टि कर. १८. प्रसन्न हो. १९. पर्वत आणि वृक्ष यांनीं. २०. एक कोटि वानरांचा नाश. २१. मानिलें. २२. आकाशांत संचार करणाऱ्या देवांनीं. २३. वानर. २४. कुंभकर्णाचें (पलाशाचें=राक्षसाचें) मन. २५. यम. २६. मरणातें भ्यालेले. २७. कुंभकर्णाच्या नाकावाटे. २८. प्राणरक्षणधर्मातें. [प्राण+अवन+धर्मा=जीवित+रक्षण+सत्कृत्यातें, सत्पथातें.] २९. प्राण्यांनीं (मनुष्यांनीं) विहित (केलें) वर्णन (स्तवन) ज्याचें अशा (प्राणावनधर्मा). कुंभकर्णाचे नाकावाटे (रस्त्यानें) वानर झपाझप बाहेर पडले. त्यावरून कवि उत्प्रेक्षा घेतात कीं ती (नासिकावाट) नवीन शिकली असावी असें वाटतें. नाहींतर एकदां नासिकांतःप्रवेश झाल्यावर जिवंत येण्याची सोय नव्हती. या पद्यांत उत्प्रेक्षालंकार आहे. ३०. भयरूप आंगरख्यातें. ३१. सुग्रीव. [सुग्रीवाला कुंभकर्णानें हातांत धरिलें, तेव्हां तो लज्जित होऊन पाहूं लागला. अध्याय २८७ श्लोक ११-१३.]

सोडवि लक्ष्मण [1]मारुनि, अहिसि जसा [2]पक्षिनायक पिल्याला. ॥ ४६
मग रामलक्ष्मणावरि ये [3]रावणपुत्र जो [4]अविप्रहित, ।
व्याघ्रावरि मत्त जसा, मत्तें [5]तत्स्वामिनें [6]अवि [7]प्रहित. ॥ ४७
[8]तो इंद्रजित् महाबळ [9]मायावी, जेंवि दुष्ट राहु, निघे. ।
प्रभु[10]पुष्पवत्प्रभेतें कपटें गगनांत गुप्त राहुनि घे. ॥ ४८
श्रीरामलक्ष्मण प्रभु त्या इंद्रजितें [11]शरव्रजें खिळिले, ।
[12]अद्भुतमोहाजगरें जें होते दि[13]ग्गजेंद्रसे गिळिले. ॥ ४९
केले बिभीषणें प्रभु [14]मंत्रौषधिनें विशल्य ते, ज्यांचें ।
नामचि करि [15]पाण्याहुनि पातळ यश [16]भास्करादितेजांचें. ॥ ५०
श्रीराम दि[17]व्यदृष्टिप्रद [18]धनदप्रेषितांबुनें नयनें ।
प्रक्षाली [19]अनुजाचीं मग जीं दि[20]व्यांबुजप्रभाजयनें. ॥ ५१
मग [21]सुग्रीवहनूमज्जांबवदंगदमुख स्वनेत्रास ।
तें दिव्य तोय लावुनि, देति [22]खळाला [23]जयस्वनें त्रास. ॥ ५२

---

१. कुंभकर्णाला मारुनि. २.गरुड. ३.इंद्रजित्. ४.विप्रहित नव्हे असा. विप्रांचा अहित(शत्रु). ५. त्याच्या (इंद्रजिताच्या) स्वामीनें (रावणानें). ६. मेंढा. ७. पाठविलेला. ८. तो मायावी महाबळ इंद्रजित् (रामावर जाण्यास) निघे. जसा राहु गगनांत गुप्त राहुनि कपटें पुष्पवत्प्रभेतें (चंद्रप्रभेतें) घे (ग्रासी, आच्छादी,) तसा हा दुष्ट इंद्रजित् गगनांत गुप्त राहुनि प्रभुप्रभेतें (रामप्रभेतें) घे. राहु हा स्पष्ट ग्रह नाहीं म्हणून गुप्त.—इंद्रजित् देखील गगनांत छपून रामावर शरप्रयोग करित होता अशी रामायणकथा आहे ती पहावी.—यांत उपमालंकार आहे. ९. कपटी. १०. चंद्राच्या तेजानें. ११. बाणसमूहानें बद्ध केलें. १२.अलौकिक मूर्च्छारूप अजगरानें (सापानें). १३. यांत उपमालंकार आहे. दिग्गज=पृथ्वी अचळ रहावी म्हणून तिला धरण्याकरितां तिच्या प्रत्येक दिशेस एक एक मोठा हत्ती ठेविलेला आहे त्यास 'दिग्गज' असें म्हणतात. दिक् म्हणजे दिशा आणि त्यांच्या ठिकाणीं स्थापित केलेले गज म्हणजे हत्ती असा 'दिग्गज' या शब्दाचा अर्थ आहे. हे आठ दिशास आठ आहेत, त्यांचीं नांवें:—ऐरावत, पुंडरीक, वामन, कुमुद, अंजन, पुष्पदंत, सार्वभौम आणि सुप्रतीक. या दिग्गजांनीं पृथ्वीला सांभाळून धरून ठेविलें आहे अशी प्राचीन कवींची समजूत आहे. १४. अध्याय २८९ श्लोक ५-७ पहा. १५. पाण्याहून पातळ करणें=पाण्यापेक्षां पातळ करणें=लाजवणें, खालीं पहायास लावणें. १६. सूर्यादिक तेजस्वी पदार्थांचें. १७. दिव्य दृष्टि देणारें (अंबु). १८. कुबेरानें पाठविलेल्या उदकानें. १९. लक्ष्मणाचीं. [कुबेरानें यक्षाच्या हातीं उदक रामाकडे पाठविलें होतें. तें उदक डोळ्यांला लाविलें असतां गुप्त असणारीं भूतें दिसावीं असा त्याचा प्रभाव होता. अध्याय २८९ श्लोक ९-१४.] २०. दिव्यकमलाच्या शोभेस जिंकणारीं (नयनें). २१. अंगदप्रमुख जे सर्व वानर ते. (अध्याय २८९ श्लोक १३.) २२. इंद्रजिताला. २३. जयजयकारशब्दें.

[1]प्रभुला बिभीषण [2]म्हणे, ‘पावेल जया न [3]रावणि कदापी, ।
[4]निजकपटज्ञा [5]पाणी जोडी, भोळ्या नरा, [6]वणिक [7]दापी.’ ॥ ५३
कळवुनि [8]पित्यासि निज जय ये, तों पाहूनि [9]मेघनादा त्या ।
कपिकुळ नाचे वेष्टुनि, [10]नटतें [11]शिखिकुळ गमे घना दात्या. ॥ ५४
क्षुब्ध असेंही पाहुनि [12]आसादी [13]तर्तुकाम रावणि [14]जों ।
तो श्रीलक्ष्मण बुडवी त्यासि, [15]जैसा सिंधु [16]पामरा वणिजा. ॥ ५५
सौमित्रिनें, [17]त्रिनेत्रें स्मरसा, सुत नामशेष केला, हें ।
परिसुनि दशवदन म्हणे, ‘तूंहि मरण [18]भूमिकन्यके! लाहें.’ ॥ ५६

---

१. या पद्यांतील वाण्याच्या दुकानाचा दाखला हा प्रसंगास अगदीं अप्रयोजक होय, असा ‘निबंधमाला’कारांचा आक्षेप आहे. ‘निबंधमाला’कार लिहितातः—‘काव्याचा उद्देश मनोरंजन हा असल्यामुळें व जे विषय नेहमींच्या व्यवहारांतले व अत्यंत परिचित त्यांच्यापासून वरील उद्देश साध्य होत नसल्यामुळें, त्यांचे वाचक शब्द व त्यांचे दृष्टांत हे मनास आल्हाद देत नाहींत; उलटें असें सुद्धां होतें कीं, एखादें पद्य सुंदर साधलें असून त्यांत मोठा प्रौढ अर्थ संगृहीत केलेला असतो, पण वरच्या प्रकारच्या एका शब्दानें किंवा दाखल्यानें दुधांत मिठाचा खडा टाकल्याप्रमाणें होऊन जातें’. (निबंधमाला—अंक ६३ पृष्ठ १४.) असा या पद्यावर आक्षेप आहे व त्याचें निरसन वे०शा०सं० गणेशशास्त्री लेले यांनीं येणेंप्रमाणें केलें आहे. “प्रभूला बिभीषण म्हणे” इत्यादिक [आर्या] होय, हींत ‘न रावणि कदापी’ या सात अक्षरांचें यमक साधलें आहे, आणि त्यामुळें वणिकाचा (वाण्याचा) दृष्टांत द्यावा लागला. पण तोही “भोळ्याभोळ्यांस वाणी दडपतो खरा, पण तो स्वकीय कपट जाणणाऱ्यास हातच जोडतो” अशा अर्थयोजनेच्या योगें फार समर्पकपणें जमविला आहे!’ (निबंधमाला—अंक ७० पृष्ठ २६.) २. रामापाशीं हें बिभीषणाचें भाषण आहे. इंद्रजिताला जय मिळणार नाहीं, या उक्तीच्या पुष्ट्यर्थ उत्तरार्ध आहे. जसा वाण्याला मर्मज्ञापुढें जय मिळत नाहीं तसा तुजपुढें त्याला (इंद्रजिताला) जय मिळणार नाहीं—असा भावार्थ. ३. रावणपुत्र इंद्रजित्. [‘इ’ प्रत्यय अकारांत शब्दापुढें गोत्रापत्यार्थी होतोः—रावण, रावणि; दक्ष, दाक्षि; व्यास, वैयासकि.] ४. आपलें कपट जाणणाऱ्या मार्मिका (नरा). ५. हात. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ६. वाणी. ७. दडपी. ८. रावणाला. ९. इंद्रजिताला. १०. नाचतें. ११. मोराचें (शिखीचें) कुळ (समूह). १२. धरी, गांठी. १३. तरूं इच्छिणारा. तर्तुकाम=धातूपुढें ‘तुम्’प्रत्यय लागून त्यांतील ‘म्’चा लोप होऊन ‘काम’शब्द लागून हें रूप सिद्ध झालें आहे. कर्तुकाम, गातुकाम, गंतुकाम, जेतुकाम, प्राप्तुकाम, इत्यादि दुसरीं उदाहरणें आहेत. ‘काम’शब्दाप्रमाणें ‘मनस्’शब्दाचाही प्रयोग होतो. गंतुमना, दातुमना, कर्तुमना, इत्यादि. काम आणि मनस् यांच्या योगें ‘इच्छिणारा’ असा अर्थ होतो—कर्तुकाम, कर्तुमना (करूं इच्छिणारा), गंतुकाम, गंतुमना (जाऊं इच्छिणारा). १४. ज्या (लक्ष्मणाला). १५. यांत उपमालंकार आहे. १६. क्षुद्र वाण्याला. १७. शंकरानें कामाला जाळून भस्म केलें या कथेकडे येथें कटाक्ष आहे. [तीन नेत्र ज्याला तो त्रिनेत्र=त्र्यंबक, विरूपाक्ष.] १८. हे सीते.

खड्गासि म्हणे, 'त्वदधिक[1] कोणीहि प्रिय मला असेनाच, ।
चाल, प्राशुनि सीतागलगलदसृगासवा,[2] असे![3] नाच.' ॥ ५७
सीतेवरि जातां तो दे लाज पिसाळल्याहि कुत्त्यातें,[4] ।
'मेल्या! रांड तुझी हो' ऐसें शापी हळूच कु[5] त्यातें.[6] ॥ ५८
साधु अविंध्य[7] निशाचर त्यासि म्हणे, 'वात कायसी?[8] तेला ।
हरितां, करितां पतिचा मारीना घात काय सीतेला?[9] ॥ ५९
शक्रा[10] त्वद्दाहूंची[11] जेंवि हरीची इभा[12] गमे[13] लीला, ।
मारूं पाहसि काय?[14] प्रभु तो तूं भूरिभाग[15] मेलीला[16]?' ॥ ६०
आलें मनांत[17] तें, मग पाप[18] परतला, न जाणता महिम्या,[19] ।
वाटे मत्ताखु[20] म्हणे, 'खावा स्वकुळासि भक्षिता अहि[21] म्या.' ॥ ६१
मत्तेभरद[22] म्हणे हित जैसा बालिश सपाम[23] रामरण, ।
हित मानी रावण कीं, पाडी भ्रांतींत पामरा मरण.[24] ॥ ६२

---

१. तुझ्याहून अधिक. २. सीता+गल+गलद्+असृक्+आसवा=सीतेच्या कंठापासून गळणारें रक्त हेंच मद्य त्यातें प्राशून. ३. हे खड्गा. ४. कुत्र्याला. ५. पृथ्वी. ६. रावणातें. ७. अविंध्यनामक राक्षस. [अध्याय २८९ श्लोक २८-३१ पहा.] ८. वातीचा काय उपयोग आहे? ९. साधु अविंध्य (नांवाचा) निशाचर त्यासि (रावणास) म्हणे—'तेल हरितां वात कायशी? पतिचा (रामाचा) घात करितां, तो (घात) सीतेला मारीना काय?'=तेल काढून घेतलें असतां वात टिकेल काय? नाहीं टिकणार. तसेंच रामाचा घात केला असतां, सीता वांचेल काय? नाहीं वांचणार—असा इष्टार्थ काक्वर्थानें ध्वनित केला आहे. १०. इंद्राला. ११. तुझ्या भुजांची. १२. गजास. १३. जशी हरीची (सिंहाची) लीला इभा (गजाला) गमते तशी तुझ्या भुजांची लीला इंद्राला गमे, असा तूं पराक्रमशाली आहेस. १४. तूं असा पराक्रमी असतां, मेलीला मारूं पाहणार नाहींस—असा या प्रश्नानें इष्टार्थ ध्वनित केला आहे. १५. अतिशय दैवाचा, महाभाग्यसंपन्न. १६. जी मृतवत् आहे तिला (त्या सीतेला). १७. अविंध्याचें खोंचदार भाषण. १८. रावण. १९. मोठेपणाला [महिमा, गरिमा, लघिमा इत्यादि 'इमन्'प्रत्ययानें झालेले जे संस्कृत शब्द त्यांचा संस्कृताप्रमाणें पुंलिंगी प्रयोग केलेला महाराष्ट्र काव्यांत आढळतो. क्वचित् हे शब्द स्त्रीलिंगीही आढळतात.] २०. माजलेला उंदीर. २१. सर्प. २२. मत्त+इभ+रद=माजलेला+हत्ती+दांत=माजलेल्या हत्तीचा दांत. २३. खजुला. [स+पामन्=सहित+ओली खरूज=खजुला.] २४. जसें मूर्ख (बालिश) खजुल्या (सपाम) मनुष्याला मत्तेभरद (उन्मत्त हत्तीचा दांत) हितकर वाटतो, तसें रावणाला रामरण हित वाटलें. तें ठीकच, कारण कीं त्याचें मरण आलें होतें, त्यानें (पामरा) क्षुद्ररावणाला भ्रांतींत पाडिलें. खजुला मनुष्य हात खाजविण्यास माजलेल्या हत्तीच्या नोंकदार दांतांवर खाजवायाला जातो, व तें त्याला सुखकर वाटतें, पण मरणप्राय भीति असते ती त्याला दिसत नाहीं, कारण तो बालिश (मूर्ख) पडला. तशी पामर रावणाची गति झाली.

गांठिति त्या कपिकटका [1]खंळसेना, जेंवि अग्निच्या पुंजा ।
[2]गुंजा, तोहि खळमणी [3]प्रभुला, [4]श्रीनृहरिला जसा [5]मुंजा. ॥ ६३
बैसुनि शक्ररथीं करि [6]विजयश्रीकेलिकुंज राम रण. ।
[7]तद्दैवहि अनुमोदन दे, द्याया [8]यातुकुंजरा मरण. ॥ ६४
करि कपटशत, असो तें, [9]दंडहताहीस न क्षमा यावी, ।
बहुसंख्य रामलक्ष्मण निर्मी तो [10]मोहदक्ष मायावी. ॥ ६५
[11]श्रीरामरावणसमर होय श्रीरामरावण[12]समरसा, ।
ते [13]वृष्टि जसे न करिति तसि [14]शुचि [15]सशकार रावण समरसा. ॥ ६६

१. राक्षसाची सेना. २. गुंज—जी सर्व लाल असते ती. ज्याप्रमाणें गुंजा अग्नीच्या पुंजा गांठी (स्पर्धा करी—अग्निपुंज आणि गुंज यांत रक्तिमसाम्य असतें, म्हणून स्पर्धा. गुंजेचा निभाव लाल निखाऱ्यापुढें क्षणभरही लागावयाचा नाहीं हें स्पष्ट आहे.) तसा रावण रामास गांठी. ३. येथें 'गांठी' या क्रियापदाचा अध्याहार जाणावा. ४. नरसोबाच्या वाडीस असणाऱ्या भूतबाधानाशक देवाला. श्रीनृसिंह दैवत सर्व पिशाचांचा परिहार करणारें आहे. त्या दैवतापुढें जशी मुंजानें घमेंड बाळगावी, तशी रामापुढें रावणानें मारिली—हा इत्यर्थ. गाणगापुर, नरसोबाची वाडी, व बिन्हाडसिद्धाचें कवठें या तीन क्षेत्रीं पिशाच गत घेतात. हीं तिन्हीं ही स्थानें नृसिंहदैवताचीं प्रख्यात क्षेत्रें आहेत. यांतून कोणत्या तरी क्षेत्राला उद्देशून पंतांनीं 'श्रीनृहरिला' हें पद योजिलें असावें. ५. उपनयनसंस्कार-प्रीत्यर्थ मुंज (मोळाची दोरी) कमरेस बांधली असून जो ब्राह्मणबटु सोडमुंज होण्यापूर्वीं मृत होऊन पिशाच होतो तो मुंजा. ६. विजयलक्ष्मीचें विलास करण्याचें कुंजवन. ७. त्या रावणाचें दैव सुद्धां. ८. राक्षसांमध्यें हत्तीसारखा असास. (रावणास.) ९. दांड्यानें मारलेल्या सर्पास. १०. मोह (भ्रांति-मूर्च्छा) पाडण्यांत कुशल. ११. हें अनन्वय नामक अलंकाराचें उदाहरण आहे. जेथें ज्याची त्यालाच उपमा दिली असते म्हणजे जें उपमेय असतें तेंच उपमान असतें तेथें हा अनन्वय अलंकार होतो. प्रस्तुत पद्यांत समर हाच उपमान आणि समर हाच उपमेय, त्यास दुसऱ्या कोणाची उपमा शोभत नाहीं. १२. समरासारिखा. [समर (युद्ध) हा शब्द संस्कृतांत पुंलिंगी आहे.] १३. राम व रावण यांनीं परस्परांवर जी शरवृष्टि केली तशी आषाढ व श्रावण मास ही जलवृष्टि करीत नाहींत—असा याचा भावार्थ आहे. १४. आषाढ. १५. शकारसहित रावण (श्रावण.) येथें 'श्रावण' शब्द साधून यमक साधण्या-साठीं पंतांस हा केवढा द्राविडी प्राणायाम करावा लागला! 'श्रावण' इतका शब्द साधण्यासाठीं काय हा खटाटोप! जेथें अशा प्रकारची दुर्गम रचना केली असते तें काव्य क्लिष्टच होय. पंताच्या काव्यांत या प्रकारच्या क्लिष्टकल्पनामय रचनेचा मासला क्वचित् कोठें कोठें आढळतो, पण तो फारच विरलतम म्हणण्यासारखा खरा. पुढील पद्यें हीं या प्रकारांत मोडतात—(१) 'शूर सकार शकारीं व्हाया दे द्विष-दुरांत फटकारा । भट भीमेतर असता तरि तेव्हां रक्षिता नच टकारा ॥.' [गदापर्व, अध्याय ३ गीति १८.] (२) ण पुढें मागें रा ज्या तो राय (रावण) कपीस भेटला बानी. [मात्रारामायण २६.] (३) ऐसें ऐकुनि सोडी अहिपतिसा भीमसेन सुसकारा । बहुधा गुरु संकोच ग्रासी तन्नामवर्ति सुसकारा ॥' [सभापर्व—अध्याय ६ गीति २३.] 'इत्यादि [स्थळीं] उगीच क्लिष्टत्वाची झांक मात्र थोडथोडी

[1]गाईस गोपैसे, कपि सेनासि [2]दशास्यसायक [3]वळीती, ।
[4]जाणों न वानरचमू मिटक्या देऊनि [5]साय कवळी ती. ॥ ६७
जिंकील न [6]आत्मगुणें गिळुनि [7]सितायुक्त साय काक [8]पिका, ।
[9]खळ [10]निजयशा तसा, हें समजुनि भीतील सायका कपि कां? ॥ ६८
[11]प्रबळदशवदनखरशरनिकरें सुग्रीवकटक वितुळे तें, ।
कथितां योजिल [12]दृष्टानिलबलभिन्नाभ्रघट कवि [13]तुळेतें. ॥ ६९
त्या प्रभुपुढें समर्थें झालीं न [14]स्वावनीं चमूकवचें, ।
तीं [15]हास्यफळेंचि जशीं [16]देवगुरुसमक्ष नीचमूकवचें. ॥ ७०

आहे, तरी अशा प्रकारची कविता मोरोपंताच्या एकंदर कवितेच्या संख्येशीं लावून पाहिली असतां, महासमुद्राच्या कोरड्या पडलेल्या वाळवंटांतील रेतीच्या कणासारखी किंबहुना विश्वांतील दोनचार चांदण्या काळसर झाल्यासारखी दिसेल. अति मोठ्या काव्यसंख्येंत अतिशय थोड्याच तरी क्लिष्ट कल्पना पंतानें कशा राहूं दिल्या अशी शंका कोणी घेतली तर तिचें समाधान असें आहे कीं, कितीएक मनुष्यें अशाप्रकारच्या खुबीला पाहून फार खुष होतात. एखाद्या ठिकाणीं त्यांनीं अशा करामतीची रचना पाहिली कीं, त्यांचा आनंद त्रिभुवनांत मावेनासा होऊन जातो व ते कवीची ह्याच गुणासंबंधानें स्तुति करूं लागतात असें कधीं कधीं आढळतें. हा प्रकार खऱ्या रसिकास कधींही रुचत नाहीं व मोरोपंतासही रुचत असावा असें दिसत नाहीं. तथापि सर्व प्रकारच्या प्रकृतींच्या लोकांस आपला काव्यामृतकवल प्रकारांतरांनीं प्रिय व्हावा अशी तजवीज त्यानें अनेक प्रकारांनीं करून ठेविली आहे त्यांतीलच रुचिवैचित्र्यार्थ हा प्रकार केला असावा. यास्तव व अत्यल्पत्वास्तवही वरील क्लिष्ट पदार्थांविषयीं पंतांस दूषण देतां येत नाहीं. उलट अशी शब्दार्थांची अनेक प्रकारची विचित्र चमत्कृति आणल्याबद्दल कुशल ग्रंथकार म्हणून त्याची स्तुतिच केली पाहिजे असें आम्हास वाटतें. (हंसकृत मोरोपंतावरील निबंध–पृ० ४६-४७ पहा.) १६. सम (समान) रस (उदक) जिचें ती (वृष्टि).

१. यांत उपमालंकार आहे. २. रावणाचे बाण. ३. वळवितात, जिकडे पाहिजे तिकडे फिरवितात. ४. यांत उत्प्रेक्षालंकार आहे. ५. दुधाची साय. ६. आपल्या गुणानें. (आपल्या कर्कश शब्दानें.) ७. शर्करायुक्त. ८. कोकिला. सितायुक्तसाय गिळुनि काक आत्मगुणें पिका न जिंकील– असा अन्वय. जरी काकानें चांगले चांगले पदार्थ भक्षण केले तरी तो आपल्या शब्दगुणानें कोकिलावर ताण करील असें कधीं व्हावयाचें नाहीं–इत्यर्थ. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. रावण. १०. आपल्या यशाला (कपियशाला). येथें 'न जिंकील' या क्रियापदाचा अध्याहार जाणावा. ११. बलाढ्य रावणाच्या प्रखर बाणांच्या समूहानें. १२. वायुवेगानें विसकटलेली अभ्रघटा (मेघमाला) ज्यानें पाहिली असा जो (कवि) तो. १३. उपमेतें. १४. आपल्या रक्षणाविषयीं. १५. हास्य आहे फल ज्यांचें अशीं (नीचमूकवचें). १६. बृहस्पतीसमक्ष.

उपदेशांहीं खंडी उग्रा[1] मोहासि जेंवि कपिलास्य[2]. ।
तेंवि प्रभु धनुइषुहीं[3] अरिला, तैं करिति हृष्ट[4] कपि लास्य[5]. ॥ ७१
त्यास श्रीराम म्हणे, 'रे मंदा! सर्वरक्तपापसदा[6]! ।
बाप[7] सदाचारी त्वां लाजविला कीं करूनि पाप सदा. ॥ ७२
प्राण तुझे स्वपराहित[8] पळही रक्षोधमा[9]! न वांचावें, ।
चाविशि जसा खळा तूं, खळहि अहि तसा न मानवां चांवे[10]. ॥ ७३
कामरता[11]! मरें[12], पामर[13] सामरसामरसदाप्तलोकातें[14] ।
मानुनि अहित अहितसा क्षोभे कीं पावणार शोकातें. ॥ ७४
ऐसें वदोनि, वधिला तो ब्रह्मास्त्राभिमंत्रितें[15] रोपें[16], ।
सोपें पडलें, बहुधा केलें प्रभुसाह्य जानकीकोपें. ॥ ७५
वैद्युत[17]वन्हिविमर्दित विटपिवर[18] तसा[19] खचे महाकाय[20], ।
सुर म्हणति, 'अहा! झाली दोषें याचीहि गति पहा काय?' ॥ ७६

---

१. भयंकर अज्ञानास. २. कपिलमुनीचें मुख. कपिल हा सांख्यशास्त्रप्रणेता होय. यानें आपली माता देवहूती हिला तत्वज्ञानाचा उपदेश करून तिचा उग्र मोह (भयंकर मतिभ्रम—अज्ञान) खंडित केला—अशी कथा आहे. (भागवत—स्कंध ३ अध्याय २५-३३ पहा.) ३. धनुष्य आणि बाण यांनीं. ४. आनंदित. ५. नृत्य. ६. सर्वराक्षसनीचा, हे समस्तराक्षसाधमा! ७. विश्रवा मुनि. ८. आपले आणि दुसऱ्याचे अहित (शत्रु). ९. राक्षसांमध्यें नीचा. १०. या अर्धांत व्यतिरेकालंकार आहे. 'जेथें उपमान आणि उपमेय यांमध्यें एकाचें दुसऱ्याहून आधिक्य किंवा न्यूनत्व वर्णिलें असतें तेथें हा अलंकार होतो.' हाच वाग्भटाचा अभिप्राय आहे. 'केनचिद्यत्र धर्मेण द्वयोः संसिद्धसाम्ययोः । भवत्येकतराधिक्यं व्यतिरेकः स उच्यते ॥.' [चतुर्थ परिच्छेद ८४.] जेव्हां आधिक्याचा अथवा न्यूनत्वाचा हेतु प्रदर्शित केला असतो तेव्हां हा अलंकार एकविध होय, पण जेव्हां हेतु अनुक्त असतो तेव्हां हा त्रिविध होय. याप्रमाणें याचे चार भेद आहेत. पुनः यांतील साम्याचा बोध शब्दानें, अर्थानें अथवा आक्षेपानें दर्शविला असतां याचे द्वादश प्रकार होतात. असा 'साहित्यदर्पण'कारांचा अभिप्राय आहे. [साहित्यदर्पण—दशम परिच्छेद ७०० पहा.] ११. हे कामासक्ता. १२. येथपर्यंत रामोक्ति आहे. १३. तो पामर (नीच रावण) आप्त लोकांतें अ-हित (शत्रु) मानुनि अहि—तसा (अहिसा—सापासारखा) क्षोभे. (ठीकच) कीं तो शोकातें पावणार होता. 'आप्त लोक' या पदाचीं विशेषणें 'सामर' आणि 'सामरसद.' रावणानें सर्वांना तुच्छ मानले, कारण त्याचें मरण ओढवलें होतें. १४. स+अमर+सामरसद+आप्त+लोकातें=इंद्रादिदेवांसमवेत+सा-मरस देणारे—सामरसाचें पान कर, कलह वाढवूं नको असा उपदेश करणारे+विश्वासू स्नेही हितैषी+जनांतें. १५. अध्याय २९० श्लोक २६-२७ पहा. १६. बाणानें. १७. विजेच्या अग्नीनें मर्दन केलेला. १८. महावृक्ष. १९. यांत उपमालंकार आहे. २०. स्थूलदेह.

सर्वींहीं गणिला तो जयकाळ, श्रावण प्रसूनगणीं, ।
क्षणभरि फाल्गुन न असें स्वसुनांसह रावणप्रसू न गणी. ॥ ७७
करिती रावणतनुला आलिंगुनियां विलाप बहु विधवा, ।
ते सकळ एकविध वा, सुश्रोते हो! असोत बहुविध वा. ॥ ७८
विस्तरभय नसतें तरि वर्णाया काय सुकविला परवा? ।
प्रभुच्याहि वर्णिति श्रीवाल्मीकिव्यासशुक विलापरवा. ॥ ७९
ज्या पापें सुरवानरकृतघनजयरव मुहूर्त लोपविला, ।
खळदारविलापरवा कां वर्णिल कविमयूर कोपविला? ॥ ८०
लंका बिभीषणकरीं देउनि, द्याया सतीस सुख निरवी, ।
जसि अंधकार नासुनि सुनृपकरीं दे सुरत्नसुखनि रवी. ॥ ८१
जीच्या सुव्रततेजें कंपित व्हावें सदा सदूरुनीं, ।
त्या जानकीस विनवी सदमात्य अविंध्य दास दूरुनी. ॥ ८२

---

१. सर्वांहीं तो जयकाल (जसा) प्रसूनगणीं श्रावण (गणावा तसा) गणिला, परंतु स्वसुनांसह रावणप्रसू (तो जयकाळ) फाल्गुन न असें क्षणभर(ही) न गणी, म्हणजे रामजयकाळ सर्वांना उत्सवप्रद झाला, परंतु रावणाची आई कैकसी व तिच्या मंदोदरीप्रमुख सुना यांना मात्र तो काळ फाल्गुनाप्रमाणें बोंब मारण्यास योग्य असा वाटला. अर्थात् रावणादिकांच्या मरणानें तो अत्यंत अमंगळ कालसा त्यांस वाटला. यांत दोन नकार आहेत, त्यांचा 'द्वौ नञौ प्रकृतार्थं गमयतः' ह्या न्यायानें लोप होऊन प्रकृतार्थ बाकी आहे. २. पुष्पसमुदायांनीं. ३. रावणाची आई, कैकसी. ४. एक प्रकारचे. ५. किंवा. ६. अनेक प्रकारचे (विलाप). ७. पंतांच्या वर्णनविस्तारभीरुत्वाचें सूचक हें स्थळ आहे. ८. पापी रावणानें. ९. देव आणि वानर यांनीं केलेला गंभीर जयघोष. १०. मुहूर्त= संस्कृत कालमानाच्या कोष्टकाप्रमाणें 'मुहूर्त'शब्दाचा मूळचा अर्थ 'दोन घटका' असा आहे. शुभ कार्यास चांगली वेळ पाहण्याच्या चालीवरून मुहूर्त म्हणजे चांगली वेळ असा अर्थ झाला. पाटाचें लग्न करण्यांत चांगली वेळ पाहण्याचा संबंध असतो म्हणून त्यापासून 'म्होतूर' शब्द झाला. (व्युत्पत्तिप्रदीप—पृष्ठ ४९ पहा.) ११. दुष्ट रावणाच्या स्त्रियांच्या शोकाला. १२. मोरोपंत कवि. १३. 'कोपविला' 'केला' 'पडला' 'संकोचला' इत्यादि रूपांचा गद्यात्मक ग्रंथांत भूतकाळवाचक क्रियापदाच्या स्थानीं प्रयोग होतो, तथापि तीं मूळचीं विशेषणें आहेत आणि त्यांचा विशेषणांसारखा प्रयोग पद्यात्मक ग्रंथांत होतो. प्रस्तुत स्थलीं 'कोपविला' म्हणजे 'कोपविलेला' असा विशेषणार्थक प्रयोग जाणावा. याचीं अन्य उदाहरणें:—(१) जरि उकिरड्यांत **पडला, मळला,** न हिरा तथापि सामान्य [सन्मणिमाला गीति २७.] (२) जशी पदरबें शिळा, परि असे नव्हे **शापिली** । धवें हरिमनोहराकृति सती अर्धे **व्यापिली** [केकावलि ३६.] (३) न कळविला **केला** उद्योग प्रथम तुवां कां गा या. [पंचशतीरामायण साकी १९३.] १४. सतीला (सीतेला) सुख देण्यासाठीं [रावणाला मारून] लंका बिभीषणाच्या स्वाधीन करून देई. १५. उत्तम रत्नांची उत्तम खाण. १६. साधूच्या मांड्यांनीं. १७. उत्तम प्रधान. १८. अविंध्य हा परमनीतिमान् राक्षस होता. हा रावणास वारंवार सुबोध करी. हें अविंध्यभाषण मूळांत नाहीं, पंतांनींच येथें प्रसंगास उद्देशून स्वमतिभेनें योजिलें आहे.

'रक्षुनि [1]सुगल बिभीषण जेणें स्वयशें सलज्ज शिबि केला, ।
माते! त्या खपतिकडे चाल [2]अधिष्ठूनि शुद्धशिबिकेला.' ॥ ८३
वत्साला सुरभीसी जी निजदासासि पावणारी, [3]तें ।
अनुमोदुनि, मग नेउनि कळवी तो साधु रावणारीतें. ॥ ८४
[4]जनसंग्रहार्थ तो श्रीराम प्रभु [5]कपटमानव सतीस ।
[6]बोले, 'विलोकितों तुज जरि तूं [7]परमंदिरीं न वसतीस. ॥ ८५
रिपु मारुनि सोडविलें कीर्त्यर्थचि तुज, न [8]देवि! भोगाया, ।
कीं नमुनि ईश्वराला 'यशचि' म्हणति सुजन 'दे विभो! गाया.' ॥ ८६
[9]परकरग [10]स्वकलत्र स्पर्शेंचि [11]महायशासि [12]वाहवितें ।
कोण प्राज्ञ म्हणेल [13]श्वा शिवला ज्या तशा [14]शिवीं [15]हवितें? ॥ ८७
जा स्वैरे[16], म्हण, स्त्रीच्या [17]सुखदे हो सुप्रसन्न मोकळिके! ।
जी चुंबिली [18]भुजंगें मधुप म्हणेलचि तिला 'नमो कळिके!' ॥ ८८

---

१. पृष्ठ ११२ टीप १ पहा. २. बसून. 'शिबिकेला अधिष्ठूनि' हा प्रयोग 'शिबिकामधिष्ठाय' या संस्कृत प्रयोगाच्या धर्तीवर केलेला आहे. ['स्था' धातूला 'अधि' उपसर्ग लागला असतां तो सकर्मक होतो असा संस्कृतांत नियम आहे, त्याचाच येथें अवलंब केला आहे.] ३. तें अविंध्यभाषण अनुमोदुनि=तें अविंध्याचें वचन तिनें कबूल केल्यावर. [हें Nominative absolute=भावी प्रथमेचें उदाहरण होय. येथें 'अनुमोदी' या क्रियापदाचें काम 'अनुमोदुनि या अव्ययानें झालें आहे. असेंच दुसरें उदाहरण—'मी असतां, कां माझ्या बापें केशग्रहासि पावावें?' मोरोपंत] ४. जनसंग्रहार्थ=लोकसंग्रहार्थ=लोकांची सत्कार्यें करण्याविषयीं प्रवृत्ति व्हावी म्हणून कोणतेंही एखादें सत्कार्य स्वतः करणें. 'लोकसंग्रह' हा शब्द भगवद्गीतेंत आला आहे [अध्याय ३ श्लोक २०] तेथें त्याचा अर्थ:—'लोकाचें स्वधर्माच्या ठायीं प्रवर्तन' (श्रीधर), 'लोकांचे उन्मार्ग प्रवृत्तिनिवारण (शंकर) असा आहे. ५. कपटानें मानव झालेला. ६. अध्याय २९१ श्लोक १०-१३ पहा. ७. पराच्या (अन्याच्या-शत्रूच्या वा) घरांत. ८. लग्नाच्या प्रिय बायकोस 'देवि दयिते' अशी संबुद्धि करून हांक मारतात. ['ऊढायां देवि दयिते पुमानाह प्रियां प्रति । आर्यपुत्र च जीवेश नाथ साप्याह वल्लभम्' इति सागरोक्तेः. रंगनाथकृत विक्रमोर्वशीयनाटकटीका—पृष्ठ ५५-५६ पहा.] ९. पराचे हातीं गेलेलें. १०. आपली स्त्री. ११. श्रेष्ठ यशाला. १२. घालवितें. हें दृष्टांत नामक अलंकाराचें उदाहरण आहे. 'प्रकृत जो विशेषार्थ त्याच्या बोधासाठीं अप्रकृत अशा विशेष अर्थाचा दाखला देणें तो दृष्टांत होय. एथें स्वकीय स्त्री परपुरुषाशीं संगत झाली असतां तिचा स्वीकार करूं नये, कांकीं ती अपवित्र होते, या विशेष अर्थास कुतरें शिवलेलें हविर्द्रव्य उपयोगी नव्हे, कांकीं तें अशुद्ध होय, या विशेषार्थाचा दाखला दिला आहे.' [साहित्यशास्त्र—पृष्ठ ६३-६४.] १३. कुत्रा. १४. उचित, योग्य. १५. होमद्रव्यातें. १६. स्वेच्छावर्तिनी. १७. हे सुखदे मोकळिके! सुप्रसन्न हो—अन्वय. १८. राम सीतेला म्हणतो:—हे सीते! हवी तिकडे जा, सुखद स्त्री स्वातंत्र्याला प्रसन्न हो असें म्हण; ज्या कळीचें चुंबन भुजंगानें (सर्पानें) घेतलें आहे तिला भ्रमर दुरूनच नमस्कार करतो.

असि अप्रियोक्ति कर्णीं, भूपृष्ठीं तीहि एकदांचि पडे[1], ।
प्रभुला[2] पाहों न शकति कपि, डोळे जेंवि भानुला चिपडे[3]. ॥ ८९
चित्तीं म्हणे प्रभु, 'अहा! पडली सहसा गरांत मज्जाया[4], ।
वदलों असें कसें मूलोकासह सागरांत मज्जाया[5]? ॥ ९०
सावध होउनि करिशिल जरि लोकप्रत्ययार्थ[6] हे शपथ ।
प्राणप्रियेसह सुखें आतांचि धरीन मी स्वदेशपथ.' ॥ ९१
सुर म्हणति, 'सती मोहें मुखिं भरिली आपल्या पहा रे! तें.' ।
विधि शिव म्हणती, 'अजगर गिळिल कसा तापल्या पहारे[7]तें. ॥ ९२
जेंवि व्यसनीं त्रिजगन्नाथस्मृतिचा[8] धरी करीश[9] पथ, ।
ती तेंवि सत्यधर्मस्मरणपरा[10] जानकी करी शपथ. ॥ ९३
'चुकलें[11] असेल तिळभरि तरि शापावें मला सतीव्रातें[12]. ।
भुजगीतें[13] कीं तुमच्या भुजभुजगातें[14] शिवेन तीव्रातें. ॥ ९४
स्वप्नींहि तुम्हांहुनि परपुरुषीं गेलें असेल हें मन, हो! ।
तरि युष्मच्चरणरज:स्पर्शें[15] मद्देहलोह[16] हेम[17] न हो. ॥ ९५
मळलें असेल हृदय स्वसतीव्रतनियमलेशभंगोहें[18] ।
प्रभुजी! तरि मन्मस्तक आतांचि तुम्हांसमक्ष भंगो हें.' ॥ ९६
करितां शपथशत असें वाय्वग्निप्रमुख[19] देवता म्हणती, ।
'श्रीरामा! सीतेतें करिती करिलहि महासती[20] प्रणती[21].' ॥ ९७
[22]विधिहि म्हणे, 'असि कुलजा अर्पुनि वपु तुजअशाहि कुलतिलकीं[23] ।
परतेल काय? ऐकुनि हें साध्वींचीं उरेंचि उकलतिल[24] कीं.' ॥ ९८

---

१. या 'पडे' क्रियापदाचा प्रयोग काकाक्षिगोलकन्यायानें अप्रियोक्ति कर्णीं पडे आणि तोहि भूपृष्ठीं पडे—असा करायास पाहिजे. २. अध्याय २९१ श्लोक १४ पहा. ३. निरंतर वाहणारे, रोगिष्ट असे. ४. माझी स्त्री. (मत्+जाया.) ५. बुडाया. ['मस्ज्' या धातूचें 'मज्ज्' असें रूप होतें, त्यावरून 'मज्जाया' हें रूप सिद्ध झालें आहे. मस्ज्=बुडणें.] ६. जनांचा विश्वास बसावा एतदर्थ. ७. लोहदंडातें. ८. विष्णुस्मरणाचा. ९. गजेंद्र. १०. सत्यधर्माच्या स्मरणाविषयीं दक्ष. ११. अध्याय २९१ श्लोक २२-२५. पहा. १२. पतिव्रतासमाजानें. १३. सर्पिणीतें. १४. बाहुरूप सर्पातें. १५. तुमच्या चरणधूलीच्या स्पर्शेंकरून. १६. मत्+देह+लोह=माझा+शरीर+लोखंड. १७. सोनें. १८. आपले पातिव्रत्याविषयीं जे नियम त्यांचा लव (अल्पमात्र) भंग न व्हावा या तर्कानें, अशा कल्पनेनें. [ऊह=तर्क, कल्पना.] १९. वायु अग्नि प्रमुख ज्या देवता त्या. २०. पार्वती किंवा महापतिव्रता अरुंधती वगैरे एक एक. २१. नमस्कार. २२. ब्रह्मदेव. (अध्याय २९१ श्लोक ३०.) २३. कुलभूषणीं, वंशदीपकीं. २४. विदीर्ण होतील.

तों दिव्यविमानस्थित दशरथहि [1]म्हणे [2]दशाननारीतें, ।
'वत्सा! सतीव्रतबळें ग्रासी कष्टा दशा, न नारीतें. ॥ ९९
सीता महासती हे म्हणुनचि तरलासि तूंहि [3]सदरींतें, ।
जें सर्वव्यसनौषध सद्व्रत आहे इच्याचि पदरीं तें. ॥ १००
सुर म्हणती, [4]मज सदा [5]निजसद्गतिदव्रतपरा सुनेला [6]गा ।
कोण न यमदूतांहीं शोकें होतां [7]परासु नेला, गा!? ॥ १०१
बा! हे जरि [8]खळरुद्धा शुद्धाचि सदा सती, [9]अगा! ईतें ।
[10]त्यांज्यां म्हणसि तरि यवनकृतरोधें त्यजिति कां न गाईतें? ॥ १०२
रामा! बा! माझ्या हे साध्वी [11]साध्वीड्यसद्गुणा सुहिता, ।
मेघें [12]शंपासी त्वां अंकीं घ्यावी [13]नृपर्षिची दुहिता. ॥ १०३
भरत रिपुघ्न प्रियसख सचिव सकळ भृत्य पौर गौरवुनी, ।
पाडीं गुणें उणें, जें छत्र [14]सुधास्त्रावि [15]चंद्रगौर [16]उनीं. ॥ १०४
होऊं न दिलें [17]सत्यभ्रष्ट तुवां [18]स्त्रीजितास मज [19]साधो! ।
[20]साधोरणा [21]गजीसी, [22]त्वद्युक्ता श्री असो, सुयश [23]साधो. ॥ १०५
सीताचि न [24]त्रिलोकी हर्षविली त्वां दशाननवधानें, ।
या त्वच्चरितश्रवणीं न टिकावें क्षण अघें [25]अनवधानें.' ॥ १०६

१. अध्याय २९१ श्लोक ३६ पहा. २. रामातें. ३. साधूंच्या शत्रूंतें. ४. मज दशरथाला. ५. आपलें उत्तम गति देणारें असें पातिव्रत्यरूप जें व्रत तत्पर अशा. ६. स्तवन करा. ७. मृत, गतप्राण. ८. दुष्टानें कोंडली असी. ९. अगा=हें प्रेम, कारुण्य, ममता इत्यादि अर्थवाचक संबुद्धिदर्शक अव्यय होय. १०. त्याज्या=टाकण्यास योग्य. [धातूंस 'तव्य' 'अनीय' आणि 'य' हे प्रत्यय लागून विध्यर्थक शक्ति, योग्यता, आवश्यकता इत्यादि अर्थ दाखविणारीं विशेषणें होतात. जसें–रमणीय, रम्य, रंतव्य, कार्य, करणीय, कर्तव्य, भोग्य; ईड्य, गण्य, मान्य.] ११. साधु+ईड्य+सद्+गुणा=सज्जन+स्तुत्य+उत्तम+गुणा=साधूंनीं स्तवन करण्यास योग्य असे उत्तम गुण आहेत जिचे ती. १२. वीजसी. येथें हा उपमालंकार जाणावा. १३. नृपर्षि जनकाची. [देवर्षि, ब्रह्मर्षि आणि राजर्षि असे तीन प्रकार ऋषींचे मानतात. या तीन प्रकारांशिवाय महर्षि, परमर्षि, श्रुतर्षि, आणि कांडर्षि असे चार प्रकार कोणी कोणी मानतात, तेव्हां ऋषींचे एकंदर सात प्रकार होतात. १४. अमृत स्रवणारें. १५. चंद्राप्रमाणें शुद्ध. १६. उन–ऊन=ऊन्ह, निबर, आतप, धूप. १७. सत्यवचनभ्रष्ट. १८. स्त्रीनें (कैकेयीनें) जिंकिलें ज्याला त्या मज. १९. हे साधो. २०. महातासहित. [स+आधोरण=सहित+महात.] २१. हत्तिणीसी. २२. तुझ्याशीं संयोग पावलेली. २३. प्राप्त होवो. २४. त्रिलोकी=तीन लोकांचा समाहार. २५. असावधपणें.

[1]गुरुदेववाक्य मान्य श्रीराम करी, सतीस घे[2] [3]अंकीं, ।
[4]अंकीं गण्य न तें सुख, ये बहु [5]मालिन्य इंदुच्या [6]अंकीं. ॥ १०७
[7]वृत्रारि [8]अमृतसेकें उठवी [9]विगतासुकीशकटकातें, ।
दे देव [10]देवराया यश, दुर्घट काय [11]विश्वघटकातें ? ॥ १०८
श्रीमार्कंडेय म्हणे, 'कपि उठले ब्रह्मदेववरदानें, ।
हें त्यांसि दिलें यश त्या प्रभुनें [12]सब्रह्मदेववरदानें.' ॥ १०९
राम म्हणे, 'त्वांचि दिली त्रिजटे! म्हणतों तुलाचि [13]वसुधा मी, ।
तव उपकार फिटेसें [14]धनदाच्याही नसेल [15]वसु [16]धार्मीं. ॥ ११०
फेडील कोण भाग्यें या [17]सीतादानसूपकारातें ? ।
केलें [18]सुधाप्रदें जें न घडेचि [19]नळाहि [20]सूपकारा तें.' ॥ १११
ऐसेंचि अविंध्यासहि पूजी, कीं नित्य त्याचि [21]दोघांहीं ।
व्यसनीं [22]वांचविले [23]प्रियदार, जसे जीव [24]सच्चिदोघांहीं. ॥ ११२
सीता [25]म्हणे, 'हनूमन्! त्वद्गत सेतुत्व हें न [26]मज्जनकीं ।
घडतेंचि, भेटतासि न तरि मज [27]विपदर्णवांत [28]मज्जन कीं. ॥ ११३
तूं धन्य महाभागा, बा! गा! [29]भागा तुझ्याचि यश आलें, ।
झालें होतें मद्वपु दशवदनीं, [30]घस्मरीं जसें आलें. ॥ ११४

---

१. गुरु+देव+वाक्य=पितृ(दशरथ)+अमर(वायुवन्हिप्रमुख देव)+हितोपदेशपर वचन. २. घे=घेता झाला. ['ये' 'दे' 'ने' 'हो' अशा एकारान्त व ओकारान्त धातूंच्या विध्यर्थी द्वितीय पुरुषाच्या एकवचनाचा प्रयोग पद्यात्मक ग्रंथांत तृतीयपुरुषीं वर्तमानकाळीं आणि भूतकाळीं एकवचनीं वारंवार आढळतो.] ३. मांडीवर. ४. आंकड्यांनीं. ५. मलिनत्व. ६. चिन्हीं, कलंकीं. [या पद्यांत 'अंक'शब्दाचे तीन अर्थ प्रयुक्त आहेत:–उत्संग, संख्या आणि कलंक.] ७. वृत्रासुराचा शत्रु. (इंद्र.) ८. अमृताच्या सिंचनानें. ९. विगतासु+कीशकटकातें=गतप्राण+वानरसैन्यातें. १०. इंद्रातें. ११. विश्व निर्माण कर्त्यातें. १२. ब्रह्मदेवासह सर्वांस वर देणाऱ्या अशा. १३. पृथ्वी. [तूंच या सीतेची जननी–असा भावार्थ.] १४. कुबेराच्या. १५. द्रव्य. १६. गृहीं. १७. सीतादानरूप थोर उपकारातें. १८. अमृत देणाऱ्यानें. (चंद्रें.) १९. नळराजालाहि. २०. स्वयंपाक्याला. २१. त्रिजटा आणि अविंध्य या दोघांनीं. (अध्याय २९१ श्लोक ४०-४१.) २२. वांचविले प्रियदार. येथें संस्कृताप्रमाणें 'दार' हा शब्द पुंलिंगी आणि बहुवचनी आहे म्हणून 'वांचविले' या क्रियापदाचा प्रयोग केला आहे; असें नसतें तर 'प्रिय स्त्री वांचविली' असा अथवा अशासारखा प्रयोग झाला असता. २३. आवडती पत्नी. (सीता.) २४. आनंद व चैतन्य यांच्या ओघांनीं. २५. अध्याय २९१ श्लोक ४४-४६ पहा. २६. माझ्या पित्याचे ठायीं. २७. विपत्तिसमुद्रामध्यें. २८. बुडणें. २९. वांट्याला. ३०. खादाडीं. [मर हा प्रत्यय सृ, घस् आणि अद् या धातूंपुढें कर्तरि तच्छीलार्थी होतो:–सृमर (जाणारा, एकजातीचा हरिण) घस्मर, अद्मर (खादाड.)]

तूं या कीर्ति[1]सुधासरिदुदरीं स्वानंदमत्त मासा हो. ।
त्वद्विरहातें क्षणहि न सिद्धहृदय साधुसत्तमा! साहो. ॥ ११५
भजतील मत्प्रसादें सर्वहि तुज दिव्य भोग संतत रे! ।
त्वद्भक्तिनें तरो जन, हरिहरभजनें जसाचि संत तरे.' ॥ ११६
श्रीसीतावात्सल्यें त्यजिलीच असेल अंजना[2] मानें[3], ।
सीताही[4] लाजविली बहुधा घन[5]रूपकंजनाभानें. ॥ ११७
सुग्रीव[6]प्रमुखांसह बैसे श्रीराम पुष्पकविमानीं, ।
त्यांसि[7] सकुला[8]लिवरसमधिष्ठित दिव्यद्रु[9]पुष्प कवि[10] मानी[11]. ॥ ११८
राम म्हणे, 'पावाया शुचि[12]सुकृतनिवासमानसे! तूतें, ।
तरलों व्यसनीं या अवलंबूनि शिवासमान सेतूतें. ॥ ११९
त्वत्पुण्यें टिकला[13] सति! येणें सिंधूंत पळहि[14] न तगावें, ।
शतगावें कीं हो हा, विश्वें होऊनि यासि नत गावें[15]. ॥ १२०
पाहुनि यांसि[16] न वदलों कीं कैसा भेटतो खळप[17] हा! हा! ।
जेणें सेतु विरचिला नमितो तुज देवि! तो नळ पहा हा. ॥ १२१
सुगलादि[18] रावले बहु, न दुष्काळीं[19] तेंवि रंक रावेल, ।
अर्पिति नळा नग[20], जसे बुध शिवरात्रींत शंकरा[21] बेल.' ॥ १२२
ऐसें मनः[22]प्रियेसीं बोले विरहोत्थ[23]मानसाधीतें, ।
कळवुनि साधावें जें तत्प्रिय देऊनि मान सौधी[24] तें. ॥ १२३

---

१. कीर्तिरूप अमृतनदीच्या उदरीं. २. मारुतीची माता. ३. गीति ११७ ही कल्युक्ति आहे. मारुतीवर सीतेचें इतकें वात्सल्य होतें कीं, कवीला वाटतें तो मारुती अंजनेला ही विसरला असेल. [येथें उत्प्रेक्षालंकार जाणावा.] ४. सीता जरी अशी वत्सल होती तरी घनरूप कंजनाभानें (रामानें) तिला बहुधा (पुष्कळ प्रकार नें) लाजविलें. या म्हणण्याचें तात्पर्य असें कीं सीतेचें वात्सल्यच कायतो एक गुण पण रामाचे गुण अनेक होते, तेव्हां तोही त्या रामापुढें फिक्की पडलो. येथें अतिशयोक्ति अलंकार समजावा. ५. मेघरूप कंजनाभानें [श्रीविष्णूनें; कंज म्हणजे कमल आहे नाभिस्थानीं ज्याच्या तो कंजनाभ.] ६. अध्याय २९१ श्लोक ५२-५३ पहा. ७. विमानास. ८. कुलसहवर्तमान जो भ्रमरश्रेष्ठ त्याणें आश्रयिलेलें असें. ९. दिव्य+द्रु+पुष्प=देवलोकांतील+वृक्ष+कुसुम=कल्पवृक्षाचें पुष्प. १०. पंडित. ११. येथें उत्प्रेक्षालंकार जाणावा. १२. शुचि+सुकृत+निवास+मानस=शुद्ध, विमल+पुण्य+वसतिस्थान+चित्त=शुद्ध पुण्याचें वसतिस्थान आहे मानस जिचें अशी. हें संबोधन आहे. १३. हा सेतु टिकला. येथें 'सेतु' या पदाचा अध्याहार केला आहे. १४. पळभरही. १५. स्तवावें. १६. या नळ नामक वानराला. १७. खळांचा पति दुष्टशिरोमणि (रावण.) १८. सुग्रीवादि वानर. १९. दुर्भिक्षाच्या काळांत. २०. पर्वत. २१. शंकराला बिल्वपत्र अत्यंत प्रिय होय हें सुप्रसिद्ध आहे. २२. हृदयंगम कांतेशीं. २३. विरहोत्पन्न जी मनोव्यथा तीतें. २४. संपादी.

प्रभु बोळवी चमूतें बहु पूजुनि, पितर जेंवि कन्यांतें, ।
दृष्टांत [1]ऐकदेशी, ठावें [2]तत्प्रेम काय अन्या तें? ॥ १२४
मग कि[3]ष्किंधेंत म्हणे स्वकरें स्पर्शोनि अंग, दासा हें, ।
'हा यौवराज्यभर या सुग्रीवसुखार्थ अंगदा! साहें.' ॥ १२५
धन दे, परि तात न दे बहु आवडल्याहि अंग [4]दायादा; ।
[5]तत्तुल्य कसा प्रभु? जो साक्षादमृताब्धि अंगदा [6]यादा. ॥ १२६
त्या श्रीकर तीर्थपद [7]प्रभुचा दे भाग्य आयतें [8]पाणी, ।
जें [9]पंककारण अधोगति त्या देईल काय तें पाणी? ॥ १२७
[10]पुत्रासि म्हणे, 'म्हणते मज सीता, चाल, सिद्ध हो, [11]तारे! ।
परि लाजे मन, वदल्यें बहु कटु, जैं [12]नाथ विद्ध होता रे!' ॥ १२८
अंगद म्हणे, '[13]सदरिला करितो सोडूनि [14]भल्ल भस्म रणीं, ।
नमितां न रत अघाच्या हा [15]सीताप्राणवल्लभ स्मरणीं. ॥ १२९
लोकीं धन्यत्वप्रद या [16]प्रभुचे पाय हे तुम्हां [17]तारे! ।
यापरि न सुखद होती पति, अथवा [18]कायहेतु म्हातारे.' ॥ १३०
'[19]बा! हूं, चाल, [20]शिरोब्जें वाहूं [21]रामप्रसूपदीं, राहूं, ।

---

१. एकपक्षीय, एकांशास लागू पडणारा असा. २. पितरांचें अथवा प्रभूचें प्रेम. ३. अध्याय २९१ श्लोक ५८-६० पहा. ४. पुत्राला, वडिलोपार्जित धनाचा भाग (दाय) घेणाऱ्या पुत्राला. ५. त्यासारखा, त्या तातासारखा. प्रभु त्या तातासारखा नाहीं, तर त्याहून श्रेष्ठ होय, कारण तो अंगदरूप जलचर प्राण्याला अमृताचा सागरच होय. ६. जलजंतुरूप अशा. ७. प्रभुचा श्रीकर तीर्थपद पाणी त्या (अंगदाला) आयतें भाग्य दे. ['श्रीकर-तीर्थपद' हें 'प्रभू'चेंही विशेषण होईल.] रामाचा सौभाग्यदायक व तीर्थस्थानापन्न (परमपूज्य) असा हात अंगदाला पूर्वोक्त आयतें भाग्य दे. ८. हात. ९. चिखलास कारण. (पापास कारण.) जें पंककारण अधोगति (निम्नग) पाणी (उदक) तें त्या काय देईल? कांहीं देणार नाहीं—असा भावार्थ. १०. अंगदासि. ११. वालिस्त्रिये. १२. वाली. १३. साधूंच्या शत्रूला. १४. बाण. १५. अंगद म्हणतो:—'हा सीताप्राणवल्लभ जो सदरिला (चांगल्या लोकांच्या शत्रूला) भल्ल (बाण) सोडुनि रणीं भस्म करितो, तो हा सीताप्राणवल्लभ नमितां (त्यास नमन केलें असतां) अघाच्या (पूर्वकृत पापांच्या) स्मरणीं न रत असे=त्या रामास नम्र झालें असतां तो पूर्वकृत पापें विस्मरतो आणि क्षमा करतो. १६. अंगदोक्ति चालू:—'हे तारे! तुम्हां या प्रभुचे हे पाय लोकीं धन्यत्वप्रद (आहेत). या (पायां)परी पति अथवा कायहेतु (आपल्या उत्पत्तीस कारण) असे जे म्हातारे (आईबाप) सुखद न होती.' प्रत्यक्ष आईबापांहून किंवा नवऱ्यापेक्षां हे रामपाद अधिक सुखकर आहेत. [म्हातारा किंवा म्हातारी हे शब्द हिंदी भाषेंत आईबापवाचकच प्रयुक्त आहेत. मराठींत तसा निश्चयानें प्रयोग होत नाहीं.] १७. वालिस्त्रिये. १८. देह देण्यास कारण. १९. हें तारेचें अंगदाशीं भाषण आहे. २०. शिर:कमलें वाहूं. २१. कौसल्येच्या पायीं. [प्रसू=जननी.]

पाहूं अभिषेकोत्सव, लाहूं सुख, [1]सवतिलाहि दे वाहूं.' ॥ १३१
सीतेसवें विमानीं बसतां मानी पुरास [2]देव [3]तारा, ।
न निवे, न भुले कोण, [4]प्रेक्षुनि त्या कापुरा [5]सदवतारा ? ॥ १३२
चढली [6]अजा गजशिरीं, फळली सदमृतफळेंचि [7]कटुतुंबी, ।
तें हेंचि, जें म्हणति कवि ऐसें [8]विधुला [9]पिपीलिका [10]चुंबी. ॥ १३३
दावी प्रियेसि [11]अग [12]नगे [13]गगनग खग मृग नवे नद नद्या या, ।
[14]बहुवर्णनीं [15]अनुज्ञा भरतस्मृति [16]मज न दे वदन द्याया. ॥ १३४
श्रीराम म्हणे, 'वत्सा ! [17]अक्षारे ! शीघ्र धांव, [18]बापा ! हूं. ।
करितोसि कसें व्यसनीं रक्षुनि भरतासि नाव बा ! पाहूं. ॥ १३५
आलों म्हण, भरताचें [19]वपु पावो सुमहिमा नव पुन्हा तें, ।
होय [20]रुचिर न कसें जें [21]अमृतघनें [22]दह्यमान वपु [23]न्हातें ? ॥ १३६
मागें [24]पित्यासि सांडी जरि त्यासि असे सदा सवे गमनीं ।
आपुलियाचि बसे तो पंडित जाणों तदा सवेग मनीं.' ॥ १३७
[25]श्रीरामचंद्र त्याचा [26]कर तो कपि सर्व ताप वाराया, ।
धांवुनि भेटे व्यसनीं भरतशिशुचकोर [27]तूर्ण ताराया. ॥ १३८
'आला सदार सानुज कुशली श्रीराम जो [28]स्वजनकवच'. ।
ऐसें वदे पवनसुत वाटे भरतासि तें [29]स्वजनकवच. ॥ १३९
प्रेमें भुलला नसता भरत कपिहि [30]रामपदरजःप्रवण ।

---

१. रुक्मेला. २. वणवा, अरण्याग्नि. ३. वालिस्त्री. ४. त्या रामाला पाहून कोण शांत होणार नाहीं व कोण भुलणार नाहीं? ५. सद्+अवतारा=साधूंच्या अवताराला. (रामाला.) ६. शेळी. ७. कडू भोंपळी. ८. चंद्राला. ९. मुंगी. १०. 'पिपीलिका चुंबति चंद्रबिंबम्' या समस्येकडे येथें कविकटाक्ष आहे. शंकराच्या पूजेकरितां आणलेल्या फुलांत एकावर मुंगी होती. फुलें शंकरमस्तकीं वाहिलीं तेव्हां ती मुंगीही शंकरशिरीं गेली. तेथें भालस्थचंद्राचें चुंबन सहजासहजीं त्या मुंगीला घेतां आलें, असा समस्येचा अर्थ असावा. येथें संभावनालंकार जाणावा. ११. पर्वत. १२. वृक्ष. [मंत्ररामायण–युद्धकांड–गीति ७८२-८०० पहा.] १३. आकाशास पोंचणारे, आकाशास स्पर्श करणारे असे उंच. १४. या पद्यावरून पंतांची वर्णनसंकोचाभिरुचि दिसून येते. १५. आज्ञा. १६. मोरोपंताला. १७. अक्ष नामक जो रावणपुत्र त्याच्या शत्रो. (हे मारुते.) १८. 'बापा ! हूं' 'बा ! पाहूं'–ठरींव यमक. १९. शरीर. २०. सुंदर. २१. अमृतरूप मेघानें. २२. जळणारें. २३. न्हालेलें, भिजलेलें. २४. वायूस. २५. श्रीराम हाच चंद्र त्याचा कर (किरण–हस्त) मारुति. २६. हस्त. २७. लवकर. २८. आपल्या भक्तांचें कवच (रक्षण करणारा). २९. आपल्या पित्याचें वचन. ३०. रामपादाच्या धुळीवर नम्र झालेला.

[1]तरि [2]राज्यपारितोषिक देतांही [3]त्यासि वारिता [4]कवण? ॥ १४०
'आला **श्री**राम' असें **भ**रत पुसे पांच सातदां साचें; ।
उत्तरहि तसेंचि करी आवृत्ती पांच सात दासाचें. ॥ १४१
जाणों निववायास्तव [5]तो चातक होय दाससा मोरा, ।
बोधुनि घेउनि गेला सांभाळुनि [6]तोयदास सामोरा. ॥ १४२
प्रभुकारुण्यचि धांवे होउनि **पुष्पकविमान** भरभर तें, ।
कीं व्हावें न व्याकुळ वाहुनि दुर्वाह्य राज्यभर **भ**रतें. ॥ १४३
भेटी प्रभु**भ**रताची स्मरतांचि [7]श्रोतृकोटिला निववी, ।
जिववी मृता सुधा जी तीस [8]ईचें यश इच्या पदा [9]शिववी. ॥ १४४
जो पीडिला रडविला देउनि माथां स्वराज्यभर तातें, ।
तदधिक कसा नव्हे प्रभु जो दे सुख, हरुनि भार, [10]भरतातें? ॥ १४५
मज वर्णवेल तें सुख अथवा वदवेल काय हो यश तें? ।
कीं जें अपार तेथें **[11]गुरुशे**षाच्याहि काय होय शतें? ॥ १४६
जशि [12]अब्जिनी [13]प्रमुदिता [14]उदितार्कातें विलोकितां होती, ।
तशि हर्षली **अयोध्या** पाहुनि **रघुवंशभूषणा** हो! ती. ॥ १४७
पावे चंद्रेंहि तसें [15]कुमुद न, अर्केंहि [16]तोखं [17]राजीव, ।
मज हें कळे [18]कलेवर पुर पुरतें, **राम** [19]तो खरा [20]जीव. ॥ १४८
[21]जाणों केले [22]येणें [23]शुष्कसरोमीन [24]संनिध नदानें, ।
[25]धनदानें सुखवाया कीं केवळ निर्धनासि [26]धनदानें. ॥ १४९

---

१. 'परि राज्य पारितोषिक घेतांही त्यासि वारिता कवण' असाही पाठ आहे. याचें ग्रहण केल्यास त्यासि म्हणजे मारुतीला असें समजावें. २. राज्यरूप इनाम (बक्षीस). ३. भरतासि. ४. हा प्रश्नालंकार आहे. ५. तो मारुति=चातक; भरत=मोर. येथें उत्प्रेक्षालंकार जाणावा. ६. मेघास. ७. श्रवण करणाऱ्यांच्या कोटीला. ८. या भेटीचें. ९. प्रभुभरताची भेटी स्मरतांच (तिचें स्मरण केलें असतां) श्रोतृकोटीला निववी (समाधान देते.) जी सुधा मृता जिववी [त्या सुधेला] तीतें इच्या (भेटीच्या) पदा ईचें (भेटीचें) यश शिववी (शिवण्यास, स्पर्श करण्यास, लावी.) सुधेहूनही या भेटीचें महत्त्व मोठें असें तात्पर्य. १०. हा प्रश्नालंकार, काकु. ११. बृहस्पति आणि शेष यांच्या शतानें. १२. कमळिणी. १३. आनंदयुक्त. १४. उदय पावलेल्या सूर्यातें. १५. पांढरें कमल. १६. संतोष. १७. सूर्यविकासी कमल. १८. प्रेत. १९. 'तोख राजीव' 'तो खरा जीव'—ठरींव यमक. २०. प्राण. २१. हा उत्प्रेक्षालंकार आहे. २२. आगमन. २३. शुष्क सरोवरांतील मत्स्य. २४. जवळ. २५. कुबेरानें. २६. द्रव्यदानानें.

न पुरी प्रकाशली, भू प्रभुरविनें हरुनि अंधकारा ती; ।
आला जाणों [1]दीनोद्धारोद्यत [2]सांब [3]अंधकाराती. ॥ १९०
[4]कर्दमशेषसरीं जों व्हावें [5]व्यसु [6]शुष्ककाय [7]यादानीं, ।
तों जाणों घन वर्षे, पुण्य यश स्वल्प काय या [8]दानीं? ॥ १९१
जें सीतेचें, कैंचें तें स्वर्गींच्या [9]सुभाग्य [10]वल्लीला? ।
प्रभुलाहि लाजल्या हो! [11]शतकोटिवदान्यभाग्यवल्लीला. ॥ १९२
प्रेमाश्रुवृष्टि करितां लाजे घनकोटि दृष्टिला [12]ज्यांच्या, ।
त्या [13]पौरवधूंच्या किति कविजन वर्णील [14]वृष्टि [15]लाजांच्या? ॥ १९३
बहु हर्षे पाहुनि [16]वनवासनिवृत्तस्वकायजा माता. ।
सुखविल सासूसि तसे [17]यमगेहागतहि काय जामाता? ॥ १९४
कैकेयीस नमी रघुसिंह, पळे तों तदीय [18]तापससा; ।
सुखधन द्याया धनदचि जरि वरि वेषेंकरुनि [19]तापससा. ॥ १९५
[20]हर्षविली जी म्याली संकोचा जेंवि अंधका [21]राती, ।
[22]अन्वर्थ राम चंद्र ध्यातो यास्तवचि [23]अंधकाराती. ॥ १९६

---

१. दीनाचा उद्धार करण्याविषयीं उद्युक्त. २. अंबेसह. ३. अंधकासुराचा शत्रु. (शंकर.) ही अंधकासुरवधाची कथा अशी आहे:—या असुरानें लावण्यमोहित होऊन पार्वतीला हरण्याचा प्रयत्न केला. त्यावरून त्याचें आणि शिवाचें मोठें घोर युद्ध झालें. त्यांत त्याच्या रक्तापासून अनेक अंधक उत्पन्न होऊं लागले म्हणून त्याचें रक्त शुष्करेवती नामक देवतेकरवीं नाहींसें करविलें. तेव्हां तो एकटाच अंधक अवशिष्ट राहिला. तेव्हां हतवीर्य होऊन त्यानें महादेवाचें स्तवन केलें. नंतर शिवानें प्रसन्न होऊन त्यास आपलें गणत्व म्हणजे सेवकत्व दिलें. अंधक हा भृंगी नामक सेवक झाला. [सौरपुराण—अध्याय २९]. ४. चिखल मात्र शेष आहे ज्यामध्यें अशा सरोवरांत. ५. गतप्राण. ६. रसहीन झाला देह ज्यांचा असे. ७. जलजंतूनीं. ८. अर्थात् या दानांत यश विपुल आहे असा भाव. ९. उत्तम भाग्य. १०. कल्पलतेला. ११. शतकोटि जे भाग्यवान् दाते त्यांच्या लीला. हा अतिशयोक्ति नामक अलंकार आहे. १२. ज्या पौरवधूंच्या दृष्टीला. १३. नागरिक युवतींच्या. १४. राजा नगरांत प्रवेश करूं लागला म्हणजे पौरकन्यांनीं त्याजवर लाह्या उधळाव्या असा आचार प्राचीनकाळीं प्रचलित होता त्यास अनुसरून हें वर्णन आहे. [रघुवंश—सर्ग २ श्लोक १०, सर्ग ४ श्लोक २७, सर्ग ७ श्लोक १५; कुमारसंभव—सर्ग ७ श्लोक ६९-८० पहा.] १५. लाह्यांचा. १६. वनवासापासून निवृत्त (परत आलेल्या) आपल्या कायजा (पुत्राला). १७. यमगृहापासून परत आलेल्या जामाता (जांवयास). १८. ताप हाच ससा. १९. वेषामुळें तपस्व्यासारखा. २०. जी (कैकयी) संकोचा म्याली [ती—अध्याहृत] [रामचंद्रें] हर्षविली. जेंवि (जशी) अंधका (काळोखी) राती (रात्र) [चंद्र] हर्षवितो. [म्हणून] [हा] रामचंद्र अन्वर्थ आहे (आल्हादकारक चंद्र आहे.) यास्तवचि अंधकाराती (शंकर) त्यासि (रामचंद्रासि) ध्यातो. येथें पूर्व अर्धात उपमा व रूपक अलंकार आहेत. २१. काळोखी रात्र. २२. यथार्थ. २३. शंकराला.

त्या मंथरेसहि म्हणे, 'वेड्ये! त्वां सर्वथा न लाजावें, ।
हें [1]सद्यश जोडाया मद्बुद्धी न म्हणती मला जावें. ॥ १५७
भरता! तरि राज्य करिन, जरि तूं म्हणसिल न ईस [2]भाजीन; ।
कीर्तिकरी कैकेयी, हे पुण्याची [3]नई [4]सभाजीन.' ॥ १५८
तो [5]साधु म्हणे, 'अमृताहुनि [6]आर्यनिदेश गोड कळला, हो! ।
जरि हा [7]सुगुरु, तदपि जन यासि वहातां [8]न मोडकळ लाहो.' ॥ १५९
[9]राज्याभिषेकउत्सव सुमुहूर्ती होय हो यथाविधि तें, ।
कल्याणपर्व भुलवी [10]गिरिशासह [11]हंसवररथा विधितें. ॥ १६०
सिंहासनीं जिहीं प्रभु सीतेसह देखिला, तिहीं [12]प्राज्य ।
वरिलें धन्यत्व, तसें न सुरांचें द्यावया शके राज्य. ॥ १६१
तेव्हां गंधर्वमुखीं जिकडेतिकडेहि [13]तंननन तननं ।
मुनि म्हणति, '[14]वानराणामपि न [15]नराणां सुमंगलं जननं.' ॥ १६२
[16]परशब्द न [17]साकेतीं स्वर्गीही आयकों न दे वाद्य; ।
[18]याँ गजरेंचि निवेचि न तप तप हें आयकोन [19]देवाद्य. ॥ १६३

---

१. रावणमारणादिक उत्तम यश संपादण्यासाठीं जावें असें माझी बुद्धि मला न म्हणती, यास्तव हे मंथरे! हे सर्व तुझे उपकार आहेत. तूं जर नसतीस तर माझ्या हातून (माझ्या स्वतःचे प्रेरणेनें) हें महत्कार्य झालें नसतें–असें तात्पर्य. २. संताप देईन. ३. नदी. ४. पूजीन. (सभाजन=पूजन.) ५. रामभक्त भरत. ६. वडिलांची आज्ञा. ७. मोठा जड. ८. न मोडकळ लाहो=पतन न पावो. ९. राज्याभिषेक ज्यांत आहे असा उत्सव. १०. शिव. ११. हंसश्रेष्ठ रथ ज्याचा अशा (विधितें). ब्रह्मदेवाला हंसरथ, हंसवाहन अशी संज्ञा आहे. १२. विपुल. १३. मंत्ररामायण–युद्धकांड, गीति ८२६ पहा. १४. अशीं संस्कृत सवंधची सवंध वाक्यें पंतांच्या काव्यांत अनेक आढळतात. [निबंधमाला–अंक ६६ पृष्ठें २८-३२ पहा.] १५. नराणां सुमंगलं जननं इति न, वानराणामपि=मनुष्याचेंच जन्म उत्तम आहे असें नाहीं, वानरांचेंही जन्म उत्तम आहे. १६. शत्रुशब्द. [वाद्यांचा गजर इतका मोठा होता कीं, नुसत्या अयोध्येंतच काय पण स्वर्गात देखील परशब्द (शत्रुशब्द; पर असा शब्द सर्वच स्वकीय असल्यामुळें; किंवा बृहत्शब्द) ऐकूं येत नव्हता.] १७. अयोध्येमध्यें. १८. यां गजरांचा प्रभाव इतका मोठा होता कीं देवाद्य (शंकर) या गजरेंचि निवेचि. 'तप, तप,' हें आयकोन (इतका) न निवे, म्हणजे एकांतवासप्रिय शंकराला देखील 'तप तप=तप करा तप करा' या शब्दानें किंवा ध्यानस्थ एकांतांत बसण्यानें जें समाधान झालें नाहीं तें समाधान ह्या एकांतवासविघातक वाद्यांच्या गजरानें झालें. १९. शंकर.

ईशहि नाचे, पावे वृद्धि प्रीतीहि देहभा, नाचे ।
किति अप्सरा? न माडें गौरीचित्तींहि देहभानाचें. ॥ १६४
शतलक्षकोटि खंडी कल्पतरूंचीं फुलें उडविलीं, हो! ।
तीं सुरभोग्यें कपिंनीं पौरांनीं पुरपथीं तुडविलीं, हो! ॥ १६५
कविकोटिला न वदवे लवहि श्रीरामदेवराज्याचा ।
रस, कामधेनुचाही रसिकासि वदों न दे वैराज्याचा. ॥ १६६
वेडावले महाकवि वर्णू जातां धरूनि आवांके; ।
तेथें मयूरमति किति? जी प्रेमभरें करूनि आ वांके. ॥ १६७
ऐसें चरित्र सांगुनि मार्कंडेयें सबंधु तो धर्म ।
विज्वर केला, कोण न पावे प्रभुचरण सेवितां शर्म? ॥ १६८

---

१. त्या ईशाची देहकांति. राम राज्यपदारूढ झाला तेव्हां आनंदानें ईशही नाचूं लागला; त्याची देहकांति आणि प्रीति वृद्धि पावल्या, तशाच अप्सराही नाचूं लागल्या. २. किति अप्सरा नाचे?=अनेक देवांगना नाचल्या—असा भावार्थ. [अप्सरा ह्या समुद्रमंथनकाळीं अप् म्ह० उदक यापासून उत्पन्न झाल्या:—'अप्सु निर्मथनादेव रसात्तस्माद्वरस्त्रियः । उत्पेतुर्मनुजश्रेष्ठ तस्मादप्सरसोऽभवन् ॥.' ह्या गंधर्वांगना असून स्वर्वेश्या आहेत. ह्या इंद्राच्या दासी असून त्याला कोणाच्या तपाचें भय वाटलें म्हणजे तपोभंग करण्याच्या कामीं मोठ्या कुशल, म्हणून त्याच्या आज्ञेनें ह्याच जावयाच्या आणि कार्यसिद्धि करून परत यावयाच्या. उर्वशी, मेनका, रंभा, घृताची, तिलोत्तमा, सुकेशी, मंजुघोषा इत्यादि प्रमुख सुरवेश्या होत. बाणकवीनें यांचीं चवदा कुळें असल्याविषयींचा उल्लेख 'कादंबरी'ग्रंथांत केला आहे. अप्सरा आपल्या नृत्यविलसितानें विजांस लाज आणतात.] ३. गौरीचित्तांत देखील देहभानाचें माडें (रोपें=अंकुर) न (राहिलें, उरलें). येथें 'माडें' असें पद आहे त्या ठिकाणीं कदाचित् 'भांडें' असें पद असावें असें दिसतें. तसें असल्यास असा अर्थ करावा:—शंभु नाचूं लागला, अप्सरा नाचूं लागल्या, त्यांत कांहीं विशेष नाहीं, पण गौरीचें मनांत देहभानाचें भांडें न (नाहींसें झालें). अप्सरा नाचोत, पण मी आदिशक्ति, मी थोर, मीं नाचूं नये—हें भान न राहून—देहभानाचें भांडें (पात्र—गांठोडें) नाहींसें होऊन—आनंदाचे भरांत गौरीही नाचूं लागली. ४. देहस्मृतीचें. ५. देवांनीं उपभोगण्यास योग्य अशीं कल्पतरूंचीं फुलें. ६. उत्तम आज्याचा (तुपाचा). ७. धैर्य. 'आ वांके' 'आवांके' हें पंतांच्या आवडत्या यमकांपैकीं एक आहे. ८. तापरहित. ९. येथें अर्थांतरन्यास व प्रश्न हे अलंकार आहेत. १०. सुख. वनपर्वाच्या तीन अध्यायांत (१०-१२) दाशरथिरामचरित्रकथानिरूपण आहे. त्यांतील कांहीं पद्यांस अनुलक्षून पुढील टीकारूप लेख आहे. कै० बाळकृष्ण मल्हार हंस यांनीं मोरोपंतावर जो एक निबंध लिहिला आहे त्यांतून हा उतारा घेऊन रसिकजनांस अर्पण केला आहे. कै० हंस यांचा निबंध कदाचित् पुष्कळांस माहीत नसेल, यास्तव त्याविषयीं इतकें सांगणें अवश्य दिसतें कीं त्यांनीं पंतांच्या काव्यमहोदधीचें

सूक्ष्मरीत्या आलोडन करून तो निबंध लिहिला आहे. यांतील विचार एकंदरीनें सर्वसंमत होण्यासारखे आहेत. इतकी प्रस्तावना पुढच्या उद्धृत लेखास पुरी आहे. "मूळ ग्रंथांत जितक्या कल्पनांचा व कथानकांचा विस्तारानें समावेश केला आहे तितक्या कल्पना व कथा मोरोपंतानें घेतल्या नाहींत व वर्णनही स्वतंत्र कल्पनांनीं केलें आहे. तथापि काव्यनाटकादि ग्रंथांत मूळ ग्रंथापेक्षां कमी जास्ती करून, नायकाच्या स्वभावाला व गुणाला योग्य अशी रचना केलेली असते, तसा प्रकार मोरोपंतानें केला नाहीं. मूळच्या ग्रंथांत उत्तम नायकाच्या संबंधानें तत्स्वभावाविरुद्ध कांहीं रचना आहे ती संक्षिप्त वर्णन करितांना पंतानें गाळिली नाहीं, किंवा तिचें नायकस्वभावानुरूप रूपांतरही केलें नाहीं. 'पंपेंत स्नान करुनि विभु गेला ऋष्यमूक गोत्रास । त्यातें दुरुनि पाहुनि पावे सुगल प्लवंग तो त्रास ॥' वनपर्व–अध्याय ११ गीति ९१. यांत रामास पाहून सुग्रीव वानर त्रास पावला असें म्हटलें आहे आणि लागलींच 'पवनसुतासि म्हणे ते तापस परि कार्मुकी शरी रानीं। येताति कोण पुस जा स्पष्ट गमति देवसे शरीरानीं ॥' वनपर्व–अध्याय ११ गीति ९२. ते तापस आहेत, देवासारिखे स्पष्ट दिसतात, असेंही त्यानेंच म्हटलें आहे. तेव्हां एक्याणवाव्या आर्येंत केवळ प्रासाकरितांच 'त्रास' शब्द घातला असें दिसूं लागतें. वस्तुतः देवासारिखे दिसणाऱ्यास अवलोकन करून त्रास मानण्यासारखी सुग्रीवाची स्थिति आणि बुद्धि नव्हती. तो मूळचा शुद्धांतःकरण असल्यामुळेंच रामभक्त झाला व दैत्यांशहि नव्हता. अर्थात् देवासारखे दिसणाऱ्यांचा त्यास कारणावांचून त्रास यावयाचा नाहीं. असें असतां ज्या जगदीश्वराच्या दर्शनानें साधुजनांस स्वाभाविक आनंद व्हावयाचा; त्याच्या दर्शनेंकरून सुग्रीवास त्रास झाला हें म्हणणें उदात्त पुण्यश्लोक नायकचरितांस अनुचित होय. या ठिकाणीं मूळ ग्रंथांत रामलक्ष्मणांस पाहिल्यावर वालीच्या संबंधानें संशय येऊन सुग्रीव भ्याला. अशा अभिप्रायाचें वर्णन आहे, त्याची स्पष्टता या ठिकाणीं मोरोपंतानें अवश्य करावयाची होती. अथवा 'त्रास' शब्द मुळींच गाळावयाचा होता. रामचंद्रास पाहिल्याबरोबर साधुजनहृदयपयोराशीस तत्काळ भरतीच यावयाची, ह्या सरल, उदात्त आणि निर्दोष अर्थाची जोडणी करावयास ग्रंथसंक्षेप हें कारण पंतास फार युक्त होतें. असें त्यानें केलें असतें तर स्वतंत्र ग्रंथरचना केल्याचें आणि रामचंद्राचें यशही अधिक उज्ज्वल करून दाखविल्याचें अत्यंत निर्मल यश त्यास प्राप्त झालें असतें. याप्रमाणेंच:—'सुगल म्हणे रामा म्यां शोधावी जानकी शपथ करितों । राम म्हणे कार्य तुझें जें तें मी जानकीश पथ करितों ॥ ९९ ॥ शिखिसाक्षिक सख्य करुनि राम करी कार्य मान्य वालिशतें । क्षण ज्या पुढें नुरावें प्रभुबळ नुमजे सुकंठ वालिश तें ॥ १०० ॥ तत्प्रत्ययार्थ एकें बाणें भेदूनि सप्त तालीला । वालीस वधी ज्याची स्वजनीं नुरवीच तप्तता लीला ॥ १०१ ॥' वनपर्व–अध्याय ११. यावरून भगवान् रामचंद्र याच्या राज्यांतही एकमेकांच्या नुसत्या भाषणावर विश्वास ठेवून चालत नसत असें दिसतें. तशांत हा अविश्वास केवळ प्राकृत जनामध्येंच होता असें नाहीं तर, त्रिभुवनेश्वर एकवचनी जो रामचंद्र महाराज आणि परमभक्त सुग्रीव ह्या उभयतांच्या मनांत एकमेकांविषयीं होता हें पाहून फार आश्चर्य वाटतें. त्रेतायुगांत रामचंद्र व सुग्रीव यांच्या वचनाविषयीं त्यांस इतका बंदोबस्त करून घ्यावा लागला तर, हल्लीं कलियुगांत शपथप्रमाण बेलभांडारादि क्रिया होतात तेव्हां कांहीं विश्वास वाटतो, हा कलिप्रादुर्भाव मानणें अप्रशस्त होय. कोणत्याही कालीं कोणत्याही स्थितींत मनुष्याचे मनोविकार सारख्याच संशयादि जालनीं परिवेष्टित असतात. त्यांत युगपरत्वें कांहीं फेरबदल होत

अध्याय तेरावा.

धर्म पुन्हा त्यासि म्हणे, 'मार्कंडेया मुनीश्वरा! आर्या! ।
आढळली तुज लोकीं सत्वाढ्या आमुची जशी भार्या ?' ॥ १
मुनि त्यासि म्हणे, 'होती सावित्रीनाम अश्वपतितनया, ।

असेल असें वरील गोष्टीवरून वाटत नाहीं. युगपरत्वें मनुष्याच्या अंतःकरणप्रकृत्यंशांत फेरफार होत असतो अशी पुष्कळ लोकांची व ग्रंथांची समजूत आहे. व तशी समजूत असणें हें लोकांचें सदाचरण व भक्ति वाढण्यास उत्तम कारण आहे. यास्तव भगवान् रामचंद्राच्या काव्यांत वरील गोष्ट प्रकारांतरानें वर्णावयाची होती, म्हणजे रामचंद्राच्या भाषणाबरोबर तें सुग्रीवानें निःसंशय अनन्यभावानें मान्य केलें असें वर्णन असावयाचें होतें. अशा वर्णनानें रामचंद्रस्वभावास भूषण होऊन, त्रेतायुगांतील मनुष्यस्वभाव कलीहून भिन्न होता असेंही लोकांस दिसलें असतें. हा खुबीदार फेरफार पंतानें केला नाहीं हें उघड आहे. दुसरें सुग्रीव हा वनचर होता यामुळें त्याची स्वाभाविक बुद्धि निष्कपट आणि श्रद्धालु असलीच पाहिजे. त्याहून विपरीत वरील वर्णन झालें अर्थात् हाही प्रकृतिविपर्यय दोष झाला." "असाच प्रकार, लंका जिंकून हस्तगत होण्यापूर्वींच तिचें राज्य बिभीषणास दिलें असें वर्णन करून दाखविलें आहे:—[ऐसें पूजुनि त्यातें प्रभु लंकाराज्य दे, न वेदा ते । गुण वर्णवती, ज्यांहीं लाजविले बहु जुने नवे दाते ॥ ८ ॥ वनपर्व-अध्याय १२.] रामचंद्र समुद्रतीरीं असून सेतुरचना करण्याच्या विचारांत असतांच बिभीषण त्यास येऊन भेटला. तेव्हां त्याला अभय देऊन लंकेचें राज्यही दिलें. त्यासमयीं लंकेचा स्वामी रावण होता. त्यास जिंकल्यानंतर तें स्वामित्व रामाकडे येणार होतें. त्या पूर्वींच दुसऱ्याच्या स्वामित्वाचें वस्तु तिसऱ्यास देऊन टाकलें हें वर्णन रामचंद्रासारख्याच्या चरित्रांत अगदीं अयुक्त. यास्तव अशा ठिकाणीं मूळ ग्रंथांत फेरफार करून, लंकेचें राज्य देण्याचें वचन मात्र बिभीषणास दिलें असें वर्णन मोरोपंतानें वर्णावयाचे होतें म्हणजे ग्रंथकारास व नायकासही तें फारच भूषणप्रद झालें असतें.' (बाळकृष्ण मल्हार हंसकृत मोरोपंतावरील निबंध-पृष्ठ ९४-९८ पहा.)

१. रामकथा समाप्त झाल्यावर २. अध्याय २९३ श्लोक ३ पहा. ३. गुणसंपन्न, सुस्वभावसंपन्न, पतिव्रताधर्मसंपन्न, पुण्यशील, सत्वशील, कसाही प्रसंग आला तरी जी धीर धरून राहून सदाचारानें वागते ती. ४. सावित्री या नांवानें प्रख्यात. "मद्रदेशाच्या अश्वपती राजाची कन्या सावित्री (सावित्री देवीचा अवतार) हिनें शाल्वदेशच्या द्युमत्सेन राजाचा मुलगा सत्यवान् यास वरिलें. सत्यवान् अल्पायुषी होता. त्याच्या मरणाच्या वेळीं यम जातीनें त्याचा प्राण घेऊन चालला असता सावित्रीनें त्याच्या मागून जाऊन यमास आपल्या भाषणानें संतुष्ट केलें; आणि आपल्या बापास शंभर पुत्रांची प्राप्ति, सासरा आंधळा व राज्यरहित होता त्यास डोळ्यांची व राज्याची प्राप्ति, आपणाला शंभर पुत्रांची प्राप्ति, असे वर त्याजपासून संपादिले; शेवटीं सत्यवानाचा प्राणही परत आणिला; हें ह्या आख्यानांत सांगितलें आहे." (नवनीत-पृष्ठ २४१ पहा.) ५. अश्वपति नामक मद्रदेशाधिपाची कन्या.

तच्चरित श्रवण करीं, ऐकाया योग्य साधु, पतित न याँ. ॥ २
होय प्राप्त विधिश्रीसावित्रीच्या वरेंचि ती राया, ।
यत्कीर्ति जना म्हणती, 'कर देत्यें, रे! अघाब्धितीरा या.' ॥ ३
झाली भक्तसुता ती श्रीसावित्रीच उद्धरायाला, ।
श्री क्षीरधिला जन्मुनि जें दे यश तेंच शुद्ध रायाला. ॥ ४
बहु लाजवी वरांला तीचा कुलशीलरूपमहिमा, गा! ।
'मागा' म्हणे 'गिरीशचि, न जडगिरि स्वस्तरूपमहिमागा.' ॥ ५

---

१. "यमक साधण्यासाठीं अर्थहानि होत असली तरी तिकडे फारसें लक्ष द्यावयाचें नाहीं असा प्रकार पंताच्या काव्यांत कोठें कोठें आढळतो. या दोषास पात्र अशी पंताची कविता इतकी अल्पतम आहे कीं, 'खंडीत पावरती' हें प्रमाण सुद्धां अतिशयोक्तिसूचक होईल कीं काय असें वाटतें. या दोषाचीं उदाहरणें याच आख्यानांत एक दोन आहेत. या दुसऱ्या गीतींत 'सावित्रीचें चरित ऐकावयास साधुच योग्य, पतित योग्य नाहींत' असें म्हटलें आहे. तें पंतासही संमत असेल असें आम्हांस वाटत नाहीं. कारण साध्वीचें चरित पतितांनीं ऐकूं नये असा नियम असेल तर पतितांचा उद्धार होण्याचा मार्गच बंद करून टाकला असें होऊन, पुण्यफलरूप इमारतीस पायापासून खणल्यासारखें होईल. आतां पंतास ही वरील गोष्ट संमत नव्हती हे पुढल्याच आर्येवरून दिसतें. त्या आर्येंत लागलीच या विरुद्ध वर्णन केलें आहे. 'होय प्राप्त विधिश्री, सावित्रीच्या वरेंचि ती राया। यत्कीर्तिजना म्हणती कर देतें रे अघाब्धि-तीरा या ॥ ३ ॥ ज्या सावित्रीची कीर्ति पातकसमुद्रांत बुडणाऱ्यास तारण्याकरितां हात देण्यास तयार आहे, तिचें चरित्र ऐकण्यास पतित अयोग्य असें कधीं तरी म्हणतां येईल काय? तेव्हां यावरून दुसऱ्या आर्येंतील **पतित न या** हीं अक्षरें केवळ यमकाकरितांच आणून पंतानें मोठा अनर्थ केला हें उघड दिसतें. 'माता तात परततां बहु रडती परि रडे न सावित्री । सुमृदु सुमंत्रीहि म्हणुन सांस म्हणे नाम गा नसावि त्री ॥ २० ॥' यांत माझ्या नांवांत जी 'त्री' आहे ती नसावी म्हणजे 'सावी' असें म्हणा, असा शेवटल्या चरणाचा अर्थ दिसतो. यापासून तात्पर्य असें काढावयाचें कीं, माता, पिता, सासू, सासरा, आणि पति हे खुशाल असावे आणि मग मी सावी म्हणजे सहावी व्हावें असें म्हणा म्हणून ती म्हणाली. केवळ यमक साधण्याकरितांच पंतानें केवढी ही खटपट केली आहे? आणि इतकेंही करून क्लिष्टत्वाचा दोष मात्र घेतला." (मोरोपंतावरील हंसकृत निबंध—पृष्ठ १४८-१४९ पहा.) २. पातकीपुरुष. ३. चरितास. ४. ब्रह्मदेवाची बायको सावित्री तिच्या वरानें. [अश्वपतीनें सावित्री संतुष्ट व्हावी म्हणून एक लक्ष होम करून, नित्य परिमित भोजन करून अठरा वर्षें आराधना केली, तेव्हां ती प्रसन्न झाली.] ५. अश्वपतीला. ६. त्या सावित्रीची कीर्ति. ७. पापरूप सागरतीरास. ८. भक्ताची (अश्वपतीची) मुलगी. ९. लक्ष्मी. १०. नवऱ्यास. ११. गिरीश (महादेव) हाच वर नवरा मागा असें तिचा कुलशीलरूपमहिमा (वंश, स्वभाव आणि सौंदर्य यांचा थोरपणा) म्हणे. १२. महादेवचि. १३. स्वर्+तरु+उपम+हिमागा=कल्पतरुसदृशहिमाचलपर्वता.

अश्वपति म्हणे, 'वत्से! चिंता मज हेचि एक परमा, गे!।
झालीस [1]दानयोग्या, परि कोणीही तुला न [2]वेर मागे. ॥ ६
जा, शोधुनि ये, वत्से! वरुनि मतें [3]मानल्या कुलीनातें, ।
[4]कीं तुजकडेचि आहे शतपुत्रांचेंहि गे! मुली! [5]नातें.' ॥ ७
'स्वबर पहा जा' ऐसें योग्य जनीं [6]तोचि तीसचि [7]वंदाया. ।
[8]गुरुच्या वचनें गेली आपण घेऊनि ती [9]सचिव दाया. ॥ ८
[10]अनुरूप वर विलोकुनि आली, तों त्या [11]नृपा [12]परमहर्षी ।
सांगत होता सुकथा [13]श्रीनारद जों कृपापर महर्षी. ॥ ९
ती दोघांतें [14]वंदी, तों तीस [15]ब्रह्मकायभू पाहे, ।
सस्मित असें पुसे कीं, '[16]त्वत्तनया होय काय भूपा! हे? ॥ १०
कोठें गेली होती? श्वशुरगृहाहूनि काय आणविली?।
[17]हां! सचिवांनीं आजुनि दानोचितता [18]ईची न जाणविली.' ॥ ११

१. देण्यास योग्य. २. नवरा मुलगा. ३. मानलेल्या. ४. कारण. ५. शंभर पुत्रांच्या ठिकाणीं तूं एकटी आहेस असें नातें. ६. तो अश्वपतिच. ७. वदायाला. ८. बापाच्या. ९. मंत्री आणि उपमाता यांना घेऊन. १०. योग्य, उचित. ११. अश्वपतीला. १२. ब्रह्मानंदनिमग्न. १३. नारद हा देवर्षींतील मुख्य, आणि परमभागवत होय. १४. अध्याय २९४ श्लोक ३ पहा. १५. नारद. [ब्रह्मदेवाच्या शरीरापासून–मांडीपासून–झालेला नारद. नार=पाणी, द=देणारा. जो पितरांना पाणी (नार) देतो तो नारद. 'नारं पानीयमित्युक्तं तत्पितृभ्यः सदा भवान्। ददाति तेन ते नाम नारदेति भविष्यति ॥' **हरिवंश** नामक ग्रंथांत या देवर्षीचें वर्णन खालीं लिहिल्याप्रमाणें केलें आहे:—याची अंगकांति प्रज्वलिताग्नीप्रमाणें देदीप्यमान आहे, नेत्राची चकाकी बालार्कसदृश आहे, मस्तकावर जटाभार उन्नमित करून बांधला आहे. याचें शरीर सुवर्णालंकारानें भूषित केलेलें आहे. सखीप्रमाणें यानें आपल्या कक्षपुटांत एक मोठी वीणा बाळगली आहे. चंद्ररश्मीप्रमाणें शुभ्रांबर धारण केलें आहे, कृष्णमृगचर्मनिर्मित उत्तरीयवस्त्रानें आपली काया आच्छादन केली आहे, दंडकमंडलु घेतलें आहे व हा कोणी साक्षात् दुसरा इंद्र आहे असा भास होत आहे, हा जगांतील गुप्त कलहांचा जाणणारा आहे, स्कंदासारिखा ब्रह्मचारी आहे, या महर्षीस कलहप्रिय देखील म्हणत असतात, हा विद्वान् आहे व तसाच गायनकलेंत निष्णात आहे, हा ब्रह्मसूनु आहे व जणूं काय अन्यकलीच आहे, देव व गंधर्व लोकांचा आदिवक्ता व मुनिश्रेष्ठ आहे, हा चारी वेद पठण करणारा आहे व मुख्य मुख्य याज्ञिकांकडून गाइला जाणारा आहे. या ब्रह्मर्षीस नारद म्हणत असतात, हा चिरंजीव आहे व याचा ब्रह्मलोकांत संचार आहे.] १६. तुझी मुलगी. १७. खेदार्थी अव्यय. ही उपवर झाली असून योग्य वराला देण्याला उचित आहे असें नृपांना सचिवांनीं कळविलें नाहीं, हें फार वाईट केलें म्हणून खेद. १८. इची=हिची, या मुलीची. ['हा' ह्याच्यांतील 'ह्'चा लोप होऊन जें रूप शेष राहतें त्याचा उपयोग बोलण्यांत आणि कवितेंत फार आढळतो. जसें ह्यास=यास, हिनें=इनें, ह्यानें=यानें.]

भूप म्हणे, 'परिसावें तेंचि तुवां[1] सर्वसाधुकुलगीतें[2], ।
म्यां पाठविलें होतें स्वर पहाया स्वयें स्वमुलगीतें[3]. ॥ १२
वद वत्से! काय कसें? वर बरवा पाहिला? न लाजावें, ।
ह्या गुरुनें[4] धन्य असें म्हणुनि स्वमुखें तुला मला, जावें.' ॥ १३
सांगे[5] ती सावित्री, 'नृप द्युमत्सेन[6] शाल्वपति[7] आहे, ।
जरि वृद्ध अंध रिपुहृतराज्य[8] वनस्थहि[9] न काळजी वाहे. ॥ १४
कुलशीलसत्वगुणनिधि तो पुत्रकलत्रमात्रपरिवार[10], ।
[11]परि वार[12] सर्व सम त्या, [13]कीं मथिला स्वांतरस्थ[14] [15]अरिवार. ॥ १५
तो श्वशुर[16] मानला[17] मज, चित्तें[18] त्याचा कुमार[19] म्यां वरिला; ।
जरि लाजविति सख्या[20], अनुसरली [21]गौरी हरा[22], न त्या हरिला.' ॥ १६
नारद म्हणे, 'नृपा! हे चुकली योजूनि सत्यवान् नवरा; ।
न वरावा जरि गुणवान्[23], योजूं अन्या, असे उणें न वरा[24].' ॥ १७
भूप[25] म्हणे, 'सर्वज्ञा! देवा! उमजे असेंचि सांग मला, ।
गुणवान् युवा[26] कुलज[27] वर जरि, तरिहि तुला अयोग्य का गमला? ॥ १८
काय इणें न धरावें अधनत्वें[28] भूपजनवरा[29] [30]जीवीं? ।
कां न प्राशावें मधु[31] मधुपानें[32] कूपजनवराजीवीं[33]?' ॥ १९
मुनि सांगे[34], 'वर्षांतीं येइल त्या भूपपुत्रका[35] व्यसुता[36]; ।
अन्य वरू, वृतहि[37] कच त्यजुनि, वरी भूपपुत्र[38] काव्यसुता[39].' ॥ २०

---

१. तुवां=त्वां; तुवां, तां हीं रूपें कवितेंत मात्र येतात. २. समस्तसज्जनसमूहस्तुतें=सर्व साधूंच्या समुदायानें स्तविलेल्या (त्वां). ३. आपल्या सावित्रीतें. ४. नारदानें. ५. अध्याय २९४ श्लोक ७-१० पहा. ६. द्युमत्सेन नांवाचा. ७. शाल्व देशाचा राजा. ८. शत्रूंनीं हरण केलें राज्य ज्याचें असा. ९. वनांत राहणारा. ['वनस्थ' हें उपपदसमासाचें उदाहरण होय.] १०. पुत्र आणि कलत्र (स्त्री) इतकाच आहे परिवार ज्याचा तो. ११. परंतु, तथापि. १२. त्या द्युमत्सेनाला सर्व वार (दिवस) सम (सारखे). १३. कारण. १४. स्व+अंतर+स्थ=आपल्या हृदयीं रहाणारा. १५. कामक्रोधादिक रिपुसमुदाय. १६. सासरा. १७. आवडला, पतकरला. १८.'मनसा वृतः' असेंच मूळांत आहे. १९. सत्यवान् नामक पुत्र. २०.विजयादिक सोबतिणी. २१.पार्वती. २२. शिवाला. [अध्याय २९४ श्लोक ११-१३ पहा.] २३.यद्यापि सत्यवान् हा गुणवान् आहे तथापि वरूं नये. २४.वराला कमी नाहीं, पुष्कळ वर मिळण्याजोगे आहेत, त्यांची कमताई नाहीं. २५. अश्वपति. २६. तरुण. २७. उत्तम कुलामध्यें झालेला. २८. धनहीनत्वास्तव. २९. राजश्रेष्ठाला. ३०. जीवीं धरणें=जीवीं बांधणें=जिवासीं धरणें=उत्तम लेखणें, प्रिय मानणें. ३१. मकरंदरसाला. ३२. भ्रमरानें. ३३. विहिरीमध्यें झालेल्या नूतन कमलाचे ठायीं. ३४. अध्याय २९४ श्लोक २२-२३ पहा. ३५. सत्यवानास. ३६. गतप्राणता, मरण. ३७. वरलेलाही. ३८.राजपुत्र. (ययाती.) ३९. शुक्रकन्या. (देवयानी.)

भूप म्हणे, 'न वरावा वत्से! जरि सुगुणसागर [1]लवायु; ।
[2]शीतल मंद सुगंधहि वद सेवावा कसा [3]गरलवायु?' ॥ २१
ती [4]सुमति म्हणे, 'ताता! न त्यजुनि [5]पयोधिला नदी परते; ।
न [6]पतंगचित्तवृत्ति क्षणही रत्नीं, त्यजूनि दीप, रते. ॥ २२
वरिला तो वरिलाचि, स्पर्शावा या न अन्य [7]कायातें; ।
हा दृढ निश्चय माझा, स्तवितील कुलीन कन्यका [8]यातें. ॥ २३
[9]आयुष्य असो कितितरि, मज [10]तदितरपुरुष तुजसमचि, [11]राया! ।
मन न चळेलचि, येइल जरि [12]चरचर हा गळा यम चिराया.' ॥ २४
देवर्षि म्हणे, '[13]त्यासचि दे [14]साध्वीव्रतपरा सुता, राया! ।
[15]शुचिनिश्चयाहुनि अधिक अमृतरस नसे [16]परासु ताराया. ॥ २५
हे बहु धन्या कन्या [17]अन्यायन्यायधर्मभावज्ञा ।
[18]किंबहुना स्वल्पा तरि करि [19]आद्यसतीहि वल्लभावज्ञा. ॥ २६

---

१. अल्पायुषी. २. संस्कृत ग्रंथकार वायु शीतल, मंद आणि सुरभि असा त्रिविध मानतात असें आढळतें. ३. विषयुक्त वायु. हा प्रश्नालंकार होय. ४. अध्याय २९४ श्लोक २६-२८ पहा. ५. हा नदीपयोधींचा दृष्टांत मूळांत नाहीं. नदी सागराची स्त्री या प्राचीन समजुतीकडे येथें लक्ष्य आहे. ६. शलभाची मनोवृत्ति. 'पतंग: शलभे शालिप्रभेदे पक्षिसूर्ययो:' इति सुधा. हा दृष्टांतही मूळांत नाहीं. ७. देहातें. ८. निश्चयातें. ९. तो अल्पायु अथवा दीर्घायु असो. १०. त्याहून इतर, सत्यवानाहून अन्य पुरुष. ११. अश्वपते. १२. चिरण्याची क्रिया घडतांना जो शब्द होतो तो=चरचर. अशा शब्दाला अनुकरणवाचक शब्द म्हणतात. अशा शब्दांचीं अनेक रूपें असतात—जसें चरचरां, चराचर इत्यादि. "या अशा अनुकरणरूप शब्दांचा या महाराष्ट्र भाषेत जितका भरणा असेल तितका, मला वाटतें, आणखी कोणत्याही भाषेंत नसेल, आणि तो या भाषेचा केवळ असाधारण जिव्हाळा होऊन राहिला आहे; गति, वेग, मांजुल्य, कार्कश्य, सौंदर्य, परिमिति इत्यादि क्रियेचे शतावधि प्रकार दाखवायाचे असतां, त्या त्या अनुकरणरूप शब्दांचा प्रयोग होतो. जसें:—**झटझट** चालतो; **चमचम** लवते; **टकमक** पाहते; **झणझण** वाजतें; **बद्बद** पडतें; **टपटप** झरतें; **भडभड** ओकतो; **तडतड** बोलतो; 'छडी वाजे **छमछम**, विद्या येई **घमघम**." (दादोकृत व्याकरण.) **पंतांनीं** असे अनुकरणवाचक शब्द योजून कोठें कोठें मोठी बहार करून दिली आहे. अशा स्थळीं अर्थ आणि ध्वनि हे परस्परांस इतके अनुरूप आणि अनुगुण आहेत कीं त्यांवरून **पंतांचें** समर्पक शब्दरचनाचातुर्य आणि भाषापतित्व हे गुण सुव्यक्त होतात. १३. त्या सत्यवानालाच. १४. पतिव्रता. पतिव्रतेच्या सदाचाराविषयीं तत्पर. १५. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १६. मरण पावला जो तो. गेले प्राण (असु) ज्याचे त्याला. १७. न्याय अन्याय धर्म इत्यादि भाव जाणणारी. १८. देवर्षि म्हणाला कीं, इच्या मनाप्रमाणें इला इष्टवल्लभास देऊन टाक. तसें न करिशील तर ही मुलगी तुझी अवज्ञा करील. या गोष्टीच्या समर्थनास उत्तरार्ध हें

होतें सद्धर्माच्या[1] कासेला लागतां सदा शिव[2], हो[3]! ।
येतों[4], बसा, प्रसन्न प्रभु मृत्युंजय[5] तुम्हां सदाशिव हो[6].' ॥ २७
गेला मुनि जो भगवत्कीर्तिमहाकामधेनुचा[7] दुहिता[8]; ।
नेउनि दिली नृपें ती सद्विधिनें[9] सत्यवत्करीं[10] दुहिता[11]. ॥ २८
माता तात परततां बहु रडती, परि रडे न सावित्री, ।
सुमृदु सुमंत्रीहि म्हणुनि त्यांशि म्हणे नामगा नसावि[12] त्री. ॥ २९
झाली तपोवनांत स्वीकारुनि वल्क[13] तापसी ते[14] तें ।
अद्भुत सत्व[15] तिचें धर्मा[16]! तितका नव्हताचि ताप सीतेतें. ॥ ३०
वेद श्वशुर श्वश्रूस्मृति, ती स्वाचारपद्धतीच[17] सती, ।
मुनि म्हणति या नृपाच्या उटजीं[18] सिद्धि[19] स्नुषामिषें[20] वसती. ॥ ३१

देवर्षीचें म्हणणें आहे. 'हे राजा! किंबहुना (फार काय सांगूं) आद्यसती ही (दक्षकन्या–पार्वती) स्वल्पातरि (थोडी कां होईना पण) वल्लभावज्ञा (वल्लभासाठीं पित्याची अवज्ञा) करी. दक्षयज्ञप्रसंगाला उद्देशून हा उल्लेख आहे. जर नवऱ्याकरितां आद्यसतीनें देखील आपल्या बापाची अवज्ञा केली तर आतांच्या मुली काय करणार नाहींत? तेव्हां फार काय सांगायाचें, हिला त्या वराला (सत्यवानाला) देऊन टाक. त्यांतच शोभा आहे. १९. गौरीही.

१. धर्माच्या कासेला लागणें=धर्माची कांस धरून चालणें; धर्मानुसारी वर्तन ठेवणें. २. कल्याण. ३. अहो. ४. येथें 'येतों' याचा 'जातों' असा अर्थ विवक्षित आहे. हें 'विपरीतलक्षणे'चें उदाहरण होय. कुंकू वाढलें, तांदुळ वाढले, बांगड्या वाढल्या इत्यादि उदाहरणें विपरीतलक्षणेचींच होत. [मागें पृष्ठ १३२ टीप १८ पहा. येथेंही विपरीतलक्षणेचें उदाहरण आहे.] ५. मृत्यूतें जिंकणारा. मृत्युंजय हें शिवाचें नांव आहे. ६. हो=होवो. ७. भगवंताची कीर्ति हीच थोर कामधेनु तिचें दोहन करणारा (धार काढणारा). ८. दोहनकर्ता. ['दुह्'धातूपासून दोहनकर्ता या अर्थी 'तृ'प्रत्यय लागून 'दोग्धा' आणि 'दुहिता' अशीं दोन रूपें होतात.] ९. यथाशास्त्र विवाह करून. १०. सत्यवानाच्या हातीं. ११. कन्या. १२. माझ्या नावांत जी 'त्री' आहे ती नसावी म्हणजे सावी असावी असें म्हणा म्हणजे माता, पिता, सासू, सासरा, पति, हे पांच खुशाल असले तर मी सावी (सहावी) हें तात्पर्य. त्रीरहित सावी (सहावी); [शब्दांवर केलेल्या कोट्या पंतांच्या काव्यांत क्वचित् आढळतात. अशी अन्य उदाहरणें:–(१) यन्नामीं **लक्ष्मा**च्या अंतीं **ण** प्रेमानें द्यावा संतीं. (सौम्यारामायण), (२) आधीं **भ** या वर्णापुढें यावे **रत** स्थापी असें (सूरारामायण), (३) **ण** पुढें मागें **रा** ज्या, तो राय कपीस भेटला वानी (मात्रारामायण), (४) यन्नामीं आधिं **त्रि** प्रांतीं **टा** हा **ज**कार त्यांमध्यें (दिव्यरामायण).] १३. वल्कल. १४. ती सावित्री. १५. बल, धैर्य. १६. हे धर्मा! १७. उत्तम आचरणाचा मार्ग, सदाचाराचा क्रम. १८. पर्णकुटींत. १९. आणिमादि आठ सिद्धि. २०. स्नुषेच्या मिषानें.

तो सत्यवान् म्हणे, 'हे [1]पितृराज्यश्री तपोवनांत पती ।
हो [2]आपन्मुक्त म्हणुनि बहुधा आपणहि [3]यामिषें [4]तपती.' ॥ ३२
[5]तत्सद्गुणें [6]प्रमुदितें झालीं केवळ मनांत न तिघें[7] तीं, ।
सकळें [8]सदेवतापसवृंदेंहि तपोवनांत [9]नति घेतीं. ॥ ३३
ती स्वमनांत म्हणे, 'तुज तनु रडविल सर्वकाळ, जीवा! हे, ।
सोड इला, वेड्या! बुध न कुसंगति धरुनि काळजी वाहे. ॥ ३४
[10]आध्यनलें [11]हृन्मणिकीं काळाचा [12]केवळ व्हावया शिजशी, ।
जीवा! [13]क्रिया सुटेना, केली जे प्राप्त व्हावयाशि जशी.' ॥ ३५
ऐसें चित्तीं बोले, मोजी [14]उरवरित दिवस महिने ती; ।
नसतें तसें, तरि सुखें वय भोगुनि तदधिक श्रमहि नेती. ॥ ३६
उरतां [15]चार दिवस ती [16]करी वांचाया पति [17]व्रतारंभा, ।
[18]तन्नियमीं [19]प्रियवाक् कीं शुकीं विलोकी न तीव्रता रंभा. ॥ ३७
श्वशुर म्हणे, 'त्रिदिनव्रत झालें कीं ? वंश धन्य केला, गे! ।
कर [20]पारणा, क्षुधा बहु पूर्ववयामाजि [21]कन्यके! लागे.' ॥ ३८

---

१. पित्याची राज्यलक्ष्मी. २. विपत्तीपासून मुक्त. ३. ह्या सावित्रीच्या रूपानें. ४. तप करते. ५. सावित्रीच्या उत्तम गुणांनीं. ६. आनंदित. ७. सासू, सासरा व नवरा. ८. देवांसह ऋषींचे समुदाय. ९. त्या साध्वीचे नमस्कार (नति) मोठ्या आनंदानें स्वीकारतात. नति घेतीं=नमस्कार घेणारीं (वृंदें). १०. मनोव्यथारूप अग्नीनें. ११. हृदयरूप मडक्यांत. १२. ग्रास. १३. कर्म. हे जीवा! तूं कर्ममुक्त व्हावयाचा नाहींस, जसें कर्म केलें असशील तसें कर्म अन्य जन्मीं प्राप्त होईल, पण तें सुटणार नाहीं. १४. उरलेले, शिल्लक राहिलेले. १५. अध्याय २९६ श्लोक ३ पहा. १६. सावित्रीनें त्रिरात्रव्रत (भोजनत्रयनिरोध) म्हणजे तीन दिवस उपोषण करण्याचें व्रत केलें. १७. व्रताच्या प्रारंभा. १८. त्या व्रताच्या नियमांत. १९. आपल्या पतीच्या मरणास चार दिवस राहिले तेव्हां सावित्रीनें उपोषणरूप व्रतास आरंभ केला. मनुष्य उपोषित असलें म्हणजे फार कावतें, तापून उग्र होतें, पण सावित्री हें व्रत आचरीत असतां तापून गेली नव्हती, तर प्रियवाक् होती–शांतचित्त व मधुर भाषण करणारी होती–तिच्या ठायीं व्रतनियमांनीं तीव्रता (उग्रता) आली नव्हती. एवढा मोठा तपोराशि शुक पण त्याच्या ठिकाणीं जशी रंभेला तीव्रता दिसली नाहीं तशी इजमध्येंही तीव्रता दिसली नाहीं. येथें 'प्रियवाक्' हें सावित्रीचें विशेषण आहे. या पद्याचा असा अर्थ कोणी कोणी करतात. दुसरा अर्थ पुढें दिला आहे, त्यांत 'प्रियवाक्' हें रंभेचें विशेषण जाणावें. तन्नियमीं [जी] तीव्रता [होती] ती प्रियवाक् (मधुर भाषण करणारी) रंभा शुकींही न विलोकी. त्या व्रतनियमांत सावित्रीनें जितकी तीव्रता (उग्रता, सख्ती, संगिनी) धरिली होती तितकी श्रीशुकानें धरिली नव्हती असें प्रियवाक् रंभेला (अप्सरेला) आढळलें. २०. व्रताचरणाच्या शेवटींचें भोजन. २१. अध्याय २९६ श्लोक १६ पहा.

ती 'संकल्पीं आम्हे सूर्यास्तीं पारणा[1] करायाची' ।
ऐसें श्वशुरश्वश्रूचरणांतें जोडुनी करा याची[2]. ॥ ३९
फलमूलार्थ[3] निघे पति त्यासि म्हणे, 'मजहि सत्तमा[4]! न्या, हो[5]. ।
वन पाहेन, तुम्हां हे न प्रथम प्रार्थना अमान्या हो[6]'. ॥ ४०
चित्राश्व[7] म्हणे, 'दयिते[8]! गमली वनसरणि[9] काय कोमळ ती? ।
श्रमशिल, शिबिकास्थाही[10] दुर्गवनपथांत[11] बायको मळती[12]. ॥ ४१
उपवास तीं दिसांचा, तूं आधींच प्रिये! सुमृदुला[13], गे! ।
न्यावें कसें? चरणयुग नवनीतापरिसही सुमृदु लागे. ॥ ४२
मज सोसेल कशी? जी न पाहवे स्त्रीव्यथा नरा नीचा[14], ।
श्रमदा[15] प्रमदाहृदया कथितीहि कवी कथा न रानींच्या. ॥ ४३
येणारचि तरि साध्वी! श्वश्रूश्वशुरांसि पूस, मग ये, तें ।
योग्य तुज मजहि, मानिति गुर्वाज्ञाधिक[16] सुबुद्धि न गयेतें[17].' ॥ ४४
सावित्री त्यांच्याही आज्ञेतें तत्प्रसाद साधुनि घे; ।
उटजांतूनि सतीसह वंदुनि तो स्वपितृपाद[18] साधु निघे. ॥ ४५
[19]ती न स्त्री रक्षाया त्यांसि[20] निघे आत्तमूर्ति[21] जनकाशी[22], ।
परमशिव [23]जींत नांदे म्हणुनी जिला[24] म्हणति सुज्ञजन काशी. ॥ ४६

---

१. व्रतान्तभोजन. २. प्रार्थी, विनंति करी. ३. फलें मूलें आणण्याकरितां. ४. साधुवर्य. [सत्तम=साधूंत श्रेष्ठ. दोन पदार्थांतील आणि बहुत पदार्थांतील आधिक्य विशेषणानें दाखवावयाचें असल्यास अनुक्रमें तर, ईयस् आणि तम, इष्ठ हे प्रत्यय विशेषणास लावून दाखवितात. जसें युवन्–युवतर, यवीयस् (अधिक तरुण), बलवत्–बलवत्तर, बलीयस् (अधिक बळी,) युवतम, यविष्ठ (सर्वांत तरुण), पूज्यतर, पूज्यतम, सुहृत्तम असे शब्द कवितेंत फार येतात.] ५. अहो. ६. हो=व्हावी, होवो. ७. सत्यवान्. ८. देवी. [भर्त्यानें स्वपत्नीला देवि दयिते असें संबोधनपूर्वक आव्हान करावें.] ९. वनमार्ग. १०. पालखींत बसलेली. ११. अरण्यांतील दुर्गम अशा मार्गांत. १२. दुःख पावते, क्लेश पावते. १३. फार नाजूक. १४. अधम अशा. १५. दुःखदायक, प्रमदाहृदया रानींच्या श्रमदा कथा कवी कथितीहि न—असा अन्वय. बायकोच्या मनाला श्रम देणाऱ्या अरण्यसंबंधी कथा देखील कवि (शाहणा मनुष्य) सांगत नाहींत, तर मग शाहणा मनुष्य बायकांस रानांत कसा घेऊन जाईल? जाणार नाहीं. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १६. गुरूच्या आज्ञेहून अधिक. १७. गयाक्षेत्राला. १८. आपल्या बापाचे चरण. १९. येथें स्त्रीवर जनकाशीचा आरोप करण्यासाठीं स्त्रीत्वाचा अपलाप केला आहे म्हणून हा अपन्हुति नामक अलंकार होय. २०. सत्यवानास. २१. मूर्तिमती, देहधारिणी. (आत्त+मूर्ति=धृत, स्वीकृत+शरीर.) २२. पित्याचा आशीर्वाद. २३. ज्या आशींत. २४. ज्या आशीला.

जे पक्षी जे [1]श्वापदसंघ [2]अधिष्ठूनि [3]कानना वसती, ।
त्यांचें [4]तद्वचनामृतपानार्थ पुसेल कां न [5]नांव सती ? ॥ ४७
पात्र भरूनि फळांनीं काष्ठें [6]फोडी वनांत, [7]सत्वरतें ।
पाहूनि [8]तत्कलत्रें स्मरलें [9]मुनिवच मनांत सत्वर तें. ॥ ४८
जों साध्वी हळुच म्हणे, 'हा नाथा! [10]नियतमानदा! रुचिरा ।
मूर्ति श्रमत्ये भ्रमत्ये मति कीं जी प्रियतमा न [11]दारु [12]चिरीं.' ॥ ४९
तोंचि [13]म्हणे [14]तो, 'उठल्या करित्या [15]स्मृतिहानि वेदना, लागे ।
[16]शूलशत शिरीं, जाणों सखि! [17]अक्षम [18]हा निवेदनाला, गे! ॥ ५०
तुझिया [19]मृदुशीतांकीं शिर ठेवुनि वाटतें निजावें, गे! ।
त्वत्स्पर्श अमृत म्हणउनि या [20]मत्तापें पळोनि जावें, गे!' ॥ ५१
मांडी देउनि पतिचें मस्तक हस्तकमळें [21]सुधी रगडी, ।
दे धैर्य सतीस तिचा निजनिश्चय जो खरा सुधीर गडी. ॥ ५२
सीता दशकंठा जसि, तशि सत्त्वें [22]भी न तीव्रतापा हे; ।
तों [23]पाशपाणिपुरुषाप्रति पतिपार्श्वीं [24]पतिव्रता पाहे. ॥ ५३

---

१. पशुसमुदाय. २. आश्रय करून. (अधि+स्था=आश्रय करणें. 'स्था' हा धातु 'अधि' उपसर्गाच्या योगें सकर्मक होतो. अधिष्ठूनि=अधिष्ठाय. 'अधिशीङ्स्थासां कर्म' १।४।४६ या सूत्रानें 'स्था' सकर्मक होतो. 'अधिष्ठूनि' हें रूप पंतांच्या काव्यांत अन्यत्रही आढळतें. जसें 'प्रभु मुनिसुतासि न म्हणे काय अधिष्ठुनि पयोधितीरा धा'—सन्मनोरथराजि—गीति २१.) ३. अरण्याला. येथें 'कानना' ही द्वितीया आहे. 'स्था'च्या पूर्वी 'अधि' उपसर्गाचा योग झाला नसता तर 'काननीं' असें सप्तम्यंत रूप योजणें जरूर होतें. ४. त्या सत्यवानाच्या वचनरूप अमृताच्या प्राशनार्थ. ५. त्या सत्यवानाला बोलवावें या हेतूनें त्यांचें (पशु पक्षी वगैरेंचें) नांव ती सती (सावित्री) कां न पुसेल ? पुसेलच. सावित्री कांहीं ना कांहीं विचारून सत्यवानाला बोलवीत असे. ६. सत्यवान् या कर्तृपदाचा येथें अध्याहार केला आहे. ७. धैर्यशीलें (कलत्रें). ८. सावित्रीनें. ९. नारदाचें वचन. अध्याय २९६ श्लोक ३२ पहा. १०. निश्चयेंकरून (माझ्या वचनास) मान देणाऱ्या, माझें वचन कधीं न मोडणाऱ्या. ११. काष्ठ. १२. येथें ४९-५० या पद्यांचें युग्म जाणावें. 'हा नियतमानदा नाथा! [तुमची] रुचिरा (सुंदर) मूर्ति श्रमत्ये भ्रमत्ये कीं (या करितां) जी! (अहो!) प्रियतमा! दारु (लांकुड) न चिरा (चिरूं नका)' असें सावित्री जों म्हणे 'तोंचि म्हणे तो' इत्यादि. १३. अध्याय २९७ श्लोक ३-५ पहा. १४. सत्यवान्. १५. स्मरण नाहींसें करणाऱ्या अशा वेदना उठल्या. १६. शंभर शूल मस्तकाला लागतात, टोंचतात. १७. असमर्थ. १८. हा मी सत्यवान्. १९. मृदु+शीत+अंकीं=कोमल+शीतल+मांडीवर. २०. माझ्या संतापें, शिरोवेदनेनें, मस्तकशूलानें. २१. उत्तम बुद्धिमान्. २२. भय पावे. २३. पाश आहेत हातीं ज्याच्या अशा पुरुषाला, यमाला. (अध्याय २९७ श्लोक ९-१० पहा.) २४. पति हेंच व्रत जिचें ती पतिव्रता. पतिव्रतेचें लक्षण:—'आर्तार्ते मुदिते हृष्टा प्रोषिते मलिना कृशा । मृते म्रियेत या पत्यौ सा स्त्री ज्ञेया पतिव्रता ॥.'

क्षितिवरि पतिशिर उतरुनि, सविनय झडकरि उठोनि, कर जोडी, ।
नमुनि म्हणे, 'देव! तुम्हीं, अशि कैंची अन्यदर्शनीं गोडी? ॥ ९४
केलेंचि धन्य[1] दर्शनदानें[2], येवूनि कानना, मातें, ।
अजि देवेश! निवावे बहु हे सेवूनि कान नामातें[3].' ॥ ९५
देव म्हणे[4], 'सति[5]! यम मी,' 'कां आला?' 'न्यावया तुझ्या पतितें,' ।
'हें दूतकार्य कीं जी' 'जें सेवककृत्य वेगळें सति! तें. ॥ ९६
हा सत्यवान् सुकृतवान् गुणवान् न्यावा न सेवकानीं[6] कीं, ।
ज्या कर्मी योग्यत्व स्वामीचें तें न सेवकानीकीं[7].' ॥ ९७
अंगुष्ठमात्रपुरुषाप्रति[8] यम पाशेंकरूनि आकर्षी, ।
तैं 'हाय! हाय!' म्हणती बहु सद्गदकंठ साश्रु[9] नाकर्षी[10]. ॥ ९८
त्यातें बांधुनि घेउनि यमधर्म प्रभु निघे अवाचीतें[11], ।
भ्याला सतीस बहुधा, जें ब्रह्मलिखित बरें न वाची तें. ॥ ९९
त्यामागें तीहि निघे धर्म म्हणे[12], 'भागलीस, जा परत; ।

---

१. श्लाघ्यजीवित. २. दर्शन देऊन. ३. हें उत्तरार्ध पर्यायोक्त नामक अलंकाराचें उदाहरण होय. जेथें कोणत्याही पदार्थाचें कथन रूपांतरानें अथवा पर्यायानें वळसा घेऊन केलें असतें तेथें पर्यायोक्त अलंकार होतो. या उत्तरार्धांत 'तुमचें नांव सांगा' असें सरळ न विचारतां वळसा घेऊन 'अजि देवेश! (आपल्या) नामातें सेवूनि हे कान बहु निवावे' असें विचारलें आहे म्हणून हा 'पर्यायोक्त' अलंकार होय. 'रामाला नमस्कार असो' असें न म्हणतां 'सापत्नबंधुस्नुषाशापदग्धरक्षोगणाधिपांतकाला नमस्कार असो' असें वळसा घेऊन म्हटलें असतां पर्यायोक्ति होते. या अलंकाराचें सुप्रसिद्ध उदाहरण म्हटलें तर 'अलिकुलवहनाच्या वाहना नेत होतें, शशिधरवहनानें लोटिलें मार्गपंथें । नदिपतिरपु त्याचा तात भंगोनि गेला, रविसुत महिसंगें फार दुःखीत झाला ॥' हा श्लोक होय. तसेंच 'त्वद्बंधूंचीं झालीं युगपत् शून्योत्सवें महा गेहें' (विराटपर्व—अध्याय १ गीति १७८ पहा.) ४. अध्याय २९७ श्लोक १२-१६ पहा. ५. देव (यम) म्हणे 'सति! (हे सावित्रि!) मीं यम [आहें]. [सावित्री म्हणते] 'कां आलां?' [यम उत्तर देतो] 'तुझ्या पतितें (सत्यवानातें) न्यावया [आलों.]' [सावित्री प्रत्युत्तर] 'जी! (आर्य! महाराज!) 'हें कीं (तर) दूतकार्य' (हें तर दूताचें काम, तुमचें नव्हे). (यमाचें उत्तर) 'सति! जें सेवककृत्य तें वेगळें (अन्य) [आहे].' याप्रमाणें या पद्यांत प्रश्नोत्तरें आहेत. ६. 'हा सत्यवान् [इतका] सुकृतवान् [आणि] गुणवान् [आहे] कीं सेवकांनीं न न्यावा'—असा अन्वय. ७. सेवकसमुदायीं, चाकरांच्या मंडळींत. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ८. सूक्ष्मशरीरवान् अशा पुरुषाला. हृदयाकाशांत असणाऱ्या अल्पप्रमाण पुरुषाला (आत्म्याला). ९. रोदनयुक्त. १०. स्वर्गस्थ ऋषि. ११. दक्षिणदिशेतें. [अवाची=दक्षिणदिशा; उदीची=उत्तरदिशा; प्रतीची=पश्चिमदिशा; प्राची=पूर्वदिशा. हे शब्द 'अच्' धातूपासून उत्पन्न झालेले आहेत.] १२. अध्याय २९७ श्लोक २० पहा.

[1]स्नेहऋण फेडिलें त्वां, करुनि [2]स्वपतिक्रिया, रहा स्मरत.' ॥ ६०
साध्वी म्हणे, 'प्रभो! पति जिकडे जावीच मूर्ति हे तिकडे, ।
[3]स्वगुरुव्रतप्रसादें [4]मद्गतिसि न रोधितील [5]हेति [6]कडे. ॥ ६१
[7]संत म्हणति [8]सप्तपदें सहवासें सख्य साधुशीं घडतें, ।
[9]सन्मित्रचि न व्यसनीं अन्याखिलमित्र संकटीं पडतें. ॥ ६२
तुज संत म्हणति पितृ[10]पति [11]समवर्ती [12]धर्मराज बापा! हें, ।
सत्य यश, म्हणुनि याही [13]कन्येसि दया करूनि बा! पाहें.' ॥ ६३
ऐसें सती वदे; तो [14]बोल शशी देव, [15]तोहि सागरसा ।
प्रेमें [16]उचंबळे, हो! धरि कारुण्यें द्रवासि [17]सांग [18]रसा. ॥ ६४
[19]धर्म [20]म्हणे, 'साध्वी! बहु श्रमलीस; स्वाश्रमासि जा [21]मागें; ।
जो मागशील तो वर देतों, घे, इष्ट तें मला मागें.' ॥ ६५
'देवा! व्हावे [22]चक्षुस्तेज:संपन्न आश्रमामाजी ।
[23]मामाजी ऐसें द्या, मति साहेनाचि त्या श्रमा [24]माजी.' ॥ ६६

---

१. येथें संधि वैकल्पिक असल्यामुळें केला नाहीं. २. आपल्या भर्त्याचें उत्तरकार्य, और्ध्वदेहिकक्रिया. ५. स्व+गुरु+व्रत+प्रसादें=आपल्या (माझ्या)+पितर+नियम+कृपेनें, माझ्या वडिलांच्या आणि व्रतांच्या सामर्थ्यानें. ४. माझ्या गमनाला. ५. शस्त्रें. ६. डोंगराचे कडे. ७. तत्त्वार्थदर्शी बुध. ८. सात पदांनीं. [सात शब्द एकमेकाशीं बोलल्यानें अथवा सात पावलें बरोबर चालून गेल्यानें मित्रता होते म्हणून मित्रतेला साप्तपद, किंवा साप्तपदीन असें विशेषण लावतात. साप्तपद किंवा साप्तपदीन म्हणजे मित्रत्व असाही अर्थ आहे. अध्याय २९७ श्लोक २३; कुमारसंभव सर्ग ५ श्लोक ३९ पहा.] ९. जो साधूंचा मित्र आहे तो संकटांत पडत नाहीं, त्यांवांचून इतर सर्व ज्याचे मित्र आहेत असा मनुष्य संकटांत पडतो. १०. पितरांचा पति. (यम.) ११. सर्वांस समदृष्टीनें पाहणारा. १२. यमधर्माला 'पितृपति' आणि 'समवर्ती' अशीं नांवें अमरकोशांत आहेत ['धर्मराजः पितृपतिः समवर्ती परेतराट्' इत्यमरः.] १३. याही कन्येसि=या मला सावित्रीला. १४. तो तिचा बोल (भाषण) चंद्रदेव होय. १५. तो यमराज समुद्रासारखा. [चंद्राच्या योगें समुद्रास भरती येते—ही गोष्ट आमच्या प्राचीन कवींसही माहीत होती.—रघुवंश सर्ग ७ श्लोक १९, सर्ग ३ श्लोक १७ पहा.] १६. सावित्रीच्या वचोमृतांशूनें यमसागरास प्रेमाचें भरतें आलें. १७. सहपर्वत. [स+अग=सह+पर्वत.] १८. पृथ्वी. सर्वाला करुणा आली—असा भावार्थ. १९. यम. २०. अध्याय २९७ श्लोक २६ पहा. २१. पाठीमागें. २२. नेत्रांच्या तेजानें युक्त. २३. हें सावित्रीचें भाषण. २४. माझी. प्रासासाठीं कवि कधीं कधीं झच्या स्थानीं एकांशीं सवर्ण जो **ज** त्याचा आदेश करतात—जसें माझी=माजी, माझें=माजें, माझे=माजे, तुझा=तुजा, इत्यादि. पंताच्या काव्यांत देखील अशीं स्थळें आढळतात. (१) दावाया सैरंध्रीप्रति हें मति वरिल केंवि मुख **माजी** (विराटपर्व—३-५३), (२) सेवुनि वांचेल कसी म्हणत्या गुरुस प्रजा गरा **माजी** (उद्योगपर्व—३-७८), (३) तें न स्मरे न

'दिधलें' **धर्म** म्हणे, परि जातचि होती तशीच मागूनी[1]. ।
देव म्हणे पुनरपि, 'जा वत्से! घे वर दुजाहि मागूनी.' ॥ ६७
ती सुमति म्हणे, 'राज्यभ्रंशें बहु खिन्न सासुरा होतो, ।
पावुनि भवत्प्रसादें[2] निजपद बहुकाळ सासु[3] राहो तो.' ॥ ६८
'होइल जा' **धर्म** म्हणे, परि करि अनुगमन[4] सबहुमान सती; ।
कीं जी हंसी हंसावांचुनि मानील न बहु **मा**नस[5] ती? ॥ ६९
पुनरपि मार्गीं काढी जें धर्मरहस्य जेंवि नवपुसती[6],. ।
तें होय वशीकरणचि[7], कीं भासों दे तयाशि न वपु सती[8]. ॥ ७०
धर्म म्हणे, 'गे बाई! करिसी कां व्यर्थ या श्रमास? तिजा[10] ।
वर घे, नकोचि भागों, आलीस सुदूर, आश्रमा, सति! जा.' ॥ ७१
त्यासि म्हणे **सा**वित्री, 'संपन्न असो पिता सुतनयशतें[11].' ।
हा लक्ष्मीसुतकवि[12] किति[13]? लिहिल सतीचें उमासुत[14] न यश तें.॥ ७२

तुमच्या वनवासालाहि चित्त भी **माजें** (उद्योगपर्व–१०-५१), (४) होइल कसा स्वपरिभव सांगा साहित्य होय हें **माजें** (भीष्मपर्व–१-७७), (५) मज जिंकिलें नदीजें न चले बळ यापुढें तिळहि **माजें** (उद्योगपर्व–१३-१७८), (६) पुत्री म्हणोनि नारद मुनि कळविति तेंचि चर मला **माजे** (उद्योगपर्व–१३-१९६), (७) चिंता करी बहु म्हणे कोण निवारील शाप हा **माजा** (आदिपर्व–२-६), (८) होतों ब्राह्मणसुत मी मन्नाम सहस्रपात् सखा **माजा** (आदिपर्व–३-५०), (९) बा! सांगे मज, नेली कोणिकडे राक्षसी प्रिया **माजी** (बालमंत्ररामायण–४-१३), (१०) सीतेला अवलोकुनि, झाली हे दृष्टि निर्मला **माजी** (मंत्ररामायण–५-११९).

१. पाठीमागून. २. तुमच्या कृपेनें. [भवत् हें संस्कृतांत सर्वनाम आहे.] ३. सप्राण. ४. पाठीमागून जाणें. ५. मानस नामक सुप्रसिद्ध सरोवर. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ६. नवीन लिहिलेलें अक्षर, ज्यास 'पुस्ती' असें म्हणतात. ७. दुसऱ्याचें मन वश करून घेण्याचा उपाय. ओषधी, मंत्र, तंत्र, सेवा इत्यादिद्वारा वश करण्याचें साधन. ८. तयासि वपु न भासों दे=त्याचें देहभान नाहींसें करी. (नवनीत.) ९. यमाचें मन दुसरीकडे नेण्यासाठीं सावित्री कांहीं धर्मरहस्य (धर्माच्या गोष्टी) काढी. त्या गोष्टी मुलानें एकादी पुसती (पुस्ती) काढावी तशा होत्या–म्हणजे यमापुढें सावित्री धर्मरहस्यपर कायसें बोलणार? अर्थात् मुलाच्या पुस्तीप्रमाणें कोवळें सटर फटर बोलणें होतें; परंतु तें स्त्रीचें लाडकें भाषण ऐकून यम इतका मोहित जाहला कीं तें वशीकरणच झालें; त्यानें यम इतका वश केला कीं यमास मीं कोण, किमर्थ आलों, काय करितों, हें भानच उरलें नाहीं. सारांश सावित्रीच्या धर्मरहस्यनिमित्तक गोड भाषणानें यम यमत्व विसरला. १०. तिसरा. ११. उत्तम शंभर पुत्रांनीं. १२. हा मयूरकवि. [लक्ष्मी हें पंताच्या मातेचें नांव. पंतांनीं आपल्या मातापितरांविषयीं आपल्या काव्यांत कोठें कोठें उल्लेख केला आहे. जसें:—'धन्य **श्रीराम** पिता, धन्या **लक्ष्मी** प्रसू जगीं झाली'–स्वर्गारोहणपर्व २-४२. तसेंच 'महद्विज्ञापना' गीति १४४

उडुपा[1] उडुसें[2] धर्मौदार्या[3] लाजोनि अभ्र[4] मुरडे, हो! ।
सावित्रीच्या सुयशीं न दिसे पति म्हणुनि अभ्रमु[5] रडे हो ! ॥ ७३
ऐसें शिरोनि चित्तीं, घेउनि भारीहि तीन वर, देवा[6] ।
सोडीना, सोडविल्यावांचुनियां ती सती नवरदेवा[7]. ॥ ७४
देव म्हणे[8], 'तूं स्वच्छा स्वच्छायाशीच मागतीं, सति! घे. ।
वर घेउनि जा चवथा, देतों मागोनि मागतीस तिघे[9].' ॥ ७५
नमुनि म्हणे ती वरदा[10], 'तुजला[11] अति भार न चवथा, न पित्या, ।
स्वरगा[12] आधि सुरभिचें भागे द्यायाशि न चव थान पित्यां[13]. ॥ ७६
ऱ्हा[14] सुप्रसन्न, 'वत्से! तुज हो सुतशत' असें वदा, न्या हो[15] ! ।
सुयशोराशि स्वर्गीं लज्जाप्रद सुरनगा वदान्या[16] हो.' ॥ ७७

पद्य. १३. मीं हा यशोवर्णन करण्यास किती समर्थ–अर्थात् समर्थ नाहीं. ['कोणताही कार्याविषयीं असामर्थ्य दाखवायाचें असतां **किती** या शब्दाचा प्रयोग व्यवहारी भाषणांत फार आढळतो. उदाहरण:—'तुम्ही असे धुरंधर त्या कामांत असतां मी किती' म्हणजे 'माझी कथा काय.'] (यशोदा पांडुरंगी–पृष्ठ २१२ पद्य.) १४. गणपती.

१. चंद्रास. २. नक्षत्रसें. ३. यमाच्या औदार्यास. उत्तरार्ध–सावित्रीच्या अतिशुभ्र यशानें विश्व इतकें भरून गेलें होतें कीं अभ्रमूचा पति ऐरावत हा अत्यंत शुभ्र असल्यामुळें त्या यशांत बुडून कोठें दिसेनासा झाला, तेव्हां ती रडूं लागली. तात्पर्य, सावित्रीचें यश अगदीं निर्मल असून साऱ्या त्रैलोक्यांत भरलें होतें. यशाचा वर्ण शुभ्र आहे असें कवि मानितात. (नवनीत–पृष्ठ २४७.) ४. मेघ. ५. ऐरावताची स्त्री. ६. यमधर्माला. ७. नवऱ्याला, सत्यवानाला. ८. देव (यम) म्हणे, तूं स्वच्छा [पापरहिता] (व) स्वच्छायाशीच (माझ्या–सावलीप्रमाणें) मागतीं (मागें) [येत आहेस] (म्हणून) (हे) सति! (साध्वि!) तिघे (तीन) वर मागोनि (ही–मागून घेऊनही) चवथा मागतीस (याचना करतेस तर) देतों घे, घेऊनि जा. (नवनीत.) ९. तिघे=पूर्वींचे जे तीन ते (घे). १०. वर देणाऱ्या यमाला. ११. सावित्री नमस्कारपूर्वक यमाला म्हणते:—[हे] पित्या! (बापा! यमा!) तुजला चवथा [वर देणें हें] अतिभार (फारसें जड) न (नाहीं). [हे पित्या!] न. (खचीत पित्याला–बापाला–तर हें कांहीं जड नाहीं). स्वरगा (कल्पतरूला) आधि न [कोणाला कांहीं द्यावयाचें असलें तर कल्पवृक्षाला म्हणून] (काळजी नाहीं) [तसेंच] सुरभिचें थान पित्या (पिणाऱ्यास) चव (रुचि–गोडी) द्यायाशि भागेन. (कामधेनूचें थान पिणाऱ्यास दुग्ध द्यावयास कधीं भागत नाहीं) [तसा तूं केवळ कल्पवृक्षाप्रमाणें अथवा कामधेनूसारखा वरद आहेस, त्या अर्थीं चवथा वर देणें तुला जड नाहीं]. १२. कल्पतरूला. १३. प्राशनकर्त्यांस. (वत्सास.) १४. सावित्री आणखी म्हणते:— '[अहो यमा!] ऱ्हा सुप्रसन्न [आणि] 'वत्से! सुतशत हो' असें वदा; सुयशोराशि स्वर्गीं न्या हो, [जो सुयशोराशि] वदान्या (उदार) सुरनगा (कल्पवृक्षांला) लज्जाप्रद हो (होवो.)' १५. अहो. १६. दात्यांस.

भुलला धर्म द्युतिला धृतिला मतिला तिच्या तथा स्तुतिला, ।
न करुनि विचार, जावी मागें म्हणउनि, म्हणे 'तथास्तु' तिला. ॥७८
हळुचि म्हणे सावित्री, 'पावेन वरें करूनि संततिला, ।
तुमचा प्रसाद म्हणुनि प्रेमें गातील सर्व संत तिला. ॥ ७९
तरि मत्पति मज द्या कीं तुमची पावेल मान सत्या गी, ।
यश रक्षाया प्राणहि सत्यगुणासक्तमानस त्यागी.' ॥ ८०
रोमांचित धर्म म्हणे, 'बाई! गातिल तुझा प्रभाव सती, ।
पतिशीं अविनाभावें वसशिल, रविशीं जसी प्रभा वसती. ॥ ८१
राज्य चतुःशत वत्सर करिल तुझा कांत, सोडिला, जा, गे! ।
हा त्वन्महिमा जागो, सीतेनें जेंवि जोडिला जागे'. ॥ ८२
तें वृत्त वर्तमान स्वल्पहि न तिच्या कळेवरा पाशीं, ।
जातां यम, सावित्री धांवत आली कळेवरापाशीं. ॥ ८३
पुनरपि तशीच बसली अंकीं घेऊनियां स्वपतिशिर ती; ।
जशि चेतना धवांगीं होय, इची जीवितांत मति शिरती. ॥ ८४
वनदेवता म्हणति त्या, 'बा! गा! मूर्च्छोत्थिता चकोरा! हो ।
स्वस्थ, ज्योत्स्ना कीं हे, द्रुत उठचि, नमावया नको राहो.' ॥ ८५
नेत्रें उघडुनि पाहे तो दयितेच्या मुखासचि वनीं, ती ।
दे त्यासि, जैसि नृपासि व्यसनीं देती सुखा, सचिवनीती.' ॥ ८६
स्त्रीस म्हणे; 'सुभगे! त्वां मृदु मांडी मांडिली उशी, रमला ।
आत्मा निद्रेशीं, रवि मावळला, लागला उशीर मला. ॥ ८७

१. कांतीला. २. धैर्याला. ३. या अर्धांत 'तिला' या अक्षरद्वयाची आवृत्ति वारंवार झाली आहे म्हणून हा अनुप्रासालंकार होय. ४. तसें असो. 'तुला पुत्रशत असो' असें ध्वनित. ५. अशा साठीं कीं. ६. वाणी. (तुमची सत्य वाणी मान पावेल.) ७. सत्यावर ज्याचें मानस (मन) आसक्त (रत) आहे तो. ८. सोडितो. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. अखंड स्थितीनें, वियोग न होतां. (विनाभाव=वियोग.) १०. राहते. ११. अध्याय २९७ श्लोक ५६-६० पहा. १२. तुझा थोरपणा लोकांत जागृत असो. १३. निद्रित न राहो, जागरूक असो. १४. झालेलें व होत असलेलें वृत्त. १५. पाशांत असतां. १६. शरीरापाशीं, प्रेताजवळ (अध्याय २९७ श्लोक ६२ पहा.) १७. संज्ञा, जीवनकला. १८. पतीच्या अंगीं. १९. होई, भासमान होई. २०. सावित्रीच्या जीवांत जीव आला—असा भाव. २१. मूर्च्छा जाऊन शुद्धीवर आलेला अशा. २२. चंद्रिका, चांदणें. २३. ही सावित्री. २४. चंद्रिकेला नमस्कार केल्याशिवाय राहूं नको. २५. हा उपमालंकार जाणावा. २६. अमात्यांनीं सांगितलेली चांगली मसलत. २७. हे सुंदरि, प्रिये.

पुरुष [1]श्याम [2]महौजा ओढित होता बळेंचि मज़ला जो, ।
तो कोण, पुसेन तया, नसतां [3]स्वप्नोत्तमर्ण मज, [4]लाजो.' ॥ ८८

'कथिन उद्यां, झाली बहु रात्रि, बळ असेल तरि उठा, राया! ।
देत्यें [5]हात, चला, जी! घेत्यें [6]फळभाजना [7]कुठारा या.' ॥ ८९

नेत्रें पुसोनि पदरें पतिस म्हणे, 'भेटतील मामाजी, ।
'आई!' म्हणतां रडतां पडतां दाटून कां श्रमामाजी? ॥ ९०

भेटवित्यें ताताला मातेला, या, उठा.' असें वदली, ।
आली घेउनि; अद्भुत वाटे [8]कलभासि सांवरी [9]कदली. ॥ ९१

[10]ये स्नेहहंस जाणों ईप्रति सोडुनि तदीय मातेला, ।
कीं दूर वाहवुनि ने ती [11]सत्वमहानदी यमा तेला. ॥ ९२

आला प्रकाश नेत्रीं, अंधत्वाचा [12]नुरे [13]गंध. ।
परि भूप [14]पुत्रमोहें केला [15]पहिल्यापरीसही अंध. ॥ ९३

---

१. काळा. अध्याय २९७ श्लोक ६५ पहा. २. महातेजस्वी. [ओजस्=तेजस्.] ३. स्वप्नांतलाही सावकार. [उत्तमर्ण=धनको, अधमर्ण=रिणको.] ४. सत्यवान् सजीव झाल्यावर सावित्रीस म्हणतो:—[जसा कोणी निर्दय सावकार आपल्यास कुळास ओढतो तसा] एक काळा महातेजस्वी पुरुष मला जबरीनें ओढीत होता तो कोण? मला तर स्वप्नांत देखील कोणी सावकार (उत्तमर्ण) नाहीं. मी कोणाचें कांहीं देणें नसतां जो मला ओढीत होता त्याला मी पुसेन. [मी विचारल्यावर] हा आपलें कुळ नव्हे, यास आपण व्यर्थ ओढिलें असें जाणून तो ओढणारा पुरुष लाजो, त्या पुरुषाला माझी लाज वाटो—असा भावार्थ. ५. उठावयास शक्ति नसेल तर माझा हात धरा आणि उठा. ६. पांटी. ७. कुऱ्हाड. [हें सावित्रीचें भाषण आहे.] ८. गजशिशूस. ९. केळ. १०. यांत उत्प्रेक्षा आहे. 'जाणों (असें वाटतें कीं) [हा] स्नेहहंस (प्रेमरूप, अनुरागरूप हंस; पक्षीं—सत्यवान्) तदीय (स्वकीय) मातेला (मानससरसीला—पक्षीं—जननीला) सोडूनि (टाकून—आपल्या जन्मदात्रीकडे जाण्याचें टाकून) ईप्रति (महानदीप्रति—पक्षीं—सावित्रीप्रति) ये. [सत्यवानाचें प्रेम मातेपेक्षां पत्नीवर ज्यास्त होतें म्हणून तो मातेकडे न जातां पत्नीकडेच वळला.] असें करण्याचें कारण:—ती सत्वाची (लोकोत्तरधैर्यशालिनी सावित्रीरूपिणी) महानदी (या नांवाची प्रख्यात नदी) यमा तेला (यमरूपी तेलाला) दूर वाहवुनि ने. ज्याप्रमाणें महानदी (उत्कलदेशीय आणि वंगदेशीय स्त्री-पुरुषांच्या स्नानानें प्राप्त झालेलें) तेल दूर वाहून नेते, त्याप्रमाणें सत्वाढ्या सावित्रीनें यमाला दूर नेऊन घालवून दिलें म्हणून सत्यवानाचा स्नेहहंस स्वमातेकडे न जातां यमापासून आपली मुक्तता करणारी जी सत्वमहानदी (सावित्री) तिजकडे आला. [हें आख्यान लिहीत असतां पंत जगन्नाथाकडे आले असावे आणि तेथील बायका, पुरुष, मुलें सर्वांगास चबचबीत तेल लावून महानदींत स्नान करतात ही वस्तुस्थिति त्यांच्या डोळ्यांपुढें असावी.] ११. हें अवधारणापूर्वपद कर्मधारयसमासाचें उदाहरण आहे. जसें—विद्याधन, भवसागर, काव्यामृत, इत्यादि. १२. न उरे=न राही. १३. लेश. ('गंधः संबंधलेशयोः । गंधकामोदगर्वेषु' इति हैमः.) १४. पुत्रशोकानें. १५. ही अतिशयोक्ति होय.

त्याला म्हणती[1] गौतम दाल्भ्य भरद्वाज धौम्य तापस[2], 'हा ।
बा ! गा ! उगा, मुहूर्तप्रस्थित[3] दुर्दैवदत्त[4] ताप सहा. ॥ ९४
सावित्री शुभलक्षणगुणसंपन्ना[5] महासती, बा ! हे. ।
जी जी साध्वी स्वधवानुमतें[6] द्वास्था[7] महास[8] ती बाहे[9]. ॥ ९५

वाखाणिति बहु पाहति मुनिदारहि[10] भासुरव्रत[11] तिला जे[12], ।
साध्वीच देवता ही, साध्वीला बा ! सुरव्रतति[13] लाजे. ॥ ९६
शोकें रडतां डोळे जावे, गेले कधीं न यावे, गा ! ।
दिसतें कल्याण पुढें, होऊंचि नको अधीन[14] या वेगीं[15].' ॥ ९७
ऐसें समजाविति त्या राजाला जों दयापर[16] महर्षी[17], ।
तों झाले, अवलोकुनि सावित्रीसह तया[18], परम हर्षी. ॥ ९८
मुनि म्हणती, 'हा[19] आला, नेत्रें उघडुनि, पहा, सदारा[20] या, ।
मोठा भाग्याचा तूं, प्रमुदित[21] यांसह रहा सदा, राया ! ॥ ९९
दे आलिंगन, अंकीं घे, मस्तकपद्म[22] हुंग, वाराया ।
आत्मात्मजतापातें[23], दे आशी, राजसत्तमा ! राया[24] !' ॥ १००

पुसतां विलंबकारण, चित्राश्व[25] म्हणे, 'शिरोव्यथाशयन[26]', ।
मुनि म्हणति, 'हें नव्हे, वद वत्से ! हो तूंचि आमचें नयन.' ॥ १०१

---

१. अध्याय २९८ श्लोक १०-१९ पहा. २. तपस्वी. ३. क्षणभर प्राप्त झालेला (ताप). ४. दुर्दैवानें दिलेला ताप सहन कर. ५. सामुद्रिकोक्त मंगलप्रद लक्षणांनीं आणि गुणांनीं युक्त. ६. आपल्या पतीच्या अनुमतानें. ७. द्वारीं राहणाऱ्या. ८. आनंदास. ९. बोलाविते, जी म्हणून पतिव्रता आहे ती द्वारांत असणाऱ्या महाला (आनंदाला) बाहे (बोलाविते). पतिव्रतेच्या द्वारीं आनंद नेहमीं उभा असतो, तिला आनंद सुप्राप्य आहे—असें तात्पर्य. १०. ऋषिपत्नी. ११. पातिव्रत्यसंपन्न, उत्तमाचारसंपन्न. १२. जे भासुरव्रत मुनिदार तेही तिला वाखाणिति—असा अन्वय. [येथें **'दार'**-शब्द संस्कृताप्रमाणें पुंलिंगी बहुवचनी आहे. पण क्वचित् स्त्रीलिंगीही आढळतो. जसें—'मी रामाची **दारा** हरिली तरि काय हे तुझी हानी.' मंत्ररामायण—युद्धकांड—गीति १०६ पहा.] १३. सुरलता, कल्पवल्ली. १४. स्वाधीन. १५. शोकभारास. १६. सदय. १७. गौतम, दाल्भ्य इत्यादि. (गीति ९४ पहा.) १८. सत्यवानास. १९. सत्यवान्. २०. सपत्नीक. [सदार—हें बहुव्रीहिसमासाचें उदाहरण आहे. तृतीयांत नामाशीं सह (कधीं कधीं स) याचा होणारा समास बहुव्रीहि होय. जसें—सहभृत्यगण, सबांधव, सहमित्र, ससुत, सहानुज, स्वबल, इत्यादि.] २१. आनंदयुक्त. २२. प्राचीन ग्रंथांवरून प्रियजनांचें शिरोवघ्राण करण्याचा प्रचार फार होता असें दिसतें. मस्तकपद्म (पद्मासारखें—कमळासारखें मस्तक) हें उपमानोत्तरपद कर्मधारयसमासाचें उदाहरण होय. २३. आपणाला व आपल्या पुत्राला झालेलें जें विरहदु:ख त्यातें वाराया. २४. हे द्युमत्सेना ! २५. सत्यवान्. २६. कपाळ दुखल्यामुळें निजणें.

सावित्रीनें कथिलें तें वृत्त अशेष[1] साधुसद[2] नमुनी, ।
तेव्हां झाले अतुलप्रीतिक्रीडेशिं केलिसदन[3] मुनी. ॥ १०२
मार्कंडेय म्हणे, 'बहु वर्णावें काय? जेंवि शिवसेवा ।
मज [4]काळापासुनि तसि, मुक्त करी त्यासि[5] ती[6], मनुजदेवा[7]! ॥ १०३
दुसरे दिवसीं प्रकृति[8] प्रार्थिति येऊनि आपल्या पतितें[9], ।
'या राज्य करा, सचिवें[10] वधिला[11] हरिली स्वभूमि ज्या पतितें[12].'॥ १०४
मुनि म्हणति, 'अनुभवावें स्वस्थ मनें राज्यपद, नता राया! ।
न तपोवन वर तुज बहु सावित्रीयुक्त सदन ताराया'. ॥ १०५
सिंहासनीं बसविला[13] सावित्रीच्या[14] व्रतेंचि, हा नियम[15]; ।
वरसामर्थ्य म्हणा, परि गेला होता करूनि हानि[16] यम. ॥ १०६
सावित्रीनें केला उभयकुलोद्धार[17] हा असा, राजा[18]! ।
कृष्णाहि[19] अशीच[20], स्तुति येती न मुखाशि या असारा[21] जा[22].' ॥ १०७
रामघनमयूर[23] म्हणे, 'निववालचि सुरसिकाशि, केका[24] हो! ।
शंभुहि म्हणे, 'न सेविति मंद[25] म्हणुनि झुरसि कौशिके[26]! कां? हो!' ॥ १०८

---

१. सर्व. २. साधुसभा. ३. क्रीडेचें स्थान. ४. मार्कंडेयाचें आयुष्य सोळा वर्षें होतें म्हणून त्यानें दीर्घायु होण्यासाठीं मातापितरांच्या आज्ञेनें शिवाची सेवा केली व तो त्याला प्रसन्न झाला. पुढें याच्या अंतसमयीं यम याला नेण्यासाठीं आला, तेव्हां शिवानें यमास लत्ताप्रहार करून पाडून मार्कंडेयाला चिरंजीव केलें या कथेचा येथें उल्लेख आहे. ५. त्या सत्यवानाला. ६. सावित्री. ७. हे धर्मा! ८. प्रजा, शाल्वदेशीय प्रजा. ९. राजातें. (द्युमत्सेनातें.) १०. अध्याय २९८ श्लोक ३-५ पहा. ११. राज्यापहार करणारा पापी (पतित) दुष्ट सेनापति वधिला. १२. भ्रष्टें. १३. द्युमत्सेन. १४. सावित्रीच्या सासऱ्याला जें सिंहासन मिळालें तें सावित्रीच्या व्रतप्रभावानेंच होय–हा नियम (हाच सिद्धांत–हाच निश्चयार्थ–हेंच खचित). यमाच्या वराच्या सामर्थ्यानें द्युमत्सेनाला सिंहासन मिळालें असें म्हणाल तर म्हणा, परंतु खरें नव्हे. कारण जर व्रतप्रभाव नसता; तर वर कोठून आला असता? यम तर सर्वस्वाची हानि करून गेला होता, त्याला जें मागें परतविलें तें व्रत-प्रभावानेंच होय. सारांश सावित्रीच्या **व्रता**नेंच द्युमत्सेन पुनरपि सिंहासनारूढ झाला–असें तात्पर्य. १५. हेंच सत्य समजावें. १६. 'हा नियम' 'हानि यम' हें पंतांचें आवडतें यमक आहे. १७. दोनी कुलांचा (बापाच्या आणि सासऱ्याच्या) उद्धार. १८. हे धर्मा! १९. द्रौपदी. २०. सत्वस्थ पतिव्रता, साध्वी. २१. निरर्थक. २२. जा=ज्या (स्तुति.) [कवितेंत 'ज्या'स्थानीं 'जा'चा आदेश कवि यमक साधण्यासाठीं वारंवार करतात. जसें सभापर्व–१-२२; १-८८; १-९०; २-४; २-२९; ५-९५; ७-७७; उद्योगपर्व–७-७४; ६-४४; १२-४७; १३-७९.] येथें पतिव्रतामाहात्म्यपर्व संपलें.
२३. रामघनमयूर=राम हाच घन (मेघ) तो आवडतो ज्यास असा मयूरपक्षी (मोरोपंत). पंतांस

अध्याय चौदावा.

स्वप्नीं द्विजरूपी दिनकर कर्णाला म्हणे, 'अगा! राया! ।
कांहीं विहित हित तुला आलों सांगावया अगारा या. ॥ १
तूं ब्रह्मण्य वदान्य श्रेष्ठ असें विश्व सुमहिमा गातें, ।

आपल्या आर्या फार चांगल्या झाल्या असें वाटून त्यांस आनंद झाला, त्याच्या भरांत पंत आपल्यावर मयूरत्वाचा आरोप करून घेऊन म्हणतात:—अहो केका हो! (अहो मयूरवाणीनो!–पक्षी–आर्यानो! [तुम्हीं] सुरसिकांशि निववालचि (रसिकजनांला आनंद द्यालच, रसिकांना संतोषवाल.) [आतां सुरसिक तोष पावतील पण मंद (मूर्ख) संतोष पावणार नाहींत अशी शंका घेऊन पंत म्हणतात.] मंद संतुष्ट होणार नाहींत हें खरें, तथापि त्याविषयीं वाईट वाटावयास नको, कां तर शंभु (शिवही) काशीस म्हणतात:—हे काशिके! (काशी!) मंद न सेविति म्हणुनि कां झुरसि (मूर्ख लोक तुला सेवीत नाहींत म्हणून तूं कां झुरतेस? झुरण्याचें कारण नाहीं, ते मूर्खच होत तेव्हां ते तुझी सेवा कशास करतील?) [या आख्यानांत काशी, गया, महानदी इत्यादिकांचा उल्लेख आला आहे, तेव्हां कदाचित् हा अध्याय पंतांनीं काशीस गेले त्या समयीं लिहिला असावा. काशीकर पंडित महाराष्ट्र भाषेची अवहेलना करतात या गोष्टीवर कटाक्ष ठेवून पंतांनीं उत्तरार्धांत त्या पंडितांवर टोला मारला असावा असें दिसतें. पंतांनीं आपल्या काव्याविषयीं कोठें कोठें श्लाघा अथवा गर्वोक्ति ध्वनित करून आनंदभरानें स्वकृतीचें वर्णन केलें आहे; तसा प्रकार या पद्यांत 'केका हो! सुरसिकांशि निववालचि' असें म्हणून जाणविला आहे.] २४. मयूरवाणी हो. २५. मूर्ख पुरुष. २६. हे काशि.

१. येथें कुंडलाहरणपर्वास आरंभ होतो. "इंद्र हा आपल्या पुत्राच्या (अर्जुनाच्या) कल्याणार्थ कर्णापाशीं त्याच्या अंगचीं कुंडलें व कवच यांची याचना करण्याकरितां येणार आहे; हें वर्तमान सूर्यानें त्यांस स्वप्नांत येऊन सांगितलें. त्याप्रमाणें इंद्र कपटरूपानें आला असतां व वरील दुर्घट याचना त्यानें केली असतांही वदान्यश्रेष्ठ कर्ण हा आपल्या सत्वास तिळमात्रही ढळला नाहीं. त्यानें आत्मरक्षणार्थ इंद्राची शक्ति मात्र त्याजपासून मागून घेतली, आणि ती घेतल्यानंतर आपल्या हातानें आपलीं सहज कुंडलें व कवच हीं त्यास आपल्या शरीरापासून त्यानें कापून दिलीं, येणेंप्रमाणें [या अध्यायांतील] कथानक आहे." (निबंधमाला–अंक ७० पृष्ठ १३ पहा.) २. ब्राह्मणाच्या वेषानें. ३. कर्णानें आपल्या आंगचीं कुंडलें कर्णापासून कापून इंद्राला दिलीं म्हणून त्याला **'कर्ण'** असें नांव पडलें. (अध्याय ३१० श्लोक ३८ पहा.) या पूर्वीं त्यास **वसुषेण** किंवा **वृष** असें नांव होतें. (अध्याय ३०९ श्लोक १३-१४ पहा.) ४. योग्य. ५. घरास. 'अगारा या' हें पंतांचें आवडतें यमक होय. ६. भक्तिमान्, भजनशील. ७. दाता. ८. विश्व=विश्वांतील लोक. [हिं जहत्स्वार्था लक्षणेचें उदाहरण समजावें. विश्व म्हणजे विश्वस्थ लोक; जेव्हां वाच्यार्थाचा अन्वय न होतां सर्वथा त्यागच होतो तेव्हां जहत्स्वार्था लक्षणा होते. येथें 'विश्व'शब्दाचा वाच्यार्थ जो प्रदेशविशेष त्याचा त्याग केला असून तत्रस्थ लोकांचा 'गातें' या क्रियेशीं अन्वय आहे म्हणून ही जहत्स्वार्था लक्षणा होय. ९. उत्तम थोरवी. 'महिमा' हा शब्द 'महा' या विशेषणास 'इमन्' प्रत्यय लागून झाला आहे. हा प्रत्यय भाव किंवा धर्म यार्थीं होतो; जसें–शुक्ल-शुक्लिमन् (पांढरेपणा), पृथु-प्रथिमन् (मोठेपणा), मृदु-म्रदिमन् (मृदुपणा), महत्-महिमन्, गुरु-गरिमन् (मोठेपणा), दृढ-द्रढिमन् (घट्टपणा), लघु-लघिमन् (हलकेपणा), इत्यादि.

[1]म्हणतें त्वन्मुख न क्षम ज्या द्याया [2]स्वर्द्रुसुमहि मागा तें. ॥ २
विप्रांसि म्हणसि इच्छित तें ‘द्या’ हा मात्र वर्ण न [3]वदा, न्या, ।
करिति कवि तुझें होउनि रोमांचितगात्र वर्णन, वदान्या ! ॥ ३
[5]देयार्थें [6]पात्रेच्छापूर्ति [7]बुध म्हणेल बा ! कशास न [8]हो ? ।
परि वंचाया [9]विप्रच्छद्में येणार [10]**पा**कशासन, हो ! ॥ ४
[11]अमृतोद्भव कुंडलयुगसहजकवच हें तया न ओपावें, ।
[12]तेदितरसर्वस्वार्थी जो विप्र तया म्हणोनि ‘ओ’ पावें.’ ॥ ५
कर्ण म्हणे, ‘कोण तुम्ही ?’ विप्र म्हणे, ‘मी तुझा पिता[13] [14]सविता, ।
[15]तळमळतो [16]वाराया अहिता, साधावया हितास, वित्ता.[17]’ ॥ ६
कर जोडुनि **कर्ण** म्हणे, ‘करिति न गुरुवर्य [18]कुपदेशाला, ।
[19]नेती न [20]**मा**नसींच्या निजशिशुतें [21]हंस [22]कूपदेशाला. ॥ ७

---

१. ज्या द्याया स्वर्द्रुसुमहि न क्षम, तें मागा (असें) त्वन्मुख म्हणतें=जें देण्यास कल्पवृक्षाचें पुष्पही समर्थ नाहीं तें मागा (मागून घेऊन जा) असें तुझें मुख म्हणतें. यावरून कर्णाच्या औदार्याचें श्रेष्ठत्व दर्शविलें. २. कल्पवृक्षाचें पुष्पहि. ३. जें इष्ट आहे तें द्या असा वर्ण (शब्द) म्हणूं नका, तर न्या (घेऊन जा, द्या असें बोलण्याचें कारण नाहीं). ४. (आश्चर्यानें) रोमांचित झालें गात्र (शरीर) ज्याचें असे (कवि); आश्चर्यानें किंवा विस्मयादि विकारांनीं ज्यांच्या आंगावरचे केश उभे राहिले आहेत असे (कवि.) ५. देण्यास योग्य अशा अर्थानें. ६. दानार्थी विप्राची (पात्राची) इच्छा परिपूर्ण करणें. ७. ज्ञाता. ८. व्हावो. ९. विप्राच्या वेषानें. १०. इंद्र. (पाकनामक दैत्याचा शासनकर्ता.) ११. अमृतापासून उत्पन्न. (अध्याय ३०० श्लोक २०.) जोंपर्यंत कवचकुंडलयुक्त कर्ण असेल तोंपर्यंत तो संग्रामांत अवध्य राहील असा त्या कवचकुंडलांचा प्रभाव होता–असें वर्णन आहे. (अध्याय ३०० श्लोक १८-१९ पहा.) १२. त्याहून इतर अर्थ मागणारा. १३. सूर्य कर्णाचा पिता–ही कथा **पंत**कृत आदिपर्वांत आहे. [आदिपर्व–अध्याय १६ गीति ५-१५ पहा.] १४. सूर्य. १५. पुत्राचें हित साधण्यासाठीं आणि अकल्याणाचें निवारण करण्यासाठीं पिता सदां तळमळतो. १६. निवारण करण्यासाठीं, हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १७. विणारा. (पिता.) १८. वाईट उपदेशास. १९. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २०. हंस निजशिशुतें (आपल्या बालकांना) कूपदेशाला नेती न, मानसींच्या (देशाला) नेती–असा अन्वय. २१. संस्कृत साहित्यशास्त्रकारांनीं अनेक संकेत मानिले आहेत त्यांस **कविसमय** अथवा **कविसंप्रदाय** असें म्हणतात. हंस जलदागमसमयीं मानससरोवराकडे जातात हाही एक कविसमयच गणिला आहे. यांचा उल्लेख मागें (पृष्ठ १५०-१५१ टीप २४) चार पद्यांत केला आहे. त्या पद्यांतील व इतर कविसमय येथें देतों:—आकाश आणि पाप यांचें मालिन्य, कीर्ति व हास्य यांचें शुभ्रत्व, क्रोध व प्रीति यांचा रक्तिमा (तांबडेपणा), नदींत आणि सागरांत यथाक्रम पंकज आणि इंदीवर यांची उत्पत्ति, मरालादिक पक्ष्यांचा जलाशयांत संचार, चकोरांचें चंद्रकिरणपान, जलदागमकाळीं हंसांचें मानस-

हा केल्या[1] शुद्धव्रतसख्यातें[2] करुनि[3] पातळ मळेल[4]; ।
स्वामी[5]! मन तुमचेंही पाहुनि मज निस्त्रपा[6] तळमळेल. ॥ ८
स्वर्द्रु[7] सुरभि चिंतामणि वश ज्याला, जो सुरांत सुपदेश[8], ।
सत्पात्र विमुख नोहे, ऐसाचि करा सुतासि उपदेश. ॥ ९
हानि नसो उपदेशें तुमच्या, बहु वृद्धि मद्यशाला[9] [10]हो, ।
सत्कीर्ति अमृतशाला[11] गुरुजी[12]! अपकीर्ति मद्यशाला[13], हो! ॥ १०
शोभा '[14]यशेंचि, न असी लोकीं धृतदिव्यकुंडलें कानें; ।
जोडुनि अयश न व्हावें पितृहृदयीं अग्निकुंड लेंकानें.' ॥ ११

सरोवराप्रत आगमन, स्त्रीलत्ताप्रहारें अशोकवृक्षाचें फुलणें, तरुण स्त्रियांच्या मद्यगंडूषांनीं बकुलवृक्षाचें फुलणें, विरहसंतापानें तरुणांच्या हृदयावरील हारांचें व हृदयांचें फुटणें, कामाचें चाप आणि बाण कौसुम (पुष्पमय) आणि त्याच्या धनुष्याची दोरी भ्रमरमाला असणें, कामाच्या बाणांनीं आणि स्त्रीकटाक्षांनीं तरुणजनहृदयांचा भेद, दिवसा (सूर्याच्या योगानें) अंभोजांचा आणि रात्री (चंद्राच्या योगानें) कुमुदांचा विकास, शुक्लपक्षांत चंद्राचा प्रकाश, मेघगर्जनेनें मोरांचें नृत्य, अशोकाला फळें न येणें, वसंतांत जाईला फुलें न येणें, गंधसारवृक्षांच्या (चंदनवृक्षांच्या) फलपुष्पांचा अभाव; स्त्रियांच्या पादाघातानें अशोकाचा, कटाक्षप्रेरणानें तिलकवृक्षाचा (तिळव्याचा), आलिंगनानें कुरबकाचा (कोरांटीचा), करस्पर्शानें प्रियंगूचा (वाघांटीचा), मद्यगंडूषसेकानें बकुलाचा, नर्मभाषणानें मंदाराचा, मृदुहसितानें चंपकाचा, मुखमारुतानें (तोंडाचा फुंकर घालण्यानें) आम्रवृक्षाचा, सुस्वर गायनानें नमेरुवृक्षाचा (सुरंगीच्या झाडाचा), नृत्यानें कर्णिकाराचा (पांगाऱ्याच्या झाडाचा) पुष्पविकास होणें, हस्तीचें गंडस्थळ, सापाचें मस्तक, शंख, मत्स्य, वराह आणि वेणु यांत मोत्यें असणें, चक्रवाकमिथुनांचा सूर्यास्ताबरोबर वियोग आणि सूर्योदयाबरोबर समागम, इत्यादि अनेक कविसमय प्राचीन ग्रंथांत आढळतात. यांचा प्राकृत कविवर्यांनीं ही आपापल्या काव्यांत प्रसंगानुरूप संनिवेश केला आहे. २२. विहिरींप्रत.

१. केलेल्या. २. कोणास 'नाहीं' म्हणावयाचें नाहीं असें केलेलें शुद्धव्रताचें जें सख्य त्यातें. शुद्धव्रतसख्यातें पातळ केल्याच्या योगें (हा कर्ण) मळेल (मलिन–पापी होईल. या कर्णानें आपलें शुद्धव्रत प्रेम पातळ केलें–याचकाला नकार लावून मागें हतेच्छ विमुख परतविलें म्हणजे याला पाप लागेल.) सख्य पातळ करणें=प्रेम कमी करणें. ३. करुनि=केल्यामुळें, केलें म्हणून. ['ऊन'प्रत्ययांत कृदंत कधीं कधीं कारणाचा बोध करतात. जसें–तो खाऊन माजला=त्यानें खाल्लें यामुळें (म्हणून) तो माजला.] ४. शुद्धव्रताचा त्याग केल्यानें या कर्णाला पाप लागेल–याचें यश नष्ट होईल. ५. हे ताता! मरणास भिऊन व्रतत्याग करणारा असा हा तुमचा निस्त्रप (निर्लज्ज) मुलगा (कर्ण) पाहून तुमचेंही मन तळमळेल. ६. निर्लज्जा. ७. कल्पवृक्ष. ८. चांगल्या स्थानाचा धनी. (इंद्र.) ९. माझ्या यशाला. १०. होऊ. ११. अध्याय ३०० श्लोक २१-३९ पहा. १२. गुरुजी यांत 'जी' हा आदरबोधक प्रत्यय जाणावा; जसें–मायजी, बायजी. १३. मद्याची शाळा. १४. यशानेंच शोभा प्राप्त होते, कुंडलमंडित कानें शोभा प्राप्त होत नाहीं.

भास्कर म्हणे, 'बुडावें [1]त्वच्छोकविषार्णवांत पुत्रा! म्यां; ।
हें वाटेल उचित तरि दे कुंडलकवचदान [2]सुत्राम्या.' ॥ १२
कर्ण म्हणे, 'जो अयशा [3]गुरुशोकद तोचि मंद नर मेला; ।
विष्णुहि म्हणेल 'व्हावा सुयशा शोकदहि [4]नंदन रमेला.' ॥ १३
सूर्य म्हणे, 'मागावी बा! [5]दिव्यामोघशक्ति [6]हरिकरगा; ।
वत्सा! [7]स्ववधेच्छुधनंजयवधसाहित्य हेंचि तरि कर, [8]गा!' ॥ १४
'हें करिन, हरिन अरिनरदेवप्राणहि, [9]विचिंत तूं जा, गा!' ।
ऐसा [10]स्वप्न विलोकुनि तो श्रीमान् कर्ण जाहला जागा. ॥ १५
स्वस्वप्नवृत्त कथितां करुनी [11]आपृष्ठताप जप [12]नमन, ।
कर्णमन, दृष्टि मिळतां, सप्रत्यय होय, तप्त [13]तपनमन. ॥ १६

---

१. तुझ्या शोकरूप विषाचे समुद्रांत. २. इंद्रास. (सुत्रामन्=इंद्र.) ३. बापाला शोक देणारा. ४. पुत्र. शोक देणारा असला तरी यशस्वी असा पुत्र व्हावा असें सामान्य लोक म्हणतील इतकेंच नव्हे तर रमेला शोकद पण यशस्वी पुत्र व्हावा असें विष्णुही म्हणेल. ५. ही अमोघ (फलप्रद) दिव्य शक्ति कर्णाचें रक्षण करणारी होती. (अध्याय ३०२ श्लोक १५-१६.) हिचें नांव 'वासवी शक्ति.' ६. इंद्राच्या हातांतली. ७. आपला घात करूं पाहणारा जो धनंजय (अर्जुन) त्याच्या वधाची सामग्री. ८. गा=अगा. 'अगा' हें कारुण्यदर्शक अव्यय होय. ९. चिंतारहित. १०. 'स्वप्न' हा शब्द संस्कृतांत पुंलिंगी आहे. ११. पाठ तापेपर्यंत. १२. नित्य आपली पाठ तापेपर्यंत उन्हांत जप करावा असा कर्णाचा नियम होता. त्याप्रमाणें 'आपृष्ठताप जप [आणि] नमन करुनी, स्वस्वप्नवृत्त [सूर्याला] कथितां' (स्वप्न पडल्यानंतर दुसऱ्या दिवशीं जप संपवून, सूर्यास नमन करून आपलें स्वप्नवृत्त सूर्यास सांगत असतां) कर्णमन [सूर्याची व त्याची] दृष्टि मिळतां सप्रत्यय (प्राप्तानुभव) होय [आणि] तपनमन (सूर्याचें मन) तप्त [होय]. कर्णानें आपली दृष्टि सूर्याकडे लाविली तेव्हां सूर्याचें मन तप्त झालें, आणि पाहिलेल्या स्वप्नाचा अनुभव कर्णाला आला. [स्वप्न श्रेष्ठ पुरुषाला, गुरूला अथवा इष्टदेवतेस निवेदावें आणि त्याचा अर्थ विचारावा असा नियम आहे. 'शिष्यस्तु शुचिराचान्तः पुष्पहस्तो गुरूत्तमम् । प्रणम्य शिरसा हृष्टस्तस्मै स्वप्नं निवेदयेत् ॥' [नारदपंचरात्रम्.] 'काश्यपे दुर्गते नीचे देवब्राह्मणनिंदके । मूर्खे चैवानभिज्ञे च न च स्वप्नं निवेदयेत् ॥ अश्वत्थे गणके विप्रे पितृदेवासनेषु च । आर्ये च वैष्णवे मित्रे दिवा स्वप्नं प्रकाशयेत् ॥' [ब्रह्मांडपुराणम्.] यांचा भावार्थः—ज्यास स्वप्न पडलें असेल त्यानें शुचिर्भूत होऊन, आचमन करून व हातांत फुलें घेऊन आपल्या गुरूकडे जावें व प्रसन्नचित्तें त्याच्या चरणांवर मस्तक ठेऊन पाहिलेलें स्वप्न निवेदन करावें. (नारदपंचरात्र.) तसेंच ब्रह्मांडपुराणांत स्वप्न कोणास सांगावें व कोणास सांगूं नये याचा उल्लेख केला आहे तो असाः—कुमार्गगामी ब्राह्मणास, नीच पुरुषास, देवब्राह्मणनिंदकास व मूर्खास आपलें स्वप्न कधीं सांगूं नये. अश्वत्थ, जोशी, विप्र, पिता, देव, सभ्यलोक, वैष्णव आणि मित्र या सर्वांच्या समोर दिवसां आपलें स्वप्न सांगावें.] १३. सूर्याचें मन.

द्विजकामपूर्तिपर्वीं[1] मंत्र जपाच्या जपोनि अवसानीं,[2] ।
ये[3] द्विजतनु[4] हरि,[5] दुर्लभ ज्याचें दर्शन जनासि नवसांनीं. ॥ १७
शक्र म्हणे, 'तुजचि पुढें 'दे' हें उच्चारितां न भी कवि, भो! ।
साधो! म्हणउनि आलों, कांहीं मागावयासि भीक, विभो!' ॥ १८
कर्ण म्हणे कर जोडुनि, 'पुसतो हा विप्रदास, कळवा जी! ।
काय तुम्हां द्यावें म्यां? धन[6] कन्या ग्राम वा[7] सकळ वाजी.' ॥ १९
ब्राह्मण म्हणे, 'अदेय[8] स्वप्राणहि बा! बुधा! न दात्यातें; ।
जें सत्कवियश कैंचें जीवनदाही[9] सुधानदा त्या तें? ॥ २०
निजकवचकुंडलें मज दे, दात्या! याविणें नको कांहीं; ।
तापदहि[10] मानिजेतो,[11] तापहरहि[12] सेविजे न, कोकांहीं.[13]' ॥ २१
कर्ण[14] स्मितें[15] करुनि म्हणे, 'ऐसें द्यावें तुम्हींच वरदानीं;[16] ।
अजि! देवेश्वरहो! मज कां योजितसां अशक्यवरदानीं? ॥ २२
द्यावें कसें स्वजीवनहेतु[17] सरोदान[18] मीनयादानें?[19] ।
द्यावेंहि कसें जलदें? देवा! वांचेन मी न या दानें. ॥ २३

---

१. ब्राह्मणाच्या मनोरथाची पूर्ति करणें हेंच पर्व यांत. २. अंतीं. (अध्याय ३१० श्लोक १४-१७ पहा.) ३. सूर्य मध्यवर्ती असतां, कर्ण हात जोडून सूर्याची स्तुति करीत होता अशा समयीं इंद्र आला. (अध्याय ३०९ श्लोक २३-२५.) वनवासाच्या तेराव्या वर्षी इंद्र कर्णाकडे कुंडलें मागण्यास गेला. (अध्याय ३०० श्लोक ५ पहा.) ४. विप्रशरीरधारी. ५. इंद्र. 'हरिश्चंद्रार्कवाताश्वशुकभेकयमाहिषु । कपौ सिंहे हरेऽजेंऽशौ शक्रे लोकांतरे पुमान् ॥' इति मेदिनी.) ६. अध्याय ३१० श्लोक २ पहा. यांत हिरण्यकंठी प्रमदा, ग्राम आणि गोकुळें यांचा उल्लेख आहे. ७. किंवा. ['वा' या विकल्पदर्शक उभयान्वयी अव्ययाचा प्रयोग जोडलेल्या प्रत्येक शब्दापुढें अगर सर्व शब्दांच्या अंतीं करावा असा नियम आहे, पण मराठींत हा नियम पाळतात असें नाहीं.] ८. देण्यास अयोग्य असे. ९. जीवन देणाऱ्याही. १०. ताप देणारा सूर्यही. ११. पूजित होतो, सन्मान पावतो. १२. ताप हरण करणारा चंद्रही. १३. कोक—या नांवाचा एक पक्षी आहे. यासच चक्रवाक असें म्हणतात. हे पक्षी जलाशयाच्या आश्रयानें राहतात. त्यांत पुरुष (नर) आणि स्त्री (मादी) यांचा रात्रीं ऋषिशापामुळें नित्य वियोग होतो. त्यांचा परस्परांवर अनुराग फार असल्यामुळें त्यांना वियोगाचें दुःख अत्यंत असह्य होतें. पण रात्र सरून सूर्योदय झाला म्हणजे त्यांची परस्पर भेट होते. व तीं सारा दिवस एके ठिकाणीं राहून घालवितात—अशी कविप्रसिद्धि आहे. 'त्यज चक्रवाकि शोकं बधान धैर्यं सहस्व समयममुम् । अयमेव वासरमणिर्हरिष्यते शापमूर्च्छां ते ॥' इत्यादि सुभाषितांवरून या कोक(चक्रवाक)पक्ष्याची स्थिति सुव्यक्त होते. १४. अध्याय ३१० श्लोक १४-१७ पहा. १५. हास्य. १६. वर देणाऱ्यांनीं. १७. आपल्या जीविताला कारणभूत असें. १८. सरोवराचें दान. १९. मत्स्यरूप जलचरानें.

होईन वध्य मी, तूं उपहास्य, असें करूं नको, पावें, ।
प्रभुनें काय [1]न्यायव्रतवर्तिच्छळ करून कोपावें? ॥ २४
घ्या कवच कुंडलें, [2]ग्रहणाग्रह जरि, परि असें तरि करा, जी!।
द्या शक्ति ती अरिवधीं, बहु मान्या [3]अरिधरा हरिकरा जी.' ॥ २५
शक्र म्हणे, 'घे, देतों, मागें कोणासही न दिधलीला, ।
[4]कृत्याव्याल्यशनीच्या दावितसे शक्ति [5]नैकविध लीला. ॥ २६
सोडावी हे [6]प्राणव्यसनीं एकीं, करील [7]कृत्याशीं, ।
नाहींतरि परतोनि त्वत्प्राणातें हरील [8]कृत्याशी. ॥ २७
एक रिपु वधुनि येइल [9]मद्धस्ता, '[10]श्री जशी [11]स्वकरवीरा, ।
स्मरण असों दे, [12]ईच्यो मोक्षीं बरवा विचार कर, वीरा!' ॥ २८
कर्ण [13]म्हणे, 'मी समयीं ईतें एकीं नरींच सोडीन, ।
मग हे जाऊ, मज न त्यागी ऐशी सुकीर्ति जोडीन.' ॥ २९
शक्र [14]म्हणे, 'परि जपतो जो सम सर्वत्र परमहि [15]तदवना, ।
लोकीं प्रभुप्रियत्वें होय, गुणें अल्प पर महित [16]दवना.' ॥ ३०
कापूनि कर्ण दे जें वज्रसम अभेद्य [17]सहजकवच रणीं, ।
ऐसेंचि सत्वशीळ [18]श्रीवर वाहे स्वनेत्र [19]भवचरणीं. ॥ ३१

---

१. न्यायव्रतास अनुसरून वागणाऱ्या जनांचा छळ. २. घेण्याचा आग्रहच असेल तर. ३. सुदर्शन धरणाऱ्या. ४. कृत्या+व्याली+अशनीच्या=उग्रदेवता+सर्पिणी+वज्राच्या. ५. नानाप्रकारच्या. ६. प्राणसंकटीं एकाच पुरुषावर सोडावी. ७. इष्टकार्यास. ८. उग्रदेवतेसारखी. ९. माझ्या हातास. १०. लक्ष्मी. ११. आपल्या करवीरपुष्पा, आपल्या करवीरकमलाच्या ठायीं. १२. ही शक्ति सोडण्याच्या कामीं. १३. अध्याय ३१० श्लोक २९-३० पहा. १४. कर्णानें इंद्राला कवचकुंडलें देऊन, त्याजपाशीं शक्ति (आयुध—हत्यार) मागितली व ती त्यानें दिली. पुढें ती शक्ति मी एकट्या अर्जुनावरच सोडीन असें कर्णानें सांगितलें. त्यावर इंद्र म्हणतो:—[ही शक्ति तूं एका पुरुषावरच सोडशील हें खरें] परि (परंतु) तदवना (तद्+अवना=त्याच्या—अर्जुनाच्या—रक्षणासाठीं) सर्वत्र जो सम (समबुद्धि) [आणि] परम (मोठा थोर) [तो समबुद्धि परमात्मा भगवान् कृष्ण] जपतो. [अर्जुनाचा रक्षक कृष्ण आहे, तेव्हां तूं शक्ति अर्जुनावर टाकलीस तरी तो मरणार नाहीं—असा भाव.] यास दृष्टांत:—दवना (दवणा) गुणें अल्प (गुणांनीं कांहीं मोठा उंच आहे असें नाहीं—तथापि) लोकीं प्रभुप्रियत्वें परमहित (देवांस—शंकरादि देवांस आवडतो म्हणून लोकांत अत्यंत पूज्य झाला आहे.) तसाच अर्जुनही गुणबळानें अल्पच, परंतु त्याचें रक्षण कृष्ण करतो—तो कृष्णप्रभुचा अत्यंत प्रिय—म्हणून अजिंक्य होय, असा इंद्रोक्तीचा भावार्थ. १५. त्याच्या रक्षणार्थ. १६. दवणा. १७. जन्मत: झालेलें असें कवच. १८. विष्णु. १९. शिवचरणावर.

[1]त्या शुचि सत्वसमुद्रा दात्यांच्या नायका [1]पिता काय ।
धन्य म्हणे, [2]हरिहि मनीं तो जेव्हां होय कापिता [3]काय. ॥ ३२
त्या कवचकुंडलांतें घेउनि बहु करुनि वर्णन वदे हें, ।
'साधो! तुझ्या [4]वरावा आतांचि [5]सुरम्यवर्ण नव देहें.' ॥ ३३
दातृत्वव्रत [6]अद्भुत कीं [7]गुर्वाज्ञेशि जें हठें मोडी, ।
पहिल्यापरीस पुष्कळ सद्यश [8]सद्वर्ण **कर्ण** तो जोडी. ॥ ३४
सज्ञान म्हणति, '[9]तरला **बळि** कीं हा साधु **कर्ण** न बुडाला.' ।
खळ तळमळति जसे [10]घटझष पडतां छिद्र सूक्ष्महि [11]बुडाला. ॥ ३५

अध्याय पंधरावा.

सरला [12]वनवास, मग **द्वैतवनीं पांडुनंदन** वसति, तें ।
दिवसांत [13]वांकुल्या शत दावित होतेंचि [14]नंदनवसतितें. ॥ १
विप्राशिं [15]आधि तेथें बहु दे जो '[16]हरिण हरुनि [17]अरणीतें' ।
[18]तन्मारणीं करिति ते, कौशल केलें कधींहि न रणीं तें. ॥ २
[19]शृंगाग्रविलग्नारणि तो मृग गेलाचि, लागले होते ।

---

२. सूर्य. २. इंद्रही. ३. देह. ४. ग्रहण करावा. ५. उत्तम अंगलावण्य. [कवचकुंडलकर्तनानें कर्णाचा देह विरूप दिसूं नये म्हणून इंद्रानें त्याला तुझा देह मदनासारखा सुंदर होईल असा वर दिला—या कथासंदर्भाकडे येथें लक्ष्य आहे.] ६. पूर्वी न झालेलें. ७. पित्याच्या (सूर्याच्या) आज्ञेला. ८. उत्तम देहकांति. ९. जसा त्रिपादभूमिदानानें **बळिराजा** पाताळीं गेला, तरी वास्तविकपणें पाहतां तरला, तसा हा साधु कर्ण कवचकुंडलदानानें बुडाला नाहीं, तर तरला, असें सुज्ञांस वाटे. दुष्टांस मात्र त्यामुळें तळमळ सुटली. दुर्योधन दुःशासन शकुनि प्रभृति खळांस कर्णानें कवचकुंडलें इंद्रास दिलीं म्हणून वाईट वाटलें, कारण या योगें कौरवपक्षाची हानि आणि पांडवपक्षाची सरशी व्हावयाची होती. १०. घागरींतले मासे. ११. कुंभाच्या अधोभागाला. १२. वनवासाचीं बारा वर्षें पुरीं झालीं. १३. वांकुल्या दाखविणें=उपहास करणें, तुच्छ मानणें. १४. नंदनवनांतील वसतीला. १५. मनोव्यथा. १६. एका तपस्वी ब्राह्मणाच्या अरणी वृक्षावर होत्या. त्याच वृक्षाला एक मृग कंडूशमनार्थ आपलीं शिंगें घांशीत होता. इतक्यांत त्या अरणी त्या मृगाच्या शृंगांत अडकल्या आणि तो मृग पळ काढीत निघून गेला. 'त्या अरणी मृगापासून मला परत आणून द्या' असें त्या विप्रानें धर्मराजास सांगितलें, तेव्हां पांचही पांडव धनुष्य घेऊन त्याच्या पाठीमागें लागले—इत्यादि कथेकडे येथें लक्ष्य आहे. (अध्याय ३११ पहा.) १७. अग्निमथनकाष्ठातें. १८. त्या हरिणाला मारण्याच्या कामीं. १९. शृंगांच्या अग्रांत अडकले अरणी ज्याच्या असा (मृग).

त्यामागें, जे फारचि पांचहि [1]नरसिंह [2]भागले, हो! ते. ॥ ३
भेटे वनीं अकस्मात् [3]तापापह साधुसाचि एक [4]वट, ।
[5]तच्छीतच्छायेतें सेविति ते [6]तृषित वीर [7]एकवट. ॥ ४
धर्मचि धैर्यें [8]साहे, सोसील व्यसन काय दुसरा तें? ।
नकुळ [9]तदाज्ञा घेउनि आणाया तोय [10]जाय [11]सुसरातें. ॥ ५
उष्णें झाला होता तप्त तृषित जेंवि [12]धेनुसुत डागें, ।
धांवे, [13]तरंगहस्तें जाणों पाचारिलाचि [14]सुतडागें. ॥ ६
तों [15]यक्ष [16]म्हणे, 'बापा! आधीं सेवूं नकोचि [17]तोयातें, ।
[18]मत्प्रश्नोत्तरदाता प्याया न्यायाहि [19]योग्य तो [20]यांतें.' ॥ ७
करुनि अनादर पीतां पडला तो धैर्य**मे**रुही **न**कुळ, ।
किमपि न वदे, न पाहे, [21]पतित श्रीमंत जेंवि [22]हीनकुळ. ॥ ८
मग **स**हदेव **ध**नंजय **भी**महि पडले [23]तसेचि जळपानें; ।
गमले वधिले ते त्या [24]स्वह्रदतटीं [25]**का**लियाख्यखळपानें. ॥ ९
[26]**ध**र्म म्हणे, 'हा! दैवा! न कळे झाला अनर्थ काय कसा? ।
मज बंधु एक तरि जळ द्याया यावाचि शीघ्र [27]सायकसा. ॥ १०

---

१. शूर पुरुष. [सिंह, व्याघ्र, पुंगव, कुंजर इत्यादि शब्द पदाच्या शेवटीं असल्यास ते श्रेष्ठार्थ-वाचक असतातः—'स्युरुत्तरपदे व्याघ्रपुंगवर्षभकुंजराः । सिंहशार्दूलनागाद्याः पुंसि श्रेष्ठार्थगोचराः ॥' अमरकोष–तृतीयकांड. नरसिंह (सिंहाप्रमाणें नर) हें उपमानोत्तरपद कर्मधारय समासाचें उदाहरण आहे. जेव्हां दुसरा शब्द उपमान (सारखेपणा दाखविणारा) असतो तेव्हां हा समास होतो:—चरणपल्लव, मुखचंद्र, इत्यादि.] २. रानोरानीं हिंडून मृग न सांपडतां मध्यान्हीं दमून गेले. ३. तापनाशकर्ता. ४. एक वडाचा वृक्ष. ५. त्या वटवृक्षाच्या शीतळ सावलीतें. ६. क्षुत्पिपासापरी-तांग. ७. एकदम. ८. तृषेची दुःसह पीडा साहे. ९. त्या धर्माची आज्ञा. १०. वडावर चढून तेथून दूरवर पाहून, पक्ष्यांच्या किलबिल शब्दांवरून सरोवर संनिध असावें असें जाणून नकुळ सरोवराच्या दिशेनें गेला. ११. चांगल्या सरोवरातें. १२. तरुण बैल. १३. तरंगरूप हस्तांनीं. हें उत्प्रेक्षालंकाराचें उदाहरण आहे. १४. उत्तम सरोवरानें. १५. सरोवरांतून जल नकुळ घेऊं लागला तों आकाशांत यक्षाची वाणी झाली. १६. अध्याय ३१२ श्लोक १२ पहा. १७. उदकातें. १८. माझ्या प्रश्नांचें उत्तर देणारा. १९. जो माझ्या प्रश्नांचीं उत्तरें न देतां माझा अनादर करून जलप्राशन करील तो अयोग्य आणि मरणदंडाहि होय—असा भाव. २०. या उदकातें. २१. पापी. २२. नीचकुलोत्पन्न. २३. प्रश्नोत्तर न देतां. २४. आपल्या डोहाच्या तीरावर. २५. कालिय नांवानें जो प्रख्यात असा खळपति त्यानें. (कालियसर्पानें.) २६. जेव्हां अर्जुनप्रभृति चवघे भ्राते उदक घेऊन आले नाहींत तेव्हां घाबरून, कांहीं तरी अपाय घडला असें मानून धर्म स्वतःलाच म्हणतो. २७. बाणसा.

हा! रे! कितवा[1]! धर्मा! स्वकृतें[2] निजजीवितासि आंचव, घे, ।
धिक् धिक् म्हणोनि, विटते द्यूत न करितास बंधु कां चवघे?' ॥ ११
ऐसें म्हणोनि जाउनि धर्में ते बंधु पाहिले शवसे[3]; ।
साधूंत अहंताशी[4] ज्यांमध्यें चेतना[5] न लेश वसे. ॥ १२
'हा! भीम! हा! धनंजय! न स्वर्गीं सुख पहाल, हा! नकुळा! ।
हा! सहदेवा! दोष त्यजितां मज[6] काय हा लहान[7] कुळा? ॥ १३
गेलासि केंवि भीमा! त्यागुनियां मज गुरुप्रति[8], ज्ञात्या! ।
त्यजिल्या सुयोधनोरुध्वंसादि[9] कशा गुरु[10] प्रतिज्ञा[11] त्या? ॥ १४
वत्सा[12]! न भंगलासि[13] प्रभुशींहि[14] करुनि तशाहि[15] विषम[16] रणा; ।
कालविलें[17] काय जळीं त्या दुष्टांहीं वशाहिविष[18] मरणा? ॥ १५
विष कालविलें असतें, तरि सलिलीं करपतीं न कां नलिनें[19]? ।
अलिनें[20] त्यजिलीं असतीं, होतीं तुमचींहि आननें[21] मलिनें. ॥ १६
गेला स्वर्गासि, बरें, जा, परि कवणासि हीं[22] निरविला[23], हो! ।
अत्यद्भुत हें म्हणतिल 'न कधींही पद्महानि[24] रविला हो.' ॥ १७
'विजयि[25]चतुर्बंधुचतुर्भुजलीलेकरुनि आक्रमीन रसा[26]' ।
ऐसेंचि म्हणत होतों, परि झालों आजि दीन मी नरसा[27]. ॥ १८

---

१. जुगाऱ्या! शठा! २. हे ठका! धर्मा! तुझ्याच कृतीसाठीं तूं आतां स्वप्राणावर पाणी सोड, आपली छीथू करून घे; अरे! तूं जर द्यूत न खेळतास तर तुझे चवधे बंधु तुला कां कंटाळले असते? [ही धर्माची स्वाधिक्षेपोक्ति आहे.] ३. प्रेतासारखे. ४. मीपणा. [अहम्=मी, ता=भाववाचक प्रत्यय.] ५. चलनवलनव्यापारशक्ति., ६. मज=धर्माला. ७. हा आमच्या कुळाला मोठाच दोष (डाग) होय—असा प्रश्नालंकारानें अर्थ ध्वनित केला आहे. ८. वडील भावाला. ९. सुयोधनाच्या मांड्या गदेनें चुरून टाकीन इत्यादि मोठमोठ्या प्रतिज्ञा. (अध्याय ३१३ श्लोक ५-६ पहा.) १०. मोठ्या. ११. सभापर्व—अध्याय ५ गीति ९१; अध्याय ७ गीति ११-१२, १६-१७ पहा. १२. हे अर्जुना. १३. पराजित झाला नाहींस. १४. शंकराशीं देखील. [वनपर्व—अध्याय ३ गीति १-३१ पहा.] १५. त्या प्रख्यात अशा. १६. भयंकर युद्धाला. १७. अर्जुनास उद्देशून धर्म म्हणतो:— हे अर्जुना! त्या सुप्रसिद्ध भयंकर किरातयुद्धांत तूं डगमगला नाहींस, पण आतां कसा मरण पावलास? त्या दुर्योधनप्रमुख दुष्ट लोकांनीं पाळलेल्या सर्पांचें विष तर तुला मरण यावें म्हणून पाण्यांत कालविलें नसेलना? १८. वश केलेल्या सर्पांचें विष. (अध्याय ३१३ श्लोक २२-२५ पहा.) १९. कमळें. २०. भ्रमरानें नलिनें त्यजलीं असतीं. २१. मुखें. २२. धर्म. २३. स्वाधीन केला. २४. कमळांची हानि सूर्याला कधींही होत नाहीं, परंतु सूर्याची हानि मात्र कमळास होते. कमळांना सूर्य कधीं मिळतो, कधीं न मिळतो, सूर्याला कमळें सदा मिळतात. २५. विजयशाली चवघे बंधु आणि चतुर्भुज कृष्ण यांच्या लीलेनें. २६. पृथ्वी. २७. मनुष्य असा.

[1]यांमागें न, व्यसनीं आजि बुडालों, जळीं [2]महोपळसा, ।
रे मुग्ध जीवशुक! जा सोडुनियां, लुब्ध या न हो पळसा. ॥ १९
मेले कसे अकस्मात्? [3]तेज असे, म्हणुनि होय न [4]व्याधी, ।
तर्क न चाले बहुधा, माझी [5]तृष्णाकुलाचि भव्या [6]धी. ॥ २०
प्रियबंधुमरणकारण शोधूं, जलपान करुनि, तर्कशतें, ।
जें क्षुत्तृट्प्रतिबंधा न गणी, मुनिचेंचि हृदय [7]कर्कश तें.' ॥ २१
चिंतुनि ऐसें प्याया गेला जों साधु दक्ष तोयातें. ।
विनिवारी तोंचि [8]सरस्तटगत बकरूप क्षय तो [9]यातें. ॥ २२
'रे [10]कौंतेया! केले अनुज तुझे प्रेतरूप म्यां चवघे, ।
तूं तरि वांच, हठें जळ सेवुनि मरतां उगेचि कां अवघे? ॥ २३
मत्प्रश्नाचें उत्तर दे, जळ सेवूं नकोचि, थांब कसा.' ।
धर्म म्हणे, 'ऐसा तूं कोण प्रभु, जाहलासि कां बकसा?' ॥ २४
'मी [11]यक्ष' असें सांगे दावी प्रकटुनि शरीर [12]पर्वतसें, ।
पूर्वी कधींहि झालें प्राप्त न [13]आश्चर्यभीतिपर्व तसें. ॥ २५
धर्म म्हणे, '[14]अग्निपुढें पांडित्य करील कांय कापूस? ।
कळल्या उत्तर देइन, पुसणें तें यक्षनायका! पूस.' ॥ २६
यक्षातेंचि न निववी [15]नृपदत्त [16]प्रश्नशतसमुत्तर तें ।
सुश्रोतृवृंद [17]ज्यांच्या श्रवणें होऊनि बहु [18]समुत् तरतें. ॥ २७

---

१. आजपर्यंत खऱ्या व्यसनांत म्हणून मी (धर्मराज) बुडालों नव्हतों. आज मात्र जसा एकादा मोठा दगड पाण्यांत बुडावा तसा भ्रातृविनाशरूप व्यसनांत बुडालों आहें. हे मूर्खा! जीवशुका! (राघ्या जीवा!) या पळसा (पळसाप्रमाणें) बाह्यतः मनोहर दिसणाऱ्या संसारसुखाला, ऐहिक ऐश्वर्याला) लुब्ध होऊं नको, त्याला सोडून जा. [ही धर्माची स्वाधिक्षेपोक्ति आहे.] २. मोठा दगडसा. ३. यांचीं शरीरें अविक्षत होतीं म्हणून तेज कायम होतें. ४. रोग. यांचा मरणहेतु व्याधि नव्हे. ५. तृषार्त. ६. बुद्धि. ७. कठिण. ८. सरोवराच्या तीरावर असणारा (शैवलमत्स्यभक्षक) बकरूपधारी यक्ष. ९. धर्मातें. १०. अध्याय ३१३ श्लोक २९-३० पहा. ११. मी पक्षी जलचर नसून यक्ष आहें. [अध्याय ३१३ श्लोक ३६ पहा.] १२. पर्वतोपम. १३. जेव्हां यक्ष विरूपाक्ष, महाकाय, पर्वतोपम, ज्वलनार्कसदृश आणि अधृष्य असा दिसला तेव्हां धर्माला भय आणि आश्चर्य वाटलें. [अध्याय ३१३ श्लोक ३८-३९ पहा.] १४. हा दृष्टांत मूळांत नाहीं, पंतांनीं स्वप्रतिभेनें योजिला आहे. १५. धर्मराजानें दिलेलें. १६. प्रश्नशताचें उत्तम उत्तर. १७. ज्या प्रश्नोत्तराच्या. १८. प्रीतियुक्त असें.

यक्ष म्हणे, '**कौं**तेया ! या पांडित्यें[1] **गु**रुहि[2] तुज लाजो, ।
झालों प्रसन्न चवघांमाजि उठो एक इष्ट तुजला जो.[3]' ॥ २८
धर्म म्हणे, '**न**कुळ उठो.' यक्ष म्हणे[4], 'मान्य जे शतक्रतुला[5], ।
भीम नको, **वि**जय नको, आवडलें त्यजुनि अमृत[6] तक्र[7] तुला?' ॥ २९
धर्म म्हणे[8], 'बा यक्षा ! मज तों **माद्री पृ**था समा[9], नांवें ।
दोघींचीहि अंसावीं[10], म्यां[11] अधिक उणें कधीं न मानावें. ॥ ३०
उरलों मी **कुं**तीचा, **मा**द्रीचा ज्येष्ठ[12] पुत्र उरवा, हो ! ।
स्वर्गीं न अश्रुधारा त्या मातेचें[13] कदापि उर वाहो.' ॥ ३१
यक्ष म्हणे, 'बा साधो ! तूंचि परम धन्य[14] भरतसंतानीं[15], ।
तुझिया यशीं निवाया नित्य असावेंचि भरत[16] संतांनीं. ॥ ३२
पाहसि समभावें अनुजांसि, सुतांसहि असें न बा[17] पाहे, ।
सुप्तोत्थितसे[18] भ्राते चवघेहि तुझे उठोत, बापा ! हे.' ॥ ३३
त्या यक्षवरें उठले सुखसुप्त[19] तसे पळांत चवघे ते, ।
फार निवाले पांचहि, अमृताची जेंवि देव चव[20] घेते. ॥ ३४

---

१. या पांडित्याचा समस्त भाग म्हणजे यक्षप्रश्न आणि त्यांजवर धर्माचीं उत्तरें हें प्रकरण पंतांनीं गाळिलें आहे. यांत जरी तत्त्वज्ञान भरलें आहे तरी तें काव्यास अनुगुण नाहीं आणि सामान्य जनांस दुर्ज्ञेय म्हणून पंतांनीं त्याचा समावेश या अध्यायांत केला नाहीं; ही एक त्यांच्या मार्मिकतेची आणि रसिकतेची उत्तम साक्ष होय. याचा थोडासा मासला मुक्तेश्वरानें दाखविला आहे. [मुक्तेश्वर–वनपर्व, अध्याय २३ ओव्या ३९-१०४ पहा.] २. बृहस्पतीही. ३. अध्याय ३१३ श्लोक १२२ पहा. ४. अध्याय ३१३ श्लोक १२४-१२७ पहा. ५. इंद्राला. ६. भीमार्जुनरूप अमृत. ७. सापत्न नकुलरूप तक्र (ताक). ८. अध्याय ३१३ श्लोक १२८-१३२ पहा. ९. सारख्याच माता होत. १०. मागें पुत्रद्वारा अवशिष्ट रहावीं, दोघींसही पुत्र असावे–असा भाव. ११. धर्मशील आणि धर्मरत जो मी त्या म्यां. १२. नकुल. १३. माद्रीचें. १४. श्लाघ्यजीवित. १५. भरताच्या कुळांत. १६. शिरत. १७. पिता. १८. प्रथमतः निजलेले नंतर उठलेले, निजून उठले असे. ['सुप्तोत्थित' हें कर्मधारय समासाचें उदाहरण आहे. यास विशेषणोभयपद कर्मधारय असें म्हणतात. एकाच व्यक्तीशीं संबंध आहे अशा लागोपाठ घडणाऱ्या आनुक्रमिक दानक्रियांचीं दर्शक जीं कृदंतें त्यांचा समास करतात, मात्र जी क्रिया आधीं घडली तिचें दर्शक जें कृदंत तें आधीं येतें. जसें–स्नातानुलिप्त (नर)=आधीं स्नान केलेला, नंतर उटी लावलेला; परिभुक्तमुक्त (वलय) आधीं उपभोगिलेलें, नंतर टाकलेलें; पीतोद्गीर्ण, पीतप्रतिबद्ध, इत्यादि.] १९. सुख (सुखकारक) सुप्त (निद्रा) ज्यांचें ते. सुखं सुप्तं येषां ते सुखसुप्ताः, हा बहुव्रीहिसमास होय. २०. स्वाद.

भूप म्हणे, 'यक्ष न तूं, कोण प्रभु? अद्भुतप्रभावांचे ।
लीलेनें [1]असु हरिले, न तुजपुढें आमुची [2]प्रभा वांचे.' ॥ ३५
पुसतां ऐसें प्रेमें सांगे तो त्या नृपास, 'मज [3]तात ।
धर्म, असें जाण [4]सुता! कवि ज्याची [5]सम कृपा समजतात. ॥ ३६
झालों प्रसन्न, वत्सा! धर्मात्मा तूंचि धन्य [6]मत्तनया! ।
वर माग मत्प्रसादा पात्र भला होय अन्य मत्त न या.' ॥ ३७
भूप म्हणे, 'हें द्या, ज्या हरिणहृता सांपडोत त्या अरणी.' ।
धर्म म्हणे, 'या घे बा! कैंचा मृग? आमुचीच ती करणी. ॥ ३८
माग दुजा वर, बा! गा! घ्यावें सर्वस्व हें असे नातें; ।
वत्सा! तुला न द्यावें म्यां तातें वस्तु जें असेना तें.' ॥ ३९
राय म्हणे, '[8]संवत्सर दुर्घट अज्ञातवास हा तातें ।
हो निर्विघ्न असा वर द्यावा, ठेवुनि शिरीं स्वहातातें.' ॥ ४०
[9]पितृपति म्हणे, '[10]विराटक्षितिपतिनगरीं तुम्हीं [11]विशंक रहा; ।
गुप्त असाल, उगाचि न वर गुरुवर [12]अतुललील शंकर हा. ॥ ४१
तिसरा वर माग, तुझ्या भुललों मी साधुनायका! महिम्या.' ।
वंदुनि म्हणे युधिष्ठिर, 'जिंकावा लोभ कोप [13]कामहि म्यां.' ॥ ४२
ऐसे [14]सद्वर देउनि [15]आशीरमृतें यथेष्ट वर्षोनी, ।
स्पर्शोनि शिरीं झाला [16]अंतर्हित [17]धर्मराज हर्षोनी. ॥ ४३
पांडव त्या विप्राच्या ठेविति आधीं [18]शिरोंबुजें चरणीं, ।
मग अर्पिति [19]धर्मप्रभुदर्शनवरलाभहेतु त्या अरणी. ॥ ४४
सहवासी [20]ब्रह्मसभा विनवुनि, घेउनि सुखें [21]तदाज्ञा, ते ।
गुप्त वसाया गेले, सरला वनवास जैं तदा ज्ञाते. ॥ ४५

---

१. अलौकिक पराक्रमाचे (पांडवांचे) असु (प्राण) लीलेनें (अनायासें) हरिले. २. कांति टिके. ३. अध्याय ३१४ श्लोक ६-११ पहा. ४. हे युधिष्ठिरा. ५. सर्वांवर सारखी. ६. माझ्या पुत्रा! ७. मीच मृगाचा वेष घेऊन त्या विप्राच्या अरणी हरण केल्या—असा भाव. [अध्याय ३१४ श्लोक १३ पहा.] ८. त्रयोदश वर्ष. ९. यमधर्म. १०. विराटराजाच्या राजधानींत. ११. निर्भय. १२. अनुपमकृति. १३. अध्याय ३१४ श्लोक २४ पहा. १४. उत्तम वर. १५. आशीर्वादरूप अमृतें. १६. गुप्त. १७. यमधर्म. १८. मस्तककमळें. १९. यमधर्माच्या दर्शनास आणि वरप्राप्तीस कारण अशा (अरणी). २०. बरोबर वास करण्याऱ्या विप्र मंडळीस. २१. त्या विप्रांची आज्ञा.

खगमृगवनदैवतदरिसरिदद्रिसरांसि हात जोडूनी, ।
रडले पांडव जातां सहवासी ब्रह्मवृंद सोडूनी. ॥ ४६

उपसंहार.

(गीतिवृत्त.)

ऐवं भक्तमयूरें श्रीमद्रामप्रसादघनपर्वीं ।
केलें तांडव तोषें श्रीमद्भारततृतीयवनपर्वीं. ॥



१. पक्षि, हरिण, वनदेवता, गुहा, नद्या, पर्वत, सरोवरें यांस. २. ब्राह्मणांचा समुदाय. ३. याप्रमाणें. ४. भक्त मोरोपंतानें; (पक्षी) मोरानें. ५. श्रीमद्रामप्रसाद हाच घनपर्व (जलदकाल) त्यांत.

मोरोपंतकृत महाभारत-वनपर्वाचीं परिशिष्टें.

१. पाठभेद.

गीति.	अर्ध.	पाठभेद.	पृष्ठ.
		अध्याय पहिला.	
१२	पूर्वार्ध	आकारेंचि परेंगित कळतें, बोलेन काय हो! कळतें?	३
३९	उत्तरार्ध	हा आणिला, दुखविला, सर्वांच्याही करील घातातें	६
		अध्याय दुसरा.	
९६	पूर्वार्ध	ती काम्यकीं प्रतिस्मृति विद्या उपदेशिली तया विधिनें	२५
		अध्याय तिसरा.	
१२	पूर्वार्ध	मिरविसि सुज्ञत्व कसा? अन्याला स्वकृत पाप लाऊनी	२९
		अध्याय चवथा.	
७	उत्तरार्ध	वाटे मज कितवासि त्यजुनि, मुनिजनीं वरूनि तप रतला	३९
८	,,	न असा अयश:पद कीं भूपदपदकीं जडोनि हा पडला	,,
९	,,	न तुम्ही दीन, न दु:खित, साधावें तें वनींहि साधितसा	,,
१०	,,	साक्षात शचीच सती होऊदे ग्लान न मुख न यश, स्त्री.	,,
१९	,,	हरदृगनलीं जळाला रतिच्या विटलाचि तो रुचिरत रता	४०
१८०	पूर्वार्ध	जीवन सखा पुसे, 'ही कोण अरे!' जीस नित्य शोधिसि रे!	५९
१८१	,,	आठवत्ये मज कोणीं मंदें त्यजिली वनांत ही बाळा	,,
२१३	,,	आले पुष्कळ राजे सकुमारहि त्या स्वयंवरासि, अहा!	६२
२७३	उत्तरार्ध	ती त्यासि म्हणे 'सुतस्त्रीत्यागी साधु पाहिला काय?	६९
		अध्याय पांचवा.	
५४	पूर्वार्ध	चित्तीं हांसोनि म्हणे, 'भीता भय दाखवूं नको, पावें	८१
१०२	उत्तरार्ध	सदयप्रभुप्रसादा पात्र न होईल नम्र सुजन कसा	८९
		अध्याय सहावा.	
८	पूर्वार्ध	त्वत्प्रश्नाचें उत्तर देता ज्ञाता करील तुज मुक्त	९४

गीति.	अर्ध.	पाठभेद.	पृष्ठ.
२६	पूर्वार्ध	धर्म म्हणे, 'कथितोंचि, स्ववचाला जरिहि तूं न जपशील	९६
५०	पूर्वार्ध	स्तुति न दिल्या त्वां आशीराशी, श्रितसर्वलोक-कल्पतरो	९९
५६	उत्तरार्ध	श्रवणें धर्म ब्राह्मणगण नारददेव देवही डोले	१००
		अध्याय सातवा.	
६१	,,	तुज वृत्त काय सांगों? होइल अति तैलतप्त कानातें	११३
११८	पूर्वार्ध	जोंवरि न अर्जुनातें मारीन रणांगणांत मी निकरें	११८
		अध्याय आठवा.	
१७	,,	नेसविता झालासि प्रेमें तूं करुनि यादवा! लुगड्या	१२१
२६	उत्तरार्ध	मीच नव्हे काय इची सखि! सुरभिसरींच सर्वथा लीला	१२२
		अध्याय नववा.	
४४	,,	अभिमुख मरोनिच तरे पळतां न महाबलायन पर तरे	१३३
७२	,,	हो मशकमक्षिकाहर गरुडा उडवी असें नसे चवर	१३७
		अध्याय दहावा.	
१	उत्तरार्ध	सांगा मत्सम मदधिक जरि इष्टश्रुत असेल लोकांत	१३८
११	,,	साधु बिभीषण मालिन्यात्मज ज्या त्रिभुवनेंहि वानावें	१३९
१९	,,	जो तारणीं अरींचा, स्थैर्यें जैसा महीध्र भूपधर	१४०
७९	,,	तुमच्या साधुत्वाची कळली हे शुष्क राक्षसी माया	१४७
		अध्याय अकरावा.	
४९	पूर्वार्ध	भूजेसि निजस्कंधीं घेउनि तो राक्षसेंद्र चोर पळे	१५७
		अध्याय बारावा.	
६३	,,	गांठिति त्या कपिकटका अरिसेना, जेंवि वन्हिच्या पुंजा	१७९
		अध्याय तेरावा.	
७	पूर्वार्ध	जा, वत्से! शोधुनि ये वरुनि मनें मानल्या कुलीनातें	१९७

गीति.	अर्ध.	पाठभेद.	पृष्ठ.
४७	पूर्वार्ध	जे पक्षी जे श्वापदसर्प अधिष्ठूनि कानना वसती	२०३
६१	उत्तरार्ध	स्वगुरुव्रतप्रसादें सद्गतिसि न रोधितील हेति कडे	२०५
९६	पूर्वार्ध	वाखाणिति मुनि पाहति मुनिदारहि भासुरव्रत तिला जे	२१०
१०२	,,	सावित्रीनें कथिलें तें वृत्त अशेष साधुपद नमुनी	२११
		अध्याय चवदावा.	
२०	उत्तरार्ध	जें सत्कृतियश कैंचें जीवनदाही सुधानदा त्या तें?	२१६
		अध्याय पंधरावा.	
१०	,,	मज बंधु एक तरि जळ द्याया आला पहा न सायकसा	२१९
१९	,,	रे मुग्ध जीवशुकसा सोडुनियां, लुब्ध या न हो पळसा	२२१

२. अधिक टीपा.

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	अध्याय पहिला.	
१०	धृतराष्ट्र विदुराला म्हणतो (उत्तरार्ध)–हे विदुरा! वृष्टिगुण जसा नभाला (आकाशाला) किंवा उखराला (खडकाळ जमीनीला) लागत नाहीं तसा सुसंगतिगुण दुष्टाला लागत नाहीं. आमच्या सुसंगतीचा तुला (दुष्टाला) कांहीं उपयोग घडला नाहीं, जसा पर्जन्याचे संगतीचा खडकाळ जमीनीला किंवा आकाशाला कांहीं उपयोग होत नाहीं. पाऊस पडल्यानें आकाश किंवा खडकाळ जमीन आर्द्र किंवा सुपीक होत नाहीं. वृष्टिगुण नभा कीं (किंवा) उखरा न लागे–असा अन्वय.	२
१४	पूर्वार्धांत स्वभावोक्तियुक्त उपमा आहे व चवथ्या चरणांत रूपक आहे. दुरुक्ति आणि लत्ता यांचा अभेद मानिला आहे, म्हणून रूपक झालें.	३
१७	पूर्वार्धांत सांग रूपक आहे. यांत साक्षेप अशीं दोन रूपकें असून तीं मिळून एक कल्पना झाली आहे, तेव्हां हें सांग रूपक झालें. वनपर्व–अध्याय ११ गीति ४६ हें सांग रूपकाचें उदाहरण होय.	३
२१	यांत अप्रस्तुतप्रशंसा (अन्योक्ति) नामक अलंकार आहे. जेथें ज्या गोष्टीचें वर्णन करावयाचें असतें, त्या गोष्टीचें वर्णन न करतां, ज्या गोष्टीचें उदाहरण ध्यावयाचें असतें तिचेंच वर्णन केलें असतें, म्हणजे जेथें प्रस्तुत गोष्टीचें साक्षात् कथन न करतां तिचा प्रत्यय यावा म्हणून अप्रस्तुत गोष्टीचें वर्णन असतें आणि या प्रकारें प्रस्तुत गोष्ट गर्भितार्थानें दर्शविली असते, तेथें **अप्रस्तुतप्रशंसा** नामक अलंकार होतो. हा 'पर्यायोक्ता'चा एक प्रकार आहे. यांत अप्रस्तुत (अप्राकरणिक) व्यवहाराचें वर्णन असून त्याचें पर्यवसान प्रस्तुत (प्राकरणिक) विषयावर असतें. यांत अप्रस्तुत वृत्तांच्या वर्णनानें प्रस्तुत वृत्ताचें ज्ञान व्हावयाचें असतें म्हणून यांत सामान्यविशेषभावसंबंध किंवा कार्यकारणभावसंबंध असतो. प्रकृत पद्यांत 'काककुल' 'आम्र' आणि 'पिक' अप्रस्तुत व 'धार्तराष्ट्रकुल,' 'क्षत्ता' आणि 'धर्म' प्रस्तुत–अशी पदांची योजना समजावी. या अलंकाराला इंग्रजींत Allegory असें म्हणतात. याचीं उदाहरणें:—(१) 'द्वारीं मृगपतिहस्तांतूनि अहो! वीरराय! जी मुक्ता, । ती सेविजेल इतरें सिंहावांचोनि काय जी मुक्ता? ॥' [आदिपर्व–	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	अध्याय ११ गीति ८], (२) 'राजसुतेचें यश जें तुज येइल काय गे! दरिद्रे! तें, । पाहसि विकावया तूं केशरमौल्यें कसें हरिद्रेतें? ॥' [आदिपर्व–अध्याय १० गीति १८], (३) उंच वाढला एरंड । तरीं कां होईल इक्षुदंड ॥,' (४) 'जरी गर्दभ वेगें धांवे । तरी कां अश्वमोल पावे ॥,' (५) 'कुमुदिनी काय जाणे तो परिमल । भ्रमर सकळ भोगीतसे ॥,' (६) 'पाषाण जीवनीं असतां कल्पवरी । पहातां अंतरीं कोरडा तो ॥' [तुकाराम], (७) 'मधुपासि बहु प्रिय जो आत्मप्राणव्रजासम स्तबक, । सकलरसिक प्रिया त्या हुंकोनि न पाहती समस्त बक. '॥ [वनपर्व–अध्याय १२ गीति २८.], (८) 'ती सुमति म्हणे 'ताता, न त्यजुनि पयोधिला नदी परते, । न पतंगचित्तवृत्ति क्षणही रत्नीं त्यजूनि दीप रते. ॥' [वनपर्व–अध्याय १३ गीति २२.], (९) 'शशमंडळींत कोल्हा म्हणतो, 'मी सिंह.' वल्गना करितो. । जोंवरि न पाहिला गजमुक्ताफळकवळभक्षिता हरि तो. ॥' [कर्णपर्व–अध्याय २७ गीति १२].	४
२४	पूर्वार्धांत 'अपन्हुति' आहे. 'हें मुख नव्हे तर चंद्रच' असें म्हटलें म्हणजे 'अपन्हुति' झाली. 'तो विदुर दवडिला नाहीं, तर कुशलविसर (कल्याणसमूह) दवडिला' असें वर्णन आहे, म्हणून अपन्हुति होय. वाक्यांतील अलंकार थोड्या फेरफारानें कसे बदलतात ते पहा. 'हें मुख चंद्रच आहे' असें म्हटलें म्हणजे **रूपकालंकार** झाला. 'हें मुख चंद्रासारखें आहे' यांत **उपमालंकार** झाला. 'हें मुख जणूं काय चंद्रच आहे' यांत **उत्प्रेक्षा** झाली. 'हें मुख चंद्र समजून चकोर त्यासभोंवतीं घिरट्या घालतो' यांत **भ्रांतिमान्** अलंकार झाला. 'हें मुख मुखासारखें आहे' **अनन्वय**. 'मुखासारखा चंद्र आहे' **प्रतीप**. 'चंद्राला पाहून तुझें मुख मी आठवतों' **स्मरण**. 'मुखचंद्रानें ताप शमतो' **परिणाम**. 'अहो! हें मुख आहे किंवा चंद्र आहे' **संदेह**. 'चंद्र असें समजून चकोर आणि कमल असें समजून भ्रमर तुझ्या मुखावर आसक्त असतात' **उल्लेख**. 'हा चंद्र होय' **अतिशयोक्ति**. 'मुखानें चंद्रकमलांस जिंकिलें' **तुल्ययोगिता**. 'रात्रौ चंद्र आणि तुझें मुख हर्षतात' **दीपक**. 'तुझ्या मुखावर मी आसक्त आहें, चंद्रावर चकोर आसक्त आहे' **प्रतिवस्तूपमा**. 'आकाशांत चंद्र, भुवनांत तुझें मुख' **दृष्टांत**. 'मुख चंद्रकांति धरितें' **निदर्शना**. 'निष्कलंक मुख चंद्राहून सुंदर असतें.' **व्यतिरेक**. 'तुझ्या मुखाबरोबर चंद्र रात्रौ हर्ष पावतो' **सहोक्ति**. याप्रमाणें वाक्यांत	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	थोडा फेरफार केला कीं लागलाच अलंकारांत ही बदल होतो. [श्रीमद्-प्पयदीक्षितप्रणीत **'चित्रमीमांसा'** पृ० ५.]	४
२६	उत्तरार्धांत **कार**कदीपक आहे. यांत कर्ता एक असून त्याचा अनेक क्रियांशीं अन्वय झाला आहे म्हणून हा 'कारकदीपक' अलंकार होय.	४
३९	पूर्वार्धं स्वहितकर='सु+अहितकर' आणि 'स्व+हितकर' असे दोन अर्थ या पदापासून संभवतात, ते चिंतनीय आहेत.	६
४२	पूर्वार्धांतील उद्गार अमोलिक आहे. यांत तर नीतिशास्त्राचें एक मुख्य तत्त्व वाचकांस सादर केलें आहे.	६
४८	यांतील उपमा फार सुरेख, साध्या आणि समयानुरूप आहेत.	७
४९	'सकरुण,' 'कृपालु' असें न म्हणतां 'ज्याच्या नांदे करुणा मनांत नयनांत' असें पर्यायानें वर्णन केलें आहे म्हणून हें सुरेख 'पर्यायोक्त' झालें.	७
६२	पूर्वार्धं. अनुप्रासचमत्कार. 'नक' हें पद चारदां आलें आहे.	९
७४	सप्ताक्षरात्मक यमक.	११
७६	या आर्येंत पंतांनीं व्यवहारांत कसें वागावें, आणि जीवितसाफल्य कशांत आहे आणि कुलीन पुरुषाचें योग्य कर्तव्य काय आहे हें थोडक्यांत वाचकांस कळविलें आहे. ही आर्या सदा ध्यानांत ठेवण्यालायक आहे, कारण यांतील अभिप्रायाप्रमाणें जो वागेल तो खरोखर संसारसागर सुखानें तरून जाण्यास समर्थ होणार आहे. या आर्येंत सप्ताक्षरात्मक यमक आहे.	११
८२	सप्ताक्षरी यमक.	१२
८५	यांत पूर्णोपमा आहे, कारण तिला आवश्यक अशा ज्या चार गोष्टी उपमेय, उपमान, उपमावाचक शब्द आणि साधारण धर्म त्या या आर्येंत उपस्थित आहेत. 'भीमगदा' उपमेय, 'माय' उपमान, 'जशि' उपमावाचक शब्द आणि 'मांडे वाढणें' हा क्रियारूपी साधारणधर्म.	१२
९०	'करी लगट-करील गट' हें पंताचें आवडतें ठरींव यमक होय.	१३
९१	पूर्वार्धांत पूर्णोपमा आहे. नाद व कृष्ण (उपमेय), वायु व कदली (उपमान), जेंवि (उपमावाचक शब्द) आणि कांपविणें (साधारण धर्म) अशा चारही गोष्टी उपस्थित आहेत.	१३
९५	सप्ताक्षरात्मक यमक आहे.	१४

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	अध्याय दुसरा.	
१४	या पद्यांत 'आठवली' या क्रियापदाचा प्रयोग आहे म्हणून यांत '**स्मरणा**'लंकार आहे. 'स्मरणें' धातूचा अथवा तदर्थक अन्य धातूचा प्रयोग जेथें होतो तेथें '**स्मरण**' नामक अलंकार होतो. हें द्रौपदीचें भाषण फारच करुणरसपरिप्लुत आहे.	१६
१८	उत्तरार्ध–हे पांच पांडव साक्षात् सायुध शिवच होत, परंतु शिव पंचमुख आहे आणि हे पांडव एकमुख आहेत. शिवाला पंचास्य, पंचानन असें नांव आहे ही गोष्ट लक्षांत असली पाहिजे. या पद्यांत '**न्यूनाभेद्-रूपक**' आहे, कारण शिव आणि पांडव यांजमध्यें जें न्यूनत्व आहे त्याचा अभेद कल्पिला आहे.	१६
२०	अन्वय–"स्त्रीलंघन करितयातें प्राकृत (जन) हि न साहती, हा! वातें हि (माझा) पदर हि न हालावा [अशा] मज कर लावावा न (ना)? [तुम्हीं कर] लावा पहा." अर्थ–सामान्य जनासही आपल्या स्त्रीची अमर्यादा करणारा सहन होत नाहीं. हर! हर!! वाऱ्यानेंही जिचा पदर हालूं नये अशी जी मी त्या मला [दुष्ट दुःशासनानें] कर लावावा ना? तुम्ही एखाद्या हलक्यासलक्या मनुष्याच्या स्त्रीस हात लावून पहा (म्हणजे तिचा नवरा तें कितपत सहन करितो हें समजून येईल). सारांश, द्रौपदी म्हणते, 'जर तुम्ही दुसऱ्याच्या बायकोचा अपराध केलात तर तो, तुम्हीं जसे दुःशासन मला त्रास देत असतां गप बसलां तसा, गप्प बसणार नाहीं. तो तात्काळ त्या नराधमाच्या नरडीचा घोट घेईल.'	१६
२२	पूर्वार्धांत 'अंब'शब्दाचा अर्थ 'बरें, अगे' असा घेतला असतांही चालेल.	१६
२३	पूर्वार्धांत 'सहोक्ति' अलंकार आहे.	१७
२९	उत्तरार्धांत उत्तम नीतिबोध आहे.	१७
३१	'हा नियम' 'हानि यम' ठरींव यमक आहे.	१७
३३	उत्तरार्धांत अनुप्रासचमत्कार आहे.	१८
३७	स्वसेला=स्व+सेला=निज+शेला. यमक साधण्यासाठीं येथें 'श'स्थानीं 'स'काराची योजना केली आहे. यमकत्वासाठीं असा समान वर्णांचा अभेद मानण्याचा प्रचार संस्कृतांतही आढळतो. यास आधार आहे तो असा—'रलयोर्डलयोस्तद्वज्जययोर्बवयोरपि । शसयोर्मनयोश्चान्ते सविसर्गाविसर्गयोः । सबिंदुकाबिंदुकयोः स्यादभेदेन कल्पनम् ॥' [किरातार्जुनीय–सर्ग १५ श्लोक १० टीका.]	१८
४७	पूर्वार्ध–'अंक हा रविला' हें द्रौपदीचें भाषण आहे. मागें ४४ व्या गी-	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	तींत 'व्यसनांत बुडालास भ्रात्यांसह सुज्ञ जरि, तथापि कसा?' असे द्रौपदीचे उद्गार आहेत, व या प्रस्तुत गीतींतही अशाच प्रकारचे उद्गार 'अंक हा रविला' या पदांनीं व्यक्त होत आहेत. तेजस्विवरा सूर्याला अंक (डाग) असावा हें जसें अगदीं विपरीत आहे त्याप्रमाणेंच तुला (तुजसारख्या नीतिसंपन्न पुण्यशीलाला) व्यसनप्रसंग असणें विपरीत वाटतें. सभापर्व–अध्याय ७ गीति ४२ (काव्यसंग्रह पृ० ६६) यांत याच दृष्टांतानें विपरीतार्थाचा बोध केला आहे. तुला व्यसनप्रसंग म्हणजे तेजस्विवरा रवीला अंकच होय. तुला व्यसन येणें अशक्य होय. उत्तरार्ध–द्यूत खेळून त्यांत आपलें सगळें क्षत्रियतेज घालविलेंस असें वाटे. द्यूतामध्यें तुझ्या कुशलत्वाची जी कीर्ति होती तीही त्वां घालविली असें वाटे.	१९
४९	उत्तरार्ध–'शास्त्री' असेंच पद छापील पुस्तकांत आणि हस्तलिखित पोथींत आहे. 'शास्त्री' हेंच पद योग्य आहे, सभेंत स्त्रीची दुर्दशा पाहणें शास्त्र्यांस योग्य नाहीं, व त्याच उद्देशानें पंतांनीं द्रोण, नदीसुत व तुम्हीं (धर्म) अशीं पदें घातलीं आहेत. 'तुम्हीं' या पदानें धर्मच उद्दिष्ट, इतर पांडवांकडे या पदाचा संबंध नाहीं. द्रौपदी धर्माशींच बोलत आहे. आर्येंतील 'शास्त्री' हें पद धर्माकडे जातें. धर्मास 'शस्त्री'=शस्त्रधर असें म्हणण्यापेक्षां 'शास्त्री'=धर्मशास्त्रज्ञ, धर्मवेदी म्हणणें बरें दिसतें. शिवाय याच आर्येंत 'सभेंत' असें पद असून त्यावर कटाक्ष ठेवून 'शास्त्री' हें पद पंतांनीं घातलें असावें. कारण सभा म्हटली म्हणजे धर्मशास्त्रास अनुसरून असावयाची, तेव्हां तींत जर कांहीं अनुचित वर्तन घडलें तर तें शास्त्र्यांनीं सहन करणें योग्य नाहीं. एखाद्या 'शस्त्र्यानें'=शस्त्रधरानें सभेंत कांहीं अनुचित वर्तन सहन केलें तर त्यांत कांहीं विशेष नाहीं. कारण सभा हें त्याचें रंगस्थान नसून त्यास शास्त्र माहीत बहुधा नसावयाचें, याकरितां 'शास्त्री' हें पद छापील पुस्तकांत व पोथींत असून अर्थाला आणि यमकाला अनुकूल आहे, तेव्हां सर्वथा ग्राह्य आहे.	२०
५३	पूर्वार्ध–यांत 'ति'वर्णाची आवृत्ति झाली आहे म्हणून ही पंक्ति चमत्कृतिजनक आहे.	२०
५५	पूर्वार्ध–यांत क्रोधाचें व्याघ्रव्यालांपेक्षां आधिक्य पंतांनीं वर्णिलें आहे म्हणून **अधिक** अलंकार झाला. जेथें एका पदार्थावर (आधारावर) दुसऱ्या पदार्थाचें (आधेयाचें) आधिक्य वर्णिलेलें असतें तेथें '**अधिक**'	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	अलंकार होतो. याचें लक्षण:—'आश्रयाश्रयिणोरेकस्याधिक्येऽधिकमुच्यते' [साहित्यदर्पण १०।७२३.] 'आश्रयाश्रयिणोरानुरूप्यमधिकम्.' [अलंकार-सर्वस्व—काव्यमाला ३५ पृ० १३४.] 'महतोर्यन्महीयांसावाश्रिताश्रययोः क्रमात् । आश्रयाश्रयिणौ स्यातां तनुत्वेऽप्यधिकं तु तत् ॥' [काव्यप्रदीप १०।४२.] वनपर्व—अध्याय १२ गीति १४५ 'जो पीडिला—तदधिक कसा नव्हे प्रभु, जो दे सुख हरुनि भार भरतातें' यांतही 'अधिक' अलंकार आहे.	२०
५९	हीं पद्यें (५९-७५) फारच सुरेख आणि मनोहर आहेत. यांतील **भीमोक्ति** ही **पंतांच्या** प्रतिभेची भरपूर साक्ष देत आहे. अशा सुंदर समयोचित आणि हृदयद्रावक कवितेस प्रसवणाऱ्या प्रतिभेचा महिमा वर्णावा तेवढा थोडाच. या **भीमोक्तीवरून पंतांला** प्रकृतिवैचित्र्याचें आणि विकारवैचित्र्याचें ज्ञान किती मार्मिक होतें हें स्पष्ट होतें. कवि हा कामरूपधारी बहुरूपी होय, त्याला आपल्या पात्रांच्या अनुरोधानें वेषांतर करून रंगभूमीवर येऊन तत्तत्सदृश वर्तन ठेवणें भाग पडतें. **पंत** आतां भीम झाले आहेत, तर क्षणभरानें **द्रौपदी** होणार आणि पुन: एक क्षण गेला नाहीं तोंच **दुर्योधन, भीष्म** अथवा **विदुर** बनणार. अशीं क्षणोक्षणीं पालटणारीं रूपें धारण करून वाचकांपुढें येणारा बहुरूपी मोठा चतुर असला पाहिजे. **पंत** हे द्रौपदी, भीम, धर्म, अर्जुन, कृष्ण, धृतराष्ट्र, दुर्योधन, कर्ण, विदुर इत्यादिकांचीं रूपें घेऊन जेथें जेथें बाहेर पडतात तेथें तेथें त्यांची कृति तादात्म्य पावलेली आहे असें दिसून येतें. कवीची खरी करामत मुळाबरहुकूम चित्र काढण्यांत आहे आणि तें त्यानें हुबेहुब काढलें म्हणजे त्याचें काम झालें. या न्यायानें पाहतां, **पंतांनीं** आपल्या रम्यवाणीनें **भीमाचें** जें चित्र चितारिलें आहे तें यथार्थ नाहीं असें कोण म्हणेल? तसेंच असें चालतें बोलतें चित्र काढणाऱ्या **पंताच्या** ठिकाणीं परमेश्वरी प्रेरणा, अन्तःस्फूर्ति, दिव्यदृष्टि आणि असामान्य सहृदयता हे गुण नव्हते, असें कोण म्हणेल?	२१
६६	भरंवसा=भरवश, भरोसा. [भरवशो महान् प्रत्ययः । 'भरोसा' इति भाषया । 'स्तुतिकुसुमांजलि'—स्तोत्र ११ श्लोक ३२ टीका पृ० १७० पहा.]	२२
६९	उत्तरार्ध—अर्थांतरन्यास अलंकार आहे.	२२
८०	उत्तरार्ध—यांत जें तत्त्व **पंतांनीं** सांगितलें आहे तें नित्य अनुभवास येणारें असल्यामुळें त्याच्या सत्यतेविषयीं प्रत्येक विचारी मनुष्य साक्ष देईल असें आहे.	२३
८३	हीं पद्यें (८३-८७) सुबोधपर, रसाळ आणि प्रसन्न आहेत.	२४
१०१	उत्तरार्धांत रूपक आहे.	२५
११५	पूर्वार्धांत अनुप्रासचमत्कार आहे.	२७

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	अध्याय तिसरा.	
१	'न भावें'=सहजगत्या. 'न कळतां पद अग्निवरी पडे । न करि दाह असें न कधीं घडे' ह्या न्यायानें त्या चांडाळस्त्रीला मुक्ति मिळाली.	२७
२	उत्तरार्ध–कैलास=शिवाचें क्रीडास्थान. [कैलास–'**कैलासो** हिमवांश्चैव उत्तरे वर्षपर्वतौ । पूर्वपश्चायतावेतौ अर्णवान्तरुपस्थितौ ॥' इति ब्रह्मांडपुराण:. '**कैलास:** कनकाद्रिश्च मंदरो गंधमादन: । क्रीडार्थं निर्मिता: शंभोर्देवै: क्रीडाद्रयोऽभवन् ॥' इति शंभुरहस्ये. **श्री**कंठचरित–सर्ग ४ कैलासवर्णन पहा. पृ० ४६-५८.]	२७
७	पूर्वार्ध–यांत अनुप्रासचमत्कार असून शब्दध्वनि हा अर्थाचा प्रतिध्वनि आहे. बाणांचा होणारा खरखर आवाज हा अर्थानुरूप आहे. **पोप** कवीनें आपल्या एका ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, 'The sound must seem an echo to the sense[*Essay on Criticism*] कवितेचा ध्वनि कवितेच्या अर्थाचा प्रतिध्वनि असावा. हें पाश्चात्य कविजनांचें तत्त्व पंतासही संमत असल्याचें दिसून येतें. या तत्त्वाचा अवलंब सद्योजातमरण राजकवि **टेनिसन्** यांनींही पूर्णत्वानें केल्याचें त्यांच्या काव्यांवरून दृष्टीस पडतें. 'When chattering flints battered with clanging hoop' अशी शब्दरचना टेनिसनच्या काव्यांत चहुंकडे आढळते. अर्थानुषंगानें शब्दरचना कोमल, कठोर, मृदु, मधुर, कर्कश अशी असावी हें तत्त्व पंताच्या ध्यानांत सदा वागत असे. यास प्रमाण पाहिजेच असेल तर, 'गोपशिशु म्हणति, 'पलिसा ललतां हलिनेंचि झालिला पाय,। गाला उलोनि पलला, सल्व खलें, नवल कलितसां काय?' ॥ १ ॥ समजावुनि त्यांसि म्हणे,'ऐसें लालिलचलासि मालीन । कां ललतां आललतां पलतां मी सागलांत तालीन.' ॥ २ ॥ इत्यादि गीति पहा.	२८
९	उत्तरार्ध–वज्रपाणि=इंद्र-वज्र आहे पाणीच्या ठायीं ज्याच्या तो वज्रपाणि. इंद्रानें हातांत वज्र घेऊन पर्वतपक्षांचें छेदन केलें अशी पौराणिकी कथा आहे.	२८
१५	उत्तरार्ध–यांत 'शिवावर' असें न म्हणतां 'पढवी जो चापश्रुति रामासि तयावरि' असें वळसा घेऊन वर्णिलें आहे म्हणून हें '**पर्यायोक्त**' होय.	२९
२३	पूर्वार्ध–यांत '**कारकदीपक**' अलंकार झाला आहे. तसेंच अनुप्रासचमत्कृतीही साधली आहे.	३०
३०	उत्तरार्ध–स्मित=दांत न दिसतां व स्वर स्पष्ट न होतां गालांतल्या	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	गालांत जें मधुर हंसणें तें. [स्मितलक्षण–'ईषद्विकसितैर्गण्डैः कटाक्षैः सौष्टवान्वितैः । अलक्षितं द्विजद्वारे सूत्तमानां स्मितं भवेत् ॥' इति नाट्यलोचनः. 'ईषत्प्रफुल्लितैर्गण्डैः कटाक्षैः सौष्टवान्वितैः । अदृष्टदन्तकुसुमैरुत्तमानां स्मितं मतम् ॥' इति भरतः–मालतीमाधव–जगद्धरकृतटीकानुरोधतः पाठान्तराणि–अंक १ ला पृ० २२ निर्णयसागर छापखान्यांतील आवृत्ति.]	३१
३१	उत्तरार्ध–'हरी जो स्वपद स्मरतांचि आशु पतनातें' हें लांब वाक्य 'शंकरा'बद्दल आहे म्हणून यांत 'पर्यायोक्त' आहे.	३१
	उत्तरार्ध–यांत 'अर्थांतरन्यास' अलंकार झाला आहे.	३१
३८	राई आणि गिरि यांचा प्रयोग लघुतमत्व आणि गुरुतमत्व दाखविण्यासाठीं करण्याचा प्रचार मराठी आणि इंग्रजी या भाषांत दिसून येतोः–राईचा पर्वत करणें=To make a mountain of a mole-hill. संस्कृतामध्यें तिले तालं पश्यति, परमाणुमपि पर्वतीकरोति, इत्यादि प्रयोगद्वारा अतिशयोक्ति दाखवितात.	३२
४१	शिर हुंगी='शिरस्याघ्राणं गुरुजनस्यापत्येषु वात्सल्यद्योतकम्' [मालतीमाधव–अंक ४ पृ० १०४ टीका. 'निर्णयसागरा'ची आवृत्ति.]	३३
५४	शिलीमुख=बाण; भ्रमर. ['अलिबाणौ शिलीमुखौ' इत्यमरः । शिली शल्यं मुखे यस्य.] 'मधुव्रते खगे बाणे शिलीमुखः' इति लिंगाभट्टः.	३४
५५	'सुखविला साचा' 'सुखविलासाचा'–हें ठरींव यमक आहे. [वनपर्व–अध्याय ४ गीति ३०५. पृ० ७३.]	३४
५६	'उर्वशी' असें सरळ न म्हणतां पर्यायानें 'जीच्या सुरसत्रपुढें खालें वदनासि अमृतसर घाली' असें म्हटलें आहे, म्हणून हें 'पर्यायोक्ता'चें उदाहरण होय.	३५
५९	यांतील (५९-७१) अर्जुन आणि उर्वशी यांचें संभाषण फार चित्तवेधक आहे.	३५
६०	यांत शृंगारवर्णन फारच खुबीनें व मार्मिक रीतीनें केलें आहे.	
७०	यांत नर आणि वानर यांतील भेदाचें दिग्दर्शन केलें आहे.	३६
७१	पूर्वार्धांत अनुप्रासचमत्कार उत्कृष्ट साधला आहे.	३६
७४	पूर्वार्ध–नलवानराविषयीं पुढील उतारे पुरे आहेतः– (१) 'नलः सेतुं करोत्वस्मिन् जले मे विश्वकर्मणः ।	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.

सुतो धीमान् समर्थोऽस्मिन्कार्ये लब्धवरो हरिः ॥'

[अध्यात्मरामायण–युद्धकांड–सर्ग ३ श्लोक ८४]

याचा भावार्थः–हे रामा! विश्वकर्म्याचा पुत्र जो नल नामक त्यानें माझ्या उदकावर सेतु बांधावा, तो हें काम करण्यास समर्थ आहे. त्याला ब्रह्मदेवापासून सेतुबंधनसामर्थ्यरूप वर मिळाला आहे.

(२) 'म्हणे सुवेळेसीं जावया दळभार। उपाय सांगें कांहीं सत्वर।
सागर म्हणे नळ वानर। ऋषींचा वर त्यास असे ॥ १ ॥
नळकपी बाळपणीं। शालिग्राम टाकी जळीं नेउनी।
मग ऋषी म्हणती जीवनीं। पाषाण तरोत तव हस्तें ॥ २ ॥
यालागीं सुवेळेपर्यंतु। नळाचे हातें बांधी सेतु।
असो आज्ञा मागोनि सरितानाथु। जाहला गुप्त स्वस्थानीं ॥३॥'

[श्रीधर–रामविजय–अध्याय २३–ओं० १२१–१२३.] ३६

७६ पूर्वार्ध–हरिच्या अर्धासनीं बसणें=इंद्राबरोबर अथवा इतर कोणाबरोबर अर्धासन वसावयास मिळणें हा एक मोठा सन्मान समजतात. [विराटपर्व–अध्याय ७ गी० ३ रघुवंश–सर्ग ६ श्लोक ७३. वनपर्व–अध्याय ५ गी० ५-११५ ११९-१२४.] ३७

८५ पूर्वार्ध–'भगवान् कल्पांतकालनट' हें 'पर्यायोक्ता'चें उदाहरण होय. ३८

८७ यांतील भाषण धर्माच्या स्वभावास अनुरूप नाहीं, तें महाभुज भीमाच्या अथवा धनुर्धराग्रणी अर्जुनाच्या स्वभावास फार शोभतें–असा कित्येकांचा आक्षेप येण्यासारखा आहे. संजयानें धर्माचें म्हणून धृतराष्ट्रास सांगितलेलें भाषण महाभारतांत आढळत नाहीं, तेव्हां हें पंतांनींच धर्माच्या स्वभावास न शोभणारें असें भाषण येथें योजिलें असेंही कोणास वाटण्याचा संभव आहे. पण असें मानण्याचें प्रयोजन नाहीं. हें भाषण धर्माचें नसून केवळ संजयाच्या पदरचें होय आणि धृतराष्ट्रानें पांडवांस त्यांचा राज्यभाग द्यावा या उद्देशानें त्याची येथें योजना संजयानें केली आहे. याप्रमाणें पूर्वोक्त आक्षेपाचा परिहार होतो. अथवा धर्मासही कधीं कधीं वीरश्रीस्फुरण येत असे अशीं क्वचित् उदाहरणें आहेत, त्यांपैकींच हें एक समजावें. उत्तरार्धाचा अर्थ–आम्हांला आमचें राज्यपद (कुरुगुरूंनीं) न दिलें तर कुरूंच्या (कौरवांच्या–दुर्योधनदुःशासनादिकांच्या) [आणि] गुरूंच्या (भीष्माच्या–द्रोणाच्या) रक्ताची चव आमच्या शरांला दावा (दाखवा.) ३८

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	अध्याय चवथा.	
१	अब्द (पु) संवत्सर, वर्ष ['अब्दो जीमूतवत्सरौ' इत्यमरः]. या अध्यायांत नलोपाख्यान आहे. मूळ वनपर्वांत याचे सुमारें एकहजार श्लोक (अध्याय ५३-७८) असून पंतांनीं त्यांतील कथानक सुमारें तीनशें पद्यांत आणिलें आहे. तेव्हां हें भाषांतर नसून स्वतंत्र प्रकरण होय असें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील. पंतांनीं हें प्रकरण स्वतंत्र रचिलेलें असून यांत जेथें जेथें प्रसंग आला तेथें तेथें आपल्या रसाळ वाणीनें आध्यात्मिकोन्नतिप्रापक सिद्धांताचें समर्थन करून वाचकांपुढें सुशिक्षणामृताचें चषक ठेविले आहेत. तेव्हां हा अध्याय इतर अध्यायांहून कमी आदराई नसून त्यांपेक्षां कित्येक गुणांत श्रेष्ठ आहे. यांत जागोजाग लोकव्यवहारास अनुलक्षून जे बोधप्रद उल्लेख केले आहेत तेही वाचकाच्या ज्ञानसंग्रहांत भर घालून त्याचें मनःसुमन प्रफुल्लित करणारे आहेत. तसेंच हा अध्याय हृदयंगम उपमादि अनेक अलंकारांनीं आणि मनोहर विचारांनीं भरलेला आहे. या अलंकाराचा, विचारांचा आणि उल्लेखांचा मूळांत गंध देखील नाहीं असें दोन्ही प्रकरणें ताडून पाहणाऱ्या शोधकास दिसून येईल.	३८
२	द्विजराज=द्विजांचा राजा, द्विजवर्य, ब्राह्मणश्रेष्ठ; (पक्षीं) चंद्र. येथें 'द्विजराज' हा शब्द श्लिष्ट आहे. हा द्विजराज बृहदश्व (स्वभक्तांचा) ताप शिल्लक ठेवणारा नव्हता (नाहींसा करणारा होता) [तापशांति करणें हा चंद्राचा धर्म सुप्रसिद्ध आहे.] विधु 'हा' (हाय हाय) म्हणोनि त्यासि (त्या बृहदश्वाला) कां न लाजो? बृहदश्व मुनीचा तापोपशमरूप प्रभाव पाहून संताप दूर करणाऱ्या चंद्राला कां लाज वाटूं नये? अवश्य वाटली पाहिजे.	३८
११	सती=साध्वी 'तुमची श्रुतिरति अनलसा हो' [व] हेही सती [अनलसा हो] असा अन्वय. यांत **तुल्ययोगिता** नामक अलंकार आहे. तुमच्या कानांनीं या कथानकाकडे जसें गोडीनें लक्ष पुरवावें तसेंच द्रौपदीसाध्वीनें ही निरलसपणें (काळजीनें) दमयंतीचें उदाहरण दृष्टीपुढें ठेवून तुमच्याशीं समाधानवृत्तीनें असावें—असा कविहृद्गतार्थ दिसतो. भास्करसा=सूर्यासारखा शत्रूंस दुःसहतापद, चंद्रासारखा मित्रांस आनंदप्रद आणि अग्नीसारखा प्रजाजनांस उपयोगीं पडणारा, याप्रमाणें तीन देवांचे हे गुण एकट्या नळांत होते—असा इंगितार्थ.	३९

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
१८	'देह' शब्द अत्री आहे. ही गीति सुरस, प्रसन्न आणि मनोहर अर्थानें भरलेली कशी आहे पहा. अश्या कवितेचा रसास्वाद घेण्यास वाचकाच्या आंगीं सहृदयता असली पाहिजे. "काव्याचा पूर्ण आस्वाद घेणें असेल, तर वाचकानें आपलें मन संकुचित न करितां, त्याची धांव मोठी ठेवून, कवीनें आपल्या वाक्चातुर्यानें निर्माण केलेलें लाघव समजण्याची त्यास संवय लाविली पाहिजे; व जगांत जें जें म्हणून उत्तम गणिलें आहे, त्याचें सौंदर्य व त्यापासून मनावर होणारे संस्कार हे नेहमीं जाणिले पाहिजेत." [रा. सा. कृ० प० गाडगीळकृत **'संसारसुख'** प्रकरण १६ काव्य–पृ० २५४	४०
२०	ही गीति किती सुरेख आणि प्रसन्न आहे ही! अशा कवितेला क्लिष्ट असें दूषण कोण लावील?	४०
२१	यांत **'सम'** नामक अलंकार झाला आहे. जेथें दोन पदार्थांचा संबंध (योग) झाला आहे तो अनुरूप अथवा उचित आहे असें वर्णन असतें तेथें 'सम' अलंकार होतो. येथें दमयंती व नल यांचा योग यथायोग्य आणि उचित झाला आहे असें वर्णन आहे, तेव्हां हा 'सम' अलंकार होय. याचें लक्षणः—**'समं** योग्यतया योगो यदि संभावितः क्वचित्' [काव्यप्रदीप–दशम उल्लास–३९ काव्यमाला पृ० ४४२], 'अनुरूपसंसर्गः समम्' [रसगंगाधर] दोन पदार्थांच्या संबंधाची योग्यता (अनुरूपता) त्यांच्या प्रकर्षाच्या अथवा निकर्षाच्या अनुरोधानें असली तरी चालते. पुढें ८७ व्या गीतींतही 'सम' अलंकार आहे.	४०
२२	राहो—**पंतांच्या** आर्यांत अंत्य यमक दोनचार अक्षरांचें असतें, निदान उपांत्य आणि अंत्य अशा दोन अक्षरांचें यमक हटकून असावयाचें, परंतु या आर्येंत तसें नाहीं. ही कसर पंतांनीं दोन्ही अर्धांत सुंदर अनुप्रास साधून भरून काढली आहे.	४०
२५	'विविधज्ञानविस्तारा'च्या पहिल्या पुस्तकाच्या ५ व्या व ७ व्या अंकांत 'मोरोपंत' या सदराखालीं कांहीं मजकूर लिहिलेला आहे, त्यांतील पुढील तीन उतारे घेतों:— "नलाख्यानांत कोठें एक आर्या आहे ती अशी— राधाप्राप्त्यर्थ जसा तो स्वकरगतामला यशा शिनळ। सोडी दमयंत्यर्थ क्षिप्रचि अति दुर्लभा तशाशि नळ॥ १॥ [वनपर्व–अध्याय ४ गीति २५.] यमक जोडण्यासाठीं ज्याणें भगवंताला शिनळ असें विशेषण दिलें,	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	त्याची भक्ती केवढी होती ती सहज ध्यानांत येईल. श्रीमद्भागवतांत दुष्टांनीं जी परमेश्वराची निंदा केली आहे, त्या श्लोकांचा टीकाकारानें प्रथम वास्तविक अर्थ सांगून, नंतर टीकेच्या योगानें भगवंताची निंदा आपल्याही तोंडून झाली म्हणून दोषशमनार्थ पुन्हां त्याच श्लोकांचा अर्थ ओढूनताणून स्तुतिपर केला आहे. **मोरोपंता**ला हें ठाऊक असून त्याला तें अभद्र भाषण करण्यास अगदीं संकोच वाटला नाहीं; किंबहुना लज्जा देखील वाटली नसावी.	
	येथें श्रीकृष्णाला शिनळ म्हणून, त्यानें राधेसाठीं आपलें निर्मळ यश घालवलें असें कवि म्हणतो. असें जर आहे तर त्याचे गुण कां गावे? श्रीमद्भागवतांत कृष्णाची आणि गोपींची क्रीडा शुकाचार्यानें वर्णिली आहे. परंतु शुकाचार्य एवढा साधु आणि ऊर्ध्वरेता असून त्याणें ती क्रीडा कधीं दूषिली नाहीं; परंतु त्या कृत्यांला भगवंताचीं यशें असें म्हटलें आहे. **मोरोपंता**ला तीं कृत्यें वाईट वाटत होतीं असेंही कोठें आढळत नाहीं. दुसरें, जर श्रीकृष्ण जार, तर त्याची उपमा नळाला साजत नाहीं. कारण नळानें हंसाला पाठविलें तें जारकर्माच्या हेतूनें नव्हे."	
	प्रस्तुत आर्या वनपर्वांतर्गत नलोपाख्यानांतील आहे. तिचा अर्थ उघडच आहे कीं, नलराजाच्या हातीं हंस सांपडला असतां तो त्यास सोडून देता झाला; कसा? तर जसें कृष्णानें राधेशीं रमण्याची इच्छा धरून आपल्या हातचें निर्मल यश घालविलें. या आर्येंत नलाचें आणि कृष्णाचें, दमयंतीचें आणि राधेचें, हंसाचें आणि यशाचें, असें तीन प्रकारचें साम्य कवीनें वर्णिलें आहे, व उपमालंकार केला आहे. वरील तीन साम्यांपैकीं चित्तास चमत्कार देणारें साम्य म्हटलें म्हणजे हंस आणि यश यांचें होय, व उपमेचा मुख्य भाग हाच होय. कृष्ण आणि राधा यांच्या जागीं आणखी कोणाची योजना केली असती तरी चाललें असतें; कारण त्यांचें नल आणि दमयंती यांशीं जें सादृश्य वर्णिलें आहे तें केवळ गौण आहे. मुख्याची गोष्ट कायती अमूर्त जें यश त्याशीं संस्कृत कवींच्या संकेतास अनुसरून मूर्त जो परम शुभ्र हंस त्याची तुलना करून दोहोंशीं 'सोडणें' या क्रियेचा चमत्कारिक रीतीनें अन्वय करून दिला आहे ही होय. ही तुलना यथार्थ असली म्हणजे कवीचें काम झालें; व जो खरा रसिक आहे त्याचें लक्ष तिच्या पलीकडे तिळमात्रही जाणार नाहीं. आमच्या टीकाकर्त्यानें कृष्णास 'शिनळ' हें विशेषण लावणें बरोबर आहे कीं नाहीं,	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.

शुक्राचार्यांचा प्रस्तुत प्रकरणीं कसा अभिप्राय होता व **मोरोपंतां**चा कसा होता, हंसाला जो दमयंतीकडे पाठविला तो जारकर्माच्या हेतूनें नव्हे, अतएव श्रीकृष्णाची उपमा नळाला साजत नाहीं,—वगैरे जें पांडित्य केलें आहे तें निवळ अरण्यरोदन आहे. त्याचा वरील आर्येतील उपमेशीं बिलकुल संबंध नाहीं. **मोरोपंतां**च्या धर्मसंबंधीं मतांविषयीं जर विचार कर्तव्य असता, तर प्रस्तुत लिहिणाराचा वरील सर्व ऊहापोह यथायोग्य होता; पण जोंपर्यंत कवित्वाच्या संबंधाचेंच विवेचन आहे तोंपर्यंत वरील धर्ममीमांसा केवळ अप्रस्तुत होय! (निबंधमाला–अंक ५९ पृष्ठें ८–१२.)

"**मोरोपंतां**च्या कवितेचे गुणदोष दाखवितांना कोणी कोणी त्याच्या भक्तीवरही दोषारोप केलेला आढळतो.

राधाप्राप्त्यर्थ जसा तो स्वकरगतामलायशा शिनळ ।
सोडी दमयंत्यर्थ क्षिप्रचि अतिदुर्लभा तशाशि नळ ॥ १ ॥
[वनपर्व–अध्याय ४ गीति २५]

यांत श्रीकृष्णास 'शिनळ' म्हटलें व शिनळाची उपमा नळराजास विवाहसंबंधीं कार्याच्या वेळीं योजिली, यापासून **पंतां**ची भगवान् श्रीकृष्णाविषयीं भक्ति निर्मल नव्हती. व उपमाचातुर्यही त्यास नव्हतें असा कोणी दोष दिला. त्यावर खंडणें समाधानेंही केलेलीं आढळतात. तेव्हां रुचिभिन्नत्वासंबंधानें कोणी यास दोष म्हणतात, कोणी गुण म्हणतात, असें झालें. यावरून वरील दोषारोप सत्य नाहीं हें प्रथम दर्शनींच दिसतें.

दुसरें तत्त्वतः विचार केला तरी दोषाचा लेशही वरील पद्यांत व वरील पद्यावरून **पंतां**त होता असें दिसत नाहीं.

पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः ।
पुण्यश्लोका च वैदेही पुण्यश्लोको जनार्दनः ॥

ह्या अतिप्रसिद्ध श्लोकाप्रमाणें जनार्दन [श्रीकृष्ण] आणि नल ह्यांचें साम्य किती मनोहर आहे बरें? गीतगोविंद, पद्मपुराण, या अतिपवित्र ग्रंथांवरून राधेचें महत्त्व व पुण्यसमृद्धि हिंदुलोकांस प्रसिद्धच आहे; त्याप्रमाणें तिजविषयीं श्रीकृष्णाचें अत्यंत निर्मळ प्रेमही प्रसिद्धच आहे; त्या प्रेमाशीं नळाच्या दमयंतीविषयक प्रेमाचें साम्य चमत्कृतिजनक नाहीं काय? त्याही पुढें यशाचें आणि हंसाचें साम्य करितांना तर **पंतानें** कमाल करून टाकिली आहे हें मार्मिक जन सहज समजतील.

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	'तो शिनळ' या पदावरून लक्षणेनें श्रीकृष्ण भगवान् असा अर्थ कवीनें ठेविला आहे. तो म्हणजे भागवतासारख्या पवित्र व प्रसिद्ध ग्रंथानें ज्याचें प्रेमपुरःसर वर्णन केलें आहे, व सर्व लोकांस जो विश्रुत आहे असा शिनळ (जार), ज्याला शुक, व्यास, नारद-प्रभृति भागवतोत्तम मोठ्या प्रेमानें सद्गदित होऊन चोरजारशिखामणि म्हणतात, ज्याच्या राधेसह अनेक गोपांगनांबरोबर झालेल्या जारक्रीडा वर्णन करितां करितां संस्कृत व प्राकृत कविवृंद भाटच बनून गेले आहेत; त्याला आमच्या पंतानें पुण्यश्लोकाचें उपमान कल्पून कौतुकानें व प्रेमानें शिनळ म्हटलें एवढ्यावरूनच पंताच्या ईश्वरभक्तीवर दोषारोप केला तर तें आरोप करणाऱ्याचें साहसच खरें! यापेक्षां अधिक काय म्हणावयाचें आहे!!	
	'यश सोडणें' याचा अर्थ 'पाठविणें' हा इष्ट असतां 'घालविणें' असा कोणी करितात. पाठविणें म्हणजे राधेला आपली कीर्ति समजे असें करणें आणि घालविणें म्हणजे राधेशीं जारकर्म करण्याची बुद्धी धरल्यानें यश घालवून अपयश घेणें. राधेच्या प्राप्तीकरितां कृष्णाची अपकीर्ति झाली अशी कोठें कथा नसून, तसें म्हटल्यानें नळराजवर्णनांतील सुनीति व पावित्र्य यांस उपमान दूषणकारक होण्याचा उघड संभव आहे. यास्तव 'घालविणें' असा अर्थ करण्यापेक्षां 'पाठविणें' असा अर्थ करणेंच उचित आहे. हें मर्मज्ञांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.	
	दुसरें, सोडणें या क्रियेचा ज्या अर्थी हंसावर प्रयोग केला त्याच अर्थी तो कुशल कवीनें यशावरही योजिलेला आहे. हंसाशीं शत्रुत्व जोडून किंवा पुन्हां भेट न घेण्याच्या बुद्धीनें नळराजानें त्यास सोडून दिलें आणि हंसवियोगाचें दुःख करित राहिला, असें जेव्हां मानावें तेव्हां घालविणें असा अर्थ करणाऱ्यांच्या मताप्रमाणें उपमानोपमेयाची समानक्रिया होईल!!! दमयंती प्राप्त होण्याकरितां तिजकडे नलराजानें हंसास पाठविलें, हा इष्टयर्थ चमत्कारिक रीतीनें दाखविण्याकरितां, त्या प्रसिद्ध शिनळानें (श्रीकृष्णानें) राधेच्या प्राप्तीकरितां आपल्या निर्मळ यशास तिजकडे पाठविलें ह्या मनोहर उपमानाची कवीनें योजना केली आहे हें उघड आहे. (मोरोपंतावरील हंसकृत निबंध—पृ० ५६-५९.)	
३१	या आर्येंत नळाच्या प्रतापाचें आणि लोकानंदजनकत्वाचें कसें सुरेख वर्णन आहे?	४१

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
३२	यांत 'समुच्चय' अलंकार झाला आहे. (वनपर्व–अ० १३ गी० ७८ अधिक टीपा पहा.)	४२
३३	या आर्येंत 'अनल' हें पद श्लेषात्मक आहे म्हणून यांत श्लेष अलंकार झाला आहे. नल नव्हे तो अनल किंवा अग्नि. पंतांच्या कवितेंत श्लेषाची योजना कोठें कोठें केलेली आहे, तरी त्यामुळें तिच्या प्रसादास धक्का पोंचलेला नाहीं.	,,
३४	पहिल्या अर्धांत 'सामासिक उपमा' आणि दुसऱ्या अर्धांत 'प्रतिवस्तूपमा' असे अलंकार आहेत त्यामुळें हीं अर्धें परस्परशोभाजनक झालीं आहेत.	,,
३५	प्रथमार्धांत 'परिसंख्या' आणि दुसऱ्यांत 'प्रतिवस्तूपमा' आहे.	,,
३७	उत्तरार्धाचा सान्वय अर्थः–हंस प्रत्युपकारीं हर्षीं बुडला [व] नळ कामज्वरीं (बुडाला). हा हंस नळास सांपडला असतां त्यानें याला पिंजऱ्यांत पकडून न ठेवितां जीवदान देऊन सोडिलें होतें, हा नलाचा हंसावर उपकार झाला होता. तो उपकार नलास दमयंती प्राप्त करून देण्याची खटपट करून त्यानें फेडिला. नलाचा आपल्यावर झालेला उपकार फिटला असें वाटून हंसास आनंद झाला आणि दमयंतीचें प्रेम (गीति ३६ पहा) आपणांवर आहे असें हंसमुखें कळल्यामुळें नळाला कामज्वर झाला. उपकाराची फेड केल्यामुळें हंसास आनंद होणें स्वाभाविक आहे. उपकार फेडण्यांत आनंद मानणें हें नीतिशिक्षणाचें उत्तम तत्त्व होय. अशा आध्यात्मिक उन्नत शिक्षणाचा अमोल लाभ पंताच्या कवितेच्या परिशीलनानें सहजगत्या होणारा आहे.	,,
३८	उत्तरार्ध—जे दुसऱ्यानें न सांगतांही त्याचें सुखासुख जाणण्याचा यत्न सदा करतात तेच समदृष्टि साधु होत, असें या अर्धांत पंतांनीं सांगितलें आहे.	,,
४२	'नवरी न वरी' इत्यादि लाटानुप्रासाचें उदाहरण होय.	४३
४४	सान्वय अर्थ—[ही] प्रियकार्यसाधिका युक्ति जरि भलतैशी [होती तरी ती जर] न सुचति [तर] ते सर्व साधि कामुक त्या साधुसंगतिमहालाभासहि मुकते–असा अन्वय. [दमयंतीप्राप्तिरूप] आवडतें काम साधणारी युक्ति (नळालाच दूत करून पाठविलें म्हणून) जरी भलतैशी (अयोग्य) होती, तरी पण जर ती सुचली नसती तर (दमयंतीविषयीं) कामुक (इच्छा करणारे) म्हणून साधि (दुःखी) असे ते सर्व इंद्रादिक देव त्या साधु नलाच्या संगतिरूप महालाभासहि मुकते (न पावते–आंचवते.) ही युक्ति सुचली ह्मणून नलाचा समागम तरी त्यांस घडला, नाहीं तर तो सुद्धां त्यांस दु-	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	लेभ होता. दुसऱ्या एखाद्या युक्तीनें दमयंती तर त्यांस प्राप्त झाली नसतीच, परंतु या युक्तीनें जो साधुसमागमलाभ घडला त्यासही ते इंद्रप्रमुख चवघे लोकपाल अंतरते.	४३
४८	'प्रभुजी'–हें संबोधनात्मक विशेषण फारच समयोचित आणि मार्मिक आहे. इंद्रादि देव गानलुब्ध मृगाप्रमाणें वर्तू पाहतात हें जाणून नलानें त्यांस त्यांच्या प्रभुत्वाची 'प्रभुजी' या संबोधनानें प्रसंगीं आठवण करून देऊन तसें न वर्तावें–मृगासारखें वागणें त्यांच्या पदवीला अनुचित–असें ध्वनित केलें आहे. या पद्यांतील 'सुरवर' आणि 'मृग' हीं पदें अत्यंत उच्च आणि अत्यंत नीच अशा परस्परविसदृश स्थितींचीं दर्शक असल्यामुळें देवांनीं स्वर्गभोग टाकून ऐहिक क्षुद्र भोगांकडे धांव घेतली हें फार अनुचित केलें असें ध्वनित करतात.	”
४९	इंद्रादिकांची कानउघडणी केल्यापासून कांहीं हांशील नाहीं असें जाणून नल त्यांची सविनय पायधरणी करतो. माझें मन दमयंतीवर बसलें आहे–तर तिच्याकडे मलाच आपल्या कार्यासाठीं दूत म्हणून कृपा करून पाठवूं नका, आपलें व माझें कार्य एकच आहे, तेव्हां माझ्या हातून दूताचें काम चांगलें होणार नाहीं–तर मला दूताच्या नात्यानें न पाठविण्याची कृपा करा–असा पहिल्या अर्धाचा भावार्थ आहे. देव नलास दूत करून पाठवीत असतां त्यानें न जाणें हें त्यांची अमर्यादा करण्यासारखें आहे. अमर्यादा झाली असतां ज्याची अमर्यादा झाली त्यानें अमर्यादा करणारावर रागें भरणें स्वाभाविक आहे. देवांची आज्ञा न पाळिल्यानें त्यांची अमर्यादा झाली म्हणून त्यांस राग येईल तर, तो न यावा, या उद्देशानें नल ह्मणतोः–देव हो! जो सुनय (नयसंपन्न पुरुष, नीतिमान्, नीतिनिपुण, सुज्ञ) आहे त्यानें आपल्या कोण्या (दासानें–दूतानें) (स्वातिक्रम) अमर्यादा केला इतक्याच कारणावरून त्यानें रागाऊं नये. देव हो! मला दूत करून आपण माझ्या हिताचा भंग करूं पाहतां व तो भंग न होऊं देण्यासाठीं मला आपली अमर्यादा करावी लागते, पण सरळमार्गानें आत्महित साधणें न्याय्य आहे म्हणून माझ्यावर आपण कोपूं नये. नीतिज्ञ पुरुष आपला अतिक्रम आठवून कोणावरही (कोणत्याही मनुष्यावर) रागावत नाहींत असा साधारण नियम आहे.	”
५०	यांत '**दीपक**' अलंकार झाला आहे. कोणा एका (प्रस्तुत) पदार्थाचें वर्णन करावयाचें असून त्या पदार्थावरील धर्म ज्यावर असतो अशा दुसऱ्या (अप्रस्तुत) पदार्थाचें वर्णन त्याच्याबरोबर क्रम न राखतां केलें म्ह-	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.

णजे दीपक अलंकार होतो. यांत प्रस्तुत (उपमेय) पदार्थ आणि अप्रस्तुत (उपमान) पदार्थ यांजवर असणारा धर्म एक असला पाहिजे. उपमेयाच्या स्थानींचा पदार्थ प्रस्तुत असून उपमानाच्या स्थानींचा पदार्थ अप्रस्तुत असतो. या गीतींत शब्दाचें (उपमेयाच्या स्थानीं असणाऱ्या प्रस्तुताचें) वर्णन कर्तव्य असून त्याजवर राहणारा अचल धर्म 'सदसि'वर (उपमानाच्या स्थानीं असणाऱ्या अप्रस्तुतावर) राहतो, म्हणून शब्दाबरोबर सदसीचेंही वर्णन केलें यास्तव हें 'दीपक' झालें. येथें अचलत्वरूप धर्मैक्य 'शब्द' आणि 'सदसि' यांजवर आहे. सारांश प्रस्तुत आणि अप्रस्तुत पदार्थांचा अन्वय एकाच धर्मावर करणें याचें नांव दीपक. याचें लक्षण:—

'अप्रस्तुतप्रस्तुतयोर्दीपकं तु निगद्यते । अथ कारकमेकं स्यादनेकासु क्रियासु चेत् ॥' [साहित्यदर्पण—का०६९६],'वदन्ति वर्ण्यावर्ण्यानां धर्मैक्यं दीपकं बुधाः । मदेन भाति कलभः प्रतापेन महीपतिः ॥' [कुवलयानन्द—का० ४९], 'प्रकृतानामप्रकृतानां चैकसाधारणधर्मान्वयो दीपकम्' [रसगंगाधर]. या अलंकारास दीपक अशी संज्ञा देण्याचें कारण दीपाचें सादृश्य याच्याशीं आहे हें होय. प्रासादाच्या अग्रभागीं ठेविलेला दीप प्रासादांत प्रकाश पाडून मार्गांतही पाडतो त्याप्रमाणेंच या अलंकारांत प्रस्तुतावर राहणाऱ्या धर्माचा प्रकाश प्रस्तुतावर पडून अप्रस्तुतावरही पडतो. नल प्रतापशाली वीर होता म्हणून संगरामध्यें हातांत तलवारही अचल असावी, असें अप्रस्तुतपदार्थद्वारा सूचविलें आहे. ४४

५१ दमयंतीच्या अंतःपुरांतील बंदोबस्त इतका कडेकोट आहे कीं तेथें वाऱ्याचाही प्रवेश होण्यास मार्ग नाहीं, मग माझा प्रवेश कोठून होणार—अशी अडचण नळानें दाखवून दूतकर्म करण्यास आपण असमर्थ आहों असें इंद्रास सूचविलें आहे. यांत अंतःपुराचें दुर्गमत्व व्यक्त केलें आहे. गीति ५३ व ५६ यांजकडे पाहिलें तर 'सुखें'—अडथळा न येतां, व 'अवारित'—कडेकोट बंदोबस्त असून कोणीही अडथळा केला नाहीं अशा प्रकारें, असाच अर्थ घेणें इष्ट आहे. 'दमयंतीकडे जाण्याच्या कामीं वायूच्यानेंही मजबरोबर धांव मारवणार नाहीं इतका त्वरित मी (नल) जाईन' असा प्रथमार्धाचा अर्थ कोणी कोणी करतात. ,,

५२ नळानें काढलेली अडचण इंद्र मोठ्या चातुर्यानें निवारण करतो. दमयंतीच्या अंतःपुरांत तुझा प्रवेश व्हावा. एवढें देखील काम जर आमच्या हातून होत नाहीं, तर सुज्ञ लोक आम्हाला 'प्रभु, प्रभुजी' असें

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	आदरपूर्वक संबोधून आमची स्तुति कां करतात? खुद्द नलानेंच इंद्राला 'प्रभुजी' असें संबोधिलें आहे. [गीति ४८ व ५१ पहा.]	,,
५५	या गीतींत दमयंतीनें नळाचें सौंदर्य वर्णून त्यानें अंतःपुरांत येऊन आपल्या पित्याचा (भीमाचा) अपराध केला असें फार नाजुक रीतीनें त्यास कळविलें आहे.	,,
५६	पूर्वार्ध—या पद्यांत 'दावा' हें पद 'द्यावा' अशा अर्थानें धरावें. या अर्धाचा अर्थः—आपणाला कोणी प्रतिबंध केला नाहीं असें (अवारित) आपण कसे आलां? आपला (येथें येण्यांत) हेतु काय हें स्पष्ट आयकूं द्या. आपण येथें कशासाठीं आलां हें तर ऐकूं द्या. 'आयकूं द्या' या पदानें दमयंती आपल्या मर्यादशीलपणास आणि विनयास अनुरूप अशा उक्तीनें नलाविषयीं आपली पूज्यबुद्धि ध्वनित करीत आहे. येथें 'आयकों द्यावा' हें पूर्ण क्रियापद समजावें. द्रोणपर्व—अध्याय १२ गीति ३१ वी व आदिपर्व—अध्याय ४ गीति १५७ वी यांतही पंतांनीं 'आयकों दे गा—काय कोंदे गा' अशीं यमकें योजिलीं आहेत. या स्थलीं 'आयकों' हें 'आयकूं' या निमित्तवाचकाचें रूप असून त्यापुढें 'दे' या साह्य धातूचा प्रयोग केला आहे. 'दे' या धातूचें विध्यर्थी रूप 'द्यावा' होय. यावरून यमकांतील 'दावा' पद 'द्यावा' या अर्थी आहे. पण असें केल्यानें 'द्यावा' 'दावा' अशीं पदें अंतीं राहतात आणि 'या' आणि 'आ' वर्णांचा प्रास साधतो अशी अडचण उभी राहते. पंतांची अनुरूपवर्णात्मक प्रासाविषयीं ख्याति आहे तेव्हां असे प्रास त्यांस खपणार नाहींत असें प्रथमदर्शनीं वाटण्यासारखें आहे. परंतु द्रोणपर्व—अध्याय ८ गीति ७० [ज्याला—जाला] व अनुशासनपर्व—अध्याय ६ गीति ३४ [राज्याला—राजाला] भीष्मपर्व—अध्याय ११ गी० १००[धुनीजाच्या—नी ज्याच्या] उद्योगपर्व—अध्याय ४ गी० ८७ तेज्या तें—तेजातें] सभापर्व—अ० ३ गी० ३० [ते ज्यानें—तेजानें] सभापर्व—अ० ५ गी० ९५ [ज्याचा—जाचा] इत्यादि हीं स्थळें पाहिलीं असतां, पंतांनीं क्वचित् टीकाविषयक गीतींतील प्रासाप्रमाणें प्रासाची योजना अन्यत्रही केली आहे असें स्पष्ट होतें. पंतकृत कृष्णामाहात्म्य—अध्याय १ श्लोक २ [मोरोपंतकृत स्फुटकाव्यें. पृष्ठ १०८] याचे यमकांत 'दावा' हें पद 'द्यावा' या अर्थी योजिलें आहे इतकें येथें नमूद करणें इष्ट आणि आवश्यक आहे.	
	उत्तरार्ध—तुमचा वाङ्मय सौवर्ण काय कर्णीं कोंदावा [असें] वाटे = तुमचा उत्तमवर्णमय वाणीरूप देह कानांत खूब भरून ठेवावा असें वाटे,	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	तुमचें अमृतस्रावी सुवर्णसंपन्न भाषण कानीं पडावें—असा भाव. येथें 'वाङ्मय' शब्दाचा प्रयोग किती समर्पक आणि मार्मिक आहे पहा.	४४
६०	ही दमयंतीची उक्ति अत्यंत हृदयंगम असून नळाच्या ठायीं तिचा अनन्यभक्तिभाव, दृढ निश्चय आणि प्रेमातिशय स्पष्ट दाखवीत आहे.	४५
६५	'पळ अनुसरे न अपरा धी' असें सांगून आपली 'धी' नलगामिनी झालीच आहे, आतां 'देह'ही 'नलगामी' स्वयंवरविधि झाल्यावर व्हावयाचा—असें दमयंतीनें उघड सूचविलें आहे. या आर्यामध्यें 'धी' आणि 'देह' या शब्दांची योजना मोठ्या खुबीनें केली आहे, त्या योगें दमयंती सर्वस्वी नलगामी झाली हें दाखवून तिचा त्याला वरण्याचा दृढ निश्चयही व्यक्त केला आहे.	,,
६७	उत्तरार्ध—यांत सत्याची किंमत सुधारसाहूनही अधिक केली आहे ती कोणास तरी अमान्य होईल काय? मुक्तेश्वराचे उद्गारही असेच आहेत.]मुक्तेश्वर—आदिपर्व—अध्याय१६ओव्या२११-२१४पृष्ठ१३४-१३५.	,,
७५	पूर्वार्ध—यांत दमयंतीनें देवांस सोडून नळाला वरिलें याचें कारण पंतांनीं सांगितलें आहे. कुश आणि नलद (वाळा) यांशिवाय यज्ञाचें काम चालावयाचें नाहीं, तेव्हां ते समान योग्यतेचे झाले हें खरें, परंतु जें उपभोगक्षमत्व नलदांत आहे तें कुशांत नाहीं, यास्तव एकापरी नलदाची योग्यता कुशाहून अधिक होय.	४६
८७	यांत 'सम' नामक अलंकार आहे. याचें लक्षण मागें पहा. (पृ० १४)	४८
९२	श्रीचे गेहीं—कमळीं. नळाचें शरीर हेंच कमळ. कमळांत राहण्याची योग्यता हंसाची, कवड्याची नव्हे. जसा एकादा कवडा कमळांत शिरतो तसा कलि नलशरीरांत शिरला. आश्रित जनांस आपल्या दाट छायेनें सुखविणाऱ्या वडवृक्षाला तोडण्यासाठीं जसा एकादा शेतकरी कुणबी हातीं कुऱ्हाड घेऊन त्याच्याच छायेचा आश्रय करतो तसा कलीनें नलदेहांत शिरून त्याचा आश्रय केला. येथें कलीचें आणि हलिकाचें करणें सारखेंच दुष्टपणाचें आहे असें दाखविलें आहे.	,,
९३	यांत 'विकस्वर' नामक अलंकार झाला आहे. जेथें कांहीं एक विशेषार्थाच्या समर्थनासाठीं सामान्य अर्थ (विधान) सांगून त्या सामान्यार्थाच्या प्रतिपादनासाठीं पुनः उपमानरीत्या अथवा अर्थांतरन्यासाच्या योगें अन्य विशेष अर्थ सांगितला असतो तेथें 'विकस्वर' अलंकार होतो. या अलंकारांत विशेषार्थ, सामान्यार्थ आणि पुनः अन्यविशेषार्थ अशीं	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	तीन विधानें असतात. प्रस्तुत पद्यांत (१) कलि शिखी त्या द्वापरास पाशांत, (२) व्यसनीं भल्यासि पाडी खळ, (३) हरिणा व्याध जेंवि पाशांत, हीं तीन वाक्यें यथानुक्रम विशेषार्थ, सामान्यार्थ आणि अन्य विशेषार्थ यांच्या स्थानीं आहेत असें समजावें. पहिलें वाक्य हें व्यक्तिविशेषास लागू आहे, दुसरें सामान्य अर्थास (तशा सर्व व्यक्तींस) लागू आहे आणि तिसरें पुनः विशेष व्यक्तींस लागू आहे. या आर्येंत पंतांनीं खळाचें वर्णन उत्कृष्ट केलें आहे.	४८
९७	जीचें साधन दुष्कर त्या श्रीतें मेळवूनि पुष्करसा पुष्कर साजे [आणि म्हणूनच] जसि ग्रीष्मकालशुष्करसा सरसी [तशी] नलतनु [साजे]–असा अन्वय. दुष्कर श्री मिळविल्यामुळें पुष्कर हा पुष्करासारखा साजला आणि याच कारणास्तव ग्रीष्मकालानें रस (उदक) आटलेल्या सरसीसारखी नळाची तनु (देह) साजली.	४९
१०८	यांत 'संबंधातिशयोक्ति' नामक अलंकार आहे. नळाची शोचनीय अवस्था पाहून हरिणांनीं आणि मोरांनीं आपापले स्वाभाविक व्यापार सोडून दिले असें वर्णन आहे, तेव्हां यांत संबंधीं असंबंधाची कल्पना कवीनें केलेली आहे म्हणून ही 'संबंधातिशयोक्ति' झाली.	५०
१०९	या पद्यांत पंतांनीं दमयंतीचा महिमा सुरेख वर्णिला आहे. जे वेद परमेश्वराची स्तुति करण्यांत सदां तत्पर असावयाचे तेच जर दमयंतीची नुति (स्तुति) करतात, तर तिचें भाग्य काय वर्णावें?	५१
११२	आर्या ११२–११६ ह्या फार रसाळ, प्रौढ आणि समयानुरूप आहेत. कलीनें नळाच्या आंगांत संचार केला होता त्यामुळें त्याच्या वृत्तींत जो फरक पडला त्याचें या आर्यांमध्यें सुरेख वर्णन आहे. खळाच्या संगतीनें मति कशी बदलते हें ११६ व्या आर्येंत चांगलें दाखविलें आहे.	५१
११७	आर्या ११७–१२० या करुणरसानें भरलेल्या आहेत.	५२
११९	या आर्येंत नळानें पृथ्वीला केलेली प्रार्थना कशी प्रसन्न, समर्पक आणि रसभरित आहे! विश्वंभरे क्षमे आणि सर्वसहे–या शब्दांतील खुबी सहज लक्ष्यांत येण्याजोगी आहे.	,,
१२२	या आर्येंत 'तद्गुण' नामक अलंकार आहे. कोणी एक स्वगुण टाकून दुसऱ्याशीं पुष्कळ सहवास झाल्यामुळें त्याचा गुण घेतो–असें वर्णन असलें म्हणजे 'तद्गुण' अलंकार होतो. येथें पटाला दमयंतीचा सहवास पुष्कळ असल्यामुळें त्याच्या आंगीं तिचे गुण आले होते असें दर्शविलें आहे. त-	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	सेंच पटाला नळाचाही सहवास घडला म्हणून त्याचेही गुण पटानें घेतले असें वर्णनाचें धोरण आहे. "या आर्येत पंत थोडे श्लेषाकडे वळले व त्यामुळें आर्येचा प्रसाद बराच कमी झाला आहे. 'सत्याश्रित' दमयंतीसारख्या सतीचा आश्रय करणारा, जसा काय, म्हणूनच 'गुणमय' –गुणांनीं किंवा तंतूंनीं भरलेला; 'शुचि'=निर्मळ किंवा स्वच्छ. सतीचा जर आश्रय केलेला तर 'गुणवंतपणा' व 'शुचित्व' हे गुण आंगीं यावयाचेच यावयाचे. याप्रमाणें 'तद्गुण'त्व आल्यामुळें पट कापून घेतो. 'पण हाक देत नाहीं'. पुण्यश्लोकाचा देखील सहवास थोडा काळ झालाच होता; तेव्हां 'तद्गुण' झालेल्या पटानें पुण्यश्लोकाचें तरी कपट कसें बरें उघड करावें? सारांश 'सती'चा आश्रय केला म्हणून 'तद्गुण' होऊन तोंडांतून चकारशब्दही काढिल्याशिवाय 'पट' आपणास कापून घेऊं शकला. पुण्यश्लोकाचाही पुनः सहवास झालेला. तेव्हां जर 'सती' पुण्यश्लोकाचें कपट उघड करूं शकत नाहीं, तर तद्गुण झालेला 'पट' तें कसें उघड करूं शकेल? तेव्हां या आर्येचा प्रसाद बराच कमी झाला आहे. म्हणून द्राक्षापाकाचें हें उदाहरण देणें जरी यथार्थ होणार नाहीं, तरी प्रौढपणा तात्पर्यास येऊन ही आर्या जसजशी चाखावी तसतसा रस अधिक सुटतो, म्हणून ही नारिकेलपाकाचें अत्युत्तम उदाहरण सहज ठरतें. कालिदासाची कविता प्रसन्न समजतात व भारवीची कविता भारदस्त म्हणतात. प्रसन्न कवितेचा रस द्राक्षांच्या रसासारखा असून, भारदस्त कवितेचा रस नारळाच्या रसासारखा असतो. जो पाक कालिदासांत आहे, तो भारवींत नाहीं; जो पाक भारवींत आहे, तो कालिदासांत नाहीं. पण पंतांच्या काव्यांचा हे दोन्ही पाक खमंगपणा वाढवीत आहेत. मोरोपंती महाभारतांतील कांहीं आख्यानें नीट समजलीं म्हणजे सगळा कालिदास व सगळा भारवि वाचण्याचें श्रेय मिळून आणखीही अधिक लाभ होतो. तो लाभ भक्तिरसाचा व देवाविषयीं आस्तिक्यबुद्धीचा होय. भक्तिरसाचा लाभ कालिदासाच्या काव्यांत फारसा होण्याचा संभव नाहीं. भारवीनें आपल्या काव्यांत भक्तिरसाचा छाटा निःसंशय उडविलेला आहे. पण कोठें मोरोपंती भक्तिमहासागराचा अलोट पूर व कोठें भारवीची भक्तिरसानें मंद मंद वहात जाणारी छोटी सरस्वती ! ! ! पदलालित्य दंडीचें लोकोत्तर समजलें जातें व उपमालंकार कालिदासाचा सुरेख समजतात. पंतांच्या काव्यांतील पदलालित्य दंडीसारखेंच लोकोत्तर असून, पंतांनीं स्थलोस्थळीं बांधलेले उपमालंकार अतिसुरेख	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	आहेत. सारांश कालिदासाची, भारवीची व दंडीची–मिळून त्रिवेणी एकश्या मोरोपंतामध्यें एकत्र संगम झालेली उघड आढळते.” [रा० रा० भागवत–इंदुप्रकाश–ता० १९।९।९२.]	५२
१२४	गीति १२४-१२६ यांतील दमयंतीचा विलाप वाचतांना कोणाच्या हृदयास पाझर सुटणार नाहीं? यांत प्रसादगुण तर सर्वत्र झळकत आहे. पंतांची प्रतिभा अशाच हृदयंगम आणि सुरस पद्यांस प्रसवते.	”
१२५	उत्तरार्ध–यांत **‘समासोक्ति’** अलंकार आहे. जेथें प्रस्तुत वृत्तांत वर्णावयाचा असतां विशेषणसाम्याचे बळानें अप्रस्तुत वृत्तांताची स्फूर्ति होते तेथें ‘समासोक्ति’ अलंकार होतो. प्रस्तुत आणि अप्रस्तुत वृत्तांतांचें वर्णन यांत समासानें (संक्षेपानें) केलें असतें म्हणून याला **समासोक्ति** असें नांव आहे. या पद्यांत दमयंती प्रस्तुत आणि दया अप्रस्तुत असून दोघांस समानच लागू पडणाऱ्या ‘त्यागार्हा’ या विशेषणाच्या सामर्थ्यानें अप्रस्तुत ‘दये’ची स्फूर्ति (प्रत्यायन–ज्ञापन) झाली आहे. याचें लक्षणः— ‘समासोक्तिः परिस्फूर्तिः प्रस्तुतेऽप्रस्तुतस्य चेत्’ [कुवलयानंद].	५३
१२६	हे पुण्यश्लोक नलराज! तुमचा असाधुवाद (तुमची लोक निंदा करतील असा विचार) मनांत येऊन माझें मन फार तळमळतें. विचार करा, माझा आपण त्याग केला कारण मी आपली प्रिया नसेन, पण माझ्या त्यागानें आपली प्रिया जी कीर्ति तिचें पादतळ मळत आहे, (तिला दूषण लागत आहे) तर त्याचा विचार करा–असा भावार्थ.	”
१२७	नळावर दमयंतीची भक्ति आणि प्रीति इतकी अतोनात होती कीं त्याचीं पावलें पाहून त्याचा माग काढीत दुर्गम अरण्यांतून जाण्यास ती तयार झाली होती.	”
१२८	ज्याच्या (ज्या शोकाच्या) चरणाचें रजही इतकें भयंकर (विष) कीं त्याला ‘गुरु’ म्हणून गरानें (कालकूट विषानेंही) शिरीं धरावें (गुरु समजून वंदन करावें) अशा शोकानें जिला पूर्वीं गिळिलें होतें त्या (तिला= त्या पूर्वोक्त शोकग्रस्त दमयंतीला) अजगरानें गिळिलें–असा अर्थ. गरापासून होणाऱ्या मोहापेक्षां शोकापासून होणारा मोह अधिक उग्र होय.	”
१२९	उत्तरार्ध–पवनें तो आर्तरव कर्णीं लागोनि व्याधासि कळविला–असा अन्वय. वायूनेंही तो दमयंतीचा आर्तरव कानीं लागून एका व्याधास कळविला.	”

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
१३०	दमयंती अतितैजस आणि देदीप्यमान असल्यामुळें तिला 'शिखिशिखा' असें म्हटलें आहे.	५३
१३१	न पचे=व्याधाला कीर्तिसुधा न पचण्याचें काण तो राहूसारखा दुष्ट वासनेनें भरलेला होता हें होय. दमयंतीरूप देवीच्या कोपरूप अग्नीमध्यें त्या पामर व्याधाची आहुति पडली.	„
१३२	उत्तरार्ध–यांतील उपमा किती तरी समर्पक आहे!	„
१४०	आपलें वृत्त सार्थवाहास सांगून तिनें (दमयंतीनें) तिच्या मनांत असलेला जो नळ त्याजविषयीं चौकशी केली. 'पुसणें' या क्रियापदाचा असा प्रयोग पंतांनीं अनेक स्थळीं केला आहे:—वनपर्व–अ० ६. गी० ११ 'पाहुनि उत्पात पुसे आधीं भीमासि' [काव्यसंग्रह–पृ० ९४] हरिवंश–अध्याय १६ गी० ३ 'ज्या त्यासि पुसे' वनपर्व–अध्याय १ गी० ८ 'धृतराष्ट्र स्वहित पुसे'. सार्थप=सार्थाचा (लंबाणाचा) पति. वनांत देवनळ (वांस–कळक) बहुत आढळले, पण मनुष्यदेव नळ (तूं विचारितेस तो राजा नळ) न आढळला. देव=राजा ['राजा भट्टारको देवः' इत्यमरः। 'देवस्तु नृपतौ तोयदे सुरे' इति हैमः.]	५४
१४५	उत्तरार्ध–यांत दमयंतीच्या शीलाचें वर्णन किती मोहक आहे! तसेंच चवथ्या चरणांत प्रश्नद्वारा सूचविलेलें नैतिक शिक्षणही अव्वल प्रतीचें नाहीं असें कोण म्हणेल?	५५
१४६–१४७	यांत (गी० १४६-१४७) दमयंतीच्या भूत आणि विद्यमान स्थितींमधील भेद पंतांनीं फार सुरेख वर्णिला आहे.	„
१५०	उत्तरार्ध–सैरंध्री–'चतुःषष्टिकलाभिज्ञा शीलरूपादिशालिनी। प्रसाधनोपचारज्ञा **सैरंध्री** परिकीर्तिता ॥' असें 'सैरंध्रीवर्णन' आढळतें.	„
१५१–१५२	राजमातेनें राजकन्येची सोबतीण म्हणून दमयंतीस राजवाड्यांत ठेविलें, तेव्हां तिणें राजमातेकरवीं ज्या शरती कबूल करविल्या त्यांत एक तरी तिच्या शीलास कमीपणा आणणारी आहे काय? प्रत्येक शरतीकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर 'सती'पदास अनुरूप अशाच गुणांचा त्यांत समावेश केला आहे असें वाटतें.	५६
१५६	चवथा चरण—अभयदीं (अभय देणाऱ्यांत) तुजा=तुझ्याहून अन्याल कवण (कोण) व्याला (प्रसवला आहे?) अभय देणाऱ्यांत तुजसारखा कोणीच झाला नाहीं असा या चवथ्या चरणाचा अर्थ करावा.	„

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
१५७	यांत नळाच्या परार्थपरायणतेचें चित्र पंतांनीं कसें सुरेख चितारिलें आहे. 'शरण आलेल्या जनास मरण देऊं नये' या नीतितत्त्वाचें हें उत्तम उदाहरण होय.	५६
१६५–१७२	यांतील (गी० १६५-१७२) कर्कोटकाचें भाषण प्रसादपूर्ण असून अनेक अलंकारांनीं भरून गेलें आहे. १६५ व्या आर्येच्या उत्तरार्धांतील उपमा फार सुरेख आहे.	५७
१६७	यांत सुरेख रूपक आहे. 'जागा तोषाचा'=तोषाचें स्थान, सुखस्थान. येथें 'तोषाचा' या पदाचे ठिकाणीं 'तोषाची' असें पद असावें अशी शंका येण्यासारखी आहे. 'जागा' हें पद ऋतुपर्णासंबंधी आलें आहे, ऋतुपर्ण हा शब्द पुल्लिंगी आहे तेव्हां 'जागा' हें पद पुल्लिंगी आहे असें धरून चालणें भाग आहे. 'जागा' हा शब्द मालवणी भाषेंत पुल्लिंगीं वापरतात. पंतांच्या काव्यांत मालवणी शब्द कोठें कोठें आढळतात:—सभापर्व–अ०५ गी० ६ यांत 'असकीं' असा शब्द आहे. द्रोणपर्व–अ० २ गी० ८१ यांत 'कायमा' असें पद आहे. पुन: आदिपर्व–अ० ३६ गी० २२ व द्रोणपर्व–अ० ५ गी० १ या दोन्हीं स्थळीं 'जागा' हें पद आलें असून तें पुल्लिंगी आहे असा स्पष्ट बोध होतो. हा शब्द कोशांतही पुल्लिंगी व स्त्रीलिंगी आढळतो. यावरून 'जागा' हें पद पुल्लिंगी धरतां येतें असा निष्कर्ष होतो आणि तें तसें धरिलें म्हणजे 'तोषाचा' हें रूप ठीक आहे असें ठरून शंका निवारण होते.	,,
१६८	यांत '**परिकर**' नामक अलंकार आहे. यांत 'रविवंशज' आणि 'मनुष्यदेव' हीं पदें सहेतुक आहेत म्हणून परिकरालंकार झाला आहे. याचें लक्षण पृ० १७१ टीप ६ पहा.	,,
१६९	याच्या पहिल्या चरणांत अर्थांतरन्यास अलंकार असून दुसऱ्या चरणांत सुरेख उपमा आहे.	,,
१७०–१७१	या दोन आर्यांचें (१७०–१७१) युग्मक आहे. जसा वसंतऋतु नवीन समृद्धि देण्यासाठीं जुन्या पानांला (पर्णां) वृक्षावर राहूं देत नाहीं तसा देव (अनंत) नवें सर्वस्व मनुष्याला पुन: द्यावयाचें आहे म्हणून त्याजपाशीं पूर्वीचें कांहीं एक राहूं देत नाहीं–असा भाव. १७० उत्तरार्ध आणि १७१ पूर्वार्ध यांत उपमा अलंकार आणि १७१ उत्तरार्ध यांत रूपक आहे. कर्कोटक म्हणतो:—हे नळा! आपलें सत्वरूप जीवन मात्र स्वस्थ ठेव, सत्वरूप जीवनाला मात्र आटूं देऊं नको म्हणजे भाग्य उदयास येईल. बा नळा!	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	फार भाग्य येणार आहे=पुढें तुझें नशीब उघडणार आहे [वास्तव] स्वसत्वजीवन मात्र स्वस्थ असो=तुझें सत्व हेंच जीवन होय तर तें स्वस्थ असो, त्या सत्वजीवनाला नीटपणें जपत जा. तुझें खरें जीवन (जीवितं-प्राण) गेलें तरी हरकत नाहीं, परंतु सत्वरूप जीवन मात्र सोडूं नको, प्राणावर बेतली तरी सत्व सोडूं नको—असा भावार्थ.	५८
१७२	यांत 'तुल्ययोगिता' अलंकार आहे.	,,
१७३	उत्तरार्ध—कर्कोटक सद्धितकर मात्र न [तर] तो जिष्णुचा सभासदही [होय]=कर्कोटक केवळ साधूंचें हित करणारा इतकेंच नव्हे, तर तो इंद्राचा एक सभासदही झाला. कर्कोटकाची इतकी योग्यता कीं त्याला इंद्राच्या सभेंत जागा मिळाली, तो इंद्राच्या सभेंत बसणारा झाला.	,,
१७७	या आर्येच्या उत्तरार्धांतील उपमा फारच हृदयंगम आहे.	,,
१७८	उत्तरार्ध-श्लोक=पद्य. आपल्या मनांत बायकोला आठवून उत्तम पद्य नळ म्हणत असे. 'पद्ये यशसि च श्लोकः' इत्यमरः.	,,
१७९	ही गीति 'बाहुक' नांव धारण केल्यावर नळ रोज रात्रीं निजण्याचे पूर्वीं दमयंतीला उद्देशून ऋतुपर्णाच्या घरीं मोठ्यानें म्हणत असे.	,,
१८०	उत्तरार्धांत परशोक हा वन्हि असें सुंदर रूपक साधून 'भल्या' मनुष्याचें जें लक्षण दिलें तें किती यथार्थ आहे! भल्याची पारख करण्याची ही पंतांनीं दर्शविलेली कसोटी ठीक नाहीं असें कोण म्हणेल?	५९
१८१	येथें चिंता ही राक्षसी आणि दमयंती ही सीता असें सांगून मनोहर उपमा गुंफिली आहे.	,,
१८२	चिंता हीच वृद्धव्याघ्री असें वर्णून समर्पक रूपक योजिलें आहे. या पद्यांत वृद्ध आणि 'चगळा' ('चघळा') या शब्दांत अन्वर्थकता असून अनुरूपता आहे. वृद्धत्व आलें म्हणजे भराभर गिळून टाकण्याचें सामर्थ्य कमी होतें, दांत पडल्यामुळें पदार्थ चावण्याचीं साधनें दुर्बल होतात, हळू हळू खाण्याची पाळी येते, भक्ष्यपदार्थ चघळून खावा लागतो, चघळण्यानें भक्ष्याचे हालही भारी होतात. पितृपतिसुतविषयक चिंतारूपिणी वृद्ध व्याघ्री दमयंतीला चघळून टाकण्यास तयार असल्यावर तिचे हाल काय विचारावयाचे!	,,
१८४	पूर्वार्ध-'कपींद्रसा' ह्या उपमेचें मर्म आणि समर्पकत्व समजण्यास आंगीं बरीच सहृदयता पाहिजे. उत्तरार्ध-यांत धन्यत्वाचें जें लक्षण पंतांनीं वाचकांस सादर केलें आहे त्याला कोण नांव ठेवील? पंतांचें	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	काव्य असल्या परमपूज्य आणि सर्वतोपरी वंदनीय सुविचारांनीं ओतप्रोत भरलेलें आहे, तेव्हां तें एक निःसंशय उत्तम नीतिशिक्षकच होय.	५९
१८९	उत्तरार्धांतील उपमा फारच समर्पक आहे. कलियुगानें मळविलेल्या श्रुतीला सुदेवविप्रासारखा जो कोणी सुधी विप्र असेल तोच ओळखील, अन्य विप्र ओळखूं शकणार नाहीं.	,,
१९१	उत्तरार्ध–सुबाहुमातेला तिचें अज्ञान (दमयंती भीमकराजकन्या होय या गोष्टीविषयींचें अजाणपण) विषासारखें डाजूं लागलें. आपण दमयंतीला ओळखिलें नाहीं म्हणून राजमातेला फार खेद झाला. ही गोष्ट तिच्या मनाला खाऊं लागली.	६०
१९३–१९४	या (१९३–१९४) आर्यांतील दमयंतीचा प्रसंगोचित उद्गार वाचून ज्याचे हृदयास पाझर फुटणार नाहीं असा कोण सत्पुरुष आहे? या आर्या प्रत्येक सहृदय जनाचें हृदय हालवून टाकणाऱ्या आहेत यांत संशय नाहीं. १९३ व्या आर्येचा अर्थः—जशी सुनंदा तशी हे (ही मी मुलगी आहें), कारण मीं असें पाहिलें आहे कीं लेंकीला मातेच्या ममतेपुढें कोटि अमृतप्रपा सुद्धां तुच्छ अशा वाटतात. तुमचें मुलीवरचें प्रेम जर असें आहे तर तुमची मी मुलगी या नात्यानें तुमच्यापाशीं आहें हेंच उत्तम–असा भावार्थ.	,,
१९४	दमयंतीच्या मावशीला आपल्या अज्ञानाबद्दल फार खेद झाला. तिनें आपल्या भाचीला ओळखिलें पाहिजे होतें, पण तसें झालें नाहीं आणि तन्निमित्त आपली मावशी खेद करीत आहे असें जाणून दमयंती म्हणतेः– हे मावशी! जाणोनि (ओळखून–नातें जाणून–मी कोण कोणाची इत्यादि संबंध जाणून) [नंतर जी कृत्रिम] दया केली (केलेली असते) ते तों (ती तर) तुच्छाचि मावशी (अगदीं तुच्छच माव–माया–कपट होय). नातें जाणून दया करणें (कींव करणें) ही निःसंदेह माव (माया) होय. अशी कृत्रिम दया ही केवळ मायेसारखी क्षुद्र होय, संबंध ओळखून केलेली दया ही माव केल्यासारखी समजावयाची. [जी] रुचि शीलीं [मला आहे ती] हेमीं न, रत्नीं ही [न]=मला सुस्वभावाची जशी आवड आहे तशी सोन्याची व रत्नाची आवड नाहीं. मी तेणेंचि धाल्यें=त्या तुझ्या चांगल्या स्वभावानेंच मी तृप्त झाल्यें. मी तुमच्या बहिणीची मुलगी असें समजून जर तुम्ही दया केली असती तर ती दया तृणप्राय कृत्रिम (कपटयुक्त) समजावयाची. पण त्या दयापेक्षा माझें नातें न जाणतां	

पद्य. | पद्यांचा अर्थ. | पृष्ठ.

तुम्ही [अहो मावशी] सुशीलपणानें जी दया केली तीच विशेष होय, तीच खरी दया होय. उत्तरार्धाचा दुसरा अर्थ:–हेमीं रत्नीं हि रुचि न, शीलीं [रुचि अतएव] मावशी! हे मी तेणेंचि धाल्यें–असा अन्वय. सुवर्णामध्यें आणि रत्नांमध्यें (खरें) तेज (रुचि) नाहीं, तर खरें तेज शीलांत आहे, म्हणून हे मावशी! तुझ्या त्या शीलानें मी संतुष्ट झाल्यें. तुझ्या शीलांत खरें तेज आहे म्हणून तूं मी कोण काय इत्यादि न जाणतांही मजवर मुलीसारखी दया केलीस यास्तव तें तुझें शील मला फार आवडलें–असाही अर्थ कोणी कोणी करतात तो वाचकांस सादर केला आहे. ६०

१९५ माझीं मुलें माझ्या बापाच्या घरीं आहेत. त्यांस पाहून माझ्या बापाला रडें येतें, यास्तव त्याचा समाचार घेण्यासाठीं मला लौकरच त्याच्याकडे गेलें पाहिजे असें दमयंती आपल्या मावशीला सांगून आपली त्वरित निघून जाण्याची इच्छा ध्वनित करते. मी जी येथून जाणार ती माझ्या अपत्यांसाठीं नव्हे तर माझ्या मुलांकडे पाहून सदां शोक करीत बसणाऱ्या बापासाठीं जाणार–असा दमयंतीच्या भाषणाचा मार्मिक अर्थ आहे. „

१९६ हें वर्णन प्रसादमय आणि सुरस आहे. याच्या उत्तरार्धांत उदाहरणीय सतीद्वयाचा योग जुळवून जी उत्प्रेक्षा पंतांनीं योजिली आहे तिची गोडी अनुपम आहे. „

१९७ पितृगृहा=पित्याच्या घरीं कुंडिनपुराला. स्वसे=हे माउस बहिणि! „

२०० भैमी मातेसि म्हणे—'साधूसि गांजी [व] वियोगाधि दे [असा] स्नेहचि विश्वामित्र, न पर; गाधि–एतन्नामका वियो–असा अन्वय. दमयंती आपल्या मातेला आपला पति (शोधून) आणण्याविषयीं सांगत आहे. इतकेंच नव्हे तर शोध न केला तर 'मरेलचि' [गी० २०१] असेंही स्पष्टपणें बोलत आहे. नलाविषयींचें प्रेम व त्या प्रेमापासून उत्पन्न होणारें वियोगदु:ख हीं अत्यंत असह्य होत असें भैमी श्लिष्ट अपन्हुतिद्वारा सूचवीत आहे. अर्थ—आई! साधूंना गांजतो आणि त्यांना वियोगाधि (वियोग+आधि–विरह+दु:ख) देतो असा एक स्नेहच आहे. [वास्तविक विचार करतां] स्नेह हाच विश्वामित्र (विश्व+अमित्र)=विश्वशत्रु=विश्वच्छळक होय. पर न=अन्य कोणी विश्वामित्र (जगताचा शत्रु विश्वशत्रु) नाहीं. (विश्वामित्र) अशा नांवाच्या विश्वामित्राला गाधि (कान्यकुब्ज देशाचा राजा) खुशाल प्रसवो. गाधिराजाच्या पोटीं

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.

झालेला जो विश्वामित्र तो नांवानें मात्र विश्वामित्र, अर्थानें विश्वामित्र म्हटला तर स्नेहच, या स्नेहासारखा साधूंचा छळ करणारा आणि त्यांना विरहदुःख देणारा दुसरा कोणी नाहीं. विश्वामित्र या नांवानें जो प्रसिद्ध तो खरा विश्वामित्र (विश्वशत्रु) नव्हे, गाधिपुत्र विश्वामित्रानें साधूंना छळून त्यांस वियोगजन्य दुःख दिलें हें खरें, तथापि तो विश्वामित्र (विश्वशत्रु) या नांवाला पात्र नाहीं, या नांवाला पात्र स्नेह होय तेव्हां स्नेह हा खरा विश्वामित्र. साधुजनांचा छळ करण्याच्या कामांत विश्वामित्रावर स्नेहाची कडी आहे. विश्वामित्रानें साधुजनांची जी छळणा केली आहे तिजपेक्षां स्नेह (प्रेमभाव) ज्यास्त करतो. या आर्येंत स्नेह शब्दाचा अर्थ व्यक्त केला आहे आणि तो अर्थ हा कीं जो साधूंला गांजणारा आणि त्यांना विरहदुःख देणारा तो स्नेह. साधु=विरक्त, निःसंग, सत्पुरुष. सांसारिक जनांस कामक्रोधादिक अनेक विकारांपासून दुःख सोसावें लागतें, पण जे परित्यक्तसंसार विरक्त साधुजन आहेत त्यांला पाशबद्ध करून दुःख देणारा असा हा एकटा स्नेहच आहे, इतर विकार त्यांस गांजीत नाहींत, कारण ते साधु जितेंद्रिय असल्यामुळें त्यांजवर त्या विकारांचा अंमल चालत नाहीं. 'स्नेहचि विश्वामित्र' यांतील 'चि' पदाचें स्वारस्य इतकेंच कीं इतर विकारांचे ठायीं विश्वामित्रत्व (विश्वशत्रुत्व) नसून एकट्या स्नेहांतच तें आहे असें दर्शविलें आहे. गाधि आणि आधि हे शब्द संस्कृतांत ऱ्हस्व इकारांत आहेत ते दीर्घ लिहिण्यास फारशी हरकत नाहीं. परंतु दीर्घच लिहिले पाहिजेत असें नाहीं. या आर्येंत
विश्वामित्र (विश्वाचा अमित्र (शत्रु), विश्वाचा मित्र) शब्दावर श्लेष आहे. ६१

२०१ या आर्येंतील दमयंतीचा उद्गार किती समयोचित आहे हें चतुर वाचकांच्या लक्षांत सहज येण्यासारखें आहे.

२१८ आर्या २१८–२२२ यांत नलाच्या मनांमध्यें दमयंतीविषयीं जे अनेक विचारतरंग उद्भवले त्यांचें वर्णन आहे. आर्या २१८ अर्थः—हा दोष सतीचा नव्हे (दमयंतीचा नव्हे तर) नियतीचाच हा दोष होय. [दमयंतीच्या स्वयंवराची वार्ता ऐकून नळानें तिला दोष दिला असें वर्णन मागें आलें आहे. पण दमयंती पडली सती तेव्हां नल तिला दोष देऊं शकत नाहीं म्हणून सर्व दोष दैवावर लादतो आहे.] दमयंती स्वयंवर करते हा तिचा दोष नव्हे, हा सारा नियतीचा (दैवाचा) दोष आहे, कारण नियति (दैव) इतकी प्रबळ आहे कीं ती यति (यतीला–योग्याला) स्थिर ”

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	नियमहानि करुनि (त्याच्या दृढव्रताचा भंग करुन—त्याच्या दृढ ब्रह्मचर्य व्रताची हानि करून) बळें (बळात्कारानें—मुद्दाम) भ्रमाच्या चाकीं (भ्रमरूप चाकीं) भ्रमवी, भ्रमविते चंचल करते, घोंटाळ्यांत पाडिते. ब्रह्मचर्य व्रताचा भंग होऊन यतीचा (ब्रह्मचाऱ्याचा—संन्याशाचा—योग्याचा) चुराडा होतो इतकें जर नियतीचें बळ आहे, तर हा दोष त्या नियतीचाच, दमयंतीचा नव्हे. नलाचा आशय असा कीं जर यतीलाही दैव आपलें व्रत चालवूं देत नाहीं, मग दमयंतीचा काय पाड, ती तर बोलून चालून चंचलमतिची स्त्री.	६३
२१९	अर्थः—पुत्र असतां दमयंती पुनर्विवाह कां करते? (पुत्र नसतां जर ती पुनर्विवाह करती तर शोभलें असतें) पण असें नव्हे, अरेरे, ती करते तें ठीकच, कारण मीं वनांत तिजपाशीं जें आचरण केलें तें जाराला शोभणारें होतें (पतीला शोभणारें नव्हतें). मी जाराची वृत्ति स्वीकारली तेव्हां तिणें जें करण्याचें मनांत आणिलें तें ठीकच होय. तिला मनापासून माझा वीट आल्यामुळें माझें नांवही जर रुचत नाहीं, तर माझा मुलगा कोठून मानवणार आहे? तिला जसें माझें नांव नको, तसें माझ्या मुलाचेंही नको हें ठीकच.	
२२१	पूर्वार्धात **'तुल्ययोगिता'** अलंकार झाला आहे. येथें वर्ण्यवस्तु सती दमयंती आहे पण त्या वर्ण्य वस्तूबरोबर इतर वर्ण्यांचें (श्रीचें आणि इतर सतींचें) म्हणजे अप्रस्तुतांचें वर्णन झालें आहे.	”
२२४	उत्तरार्ध—'आम्हाला पळवा आणि रविहयमदालाही पळवा' असें जणूं काय अश्व म्हणति=आम्हाला पळवा आणि सूर्याच्या अश्वांस जो शीघ्रगामित्वाचा गर्व आहे त्यालाही आमच्या पळविण्यानें पळवा (नाहींसें करा). आम्हांला पळविल्याबरोबर रविहयमदही पळणार आहे. आम्हांस पळवायास लाविलें असतां, आम्ही इतक्या वेगानें पळूं कीं तेणेंकरून सूर्याचे घोडे हीनगर्व होतील, त्यांचाही गर्व झडेल असा—भावार्थ. येथें 'सह'शब्द न योजितां पंतांनीं खुबीदार **'सहोक्ति'** बांधिली आहे.	”
२४२	जेंवि सिंधुच्या लंघनीं कुतरी न चाले तेंवि गुरुच्या लंघनीं माया (कपट—लबाडी) न चाले. (ब्रह्मज्ञानी) गुरूचें लंघन माया करूं शकत नाहीं, जसें सिंधूचें कुतरी करूं शकत नाहीं.	” ६५
२४५	उत्तरार्ध—यांत **'मिषापन्हुति'** आहे. जेथें मिषशब्दाचा अथवा	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	तत्समानार्थक अन्य शब्दाचा प्रयोग केला असतो तेथें **'मिषापन्हुति'** होते.	६६
२४६	पूजिती=(कर्ता संतसज्जन अध्याहृत) आदर करतात, स्वीकारतात. अरण्यनळा=अरणींपासून उत्पन्न झालेल्या अनळाला (अग्नीला); [पक्षीं] अरण्यांतील नळ नांवाच्या गवताला. सत्पद=साधूचें—नळासारख्या पुण्यश्लोकाचें पद (चरण); नतापदा=नम्र झालेल्या जनांच्या (मानसिक आणि कायिक) आपत्तींला [मानसिक आपत्तिहारक इंद्र आणि कायिक आपत्तिनाशक नंदनवन असें समजावें.]	,,
२४७	पूर्वार्ध—अनलसमीं=जो नळासारखा (तुझ्यासारखा) नव्हे अशा (जनां)मध्येंही, नळासारखे नाहींत अशांच्या ठायीं. नळ नव्हत अशा लोकांनाही तुझ्या थोड्याशा स्मरणानें मी तुझ्यासारखें मानीन. लवेंहि स्मरणें [तुझें अल्पमात्र स्मरण करणाऱ्यास] अनलसमीं जनीं [तो नळासारखा—तुझ्यासारखा नसला तरी.] त्वद्भवातें पाहेन [तो तूंच आहेस असें समजून त्यास छळणार नाहीं] तुझें अल्पमात्र स्मरण करणारा तुझ्यासारखा गुणवान् नसला तरी मी त्यास तुजसमान मानून छळणार नाहीं—असा कलीचा भाव. आर्या २४४–२४७ यांतील कलीचे भाषणापासून पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. प्रसंग आला ह्मणजे कलिसम जे दुष्ट असतात त्यांचे डोळे उघडतात, शुद्धीवर येतात आणि ते इतके गरीब होऊन जातात कीं ज्या पुण्यपुरुषांना ते प्रथम छळतात त्यांची साष्टांगप्रणिपातपूर्वक क्षमा मागण्यास तयार होतात.	,,
२४८	पूर्वार्ध—यांत **'अर्थांतरन्यास'** अलंकार आहे. 'कोपास आवरी नळ' हें विशेषविधान आणि तत्समर्थनार्थ 'सन्मति–शिकली' हें सामान्य विधान होय. उत्तरार्ध—यांत **'पर्याय'** अलंकार आहे. एका क्रियेचा संबंध (आश्रय) क्रमानें अनेक पदार्थांशीं (आधारांशीं) लागला ह्मणजे **'पर्याय'** अलंकार होतो. दूषी या एका क्रियेचा पर्यायानें (क्रमानें, पाळीनें) याचकसुरतरु आणि बिभीतक यांशीं संबंध (अन्वय) झाला आहे. म्हणजे या आधारांशीं त्याचा क्रमानें आश्रय वर्णिला आहे म्हणून हा **पर्याय** अलंकार होय. कलि प्रथम नळामध्यें शिरला आणि मग बिब्याच्या (बिभीतकाच्या) झाडांत शिरला असा येथें पर्याय (क्रम) आहे. याचे **संकोचपर्याय, विकासपर्याय** आणि **आधेयपर्याय** असे तीन भेद आहेत. याचें लक्षणः—**'पर्यायो** यदि पर्यायेणैकस्यानेकसंश्रयः' [कुवल-	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	यानंद १०८] 'एवं क्रमेणानेकस्मिन्पर्यायः' [काव्यप्रदीप १०।३१] 'क्वचिदेकमनेकस्मिन्ननेकं चैकगं क्रमात् । भवति क्रियते वा चेत्तदा पर्याय इष्यते ॥' [साहित्यदर्पण–१०।७३३] या अलंकाराचीं आणखीं उदाहरणें:– 'होती करीत कंदुककेलि मधुर गान मोहिनी, तीतें । स्पर्शे प्रथम वसनहर पवन, मग त्यजुनि तोहि नीतीतें. ॥ ३० ॥ [आदिपर्व–अध्याय ११] त्यासि नमुनि जिष्णु म्हणे, 'या, या हृदयीं रहा, असें न रहा । आधीं वीररसीं मग बुडवावा सद्यशोरसीं नर हा ॥'. [विराटपर्व–अध्याय ३ गीति १९] [अलंकारमीमांसा–पृष्ठ ४८] 'नलाला' असें न म्हणतां 'याचकसुरतरुला' असें पर्यायानें वर्णन केलें म्हणून येथें **'पर्यायोक्त'** अलंकार झाला.	६६
२५०	अन्वयः–तो प्रियंवद पुनरपि रथीं बैसोनि अश्वांतें पिटाळी, तदपि ऋतुपर्णमनांत जें भय [असे तें] कुंडिनपुर दाउनि टाळी. अर्थः—जरी वाटेवर कलिपाशीं बोलण्यांत थोडा वेळ घालवावा लागला तरी सुद्धां तो मृदुभाषी नळ रथांत पुनः बसून घोडे ज्यास्त पिटाळून [सूर्योदयापूर्वी कुंडिनपुरास पोंचण्याच्या विषयीं] ऋतुपर्णाच्या मनांत जें भय होतें तें कुंडिनपुर दाखवून (कुंडिनपुरास येऊन) घालवी.	६७
२५२	उत्तरार्ध–दमयंती नळाला न पाहे. रथध्वनि ऐकून भैमीस नळ आला असें वाटलें, परंतु नळाचें रूपांतर झालें होतें म्हणून ती त्यास ओळखूं शकली नाहीं. तिला संशय आला म्हणून तिनें त्याकडे पाहिलें नाहीं.	,,
२५३	उत्तरार्ध–दमयंतीची अशी संग्दिधावस्था झाली; तेव्हां तिनें तो बाहुक कोण आहे हें जाणण्यासाठीं अनेक युक्ति केल्या त्याचें वर्णन पुढें आहे.	,,
२६८	यासमयीं नळाची स्थिति एकीकडे आड आणि एकीकडे विहीर अशी झाली होती. दमयंतीला ओळख द्यावी तर, विपत्काळीं साहाय्य करणाऱ्या आश्रयदात्या स्वयंवरार्थागत ऋतुपर्णास दुखविल्याचा दोष लागतो, आणि स्वयंवरांत ऋतुपर्णाला वरूं पाहणाऱ्या दमयंतीला पेंचांत पाडल्यासारखें होतें. आणि ओळख न द्यावी तर तिला समजून उमजून पुनः दुःखसागरांत लोटून दिल्याचें पाप लागतें; याप्रमाणें नलाचें मन दोलायमान होत होतें, धर्मबुद्धि आणि प्रेमबुद्धि यांचा जबर झगडा चालला होता. अपत्यदर्शन होतांच त्यास गहिंवर आला. प्रेमबुद्धीची सरशी झाली,	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	तथापि तितक्यांत त्यानें सांवरून घेऊन 'मला माझ्या मुलाचें स्मरण झालें म्हणून मी रडतों' असा जबाब देऊन पेंचांतून मुक्त करून घेतलें.	६८
२७०	पूर्वार्ध–दमयंतीला ओळख न द्यावी असें नळाच्या मनांत होतें म्हणून मुलांस पाहून आलेला गहिंवर त्यानें दाबून टाकला, पण तिची ती दीन अवस्था पाहून ओळख न देण्याचें धैर्य पळालें. दमयंती आपल्या प्राणप्रियासाठीं झुरणीस लागून कष्टानें दिवस काढीत आहे असें नजरेस येतांच नलाचें धैर्य गळालें. पंतांनीं या प्रसंगाचें वर्णन फारच द्रावक केलें आहे; यांत करुणरस ओतप्रोत भरला आहे. उत्तरार्ध–वरकांतिहानि=दमयंतीच्या उत्तम लावण्याची हानि. दमयंतीला पाहून हें नळानें म्हटलें आहे. स्वकांतिहानि झाली म्हणून, नळाला वाईट वाटण्यास कारण नव्हतें. कर्कोटकाचें स्मरण करतांच आपणास दिव्य कांति प्राप्त होईल हें नळाला माहीत होतें. आर्या २७२ ची पूर्वार्ध या म्हणण्यास बळकटी आणतो.	६९
२७४	यांत कर्ता एक असून त्याचा संबंध (अन्वय) अनेक क्रियांशीं आहे. म्हणून हा **'कारकदीपक'** अलंकार होय. कर्ता एक असून त्या कर्तृकाराचा संबंध अनेक क्रियांशीं असतो तेव्हां **'कारकदीपक'** अलंकार होतो. याचीं उदाहरणें पंतांच्या काव्यांत अनेक आहेतः–(१) ज्ञहि अज्ञहि जन तारी नामें कामादि शत्रुही मारी । स्वयशें भवभय वारी करि भक्तमयूरघन दया भारी. ॥ ४६ ॥ [काव्यसंग्रह–मात्रारामायण–भाग पहिला.] (२) जटायु मूर्छित क्षतार्त देखतां गळां पडे, रडे पुसे कथी परंतु मृत्यु सांगतां घडे । दडे मुहूर्त पूर्व शोक यापुढें मनीं जडे, अडेचि धैर्य, तोय दे निघे शुगब्धिचे कडे. ॥ २२ ॥ [पंचचामर–रामायण.] याचें लक्षणः–'सकृद्वृत्तिस्तु धर्मस्य प्रकृताप्रकृतात्मनाम् । सैव क्रियासु बह्वीषु कारकस्येति दीपकम् ॥' [काव्यप्रदीप–१० उल्लास १७ कारिका पहा.]	,,
२७६	उत्तरार्ध–वधूंनीं सुगुणगणवरासन न वरावें काय? असा अन्वय. नव्या मुलींनीं उत्तमगुणसमुदायाचें वरासन (वर=श्रेष्ठ, आसन=स्थान=श्रेष्ठस्थान) न वरावें काय? नव्या मुलींनीं सुगुणसमूहमंडित अशा श्रेष्ठ पुरुषाला वरूं नये काय? अवश्य वरावें–असा भाव. देवांला टाकून दमयंतीनें नलाला स्वीकारलें यांत तिनें कांहीं पातक केलें असें नाहीं असें प्रतिपादन या पद्यांत केलें आहे.	,,
२७७	हें दमयंतीचें भाषण आहे. अन्वयः–बोलीं प्रेम दाविती, नेत्रें क्षणक्षणीं	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	बोलीं करिती [ती ही] जलविरहें मत्सीसी मरती कीं बरी परीक्षा पाहो. अर्थः–दमयंती म्हणते–'क्षणोक्षणीं डोळे ओले करणारी (जी मी) ती, पाण्याच्या वियोगानें जशी मत्सी (मरावी) तशी मरते किंवा फक्त भाषणानें (तोंडानेंच बोलून) प्रेम दाखविते (त्याची) चांगली परीक्षा (पुण्यश्लोकानें) पहावी.' या आर्येंत दमयंतीनें असें सूचविलें कीं नलानें पाहिजे तर माझ्या शुद्धतेबद्दल परीक्षा करावी. पुढच्या आर्येंत ती परीक्षेचा मार्ग वर्णन करिते.	७०
२७८	यांत 'पाहिली' असें पद आहे. व हें पद आहे असेंच धरिलें तर दमयंतीनें नलास खोटें सांगितलें असें पतकरावें लागतें. कारण दमयंतीस नलानें अग्निकुंडांत टाकिलें नव्हतें. शिवाय २७७ व्या आर्येंत 'पाहो' असें विध्यर्थी पद आहे. त्यामुळें ह्या आर्येंतही विध्यर्थी क्रियापद असावें, असें संदर्भावरून वाटतें. यास्तव या आर्येंतील 'पाहिली' हें पद 'पाहवी' असें विध्यर्थी धरून अर्थ केला आहे. अर्थः—रामानें सीता जशी अग्निकुंडांत टाकून पाहिली त्याप्रमाणें पुण्यश्लोकानें (नलानें) हिलाहि अग्निकुंडांत टाकून पहावी, (जेव्हां पुण्यश्लोक टाकून पाहील) तेव्हां शुकीच्या (पोपटीच्या) जशी चोंचीवर लाली (तांबडा वर्ण) असते, तशी हिच्या तोंडावर असेल. सारांशः–दमयंती म्हणते, 'मला जर अग्नींत टाकिली तर मी आरक्त दिसेन, काळी पडणार नाहीं. व्यवहारांत सोनें अग्नींत टाकून पाहतात, व तें जर अग्निसंयोगानें काळें न पडतां उलटें तांबूस दिसूं लागलें तर त्यास शुद्ध मानितात या गोष्टीवर येथें कविकटाक्ष आहे.	,,
२७९	यांत दमयंती नलास लागून बोलते. दमयंती म्हणते–'ही स्त्री (मी) जशी असती (तशी आहे) व बहुतकरून याच हेतूनें पंडितानें हिचा त्याग केला असावा. कारण तो पवित्रकीर्ति नल जर ही बरी (शुद्ध) असती तर हिला सोडिता ना. नलास 'पुण्यश्लोक' 'पंडित' अशीं विशेषणें देऊन व आपणास 'असती' असें म्हणून दमयंती नलास फारच लावून बोलली.	,,
२९९	पूर्वार्ध–यांत 'तुल्ययोगिता' अलंकार झाला आहे. येथें श्री आणि साध्वी स्त्री हे वर्ण्य पदार्थ दोन्ही प्रस्तुत आहेत. [पृ० ३२ पद्य २२१ टीप पहा.] उत्तरार्ध–विना प्रेम ते दंपती न, बोबळें [विना] डोळे व्यर्थ चिपडे [होत]–असा अन्वय लावावा. आपल्या पतीच्या गळ्यांत पूर्वीची श्री पडली तोंच (आपल्या पतीची–नळाची–शरीरकांति पूर्वींप्रमाणें आविर्भूत	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	झाली तोंच) दमयंतीही त्याच्या गळीं आपणच (बळानें) पडली. (नळाला पूर्वस्वरूप प्राप्त होतांच दमयंतीनें त्याला ओळखून त्याच्या गळ्याला मिठी मारिली.) जे बुबुळरहित ते डोळे नव्हत, व्यर्थ चिपडे होत. तसेंच प्रेमभावावांचून दंपती (नवराबायको) व्यर्थ होत. जर बुबुळें नाहींत तर चिपडे डोळे जसे व्यर्थ तसें जर प्रेम नाहीं तर नवराबायको (भार्यापती) हा संबंध व्यर्थ. नवराबायको हीं दोन असल्यामुळें डोळ्यांचा (डोळे दोनच असतात म्हणून) दृष्टांत फारच समर्पक आहे. दंपती=जंपती=जायापती ['दंपती-'जाया च पतिश्च इति द्वन्द्वसमासे जायाशब्दस्य दम्-भावः जम्-भावश्च वा निपात्यते । तेन च दम्पती, जम्पती, जायापती, इति रूपत्रयं भवति.' 'दाराः पुंसि बहुत्वे च दूं कलत्रे नपुंसकम्' इत्यमरमाला.]	७२
३००	उत्तरार्ध-शोकरूप मोहातें हरून समजावी.	,,
३०४	पूर्वार्ध-'स्वार्थग्रहलेशमात्र न कुलीनीं'=जे कुलीन असतात त्यांचा स्वार्थसंपादनाविषयीं तिळमात्र आग्रह नसतो हा उल्लेख येथें ऋतुपर्णास उद्देशून केला आहे. दमयंती आणि नल यांचा पुनः संयोग झाला म्हणून ऋतुपर्ण सुख पावला, कारण तो कुलीन अतएव स्वार्थाग्रहशून्य होता असें सूचविलें आहे. या पंतांच्या उद्गारांत नैतिक शिक्षणाचें सार भरलें आहे असें म्हटलें तरी चालेल. कुलीन कोणाला म्हणावें हें तत्त्व या चरणांत पंतांनीं अर्थांतरन्यासाचा आश्रय करून वाचकांस कळविलें आहे.	७३
३०५	अश्वहृदय नलानें ऋतुपर्णास सांगितल्यामुळें त्याला नलाप्रमाणें सुगतिपासून (शीघ्र गमनापासून-घोडे चांगल्या रीतीनें चालविण्याचे त्वरेपासून) होणारे सुखविलास प्राप्त झाले. या चरणांत 'सुगति' या पदावर श्लेष आहे. नलपक्षीं सुगति (उत्तम जिची गति (वर्तनक्रम) आहे ती) दमयंती हिच्या उपभोगापासून उत्पन्न झालेल्या सुखाचा व विहाराचा (लाभ) असें धरावें. सारांश नलाला (सुगतिपासून) दमयंतीपासून होणारे सुखाचा व ऋतुपर्णास शीघ्रसुगतिपासून (शीघ्र गमनापासून) होणारे सुखाचा, असा दोघांनाही सारखाच लाभ झाला.	,,
३०६	'हायन हो-हाय न हो' हें दोन अर्धास जोडणारें यमक आहे. अशा प्रकारच्या यमकांस 'दामयमक' असें म्हणतात. [राजाराम रामकृष्ण भागवतकृत 'अलंकारमीमांसा' पृ० ५४-५५ पहा.]	,,

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
३०९	'जसें रामें' या उपमेचा रसास्वाद घेण्यास वाचकाच्या आंगीं बरीच सहृदयता पाहिजे. (पृ० १४, पद्य १८ वरील टीप पहा.)	७३
३११	यांत सप्ताक्षरी अंत्य यमक आहे.	,,
	अध्याय पांचवा.	
७	यांत 'दामयमक' आहे. हें दोन अर्धांस जोडणारें आहे.	७५
	उत्तरार्धः-[लोमशानें सांगितलेली तीर्थयात्रा कर म्हणजे] कृष्णामृतसिंधुनामसीकरगा श्री करगा होईल=कृष्णरूप अमृतसिंधूच्या नामरूपसीकरांबरोबर असणारी श्री (विजयलक्ष्मी) तुला प्राप्त होईल. कृष्णनामस्मरणानें प्राप्त होणारी लक्ष्मी तीर्थयात्रा केल्यानेंही होईल. यांत तीर्थयात्रेचा महिमा नामस्मरणाच्या महिम्याप्रमाणेंच होय असें सूचविलें आहे. सीकरगा=तुषारांबरोबर गेलेली. कृष्ण हा अमृतसिंधु, या कृष्णाचीं नामें हीं सीकर, त्या सीकरां (तुषारां) बरोबर बाहेर आलेली श्री (लक्ष्मी) तुझ्या हस्तगत होईल. श्रीकृष्णनामापासून प्राप्त होणारी लक्ष्मी तुझ्या हातीं येईल.	
२२	या गीतींत **'स्वभावोक्ति'** आहे.	७७
२९	गंडकीशिला=गंडकी नदींतील शिला. या नदीचा उगम हिमालय पर्वतांतून आहे. हिला 'शालिग्रामी' नदी असें नांव आहे; कारण हींत शालिग्रामशिला सांपडतात. तुळजापुरच्या देवीची जी सुप्रसिद्ध मूर्ति आहे ती गंडकीच्या काळ्या दगडाची असून फार मनोवेधक आहे.	७८
३३	घटोत्कचाचा उद्देश आपला आणि आपल्या आश्रयास असणाऱ्या राक्षसांचा जन्म सफल करण्याचा होता हें स्पष्ट आहे. तेव्हां त्याच्या उद्देशाला अनुसरून पंत म्हणतातः—घटोत्कचानें धौम्यादिक मुनिजन राक्षसांच्या खांद्यावर प्रथम बसविले [व तो] शिवासारखा सत्संग (साधुसमागम) पावला. राक्षस हे तर दुष्ट आणि घातुक, असें असतां त्यांच्या खांद्यावर बसण्याचें ऋषींनीं कसें कबूल केलें अशी शंका येण्यासारखी आहे. या शंकेचें समाधान 'गरुडसखें गरलरस कां न विलेपावे?' या दृष्टांतानें पंतांनीं केलें आहे. ऋषिजनांनीं राक्षसस्कंधारोहण मान्य करण्याचें कारण हेंच कीं त्यांस पांडवांचें साहाय्य होतें, तेव्हां राक्षसांपासून इजा पोंचेल अशी शंका बाळगण्यास जागा नव्हती. गरुड मित्र असला म्हणजे विषरसानें काय होणार? अर्थात् कांहीं व्हावयाचें नाहीं, त्याप्रमाणेंच	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	पांडवांचा समागम प्राप्त झाल्यावर राक्षसस्कंधारोहणानें काय इजा होणार? 'गरुडसख' या पदानें पांडव आणि 'गरलरस' पदानें राक्षस असा अभिप्रेतार्थ ग्रहण करणें योग्य आहे. तसेंच पुढच्या गीतींत 'चक्षुर्विष अहि' व 'ओतु' हीं पदें राक्षसांस अनुलक्षून आणि 'अमृतघट' व 'शुक' हीं दोन पदें ऋषींस उद्देशून योजिलीं आहेत.	७९
३४	चक्षुर्विष नामक भुजंगोत्तम (महाभारत–आदिपर्व–अध्याय ३३ श्लो० ५-७) हा जरी अमृतघटाचें रक्षण करीत होता, तरी त्यानें त्या घटांतील अमृत तोंडांत टाकलें नाहीं, याचें कारण हरितेज होय. अमृतघटासारखा चांगला पदार्थ दुष्ट सापाच्या स्वाधीन होता, पण त्या घटावर ईशकृपा असल्यामुळें दुष्टाच्या हातून त्या घटाचें कांहींएक वाईट झालें नाहीं. सारांश हरिकृपा असली म्हणजे तिच्यापुढें दुष्टांचें कांहींएक चालत नाहीं. अर्थसंदर्भानें–यद्यपि ऋषिजन हे दुष्ट राक्षसांच्या खांद्यावर बसले होते तथापि त्या ऋषिजनांस पांडवांचा आश्रय असल्यामुळें राक्षसांपासून कांहींएक इजा झाली नाहीं.	,,
३७	यांत 'दामयमक' आहे.	,,
४०	साध्वी धर्मपत्नीचें वचन नवऱ्यास किती मान्य असतें हें यावरून चांगलें समजतें.	८०
४२	यांत मारुतीचें वर्णन पर्यायानें केलें आहे म्हणून यांत **'पर्यायोक्त'** अलंकार झाला आहे.	,,
४३-५४	यांतील उभय वायुपुत्रांचें संभाषण फार सुरस आणि चित्ताकर्षक आहे.	८१
५६	उत्तरार्ध–यांत **'अर्थांतरन्यास'** नामक अलंकार आहे.	८२
६२	या अध्यायांतील मारुतिभीमांच्या संभाषणावरून पांडवांस रामकथा विदित होती असें स्पष्ट दिसतें. असें असूनही मार्कंडेयानें धर्मराजाला रामकथा दहाव्या अध्यायांत सांगितली आहे हें कसें अशी शंका येण्यासारखी आहे. तिचें समाधान असें:—'माझ्यासारखा शोक कोणाला झाला होता काय?' असा धर्मानें प्रश्न केल्यावरून मार्कंडेयानें त्यास रामकथा निवेदिली आहे. रामकथा धर्माला पूर्वींच ज्ञात होती किंवा नव्हती हें मार्कंडेयाला माहीत नसावें, अथवा माहीत होतें असेंही गृहीत केलें तरी मार्कंडेयाचें काम धर्मराजाचें सांत्वन करावयाचें होतें, तें यथार्थपणें	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	बजाविण्यासाठीं त्यानें ज्या ज्या योग्य अशा कथा त्याला वाटल्या त्या सांगितल्या, त्या कथा धर्माला माहीत असल्या नसल्या सारख्याच. त्यांच्या श्रवणानें—त्यांपासून मनास समाधान वाटावें—हा जो इष्ट परिणाम तो व्हावयास चुकतो असें नाहीं.	८३
६९	पूर्वार्ध—यांत **रूपक** आहे. उत्तरार्ध—यांत **अर्थांतरन्यास** अलंकार असून 'तेजस्वी' कोणाला म्हणावें हें सूचविलें आहे.	८४
७६	उत्तरार्ध—यांत **अर्थांतरन्यास** झाला आहे.	८५
९०	या गीतीचा पुढें दिलेला अर्थ सुसंगत, सुरस आणि सरळ होय. धर्म म्हणतोः—हे भीमा! मला राज्यलक्ष्मी ही अगदीं व्यभिचारिणी वाटते—अर्थात् मला अशा राज्यलक्ष्मीची स्पृहा नाहीं. ही सौगंधिकपुष्करिणी पाहून मला फार आनंद झाला. ही नलिनी जशी दिसली तशी जर अलकानगरी दिसती तर हे सख्या! माझे डोळे निवाले असते. [धर्माला अलका पाहण्यासाठीं पुढें जाण्याची उत्कंठा फार होती, परंतु पुढें जाण्याचा मार्ग सुगम नाहीं असें वायूच्या सांगण्यावरून कळल्यामुळें तो पुढें न जातां परतला.]	८७
१०१	पूर्वार्ध—भीमानें यक्षराक्षसांचा नाश केला म्हणून कुबेराला क्रोध येऊन तो युद्ध करण्याच्या हेतूनें सैन्यासह आला, परंतु धर्मप्रभृति पांडवांस पाहतांच त्याची युद्ध करण्याची इच्छा शांत झाली, त्यांस पाहतांच कुबेराच्या मनांत स्नेहभाव उत्पन्न झाला.	८८
१०३	संकोच—भीमसेनानें माझे यक्षराक्षस मारिले असें मी समजत नाहीं, तर ते कालवशानेंच मरण पावले, भीमसेन निमित्तमात्र झाला, यास्तव मनांत संकोच बाळगण्याचें कारण नाहीं—असा भाव.	८९
१०९	धर्मास इंद्रानें दर्शन दिलें ही कथा वनपर्वाच्या १६६ व्या अध्यायांत असून इंद्राचें भाषण श्लोक १३-१४ यांत आहे तें गीति १०९-१११ यांच्याशीं ताडून पहावें म्हणजे पंतांची करामत दिसून येईल.	९०
११८	हत्तीच्या गंडस्थळांत मौक्तिक आढळतें असा कविसमय आहे. यास आधारः—"करींद्रजीमूतवराहशंखमत्स्याहिशुक्त्युद्भववेणुजानि । मुक्ताफलानि प्रथितानि लोके तेषां तु शुक्त्युद्भवमेव भूरि ॥" [कुमारसंभव—सर्ग १ श्लोक ६ टीका पहा.] याचा भावार्थः—करींद्र=गजश्रेष्ठ, जीमूत=मेघ, वराह, शंख, मत्स्य, अहि=सर्प, शुक्ति (शिंपा) आणि वेणु=वंश यांपासून	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	उत्पन्न होणारीं मोत्यें लोकांत प्रसिद्ध आहेत, त्यांत शुक्तिजात मुक्ताफळें पुष्कळ उत्पन्न होतात. [या श्लोकांचें साकीबद्ध भाषांतर येथें देतों:— 'वारणिं, शंखीं, जलदीं, वंशीं, सर्पांच्या शीर्षांत, । वराहिं, मत्स्यीं, शुक्तीमाजी मुक्ता उद्भवतात ॥ १ ॥ सर्वांमाजी शुक्तिज मुक्ता प्रसिद्ध लोकीं फार । कविसमयां या योजुनि कविते शोभविती कवि थोर ॥ २ ॥'].	९१
	अध्याय सहावा.	
३	यांत 'लोकोक्ति' नामक अलंकार आहे. जेथें लोकप्रवादाचें अनुकरण होतें तेथें 'लोकोक्ति' नामक अलंकार होतो. याचें लक्षण:—'लोकप्रवादानुकृतिर्लोकोक्तिरिति भण्यते' [कुवलयानंद १५५.] 'हे सखि! डोळे मिटून कांहीं महिने सहन कर' या वाक्यांत 'डोळे मिटून' हें प्रसिद्ध लोकवादाचें अनुकरण आहे म्हणून यांत 'लोकोक्ति' अलंकार आहे.	३९
१६	उत्तरार्ध—ही कव्युक्ति न मानतां धर्माचीच उक्ति आहे व यांत 'अर्थांतरन्यासा'चा आश्रय करून मुनिजनांची स्तुति केली आहे असें मानिलें तरी चालेल.	,,
२६	उत्तरार्ध—यांत 'ब्राह्मणा'चें जें लक्षण केलें आहे त्याला अनुसरून ज्यांचें वर्तन आहे तेच खरोखर त्या नांवास योग्य होत, मग ते जन्मतः ब्राह्मण असोत अथवा नसोत.	९६
२८	उत्तरार्ध—घनाला (मेघाला) मोठी घमेंड असेल कीं मीच काय तो अमृताचा (उदकाचा) जबरदस्त वर्षाव करणारा, मजसारखा अमृतवर्ष करणारा दुसरा कोणी नाहीं, परंतु पंत म्हणतात:—तो मेघ देखील स्वतः कबूल करतो कीं सुश्रोतृवक्तृसंगमापासून जो अमृताचा (वचनामृताचा) वर्षाव होतो त्यापुढें माझा अमृतवर्ष (पाण्याचा वर्षाव) कांहींच नाहीं. येथें 'अमृत' शब्द श्लिष्ट आहे.	,,
३०	उत्तरार्ध—सत्संग (साधुसमागम) हा जयग्रंथांत नहुषाची अजगरता दावी (दाखवी). नहुष शापानें अजगर झाला ही कथा मात्र महाभारतांत आहे, परंतु सत्संग नहुषाच्या ठिकाणीं अजगरता न दावी=नहुष एकदां अजगर झाला होता असें त्याच्या देहावरून कळत नसे.	,,
३२	उत्तरार्ध—देह शब्द अस्त्री आहे. ['कायो देहः क्लीबपुंसोः' इत्यमरः.]	,,
३३	उत्तरार्ध—यांत 'पर्यायोक्त' आहे.	९७

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
३६	पूर्वार्ध–यांतही 'पर्यायोक्त' आहे.	९७
३७	पूर्वार्ध–यांत 'रूपक'अलंकार झाला आहे.	,,
४०	या आर्येत भामा व कृष्णा यांस गंगा व यमुना यांची वर्णास्तव व लक्ष्मी व गौरी यांची स्थितीस्तव जी उपमा दिली आहे ती फारच मजेदार व समर्पक आहे. सत्यभामा व द्रौपदी [गौर व कृष्ण] यांची भेट पंत म्हणतात गंगा आणि यमुना यांच्या संगमासारखी [गौर व कृष्णा] गंगाजमनी दिसली. गंगा आणि यमुना यांच्या संगमाच्या ठिकाणीं गंगेचें धवलत्व आणि यमुनेचें कृष्णत्व हीं स्पष्ट व्यक्त होतात हें सर्वप्रसिद्धच आहे. आतां त्याच पुन्हां पार्वती आणि लक्ष्मी यांसारख्या दिसल्या. उघडच आहे, कीं सत्यभामा ही कृष्णाची पट्टराणी तेव्हां ती दागिन्यांनीं भरून आली असेल म्हणून लक्ष्मीसारखी दिसली. आणि द्रौपदी ही वनवासांत होती म्हणून ती पार्वतीसारखी (भिकाऱ्याच्या बायकोप्रमाणें) दिसली.	,,
४१	उत्तरार्ध–यांत साधुदर्शनाची जी महती वर्णिली आहे ती कोणाला तरी अमान्य होईल काय?	९८
४२	पंचमुखें=सदाशिवानें [सदाशिवाला पंचमुख, पंचवक्त्र असें नांव आहे; ज्याला पांच मुखें आहेत तो पंचमुख. या पांच मुखांचीं नांवें सद्योजात, तत्पुरुष, अघोर, वामदेव आणि ईशान अशीं आहेत. 'यतः सद्योजाततत्पुरुषाघोरवामदेवेशाना इति भगवतः पंचवक्त्राणि । पंचवक्त्रं विशालाक्षं सर्पगोनासमंडितम् इति स्वच्छंदमहातन्त्रे ॥' स्तुतिकुसुमांजलि–स्तोत्र ११ श्लोक ११६ टीका–पृष्ठ १९९, स्तोत्र ९ श्लोक १० टीका–पृष्ठ ८७ पहा. 'वदनपंचकस्तुति'काव्यांत या पांच मुखांचें विस्तृत वर्णन आहे.] येथें 'पंचमुख' हा शब्द फारच मार्मिक व समर्पक आहे. पांच पांडव व पंचमुख या शब्दांत जें गर्भित सादृश्य दर्शविलें आहे तें शंकर आशुतोष इत्यादि शिववाचक अन्य शब्दानें व्यक्त झालें नसतें. योग्य स्थलीं योग्य शब्दाची योजना करून पंतांनीं आपली अलौकिक मार्मिकता व्यक्त केली आहे.	,,
४३	अन्वयः—तुम्ही प्रथमचि परा शतजन्मेंहि सुदुर्लभा [अशा] सुकृतें तुळा. संप्रति (सुकृतें) तव कर्में जीवत्कृतें [आणि] परकर्में परासुकृतें [होत]. दुसऱ्याला शंभर जन्मींही जें सुकृत (पुण्य) प्राप्त होणें अशक्य *अशा सुकृताशीं आधींच* तुमचें सुकृत तुलना पावतें (बरोबर–समान	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	आहे). आतां तीर्थयात्रादि प्राप्त सुकृतानें (पुण्यानें) तुमचीं कर्में जीवंत केलीं आहेत व शत्रुकर्में परासु (मृतप्राय) केलीं आहेत. तुमच्या पुण्य-विशेषानें तुमचीं कर्में प्रबळ झालीं आहेत आणि तुमच्या शत्रूंचीं कर्में दुर्बल (मृतप्राय–निःसत्व) झालीं आहेत. तुम्ही प्रथम तुलना करून पहाल तर, तुम्हाला असें दिसून येईल कीं दुसऱ्यास शंभर जन्मांनींही अप्राप्य अशा पुण्यानें तुमचीं कृत्यें जीवंत झालीं आहेत आणि परकर्में (शत्रुकर्में) मृतप्राय झालीं आहेत. उत्तरार्ध–यांत **'यथासंख्य'** अलंकार झाला आहे. जेव्हां पदार्थांचें वर्णन ज्या क्रमानें पहिल्यानें झालेलें असतें त्याच क्रमानें त्यांचा संबंध (अन्वय) पुनः दुसऱ्या पदार्थांशीं लागत असला म्हणजे **'यथासंख्य'** अलंकार होतो. 'संप्रति (सुकृतें) तव कर्में जीवत्कृतें [आणि] परकर्में परासुकृतें [होत]' असा यांत पूर्वींच्या क्रमाशीं जुळणारा दुसरा क्रम आला आहे म्हणून **'यथासंख्य'** अलंकार झाला. शत्रूंस, मित्रांस आणि विपत्तीला जिंक, राख आणि पिटाळ' या वाक्यांत शत्रु, मित्र, आणि विपत्ति या शब्दांचा ज्या क्रमानें उल्लेख झाला आहे त्याच क्रमानें जिंक, राख, आणि पिटाळ, या शब्दांशीं त्यांचा संबंध लागला आहे म्हणून हा **'यथासंख्य'** झाला. याचीं अन्य उदाहरणें:— (१) जयभीमवधाविषयीं कर्णसुयोधन करीत बकबक रे । कैसे करितील तिमिग्रास दहनमेषभंग बक बकरे ॥ [द्रोणपर्व–अध्याय १२ गीति ९१], (२) कीचकरहित विराट स्पष्ट जसा सर्प नीरदन दीन, । अल्प अनल्प बळें तो तूं संप्रति, जेंवि नीरद नदीन. ॥ [विराटपर्व–अध्याय २ गीति ३१ पृष्ठ ४९], (३) कर्णखचरार्जुनां कां म्हणति न खद्योतरात्रिकरसविते [वनपर्व–७-९५], (४) मानी मनोजशर हार तुरे फुलांचे, कंदर्पकोपवचनें ध्वनि कोकिलांचे । राकाशशी मदनदर्पण भाविलाहे, नेघेंचि तो न परिसे न तयासि पाहे ॥ [रघुनाथपंडित–नलदमयंतीस्वयंवराख्यान].	९८
४४	अन्वयः—तूं (हे धर्मा!) तीर्थांतें उद्धराया फिरलाशि, मज्जन (स्नान) कराया न [फिरलाशि] [कारण] सच्चरण म्हणति 'पुण्यर्द्धी हो! नमज्जन-करा (नमन करणाऱ्या जनांच्या हाताशीं) आधीं या.' अर्थ—हे धर्मा! तूं तीर्थांचा उद्धार करावा यासाठीं फिरलास, तीर्थांत स्नान करावें म्हणून फिरला नाहींस, कारण साधुजनांचें चरण म्हणतातः–अहो पुण्याचे निधीनो! आधीं आम्हास (चरणांस) नम्र झालेल्या लोकांच्या हातीं या. तीर्थस्नानापासून साधुजनांला पुण्यप्राप्ति करावयाची असें नाहीं, तर ती-	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	र्थालाच साधुजनसमागमापासून पुण्यर्द्धि मिळवावयाची असते,–असें कृष्णाच्या भाषणाचें तात्पर्य. तीर्थें साधूंना पवित्र करीत नाहींत, तर साधूच तीर्थाला पवित्र करतात.	९८
४६	उत्तरार्धः—त्रिनयन=महादेव. [श्वेतभानु=सोम, बृहद्भानु=अग्नि, आणि भानु=सूर्य, हे महादेवाचे तीन नेत्र होत. स्तुतिकुसुमांजलि–स्तोत्र २ श्लोक ६]. येथें 'त्रिनयन' हा शब्द फार समर्पक योजिला आहे. ज्याच्या मस्तकावर अग्निसदृश तिसरा लाल डोळा आहे असा 'शंकर' हें सूचविण्यासाठीं तदर्थवाचक 'त्रिनयन' शब्द घातला आहे. येथें 'त्रिनयन' या शब्दानें जें काम झालें आहे तें इतर शब्दानें व्हावयाचें नाहीं. शंकराचा तिसरा नयन अग्नि असून त्याच्या मस्तकीं चंद्र असतो इतका कथाभाग लक्षांत ठेविला म्हणजे सित (पांढरे) व रक्त (तांबडे) टिकले पुढें कसे सरसावतील या पंतोक्तीची मार्मिकता समजेल. शंकरमस्तकावरील चंद्राची धवल कोर आणि त्याचा आरक्त तिसरा नेत्र ह्यांपुढें पांढरे आणि तांबडे टिकले काय म्हणून गर्व दाखविण्यास जातील?	,,
४९	उत्तरार्ध–बोलका=बोलणारा (फार बोलतो तो.) येथें हा शब्द वाग्मी Eloquent या अर्थीं योजिला आहे. सांप्रत या शब्दांत थोडी निंदेची छटा मारते, परंतु ती पंतांच्या वेळीं नसावी. बोलका म्हणजे बहुभाषी–बडबड करणारा Talkative असा अर्थ झालेला आहे.	९९
५२	प्रतिविंध्यादिक पांच कुमार आजोळीं द्रुपदाकडे (पृ० १८ टीप १५ अध्याय २ गीति ३८) गेले होते, ते सांप्रत कृष्णगृहीं राहावयास आले असून, द्वारकेंत राहण्यास इतके खुष होते कीं त्यांस यज्ञसेन व मातुल यांनीं अनेकवार बोलाविलें असतांही ते परत आजोळीं गेले नाहींत–इत्यादि वर्णन महाभारत–वनपर्व–अध्याय १८३ श्लो० २३-२६ यांत आढळतें. या पद्यांत 'षण्मुखमातृसम' हा शब्द फार खुबीदार आहे. जसे सुभद्रागृहीं सहा मुलगे होते तसें पार्वतीसदनीं एकटा षडानन होता तरी तो सहा मुखें असल्यामुळें सहा मुलांच्या स्थानीं होता. सुभद्रेचें गृह जसें सहांनीं भूषित होतें तसें पार्वतीसदनही षडाननानें भूषित होतें, असा अर्थ पार्वतीवाचक 'षण्मुखमातृ' शब्द योजून दर्शविला आहे.	,,
५८	उत्तरार्ध–नटती=नाचतात. नट् (नाचणें) या धातूपासून संस्कृत पद्धतीवर केलेला हा प्रयोग आहे म्हणून यास Sanskritism असें म्हटलें असतां चालेल. नटति, स्वप्न, मित्र, शपथ, जन्म, राजदार इत्यादि	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	शब्दांचे प्रयोगांवरून पंताचा रोख मराठी भाषेला संस्कृत व्याकरणाच्या पद्धतीवर नेण्याचा दिसतो.	१०१
६३	या गीतींत 'नवशीकरण' हा शब्द नवा साधून जो अर्थ केला आहे तो उचित नाहीं. याचा अन्वयः—गे! जी पतिपरमेश्वरचरणा तत्सेवार्थ करणें (इंद्रियें) न नवशी, ती मुग्धा स्वामिमन (वल्लभचित्त) वशीकरणें कैशी वळवील? अर्थ=जी सती पति हाच परमेश्वर जाणून त्याच्या चरणाला (पादाला) त्या पतीची सेवा घडावी यासाठीं आपलीं करणें (इंद्रियें मन इत्यादि) नवशीत नाहीं—(पतिचरणाला नवस करून अर्पण करीत नाहीं)—पतिदेवतेला नवस करीत नाहीं, ती मुग्धा स्त्री वशीकरणानें (टाण्याटोण्यासारख्या उपायांनीं) आपल्या पतीचें मन कसें वळवील? अर्थात् वळवूं शकणार नाहीं. ['**ज्ञानप्रसारक**'–पुस्तक १६ पृ० ३०६.] नवसणें=हे पतिचरण हो! जर तुम्ही मला आपली सेवा द्याल तर, मी आपलीं इंद्रियें तुम्हांस वाहीन असा नवस करणें.	१०३
६५	या गीतीचा पृष्ठ १०४ यामध्यें जो अर्थ दिला आहे तो उचित नाहीं. अन्वयार्थः—ती श्रुतीला कविधीसी शुद्ध वदलीला फार मानवली, [कारण] सती पतीसचि न [तर] कर्णासहि सत्य (खरोखर) उद्धवदलीला होति. ती (सत्यभामा) जशी कवीची (सुज्ञ पुरुषाची) धी (बुद्धि) श्रुतिला (वेदाला) मान डोलविते (सुज्ञ पुरुष वेदाला जसा मान देतो) तशी शुद्ध वदलीला (चांगली बोलली जी द्रौपदी तिला) फार मानवली (फार आवडली—मान डोलविती झाली.) सत्यभामेनें द्रौपदीच्या उत्तम भाषणाला मान डोलविली यांत कांहीं नवल नाहीं कारण (पंत म्हणतात) सती (पतिव्रता स्त्रिया) आपल्या वल्लभासच नव्हे तर (इतरांच्या) कानासही सत्य (खरोखर) उद्धवद (आनंदप्रद) आनंद देणाऱ्या आहेत लीला (चेष्टा) ज्यांच्या अशा होतात. पतिव्रतांच्या लीला त्यांच्या वल्लभांसच आनंद देतात असें नव्हे, तर त्या इतरांच्या कानांलाही आनंददायिनी होतात. साध्वींच्या लीलांनीं त्यांच्या नवऱ्यांसच आनंद होतो असें नाहीं, तर त्यांच्या लीला ऐकून (श्रवणद्वारा) इतरांलाही आनंद होतो—असा भाव. मानवणें=मान डोलवणें, मान्य होणें.	१०४
६८	'नभा उखल–न भाउ खल' हें पंतांचें ठरींव यमक आहे.	,,

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	अध्याय सातवा.	
१	'काळजी वाहे–काळ जीवा हे' ठरींव यमक. यांत 'भुजगसे' हा शब्द खुबीदार आहे. सर्प जसा कुटिलपणें वांकडा वांकडा जातो व चावतो त्याप्रमाणें पांडव हे आपणास सरळपणें दुःख न देतां वक्र व कुटिल मार्गाचा अवलंब करून छळतील अशी धृतराष्ट्राला धास्ती पडली, असा भावार्थ आहे.	१०५
५	उत्तरार्ध–कर्ण म्हणतोः—मसलत देणारा जो मी त्या मला (मंत्रापासून उत्पन्न होणाऱ्या) जयसुधेचें यथेच्छ पान करून ढेंकर देऊन (तृप्ति होईपर्यंत जयसुधा पान करून) स्तवा (स्तवन करा).	”
८	या गीतीचा अर्थ पृष्ठ १०६ यांत दिला आहे तो उचित नाहीं. अन्वयः—[मी धृतराष्ट्र] या शमला सुयोधना (पापी दुर्योधनाला) म्हणतों [कीं] वनप्रवेशें दहनापरि भीमधनंजय कृष्णाक्षोभें सुयोधनाश मला दिसतो. अर्थः—धृतराष्ट्र म्हणतो–या पापी दुर्योधनानें अरण्यांत प्रवेश केला तर भीम, अर्जुन आणि द्रौपदी यांच्या अग्निसमान कोपानें या पाप्याला सुवीरनाश होईल असें मला दिसतें. हा पापी दुर्योधन अरण्यांत गेला तर त्याला कृशानुसदृश भीमादिकांच्या कोपानें आपल्या उत्तम वीरांचा नाश सोसावा लागणार आहे, असें मला वाटतें.	१०६
१३	'सकटक वनीं–सकट कवनीं' ठरींव यमक. पूर्वार्ध–यांत 'स=सह' शब्दाची योजना केली आहे तरी 'सहोक्ति' होत नाहीं कारण दार अनुज शकुनि इत्यादिकांचा शिरणें हा धर्म वास्तविकपणें अभिन्न आहे.	”
१४	यांत 'व्यतिरेक' अलंकार आहे.	”
२१	खेचरबल–आकाशमार्गी गमन करणाऱ्या गंधर्वांचें सैन्य. येथें 'खेचरबल' शब्द पंताच्या समर्पक शब्दरचनाचातुर्याची साक्ष देत आहे. जरी आम्ही पादचारी व तुम्ही आकाशगामी, तरी तुम्ही जर निघून गेलां नाहीं तर तुमचा आम्ही [भूचर प्राणी] समाचार घेऊं अशी दुर्योधनवीराची दर्पोक्ति ध्वनित केली आहे.	१०७
३४	यांत ज्या नीतितत्वाचें प्रतिपादन केलें आहे त्यास नांव कोण ठेवील? पंताच्या काव्यांत अशा उदार नीतितत्वांचा निर्देश वारंवार केलेला आढळतो.	१०९
३५	कुपुत्र कोण या प्रश्नाचें उत्तर या गीतींत सुरेख दिलें आहे.	”

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
३७	उत्तरार्धः—असुज्ञा ती कामदुघा बहुमता (परि) सुज्ञासि गुर्वनुज्ञा (बहुमता)=मूर्ख मनुष्याला ती कामधेनु फारच मान्य असते. परंतु सुज्ञपुरुषाला गुरूची आज्ञाच मान्य असते.	११०
३८	उत्तरार्ध—अन्वय—खेचर फिरले (जर) ते मरणार नसते तरि भिऊनि कां न पळते?=गंधर्वांचें मरणच आलें म्हणून ते फिरले, असें नसतें तर (त्याचें मरण ओढवलें नसतें तर) ते भिऊन कां पळाले नसते? त्याचें मरण आलें होतें म्हणून ते भिऊन पळाले नाहींत, तर मरणासाठींच परतले. ते जर मरावयाचे नसते तर पळाले असते, पण तसें नव्हतें म्हणून न पळतां परतले. ज्या अर्थी गंधर्वांनीं मोर्चा फिरविला त्या अर्थी ते पांडवांच्या हातीं मरणार होते आणि म्हणूनच ते पांडवांस भिऊन पळाले नाहींत.	,,
४१	या गीतींत 'अतिशयोक्ति' अलंकार आहे. चित्रसेनाज्ञा आणि सुधा हे पदार्थ तात्विकदृष्टीनें म्हटले तर भिन्न होत, एक नव्हत; या दोहोंमध्यें भेद असतांही पंतांनीं अभेदाची कल्पना केली आहे. अशा प्रकारच्या अतिशयोक्तींत रूपकाची झांक मारते.	,,
४८	'सुयोधना शरण—सुयोधनाश रण' ठरींव यमक [गीति २६ पृष्ठ १०८ पहा.]	१११
५२	उत्तरार्ध, अन्वय—तें शील सकळांसहि तारिल, या त्या क्षणमात्र चळ नसो=तें उत्तमशील सकळांचें तारण करील, त्या शीलाला चळ (चंचलता) क्षणभर सुद्धां नसो.	११२
५५	'कीर्तिलाभरत—कीर्तिला भरत' ठरींव यमक.	,,
५७	इंद्रानें मृत गंधर्वांस अमृतसेक करून उठविलें असें वर्णन आहे. गंधर्व तर देवयोनि, त्यांस मरण संभवतें कसें अशी शंका येण्यासारखी आहे. तिचें समाधान असें:—गंधर्व हे देवयोनि म्हणजे देवांशक होत, अमर नव्हत. जे योनिसंभव त्यांस मृत्यु प्रकृतिसिद्ध आहे असें समजावें. जे अयोनिसंभव त्याची मात्र मरण ही प्रकृति नव्हे असें मानावें. हरिहर हे अयोनिसंभव होत, कच योनिसंभव होय. देवदानवांच्या युद्धांत देव पतन पावल्याचीं उदाहरणें विपुल आढळतात. एतावता गंधर्व हे देवांशक आणि योनिसंभव म्हणून त्यांना प्रकृतिसिद्ध मरण आहे.	,,
६३	उत्तरार्ध—यांत 'रूपक' आहे.	११३

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
६६–६९	यांत 'स्वभावोक्ति' आहे, झालेल्या गोष्टीची आठवण करून दिली आहे.	११३–११४
७७	सांबें–अंबेसह शिवानें, अंबा व शिव यांनीं दुर्योधनास वर दिले होते असें 'सांब' शब्द योजून पंतांनीं ध्वनित केलें आहे.	,,
८२	'अगारा या–अगा राया' हें ठरींव यमक.	११५
८३	यांत 'श्लेष' आहे. याचा अन्वय–धर्म सुरगति [आणि] तूं असुरगति, यास्तव असुर कुलें शेतें तुज मेधा! आशेतें धरुनि जीवनलाभार्थ आ पसरितात्ति.	,,
८४	मोरोपंत–वनपर्व–अध्याय १४ यांत ही कथा सविस्तर वर्णिली आहे.	११६
८८	राधेय–येथें रोदन, नमन, आण वाहणें इत्यादि उपाय स्त्रीस्वभावास अनुरूप आहेत असें जाणूनच पंतांनीं कर्णास 'राधेय' असें विशेषणपद लावून त्याचा नामर्दपणा बाइलेपणा ध्वनित केला आहे. हाच प्रकार पुढें आर्या १०६ व १२० यांत दुर्योधनाला 'गांधार' असें विशेषणपद लावून त्याचें कापुरुषत्व आणि दौर्बल्य दाखविण्यासाठीं केला आहे. मर्द पुरुषास अनुचित असें कृत्य एकाद्या वीराच्या हातून घडलें असतां त्याला बायकांच्या नांवावरून प्राप्त झालेलें उपपद लावून त्याचा उपहास करण्याचा प्रकार पंतांनीं अनेक ठिकाणीं केला आहे असें दिसतें.	११८
१०२	'पाप डसे–'पापडसे' हें ठरींव यमक आहे.	११९
११४	उत्तरार्ध–यांत 'अर्थांतरन्यास' अलंकार आहे.	१२०
११६	ही भीमोक्ति आहे. भीमसेन दुर्योधनाला म्हणतो:—हे दुर्योधना! आज तुझा राजसूययज्ञ पहायाला मी येत नाहीं, तर तुझ्याशीं समरसत्र करण्याकरितांच धर्मासह खचित येईन. माझ्या मनाला हाच रस रुचतो, हा समररूप रस जितका आवडतो तितका दुसरा कोणताही रस आवडत नाहीं. दुसरे अनेक रस आहेत त्यांपैकीं एखादा अमृतासारखा जरी असला तरी तो मला त्रासच देतो. [येथें अमृतसमरस भीमाला त्रास कां देतो अशी शंका येण्यासारखी आहे. याचें कारण युद्धरसाची गोडी आम्हाला माहीत नाहीं हेंच होय. जो खरा वीर आहे त्याला युद्धरसापुढें इतर सर्व रस तुच्छ होत. भीमसेन हा मोठा वीर होता आणि त्याला आपल्या शत्रूचा पराभव करून समररसपान करावयाचें होतें, तेव्हां त्यास अमृतसम इतर रस त्रासप्रद वाटला हें ठीकच आहे.]	,,

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	अध्याय आठवा.	
२	हें 'व्रीहिद्रौणिक आख्यान' वनपर्वाच्या २५८-२६० या अध्यायांत आहे. मुद्गल नामक एक ब्राह्मण कुरुक्षेत्रांत पुत्रस्त्रियांसहवर्तमान शिलोंच्छवृत्तीनें उदरनिर्वाह करून असे. तो मोठा शान्त जितेंद्रिय सत्यभाषी श्रोत्री होता. तो शेतांत गळलेला एकेक भातगोटा टिपून पानाचे द्रोणांत टाकून पंधरा दिवसांनीं तो द्रोण भरला म्हणजे अतिथींस भोजन देऊन आपणही पंधरा दिवसांनीं एकदां भोजन करी. याप्रमाणें कपोतिकन्यायानें पक्षाहार करून आपलें, भार्येचें, स्नुषेचें आणि सुताचें पोषण करीत असतां, इंद्रप्रमुख देव अतिथिवेषानें याजकडे येऊन प्रसाद घेऊन संतुष्टमानस होत्साते जात. हा वृत्तांत ऐकून अत्रिपुत्र दुर्वासमुनि हा याजकडे पारण्याच्या दिवशीं मध्यान्हीं आला. व 'मी अन्नार्थी आहें' असें सांगून ब्राह्मणानें दिलेलें अन्न भक्षण करून व राहिलेलें अन्न आंगाला लावून निघून गेला. याप्रमाणें दुर्वासानें लागोपाठ सहा पंध्रवडे केलें. मुद्गलानें सहाही वेळ दुर्वासमुनीला भक्तिपुरःसर सर्व अन्न दिलें. तेव्हां दुर्वास प्रसन्न झाला व मुद्गल सत्वभ्रष्ट झाला नाहीं म्हणून त्यास स्वर्गवासलाभ होईल असा वर देऊन निघून गेला. या कथेंत दानाची महती दर्शविली आहे. सत्पात्रीं स्वल्प जरी दिलें तरी तें अनंतफलदायी होतें या तत्वाचें हें उदाहरण आहे. दुर्वासाला व्रीहिद्रोण देऊन मुद्गलश्रोत्री संसारसागर तरला असें या आख्यानांत सूचविलें आहे.	१२०
६	उत्तरार्ध–जसें शुद्ध पाणी तापविलें तरी रसास (रुचीला–माधुर्याला) सोडीत नाहीं, तसा शुचिगुण पुरुष सत्वाला कधींही सोडीत नाहीं.	१२१
७	उत्तरार्ध–साधुसंगति चांगलें फळ देणारी आहे, परंतु ती जे शुद्ध आहेत त्यांलाच पचते (फळ देणारी होते) इतरांस ती पचत नाहीं. (इतरांस तिच्यापासून उत्तम फललाभ होत नाहीं.)	,,
८	उत्तरार्ध–यांत पंतांनीं सुंदर उपमा योजिली आहे.	,,
१०	उत्तरार्ध–यांत 'पर्यायोक्त' आहे.	१२२
१३	उत्तरार्ध–यांत 'यदुवंशविहितजननाचे प्रियसख' हें सुरेख 'पर्यायोक्त' होय.	,,
१५	गीति १५–२० यांतील द्रौपदीचा धांवा हृदयंगम आणि करुणरसानें भरलेला आहे.	,,
१९	मग मत्स्वरूप काय ? मग माझें मोठेपण काय उरलें ?	,,

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
२०	दुधाच्या उताला यावयास जसा उशीर लागत नाहीं तसा या दुर्वासाच्या क्रोधाला यावयाला उशीर लागत नाहीं. यास्तव, अहो कृष्णजी! तुम्ही माझ्यावर कृपा करून उतावेळ या (लौकर या). यांत द्रौपदीचें भाषण आहे, म्हणून स्त्रीजातीस योग्य असा येथें दुधाच्या उताचा दृष्टांत पंतांनीं दिलेला आहे. यावरून पात्रांस अनुरूप भाषणें घालण्याची पंतांची शैली स्पष्ट दिसते.	१२३
२५	उत्तरार्ध–चित्रगुप्त हा यमाचा चिटणीस होय. हा सर्व लोकांची पापें आणि पुण्यें एका वहींत लिहून ठेवितो व त्यांतील हिशेबाप्रमाणें प्रत्येक मनुष्यास यथाकर्म बक्षीस अथवा शासन मिळतें.	,,
२६	हे सखि द्रौपदी! थट्टा पुरे कर, ही थाली सर्वांस संतृप्त करण्यास योग्य (समर्थ) आहे, इची लीला सुरभिसखीच (सुरभीसारखी इष्टार्थ देणारी) आहे; असें असतां ही मला तृप्त करावयास समर्थ नाहीं काय?	,,
२८	उत्तरार्ध–विश्वंभरानें (विश्वपालक कृष्णानें) कल्पवृक्ष, चिंतामणि आणि कामधेनु यांचीं यशें हरिलीं, यांजकडूनही जें होणार नाहीं तें करून त्यांस लाजविलें असा भाव.	१२५
३९	आतां आम्हाला भाताचें एक सित (शीतही) तुहिनपर्वताभ (हिमाचलाप्रमाणें) आहे, मग आम्ही काय गिळावें? आमचीं पोटें इतकीं भरून गेलीं आहेत कीं एक शीत डोंगराप्रमाणें वाटतें. [पश्चात्तापपूर्वक दुर्वास म्हणतो] कृष्णेचा कोपाग्नि हिमालयपर्वतालाही भसित (भस्म, राख) करील, मग मी किती? (माझा हिशोब तो काय?)	,,
३५	गीति ३५–४१ यांतील दुर्वास मुनीचें भाषण त्याची अंतःस्थिति सुरेखपणें व्यक्त करीत आहे.	,,
४३	नदीवर स्नानास गेलेला विप्र (दुर्वास मुनि) आणि त्याचा श्रित (शिष्य) यांच्या पलायनाचा भावानें सांगितलेला वृत्तांत धर्मास मोही, सापाचा उरांत शिरलेला दांत जसा [जखमी मनुष्याला] मोहितो तसा. दुर्वास मुनि शिष्यांसहवर्तमान नदीवरूनच पळून गेला असें जेव्हां भावानें सांगितलें तेव्हां धर्मराजाला फार वाईट वाटलें–असा भाव.	१२६
४६	उत्तरार्ध–साधि (चिंताग्रस्त झालेल्या) भक्तांस (पांडवांस) कृष्ण रात्रीं भेटून सुयश साधी (मिळवी), जसा मित्र (सूर्य) पद्मास तसा.	,,
५०	उत्तरार्ध–कृष्ण म्हणतोः–मी आल्यावर बलरामही येईल. [आम्ही	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	दोघे असलों म्हणजे] मा (लक्ष्मी) वराका (तुच्छ होय) ती आलीच पाहिजे. जेथें आम्ही दोघे आहों तेथें जयश्री असावयाचीच–असा भाव.	१२७
५३	गीति ५३–५५ यांत दुर्वास मुनि गेल्यावर धर्माचें कृष्णाला उद्देशून द्रौपदीशीं झालेलें भाषण आहे. हें सरळ, प्रेमळ आणि भारदस्त असून शेवटल्या गीतींत तर वात्सल्याची कमाल झाली आहे.	,,
	अध्याय नववा.	
२	उत्तरार्धांत सुरेख आणि समयोचित उपमा आहे.	१२८
१७	उत्तरार्धांत ‘अर्थांतरन्यास’ अलंकार आहे.	१३०
२०	हे धौम्य! तुमच्या आज्ञेनें ही (मी द्रौपदी) वृकोदराच्या गदेप्रमाणें दुष्ट जयद्रथाच्या रथावर बसो. (मी तुमच्या आज्ञेनें हे धौम्य! दुष्ट जयद्रथाच्या रथांत बसतें–पण प्रेमभावानें बसतें असें मात्र नव्हे, तर भीमाच्या गदेप्रमाणें बसतें, भीमाची गदा जसा याचा नाश करील तसा मी याच्या रथावर बसून याचा नाश करीन–असा भाव.) [एकदां त्या दुष्ट जयद्रथाच्या हातांत सांपडल्यावर प्रसंग कठीण येईल असें कदाचित् म्हणाल, तर ती शंका नको, कारण] हरीचा प्रसाद ज्यांवर असे जे कवि (सुज्ञ पांडव) त्यांची दासी (मी द्रौपदी) जरी दुष्ट जयद्रथरूप वृकाच्या (लांडग्याच्या) पोटांत गेली तरी आपन्ना (दुःखिता) होणार नाहीं.	,,
२१	उत्तरार्ध–अन्वय–ती पररथासि स्पर्शाया मैं न धरि कीं कीला अंत्यजा [स्पर्शाया मैं न धरि].	,,
२५	‘रे’ इति हीनसंबोधने. हे दुर्विनीत! हे अधम!	१३१
२८	चतुर्थ चरणांत मनोहर उपमा आहे. ‘उपमा कालिदासस्य’ असें जें सुभाषित आहे त्यांत ‘उपमा रामपुत्रस्य’ अथवा ‘उपमा श्रीमयूरस्य’ असा फेरफार केला तर तो पंतास यथार्थत्वानें लागू पडणार नाहीं असें कोण म्हणेल? पंताच्या उपमा फारच बहारीच्या असतात, त्यांत समर्पकता, चातुर्य आणि नीटनेटकेपण यांची कमाल करून सोडिली असते.	,,
३६	उत्तरार्धांत ‘अर्थापत्ति’ अलंकार आहे.	१३२
३७	पूर्वार्ध—‘येतों आतांचि’=‘भीम म्हणतो:–मी लागलाच परत येतों, शत्रूला मारावयाला मला फार वेळ नको, तुम्ही पुढें जा, मी तुमच्या पाठोपाठ शत्रुवध करून आलोंच’ असाही अर्थ केला असतां चालेल.	,,

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
३९	उत्तरार्धांत सुंदर आणि बोधपर 'अर्थान्तरन्यास' योजिला आहे.	१३३
४४	उत्तरार्ध—अन्वय–जरि महाबलायन पळ पळतां न तरे [तरि] पर (पण, परंतु) अभिमुख मरोनि तरे.	,,
५७	पूर्वार्धांत 'स्वभावोक्ति' आहे. येथें पूर्वी घडलेल्या प्रसंगाची आठवण करून दिली आहे.	१३६
६५	गुरूच्या (धन्याच्या) मंत्रास (शिकवणीस) वश असलेल्या व्याघ्रानें धरलेल्या मृगास जसें सोडावें तसें भीमानें धर्माच्या आज्ञेनें पकडलेल्या दुष्ट जयद्रथास सोडिलें असतां, तो दुष्टात्मा (दुष्ट अंतरीं) जयद्रथ वरून मात्र धर्माला नमनें करी (नमस्कार करी) शिरें मात्र लवे (शिरानें मात्र वांके) परंतु मनानें न लवे व नमनेंही न करी. गुरुमंत्रवशव्याघ्रें=गुरु=धर्म मंत्र=उपदेश, बोध, वश=स्वाधीन, व्याघ्र=वाघ=धर्माच्या वचनास सदां वश असणारा जो मनुजशार्दूल भीम त्यानें–असाही अर्थ येथें संभवनीय असून प्रसंगास अनुरूप आहे.	१३७
६७	उत्तरार्धांत 'अर्थान्तरन्यास' आहे. पंतांनीं यांत अत्युच्च आध्यात्मिक शिक्षणाचें उत्तम तत्व वाचकांस सादर केलें आहे.	,,
६८	पांडवांनीं जरी गौरव करून जयद्रथ बोलविला, तरी तो खळ खलत्व (अधमपणा) न सोडी, जसें चंद्राकडून साखरेंत घोळविलें तरी लकुच नांवाचें फळ आपुलें कटुत्व सोडीत नाहीं. [कटु म्हणजे तिखट, तीक्ष्ण असा अर्थ असून पंत हा शब्द 'कडू' या अर्थी योजतात असें आढळतें. तिक्त=कडू.]	,,
७३	अर्जुनावांचून चौघांचा एकवार भंग करून यश घे—अर्जुनावांचून चौघांचा भंग करण्यांत काय मोठा पराक्रम आहे असें म्हणसील तर शिव म्हणतात—एखादा पांगळा मेरू उल्लंघन न करो पण एखादा कुलगिरी उल्लंघून निघाला तरी काय थोडें जाहलें? या गीतींत 'अर्जुनरहितहि' असें पद आहे हें नीट दिसत नाहीं, कारण या पदांतील 'हि' हें अव्यय व्यर्थ राहतें. वास्तव 'अर्जुनारहिता' असा पाठ असता तर हें 'चवघां' याचें विशेषण चांगलें शोभलें असतें. पण दोन तीन हस्तलिखित पोथ्या पाहिल्या त्यांत 'अर्जुनरहितहि' असाच पाठ आहे त्यास उपाय नाहीं.	१३८
७५	चवथ्या चरणांत 'अर्थांतरन्यास' नामक अलंकार आहे.	,,

पद्य. | पद्यांचा अर्थ. | पृष्ठ.

अध्याय दहावा.

२ मार्कंडेय मुनि धर्मास रामकथा परिसविता (ऐकविणारा) झाला. या विशेष गोष्टीवरून सामान्य नियम पंत सांगतात—भगवंताचें यश कथिता (सांगणारा–कथन करणारा) हाच खरोखर त्रिजगद्बंधु (सूर्य) होय, [सूर्याला 'लोकबांधव' अशी संज्ञा आहे. ही गोष्ट येथें ध्यानांत ठेविली पाहिजे.] यद्यपि सविता (सूर्य) तमोघ्न (अंधकारनाशक–अज्ञाननाशक) आहे परि तरीपण तो त्रिजगद्बंधु (लोकबांधव) नव्हे. या उत्तरार्धांत 'अर्थांतरन्यास' अलंकार असून त्यांजवर 'व्यतिरेका'ची छाया पडली आहे. ,,

५ उत्तरार्धांत 'पर्यायोक्त' आहे. १३९

८ वर देणारा जो विधि (ब्रह्मदेव) त्यानें वैश्रवणाला अमरता (देवत्व) आणि सोन्याची लंका दिली, तसेंच ज्याचें विलोकन (दर्शन) कलंका (पापाला) नाशी त्या देवाशीं (तेणें देवें=त्या देवा शंकराशीं) सख्यही दिलें. उत्तरार्धांत 'पर्यायोक्त' आहे. ,,

११ पुष्पोत्कटा=रावणाची माता. महाभारताच्या वनपर्वांतील रामायणाप्रमाणें रावणाचा वंशवृक्ष पुढें दिला आहेः—



मोरोपंतांनीं वनपर्वांत (अध्याय १० गीति ६-१२ काव्यसंग्रह-वनपर्व पृ० १३९-१४०) असेंच वर्णन महाभारतास अनुसरून केलें आहे. हें वर्णन रामायणांतील वर्णनाशीं जुळत नाहीं. अध्यात्मरामायण–उत्तरकांड (सर्ग १२) यांत हा रावणवंशवृक्ष दिला आहे तो असाः—

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.

प्रजापति (स्वयंभू.)

पुलस्त्य × तृणबिंदुकन्या गो.
(स० ११३२.)

सुमालिकन्या कैकसी × विश्रवस् × भरद्वाजकन्या देववर्णिनी.
(स० ११३४.)

वैश्रवण (कुबेर)×ऋद्धि.

नलकूबर×रंभा.

१ दशग्रीव × मंदोदरी. (स० २।४०.) — मेघनाद.
२ कुंभकर्ण × वैरोचनदौहित्री वज्रज्वाला. (स० २।४१.)
३ शूर्पणखा × विद्युजिह्व.
४ बिभीषण × शैलूषगंधर्वकन्या सरमा. १३९

१४ चांगली इच्छा धरणारा बिभीषण आणि कुत्सित इच्छा धरणारे रावण कुंभकर्ण हे तीव्र तप करीत असतां, विघ्नांनीं यांना भय दिलें नाहीं, यानींच विघ्नांला भिवविलें—जसें लांडग्याला गजशत्रु सिंहांनीं भिववावें. १४०

१८ उत्तरार्ध—तुझें तप हें मला फार मोठें ओझें झालें आहे तर हे वत्सा! रावणा! अमरत्वावांचून जें हवें तें लवकर माग. „

१९ उत्तरार्ध—तूं आपल्या शत्रूंस जिंकशील, महीध्रा (पर्वता)सारखा स्थिर (दृढ) आणि राजांस धरणारा (दंड करणारा) होशील. [महीध्र=महीधर=पर्वत.] १४०

२२ उत्तरार्ध—नरांस आणि वानरांस न हांसा—त्यांची कुचेष्टा करूं नका, कारण त्यांपासून भय आहे. [या गीतींत ‘तुवां’ हें एकवचन आणि ‘हांसा’ हें बहुवचनांत क्रियापद आहे, हा प्रयोग चिंतनीय होय.] १४१

३१ पूर्वार्धांत रावणाला जलनिधि (सागर) कल्पून त्याचें विश्रृंखलत्व ‘खळ खळ’ अशा शब्दध्वनीनें दर्शविलें आहे तेव्हां येथें अर्थाला अनुसरून शब्दध्वनि आहे असें म्हटलें पाहिजे. १४२

३६ ब्रह्मदेव इंद्राला म्हणाला:—रामाला साहाय्य करण्यासाठीं आस्वलींप्रत पाहिजे तें रूप धरणारे व पाहिजे तितकें बळ असणारे असे पुत्र व्हावेत. [रामप्रभूचें साहाय्य वानरांनीं काय करावयाचें अशी शंका येईल तर त्यावर उत्तर पंत देतात] नक्षत्रें चंद्राचें जें कार्य करतात तें यांनीं (वानरांनीं) रामाचें कार्य केलें म्हणजे झालें. [चंद्राच्या प्रकाशांत नक्षत्रांच्या

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	प्रकाशाची भर पडून चंद्रप्रकाश वृद्धिंगत होतो तसें रामकार्य वानरांच्या साहाय्यानें होवो. 'चंद्रकार्य' या ठिकाणीं 'चंद्रसाह्य' असा पाठ असता तर बरें असें कित्येकांचें म्हणणें आहे.]	,,
३७	अर्थः—वानरी अमितबळ देवपुत्रांतें प्रसवोत=वानरींच्या पोटीं देव जन्मास येवोत. हें मी हित कथितों कीं ज्या प्रजा प्रभुदासरत असतात त्या जरी (बायका) असल्या तरी तमीं (अज्ञानांत–दुःखांत) बुडत नाहींत. येथें 'त्या नरीहि तमीं' असा पाठ ग्रहण केला आहे.	१४३
४६	उत्तरार्धात 'अर्थांतरन्यास' आहे.	१४४
४८	भागाल=थकाल; भागणें=थकणें, थकून जाणें.	,,
४९	उत्तरार्धात 'अधिक' नामक अलंकार झाला आहे. यांत स्वकरसहस्रापेक्षां रामपादाचें आधिक्य पंतांनीं वर्णिलें आहे. [पुढें अध्याय १२ गीति १४५ वरील अधिक टीपा पहा.]	,,
५१	उत्तरार्धात 'कांपवि' या एका क्रियारूपी धर्माचा 'मुनिसभा आणि 'गंगा' यांशीं संबंध आहे ह्मणून 'तुल्ययोगिता' झाली.	१४५
५८	उत्तरार्धातील 'अयोध्या' हें उपादानलक्षणेचें उदाहरण होय. अयोध्या=अयोध्यानगरांतील प्रजा.	,,
६०	पूर्वार्धात 'रूपक' आहे.	१४६
६५	उत्तरार्धात 'रूपक' आहे.	,,
६७	पूर्वार्धात 'अधिक' अलंकार झाला आहे. परमाणु='जालान्तरगते भानौ यत्सूक्ष्मं दृश्यते रजः । तस्य त्रिंशत्तमो (षष्ठतमो) भागः परमाणुरुदातः' [स्तुतिकुसुमांजलि–स्तोत्र ३५ श्लोक १६ टीका–पृष्ठ ४२२]	,,
६८	पूर्वार्धे—श्रीराम लक्ष्मण निघाला असें पाहून त्याला म्हणतोः–मदधिक गुरुचरण, त्यजुनि काय निघसी ते=हे लक्ष्मणा! माझ्यापेक्षां गुरुचरण (तातपाद–दशरथपाद) श्रेष्ठ आहेत, तेव्हां त्यांना (त्या गुरुचरणांना) टाकून काय निघतोस? उत्तरार्धे–[रामाचें भाषण ऐकून लक्ष्मण वनास जावयाचा थांबला नाहींच, परंतु रामाच्या उक्तींतील 'गुरुचरण' हे शब्द घेऊन वक्रोक्तिद्वारा 'पतिरेको गुरुः स्त्रीणां' या वचनाचा आदर करून सीतेला म्हणतोः–गुरुचरण त्यजुनि काय भजावें (तर) हे सीते निघ=हे सीते! पतिचरण (रामपाद) टाकून दुसरें काय भजावें? पतिचरणाव्यतिरिक्त सेवनार्ह विषय कोणता आहे, तर आतां निघ. दुसरा अर्थः–काय त्यजुनि	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	गुरुचरण भजावे [यास्तव] सीते! निघ=हे सीते! काय (शरीर) त्यजुनि (टाकून)=शरीरत्याग करून हीगुरुचरण भजावे=वडिलांच्या (पूज्य जनांच्या) चरणांची (रामचरणांची) सेवा करावी, (असें आहे तर) रामचरणसेवा करण्यास निघ (चल)=प्रसंग पडल्यास प्राण देखील खर्ची घालून गुरुजनांची सेवा करावी असें आहे, तेव्हां हे सीते! रामचरणसेवा करण्यास वनांत चल.	१४७
	अध्याय अकरावा.	
५	उत्तरार्ध–पाप्मे=पापें. [पाप्मान् (पुल्लिंग)=पाप, अघ, वृजिन. 'अस्त्री पंकं पुमान् पाप्मा पापं किल्बिषकल्मषम्' इत्यमरः].	१५१
२३	पूर्वार्ध–यांत रामाच्या बाणप्रक्षेपणानें झालेला ध्वनि (नाद) शब्दोच्चारानें व्यक्त व्हावा अशी पदयोजना केली आहे. The sound echoes to the sense याचें हें उदाहरण होय.	१५४
२५	अमृतप्रदीं=दूध देणाऱ्याच्या ठायीं; (पक्षीं) मोक्ष देणाऱ्याच्या ठायीं. अमृत शब्द श्लिष्ट आहे, अमृत=दूध, मोक्ष. ['अमृतं यज्ञशेषे स्यात् पीयूषे सलिले घृते। अयाचिते च मोक्षे च ना धन्वन्तरिदेवयोः' इति मेदिनी.]	,,
३९	वज्रींदुराहु=ही उपमा रावणाला दिली आहे. वज्री हाच इंदु त्याला राहुरूप असा, इंद्ररूप चंद्राचा राहुरूप पराजेता (इंद्राचा पराजय करणारा रावण) इंद्राला राहु त्रास देतो हें सुप्रसिद्ध आहे.	१५६
४६	यांत 'रूपका'लंकार आहे.	१५७
५५	हतक=निंदित. ['दग्धहतकनिंदितानि कुत्सायाम्' इति शाब्दाः अनर्घराघव टीका–अंक ४ पृष्ठ १५०.] कतक=विराटपर्व–अध्याय ३ आर्या १६ पहा. पंतांच्या काव्यांत कतकाच्या अंबुप्रसादनधर्माविषयीं उल्लेख वारंवार आढळतो.	१५८
६३	यांत 'सहोक्ति' नामक अलंकार आहे.	१५९
६९	यांत 'कारकदीपक' नामक अलंकार आहे.	,,
७१	स्वकरबलें=यांत कर शब्द श्लेषयुक्त आहे. कर=हस्त; (पक्षीं) किरण. रावण हा स्वकरबलें (आपल्या भुजपराक्रमानें) लोकीं प्रख्यात झाला, रविही स्वकरबळें (आपल्या किरणप्रभावानें–किरणतेजानें–रश्मिप्रकाशानें) प्रख्यात आहे. ['करो वर्षोपले रश्मौ पाणौ प्रत्यायशुंडयोः' इति मेदिनी.]	१६०

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
७९–८०	यांत 'प्रत्यनीक' नामक अलंकार आहे. "'व्यतिरेक'ही क्वचित् गर्भित असतो. उपमेयाची किंवा उपमेयाच्या एकदेशाची बरोबरी करूं शकत नसल्यामुळें मान खालीं घालणारें उपमान सवड सांपडतांच उपमेयाबरोबर संबंध जडलेल्याशीं झगडा करितें आणि वड्याचें तेल वांग्यावर काढून त्यासच त्रास देऊं लागतें असें प्रौढोक्तीचा आश्रय करून कवी जें क्वचित् वर्णन करितात, त्यास 'प्रत्यनीक' म्हणतात. मोराचा पिसारा सीतेच्या फुलें घातलेल्या आंबाड्याची बरोबरी करूं शकत नसे, म्हणून सीता नष्ट झालीशी पाहून आनंद प्रदर्शित करण्यासाठीं मोर रामासमोर नाचत आहेत!!! 'व्यतिरेका'चा गर्भ असल्याशिवाय 'प्रत्यनीक' शक्यच नाहीं. हत्तीस लाजवी, कारण सीता अधिक सुरेख चाले; सिंहास लाजवी, कारण सीतेची कंबर अधिक बारीक; पोपटांस लाजवी, कारण सीतेचा स्वर अधिक मंजुळ; मोरांस लाजवी, कारण सीतेचा आंबाडा अधिक शोभिवंत; हरिणांस लाजवी, कारण सीतेचे डोळे अधिक चंचळ. आतां तीच मंडळी सीतेच्या पश्चात् रामास लाजवीत आहे आणि रडवीतही आहे, कारण 'प्रत्यनीका'लंकाराचा आश्रय कवीनें केला आहे. 'प्रत्यनीका'नें दुसऱ्या आर्येतील 'अर्थांतरन्यासा'स विशेष खमंगपणा आणिला आहे." (भागवतांची अलंकारमीमांसा –पृष्ठ ३४–३५.)	१६१
८१	करुणरसाच्या योगें ही गीति रमणिय झाली आहे.	,,
८६	उत्तरार्ध–त्वां तमीं (मोहांत–अंधकारांत) व्याकुळ होऊन आपल्या पातें (पतनानें–पराभवानें) सूर्याला लाज न द्यावी, कारण हा सूर्यकुलोत्पन्न असल्यामुळें याच्या पातानें सूर्याला लाज वाटणारच, तर तसा प्रसंग न आणावा.	,,
९८	सीतेचे भुजग (भुजांवर असणारे) आणि स्तनग (स्तनांवर असणारे हार इत्यादि) अलंकार पाहून रामाला मोह उत्पन्न झाला. तेव्हां तो म्हणाला:– भुजग मोहूत, [अहो] स्तनग! तुम्ही [भुजग]सम मज कंवि मोहा? समस्त नग हो! तुमचेंहि [जें] सुकृत होतें तें सरलें कीं मज सांगा—असा अन्वय. अर्थ,—काय आश्चर्य आहे कीं ज्यानें त्यानें आपला धर्म सोडला असें दिसतें, हे भुजग (बाहुटे) नांवाचे दागिने आहेत ते आपल्या भुजग (सर्प) या नांवाप्रमाणें मला मोह उत्पन्न करतात हें ठीकच आहे. कारण भुजग हे विषारी प्राणी आहेत तेव्हां त्यांच्या संसर्गापासून मोह उत्पन्न झाला तरी कांहीं नवल नाहीं. मोहूत बिचारे ते, परंतु, तुम्ही स्तनग अलंकार हो! तुम्ही तरी आपला धर्म सोडाव-	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	याचा नव्हता. हे तुम्ही स्तनग हें नांव धारण करीत होत्साते मज (मला)–सम (भुजगासारखे) कॅवि (कसें) मोहा (मोहून टाकितां). अहो स्तनग नग हो! मोह उत्पन्न करणें हा तुमचा धर्म नव्हे असें असून भुजग हें नांव धारण करणाऱ्याप्रमाणें मला मोह कसा बरें उत्पन्न करतां? याचें कारण असें तर नसेल ना, तुमच्या पदरीं जें कांहीं सुकृत (पुण्य) होतें तें सर्व सरलें (संपलें) आणि म्हणून तुम्ही पापी झालां. आणि पापी झाल्यामुळें पापी मनुष्याप्रमाणें मला छळीत आहां. या आर्येंत 'तुमचेंही' असें पद आहे त्याचा भावार्थ असा कीं माझें तर सुकृत (पुण्य) सरलेंच व तुमचें सरलें कीं काय? असा प्रश्न आहे.	१६३
११४	सुग्रीव म्हणतोः—हे प्रभो! मी अजाण पोपट आहें जसा मला बोलवाल तसा मी बोलेन. मला स्वतः बोलतां येत नाहीं परंतु तुम्ही प्रवर्तक होऊन जसें बोलवाल तसें बोलेन. जी (हे भगवन्) अजानकीरचितें इतरें सुकृतें तें कार्य कसें घडेल? जानकीशिवाय इतरानें केलेल्या पुण्यानें हें कार्य कसें सिद्धीस जाईल? सीतेचा शोध लावणें हें कार्य इतरांच्या पुण्याईनें व्हावयाचें नाहीं. म्हणण्याचें तात्पर्य असें कीं, या कामीं आमचे यत्न व्यर्थ आहेत. सीतेचेंच पुण्य या ठिकाणीं उभें राहील तर तिचा शोध लागेल; एरव्हीं लागावयाचा नाहीं.	१६५
१२०	शीतार्ती–या ठिकाणीं श्लेष कल्पून सीतार्ती म्हणजे सीतेसाठीं व्याकुळ झालेल्या रामीं असा अर्थ घेतला तरी चालेल. अशा प्रसंगीं स श यांचा अभेद मानावा म्हणजे झालें.	१६६
१२२	वांचेन काय? रसांत आज्यसा साधूंसि मान्य होईन (काय?), ज्यांत यश [त्यांत अथवा तें] मरण बरें, त्याहूनि राज्य सामान्य, श्रेष्ठ न–असा अन्वय. राम म्हणतोः—मी वांचेन काय? व षड्रसांत तूप जसें मान्य आहे, तद्वत् मी साधूंना मान्य होईन काय? ज्यांत (ज्या कार्यांत) कांहीं यशोलाभ आहे त्यांत मरण बरें; त्याहूनि (असल्या यशोदायक कार्यांतील मरणाहून) राज्य हा पदार्थ अगदीं साधारण होय, श्रेष्ठ (अधिक) न (नाहीं), असल्या मरणापेक्षां राज्य थोर नाहीं तर कमी महत्त्वाचें आहे. रामाचे म्हणण्याचा भावार्थ इतकाच कीं मी शत्रुजनांबरोबर लढाई मारून यश मिळवितों, मग अशा लढाईत मला मृत्यु आला तरी पत्करला, मला तोच मृत्यु श्रेष्ठ वाटतो, अशा मृत्यूपेक्षां राज्य श्रेष्ठ नाहीं, तर तें अगदीं साधारण होय.	,,

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
१२४	यांत 'अतिशयोक्ति' अलंकार आहे.	१६६
१२६	यांत 'उत्प्रेक्षा' आहे.	१६७
१२७	सीतेनें खूण म्हणून दिलेला चूडामणि रामाला दाखवून मारुति म्हणतो:—या चरणांवर वहावयाला सीतेनें दिलेला जो चूडामणि (शिरोभूषण) तो हा आपल्या पादकमळावर स्थित आहे, याला येथें असलेला पाहून महावया (म्हातारा) पद्मासन (ब्रह्मदेव) लाजो. इतके दिवस पद्मावर बसणारा काय तो ब्रह्मदेव, आतां हा दुसरा पादकमळावर बसला म्हणजे अर्थात् त्या जुन्याला लाज वाटेल.	,,
१२९	यांत 'तुल्ययोगिता' आहे.	१६८
	अध्याय बारावा.	
९	आर्या ९-१०-१२-१३-१४-१५ या संबंधानें पुढील उतारा पहा:—'पहिल्या (९) आर्येत समासोक्ति, दुसरींत (१०) वीररसाची छटा, तिसरींत (१२) समासोक्ति व शृंगार, चवथींत (१३) समासोक्ति व वीररसाची कमाल, पांचवींत (१४) व सहावींत (१५) करुणरस, असे अनुक्रमें सहा 'अलंकार्यें' समजावे व अलंकार 'उत्प्रेक्षा'. प्रकृत सेतूवर बाहुत्व, अहित्व, पायघडीत्व, कृष्णवर्त्मत्व (अग्नित्व,) सांजनाश्रुपथत्व, उरत्व असे सहा अप्रकृत आरोप अनिश्चितपणानें केले आहेत.' [अलंकारमीमांसा—पृष्ठ २२.]	१६९
११	यांत सुरेख आणि समयानुरूप 'अपन्हुति' आहे.	१७०
१२	यांत राम वर, जयश्री वधू, लंका वधूमाता, सेना वरपक्षीय विहीण, सुनील पाटावे, पायघडी असें समजावें. वरपक्षीय विहीणीला (सेनेला) वधूपक्षीय विहिणीनें (लंकेनें) स्वकन्येच्या (जयश्रीच्या) विवाहप्रसंगीं पायघड्या घालण्याची चाल आहे तिला अनुसरून लंकेनें जीं उंची निळ्या रंगाचीं पाटावें हांतरलीं तीं वऱ्हाडिणीला (सेनारूप विहिणीला) पायघड्याच अशीं वाटलीं.	१७१
१५	स्वापयशें शोकानलदग्ध=अगस्त्य मुनीनें अमर्याद असा सागर प्राशन करून तो आपल्या मूत्रद्वारें पुनः सोडला या पौराणिककथेकडे कवीचें लक्ष आहे.	१७२
१७	उत्तरार्ध—सुरतरुच्याहि रोपातें (कल्पवृक्षाच्या कोंवळ्या झाडाला)	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	हानि (नाश) हो (होवो) [असें] हतभाग्य (दुर्दैवी) कां म्हणेना? (कां म्हणणार नाहीं? अर्थात् म्हणेलच.)	१७३
२८	यांत 'अन्योक्ति' आहे.	,,
४७	मग जसा मत्त व्याघ्रावरि मत्तें (माजलेल्या) तत्स्वामीनें (त्याच्या-मेंढ्याच्या पालकानें-धनगरानें-मेंढक्यानें) प्रहित (पाठविलेला) अवि (मेंढा) [येतो तसा] जो अविप्रहित (विप्रशत्रु) [तो] रावणपुत्र (इंद्रजित्) रामलक्ष्मणावरि ये (आला)-असा अन्वय.	१७६
४९	इंद्रजितानें रामलक्ष्मणांस बाण मारून खिळून (जखडून) टाकिलें त्या वेळीं त्यांस मूर्च्छा आली. या प्रसंगास अनुलक्षून पंत म्हणतात:—हें मोठें अद्भुत झालें, कारण अजगर प्राण्यांस गिळतो खरा, पण कांहीं दिग्गजेंद्रांस गिळित नाहीं, असें असून या ह्या मोहरूप अजगरानें दिग्गजेंद्रासारखे जे रामलक्ष्मण त्यांस गिळिलें.	,,
५४	उत्तरार्ध-यांत उत्प्रेक्षा आहे. दात्या घना (पाहूनि) शिखिकुळ नटतें [असें] गमे (वाटे). इंद्रजिताला पाहून वानरांला स्फुरण चढून आनंद झाला, यावरून मेघाला पाहून मोरांना आनंद होतो याची स्मृति कवीला झाली.	१७७
५८	उत्तरार्ध-यांतील भूदेवीची उक्ति स्त्रीस्वभावानुरूप आहे.	१७८
६५	येथें 'मोहदक्ष' आणि 'मायावी' या शब्दांची योजना भट्टीकाव्यांतील प्रथम सर्गाच्या सहाव्या श्लोकांत 'निर्माणदक्ष' आणि 'पद्मासनकौशल' यांजसारखी पुनरुक्तिवाचक समजावी.	१७९
६६	यांत 'अनन्वय' आहे.	,,
६७	या आर्येच्या पूर्वार्धांत रावणाचे बाण वानरांच्या सैन्यांस पुढें जाऊं देत नाहींत असें वर्णन केलें आहे. गाईंचा व गोपांचा दृष्टांत देऊन रावणाचे बाणांस कपिसेना फिरविणें फार सोपें होतें असें सूचविलें आहे. रावणानें आपल्या बाणांनीं वानरसेना रुद्ध केली. तेव्हां कविला तिजविषयीं जें वाटलें तें या आर्येच्या उत्तरार्धांत सांगितलें आहे. कवि म्हणतात, 'मला वाटतें ती वानरसेना नव्हे, तर [रावण] दुधावरची सायच मिटक्या मारीत भक्षण करीत आहे. कवल-ग्रास. 'कवल' या नामापासून 'कवळणें' असें नामधातुसाधित क्रियापद झालें. 'कवळणें' याचा अर्थ 'आलिंगणें' असा होतो, परंतु तो येथें इष्ट नाहीं. कारण 'मिटक्या देऊनी' असें आर्येंत आलें आहे. मिटक्या देऊन आलिंगितो असें	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	म्हणणें शोभत नाहीं, मिटक्या देऊन खातो–असें म्हणणें शोभतें. आणि असा बोलण्याचा संप्रदायही आहे, याकरितां 'कवलणें' याचा अर्थ 'भक्षण करणें' असा येथें धरावा. सारांश जन जसे दुधावरची साय मोठ्या प्रेमानें व सहज भक्षण करितात त्याप्रमाणें रावणानें वानरसेना भक्षण केली. याच आर्येचा 'जाणोनि वानरचमू' असा पाठभेद जुन्या पोथ्यांवरून व 'नवनीता'वरून दिसून येतो (आवृत्ति २ पृ० ३६३, व आवृत्ति० ५ पृ० २६७, आर्या २०८). या पाठास अनुसरून अर्थ असा:–'रावण ती वानरांची सेना ही दुधाची सायच समजून तीस मिटक्या मारून भक्षण करिता झाला.'	१८०
७४	यांतील शब्दयोजना अनुप्रासचमत्कारानें भरली असल्यामुळें श्रुतिमनोहर आहे. या पद्याचा अन्वय:–पामर सामर सामर सदास लोकांतें अहित मानुनी अहितसा क्षोभे, कीं शोकातें पावणार, (तसा) हे कामरता मर. ही रावणास उद्देशून रामोक्ति आहे. जो पामर (नीच) असतो तो पुढें शोक प्राप्त व्हावयाचा आहे म्हणूनच कीं काय सामरसामरसदास लोकांतें (इंद्रादिदेवांसमवेत साम कर, कलह करूं नको, असा उपदेश करणाऱ्या हितैषि जनाला) अहित मानुनी (शत्रु मानून) अहितसा (सर्पासारखा) क्षोभे (क्षोभ पावतो, क्षुब्ध होतो.) त्याप्रमाणें हे कामासक्ता नीचा (पामरा) रावणा! तूं केलेंस, तेव्हां तूंही आतां मर.	१८१
७७	रामानें रावणास मारिलें, तेव्हां देवांनीं विपुल पुष्पवृष्टि केली, ती इतकी कीं, जशी श्रावणमासीं मेघ पर्जन्यवृष्टि करितात तसी. त्यामुळें लोकांस तो जयकाळ श्रावणमासच वाटला. रावणाचे मातुश्रीस व बायकांस मात्र फाल्गुनमास वाटला, त्यांनीं दुःखानें शंख केला असा इत्यर्थ.	१८२
८०	मागील आर्येंत विस्तारभयाचें कारण दाखवून कवींनीं रावणस्त्रियांच्या शोकाचें वर्णन टाळिलें. व या आर्येंत आपणांस राग आला असें दाखवून कवि रावणस्त्रियांचे दुःखोद्गार वर्णीत नाहींत. याच आर्येच्या उत्तरार्धांत 'कवि मयूर' अशीं पदें आहेत. पूर्वार्धांत 'घन जय रव' अशीं पदें आहेत. 'घन जय रव' याचा अर्थ गंभीर जयशब्द व घनांचा जयरूप शब्द असा करावा. तसेंच 'कवि मयूर' या पदानें मोरोपंत कवि व कविरूप मोर असें घ्यावें. घनरव मोरास प्रिय आहे असा कविसमय आहे.[पृष्ठ १५० टीप २४, पृष्ठ २१३ टीप २१]. एखाद्यानें दुसऱ्याचे प्रिय गोष्टीस अडथळा केला तर ज्यानें अडथळा केला असेल त्याचा राग त्यास (दुसऱ्यास) येणें साहजिक आहे. खलदारविलापरवानें जयघनरवास (गंभीर जयजयकाराला) लोप-	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	विलें (अडथळा केला, ऐकूं येऊं दिला नाहीं) त्यामुळें कवि मयूरास राग आला हें योग्यच आहे. राग येण्याचें कारण खलदारविलापरव होय. करितां 'पापें' या पदानें 'दुष्ट विलापरवानें' असा अर्थ घ्यावा. विलापरव पाप (दुष्ट) कारण तो जयरव लोपवितो. मागील आर्येतहि विलापरवासंबंधींच लिहितात. या सर्व गोष्टीवरून पाहतां 'पापें' याचा अर्थ 'दुष्टें विलापरवें' असा लावावा हें प्रशस्त दिसतें. 'दार'शब्द संस्कृतांत पुल्लिंगी मानतात; तेव्हां 'पापें' म्हणजे 'खलदारानें' (रावणस्त्रियांनीं) असाही अर्थ कदाचित् कोणी घेऊं शकेल. अर्थ—ज्या रावणस्त्रियांच्या दुष्ट विलापरवानें देव व वानर यांनीं केलेला गंभीर जयशब्द दोन घटका लोपविला (नाहींसा केला—ऐकूं येऊं दिला नाहीं) त्या रावणस्त्रियांच्या विलापरवाला कोपग्रस्त मयूरकवि कां स्तवील? अर्थात् त्या रावणपत्नीविलापाचें वर्णन करणार नाहीं.	१८२
८८	पूर्वार्ध—स्वैर जा, स्त्रिच्या मोकळिके म्हण [कीं] सुप्रसन्न हो [व] सुख दे. अर्थ—राम सीतेला म्हणतात, 'सीते! मी तुला रावणाला मारून मोकळीक दिली आहे; त्या मोकळिकेला तूं अशी विनंति कर कीं मजवर (सीतेवर) प्रसन्न हो व मला (सीतेला) सुख दे.. तात्पर्य कीं सीते तूं माझी विनवणी करूं नको; मी तुजवर प्रसन्न होणार नाहीं व मजपासून तुला सुखप्राप्तीही घडणार नाहीं; तर मीं जी मोकळीक (रावण मारून) तुला दिली आहे त्यांतच सुख मान. या आर्येंत 'स्त्रीच्या' या पदाचा अर्थ सामान्यत्वानें न धरितां, 'तुझ्या' असा धरावा. येथें 'मोकळीके' या पदाची चतुर्थी धरावी व 'कळीके' या पदाची संबोधन विभक्ती मानावी. 'म्हण'-धातूपुढें चतुर्थीचा योग असतो हें याच आर्येच्या उत्तरार्धावरून स्पष्ट होत आहे. 'स्त्रीच्या' या तृतीयपुरुषी नामाचा द्वितीयपुरुषाप्रमाणें उपयोग येथें झाला आहे. 'स्त्रीच्या' म्हणजे 'तुझ्या' असा अर्थ. राम सीतेशीं बोलत आहे म्हणून संदर्भाकडे पाहिलें असतां द्वितीयपुरुषी नाम असणें साहजिक आहे. परंतु कधीं कधीं भाषणांत अशा प्रसंगीं तृतीय पुरुषी नामाचा द्वितीय पुरुषी नामाच्या ऐवजीं उपयोग करण्यांत येतो. याच अध्यायांतील ९१ वे गीतींत 'प्राणप्रियेसह' हें 'तुजसह' या द्वितीय पुरुषी नामाकरितां योजिलें आहे. तसेंच या ९१ व्या गीतीच्या पूर्वार्धांत 'करिशिल' असें जें क्रियापद आहे तेंही द्वितीय पुरुषी आहे. शिवाय या अर्थास महाभारत वनपर्व—अध्याय २९१ श्लोक १०।११।१२।१३ हे पुष्टि	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	देत आहेत. व याच श्लोकांस धरून आर्या ८८।८९।९०।९१ या लिहिल्या आहेत असें त्यांतील अर्थावरून व पदांवरून दिसून येणार आहे. उत्तरार्ध–जिला भुजंगानें (सर्पानें–पक्षीं–जारानें) चुंबिलें तिला 'नमो कळिके!' (हे कळिके! नमस्कार असो तुला) असें (तिरस्कारपूर्वक) मधुप (भृंग) म्हणणारच आहे. 'कलिका' हें पद नवयौवनयुवतिसूचक होय.	१८३
८९	राम (प्रभु) उग्र भाषणानें सीतेला ताडूं लागला तेव्हां त्याचें उग्रत्व वाढून संताप झाला होता म्हणून वानर त्यास पाहूं शकले नाहींत.	१८४
९१	यांतील शब्द सीतेला उद्देशून रामाच्या आत्मगत भाषणांतील आहेत, तेव्हां 'करशिल' याच्या ऐवजीं 'करील' असें रूप असतें तर प्रशस्त होतें. (८८ व्या गीतीवरील टीप पहा.) 'सावध होऊनि करिल' असा पाठ असता तर बरें होतें.	,,
९२	[विधि व शिव यांखेरीज इतर] इंद्रादिक देव (आपसांत) म्हणतात 'सीतेस मोहरूप अजगरानें आपल्या मुखांत घातलें तें पहा. (विधि व शिव हे दोन देव म्हणतात सीतेस मोहाची बाधा होणें नाहीं) तेव्हां ब्रह्मदेव व शंकर म्हणतात:—तापलेल्या पहारेस अजगर कसें गिळील! देवांनीं सीता मोहाकुल झाली असें जें म्हटलें तें संभवनीय नाहीं हें पहारेचें व अजगराचें उदाहरण देऊन विधि व शिव या दोन देवांनीं दाखविलें. येथें अजगर=मोह व पहार=सीता असें समजावें. मोहें=मोहानें (मूर्च्छेनें) सीतेला गिळिलें (सीता रामाच्या दुर्भाषणानें मूर्च्छित होऊन पडली) असें इतर देव म्हणूं लागले, पण ज्ञानानें श्रेष्ठ असे जे विधि व शिव ते मात्र अजगर तापलेल्या पहारेतें कसा गिळील असें म्हणाले. जसा अजगर इतर सर्व पदार्थ गिळील, पण तापलेली पहार गिळणार नाहीं तसा मोह इतरांस पडेल पण सीतेला पडणार नाहीं. शिव व विधि यांस सर्व कांहीं माहीत होतें म्हणून ते तसें म्हणाले. व्यवहारांतही एखाद्या गोष्टीविषयीं असें मतवैचित्र्य दृष्टीस पडतें. त्याप्रमाणेंच कांहीं देव म्हणाले सीतेस मोहानें व्याकुळ केलें व कांहीं म्हणाले सीता मोहानें व्याकुळ व्हावयाची नाहीं.	,,
९४	उत्तरार्ध–सर्पिणीला किंवा तुमच्या उग्र बाहुरूप सापाला स्पर्श करीन. मी जर असती असलें तर तुमचा भुजभुजग मला ठार करील–असें तात्पर्य.	,,
९६	पूर्वार्ध–आपल्या पातिव्रत्यनियमांचा अल्पमात्र भंग व्हावा असें माझ्या मनांत येऊन जर माझें हृदय मळलें असेल तर.	,,

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
१०३	साध्वी='पतिं या नाभिचरति मनोवाग्देहसंयता । सा भर्तृलोकानाप्नोति सद्भिः **साध्वीति** चोच्यते ॥' [मनुस्मृति–अध्याय ९ श्लोक २९]. याचा भावार्थः—जी (स्त्री) मनानें, वाणीनें व देहानें पतीच्या मर्जीविरुद्ध कांहीं कृत्य करित नाहीं ती मरणोत्तर भर्तृलोकास जाते व तिला इहलोकीं शिष्ट लोक **'साध्वी'** असें म्हणतात. तृतीय चरणांतील उपमा मोरोपंताच्या मोठी आवडीची दिसते, कारण त्यांनीं तिचा उपयोग अनेक ठिकाणीं केला आहे. ती तशीच सुरेख आणि मोहक आहे.	१८५
१०४	दशरथ रामास म्हणतो, 'बा रामा! चंद्राप्रमाणें शुभ्र असून (उन्हांत) अमृत स्रवणाऱ्या (ग्रीष्म ऋतूंतील) छत्रास तूं आपल्या गुणें (गुणांनीं) उणें पाडीं (कमी पाड–कमी कर). तात्पर्य–ग्रीष्मकालीं शुभ्र, शीतल व अमृतमय छत्र तप्त जनांस शांतिप्रद होतें हें खरें आहे. परंतु रामा! तूं तुझ्या विरहाग्नीनें पीडित प्रजाजनांस अशा छत्रापेक्षां अधिक सुख दे. 'गुणें उणें पाडीं' म्हणजे शांति देण्याचा जो छत्राचा गुण तो तूं (आपल्या आचरणानें) कमी पाड, तूं आपल्या चांगल्या गुणांनीं छत्राला न्यूनता आण.	,,
१०७	यांतील यमक दोन अर्धांस जोडणारें आहे. 'दामरामायण' तर अशाच यमकांनीं बांधलेलें आहे.	१८६
१११	उत्तरार्ध–नलराजा हा उत्तम सूपकार (स्वयंपाक करण्यांत अत्यंत कुशल) होता, व अग्नि आणि पाणी हीं दोन त्याला पाहिजे त्या ठिकाणीं देवप्रसादानें उत्पन्न करतां येत असत. सुधास्रावी चंद्र जें पक्कान्न करील त्यासारखें दुसरें नलराजासुद्धां करूं शकणार नाहीं. चंद्राच्या हातीं अमृत असल्यामुळें त्यानें तयार केलेला पदार्थ अत्यंत खमंग, रुचकर व स्वादिष्ट उतरणें साहजिक आहे.	,,
११७	या आर्येंत सीतेचें व रामाचें मारुतीवर किती प्रेम होतें हें वर्णिलें आहे. सृष्टिनियमाप्रमाणें पाहतां आईचें प्रेम पुत्रावर फार असतें. व यावरच नेट देऊन कवि म्हणतातः—सीतेचें वात्सल्य (मारुतीविषयक) पाहून अंजनेचें (मारुतीच्या आईचें) देहभानच गेलें असेल. कोणाचें देहभान जाण्यास त्याला कांहीं अपूर्व गोष्ट आढळली पाहिजे. आतां अंजनेला तर देहभान राहिलें नाहीं असें वर्णन आहे. खुद्द आईसच जर सीतेचें प्रेम अपूर्व वाटलें तर मग दुसऱ्यांविषयीं काय सांगायाचें. तात्पर्य अंजनेपेक्षां	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	सीतेची मारुतीवर फार प्रीति होती. सीतेनें मारुतीला पुष्कळ वर देऊन वात्सल्य दाखविलें, त्यानें मारुतीच्या मातेला भान राहिलें नसेल. अंजनेच्या प्रेमापेक्षां सीतेचें प्रेम मारुतीवर ज्यास्त होतें असें तात्पर्य. उत्तरार्धांत कवि लिहितात कीं, असें जिचें मारुतीवर प्रेम ती सीताही बहुतकरून रामानें (कंजनाभानें) लाजविली. सीतेच्या प्रेमाधिक्यानें जसें अंजनेस खालीं पाहायास लाविलें त्याप्रमाणें रामाच्या प्रेमाधिक्यानें सीतेची स्थिति झाली असावी. तात्पर्य, मारुतीवर सीतेचें प्रेम अंजनेच्यापेक्षां ज्यास्त होतें व सीतेच्या प्रेमापेक्षांही रामाचें प्रेम ज्यास्त होतें. एकंदर पद्यांत 'सार' नामक अलंकार आहे. 'कंजनाभानें' असें पद घालून कवींनीं अर्थगौरव केलें आहे. कंज (कमल) हें अत्यंत मृदु आहे असा कविसंप्रदाय आहे. करितां कमलाचें उत्पत्तिकारणही मृदु असलें पाहिजे. कमल ज्या अर्थीं मृदु आहे त्या अर्थीं त्याचें उत्पत्तिस्थानही मृदु असलें पाहिजे. येथें कमलाचें उत्पत्तिस्थान नाभी (रामाची) असें घ्यावयाचें. तात्पर्य, राम कठोर अंतःकरणाचा नसल्यामुळें त्याचे ठिकाणीं प्रेमाधिक्य संभवनीय आहे असें 'कंजनाभानें' या पदानें कवि दाखवितात. 'घनरूप कंजनाभानें' हें पद अन्वर्थक आणि सहेतुक आहे. घन म्हणजे मेघ, तेव्हां 'घन' या पदानें मेघाप्रमाणें विपुल वृष्टि करण्याचें म्हणजे वरदान करण्याचें सामर्थ्य सूचविलें. 'कंज' (कमल) हें लक्ष्मीनिवासस्थान होय, तेव्हां या पदानें दातृत्वयोग्यता सूचित केली. याप्रमाणें हीं दोन्हीं पदें सहेतुक आहेत, म्हणून हा 'परिकर' अलंकार समजावा. 'अलंकारः परिकरः साभिप्राये विशेषणे' असें या अलंकाराचें लक्षण आहे.	१८७
१२०	'न तगावें–नत गावें' हें पंताचें ठरींव यमक.	,,
१२२	या गीतीच्या शेवटीं जें यमक आहे तेंच यमक अध्याय ३ गीति १ मध्यें व मोरोपंतकृत स्फुटप्रकरणें–भाग पहिला–सिद्धेश्वरस्तव–गीति ४ यांत आहे.	,,
१२३	आपणास विरहापासून जें दुःख झालें तें सीतेस कळवून व तिला मान देऊन जें तिचें प्रिय करायाचें होतें तें राम संपादन करिता झाला.	,,
१३१	यांत 'हूंकाराची आवृत्ति अनेकवार झाल्यामुळें 'वृत्त्यनुप्रास' आहे.	१८९
१३२	यांत 'विरोध' अलंकार आहे. याचें लक्षण आणि स्पष्टीकरण असें:— 'एका धर्मावर एक किंवा दोन विरुद्ध धर्मांचा आरोप करण्यांत आला कीं 'विरोध' झाला.' [प्रस्तुत आर्येंत] 'पुरत्व' व 'द्रवत्व' हे धर्म परस्परवि-	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	रुद्ध होत; 'पुरत्व' आहे तर 'दवत्व' निःसंशय नाहीं आणि 'दवत्व' आहे तर 'पुरत्व' निःसंशय नाहीं. तेव्हां वास्तविक विचार करितां हा 'रूपका'चा पोटभेद होतो. धर्म विरुद्ध नसल्यास 'रूपक' आणि धर्म विरुद्ध असल्यास 'विरोध'. [अलंकारमीमांसा–पृष्ठ ३३.]	१८९
१३३	तारा वानरी असून विमानांत बसली यावर मोरोपंत म्हणतात, हत्तीवर शेळी बसावी किंवा कडूभोंपळीस अमृतफळें यावींत तसें हें झालें किंवा चंद्राचें चुंबन मुंगी घेते, असें जें कवि म्हणतात तसें हें झालें. याविषयीं समस्येचा श्लोक आहे तो असा:—असज्जनः सज्जनसङ्गिसङ्गात्करोति दुःसाध्यमपीह साध्यम् । पुष्पाश्रयाच्छंभुशिरोऽधिरूढा पिपीलिका चुंबति चंद्रबिंबम् ॥ १ ॥ याचा अर्थः—असज्जन पुरुष सज्जनांच्या संगतीनें या लोकीं जें कष्टानें सुद्धां मिळणार नाहीं तें सहज मिळवितो. यास दृष्टांत असा कीं, मुंगी ही फुलाच्या आश्रयानें शंकराच्या मस्तकावर आरूढ होऊन चंद्रबिंबाचें चुंबन करिते.	,,
१३४	पूर्वार्धांत 'वृत्त्यनुप्रास' आहे. उत्तरार्ध–बहुवर्णनीं वदन याया भरतस्मृति मज अनुज्ञा न दे–असा अन्वय. तोंडानें पुष्कळ वर्णन करण्यास भरताची आठवण मला परवानगी देत नाहीं. रामाच्या भेटीकरितां भरत खोळंबला आहे, तेव्हां पुष्पक विमानांतून रामानें सीतेला दाखविलेल्या पदार्थांचें वर्णन करण्यांत काळ न घालवितां, मी (मोरोपंत) एकदम त्याच कामास (म्हणजे रामभरतांची भेट करून देण्यास) लागतों. येथें पंतांच्या मनांत वर्णनसंकोच करावयाचा असल्यामुळें त्यांनीं मोठी मार्मिक कोटी करून आपलें काम साधिलें आहे. अशाच कोट्या पंतांच्या काव्यांत अन्यत्र दृष्टीस पडतात.	,,
१३७	सवे=संवय. उत्तरार्ध–तो पंडित मारुति इतक्या वेगानें आपल्या इष्ट स्थळीं गेला कीं जणूं काय तो (मारुति) आपल्या वेगवान् मनोरूपी वाहनावरच बसून गेला. यांत 'उत्प्रेक्षा' आहे.	,,
१३८	या आर्येंत 'रूपक' अलंकार आहे. चकोर=या शब्दाचा विग्रह असा आहे:—'चकति चंद्रामृतपायित्वाद्विषं प्रतिहंति, चक् तृप्तौ प्रतिघाते च चकोरः । चकति तृप्यते ज्योत्स्नाया इति चकोरः ॥ इति स्वामी' [काश्मीरमहाकविश्रीजगद्धरभट्टकृत–स्तुतिकुसुमांजलि–पृष्ठ १२३ स्तोत्र ९ वें श्लोक ४९ राजानकरत्नकंठविरचित टीका.]	,,
१४१	या गीतींत मोरोपंतांनीं भरतप्रेम उत्कृष्ट रीतीनें वर्णन केलें आहे. त-	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	शीच त्याची रामप्रेक्षणोत्सुकताही मनुष्यस्वभावाला पूर्ण अनुरूप अशीच दर्शविली आहे. एखादी गोष्ट व्हावी असें आपल्या मनांतून फार असलें व ती गोष्ट तशी झाली असें कोणीं येऊन सांगितलें, तर जशा आपणाला शंका येतात व 'खरेंच असें झालें का?' म्हणून पुन: पुन: आपण उत्कंठेनें विचारतों, तोच प्रकार येथेंही पंतांनीं दाखविला आहे. या पद्यांत सप्ताक्षरात्मक यमक आहे.	१९०
१४५	यांत 'अधिक' नामक अलंकार आहे. हींत बापापेक्षां ज्येष्ठ बंधूचें आधिक्य कवीनें वर्णिलें आहे. जेथें एका पदार्थावर दुसऱ्या पदार्थाचें आधिक्य वर्णिलेलें असतें तेथें 'अधिक' अलंकार होतो.	,,
१४७	या आर्येंत वस्तुप्रतिवस्तुभावात्मक उपमा असून सुरेख 'समासोक्ति' आहे. जेथें अचेतनावर चेतनास उचित अशा धर्मांचा, भावाचा अथवा क्रियेचा आरोप केलेला असतो तेथें समासोक्ति होते. या आर्येंत अचेतन अयोध्येवर हर्षित झाल्याचा आरोप केला आहे तो नायिकेला योग्य असा आहे. अयोध्या ही येथें नायिका आहे—हा अयोध्येवर नायिकाभावाचा (स्त्रीत्वाचा) केलेला आरोप स्पष्ट शब्दांनीं दाखविला नाहीं म्हणून ही 'समासोक्ति' होय. समासोक्तींत समास म्हणजे संक्षेप असतो, तसा येथेंही आहे. येथें राम आणि अयोध्या यांमध्यें नायकनायिकाभाव कल्पिला आहे, हें उघड आहे. या अलंकाराचीं अन्य उदाहरणें वनपर्व–अध्याय ४ व १० यांत पहा.	,,
१५४	उत्तरार्ध—यमगृहापासून परत आलेला जांवई ही तसें (प्रथमार्धांत वर्णिल्याप्रमाणें) सासूला सुखविल काय ? अर्थात् नाहीं.	१९१
१५६	अंधकारा (काळोखाला) जशी एकादी स्त्री भीते तसी जी कैकयी संकोचा भ्याली होती (कारण रामाला वनास मीं पाठविलें, तेव्हां तो आतां काय म्हणेल–या संकोचानें भ्याली होती) ती (कैकयी) रामानें हर्षविली. कां तर रामचंद्र हें रामाचें नांव अन्वर्थ (सार्थ) आहे. (राम हा चंद्राप्रमाणें खरोखर आनंद देणारा आहे. यास्तवच) (अंधकाराति) अंधकासुराचा अराति–शत्रु=शिव त्यास ध्यातो. संकोच=रामाच्या वनवासास आपणच कारण म्हणून पश्चात्ताप पावलेल्या कैकयीला मोठा संकोच झाला होता. अंधकाराति=शंकर. समुद्रमंथनसमयीं उत्पन्न झालेल्या हालाहलविषाचें शंकरानें प्राशन केलें, त्या योगें त्याच्या आंगाचा दाह झाला. तो शांत होण्याकरितां शंकरानें आपल्या मस्तकीं चंद्र धारण केला, तरी दाह शांत झाला नाहीं,	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	शेवटीं 'राम! राम!' असें रामनामाचें ध्यान केल्यावर लागलाच दाह शांत झाला—अशी पौराणिक कथा आहे. चंद्र=आल्हाद देणारा जो तो चंद्र असा अर्थ मल्लिनाथांनीं 'रघुवंशा'च्या टीकेंत केला आहे:—'यथा चंदयतीत्याल्हादयतीति चंद्रः इंदुः । चदिधातोरौणादिको रप्रत्ययः ।'	१९१
१५८	उत्तरार्ध—नई=नदी. 'इकडे नई तिकडे वई' या म्हणींत हा शब्द आढळतो. पंतांनीं याचा प्रयोग क्वचित् अन्यत्र केला आहे. [वनपर्व—अध्याय ७-६६.]	१९२
१६१	जिहीं—तिहीं यांत 'हीं' हा तृतीयेचा प्रत्यय आहे. याचीं अन्य उदाहरणें पंतांच्या काव्यांत पुष्कळ आहेत. [सभापर्व—अध्याय ६—७७ पुत्रांहीं—कोकांहीं; अध्याय ७—६३ रजांहीं; ६६ तिहीं; ७१ ज्यांहीं; ९१ अक्षांहीं-लेंकांहीं].	,,
१६७	उत्तरार्ध—पंतांनीं या अर्धांत दर्शविल्याप्रमाणें आपल्या 'अल्पविषया मति'चा आणि 'मंद'त्वाचा उल्लेख प्रांजलपणें अनेक ठिकाणीं केला आहे. जे थोर आणि उदार असतात त्यांचा असाच प्रकार असावयाचा. [रघुवंश—सर्ग १ श्लोक २-३ पहा.]	१९३

अध्याय तेरावा.

२	उत्तरार्ध—तच्चरित [सावित्रीचरित] श्रवण करीं, (कारण तें) ऐकाया योग्य (आहे). साधु पतित न या [चरिताला]—असा अन्वय. मार्कंडेय म्हणतो—हे धर्मा! सावित्रीचें चरित ऐक, कारण तें ऐकण्यास योग्य असें आहे. या चरिताला साधु अथवा पतित असा भेदभाव मुळींच नाहीं, हें अमक्यानें ऐकावें आणि अमक्यानें ऐकूं नये असा कांहीं प्रकार नाहीं, हें चरित पाहिजे त्यानें ऐकावें. (१) हे साधुपतितनया! (हे साधुवर्याच्या पांडूच्या पुत्रा!) त्या सावित्रीचें चरित श्रवण कर, कारण तें ऐकायास योग्य आहे. (२) हे तनया! [मुला धर्मा!] तें चरित श्रवण कर, तें ऐकण्यास योग्य आहे; कारण त्याच्या श्रवणानें सा (सहा, सहा रिपु, षड्रिपु) धुपति (धुपून जातात—नष्ट होतात)—असेही या चरणाचे दोन अर्थ कोणी कोणी सूचवितात.	१९५
५	या आर्येत सावित्रीचें मोठेपण वर्णन केलें आहे. सावित्रीचा महिमा ऐकून तिच्या भावी वरांना लज्जा वाटली; पंत म्हणतात हें ठीकच आहे.	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	कारण (आर्यार्ध) खुद्द शंकर म्हणतातः—कल्पतरूसारखा जो हिमाग तो मागूं नका (तर ही सावित्री मागा) कारण तो जड गिरि (पर्वत) आहे. शंकराच्या उक्तीचा अर्थ इतकाच कीं या सावित्रीच्या ठिकाणीं हिमाग (हिमाचल) पर्वताचे गुण असूनहि त्याचे ठिकाणीं असलेलें जाड्य [अचेतनत्व] इच्या ठिकाणीं नाहीं, करितां हिला मागा, त्या पर्वताला मागूं नका. या अर्थाला पुष्टि येण्याकरितां पंतांनीं 'गिरीशचि' अशीं पदें घातलीं आहेत. 'गिरीश' असें घालून पंतांनीं शंकराचें पर्वतसंबंधीं ज्ञान खरें आहे असें ध्वनित केलें. गिरीशास गिरीसंबंधीं यथार्थ ज्ञान असणें सयुक्तिक आहे. वस्तूच्या स्वामीस तिचें यथार्थ ज्ञान असणें साहजिक आहे. 'चि' या पदानें निश्चय गोचर होतो. शंकरच म्हणतात कीं सावित्री ही हिमाग पर्वतापेक्षां श्रेष्ठ आहे. तर आतां त्याबद्दल कांहीं शंकाच उरत नाहीं. सारांश सावित्रीचा महिमा फारच मोठा होता. कारण गिरीशच असें म्हणतात कीं, कल्पतरुसमान हिमाग पर्वत न मागतां सावित्रीसच याचकांनीं मागावी. हिमागापेक्षांहि ती विशेष मौल्यवान आहे.	१९६
११	'सावित्रीला सासऱ्याच्या घराहून आणिलें काय?' असें नारद विचारतो व तिला पाहून हिचा विवाह झाला नाहीं असें कांहीं बाह्य चिन्हांवरून जाणून, स्वयंवर करून हिचें दान करण्याचें राजाला सचिवांनीं सूचविलें नाहीं असें म्हणून खेद दर्शवितो. या उत्तरार्धावरून त्या काळीं कन्या विवाहित आहे किंवा नाहीं हें जाणण्याचें मंगलसूत्रासारखें कांहीं बाह्यचिन्ह प्रचलित असावें असें दिसतें.	१९७
१९	यांत सप्ताक्षरी यमक असून उत्तरार्ध हें उत्तम सुभाषित आहे.	१९८
२१	यांत 'दृष्टांत' नामक अलंकार आहे. [रा. रा. भागवतकृत 'अलंकारमीमांसा'–पृष्ठ २९-३० पहा.]	१९९
२२	यांत 'अन्योक्ति' आहे. ['अलंकारमीमांसा'–पृष्ठ १४ पहा.] येथें 'पयोधि' व 'दीप' हे दोन अप्रस्तुत पदार्थ सत्यवानाचा बोध करतात, व 'नदी' व 'पतंगचित्तवृत्ति' हे सावित्रीचा बोध करतात आणि 'रत्न'शब्दापासून अन्यपतीचा बोध होतो.	,,
२६	[हे] अन्यायन्यायधर्मभावज्ञा! [नृपा!] हे कन्या बहु धन्या. नारद म्हणतोः—हे योग्यायोग्यभाव जाणणाऱ्या भूपा! ही तुझी मुलगी मोठी	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	धन्य होईल. (तुझ्या मुलीस सत्यवान् जर इतका आवडतो आहे तर ती त्याचीं आज्ञा पाळून जगतांत मोठी धन्यता पावेल–पतीची आज्ञा पाळणें यांत स्त्रियांचें धन्यत्व आहे, तेव्हां तूं त्या मुलीला सत्यवानालाच दे.) फार काय सांगूं? आर्यसती (पार्वती) ही देखील वल्लभाची अवज्ञा थोडीशी तरी कदाचित् करील, पण, ही तुझी कन्या तसें कधींही करावयाची नाहीं. पार्वतीनें शंकराची अवज्ञा करणें अगदीं असंभवनीय आहे, तें देखील कदाचित् अल्पस्वल्प संभवेल, परंतु तुझी मुलगी वल्लभावज्ञा (नवऱ्याची अवमानना) कधींही करणार नाहीं, म्हणून ती धन्यता पावेल. या पद्यांत 'न्या' अक्षराची आवृत्ति झाल्यामुळें अनुप्रासालंकार झाला आहे. अशीं उदाहरणें पंतांच्या काव्यांत विपुल आहेत:—(१) देवि! अहल्याबाई! झालीस जगत्त्रयांत तूं धन्या। न न्याय धर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या. ॥ २ ॥ [मोरोपंतकृत स्फुटप्रकरणें–भाग पहिला–अहल्यास्तुति–काव्यसंग्रह–पृष्ठ २७३], (२) धर्माधर्मबळाबळवार्ता तीं दुर्लभाचि अन्या या; । कन्या या पायांची जाणें न्याया, तथैव अन्याया ॥ ३४ ॥ [मोरोपंत–आदिपर्व–काव्यसंग्रह–पृष्ठ ३४], (३) अन्या, धन्या, कन्या, अन्यायन्यायजाणत्या मार्गें। गांधर्वेंचि वरातें भजल्या; तद्गुरुहि न भरले रागें ॥ ४२ ॥ [मोरोपंत–आदिपर्व–काव्यसंग्रह–पृष्ठ ७६], (४) न चुके, कन्या अन्या धन्या कवणा वरासि अर्पावी? । क्षितिधर एकचि, न दुजा, कद्रूहि तशा दुज्या न सर्पा वी ॥ ६७ ॥ [मोरोपंत–आदिपर्व–काव्यसंग्रह–पृष्ठ २१६].	१९९
२७	उत्तरार्ध–यांतील 'मृत्युंजय'शब्दांत विशेष खुबी आहे म्हणून हा 'परिकर' नामक अलंकार समजावा.	२००
२९	याचा अन्वय:–माता तात परततां बहु रडती, परि सावित्री सुमृदु [असूनही] सुमंत्रीहि [होती] म्हणुनि (म्हणून) न रडे. [ती सावित्री] त्यांशीं (त्या मातापितरांला) म्हणे:—'नामगा सावित्री न.'=आईबाप सावित्रीचा विवाह करून परत येतांना फार रडलीं, यांत नवल नाहीं. झालेला विवाह परिणामीं कितपत सुखावह होईल याची कल्पना नारदाच्या सांगण्यावरून त्यांच्या डोळ्यापुढें उभी होतीच. अशा समयीं सावित्रीलाही रडूं येणें स्वाभाविक होतें. परंतु ती रडली नाहीं. याचें कारण ती कठोर मनाची होती असें नव्हे. सावित्री सुमृदु (अत्यंत कोमल मनाची असूनही) ती रडली नाहीं; ती सुमृदु (असून) सुमंत्रीही होती म्हणून	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	रडली नाहीं. सावित्री जरी कोमल मनाची होती तरी ती उत्तम विचारी (पुऱ्या विचाराची–विचारशील) होती, म्हणून तिनें न रडतां नारदानें सांगितलेली गोष्ट गुप्त ठेवून आपल्या अंतःकरणास लागलेली काळजी सासूसासरा यांस यत्किंचित्‌ही दर्शविली नाहीं. ती सुमृदु (कोमळ मनाची) होती तरी सुमंत्री (विचारशील) होती, तेव्हां तिनें आपलें दुःख गिळून टाकिलें, तें सासूसासऱ्यांच्या नजरेस पडूं दिलें नाहीं. तिचे आईबाप शोक करीत होते त्यांस ती म्हणाली:–'नामगा न सावित्री' (जिच्या वरानें मी तुम्हास प्राप्त झाल्यें व जी आमच्या कुलाची आराध्य देवता) सावित्री नामगा (नामधारक) न=केवळ नांव धारण करणारी नव्हे, तर ती यथार्थनामधारिणी सावित्री होय. तुमची कुलदेवता सावित्री ही केवळ नांवाची सावित्री आहे असें नव्हे, तर ही यथार्थत्वानें सावित्री आहे. (संकटमोचनोपायाची प्रेरणा करणारी आहे. सावित्री=प्रेरणा करणारी.) [केव्हां केव्हां फार अनन्वर्थक नांवें असतातः–मेलेल्या मनुष्याचें नांव अमरनाथ, गोंवऱ्या वेंचणाऱ्या बाईचें नांव लक्ष्मी, भिक्षा मागणाराचें नांव धनपाळ, नांव सोनूबाई आणि हातीं कथलाचा वाळा–तसेंच 'धत्तूर ही कनक नाम सदां धरीतो । होईल काय रसिकां कनकापरी तो' इत्यादि प्रकार एकाच मासल्याचे होत].	२००
३१	पूर्वार्धात 'रूपका'लंकार आहे. उत्तरार्धात 'मिषापन्हुति' आहे.	,,
३३	यांत 'सार' नामक अलंकार झाला आहे. [अलंकारमीमांसा–पृष्ठ ४९-५०.]	२०१
३६	उत्तरार्ध–'नसतें तसें तरि' इत्यादि=उर्वरित दिवस महिने मोजण्याचें नसतें तर, स्वप्राणपतीचें आयुष्य फार थोडे दिवस उरलें, तें मोजण्याचें नसतें तर, तिला वनवासांत राहून जे श्रम होत होते त्यांहून अधिक श्रम घेऊन सावित्रीनें आयुष्य आनंदानें घालविलें असतें. सावित्रीला पतिमरणाचेंच काय तें दुःख होतें, वनवासनिमित्त जे कष्ट ते दुःसह नव्हते. अन्वयः—[जर] तसें नसतें तरि (तर) तदधिकहि श्रम भोगुनि सुखें वय नेती.	,,
४४	उत्तरार्ध–सुभाषितरूप आहे.	२०२
४६	या आर्येंत 'परम शिव' या पदाचे दोन अर्थ आहेत. 'परम शिव' या पदाचा एक अर्थ अत्युत्तम कल्याण व दुसरा अर्थ श्रेष्ठ शिवमूर्ती (शंकर).	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	पित्याच्या आशींत परम शिव (मोठें कल्याण) आहे आणि काशींत परम शिव (महादेव) आहे–हें स्पष्ट आहे. सौराष्ट्र, उज्जनी इत्यादि ठिकाणीं शिवलिंगें आहेत परंतु तीं काशी येथील शिवलिंगापेक्षां अधिक महत्वाचीं नाहींत, म्हणून काशींतील शिवमूर्तीस (काशीविश्वेश्वरास) 'परमशिव' असें विशेषणपद लाविलें तर शोभण्यासारखें आहे. जींत=त्या जनकाच्या आशींत; (पक्षीं) ज्या नगरींत. जिला=ज्या जनकाशीला; (पक्षीं) ज्या नगरीला. पूर्वार्धांत 'अपन्हुति' आणि उत्तरार्धांत 'श्लेष' आहे.	२०३
५५	उत्तरार्ध–यांत सुरेख 'पर्यायोक्त' आहे.	,,
५९	या आर्येच्या पूर्वार्धांत यम सत्यवानास बांधून आपल्या नगरीकडे जाण्यास निघाला असें वर्णन आहे. परंतु हें त्याचें कृत्य चुकीचें होतें. कारण यमास पुढें सत्यवानास सोडून देणें प्राप्त झालें. आतां यमानें बद्ध केलेला सत्यवान पुन्हा सुटला कसा व त्याची (यमाची) अशी चूक झाली कशी असें वाटणार आहे. त्यास कवि ह्मणतात (अर्थ) बहुतकरून यम सावित्रीला भ्याला व त्यामुळें त्यानें सत्यवानाचे नशिबीं ब्रह्मदेवानें काय लिहिलें आहे हें नीट वाचिलें नाहीं. सतीच्या कपाळावरचें ब्रह्मलिखित कावराबावरा झालेला यम वाचावयास विसरला, म्हणून एकाएकीं चूक करून सावित्रीच्या नवऱ्याला नेता झाला. सावित्रीच्या कपाळीं ब्रह्मदेवानें वैधव्य लिहिलें नव्हतें, हें यमानें पाहिलें नाहीं. प्राण्याचें आयुष्य, सुख, दुःख इत्यादि गोष्टी ब्रह्मदेव त्याचे कपाळीं लिहून ठेवितो असा समज आहे, त्यास अनुसरून हें वर्णन आहे.	,,
६२	उत्तरार्ध–हें अर्ध उत्तम सुभाषित आहे.	२०५
६४	यांत 'उपमा' आहे.	,,
७३	मागील आर्यांत सावित्रीला यमानें जे निरनिराळे वर दिले आहेत, त्यांचें कथन झालें आहे, व त्यावरून कवीची यमाविषयीं जी समजूत झाली ती या आर्येच्या पूर्वार्धांत ते (मोरोपंत) सांगत आहेत. पूर्वार्धाचा अर्थः—चंद्राला लाजून जसें नक्षत्र पाठीमागें फिरतें त्याप्रमाणें यमाच्या औदार्यास लाजून अभ्र (मेघ) मागें सरला. जसें चंद्रापुढें नक्षत्र फिकें पडतें तसें यमाच्या औदार्यापुढें अभ्राचें (मेघाचें) औदार्य फिकें पडलें, तात्पर्य यमाच्या औदार्यानें मेघासहि लज्जित केलें. मेघापेक्षां श्रेष्ठ दाता नाहीं असें मानितात. तेव्हां दातृत्वानें त्यासही यमानें लाजविलें असें सांगून कवि यमाचें दातृत्व प्रकर्षानें वर्णितात. उ-	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	उत्तरार्ध–यांत 'मीलित' नामक अलंकार झाला आहे. "संस्कृत कवींच्या संप्रदायास अनुसरून, मोरोपंतानें 'मीलिता'सारखे फाजिलपणानें ओतप्रोत भरलेले अलंकारही–फारच विरळा हें खरें तरी–क्वचित् आपल्या काव्यांमध्यें बांधलेले आढळतात. असल्याही अलंकारांचें पर्यवसान उपमेंतच असतें." * * * * कवींचीही एक सांकेतिक अशी प्रौढोक्ति असते. यशाचा रंग या कवींच्या प्रौढोक्तीनें पांढरा ठरविला आहे. सावित्रीच्या पांढऱ्या यशामध्यें पांढरा ऐरावत अजीबात बुडून गेला म्हणजे यशाच्या वरचढपणा मिळालेल्या पांढऱ्या रंगामध्यें ऐरावताचा पांढरा रंग अगदीं मिळून गेला अशी लापनिका झाली आणि 'मीलित' अलंकार सिद्ध झाला. 'ऐरावत नवरा यशामध्यें अगदीं मिळून गेल्यामुळें दिसेनासा झाला, त्यामुळें अर्थातच त्याची बायको अभ्रमु रडूं लागली' !!! असल्या अलंकारांखालीं संस्कृत सारस्वत अगदीं चिरडून गेलेलें आहे. या जातीच्या फाजिलपणाचा किंवा असल्या पचकळपणाचा वारा देशी कवींस सोसत नाहीं, हें देशी सारस्वताचें एक सौभाग्यलक्षण होय. मोरोपंतानें मुद्दाम एक मासला म्हणून आपल्या भारती भट्टींत बनवून तो देशी लोकांस सादर केलेला दिसतो. [अलंकारमीमांसा–पृष्ठ ३३-३४.]	२०६
७४	चित्तीं शिरोनि=पोटांत शिरून, त्याचा लोभ संपादन करून.	२०७
७८	पूर्वार्ध–यांत 'तिला' याची आवृत्ति झाल्यामुळें 'अनुप्रास' नामक शब्दालंकार झाला आहे. यांत 'समुच्चय' अलंकार आहे. या अलंकाराचें लक्षण असें:–(१) 'बहूनां युगपद्भावभाजां गुम्फः समुच्चयः' [कुवलयानंद–११३], (२) 'युगपत् पदार्थानामन्वयः समुच्चयः' [रसगंगाधर–पृ० ४८९], (३) 'तत्सिद्धिहेतावेकस्मिन्यत्रान्यत्तत्करं भवेत् । समुच्चयोऽसौ' [काव्यप्रदीप ३०–पृ० ४२७]. जेथें अनेक पदार्थ, अनेक गुण किंवा अनेक क्रिया यांचा युगपद्भाव (सहभाव–गुंफ–संदर्भ) इष्ट असतो तेथें हा 'समुच्चय' होतो. जेथें एका कार्याच्या सिद्धीसाठीं अनेक कारणांचा एकाच वेळीं खलेकपोतन्यायानें संबंध जोडिला असतो तेथें 'समुच्चय' अलंकार होतो. प्रस्तुत आर्येंत द्युति, धृति, मति आणि स्तुति या सावित्रीच्या एकवटलेल्या चार पदार्थांस यमधर्म अतिशय भुलला असा या चारांचा युगपद्भाव इष्ट आहे; म्हणून हा 'समुच्चय' अलंकार होय. सावित्रीच्या एका पदार्थासही भुलून जाणें साहजिक आहे. मग येथें तर चारीही एकवटले आहेत	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	तेव्हां त्यांस यमधर्म भुलला यांत नवल नाहीं. धर्माच्या भुलून जाण्यास एक द्युति हा पदार्थ पूर्ण कारण असून धृति, मति, स्तुति हे पदार्थही त्याच कार्याच्या सिद्धीकरितां कारणत्वानें मिळून प्राप्त झाले आहेत. तेव्हां 'समुच्चय' अलंकार होय. याचीं अन्य उदाहरणें:—(१) पाय धरुनियां म्हणती, 'रामा! आम्ही तुझेचि सांगाती'। रडती, पडती, पढती स्तोत्रें, त्याच्याचि कीर्तिला गाती. ॥ ३७ ॥ [मंत्ररामायण–अयोध्याकांड, काव्यसंग्रह–पृष्ठ ४९], (२) मज शंतनुगंगागुरुगोविप्रवरप्रसादपात्रास। यात्रासमयभ्रंशें दुर्गति, ऐसा धरूं नका त्रास. ॥ १२९ ॥ [भीष्मपर्व–अध्याय ११ वा], (३) तव संततिच न केवल, बुडविलि निखिला महीहि या पापें; । निर्दय निर्भय निस्त्रप भस्म करावाचि हा तुवां शापें. ॥ ५१ ॥ [स्त्रीपर्व–अध्याय ३ रा], (४) म्हणतें तुझ्या सख्याला, 'बा कोणिकडे झुगारिलें शिर तें; । चिरतें काळिज; कानीं कन्येचें करुण वच जसें शिरतें' ॥ २३ ॥ [स्त्रीपर्व–अध्याय ५ वा].	२०८
८४	यांत 'अतिशयोक्ति' आहे. कारणाचा व्यापार चाललेला असतांच कार्याची सिद्धि झाली असें जेथें वर्णन असतें तेथें 'अतिशयोक्ति' होते. सावित्रीच्या जीवितांत मति असणें हें कारण आणि सत्यवानाच्या आंगीं चेतना येणें हें कार्य, परंतु हीं एकदमच झालीं म्हणून यांत 'अतिशयोक्ति' आहे.	"
८५	यांत 'भेदीं अभेद' कल्पून वर्णन केलेलें आहे म्हणून 'अतिशयोक्ति' होय. यांत 'चकोर' सत्यवान् आणि 'ज्योत्स्ना' सावित्री–असें मानिलें आहे म्हणून या 'अतिशयोक्तीं'त रूपकाची झांक मारते. [अलंकारमीमांसा–पृष्ठ ३६].	"
९०	सत्यवानास आपण आईबापांस कसे भेटतों या संबंधें फार खेद झाला होता असें मागील पुढील आर्यांच्या संदर्भावरून घेतां येत आहे. कोण्याहि मनुष्यास दुःख झालें असतां तो रडतो व 'बाई ग, बाई!' असे उद्गार काढितो. या प्रवृत्तीस धरून कवीची योजना असावी. सावित्री सत्यवानास उद्देशून म्हणते:—(अर्थ) 'आपण 'बाई' असे कष्टसूचक उद्गार कां काढितां, रडतां कां, व मुद्दाम दुःखांत पडतां कां?' तात्पर्य, सावित्री सत्यवानाचें समाधान करण्याच्या उद्देशानें म्हणते—आपणांस खेद वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. सावित्रीच्या एकंदर वर्तनावरून हें तिनें केलेलें समाधान युक्तच आहे.	२०९

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
९१	यांत 'असंभव' अलंकार आहे. जेथें घडलेल्या अर्थाची असंभाव्यता वर्णिली असते तेथें 'असंभव' नामक अलंकार होतो. याचीं दुसरीं उदाहरणें:—(१) 'गज गोष्पदीं बुडाला! हा! दैवा! सिंधु शोषिला मशकें। न शके सोसाया हें वधिला तो केसरी कसा शशकें॥' [द्रोणपर्व], (२) 'त्या दोघां कृष्णातें म्हणशी मारीन मोह हा कवणें। वधिले सिंह श्रृगालें ऐसें लोकांत ऐकिलें श्रवणें'॥ [कर्णपर्व].	२०९
९३	यांत 'विभावना' नामक अलंकार झाला आहे. [अलंकारमीमांसा–पृष्ठ ४१.]	,,

अध्याय चवदावा.

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
१५	अरिनरदेवप्राण=शत्रु जे नरदेव (नरनारायणावतारी) कृष्णार्जुन त्यांचे प्राण. यांत अनुप्रास साधिला आहे. उत्तरार्ध–'स्वप्न'शब्द पुल्लिंगी योजिला आहे. [निबंधमाला–अंक १० पृ० १४.]	२१५
१६	उत्तरार्ध–अन्वय—दृष्टि मिळतां कर्णमन सप्रत्यय होय व तपनमन तप्त होय.=डोळे मिटतांच कर्णास सूर्याचा साक्षात्कार झाला व सूर्याला त्रास झाला. आपृष्ठताप जप नमन करून स्वस्वप्नवृत्त कथितां (स्वप्नांतील हकीकत दुसऱ्यास सांगत असतां) दृष्टि मिळतां, (ब्राह्मण एक पुढें येणारा दृष्टीस पडतां), कर्णाचें मन सप्रत्यय (दाखला मिळालेलें) होय (झालें) [आणि] सूर्याचें मन (तो ब्राह्मण इंद्रच असल्यामुळें) तप्त होय.	,,
२०	उत्तरार्ध–उत्तम सुभाषित. कवि=सुज्ञ पुरुष, पंडित, शहाणे पुरुष.	२१६
२३	पूर्वार्ध–जलदें (मेघानें) [स्वजीवनहेतु सरोदान] कसें देऊन टाकावें? कारण मेघाची उत्पत्ति पाण्यापासून, तेव्हां सरोवराचें दान केल्यास, मेघोत्पत्तीचा मार्गच खुंटला. मेघाच्या जीविताला कारणभूत असें सरोवराचें दान त्यानें कसें करावें? हा प्रश्नालंकार जाणावा.	,,
२९	पूर्वार्ध–नरींच=अर्जुनींच, अर्जुनावरच.	२१७
३०	अष्टाक्षरी यमक.	,,
३१	उत्तरार्ध–एकदां विष्णूनें शंकराला सहस्र कमळें वाहण्याचा संकल्प करून वैकुंठचतुर्दशी व्रत करण्याचें मनांत आणिलें. त्याप्रमाणें सहस्र कमळें आणून शिवपूजनास आरंभ केला. इतक्यांत शंकरानें त्यांतील एक कमळ सत्वपरीक्षार्थ उचलून एकीकडे केलें. विष्णु इकडे तिकडे पाहतो	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	तों एक कमळ कमी आहे. तेव्हां त्यानें आपला एक डोळा कमळाचे ऐवजीं वाहून व्रत पूर्ण केलें. अशी कथा 'व्रतराज' ग्रंथांत आहे. [व्रतराज–वैकुंठचतुर्दशीव्रत–पृष्ठ २५७-२६७.] या संबंधानें पुढील श्लोक पहा. 'हरिस्ते साहस्रं कमलबलिमाधाय पदयोर्यदेकोने तस्मिन्निजमुदहरन्नेत्रकमलम् । गतो भक्त्युद्रेकः परिणतिमसौ चक्रवपुषा त्रयाणां रक्षायै त्रिपुरहर जागर्ति जगताम् ॥' [महिम्नःस्तोत्र–श्लो० १९.] याचें भाषांतरः—'सहस्राब्जें विष्णू चरणकमळा पूजित जयीं उणें येतां, एका नयनकमळा अर्पित तयीं, स्वशक्त्युत्कर्षाची परिणति तया चक्रवपुनें त्रिलोकीं रक्षाया त्रिपुरहर सामर्थ्यं गतिनें ॥ १ ॥' [किंकरकवि.]	२१७
	अध्याय पंधरावा.	
५	पूर्वार्ध–द्वितीय चरणांत प्रश्नालंकार आहे.	२१९
६	उत्तरार्ध–उत्प्रेक्षा फार सुरेख आणि अनुरूप केली आहे. पाण्यावरचे हेलकावे हातांसारखे दिसतात व ते बोलावीत आहेत असा भास होतो.	,,
८	उत्तरार्धांत उपमा आहे.	,,
१४–१५	यांत गत गोष्टीचें स्मरण वर्तमानकालीं करून दिलें आहे म्हणून 'स्वभावोक्ति' होय.	२२०
१७	गेला स्वर्गासि, बरें, जा–हें 'व्याजस्तुती'चें उदाहरण आहे. या लहानशा वाक्यांत पंतांनीं धर्माच्या हृदयांतील सगळा दुःखसागर वाचकांस दाखवून त्याची निराश्रितता व शांति व्यक्त केली आहे. हिचा अन्वय व अर्थः—हो! (अहो!) गेला स्वर्गासि, बरें, जा. परि (परंतु) हा (धर्म) कवणासि निरविला. [लोक] हें अत्यद्भुत म्हणतील, रविला हानि हो (होवो) [असें] पद्म न कधींही [म्हणतील]. अर्थः—धर्मराज म्हणतो–अहो बांधव हो! तुम्हीं स्वर्गास गेलां, बरें जा, परंतु हा धर्मराज कोणाचे स्वाधीन केला? ह्या धर्माच्या संरक्षणाची काय वाट लाविली? [मला वाटतें] लोक तुमचें हें करणें (आपण स्वर्गास निघून जाणें आणि माझी व्यवस्था न करणें) अत्यद्भुत झालें असें म्हणतील, रविला (सूर्याला) हानि होवो असें पद्म कधींही म्हणणार नाहींत. जसें पद्मांचें आणि सूर्याचें प्रेम स्वाभाविक आहे तसें तुमचें व माझें प्रेम स्वाभाविक असून तुम्ही मला सोडून गेलां, हें मोठें आश्चर्य झालें असें लोक म्हणतील. या पद्यांत 'पद्म'शब्द पुल्लिंगी बहुवचनी समजावा. ['वा पुंसि पद्मं	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	नलिनमरविंदमहोत्पलम्' इत्यमरः । 'पद्मोऽस्त्री पद्मके व्यूहनिधिसंख्यांतरेंऽबुजे' इति मेदिनी. 'पद्म' शब्द अस्त्री आहे.]	२२०
३६	यमधर्म हा समदर्शी होय. जे ज्ञानी असतात त्यांची दृष्टि सर्वांवर सारखी असते. [भगवद्गीता–अध्याय ५ श्लोक १८.]	२२३
३९	यांत बापानें पुत्राला देऊं नये असें वस्तु जगतांत नाहीं असें वर्णिलें आहे.	,,
४३	शिरःस्पर्श आणि शिरोऽवघ्राण करणें हें वात्सल्यदर्शक आहे.	,,
४४	यांत 'अरणी' विशेष्याचें विशेषण बरेंच मोठें आहे.	,,

३. मूळग्रंथाचें शुद्धिपत्र.

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
		अध्याय पहिला.		
८	२	हृदयमेद	हृदयभेद	२
१३	२	[१०] हंसी	[१०] हंसीं	३
२२	१	विनवी–जेवी	निववी–जेवीं	४
२४	१	कुशळविसर	कुशलविसर	,,
,,	२	पळ	पल	,,
४३	२	आम्हीं, बहु	आम्हीं बहु,	६
५०	१	त्याशि	त्यासि	७
,,	२	विनिपातहेतुमार्गामाजि	विनिपातहेतु मार्गामाजि.	,,
६२	१	वन–पडलें	वन–पडलें	९
६५	१	स्वग	खग	१०
७६	१	दिसांचा	[१६] दिसांचा	११
८०	२	तरी	तरि	१२
		अध्याय दुसरा.		
२९	२	[६] वांचावें	[६] वांचावें	१७
४६	१	नव्हे तुझें	तुझें नव्हे	१९
७४	१	[२०] हूं	[२२] हूं	२२
८३	२	होतीं	होती	२३
८७	२	कां ममता	कां ममता	२४
११४	१	तुजसम तूंचि [६] भला	तुजसम तूंचि भला	२७
११५	२	मीं	मी	,,
		अध्याय तिसरा.		
१७	१	गिलों	गिळों	२९
४८	१	स्पर्शों	स्पर्शों.	३४
६२	१	असें म्हणे	म्हणे असें	३५
६५	२	पौरव, तें	पौरव ते,	३६

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
		अध्याय चवथा.		
१७	१	नावें,	नांवें,	४०
१८	२	रतिचें.	रतिचें.	,,
३६	२	मधुहित	मधु हित	४२
३७	१	हें प्रेम	हें प्रेम,	,,
,,	२	हंसप्रत्युपकारीं हर्षी कामज्वरीं नळ	हंस प्रत्युपकारीं हर्षी, कामज्वरीं नळ,	,,
५२	२	प्रभु	'प्रभु'	४४
६२	२	मंदधिक	मंदधिक	४५
१३२	२	बाळा	बाला	५३
१४०	२	सौंथप म्हणे, 'मनुष्य न आढळले,—देवनळ	सौंथप म्हणे, 'मनुष्य नं, आढळले—देवनळ'	५४
१४७	१	गतिला	गतिला'	५५
१५३	२	मत्सुता प्रियसखी	मत्सुताप्रियसखी.	५६
१५४	२	मतिसा	मतिसी	,,
१५६	१	वणव्याला,	वणव्याला	,,
१६५	२	त्वद्रत	त्वद्गत	५७
१७३	२	मात्र न तो,	मात्र, न तो	५८
१७९	१	बाळा,	बाळा?	,,
१८०	१	रे!	रे!'	५९
१९०	१	नळ	नल	६०
१९५	२	बोधोमीं'	बो धोमीं'	,,
१९६	२	अनुसूया	अनसूया	,,
२००	१	वियोगा धी	वियोगाधि	६१
,,	२	गाधी	गाधि	,,
२०३	१	त्यांसि	त्यांशि	,,
,,	२	सिकवी	शिकवी.	,,
२०४	१	असतां	असतां	,,
२०५	१	सांगती	सांगति	,,
२१७	१	'बहु बरें' स्वमनीं हा हो!	"बहु बरें,' स्वमनीं हा—हो!"	६२
२२०	१	कथ	कथं	६३

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
२३४	२	कठिन	कठिण	६४
२३६	२	शाखचींच	शाखेचींच	,,
२४७	१	अनलसमीं,	अनलसमीं	६६
२६३	२	मोटी	मोठी	६८
२७४	१	निजाश्रुनीं रानीं	निजाश्रुनीरानीं	६९
२७६	२	—वरास न वेधूनीं.	—वरासन वेधूनीं.	,,
२७७	२	पाहों	पाहो	७०
२८४	२	वोंरणकरोरू?	वोंरणकरोरू!	,,
२९९	२	प्रेमबोबळें	प्रेम बोबळें	७२
३१३	१	बृहदश्व	बृहदश्व	७३
,,	२	प्रमुदित पुण्यश्लोक यशें	प्रमुदित, पुण्यश्लोकयशें	,,

अध्याय पांचवा.

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
७	१	—सीकर गा.	सीकरगा.	७५
१६	२	पाताळविळीं	पातालविलीं	७६
२९	२	गंडकी—	गंडकी—	७८
३३	२	गरळ रस	गरलरस	७९
३४	२	शिवशुक—	शिवशुक	,,
५६	१	भीमबळें,	भीमबळें	८२
५९	२	हरित्या	हरित्या	८३
७७	२	श्रीकाळी	श्रीकाली	८५
८३	२	अतिकठिना	अतिकठिणा	८६
९०	२	असती?	असती.	८७
११८	२	खावे.	खावें?	९१

अध्याय सहावा.

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
३७	२	बहू	बहु	९७
४०	२	जना	जनां	९८
४४	२	पुण्यर्द्धी, हो! नमजन! करा	पुण्यर्द्धी हो! नमजनकरा	,,
५०	१	लोकदेव	देवलोक	९९
५१	१	असे नातें	असें नातें	,,

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
६४	२	शिवदेहार्धमता	शिवदेहार्धगता	१०३
६५	२	उंद्धव–	उंद्धव–	१०४
७०	२	घेऊन	घे ऊन.	१०५

अध्याय सातवा.

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
७	२	करुनि	करुनी	१०६
३६	२	भेट–शरण'	भट—शरण'	१०८
३८	२	नसते,	नसते	११०
४६	२	शिवासीं	शिवासी	१११
५२	२	सकलांसहित्या,—नसो	सकलांसहि, त्या—नसो,	११२
६५	१	वर दे	वरदे !	११३
१०४	२	म्हणतों,	म्हणतो,	११८
११८	२	करवीन	करवीन,	१२०

अध्याय आठवा.

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
६	१	जन तरला,	जन, तरला	१२१
,,	२	शुचिगुण	शुचिगुण,	,,
११	१	जपून	जपोनि	१२२
२१	१	लागावें,	लागावें	१२३
३२	२	सांजे	सांजे	१२४
५०	२	वरा का	वराका	१२७

अध्याय नववा.

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
६	२	फळ	पळ	१२८
१४	१	कामांधं	कामांध	१२९
१८	२	सतीवर	सती वर	१३०
२५	२	ब्रहानपा	महा तपा	१३१
३३	२	प्रियराज्यश्रीमोचनें	प्रिय राज्यश्रीमोचनें	१३२
३५	२	निववी	निववीं	,,
३७	१	येतीं,	येतीं	,,
४३	२	पाहो–उतरा हो.	पाहों–उत राहो.	१३३

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
४८	१	वारी	वारी	१३४
४९	२	चालो	चालों	१३५.
७३	१	घे.	घे.'	१३८
,,	२	निघे.'	निघे.	,,
७६	२	भवाचें.	भवाचें	,,
		अध्याय दहावा.		
१५	१	धीरानीं	धीरांनीं	१४०
१९	२	महीध्रभूपधर	महीध्र भूपधर	,,
२१	२	शासनांत	शासनांत	१४१
२८	१	यांनीं,	यांनीं,	,,
४०	१	हर्षे	हर्षे	१४३
४१	१	विवूनि	विऊनि	,,
५६	१	युवराज्यपद	युवराजपद	१४५
५८	१	यो ध्यो,	यो, ध्यो	,,
६८	१	गुरुचरण	गुरुचरण,	१४६
,,	२	काय ?	काय;	,,
१०२	२	श्रीमदयोध्येला	श्रीमद्योध्येला	१५०
		अध्याय अकरावा.		
५	२	खरादि पाप्मे–तेरा	,'खरादि पाप्मे,–तेरा.'	१५१
१७	१	रामाश्रमासि	रामाश्रमाशि	१५३
,,	२	सिवे	शिवे	,,
५२	२	मी, असे	मी असें,	१५७
९८	१	मजसम	मज सम	१६३
,,	२	नगहो	नग हो	,,
११५	२	दिशासि	दिशांसि	१६५
१२०	१	ये ऊन	येऊन	१६६
,,	२	येऊन	ये ऊन	,,
१२२	२	ज्यांत श्रेष्ठ न, त्याहूनि राज्य	ज्यांत, श्रेष्ठ न त्याहूनि राज्य,	,,
१२३	२	जना	जनां	,,

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
		अध्याय बारावा.		
२६	१	हठें	हटें	१७३
२७	२	हो !–रोपातें ?	,"हो–रोपातें."	,,
४९	२	अद्भुतमोहाजगरें	अद्भुत मोहाजगरें	१७६
६२	१	रामरण,	रामरण	१७८
६७	१	सेनासि	सेनेसि	१८०
७१	२	धनु इषुहीं	धनुरिषुनीं	१८१
७३	१	वांचावें,	वांचावे,	,,
७४	१	मरें पामर	मरें पामर	,,
८८	१	स्त्रीच्या सुखदे हो सुप्रसन्न मो-कळिके!	स्त्रीच्या, सुख दे, हो सुप्रसन्न, मो-कळिके,	१८३
९१	१	होउनि करिशिल	होऊनि करिल	१८४
१०१	१	म्हणती,	म्हणति,	१८५
१०४	२	पाडीं	पाडी	,,
१३८	१	श्रीरामचंद्र	श्रीराम चंद्र,	१८९
१४१	१	श्रीराम'	श्रीराम' ?	१९०
१४९	१	मीन संनिध	मीनेंसंनिध	,,
१५१	१	यादानीं,	यादांनीं,	१९१
१५४	२	तसे	तसें	,,
१५६	१	अंधकारा ती,	अंधकारा ती,	,,
,,	२	चंद्र	चंद्र,	,,
१६०	१	राज्याभिषेकउत्सव–विधि तें.	राज्याभिषेक उत्सव–विधि, तें	१९२
१६४	१	प्रीतीहि देहभा, नाचे	प्रीतीहि, देहभा नाचे,	१९३
		अध्याय तेरावा.		
५	१	वराला	वरांला	१९६
७	१	मतें	मनें	१९७
२६	१	भावज्ञा ।	भावज्ञा ! ।	१९९
२९	२	म्हैणुनि त्यांसि म्हणे नामगा न-सावि त्री.	म्हणुनि, त्यांसि म्हणे, 'नामगा न सावित्री.'	२००
३१	१	श्वश्रूस्मृति,	श्वश्रू स्मृति,	,,

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
३७	१	¹⁶करी	¹⁶करि	२०१
४६	२	म्हणुनी	म्हणुनि	२०२
६४	१	शशी देव,	शशी, देव	२०५
८३	१	कळेवरा	कळे वरा	२०८
८५	२	राहो	राहों	,,

अध्याय चवदावा.

२३	१	धावेंहि	ध्यावेंहि	२१६
२९	१	नरींच	नरींच	२१७

अध्याय पंधरावा.

४	१	एक वॅट,	ऍक वॅट,	२१९
९	१	जळ,	जल,	,,
,,	२	खळ	खल	,,
१७	२	'न-पद्महानि-हो.'	न-पद्म हानि-हो.'	२२०
२२	२	क्षय	यक्ष	२२१
३५	२	वांचे.'	वेंचे.'	२२३

४. टीपांचें शुद्धिपत्र.

टीप.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
१४	हृदयभेद	(हृदयभेद)	२
१७	ज्यांपासून इत्यादि	ज्यांची गति चांगली आहे असे, उत्तम-गतियुक्त.	,,
२२	वृष्टिगुण-नसतो.	अधिक टीपा पहा. (पृ० ४).	,,
२९	अंध-काम	(अंध धृतराष्ट्राला काठीप्रमाणें आधार देण्याचें) पत्करलेलें (काम.)	३
३४	पुण्य (यश)	पुण्य यश	५
१८	कष्ट, त्रास.	कष्टाला, त्रासाला.	७
२	प्राणांतें	प्राण	८
१८	आपल्या-रुचतो	(आपल्या-रुचतो)	,,
२२	३७ व्या 'कुरु' नामक	'कुरु' नामक ३७ व्या	,,
२५	करविता दैव,	करविता आपण नव्हे,	,,
५	भीमास	किर्मीरातें. (गीति ९५ पहा).	१२
१९	ते	ते तरणार नाहींत,	१५
२४	क्रोधानें	दीनवाण्या मुद्रेनें	,,
२०	तुलना करून पहा	प्राकृत जनाच्या बायकोस करलावा आणि मग पहा तुमची काय दशा होते ती. एखाद्याच्या बायकोस हात लावून पहा म्हणजे तो कितपत सोसतो हें कळेल.	१६
२३	आई	हे आई.	,,
१७	छाव्याचें	छाव्याचे	१८
२१	ब्रह्मदेव	शुक्र	१९
२२	अवस्थानीं	अवस्थानीं,	,,
२	ह्या गीतिमध्यें इत्यादि	अधिक टीपा पहा. (पृ० ९).	२०
१०	[आहे]	[अहो !]	,,
२७	सरोवर	(सरोवर)	२१
७	वामनातारीं	वामनावतारीं	२५
३१	सत्वसंपन्न, धर्मशील.	सत्वसंपन्नें, धर्मशीलें.	,,
२०	अर्जुनानें-किरातानें	मीं-त्वां	२८

टीप.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
१२	सर्पाचें (विष)	सर्पाचें गरळ (विष)	२९
२९	उत्तर देऊन.	उत्तर देऊन, ओ म्हणून.	३१
८	तुझ्या शत्रूतें	आपल्या शत्रूतें (पृ० ३७ गी० ७८)	३२
१०	पुष्पास	पुष्पा!	३५
१५	चित्रसेनानें	इंद्रानें	३५
२०	ऋषीच्या शापामुळें	ब्रह्मदेवाच्या वरानें, 'तुला सेतु बांधतां येईल' असा वर विधीकडून नलाला मिळाल्यामुळें	३६
२२	लक्ष्य आहे.	लक्ष्य आहे. [अध्यात्मरामायण—युद्धकांड—सर्ग ३ श्लो० ८४]	,,
३	हा भाग	कैकेयीचा हा भाग	३७
२०	मन.	मान.	,,
१०	मोठा	पुष्कळ, भारी, विपुल.	३८
२३	पक्ष्यानें.	पक्ष्याशीं तुला काय करावयाचें आहे? येथें 'काय' हा शब्द केवळ प्रश्नार्थक नसून संस्कृतांतील 'किम्' शब्दाप्रमाणें 'प्रयोजनबोधक' आहे.	,,
२५	जो	जो मानवसुत सुरपसुतशतप्रवर तो	,,
२७	नये.	न ये (तर) तुला द्विजें काय (लाभ)—असा अन्वय.	,,
१७	हंसाचे उलट	उलट	४२
२८	दमयंती नेण्याची	दमयंतीकडे येण्याची	,,
२९	सुनय इत्यादि.	अधिक टीपा पहा. (पृ० १९).	४३
२०	सौवर्णकाय कोंदावा	द्यावा, आयकों द्या; यमकासाठीं 'द्यावा' याच्या ऐवजीं 'दावा' असें पद योजिलें आहे.	४४
९	होउ	होऊ	५२
२८	राहा हो	राहों द्या	,,
१०	थोर; मोठे.	वंदनीय पदार्थ, श्रेष्ठ पदार्थ.	५३
३	(सत्त्वरहताला)	(सत्त्वरहिताला)	५४
२८	व्यापाराच्या	व्यापाऱ्याच्या	,,
९	ज्याची असा	जिची अशी	५६

टीप.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
८	मला (दमयंतीला)ही	ती मी (दमयंती)ही	६०
१३	कोटि–म्हणून	मी तुझ्या बहिणीची मुलगी असें नातें जाणून, तुझा माझा संबंध समजून केलेली दया.	,,
५	'भीम'	'नल'	६१
११	अकारसहिता	अकारसहिता,	,,
१२	अकाररहिता	अकाररहिता,	,,
१९	स्त्रीभाव.	स्त्रीभाव, सुज्ञमतें (जो) योषिद्भाव.	६२
२०	गाढव.	कठोर, तीव्र, प्रखर	,,
१९	गर्व आहे ज्यांस असे	जलद जाण्याविषयीं जो गर्व आहे त्यालाही	६३
१२	हें	कपट, लबाडी, खोटसाळपणा. हें	६५
११	न तापदास	नताऽपदास	६६
१६	(अग्निसदृश)	(नलसम न=नळासारखे जे नाहींत त्यांस· अ+नल+सम=न+नल-भूप+समान)	,,
२	त्यास	तरी	६७
२३	नाकाला.	कानाला.	,,
२७	सुगुणगणवरास न वरावें ना ? [या पद्यांत–ना ?']	सुगुणगणवरासन न वरावें ? अधिक टीपा पहा. (पृ० ३५).	६९ ,,
,, २५	अशी	अशा (श्रीमति !)	५२
१६	प्रेमरूप बुबुळें	प्रेमाशिवाय; डोळ्यांचीं बुबुळें.	७२
१४	त्यान.	त्यानें.	७३
३	असें दोन्हीं	असे दोन्ही	७५
१३	स्कंधीं–	स्कंधीं (स्कंधावरते)–	७९
१९	कुबेराचा	धर्मांचा	८८
२२	कुबेरास	धर्मास. [भीमानें यक्षराक्षसांस मारिलें हें व्यर्थ साहस केलें–असें करणें योग्य नाहीं–हें धर्मशास्त्र-विरुद्ध होय–इत्यादि सामोपायांनीं भीमाला आटोक्यांत आणण्याचा उद्योग धर्मानें केला.]	,,

टीप.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
१७	त्या. अर्जुनाला	त्या धर्माला. ['त्यां' असें पद असेल तर त्या द्रौपदी–धर्म–भीम–नकुल–सहदेव–यांस असा अर्थ करावा.]	८९
१८	त्यांच्या (द्रौप–कांच्या)	अर्जुनाच्या	,,
९	तापस	तामस	९०
११	असें म्हण इंद्र म्हणे.	असें इंद्र म्हणे. हे धर्मा! साधूचा असंतोष (रोष) झाला असतां विलाप करावा लागतो हें जाणून तुझा दास जो अर्जुन त्याला दिव्यास्त्ररूप करभार दिला–असें इंद्र म्हणे.	,,
१२	हस्त	करभार	,,
७	(स्वर+)	(स्वर्+)	९१
१	लागते	लाजते.	९२
१४	मीही वर्णन	मीही वर्षण	९६
२१	आज (शिव)	अज (शिव)	,,
११	पुरा इत्यादि	अधिक टीपा पहा. (पृ० ४२).	९८
१९	(उद्दंड=उ	उद्दंड=उत्	,,
११	म्हणते, पुस=	म्हणतें, पुस=	९९
१२	म्हणते–न	म्हणतें–न	,,
१३	प्राणासारखे	प्राणांसारखे	,,
१५	साहा	अभिमन्युबालकासह साहा.	,,
[illegible]	मन्या	गता (गेलेली)	१०३
१[illegible]	उद्धवलीला	उद्धवद्लीला	१०४
१५	जिरविणें.	जिरविणें; तृप्त होणें.	१०५
[illegible]	शत्रूला	परंतु. 'तूं धैर्यनिधि आणि सुधी आहेस, परंतु व्यर्थ भितोस–असा भाव.	१०६
[illegible]	तुमचा इत्यादि.	अन्वय—नातरि (तुम्ही) मराल (मग) तुमचा तो पति सनरकोटि हो	

टीप.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
		(अथवा) सामर हो.=नाहीं तर मराल, मग तुमच्या राजाबरोबर एक कोट मनुष्यें असोत अथवा अमर (देव) असोत. गंधर्व म्हणतात:—तुम्ही पळून जाणार नाहीं तर ठार व्हाल (मराल), मग तुमचा तो पति (दुर्योधन) शेंकडों कोटि लोक घेऊन येवो अथवा देवांना घेऊन येवो, आम्ही सर्वांला मारूं—असा भाव.	१०७
२१	सैन्याचे—प्रयत्न.	सैन्याचा—प्रयत्न. बल=शक्ति, सामर्थ्य.	१०८
१	अल्पहितप्रद.	लघुलोकांला हितप्रद	१०९
८	८ चित्रसेनानें	९ चित्रसेनानें	,,
९	९ मुलासह	८ मुलासह	,,
५	[यद्यपि इत्यादि.]	अधिक टीपा पहा. (पृ० ४७).	११०
१३	शिवाच्या	शिवेसारखी, दुर्गेसारखी	१११
१६	कथिला	गाइला.	११२
२३	न मेले असे.	न मेले असे, खरोखर मेलेच नाहींत जसे काय.	,,
२	दशाननाचा	दशरथाचा	११४
१७	वीरांचा	वीराचा	,,
८	(येथें	(येथें 'तिलक' याचा 'टिकला' असा	११५
३१	कांमातुरं	कामातुर	१२९
२४	दडपी.	दडपी, धमकावीना	१३०
१३	शकुनी	शकुन	१३३
१७	पर इत्यादि	अधिक टीपा पहा. (पृ०५२).	,,
११	फार	पार	१३५
१	जयद्रथापासून	भीमापासून	१३६
१४	ओंठीचें फळ	कुचला, काजरा.	१३७
२	कवीचा	शिवाचा	१३८

टीप.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
४	पंत म्हणतातः—	शिव म्हणतातः—	१३८
७	वर्णिला	वर्णिलेला	१३९
१८	(अध्याय २७	(अध्याय २७४	,,
२४	अंत्य लघु स्वरास	अंत्य स्वराला	१४०
३	सारस्य	स्वारस्य	१४३
९	आलेलें	आलेले.	,,
१९	न येवो.	तुझ्या सुतीं दासत्व न येवो	१४५
२६	आहेत.	आहेत. [महद्विज्ञापना ६१].	१४६
१३	पातकी	पापें	१५१
२	निकृतनासा	निकृतनासा. जिचें नाक कापलें अशी	१५२
८	पावें.	पावे.	१५४
१२	दूध देणाऱ्याचे ठायीं.	ठायीं; (पक्षीं) मोक्ष देणाऱ्याच्या ठायीं. अमृत=दूध, मोक्ष. 'अमृत' शब्द श्लिष्ट आहे.	,,
११	इंद्रचंद्रांचा राहू.	इंद्रचंद्राचा राहु	१५६
,,	इंद्र व चंद्र याचा पराजयकर्त्ता.	इंद्ररूप चंद्र याचा पराजयकर्त्ता.	,,
१२	३२	१२	१५७
१४	(रघुवंश—सर्ग १ श्लोक ३८.]	[चारित्रवर्द्धनकृत 'शिशुहितैषिणी' नामक रघुवंशटीका सर्ग १ श्लो० ३८]	१६०
५	सुग्रीव याची बायको तारा	सुग्रीव याची बायको रुमा	१६२
१२	भुजग (सर्प; बाहुटे, बाहुभूषणें) मोहा मोहूत	भुजग (सर्प; बाहुटे, बाहुभूषणें) मोहूत	१६३
,,	स्तनग असतां कसे मोह पावलां?	स्तनग असतां कसे मोहा (मोह पावतां?)	,,
१४	ज्यांत (ज्या कार्यी—स्थळीं) यश श्रेष्ठ (उत्तम) त्यांत मरण बरें	ज्यांत (ज्याकार्यी—स्थळीं) यश, त्यांत मरण बरें.	१६६
,,	सामान्य (अगदीं साधारण) आहे,	सामान्य (अगदीं साधारण) आहे, श्रेष्ठ न—श्रेष्ठ नाहीं, त्याहून राज्य श्रेष्ठ न (नाहीं)	,,
१	वानरसेन	वानरसेना	१७१

टीप.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
६	महाबुद्धिसंपन्न रामानें	महाबुद्धिसंपन्न नलानें	१७२
४	रावणाविषयीं तीव्र	रणाविषयीं तीव्र	१७४
५	त्याच्या (इंद्रजिताच्या) स्वामीनें (रावणानें).	त्या मेंढ्याच्या मालकानें धनगरानें	१७६
२४	जसें मूर्ख	मरण, जसें मूर्ख	१७८
१२	येथपर्यंत	या पद्याच्या अखेरपर्यंत	१८१
८	पापी रावणानें.	ज्या दुष्ट विलापरवानें.	१८२
४	'लोकसंग्रह'	'लोकसंग्रह'	१८३
१७	हे सुखदे मोकळिके !	हे मोकळिके !	,,
१८	(अल्पमान) भंग न व्हावा	(अल्पमात्र) भंग व्हावा	१८४
५	आपलें उत्तम	उत्तम	१८५
,,	जें व्रत तत्पर	जें व्रत त्यांत तत्पर	,,
२४	आनंद व चैतन्य	मुद्+चित्+ओघांहीं=आनंद व चैतन्य	१८६
४	अलंकार समजवा	अलंकार समजावा	१८७
१	रुक्मेला.	रुमेला बरोबर घेऊं दे.	१८९
१७	आलेल्या जामाता (जांवयास)	आलेला जामाता (जांवई)	१९१
२३	शंकराला	शंकर.	,,
१६	किंवा बृहत्शब्द)	किंवा दुसऱ्याचा शब्द)	१९२
३	नदी	नदी 'इकडे नई तिकडे वई' या म्हणींत हा शब्द आढळतो. पंतांनीं याचा उपयोग क्वचित् केला आहे (मोल्स्वर्थ पृ० ४४६).	१९२
३	म्हणे नाम गा	म्हणे नामगा	१९६
,,	॥ २० ॥	॥ २९ ॥	,,
१७	जाणणारी.	जाणणाऱ्या राजा	१९९
१२	मूर्ति भ्रमत्ये भ्रमत्ये	मूर्ति भ्रमत्ये (व) मति भ्रमत्ये	२०३
३	नदिपतिरपु	नदिपतिरिपु	२०४
,,	'त्वद्वंधंची	'त्वद्बंधूंचीं	,,
१४	चंद्रदेव	चंद्र	२०५
१५	तो यमराज	तो देव यमराज	,,

टीप.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
११	भागेन.	भाग न.	२०७
१	२	१	२१८
१८	दानक्रियांची	दोन क्रियांचीं	२२२
१७	यमधम	यमधर्म	२२३

00066051

Digitized with financial assistance from
Ms.Vaidehi Thakar
on 06 November, 2019